# स्पंदशास्त्र

अर्थात

## सिद्धयोग साधन पद्धती



संकलक : डॉ. केशव रामचंद्र जोशी
एम. ए. पीएच. डी.

# स्पंदशास्त्र

## अर्थात्

## सिद्धयोग साधन पध्दती



संकलक डॉ. केशव रामचंद्र जोशी
एम्.ए. पी.एच्.डी.

।।श्रीगुरुःशरणम्।।

।। ॐ श्रीमद् अमृतमूर्तये शिववामनाय नमः ।।

।। ॐ नमः स्वस्पन्दात्मसंविन्मूर्तये शम्भवे ।।

# स्पंदशास्त्र

## अर्थात्

# सिद्धयोग साधन पद्धती



-: संकलक :-

डॉ. श्री. केशव रामचंद्र जोशी

एम्.ए.; पीएच्. डी.

● **प्रकाशक :**
व्यवस्थापक,
सिद्धयोग प्रकाशन,
३, गौरीशंकर अपार्टमेंट,
सर्वे नं. १४/१/२, वडगाव (बुद्रुक),
सिंहगडपथ, पुणे - ४११०५१.


● **संगणकीय अक्षर जुळणी :**
संजीवनी, ५ न्यू संजोग,
राधा नगर, तुळिंज,
नालासोपारा (पूर्व), ता.वसई,
जि. ठाणे - ४०१२०९

● **मुद्रक :**
प्रसाद मुद्रणालय,
मनःशान्ती, ५०४, शनिवार पेठ,
मेहुणपुरा, पुणे - ४११ ०३०.

● **प्रकाशनकाल :**
प्रथमावृत्ती : इ.स. १९७५
द्वितीयावृत्ती : इ.स. २००१

● **मूल्य ३००/- रुपये**

॥ योगिराज सद्‌गुरू श्रीसन्त वामनरावजी गुळवणीमहाराज ।



शक्तिपाताचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।
ब्रह्मस्थितीचा निर्धारू । शाम्भव योगी ॥
जन्म : शके १८०८, दि. २३/१२/१८८६, मार्गशीर्ष वद्य १३, श्रीक्षेत्र कुडुत्री.
समाधी : शके १८९६, दि. १५/१/१९७४, पौष वद्य ८, श्रीक्षेत्र पुणे.

# अनुक्रमणिका



*****

# स्पंदशास्त्र

## -: पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना :-

**प्रास्ताविक :-**

**शिवः शक्त्या युक्तो यदि भवति शक्तः प्रभवितुं**
**न चेदेवं देवो न खलु कुशलः स्पन्दितुमपि।**

श्रीमद्भगवत्पाद जगद्गुरू आद्यशंकराचार्यांनी आपल्या सौंदर्यलहरीच्या पहिल्या श्लोकातच स्पंदशास्त्राचे उद्घाटन करून त्याचे अपूर्वत्व स्पष्ट केले आहे. जर श्रीशिव शक्तीने युक्त असतील तरच ते सृष्टिरचना करण्यास समर्थ होतात. एरवी असे जर नसते तर श्रीशिव स्पंदित होण्यालाही योग्य ठरले नसते. श्रीशिव स्वरूपतः अनादि, अनंत, स्वयंसिद्ध, स्वप्रकाशी, नित्यतत्त्व, देशकालातीत, सर्व-अवच्छेदहीन आणि सकल भेदबाधाशून्य असे आहेत. श्रीशिव म्हणजे सर्वथैव निरपेक्ष अशी सत्ता आहेत. ते स्वतःच निष्कारण असून समस्त चराचर विश्वाचे एकमात्र कारण आहेत. हे कारण म्हणजेच त्यांची शक्ती आहे. या शक्तीच्या बरोबर ते नित्यमुक्त अशा स्थितीत असतात. त्यामुळे श्रीशिवशक्तिसंबंधाच्याविषयी नाथयोगी **"सिद्धसिद्धान्तसंग्रह"** या ग्रंथात असे म्हणतात की -

**शिवस्याभ्यन्तरे शक्तिः शक्तेरभ्यन्तरे शिवः।**
**अन्तरं नैव पश्यामि चन्द्रचन्द्रिकयोरिव।।**

श्रीशिवात शक्ती व शक्तीत श्रीशिव सामावलेले असून ते एकरूप झालेले असतात. ज्याप्रमाणे चंद्र व चांदणे या गोष्टी दोन नसतात त्याप्रमाणेच श्रीशिव व शक्तीत अंतर नसते. एकाच अद्वितीय परमतत्त्वास दृष्टिभेदानुसार श्रीशिव किंवा शक्ती ही संज्ञा प्राप्त होते. श्रीशिव शक्तिरूप होऊन सर्व दृष्ट आकारांमध्ये स्फुरित होतात. दोन्ही अन्योन्याश्रयभूत असे आहेत.

अशा प्रकारे सूर्य व सूर्यकिरणांप्रमाणे अभिन्न असलेले श्रीशिवशक्ती हे विश्वाची उभारणी-संहारणी करीत असतात. या दृष्टीने **"सिद्धसिद्धान्तसंग्रह"** या ग्रंथात असे म्हटलेले आहे की :-

**प्रसरं भासते शक्तिः सङ्कोचं भासते शिवः।**
**तयोः संयोगकर्ता यः स भवेद्योगिराट्।।**

विस्तार, प्रसार किंवा उभारणीत शक्ती भासमान होते व संकोच, लय किंवा साम्यावस्थेत श्रीशिव भासमान होतात. अशा श्रीशिव-शक्तीचे ऐक्य करणाराच योगिश्रेष्ठ होतो. हे ऐक्य श्रीसद्गुरुकृपेने जेव्हा अनादि निद्रिस्थ शक्ती जागृत होते तेव्हा घडून येते. बहिर्मुखतेने स्पंदित झालेली शक्ती अंतर्मुख होऊन सुषुम्णामार्गाने प्रवाहित होत होत स्वस्पंद अशा श्रीशिवावस्थेला प्राप्त होते. अज्ञानी माणसाला स्पंदाचे प्रवाह पतित करण्यासाठी नेहमीच उद्युक्त असतात. यासाठी श्रीसद्गुरुकृपेने प्राप्त झालेले सिद्धयोगाचे साधन साधक करीत राहिला म्हणजे स्पंदतत्त्वाचा विवेक होऊन त्याला त्याच्या मूळ स्वरूपाची अभिव्यक्ती होते. या अभिप्रायानेच **"सिद्धयोगसाधन हा चिंतामणी आहे"** व **"सिद्धयोगसाधन हे वज्राचे टोक आहे."** हे दोन अपूर्व सिद्धान्त या स्पंदशास्त्रात राबवून शास्त्रकारांनी त्यांची सिद्धी केली आहे.

श्रीशिवांपासून म्हणजे सहस्त्रारापासून पृथ्वीपर्यंत म्हणजे मूलधारापर्यंत जो विस्तीर्ण सुषुम्णा पथ आहे तो चिद्वस्तूनेच म्हणजे जागृत कुंडलिनी शक्तीनेच सिद्ध होतो. यासाठी श्रीसद्गुरूंच्या कृपेने शक्तिपात होणे आवश्यक असते. श्रीसद्गुरूंच्या कृपेलाच शास्त्रीय परिभाषेत शक्तिपात असे म्हणतात. शक्तिपात म्हणजे ज्ञानाचे दान करण्याची अलौकिक व लोकोत्तर प्रक्रिया होय. अशी प्रक्रिया घडली की, स्वस्पंद श्रीशिवावस्था साधकाला प्राप्त होते. जीव कितीही अधमाधम वासनेने व भोगाकांक्षेने युक्त असला व स्पंदाच्या प्रवाहात वाहत जात असला तरी ज्यावेळेस त्याच्यावर शक्तिपात होतो त्यावेळी त्याच्या अधोगतीचा प्रवाह ऊर्ध्वगती होऊन तो ब्रह्मपदाला अवश्य पोहोचतो. श्रीभगवंताच्या शक्तीचा महिमा अपार आहे. शक्ती जेव्हा श्रीसिद्धगुरूकडून साधकात संक्रात-जागृत-होते तेव्हा ती जीवाला सर्व प्रकारच्या भोगवासनेतून सोडवून स्वस्पंद अशा श्रीशिवावस्थेला पोहोचविल्याशिवाय शांत होत नाही.

श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी **"श्रीज्ञानेश्वरी"** या ग्रंथाच्या १८ व्या अध्यायात उपरोक्त प्रक्रिया श्रीमद्भगवद्गीतेच्या ६२ व्या श्लोकावर टीका करताना अवघ्या चार ओव्यात पुढीलप्रमाणे मांडली आहे.

**तया अहं वाचा चित्त अंग। देऊनियां शरण रिग।**
**महोदधी का गांग। रिगाले जैसें।।१३१९।।**
**मग तयाचेनि प्रसादें। सर्वोपशांतिप्रमदे।**
**कांतु होऊनिया स्वानंदें। स्वरूपीचि रमसी।।१३२०।।**
**संभूति जेणें संभवे। विश्रांति जेथें विसंवे।**
**अनुभूतीही अनुभवे। अनुभवा जया।।१३२१।।**
**तिये निजात्मपदींचा रावो। होऊनि ठाकसी अव्ययो।**
**म्हणे लक्ष्मीनाहो। पार्था तूं गा।।१३२२।।**

सिद्धयोग ही एक अत्यंत प्राचीन अशी साधन पद्धती आहे. या सिद्धयोग साधन पद्धतीमध्ये अगदी प्रारंभापासून परमतत्त्वाचे एक नाव "स्पंद" असे प्रचलित आहे. शुद्धात्मा, श्रीशंकर, श्रीशिव, भाव, स्वभाव, ज्ञाता व सामान्य ही त्याची अन्य नावे आहेत. सर्वदर्शन संग्रहामध्ये याला "श्रीशिवदर्शन" असे म्हटले आहे. आचार्य भट्ट श्रीकल्लटाने आपले श्रीगुरू श्रीवसुगुप्त यांच्यापासून या स्पंदशास्त्राचे म्हणजे सिद्धयोगशास्त्राचे रहस्य प्राप्त करून केवळ एकावन्न कारिकांच्यामध्ये त्याची गुंफण केली आहे. दहाव्या शताब्दीच्या मध्यकाळी श्रीउत्पलाचार्यांनी "**स्पंद-प्रदीपिका**" या नावाने वरील ग्रंथावर टीका लिहिली. हे पुस्तक संस्कृत भाषेमध्ये असून इ.स.१९९८ मध्ये मेडिकल हॉल प्रेस, काशी, येथून प्रकाशित झाले आहे. सिद्धयोगाचे साधन करणाऱ्या साधक-वाचकांना मूळ ग्रंथ, अर्थ-विवरण व भाषांतरासह मराठीत उपलब्ध करून द्यावा व सिद्धयोगाचे समाधिधन सर्वांना प्राप्त व्हावे या हेतूने प्रसिद्ध करीत आहोत. याकामी "चिंतामणि त्रैमासिक" वर्ष ६ अंक ४ यामध्ये हिंदी भाषेत अनंतश्री स्वामीअखंडानंदसरस्वतीजीमहाराज यांनी केलेले स्पंदतत्त्वाचे विवरण व श्री.नारायण यशवंत ढेकणे, नाशिक यांच्याकडून प्राप्त झालेली या विषयाच्या मराठी विवरणाची एक वही या दोहोंचा खूप उपयोग झाला. या उभयतांचा मी ऋणी आहे.

माझे परम सद्गुरू श्रीसंत योगिराज श्री. वामन दत्तात्रेय गुळवणी-महाराज यांच्या परम कृपेने हा ग्रंथ लिहून पूर्ण झाला. सिद्धयोगाचे शास्त्र व त्याची अनुभूती त्यांच्या कृपेने सर्वांना उपलब्ध व्हावी

अशी त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

श्रीनाथ प्रिटींग प्रेसचे मालक श्री.रा.शं.नेलेकर व कामगार श्री.धर्मराज मारुती कोलते प्रभृतींनी जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांना हार्दिक धन्यवाद!

लोभ असावा ही प्रार्थना.

गुरुचरणरजसेवक

*– केशव रामचंद्र जोशी*

*****

।। श्रीगुरु:शरणम्।।

।। ॐ श्रीमद् अमृतमूर्तये शिववामनाय नमः।।

।। ॐ नमः स्वस्पन्दात्मसंविन्मूर्तये शम्भवे।।

**द्वितीयावृत्तीची प्रस्तावना :-**

माझे हृदयस्थ सद्गुरुनाथ श्रीसंत वामन दत्तात्रेय गुळवणीमहाराज हे भारतवर्षातील एक अनुपायप्रक्रियासंपन्न अनुत्तर महासिद्धयोगी, शक्तिपाताचार्यवर्य आणि लोकोत्तर, अलौकिक व एकमेवाद्वितीय असे महान् साधुपुरुष होते. त्यांच्या अपार कृपाबलाने श्रीमन् महामाहेश्वराचार्यवर्य श्रीमद् वसुगुप्त विरचित "स्पंदकारिका" अर्थात् "स्पंदशास्त्र" किंवा "सिद्धयोग साधन पद्धती" हा ग्रंथ मूळ संस्कृत श्लोक किंवा कारिका, त्यावरील श्रीउत्पलाचार्यकृत स्पंदप्रदीपिका, श्रीरामकंठाचार्यकृत विवृती, श्रीभट्टकल्लटकृत वृत्ती, श्रीक्षेमराजकृत स्पंदनिर्णय, श्रीकृष्णानंदसागरकृत स्पंदरंजनी व श्रीक्षेमराजकृत स्पंदसंदोह या टीकांचे सुबोध मराठी भाषांतर व विवेचक प्रस्तावना यांसह सिद्धयोगाच्या सर्व साधक-वाचक-भक्तांना मराठी भाषेत प्रथमच उपलब्ध होत आहे ही परमभाग्याची गोष्ट आहे.

प्रातःस्मरणीय महासिद्धयोगी श्रीसंत गुळवणीमहाराज यांनी परमहंस परिव्राजकाचार्य श्रीगंगाधरतीर्थस्वामीमहाराज, परमहंस परिव्राजकाचार्य श्रीनारायणतीर्थस्वामीमहाराज, परमहंस परिव्राजकाचार्य श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ-स्वामीमहाराज आणि परमहंस परिव्राजकाचार्य श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराज यांच्याकडून परंपरेने प्राप्त झालेला सिद्धयोगसाधनगंगेचा पवित्र व निर्मळ प्रवाह प्रवाहित करून आसेतुहिमाचल पसरलेल्या भारतवर्षातील हजारो-हजार साधकांना अनुपायप्रक्रियासंपन्न व अनुत्तर अर्थात् सर्वश्रेष्ठ अशी शक्तिपातयोगदीक्षा देऊन कृतार्थ केले होते. त्यांच्या अनुज्ञेनेच या सिद्धयोगसाधनपरंपरेची अक्षुण्णधारा "**ना आदिगुरु शंकरा। लागोनि शिष्यपरंपरा। बोधाचा हा संसरा। जाला जो आमुतें ।।१८.१७५९।। तो हा तूं घेऊनि आघवा। कळीं गिळितयां जीवां। सर्व प्रकारी घांवा। करीं पां वेगीं।।१७६०।।**" या संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराजांनी "**श्रीज्ञानेश्वरी**" या ग्रंथात सांगितलेल्या न्यायाने शब्दब्रह्मात्मक किंवा तात्त्विक अगर सैद्धान्तिक (Theoretical) आणि साधनात्मक किंवा

कृतिशील म्हणजे प्रयत्नाभ्यासात्मक (Practical) अशा उभयविध पद्धतीने माझ्याकडून प्रवाहित होत असून, या सिद्धयोग किंवा शक्तिपातयोगसाधनगंगेत अनेकानेक साधक-भक्त-योगी-मुमुक्षुजन सुस्नात होऊन आपले जीवन धन्य व कृतार्थ करण्यासाठी मार्गस्थ होत आहेत, ही परमानंदाची व चिरस्मरणीय अशी गोष्ट आहे.

सिद्धयोगसाधनपरंपरेतील व इतरही परंपरांनी प्रवाहित झालेल्या साधनाश्रयी साधकयोग्यांना शब्दब्रह्मात्मक सिद्धयोगांतर्गत उच्चस्तरीय तत्त्वांचा किंवा सिद्धान्तांचा लाभ व्हावा म्हणून आजपर्यंत श्रीमन् महामाहेश्वराचार्यवर्य महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ विरचित "**अमरौघप्रबोध**", "**अमरौघशासन**", "**योगबीज**" व "**अमनस्कयोग**" हे चार ग्रंथ आणि श्रीमन् महामाहेश्वराचार्यवर्य महासिद्धयोगी श्रीअभिनवगुप्तपादाचार्य विरचित "**तंत्रवटधानिका**" हा ग्रंथ प्रकाशित केला असून आता "**स्पंदशास्त्र**", "**स्पंदकारिका**" अर्थात् "सिद्धयोग साधन पद्धती" हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. "सिद्धयोगात" किंवा "शक्तिपातयोगात" श्रीगुरुप्रसादाने म्हणजे दीक्षेने अनादि निद्रिस्थ आत्मशक्ती कुंडलिनी जागृत झाल्यामुळे अंतरंग योगसाधन स्क्षूल, सूक्ष्म व परपातळीवर उपस्थित होऊन, ते सहजतेने आपोआप होते. या अनुपाय व अपुरुषार्थसंपन्न साधनाचे पर, उच्च व श्रेष्ठ पातळीवरील स्वरूप काय आहे, याची सांगोपांग माहिती व्हावी म्हणून साधकयोग्यांनी या ग्रंथाचा साक्षेपपूर्वक अभ्यास करून त्यातील सारग्रहण करावे.

श्रीसद्गुरुनाथमहाराज हे ज्याप्रमाणे बोधाच्या अर्थात् दीक्षेच्या ऐश्वर्याचा विस्तार आपल्या अमोघ संकल्पाप्रमाणे माझ्याकडून करवून घेत आहेत त्याचप्रमाणे त्यांच्याच इच्छेने या संप्रदायसिद्धपरंपरेने विभूषित झालेल्या सिद्धयोगसाधनगंगेचे निखळ शास्त्रीय स्वरूप साधकांना व अभ्यासू वाचकांना उपलब्ध व्हावे म्हणून त्यांनी कितीतरी ग्रंथ माझ्याकडून लिहून घेतले. आत्तापर्यंत प्रसिद्ध केलेल्या सर्व ग्रंथांपेक्षा या ग्रंथाचे स्वरूप सर्वस्वी निराळे असून ते शक्तिपातयोगाच्या किंवा सिद्धयोगाच्या उच्च स्तरावरील अभ्यासाने युक्त असे आहे. जरी हा सर्व अभ्यास किंवा त्याचे स्वरूप हे अत्यंत दुरूह असले तरी श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी "**अनुभवामृत**" या ग्रंथात "**शिवशक्तिसमावेशें। मियां नमन केलें ऐसें। रंभागर्भ आकाशें। रिगाला जैसा।।१.६४।।**" असे म्हणून श्रीशिव व शक्ती यांच्या समावेशाचा

व तद्वारा नमनाचा म्हणजे अंतिम सामरस्यसिद्धीचा जो अनुत्तर, एकमेवाद्वितीय, अलौकिक व अपूर्व सिद्धान्त मांडला आहे, त्याचा उलगडा करून घ्यावयाचा असेल व सिद्धयोगाचे किंवा शक्तिपातयोगाचे अनुत्तरस्वरूप आकळावयाचे असेल तर महामाहेश्वराचार्यवर्य श्रीअभिनवगुप्त, श्रीसोमानंद, श्रीशंभुनाथ, श्रीजयरथ, श्रीक्षेमेंद्र, श्रीउत्पलदेव, श्रीवसुगुप्त इत्यादि कौल, त्रिक, स्पंद, प्रत्यभिज्ञा, त्र्यंबक किंवा तत्सम मार्गासंबंधी लिहिलेल्या ग्रंथांचा अभ्यास करणे नितांत आवश्यक असून या धारणेपोटीच हा ग्रंथ प्रसिद्ध करीत आहे. "**कानडेचि अभ्यासावे निरंतर,**" या श्रीसमर्थरामदासस्वामीमहाराजांनी सांगितलेल्या न्यायाने साधक-भक्त-वाचकांनी या ग्रंथाचा आस्वाद घ्यावा. त्याचप्रमाणे सिद्धयोगात श्रीगुरुकृपेने आत्मशक्ती कुंडलिनी जागृत होऊन योगसाधन सहजतेने आपोआप होत असल्यामुळे त्यात पुरुषार्थसंपन्न अभ्यासाचे कारण पडत नाही; मात्र साधकाला जागृत कुंडलिनी शक्तिरूप श्रीसद्गुरूंना शरणागतसंपन्न होऊन साधन करावे लागते. या दृष्टीने सिद्धयोगाच्या साधकांनी या ग्रंथाचा अभ्यास करून सार ग्रहण करावे.

"**स्पंदशास्त्र**" किंवा "**स्पंदकारिका**" या ग्रंथाच्या मूळ कारिका एकूण ५३ असून त्यातील प्रत्येक कारिका एकेका सूत्रासारखी आहे. या ग्रंथाचे एकूण चार अध्याय टीकाकारांनी पाडलेले असून त्यांना नावेही दिली आहेत; मात्र त्यांनी हे विभाजन आपापल्या मताप्रमाणे केलेले असल्यामुळे प्रत्येक अध्यायातील कारिका कमी-अधिक अर्थात् पुढे-मागे झाल्या आहेत. या ग्रंथाच्या चार अध्यायांची नावे क्रमशः स्वरूप स्पंदनिष्यंद, स्वभावोपलब्धी किंवा सहजविद्योदय, विश्वस्वभावशक्त्युपपत्ती व अभेदोपलब्धी अर्थात् विभूतिस्पंद अशी आहेत. या ग्रंथातील अध्याय अर्थात् निष्यंदांची नावे जरी श्रीरामकंठाचार्यकृत विवृतीप्रमाणे दिलेली असली व तसे विभाजन केलेले असले तरी इतरांनी निष्यंदांचे निराळेपणाने केलेले विभाजन व त्यांना दिलेली नावे तेथे दिली आहेत.

सिद्धयोगाच्या उच्चतम तत्त्वज्ञानाचे सर्वंकष स्वरूप "**स्पंदशास्त्र**" किंवा "**स्पंदकारिका**" या ग्रंथात कसे प्रकट झाले आहे, हे आता पाहवयाचे आहे. जगातील सर्व दार्शनिकांनी कोणत्या ना कोणत्या रूपात संसाराच्या मूळ पदार्थाचा विचार केला आहे. भारतीय दर्शनात या पदार्थांचे

"तत्त्व" म्हणून सर्व दार्शनिकांनी वर्णन केले आहे. मूळ तत्त्व जाणले अर्थात् त्याच्याशी समरस झाले की, मोक्ष किंवा स्वसंवेद्य आत्मस्वरूपाची प्राप्ती होते व मूळतत्त्वाच्या विकृत रूपात गुंतल्यामुळे प्राणी बंधनात पडतो. हे बंधन किंवा आवरण दूर होणे हेच तत्त्वज्ञानाचे खरे स्वरूप आहे. तत्त्व म्हणजे पद, ब्रह्म, पुरुष, स्वसंवेद्य आत्मरूप किंवा श्रीशिव होय व ज्ञान म्हणजे शक्ती, कुंडलिनी, सत्ता, प्रकृती किंवा माया होय. ज्ञान झाले की, तत्त्वाची प्राप्ती होते. "**अतोऽत्यन्तप्रसिद्धं ज्ञानं ज्ञाताऽप्यत एव प्रसिद्ध इति। तस्माज्ज्ञाने यत्नो न कर्तव्यः किं त्वनात्मबुद्धिनिवृत्तावेव तस्माज्ज्ञाननिष्ठा सुसम्पाद्या।**" असे श्रीमदाद्यशंकराचार्यांनी "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथाच्या अठराव्या अध्यायातील पन्नासाव्या श्लोकावर भाष्य करताना म्हटले आहे. याचा अर्थ असा आहे की, ज्ञान अत्यंत प्रसिद्ध आहे; कारण ज्ञात्यावाचून केवळ ज्ञानाची सिद्धीच होणे शक्य नाही. (याप्रमाणे ज्ञान सर्वथा सिद्धच असल्यामुळे त्याविषयी भावना, उपाय, मार्ग इत्यादि विधी नाही.) याकरिता ज्ञानाविषयी यत्न करावयास नको; तर अनात्मबुद्धी निवृत्त करण्यासाठीच साधना करावयास पाहिजे. त्यामुळे ज्ञाननिष्ठा अनायासाने संपादन करता येण्यासारखी आहे. ही ज्ञाननिष्ठा संपादन करण्याची जी साधने आहेत तीही ज्ञानरूपच आहेत असे "**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम्।।१३.११।।**" या "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथातील श्लोकावर टीका करताना श्रीमदाद्यशंकराचार्यांनी, "तत्त्वज्ञानाचा अर्थ मोक्ष असून सर्व संसाराचा उपशम, त्याचे आलोचन करणे, हे तत्त्वज्ञानार्थदर्शन होय व या तत्त्वज्ञानासाठी सांगितलेले साधनजातही ज्ञानच होय; कारण ते ज्ञानासाठी आहे," असे म्हटले आहे.

अशा या तत्त्वज्ञानाची प्राप्ती झाली की, जीवाला मोक्षप्राप्ती होते; कारण "**तत्त्वज्ञानान्निश्रेयसाधिगमः।**" असे शास्त्रवचन आहे. जीव हा मूळचा ब्रह्मस्वरूप आहे; पण त्याला आपल्या स्वस्वरूपाचे स्वसंकोचामुळे अज्ञान प्राप्त झाल्यामुळे तो जीवभावाला प्राप्त होऊन बद्ध झाला आहे. या अज्ञानाची निवृत्ती स्वस्वरूपाचे अपरोक्षज्ञान झाल्याशिवाय इतर कोणत्याही उपायांनी होत नाही. ज्याप्रमाणे प्रकाशाशिवाय अंधकाराचा विनाश इतर कोणत्याही उपायांनी किंवा साधनांनी होत नाही त्याप्रमाणे तमोरूप अज्ञानाची निवृत्ती तत्त्वज्ञानाशिवाय इतर कोणत्याही साधनांनी होत नाही. अज्ञानाच्या व

जन्ममरणचक्रपरंपरेच्या फेऱ्यातून मुक्त होण्याकरिता जीवाला तत्वज्ञानप्राप्ती अर्थात् स्वसंवेद्य आत्मस्वरूपाशी समरस होणे हा एकच उपाय आहे व हे सर्व जग प्रकाशयुक्त परमात्मस्वरूप अर्थात् "**जग ही असी की वस्तुप्रभा**" आहे अशी जाणीव होणे, हेच या तत्वज्ञानाचे स्वरूप आहे.

जीव, जगत् आणि ईश्वर यांचे खरे स्वरूप काय आहे? हे कळून येणे याला तत्त्वज्ञान असे म्हणतात. ज्यावेळी "**तरी गुरु दाविलिया वाटा। येऊनि विवेकतीर्थतटा। धुऊनियां मळकटा। बुद्धीचा तेणे।। श्रीज्ञानेश्वरी १८.१०११।।**" याप्रमाणे ज्यावेळी श्रीगुरूंनी शक्तिपात करून दाखविलेल्या सिद्धयोगमार्गाच्या वाटेने जाऊन साधक शुद्ध होतो त्यावेळी त्याला तत्त्वज्ञानरूप सामरस्याची प्राप्ती होते. या प्राप्तीमुळे जीव, जगत् व ईश्वर ही भिन्न नसून एकरस व परिपूर्ण आहेत असा बोध होऊन द्वैत प्रपंचाचा बाध होतो. असे झाले म्हणजे ब्रह्म सत्य आहे, जगत् प्रकाशरूप आहे व जीव आणि परमात्मा म्हणजे श्रीशिव आणि शक्ती ही समरस आहेत असा अनुभव येऊन वेदान्ताचा परम सिद्धान्त सिद्ध होतो. शेवटी एक अद्वितीय, निष्प्रपंच व सच्चिदानंद अशी श्रीशिवशक्तियुक्त व परब्रह्मरूप स्वसंवेद्य आत्मवस्तूच शिल्लक राहते. यालाच अद्वयावस्था किंवा समरसावस्था असे म्हणतात.

उपरोक्त दृष्टीने विचार केला असता जीव, जगत् व ईश्वर यांच्या रूपाने होणारी पिंडब्रह्मांडाची उभारणी व सिद्धयोगसाधनाने या सर्वांची संहारणी होऊन सामरस्यावस्थेची प्राप्ती कशी होते, हे "**स्पंदशास्त्र**" किंवा "**स्पंदकारिका**" या ग्रंथाधारे पाहिले म्हणजे या ग्रंथाच्या वास्तविक स्वरूपाचे रहस्य लक्षात आल्यावाचून राहणार नाही.

प्रथमतः स्पंदशास्त्रकार महामाहेश्वराचार्यवर्य श्रीवसुगुप्त यांनी जीवाचे किंवा पिंडाचे जे स्वरूप "**स्पंदशास्त्र**" किंवा "**स्पंदकारिका**" यांच्या द्वारा कथन केले आहे, ते साररूपाने पाहू.

श्रीशिवच आपल्या स्वातंत्र्यशक्तीने स्वतःच स्वतःला संकुचित करून जीव झालेले आहेत. या दृष्टीनेच "**प्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथातील "**चितिसङ्कोचात्मा चेतनोऽपि संकुचितविश्वमयः।।४।।**" व "**चितिरेव चेतनपदादवरूढा चेत्यसङ्कोचिनी चित्तम्।।५।।**" ही दोन्ही सूत्रे पाहण्यासारखी आहेत. या सूत्रांचा अर्थ असा आहे की, चिती म्हणजे चैतन्याशी

अर्थात् श्रीशिवाशी एकरूप किंवा समरस असलेली शक्ती ही संकुचित झालेला आत्मा अर्थात् जीवात्माच आहे. ही (आत्मरूपाशी अभिन्न म्हणजे एकरूप किंवा समरस असलेली शक्ती) चेतन अर्थात् प्रकाशमय असूनही संकुचित अवस्थेमध्ये विश्वरूप व जीवरूप धारण करते.।।४।। ज्यावेळी चितिशक्ती ही चेतनपदावरून खाली उतरून प्रत्यक्ष विषयांच्या द्वारा संकुचित होते त्यावेळी तिला चित्त (जीव) असे म्हणतात. या अवस्थेमध्ये विशुद्ध चित्-तत्त्व हे आपलेच रूपांतर असलेल्या मायाशक्तीच्या द्वारा आपल्याच अभिन्न अशा ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती आणि मायाशक्ती यांचा संकोच करून अर्थात् संकुचित करून सत्त्व, रज व तमोगुणात्मक किंवा बुद्धी, मन व अहंकार यांच्या समष्टिरूपाने चित्तरूप अर्थात् जीवरूप धारण करतें.।।५।।

चैतन्य म्हणून सर्व ठिकाणी एकच आहे. या चैतन्यालाच प्रकाशरूप आत्मा असे म्हणतात. या दृष्टीनेच "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात "**चैतन्यात्मा।।१.१।।**" असे म्हटले असून "**श्रीज्ञानेश्वरी**" या ग्रंथात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी "**ऐसें उपाधीचेनि पाडें। क्षणिकत्व यातें जोडे ।।१५.५००।। एवं जीवचैतन्य आघवें। हे क्षर पुरुष जाणावे ।।१५.५०१।।**" व "**जेणें चैतन्या ईश्वर ब्रह्मा। देहचि केले परमसीमा ।।१८.३८२।।**" असे सांगून उपाधीमुळे सीमाबद्ध झालेल्या जीवाचे मूळ आत्मस्वरूप चैतन्यरूप आहे असे म्हटले आहे. हा आत्माच उपाधी, प्रतिबिंब, माया, संकल्प, कल्पना, स्फूर्ती, आभास किंवा अन्य पद्धतीने संकोचरूप धारण करून जीव होत असतो. ज्यावेळी चैतन्याला पूर्व संस्कार चिकटतात त्यावेळी त्याला जीव असे म्हणतात. चैतन्य हे व्यापक असल्यामुळे जीवही व्यापक असतो; परंतु अज्ञानामुळे, कल्पनेमुळे किंवा संकोचामुळे अगर पिंडब्रह्मांडाच्या उभारणीच्या तत्त्वज्ञानातील कोणत्याही प्रक्रियेमुळे आपण व्यापक आहोत हे जीव विसरून जातो. "**स एतमेव सीमानं विदार्यैतया द्वारा प्रापद्यत।।१.३.१२।।**" अर्थात् ईश्वरच या शरीरात मस्तकातील छिद्रातून प्रवेश करून जीव बनतो. "**श्रीमद्भागवत**" या ग्रंथाच्या एकादश स्कंधातही आत्माच जीव बनतो हे सांगताना असे म्हटले आहे की -

**स एष जीवो विवरप्रसूतिः प्राणेन घोषेण गुहां प्रविष्ट।**
**मनोमयं सूक्ष्ममुपेत्य रूपं मात्रा स्वरो वर्ण इति स्थविष्ठः।।११.१२.१७।।**

परमात्माच जीवरूपाने आधारादि चक्रांमध्ये अभिव्यक्त होतो. त्यामुळे तो अपरोक्ष अर्थात् साक्षात् व्यक्त होतो. सर्व जीवांना जीवन देत असल्यामुळे जीव या संज्ञेस प्राप्त झालेला परमेश्वर "परा" संज्ञक नादयुक्त प्राणासह आधारचक्रमध्ये, "पश्यंती" वाणीच्या रूपाने मणिपूरचक्रात, "मध्यमा" वाणीच्या मनोमय सूक्ष्मरूपाने विशुद्ध चक्रात व "वैखरी" वाणीच्या रूपाने मुखात प्रविष्ट होऊन मात्रा, स्वर व वर्ण इत्यादींच्या रूपाने अत्यंत स्थूल होतो. या श्लोकावरील श्रीसंत एकनाथमहाराजांची **"श्रीएकनाथी भागवत"** या ग्रंथातील टीका पाहिली म्हणजे जीवाचे स्वरूप अधिक स्पष्ट होईल. ते असे म्हणतात की, "परमेश्वराच्या स्वातंत्र्यशक्तीनेच स्वतःला संकुचित करून घेऊन जीवरूप धारण केलेले आहे. ही मूळ बीजशक्ती अविद्यात्मक आहे. तिला अव्यक्त ही संज्ञा आहे. परमेश्वर हा तिचा आश्रय आहे. माया हे या शक्तीचे स्वरूप आहे. तिच्यामध्ये सर्व संसारी जीव आपले खरे स्वरूप काय आहे हे न समजता स्वस्थपणे घोरत पडतात. अशी ही महानिद्रा आहे."

"**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात श्रीभगवंतांनी **"ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।।१५.७।।"** असे सांगून जीव हा आपला अंशच आहे असे स्वच्छच म्हटले आहे. याचा भावार्थ स्पष्ट करताना श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराज **"श्रीज्ञानेश्वरी"** या ग्रंथात असे म्हणतात की -

**ऐसें शरीराचि येवढें। जैं आत्मज्ञान वेगळें पडें।**
**तैं माझा अंशु आवडे। थोडेपणें।।१५.२४३।।**
**समुद्र कां वायुवशें। तरंगाकार उल्लसे।**
**तो समुद्रांशु ऐसा दिसे। सानिवा जेवीं।।३४४।।**
**तेवीं जडातें जीवविता। देहअहंता उपजविता।**
**मी जीव गमें पंडुसुता। जीवलोकीं।।३४५।।**
**पैं जीवाचिया बोधा। गोचरु जो हा धांदा।**
**तो जीवलोकशब्दा। अभिप्रावो।।३४६।।**

उपरोक्त सर्व ओव्यांमधून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जीव या शब्दाचा जो अभिप्राय प्रकट केला आहे त्यातील रहस्य प्रकट करताना म. म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी **"भारतीय संस्कृती और साधना," खंड पहिला** या ग्रंथामधील "**जपसाधना**" या लेखात असे म्हटले आहे की -

"अशा प्रकारे आत्मा स्वरूपतः पूर्णप्रकाशात्मक, परमेश्वररूप, स्वतंत्र व भोक्ता असूनही स्वेच्छापूर्वक जीवभाव ग्रहण करतो. त्यामुळे त्याचे स्वातंत्र्य व भोक्तृभाव लुप्त होऊन जातात. वास्तविक पाहता आत्म्यामध्ये सर्व शक्तींचा समावेश व समन्वय आहे. त्यामुळे आत्म्याचा पूर्ण अहंभाव स्वभावसिद्ध आहे. "अ" पासून "ह" पर्यंत सर्व वर्ण व कला एकमेकाशी व आत्म्याबरोबर अभिन्नरूपाने व अखंडभावाने स्फुरित होणे ही आत्म्याची पूर्ण अहंता आहे. चैतन्य, विमर्श, स्वातंत्र्य किंवा ऐश्वर्य ही त्याचीच दुसरी नावे आहेत. या सर्व अकरादि वर्णांचे वाच्य अनुत्तरादि विमर्श आत्माच असून तो आपल्या विमर्शाचेही स्वरूप आहे. अखंड स्थितीत हे सर्व एक व अभिन्नरूपाने प्रकाशित होतात; परंतु आत्मा ज्यावेळी स्वेच्छापूर्वक सृष्ट्युत्पत्तीला उद्युक्त होतो त्यावेळी त्याच्या स्वरूपाश्रित असणारे सर्व अकरादि वर्ण उद्भूत होतात. अद्वैत अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्यावस्थेत सर्व कला अभिन्न भावाने आंतर शब्द किंवा स्वभावरूपात राहतात. या सर्व कला तत्स्वरूपात अक्षुण्ण राहिल्यावरही सृष्टीच्या उन्मेष-दशेत जणू काही अंशतः विभक्तरूपाने क्रमशः ब्राह्मी-प्रभृती अष्ट-वर्ग शक्तींच्या आणि अ, आ इत्यादि पन्नास रुद्र शक्तींच्या रूपात अवतीर्ण होतात. अकरादि वर्ण आत्म्याशी स्वतःशी विमर्शरूप व एकरूप असूनही अज्ञानावस्थेमध्ये आत्म्यापासून भिन्नरूपात प्रतीत होतात. या स्थितीत त्या कला किंवा अंश या नावाने संबोधिल्या जातात. हीच मातृकाशक्ती होय. श्रीमदाद्यशंकाराचार्य यांनी **"श्रीदक्षिणामूर्तिस्तोत्र"** या स्तोत्रात "महाविभूती म्हणून ज्यांचा उल्लेख केलेला आहे त्यांच्या द्वाराच आत्म्याचे ऐश्वर्य किंवा वैभव लुप्त होते. कला आत्मस्वरूपापासून उत्पन्न होऊन आत्म्याचा ऐक्यभाव झाकून टाकतात. त्यामुळे श्रीशिवरूपी आत्मा हा जीव किंवा पशुरूपात उत्पन्न होतो. हाच आत्म्याचा स्वरूपसंकोच किंवा अणुभावाची प्राप्ती आहे. मग हा अणुरूपी प्रमाता किंवा जीव पूर्वी वर्णन केलेल्या अष्टवर्गीय ब्राह्मी आदि शक्ती, अकरादि रुद्रशक्ती व त्यापासून उत्पन्न झालेल्या पदवाक्यादिमय असंख्य क्षुद्रशक्तींच्या खेळाची वस्तू बनतो. मातृका अणुजीवाच्या प्रत्येक संवेदनेमध्ये अंतःपरामर्शनाच्या द्वारा स्थूल अगर सूक्ष्म असा शब्दानुवेध करतात आणि वर्ग-वर्गी इत्यादि देवतांच्या अधिष्ठनाच्या द्वारा चित्तामध्ये काम, क्रोध, लोभ, मोह, राग, द्वेषादि भाव किंवा वृत्तिसमूह उत्पन्न करतात.

अशा प्रकारे आत्म्याचे असंकुचित स्वातंत्र्यमय चिद्घनरूप झाकून जाते व देहात्मभाव, पारतंत्र्य आणि पाशबंधनाचा सूत्रपात होतो."

येथपर्यंत "**स्पंदशास्त्र**" किंवा "**स्पंदकारिका**" या ग्रंथामध्ये व त्यावरील टीकांमध्ये आलेले जीवाचे स्वरूप सूसूत्रपणे कथन केले. या दृष्टीने या ग्रंथातील जीवाच्या स्वरूपासंबंधीचे पुढील सिद्धान्त पाहणे अभ्यसनीय ठरेल.

**(१)** स्पंदशास्त्राच्या मान्यतेनुसार मूलतः पूर्णचेतन स्वस्वभाव असलेला असा वरपासून खालपर्यंत एकच प्रमाता अर्थात् जीव किंवा ज्ञाता विद्यमान आहे. स्वतंत्र व आनंदमय असल्यामुळे हा प्रमाता किंवा ज्ञाता किंवा ज्ञान करून घेणारा पुरुष पतिप्रमाता अर्थात् परमेश्वर आणि पशुप्रमाता अर्थात् जीव या दोन रूपांमध्ये अवस्थित आहे अर्थात् श्रीशिव आणि जीव ही प्रमात्याची दोन रूपे आहेत. (पृ. २५,२६)

**(२)** प्रत्येक पशूच्या किंवा जीवाच्या हृन्मंडलामध्ये निगूढ अर्थात् खोल रूपामध्ये असलेल्या ज्ञानक्रियात्मक स्पंदशक्तीच्या खऱ्या, स्वतंत्र तसेच सामान्य रूपाचे विस्मरण हाच त्या जीवाचा पाश आहे. (पृ. २७)

**(३)** प्रमाता म्हणजे जीवाच्या अंतःकरणात, बाहेर आणि अन्य पदार्थांत राहणारी पूर्ण व परिमित म्हणजे संकुचित श्रीवामेश्वरी आदि (देवी) सम्यक् ज्ञान आणि अज्ञानाने मुक्ती व बंध प्रदान करीत असतात.(पृ. ११०)

**(४)** हा शाक्तवर्ग एकीकडे अज्ञानी पुरुषांना (जीवांना) अधोगतीच्या गर्तेमध्ये लोटीत असतो तर दुसरीकडे श्रीसद्गुरूंच्या कृपेने निर्मळ हृदय बनलेल्या पुरुषांना श्रीशिवभावर आरूढ करण्याची क्षमता या शक्तिवर्गामध्ये असते. (पृ. ११०)

**(५)** ज्यावेळी संकुचित म्हणजे परिच्छिन्न शक्तींच्या द्वारा (जीव) मोहित होत नाही त्यावेळी तो शरीरी परमेश्वर "श्रीशिवभट्टारकच" असतो. (पृ. ११०)

**(६)** तो प्रमाता म्हणजे जीव आपल्या अंगरूप पदार्थांचा स्वामी आहे असे म्हटले जाते. मात्र मायेच्या द्वारा या पदार्थांचा भेद झाल्यावर तो क्लेश-कर्मादींमुळे पशू अर्थात् जीव होतो. (पृ. १२४)

**(७)** (जीवाला) स्वरूपाच्या अपूर्णतेची अनुभूती ही आणव, मायीय

आणि कार्म या तीन रूपांमध्ये अभिव्यक्त होत असते. (पृ.१४०)

**(८)** मायेचा स्वीकार केल्याकारणानेच बोध मलिन होऊन पुरुष पशू होतो. हा पुरुष पशू काल, कला, नियती, राग व अविद्येने उत्तम रीतीने बांधलेला असतो. (पृ. १४५)

**(९)** ज्यावेळी या आधी सांगितलेल्या आणि पुढे सांगितल्या जाणाऱ्या उपपत्तींच्या घट्ट पकडीमुळे आणि अनुभवामुळे अभिलाषांनी विवश झालेल्या ग्राहकाच्या (जीवाच्या) अभिमानाने युक्त असा क्षोभ अनात्म्यामध्ये आत्माभिमानाची निवृत्ती करीत आत्म्यामध्ये अनात्माभिमानाची शांती प्रकर्षाने करतो त्यावेळी त्या जीवाला श्रेष्ठ असे स्पंदतत्त्वात्मक पद प्राप्त होते. (पृ. १४८)

**(१०)** शास्त्रकारांनी आध्यात्मिक संदर्भाने संसाराच्या प्रमातृवर्गाला अर्थात् ज्ञातृवर्गाला किंवा जीववर्गाला अबुद्ध, बुद्ध, प्रबुद्ध आणि सुप्रबुद्ध या चार प्रकारामध्ये विभक्त केलेले आहे. (पृ. २२६)

**(११)** श्रीभगवान् हे परमकारुणिक अर्थात् परमदयाळू आहेत. यामुळे या श्रीभगवंतांच्या शक्तिपातामुळे किंवा कृपेमुळे कोणत्याही वेळी एखाद्या प्रमात्यामध्ये किंवा जीवामध्ये अकस्मात् अशी योग्यता निर्माण होते की, त्या जीवाच्या अंतःकरणातील तपामध्ये किंवा अंधकारामध्ये दिव्य अशा श्रीशांकरभक्तीची किरणे स्वयं प्रवेशतात. (पृ. २२७)

**(१२)** प्रबुद्ध योगी अर्थात् साधक जीव हाच श्रीगुरूपदेशासाठी उपयुक्त अर्थात् योग्य पात्र आहे. (पृ. २२८)

**(१३)** गुणादि रूपाने प्रवाहमान असणारे हे विशेषस्पंद प्रतिक्षण चिद्रूप असणाऱ्या स्वतःच्या वास्तविक स्थितीवर आवरण घालण्यासाठी अर्थात् चिद्रूपावस्था झाकण्यासाठी उद्युक्त किंवा टपलेले असतात. हे विशेषस्पंद ज्यांना स्पंदतत्त्वाचे ज्ञान झालेले नाही अशा प्रबुद्ध बुद्धीच्या जीवांना दुस्तर अर्थात् तरून जाण्यास अवघड अशा भयंकर संसारमार्गात पाडतात. (पृ. २५०)

**(१४)** सर्व रीतीने स्वतंत्र असलेले श्रीशिव हे स्वतःच्या शक्तीच्या विरोधामुळे अस्वतंत्र अर्थात् परतंत्र पशू बनत असतात. असे संकोच पावलेले श्रीशिव हे अशुद्ध संसाराचे किंवा मार्गाचे प्रवासी बनलेले असतात. (पृ. २५४)

**(१५)** हे कालतत्त्व पशूला अर्थात् जीवाला अर्थात् अणूला त्रुटी, क्षण इत्यादिरूप कालभेदाच्या परिधींमध्ये अर्थात् कक्षेमध्ये किंवा मर्यादेमध्ये अडकवीत असते. काळाच्या तथाकथित मर्यादेच्या संकोचामध्ये पडल्यामुळे जीव हा संसारामधील किंवा जगतामधील प्रत्येक कार्यकलापासाठी निश्चित क्षण किंवा प्रहर यांच्या कल्पनेमध्ये व्यस्त राहतो अर्थात् गढून गेलेला असतो. (पृ. २५८)

**(१६)** अज्ञानी माणसाला (जीवाला) हे स्पंदाचे (शक्तीचे) प्रवाह पतित करण्यासाठी नेहमीच उद्युक्त असतात. यासाठी आपल्या विस्तृत स्वभावाने स्पंदतत्त्वाचा विवेक करण्याकरिता नेहमी उद्योग-साधन करीत राहिले पाहिजे. त्यामुळेच स्वस्वरूपाची अभिव्यक्ती होते. (पृ. २६५)

**(१७)** जीव ज्या अवस्थेला जातो त्या अवस्थेत स्पंदतत्त्व प्रतिष्ठित असते अर्थात् जीव व स्पंद म्हणजे शक्ती ही एकरूप असते. (पृ.२७६)

**(१८)** शब्दराशीपासून अर्थात् "अ" कारापासून "क्ष" कारापर्यंतच्या वर्णसमुदायापासून निर्माण होणाऱ्या श्रीब्राह्मी, श्रीमाहेश्वरी इत्यादि देवतासमूहाच्या वशीभूत असलेल्या स्वतंत्र पतिप्रमात्याला किंवा परमेश्वराला किंवा श्रीशिवालाच "पशुप्रमाता" अर्थात् जीव असे नाव दिलेले आहे. पशुप्रमाता या कलासमूहाला वश होण्यामागील कारण असे आहे की, कलासमूहाने परमेश्वराच्या असीम वैभवाला किंवा स्वातंत्र्याला पूर्णपणे नष्ट-भ्रष्ट केलेले आहे. (पृ. ४२२)

**(१९)** भिन्न भिन्न शक्ती मी स्वतः श्रीपरमशिवरूप आहे या जागृतीला आवरण टाकण्याकरिता व शब्दसृष्टी ही खरी आहे असे भासविण्याकरिता जीवाला पशू बनवितात. त्याची पशुकाया कायम ठेवण्यासाठी ह्या सर्व शक्तींचा कायम प्रयत्न असतो. या प्रयत्नामुळे एकदा जीवाला स्वस्वरूपाचा विसर पडला की, तो परतंत्र बनतो व त्याचे स्वातंत्र्य नाहीसे होते. (पृ. ४४९)

**(२०)** याप्रमाणे श्रीपरशिवांशी अभिन्न असणारी परमेश्वरी शक्ती जेव्हा अधोमुख होऊन क्रियारूप बनते त्यावेळेला ती जीवांना पशू बनवून क्षणोक्षणी भेदाचाच अनुभव देऊन त्यांना नेहमी परतंत्रावस्थेत राखते. त्याचप्रमाणे ही परमेश्वरी शक्ती अधोमुखाने कार्यरत झाली की, ती जीवांना जन्ममरणादि संसारात फेकून देते. (पृ. ४५४)

आता स्पंदशास्त्रकारांनी जगताचे किंवा ब्रह्मांडाचे अगर विश्वाचे जे स्वरूप कथन केले आहे त्याचे साररूप पाहू.

"श्रीभगवान् हे सृष्टी, स्थिती, संहार, निग्रह किंवा तिरोधान व अनुग्रह या पाच कृत्यात नेहमीच मग्न असतात. ही त्यांची नित्यकृत्ये आहेत. त्यामुळे ते आपल्याशी अभिन्न असलेल्या शक्तीच्या द्वारा सृष्टीची किंवा विश्वाची निर्मिती करतात. श्रीभगवान् आपल्या स्वातंत्र्यशक्तीने सर्वात् प्रथम आपल्या स्वरूपाला आच्छादित करणाऱ्या महामाया शक्तीला प्रकट करतात. त्यामुळे आकाशवत् स्वच्छ व प्रकाशमान् आत्म्यात संकोचाचा आविर्भाव होतो. त्यावेळी प्रकाश म्हणजे मूळ आत्मस्वरूप व विमर्श म्हणजे सृष्टीचे प्रकटीकरण या दोन्हींचे स्वरूप विद्यमान असते. सृष्टींच्या सर्व व्यापाराच्या मुळाशी प्रकाश व विमर्श या दोहोंचीही सत्ता राहते हे प्रसिद्ध आहे. ज्यावेळी पराशक्ती स्वातंत्र्याच्या उन्मेषाने अंतर्लीन अवस्था सोडून देऊन अभिव्यक्त होते त्यावेळी विश्वरूपचक्राचे आवर्तन सुरू होते. खरे पाहता सृष्टीची अभिव्यक्ती ही शक्तीची किंवा विमर्शाची होत असते. प्रकाश हा या स्थितीत केवळ उपचारमात्र असतो. या दृष्टीने पाहिले तर हे लक्षात येते की, तत्त्वमात्रच शक्तीच्या स्वातंत्र्योल्लासाची विशेष अशी अवस्था आहे. याकरिता श्रीशिवतत्त्व हृदतत्त्व असल्यामुळे त्याची शक्तिकोटीत गणना होते. याकरिता प्रकाश व विमर्श हे एक प्रकारे परमविमर्शाचे केवळ रूपात्मक भेद आहेत. या स्थितीत शुद्ध परमात्मतत्त्व यांमध्ये अंतर्लीन राहते. याकरिता तत्त्वांचा विचार करताना प्रकाश व विमर्श हे दोन्हीही विमर्शात्मक किंवा शक्त्यात्मक असल्यामुळे त्यांच्यात अंशांची कल्पना केली जाते.

वामकेश्वरतंत्राच्या मताने प्रकाशाचे चार अंश असून त्याच्याशी एकरूप असलेल्या विमर्शाचेही चार अंश आहेत. अंबिका, वामा, ज्येष्ठा व रौद्री या नावाचे प्रकाशाचे चार अंश असून शांता, इच्छा, ज्ञान व क्रिया या नावाचे विमर्शाचे चार अंश आहेत. अंबिका व शांता यांच्या सामरस्यावस्थेतमध्ये शांतभावयुक्त पराशक्ती ही परावाक् या नावाने प्रसिद्ध आहे. हीच आत्मस्फुरणाची अवस्था आहे.

**आत्मनः स्फुरणं पश्येद्यदा सा परमा कला।**
**अम्बिकारूपमापन्ना परावाक् सम्मुदीरिता।।**

**अर्थ :-** ज्यावेळी ही पराशक्ती आपल्या स्फुरणाला पाहते त्यावेळी ती अंबिकारूपाला प्राप्त झालेली "परावाक्" आहे असे म्हटले जाते.

या आत्मस्फुरणाच्या अवस्थेत संपूर्ण विश्व बीजरूपाने अर्थात् अस्फुट रूपाने आत्मसत्तेत विद्यमान असते. त्यानंतर शांतेपासून इच्छेचा उदय झाल्यावर विश्व अव्यक्त विश्वशक्तीच्या गर्भातून बाहेर येते. त्यावेळी इच्छाशक्ती वामाशक्तीशी एकरूप होते व पश्यंतिवाक् या नावाने ओळखली जाते. यानंतर ज्ञानशक्तीचा आविर्भाव होतो. ज्ञानशक्ती ही ज्येष्ठेबरोबर एकरूप असून मध्यमावाक् या नावाने ओळखली जाते. ही शक्तीच सृष्ट म्हणजे दिसणाऱ्या विश्वाच्या स्थितीचे कारण आहे. ज्ञानानंतर क्रियाशक्ती रौद्रीबरोबर एकरूप होऊन वैखरी या नावाने प्रसिद्धीला येते. प्रपंचात्मक वाग्वैचित्र्य हे वैखरीचेच स्वरूप आहे. **(भारतीय संस्कृती और साधना, खंड पहिला, लेख - "तांत्रिक दृष्टि," पृष्ठ ३८ ते ४०)**

शक्ती अर्थात् प्रकृती हीच विश्वनिर्मितीला कारणीभूत आहे हे कथन करताना श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी **"श्रीज्ञानेश्वरी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**मा इये प्रकृती तंव। गुणमयी हेंचि नांव।**
**किंबहुना सावेव। गुण तेचि हे।।१३.९८७।।**
**हे प्रतिक्षणीं नित्य नवी। रूपा गुणाचीच आघवीं।**
**जडातेंही माजवी। इयेचा माजु।।९८८।।**
**हे वाङ्मयाची वाढी। साकारपणाची जोडी।**
**प्रपंचाची धाडी। अभंग हे।।९८९।।**
**कळा येथून जालिया। विद्या इयेच्या केलिया।**
**इच्छा ज्ञान क्रिया। वियाली हे।।९९०।।**

अशा प्रकारे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सृष्टीच्या उन्मीलनात्मक किंवा उभारणीचे जे स्वरूपरहस्य प्रकट केले आहे ते वर वर्णन केलेल्या विवेचनाचे सारच आहे. या दृष्टीनेच शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की-

**अकार सर्ववर्णाग्र्यः प्रकाशः परमः शिवः।**
**हकारोऽन्त्यकलारूपो विमर्शः कथितः प्रिये।।**

याचा अर्थ असा आहे की, "अ" म्हणजे श्रीशिव हा प्रकाशात्मक आहे व "ह" म्हणजे शक्ती ही विमर्शात्मक असल्यामुळे "अ" व "ह" हे

दोन वर्ण सर्व वर्णमालेचे द्योतक आहेत. ही सर्व वर्णमाला श्रीभगवंताच्या प्रकाश किरणांचे किंवा शक्तींचे प्रतीक आहे. "ह" हा प्राणवाचक आहे. चित्शक्ती ही प्राणशक्तीच्या रूपात परिणत होऊन पुन्हा विलोमक्रमाने आपल्या मूळ श्रीशिवस्थानात परत येते. त्यावेळी पुन्हा क्रियेचा आविर्भाव होऊन "अ" किंवा अनुत्तराबरोबर म्हणजे श्रीशिवाबरोबर समरस होते. याचेच नाव "अहं" असे आहे. हा "अहं" सतत स्पंदमय असतो. यातूनच पुढे "इदं" भावाची उत्पत्ती होते म्हणजे सृष्टीची रचना होते. "इदं" भावच विश्वाचे प्रतीक आहे. या दृष्टीने पाहिले म्हणजे सर्व विश्व हे शब्दापासून उत्पन्न होणारे व शब्दातच राहणारे आहे. **"शब्देष्वेवाश्रिता शक्तिर्विश्वसास्य निबन्धनी," "वागेव विश्वा भुवनानि यज्ञे वाच इत् सर्वाममृतं यच्च मर्त्यम्।"** इत्यादि शास्त्रवचनांवरून हे स्पष्ट होते की, शब्दच म्हणजे शक्तीच जगत्सृष्टीचे मूळ आहे व सृष्टीच्या बाहेर जाण्यासाठी शब्दच अर्थात् शक्तीच एकमात्र उपाय आहे." **(भारतीय संस्कृति और साधना, खंड पहिला, लेख - शक्तिका जागरण पृ. ३१७ व जप-साधना पृ. ३३०)**

येथपर्यंत **"स्पंदशास्त्र"** किंवा **"स्पंदकारिका"** या ग्रंथात ग्रंथित झालेले जगताचे, सृष्टीचे किंवा विश्वाचे स्वरूप थोडक्यात सूत्ररूपाने कथन केले. या दृष्टीने या ग्रंथातील जगत्सृष्टीसंबंधीचे पुढील सिद्धान्त लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

**(१)** श्रीपरमेश्वराच्या स्वरूपाशी अभिन्न असणारी शक्तीच सर्व काही बनली आहे. (पृ. ५)

**(२)** श्रीभगवंताच्या ज्या अनंत शक्ती आहेत तेच ईश्वराचे ऐश्वर्य आहे. हे सर्व जगत् शक्तिरूप आहे. (पृ.५६)

**(३)** श्रीपरमेश्वर हा स्वतःच्या शक्तीने म्हणजे इच्छाशक्तने जगाची उत्पत्ती व लय करतो. स्थिती अवस्थेमध्ये हे जगत् त्याच्या शक्तीचे वैभव असते. अर्थात् जे जे काही दिसते ती ती शक्तीच आहे. जगत् असे मुळीच नाही. (पृ.६)

**(४)** या विश्व-व्यवहाराचे कारण वाणीच आहे. (पृ.७)

**(५)** जगताचा उदय व विलय शक्तीच्या प्रसाराशी व संकोचाशी बांधलेला आहे. (पृ. ८)

**(६)** हे प्रभो ! तुमच्या उन्मेष-निमेषाच्या केवळ आशयालाच सृष्टी व प्रलय म्हणतात. उन्मेषामध्ये ज्ञानक्रिया आदि गर्भित इच्छाशक्तीचा निवास असतो व तीच प्रसारित होते. इच्छेमुळे ज्ञान प्रवृत्त होते व क्रियाशक्तीच्या साधनामुळे पदार्थांची उत्पत्ती होते. (पृ.८)

**(७)** संविन्मय अर्थात् शक्तिमान् विश्वाला हा याच स्पंदमय स्वातंत्र्यामुळे अर्थात् या स्पंदमय स्वातंत्र्याच्या साहाय्याने आपले स्वरूप लपवून आणि विद्युद्गतीने प्रकट करून अक्रमामध्ये क्रमाचे आणि क्रमामध्ये अक्रमाचे अवभासन अर्थात् प्रकाशन करण्याची क्रीडा करीत असतो. (पृ. १९)

**(८)** हीच स्पंदशक्ती विश्वातील प्रत्येक दृश्यमान अथवा अदृश्यमान पदार्थाला सत्ता देत असते. इतकेच नव्हे; तर ज्या वस्तूंच्या प्रत्यक्षरूपामध्ये पूर्ण अभाव असतो त्या वस्तूंनाही कल्पनेच्या द्वारा स्थिती प्रदान करीत असते अर्थात् आकाशपुष्प, वंध्यापुत्र आणि शशशृंगासारख्या कल्पना उत्पन्न करून व्याप्त होऊन राहतो. (पृ. १९)

**(९)** या विश्वामध्ये जितके पदार्थ आहेत ते सर्व पदार्थ शक्तिरूपच आहेत.

**(१०)** हा सर्व दृश्यमान प्रपंच मौलिक स्वातंत्र्यशक्तीचाच विकास आहे. अशी अनंतरूपे असूनही ही स्वातंत्र्यशक्ती मुख्यतः इच्छा, ज्ञान आणि क्रिया या तीन रूपांमध्ये शाश्वतरूपाने स्फुरित होत असते. (पृ. २१)

**(११)** या विश्वामध्ये श्रीब्रह्मदेवांपासून गवताच्या काडीपर्यंत जितके असंख्य पदार्थ प्रत्यक्ष किंवा अनुभव यांचे विषय बनलेले असतात, ते सर्व पदार्थ परमेश्वराच्या अनंत शक्तींचे स्रोत आहेत. (पृ. २५)

**(१२)** शक्ती ही आपल्या मौलिक विश्वोत्तीर्ण चिन्मात्र रूपामध्ये अवस्थित असली तरीही सर्व विभूतींना या शक्तीने आपल्या गर्भामध्ये ठेवलेले किंवा धरलेले असते अथवा विश्वमय शक्तिप्रसादाच्या रूपामध्ये अवस्थित असली तरीही ती शक्ती कल्पनातीत विश्वाला साकार करण्याचे दुर्घट कार्य संपन्न करणाऱ्या वैभवाने परिपूर्ण असते. (पृ. २६)

**(१३)** हीच शक्ती स्वरूपाच्या आधाराने विश्वाच्या चित्राची रचना केल्यावरही स्वयं निर्मलरूपाला धारण करणारी असते. (पृ.२६)

**(१४)** श्रीपरमेश्वरच या जगताच्या सृष्टिसंहारादि क्रीडेला कारणीभूत असून तो त्याच्यामध्ये आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या पदार्थांचे अवभासन

किंवा प्रकाशन करीत असतो. त्याच्याशिवाय उत्पत्तीची इच्छाच शक्य होणार नाही. (पृ.३६)

**(१५)** भगवान् हे चिदात्मा असल्यामुळे एखाद्या योग्याप्रमाणे लोकिक सामग्रीशिवाय केवळ इच्छेनेच आंतर विमर्शरूपामध्ये अर्थात् विचारांच्या रूपामध्ये असलेल्या पदार्थवर्गाला बाह्यरूपामध्ये अवभासित करीत असतात. (पृ. ४९, ५०)

**(१६)** ज्याप्रमाणे विचित्र नगर, गाव इत्यादि गोष्टी अविभक्त किंवा अभिन्न असल्या तरीही आरशात प्रतिबिंबित झाल्यावर मूळ रूपाहून किंवा बिंबाहून निराळ्या आहेत असे भासित होते त्याप्रमाणे अत्यंत निर्मल असलेल्या परमश्रेष्ठ श्रीभैरवांच्या संवित् म्हणजे शक्तीपासून अभिन्न म्हणजे एकरूप किंवा विभागशून्य असलेले हे जगत् एक-दुसऱ्यापासून आणि त्या परमतत्त्वापासूनही भिन्न आहे असे भासित होते. (पृ. ५१)

**(१७)** जगताला प्रकाशित करणारे परमतत्त्व व जग यांच्यामध्ये भेद नाही. (पृ. ५६)

**(१८)** हे सर्व जग या तत्त्वाच्या अर्थात् श्रीशिवाच्या क्रियेचे साररूप प्रकाशन आहे. (पृ. ५७)

**(१९)** निळा, पिवळा इत्यादि रंगांमध्ये किंवा सुख-दुखादि भावनांमध्ये म्हणजे सर्व गोष्टींमध्ये चित्स्वरूप अखंडित असते. चित्रविचित्र उपाधींचे नानाविध विकल्प चित्स्वरूप निरनिराळे आहेत असे फक्त भासविते.

**(२०)** ज्ञान हे नीलसुखादि रूपाने अंतर्बाह्य प्रकाशते. ज्ञानावाचून वस्तूला सत्ता किंवा अस्तित्व नाही. त्यामुळे जगत् हे ज्ञानरूपच आहे. (पृ. ९६)

**(२१)** या सत्पासून बनलेला सर्व कार्यरूप प्रपंच हा संवृतिसत्य अर्थात् आवरण सत्य आहे. (पृ. ९८)

**(२२)** ही सतत स्पंदमयी पारमेश्वर सत्ता नित्य असल्यामुळे आदि-अंतरहित असते. ही परमेश्वराची सत्ता विश्वाकृती असल्यामुळे स्वतःच चेतनरूप, जडरूप आणि विश्वाच्या विचित्र आकारप्रकाराचे अवभासन करणारी आहे. सत्य गोष्ट अशी आहे की, या कारणांनी ही स्पंदमयी परमेश्वराची सत्ता स्वतः बहुरूपी अर्थात् अनेक रूपे धारण करणारी अशी आहे. (पृ. १२१)

**(२३)** श्रीशिवांच्या निर्विकल्प स्वरूपामध्ये विकल्पज्ञानाचा उदय होणे अर्थात् प्रत्ययोद्भव होणे हेच त्या श्रीशिवांचे परामृतरसापासून अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्य या अवस्थेपासून भ्रष्ट होणे आहे. यामुळे श्रीशिव स्वतःचे स्वातंत्र्य गमावतात व परतंत्र बनतात. यामळे श्रीशिवांना विकल्पज्ञानाच्याविषयी अर्थात् पाच तन्मात्रांविषयी अर्थात् संपूर्ण जगताविषयी अभिलाषा निर्माण होते. (पृ. ४३८)

**(२४)** श्रीशिव प्रकाशरूप आहेत व शक्ती विमर्शरूप आहे म्हणून संपूर्ण विश्व हे प्रकाशविमर्शमय आहे. (पृ. ४४४)

यानंतर स्पंदशास्त्रकारांनी ईश्वराचे, परमेश्वराचे, मूळ तत्त्वाचे किंवा श्रीशिवाचे जे स्वरूप प्रकट केले आहे त्याचे साररूप पाहू.

श्रीशैवशास्त्रानुसार ईश्वराचे स्वरूप काय आहे हे कथन करताना म. म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी **"भारतीय संस्कृती और साधना", खंड पहिला**, या ग्रंथातील **"ईश्वरमें विश्वास"** या लेखात असे म्हटले आहे की, "संसाराची सृष्टी अर्थात् निर्मिती, स्थिती आणि संहाराचा कर्ता व अनुग्रह आणि निग्रहाला हेतुभूत किंवा कारणस्वरूप सच्चिदानंदमय अनंतशक्ति-समन्वित सत्ता विशेष" म्हणजे "ईश्वर" होय. या सत्तेमध्ये ज्या शक्ती अंतर्निहित राहतात त्या शक्तींच्या साम्यावस्थेलाच ईश्वराचा "ब्रह्मभाव" असे म्हणतात. ज्यावेळी वैषम्य-कालात कोणतीही शक्ती मुख्य होऊन इतर शक्तींना सामावून घेऊन प्रकाशित होते त्यावेळी केवळ त्या शक्तीची क्रिया दृष्टिगोचर होते. सृष्टीच्या शेवटी कोणतीही शक्ती शिल्लक राहत नाही; मात्र शक्ती व शक्तिमान् हे अभिन्नभावाने एकरस किंवा समरस होऊन प्रकाशित होत राहतात. संसारात जे काही आहे किंवा होईल, ते सर्व ईश्वरापासून उद्भूत झालेले असते, ईश्वरात स्थित असते व शेवटी ईश्वरातच विलीन होते. याकरिता जोपर्यंत जगत् आहे तो पर्यंत ज्याप्रमाणे समुद्र किंवा तलाव हे तरंगांचे आश्रयस्थान असते त्याप्रमाणे जगताच्या आश्रयरूप ईश्वरसत्तेचा साधनाभ्यासपूर्वक साक्षात्कार करून घेणे आवश्यक आहे. केवळ एवढेच नव्हे; तर सांसारिक सत्ता ही मूलतः ईश्वरीय सत्तेशी एकरूप किंवा अभिन्न असल्यामुळे तिचीही प्राप्ती करणे आवश्यक आहे. जगताच्या अस्तित्वाच्या वेळी त्याच्या संरक्षक, नियामक, दर्शक आणि भोक्त्याच्या रूपातही ईश्वराच्या सत्तेचे अनुसंधान करणे

योग्य आहे. ज्या कला आणि विद्यारूप शक्ती प्रवाहरूपाने प्रवर्तित होऊन व्यावहारिक जगात कार्य-साधन करीत असतात त्यांची मूळ प्रवृत्ती जेथून सुरू होते, तोच ईश्वर आहे."

त्याचप्रमाणे म. म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी **"तांत्रिक वाङ्मयमें शाक्तदृष्टि"** या ग्रंथातील **"श्रीभगवान् का स्वरूप और कार्य (द्वैत शैवमत)"** या लेखात असे म्हटले आहे की, "श्रीभगवान् हे आगमशास्त्रानुसार नेहमी पंचकृत्यनिरत राहतात. त्यानुसार ते सृष्टी, स्थिती, संहार, निग्रह किंवा तिरोधान व अनुग्रह या गोष्टी नेहमीच करीत असतात. ही त्यांची नित्यकृत्ये आहेत. परंतु ईश्वराच्या स्वरूपाची एक अशीही अवस्था आहे की, ज्या अवस्थेत ते काही करतात असे म्हणणेही शक्य होत नाही. द्वैतमतानुसार जीव किंवा पशू हा अनादि कालापासून मलाने झाकलेला आहे. जरी जीव हा स्वरूपतः श्रीशिवत्वसंपन्न असला तरीही या मलाच्या आवरणामुळे तो आपले श्रीशिवत्व विसरून, जीवाचे स्वांग धारण करून व कर्तृत्वभाव ग्रहण करून शुभाशुभ कर्मफलभोगाकरिता मायिक जगतातील विभिन्न लोकांमध्ये व देहांमध्ये संसारी होऊन निरंतर भ्रमण करीत राहतो. श्रीशिवाची किंवा जीवाची स्वतःची आत्मविस्मृती हीच या भ्रमणरूप व्यापाराच्या मुळाशी आहे. खरे पाहता; या आत्मविस्मृतीच्या मुळात मलाचे आवरण किंवा रोधशक्ती आहे. ही परमेश्वराच्या इच्छेनेच बनलेली आहे आणि ज्यावेळी त्याच्या इच्छेने किंवा अनुग्रहाने ही आवरणशक्ती दूर होते त्यावेळी जीव आपले श्रीशिवत्व प्राप्त करतो. हीच त्याची परामुक्ती आहे. जोपर्यंत ही मुक्ती होत नाही तोपर्यंत जीव कोणत्याही अवस्थेत जरी राहिला तरी ती त्याची सर्वश्रेष्ठ अंतिम अवस्था असत नाही. या निग्रहाच्या आणि अनुग्रहाच्या मुळाशी स्वतः श्रीभगवानच असतात आणि या दोन अवस्थांच्या मध्ये सृष्टी, स्थिती व संहाराचे चक्र फिरत राहते.

मात्र अद्वैतदृष्टीने आत्मा सर्व अवस्थांच्या वर असलेल्या साक्षात् श्रीपरमशिवदशेला प्राप्त होऊ शकतो. अशा प्रकारे हे लक्षात येते की, सच्चिदानंद हे परमेश्वराचे स्वरूप असून त्याची शक्तीही सच्चिदानंदरूपा आहे. त्याचप्रमाणे ते नित्य निष्क्रिय राहूनही नेहमीच पंचकृत्यकारी आहेत व अशी पंचकृत्ये करूनही ते नित्य स्वस्पंद स्वरूपात राहत असतात. ज्यावेळी जीव आपल्या श्रीशिवस्वरूपाला प्राप्त होतो त्यावेळी तोही तोच

आहे. जीवाला जीवरूपात आपल्यापासून दूर करणे हा जसा त्यांचा स्वभाव आहे त्याप्रमाणेच जीवाला आपल्या निजस्वरूपात लीन करून घेणे हाही त्यांचाच स्वभाव आहे. या स्वभावाचे अवलंबन करूनच त्यांची नित्यलीला निरंतर कालाच्या बाहेर प्रवर्तित होत राहते आणि कालाच्या आतही कर्मसूत्राच्या द्वारा त्यांचा छायाभिनय चालतच राहतो." (पृ. १३२)

उपरोक्त वर्णन केलेल्या ईश्वरविषयक विचारांच्या प्रकाशात "**स्पंदशास्त्र**" किंवा "**स्पंदकारिका**" या ग्रंथातील ईश्वरासंबंधीची पुढील सूत्ररूप विधाने विचार प्रवर्तक ठरतील.

**(१)** श्रीपरमशिव आत्यंतिक मुक्ती देणारे आहेत. त्यांच्या परम अद्भुत अशा मायाशक्तीच्या योगाने चित् व जड वगैरे अनंत पदार्थ आणि व्यक्ती निर्माण झालेल्या दिसतात. असे असले तरी तत्त्वदृष्ट्या परमेश्वराच्या स्वरूपाशी अभिन्न असणारी शक्तीच सर्व काही बनली आहे हे लक्षात घेतले म्हणजे पदार्थमात्र श्रीगुरुरूप आहे याची जाणीव अंतःकरणात होईल. (पृ. ५)

**(२)** अनंत शक्ती या ईश्वराचे ऐश्वर्य असून ते ज्याच्या ठिकाणी भासमान होते तो परमेश्वर सर्वशक्तिमान् आहे. यामुळे परमेश्वर सर्व शक्तिचक्रांचे आदिकारण आहे. या अर्थानेच त्याला जगाचे उत्पत्तिकारण म्हणतात. श्रीपरमशिव किंवा श्रीमहेश्वर निव्वळ ज्ञानस्वरूप आहेत. ते या शक्तिचक्राचा आत्मा असल्याने ते शक्तिचक्र ईश्वराशी तद्रूपच आहे. (पृ.६)

**(३)** परमेश्वर म्हणजेच प्रकाशरूप महादेव हे "अहं ब्रह्मास्मि" आदि शब्दसमूहांच्या परमार्थरूप पूर्णहंतेच्या परामर्शाच्या म्हणजे विचाराच्या सारामुळे नेहमीच आनंदघन, स्फुरणात्मक, दैवी शक्ती आणि आसुरी शक्ती निर्माण करण्यासाठी मंथन करणाऱ्या अरणीप्रमाणे असणाऱ्या पराशक्तीने युक्त पूर्ण स्वातंत्र्यरूप असे आहेत. (पृ. ३२)

**(४)** श्रीशिवांच्या निर्विकल्प स्वरूपामध्ये विकल्प ज्ञानाचा उदय होणे अर्थात् प्रत्ययोद्भव होणे हेच त्या श्रीशिवांचे परामृतरसापासून अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्य या अवस्थेपासून भ्रष्ट होणे आहे. यामुळे श्रीशिव स्वतःचे स्वातंत्र्य गमावितात व परतंत्र बनतात आणि पाच तन्मात्रांनी इंद्रियांना प्रत्यक्ष गोचर होतात. (पृ. ३४)

**(५)** श्रीशिवांच्या स्पंदात्मक विमर्शभूमिकेत किंवा शाक्तभूमिकेत अथवा ज्ञानभूमिकेमध्ये किंवा श्रीशिवांच्या ठिकाणी हे सर्व कार्यरूप असलेले जगत् अभेदरूपाने अवस्थित असते किंवा राहते आणि त्या श्रीशिवांपासून बाहेर पडते किंवा उत्पन्न होते. त्या श्रीशिवांच्या किंवा सत्तेच्या अनाच्छादित अर्थात् आच्छादन किंवा आवरणरहित स्वरूपामुळे स्वतंत्र प्रसारात कोठेही अडचण किंवा अडथळा असत नाही. (पृ. ४१)

**(६)** त्याचप्रमाणे ज्ञानरूप श्रीशंकर हे एकरूप व एकरस असून सुद्धा भिन्न वस्तूंमुळे भिन्न आहेत असे भासते. परंतु वस्तुतः तसे नाही. ज्ञान हे श्रीशंकरांचे स्वरूप आहे. ते त्यांच्या ठिकाणी स्थित आहे. या ज्ञानाच्या प्रकाशात नाना प्रकारचे भेद दिसले तरी ते सत्य नसून त्या त्या पदार्थांच्या ठिकाणी असणारे ज्ञान हेच सत्य आहे. ज्ञान म्हणजे श्रीशंकरच होय. (पृ. ४१, ४२)

**(७)** ज्ञानात्मक आणि क्रियात्मक असे चैतन्य हेच आत्म्याचे स्वरूप आहे असे सिद्धच आहे. हे चैतन्य कशानेही झाकले जात नसल्यामुळे त्याचे श्रीशिवत्व कोणाकडूनही नाकारले जाणार नाही.

**(८)** ते स्पंदतत्त्व अर्थात् श्रीशंकर हे तत्त्वतः अर्थात् वास्तविक स्वरूपात सत् व नित्य आहेत. या स्पंदतत्त्वाच्या ठिकाणी दुःख नाही, सुख नाही, ग्राह्यता अर्थात् ग्रहण होण्याचा धर्म नाही, ग्राहकता नाही आणि मूढभावही अर्थात् अचेतनत्वही नाही. (पृ. ९२)

**(९)** ते तत्त्व (ईश्वर) सर्व आलंबन, धर्म, तत्त्व, क्लेश इत्यादि आशयांपासून संपूर्णतः शून्य आहे; परंतु परमार्थतः ते तत्त्व शून्य नाही. (पृ. ९३)

**(१०)** श्रीशिवदशेमध्ये अभिव्यक्त होणारे हे व्यापक ज्ञातृत्व किंवा स्वस्वभाव याच्या ठिकाणीच सर्व वस्तू संपादन करण्याचें किंवा विश्वनिर्मितीचे स्वातंत्र्य आहे. (पृ. ९४)

**(११)** श्रीशिव हा प्रभू असल्यामुळे सर्वव्यापक आहे. तो नित्य असल्यामुळे अनादि व अनंत आहे. तो श्रीशिव म्हणजे विश्वाकृतीच आहे. त्यामुळे तो चिद्रूप व अचिद्रूपही आहे. त्याच्या सर्व विचित्रतांचे अवभासन म्हणजे प्रकटीकरण तोच करतो. तो श्रीशिव आपल्या शक्तीने बहुरूपत्व धारण करतो.

**(१२)** श्रीशिव हे आपल्याच स्वातंत्र्यशक्तीचे रूपांतर असलेल्या मायाशक्तीच्या द्वारा स्वरूपावरच आवरण टाकून स्वतःच्या आत्मरूपाच्या दर्पणामध्ये अनंत प्रकारच्या ग्राहकांचे आणि ग्राह्यांचे अवभासन करीत असतात.

**(१३)** सर्वव्यापी ईश्वर किंवा चिन्मयमूर्ती आत्मा ज्ञान व ज्ञेय अर्थात् शब्द, रूप इत्यादि तसेच सुखादि अनंत विषयस्वरूपी असून अत्यंत श्रेष्ठ शक्तीने युक्त असतो. सर्वव्यापी ईश्वर हा जागृती व स्वप्न या अवस्थांमध्ये प्रकाशतो. ईश्वर हा ज्ञानरूपाने स्वप्न या अवस्थेत व ज्ञेयरूपाने जागृत अवस्थेमध्ये अनुभवावयास येतो. त्या व्यतिरिक्त इतर म्हणजे सुषुप्ती व तुर्या या अवस्थेमध्ये तो चिद्रूपत्वाने प्रतीतीस येतो. (पृ. २३१)

**(१४)** श्रीशिव हा प्रकाशदृष्टीने केवळ चिन्मय आहे व विमर्शदृष्टीने विश्व आहे. चिन्मयता हे त्याचे आंतररूप आहे व विश्वात्मकता हे त्याचे बाह्यरूप आहे. श्रीशिवाच्या या विश्वात्मक स्वरूपाकडे पाहिले म्हणजे तेथे ज्ञेयता आणि कार्यता हे दोन धर्म दिसतात. पण विश्वाची ज्ञेयता आणि कार्यता हा श्रीशिवांच्या ज्ञानशक्तीचा व क्रियाशक्तीचाच विकास आहे. श्रीशिवांची ही ज्ञानक्रियारूपशक्ती निमिषित म्हणजे अंतर्मुख असते तेव्हा ती केवळ प्रकाशमयच असते व ती उन्मिषित होते तेव्हा ती बहिर्मुख होऊन विश्वरूपाने अवभासित होते. (पृ.४४५)

येथपर्यंत आपण श्रीशिवांशी अनवच्छेद, एकरूप, एकरस व समरस असलेली चैतन्यरूप व प्रकाशयुक्त स्वातंत्र्याशक्ती ही जीव, जगत् व ईश्वररूपाने पिंडब्रह्मांडाची उभारणी कशी करते हे पाहिले ही शक्तीच श्रीगुरुकृपेने जागृत झाल्यावर साधनरूप होऊन पिंडब्रह्मांडाची संहारणी करीत असल्यामुळे या शक्तीचे स्पंदशास्त्रकारांना अभिप्रेत असलेले साररूप स्वरूप प्रथम पाहू.

महामहोपाध्याय श्रीगोपीनाथ कविराज यांनी या दृष्टीने **"भारतीय संस्कृति और साधना" खंड पहिला** या ग्रंथातील **"शक्ति-साधना"** या लेखात असे म्हटले आहे की, "आपण ज्या अनंत अशा वैचित्र्ययुक्त विश्वाचा निरंतर नाना प्रकाराने अनुभव घेत असतो ते सर्व विश्व खरे पाहता आत्मप्रकाशाव्यतिरिक्त आणखी काहीही नाही. अत्यंत सुसूक्ष्म असे कारण जगत्, लिंगात्मक सूक्ष्म जगत् आणि इंद्रियगोचर स्थूल जगत्

ही सर्व शक्तीचीच भिन्न भिन्न विकासाची रूपे आहेत. या विश्वाच्या मुळाशी जी पूर्ण सत्ता पारमार्थिक रूपाने राहत असते तेच शक्तीचे परमश्रेष्ठ स्वरूप आहे. या पूर्ण व परमश्रेष्ठ शक्तीच्या स्वरूपाला "विशुद्ध चैतन्य" शक्ती असे नाव देऊन त्याचे वर्णन केले तरी त्याचा योग्य परिचय होऊ शकत नाही आणि "सच्चिदानंद" या शब्दाने जरी त्याचे वर्णन केले तरीही त्या स्वरूपाचा पूर्ण निर्देश झाला असे वाटत नाही. अशा प्रकारे वाणी आणि मनाच्या पलीकडे असलेली व जिचा निर्देश करता येत नाही अशी जी एक अवर्णनीय परमार्थसत्ता आहे तिलाच शास्त्रामध्ये "परमपद" असे म्हटले आहे. हे परमपद सत् आहे की असत् आहे, या विषयाचा लौकिक विषयाच्या दृष्टीने विचार करण्यास योग्य असला तरीही ज्यावेळी या विषयाची चर्चा करण्यास व सूक्ष्म विचार करण्यास सुरुवात होईल त्यावेळी परमपदात प्रकाश व विमर्श हे दोन्ही अंश स्वभावसिद्धरूपाने स्थित असतात, हे स्वीकार करावे लागेल. प्रकाशाच्या शिवाय ज्याप्रमाणे विमर्श किंवा विचार असणे शक्य नाही त्याप्रमाणे विमर्शाचा किंवा विचाराचा त्याग केला तर प्रकाशाची स्थिती असणे शक्य नाही. या शिव-शक्तिस्वरूप प्रकाश आणि विमर्श यांच्या नित्यसंबंधाचीच चैतन्यरूपाने महापुरुषांना अनुभूती येते. या संबंधाचे व अनुभूतीचेच शास्त्रांमध्ये विस्ताराने वर्णन केलेले आहे. परंतु चैतन्य असले तरीही प्रकाश आणि विमर्शाच्या साम्यावस्थेत ते अव्यक्तच राहते. या अवस्थेचे दुसरे नाव "परम-पद" असे आहे, यात काहीच शंका नाही. या साम्यावस्थेत महाशक्तिरूप अनादि शक्ती ही श्रीपरमशिवाच्या बरोबर सामरस्यभावयुक्त होऊन अद्वयस्वरूपात विराजमान राहते. स्वरूपाच्या दृष्टीने या अवस्थेला एक प्रकारे "परब्रह्मभाव" असे दुसरे नाव देता येईल. परंतु या अवस्थेत स्वरूपभूत स्वातंत्र्य नित्य स्थित राहत असल्यामुळे ही अवस्था ब्रह्मतत्त्वाहूनही विलक्षण असते. या महाशक्तिस्वरूप परमपदाची जी गोष्ट येथे कथन केली आहे, ती वाचल्यावर हाच निष्कल अथवा पूर्णकल परमेश्वर आहे असे भ्रमाने कोणीही समजता कामा नये; कारण की, निष्कल, निष्कल-सकल आणि सकल या विश्वाच्याच तीन अवस्था आहेत. परंतु महाशक्ती सर्वातीत असल्यामुळे विश्वातीत परमपदापासून तिच्या स्वातंत्र्यस्वरूप आत्मविलासामुळे नित्य साम्य कोणत्याही प्रकारे भग्न न होता, एक प्रकारें भग्नवत अवस्था उत्पन्न होते आणि या

वैषम्याचे फळ म्हणून गुणप्रधान भावात छत्तीस तत्त्वांनी युक्त असलेले विश्व निर्माण होते. अखंड परमार्थस्वरूप श्रीशिवशक्ती एकरूप, अभिन्न व एकरस किंवा समरस असले; तरी स्वातंत्र्यजनित विक्षोभामुळे तिच्या द्वारा किंवा तिच्यातच भेदमय विश्वप्रपंचाचा उदय होतो. यावरून हे स्पष्ट होते की, त्रिविध विभागांनी युक्त असलेले सर्व विश्व मूळ शक्तीचा फक्त विकास आहे, हे निश्चित सत्य आहे."

ज्याप्रमाणे चैतन्यशक्ती कुंडलिनी बहिर्मुख गतीने प्रसारित होऊन पिंडब्रह्माडाची रचना करते त्याप्रमाणेच ती श्रीसद्गुरुकृपेने, ईश्वराच्या कृपेने, कालाच्या परिपाकाच्या प्रभावाने, तीव्र संवेगाने किंवा इतर कोणत्याही कारणाने जागृत झाल्यावर पिंडब्रह्मांडाची संहारणी करून आपली मूळ साम्यावस्था प्राप्त करून घेते. या प्रक्रियेचे वर्णन करताना महामहोपाध्याय श्रीगोपीनाथ कविराज **"भारतीय संस्कृति और साधना" खंड पहिला**, या ग्रंथातील **"कुंडलिनी तत्त्व"** या लेखात असे म्हणतात की, "ज्यावेळी प्रसारण-शक्ती अर्थात् उभारणीची क्रिया बाधित होते त्यावेळे संकोच-शक्तीच्या क्रियेचा आरंभ होतो. सर्व ब्रह्मांडात सर्वत्र हीच व्यवस्था आहे. समस्त ब्रह्मांड या संकोच-शक्तीच्या प्रभावाने स्वतःमधील वैषम्याचा परित्याग करून साम्यावस्थेला सामोरे जाते. निरनिराळ्या प्रकारे प्रयत्न न करताही प्रत्येक व्यक्ती ही ब्रह्मांडाच्या मुक्तीबरोबर महाप्रलायाच्या वेळी मोक्ष प्राप्त करते. जर जीवाने आपल्या मुक्तिकरिता निराळा प्रयत्न केला तर त्याला ब्रह्मांडाच्या मोक्षकालाची किंवा महाप्रलयाची अपेक्षा किंवा प्रतीक्षा करावी लागत नाही.

जीव स्थूल तत्त्वाच्या आवरणामुळे आवृत झालेला असल्यामुळे सूक्ष्म अशा सुषुम्णा मार्गात प्रविष्ट होऊ शकत नाही. पूर्वसंस्कार किंवा वासना, अभिमान किंवा कर्तृत्वबोध आणि फलाकांक्षा किंवा भोगामिलाषा अर्थात् ज्याला कामना असे म्हणतात, अशा तीन आवरणांमुळे जीव स्थूलत्वसंपन्न होतो. विषयेंद्रादि रूप हेच जीवावरील स्थूलावरण असून ते त्याला आपल्या मूळ स्वरूपाप्रत परत जाऊ देत नाही. प्रत्येक जीव हा ज्ञान, आनंद व अमरत्वाची इच्छा करीत असतो, इतकेच नव्हे; तर तो ब्राह्मी स्थितीचीही आकांक्षा बाळगून असतो आणि ही विशेष आशा मनात ठेवूनच तो विषयराज्यात परिभ्रमण करित असतो. वास्तविक विषयादि

गोष्टी या अपेक्षित किंवा आवश्यक नसून आनंदप्राप्तीच इष्ट आहे. मात्र या आनंदाच्या सिद्धीसाठी तो गौणसाधनरूपी विषयादिकांची आकांक्षा करीत राहतो. परंतु जीव युग-युगांतरात व कल्प-कल्पांतरात फिरूनही आपल्या आकांक्षांची तृप्ती करू शकत नाही. याचे एकमात्र कारण हे आहे की, तो सर्व ठिकाणी आपल्या वासना व कर्तृवादि अभिमान बरोबर घेऊन फिरत असतो. खरे पाहता शेवटी जोपर्यंत वासनेचा एक क्षणभरसुद्धा उच्छेद होत नाही तोपर्यंत सुषुम्णेच्या मार्गात जीवाला प्रवेश मिळू शकत नाही. कारण स्थूल वस्तू सूक्ष्ममार्गात प्रविष्ट होऊ शकत नाही; भूतशुद्धी, चित्तशुद्धी इत्यादि क्रियांचे तात्पर्य स्थूलतेच्या विसर्जनाशिवाय दुसरे काहीही नाही. ज्यावेळी पंचभूते शुद्ध होतात त्यावेळी पंचीकरणाची स्थिती राहत नाही. एवढेच नव्हे; तर पंचबिंदूही एका बिंदूच्या रूपात परिणत होतात. त्यानंतर चित्तशुद्धी होते. ज्यावेळी एकबिंदूही निर्मळ होतो त्यावेळी ज्ञानचक्षू किंवा तृतीय नेत्र उघडतो. हीच जीवाची विशुद्धावस्था आहे. यानंतर जीव ईश्वरतत्त्व समोर धारण करीत करीत क्रमाने अग्रेसर होतो. यालाच दुसऱ्या शब्दात उपासना असे म्हणतात. उपासनेच्या वेळी आज्ञाचक्रातील बिंदूत आणि सहस्रारातील महाबिंदूत भेद व अभेद या दोन्ही गोष्टी राहतात. ज्यावेळी क्रमाक्रमाने भेदाभेदाच्या मध्यातील भेदांश गळून जातो त्यावेळी अभेदाची प्रतिष्ठा होऊन ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होते. यांनतर त्रिगुणातीत परम साम्यावस्थेमध्ये किंवा ब्रह्मत्वामध्ये साधक प्रतिष्ठित होतो. या सर्व विवेचनावरून हे स्पष्टपणे प्रतीत होईल की, कुंडलिनीशक्ती जागृत झाल्याशिवाय जीवाची ऊर्ध्वगती होऊ शकत नाही. ती जागृत झाली की, संकोचशक्ती अथवा ऊर्ध्व बिदूतील आकर्षणशक्तीच्या प्रभावाने क्रमाक्रमाने अंतर्मुखगती वृद्धिंगत होते व शेवटी साम्यावस्था स्थिर होते. (पृ. ३१०-३११)

उपरोक्त चैतन्यशक्तीच्या अर्थात् कुंडलिनीशक्तीच्या बहिर्मुख व अंतर्मुख स्थिती-गतीच्या विचारांच्या अनुरोधाने **"स्पंदशास्त्र"** किंवा **"स्पंदकारिका"** या ग्रंथातील पुढील सिद्धान्त विषय आकलनाच्या दृष्टीने उपयुक्त होतील.

**(१)** ही स्पंदशक्ती अनंत सृष्टिसंहारांना आपल्यात समाविष्ट केलेली, पूर्ण चैतन्यरूप आणि आनंदरूप आहे. त्याचप्रमाणे ती निःशेष (सर्व) शुद्ध आणि अशुद्धरूप जगतातील प्रमाता (जीव) आणि प्रमेय (ज्ञेय

विषय) यांच्या संकोच आणि विकासाचे आभासन करणाऱ्या तत्त्वासहित असणारी, सर्व उपनिषदांमध्ये उपास्य म्हणून सांगितली गेलेली आणि एकाच वेळी उन्मेष आणि निमेष यांनी युक्त आहे. (अर्थात् तीच सृष्टी म्हणजे उभारणी आणि संहार घडवून आणणारी आहे.) (पृ. ३२)

**(२)** ही ईश्वरीशक्ती नेहमीच आनंदात असणारी नेहमीच पूर्णरूपाने भासते. ती ज्ञानसागराची लाट असून ईश्वराची इच्छात्मक शक्ती आहे. (पृ. ३३)

**(३)** प्रत्यक्षात परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती अथवा स्पंदनशक्ती ही एकच आहे. ती अनंत तसेच अपरिमित अर्थात् अमर्यादित धारांमध्ये प्रवाहमान होऊन विश्वाच्या अणू अणूचे रूप धारण करीत असते. (पृ. १०८)

**(४)** या शक्तिवर्गाचे खेचरी, गोचरी, दिक्चरी आणि भूचरी हे चार प्रधान विभाग केलेले आहेत. (पृ. १०८)

**(५)** परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती विश्वाचे वमन करते अर्थात् स्वरूपामध्ये केवळ "अहं" रूपामध्ये अवस्थित भावमंडळाचे बाह्य "इदं" रूपामध्ये अवभासन करीत असते. (पृ. १०९)

**(६)** ही स्वांतत्र्यशक्ती वाम अर्थात् विरुद्ध आचरण करणारी असते. या शक्तीचा भाव असा आहे की, स्वभावाच्या विरुद्ध रूपाला अर्थात् संसाराच्या रूपाला धारण करून सर्व विश्वाला अनंत आपत्तींचा आणि जन्ममरणाचा विषय बनवीत असते. (पृ.१०९)

**(७)** परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती ही संसारभावाच्या विरुद्ध आचरण करीत असते. या शक्तीचा भाव असा आहे की, ती परमेश्वराच्या शक्तिपातास अर्थात् कृपेस पात्र बनलेल्या व्यक्तींमध्ये श्रीशिवभावाचा विकास करीत असते. (पृ. १०९)

**(८)** या शक्तिवर्गाचे काम द्विमुखी आहे. अर्थात् हा शक्तिवर्ग दोन मुखांनी म्हणजे संसारोन्मुखतेने व श्रीशिवोन्मुखतेने काम करीत असतो. (पृ. ११०)

**(९)** प्रमाता म्हणजे जीवाच्या अंतःकरणात, बाहेर आणि अन्य पदार्थात राहणारी पूर्ण म्हणजे परिमित म्हणजे संकुचित श्रीवामेश्वरी आदि (देवी) सम्यक् ज्ञान आणि अज्ञानाने मुक्ती व बंध प्रदान करीत असतात. (पृ. ११०)

**(१०)** हा शक्तिवर्ग एकीकडे अज्ञानी पुरुषांना अधोगतीच्या गर्तेमध्ये लोटीत असतो तर दुसरीकडे श्रीसद्गुरूंच्या कृपेने निर्मळ हृदय बनलेल्या पुरुषांना श्रीशिवभावावर आरूढ करण्याची क्षमता या शक्तिवर्गामध्ये असते. (पृ. ११०)

**(११)** चितिशक्ती ही प्रत्यवमर्शात्मक म्हणजे चेतनरूप, विचारात्मक किंवा "मी आहे" अशी असून तेच तिचे पारमार्थिक रूप आहे.

**(१२)** विमर्शात्मिका अर्थात् विचारमयता हाच या चितिक्रियेचा एक अविच्छेद्य अर्थात् अखंड स्वभाव आहे.

**(१३)** परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती सतत उदीयमान असल्यामुळे अर्थात् उदय पावत असल्यामुळे प्रतिक्षणी चित्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रिया या पाच रूपांमध्ये स्पंदनशील अर्थात् स्फुरणशील आहे. यालाच दुसऱ्या शब्दांमध्ये सर्वकर्तृत्व, सर्वज्ञत्व, पूर्णत्व, नित्यत्व आणि व्यापकत्व असेही म्हणतात. तेच अनुत्तर अर्थात् ज्याहून अन्य काहीही श्रेष्ठ नाही असे सर्वश्रेष्ठ तत्त्व याच शक्तिपंचकाच्या साहाय्याने प्रतिक्षण विश्वरूपामध्ये सृष्टी, स्थिती, संहार, पिधान आणि अनुग्रह ही पाच विराट कृत्ये करीत राहत असते. विश्वरूपामध्ये प्रसृत अथवा अवभासित होणे किंवा प्रकाशित होणे हा चैतन्याचा स्वभाव आहे. (पृ. १३९)

**(१४)** ही दैदीप्यमान अशी महासत्ता आहे. तिला देश, काल इत्यादि विच्छेदांचा स्पर्श होत नाही. या परमेश्वराच्या सारतत्त्वयुक्त चितिशक्ती अर्थात् कुंडलिनीशक्तीला हृदय अर्थात् प्रतिष्ठास्थान असे म्हटलेले आहे. (पृ. २१६)

**(१५)** ही कुंडलिनीशक्ती महासत्ता, महादेवी व विश्वाचे जीवन आहे. अशा स्वरूपाची विमर्शमय किंवा विचाररूप किंवा ज्ञानरूप स्पंदना किंवा स्फुरण हे स्वयं अदेशकालरहित अर्थात् अयोग्यदेशकालरहित असते. ही विमर्शरूप स्पंदना विभिन्न आणि विचित्र प्रकारच्या देश, काल आणि आकार यांनी परिवलित अर्थात् वेष्टिलेल्या प्रमेयवर्गाला अर्थात् बाह्य जगताला जीवन देऊन स्वतः त्या त्या रूपामध्ये निरर्गल क्रीडा करीत राहते. (पृ. २१७)

**(१६)** श्रीशिवशक्तीचे जे यामलारूप अर्थात् समावेशात्मकरूप आहे यालाच संघट्ट असे म्हणतात. हीच आनंदशक्ती आहे. या शक्तीपासून विश्वाची निर्मिती होते.

**(१७)** प्रत्येक शब्द म्हणजे केवळ जड ध्वनी नसून स्पंदमयी चेतनशक्ती आहे. आपल्या भोक्तृभावाची अर्थात् भोगणाऱ्या भावाची अनुभूती प्राप्त होईपर्यंत प्रत्येक जीव या शक्तीचा दास असतो. (पृ.४३३)

**(१८)** श्रीशिव नेहमीच निजाशक्तीला चिकटलेला अर्थात् तिच्याशी समरस स्थितीत असतो. त्याचप्रमाणे तो सृष्ट्यादि पाच कृत्ये करणारा, स्वतंत्र, आगमांमधून स्पंद, ललित, ईश्वर इत्यादि शब्दांनी सांगितला गेला आहे. याची स्वातंत्र्यशक्तीच सनातन, पूर्णाहंतारूप, परा, मत्स्योदरी, महासत्ता, स्फुरत्तोर्मी (प्रकाशाची लाट), सार, हृदय, भैरवीदेवी, शिखा इत्यादि असंख्य प्रकारांनी त्या त्या ठिकाणी सांगितली गेली आहे. (पृ. ४३३)

आता स्पंदशास्त्रकारांनी स्वभावोपलब्धी किंवा सहजविद्योदय होण्यासाठी अर्थात् चिच्छशक्ती कुंडलिनी जागृत होण्यासाठी व पिंडब्रह्मांडाची संहारणी घडून येण्यासाठी कोणत्या उपायांचा किंवा साधनांचा आश्रय साधकांनी घ्यावा यासंबंधी जो निर्देश केला आहे ती संक्षेपतः पाहणे इष्ट ठरेल.

**(१)** अबुद्ध, बुद्ध, प्रबुद्ध व सुप्रबुद्ध असे चार प्रकारचे जीव असून (पृ. २२६) ज्यावेळी प्रबुद्ध या जीवाची आत्मजिज्ञासा तीव्रतर रूप धारण करते तेव्हा भगवान् श्रीचंद्रमौळी स्वयं श्रीगुरूंचे रूप धारण करून त्या जीवाला श्रीशांकरमार्गात दीक्षित करून देतात अर्थात् त्याच्यावर शक्तिपात किंवा कृपा करतात. (पृ. २२८)

**(२)** श्रीशिवांपासून (सहस्रारापासून) पृथ्वीपर्यंत (मूलाधारापर्यंत) हा जो विस्तीर्ण मार्ग (सुषुम्णापथ) आहे, तो चिद्वस्तूनेच (कुंडलिनी शक्तीनेच) सिद्ध होतो व त्या शक्तीमुळेच जाणला जातो. (अर्थात् श्रीगुरुकृपेने म्हणजे शक्तिपातयोग दीक्षेने अनादि निद्रिस्थ चैतन्यरूप आत्मशक्ती कुंडलिनी जागृत झाल्यावर ती स्वतः साधनरूप होऊन साधकाला श्रीशिवांशी समरस करते.)

**(३)** स्पंदतत्त्वाची अर्थात् शक्तितत्त्वाची अभिव्यक्ती म्हणजे स्वरूपाचा अनुभव प्राप्त होण्यासाठी प्रयत्नशील असलेला प्रबुद्ध साधकयोगी आपल्या तुर्यावस्थेतील भोगात्मक, चमत्कारमय अशा स्पंदतत्त्वाची अर्थात् आपल्या चिन्मात्र स्वरूपाची अनुभूती जागृतावस्थेतच अत्यंत अल्प काळामध्येच अखंड प्राप्त करून घेत असतो. (पृ. ३६४)

**(४)** प्रबुद्धाचा अभ्यास सतत जागृत राहिल्याने तो विशेष स्पंदाचा

सामान्य स्पंदात लय करीत असतो. असा नित्य उद्योग म्हणजे अभ्यास-साधन तो करीत असल्यामुळे हे गुणादिक स्पंद त्याचा पराभव करू शकत नाहीत. (पृ. २६४)

**(५)** जो प्रबुद्ध योगी स्वतःमध्ये स्पंदतत्त्वाच्या स्वरूपाची अनुभूती प्राप्त करून घेण्यासाठी प्रतिक्षण उद्योग करीत राहतो तो प्रबुद्ध योगी जाग्रत् अवस्थेमध्येच आपल्या भावाची अर्थात् तुर्यचमत्कारमय अशा स्पंदतत्त्वाची अनुभूती अत्यंत अल्प काळामध्ये प्राप्त करून घेत असतो. (पृ. २६८)

**(६)** ज्या भाग्यशाली साधकांवर तीव्रतम शक्तिपात होतो त्या व्यक्तींना श्रीसद्गुरू हे लोकोत्तर प्रातिभज्ञानाच्या द्वारा या मधल्या अवकाशातील म्हणजे दोन विचारांमधील संधिक्षण आणि या क्षणांमध्ये प्रकाशमान राहणारे स्पंदतत्त्व या सर्वांची अनुभूती करवून देतात. (पृ. २८५)

**(७)** विशेष स्थितींचे क्षण पकडल्यामुळे साधकाचे चंद्र व सूर्य म्हणजे मन व प्राण अकस्मात् लय पावतात. त्यावेळी जीव ब्रह्माची एकता होऊन तो साधक ब्रह्मस्थितिप्रत पोहोचतो. (पृ. २९९)

**(८)** अलौकिक मार्गाने म्हणजे सुषुम्णामार्गाने प्राण व मन लय पावतात. (पृ. २९०)

**(९)** प्रबुद्धाला ईश्वर शक्तिपाताच्या प्रभावाने इतर लोकांहून निराळ्याच प्रकारची जागृती झालेली असते व त्याची ज्ञानदृष्टी चांगलीच उघडलेली असते. (पृ. २९०)

**(१०)** प्राणापानांची (सुषुम्णामार्गात) प्रशांती हीच आत्मदर्शनाची युक्ती आहे. (पृ. २९१)

**(११)** भगवती संविद् शक्तीच मध्य अर्थात् सुषुम्णेव्यतिरिक्त आणखी काही नाही; कारण की, ती सर्वांमध्ये समानरूपाने विद्यमान राहते. त्या सुषुम्णानाडीच्या आधाराशी संलग्न किंवा एकरूप अगर तिच्या अंतरातून गमन केल्याशिवाय (साधकाला आपल्या वास्तविक) स्वरूपाचे ज्ञान होत नाही. (पृ. २९७)

**(१२)** केवळ वर्णरूप मंत्र पशुभावात राहणारे असतात. सुषुम्णामार्गात त्यांचा जप-उच्चारण केल्यावर ते पशुपती होतात. खरे पाहिले तर सिद्धमार्गातच मंत्रांची सफलता आहे. (पृ. ३०३)

**(१३)** हे मंत्र मायेच्या काजळीपासून अलिप्त होऊन, संसारातील भोगसिद्धीपासून निवृत्त होऊन, शुद्ध संविद्रूप किंवा शांतरूप अर्थात् ज्यांचे विशिष्ट देवतास्वरूप समाप्त झालेले आहे असे होऊन, भक्ताच्या किंवा आराधना करणाऱ्या व्यक्तीच्या चित्तासह त्याच ठिकाणी सामान्य स्पंदरूप चिदाकाशात किंवा स्पंदतत्त्वात विलीन होतात. या कारणामुळे हे सर्व मंत्र श्रीशिवस्वरूप आहेत. (पृ. ३०५)

**(१४)** दीक्षा देण्य:साठी प्रवृत्त झालेल्या आचार्यादींचे करणरूप सर्व मंत्र त्या स्पंदतत्त्वाच्या सामर्थ्याला प्राप्त करून अनुप्राणकत्वाने अर्थात् त्या स्पंदतत्त्वात समाविष्ट होऊन आचार्यादींशी संबधित झालेल्या आराधकाच्या चित्तासह मोक्ष आणि मोक्ष मिळविण्याच्या साधनाचा अधिकार मिळविण्यासाठी प्रवृत्त होतात.

अशा प्रकारे मंत्रद्वारा किंवा अनुपाय प्रक्रियेद्वारा श्रीसद्गुरूंकडून शक्तिपात होऊन सिद्धयोगाचे आतून सहजपणे शक्तीकडून स्वत: चालणारे साधन सुरू होणे व साधकाने ते प्रयत्नाभ्यासपूर्वक दीर्घकाल, निरंतर व श्रद्धाभक्तिपूर्वक करणे नितांत आवश्यक असून, त्यामुळेच साधक स्पंदांवर आरूढ होऊन किंवा विचाराने दोन स्पंदांमधील अनुत्तर मुक्त स्थितीत विलीन होऊन अंतिम सिद्धीची प्राप्ती करून घेतो. हेच तत्त्व सिद्धान्तरूपाने आपल्या शब्दात सांगताना महामहोपाध्याय श्रीगोपीनाथ कविराज यांनी **"भारतीय संस्कृति और साधना" खंड पहिला** यातील काही लेखांच्या शेवटी असे म्हटले आहे की -

"शक्तिपाताशिवाय म्हणजे भगवंताची कृपा झाल्याशिवाय कोणताही जीव पूर्णत्व प्राप्त करू शकत नाही. इतकेच काय; तो पूर्ण प्राप्त करण्याच्या (सुषुम्णा) मार्गात प्रवेश देखील करू शकत नाही. जीवाच्या आधारशक्तीच्या अर्थात् धारणाशक्तीच्या भेदानुसार शक्तिपाताचे कमी जास्त प्रमाण दिसून येते. मात्र हेही तितकेच खरे आहे की, जीव कितीही सामान्य कोटीतील असला आणि भोग, वासना, आकांक्षा इत्यादींनी कितीही गुरफटलेला असला तरी एकदा त्याच्यावर शक्तिपात झाला की, तो श्रेष्ठ अशा ब्रह्मपदाला अवश्य पोहोचतो. मात्र भोगाकांक्षादि विक्षेपांमुळे जीवाच्या परमपदाला जाण्याच्या गतीत अडथळा उत्पन्न होतो. जर शक्तिपाताची मात्रा तीव्रातितीव्र असेल व आडवे येणारे विक्षेप जर नसतील तर अत्यंत शीघ्र गतीने

म्हणजे क्षणभरातसुद्धा जीव परमपदाला जाऊन पोहोचतो. शक्तिपातयोगदीक्षेच्या वेळी योग्यायोग्यतेचा विचार केला जात नाही. मात्र जीवाच्या मुळातील योग्यतेनुसारच शक्तिपाताचे प्रमाण स्वाभाविकपणे निश्चित होत जाते. परंतु प्रमाण जरी काहीही असले तरी भगवंताच्या शक्तीचा महिमा इतका मोठा आहे की, एकदा का होईना श्रीसद्गुरूंकडून ही शक्ती साधकात संक्रमित झाली की, ती त्या जीवाला भगवंताच्या घरी अर्थात् सहस्रारातील श्रीशिवपदाला किंवा ब्रह्मपदाला पोहोचविल्याशिवाय शांत होत नाही, हे अगदी नितांत सत्य आहे." (**शक्तिपातरहस्य** - पृ. २३७)

"शक्तिपात होऊन कुंडलिनीशक्ती जागृत झाल्याशिवाय ब्रह्मप्राप्तीच्या महान् मार्गाच्या वाटचालीला सुरुवातही होत नाही. मग ब्रह्मप्राप्तीची गोष्ट तर फारच दूरची आहे. शक्ती जागृत होणे हाच मनुष्य जीवनाचा खरा उद्देश आहे. केवळ अपूर्ण कैवल्य प्राप्त करून जन्ममृत्यूच्या चक्रात सापडून वरच्या दर्जाचे स्थान प्राप्त करणे हे मनुष्य जीवनाचे ध्येय असूच शकत नाही. आपली सुप्त भगवच्छक्ती जोपर्यंत पूर्णपणे जागृत होत नाही तोपर्यंत मनुष्य जीवनाचे खरे सार्थक होत नाही. कुंडलिनीशक्ती जागृत झाल्याशिवाय जड व चैतन्य यातील संघर्ष समाधानकारकपणे संपत नाही. विवेकज्ञानाचा उपयोग हा या मार्गाची वाटचाल सुरू करण्याची पहिली पायरी म्हणून ठीक आहे; परंतु शक्तीची साधना केल्याशिवाय श्रीशिवभावाची प्राप्ती होणे अत्यंत कठीण आहे." (**शक्ति का जागरण** - पृ. ३२२)

अशा प्रकारे पिंडब्रह्मांडाची संहारणी होऊन साधकाला ज्या तत्त्वज्ञानाची म्हणजे अंतिम स्थितीची, मोक्षाची, कैवल्याची, अमात्रक स्थितीची, स्वस्पंदस्थितीची किंवा श्रीशिवशक्तिसामरस्याची प्राप्ती होते त्या स्थितीचे किंवा अवस्थेचे वर्णन स्पंदशास्त्रकारांनी कसे केले आहे ते पाहू.

स्पंदशास्त्रकारांनी या श्रीशिवशक्तिसामरस्याचे वर्णन "अभेदोपलब्धी" या नावाने केले असून याचे वर्णन करताना श्रीसंत तुकाराममहाराजांनी असे म्हटले आहे की -

**लवण मेळवितां जळे। काय उरलें निराळें।।१।।**
**तैसा समरस जालों। तुजमाजीं हरपलों।।२।।**
**अग्निकर्पूराच्या मेळीं। काय उरली काजळी।।३।।**
**तुका म्हणे होती। तुझी माझी एक ज्योती।।४।।**

श्रीस्वात्मारामयोगींद्र यांनीही उपरोक्त दृष्टान्ताच्याच आधारे सामरस्याची स्थिती किंवा आत्मोपलब्धी म्हणजेच समाधी होय, हे सांगताना "**हठयोगप्रदीपिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "ज्यावेळी मीठ पाण्यात पडून विरघळते त्यावेळी ते पाण्याशी एकरूप होते. त्याचप्रमाणे ज्यावेळी मनरूपी जीव किंवा शक्ती आत्मरूपाशी अर्थात् स्पंदरूप श्रीशिवाशी म्हणजे चैतन्याशी एकरूप होते त्यावेळी त्या अवस्थेला समाधी असे म्हणतात. ज्यावेळी प्राणांची गती क्षीण होते व मनाचाही लय होतो त्यावेळी जी समरस अवस्था उपस्थित होते त्याला समाधी असे म्हणतात. जीवात्मा व परमात्मा यांच्या उपरोक्तप्रकारे होणाऱ्या ऐक्याला समता म्हणतात. या समतेच्या अवस्थेत सर्व संकल्प पूर्णपणे नष्ट होत असल्याने यालाच समाधी असे म्हणतात." (४.५, ६, ७)

अशी ही एकरस, अनवच्छेद्य, अभेद्य, अपूर्व, अपरंपार, अकथनीय एकमेवाद्वितीय, अलौकिक व अनुत्तर अवस्था आहे; कारण या अवस्थेत एकाचवेळी ज्ञान व भक्ती आणि चित् व आनंद यांचा समावेश झालेला दृष्टीस पडतो. या अवस्थेत ज्ञान व भक्ती ही एकाकार होते. स्वसंवेद्य आत्मरूपाची ही अवस्था असल्याने ज्ञानाची अंतिम सीमा व प्रेमाची पराकाष्ठा येथे पाहावयास मिळते. ही समन्वयाची भूमी असल्याने येथेच द्वैताद्वैताचे सामंजस्य झालेले दृष्टीस पडते. या ठिकाणी श्रीशिव व शिक्ती पूर्णपणे एकरस होत असल्याने येथे श्रीशिवाचे अगर शक्तीचे प्राधान्य असत नाही. हीच खरी साम्यावस्था होय. यालाच श्रीशिवशक्तीचे सामरस्य असे म्हणतात. या समरस अवस्थेलाच अद्वयअवस्था किंवा अभेदावस्था म्हटले जाते. या अवस्थेत दोन किंवा अनेकांचे वैषम्य तर नाहीसे होतेच; परंतु विषमतेचे बीजही राहत नाही. ही चिदानंदमयी अद्वैतनिष्ठा आहे यात काहीही शंका नाही. ही अवस्था बुद्धीच्या, विचाराच्या किंवा ध्यानाच्या पलीकडे असून ती अव्यक्त व स्वयंप्रकाश आहे.

उपरोक्त विचारांच्या पृष्ठभूमीवर स्पंदशास्त्रकार या अवस्थेबद्दल काय म्हणतात ते पाहण्यासारखे आहे.

**(१)** आपल्या स्वरूपाची पूर्ण आणि खरी स्मृती हीच मुक्ती आहे. या स्मृतीलाच शास्त्रीय शब्दामध्ये "तुरीयारूप शाक्तभूमिकेचा साक्षात्कार होणे" असे म्हणतात. (प्रस्तावना- पृ.१५)

**(२)** कोणत्याही अन्य स्थानी जाण्याने मोक्ष मिळत नाही. एखादे विशेष स्थान मोक्षाचे आहे असेही असत नाही. अज्ञान ग्रंथी मोकळ्या होणे हाच मोक्ष आहे. (पृ. ६)

**(३)** "महाभारत" या ग्रंथाच्या मोक्षधर्मामध्ये रागद्वेषादि क्लेशांनी युक्त अशा दूषित चित्ताला संसार असे म्हटले असून त्यापासून पूर्णपणे मुक्त झालेल्या चित्ताला मोक्ष असे म्हटले आहे. (पृ.७)

**(४)** रागादि चित्त हा संसार असून पवित्र चित्त हा मोक्ष आहे. (पृ. ७)

**(५)** सर्व विकल्प म्हणजे संसार होय. विकल्पाशिवाय जीवाला दुसरे कोणतेही बंधन असत नाही. (पृ. ७)

**(६)** संकुचित आणि कृत्रिम प्रमातृपद विसरून जीव श्रीशिवाशी समरस होणे हेच जीवन्मुक्तिफल आहे. (पृ. ३१)

**(७)** ज्या वेळेला क्षोभ म्हणजे मनाची व्यग्रता थांबेल किंवा लीन होईल त्यावेळेला परमपद प्राप्त होईल (पृ. ३४)

**(८)** स्वतःच्या आत्मगत अशुद्धीमुळे अर्थात् आणव मलामुळे संसारामधील वासनात्मक कर्मांच्या अभिलाषांमध्ये किंवा इच्छेमध्ये पडलेल्या अर्थात् कर्ममलाने लिप्त झालेल्या मर्यादित सामर्थ्याच्या अर्थात् पूर्ण सामर्थ्य नसलेल्या पुरुषाच्या क्षुब्धवृत्ती व माया अर्थात् मल, अहंकार, भेदबुद्धी नाहीशी झाल्यावर त्या पुरुषाला परमपद प्राप्त होत असते. (पृ. १२९)

**(९)** मन, चेतना, शक्ती आणि आत्मा हे चौघेजण ज्यावेळेला पूर्णपणे नष्ट होतील त्यावेळेला ते श्रीभैरवरूप आपोआप व्यक्त होईल. (पृ. १४८)

**(१०)** जो साधक स्वभावाचा किंवा स्पंदात्मक आत्मस्वरूपाचा सर्व विश्वातील स्थावर व जंगम वस्तूंमध्ये अर्थात् कणाकणामध्ये अनुस्यूत किंवा समाविष्ट असलेल्या मुख्य सत्तेच्या रूपात साक्षात्कार करून घेत विस्मयावस्थेत अर्थात् आश्चर्य करीत राहत असतो तो साधक या तिरस्काराने पूर्ण आणि कुत्सित अर्थात् दूषित आवागमनामध्ये अर्थात् जन्म-मृत्यूच्या येरझाऱ्यामध्ये पडणे कसे शक्य आहे? (पृ. १६०)

**(११)** ज्याप्रमाणे दिव्याची ज्योत विझल्यावर ती भूमीमध्ये, आकाशामध्ये, कोणत्याही दिशेला किंवा कोणत्याही विदिशेमध्ये म्हणजे दोन दिशांच्या मध्यवर्ती बिंदूत जाऊ शकत नाही; मात्र दिव्यामधील तेलाचा क्षय झाल्यावर

केवळ शांती होत असते त्याप्रमाणे योग्याचा आत्मा निवृत्तिस्थानी पोहोचल्यावर भूमीमध्ये, आकाशामध्ये कोणत्याही दिशेमध्ये किंवा कोणत्याही विदिशेमध्ये जाऊ शकत नाही; मात्र योग्याचा आत्मा सर्व दु:खांचा क्षय झाल्यामुळे केवळ शांतीच्या अवस्थेमध्ये लय होऊन जातो. (पृ. १७६, १७७)

**(१२)** मोक्ष ही कोणतीही वेगळी अवस्था नाही तर स्वरूपख्याती अर्थात् स्वरूपाचे ज्ञान अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्य हाच मोक्ष होय. (पृ. १८०)

**(१३)** सर्व दीक्षांमध्ये निर्वाण दीक्षा ही असामान्य व दुर्लभ आहे; कारण ज्या भाग्यवान् व्यक्तीला ही निर्वाण दीक्षा प्राप्त होते त्या व्यक्तीच्या मनामध्ये अनेक युगे साठलेल्या आणि पिंड न सोडणाऱ्या वासना या एका क्षणभरात नाहीशा होत असतात. असा योगी पुर्यष्टकाच्या म्हणजे पांचभौतिक शरीराच्या बंधनातून मुक्त होऊन स्वरूपामध्ये विश्रांती प्राप्त करून घेतो. (पृ. ३५०)

**(१४)** ज्यावेळी साधक स्थूल किंवा सूक्ष्म पुर्यष्टक यांपैकी एकात राहत असतानाही चित्ताला लीन करून अंतर्बाह्य एकाकार असलेल्या स्पंदतत्त्वाची अनुभूती प्राप्त करून घेतो त्यावेळी त्या प्रत्ययोद्भवाच्या स्वतंत्रतेने संहार व उदय संपन्न करीत असतो. यामुळे असा साधक आपली आतापर्यंत हरविलेली भोक्तेपणाची पदवी प्राप्त करून घेतो व शक्तिचक्राचा ईश्वर अर्थात् पूर्ण श्रीशिव बनतो. (पृ. ४७९)

**(१५)** जो साधक आपल्या आंतरिक ईश्वरी शक्तीशी युक्त असतो तो जीवन्मुक्त असतो. (पृ. ३२२)

**(१६)** सिद्धयोगाचा अभ्यास करणारा साधकोत्तम हा जीवन्मुक्तच असतो; कारण तो सतत सर्वावस्थेमध्ये एक क्षणभरसुद्धा वाया न घालविता श्रीपरमशिवस्थितीत जागृत राहतो. (३२२)

**(१७)** सर्वांतर्यामी परमात्म्यासकट सर्व माझ्या लीला आहेत असे साक्षिरूपाने जो पाहत राहतो तो जीवन्मुक्त स्थिती भोगतो. (पृ. ३२३)

**(१८)** ज्यावेळी श्रीसद्गुरुकृपेने शक्तिपात होतो त्यावेळी श्रीपरमशिवरूपी शक्तीची किरणे त्याच्यावर पडतात. त्यामुळे ज्ञान जागृत होऊन जीवाची दृष्टी विमल होते. ही दृष्टी एकदा प्राप्त झाली की, देहाहून वेगळे असे जे जे पदार्थ आहेत ते ते सर्व आत्मस्वरूप आहेत असे तो पाहतो. जी जी

वस्तू दिसेल त्या त्या वस्तूच्या ठिकाणी विवेक जागृत करून सर्व पदार्थमात्र श्रीपरमशिवाच्या शक्तिचक्रातील अविभाज्य घटक आहेत अशी अनुभूती तो घेतो. अशी जागृती ठेवल्याने या शक्तिचक्राचा तो जीव आधिष्ठात्रा बनतो म्हणजे श्रीपरमशिव होतो. (पृ. ३२७)

**(१९)** आत्मानुभवाने सम्यक् विश्रांती प्राप्त झाल्यावर जो अलुप्तानुभव स्थिर राहतो त्यामुळे तत्त्ववित् पुरुष विषयभोग घेत असतानाही जीवन्मुक्तच असतात. (पृ. ३२८)

**(२०)** हे त्रिलोकीनाथा! आपली उपासना करून ज्या साधकाने सर्व किल्बिषरूप उपद्रव नाहीसे केले आहेत किंवा ते धुऊन टाकले आहेत म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने शक्तिपातयोगाचे साधन मिळून ज्यांच्या प्राणशक्तीचे सुषुम्णेत चालन होऊन जन्मजन्मांतरींचे सर्व संस्कार जळून गेल्याने अज्ञानादि सर्व दोष दूर झाले आहेत त्यांना माझ्यातच हे सर्व जगत् स्थित आहे, मीच सर्व आहे व मीच सर्वत्र आहे हा अनुभव अद्वैतभावनेच्या आवेशाने अत्यंत शीघ्रतेने प्राप्त होतो. (पृ.३२८)

**(२१)** ज्या योग्याच्या चित्ताचा असा स्वभाव विकसित झालेला असतो की, "हे सर्व विश्व माझेच स्वरूप आहे," तो योगी सर्व प्रमेय विश्वाला आपला खेळ समजून, नित्ययुक्त असल्याकारणाने, पांचभौतिक कायेमध्ये राहत असूनही ईश्वराप्रमाणे मुक्त आहे. अशा व्यक्तीसाठी शरीराचे अस्तित्व इत्यादि बंधनकारक होत नाही. (पृ.३३२)

येथपर्यंत आपण **"स्पंदशास्त्र"** किंवा **"स्पंदकारिका"** या ग्रंथाचे साररूप काय आहे ते पाहिले. या व्यतिरिक्त इतर कितीतरी विषय या ग्रंथात आले असून ते सर्व वर विवेचन केलेल्या मुख्य विषयाची सिद्धी करण्याकरिता ग्रंथावरील टीकाकारांनी प्रस्तुत केले आहेत. या दृष्टीने साधकांनी **"ब्रह्मबिन्दूपनिषद्"** अथवा **"अमृतबिन्दूपनिषद्"** या योगोपनिषदातील पुढील रहस्य लक्षात घ्यावे. यासंबंधी उपनिषद्कारांनी असे म्हटले आहे की, "शुद्ध व अशुद्ध असे दोन प्रकारचे मन सांगितले आहे. अशुद्ध मन इच्छायुक्त म्हणजे कामसंकल्पादियुक्त असते व शुद्ध मन कामसंकल्पादिरहित म्हणजे इच्छारहित असते.।।१।। मनुष्याच्या बंधाचे आणि मोक्षाचे कारण बंधच आहे. विषयांच्या ठिकाणी आसक्ती असलेले मन बंधाला व विषयरहित मन मोक्षाला कारण होते.।।२।। निर्विषय मनच

मुक्तीचे कारण असल्यामुळे मोक्ष इच्छिणाऱ्याने आपले मन नित्य विषयरहित करावे.।।३।। विषयांच्या इच्छेने निरुद्ध झालेले मन जेव्हा हृदयामध्ये निरुद्ध होईल म्हणजे स्वत:चा मनपणा विसरून विलीन होईल तेव्हा परमपद प्राप्त झाले असे समजावे.।।४।। हृदयात मन लीन, क्षीण किंवा क्षय पावेपर्यंत मनाचा निरोध करावा. हेच ज्ञान व ध्यान होय. इतर सर्व शास्त्रादि विस्तार म्हणजे केवळ वादविवाद, विस्तार किंवा पाल्हाळ समजावा.।।५।।

असे असले तरी या ग्रंथातील काही महत्त्वाचे सिद्धान्त खाली देत आहे. साधक-भक्त-वाचकांनी या सर्वांचा अभ्यासाच्या व विचाराच्या दृष्टिकोनातून या सिद्धान्ताचा मुळातून जरूर स्वाद घ्यावा.

(१) सूर्य व सूर्यकिरणांप्रमाणे अभिन्न असलेले श्रीशिवशक्ती हे विश्वाची उभारणी व संहारणी करीत असतात. (प्र. पृ. ३)

(२) सिद्धयोगसाधन हा चिंतामणी आहे. (प्र. पृ. ४)

(३) सिद्धयोगसाधन हे वज्राचे टोक आहे. (प्र. पृ. ४)

(४) संसारातील प्राणी ज्या ज्या भयंकर कर्मांनी बांधले जातात तेच वास्तविक रीतीने मुक्तीचे उपाय आहेत. (वि. प्र. पृ. १०)

(५) पतन व अभ्युत्थान या दोहोंचे एकच कारण आहे. अज्ञानी ज्यामुळे बांधला जातो त्यामुळेच ज्ञानी मुक्त होतो. (वि. प्र. पृ १०)

(६) ज्याच्यामध्ये सर्व विषय प्रवेश करतात त्यालाच खरी शांती प्राप्त होते. विषयांच्या मागे लागलेल्याला शांती मिळत नाही. यापेक्षाही पहिली ही गोष्ट खरी आहे की, रागद्वेषरहित इंद्रियांनी जर भोग भोगले तर ते प्रसन्नतेचेच साधन होते. (वि. प्र. पृ. १०)

(७) सर्वांचा निषेध केल्यावर जे तत्त्व शेष राहते तोच आत्मा होय. (वि. प्र. पृ. १०)

(८) सिद्धयोग हा ज्ञानी लोकांनी सांगितलेला परब्रह्मप्राप्तीचा अत्यंत श्रेष्ठ व सुलभ संप्रदाय आहे. (वि. प्र. पृ. १२)

(९) या शक्तिपातालाच आगम, मार्ग किंवा शास्त्रप्रबोध असे म्हणतात. (वि. प्र. पृ. १२)

(१०) हे जे स्पंद-तत्त्व-शास्त्र आहे ते स्वतंत्र दर्शन आहे, हे ध्यानात ठेवले पाहिजे. (वि. प्र. पृ. ११)

(११) सर्वांना आवडेल असा ग्रंथ सांगणे किंवा लिहिणे फार दुर्लभ आहे. तथापि सत्पात्र असे जे काही थोडे विवेकी असतील त्यांच्या करिता हा ग्रंथ आहे.

(१२) श्रीशिवशक्तिसामरस्य हेच श्रीसदाशिवतत्त्वापासून पृथ्वितत्त्वापर्यंत सर्व जडचेतनात्मक विश्वाचे आधारभूत आणि यथार्थ स्वरूप आहे. (वि. प्र. पृ. २२)

(१३) प्रकाशरूप श्रीशिवांची स्वतःची अभिन्न अहंविमर्शरूप (मी) स्फुरणरूप शक्ती हाच स्पंद आहे आणि स्पंदना हेच श्रीशिवांचे स्वातंत्र्य आहे. (वि. प्र. पृ. २३)

(१४) श्रीपरमशिव शक्तीशी अभिन्न असतात व नेहमी आपल्या ज्ञानस्वरूपातच निमग्न असतात त्यांना श्रीशिवशक्तिरूपाने प्रकट होण्याची जी इच्छा होते त्यालाच स्पंद असे म्हणतात. (पृ. ५)

(१५) ज्या अनंत शक्ती आहेत तेच ईश्वराचे ऐश्वर्य आहे. हे सर्व जगत् शक्तिरूप आहे. (पृ. ६)

(१६) जे जे काही दिसते ती ती शक्तीच आहे. जगत् असे मुळीच नाही. (पृ. ६)

(१७) जीवाला श्रीपरमशिव स्वरूपाचे अधिकार देणे हे या साधनग्रंथाचे प्रयोजन आहे. (पृ. ६)

(१८) या विश्व-व्यवहाराचे कारण वाणीच आहे. (पृ. ७)

(१९) जगताचा उदय व विलय शक्तीच्या प्रसाराशी व संकोचाशी बांधलेला आहे. (पृ. ८)

(२०) सर्व शक्तींनी युक्त असलेला एक भगवानच जीवाचे ध्येय व उपास्य आहे. (पृ. ९)

(२१) वेदान्त, वैष्णव, शैव, सौर, बौद्ध व अन्यान्य मतमतांतरांमध्ये ज्ञाता व ज्ञेय या दोन्ही गोष्टी एक शुद्ध आत्माच आहे. जो जाणणारा आहे तोच जाणला जाणार आहे. (पृ. ९)

(२२) श्रीशिव आणि शक्ती हे प्रत्यक्षात एकाच सत्तेचे सूचक आहेत. ज्याप्रकारे अग्नी व त्याची शक्ती एकरूप असतात त्याप्रमाणेच हे एकरूप आहेत. (पृ. १४)

(२३) शब्द आणि अर्थ यांच्या विचारांमध्ये जी श्रीशिवाने युक्त नाही अशी अवस्थाच नाही. (पृ. ५७)

(२४) श्रीसद्गुरुकृपेने प्राप्त झालेले शक्तिपातयोगाचे साधन अत्यंत दृढतेने, निश्चयाने, अखंडपणे व मोठ्या आदराने करीत राहिल्यास आपण स्वयमेव शक्तीच आहोत, पदार्थ नाहीतच अशी धारणा आपोआप दृढ होत जाते.

(२५) शैवदर्शन हे कधीही पलायनवादावर विश्वास ठेवीत नाही. या शास्त्रामुळे संसार आणि त्याचे आघात प्रतिघात या दोहोंविषयी निरपेक्ष राहता येते; कारण हे दोन्ही श्रीशिवत्वाचा विकास आहे. (पृ. ३९७)

(२६) प्रतिक्षण मनामध्ये निर्माण होणाऱ्या आणि नाहीशा होणाऱ्या असंख्य चिंतांमधील संधिक्षणामध्ये नित्योदित अर्थात् नित्य उदय पावलेल्या उन्मेषतत्त्वाची व्यापकता अनुभवावयाला येऊ शकते. (पृ. ३९७)

(२७) श्रीपरशिवांच्या भक्तीचे म्हणजे जागृत शक्तीचे बल धारण करणारे साधकच फक्त द्वैताचा विवेकाने नाश करू शकतात (पृ.४४०)

(२८) ज्या ज्या कोणत्या मनोहर वस्तू आपल्या डोळ्यांसमोर येतील त्यांच्या ठिकाणी एकाग्र होऊन मन लीन होईपर्यंत श्रीपरमशिवांची भावना करावी. त्यामुळे निरोध आपला सेवक होईल. (पृ. ४८०)

येथपर्यंत आपण "**स्पंदशास्त्र**" किंवा "**स्पंदकारिका**" या ग्रंथाधारे जीव, जगत् व ईश्वर यांच्या रूपाने होणारी पिंडब्रह्मांडाची उभारणी अर्थात् त्यांचे स्वरूप व सिद्धयोगसाधनाने या सर्वांची संहारणी होऊन श्रीशिव-शक्तिसामरस्यावस्थेची प्राप्ती कशी होते हे विस्तृतपणे पाहिले. या सर्व विवेचनाचे श्रीसंत तुकाराममहाराजांनी पुढील चार अभंगात साररूपाने वर्णन करताना असे म्हटले आहे की -

**संकोचोनी काय झालासी लहान। घेई आपोशन ब्रह्मांडाचें।।१।।**
**करोनी पारणें आंचवू संसारा। उशीर उशीरा लावूं नको।।२।।**
**घरकुलीनें होता पाडिला अंधार। तेणें केलें फार कासावीस।।३।।**
**झुगारूनी दुरी लपविलें काखे। तुका म्हणे वाखे कौतुकाचे।।४।।**

☆☆☆☆☆

**निरंजनीं आम्हीं बाधियेलें घर। निराकारीं निरंतर राहिलोंसे।।१।।**
**निराभासीं पूर्ण झालो समरस। अखंड ऐक्यास पावलों आम्ही।।२।।**
**तुका म्हणे आतां नाहीं अहंकार। झालों तदाकार नित्य शुद्ध।।३।।**

☆☆☆☆☆

**निरंजनीं एकवटवाणे। संग नेणें दुसरा।।१।।**
**पाहा चाळविलें कैसें। लावूनि पिसें गोवळें।।२।।**
**लपविलें अंगें अंग। दिला संग होता तो।।३।**
**तुका म्हणे नव्हतें ठावें। झाले भावें वाटोळें।।४।।**

☆☆☆☆☆

**लवण मेळवितां जळें। काय उरलें निराळें।।१।।**
**तैसा समरस झालों। तुजमाजीं हरपलों।।२।।**
**अग्निकर्पूराच्या मेळीं। काय उराली काजळी।।३।।**
**तुका म्हणे होती। तुझी माझी एक ज्योती।।४।।**

☆☆☆☆☆

हे साधका! तू मुळात चैतन्यस्वरूप, विभुरूप, आत्मरूप अर्थात् श्रीशिवशक्तिरूप असताना आपल्या स्वस्वरूपाशी अभिन्न असलेल्या शक्तीचा संकोच करून जीवरूपाने लहान का झालास? ही जी उभारणी तू स्वतः केली आहेस तिची संहारणी करण्याकरिता ब्रह्मांडाचे आपोशन घे अर्थात् श्रीसद्गुरुकृपेने जागृत झालेली मूलाधारस्थ जीवरूप कुंडलिनी शक्ती आज्ञाचक्राच्या पर्यंत असलेल्या पिंडातून सुषुम्नाद्वारे ब्रह्मांडात म्हणजे आज्ञाचक्राच्या वर सहस्रारात नेऊन श्रीशिवाशी समरस कर.।।१।। अशा रीतीने पारणे करून म्हणजे अनंत जन्मपर्यंत संकुचितपणामुळे जो स्वस्वरूपाचा उपवास अर्थात् विस्मरण झाले होते ते उपरोक्त प्रकारे सामरस्याच्या द्वारा दूर करून समस्त संसार गिळून टाक. हे घडून येण्याकरिता फार उशीर लावू नको अर्थात् दीर्घकाल, निरंतर व अत्यंत सत्काराने श्रीगुरुकृपाप्राप्त साधन कर.।।२।। घरकुलीने अर्थात् जीवपणामुळे, देहाभिमानामुळे, वासनामुळे व इच्छा-आकांक्षादि संसारोन्मुख वृत्तींमुळे जन्ममरणपरंपरारूप आत्मस्वरूपाच्या अज्ञानामुळे अंधार पडला होता त्याने तुला जन्मजन्मांतरी अत्यंत कासावीस केले होते अर्थात् त्रिविध तापाने पोळून टाकले होते.।।३।। श्रीसंत तुकाराममहाराज असे म्हणतात की, हे साधका! तू आपल्याला स्वतःला आपल्याच काखेत अर्थात् स्वतःच्या ठिकाणी लपवून स्वतःच हा संसाराचा खेळ कौतुकाने लपून खेळत होतास; पण हा खेळ तापदायक असल्यामुळे तो तू दूर झुगारून दे अर्थात् जीवरूपाने जे स्वांग घेतलेले आहे ते सोडून देऊन श्रीशिवरूप हो.।।४।।

आम्ही निरंजनात म्हणजे नि:शेष अंजनरहित अशा शुद्ध श्रीशिवशक्ति-सामरस्यावस्थेत घर बांधले आहे अर्थात् तेथे समरस झालो आहोत आणि त्या अवस्थेतच अखंड निराकार रूपाने आहोत.।।१।। अशा प्रकारे श्रीशिवशक्तीचे जे नि:शेष आभासरहित अर्थात् पिंडब्रह्मांडाच्या उभारणीविरहित जे स्वरूप आहे त्याच्याशी आम्ही समरस आणि त्रिकालाबाधित समावेशावस्थेला प्राप्त झालो आहोत.।।२।। श्रीसंत तुकाराममहाराज असे म्हणतात की, आता "अ" म्हणजे श्रीशिव व "हं" म्हणजे शक्ती या दोघांचे सहस्रारात समरसीकरण झाल्यामुळे आमच्या ठिकाणी "अहं"कार शिल्लक राहिलेला नाही. आम्ही नित्य शुद्ध अशा श्रीशिवशक्तीशी तदाकार, एकरूप किंवा समरस झालो आहोत.।।३।।

माझे मूळचे श्रीशिवशक्ति स्वरूप हे निरंजन अर्थात् शुद्ध व कलंकरहित असे होते. त्या अवस्थेत मला कोणाचाही संग नव्हता. असे माझे नि:संग व निखळ शुद्ध रूप होते.।।१।। परंतु ईश्वराने स्वत:च स्वत:ला चाळविले अर्थात् स्वेच्छेनेच आपल्याला जीवरूपाने संकुचित करून घेऊन पिंडब्रह्मांडाच्या गुंत्यात अडकवून घेतले.।।२।। अशा प्रकारे संसारोन्मुख होऊन त्याने आपल्याला अर्थात् स्वस्वरूपाला लपवून टाकले आणि मूळची एकसंगाची अद्वय स्थिती मोडून टाकली.।।३।। अशा प्रकारे जीवभाव प्राप्त झाल्याने आमचे वाटोळे झाले व पुन्हा मी श्रीशिवभाव प्राप्त करून घेतल्यामुळेही आमचे वाटोळेच झाले.।।४।।

ज्याप्रमाणे मीठ पाण्यात घातल्यावर ते पाण्यापेक्षा वेगळे राहत नाही।।१।। त्याप्रमाणे मी ईश्वराशी अर्थात् माझ्या स्वसंवेद्य अशा मूळच्या श्रीशिव-शक्तिस्वरूपाशी समरस अर्थात् एकरूप व एकरस झालो. या रीतीने मी श्रीभगवंतामध्ये हरवून अर्थात् विरघळून गेलो.।।२।। ज्याप्रमाणे अग्नी आणि कापूर यांचा संबंध आला असता कापूर जळून जाऊन खाली काजळी सुद्धा उरत नाही।।३।। त्याप्रमाणे ईश्वराची व माझी स्वरूप ज्योती मुळातच जी एक होती ती आता सर्व संकुचितपणाचा निरास झाल्यामुळे पूर्ववत् एक झाली आहे.।।४।।

सारांश, सिद्धयोगाचे साधन करणाऱ्या साधकांना या साधनाचे अत्युच्च व अनुत्तर पातळीवरील श्रीगुरुस्वरूपाने मार्गदर्शन करून अंत:स्फूर्ती

देणारा आणि आपल्या स्वसंवेद्य व स्वस्पंद अर्थात् श्रीशिवशक्तिरूप आत्मस्वरूपाकडे अर्थात् सामरस्यरूप व अंतिम सिद्धीकडे मार्गस्थ होण्यासाठी प्रेरणा देणारा "**स्पंदशास्त्र**" किंवा "**स्पंदकारिका**" हा एक अपूर्व, अलौकिक, लोकोत्तर व एकमेवाद्वितीय ग्रंथ आहे. साधक वाचक, भक्त व जिज्ञासू अभ्यासकांना या ग्रंथाचा लाभ होईल.

या ग्रंथात ज्या टीकांचे भाषांतर समाविष्ट केलेले आहे त्यातील काही टीकांचे भाषांतर चि. सौ. मंजिरी प्रीतम पाटील, एम्. ए. (सुवर्णपदक विजेती) हिने केले आहे. तिच्याकडून या संप्रदायाची अशीच सेवा उत्तरोत्तर व्हावी व तिच्यावर अखंड श्रीगुरुकृपा राहावी म्हणून श्रीगुरुचरणी प्रार्थना आहे. त्याचप्रमाणे या ग्रंथाची मुद्रिते तपासण्याचे काम चि. सौ. सुवर्णा दत्तगुरू पाटील हिने व श्री. दिलीप मधुसूदन पिंगळे या दोघांनी अत्यंत मेहनतीने व साक्षेपाने केले असून या ग्रंथाच्या सूची श्री. दिलीप मधुसूदन पिंगळे यांनी खूप कष्ट घेऊन तयार केल्या आहेत. याशिवाय या ग्रंथाची अक्षर जुळणी चि. विवेक जयवंत हटकर, श्री. नितीन यशवंत रोडे यांनी सेवाभावाने, प्रेमाने व श्रद्धेने केलेली आहे, ही अत्यंत स्पृहणीय गोष्ट आहे. या सर्वांवर व त्यांच्या कुटुंबियांवर श्रीगुरुचरणांनी अखंड कृपादृष्टी ठेवावी ही त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

ज्यांनी अत्यंत आत्मीयतेने, आपुलकीने व प्रेमाने अर्थसाहाय्य करून हा ग्रंथ प्रसिद्ध होण्याचा मार्ग सुलभ करून दिला त्या सर्वांवर व त्यांच्या कुटुंबियांवर श्रीगुरुचरणांनी अखंड कृपादृष्टी ठेवावी अशी त्यांच्या परमकोमल चरणी प्रार्थना आहे.

सिद्धयोगाचे समाधिधन ज्या ज्या ग्रंथामधून संपूर्णपणे अगर अल्पांशाने प्रकट झालेले असेल ते ते ग्रंथ मूळ व मराठी भाषांतरासह साधकांपर्यंत पोहोचविण्याचा पूर्वी केलेला संकल्प माझे हृदयस्थ श्रीसद्गुरू सकलसंतश्रेष्ठ महासिद्धयोगी श्रीसंत गुळवणीमहाराज आपल्या अमोघ शक्तिसामर्थ्याने, माझ्यावरील प्रेमाने व अपरंपार कृपाबलाने पूर्ण करून घेतील असा नितांत विश्वास आहे; कारण हे त्यांनी माझ्यावर सोपविलेले कार्य आहे. श्रीसद्गुरूंनी दिलेले किंवा सोपविलेले कार्य हे नेहमीच यशस्वी होत असते. (Given mission is always successful) असा शास्त्रकारांचा निर्वाळा

आहे; कारण हे कार्य निमित्तमात्र म्हणून कोणीही करीत असला तरी अंततः संप्रदाय परंपरेने वाहत आलेली श्रीसद्गुरुरूप इच्छाशक्तीच आपल्या अपूर्व बलाने हे घडवून आणीत असते, हे नितांत सत्य आहे.

सारांश, "**तया अक्षराआंतील भावो। पाववीन मी तुमचा ठावो। आइका म्हणे केशवो। श्रीवामनाचा।।**" या न्यायाने "**स्पंदशास्त्र**" अर्थात् "**स्पंदकारिका**" या ग्रंथाचा, त्यावरील सर्व संस्कृत टीकांचा अर्थ व विस्तृत प्रस्तावना पूर्ण झाली. "**फोडूनि शब्दांचे अंतर। वस्तु दाखवी निजसार। तोचि सद्गुरु माहेर। अनाथांचे।।५.२.१५- श्रीदासबोध।।**" या श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांच्या म्हणण्याप्रमाणे हा ग्रंथ श्रीसद्गुरुनाथ-स्वामीमहाराजांच्या कृपेचे वैभव आहे, हे नितांत सत्य आहे. श्रीसद्गुरुकृपेने होणाऱ्या कुंडलिनी शक्तीच्या उत्थापनाद्वारा स्वस्पंदरूपाशी अर्थात् श्रीशिवस्वरूपाशी एकरूप किंवा समरस करणाऱ्या अमनस्कयोगाची सिद्धी हा या ग्रंथाचा मूर्धन्य महासिद्धान्त असून इतर तदंगभूत उपसिद्धान्त हे या ग्रंथाचे स्वरूप आहे. सिद्धयोगाचे साधन करणाऱ्या साधकांना शब्दरूप श्रीगुरुस्वरूपाने मार्गदर्शन करणारा हा एक अमोलिक, अपूर्व व अलौकिक असा ग्रंथ आहे.

सिद्धयोग हे ब्रह्मविद्येचे बीज आहे. साधकांना स्वस्पंदात्मक व संविन्मूर्तिरूप अर्थात् चैतन्यरूप श्रीशंभू किंवा श्रीशिवशक्तिसामरस्याची प्राप्ती व्हावी म्हणून श्रीसद्गुरुनाथस्वामीमहाराजांच्या अपार कृपेने हे रहस्य या ग्रंथरूपाने प्रसिद्ध होत आहे. सिद्धयोग अर्थात् शक्तिपातयोगशास्त्र म्हणजे शुद्धबोधाचा उल्लास आहे. मत्सर, द्वेषादि क्षुद्र व संकुचित बुद्धी सोडून देऊन या शास्त्राच्या रहस्याचा सर्व संतांच्या व पंथांच्या सारस्वताच्या प्रांगणात शिरून विचार केला पाहिजे. हे शास्त्र म्हणजे एक महान् आश्चर्य आहे. या शास्त्राचा कधीही अनादर करता कामा नये.

सत्शिष्यांच्या करिता या शास्त्राची रचना महामाहेश्वराचार्यवर्य महासिद्धयोगी श्रीवसुगुप्त यांनी केली आहे. दिवा हातात असला म्हणजे चालणाऱ्यांचे पाय घसरत नाहीत व वाट चुकत नाही. त्याचप्रमाणे आडमार्गाने जाणाऱ्या साधकयोग्यांनाही या शास्त्राच्या प्रकाशात शुद्धमार्ग दृष्टीस पडतो. अत्यंत सावधनतेने, साक्षेपाने व निश्चयाने जो साधकयोगी या सिद्धमहायोग

अर्थात् शक्तिपातयोगशास्त्राचा अभ्यास करतो तो आपल्या आयुष्यातच आपल्या अमनस्कतारूप भगवत्तेची अनुभूती घेऊन कृतार्थ होतो. यापेक्षा दुसरे कोणते मोठे आश्चर्य असू शकते?

इत्यलम्! विश्वात्मक व विश्वोत्तीर्ण श्रीगुरुचरणी नित्य व अखंड अगत्य ठेवून त्यांच्या अखंड श्रीचरणस्मरणाने जीवन धन्य व कृतार्थ करावे ही नम्र प्रर्थना.

श्रीगुरुचरणरजसेवक

**केशव रामचंद्र जोशी**

☆☆☆☆☆

।। श्रीगुरुःशरणम् ।।

।। ॐ निरञ्जनोन्मन्यान्मेषचिन्मयानन्द श्रीशिववामनाय नमः ।।

# स्पंदशास्त्र

## विषय प्रवेश

**सिद्धयोगशास्त्राची महती व आवश्यकता :-**

स्वतः परमतत्त्व "स्पंद" शब्दाने आपल्याला प्रकट करीत असते. सात मजली महालावर जाण्यासाठी ज्याप्रमाणे जिन्याची किंवा नदी पार करून जाण्यासाठी नावेची नितांत आवश्यकता असते त्याचप्रमाणे श्रीभगवंताच्या प्राप्तीसाठी सिद्धयोगशास्त्राची नितांत आवश्यकता आहे. यामुळेच सिद्ध व साधारण पुरुषांमध्ये एक विलक्षण संबंध प्रस्थापित होतो. या संबंधाशिवाय साधारण पुरुषाला यथार्थ तत्त्वाची अनुभूती कदापीही होऊ शकत नाही. या ग्रंथामध्ये स्वस्पंद हे वाच्य म्हणजे लक्ष्य आहे व शब्द हा वाचक म्हणजे उपाय आहे. स्पंद शब्दाचा अर्थ किंचित् हलणे असा आहे. अत्यंत शांत व निस्तरंग परमात्म्यामध्ये एकावेळेला सर्व रूपाने प्रकट होण्याची योग्यता असते. त्यालाच किंचित् चलन असे म्हणतात. यामुळे त्याच्या निर्विकल्पतेचा भंग होत नाही. व्यवहारामध्ये जेवढे ज्ञान होत असते त्यात पदार्थाच्या उदयाचा क्रम अंतर्निहित असतो. परंतु याच्याही पलीकडे एक विलक्षण अनंत चिद्रूप असा प्रमाता म्हणजे ज्ञाता किंवा संविद् आहे. खरे पाहिले तर तोच श्रीमहेश्वर आहे. त्याच्यामुळेच सर्व भेदांची सिद्धी होत असते म्हणजे त्याच्यामुळेच सर्व भेद दृष्टिगोचर होत असतात. हे तत्त्वच चित्, संवित्, ज्ञान व बोध या नावांनी प्रसिद्ध आहे. वस्तुतः या तत्त्वाला कसलेही आवरण नसल्याने व ते चित्स्वरूप असल्याने दिशा व काल हे भेद या तत्त्वाच्या ठिकाणी नाहीत. त्या विरहित हे केवळ अद्वितीय आहे. हे तत्त्व केवळ श्रद्धागम्य, दृष्टीच्या पलीकडे असलेले किंवा अदृश्य असे परोक्ष तत्त्व नसून स्वतःला अनुभवाला येणारे असे प्रमाणभूत तत्त्व आहे. **हाच शक्तितत्त्वाचा परमेश्वर म्हणजे आत्म-चिंतामणी आहे.** हे तत्त्वच जाणावयाचे असल्याने त्यासंबंधी

विचार, मनन, चिंतन व त्याच्या प्राप्तीच्या साधनाची चर्चा करणे आवश्यक आहे.

सिद्धयोगसाधन हा चिंतामणी आहे; कारण साधकाला तत्काल स्वानुभूती प्राप्त करून देणाऱ्या या साधना इतके श्रेष्ठ असे दुसरे साधन या भूतलावर नाही असा शास्त्रकारांनी उद्घोष केला आहे. या दृष्टीने **"पौष्कर संहिता"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**चिन्तामणौ स्वरूपेण न किञ्चिदुपलभ्यते।**
**अथ चाभिमतं सूते ब्रह्मैवं सर्वशक्तिकम्।।**

चिंतामणी प्राप्त झाल्यावर खरे पाहता कोणत्याही वस्तूची प्राप्ती होत नाही. परंतु आपण जी इच्छा करू त्याची प्राप्ती चिंतामणी करून देत असतो. हा चिंतामणी सर्वशक्तिमय ब्रह्मच आहे.

सिद्धयोगाचे साधन हे असेच चिंतामणिस्वरूप असल्याने त्या साधनामुळे साधकाच्या सर्व इच्छा पूर्ण होतात व हे साधन सर्वशक्तिमय असे साध्यरूप असल्याने साधकाला परब्रह्माचीही प्राप्ती होते. श्रीभगवदादिशेषप्रणीत **"परमार्थसार"** या ग्रंथातही साधक भावनेने जे जे साधन करतो ते ते शेवटी सिद्धयोग साधनरूप अंतरंग चिंतामणीत परिणत होऊन त्याची प्रगती कशी होते हे सांगताना असे म्हटले आहे की -

**सर्वाकारो भगवानुपास्यते येन येन भावेन।**
**तं तं भावं भूत्वा चिन्तामणिरिव समभ्येति।।६६।।**

परमेश्वर तर सर्व काही आहे. परंतु ज्या ज्या भावनेने त्याची उपासना केली जाते ती ती भावना शेवटी सिद्धयोगाचे अंतरंग साधन परिपुष्ट, समर्थ, वृद्धिंगत व विकसित होण्यास साहाय्यक होऊन चिंतामणीप्रमाणे जी जी इच्छा करावी ते ते फल या साधनेपासून प्राप्त होते.

मूलतः परमार्थवस्तू म्हणजे परब्रह्म हे भावशून्य, अग्राह्य व निराकार आहे. त्याचे श्रीशिव हे नाव सुद्धा केवळ कल्पनामात्र आहे. परमार्थ वस्तूमध्ये परिणाम म्हणजे बदल नाही व विवर्त म्हणजे भासही नाही. अगर या दोन्ही गोष्टी असल्या तरी परमार्थ वस्तूमध्ये काही खंड पडू शकत नाही. **"संवित्-प्रकाश"** या ग्रंथामध्ये ही गोष्ट स्पष्ट करताना असे स्पष्ट केले आहे की, "निर्मल-बोधैकस्वरूप" परमार्थामध्ये विवर्त व परिणाम या दोन्ही वादांमुळे देह-परिग्रहाची म्हणजे आत्माच जीवभाव

धारण करून देहात कसा येऊन राहतो याची उपपत्ती लागते किंवा सिद्धी होते. वास्तविक पाहता परमार्थ हा स्वस्वरूपापासून कधीही न ढळणारा म्हणजे अच्युत आहे. विवर्तामध्ये अशी च्युती न होताही अशी च्युती झाली आहे असे फक्त भासते. ज्याप्रमाणे सोनेच कुंडलाचा आकार धारण करते त्याप्रमाणेच परिणामामुळे आत्माच जगद्रूपाने परिणाम पावलेला किंवा नटलेला दिसतो."

खरा प्रश्न असा आहे की, असे जर भासते किंवा परिणामित झालेले दिसते तर हे आत्मतत्त्व आवरणरहित कसे असू शकेल? आपण जेथे पाहतो तेथे त्या आत्मतत्त्वाला सुख, दुःख, मोह, स्पंद, स्वस्पंद इत्यादि गुणांनी झाकलेलेच पाहतो. सुखदुःखादि गोष्टी या जाणण्यास योग्य असल्या कारणाने त्या स्वतः सत्ताशून्य आहेत. जो जाणणारा म्हणजे ज्ञाता आहे त्याच्या आश्रयामुळेच या सुखदुःखादि गोष्टींना प्रतिष्ठा प्राप्त झाल्यासारखे दिसते. ज्यांची बुद्धी अप्रबुद्ध व अविकसित असते ते आपल्या शुद्ध-बुद्ध स्वरूपाचा परित्याग करून कामनावश अहंभावाने संसाराशी किंवा गुणांशी एकरूप होतात व आपल्या अनंत स्वरूपाला संकुचित किंवा लहान करतात. हा संकोच केवळ अविद्येमुळेच झालेला असतो. स्वतःचे संवित्-स्वरूप तर अद्वितीयच आहे. म्हणून जे महापुरुष स्वरूपामध्ये स्थिर असतात त्यांना हा भ्रम कधीही होत नाही.

**"धातुसमीक्षा"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "हा अविद्यायुक्त आत्माच प्रमेयाच्या म्हणजे ज्याला जाणावयाचे आहे त्या रूपाने स्थित असतो. अर्थात् पाहणारा जीव व दिसणारे संसाराचे दृश्य हे भेद खरे नाहीत. अविद्येने गुरफटलेला आत्मा आपल्या स्वतःच्या मूळ स्वरूपाला जाणत नाही. अविद्या स्वतः खोटी आहे. असत्य आहे. खोटी वस्तू कधी असूच शकत नाही. जी वस्तूच नाही त्या वस्तूचा नाश किंवा वस्तूत विकार अगर बदल होऊ शकत नाही. दोरीचा तुकडा अंधारात पडला तरी तिच्यात बदल होत नाही किंवा ती दिसत नाही म्हणून ती नष्ट झाली असेही होत नाही. याप्रकारे अविद्येमुळे आत्म्यामध्ये कोणताही बदल किंवा नाश होत नाही. त्यामुळे या ज्ञानरूप परमात्म्याला स्वतःचे किंवा दुसऱ्याचे असे कोणतेही बंधन नाही. अज्ञानामुळेच आत्मा बंधनात आहे असे वाटते. अज्ञान संपल्यावर आत्मा पहिल्यापासूनच मुक्त आहे हे जाणवते."

"**तत्त्वयुक्ती**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "**संसारातील प्राणी ज्या ज्या भयंकर कर्मांनी बांधले जातात तेच वास्तविक रीतीने मुक्तीचे उपाय आहेत.** परंतु मूर्खपणामुळे ते त्या भवबंधनापासून मुक्त होऊ शकत नाहीत." "**कुलयुक्ती**" या ग्रंथामध्येही असे म्हटले आहे की, "**पतन व अभ्युत्थान या दोहोंचे एकच कारण आहे. अज्ञानी ज्यामुळे बांधला जातो त्यामुळेच ज्ञानी मुक्त होतो.**" श्रीउत्पलाचार्यांचे म्हणणे असे आहे की, "**ज्या कारणांमुळे मूर्ख दुःखी होतो त्यांच्यामुळेच बुद्धिमान दुःखाच्या पलीकडे जातो. लोखंडाचा गोळा पाण्यात बुडून जातो. मात्र त्याची नाव तयार केली तर ती पाण्यात तरंगू लागते.**"

श्रीमद्भगवद्गीतेमध्येही अगदी स्पष्टपणे सांगितले आहे की, "**ज्याच्यामध्ये सर्व विषय प्रवेश करतात त्यालाच खरी शांती प्राप्त होते. विषयांच्या मागे लागलेल्यास शांती मिळत नाही. यापेक्षाही पहिली ही गोष्ट खरी आहे की, रागद्वेषरहित इंद्रियांनी जर भोग भोगले तर ते प्रसन्नतेचेच साधन होते.**" एका महात्म्याने असे म्हटले आहे की, "जो परमार्थज्ञानी मनुष्य आत्मभावाचा त्याग न करता विषयांवर प्रेम करतो तोच खरा जीवन्मुक्त होय. ज्याप्रमाणे नट अन्य रूपाने आपल्याला दिसतो त्याप्रमाणे आत्म्याचे स्पंद विषयरूपाने आपल्या अनुभवास येतात." "**चिच्छक्ती-संस्तुती**" या ग्रंथामध्ये श्रीयोगिनाथांनी असे म्हटले आहे की, "शक्तीच्या प्रवृत्ती व निवृत्तीनेच उदय व प्रलय होत असतात. याकरिता जेवढे स्पंद दृग्गोचर होऊन अनुभवास येतात ते सर्व शक्तीचेच स्पंद आहेत. अग्नीतून धूर बाहेर पडल्यावर आकाशामध्ये नाना तऱ्हेच्या आकृती दिसू लागतात. त्याचप्रमाणे अद्वैत परमात्म्यामध्ये शक्तीच्या स्पंदामुळे ही द्वैतरूप सृष्टीची आकृती दिसू लागते."

सृष्टीच्या आकृतीचा हा जो भ्रम जीवाला झालेला आहे तो दूर करण्यासाठी उपाय सांगून उपेय म्हणजे प्राप्त करण्याच्या वस्तूचे प्रतिपादन करणे हे शास्त्राचे खरे प्रयोजन आहे. शास्त्र वाचल्याने उपेय-स्वरूपाची अनुभूती येत नाही हे नितांत सत्य आहे. परंतु शास्त्राच्या ज्ञानाने आपल्याला कोणत्या सहज साधनाने उपेय स्वरूपाची अनभूती येऊन ती स्थिर होईल याचे ज्ञान होते. या दृष्टीने शास्त्राची महती मानलीच पाहिजे.

*****

## सिद्धयोग म्हणजे वज्राचे टोक

हे जे स्पंद-तत्त्व-शास्त्र आहे ते स्वंतत्र दर्शन आहे, हे ध्यानात ठेवले पाहिजे. मात्र या दर्शनामुळे अद्वैत-प्रतिपादक शास्त्रांच्या संगतीमध्ये कोणत्याही तऱ्हेची बाधा उत्पन्न होत नाही हा या दर्शनाचा विशेष आहे. विश्वाकार होणारे, विश्वाला प्रकाशित करणारे व विश्वाचा संहार करणारे इत्यादींचे जे आदिकारण अकृत्रिम अहंकार आहे त्याच्या स्फुरणाला विमर्श म्हणतात. या विमर्शस्वरूप स्पंदभूमीवर आरूढ झाल्यावर पश्यंती आदीच्या क्रमाने वाणीची उत्पत्ती होते. नंतर संवित्प्रकाशाच्या म्हणजे ज्ञानाच्या प्रकाशाच्या अनुसार ती वाणीच विश्वाचा उदय व विलय करते. ती कार्यानुरूप नामरूप धारण करते व चराचराच्या जीवनयात्रेचा निर्वाह करते. उभारणी व संहारणी ही दोन्ही त्या वाणीचीच रूपे आहेत. त्यातच नामरूपाचा व व्यवहाराचा निर्वाह निवास करीत असतो. जर त्या शक्तीची सत्ता स्वीकारली नाही तर कोणत्याही वादीची सत्ता सिद्ध होऊ शकणार नाही; कारण वादाचा तो आत्माच प्रकाशक आहे. तोच सर्वाला मूळ कारण आहे. यासाठीच **"ईश्वरप्रत्यभिज्ञादर्शन"** या ग्रंथामध्ये त्याला आदिसिद्धी म्हटले आहे. हा आपला आत्मा आदिसिद्ध, ज्ञाता, कर्ता व श्रीमहेश्वर आहे. याची सिद्धी करण्यासाठी कोणताही चेतन पुरुष अपेक्षित नाही. ज्याच्यापासून सर्व सिद्ध होते तो आत्माच आहे. **सर्वांचा निषेध केल्यावर जे तत्त्व शेष राहते तो आत्मा होय.**

जीवाची वृत्ती नेहमी संपूर्णपणे विषयाकार असते. या विषयाकार वृत्तींच्या सुरवातीला, मध्ये व शेवटी आत्मा स्वयंप्रकाशमान असूनही सिद्ध परमार्थाच्या संबंधामध्ये विप्रतिपत्ती म्हणजे अग्रहण, अन्यथाग्रहण किंवा संशय निर्माण होण्याचे एकमात्र कारण केवळ मोहच आहे. एखादा छोटा राजा असतो. तो चक्रवर्ती सम्राटाकडे याचना करून त्याच्यापासून थोडीशी सेना व काही लढाईची सामुग्री मिळवितो. ही सामुग्री प्राप्त झाल्यावर जर लहान राजाने चक्रवर्ती राजाचे साम्राज्य हरण करण्यासाठी युद्ध केले तर तो लहान राजा स्वतःच स्वतःचा विनाश करून घेतो. त्याचप्रमाणे आदिसिद्ध आत्म्यापासून शक्ती प्राप्त करून घेऊन जो वृत्ती किंवा वृत्त्यारूढ पदार्थ असलेल्या आत्म्याचाच अपलाप करतो म्हणजे त्याला लपवितो त्याची शेवटी निश्चित च्युती होते. अशा प्रकारे हे स्वतःसिद्ध

आहे की, या आत्मसत्तेचा कोणाकडूनही पराजय होत नाही.

**दशादिक्कालाद्यैरकलितचिदालोकवपुषः।**
**सदा तादृक्स्वात्मानुभवितृतया विस्फुरति यः।।**
**निजो धर्मःशम्भोरनुपमचमत्कारसरसः।**
**परं शाक्तं तत्त्वं जगति जयति स्पन्द इति तत्।।१।।**

दिशा व काल हे पदार्थ उत्पत्तीच्या पूर्वी शक्तीशी तन्मय असल्याने स्वतःतील लक्षणे प्रकट करू शकत नाहीत. शक्ती सुद्धा स्वतः श्रीशिवाशी तादात्म्य पावलेली असल्याने केवळ श्रीशिवस्वरूपच बनलेली असते. त्यामुळे चैतन्य हेच ज्याचे शरीर आहे तो श्रीपरशिव स्वतःच स्वस्वरूपात स्फुरण पावत असतो.

पण तो श्रीपरशिव शक्तियुक्त असल्याने ब्रह्मानंदादि शक्तिस्वरूपी शब्दांनी त्याचे वर्णन केले जाते. ब्रह्म म्हणजे आत्मा व आनंद म्हणजे शक्ती होय. स्वरूपाचा अर्थही असाच होतो. "स्व" म्हणजे आत्मा व "रूप" म्हणजे शक्ती होय. तेव्हा परब्रह्म हे तत्त्व शक्तियुक्त असल्याने त्याची उपासना करणारे भक्तिमान् साधक भुक्ती व मुक्ती या दोन्हींना पात्र होतात. याकरिता त्या परब्रह्मरूपी शक्तितत्त्वाचा जयजयकार असो. त्या शाक्ततत्त्वाला स्पंद असे नाव आहे.

**तज्ज्ञैरदर्शितदिशः स्वयमाविशन्तः।**
**केचित्रिसर्गगहनं विषमं भ्रमन्तु।।**
**तत्रैव यत्पुनरमी हतवर्त्मनान्यान्।**
**आकारयन्ति गमनाय महान्भ्रमोऽयम्।।२।।**

**सिद्धयोग हा ज्ञानी लोकांनी सांगितलेला परब्रह्मप्राप्तीचा अत्यंत श्रेष्ठ व सुलभ असा संप्रदाय आहे.** हा संप्रदाय सोडून शैवागमरूपी खोल असा समुद्र तरून जाण्याची काही जण इच्छा करतात. श्रीगुरूंनी ब्रह्मज्ञान दिल्याबरोबर पटणारे जे शिष्य ते शैव होत. ब्रह्मज्ञान दिल्याबरोबर पटण्याची क्रिया एकमात्र शक्तिपातानेच होते. **या शक्तिपातालाच आगम, मार्ग किंवा शास्त्रबोध असे म्हणतात.** वामाशक्तीमुळे किंवा अन्य मार्गाने आपल्याला ज्ञान प्राप्त झालेले आहे असे काही जण म्हणतात. परंतु ते परतीरास पोहोचू शकत नाहीत. दुर्बोध व दुःखपूर्ण असा संसारसागर पाहून उल्लंघू शकत नाहीत. असे असून सुद्धा ते आपल्या शिष्यांना त्याच

मार्गाने या म्हणून सांगतात. असे सांगणारे लोक मोठ्या भ्रमात पडलेले आहेत हेच खरे.

**नानावादानिलौघाननवसरकृतान्योन्यसङ्घट्टघोरो-।**
**द्धातानापादयद्भिः श्रवणविदलनोद्दामशब्दप्रबन्धान्॥**
**शास्त्राब्धिः क्षोभ्यते यैर्विवरणरभसादुद्यदावर्तभीम।**
**भ्रान्तिभ्रष्टागमार्थप्लवविधुरमतिस्तारितोऽर्थी जनस्तैः॥३॥**

काही मोठमोठ्या ग्रंथात नाना प्रकारच्या परस्पर विरुद्ध अशा वादविवादांचे वारे वाहत असतात. त्यांचे वादविवाद श्रवण केले म्हणजे कान सुद्धा घाबरून जातात. अशा ग्रंथांमध्ये विविध प्रकारचे अर्थरूपी भोवरे असल्याने शास्त्ररूपी समुद्र प्रक्षुब्ध होऊन त्या समुद्रभ्रांतीने लोक भ्रष्ट होतात. त्यांना आपल्या कल्याणाचा खरा मार्ग दिसेनासा होतो. अशा वेळी शास्त्ररूपी समुद्र तरून जाण्यासाठी ज्यांनी उत्तम रीतीने साधनमार्गाच्या शास्त्राचे विवरण करणारे ग्रंथ निर्माण केले आहेत त्यांनीच खरोखर भ्रमिष्ट लोकांना तारले आहे.

**कश्चिद्भिन्नरुचिर्विदन्नपि परं तत्त्वं विपर्यस्यति।**
**द्वेषध्वान्तविरुद्धबुद्धिरितरो जात्यैव चान्यो जडः॥**
**इत्थं दुर्लभ एव सर्वहृदयग्राही गिरां सङ्ग्रहः।**
**किन्त्वेतेऽद्य विवेकिनः कतिपये सन्त्यत्र पात्रं सताम्॥४॥**

कित्येक विद्वान् लोक माझ्या या मताहून भिन्न मताचे आहेत. हे लोक शक्तियुक्त अशा परब्रह्माचा अर्थ जाणूनबुजून विपरीत रीतीने करणारे आहेत. कित्येक लोक द्वेषाने आंधळे होऊन मुद्दामच शास्त्राचा विरुद्ध अर्थ करतात. कित्येक जण जन्मतःच मूर्ख असल्याने तत्त्वाचे यथार्थ ग्रहणच करू शकत नाहीत. त्यामुळे सर्वांना आवडेल असा ग्रंथ सांगणे किंवा लिहिणे फार दुर्लभ आहे. तथापि सत्पात्र असे जे काही थोडे विवेकी असतील त्यांच्या करिता हा ग्रंथ आहे.

**केनापि ग्रथितां प्रसारणधिया कैश्चिद्सूत्रीकृता-**
**मेकीकृत्य यथागमं विरचतां स्पन्दार्थसूत्रावलीम्॥**
**ईशानुग्रहशक्तिवज्रशिखया विद्धेषु विद्वन्मनो-**
**माणिक्येषु निवेशयाम्यहमिमां कर्तुं कृतार्थां द्वयीम्॥५॥**

आजपर्यंत कित्येकांनी म्हणजे श्रीवसुगुप्तांनी प्रथम स्पंदसूत्रावली रचिली. नंतर भट्ट श्रीकल्लट इत्यादि सिद्धांनी त्याचे विवरण केले. मी (अर्थात् श्रीरामकंठाचार्य यांनी) मंत्रशास्त्राच्या अर्थाची सूत्रावली रचून त्याचे विवरण केले. ही दोन्ही एकत्र करून ईश्वराच्या अनुग्रहरूपी शक्तीच्या अर्थात् शक्तिपाताच्या वज्राच्या टोकाने ज्या विद्वानांची मनरूपी माणके विद्ध झाली आहेत त्यांच्या कोंदणात ही माझी कृती मी बसवितो. त्यामुळे श्रीवसुगुप्त व श्रीभट्टकल्लट यांच्या ग्रंथांची सार्थकता होईल.

*****

# स्पंदसंप्रदाय

सतत स्पंद पावणारी किंवा स्फुरण पावणारी परमेश्वराची विमर्शशक्ती अर्थात् स्वतंत्र क्रियाशक्ती हा स्पंदसूत्रामध्ये वर्णिलेला विषय आहे. काश्मीरमधील सर्व शैवक्षेत्रामध्ये प्राचीन काळापासून चालत आलेल्या एका जनश्रुतीनुसार इ.स. नवव्या शतकापूर्वीची अनेक शतके हे येथील दार्शनिक संसाराचे अर्थात् शैव शास्त्राचे अंधकार युग मानले जाते. त्याकाळी श्रीनागबोधीसारख्या बौद्ध आचार्यांनी व अन्य मतवादी लोकांनी येथील दार्शनिक क्षेत्रामध्ये द्वैतमूलक सिद्धान्ताची स्थापना केली होती. या सिद्धान्तांनी सर्वसामान्य जनतेला वास्तविक परिस्थितीपासून किंवा यथार्थ तत्त्वापासून दूर नेऊन भ्रांतीच्या खड्ड्यामध्ये ढकलून दिलेले होते. अशा परिस्थितीमध्ये अनुग्रहैकमूर्ती भगवान् श्रीभूतनाथांना लोकांचा उद्धार करण्याची इच्छा झाली. भगवान् श्रीभूतनाथ यांनी श्रीवसुगुप्त या नावाच्या एका सिद्ध पुरुषाला स्वप्नामध्ये स्वतः दीक्षा दिली. श्रीमहादेव पर्वताच्या पायथ्याशी (हल्लीचे दाछीगाम) विद्यमान असलेल्या एका टेकडीच्या (हल्लीचे शंकरपल) उंचवट्यावर अद्वैत शैवसिद्धान्ताच्या सूत्राचा पत्ता सांगितला. भगवान् श्रीभूतनाथ यांनी या शैवसिद्धान्ताच्या सूत्रामध्ये सामावलेले रहस्य श्रीवसुगुप्त यांना समजावून दिले. भगवान् श्रीभूतनाथ यांनी सिद्ध श्रीवसुगुप्त यांना अशी आज्ञा केली की, श्रीवसुगुप्तांनी त्या ठिकाणहून या सूत्राचा संग्रह करून त्यातील रहस्य अंधःकारात खितपत पडलेल्या लोकांना समजावून द्यावे व त्या अज्ञानी जीवांचा उद्धार करावा. सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्य यांनी श्रीभगवंतांच्या आज्ञेवरून त्या सूत्रांचा संग्रह केला आणि श्रीभट्टकल्लट आदि सच्छिष्यांना ही सूत्रे व्यवस्थितपणे समजावून दिली. स्वतः श्रीवसुगुप्ताचार्यांनी त्या सूत्रांमध्ये असलेल्या शक्तिमान् अर्थात् श्रीशिव आणि शक्ती यांच्या पूर्ण अभेदसिद्धान्ताचे सार एक्कावन कारिकांमध्ये संग्रहीतही केले. पुढे काही काळानंतर याच एक्कावन कारिकांना "**स्पंदकारिका**", "**स्पंदसूत्रे**" किंवा "**शक्तिसूत्रे**" अशी नावे दिली गेली.

श्रीभट्टकल्लट यांनी परतत्त्वाच्या विमर्शप्रधानतेचा किंवा ज्ञानप्रधानतेचा स्वीकार करून या स्पंदसूत्रावर आपली वृत्ती लिहिली व स्पंदसंप्रदायाचा शिलान्यास केला. सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्य यांच्या द्वारा अद्वैत शैवदर्शनाचा

जो पुनरुद्धार झाला त्याचा वर उल्लेख केलेलाच आहे. प्रत्यक्षात याकाळी या शैवदर्शनाचा दुसऱ्यांदा पुनरुद्धार झाला. सिद्ध श्रीवसुगुप्त यांच्या आधी अत्यंत प्राचीनकाळी प्रतिकूल विचारधारांच्या प्रचंड प्रहारांनी या शैवदर्शनाचा उच्छेद किंवा नाश झालेला होता. त्याकाळी भगवान् श्रीआशुतोषांनी अंधःकारात खितपत पडलेल्या लोकांचा उद्धार करण्याच्या इच्छेने श्रीकंठ हे नाव धारण करून भगवान् श्रीदुर्वासांच्या द्वारा या दर्शनाचा पुनरुद्धार करविला होता. या घटनेचा उल्लेख भगवान् श्रीअभिनव-गुप्तपादाचार्यांनी आपल्या **"तंत्रालोक"** या महान् ग्रंथाच्या पहिल्या आह्निकामध्ये विस्तारपूर्वक केलेला आहे.

* * * * *

## स्पंदसंप्रदायाचे उपलब्ध साहित्य

सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांच्या नंतर श्रीसोमानंद आणि त्यांची शिष्यपंरपरा यांनी एकाहून एक श्रेष्ठ अशा स्वतंत्र ग्रंथाची रचना करून विशाल प्रत्यभिज्ञा साहित्य निर्माण केले. स्पंदसंप्रदायामध्ये स्पंदकारिकेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्वतंत्र ग्रंथाची रचना केलेल्या लेखकाचे नाव आढळून येत नाही. याचे कारण काय आहे? याविषयी काहीही माहिती नाही. अशा प्रकारचे ग्रंथ लिहिले गेले असावेत व ते राजनैतिक विषमतेने काळाच्या उदरात गडप झाले असावेत असा विचार करणेही चुकीचे आहे. असे घडले असते तर प्रत्यभिज्ञा साहित्य किंवा शैवदर्शन यांचे दुसरे प्राचीन आगमग्रंथ किंवा स्पंदसूत्रे त्या विषमतेच्या कठोर प्रहारापासून वाचणे कसे शक्य होते? यावरून ही गोष्ट स्पष्ट आहे की, सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांनंतर स्पंदकारिकांशिवाय अन्य कोणताही मौलिक ग्रंथ लिहिला गेला नाही. काश्मीरमध्ये शाक्तलोकांपेक्षा शैववाद्यांचे संख्याधिक्य होते, या विचारात कोणतेही सार आढळून येत नाही. सध्याही शाक्तक्रमाचे अनुसरण करणारे कितीतरी लोक काश्मीरमध्ये आढळून येतात. यामागील कारण स्वतः श्रीशिवभट्टारकच जाणतात.

स्पंदसूत्रांवर निश्चितपणे अनेक वृत्ती व टीका लिहिल्या गेल्या. यामधील अनेक टीका व वृत्ती या आजही उपलब्ध आहेत आणि अनेक ग्रंथांचा केवळ उल्लेख मिळतो. श्रीअभिनवगुप्तपादाचार्य यांचे प्रमुख शिष्य श्रीक्षेम-राजाचार्य यांनी आपल्या **"स्पंदनिर्णय"** या ग्रंथामध्ये अनेक विवृतींचा

उल्लेख केलेला आहे. श्रीक्षेमराजाचार्य यांनी "**स्पंदनिर्णय**" या आपल्या ग्रंथामध्ये "**यद्यप्यस्मिन् विवृतिगणना विद्यते नैव शास्त्रे**" अर्थात् जरी या स्पंदसूत्रांवर अनेक वृत्ती किंवा टीका लिहिल्या गेल्या असल्या तरी त्या सर्व काही शास्त्रात उपलब्ध नाहीत, असे म्हटलेले आहे. श्रीक्षेमराजाचार्य यांनी सूत्र क्रमांक १७ व सूत्र क्रमांक १८ यांच्या व्याख्येमध्ये श्रीभट्टलोल्लट यांची वृत्ती आणि अन्य टीकाकारांच्या टीकेचा उल्लेख केलेला आहे. या वृत्ती किंवा टीका श्रीक्षेमराजाचार्यांच्या काळी उपलब्ध असतील; परंतु दुर्भाग्याने सध्या या उपलब्ध नाहीत. आजच्या काळी खाली वर्णिलेल्या टीका किंवा वृत्ती या उपलब्ध आहेत.

१) श्रीभट्टकल्लट यांची "**स्पंदकारिकावृत्ती**"

२) श्रीक्षेमराजाचार्य यांचा "**स्पंदसंदोह**"

ही टीका केवळ पहिल्याच स्पंदसूत्रावर लिहिलेली एक विस्तृत टीका आहे. "**स्पंदसंदोह**" या टीकेमध्ये अन्य सर्व सूत्रांचे सार संग्रहित केलेले आहे.

३) श्रीक्षेमराजाचार्य यांनी लिहिलेल्या स्पंदसूत्रावरील "**स्पंदनिर्णय**" या त्यांच्या दुसऱ्या टीकेमध्ये सर्व स्पंदसूत्रांची वेगवेगळी टीका लिहिलेली आहे.

४) श्रीरामकंठ यांच्या "**स्पंदकारिकाविवृती**" या टीकेमध्ये श्रीभट्टकल्लट यांच्या वृत्तींचा अर्थ पूर्णपणे प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे.

५) श्रीउत्पलाचार्य यांनी त्यांच्या "**स्पंदप्रदीपिका**" या टीकेमध्ये सर्व स्पंदसूत्रांवर अत्यंत विस्तृत टीका लिहिलेली आहे. श्रीउत्पलाचार्य (वैष्णव) यांच्या संबंधामध्ये हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, स्पंदप्रदीपिकेचे लेखक श्रीउत्पलाचार्य आणि "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथाचे लेखक भगवान् श्रीउत्पलदेव या दोन वेगवेगळ्या व्यक्ती आहेत.

या उपलब्ध साहित्याचा तुलनात्मक अभ्यास केला असता या टीकाकारांध्ये पारस्परिक अर्थात् एकमेकांविषयी मतभेद आणि दृष्टिकोणांची मतभिन्नता होती हे सत्य स्पष्टपणे ध्यानात येते. या टीकाकारांपैकी प्रत्येक लेखकाने एका विशेष आध्यात्मिक दृष्टिकोनाचा स्वीकार करून स्पंदसूत्रांची व्याख्या केलेली आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

### सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्य आणि श्रीभट्टकल्लट यांचा काळ :-

या दोन्हीही सिद्ध पुरुषांनी आपले जीवनवृत्त किंवा वंशावळी या विषयामध्ये कोठेही काहीही लिहून ठेवलेले नाही. असे करून सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्य यांनी अत्यंत शुद्ध अशा भारतीय मर्यादेचेच पालन केलेले आहे. परवर्ती अर्थात् त्यानंतरच्या सर्व लेखकांनीही यांच्या विषयी जितका उल्लेख केलेला आहे त्यावरून हे ज्ञात होते की, अर्वाचीन शैवक्षेत्र सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्य आणि श्रीभट्टकल्लट यांना सिद्धगुरूंच्या रूपामध्ये स्मरण करीत आलेले आहे. श्रीक्षेमराजाचार्य यांनी स्पंदनिर्णयाच्या उपोद्घातामध्ये जनश्रुतीचा उल्लेख करताना सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांचा केवळ नामनिर्देश केलेला आहे; तर श्रीभट्टकल्लटांची प्रसंगानुरूप चर्चाही केलेली नाही. श्रीक्षेमराजाचार्य यांनी केवळ श्रीशिवसूत्रविमर्शिनीच्या उपोद्घातामध्ये सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांचा महामाहेश्वर श्रीसिद्धगुरू आणि श्रीभट्टकल्लटांचा त्यांच्या शिष्यांच्या रूपामध्ये स्वीकार केलेला आहे. याउलट काश्मीरचे प्रसिद्ध इतिहासकार श्रीकल्हण यांनी आपल्या **"राजतरंगिणी"** या ग्रंथामध्ये मुख्यरूपामध्ये श्रीभट्टकल्लटाचे नाव घेऊन त्याच्या समकालीन अन्य सिद्धांचा **"आदि"** या शब्दाने गौणरूपाने निर्देश केलेला आहे.

**अनुग्रहाय लोकानां भट्टश्रीकल्लटादयः।**
**अवन्तिवर्मणः काले सिद्धा भुवमवातरन्।।५.६६।।**

याचा अर्थ असा आहे की, लोकांवर अनुग्रह किंवा कृपा करण्यासाठी श्रीभट्टकल्लट इत्यादि सिद्धयोगी राजा अवंतिवर्म्याच्या काळामध्ये पृथ्वीवर अवतरित झाले.

या दोघांव्यतिरिक्त दुसऱ्या शैवलेखकांनीही आपल्या कृतींमध्ये या दोघांचा श्रीगुरु-शिष्य यांच्या रूपामध्ये केवळ नामाचा उल्लेख केलेला आहे. यामुळे या विषयामध्ये अधिक काही शोध लागेपर्यंत मौनाचा आश्रय घेणे श्रेयस्कर आहे.

श्रीकल्हणाचार्य यांनी **"राजतरंगिणी"** या ग्रंथामध्ये एक पद्य उद्धृत केलेले आहे. त्यावरून श्रीभट्टकल्लट आणि अन्य अनेक सिद्धांनी लोकांवर अनुग्रह करण्यासाठी काश्मीरमधील प्रसिद्ध राजा श्रीअवंतिवर्मन यांच्या शासनकाळामध्ये पृथ्वीवर अवतार घेतला होता हे कळून येते. यासाठी श्रीकल्हणाचार्यांचे जितके आभार मानावे तितके कमीच आहेत. श्रीकल्हणाचार्य यांनी **"राजतरंगिणी"** या ग्रंथाच्या दुसऱ्या एका पद्यामध्ये

राजा श्रीअवंतिवर्मनाच्या राज्याधिरोहणाचा काळ लौकिक संवत् २९०० अर्थात् इ.स.८५५-८५६ असा होता हे कथन केले आहे. तो श्लोक पुढीलप्रमाणे आहे.

**एकोनत्रिंशे स वर्षेऽथ प्रजाविप्लवशान्तये।।**
**विनिवार्योल्पलापीडं तमेव नृपतिं व्यघात्।।४.७१६।।**

**अर्थ :-** प्रजेमधील गोंधळ शांत करण्यासाठी उल्पलापीडाचे निवारण करून त्याने अर्थात् अवंतिवर्म्याने संवत् २९०० अर्थात् इ.स. ८५५-८५६ त्याच राजाला मारले (आणि तो राज्यावर आला.)

हे संवत् श्री.स्टैनमहोदयांच्या गणनेनुसार इ.स.८५५-८५६ होते. श्रीअवंतिवर्मनाने एकूण एकतीस वर्षे राज्य केले. इ.स.८८६-८७ ही त्याची शेवटची कालमर्यादा आहे. सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्य आणि श्रीभट्टकल्लट हे श्रीगुरु-शिष्य असल्यामुळे ते समकालीन होते याविषयी कोणतीही शंका नाही. दुसरीकडे श्रीकल्हणाचार्य यांनी श्रीभट्टकल्लट यांना सिद्ध पुरुषाच्या रूपामध्ये स्वीकारलेले आहे. श्रीभट्टकल्लट यांना सिद्धावस्था प्राप्त करून घेण्यासाठी कमीत कमी पन्नास वर्षे लागलीच असतील. श्रीभट्टकल्लटांचा काळ नवव्या शतकाची सुरुवात मानली असता श्रीवसुगुप्ताचार्यांचा काळ आठव्या शतकाचा उत्तरार्ध असावा असे वाटते.

❋ ❋ ❋ ❋ ❋

### स्पंदसूत्रांचे खरे लेखक :-

या संबंधामध्येही प्राचीनकाळापासून येथील शैव आचार्यांमध्ये पारस्परिक मतभेद चालत आलेले आहेत. अद्यापही हा प्रश्न विवादास्पद असून याचे कोणतेही समाधानकारक व संतोषजनक उत्तर मिळालेले नाही. अनेक आचार्यांच्या मतानुसार मूळसूत्रांची रचना स्वतः सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांनी केलेली आहे. श्रीभट्टकल्लटांनी श्रीगुरूंच्या सूत्रात्मक भाषेचा अर्थ समजून घेण्यासाठी या सूत्रांवर वृत्ती लिहिलेली आहे. आजही येथील शैवक्षेत्रामध्ये बहुमत याच बाजूचे आहे व त्याचेच समर्थन सर्वजण करीत असतात. याउलट अनेक आचार्यांचे मत असे आहे की, मूळसूत्रांची रचना श्रीभट्ट-कल्लटांनी केलेली असून आपल्याच सूत्रांचा अर्थ समजावून देण्यासाठी श्रीभट्टकल्लटांनी या सूत्रांवर वृत्ती लिहिलेली आहे.

या दुसऱ्या मताच्या समर्थकांमध्ये स्पंदप्रदीपिकेचे लेखक श्रीउत्पलाचार्य

(वैष्णव) आणि श्रीशिवसूत्रवार्तिकाचे लेखक श्रीभास्कराचार्य हे प्रमुख आहेत. श्रीउत्पलाचार्य यांनी "**स्पंदप्रदीपिका**" या ग्रंथात असे कथन केले आहे की, श्रीभट्टकल्लटांना तत्त्वदर्शी श्रीगुरू सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांपासून हे रहस्य प्राप्त झाले आणि त्यांनी हे रहस्य श्लोकबद्ध केले.

**वसुगुप्तादवाप्येदं गुरोस्तत्त्वार्थदर्शिनः।**
**रहस्यं श्लोकयामास सम्यक् श्रीभट्टकल्लटः।।५३।।**

याचा अर्थ असा आहे की, यथार्थतत्त्वाचे दर्शन झालेल्या श्रीगुरू वसुगुप्तांपासून हे रहस्य प्राप्त करून श्रीभट्टकल्लट यांनी ते योग्य प्रकारे श्लोकांमध्ये बद्ध केले.

श्रीभास्कराचार्यांनी आपल्या श्रीशिवसूत्रवार्तिकाच्या उपोद्घातामध्ये पूर्वी वर्णिलेल्या जनश्रुतीचा उल्लेख करताना आपले असे मत प्रदर्शित केलेले आहे की, प्राचीन काळी एका सिद्धाच्या आज्ञेवरून श्रीमहादेव पर्वतावर सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांना श्रीशिवसूत्रे मिळाली होती. सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांनी ती सूत्रे आणि त्यांचे रहस्य श्रीभट्टकल्लट यांना दिले. ही स्पंदसूत्रे चार खंडामध्ये विभागलेली होती. श्रीभट्टकल्लट यांनी यामधील पहिल्या तीन खंडांची व्याख्या आपल्या "**तत्त्वार्थचिंतामणि**" नावाच्या टीकेमध्ये केली. श्रीभास्कराचार्यांनी हे सर्व "**शिवसूत्रवार्तिक**" या ग्रंथाच्या उपोद्घातात पुढील शब्दात वर्णिलेले आहे.

**श्रीमन्महादेवगिरौ वसुगुप्तगुरोः पुरा।**
**सिद्धादेशात्प्रादुरासन् शिवसूत्राणि तस्य हि।।**
**सरहस्यान्यतः सोऽपि प्रदाद्भट्टाय सूरये।**
**श्रीकल्लटाय सोऽप्येवं चतुःखण्डानि तान्यथ।।**
**व्याकरोत्त्रिकमेतेभ्यः स्पन्दसूत्रैः स्वकैस्ततः।**
**तत्त्वार्थचिन्तामण्याख्यटीकया खण्डमन्तिमम्।।**

याचा अर्थ असा आहे की, कैलास पर्वतावरील एका विवक्षित शिलाखंडावर सद्गुरू श्रीवसुगुप्तांच्या पुढ्यात सिद्धांच्या आदेशाप्रमाणे ही श्रीशिवसूत्रे प्रादुर्भूत झाली. श्रीवसुगुप्तांनी गुप्त रहस्यांनी युक्त अशी ही सूत्रे विद्वान् श्रीकल्लटांना सांगितली. श्रीकल्लटांनी त्या सूत्रांची चार खंडात विभागणी करून त्यावर स्पंदसूत्रे रचली आणि अंतिमखंडावर "**तत्त्वार्थचिंतामणि**" या नावाची टीका लिहिली.

श्रीउत्पलाचार्य (वैष्णव) आणि श्रीभास्कराचार्य यांच्या या मान्यतेमागील

काय आधार आहे ? याचा कोठेही उल्लेख मिळत नाही आणि त्यांनी स्वतः याविषयी काहीही लिहिलेले नाही.

श्रीक्षेमराजाचार्यांचे मत असे आहे की, स्पंदसूत्रांची रचना स्वतः सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांनी केलेली आहे. श्रीक्षेमराजाचार्यांनी आपल्या या मान्येतला **"स्पंदनिर्णय"** या ग्रंथाच्या शेवटी आपल्या एका पद्यामध्ये अभिव्यक्त केलेले आहे.

**लब्ध्वाप्यलभ्यमेतज्ज्ञानघनं हृद्गुहान्तकृतनिहितेः।**
**वसुगुप्तवच्छिवाय हि भवति सदा सर्वलोकस्य।।४.२।।**

श्रीरामकंठाचार्यांच्या विवृतीने कोणत्याही अंतिम तसेच निश्चित निर्णयाप्रत पोहोचण्यासाठी कोणतेही साहाय्य मिळत नाही. काश्मीर येथील संशोधन कार्यालयाच्या द्वारा प्रकाशित विवृतीच्या (संवत् १९६९ संस्करण) पृष्ठ क्रमांक ३ वर उल्लेखिलेल्या "केनापि ग्रथितां प्रसारणधिया"- इत्यादि उपोद्घातात्मक पद्यामध्ये श्रीरामकंठाचार्य यांनी सूत्रावलीचे ग्रथन करणाऱ्या कोणत्याही निश्चित व्यक्तीचे नाव लिहिलेले नाही. या पद्यावर लिहिलेल्या टिप्पणीमध्ये स्पष्ट शब्दामध्ये असे लिहिलेले आहे की, श्रीवसुगुप्तपादाचार्यांनी सर्वप्रथम स्पंदसूत्रांची रचना केलेली आहे. **"प्रथमं वसुगुप्तपादैः सूत्रावलिः दृब्धा।"** अर्थात् श्रीवसुगुप्तपादांना सर्वप्रथम सूत्रावली मिळाली. ही टिप्पणी कोणीही लिहिलेली असली तरी कोणत्या आधाराने लिहिलेली आहे याविषयीचे सूत्र कोठेही आढळून आलेले नाही.

श्रीभट्टकल्लटांच्या पुढील पद्याच्या अर्थाचा निष्पक्षपातीपणाने विचार केला असता असा निष्कर्ष निघतो की, सूत्रकार होण्याचे श्रेय हे सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांना प्राप्त झालेले आहे किंवा सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांनी स्पंदसूत्रांची रचना केलेली आहे.

**अगाधसंशयाम्भोधि समुत्तरणतारिणीम्।**
**वन्दे विचित्रार्थपदां चित्रां तां गुरुभारतीम्।।**
**।। स्पंदकारिका क्रमांक ५२।।**

वरील पद्याचा निष्पक्षपातीपणाने विचार केल्यास असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की, वास्तविक सूत्रकार होण्याचे श्रेय सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्यांनाच प्राप्त होते.

मूळ स्पंदसूत्रांची एकूण संख्या एक्कावन आहे. श्रीक्षेमराजाचार्यांनी सुद्धा आपल्या स्पंदनिर्णयाच्या उपोद्घातामध्ये मूळसूत्रांची संख्या एक्कावन्न

सांगितलेली आहे. यावरून ही गोष्ट सिद्ध होते की, वर उल्लेखिलेली कारिका श्रीभट्टकल्लटांनी मूळसूत्रांवर वृत्ती लिहिल्यानंतर श्रीगुरुभारतींना वंदन करण्यासाठी या वृत्तीला जोडलेली आहे. मूळसूत्रे ही श्रीभट्टकल्लटांनी स्वतः लिहिली असती तर त्यांना बावन्नावी कारिका आपल्याच शब्दांना "श्रीगुरुभारतीचे" नाव देऊन आणि कारिकेमध्ये वर्णिलेल्या विशेषणांनी सजवून स्वतःच त्यांची वंदना करणे शक्य नाही. श्रीभट्टकल्लटांच्या कारिका क्रमांक बावन्न वरून सिद्ध श्रीवसुगुप्ताचार्य हेच मूळ स्पंदसूत्रकार आहेत हे सिद्ध होते.

याशिवाय श्रीभट्टकल्लटाचार्य विरचित वृत्तीच्या अनुवादाचे मूळ पुस्तक अर्थात् काश्मीर येथील संशोधन कार्यालयाच्या द्वारा प्रकाशित स्पंदकारिकेच्या (श्रीकल्लटाचार्य वृत्ती संवत् १८७० संस्करण) शेवटी तीन श्लोकांचे एक वेगळे परिशिष्ट छापलेले आहे. हे तीन श्लोक श्रीभट्टकल्लटाचार्यांनी लिहिलेले आहेत की, अन्य कोणी याविषयी काहीही माहिती नाही. या तीन श्लोकामधील दुसरा श्लोक पुढीलप्रमाणे आहे -

**दृब्धं महादेवगिरौ महेशस्वप्नोपदिष्टाच्छिवसूत्रसिन्धोः।**
**स्पन्दामृतं यद्वसुगुप्तपादैः श्रीकल्लटस्तत्प्रकटीचकार।।**

**अर्थ :-** जे श्रीवसुगुप्तपादांनी श्रीशंकरांनी स्वप्नात आदेश दिल्याप्रमाणे श्रीशिवसूत्ररूपी समुद्रातील स्पंदामृत मिळविले तेच श्रीभट्टकल्लटांनी प्रकट केले.

या श्लोकाची रचना कोणीही केलेली असली तरी या श्लोकामध्ये स्पष्ट शब्दामध्ये श्रीवसुप्तपादाचार्यांना मूळ स्पंदसूत्रकार आणि श्रीभट्टकल्लटाचार्यांना वृत्तिकार घोषित केलेले आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

## स्पंद म्हणजे काय आहे? :-

**श्रीशिवशक्तिसामरस्य हेच श्रीसदाशिवतत्त्वापासून पृथ्वितत्त्वापर्यंत सर्व जडचेतनात्मक विश्वाचे आधारभूत आणि यथार्थ स्वरूप आहे. स्पंदशास्त्राच्या पारिभाषिक शब्दामध्ये यालाच चिन्मात्ररूप आत्मसत्ता असे म्हणतात. या श्रीशिवशक्तिसामरस्यामध्ये श्रीशिव हे प्रकाश आहेत आणि शक्ती हा त्यांचा विमर्श आहे. श्रीशिव आणि शक्ती किंवा प्रकाश आणि विमर्श ही द्वित्वे किंवा यांचा दोनपणा अगर द्वैत हे केवळ सांगण्यासाठी व ऐकण्यासाठी औपचारिकपणाने वापरलेली**

**आहेत. प्रत्यक्षात या दोहोंमध्ये नीरक्षीराप्रमाणे अर्थात् पाणी व दूध यांच्याप्रमाणे सामरस्य आहे. असो. विमर्श ही प्रकाशाची स्पंदना आहे आणि अशी स्पंदना असल्यामुळे विमर्श हा प्रकाशाचा प्राण आहे. प्रकाशामध्ये प्राणभूत स्पंदना नसेल तर प्रकाशाची सत्ता कोठून असणार? शक्तिहीन श्रीशिवांची कल्पना शवाच्या कल्पनेहून अधिक काहीही नाही. निष्कर्षतः प्रकाशरूप श्रीशिवांची स्वतःची अभिन्न अहंविमर्शरूपा (मी स्फुरणरूप) शक्ती हाच स्पंद आहे आणि स्पंदना हेच श्रीशिवांचे स्वातंत्र्य आहे.**

❋ ❋ ❋ ❋ ❋

**स्पंदनशक्तीमध्ये ज्ञातृता आणि कर्तृतारूप स्वातंत्र्य :-**

चित्, निर्वृत्ती (आनंद), इच्छा, ज्ञान आणि क्रिया ही शक्तीची पाच मुखे आहेत. यातील चित् आणि आनंद हे श्रीशिवांशी इतके एकरूप झालेले आहेत की, याचे पार्थक्य किंवा भिन्नत्व हे कल्पनेतही शक्य नाही. इच्छा हे श्रीशिवांचेच स्थूलरूप आहे; परंतु श्रीशिवांचे श्रीशिवभूमिकेमधील रूप हे पशुभूमिकेमधील रूपाहून पूर्णपणे भिन्न आहे. श्रीशिव हे पशुप्रमाणे स्थूलरूपामध्ये कधीही आंबा खाण्याची किंवा झाडांची मोजदाद किंवा गणना करण्याची इच्छा करीत नाहीत. शैवमान्यतेनुसार या भूमिकेमध्ये इच्छेचे रूप चित्ता आणि आनंदता यांचे केवळ सूक्ष्मातिसूक्ष्म असे अभ्युपगम अर्थात् सादृश्य किंवा साम्य आहे. श्रीशिवत्वामध्ये चित्ता आणि आनंदता हे दोन्ही अंतर्भूत झालेले आहेत. या अभ्युपगमामध्येही बहिर्मुखीन उन्मुखता नसल्यामुळे इच्छा ही श्रीशिवत्वामध्ये विश्रांत अवस्थेमध्ये विद्यमान असते. मात्र ज्ञान आणि क्रिया शेष राहतात. या दोन्ही रूपामध्ये शाश्वत शाक्तस्पंदना ही पतिभूमिका आणि पशुभूमिका या दोन्हींमध्ये युगपत् अर्थात् एकाचवेळी स्पंदायमान आहे. निष्कर्षतः ज्ञातृता आणि तदनुकूल कर्तृता (सर्व काही जाणण्याचे आणि करण्याचे स्वातंत्र्य यालाच पूर्णकर्तृत्व असे म्हणतात.) हेच स्पंदशक्तीचे स्वरूप आहे. हेच त्यामधील स्वातंत्र्य आहे. याच स्वातंत्र्याच्या द्वारा श्रीशिव हे गृहीता-भूमिका, ग्रहण-भूमिका आणि ग्राह्य-भूमिका यावर एकाच वेळी स्पंदायमान असतात.

शक्तीची पाच मुखे या पाच भिन्न भिन्न शक्ती नाहीत. प्रत्यक्षात शक्ती ही एकच आहे. स्वतंत्र चित्ता किंवा चिन्मात्ररूपता हे या शक्तीचे मूळ रूप आहे. शक्ती ही शक्तिमानाशी अभिन्न आहे. चित्तेचे स्थूलरूप आनंद

आहे. आनंदाचे स्थूलरूप इच्छा आहे. इच्छेचे स्थूलरूप ज्ञान आहे आणि ज्ञानाचे स्थूल रूप क्रिया आहे. श्रीशिव हे सृष्टी, संहार, स्थिती, पिधान आणि अनुग्रह इत्यादि पाच कृत्ये करीत असतात; कारण श्रीशिवांमध्ये ज्ञान आहे. श्रीशिवांमध्ये इच्छा असल्याने ते जाणत असतात. श्रीशिव हे इच्छा करतात; कारण त्यांच्यामध्ये आनंद आहे. श्रीशिव हे पूर्णचैतन्यरूप असल्याने आनंदमय आहेत. निष्कर्षतः चित्ता हेच श्रीशिव आहेत आणि श्रीशिव हीच चित्ता आहे. केवळ श्रीशिवशक्तिसामरस्य हेच खरे तत्त्व आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

## स्वस्वभाव किंवा स्वभाव :-

(स्पंदशास्त्रामध्ये स्वस्वभाव किंवा स्वरूपता यांच्यासारख्या शब्दातील "**स्व**" शब्दाच्या पुनरुक्तीचा दोष नगण्य आहे; कारण या दर्शनामध्ये या पुनरुक्तीच्या द्वारा आत्मतत्त्वाची मौलिकता, मलहीनता आणि शाश्वतिक वर्तमानता अभिव्यक्त केलेली आहे. काही ठिकाणी "**स्व**" या शब्दाचा प्रयोग हा अनिवार्यपणे केला गेलेला आहे.)

संसारभूमिकेमध्ये कोणत्याही प्राणिविशेषामध्ये किंवा वस्तुविशेषामध्ये उत्पत्तीपासून शेवटपर्यंत प्रायः एकाच रूपात राहणाऱ्या विशिष्ट गुणाला किंवा प्रकृतीला स्वभाव असे म्हणतात. या भूमिकेवर प्रत्येक पदार्थ हा विशिष्ट तसेच अन्य पदार्थाहून भिन्न असल्यामुळे हा स्वभावही विशिष्ट तसेच विभिन्न प्रकारचा असतो. यामुळे या स्वभावाला समष्टिरूप नाही तर व्यष्टिरूप असे म्हणता येते. याउलट अध्यात्म-भूमिकेवर स्वभाव किंवा स्वस्वभाव या शब्दाचा अर्थ विश्वाच्या प्रत्येक जड किंवा चेतन पदार्थामध्ये अनुस्यूत असलेली अर्थात् समाविष्ट असेलली किंवा व्यापून असेलली मौलिक सत्ता किंवा तत्त्व असा आहे. हे मौलिक आत्मतत्त्व या विभिन्न वेद्यपदार्थांचे प्रकाशन, स्थिती आणि संहार यांचे मूळ कारण असल्यामुळे कर्तृभूत सत्ता आहे आणि स्वयं कार्यभूत प्रमेयतेच्या अर्थात् स्वसंवेद्य आत्मतत्त्वाच्या स्पर्शापासून खूप दूर आहे. हे आत्मतत्त्व निरवच्छिन्न अर्थात् न झाकलेले, अकालकलित अर्थात् कालाने ग्रासले न जाणारे आणि स्वतंत्र असल्यामुळे विशुद्ध चिन्मात्ररूप आहे. हे तत्त्व हीच प्रस्तुत स्पंदसूत्रामध्ये वर्णिलेली आत्मसत्ता आहे. स्वरूप किंवा स्वस्वरूप यासारखे अन्य पारिभाषिक शब्द या आत्मसत्तेलाच अभिव्यक्त करीत असतात.

**स्पंदशास्त्रामधील अवस्थायुगल :-**

शैवदर्शनाचा अभ्यास केल्यावर हे तथ्य लक्षात येते की, विश्वाच्या कणाकणामध्ये अथवा विश्वोत्तीर्ण रूपामध्ये केवळ हीच स्पंदमयी आत्मसत्ता विद्यमान आहे किंवा व्यापून राहिलेली आहे. या आत्मसत्तेलाच अवस्था-विशेषाच्या सीमेमध्ये बंद करणे ही सर्वात मोठी भ्रांती आहे. परंतु संसारभूमिकेचा निर्वाह हा भेददृष्टीचा स्वीकार केल्याशिवाय होऊ शकत नाही. **भेद हा अभेदाचाच बहिर्मुख विकास आहे.**

परतत्त्व हे शक्तिमान असल्यामुळे आपल्या निर्बाध तसेच स्वतंत्र शाक्त विजृंभणेच्या म्हणजे विकासाच्या किंवा विस्ताराच्या द्वारा स्वयंकर्तृता म्हणजे स्वतःच्या कर्तृत्वाची अवस्था आणि कार्यता म्हणजे कार्य करण्याची अवस्था यांमध्ये प्रकाशमान होऊन विश्वाच्या उत्थानाची किंवा पतनाची क्रीडा करीत राहते. या दोन अवस्थांमधील कार्य करण्याची अवस्था हा स्वरूप-विकास असून स्वरूप-विश्रांती ही कर्तृत्वाची अवस्था आहे. कार्यता अर्थात् कार्य करण्याची ही उपाधी कर्तृतेच्या अर्थात् कर्तृत्वाच्या प्रकाशावरच जीवित राहिलेली आहे. ज्ञानप्राप्ती झाल्यावर ही कार्यता तत्काळ विलीन होऊन जाते. याउलट कर्तृता अवस्था ही नित्य उदय पावणारी ज्ञानरूप अवस्था असल्यामुळे शाश्वत यथार्थता आहे. आत्मकल्याण इच्छिणाऱ्या व्यक्तीसाठी कर्तृता ही उपादेय किंवा ग्राह्य आहे आणि कार्यता ही हेय किंवा त्याज्य आहे. भारतातील जवळजवळ संपूर्ण दार्शनिक संसारामध्ये स्वतंत्र कर्तृतेला "अहंता" असे म्हणतात व परतंत्र कार्यतेला "इदंता" या शब्दाने अभिव्यक्त केले जाते.

*****

**स्पंदशास्त्रामधील प्रमात्याचे किंवा जीवाचे अर्थात् ज्ञात्याचे भेद :-**

स्पंदशास्त्राच्या मान्यतेनुसार मूलतः पूर्णचेतन स्वस्वभाव असलेला असा वरपासून खालपर्यंत एकच प्रमाता अर्थात् जीव किंवा ज्ञाता विद्यमान आहे. स्वतंत्र व आनंदमय असल्यामुळे हा प्रमाता किंवा ज्ञाता किंवा ज्ञान करून घेणारा पुरुष पतिप्रमाता अर्थात् परमेश्वर आणि पशुप्रमाता अर्थात् जीव या दोन रूपांमध्ये अवस्थित आहे अर्थात् श्रीशिव आणि जीव ही प्रमात्याची दोन रूपे आहेत. या प्रमात्याचे पतिप्रमाता हे रूप विश्वोत्तीर्णाचा विश्वमय विकास आहे अर्थात् या रूपामध्ये या पतिप्रमात्याच्या किंवा

परमेश्वराच्या किंवा श्रीशिवांच्या इतर भेदांची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. पशुप्रमात्याच्या रूपामध्ये अर्थात् जीवरूपामध्यं हा प्रमाता किंवा ज्ञाता विश्वोत्तीर्णाचा विश्वमय विकास आहे. या रूपामध्ये हा जीव अर्थात् प्रमाता किंवा ज्ञाता व्यष्टिरूप अर्थात् सीमित किंवा व्यक्तिगत आणि विशिष्ट आहे. यामुळे या प्रमात्याचे प्रकार, उपप्रकार आणि आकार-प्रकारात्मक वैचित्र्य इतके विविध आहे की, यांची गणना मानवाच्या संकुचित कल्पनेमध्ये येऊ शकत नाही. पांचभौतिक शरीर धारण करणाऱ्या प्रत्येक जंगम आणि स्थावर प्राण्याला पशुप्रमाता अर्थात् पशुरूप जीव असे म्हणतात. प्रत्यभिज्ञादर्शनाच्या आचार्यांनी "अहंता" आणि "इदंता" यांच्या चढ-उताराच्या आधारावर विश्वाला शुद्धमार्ग आणि अशुद्धमार्ग यामध्ये विभक्त केलेले आहे. या आचार्यांनी मार्गावर अवस्थित असलेल्या प्रमात्यांच्या विभिन्न तसेच विविध स्तरांचे गंभीर अर्थात् सखोल विवेचन प्रस्तुत केलेले आहे. परंतु स्पंदशास्त्राच्या मतानुसार श्रीशिवप्रमात्याशिवाय अन्य सर्व श्रीसदाशिवकोटी ते पृथ्वीकोटीपर्यंत स्थित असलेले प्रमाता अर्थात् जीव हे पशुप्रमाता आहेत. स्पंदशास्त्रकारांनी या प्रमात्यांमध्ये आढळून येणाऱ्या बोधात्मक किंवा ज्ञानात्मक संकोच किंवा विस्तार यांच्या आधारावर या प्रमात्यांना म्हणजे जीवांना अबुद्ध, बुद्ध, प्रबुद्ध आणि सुप्रबुद्ध या चार श्रेणींमध्ये विभागलेले आहे. पुढे सूत्र क्रमांक १७ च्या विवरणामध्ये या चारही श्रेणींवर यथासंभव प्रकाश टाकलेला आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

### प्रमात्यांचे अर्थात् जीवांचे ग्राह्यविषय :-

पतिप्रमात्यासाठी किंवा श्रीशिवांसाठी हे संपूर्ण जड-चेतनात्मक विश्व अभिन्न अहंरूपामध्येच ग्राह्य मानलेले आहे. पशुप्रमात्याचे किंवा जीवाचे आभ्यंतर आणि बाह्य हे दोन प्रकारचे ग्राह्य विषय आहेत. आभ्यंतर ग्राह्यविषयामध्ये सुख, दु:ख आणि मूढता हे तीन अंत:करणाच्या धर्माशी संबंधित असलेले भावनात्मक विषय समाविष्ट होतात. बाह्य ग्राह्य विषयामध्ये शब्दात्मक, स्पर्शात्मक, रूपात्मक, रसात्मक आणि गंधात्मक स्थूल पदार्थ अंतर्भूत होत असतात. आभ्यंतर विषय हे मानसिक अनुभूतीच्या द्वारा आणि बाह्य विषय हे पाच ज्ञानेंद्रियांच्या द्वारा ग्राह्य आहेत किंवा ग्रहण केले जातात. या संबंधामध्ये हे तथ्य लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, पतिप्रमात्यापेक्षा अर्थात् श्रीशिवांपेक्षा पशुप्रमाता अर्थात् जीव हा स्वयं ग्राह्यकोटीमध्ये पडत असतो.

**पाश कोणता आहे? :-**

प्रत्येक पशूच्या किंवा जीवाच्या हृन्मंडलामध्ये निगूढ अर्थात् खोल रूपामध्ये असलेल्या ज्ञानक्रियात्मक स्पंदशक्तीच्या खऱ्या, स्वतंत्र तसेच सामान्य रूपाचे विस्मरण हाच त्या जीवाचा पाश आहे. संसाराच्या भूमिकेवरील सर्व जड आणि चेतन पदार्थ ही सामान्य शक्तीची विशिष्ट रूपे आहेत. विशिष्ट असल्यामुळे ही रूपे परस्परांहून भिन्न आहेत. यामुळे ही रूपे परस्पर-सापेक्ष आहेत. ही पारस्पारिक सापेक्षता भौतिक द्वंद्वात्मकता आहे. द्वंद्वाच्या चक्कीच्या दोन दगडांमध्ये अडकलेला जीव हा सतत दळला जात आहे. हा जीव परमेश्वराचा शक्तिपात किंवा परमेश्वराची कृपा होईपर्यंत येरझाऱ्यांच्या गोंधळात पडूनच राहतो. सामान्य शब्दामध्ये असेही म्हणता येते की, विश्वात्मक एकत्वाला विसरून वैयक्तिक अनेकत्वाच्या दरीमध्ये हरवून जाणे हे एक असे बंधन आहे की, जे जीवात्म्याला जळूप्रमाणे चिकटलेले असते. या जळूपासून सुटका करून घेणे हे केवळ धैर्यवान् पुरुषाचे काम आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**मुक्ती म्हणजे काय? :-**

सामान्य रूपामध्ये मुक्तीसारख्या पृथक् पदार्थाची कल्पना ही सापेक्ष बनत असते. शेवटी मुक्ती कशापासून? याकरिता अशा परिस्थितीमध्ये बंधनासारख्या पृथक् किंवा वेगळ्या सद्भावाची आवश्यकता आहे. स्वस्वभाव हा निरपेक्ष असतो. परिणामस्वरूप या भूमिकेवर कोणतेही बंधन नाही व कोणापासूनही मुक्ती होणे नाही. स्वभाव हा स्वभाव आहे. कमीही नाही आणि जास्तही नाही.

पशुभूमिकेवर सर्व काही सापेक्ष आहे. यामुळे बंधन आणि मुक्ती यांसारख्या कल्पनाही विद्यमान आहेत. वर सांगितलेले आहे की, आत्मशक्तीच्या खऱ्या स्वरूपाची विस्मृती हेच बंधन आहे. यावरून ही गोष्ट निश्चित आहे की, या स्वरूपाची पूर्ण आणि खरी स्मृती हीच मुक्ती आहे. या स्मृतीलाच शास्त्रीय शब्दामध्ये "तुरीयारूप शाक्त-भूमिकेचा साक्षात्कार होणे" असे म्हणतात.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**स्पंदाच्या उपदेशाचा अधिकारी कोण? :-**

स्पंदसंप्रदायाच्या श्रीगुरूंच्या मान्यतेनुसार वर वर्णिलेल्या चार प्रकारच्या पशुभूमिकेवरील प्रमात्यांमधील अर्थात् ज्ञात्यांमधील केवळ प्रबुद्ध प्रमाता

किंवा जीव हीच स्पंदशास्त्राच्या उपदेशासाठी उपयुक्त किंवा लायक व्यक्ती आहे. अबुद्ध आणि बुद्ध प्रमात्यांना किंवा जीवांना उपदेश करणे हे वाळवंटामध्ये बी रोवण्याप्रमाणे निष्फळ आहे. सुप्रबुद्ध प्रमात्याला किंवा जीवाला उपदेशाची आवश्यकता नाही; कारण सुप्रबुद्ध जीवाने प्राप्य वस्तू प्राप्त करून घेतलेली आहे. यातील प्रबुद्ध प्रमाता किंवा जीव हा आध्यात्मिक दृष्टीने शाक्तभूमिकेच्या प्रवेशद्वाराच्या अत्यंत निकट पोहोचलेला असतो; परंतु श्रीसद्गुरूंच्या कृपेशिवाय तो शाक्तभूमिकेच्या क्षेत्रात प्रवेश प्राप्त करून घेण्यास समर्थ असत नाही. यामुळे या प्रबुद्ध प्रमात्याला या स्पंदवाक्याचे अमृत पाजून त्याला अगाध संशयसागरातून पार करणे हे सिद्ध श्रीगुरूंचे आवश्यक तसेच मनोनीत अर्थात् आपणहून स्वीकारलेले असे कर्तव्य आहे. हाच सर्व स्पंदशास्त्राचा मुख्य उद्देश व हेतूही आहे.

"**स्पंदशास्त्र अर्थात् सिद्धयोग साधन पद्धती**" या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीत फक्त श्रीउत्पलाचार्य यांच्या "स्पंदप्रदीपिका" या ग्रंथाचे भाषांतर छापले होते. मात्र या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीत श्रीउत्पलाचार्य यांची "**स्पंदप्रदीपिका**", श्रीरामकंठाचार्य यांची "**स्पंदकारिकाविवृती**", श्रीभट्टकल्लट यांची "**स्पंदकारिकावृत्ती**" श्रीक्षेमराज यांचा "**स्पंदनिर्णय**" श्रीकृष्णानंदसागर यांची "**स्पंदरंजनी**" आणि श्रीक्षेमराज यांचा "**स्पंदसंदोह**" या मूळ संस्कृत टीकांचे भाषांतर छापले आहे. स्पंदशास्त्राचा विषय अत्यंत कठीण असल्यामुळे त्याच्या सर्व कक्षा स्पष्ट व्हाव्यात या उद्देशानेच उपरोक्त सर्व टीका संपादून छापण्याचा हा उपक्रम केला आहे. सर्व साधकभक्तांना व अभ्यासू साधकांना याचा विशेष लाभ होईल अशी खात्री आहे.

त्याचप्रमाणे श्रीभट्टकल्लट यांच्या "**स्पंदकारिकावृत्ती**" या ग्रंथाचे भाषांतर करताना "**स्पंदकारिका**" श्रीभट्टकल्लटाचार्य विरचित वृत्ति सहित, हिन्दी अनुवाद और सूत्रौपर स्वतंत्र विवरण या प्रो. नीलकंठ गुरुटू यांनी लिहिलेल्या ग्रंथाचा उपयोग केला आहे. त्याचप्रमाणे "**स्पंदकारिका पञ्चभिः टीकाभिः समलङ्कृता**" या आचार्यकृष्णानंदसागर यांनी संपादिलेल्या ग्रंथाचाही मूळ टीकांच्या उपलब्धीसाठी उपयोग केला आहे.

येथपर्यंत ग्रंथात प्रवेश होण्यासाठी आवश्यक असलेले विवेचन केले. यापुढे स्पंदतत्त्वकारिकांचे विवेचन व विवरण केले आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

# स्पंद-कारिका

।। श्रीस्पन्दवपुषे नमः।।

।। ॐ नमः स्वस्पंदात्मसंविन्मूर्तये शंभवे।।

## पहिला प्रवाह

## निःष्यंद पहिला

## स्वरूप-स्पंद

।। मङ्गलाचरणम्।।

**यस्योन्मेषनिमेषाभ्यां जगतः प्रलयोदयौ।**
**तं शक्तिचक्रविभवप्रभवं शङ्करं स्तुमः।।१।।**

**अन्वयार्थ :- यस्य** - ज्याच्या, **उन्मेषनिमेषाभ्याम्** - डोळ्यांच्या उघडझापीमुळे, **जगतः** - विश्वाचा, **प्रलयोदयौ** - संहार व निर्मिती (होतात), **तम्** - त्या (ला), **शक्तिचक्रविभवप्रभवम्** - शक्तींच्या समुदायांच्या ऐश्वर्याच्या उगमाला (उगमस्थान असलेल्या), **शङ्करम्** - शंकराला, **स्तुमः** - आम्ही स्तवितो.।।१।।

**अर्थ :-** श्रीशंकरांच्या नेत्रांच्या उघडण्याने आणि मिटण्याने (म्हणजेच स्पंदामुळे) शक्तिचक्राचा संहार व उत्पत्ती होते. यामुळे जगाची उत्पत्ती व लय होत असतात. त्या (अनंत) शक्तींच्या समूहाच्या ऐश्वर्याचे उगमस्थान असलेल्या अर्थात् जगाच्या सर्व उत्पत्ती-लयाला आदिकारण असलेल्या श्रीशंकरांची आम्ही स्तुती करीत आहोत.।।१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

श्रीशंकर म्हणजे परम श्रीशिव होय. ते नित्य आहेत. ते निव्वळ ज्ञानस्वरूप आहेत. ते आपल्या ज्ञानस्वरूपापासून कधीही च्युत होत नाहीत. असे असून ते डोळे उघडतात व मिटतात. असे अनित्य कर्म ते कसे करू शकतात? त्याचे उत्तर असे आहे की, नेत्र उघडण्याचे व मिटण्याचे काम त्यांची इच्छाशक्ती करीत असते. जगत् हे परमेश्वराच्याच मायाशक्तीने निर्माण केलेले असल्यामुळे त्याला उत्पत्ती व लय आहे. त्याला ईश्वराची इच्छा हे निमित्त होय. उत्पत्तीला कारणीभूत असलेल्या

ईश्वराच्या इच्छेला उन्मेष असे म्हणतात व प्रलयाला कारणीभूत असलेल्या ईश्वराच्या इच्छेला निमेष असे म्हणतात. व्यवहारामध्ये इच्छा ही इच्छेच्या अवस्थेत असताना इच्छिलेला पदार्थ परब्रह्म असतो अर्थात् तो पदार्थ स्वस्वरूपातच असतो. त्याप्रमाणे परमेश्वराच्या शक्तीच्या ठिकाणी नाना प्रकाराने भासमान होणारे हे जगत् विशेष रूपाने किंचित्सुद्धा प्रकट न होता स्वस्वरूपाशी तद्रूप असते. त्यालाच म्हणजे त्या दशेलाच श्रीशिवदशा असे नाव आहे.

**या चैषा प्रतिभा तत्तत्पदार्थक्रमरूपिता।**
**अक्रमानन्तचिद्रूपः प्रमाता स महेश्वरः।।**

निरनिराळ्या पदार्थांचे ज्ञान करून देणारी अशी जी प्रतिभा शक्ती आहे ती चिद्रूप आहे. अक्रम म्हणजे क्रमरहित, अनंत व चिद्रूप असे श्रीमहेश्वर किंवा श्रीपरमेश्वर हे त्या प्रतिभेचे ज्ञाते आहेत. इच्छा, ज्ञान व क्रिया ही नावे असलेली इदंतारूपी माया शक्तिजन्य आहे. त्यामुळे फक्त एक श्रीशिवदशेखेरीज मायाशक्ती सदा प्रकटरूपाने असते. या शक्तीपासून श्रीसदाशिवादि ३४ तत्त्वे निर्माण झाली. अशी ही परमेश्वराची शक्ती स्वतःच्या लीलेने जगाची उत्पत्ती व लय करणारी उन्मेष व निमेष या शब्दांनी वर्णिली जाते.

श्रीभट्टकल्लटांनी वरील सूत्राचा अर्थ निराळा केला आहे. **"यस्योन्मेष-निमेषाभ्यां जगतः प्रलयो उदयो।"** ज्या परब्रह्माचा उन्मेष म्हणजे स्वतःच्या स्वरूपाचा विकास झाला असताना म्हणजे स्वस्वरूपाची जागृती झाली असताना जगाचा प्रलय म्हणजे नाश होतो.

निमेष म्हणजे स्वस्वरूपाला विसरणे होय. स्वतःच्या स्वरूपाला विसरला म्हणजे जगाची उत्पत्ती होते; परंतु परब्रह्मतत्त्व नित्य शक्तियुक्त असल्याने प्रथम सांगितलेला अर्थच जास्त सयुक्तिक वाटतो. शक्ती व श्रीशिव यांच्यामध्ये अभेदच आहे. परब्रह्माच्या ठिकाणी ऐश्वर्य म्हणून जे वर्णन केलेले आहे ते शक्तियुक्त म्हणूनच केलेले आहे. सर्वत्र "अहं" हीच जागृती असणे म्हणजे निर्गुण तत्त्वांची जागृती असून तिच्यात त्रैलोक्य निर्माण करण्याची शक्ती आहे. अशा वेळी जगत् हे जरी दिसत असले तरी ते अहंरूपच आहे. अर्थात् जगत् सुद्धा परब्रह्मच आहे. हे श्रीशंकरऐश्वर्य अती अपूर्व आहे. ईश्वरत्व असून कशावरही सत्ता चालवावयाची नाही आणि दुसरी अपूर्वता अशी की, जगत् भासमान् होत असून सुद्धा ते परब्रह्मरूपच आहे

अशी जागृती ठेवावयाची. "अहं" सर्व आहे व "अहं" म्हणजेच परब्रह्म आहे.

**परमेश्वरता जयत्यपूर्वा तव सर्वेश यदीशितव्यशून्या।**
**अपरापि तथैव ते ययेदं जगदाभाति यथा तथा न भाति।।**
**लिख्यते जगत्रितयचित्रमद्भुतप्रतिभापरिस्फुरितशंसि ते नमः।**
**सुसितैकसूक्ष्मनिजशक्तिवर्तिकारचितावभासशतशोभि शम्भवे।।**

हे सर्वेश्वरा! तुझ्या अधिकाररहित आणि अपूर्व अशा परम ऐश्वर्याचा जयजयकार असो. त्याचप्रमाणे तुझी दुसरीही (परमेश्वरता) अशी आहे की, जिच्यामुळे हे जगत् जसे आभासित आहे तसे भासत नाही. तुझ्या त्या श्रीशंकरतत्त्वाला नमस्कार असो. हे तत्त्व त्रैलोक्यरूपी चित्र निर्माण करून त्यात अद्भुत अशा ज्ञानस्वरूपाने स्फुरण पावत असते. अतिशय सूक्ष्म व स्वच्छ अशा आत्मरूपी लेखणीने अनंत प्रकारे शोभायमान असे जगत् रचून दाखविणारे हे श्रीशांभंव किंवा श्रीशांकरतत्त्व आहे. श्रीशंकरांच्या अनुग्रहाने साधकाचा मायारूपी अंधकार नष्ट होतो. त्यामुळे श्रीशकंर व त्यांचे ज्ञान साधकाच्या ठिकाणी आतून प्रकट होते. या अनुग्रहामुळेच श्रीपरशिवांचे ऐश्वर्य साधकाला सहज ग्रहण करता येते असे सुप्रबुद्ध महात्मे सांगत असतात. अशा प्रकारच्या अनुग्रहाला ईश्वरपात म्हणजे संसार सुटणे असे म्हणतात. ज्यांच्यावर असा ईश्वरपात झाला आहे त्यांना श्रीपरशिवांची तीव्र जिज्ञासा उत्पन्न होते. मग ते श्रीसद्गुरूंना शरण जातात व त्यांच्याकडून शक्तिपातयोगाचा अनुग्रह घेऊन त्यांनी सांगितल्या-प्रमाणे साधनाचा अभ्यास करून स्वात्मानुभव सुखाने भोगतात.

ज्यांच्यावर ईश्वराचा शक्तिपात झालेला नाही त्यांना अप्रबुद्ध म्हणजे मूढ म्हणतात. अशी माणसे श्रीशांकरतत्त्वाला नालायक असतात म्हणून त्यांना उपदेश करू नये असे शास्त्र सांगते. या परम अद्भुत अशा माया शक्तीचे चित् व जड असे जरी भाग दिसत असले तरी तिचे अनंत भेद दिसून येतात. शक्तीचे अनंत भेद दिसत असले तरी सुद्धा तत्त्वतः परमेश्वराशी अभिन्न असणारी ही ज्ञानशक्तीच आहे. हिलाच श्रीत्रिपुरसुंदरी असे म्हटले जाते. "इदं" "इदं" म्हणून नाना रूपांच्या भेदाने भिन्न भिन्न रीतीने भासणारे हे तत्त्व शक्तिमान असे म्हटले जाते. शक्ती म्हणजे सर्व पदार्थमात्र होय. शक्तिमान असे जे श्रीपरशिव त्यांच्याशी ऐक्यतेने असणारी

अशी जी शक्ती ती शक्ती होय. या शक्तीलाच श्रीपरशिवांचे वैभव म्हणतात.

**शक्तिश्च शक्तिमांश्चैव पदार्थद्वयमुच्यते।**
**शक्तयोऽस्य जगत्कृत्स्नं शक्तिमांश्च महेश्वरः।।**

शक्ती व शक्तिमान असे दोन पदार्थ गणले जात असले तरी ते एकरूपच आहेत. सर्व जगत् ही शक्ती आहे व श्रीपरशिव हे शक्तिमान आहेत. असे हे जे शक्तिचक्र आहे त्याच्या उत्पत्तीचे कारण श्रीपरशिवच आहेत. शक्तिचक्राचे आदिकारण असलेले श्रीपरमशिवतत्त्व ज्ञानस्वरूपच आहे असे वृत्तिकारांनी वर्णन केले आहे. श्रीमहेश्वर हे निव्वळ ज्ञानमय आहेत. त्याच श्रीपरशिवांना स्पंदकारिकेच्या पहिल्या श्लोकात श्रीशंकर असे म्हटले आहे. "शं" म्हणजे स्वभाव होय. "स्व" म्हणजे आत्मा व भाव म्हणजे शक्ती होय. त्यामुळे स्वभाव म्हणजे स्वरूप होय. आत्मा हेच श्रीपरमशिवांचे स्वरूप आहे असे वृत्तिकारांनी म्हटले आहे. याचा विस्तार पुढे ५१ व्या सूत्रात दिला आहे. मायेच्या योगाने स्वतःच्या स्वरूपाचे ज्ञान होत नसते. आत्म्याहून देह आदि भिन्न भिन्न भास जीवाला होत असले तरी ते आत्म्याहून खरोखरी भिन्न नाहीत.

सिद्धान्त म्हणजे काय? सिद्ध म्हणजे ईश्वरतत्त्व होय. त्याचा अंत म्हणजे निष्ठा किंवा निश्चय होय. या स्पंदकारिकांच्या मध्ये ईश्वराच्या निश्चयाचा सिद्धान्तच सांगितला आहे. ज्ञान, क्रिया, योग व चर्या या सर्वांचे सार्थक सिद्धान्ताच्या योगानेच होते. त्यामुळेच या स्पंदकारिकांमध्ये सांगितलेले सिद्धयोगाचे शास्त्र हे श्रेयप्राप्तीला उपयुक्त झाले आहे . किंबहुना हे सिद्धयोगशास्त्रच श्रेय मिळवून देणारे साधन आहे असे म्हणणे योग्य ठरेल. हे शास्त्र मुक्तीकरिता उपयुक्त आहे. जी वस्तू-गोष्ट आपल्याला प्राप्त करून घ्यावयाची आहे त्याला उपेय म्हणजे प्राप्य वस्तू म्हणतात. प्राप्य वस्तूच्या प्राप्तीच्या उपायाला साधन म्हणतात. **साध्य व साधन किंवा उपेय व उपाय ही दोन्हीही श्रीशिवांची रूपेच आहेत. कारणापासून कार्य भिन्न नसते म्हणून श्रीपरमशिव व त्यांच्या प्राप्तीचे साधनभूत असलेली ही स्पंदकारिका अर्थात् शक्ती ह्या दोन्ही गोष्टी एकच आहेत. सारांश, श्रीपरशिवांच्या स्वरूपाचे म्हणजे त्यांचे स्वतःचे व त्यांच्या शक्तीचे वर्णन या शास्त्रात केले आहे.**

प्रत्येक शास्त्राला अधिकारी, विषय, संबंध व प्रयोजन म्हणजे हेतू या अनुबंध चतुष्टयाची जरूरी असते. या दृष्टीने या स्पंदकारिकांच्या शास्त्राचा

अधिकारी कोण? विशुद्ध श्रद्धा व भक्ती ज्याच्या ठिकाणी आहे असा जीव या शास्त्राचा अधिकारी आहे. या शास्त्राचा विषय कोणता आहे? सिद्धयोग साधनाच्या योगाने जीव श्रीशिवस्वरूप कसा होतो व श्रीशंकरांचे म्हणजे श्रीपरमगुरुराजांचे स्वरूप काय आहे हे सांगणे हा या शास्त्राचा विषय आहे. या शास्त्राचा संबंध काय आहे? परमगुरू श्रीशंकर हे या शास्त्राचा कर्ता व सिद्धयोगशास्त्र हे कार्य असा याचा संबंध आहे. या शास्त्राचे प्रयोजन काय आहे? परमेश्वर स्वरूपाची प्राप्ती करून घेण्याकरिता हा ग्रंथ लिहिला आहे. हे या शास्त्राचे प्रयोजन आहे. या शास्त्राचे नाव काय आहे? स्पंदकारिकाशास्त्र हे या शास्त्राचे नाव आहे. स्पंद म्हणजे काय? श्रीपरमशिव शक्तीशी अभिन्न असतात व नेहमी आपल्या ज्ञानस्वरूपातच निमग्न असतात. त्यांना श्रीशिवशक्तिरूपाने प्रकट होण्याची जी इच्छा होते त्यालाच स्पंद असे म्हणतात. मूळचे अहं हे स्फुरण स्पंद या अर्थानेच अभिप्रेत आहे.

**ज्यांच्या ठिकाणी अत्यंत शुद्ध श्रद्धा व भक्ती असते त्यांच्यावर परमेश्वर प्रथम शक्तिपात म्हणजे अनुग्रह करतो. त्यामुळे अशा जीवांना आत्मप्राप्तीच व्हावी अशी उत्कंठा व इच्छा उत्पन्न होते. परमेश्वराच्या शक्तिपातकृपानुग्रहामुळे ईश्वरप्राप्ती करणे हेच जीवाचे एकमेव ध्येय आहे याबद्दल त्या जीवाला संदेह राहत नाही. त्यामुळे तो श्रीसद्गुरूंना शरण जाऊन त्यांच्याकडून दीक्षा घेतो. अशा प्रकारे श्रीगुरूंच्या अनुग्रहाबरोबर किंवा आज्ञेबरोबर ज्याचे आत्मस्वरूप प्रकट होण्याचेच राहिले आहे तोच या शास्त्राचा अधिकारी आहे. अशा प्रकारचे ज्ञान ज्याला झाले नाही तो उपदेशाला योग्य नाही.**

**श्रीपरमशिव आत्यंतिक मुक्ती देणारे आहेत. त्यांच्या परम अद्भुत अशा मायाशक्तीच्या योगाने चित् व जड वगैरे अनंत पदार्थ आणि व्यक्ती निर्माण झालेल्या दिसतात. असे जरी दिसले तरी तत्त्वदृष्ट्या परमेश्वराच्या स्वरूपाशी अभिन्न असणारी शक्तीच सर्व काही बनली आहे हे लक्षात घेतले म्हणजे पदार्थमात्र श्रीगुरुरूप आहे याची जाणीव अंतःकरणात उत्पन्न होईल. इदं इदं म्हणून ज्यांना आपण म्हणतो अशी नाना नावाने व रूपाने नटलेली ही शक्ती अनेकत्वाने भासमान होते. तिला शक्तिचक्र असे नाव आहे. जरी पदार्थ अनेक असले तरी ते शक्तिरूपच आहेत अर्थात् परब्रह्माशी अभिन्नच आहेत.**

**पुनःपुन्हा विवरण करण्याचा व सांगण्याचा हाच मूळ हेतू आहे. या ज्या अनंत शक्ती आहेत तेच ईश्वराचे ऐश्वर्य आहे. हे सर्व जगत् शक्तिरूप आहे.** ते ज्याच्या ठिकाणी भासमान होते तो परमेश्वर सर्वशक्तिमान आहे. यामुळे परमेश्वर सर्व शक्तिचक्रांचे आदिकारण आहे. या अर्थानेच त्याला जगाचे उत्पत्तिकारण म्हणतात. श्रीपरमशिव किंवा श्रीमहेश्वर निव्वळ ज्ञानस्वरूप आहेत. ते या शक्तिचक्राचा आत्मा असल्याने ते शक्तिचक्र ईश्वराशी तद्रूपच आहे.

परमेश्वर हा स्वस्वभावाप्रमाणे वागतो. स्व म्हणजे आत्मीय. स्वस्य म्हणजे आत्म्याचे भाव म्हणजे स्वरूप होय. स्वस्वभावस्थ म्हणजे आत्म्याचे स्वरूप असा अर्थ झाला. **परमेश्वर हा स्वतःच्या शक्तीने म्हणजे इच्छाशक्तीने जगाची उत्पत्ती व लय करतो. स्थिती अवस्थेमध्ये हे जगत् त्याच्या शक्तीचे वैभवच असते. याचा अर्थ असा की, जे जे काही दिसते ती ती शक्तीच आहे. जगत् असे मुळीच नाही.** देहाहून आत्मा वेगळा आहे असा जीवाला भास मात्र होत असतो. परंतु हे जगत् आहे असे ज्ञान ज्याच्यामुळे होत असते तो आत्मा हा जगद्रूपाने भासणाऱ्या शक्तिरूपाहून काही वेगळा नसतो. सिद्धवस्तू म्हणजे ईश्वरतत्त्व होय. त्याचा अंत म्हणजे निश्चय या स्पंदकारिकांमध्ये केलेला आहे. तो सिद्धान्त मनात ठसण्याकरिता श्रीशंकररूप परमेश्वराची स्तुती केली आहे. **जीवाला श्रीपरमशिव स्वरूपाचे अधिकार देणे हे या साधनग्रंथाचे प्रयोजन आहे.**

भोग व मोक्ष आणि श्रेय व प्रेय या दोन्ही गोष्टी देणारे श्रीशंकर असल्यामुळे पहिल्या मंगल श्लोकामध्ये त्यांची स्तुती केली आहे. निर्मलता म्हणजे अद्वैत हा श्रीशंकरांचा स्वभावच आहे. या सिद्धान्तामध्ये जीवन्मुक्तीलाच मोक्ष असे म्हटले आहे. संविद्च ज्ञाता, कर्ता, भोक्ता, ईश्वर, अनुभूती, ध्यान, जाणीव, ओळखावयाची वस्तू व मिळविण्याची वस्तू आहे. हा काही अध्यारोप म्हणजे चुकीचा किंवा खोटा आरोप नाही किंवा अध्यास म्हणजे एका वस्तूचा आरोप दुसऱ्या वस्तूवर केलेला नाही. या संविद्मध्ये एकाच वेळेला सर्व काही आहे. **"सर्वज्ञ भैरव"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**नान्यत्र गमनं स्थानं मोक्षोऽस्ति सुरसुन्दरि।**
**अज्ञानग्रन्थिभेदो यः स मोक्ष इति कथ्यते।।**

**अर्थ :-** कोणत्याही दुसऱ्या स्थानी जाण्याने मोक्ष मिळत नाही. एखादे विशेष स्थान मोक्षाचे आहे असेही असत नाही. अज्ञान ग्रंथी मोकळ्या होणे हाच मोक्ष होय.

"**महाभारत**" या ग्रंथाच्या मोक्षधर्मामध्ये रागद्वेषादि क्लेशांनी युक्त अशा दूषित चित्ताला संसार म्हटले असून त्यापासून पूर्णपणे मुक्त झालेल्या चित्ताला मोक्ष म्हटले आहे. "**बौद्ध सिद्धान्त**" या ग्रंथामध्येही रागादि मलीन चित्ताला संसार म्हटले असून पवित्र चित्ताला मोक्ष म्हटले आहे. "**नारदसंग्रह**" या ग्रंथाचेही हेच सांगणे आहे की, "सर्व विकल्प म्हणजेच संसार होय. विकल्पाशिवाय जीवाला दुसरे कोणतेही बंधन असत नाही." खरे पाहिले तर बंधन, बंधनकर्ता व बद्ध या तीनही गोष्टी एकच आहेत. मात्र त्या आपापल्या विकल्पाने बांधलेल्या आहेत. "**आत्मसप्तती**" या ग्रंथामध्येही असा उल्लेख आहे की, "खरे पाहता बंधनच नाही. मग मुक्ती कशी असेल? मुक्ती व बंधन या दोन्ही गोष्टी विकल्पाने घडविल्या आहेत. वस्तुतः बंधन-मुक्ती इत्यादि काहीही नाही." "**पांचरात्र**" या ग्रंथामध्ये आत्मसंवित् या शब्दाला प्रतिशब्द म्हणून भगवान्, सर्वज्ञ, सर्वदर्शी, सर्वेश्वर व सर्वशक्ती या शब्दांचा प्रयोग केला आहे. जर भगवान् व संवित् यांची अभिन्नता संमत किंवा मान्य नसती तर एकतत्त्वामध्ये स्तोता, स्तुत्य व स्तुतीचा भेद कसा आला असता? ज्याप्रमाणे मनुष्य आपल्या छायेला उल्लंघून जाऊ शकत नाही त्याप्रमाणे अद्वैताचे उल्लंघन करणेही शक्य नाही. ज्ञेय म्हणजे जे तत्त्व जाणावयाचे आहे व ज्याची अनुभूती घ्यावयाची आहे त्याला आपल्या स्वरूपाशी एकरूप करून ज्ञानाला पाहावे म्हणजे ज्ञानाचा व ज्ञेयाचा कोणताही भेद राहणार नाही. हे सर्व भेद केवळ शाब्दिक व विकल्पमात्र आहेत. शब्दाचे कारण विकल्प आहे व विकल्पाचे कारण शब्द आहे. राहूचे शीर किंवा तुपाची धार या वाक्यांमधून जो भेद भासतो तो केवळ विकल्पच आहे. जी गोष्ट आपल्या संविद् स्वरूपाशी अभिन्न आहे ती जरी बोलण्या-चालण्याचा विषय झालेली दिसत असली तरीही ती आत्मस्वरूपाशी अभिन्नच असते.

बोलण्याने व्यवहार चालत असतो. "**संवित् प्रकाश**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "या विश्व-व्यवहाराचे कारण वाणीच आहे." ही गोष्ट युक्तीने सिद्ध होते. ही गोष्ट काही शास्त्रोक्त परोक्ष स्वर्गाप्रमाणे नाही. कोणतेही कार्य संकल्पाशिवाय होत नाही व कोणताही विकल्प वाणीशिवाय

होत नाही. बोध किंवा आत्मा हेच वाणीचे मूळ आहे. **"जयाख्यसंहिता"** या ग्रंथामध्ये याची अधिक विस्ताराने चर्चा केली आहे. मात्रा, अतिसूक्ष्म, परम, मध्यम, स्थूल व स्थूलतर असे शब्दाचे अनेक भेद होतात. प्रत्येक व्यवहारात हे भेद कोणत्या ना कोणत्या रूपाने दिसून येतात. हे श्रीशिवशंकररूप संवित्-तत्त्व शारीरिक, शाब्दिक किंवा मानसिक व्यवहाराचे पूर्वरूप आहे. याकरिता मंगलाचरणामध्ये त्यांची स्तुती केली आहे.

हे संवित्-तत्त्व काय आहे? संवित्-तत्त्वाच्या उन्मेषाने, उन्मुखतेने, उकलण्याने किंवा उघडण्याने विश्वाचा उदय होतो व परंपरा चालू राहते. या तत्त्वाच्या निमेषाने, विश्रामाने, मिटण्याने किंवा बंद होण्याने प्रलय होतो व परंपरा संपुष्टात येते. ज्याप्रमाणे जागृत कालामध्ये दृश्याचा उदय व झोपेच्या कालामध्ये दृश्याचा प्रलय होतो त्याचप्रमाणे वरील क्रिया घडते. आत्मसंविताच्या उन्मेष व निमेषाच्या अतिरिक्त उत्पत्ती-प्रलय किंवा उभारणी-संहारणी नावाची कोणतीही वस्तू नाही. हे आत्मरूप ईश्वराच्या शक्तीचा फक्त प्रसार व विराम आहे. अत्यंत शुद्ध संवित्चे हे दोन आकार आहेत. **"तत्त्वविचार"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "जगताचा उदय व विलय शक्तीच्या प्रसाराशी व संकोचाशी बांधलेला आहे. ज्याची ही अशी शक्ती आहे तेच श्रीशिव-आत्मा आहेत." **"कक्ष्यास्तोत्र"** यातही हाच भाव प्रकट झाला आहे. "हे प्रभो! तुमच्या उन्मेष-निमेषाच्या केवळ आशयालाच सृष्टी व प्रलय म्हणतात. तुमची ही विचित्र निर्मिती पाहिल्यावर वरील गोष्ट स्वतःच स्पष्ट होते." उन्मेषामध्ये ज्ञानक्रिया आदि गर्भित इच्छाशक्तीचा निवास असतो व तीच प्रसारित होते. इच्छेमुळे ज्ञान प्रवृत्त होते व क्रियाशक्तीच्या साधनामुळे पदार्थांची उत्पत्ती होते. याचा विराम म्हणजेच प्रलय होय. उन्मेष व निमेष या शब्दांचे मूळ प्रयोग मंगलार्थक, पादपूरणार्थक किंवा ते सृष्टीच्या पूर्वी असल्या कारणाने केले आहेत. त्यांमध्ये शब्द-क्रम विवक्षित नाही. उन्मेषात मुक्ती आहे व निमेषामध्येही मुक्ती आहे; कारण निमेष निस्तरंग आहे.

आत्मसंविद्रूप श्रीशिवशंकरांना "शक्तिचक्र-विभवप्रभव" असे म्हटले आहे. शक्ती अनेक असतात. **"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथानुसार जगत्स्रष्ट्याची समवायिनी शक्ती इच्छा आहे. ती जेव्हा जगताला प्रकट करते तेव्हा ती ज्ञानशक्ती होते. ती कार्योन्मुख झाल्यावर क्रियाशक्ती होते. तिच्यातच आनंद, इच्छा, ज्ञान व क्रिया निवास करतात. या सर्व शक्ती

आत्मसंवित्‌शी एकरूप असतात. पांचभौतिक शरीररहित केवळ चिदात्म्यामध्ये जो परमानंदाचा उल्लास दिसतो ती परा वैष्णवीशक्ती आहे. या शक्तींच्या साहाय्यानेच संवित् विग्रह म्हणजे रूप धारण करते व दानवांचा नाश करते. या शक्ती जीवांचे आत्यंतिक हित करीत असल्यानेच त्यांना माता म्हणून संबोधिले जाते. या सर्व शक्ती विज्ञानदेहरूपच असतात.

खेचरी, इच्छा, परा, अघोरा, वामा, ब्राह्मी, वैष्णवी, शैवी, सौरी, बौद्धी इत्यादि नावांनी भिन्न भिन्न संप्रदायांनी आपापल्या मतानुसार प्रधानतेने या शक्तींचे वर्णन केले आहे. कोणी कोणी या शक्तींना अक्षररूप व साधनरूपही मानतात. काहीही असले व मानले तरी सर्व शक्तींचे मूळ कारण स्पंदरूप श्रीभगवानच आहेत. "**मायावामनसंहिता**" या ग्रंथामध्ये सर्व शक्तींनी युक्त असलेला एक भगवानच जीवाचे ध्येय व उपास्य मानला आहे. या बाबतीत "**कुलयुक्ती**" या ग्रंथात अत्यंत सुंदर वचन आले आहे. "**वेदान्त, वैष्णव, शैव, सौर, बौद्ध व अन्यान्य मतमतांतरामध्ये ज्ञाता व ज्ञेय दोन्ही गोष्टी एक शुद्ध आत्माच आहे. जो जाणणारा आहे तोच जाणला जाणार आहे. ज्याचे उन्मेष व निमेष जगताचे उदय व विलय हे आहेत त्याला आम्ही नमस्कार करतो.**" उपरोक्त ग्रंथात असे जे म्हटले आहे ते वरील दृष्टीने पाहता ठीकच आहे. **शक्तिमान् आत्मा श्रीमहेश्वर आहे व शक्ती जगत् आहे.** ज्याप्रमाणे अत्यंत श्रेष्ठ अशा सुंदरीच्या अंग-प्रत्यंगातून कोटी कोटी गुणांनी लावण्य नुसते झळकत असते त्याप्रमाणे परमात्म्याची चिन्मात्रता जगताच्या रूपाने झळकत असते. शक्तींच्या सामर्थ्यामुळेच आत्म्याची प्रभू ही संज्ञा योग्य होते.

येथे असा प्रश्न उपस्थित होतो की, इतके अपार सामर्थ्य असताना संसारी अवस्थेमध्ये आत्म्याचे हे वैभव का झाकून जाते? त्याचप्रमाणे देव, मनुष्य, जनावरे, शरीर, इंद्रिये, ब्रह्मांडे, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ वगैरे अनंत प्रकारचे भेद जेथे व ज्यामध्ये आहेत अशा या संसाराला आत्मस्वरूप कसे म्हणावयाचे? म्हणजे तू श्रीगुरुरूपच आहे असे कसे म्हणावयाचे? ऐश्वर्यवान् असे श्रीपरमगुरू तेच माझा आत्मा आहेत असे कसे म्हणावयाचे? असा प्रश्न शिष्याने विचारला. त्याचे उत्तर पुढील कारिकेत दिले आहे.।।१।।

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** उन्मेष व निमेष हे श्रीशिवांच्या इच्छेमुळे होतात.

त्यामुळे इच्छेलाच येथे उपचाराने उन्मेष व निमेष असे म्हटले आहे. ही इच्छा हीच श्रीशिवांची अभिन्न व अव्यतिरिक्त शक्ती आहे. या इच्छाशक्तीचे स्वरूपविवेचन पुढे ४३ व्या कारिकेमध्ये येईल. श्रीशिवावस्थेतील या इच्छाशक्तीच्या स्फुरणात सर्व विश्व, त्या अवस्थेत त्याला मूर्त स्वरूप न आल्यामुळे, त्या शक्तिस्फुरणाहून वेगळे नसतेच म्हणजे इच्छेत विश्व श्रीशिवांच्या ठिकाणीच स्थित असते. या इच्छेमुळेच विश्वाचे उन्मेष व निमेष होतात असे म्हणण्यात श्रीशिवदशेतील इच्छाशक्तीचे स्वातंत्र्य दाखविले आहे. ही जी इच्छास्फुरणरूप श्रीशिवदशा किंवा श्रीशिवदशेतील इच्छास्फुरण, यालाच श्रीउत्पलदेवांनी **"प्रत्यभिज्ञाकारिका"** या ग्रंथात **"प्रतिभा"** असे म्हटले आहे. ते असे -

**या चैषा प्रतिभा तत्तत्पदार्थक्रमरूपिता।**
**अक्रमानन्तचिद्रूपः प्रमाता स महेश्वरः।।**

**अर्थ :-** त्या त्या पदार्थाच्या क्रमाने विचित्रित किंवा अलंकृत झालेली ही जी प्रतिभा तीच अक्रमावस्थेत अनंत व चिद्रूप प्रमातृरूप श्रीमहेश्वर आहे असे अनुभवास येते.

श्रीशिवांची शक्ती ही वस्तुतः एकच असताना "शक्तीनां चक्रम्" असा प्रयोग करण्यातील अभिप्राय असा आहे की, कोणत्याही दशेतील स्वप्रतिपत्ती अर्थात् स्वानुभव हा नेहमी "अहंरूप" असतो. पण श्रीशिव जेव्हा या स्वप्रतिपत्तीला आपल्याच जाणिवेचा विषय बनवितात तेव्हा ते "अहं" लाच "इदं" बनवितात व त्या अहंरूपाचा अर्थात् अहंतेचा किंवा अस्मितेचा परामर्श करितात. (प्रख्या) त्यावेळी त्यांच्या त्या परामर्शात अहंचे रूपच सारखे विकसित होत असते. स्वशक्तीच्या अर्थात् प्रतिभेच्या प्रकाशात स्वप्रतिपत्तीच सारखी विकसित होत असते. याचा अर्थ असा की, जो जो त्या इदंभूत अर्थात् विषयभूत अहंतेकडे म्हणजे स्वप्रतिपत्तीकडे पाहावे तो तो त्यात परमार्थतः त्या प्रमात्याचा म्हणजे द्रष्ट्याचा स्वस्वभावच विकसित होताना दिसतो. याचा अर्थ असा की, श्रीशिवाने उन्मेषित केलेले विश्व हे श्रीशिवाच्या स्वभावाहून परमार्थतः वेगळे नाहीच.

या संबंधात आणखी असेही म्हटले आहे की -

**लिखते जगत्त्रितयचित्रमद्भुत प्रतिभापरिस्फुरितशंसि ते नमः।**
**सुसितैकसूक्ष्मनिजशक्तिवर्तिकारचितावभासशतशोभि शम्भवे।।**

**अर्थ :-** अत्यंत निर्मळ व सूक्ष्म अशा शक्तिरूपी वर्तिकेने नानाविध अर्थात् शेकडो अवभास रेखाटल्यामुळे जे अत्यंत शोभायमान दिसत आहे व ज्यातून (चित्रकाराच्या) अद्भुत प्रतिभेच्या स्फुरणाचा सारखा प्रत्यय येत आहे, असे त्रैलोक्यरूपी चित्र काढणाऱ्या श्रीशंकरांना नमस्कार असो. त्रैलोक्यरचना हा श्रीशंकरांच्या प्रतिभेचा विलास आहे. या प्रतिभा-शक्तिमुळेच त्रैलोक्यरचनेला शोभा आली आहे. त्यामुळे श्रीशकंरांच्या प्रातिभस्फुरणाहून तो वेगळा नाही, असाच या पद्यातील अभिप्राय आहे.

सारांश, ज्याला आपण चिदचिद्भेदात्मक विश्व म्हणतो ते श्रीशंकरांच्या प्रातिभ स्फुरणातच आकारास येत असते. श्रीशिवांची ही शक्ती एकच असून तीच नामरूपांनी भिन्न वाटणाऱ्या भावांच्या रूपातून अभिव्यक्त होते. अशा प्रकारे नामरूपात्मक नानाविध भावातून अभिव्यक्त होणाऱ्या त्या एकाच शक्तीचा, भावबहुत्वाच्या अपेक्षेने केलेला निर्देश म्हणजे "शक्तीनां चक्रम्" असा निर्देश होय. प्रतिभाशक्तीचे हे अनंत विलास हेच श्रीशिवांचे ऐश्वर्य किंवा विभव होय; कारण या नानाविध रूपातून श्रीशिवांचे विभवन (विशेषेण भावनम्) होत असते.

**ही प्रतिभा किंवा शक्ती हा श्रीशिवांचा स्वभावच होय. या शक्तीचे होणारे किंचित् चलन किंवा स्फुरण यालाच स्पंद असे नाव आहे. या स्फुरणाचेच प्रतिपादन यात आहे. त्यामुळे या शास्त्रालाही "स्पंद" असेच नाव दिले आहे.** कारिकेतील "स्तुमः" या पदाने स्तुती अभिप्रेत आहे. स्तुती म्हणजे उपादेय अर्थात् प्राप्त करावयाच्या वस्तूच्या स्वरूपाचे प्रतिपादन होय.

**टीप :- १)** श्रीशिवांची शक्ती आणि प्रतिभा यांची अभिन्नता ही सर्वच आगमग्रंथात मानलेली आहे. **"त्रिपुरारहस्य"** या ग्रंथात तर प्रतिभा हे श्रीशिवांच्या शक्तीचे परमश्रेष्ठ रूप होय असे स्पष्ट म्हटले आहे.

**यत्र सर्व जगदिदं दर्पणप्रतिबिम्बवत्।**
**उत्पन्नं च स्थितं लीनं सर्वेषां भासते सदा।। ....**
**सा परा प्रतिभा देव्याः परं रूपं ममेरितम्।।**

**(त्रि.र.२०।३१-३६)**

**अर्थ :-** जेथे हे जगत् आरशातल्या प्रतिबिंबाप्रमाणे सर्वांना उत्पन्न झालेले, स्थिर असलेले आणि लय झालेले नेहमी भासते ती परा प्रतिभा असून देवीचे ते सर्वश्रेष्ठ रूप आहे.।।१।।

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

।। श्रीस्पन्दवपुषे नमः ।।

## स्वरूप-स्पंद नामक प्रथम निष्यंद

।। मङ्गलाचरणम् ।।

**वृत्ती :-** या सूत्रामध्ये ग्रंथकाराने नमस्कार करण्याच्या उपक्रमांच्या दोन गोष्टींकडे संकेत केलेला आहे. यातील प्रथम गोष्ट अशी आहे की, यातील श्रीशिव याचा अर्थ अनुग्रहशक्तीच्या द्वारा जीवाला किंवा स्वतःच्या संकुचित अंशाला अभेद अवस्थेवर आरूढ करणारा कल्याणकारी स्वभाव असा आहे. श्रीशिव हे आपल्या केवळ संकल्पानेच अर्थात् विमर्शात्मक स्पंदनाने किंवा शक्तीच्या विचारांच्या स्पंदनाने किंवा स्फुरणामुळे जगताची सृष्टी आणि संहार करीत असतात अर्थात् श्रीशिव हेच जगताच्या सृष्टी आणि संहार यांचे मूळ कारण आहेत. या उपक्रमातील दुसरी गोष्ट अशी आहे की, ते (श्रीशंकर नावाचा स्वभाव) विज्ञानदेहाचे अर्थात् विमर्शात्मक अर्थात् विचारात्मक स्पंदनारूप शक्तिचक्राच्या ऐश्वर्याचे मूळ उद्गम स्थान आहेत. युगपत् अर्थात् एकाचवेळी विश्वाच्या अनंत विशेषरूपांमध्ये प्रवाहमान होणे आणि आपल्या मौलिक अर्थात् मौल्यवान भेदहीन अर्थात् अभेदात्मक सामान्यरूपांमध्ये विश्रांत होणे यांची स्वतंत्र क्रियाशीलता हेच या शक्तिचक्राचे ऐश्वर्य आहे.।।१।।

**विवरण :-**

### शिव आणि शक्ती

स्पंदशास्त्रामध्ये प्रतिपादिलेल्या अर्थात् प्रतिपादन केलेल्या किंवा सांगितलेल्या या सिद्धान्तानुसार सर्व नामरूपात्मक व्यक्त आणि भावनात्मक अव्यक्त विश्व यांना जीवन देणारी तसेच प्रत्येक पदार्थाची आत्मभूत अशी एकच भौतिक किंवा मौल्यवान चैतन्यसत्ता शाश्वत रूपाने विद्यमान किंवा अस्तित्वात आहे. या दृष्टीनेच "**चैतन्यमात्मा।।१.१।।**" असे श्रीशिवसूत्रात म्हटले आहे. या चैतन्य सत्तेचेच नाव "श्रीशिव" किंवा "श्रीशंकर" असे ठेवलेले आहे. जरी ही मौलिक चैतन्यसत्ता नामरूपाने भिन्न असली तरीही त्या सत्तेचे असे नामकरण करण्यामध्ये एक विशेष अभिप्राय किंवा अर्थ अंतर्निहित अर्थात् सामावलेला आहे. तो अभिप्राय किंवा अर्थ असा आहे की, सामान्य रूपाने स्वतंत्र इच्छेच्या द्वारा सृष्टी, स्थिती, संहार, पिधान

म्हणजे निग्रह आणि अनुग्रह ही पाच कृत्ये प्रतिक्षण करीत असतानाही या शक्तीचे अनुग्रहात्मक कृत्य हे एक विशेष कृत्य आहे. या अनुग्रहाच्या साहाय्यानेच श्रीशिव हे जन्ममरणरूपी जात्याच्या दगडांमध्ये दळले जाणाऱ्या अणूंचे अर्थात् जीवांचे सर्व भेदभावनेने असलेले पूर्ण अज्ञान दूर करून या अणूंना किंवा जीवांना स्पंदमयी शाक्तभूमिकेवर आरूढ करतात व अशा रीतीने या अणूंचे किंवा जीवांचे कल्याण करीत असतात. शम् = कल्याण + कर = करणारा म्हणून श्रीशिवांना श्रीशंकर अर्थात् कल्याण करणारा असेही म्हटले जाते.

श्रीशंकर हे चैतन्यरूप असून "चेतने"च्या क्रियेचे स्वतंत्र कर्ता आहेत. चेतनेची क्रिया करण्यात स्वतंत्र असल्यामुळे श्रीशंकरांना "चेतन" असे म्हणतात किंवा श्रीशंकर हेच चेतन आहेत. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, **"घटेन स्वात्मनि न चमत्क्रियते, स्वात्मा न परामृश्यते, न स्वात्मनि तेन प्रकाश्यते, न अपरिच्छिन्नतया भास्यते ततो न चेत्यत इत्युत्यते ।।१.५.१३।।"**

**अर्थ :-** घटाकडून स्वात्म्यात चमत्कार केला जात नाही. अर्थात् स्वात्म्यात तो प्रकाशित होत नाही, त्याला स्वात्म्याचे ज्ञान प्राप्त होत नाही, तो स्वतःलाच प्रकाशित करू शकत नाही आणि अपरिच्छिन्न रूपाने भासत नाही त्यामुळे तो स्वतःच जाणतो असे कोणीही म्हणत नाही.

घट हा चेतन नाही. याचे कारण घटाला आपली किंवा आपल्याहून भिन्न अशा अन्य कोणाचीही चेतना नसते अर्थात् जाणीव नसते. याच्या विरुद्ध "चैत्र" नावाच्या व्यक्तीमध्ये चेतनेची अशी विभूती अर्थात् संपत्ती किंवा समृद्धी अर्थात् माहात्म्य म्हणजेच ऐश्वर्य किंवा शक्ती विद्यमान आहे की, ती "अहं" रूप आवेगाच्या द्वारा स्वतःच्या आत्मरूपामध्ये आणि आपल्याहून भिन्न असलेल्या नील, पीत, सुख, दुःख किंवा यांच्या अभावात्मक शून्यरूपामध्येही अवभासित अर्थात् प्रकाशित होत असते. यामुळे चैत्र हा ज्ञाता असल्यामुळे ती व्यक्ती स्वतंत्र आहे. याकरिताच **"ईश्वर-प्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथात **"चैत्रेण तु स्वात्मनि अहमिति संरम्भोद्योगोल्लासविभूतियोगात् चमत्क्रियते ..... नीलपीतसुख-दुःखतच्छून्यताद्यसंख्यावभासयोगेन अवभास्यते ततः चैत्रेण चेत्यत इत्युच्यते।।१.५.१३।।"** असे म्हटले आहे. फलस्वरूप चैत्र हा चेतविणारा असल्याने चेतन आहे आणि त्याला "चेतन" असे म्हटले जाते. श्रीशंकर

हे प्रकाशविमर्शमय असतात अर्थात् ते प्रकाश-विचारमय किंवा प्रकाश-ज्ञानमय असतात किंवा श्रीशिवशक्तिसामरस्यरूप असतात. श्रीशिव हे आपल्या स्वरूपाचा आणि आपल्याच शक्तीच्या प्रसाररूप विश्वाचा **"ईश्वरप्रज्ञभिज्ञा"** या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे **"चिति प्रत्यवमर्शात्मा।। १.५.१३।।** अर्थात् अहंरूपामध्ये विमर्श करणे अथवा चेतणे किंवा विचार करणे किंवा निर्माण करणे या क्रियेचे कर्ते आहेत. फलतः श्रीशिव हे चैतन्य आहेत. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथात स्वतंत्र ज्ञाता आणि स्वतंत्र कर्ता हा श्रीशिवांचा स्वभाव आहे, असे म्हटले आहे. याचे फलस्वरूप श्रीशिव हे स्वतंत्र आहेत आणि स्वातंत्र्य ही श्रीशिवांची मुख्य शक्ती आहे. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात **"स्वातन्त्र्यमेतन्मुख्यम्।।१.५.१३।।"** असे म्हटले आहे. श्रीशिवांच्या या स्वातंत्र्यशक्तीलाच चेतनाशक्ती, चितिशक्ती, स्पंदशक्ती, विमर्श, सार, हृदय, संवित्, ऊर्मी इत्यादि नावांनी अभिव्यक्त केलेले आहे.

ही सर्वस्वतंत्र चैतन्य सत्ता हा या सर्व विश्वाचा एकमात्र आत्मा आहे. याचा अर्थ असा नाही की, जी आत्मसत्ता आहे ती चेतन आहे. परंतु चैतन्य हाच आत्मा आहे. राहू अर्थात् डोके असे म्हणणे हा केवळ औपचारिक प्रयोग आहे. प्रत्यक्षात राहू आणि डोके या दोन्ही एकच वस्तू आहेत. या दृष्टीने **"श्रीशिवसूत्रविमर्शिनी"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, **"चैतन्यं चितिः, चेतन आत्मा इति राहोः शिर इतिवत् काल्पनिकम्, वस्तुतः एकमेव सर्वम्। चितिक्रिया, प्रकाशविमर्शः तस्य भावः चैतन्यम् स्वातंत्र्यम्।।१.१।।"**

याचा अर्थ असा आहे की, श्रीशंकरांची स्वतःची अशी एक अभिन्न शक्ती आहे. श्रीशंकरांच्या या शक्तीला "स्वातंत्र्यशक्ती" असे म्हणतात. ही शक्ती श्रीशिवांपासून अभिन्न आहे; कारण श्रीशिव हे शक्तीशिवाय राहूच शकत नाहीत आणि शक्ती ही श्रीशिवांशिवाय राहू शकत नाही. याबद्दल शास्त्रात असे म्हटलेले आहे की, **"न शिवः शक्तिरहितो न शक्तिः शिववर्जिता। उभयोरस्ति तादात्म्यं वह्निदाहकयोरिव।।"** श्रीशिव आणि शक्ती हे प्रत्यक्षात एकाच सत्तेचे सूचक आहेत. ज्याप्रकारे अग्नी आणि त्याची दाहकशक्ती हे दोन भिन्न पदार्थ नाहीत त्याप्रमाणे श्रीशिव आणि शक्ती हे प्रत्यक्षात एकाच सत्तेचे सूचक आहेत अर्थात् एकाच सत्तेची सूचना करीत असतात.

## स्पंदशक्ती

"पूर्ण अहं-विमर्श" हे या शक्तीचे स्वरूप आहे. अहं विमर्श अर्थात् शक्तीचा स्वतःचा विकास ही एक मौलिक स्फुरणा आहे. या दृष्टीने **"स्वच्छंदतंत्र"** या ग्रंथात असे म्हटलेले आहे की -

**शिवस्यैका महाशक्तिः शिवश्चैको ह्यनादिमान्।**
**सा शक्तीर्भिद्यते देवि! भेदैरानन्त्यसम्भवैः ।।११.२७१।।**

**अर्थ :-** अहं विमर्शाच्या स्फुरणेमुळे ती एकच शक्ती अनंत रूपांमध्ये स्फुरित होऊन विश्वाच्या अनंत आणि विचित्र रूपांमध्ये अवभासमान आहे किंवा प्रकाशमान होत असते.

स्पंदनशक्ती ही शाश्वतरूपाने स्फुरणशील आहे. यामुळेच अर्थात् स्फुरणशील रूपामुळेच या शक्तीला "स्पंदशक्ती" असे म्हणतात. यापुढे या स्पंदशक्तीच्या स्वरूप विश्लेषणाच्या विषयामध्ये काही मुख्य गोष्टींवर प्रकाश टाकणे अर्थात् या मुख्य गोष्टी स्पष्ट करणे युक्तिसंगत होईल.

"स्पंद" या शब्दाचा मूळ धातू "स्पदि" असा आहे. "किञ्चिच्चलन" अर्थात् "सूक्ष्म अहंविमर्शात्मक स्फुरणा" हा "स्पदि" या शब्दाचा अर्थ आहे. साधारणपणे "स्फुरणा" किंवा "स्पंद" या शब्दाने "कंपन" किंवा हलणे, लहरणे, तरंगित होणे असा अर्थ अभिप्रेत आहे. हा अहं विमर्शात्मक स्पंद स्थूल किंवा वाऱ्यामुळे हलणाऱ्या वृक्ष इत्यादींच्या कंपाप्रमाणे नसतो. या अहं विमर्शात्मक स्पंदाचे स्वरूप चिद्घनाच्या बाह्य विश्वात्मक रूपामध्ये स्वतंत्र शक्तिप्रसाराच्या दिशेने संकल्पात्मक उन्मुखमात्र अर्थात् केवळ उत्सुकतेमुळे झालेले असते. या दृष्टीने **"षट्त्रिंशत्तत्त्वसंदोह"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

**यदयमनुत्तरमूर्तिर्निजेच्छयाऽखिलमिदं जगत्स्रष्टुम्।**
**पस्पन्दे स स्पन्दः प्रथमः शिवतत्त्वमुच्यते तज्ज्ञैः ।।१।।**

**अर्थ :-** या श्रेष्ठ (स्वरूप असलेल्या) ईश्वराने हे संपूर्ण विश्व स्वेच्छेने निर्माण करण्यासाठी स्पंदन म्हणजे हालचाल केली. तो प्रथम स्पंद म्हणजे श्रीशिवतत्त्व असे ज्ञानी लोक म्हणतात.

या संकल्पात्मक उन्मुखतेला किंवा उत्सुकतेला सूत्रकारांनी "उन्मेष-निमेष" शब्दांनी अभिव्यक्त केलेले आहे. ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, येथे "उन्मेष-निमेष" याचा अर्थ उन्मेष, निमेष असा नाही; तर उन्मेष-निमेषात्मक अहं प्रत्यवमर्श असे याचे स्वरूप असून, ते विज्ञानरूप

अनुत्तर तत्त्वाची अर्थात् ज्याहून श्रेष्ठ असे अन्य काहीही नाही अशा तत्त्वाची संकल्पात्मक गतिमयता असे आहे. हाच उन्मेष-निमेष याचा खरा अर्थ आहे. शक्तीचे रूप नेहमी उदित असल्याने तिचा कधीही उन्मेष अर्थात् उदय किंवा विकास म्हणजेच सक्रियता, तसेच अस्त किंवा संकोच अथवा निष्क्रियता होत नाही.

वास्तविक पाहता स्पंदनशक्तीचे स्वरूप हे उच्छलनात्मक अर्थात् उभारणी व संहारणी युक्त असे आहे. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात "**स्वात्मन्युच्छलनात्मकः ।।४.१८३।।**" असे म्हटले आहे. स्पंदशक्ती ही युगपत् अर्थात् एकाच वेळी स्वरूपाचा विकास किंवा संकोच करीत असते. याचे फल म्हणून ही शाक्त क्रियाशीलता एकाच वेळी द्विमुखी अर्थात् अंतर्मुखी आणि बहिर्मुखी असते. परंतु ही सर्व क्रियाशक्ती अर्थात् क्रियात्मकता संकल्पात्मक आहे.

"**सैषा सारतया प्रोक्ता हृदयं परमेष्ठिनः ।।१.५.१४।।**" असे "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथामध्ये म्हटल्याप्रमाणे अनुत्तर तत्त्व अर्थात् ज्याहून श्रेष्ठ असे अन्य काहीही नाही असे तत्त्व हे निःसंदेह श्रीशंकरात्मक बोधगगन अर्थात् ज्ञानाचे आकाश आहे. अनुत्तर तत्त्वाचेही सारभूत हृदय हे विमर्शरूप स्पंदशक्ती आहे. शक्ती ही परिवलित अर्थात् वेढे घातलेली म्हणजे चक्राकार असल्यामुळे या शक्तीमध्ये विश्वोत्तीर्णता अर्थात् विशुद्ध ज्ञानप्रधान प्रकाशरूपता, विश्वरूपता अर्थात् क्रियाप्रधान विमर्शरूपता ही मोराच्या अंड्यामध्ये वर्तमान असेलल्या द्रवपदार्थाच्याच रूपामध्ये अवस्थित असते. आगामी शावकाच्या अर्थात् मोराच्या पिल्लाच्या विचित्र रंगाच्या पंख्याच्या कल्पनेप्रमाणे अभेद हा किंवा अभिन्नता ही "अहं" रूपामध्ये अवस्थित असते. या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की, "**संविन्निष्ठा हि विषयव्यवस्थितयः ।**" याचा अर्थ असा आहे की, संविन्निष्ठा अर्थात् संविच्छक्ती विषयांमध्ये स्थित असते.

वर निर्देश केलेल्या प्रकाशभाग आणि विमर्शभाग यामधील क्रियाप्रधान विमर्शभाग हाच सामान्य स्पंद आहे. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात श्रीअभिनवगुप्त आचार्यांनी असे म्हटले आहे की -

**हृदये स्वविमर्शोऽसौ द्रावितशेषविश्वकः ।**
**भावग्रहादिपर्यन्तभावी सामान्यसंज्ञकः ।।४.१८२।।**
**स्पन्द स कथ्यते शास्त्रे स्वात्मन्युच्छलनात्मकः ।।१८३।।**

**अर्थ** :- हृदय हा बोधाचाच पर्याय आहे. तो अर्थात् स्वबोध आपल्यामध्ये स्वात्म्याचा विमर्श अर्थात् द्रावित म्हणजे बाहेर पसरलेला किंवा फैलावलेला सर्व संसार स्वात्मसात् करतो अर्थात् गिळून टाकतो. हा बोध संसाराच्या उत्पत्तीच्या पहिल्या वेळेपासून संहाराच्या शेवटच्या क्षणापर्यंत सतत उसळत असतो. एखाद्या विशेषाच्या अभावामुळे आणि शांतीच्या कारणामुळे या बोधाला सामान्य असे म्हणतात. या बोधाला स्पंदशास्त्रात स्पंद असे म्हणतात. स्पंदनामध्ये काही ना काही उसळणे स्वाभाविक असते. या सामान्य स्पंदालाच विमर्श असे म्हणतात. या विमर्शालाच उसळण्याच्या कारणामुळे किंवा स्वभावामुळे स्पंद असे म्हणतात.

या क्रियाप्रधान विमर्शभागाच्या द्वारा अंतर्मुख "अहं" मध्ये अभिन्न रूपामध्ये अवस्थित असलेल्या विश्वकल्पनेचे बहिर्मुख अशा "इदं" रूपामध्ये अवभासन किंवा प्रकाशन होत असते. "इदं" रूपामध्ये अवभासित किंवा प्रकाशित होणाऱ्या विश्वाची अंतर्मुख अनुसंधानात्मक किंवा अहंरूपतेमध्ये विश्रांतीची क्रिया संपन्न होत असते.

विमर्शामध्ये ज्या वस्तूचा सद्भाव असतो त्या वस्तूचेच बाह्य अवभासन किंवा प्रकाशन होणे शक्य असते. ज्या पदार्थाचे बाह्य रूपामध्ये अवभासन किंवा प्रकाशन झालेले असते त्याच पदार्थाचा अंतर्मुखतेमध्ये विश्राम होणे अर्थात् लय होणे किंवा विरघळणे शक्य असते. याचे फल म्हणून विमर्शात्मक स्पंदशक्तीचे असे स्वातंत्र्य तसेच असीम सामर्थ्य आहे की, ही स्पंदशक्ती अवभासित अर्थात् प्रकाशित पदार्थांचा आपल्या रूपामध्ये लय करू शकते. या दृष्टीने "**ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, "**विमर्शो हि सर्वसहः परमपि आत्मीकरोति, आत्मानं परिकरोति, उभयम् एकीकरोति, एकीकृतं द्वयमपि न्यग्भावयति इत्येवंस्वभावः।।१.५.१३।।**" अर्थात् ही स्पंदशक्ती स्वतःला भाव-मंडलाच्या रूपामध्ये अवभासित किंवा प्रकाशित करू शकते. ही स्पंदशक्ती दोहोंना एकाकार बनवून धारण करू शकते आणि दोहोंपासून पृथक् रूपामध्येही अवस्थित राहू शकते. प्रत्यक्षात ही विमर्शात्मक अर्थात् विचारात्मक स्फुरणा (स्पंदशक्ती) ही एक महान् अशी सत्ता आहे की, जिच्या शिवाय प्रकाशाची कल्पना करणे व्यर्थ आहे. याचे कारण असे आहे की, विमर्शहीन प्रकाश हा बिंबग्राही असूनही जड असतो. या दृष्टीने "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**स्वभावमवभासस्य विमर्शं विदुरन्यथा।**
**प्रकाशोऽर्थोपरक्तोऽपि स्फटिकादिजडोपमः।।(१.५.११)**

**अर्थ :-** अवभासाचा म्हणजे प्रकाशाचा स्वभावच विमर्श म्हणजे उभारणी, संहारणी व एकीकरण हा आहे. स्वस्वरूपाचा अनुभव घेतलेल्या लोकांनाच याची जाणीव असते. तत्त्ववेत्तेलोक विमर्शाला अहम्, असांकेतिक, स्वातंत्र्यरूप, आत्मविश्रांतिरूप व ज्ञाता असे म्हणतात. अन्यथा या अर्थापासून दूर गेल्यास विमर्शशून्य प्रकाश स्फटिकाप्रमाणे जडवत् होईल.

स्पंदशक्तीचा स्वभाव हा किंचिच्चलन अर्थात् किंचिच्चलनात्मक असा आहे, असे वर सांगितलेले आहे. यामुळेच **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे कथन केले आहे की -

**किञ्चिच्चलनमेतावदनन्यस्फुरणं हि यत्।**
**ऊर्मिरेषां विबोधाब्धेर्न संविदनया विना।।४.१८४।।**

शैवशास्त्रामध्ये "किञ्चिच्चलन" शब्दाचा अर्थ "स्वतंत्ररूपामध्ये स्फुरित होणे" असा आहे. संवित् अर्थात् भगवच्छक्ती ही कधीही स्फुरणाशिवाय राहू शकत नाही. याचे कारण असे आहे की, ही संवित् पुन्हा चिद्रूप होऊ शकत नाही. जर असे असते तर पुन्हा चिद्रूपतेच्या अभावामुळे संपूर्ण विश्वामध्ये जड दगडगोटे यांच्याशिवाय अन्य कोणतीही जीवित सत्ता पाहण्यास मिळाली नसती.

भगवच्छक्ती ही जड वस्तू आहे किंवा नाही हे कोणीही सांगू शकत नाही. यामुळे या शक्तीची सत्ता ही असून नसल्याप्रमाणेच असते. फलस्वरूप ही संवित् प्रतिक्षण प्रमाता (यथार्थ ज्ञान करून घेणारा कर्ता) आणि प्रमेय (ज्या गोष्टीचे यथार्थ ज्ञान करून घेतले जात असते) या दोन्ही रूपामध्ये सतत स्फुरणमयी आहे अर्थात् स्पंदशील आहे. प्रत्यक्षात् स्पंद हा किंवा स्फुरणा ही शक्तिसमुद्रावरील लाटेप्रमाणे आहे, हे स्पष्ट आहे. या दृष्टीने **"तंत्रालोकविवेक"** या टीकेत असे म्हटले आहे की -

**इदमेव संविदः संवित्त्वं यत् सर्वम् आमृशतीति।।४.२१४।।**

स्पंद तसेच संवित् अर्थात् भगवच्छक्ती ही विमर्शमयी अथवा सतत स्पंदमयी असल्यामुळे प्रत्येक पदार्थाचे (विश्वोत्तीर्ण रूपामध्ये अथवा विश्वमय रूपामध्ये वर्तमान भावांचा) स्वतंत्र "अहं" रूपामध्ये विमर्श अर्थात् विचार करू शकते किंवा करीत असते. हेच या संवित्‌चे अर्थात् भगवच्छक्तीचे संवित्त्व अर्थात् शक्तित्त्व आहे.

**निस्तरङ्गतरङ्गादिवृत्तिरेव हि सिन्धुता।।(४.१८५)** असे **"तंत्रालोक"** या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे समुद्र हा कधी तरंगहीन असतो तर कधी तरंगायमान रूप धारण करीत असतो. सागराची सागरता ही यामुळेच सिद्ध होत असते. **"एष प्रकाशरूप आत्मा स्वच्छन्दो ढौकयति निजरूपम्। पुनः प्रकटयति झटिति अथ क्रमवशाद् एष परमार्थेन शिवरतम्"।।** असे **"तंत्रसार"** या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे संविन्मय अर्थात् शक्तिमान् विश्वात्मा हा आपल्या याच स्पंदमय स्वातंत्र्यामुळे अर्थात् या स्पंदमय स्वातंत्र्याच्या साहाय्याने आपले स्वरूप लपवून आणि विद्युद्गतीने प्रकट करून अक्रमामध्ये क्रमाचे आणि क्रमामध्ये अक्रमाचे अवभासन अर्थात् प्रकाशन करण्याची क्रीडा करीत राहतो. प्रत्यक्षात हाच आनंदात्मक स्वातंत्र्यशक्तीचा अलौकिक चमत्कार आहे.

स्पंदशक्ती ही एक महान् सत्ता असल्यामुळे प्रत्येक क्रिया करण्यासाठी स्वतंत्र आहे. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की -

**सा स्फुरता महासत्ता .....।।१.५.१४।।**

**सत्ता च भवनकर्तृता सर्वक्रियासु स्वातन्त्र्यम्।।१.५.१४।।**

हीच स्पंदशक्ती विश्वातील प्रत्येक दृश्यमान अथवा अदृश्यमान पदार्थाला सत्ता देत असते. इतकेच नव्हे; तर ज्या वस्तूंचा प्रत्यक्षरूपामध्ये पूर्ण अभाव असतो त्या वस्तूंनाही कल्पनेच्या द्वारे स्थिती प्रदान करीत असते. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, **"सा च खपुष्पादिकमपि व्याप्नोति।।१.५.१४।।"** म्हणजे आकाशपुष्प, वंध्यापुत्र अर्थात् वंध्या स्त्रीला होणारा पुत्र आणि शशशृंग अर्थात् सशाची शिंगे या अशाच कल्पना ती उत्पन्न करून व्याप्त होऊन राहते.

या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, या कार्याशिवाय स्पंदशक्ती ही देश, काल आणि आकार यांच्या सीमांना अर्थात् मर्यादांना जन्म देत असते.

**देशकालाविशेषणी।।१.५.१४।।**

स्पंदशक्ती ही स्वयं नित्य आणि व्यापक असल्यामुळे देश, काल आणि सीमा यांच्यामुळे असीम अर्थात् मर्यादित असत नाही किंवा बनत नाही. हेच कारण आहे की, संसारामध्ये जितक्या प्रमाता, प्रमाण, प्रमेय,

प्रमा यांच्या कल्पना आहेत अथवा अंतर्मुखरूपामध्ये किंवा बहिर्मुख-स्वरूपामध्ये ज्या काही कल्पना आहेत त्या सर्व रूपांमध्ये ही शक्ती स्वतःला अवभासित किंवा प्रकाशित करीत असते आणि या रूपांहून ही शक्ती पृथग्रूपामध्ये अर्थात् भिन्नत्वाने प्रकाशमान राहत असते. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**अत एषा स्थिता संविदन्तर्बाह्योभयात्मना।**
**स्वयं निर्भास्य तत्रान्यद्भासयन्तीव भासते।।४.१४७।।**

**अर्थ :-** प्रत्यवमर्शमयी अर्थात् सर्वत्र प्रकाशित होणारी ही संविच्छक्ती स्वतःच्या स्वातंत्र्याच्या माहात्म्यामुळे आत व बाहेर प्रमाता म्हणजे जीव आणि प्रमेय म्हणजे श्रीशिव या दोन्ही रूपांनी भासमान होत असते. ही शक्ती स्वात्म्यात अतिरिक्तपणे म्हणजे निराळेपणाने भासित होते आणि स्वतःही भासित होत असते. तिच्याशिवाय वास्तविकपणे काहीही भासित होऊ शकत नाही. आपल्या या शक्तीमुळेच ती महिने, राशी आणि स्वरसरणीमध्ये बारा रूपात भासित होते.

### स्पंदशक्तीची अनंतता

प्रत्यक्षात जरी ही स्पंदशक्ती एकच असली तरीही प्रसाराच्या भूमिकेमध्ये ही अनंत धारांमध्ये प्रवाहमान होत असते. "**शक्तयोऽस्य जगत्कृत्स्नं शक्तिमांस्तु महेश्वरः।।**" असे "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकेमध्ये म्हटल्याप्रमाणे विश्वामध्ये जितके पदार्थ आहेत ते सर्व पदार्थ शक्तिरूपच आहेत. सामान्य भूमिकेमध्ये अर्थात् पतिदशेमध्ये ही स्पंदशक्ती चित्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रिया या पाच मुख्य तसेच असंकुचित रूपामध्ये सतत विकासशील असते. ही स्पंदशक्ती विशेष भूमिकेमध्ये अर्थात् पशुदशा किंवा जीवभावामध्ये प्राण, अंतःकरण, बाह्य इंद्रिये इत्यादि अनंत प्रमेयाच्या रूपामध्ये प्रवाहमान आहे. (सूत्र १९ चे विवरण पाहावे.) "**तस्य च स्वातन्त्र्यम् आनन्दशक्तिः, तच्चमत्कार इच्छाशक्तिः, प्रकाशरूपता चिच्छक्तिः, आमर्शात्मकता ज्ञानशक्तिः, सर्वाकारयोगित्वं क्रियाशक्तिः।।**" असे "**तंत्रासार**" या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे पतिप्रमात्याची अभिन्न अर्थात् एकरूप स्वातंत्र्यशक्ती ही त्याची आनंदघनता आहे. आनंदाचा चमत्कार हीच इच्छाशक्ती आहे. प्रकाशरूपता ही या पतिप्रमात्याची अर्थात् परमेश्वराची चिच्छक्ती असून विमर्शमयता ही ज्ञानशक्ती आहे. प्रत्येक प्रकारच्या आकार इत्यादींना अवभासित करण्याच्या सामर्थ्यालाच

"क्रियाशक्ती" असे म्हणतात. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**तस्मात्संवित्त्वमेवैतत्स्वातन्त्र्यं यत्तदप्यलम्।**
**विविच्यमानं बह्वीषु पर्यवस्यति शक्तिषु।।१.१६०।।**

**अर्थ :-** संवित्स्वभावच अर्थात् शक्तिस्वरूपच स्वातंत्र्य आहे. हे स्वातंत्र्यच अनंत अनंत शक्तींमध्ये पर्यवसित होऊन वेगवेगळे भासते.

यावरून हे स्पष्ट होते की, हा सर्व दृश्यमान प्रपंच मौलिक स्वातंत्र्य-शक्तीचाच विकास आहे. अशी अनंतरूपे असूनही ही स्वातंत्र्यशक्ती मुख्यतः इच्छा, ज्ञान आणि क्रिया या तीन रूपांमध्ये शाश्वतरूपाने स्फुरित होत असते. पतिभावामध्ये नाही तर पशुभावामध्येही शक्तीचे हे इच्छात्मक, ज्ञानात्मक आणि क्रियात्मक रूप प्रतिक्षण कार्यनिरत राहत असते. कोणताही प्राणी हा जेव्हा एखाद्या वस्तूवर प्रेम करीत असतो किंवा त्या वस्तूची इच्छा करीत असतो तेव्हा ती वस्तू त्या प्राण्याच्या अंतःचेतनेमध्ये आधीपासूनच अभिन्न रूपामध्ये अवस्थित होत असते. त्यानंतर ज्ञानाच्या द्वारे त्या वस्तूला जाणून घेऊन तो प्राणी क्रियेच्या द्वारा ती कार्यरूपामध्ये परिणत अर्थात् रूपांतरित करीत असतो. संक्षेपामध्ये अर्थात् थोडक्यात असे म्हटले जाते की, प्राणी ज्या वस्तूची इच्छा करीत असतो ती जाणतही असतो आणि करीतही असतो. अशा प्रकारे पतिदशेमध्ये इष्यमाण अर्थात् योग्य किंवा हितावह अशी विश्वकल्पना प्रथम इच्छाशक्तीमध्ये अभिन्न रूपाने अवस्थित राहत असते. त्यानंतर ज्ञानशक्तीच्या द्वारा त्याचा विमर्श अर्थात् विचार किंवा संकल्प होऊन क्रियाशक्तीच्या द्वारा बाह्य अवभासन संपन्न होत असते. अशा प्रकारे एकच मौलिक पारमेश्वरी स्पंदशक्ती ही स्वातंत्र्याने इच्छा, ज्ञान आणि क्रिया यांचा केवळ व्यपदेश अर्थात् विविधता धारण करीत असते. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**माया नाम च देवस्य शक्तिरव्यतिरेकिणी।**
**भेदावभासस्वातन्त्र्यं तथा हि स तया कृतः।।९.१४९.५०।।**

हे सर्व व्यपदेश उन्मेषामध्ये येणाऱ्या मायाशक्तीच्या सामर्थ्यापासून उत्पन्न होत असतात. या दृष्टीने **"शिवदशामेकां मुक्त्वा मायाशक्तिः सर्वत्र कृतपदा।"** असे **"स्पंदकारिकाविवृती"** या टीकेमध्ये म्हटले

आहे. याचे कारण असे की, केवळ श्रीशिवदशा सोडून अन्य सर्व अवस्थांमध्ये मायाशक्तीचेच साम्राज्य परसलेले असते. हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, इदंभावाला अवभासित करण्याकडे उन्मुख बनलेल्या स्वातंत्र्यशक्तीलाच "मायाशक्ती" असे म्हणतात. ही शक्तीची अशी अवस्था आहे की, ज्यामध्ये आगामी भेदकल्पना भरलेली तर असते; परंतु त्याचा विभाग झालेला नसतो. या दृष्टीने **"तंत्रालोकविवेक"** या टीकेमध्येअसे म्हटले आहे की -

**अत एव बहिर्मुखतायां भाविनो विभागस्य**
**शिम्बिकाफलवत् अस्यां गर्भीकारोऽस्ति।।९.१५१।।**

ज्याप्रमाणे शेवग्याच्या शेंगेच्या गर्भामध्ये आगामी अनंत शेंगांची कल्पना अविभक्त रूपामध्ये अवस्थित राहत असते त्याप्रमाणे ही शक्तीची अवस्था आहे. असो. या विषयावर योग्य ठिकाणी प्रकाश टाकण्यात येणार आहे. येथे केवळ इतकेच लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, संपूर्ण विश्व हे याच पारमेश्वरी स्पंदशक्तीचा प्रसार अथवा विकास आहे.

सामान्य आणि विशेष ही स्पंदशक्तीच्या प्रसाराची दोन रूपे आहेत. याच दोन रूपांच्या आधाराने शैवशास्त्रवेत्त्यांनी या स्पंदशक्तीची सामान्य-स्पंद आणि विशेषस्पंद अशी दोन नावे ठेवलेली आहेत. या स्पंदशक्तीचे सामान्य रूप हे अनेकाकारतेमध्ये एकाकारता असून विशेष रूप हे एकाकारतेमध्ये अनेकाकारता आहे. याचा भाव असा आहे की, याचे सामान्यरूप विश्वात्मक सूक्ष्म चेतना किंवा प्राणना आहे. एका बाजूने ही विश्वाच्या अनेक रूपांमध्येही एकाच सामान्यरूपाने व्याप्त आहे व दुसऱ्या बाजूने हिचे विशेष रूप विश्वाच्या अनेक तसेच विचित्र नामरूपात्मक प्रमेय पदार्थांचे रूप आहे आणि या रूपामध्येही भेदाची प्रधानता असल्यामुळे वस्तुतः एक असूनही ही विशेष रूपांमध्ये (अनेकाकारांमध्ये) प्रवाहमान अर्थात् भासमान आहे. येथे स्पंदशक्तीच्या या दोन रूपांचा केवळ संकेत आलेला आहे. पुढे यथास्थान या रूपांचे विश्लेषण केले जाणार आहे.

आता येथे सूत्रामध्ये उल्लेखिलेल्या उन्मेष-निमेष यावर थोडासा प्रकाश टाकणे युक्तिसंगत होईल.

या विषयामध्ये आधीच असे म्हटलेले आहे की, उन्मेष-निमेष हे संकल्पात्मक गतिमयतेव्यतिरिक्त अन्य काहीही नाही. या दृष्टीने **"स्पंद-कारिकाविवृती"** या टीकेमध्ये असे म्हटले आहे की -

**उन्मेषनिमेषशब्दाभ्यां तदुपचरितवृत्तिभ्याम् इच्छामात्रमेकं शङ्कर-सम्बन्धि प्रतिपाद्यते, स च तस्य नित्यो धर्मः स्वभावभूतः, तस्य उन्मेषनिमेषशब्दवाच्यत्वं द्वित्वं च उपचारात्।**

या संकल्पात्मक गतिमयतेलाच शैवशास्त्रामध्ये इच्छाशक्ती असे नाव दिलेले आहे. ही इच्छाशक्ती ही श्रीशंकरांचा नित्यधर्म अथवा स्वभाव आहे. इच्छाशक्ती ही या श्रीशंकरांपासून कधीही वेगळी होत नाही; कारण शक्ती आणि शक्तिमान् हे कधीही एकमेकांपासून वेगळे होऊ शकत नाहीत. या प्रथम सूत्रामध्ये एकाच इच्छाशक्तीला किंवा केवळ संकल्पाला व्यक्त करण्यासाठी उन्मेष आणि निमेष यांचा औपचारिक प्रयोग केलेला आहे. सूक्ष्मदृष्टीने पाहिले असता ही गोष्ट योग्य तऱ्हेने लक्षात येते की, उन्मेष आणि निमेष हे केवळ संकल्पाचेच द्योतक आहेत. पारमेश्वर अर्थात् परमेश्वराच्या संकल्पामध्ये विश्वोत्तीर्ण रूपामध्ये अर्थात् विशुद्ध चिन्मात्ररूपामध्ये अवस्थित राहण्याच्या दिशेने उन्मुखता होत असते. "उन्मेष" हा याच अवस्थेचा द्योतक आहे. या अवस्थेमध्ये सर्व "इदं भाव" अथवा केवळ प्रमेयभाव हा "अहं" रूप अर्थात् विशुद्ध चिन्मात्ररूप प्रमातृभावामध्येच लीन झालेला असतो. यालाच शैवशब्दावलीमध्ये **"पारमेश्वर अनुग्रह"** किंवा **"शक्तिपात"** असे म्हणतात. पारमेश्वर संकल्पामध्ये स्वरूपाला संसाराच्या अनंत भेदपूर्ण वैचित्र्यामध्ये प्रसारित करण्याच्या दिशेने उन्मुखता होत असते किंवा प्रेरणा होत असते. "निमेष" याच अवस्थेचा द्योतक आहे. या अवस्थेमध्ये चिन्मात्ररूप प्रमातृभावामध्ये अभिन्नरूपामध्ये वर्तमान असलेली प्रमेयता पूर्वी वर्णिलेल्या मायाशक्तीच्या प्रभावातून वेगळी होऊन विकासामध्ये येत असते. यालाच शैवशब्दांमध्ये "तिरोधान" असे म्हणतात. ही गोष्ट स्पष्ट आहे की, या दोन्ही रूपांमध्ये परमेश्वराच्या केवळ संकल्पानेच गतिमयता किंवा इच्छाशक्ती ही कार्यनिरत होत असते. **परमेश्वराच्या संकल्पाच्या याच दोन रूपांना क्रमशः अंतर्मुखस्पंद आणि बहिर्मुखस्पंद असे म्हणतात. या विषयामध्ये हे समजणे आवश्यक आहे की, स्पंदशक्तीची ही द्विमुखी गतिमयता एकाच वेळी चालत राहते. परमेश्वर हे आपल्याच एखाद्या स्वरूपभूत भक्तजनाला अनुग्रहाचा विषय बनवून चिन्मात्ररूपावर आरूढ करीत असतात. तसेच परमेश्वर हे तत्काल एखाद्या व्यक्तीला तिरोधानाचा विषय बनवून संसाराच्या मायागर्तेमध्ये बुडवीत असतात.** दोन्ही

रूपांमध्ये स्वतंत्र ज्ञातृत्व आणि कर्तृत्व यामध्ये कोणताही चढ-उतार उत्पन्न होत नाही. जगताचे प्रलय आणि उदय होत असतात; मात्र संविद्‌चे अर्थात् भगवच्छक्तीचे होत नाहीत. याचे कारण असे आहे की, उन्मेष अवस्थेमध्ये स्वरूपाहून अतिरिक्त अन्य कोणत्याही प्रमेयजालाचे अस्तित्व नसल्यामुळे जगताचा प्रलय अर्थात् पूर्णतया स्वरूपामध्येच लय आणि निमेष अवस्थेमध्ये प्रमेयतेच्या स्वरूपाहून वेगळे अस्तित्व असल्याने जगताचा उदय होत असतो. जगतामध्ये या दोन्ही रूपांमध्ये काहीही घडले तरीही संवित् अर्थात् पारमेश्वरी शक्ती ही अक्षुण्ण अर्थात् अखंड किंवा कायम राहत असते.

शक्तिचक्र आणि त्याची विभूती यांच्या विषयामध्ये याआधीच या गोष्टीचा उल्लेख केला गेलेला आहे की, परमेश्वराची किंवा परमात्म्याची वास्तविक शक्ती एकच असून या शक्तीचे नाव "स्वातंत्र्यशक्ती" असे आहे. याचाही संकेत दिलेला आहे की, ही शाश्वत स्पंदमयी असल्यामुळे या शक्तीचा अंतर्मुख तसेच बहिर्मुख प्रसार हा एकाच वेळी चालत असतो. पुढेही शक्तिचक्राच्या विषयावर योग्य ठिकाणी प्रकाश टाकण्यात येणार आहे. येथे वाचकांचे लक्ष्य केवळ खाली लिहिलेल्या अनेक गोष्टींकडे आकर्षित करणे हे अपेक्षित वाटत आहे. या दृष्टीने **"मालिनी-विजयोत्तरतंत्र"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

**या सा शक्तिर्जगद्धातुः कथिता समवायिनी।**
**इच्छात्वं तस्य सा देवी सिसृक्षोः प्रतिपद्यते।।३.५।।**

परमेश्वराची अभिन्न स्वांतत्र्यशक्ती ही विश्वरूपामध्ये प्रसृत होण्याच्या दिशेने उन्मुख होण्याच्या वेळी किंवा होतेवेळी सर्वप्रथम इच्छेचे रूप धारण करीत असते. या संबंधी **"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**एवं सैषा द्विरूपापि पुनर्भेदैरनेकताम्।।३.८।।**
**अर्थोपाधिवशाद्याति चिन्तामणिरिवेश्वरी।।३-८.१/२।।**

ही इच्छाशक्ती उत्तरोत्तर प्रसृत होत असताना ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती या रूपामध्ये प्रकट होत असते. ज्ञान आणि क्रिया हे शक्तियुगल ऐश्वर्यपूर्ण असल्यामुळे जणू चिंतामणी आहे. या शक्तियुगलामुळे उत्तरोत्तर विकासामध्ये येणाऱ्या प्रमेयतेच्या उपाधींच्या आवश्यकतेनुसार अनंत शक्तिधारा उसळून

बाहेर पडतात आणि फलस्वरूप श्रीशिवतत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंतचे सर्व विश्ववैचित्र्य विकसित होत असते. ज्ञानशक्ती वर्ण, पद आणि मंत्र या तीन मार्गांच्या रूपाने आणि क्रियाशक्ती कला, तत्त्व आणि भुवन या तीन मार्गांच्या रूपाने प्रसृत होऊन बाह्य विश्वाचे रूप धारण करीत असते. अशा प्रकारे पहिल्या तीन रूपांमध्ये सर्व वाचक विश्वाचा आणि दुसऱ्या तीन रूपांमध्ये सर्व वाच्यविश्वाचा विकास होत असतो.

## शक्तिचक्र

**"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथामध्ये असे म्हटलेले आहे की

**तत्र तावत्समापन्ना मातृभावं विभिद्यते।।३.९।।**
**द्विधा च नवधा चैव पञ्चाशद्धा च मालिनी।।३.१०।।**
**वर्गाष्टकमिह ज्ञेयमघोराद्यमनुक्रमात्।।**
**तदेव शक्तिभेदेन माहेश्वर्यादि चाष्टकम्।।३.१३।।**
**माहेशी ब्राह्मणी चैव कौमारी वैष्णवी तथा।**
**ऐन्द्री याम्या च चामुण्डा योगीशी चेति ता मताः।।३.१४।।**

उपरोक्त कथनानुसार या वाचक आणि वाच्यमय विश्वाचे सर्वतोमुखी विकास कार्य संपन्न करण्यासाठी याच पारमेश्वरी शक्तीच्या धारा काही ठिकाणी मातृका अर्थात् शब्दराशीचे रूप धारण करून "अ" पासून "क्ष" पर्यंत आठ वर्गाच्या अधिष्ठात्री असलेल्या किंवा बनलेल्या श्रीमाहेश्वरी, श्रीब्राह्मणी, श्रीकौमारी, श्रीऐंद्री, श्रीयाम्या, श्रीचामुंडा आणि श्रीयोगिशी शक्तींच्या रूपामध्ये, तर कधी अंतःकरण आणि बाह्यकरण यांच्याशी संबंध ठेवणाऱ्या श्रीखेचरी, श्रीभूचरी, श्रीदिक्चरी आणि श्रीगोचरी शक्तींच्या रूपामध्ये, तर कधी प्राण, बुद्धी, अंतःकरण, ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये अथवा सर्व महाभूतांच्या रूपांमध्ये प्रसृत होत राहतात. **सांगण्याचे तात्पर्य असे आहे की, या विश्वामध्ये श्रीब्रह्मदेवांपासून गवताच्या काडीपर्यंत जितके असंख्य प्रमेय पदार्थ प्रत्यक्ष किंवा अनुभव यांचे विषय बनलेले असतात, ते सर्व पदार्थ परमेश्वराच्या अनंत शक्तींचे स्रोत आहेत.**

"शक्तिचक्र" हे याच अनंत शक्तिधारांचे शास्त्रीय नाव आहे. हे शक्तिचक्र विभवाने अर्थात् ऐश्वर्याने परिपूर्ण आहे. येथे "विभव" या शब्दाचा अर्थ "ऐश्वर्य" असा आहे. ऐश्वर्य हे कोणत्याही किंवा एखाद्या

वस्तूच्या करण्याच्या, न करण्याच्या किंवा अन्यथा करण्याच्या स्वातंत्र्यपूर्ण इच्छेचे द्योतक आहे. याचा अर्थ असा आहे की, शक्ती ही शक्ती असल्यामुळे नित्य उदीयमान अर्थात् उदय पावणारी आणि शाश्वत रूपामध्ये पूर्ण अभेदात्मक अहं विमर्शाचे अर्थात् विचाराचे स्फुरण करणाऱ्या स्वभावाची असते. शक्तीच्या स्वतंत्र स्फुरणेच्या प्रवाहामध्ये कोणतीही वस्तू अडथळा निर्माण करू शकत नाही. शक्ती ही आपल्या मौलिक विश्वोत्तीर्ण चिन्मात्र रूपामध्ये अवस्थित असली तरीही सर्व विभूतींना या शक्तीने आपल्या गर्भामध्ये ठेवलेले किंवा धरलेले असते अथवा विश्वमय शक्तिप्रसादाच्या रूपामध्ये अवस्थित असली तरीही ती शक्ती कल्पनातीत विश्वाला साकार करण्याचे दुर्घट कार्य संपन्न करणाऱ्या वैभवाने परिपूर्ण असते.

अशा स्वतंत्र शक्तींनी परिपूर्ण अशा शक्तिमानाच्या स्वरूपाला "परिपूर्ण शंकर-स्वरूप" किंवा "परिपूर्ण शंकर-स्वभाव" असे म्हणतात. **"विज्ञान-भैरव"** या ग्रंथामध्ये स्वतंत्रपणे स्फुरणाऱ्या संवित् शक्तीने परिपूर्ण असलेल्या शक्तिमानाच्या स्वरूपाचे अत्यंत सुंदर शब्दामध्ये वर्णन केलेले आहे.

श्रीभगवंतांची शक्ती ही अपरिमित अर्थात् अमर्यादित आणि कल्पनातीत अर्थात् कल्पनेच्या पलीकडे अनेकाकारतेमध्येही एकाकारतेच्या मधुरतम रसाने परिपूर्ण असते. हीच शक्ती स्वरूपाच्या आधाराने विश्वाच्या चित्राची रचना केल्यावरही स्वयं निर्मलरूपाला धारण करणारी असते. श्रीभगवंतांची किंवा शक्तिमानाची शक्ती ही विश्वाचे अवभासन करण्यासाठी अनंत शक्तिस्रोतांमध्ये प्रवाहमान होत असते. परिपूर्ण शक्ती ही शक्तिमानाची परिपूर्ण अवस्था आहे. हे दिव्यरूप पूर्ण अहं-विमर्शमय किंवा अहं-स्फुरणामय असल्यामुळे केवळ आनंदस्वरूप असते. या दृष्टीनेच **"विज्ञानभैरव"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**दिक्कालकलनोन्मुक्ता देशोद्देशाविशेषिणी।**
**व्यपदेष्टुमशक्याऽसावकथ्या परमार्थतः।।१४।।**
**अन्तःस्वानुभवानन्दा विकल्पोन्मुक्तगोचरा।**
**याऽवस्था भरिताकारा भैरवी भैरवात्मनः।।१५।।**
**तद्वपुस्तत्त्वतो ज्ञेयं विमलं विश्वपूरणम्।।१५१/२।।**

शक्तिमानाचे हे दिव्यरूप दिशा, काल आणि आकार यांच्या दृष्टीने संकोचरहित असून जवळ किंवा दूर यांच्या प्राचीरापासून अर्थात् सर्व

प्रकारच्या संकोचांपासून किंवा बंधनांपासून दूर असून ते मध्यमा आणि वैखरी वाणीच्या अभिलापाला म्हणजे शब्द किंवा भाषण यांना अविषय असल्यामुळे प्रत्यक्षात अवर्णनीय आणि केवळ आंतरिक अनुभवानेच गम्य असते किंवा जाणता येते. प्रत्येक प्रकारच्या शंकेच्या आतंकापासून अर्थात् भीतीपासून आणि विकल्पजालापासून अर्थात् संशयाच्या जाळ्यापासून रहित असल्यामुळे या अवस्थेला "भैरवी अवस्था" असे म्हणतात. ही भैरवी अवस्था हे भैरवरूप श्रीशंकरांचे वास्तविक स्वरूप आहे किंवा हा श्रीभैरवरूप श्रीशंकरांचा स्वभाव आहे. याचे कारण या भैरवी अवस्थेमध्ये विश्वोत्तीर्णता आणि विश्वरूपता दोन्ही एकाकार अर्थात् एकरूप बनून अवस्थित राहत असते.

"शकन्" अर्थात् काही करू शकणे यालाच "शक्ती" असे म्हणतात. या दृष्टीने **"विज्ञानभैरव"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**शकनं शक्तिः सामर्थ्य विश्वनिर्माणादिकारि भैरवस्वरूपमेव।।**

**अर्थ :-** शकन् अर्थात् शक्ती म्हणजेच विश्वनिर्माणादि करण्याचे सामर्थ्य असून ते श्रीभैरवस्वरूपच आहे.

प्रत्येक चेतन प्रमाता हा आपल्या परिधीमध्ये अर्थात् मर्यादेमध्ये आपापल्या सामर्थ्यानुसार कार्य करू शकतो; कारण या चेतन प्रमात्यामध्ये अंशतः शक्ती विद्यमान असते. जो प्रमाता जितके मोठे काम करू शकतो त्या प्रमात्याला तितके अधिक शक्तिमान् म्हटले जाते. इतक्या अनंत तसेच कल्पनेनेही अचिंत्य असलेल्या अर्थात् ज्याची कल्पना केली जाऊ शकत नाही अशा विश्वाचे निर्माण किंवा संहार करणे हे सर्वात मोठे काम आहे. हे दुर्घट कार्य सर्वात महान् असलेले शक्तिमानच करू शकतात. या शक्तिमान् प्रमात्याला अर्थात् जो हे दुर्घट कार्य करण्यास समर्थ आहे अशा परप्रमात्यालाच सर्वशक्तिमान् भैरवरूप "श्रीशंकर" असे म्हणतात. अंशतः शक्तिमान् असल्यामुळे प्रत्येक जीव हा अंशतः श्रीशिवच आहे. आपल्याच शक्तीच्या वास्तविक स्वरूपाची अनुभूती प्राप्त केल्यामुळे जीव हा श्रीशिव बनू शकतो. शक्तीच्या वास्तविक स्वरूपाची अनुभूती मानवास काय करू शकत नाही? शाक्तभूमिकेवर आरूढ होणे हे श्रीशिवभावामध्ये प्रविष्ट होण्याचे मुख्यद्वार आहे. या अर्थानेच **"विज्ञानभैरव"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**शक्त्यवस्थाप्रविष्टस्य निर्विभागेन भावना।**
**तदासौ शिवरूपी स्यात् शैवीमुखमिहोच्यते।।२०।।**

**अर्थ :-** शक्तीच्या अवस्थेत प्रवेश केलेल्या (जीवाची) श्रीशिव आणि शक्ती यांच्यामधली भेददृष्टिरूप भावना नष्ट होते. त्यावेळेस ती (पराशक्ती) श्रीशिवरूप होते व तिला श्रीशिवामध्ये प्रवेश करण्याचे मुखच म्हटले जाते.।।२०।।

सूत्रामध्ये उल्लेखिलेल्या "शक्तिचक्रप्रभवम्" या शब्दाच्या तत्पुरुष समासाच्या द्वारा परमात्म्याच्या उन्मेषनिमेषात्मक स्वरूप आणि बहुव्रीही समासाच्या द्वारा अशा शाक्तभूमिकेच्या अनुभूतीची प्राप्ती करण्याच्या उपायाचा अर्थ लावला जाऊ शकतो. तो पुढीलप्रमाणे आहे.

१) शक्तिचक्रविभवस्य प्रभवम् (तत्पुरुष समास) शक्तिचक्र अर्थात् अनंतरूपी प्रवाहमान अर्थात् प्रवाहित होणाऱ्या स्पंदधारांचे "विभव" अर्थात् अंतर्मुख किंवा बहिर्मुख यांच्या प्रसाराचे "प्रभवम्" मूल उद्गमस्थान असलेले श्रीशंकर असून त्यांना (श्रीशंकरांना) आम्ही प्रणाम करीत आहोत.

२) शक्तिचक्रविभवात् प्रभवो यस्य तम् (बहुव्रीही समास) "शक्तिचक्र" अर्थात् प्राण, बुद्धी, इंद्रिये इत्यादि विशेष रूपांमध्ये प्रवाहमान शक्तिपुंजांची "विभवात्" वास्तविक अनुभूती प्राप्त केल्यामुळेच प्रभवः अर्थात् ज्या श्रीशंकररूपाची अभिव्यक्ती होते त्या श्रीशंकरांना आम्ही प्रणाम करीत आहोत.

या विषयी **"स्पंदनिर्णय"** या टीकाग्रंथामध्ये ही गोष्ट स्पष्ट करताना असे म्हटले आहे की -

**देहाद्याविष्टोऽपि परमेश्वरः करणोन्मीलननिमीलनाभ्यां**
**रूपादिपञ्चकमयस्य जगतः सर्गसंहारौ करोति।।**

प्रत्यक्षात श्रीभगवंत हे स्वतःच प्रत्येक प्राण्याच्या शरीरामध्ये प्रविष्ट होऊन इंद्रिय-शक्तीच्या उन्मेष-निमेष क्रियांच्या द्वारा शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांना ग्रहण किंवा अग्रहण करून भिन्न भिन्न प्राण्यांच्या निश्चित देश, काल आणि आकार यांच्या परिधीनुसार विश्वाची सृष्टी आणि संहार करीत राहतात. याचे फल म्हणून जर एखादी व्यक्ती कोणत्यातरी उपायाच्या द्वारे आपल्या विशेष रूपामध्ये प्रवाहमान शक्तीचा संकोच दूर करून

त्यांना मौलिक सामान्य-अवस्थेपर्यंत पोहोचवू शकली तर स्वरूपविकास दूर नाही. येथे वाचकांना सावधान करण्यासाठी अनेक मुख्य शक्तींची केवळ नावेच घेतलेली आहेत. पुढे अनेक ठिकाणी या शक्तींच्या स्वरूप वर्णनावर यथासंभव प्रकाश टाकला जाणार आहे.।।१।।

पूर्वसूत्रामध्ये असे दर्शविलेले आहे की, सामान्य स्पंदभूमिका (संवित् अर्थात् श्रीभगवच्छक्ती) ही सर्व कार्यरूप अर्थात् प्रमेयरूप विश्वाच्या प्रत्येक पदार्थाच्या रूपामध्ये प्रवाहमान असते. परंतु या संबंधी अशी शंका निर्माण होते की, या संसारामध्ये किंवा विश्वामध्ये विचित्र प्रकारच्या शरीर, इंद्रिय, भुवन, घट, पट इत्यादि रूपांमध्ये स्वभावाची अनेकाकारता आढळून येत असते. या अवस्थेमध्ये संसाररूप अनेकत्वाचा स्वभाव हा श्रीशिवरूप एकत्व कसा होऊ शकतो? पुढील सूत्रामध्ये या शंकेचे समाधान म्हणून असे कथन केलेले आहे की, प्रत्यक्षात प्रमेयरूप अनेकाकारता ही अहं विमर्शाच्या एकाकारतेमध्ये अनादिकालापासून अभिन्नरूपाने अंतर्निहीतच आहे. जी वस्तू केवळ विमर्शामध्ये अर्थात् विचारामध्ये आहे त्या वस्तूचेच बाह्य अवभासन होत असते. या सिद्धान्तानुसार त्याचे (अनेकाकारतेचे) केवळ बाह्य अवभासन होत असते. नवीन कोणतीही वस्तू उत्पन्न होत नसते. दोन्ही रूपांमध्ये एकाकारता अर्थात् एकरूपता ही स्वरूपामध्ये अक्षुण्ण अर्थात् सतत राहत असते.।।१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :- (प्रास्ताविक)**

ज्याप्रमाणे एखाद्या आरशात नगराचे प्रतिबिंब पडते त्याप्रमाणे पृथ्वी-पासून श्रीशिवापर्यंतची सर्व तत्त्वे ही स्पंदशक्ती स्वस्वरूपामुळे स्वतंत्र, स्वच्छ व स्वात्मरूप स्वभिंतीवर रेखाटते. ही दृग्देवी अर्थात् ज्ञानस्वरूप देवता मंत्रांना सामर्थ्य (प्राप्त करून) देणारी, शब्दराशींनी युक्त व पूर्णाहंतारूप अनंत स्फुरणाला सतत उत्पन्न करणारी आहे. अशी ही श्रीशांकरी (श्रीशंकराशी संबंधित असणारी) स्पंदशक्ती जगामध्ये विजयी होते.।।१।।

मी रचलेल्या स्पंदसंदोहामुळे स्पंदतत्त्वावर आधीच बराच प्रकाश पडलेला आहे. आता त्या स्पंदतत्त्वाबद्दल संपूर्ण आणि समाधानकारक माहिती देण्यासाठी मी हा प्रयत्न आरंभिला आहे.।।२।।

हे स्पंदतत्त्वाचे स्पष्टीकरण स्पंदसूत्रांचा एकमेकातील योग्य संबंध

स्पष्ट करण्यासाठी रचलेले आहे. (त्यामुळे) विद्यार्थी सूत्रातील योग्य समन्वय समजून घेण्यास, श्रेष्ठ तत्त्वाशी जवळचा संबंध प्राप्त करून घेण्यास, तीक्ष्ण तर्काची पद्धत शिकविण्यास, उपायांचे योग्य सादरीकरण करण्यास, स्वतःसिद्ध सत्यांची योग्य समज होण्यास आणि सर्वात शेवटी काश्मीर शैवतत्त्वज्ञान जाणून घेण्यास समर्थ होतील. त्यामुळे हे विद्वानांनो ! या श्रीस्पंदशास्त्राच्या वृत्तीमध्ये आपली बुद्धी ठेवून ही श्रीस्पंदशास्त्ररूप संपत्ती प्राप्त करून घ्या.।।३।।

विश्वावर कृपा करण्यात तत्पर असलेल्या श्रीपरमशिवांच्या आवेशाने ज्यांचा महिमा जागृत झाला आहे आणि ज्यांना स्वप्नात आदेश मिळालेला आहे अशा श्रीमान् वसुगुप्ताचार्यांना महादेव पर्वतावर श्रीभगवंताच्या इच्छेनेच एका मोठ्या दगडाच्या पृष्ठभागावर कोरलेली अत्यंत रहस्यमय अशी श्रीशिवसूत्रे प्राप्त झाली. ती सर्व सूत्रे (त्यांनी) प्रसन्न आणि गंभीर अर्थात् परार्थाने युक्त एक्कावन श्लोकांनी आगम अर्थात् शब्दप्रामाण्य व अनुभव यांच्या उपपत्तीने अर्थात् साहाय्याने एकत्रित करून संगृहीत केली. त्या एक्कावन श्लोकांपैकी पहिले पंचवीस श्लोक हे "स्वरूपस्पंद" या पहिल्या निष्यंदात, सात श्लोक "सहजविद्योदय" (अर्थात् सहजविद्या किंवा अंतर्ज्ञानाच्या उदयातील शक्ती) या दुसऱ्या निष्यंदात आणि एकोणीस श्लोक "विभूतिस्पंद" (अर्थात् श्रेष्ठत्वामध्ये आणि श्रेष्ठत्वाची शक्ती) या तिसऱ्या निष्यंदात सांगितले आहेत. अशा प्रकारे तीन निष्यंदात सर्व स्पंदशास्त्र सांगितले आहे.

प्रथम निष्यंदात स्तुतीसह सर्व प्रकरणाचा म्हणजेच स्पंदशास्त्राचा (साररूपात) अर्थ पहिल्या श्लोकात सांगितला आहे. त्यानंतर चार श्लोकांमधून सोपपत्तिक अर्थात् कारणांसहित स्पंदतत्त्व योग्य मुद्यांनी स्थापित केले आहे. त्यानंतरच्या सहाव्या व सातव्या श्लोकांनी अभिज्ञानासह त्याच्या प्राप्तीचा उपाय सांगितला आहे. आठव्या श्लोकाने उपायाबद्दल घेतलेल्या शंकांचा किंवा आक्षेपांचा निरास केला आहे. त्यानंतर नवव्या श्लोकात उपाय हाच उपेयाच्या प्राप्तीसाठी अनुरूप कसा आहे याची चर्चा करून ह्या उपायांची पुष्टता केली आहे. त्यानंतरच्या दहाव्या श्लोकाने उपायांमुळे प्राप्त होणारे उपेयाचे म्हणजेच साध्याचे स्वरूप सांगितले आहे. त्यानंतरच्या अकराव्या श्लोकाने त्याच्या अवलंबनामुळे संसाराचा अभाव कसा होतो हे सांगितले आहे. त्यानंतर बाराव्या आणि तेराव्या श्लोकांनी अभाववादींचे

मत खोडून काढत त्यांच्या तत्त्वातील आणि स्पंदशास्त्रातील वैलक्षण्य अर्थात् फरक सांगितला आहे. चौदाव्या श्लोकाने स्पंदामुळे अस्तित्त्वात येणारे (जगद्रूप) कार्य हे नाश पावणारे असले तरी स्पंदतत्त्व हे अक्षय अर्थात् कधीच नाश न पावणारे आहे असे सांगितले आहे. ह्याचीच चर्चा करीत असताना पंधराव्या आणि सोळाव्या श्लोकांनी अभाववाद समूळ नष्ट केला आहे. त्यानंतर सतराव्या श्लोकात सुप्रबुद्धाला ह्या स्पंदतत्त्वाची सदैव प्राप्ती होते आणि प्रबुद्धाला पूर्व आणि अपर अशा दोन अवस्थातच स्पंदतत्त्वाची प्राप्ती होत असते असे सांगितले आहे. त्यानंतरच्या अठराव्या श्लोकाने सुप्रबुद्धाच्या प्रतीतींचा (म्हणजेच अनुभवांचा) विषय विभाग सांगितला आहे. त्यानंतरच्या एकोणिसाव्या श्लोकाने सुप्रबुद्धांच्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यांना नष्ट करण्यास मदत करणाऱ्या प्रक्रियेचा निर्देश केला आहे. त्यानंतर विसाव्या श्लोकात अप्रबुद्धाच्या बाबतीत स्व-स्वरूपाचे आवरण कसे होते हे सांगितले आहे. एकविसाव्या श्लोकाने सुप्रबुद्धता मिळविण्यासाठी सतत प्रयत्नरत असावे असे सांगितले आहे. बाविसाव्या श्लोकात असे सांगितले आहे की, व्यवहार अवस्थेत इतरांना अडथळा करण्यात प्रमुख अशी काही कार्ये असतात आणि तीच उद्योगाचे विषय होतात. त्याच्यानंतर तेवीस, चोवीस आणि पंचवीस या श्लोकांमधे अप्रबुद्धाने सुप्रबुद्धता मिळविण्यासाठी व सुषुप्तिरूप अंधकाराचे आवरण नष्ट करण्यासाठी साधक़योग्याने मिळालेल्या ज्ञानाचा उचित उपयोग करून सतत जागृत असावे असे सांगितले आहे. अशा प्रकारे "**यस्योन्मेष**" या श्लोकापासून "**प्रबुद्धः स्यादनावृत**" या श्लोकापर्यंतचे हे तात्पर्य आहे. आता आचार्य श्रीक्षेमराज ग्रंथाचा अर्थ स्पष्ट करतात.

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

श्रीशंकर या शब्दाचा अर्थ सर्व प्रकारच्या क्लेशांचा नाश करून परमानंद, अद्वयमय, स्वचैतन्याच्या विस्ताराने (जीवांना) स्वरूपाचे ज्ञान करून देऊन त्यांच्यावर अनुग्रह अर्थात् कृपा करणे असा आहे. त्या या स्व-स्वभावरूप श्रीशंकराची आम्ही स्तुती करतो अर्थात् त्याला विश्वोत्कर्षित्वाने (म्हणजेच तो सर्व विश्वापेक्षा श्रेष्ठ आहे अशा) विचाराने जाणून घेत त्याने रचलेल्या संकुचित आणि कृत्रिम प्रमातृपद अर्थात् जीवभावाला विसरून त्याच्यामध्ये समाविष्ट होतो अर्थात् त्याच्याशी सामरस्य प्राप्त करून घेतो. हे **सामरस्यच जीवन्मुक्तिफल आहे असे या प्रकरणात**

**उपदेशिले आहे.** येथे "**स्तुमः**" असा बहुवचनाचा प्रयोग करण्याचे कारण ज्यांच्याकडे दिव्य तेज आहे आणि जे कृपाकटाक्षाला योग्य आहेत त्यांच्यामधे अभेद सांगणे हे होय. "**तम्**" याने श्रीशंकरांचे निःसामान्यत्व अर्थात् एकमेव वैशिष्ट्य ध्वनित केले आहे. आणि तेच "**यस्य**" या श्लोकार्धात व्यक्त झाले आहे. येथे श्रीपरमेश्वर म्हणजेच प्रकाशस्वरूप श्रीमहादेव हे "**अहं ब्रह्मास्मि**" आदि शब्दसमूहांच्या परमार्थरूप पूर्णाहंतेच्या परामर्शाच्या म्हणजेच विचाराच्या सारामुळे नेहमीच आनंदघन, स्फुरणात्मक, दैवी शक्ती आणि आसुरी शक्ती निर्माण करण्यासाठी मंथन करणाऱ्या अरणीप्रमाणे असणाऱ्या पराशक्तीने युक्त पूर्ण स्वातंत्र्यस्वरूप असे आहेत. त्यामुळेच (परमेश्वराचा) चैतन्यस्वभाव असल्यामुळे तो अचल असूनही व श्रीपरमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती त्याच्याशी अभिन्न असूनही ज्याप्रमाणे आरशामध्ये मोठ्या नगराचे प्रतिबिंब पडते त्याप्रमाणे स्वतःच्या पार्श्वभूमीवर सर्व सृष्टिपरंपरा ती प्रतिबिंबित करते. आणि अनधिक अर्थात् या सृष्टीमध्ये कोणत्याही प्रकारे कमी-अधिकपणा न होऊनही अधिकाप्रमाणे दाखविणारी आणि किंचित् चलनाने युक्त असल्याने अशा अर्थाच्या धातूचा अनुगम करणाऱ्या तिला स्पंद(शक्ती) असे म्हणतात. त्यामुळे श्रीपरमेश्वर नेहमीच स्पंदतत्त्वाने अर्थात् स्पंदशक्तीने किंवा शक्तितत्त्वाने युक्त असतो. तो कधीच अस्पंद (तरंगरहित अर्थात् शक्तिरहित) नसतो; कारण काहीजण असे म्हणतात की, अस्पंद हेच श्रेष्ठ तत्त्व होय. परंतु त्यांचा हा विचार चुकीचा आहे; कारण जर श्रेष्ठ तत्त्व शांत किंवा निष्क्रिय असेल तर हे सर्व विश्व ईश्वरविरहित मानावे लागेल. सर्व क्रियांचे सार असणाऱ्या स्पंदशक्तियुक्त श्रीशंकरात्मक स्वस्वभावाचे प्रतिपादन करण्यासाठीच (आमच्या) श्रेष्ठ श्रीगुरुजनांनी या शास्त्राला स्पंद हे योग्य नाव दिले आहे. हे सर्व पुढे गेल्यावर स्पष्ट होईल.

ती ही स्पंदशक्ती अनंत सृष्टिसंहारांना आपल्यात समाविष्ट केलेली, पूर्ण चैतन्यरूप आणि आनंदरूप आहे. त्याचप्रमाणे ती निःशेष (सर्व) शुद्ध आणि अशुद्धरूप जगतातील प्रमाता (जीव) आणि प्रमेय (ज्ञेय विषय) यांच्या संकोच आणि विकासाचे आभासन करणाऱ्या तत्त्वासहित असणारी, सर्व उपनिषदांमध्ये उपास्य म्हणून सांगितली गेलेली आणि एकाच वेळी उन्मेष आणि निमेष यांनी युक्त आहे. (अर्थात् तीच सृष्टी अर्थात् उभारणी आणि संहार घडवून आणणारी आहे.) ही स्पंदशक्तीच

पूर्वी निर्मिलेल्या श्रीशिवापासून पृथ्वीपर्यंतच्या तत्त्वांची संहारकर्त्री म्हणून व्यक्त होत असते. जे अजून अस्तित्वात येणार आहे त्यांच्या अवस्थेच्या संदर्भाने ती स्रष्टुरूप अर्थात् निर्मिती करणारी उन्मेष भूमी असते. बाह्य जगताच्या संहाराची स्थिती अंतरातील चैतन्याला जागृत करण्यास प्रवृत्त होते आणि अंतर्चैतन्याच्या कल्पनेकडे दुर्लक्ष करण्याची स्थिती हीच जगाच्या उन्मेषाची दशा होय असा आपण विचार करतो. यासंबंधी आगमामध्ये असे म्हटले आहे की -

**लेलिहाना सदा देवी सदा पूर्णा च भासते।**
**ऊर्मिरेषा विबोधाब्धेः शक्तिरिच्छात्मिका प्रभोः।।**

**अर्थ :-** ही ईश्वरीशक्ती नेहमीच आनंदात असणारी आणि नेहमीच पूर्णरूपाने भासते. ती ज्ञानसागराची लाट असून ईश्वराची इच्छात्मक शक्ती आहे.

श्रीमन्माहेश्वरच स्वातंत्र्यशक्तीने शिवमंत्र, महेश्वरमंत्र, ईश्वरमंत्र, विज्ञानाकल, प्रलयाकल, सकलापर्यंत प्रमातृभूमिका आणि तद्वेद्यभूमिका अर्थात् प्रमात्याला जाणून घेण्याच्या भूमिकेचा स्वीकार करीत यातील पहिल्या पहिल्या (प्रमात्याला) आधारभूत म्हणून स्थित राहून अंतःस्वरूप झाकून टाकण्याच्या क्रीडेने निमेष करीत करीत उन्मेष (सृष्टी) करतात. ज्यावेळी ते अशी इच्छा करतात त्यावेळी ते अवरोहक्रमाने म्हणजेच उतरत्या क्रमाने स्वतःला व्यक्त करतात. अगोदरचे ज्ञाते हे पाठीमागे पडतात आणि नंतरचे आधी येतात. मात्र पहिला ज्ञाता हा नंतरच्या ज्ञात्याला आधार म्हणून काम करतो. आरोह म्हणजेच चढत्या क्रमाकडे लक्ष दिले असता असे समजते की, श्रीशंकर हे क्रमाक्रमाने अगोदरचे ज्ञाते निर्माण करतात आणि नंतरचे नष्ट करतात. हे ज्ञानयोग्यांच्या बाबतीत घडते. त्यामुळे ते पूर्व-पूर्व प्रमात्यांना त्यांची संकुचितता टाकावयाला लावून त्यांना पूर्णावस्थेत व्यक्त करतात. त्याचप्रमाणे प्रत्येक आधीचा प्रमाता क्रमाक्रमाने त्याची पूर्णावस्था टाकतो आणि संकुचितत्वाचा अवरोह क्रमामध्ये स्वीकार करतो. त्यामुळे प्रत्येक गोष्ट ही त्याच गोष्टीच्या स्वरूपाची असते. द्वैताची स्पष्ट जाणीव ही केवळ श्रीशिवांनी व्यक्त व्हावयाला लावलेल्या संकुचितत्वामुळे असते. या ठिकाणी दिलेला उपदेश हा या द्वैतभावनेचा समूळ नाश व्हावा म्हणून आहे. ही चर्चा पुरे.

चैतन्यशक्ती ही एकाच वेळेस उन्मेष (जागृती) आणि निमेष (निद्रा)

या दोन्ही स्वरूपाची असते. नील-सुख इत्यादि आभासांना उत्पन्न करणारी असूनही संवित् प्रमात्याशी एकरूप असते आणि त्या स्वरूपाच्या निमेषरूप असणारी त्याचप्रमाणे अवभास चरपीतादि आभासांना नष्ट करणारी असते म्हणून या स्वसंवेदनाने सिद्ध होणाऱ्या, उन्मेष व निमेष या दोन्ही स्वरूपाच्या प्रतिभेचे अर्थात् भगवती चिच्छक्तीचे महान् बुद्धी असणाऱ्या पुरुषांनी या जन्ममरणरूप संसाराचा उच्छेद (नाश होण्यासाठी) ध्यान करावे. त्यामुळेच **"उन्मेषनिमेषाभ्याम्"** हे पद श्रीभट्टकल्लटाने आपल्या वृत्तीत **"संकल्प-मात्रेण"** असे अविभक्तच अर्थात् कोणत्याही भेदाशिवाय अशा अर्थाने इच्छाशक्तिरूपत्वाने सांगितले आहे. शास्त्रसंग्रहकारांनीही यासंबंधी असे म्हटले आहे की -

**एकचिन्ताप्रसक्तस्य यतः स्यादपरोदयः।**
**उन्मेषः स तु विज्ञेयः स्वयं तमुपलक्षयेत्।।३/९।।**

**अर्थ :-** एका विचारात अर्थात् एकाच विषयाच्या चिंतनात गढलेल्या व्यक्तीच्या चित्तामध्ये ज्या अलक्षित आत्मबळाच्या विकासामुळे दुसऱ्या विचाराचा उदय होत असतो त्या आत्मबळामुळे अचानक झालेला प्रभाव किंवा विकास हा उन्मेष आहे असे जाणून घ्यावे. साधकाने आपणहून त्या उन्मेषावर लक्ष ठेवावे किंवा उन्मषाचे अनुसंधान करावे.

अशा प्रकारे येथे आरंभिलेल्या विचाराचा नाश हाच परस्वरूपाचा अर्थात् नवीन विचाराच्या उदयाचा हेतू (कारण) म्हणजेच उन्मेष होय; कारण एका प्रवृत्त झालेल्या विचाराच्या नाशाशिवाय परस्वरूपाचा म्हणजेच अन्य विचाराचा (कल्पनेचा) उदय होत नाही.

ही गोष्ट आम्ही इतर ठिकाणी आणखी स्पष्ट करू.

**परामृतरसापायस्तस्य यः प्रत्ययोद्भवः।**
**तेनास्वतन्त्रतामेति स च तन्मात्रगोचरः।।३/१४।।**

**अर्थ :-** श्रीशिवांच्या निर्विकल्प स्वरूपामध्ये विकल्प ज्ञानाचा उदय होणे अर्थात् प्रत्ययोद्भव होणे हेच त्या श्रीशिवांचे परामृतरसापासून अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्य या अवस्थेपासून भ्रष्ट होणे आहे. यामुळे श्रीशिव स्वतःचे स्वातंत्र्य गमावितात व परतंत्र बनतात आणि पाच तन्मात्रांनी इंद्रियांना प्रत्यक्ष गोचर होतात.

येथेही उदय किंवा सृष्टी याचा परम अर्थ प्रलय आहे हे स्पष्ट सांगितले आहे.

**यदा क्षोभः प्रलीयेत तदा स्यात् परमं पदम्।।१/९।।**

**अर्थ :-** ज्या वेळेला क्षोभ (मनाची व्यग्रता) थांबेल किंवा लीन होईल त्यावेळेला परमपद (प्राप्त) होईल.

येथेही क्षोभ प्रलयरूप निमेष (संहार) हाच परमपद-उन्मेषरूप (स्पंदशक्तीचे जागरणच) आहे असे निरूपित केले आहे. अशा प्रकारे उन्मेष आणि निमेष हे उभयरूप असूनही शक्ती कधी उन्मेष-प्राधान्याने तर कधी निमेष-प्राधान्याने व्यवहारिली जाते.

अशा प्रकारे या श्लोकाच्या अर्ध्याभागात असे सांगितले आहे की, श्रीशिवांशी संबोधित असणाऱ्या, स्वरूपाच्या उभारणीने युक्त अथवा स्वरूपाला व्यक्त करणाऱ्या व कार्याची प्राधान्याने उभारणी किंवा सृष्टी करणाऱ्या शक्तीमुळे श्रीशिवांपासून धरणीपर्यंतच्या तत्त्वांनी युक्त अशा विश्वाचा उदय होतो. अभेदाने युक्त स्वतत्त्वाचा विसर पडलेली आणि विविध प्रकारच्या भेदांनी नटलेली ही सृष्टी आहे. स्वरूपाच्या निमेषाने युक्त असूनही बाह्य (वस्तूंची) प्राधान्याने उभारणी करणाऱ्या शक्तीपासून जगताचा प्रलय होतो. ही सृष्टी अथवा उदय अभेदमय असून प्रलय अथवा संहार भेदमय आहे. त्यामुळे प्रलय उदयरूप असून उदय प्रलयरूप आहे असे जाणून घ्यावे. (म्हणजेच जगताचा उदय होत असताना स्व-स्वरूपाचा विसर पडत असल्याने तो स्वरूपाचा प्रलयच असतो. त्यामुळे उदय हा प्रलयरूप आहे. त्याचप्रमाणे ज्यावेळेला जगताचा प्रलय होत असतो त्यावेळेस अभेदरूप स्वरूपाकडे तो नेत असल्याने प्रलय हा उदयरूप आहे असे येथे म्हटले आहे.) वस्तुतः काहीही उदय पावत नाही आणि काहीही लय पावत नाही. (अर्थात् कशाचीच सृष्टी होत नाही आणि संहारही होत नाही.) केवळ श्रीभगवती स्पंदशक्तीच अक्रमरूपाने त्या त्या रूपात भासते आणि स्फुरण पावत असणारी ती उदित होत आहे आणि नष्ट होत आहे अशी भासते असे आम्ही दाखवून देणार आहोत. स्थिति-लय-अनुग्रह ही परमेश्वराची इतर कृत्ये प्रलय आणि उदय यांच्यातच समाविष्ट होतात; कारण ती कृत्ये प्रलय-उदय यांचीच विशिष्ट रूपे आहेत. त्यामुळे या प्रलय-उदय यांच्यातच श्रीपरमेश्वराच्या पाचही कृत्यांचा समावेश केलेला आहे.

मी हे जे काही येथे सांगितले ते सर्व "**स्पंदसंदोह**" या फक्त पहिल्या सूत्रावरच्या टीकेत आधीच सांगितले आहे.

## प्रतिपक्षाची शंका

प्रतिपक्ष येथे अशी शंका उत्पन्न करतो की, श्रीमन्महार्थ दृष्ट्या सृष्ट्यादि देवतांच्याकडून ह्या वैविध्यपूर्ण जगाच्या प्रलय-उदय इत्यादि क्रिया केल्या जात असतात. त्यामुळे तुम्ही "**यस्य इत्यादि**" कसे काय म्हणू शकता?

ही शंका दूर करण्यासाठी "**तं शक्तिचक्रविभवप्रभवम्**" ही ओळ पुढीलप्रमाणे स्पष्ट करावयास पाहिजे. शक्तींच्या म्हणजेच सृष्टिरक्तादि मरीचिदेवींच्या द्वादशात्मक समूहरूप चक्राच्या उद्योग-अवभास-चर्वण-विलापन यांनी युक्त क्रीडा (लीला) आडंबराच्या वैभवाला कारण आहे. या सर्व देवी श्रीमन्मंथानभैरव चक्रेश्वराला आलिंगन देऊन या जगताची सृष्टिसंहारादि क्रीडा संपादन करतात अर्थात् जगत् उत्पन्न करून नष्ट करण्याची ही लीला या बारा चक्रांच्या देवीच घडवून आणतात असे आम्नायात (वेदात) सांगितले आहे.

## शक्तिचक्राचा दुसरा अर्थ

श्रीपरमेश्वरच या जगताच्या सृष्टिसंहारादि क्रीडेला कारणीभूत आहे हे कशावरून सांगितले जाते? या शंकेलाही "**शक्तिचक्र**" हेच उत्तर आहे. **या विश्वाला जे काही अस्तित्त्व आहे ते प्रकाशाच्या स्वरूपाचे असून तेच प्रकाशित होते किंवा व्यक्त होते.** यासंबंधी "**ईश्वरप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**स्वामिनश्चात्मसंस्थस्य भावजातस्य भासनम्।**
**अस्त्येव न विना तस्मादिच्छामर्शः प्रवर्तते।।१।५।१०।।**

**अर्थ :-** श्रीपरमेश्वर त्याच्यामध्ये आधीपासूनच अस्तित्वात असणाऱ्या पदार्थांचे अवभासन किंवा प्रकाशन करीत असतो. त्याच्याशिवाय उत्पत्तीची इच्छाच शक्य होणार नाही.

या सर्वाचे स्पष्टीकरण असे आहे की, बुद्धिमान लोकांनी निश्चित केलेल्या नीतीप्रमाणे श्रीपरमेश्वराच्या आतील प्रकाशाने प्रकाशमान होऊन स्थित असणाऱ्या गोष्टीला सत्-शक्तिचक्र असे म्हटले जाते; कारण आगमग्रंथांमध्ये श्रीपरमेश्वराचे अनंतशक्तित्व उद्धोषिले आहे. हा श्रीपरमेश्वरच शक्तींच्या परस्परांच्या एकत्र येण्याने आणि वेगळे होण्याने अनंत प्रकारच्या झालेल्या विश्वाच्या श्रेष्ठपणाचे कारण आहे. या शक्तिचक्राचे अंतिम ध्येय आभास किंवा व्यक्त होणे हे आहे. हा श्रीपरमेश्वरच विश्वाच्या

सृष्टी आणि प्रलयाचे कारण आहे; कारण तोच ज्ञानरूप देहाने स्थित असलेल्या त्याचप्रमाणे त्याच्याशी ऐकात्म्यभावाने स्थित असलेल्या विश्वाला आभासित करून (प्रकाशित करून) एकमेकांना नानाप्रकारांनी एकत्र आणीत असतो आणि वेगळे करीत असतो. याबद्दल श्रीभट्टकल्लटांनी असे म्हटले आहे की -

**विज्ञानदेहात्मकस्य शक्तिचक्रैश्वर्यस्योत्पत्तिहेतुत्वम्।**

**अर्थ** :- शक्तिचक्राचे ऐश्वर्य हे विज्ञान देहात्मकासारखे म्हणजे ज्ञानासारखेच असून त्यांनाच सर्व जगताच्या उत्पत्तीचे कारण (म्हणून मानले जाते.) वरती शक्तिचक्राची जी दोन्ही स्पष्टीकरणे सांगितली आहेत, त्यांच्यामध्ये श्रीभट्टकल्लटांच्या याच शब्दांमधला उचितपणा आहे. त्याचप्रमाणे

## तिसरे स्पष्टीकरण

"**शक्तयोऽस्य जगत्कृत्स्नम्**" अर्थात् ह्याच्या म्हणजे श्रीपरमेश्वराच्या शक्ती म्हणजेच हे संपूर्ण जग आहे, हे जे आगमात सांगितले आहे त्या दृष्टिकोणाधारे "**तस्माच्छब्दार्थचिन्तासु न सावस्था न यः शिवः**" अर्थात् त्यामुळे शब्द आणि त्याचा अर्थ यांच्या विचारामध्ये अशी एकही अवस्था नाही की जिच्यामध्ये श्रीशिव नाही. हे शक्तिचक्र विश्वाचे प्रतिनिधित्व करते.

## चौथे स्पष्टीकरण

"**रहस्यनीती**" या ग्रंथाप्रमाणे "खेचरीच्या ऊर्ध्वभागात असलेली निर्वात पोकळी किंवा आकाश हेच वामेशीचे क्षेत्र आहे." हा वाक्प्रचार वामेश्वरी, खेचरी, गोचरी, दिक्चरी, भूचरीरूप शक्तिसमूहालाही सुचवितो. या सर्वांचे मी स्पंदसंदोहामध्ये योग्यप्रकारे वर्णन केले आहे. वामेश्वरी इत्यादि संकेताने शक्तिचक्रांची अभिव्यक्ती दाखवितात. हेच त्या दोन स्पष्टीकरणांमधून दाखवून दिले आहे आणि **अप्रबुद्धधियस्त्वेते स्वस्थिति-स्थगनोद्यताः।(१/२०)**" अर्थात् "ज्यांची बुद्धी जागृत झालेली नाही अर्थात् जे मूढबुद्धी आहेत त्यांच्यापासून या शक्ती आपली स्वस्थिती लपवून ठेवण्यास उद्यत झालेल्या असतात.

## पाचवे, सहावे आणि सातवे स्पष्टीकरण

"**यतः करणवर्गोऽयं ..... १/६**" या परिच्छेदाप्रमाणे शक्तिचक्राचा

अर्थ इंद्रियांचा समूह असा आहे, "**तदाक्रम्य बलं मन्त्राः ...।।२/१।।**", नित्य मंत्र आणि "**शब्दराशिसमुत्थस्य शक्तिवर्गस्य ...।।३/१३।।**" या नीतीने ब्राह्मी इत्यादि देवतांच्या स्वभावाचे अशा प्रकारे मीच स्पंदसंदोहात स्पष्टपणे स्पष्टीकरण केलेल्या शक्तिचक्राचे जे विभव म्हणजेच माहात्म्य आहे ते तेथे उत्पन्न होते. श्रीपरमेश्वर हा शक्तिचक्राच्या ऐश्वर्यामधे स्वतंत्र असतो. तो तेथे पशूप्रमाणे परतंत्र नसतो.

## आठवे स्पष्टीकरण

शक्तिचक्राचा म्हणजेच रश्मिपुंजाचा जो विभव अर्थात् अंतर्मुख विकास त्यापासून ज्याचा उदय होतो किंवा अभिव्यक्ती होते असा बहुव्रीही समास घेतल्यास तो असे सुचवतो की, श्रीपरमेश्वराच्या स्वरूपाचे प्रत्यभिज्ञान हे त्या अंतःस्वरूपाच्या निरीक्षणाने सहजच होते.

## संपूर्ण श्लोकाचे दुसरे स्पष्टीकरण

जो आपल्या भक्तांना खऱ्या स्वरूपाचे प्रकाशन करवितो, जो शक्तिचक्र विभवाचे म्हणजेच श्रेष्ठ-संविद्रूपदेवता स्फाराचे कारण आहे, ज्या चिदानंदघन परमेश्वराच्या स्वतःच्या उन्मेष-निमेषाने म्हणजेच "स्व"रूप उघड करणे आणि गुप्त करण्याने; "जे आत आहे तेच बाहेर आहे," या न्यायाने जगाच्या शरीररूपाचा व त्या अनुषंगाने बाह्य जगताचाही प्रलय आणि उदय यथाक्रम (क्रमानुसार) उन्मज्ञनामध्ये होतो अशा श्रीशंकरांची आम्ही स्तुती करतो.

## संपूर्ण श्लोकाचे तिसरे स्पष्टीकरण

त्याचप्रमाणे ज्या स्वात्म्याचा संबंधी असण्याने बहिर्मुख प्रसाररूप अशा उन्मेषामुळे म्हणजेच जागृतीमुळे जगाचा उदय होतो आणि अंतर्मुखरूप निमेषामुळे म्हणजे निद्रेमुळे प्रलय होतो त्या श्रीशंकराची आणि विश्वाच्या सृष्टी इत्यादि कार्योन्मेषादि स्वरूपाच्या संविद्देवीमाहात्म्याचे कारण असणाऱ्या श्रीशंकराची आम्ही स्तुती करतो.

अशा प्रकारे हा श्लोक शब्दांच्या योजनेप्रमाणे आणि अर्थाच्या मागणीप्रमाणे अशा दोन्ही प्रकारे स्पष्ट करता येतो. देहादींनी आविष्ट अर्थात् प्रवेश केलेला असूनही श्रीपरमेश्वर इंद्रियांचे उन्मीलन (उघडणे) आणि निमीलन (झाकणे) करून रूपादि पंचतन्मात्रांनी युक्त अशा जगाची सृष्टी व संहार करतो. रहस्य जाणणाऱ्यांनी "**ईश्वरप्रत्याभिज्ञा**" या

ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

**तदेवं व्यवहारेऽपि प्रभुर्देहादिमाविशन्।**
**भान्तमेवान्तरर्थौघमिच्छया भासयेद्बहिः।।१।६।७।।**

**अर्थ :-** अशाप्रकारे व्यवहारातही श्रीपरमेश्वर देह इत्यादींमध्ये प्रवेश करून आत स्थिर असणाऱ्या अर्थसमूहाला आपल्या इच्छेने बाह्य ठिकाणी भासवितो.

अशाप्रकारे हाच अर्थ जाणवून देण्यासाठी श्रीगुरूंनी "**यस्य स्वातन्त्रशक्त्या .....**" असे न म्हणता "**यस्योन्मेषनिमेषाभ्याम्**" असे म्हटले आहे.

ह्या श्लोकामध्ये समावेशरूप श्रीशंकरस्तुती ही प्राप्य गोष्टींच्या म्हणजेच ज्याची प्राप्ती करून घ्यावयाची आहे अशा ध्येयाच्या रूपात सांगितली आहे. "**शक्तिचक्रविभवात्प्रभवो यस्य**" अर्थात् "ज्याचे प्रकाशन हे शक्तिचक्राच्या विभवामुळे होते," असा बहुव्रीही अर्थ घेऊन शक्तिचक्रांचा विकास हा त्या प्राप्तीसाठी साधन म्हणून सांगितला आहे. "शक्तिचक्र विभवाचे म्हणजेच परसंविद्-देवतास्फाराचे भक्तांना प्रकाशन करविणारा" अशा तत्पुरुष समासाच्या अर्थाने त्याचे फळ सांगितले आहे. यासंबंधी स्पंदशास्त्रातच असे म्हटले आहे की, "**ततश्चक्रेश्वरो भवेत् (३/१९)** अशाप्रकारे या शास्त्राचा सांगण्याचा विषय व ते मिळविण्याचा उपाय यांच्यातला उपेयोपायरूपसंबंध व त्याचे फल हे सर्व या एकाच सूत्रात सांगितले आहे.।।१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

ज्यांच्या संवित्प्रकाशाने अर्थात् चैतन्यशक्तीच्या प्रकाशाने (माझ्याकडून) ही स्पंदरंजनी (नावाची स्पंदकारिकांवरची टीका) केली गेली त्या सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या आणि भासा ही पंचकृत्ये करणाऱ्या, अद्वैतस्वरूप श्रीशिवांना माझा नमस्कार असो.।।१।।

प्रारंभ केलेल्या इष्ट ग्रंथाच्या निर्विघ्नपूर्वक समाप्तीसाठी ग्रंथकार इष्टदेवतेची स्तुती "**यस्योन्मेषनिमेषाभ्यां .....**" या श्लोकातून करतात. भगवान् श्रीपरमशिवांच्या संकल्परूप इच्छाशक्तीनेच हे दिसत असणारे स्थावर-जंगमात्मक विश्व निर्माण होते किंवा आविर्भूत होते आणि त्या इच्छा-

शक्तीतच स्थित राहून परत तेथेच लीन होते. हा दिसत असलेला सर्व प्रपंचाचा विस्तार श्रीशिवांच्या स्वतंत्रशक्तीचाच आहे. हाच त्यांचा दुसऱ्या कोणाच्याही अधीन नसणारा स्वभाव असून त्यांच्याशी अभिन्न असणाऱ्या निमित्त-उपादानरूप कारणांनी श्रीशिव सृष्टिरूप कार्याची रचना करतात. यासंबंधी **"स्तवचिंतामणि"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**निरूपादानसम्भारमभित्तावेव तन्वते।**
**जगच्चित्रं नमस्तस्मै कलाश्लाघ्याय शूलिने।।१।।**

**अर्थ :-** उपादानकारणाशिवायच उत्पन्न होणाऱ्या जगाचे चित्र "स्व" भिंतीवर प्रकट होते. (ते प्रकट करणाऱ्या) कलाश्लाघ्य अर्थात् कलारूप सृष्टी निर्माण करण्याचे सामर्थ्य असणाऱ्या श्रीशंकरांना नमस्कार असो.।।१।।

या श्रीशंकरांची स्पंदशक्ती नामरूपात्मक सर्व प्रपंचाच्या वरती स्थित आहे. ती स्पंदशक्तीच शुद्धज्ञानाने संयुक्त होऊन प्रकाशरूप आणि क्रियाप्रधान होऊन विश्वरूपाचे प्रतिपादन करते. ही स्पंदशक्ती मोराच्या अंड्यामध्ये असलेल्या द्रवरूप पदार्थाने येणाऱ्या पिलाच्या रूपाच्या चित्रविचित्र आणि आश्चर्यजनक त्याचप्रमाणे वेगवेगळ्या रंगांच्या असलेल्या पंखांच्या कल्पनेप्रमाणे अहंप्रत्यवमर्शात अर्थात् अहंच्या ज्ञानात अभेदाने राहते. जरी ही एकच स्पंदशक्ती प्रसारभूमिकेमध्ये अनंतधारारूपाने विभक्त होऊन प्रवाहित होते तरीही इच्छा-ज्ञान-क्रिया शक्तिरूपाने अविरत स्फुरित होत असते. या सर्व प्रमातावर्गामध्ये इच्छा-ज्ञान-क्रिया या स्पंदरूपाची प्रतिक्षण कार्यनिष्ठा राहत असते. प्राणिमात्र ज्या वस्तूची इच्छा करतो ती ती अंतःकरणात पहिल्यापासूनच विद्यमान असते. त्यानंतर ज्ञानशक्तीने त्या इच्छेचे एकत्रिकरण होऊन क्रियाशक्तीने ती कार्यात परिणाम पावते. या रीतीने परमेश्वरातही विश्वकल्पना पूर्वीपासूनच स्थित असून पाठीमागून ज्ञानशक्तीने त्या इच्छाशक्तीचे समालोचन करून क्रियाशक्तिद्वारा ती कार्यरूपात परिणमित अर्थात् रूपांतरित होते. या प्रक्रियेने संसारामध्ये दिसणाऱ्या ज्ञेयवस्तू जाणणाऱ्या (जीवांची) त्या शक्तित्रयाद्वारा अभिव्यक्ती होते. त्यामुळेच श्रीशिव त्या त्या आकाराच्या (विविध) प्रकारांनी आत-बाहेर प्रकाशित होतात. यासंबंधी **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**वर्तमानावभासानां भावानामवभासनम्।**
**अन्तःस्थितवतामेव घटते बहिरात्मना।।१.५.१।।**

अर्थ :- विद्यमान असणाऱ्या व अवभासित होणाऱ्या पदार्थांचे

अवभासन अर्थात् प्रकाशन अंतःस्थित असल्याप्रमाणेच बाह्य आत्म्यानेच एकत्र होते. (१-५-१) पशूंप्रमाणे अज्ञानरूप अंधकारामध्ये मग्न झालेल्या प्रमात्यांच्या अर्थात् जीवांच्या सर्व अज्ञानापासून उत्पन्न होणाऱ्या भेदकल्पनेचे समूळ उच्चाटन करून ज्ञान प्रकाशरूपभूमीत स्थापन करून श्रीशंकर सृष्टि-स्थिती-संहार-पिधान-अनुग्रहात्मक पंचकृत्यांनी कल्याण संपादन करतात. अशा प्रकारे ऐंद्री, ब्राह्मी, वैष्णवी, चामुंडा, माहेश्वरी प्रभृती शक्तिचक्रांच्या ऐश्वर्याचे उद्गमस्थानही भगवान् श्रीशिवच आहेत. त्यामुळे त्या श्रीशंकरांना आम्ही प्रार्थना करतो.।।१।।

**यत्र स्थितमिदं सर्वं कार्यं यस्माच्च निर्गतम्।**
**तस्यानावृतरूपत्वान्न निरोधोऽस्ति कुत्रचित्।।२।।**

**अन्वयार्थ :-**

**यत्र** - ज्यांच्या स्पंदात्मक विमर्शभूमिकेत अथवा श्रीशिवांच्या ठिकाणी, **इदं** - हे, **सर्वं कार्यम्** - कार्यरूप असलेले सर्व जगत्, **स्थितम्** - अभेदरूपाने अवस्थित असते, **च** - (आणि); **यस्मात्** - ज्यांच्यापासून, **निर्गतम्** - बाहेर पडते, उत्पन्न होते (श्रीकल्लट), **तस्य** - त्या श्रीशिवांच्या अथवा सत्तेच्या, **अनावृतरूपत्वात्** - अनाच्छादित स्वरूपामुळे, **कुत्रचित्**- कोठेही, **निरोध** - अडथळा-स्वतंत्र प्रसारात अडचण, **न अस्ति**-असत नाही.।।२।।

**अर्थ :-** श्रीशिवांच्या स्पंदात्मक विमर्शभूमिकेत किंवा शाक्तभूमिकेत अथवा ज्ञानभूमिकेमध्ये किंवा श्रीशिवांच्या ठिकाणी हे सर्व कार्यरूप असलेले जगत् अभेदरूपाने अवस्थित असते किंवा राहते आणि त्या श्रीशिवांपासून बाहेर पडते किंवा उत्पन्न होते. त्या श्रीशिवांच्या किंवा सत्तेच्या अनाच्छादित अर्थात् आच्छादन रहित किंवा आवरण रहित स्वरूपामुळे स्वतंत्र प्रसारात कोठेही अडचण किंवा अडथळा असत नाही.।।२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

जगातील घटपटादि सर्व पदार्थ सूर्याच्या प्रकाशात दिसतात. या सर्व पदार्थांचे ज्ञान होण्याला सूर्याचा प्रकाश कारण होतो. नाहीतर भेद हा शब्दच नाही. मग भेद का भासतो? एकच प्रकाश भिन्न भिन्न वस्तूंवर पडला की, त्याचे स्वरूप भिन्न होते. या भिन्न प्रकाशामध्ये प्रकाशज्ञानाने त्या त्या ठिकाणी असलेल्या पदार्थांचे ज्ञान होते, म्हणजे प्रकाश एकरूप

असून सुद्धा भिन्न भिन्न वस्तूंमुळे तो भिन्न आहे असे ज्ञान होते. **त्याचप्रमाणे ज्ञानरूप श्रीशंकर हे एकरूप व एकरस असून सुद्धा भिन्न वस्तूंमुळे भिन्न आहेत असे भासते. परंतु वस्तुतः तसे नाही. ज्ञान हे श्रीशंकरांचे स्वरूप आहे. ते त्यांच्या ठिकाणी स्थित आहे. या ज्ञानाच्या प्रकाशात नाना प्रकारचे भेद दिसले तरी ते सत्य नसून त्या त्या पदार्थांच्या ठिकाणी असणारे ज्ञान हेच सत्य आहे. ज्ञान म्हणजे श्रीशंकरच होय.** ज्याप्रमाणे कारणापासून कार्य भिन्न असत नाही त्याप्रमाणे श्रीशंकरांपासून सर्व पदार्थ भिन्न असू शकत नाहीत; कारण ते ज्ञानस्वरूपच आहेत. पदार्थ नाहीतच. सर्व ठिकाणी निव्वळ चैतन्यच व चैतन्यमयताच आहे. अशा स्थितीत सर्व ठिकाणी द्वैत आहे असे जरी वाटले किंवा भासले तरी देखील ते ज्ञानच आहे व ते ज्ञान देखील परम श्रीशिवांचे स्वरूप आहे असे समजले पाहिजे. साधकाची बुद्धी उत्कृष्ट व निर्मळ झाली की, श्रीशंकर हेच सर्व पदार्थमात्राचा आत्मा आहेत असा अभ्यास किंवा विवेक सुरू होतो. मग ज्याप्रमाणे सूर्याचा उदय झाल्याबरोबर सर्व धुके नष्ट होते त्याप्रमाणे वरील अभ्यास आपोआप सुरू झाला की, साधकाचे द्वैताचे ज्ञान व भेद नष्ट होतात. द्वैताच्या महामोहाच्या अंधकाराने मायाशक्तीचे प्राबल्य झाल्यामुळे सर्व जीवात्मे आपल्या ज्ञानस्वरूपापासून किंवा स्वस्वरूपापासून भ्रष्ट होतात. त्यामुळे आत्म्याहून निराळ्या असणाऱ्या देहाला ते अहं म्हणजे आत्मा असे मानू लागतात. अशा या स्थितीला परमदुर्भेद्य अशी भेदमूलक हृदयग्रंथी असे म्हणतात.

स्पंदतत्त्वामध्ये हे संपूर्ण कार्यजगत् ज्ञानरूपाने शक्त्यात्मक होऊन राहत असते. निमेषाच्या दशेमध्ये ते ज्ञानरूप असल्या कारणाने अनावृत म्हणजे उघडे व अनाच्छादित म्हणजे न झाकलेले असेच राहते. त्याचा केव्हाही, कोठेही व कोणत्याही प्रकाराने निरोध होत नाही. खरी गोष्ट अशी आहे की, बोध्याची म्हणजे जे आत्मतत्त्व जाणावयाचे आहे त्याची स्वतःची अशी सत्ता नाही. ज्ञानस्वरूप आत्मा दोन्ही अवस्थेमध्ये अनावृत म्हणजे उघडाच असतो. प्राचीन आचार्यांचे असे वचन आहे की, "सोन्याच्या अलंकारांमध्ये असलेली विचित्रता, विविधता व नानाविधता ही सोन्याहून निराळी नसते." नित्यस्वरूपाची विश्वरूपताही वरील दृष्टान्ताप्रमाणेच असते. अलंकाररहित सुवर्ण हे पिंडात्मक आहे. वेद्यरहित म्हणजे जाणण्यारहित असलेला आत्मा चिदात्मक आहे. **"ज्ञानसंबोध"** या

ग्रंथामध्येही असे म्हटले आहे की, "विश्वाचा आश्रय आकाश आहे. मात्र आकाशाचा आश्रय विश्व नाही. ज्ञान आकाशाप्रमाणे अनंत आहे व ज्ञेय विश्वाप्रमाणे अल्प व किंचित् न्यूनसत्ताक आहे. आकाशामध्ये कशाच्याही साहाय्याने परिच्छेद पाडता येत नाही किंवा आकाशाला प्रतिबंध करता येत नाही; कारण ते व्यापक आहे. या आकाशाप्रमाणे ज्ञानस्वरूपही प्रतिबंधरहित असते."

आत्म्याच्या सर्व वृत्तींचा उपसंहार होऊन निरोध होत नसेलही. परंतु जागृत आदि अवस्थांमध्ये तो अनिरुद्ध म्हणजे बंधनरहित किंवा मुक्त-मोकळा कसा राहू शकतो? हे कळले म्हणजे दुर्भेद्य अशा हृदयग्रंथींचा भेद कसा होतो हे पुढील कारिकेवरून स्पष्ट होईल.।।२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

श्रीशिवांचा हा शक्तिरूप स्वभाव तोच आपणापैकी प्रत्येकाचाही स्वभावच आहे. त्यामुळे या शास्त्रात त्याला "स्वस्वभाव" असे म्हटले जाते. अर्थात् श्रीशिवांच्या प्रतिभेचा विकास म्हणजे स्वस्वभावाचाच विकास असतो; कारण स्वभावदृष्ट्या जीव आणि श्रीशिव यांच्यात अभेद आहे. पण येथे प्रारंभीच जी एक शंका येते ती अशी आहे. आम्ही सर्व जीव शरीरभेदाने, इंद्रिय (करण) भेदाने, अवस्थाभेदाने व सुखदु:खभोगभेदाने परस्परांपासून अत्यंत भिन्न आहोत व या सर्वांतूनच तर आमचा स्वभाव (स्वरूप) बनलेला आहे. मग जीवाचा आणि श्रीशिवांचा स्वभाव एकच आहे असे आपण म्हणतो हे कसे? याचे या दुसऱ्या कारिकेत स्पष्टीकरण केले आहे.

**स्पष्टीकरण :-** या शास्त्रात अहम् = ज्ञाता व इदम् = ज्ञेय असे अर्थ आहेत. तेव्हा "इदम्" म्हणजे वेद्यत्वाने अवस्थित असलेले. "सर्वम्" म्हणजे प्रत्येक दर्शनाच्या वेळी तसे तसे परिकल्पित झालेले. आपले ज्ञान हे खरोखरी ज्ञेय वस्तूचे परिकल्पनच असते. या परिकल्पनेचे एकमेव अधिष्ठान शक्ती किंवा प्रतिभा हेच होय. अर्थात् हे परिकल्पन प्रतिभेला मर्यादा घालू शकत नाही. किंबहुना या परिकल्पित ज्ञेयरूप विश्वाला अस्तित्वच मुळी प्रतिभेमुळे येते. हे झाले ज्ञानाबद्दल. क्रियासुद्धा प्रतिभेला मर्यादा घालू शकत नाही; कारण क्रियेने निष्पन्न झालेले कार्यसुद्धा वस्तुतः प्रतिभेपासूनच निघालेले असते. त्यामुळे प्रतिभाशक्ती हे ज्ञातृत्व आणि

कर्तृत्व या दोहोंचेही कारण होय. ही प्रतिभा निर्मल व चिन्मात्रैकरूप असून त्या रूपात तिला वेद्यत्वाचा स्पर्शसुद्धा होत नाही म्हणजे ती कोणत्याही ज्ञात्याचा ज्ञेयविषय बनत नाही. अशा रूपातील प्रतिभाशक्तीलाच "स्वस्वभाव" अशी संज्ञा आहे. जाती, शरीर इत्यादिकांच्या अभिमानाने संकुचित झालेली व म्हणून कार्यवर्गात जाऊन पडणारी व प्राणिमात्राचे स्वरूप म्हणून सामान्यतः ओळखली जाणारी चिती म्हणजे स्वस्वभाव नव्हे. स्वस्वरूपाचे असे लक्षण असल्याने श्रीशिवांचा शक्तिरूप स्वभाव व स्वस्वभाव यांच्यात भेद नाही. व्यावहारिक संकुचित अवस्थेत या स्वस्वभावाचा संकोच अनेक उपाधींमुळे झालेला असला तरी ज्या अर्थी उपाधी नाहीशी होताच तो संकोचही नष्ट होतो त्याअर्थी जाती, शरीर, इंद्रिये इत्यादींनी झालेला हा संकोच म्हणजे स्वस्वभावाचा तत्त्वतः निरोध नव्हे.

पण आपण हा जो "स्वस्वभाव" म्हणून पदार्थ सांगता तो आगम ग्रंथात म्हणतात म्हणूनच आम्ही मान्य करावयाचा की त्याची काही उपपत्ती आपणाला लावता येते? व अशी एखादी उपपत्ती असेल तर ती कशी लावावयाची? अशी कोणास शंका आली तर तिचा परिहार पुढील कारिका करते. या कारिकेची अवतरणिका अशी - या शास्त्रात "अहम्" हा प्रमात्याचा वाचक आहे व "इदम्" हा प्रमेयाचा वाचक आहे. आता "अहम्" ने बोधित होणाऱ्या प्रमात्याचे (ज्ञात्याचे) स्वरूप कोणते? सामान्य व्यवहारी माणसाचा अहंप्रत्यय देहादिकांच्या ठिकाणीच मर्यादित झालेला असतो; पण अहंप्रत्ययाचे हे मर्यादित स्वरूप शास्त्राला अभिप्रेत नाही. देहादि-उपाधी-अनवच्छिन्न अशा स्वस्वभावाच्या ठिकाणीच अहं प्रत्ययाची बोधकता असावयास हवी व ती पुढील अनुभवाने उपपन्नही होते.

**टीप :-** "स्वस्वभाव" म्हणजे आत्म्याचे स्वरूप. स्वस्य = आत्मन, स्वः = आत्मीयः भावः = स्वरूपम् (श्रीरामकण्ठ).।।२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## कर्तृत्व आणि कार्यत्व

जर कोणी असा प्रश्न विचारला की, जेव्हा स्वस्वभावाचे श्रीशंकर हेच

संसारी बनून आवागमनाच्या चक्रात पडतात तेव्हा त्यांना या संसारी रूपामध्ये श्रीशिव असे कसे म्हणता येईल? या प्रश्नाचे उत्तर देताना असे म्हटले जाते की, ज्या अभेद भूमिकेमध्ये हे सर्व विश्व अनादिकालापासून अहंरूपामध्ये अवस्थितच आहे आणि ज्यापासून याची उत्पत्ती अहंरूपतेपासून वेगळी होऊन इदंरूपतेमध्ये अवभासित झालेली आहे त्या सत्तेच्या स्वभावावर अर्थात् अहंविमर्शरूप एकाकारतेवर संसारी अवस्थेमध्येही कोणतेही आवरण नसते. यामुळे याच्या स्वतंत्र प्रसारामध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ शकत नाही. याच कारणामुळे त्याला "श्रीशिव" असे म्हणतात.।।२।।

**विवरण :-**

## आंतर आणि बाह्य पदार्थांची विमर्शरूपता

"**यदन्तस् तद्बहिः।**" हा शैवशास्त्राचा सिद्धान्त आहे. या दृष्टीनेच "**परात्रिंशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**यथा न्यग्रोधबीजस्थः शक्तिरूपो महाद्रुमः।**
**तथा हृदयबीजस्थं जगदेतच्चराचरम्।।२४।।**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे वडाच्या लहानशा बीजात अत्यंत मोठ्या अशा शक्तिरूपी वृक्षाचा सर्व आकार बीजरूपाने राहत असतो त्याप्रमाणे हृदयबीजात जड व चेतन पदार्थांनी भरलेले व पारमेश्वरी शक्तीचे साकार रूप असलेले सर्व विश्व हृदयाच्या रूपात अर्थात् ज्ञानरूपात अवस्थित असते.

याचा अर्थ असा आहे की, ज्याप्रमाणे छोट्याशा बीजामध्ये मोठ्यात मोठ्या वटवृक्षाच्या शाखा, पाने, फुले आणि फळे इत्यादींची कल्पना बीजरूपामध्ये विद्यमान असते त्याप्रमाणेच स्पंदात्मक विमर्शभूमिकेमध्ये सर्व प्रमेयपदार्थांची विद्यमानता ही विमर्शरूपामध्ये विद्यमान असते. त्याचप्रमाणे चैतन्यामध्ये स्वभावतः प्रसाराचा रस असल्यामुळे तीच आंतर कल्पना बाह्य स्थूल नानारूपतेमध्ये अर्थात् विविध रूपांमध्ये विकसित होत असते. यामुळे जे आत आहे तेच बाहेर आहे. विषय सोपा बनविण्यासाठी प्रथम जीवभावाच्या स्तरावर या सिद्धान्ताचे परीक्षण करणे हे युक्तियुक्त होईल.

साधारण जीवभावाच्या स्तरावर ही गोष्ट आढळून येते की, प्रत्येक प्राण्याच्या आंतर-विमर्शामध्ये त्या प्राण्याचे परिचित प्रमेयभाव हे विमर्शरूपामध्ये किंवा विचाररूपामध्ये अवस्थित राहत असतात. आपापल्या मानसिक विस्ताराच्या अनुपातानुसार अर्थात् ज्या प्राण्याचा जितका विमर्श असतो

तितकाच त्या प्राण्याच्या संसाराचा विस्तार असतो. परंतु ही गोष्ट निश्चित आहे की, ज्या गोष्टी विमर्शामध्ये किंवा विचारांमध्ये विद्यमान असतात त्या गोष्टींचेच बाह्य अवभासन होत असते. उदाहरण म्हणून "कुंभार घडा बनवितो" या परामर्शाचे दार्शनिक विश्लेषण केले असता काही गोष्टींकडे ध्यान आकर्षित होते. पहिली गोष्ट ही की, घट हे एक कार्य आहे, जे एका चेतन कुंभाराच्या क्रियेचा विषय बनलेले आहे. दुसरी गोष्ट अशी की, घट हा स्वयं विमर्शहीन अथवा जड असल्यामुळे स्वरूपाला जाणू शकत नाही, तसेच आपल्याहून भिन्न अशा अन्य कोणत्याही वस्तूला सत्ता प्रदान करू शकत नाही. तिसरी गोष्ट अशी आहे की, कुंभार चेतन असल्यामुळे मातीच्या पिंडाला घड्याचे रूप देऊ शकतो. माती ही स्वयं घटाचे रूप धारण करू शकत नाही. या गोष्टीबरोबरच मनामध्ये एक शंका उत्पन्न होत असते की, घडा बनवीत असताना रांजण किंवा रांजण बनवीत असताना प्याले अर्थात् पेले का बनत नाहीत?

या शंकेचे समाधान शोधता शोधता अंततोगत्वा अर्थात् शेवटी आम्हाला हे स्वीकार करावे लागते की, घडा इत्यादि पदार्थांना बाह्य साकारता प्रदान करण्यापूर्वी कुंभाराच्या अंतर्विमर्शामध्ये किंवा अंतर्विचारामध्ये घड्याची आकृती, प्रमाण, रंग इत्यादींची यथावत् कल्पना विद्यमान असते. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**तदेव व्यवहारेऽपि प्रभुर्देहादिमाविशन्।**
**भान्तमेवान्तरर्थौघमिच्छया भासयेद् बहिः ।।१.६.७।।**

**अर्थ :-** अशा प्रकारे व्यवहार करण्याच्या वेळी ईश्वर देहादि अवस्थांमध्ये प्रवेश करताना आपल्या अंतरातील अर्थसमूहालाही आपल्या इच्छेने बाहेर भासमान करीत असतो.

रचना करतेवेळी केवळ इतकेच घडत असते की, कुंभाराच्या अंतर्विमर्शामधील विद्यमान कल्पना बाह्य साकार रूपामध्ये विकसित होत असते. दोन्ही रूपामध्ये तिळाइतकाही फरक किंवा भेद असत नाही.

जर कुंभाराच्या विचारामध्ये या कल्पना प्रथमपासूनच विद्यमान नसत्या तर तो कुंभार या कल्पनांना बाह्य साकाररूप देण्यात असफलच राहिला असता. फलतः घडा हे कुंभाराच्या आंतरिक विमर्शाच्या बाह्य अवभासा-शिवाय अन्य काहीही नाही.

**"एतदुक्तं भवति न प्रसवेकादिवाक्षोटादि तत् तस्मात् निर्गतम्।"**

असे "**स्पंदनिर्णय**" या टीकेत म्हटले असून या संबंधामध्ये ही गोष्ट विचारणीय आहे की, ज्याप्रमाणे अक्रोड, पिस्ते, किंवा बदाम इत्यादि वस्तू ठासून भरलेल्या थैल्यांमधून त्यांच्या वेगवेगळ्या रूपामध्ये बाहेर पडतात किंवा येत राहतात त्याप्रमाणे आंतर विमर्श हा अनंत पदार्थांच्या कल्पनेप्रमाणे नाही. अशी कोणतीही गोष्ट लक्षात येत नाही की, जी उपरोक्त कल्पनेप्रमाणे आहे. त्यामुळे कुंभाराप्रमाणे प्रत्येक चेतन प्रमात्याच्या अंतर्विमर्शामध्ये सर्व वाच्य पदार्थ हे विमर्शाच्या रूपामध्ये अर्थात् अहम् पासून अभिन्न रूपामध्येच अवस्थित राहतात. आपल्यामध्ये अभिन्नरूपामध्ये अवस्थित पदार्थांना भिन्न रूपामध्ये साकारता प्रदान करण्याचे स्वातंत्र्य विमर्शामध्ये असते. "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की-

**स्वामिनश्चात्मसंस्थस्य भावजातस्य भासनम्।।**
**अस्त्येव न विना तस्मादिच्छामर्शः प्रवर्तते।।१.५.१०।।**

**अर्थ :-** चिदात्मादेवामध्ये राहणारेच अर्थसमूह भासित होतात. त्यामुळे चिदात्मादेवात अर्थराशी राहत असली; तरी इच्छेशिवाय अर्थात् इच्छाशक्तीशिवाय अर्थसमूहाचा परामर्श होऊ शकत नाही अर्थात् जगदादि भासित किंवा प्रकाशित होऊ शकत नाही.

बाह्यरूपामध्ये अवभासित झाल्यानंतर या कल्पना समाप्त होत नाहीत; परंतु तरीही अंतःचेतनेमध्ये पूर्णपणे विलीन होऊन अवस्थित राहत असतात. जर या कल्पना समाप्त झाल्या असत्या तर असे घडणे शक्य होते की, कुंभार हा एका घटाला साकारता प्रदान केल्यानंतर दुसऱ्या त्याच प्रकारच्या आकार-प्रकारच्या घड्याची निर्मिती करू शकला नसता.

त्याचप्रकारे सर्वोत्कृष्ट श्रीशंकरांच्या स्तरावरही त्या विश्वस्पंदामध्ये हे सर्व इदंरूप अर्थात् संकुचित प्रमाता, प्रमेय आणि प्रमाणांनी भरलेले कार्यजगत् अनादिकालापासून "अहंरूप" एकाकारतेमध्ये अवस्थित आहे. याच मौल्यवान् "अहं" परामर्शामध्ये अर्थात् विचारामध्ये स्वातंत्र्यापासून जो इदंतेचा परामर्श किंवा विचार उदित होत असतो त्यालाच "बाह्य प्रमेयतेचा विकास" असे म्हणतात. या अर्थानेच "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**वर्तमानावभासानां भावानामवभासनम्।**
**अन्तःस्थितवतामेव घटते बहिरात्मना।।१.५.१।।**

**अर्थ :-** वर्तमानरूपात अवभासित अर्थात् प्रकाशित होणाऱ्या पदार्थांचेच बाह्यरूप प्रकाशित होणे घडून येत असते.

फलतः आंतर विमर्शामध्ये अवस्थित असलेल्या भाववर्गाला भेदमय प्रमेयतेच्या नाना रूपांमध्ये अवभासित करणे आणि त्यानंतर या भाववर्गाला विमर्शात्मक एकाकारतेमध्ये निःशेष लीन करणे हा स्वभाव अथवा स्वातंत्र्य अथवा आनंदशक्ती अथवा उन्मेष-निमेषमय स्पंद यांच्या शाश्वत क्रीडेचा चमत्कार आहे. परमार्थाच्या दृष्टिकोणातून पाहिले असता ही गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते की, ते सर्व प्रमेय पदार्थ जे स्फुटरूपामध्ये अर्थात् "इदं" रूपामध्ये भासमान असतात ते प्रत्यक्षात परमार्थ सत्तेचे स्वतःचे अवयवच असतात. त्यामुळे ज्याप्रकारे घटरूप पदार्थाचे अवभासन मातीरूप सत्तेच्या अंतर्गतच होत असते त्याचप्रकारे स्वरूपामध्ये अवस्थित राहूनही केवळ मायाशक्तिरूप स्वातंत्र्याच्या द्वारा या प्रमेय पदार्थाचे भिन्नरूपामध्ये अवभासन होत असते. मातीची सत्ता नसल्यास घड्याचीही सत्ता असत नाही. जर भाव हे स्वरूपामध्ये अवस्थित झाले नाहीत तर ते भाव असणार नाहीत.

## अनुत्तरतत्त्व आणि जीव यामधील भेद

या संबंधामध्ये ही गोष्ट विशेषकरून ध्यानात ठेवणे आवश्यक आहे की, बाह्यरूपामध्ये भासमान होणारा पदार्थवर्ग अर्थात् कार्यजगत् ही स्वतः कोणतीही भिन्न सत्ता नाही. परंतु आंतरिक चैतन्यसत्तारूप एकतेच्या बहिर्मुखीन प्रसारालाच "कार्यता" किंवा "अनेकाकारता" असे म्हणतात. या दृष्टीने **"अजडप्रमातृसिद्धी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**एवमात्मन्यसत्कल्पाः प्रकाशस्यैव सन्त्यमी।**
**जडाः ....... ।।१३।।**

एकापासून अनेक बनतात; परंतु अनेकामध्येही एकच अंतर्निहित असतो. यामुळे घडा, पट इत्यादि रूपांचे अनेकाकारतेचे मूळ श्रीशिवरूप असून ते एकाकार कसे होऊ शकेल? असे म्हणणे पूर्णपणे अयोग्य आहे. हेच कारण आहे की, कार्यरूप जगताला आपल्याहून भिन्न रूपामध्ये सत्ता प्रदान केल्यानंतरही श्रीशिव हे श्रीशिवच आहेत आणि त्या आधीही ते श्रीशिवच आहेत. या दृष्टीने **"स्पंदनिर्णय"** या टीकेत असे म्हटले आहे की -

**न च कार्यं घटादिकर्तुः कुम्भकारादेः**
**कदाचित् स्वरूपं तिरोदधद्दृष्टम्।**

**अर्थ :-** घट निर्माण करणाऱ्या कुंभार इत्यादि कर्त्याचे स्वरूप कार्याने म्हणजेच घटाने झाकले गेले आहे असे कोठेच दृष्टीस पडत नाही.

घड्याला बाह्य साकाररूप देण्याआधी आणि नंतरही कुंभार हा कुंभारच असतो. दोन्ही अवस्थांमध्ये वास्तविक सत्तेची एकाकारता व्याप्त आहे. या अर्थानेच "**अजडप्रमातृसिद्धी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**प्रकाश एवास्ति स्वात्मना स्वपरात्मभिः।।१३।।**

**अर्थ :-** स्वात्मरूपाने व परमात्मरूपाने सर्व ठिकाणी प्रकाशच विद्यमान असतो.

आता या संबंधामध्ये ही गोष्ट विचारणीय आहे की, सर्वसाधारणपणे कुंभाराला घडा इत्यादि पदार्थ बनविण्यासाठी विशेष प्रकारचे समवायि-कारण, असमवायिकारण किंवा उपादानकारण, निश्चित देश, काल, आकार इत्यादींची परिधी अर्थात् मर्यादा आणि भिन्न भिन्न आकार-प्रकार बनविण्याची सक्रमता इत्यादींची अपेक्षा असते. अनुत्तर-सत्तेलाही कार्यजगत् बनविण्या-साठी अशाच सामग्रीची आवश्यकता राहते का? जर आवश्यकता असेल तर एका सामान्य कुंभारालाही श्रीशिवच मानावे लागेल. या विषयी "**पारदृश्वा सिद्धांचे**" म्हणणे असे आहे की, अनुत्तरतत्त्व आणि जीव यांचे ज्ञातृत्व व कर्तृत्व यांमध्ये केवळ स्वातंत्र्याच्या प्रमाणाचा भेद असतो. परमेश्वर हे पूर्ण चिद्रूप असल्यामुळे आपल्या स्पंदात्मक स्वातंत्र्यामुळे प्रत्येक कार्य कोणत्याही प्रकारची कारण सामग्री आणि निश्चित क्रमाशिवाय केवळ आपल्या संकल्पानेच सिद्ध करीत असतात. साधारण किंवा सामान्य जीव हा अंशतः चिद्रूप किंवा परतंत्र असल्यामुळे त्याला कोणतेही कार्य करताना दुसऱ्याच्या साहाय्याची अपेक्षा करावी लागते. मात्र श्रीमान् उत्पलदेवांनी "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**चिदात्मैव हि देवोन्तःस्थितमिच्छावशाद्बहिः।**
**योगीव निरुपादानमर्थजातं प्रकाशयेत्।।१.५.७।।**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे योगी उपादान कारणांशिवाय अर्थात् कोणत्याही बाह्य सामुग्रीशिवाय अर्थसमूहाला प्रकाशित करतात त्याप्रमाणे चिदात्मादेवही

आपल्या ठिकाणी स्थित असलेल्या अर्थसमूहाला इच्छाबलाने अर्थात् इच्छाशक्तीने प्रकाशित करतात.

भगवान् हे चिदात्मा असल्यामुळे एखाद्या योग्याप्रमाणे लौकिक सामग्री-शिवाय केवळ इच्छेनेच आंतर विमर्शरूपामध्ये अर्थात् विचारांच्या रूपामध्ये असलेल्या पदार्थवर्गाला बाह्यरूपामध्ये अवभासित करीत असतात. या अलौकिक क्रियाशक्तीवर कोणताही लौकिक अडथळा कार्यान्वित होऊ शकत नाही. श्रीभट्टनारायण यांनी आपल्या "**स्तवचिंतामणी**" या ग्रंथामध्ये याच लक्ष्याला किंवा ध्येयाला हृदयामध्ये ठेऊन श्रीभगवंतांना एक सर्वोत्कृष्ट कलाकार मानलेले आहे. या दृष्टीनेच त्यांनी उपरोक्त ग्रंथात असे म्हटले आहे की -

**निरुपादानसम्भारमभित्तावेव तन्वते।**
**जगच्चित्रं नमस्तस्मै कलाश्लाघ्याय शूलिने।।१।।**

**अर्थ :-** उपादान कारणाशिवाय उत्पन्न होणाऱ्या जगाचे चित्र "स्व"रूप भिंतीवर किंवा आधारावर प्रकट करणाऱ्या आणि कलाश्लाघ्य अर्थात् कलारूप सृष्टी निर्माण करण्याचे सामर्थ्य असणाऱ्या श्रीशंकराला नमस्कार असो.

श्रीभगवंतांना आपल्या कलेच्या प्रदर्शनासाठी आपल्या स्वरूपाहून इतर अशा अन्य कोणत्याही आधार इत्यादींची आवश्यकता असत नाही. पारमेश्वरी शक्ती ही चतुर्दिक् स्वतंत्र असल्यामुळे ती कधी क्रमानुसार अथवा कधी क्रमात्मक पराधीनतेशिवायच कार्यनिरत अर्थात् कार्यमग्न असते; परंतु या पारमेश्वरी शक्तीचे खरे स्वरूप नेहमी क्रमरहितच असते. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकेत असे म्हटले आहे की -

**.... निःशेषशक्तिचक्रक्रमाक्रमाक्रामिणी अतिक्रान्तक्रमा-क्रमातिरिक्तारिक्ततदुभयात्मतयापि अभिधीयमानापि अनेतद्रूपा अनुत्तरापरा स्वातन्त्र्यशक्तिः काप्यस्ति।।**

**अर्थ :-** सर्व शक्तिचक्रांना क्रम व अक्रमरूपाने आक्रमिणारी किंवा सृष्ट्यादि कार्ये क्रम व क्रमरहित स्वरूपाने करणारी, क्रमाक्रमांचे उल्लंघन केलेली; परंतु तरीही क्रमाक्रमांनी युक्त आणि त्या स्वरूपांची नसणारी अनुत्तर, परा किंवा श्रेष्ठ अशी स्वातंत्र्यशक्ती आहे.

चैतन्यरसाची तरलता अर्थात् द्रवता ही आपल्यामध्ये आश्यानता

अर्थात् घनतेचे रूप धारण करीत असते आणि ही आश्यानता हीच स्थूल प्रमेयता आहे. चैतन्य रस जितका उत्तरोत्तर आश्यान किंवा घन होत जातो तितकी जडता निर्माण होत असते. "पृथ्वीतत्त्व" हे या आश्यानीभवनाच्या किंवा घनीभवनाच्या क्रियेची अंतिम सीमा किंवा मर्यादा आहे. आमचे श्रीगुरुमहाराज हे कधी कधी मंद हसत असे म्हणत असत की, "संवित्‌चे अर्थात् शक्तीचे स्वातंत्र्य हे इतके विस्मयकारक असते की, ही शक्ती या स्वातंत्र्याच्या साहाय्याने आपल्या संवित्भावापासून अवरूढ होऊन अर्थात् उतरून किंवा खाली येऊन माती बनत असते."

शास्त्रकारांनी मंदबुद्धीच्या शिष्यांना बाह्य अवभासाची प्रक्रिया समजावून देण्यासाठी आरशाच्या नगराची उपमा दिलेली आहे. या दृष्टीने "**स्पंद-निर्णय**" व "**परमार्थसार**" या ग्रंथांमध्ये असे म्हटले आहे की -

**स एव भगवान्स्वस्वातन्त्र्यादनतिरिक्तामप्यतिरिक्तामिव जगद्रूपतां स्वभित्तौ दर्पणनगरवत्प्रकाशयान्स्थितः**

**।। स्पंदनिर्णय।।**

**दर्पणबिम्बे यद्वन्नगरग्रामादि चित्रमविभागि।**
**भाति विभागेनैव च परस्परं दर्पणादपि च।।**

**।। परमार्थसार १२।।**

**विमलतमपरमभैरवबोधात् तद्वद् विभागशून्यमपि।**
**अन्योन्यं च ततोऽपि च विभक्तमाभाति जगदेतत्।।१३।।**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे विचित्र नगर, गाव इत्यादि गोष्टी अविभक्त (अभिन्न) असल्या तरीही आरशात प्रतिबिंबित झाल्यावर मूळ रूपाहून किंवा बिंबाहून निराळ्या आहेत असे भासित होते।।१२।। त्याप्रमाणे अत्यंत निर्मल असलेल्या परमश्रेष्ठ श्रीभैरवांच्या संवित् म्हणजे शक्तीपासून अभिन्न म्हणजे एकरूप किंवा विभागशून्य असलेले हे जगत् एक-दुसऱ्यापासून आणि त्या परमतत्त्वापासूनही भिन्न आहे असे भासित होते.।।१३।।

ज्याप्रमाणे आरशात पडलेले नगर इत्यादींचे प्रतिबिंब आरशाहून वेगळे नसूनही वेगळे भासत असते त्याप्रमाणे चिद्दर्पणामध्ये अर्थात् चिद्रूपी आरशामध्ये पडलेले विश्वरूप प्रतिबिंब विश्वाहून भिन्न नसूनही भिन्न असल्याप्रमाणे दिसून येत असते. आरशामधील नगर ही केवळ उपमा आहे. प्रत्यक्षात चिद्दर्पणाचा आणि साधारण आरशाचा अत्यंत

दूरन्वयानेही कोणताही संबंध नाही. जेव्हा सामान्य आरशाच्या प्रतिबिंब प्रक्रियेमध्ये आरसा, बिंब आणि प्रतिबिंब हे तिन्ही वेगवेगळे पदार्थ असतात तेव्हा चिद्दर्पणाच्या प्रतिबिंबप्रक्रियेमध्ये चैतन्यसत्ता स्वयं बिंब, प्रतिबिंब आणि आरसा आहे. अतः सांसारिक शब्दार्थ कल्पनेची कोणतीही अवस्था अशी नाही जिला "श्रीशिव" असे म्हणता येणार नाही. यामुळेच "**श्रीशिवसूत्रवार्तिक**" या टीकेत असे म्हटले आहे की -

**चैतन्यमात्मनो रूपं सिद्धं ज्ञानक्रियात्मकम्।**
**तस्यानावृतरूपत्वात् शिवत्वं केन वार्यते।।१.१५।।**

**अर्थ :-** ज्ञानात्मक आणि क्रियात्मक असे चैतन्य हेच आत्म्याचे स्वरूप आहे असे सिद्धच आहे. ते चैतन्य कशानेही झाकले जात नसल्यामुळे त्याचे श्रीशिवत्व कोणाकडूनही नाकारले जाणार नाही.

फलतः "ज्ञानक्रियात्मक चैतन्य" हा प्रत्येक जड आणि अजड पदार्थाचा स्वभाव आहे. तो प्रत्येक अवस्थेमध्ये सिद्ध आणि अनावृत अर्थात् आवरणरहित रूपामध्ये अवस्थित राहत असतो. या विश्वात्मक स्वभावाला कोणत्याही प्रकारच्या विरोधी सत्तेच्या कल्पनेच्या द्वारा खोटे ठरविले जाऊ शकत नाही.।।२।।

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

श्रीशंकरांप्रमाणे स्वरूपाची सत्ता असणे याला काय प्रमाण आहे? आणि तो उपादान कारण नसतानाही या जगताचे निर्माण कसे काय करू शकतो? जर त्याला भौतिकता प्रदान केली तर मातीच्या ढेकळाने ज्याप्रमाणे घट झाकला जावा त्याप्रमाणे जगतामुळे त्याचे स्वरूप झाकले जाईल का? आणि आनुषंगिक व्यक्तत्व आणि निर्व्यक्तत्त्व यामुळे श्रीपरमेश्वराच्या स्वभावात भेद उत्पन्न होईल. जर त्याच्या उन्मज्ञनात म्हणजेच व्यक्तत्त्वामध्ये व जगाच्या उदयाला एखादे कारण गृहीत धरले तर त्याठिकाणी द्वैत निर्माण होईल; या आणि अशा प्रकारच्या शंकांना एकाच प्रहारात उत्तर देण्यासाठी दुसरी कारिका सांगितली आहे.

**स्पष्टीकरण :-** या श्रीशंकरात्मक प्रकाशानंदपूर्ण अशा स्वस्वभावाला कोणत्याही देश, काल किंवा आकार यांच्यामध्ये निरोध म्हणजेच अडथळा नसतो. त्याचे कारण म्हणजे हा स्वस्वभाव अनावृतरूप म्हणजेच कोणाकडूनही झाकला न जाणारा आणि गुप्त न राहण्याच्या स्वभावाचा आहे.

याचे सार पुढीलप्रमाणे आहे - जे काही किंचित् प्राण, पुर्यष्टक, सुख, नील इत्यादि चैतन्यरूप प्रकाशाला आवरण घालणारे होत असेल आणि ते जर प्रकाशित झाले नाही तर काहीच प्रकाशित होणार नाही आणि प्रकाशित होणाऱ्या सर्व गोष्टी प्रकाशात्मक श्रीशंकरांच्याच स्वरूपाच्या असल्याने कोण कोणाचे निरोधक आहे? आणि निरोध (विरोध) करण्याचा अर्थ तरी काय आहे? (अर्थात् कोणीच कोणाला अडथळा करू शकत नाही.) हेच **"तस्य"** या विशेषणाने **"यत्र"** इत्यादींचे उपपादन करताना म्हटले आहे. ज्या चिद्रूपस्वात्म्यात हे मातृमानमेयात्मक सर्व जगाचे कार्य स्थित आहे व ज्या प्रकाशाने प्रकाशित होऊन या जगताला अस्तित्व लाभते त्या जगतानेच (प्रकाशात्मक स्वस्वभावाला) निरोध कसा काय केला जाईल? जर तसा निरोध झाला तर जो अडथळा आणीत आहे त्याचेच प्रकाशन होणार नाही असा याचा आशय आहे. यासंबंधी **"अजडप्रमातृसिद्धी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की-

**"तदात्मनैव तस्य स्यात्कथं प्राणेन तन्त्रणा।।२१।।"**

**अर्थ :-** त्याच्याशी अर्थात् श्रीपरमेश्वराशी एकात्म असलेल्या प्राणाकडून तो कसा काय नियंत्रित केला जाईल?

## प्रतिपक्षाचे म्हणणे

अस्तित्वात असणाऱ्या आत्म्याचा प्रकाश खरोखर उत्पन्न झालेल्याच्या बाबतीत शक्य आहे; परंतु त्याची उत्पत्ती तरी कोठून होते? या प्रश्नाला उत्तर म्हणून कारिकेत **"यस्माच्च निर्गतम्"** असे म्हटले आहे. योग्याच्या स्मृती, स्वप्न, संकल्प इत्यादि शक्तींच्या दृष्टीला अनुसरून स्वानुभवसिद्ध असा चैतन्य आणि जगत् यांच्यामधला कारणसंबंध अमान्य करून ज्याला कोणतेही प्रमाण नाही आणि (त्यामुळे) जे सिद्ध करता येत नाही अशा प्रधान किंवा प्रकृती, परमाणू इत्यादींना त्याचे कारणत्व देणे हे योग्य नाही. **"कार्य"** या पदाने हेच ध्वनित केले आहे की, कर्त्याने क्रियेद्वारा निष्पन्न केलेल्या गोष्टीला कार्य असे म्हणतात. जड कारणाने उत्पन्न झालेल्या गोष्टीला कार्य असे म्हणता येत नाही; कारण **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे जडाच्या कारणत्वाची सिद्धी करता येत नाही.

**अवस्थायुगलं चात्र कार्यकर्तृत्वशब्दितम्।।१।१४।।**

अर्थात् "दोन अवस्थांना येथे कार्य आणि कर्तृत्व असे म्हटले

आहे." या ठिकाणी वर सांगितलेली ईश्वरप्रत्यभिज्ञेची नीती सांगता येईल. कारिकेतील "**सर्व**" या शब्दाने कर्त्याचा उपादानादि निरपेक्षपणा ध्वनित केला आहे. एखाद्या कार्याने म्हणजेच घटाने कार्याचा कर्ता म्हणजे कुंभार इत्यादींचे स्वरूप झाकून टाकले आहे, असे कोठे दृष्टीस पडलेले नाही.

पुढे प्रतिपक्ष परत असा आक्षेप घेतो की, अवस्थित अर्थात् जे अंतर्गत स्वरूपात स्थिर असते त्याची बाहेर येण्याची प्रक्रिया घडत असते, तर मग ही प्रक्रिया अगदी सुरुवातीलाच घडते का? याचे उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की, ते अन्यत्र कोठेही नसून त्या चिदात्म्यातच आहे. हे "**यत्र स्थितम्**" या कारिकेतील शब्दांनी सांगितले आहे. यत्र स्थितम् हे दोन वेळा योजावे. त्याचा अर्थ असा होतो की, जर त्या चिदात्म्यात हे जगत् अहंप्रकाशाशी अभेदरूपाने अस्तित्त्वात नसेल तर ते उपादानादि कारणांपासून निरपेक्ष कसे बरे उत्पन्न होईल? कारण "**परात्रिंशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**यथा न्यग्रोधबीजस्थः शक्तिरूपो महाद्रुमः।**
**तथा हृदयबीजस्थं जगदेतच्चराचरम्।।२४।।**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे वडाच्या झाडाच्या बीमध्ये शक्तिरूप मोठा वृक्ष असतो त्याचप्रमाणे हृदयरूप बीजामध्ये हे सर्व चराचर जगत् सामावलेले असते. आणि "**स्वामिनश्चात्मसंस्थस्य**" या "**ईश्वरप्रत्यभिज्ञा कारिकेत**" या आधी सांगितल्याप्रमाणे हे जग त्याच्यामध्ये प्रकाशित होत स्थित असते आणि त्याच्याशी अभेदरूपाने व्यक्त होत असते.

त्यामुळे हा चिदात्मरूप श्रीपरमेश्वर आपल्या जडस्वरूपाप्रमाणे असलेले जग उत्क्रांत किंवा निर्माण करतो. त्यामुळे ही रचना अशी होते की, "ज्याच्यामध्ये केवळ पाहिले असता ते कोणापासूनतरी बाहेर आल्याप्रमाणे (असते)" येथे "**च**" हे अव्यय "**एव**" या अर्थी वापरलेले असून त्याच्या आधी येणाऱ्या शब्दाशी त्याचा अन्वय लावू नये.

परत प्रतिपक्ष असा प्रश्न विचारतो की, जर असे मानले की, त्या प्रकाशशरीराच्या (श्रीपरमेश्वरापासूनच) हे जग उत्पन्न झाले तर ते जग व्यक्त कसे होईल? कारण ज्या गोष्टी प्रथाबाह्य म्हणजेच व्यक्त होण्याच्या गुणाहून वेगळ्या आहेत त्या गोष्टी व्यक्तच होणार नाहीत. (कारण जग हे व्यक्तत्त्वाच्या गुणाबाहेर असल्याने ते व्यक्त होते असे म्हणणे या वाक्यांमध्ये परस्परविरोध निर्माण होतो असे प्रतिपक्षाला म्हणावयाचे आहे.)

या प्रश्नाला उत्तर देताना श्रीक्षेमराज असे म्हणतात की, "**यस्मात् निर्गतमपि सद्यत्र स्थितम्**" ह्याची दोनवेळा आवृत्ती करून त्याची योग्य जुळणी करावी. "**च**" याचा अर्थ येथे "**अपि**" (म्हणजे सुद्धा) असा असून त्याचा अन्वयात अनुक्रमे अर्थ घेऊ नये.

या सर्वांचा परिणाम म्हणजे ज्याप्रमाणे अक्रोड त्याच्या कवचातून बाहेर येतो त्याप्रमाणे हे जग श्रीपरमेश्वरामधून बाहेर आलेले नाही. याउलट त्या श्रीपरमेश्वराच्या स्वस्वातंत्र्यशक्तीमुळे तो श्रीपरमेश्वर स्वतःला जगतापासून वेगळे दाखविण्याचा प्रयत्न करतो. ज्याप्रमाणे एखाद्या आरशात नगराचे प्रतिबिंब पडते त्याचप्रमाणे आपल्या "**स्व**"च्या पार्श्वभूमीवर परमेश्वर ह्या जगाचे प्रतिबिंब दाखवीत स्थित असतो.

प्रतिपक्षी परत पुढे असे म्हणतो की, असे जरी मानले की, श्रीपरमेश्वर हा सृष्टी आणि स्थिती या स्थितींच्या वेळी जगताकडून झाकला जात नाही; परंतु अभावरूप आणि सुषुप्ती अवस्थेप्रमाणे असणाऱ्या जगाच्या स्थितीकडून हा श्रीपरमेश्वर स्वतःचे झाकणे रोधू शकत नाही.

"**यस्मात् निर्गतमपि सद्यत्र स्थितम्**" हीच ओळ याही शंकेला उत्तर म्हणून सांगता येते. ग्राह्य (ज्ञेय) जग ग्राहक (ज्ञाता) अशा चिदात्म्याहून वेगळे नाही. ही ओळ असे सांगते की, उत्पन्न झालेले जग संहारावस्थेतही श्रीपरमेश्वराशी अभिन्नरूपात स्थित असते आणि जगताचे शून्यरूप अथवा संपूर्ण असा नाश कधीच होत नाही; कारण असा हा संहार प्रकाशाचा आधार असल्याशिवाय टिकूच शकत नाही. यासंबंधी "**श्रीस्वच्छंदशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**अशून्यं शून्यमित्युक्तं शून्यं चाभाव उच्यते।**
**देव्यभावः स विज्ञेयो यत्र भावाः क्षयं गताः।।४।२९२।।**

**अर्थ :-** अशून्यालाच शून्य असे म्हटले असून शून्य म्हणजेच अभाव होय. हे देवी! जेथे सर्व भाव म्हणजेच पदार्थ नष्ट झालेले असतात त्याला अभाव असे म्हटले जाते.

अशा प्रकारे सर्व श्लोकाचा अर्थ असा आहे की, हे सर्व जगत् ज्याचे कार्य आहे, ज्याच्या प्रकाशाने सर्व प्रकाशित होते व संहाराच्या काळातही जे प्रकाशाशी एकात्म होऊन स्थित असते त्याला देशकालआकारादि कोणताही अडथळा असत नाही. त्यामुळे हे तत्त्व सर्वव्यापक, नित्य, सर्व शक्तींसहित असणारे, स्वयं प्रकाशमान आणि आदिसिद्ध आहे. जी प्रमाणे

अज्ञात गोष्टी जाणून घेण्यासाठी उपयोगी असतात त्या असमर्थ प्रमाणांनी या तत्त्वाची सिद्धी कधीच होऊ शकत नाही. किंबहुना या प्रमाणांचे आणि विश्वातील इतर गोष्टींचे अस्तित्व या तत्त्वाच्या सिद्धीवर अवलंबून आहे. यासंबंधी आमच्या श्रीगुरूंनी **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**प्रमाणान्यपि वस्तूनां जीवितं यानि तन्वते।**
**तेषामपि परो जीवः स एव परमेश्वरः।।१।५५।।**

**अर्थ :-** ज्या प्रमाणांनी वस्तूंचे जीवित पसरविले जाते त्यांच्यामध्ये तो परमेश्वरच श्रेष्ठ सामर्थ्य निर्माण करतो.

**"यस्मान्निर्गतम्"** हे दोन वेळा ("यत्र स्थितम्" याच्याशी योजावे.) यामुळे याचा अर्थ असा होईल की, हे जग जेथे स्थित आहे व ज्याच्या प्रकाशाने प्रकाशित आहे, त्या स्वरूपाचे असूनही म्हणजेच ज्याचा प्रकाश म्हणजे ज्ञेय असे हे सर्व जग आहे व जो प्रकाश ज्याच्या सिद्धीसाठी प्रमाण आहे अशा या तत्त्वाहून हे जग वेगळे नाही म्हणजेच जगताला प्रकाशित करणारे परमतत्त्व व जग यांच्यामध्ये भेद नाही.

अशा प्रकारे सृष्टि-स्थिति-संहार-मेलन आणि अवभासन इत्यादि दुर्घट कार्ये करणाऱ्या या तत्त्वाला सर्वत्र सर्वदा कोणताही अडथळा नसतो असे स्वानुभवानेच सिद्ध होते. यासंबंधी श्रीउत्पलदेवाचार्यांनी असे म्हटले आहे की -

**परमेश्वरता जयत्यपूर्वा तव सर्वेश यदीशितव्यशून्या।**
**अपरापि तथैव ते ययेदं जगदाभाति यथा तथा न भाति।।**
**(उ.स्तो १६।३०)**

**अर्थ :-** हे सर्वांच्या ईश्वरा! तुझी अपूर्व अशी परमेश्वरता ईशितव्याने अर्थात् स्वामित्वाने रहित असल्याने नेहमीच विजयी होते. दुसरीही तुझी (परमेश्वरता) आहे जिच्यामुळे हे जगत् जसे आहे त्याप्रमाणे भासत नाही.

याचा अर्थ असा आहे की, हे भासित किंवा व्यक्त होणारे जगत् हे भासनाशी एकरूपतेने स्थित असते. भासनाशिवाय काहीही भासत नाही. स्वस्वभावात समावेश करून घेण्यात तत्पर असणाऱ्या योग्याने निमीलन समाधीत **"यत्र स्थितम्"** या पदाच्या उल्लेखाने आणि **"यस्माच्चनिर्गतम्"** या पदाच्या उल्लेखाने उन्मीलन समाधीमध्ये किंवा या दोन्हीही अवस्थांमध्ये

असावे असे सांगितले आहे. कारण त्याचा स्वस्वभाव हा अडथळ्यांच्या म्हणजेच निरोधांच्या पलीकडे आहे. यासंबंधी स्पंदकारिकेतच पुढे असे सांगितले आहे की -

**यदा क्षोभः प्रलीयेत तदा स्यात्परमं पदम्।।१।९।।**

**अर्थ :-** ज्यावेळेला मनाची व्यग्रता म्हणजेच क्षोभ लीन होईल त्यावेळेला परम पद शक्य होईल.

त्याचप्रमाणे पुढे असे म्हटले आहे की -

**तस्माच्छब्दार्थचिन्तासु न सावस्था न यः शिवः।।२/४।।**

**अर्थ :-** त्यामुळे शब्द आणि अर्थ यांच्या विचारांमध्ये जी श्रीशिवाने युक्त नाही अशी अवस्थाच नाही (म्हणजेच सर्व अवस्था श्रीशिवस्वरूप आहेत.)

काही ठिकाणी अनात्मवादी सौगतादि किंवा काही ठिकाणी बाधकांचे मत प्रमाण असतानाही त्या स्वस्वभावाला कोणताही अडथळा किंवा निषेधही नाही; कारण त्या स्वस्वभावतत्त्वाचा निषेध करणारा किंवा जे त्याचे प्रतिषेधक प्रमाण आहे तेच जर सिद्ध होत नसेल तर हे पार्श्वभूमी किंवा आधार नसलेले चित्र आहे. (जो मनुष्य या परमतत्त्वाचे अस्तित्त्व मान्य करीत नाही त्याने हे मान्य केलेले असते की, त्या परमतत्त्वाच्या तेजस्वितेमुळे तो प्रकाशित होत असतो आणि तो अनादिअनंतरूपाने अस्तित्वात आहे; कारण त्या मनुष्याला एकतर अस्तित्व तरी असले पाहिजे किंवा नसले तरी पाहिजे. जर त्याला अस्तित्वच नसेल तर हे निषेधाचे निषेध करणाऱ्याशिवाय असणारे चित्र आधारहीन ठरेल.) आणि जर त्या निषेधाची किंवा निषेधकाची सिद्धी होत असेल तर म्हणजेच त्यांचे अस्तित्व सिद्ध होत असेल तर त्यामुळे श्रीपरमेश्वराची म्हणजे आदिसिद्ध प्रकाशमूर्ती अशा श्रीशंकरांचीच सिद्धी होते. त्यामुळे त्या परमतत्त्वाच्या प्रतिषेधासाठी प्रतिपक्ष येऊनही त्याच्याकडून एकही अक्षर बोलले गेले नाही म्हणजेच प्रतिपक्षाकडून उलट या परम तत्त्वाचीच सिद्धी केली गेली.

यासंबंधीच "**न तु योऽन्तर्मुखो भावः।।१।१६।।**" अर्थात् आणि जो अंतर्मुख भाव नाही, या ठिकाणी अधिक विवेचन येईल.

अशा प्रकारे या श्लोकामध्ये सर्व विश्वाच्या पलीकडे असलेला विश्वमय, विश्वाची सृष्टी, संहार इत्यादि कार्य करणारा श्रीशिव हाच स्वस्वभावयुक्त तत्त्व आहे असे सांगितले आहे. सर्व आस्तिक ग्रंथांमध्ये जे उपास्य तत्त्व

सांगितले जाते ते या स्पंदतत्वाशिवाय अधिक काही नाही. या जगात उपास्य तत्त्वांचे जे अनेक प्रकार दिसतात अथवा भासतात ते केवळ या स्पंदतत्वाच्या स्वातंत्र्यशक्तीमुळे होय. वस्तुतः हे सर्व जग या तत्त्वाच्या क्रियेचे साररूप प्रकाशन आहे. यासंबंधीच पुढे असे म्हटले आहे की-

**तदाक्रम्य बलं मन्त्राः सर्वज्ञबलशालिनः ।।२/१।।**

**अर्थ :-** त्या सामर्थ्याचा आधार घेऊन मंत्र सर्वज्ञ आणि बलशाली होतात. अशा प्रकाराने हे तत्त्व प्रतिपादिलेले आहे. या रीतीने येथे कोणत्याही आक्षेपांना जागा उरत नाही.

अशा रीतीने अशा प्रकारच्या चिंतामणीप्रमाणे असणाऱ्या स्पंदसूत्रांवरच्या इतरांनी केलेल्या सर्व व्याख्या आणि आम्ही केलेली व्याख्या यांच्यामधील फरक सूज्ञ आणि अनसूय अर्थात् मत्सररहित अशा वाचकांनी स्वतःच जाणून घ्यावा. आम्ही प्रत्येक पदाची या व्याख्येत हा ग्रंथ मोठा होईल म्हणून व्याख्या केलेली नाही किंवा प्रत्येक पद उलगडून दाखविलेले नाही.।।२।।

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

या आधीच्या श्लोकात संवित्प्रकाशात्मक श्रीशिवच सर्व घट-पटादि पदार्थात विद्यमान् असतात अर्थात् राहतात असे सांगितले. परंतु विविध प्रकारच्या विश्वातल्या पदार्थात विभिन्नता दिसून येते. या स्थितीत अद्वैतरूपतेचा म्हणजेच सर्व काही एकरूपच आहे अशा स्थितीचा भंग कसा काय होत नाही? असा संशय स्वाभाविकपणेच निर्माण होतो. परंतु येथे संशयाला कोणतीही जागा नाही असे "**यत्र स्थितमिदं ....।।२।।**" या कारिकेत सांगितले आहे. कारण ज्याप्रमाणे एकाच सूक्ष्म वटबीजामध्ये मूळ, फळ, पाने, शाखा, प्रशाखा इत्यादि भेदाने किंवा प्रकाराने विशाल असा वटवृक्ष शोभून दिसतो आणि वृक्षाचे इतके अवयव असूनही एकच वटबीज वेगळे होत नाही त्याचप्रमाणे एकाच अभिन्न अद्वैतात तीन परिच्छेदांनी अर्थात् विभागांनी रहित अशा भगवान् श्रीपरमशिवांमध्ये विभिन्न स्वभावाचे पदार्थ असूनही अद्वैताची क्षती किंवा क्षय होत नाही किंवा व्यवहारामध्ये एका महासमुद्रामध्ये निर्माण होणाऱ्या लाटांच्या वेगळेपणामुळे लाटांनीच बनलेल्या समुद्रामध्ये कोणताही भेद होत नाही. अशा प्रकारेच प्रकृतीमध्येही

जाणावे. जगामध्येही घट निर्माण करताना कुंभाराला चक्रादि सहकारी कारणांची आवश्यकता असते त्याप्रमाणे भगवान् श्रीशिवांच्या ह्या दिसणाऱ्या नामरूपात्मक विशाल किंवा महान् अशा विश्वामध्ये सहकारी कारणांची किंवा क्रम-अक्रमाची अपेक्षा नसते. त्याचप्रमाणे ते तत्त्व कोणाकडूनही आवृत केले जात नाही अर्थात् झाकून टाकले जात नाही.।।२।।

**जाग्रदादिविभेदेऽपि तदभिन्ने प्रसर्पति।**
**निवर्तते निजान्नैव स्वभावादुपलब्धृतः।।३।।**

**अन्वयार्थ :-**

**जाग्रदादिविभेदे अपि** - जागृती, स्वप्न, सुषुप्ती इत्यादि भिन्न अवस्थात सुद्धा, **तत्** - ते स्पंदतत्त्व किंवा शिवत्व, **अभिन्ने** - अनुभविता किंवा वेदक अथवा जाणणारा या समान-भिन्न नसणाऱ्या रूपात, **प्रसर्पति** - संचार करते, एकरूप राहते, **निजात्** - स्वतःच्या, **उपलब्धृतः** - अनुभव घेणारा, जाणणारा, वेदक अशा, **स्वभावात्** - स्वभावापासून, **नैव निवर्तते**- (मुळीच निवृत्त होत नाही.)।।३।।

**अर्थ :-** जागृती, स्वप्न, सुषुप्ती इत्यादि भिन्न अवस्थांमध्ये ते स्पंदतत्त्व किंवा श्रीशिवत्व हे भेदरहित किंवा अभिन्न रूपाने वेदकाच्या अर्थात् अनुभव घेणाऱ्याच्या किंवा जाणणाऱ्याच्या रूपामध्ये व्यापून राहिलेले असते. यामुळे या सर्व अवस्थांच्या प्रसाराच्या वेळी हे स्पंदतत्त्व (श्रीशिवाच्या स्वतःच्या)अनुभवी स्वभावापासून निवृत्त होत नाही.।।३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

अवस्था जरी भिन्न असल्या तरी ज्ञान हे एकच आहे. जागृत अवस्थेमध्ये आपल्याला जुन्या गोष्टींचे स्मरण होणे हे सुद्धा स्वप्नच आहे. मादक पदार्थांच्या योगाने जी मूर्च्छा येते ती एक गाढनिद्राच आहे.

जागृत अवस्था कशाला म्हणतात? इंद्रियांच्या योगाने शब्दादि विषयांचे ग्रहण करणारा पुरुष जेव्हा आपल्या पसरलेल्या शक्तीचा अभिमान धारण करतो तेव्हा त्या अवस्थेला जागृत अवस्था असे म्हणतात. स्वप्नावस्था कशाला म्हणतात? इंद्रिये विषयांचे ग्रहण करता करता थकली म्हणजे नुसत्या मनानेच विषयांचे ग्रहण होत असते. या अवस्थेलाच स्वप्नावस्था असे म्हणतात. सुषुप्ती अवस्था कशाला म्हणतात? मनाचे व्यापार सुद्धा

जेथे बंद होतात व तात्कालिक द्वैताची भावना सुद्धा जेथे राहत नाही त्या अवस्थेला सुषुप्ती अवस्था असे म्हणतात. स्मृती ही स्वप्नाप्रमाणे आहे. स्मृतीत अनुभवलेल्या विषयांचे स्मरण होते. मदिरा जास्त प्याल्याने चित्त व इंद्रियांच्या वृत्ती नष्ट होतात त्याला मद असे म्हणतात. अतिशय दुःख किंवा विषयांच्या योगाने जो मोह होतो त्याला मूर्च्छा असे म्हणतात. या अवस्थांमध्ये द्वैताचे भान नसल्याकारणाने त्यास सुषुप्ती अवस्था असे म्हणतात.

अशा रीतीने जागृत, स्वप्न व सुषुप्ती अवस्था असल्या तरी आत्मा स्वतःच्या ज्ञानस्वरूपापासून वेगळा नसतो म्हणजे तो ज्ञानस्वरूपमयच असतो. या तीनही अवस्थांचा आत्मा साक्षी असतो. जर तो अवस्थारूप बनला असता तर त्याच्यावर भेद उत्पन्न झाला असता. आत्म्याचे ज्ञान अगर साक्षी हे स्वरूप तीनही अवस्थेत साक्षिरूपाने सारखेच असते. ज्याप्रमाणे तीनही अवस्थांच्या बाबतीत आत्म्याचा सारखेपणा किंवा साक्षीपणा कायम असतो. त्याप्रमाणेच सर्व देहांच्या बाबतीतही त्याचे साक्षिरूप कायम असते. "ममात्मा सर्व भूतात्मा" म्हणजे देह जरी भिन्न असले तरी एकच चैतन्यरूपी आत्मा सर्व देहांमध्ये व्यापून असतो. दर एकामध्ये "अहं" "अहं" असे स्फुरण आहे. हा "अहं" म्हणजेच चैतन्य श्रीपरशिव किंवा आत्मा होय.

योगशास्त्राच्या दृष्टीने विचार केला तर वरील तीन अवस्था पुढीलप्रमाणे दिसून येतात. ध्येयवस्तूवर एकसारखी प्रवृत्ती राहणे यालाच योगशास्त्रातील जागृतावस्था किंवा धारणा असे म्हणतात. त्याच्या पुढील अवस्था ध्यानाची आहे. ध्येयाचा जो अनुभव आला त्या अनुभवाच्या प्रवाहाशी एकसारखी एकतानता करीत अनुसंधान ठेवणे यालाच योगाभ्यासातील ध्यान किंवा स्वप्नावस्था असे म्हणतात. त्या एकाग्रतेचा अभ्यास दृढ झाला म्हणजे दुसरा कोणताही अनुभव न येता ध्येयाचा सूक्ष्म आभास राहणे यालाच योगाभ्यासातील सुषुप्ती अवस्था किंवा संप्रज्ञात समाधी असे म्हणतात. या अवस्थेत मी आनंदित आहे असाच अनुभव येतो. ध्येयरूप बनणे ही त्याच्या पुढची अवस्था आहे. त्याला असंप्रज्ञात समाधी असे म्हणतात. ध्यान, धारणा व समाधी या अवस्थांमध्ये अनुभविता साक्षी असा आत्मा व्यापून असतो. सालंब समाधीमध्ये म्हणजे ध्येय वस्तूवर ऐक्य करण्यात सुद्धा आत्मतत्त्वच जागृत असते. निरालंब समाधीमध्ये ध्येयाचेही ज्ञान

राहत नाही; परंतु ती समाधी सुषुप्ती अवस्थेप्रमाणेच आहे. त्या अवस्थेत मला इतका वेळपर्यंत कशाचेही भान नव्हते असे साधक सांगतो. ती समाधी उतरल्यानंतर अशी माझी स्थिती होती असे सांगणे म्हणजे त्या स्वरूपात आपला आत्मा साक्षिरूपाने होता असेच म्हणणे आहे. आत्मा हा कोणत्याही अवस्थेत आपल्या ज्ञानस्वरूपापासून ढळलेला नसतो. त्याचप्रमाणे मी देहरूप, मी मनुष्य, ब्राह्मण, देवदत्त, तरुण, सुंदर, म्हातारा व कुरूप इत्यादि देहाला धरून निरनिराळ्या अवस्था आहेत. त्यात आत्मा एकच आहे. त्याचप्रमाणे मी सुखी, दुःखी, आनंदी इत्यादि बुद्धीच्या आधारावर झालेल्या भावनांचा साक्षीही तोच आत्मा आहे. "मी तहानलेला आहे," असे मनुष्य प्राणाच्या आधाराने बोलतो म्हणजे त्याचा आत्माच हे बोलत असतो.

जागृती, स्वप्न व सुषुप्ती इत्यादि अवस्था बदलत असतात हे अगदी खरे आहे. परंतु त्या सर्व अवस्था आत्मसंवितापासून अगदी अभिन्न असतात. अवस्थांमध्ये भिन्नभिन्नता झालेली दिसली तरी स्पंदतत्त्व आपल्या स्वतःच्या उपलब्धिमात्र म्हणजे ज्ञानमात्र स्वभावापासून ढळत नाही; कारण स्पंदतत्त्व हे उपलब्धा म्हणजे उपलब्ध होणारे, मिळणारे व जाणावयाचे तत्त्व आहे. असे हे उपलब्धा तत्त्व म्हणजे आत्मा तीनही अवस्थांमध्ये समान रूपाने राहणारे आहे. अवस्थांमध्ये भेद होतो. अवस्थाता म्हणजे आत्म्यामध्ये भेद कधीही होत नाही. विषवृक्षाचा अंकुर लहान असला किंवा मोठा असला तरी त्याच्या विषामध्ये काही भेद होत नाही. जागृती व स्वप्नातील संवेदन प्रसिद्धच आहे. पाण्याच्या लाटांबरोबर पाण्यात पडलेले चंद्राचे प्रतिबिंब हलताना दिसते; परंतु चंद्राशी त्या हलण्याच्या क्रियेचा काहीही संबंध असत नाही. अवस्था बदलतात, नाचतात व आपले रूप बदलतात; परंतु परमात्म्याशी त्यांचा काहीही संबंध असत नाही. ज्याप्रमाणे स्वतःच्या अंगाची कोणतीही क्रिया अंगाशी एकरूप असते त्याचप्रमाणे कोणताही भेद परमात्म्याच्या अंगाची क्रिया असून तो त्याच्याशी अभिन्न असतो. जीव जेव्हा इंद्रियांनी अर्थ ग्रहण करतो तेव्हा त्याची स्वप्नावस्था असते. मात्र ज्यावेळी अर्थ व स्मरण या दोन्हीही गोष्टी नसतात त्यावेळी जीव सुषुप्ती अवस्थेत असतो. मात्र आत्मा जसाच्या तसा शुद्ध बोधैकस्वरूप आहे. हीच त्याची तुरीयता किंवा तुरीय अवस्था आहे.

काही काहींचे असे म्हणणे आहे की, भिन्न भिन्न अवस्था तर विश्वाच्या अंतर्गतच आहेत. परंतु अवस्थाता, संवेत्ता किंवा जो जाणणारा आहे त्याच्या ठिकाणी अवस्था नाहीत. प्रत्यभिज्ञा आदि युक्तींनी वरील विधानाचे खंडन पुढील कारिका लिहून स्पंदकारिकाकारांनी केले आहे.।।३।।

*****

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** जागृती, स्वप्न, सुषुप्ती, मोह, मद इत्यादि अवस्थांचा आपण अनुभव घेतो तेव्हा आपली त्या त्या अवस्थेशी एकरूपता झालेली दिसून येते. या सर्व अवस्था परस्परांपासून भिन्न आहेत. या अवस्थांशी आपली अभिन्नता दिसते एवढ्यावरून या अवस्थाच आपले स्वरूप आहे असे मानले तर ते बरोबर होणार नाही; कारण तसे मानले तर एकाच माणसाच्या जीवनात जितक्या अवस्था तितकी ज्ञातृत्वे असे मानण्याचा प्रसंग येईल. उलट आपला अनुभव असा आहे की, या सर्व अवस्थांतरात आपले ज्ञातृत्व एकरूपच असते. उदाहरणार्थ - "योऽहम् अस्वाप्सम्, सोऽहम् जागर्मि।" अर्थात् जो मी झोपलो होतो तोच मी आता जागा आहे. येथे दोन्ही भिन्न अवस्थांचा अनुसंधाता एकच आहे. हेच इतर अवस्थांच्या अनुसंधानाबाबत दाखविता येईल. याचा अर्थ असा की, या भिन्नभिन्न अवस्थांचा अनुभावक ज्ञाता हा त्या त्या अवस्थेत अभिन्नत्वाने वावरताना दिसत असला तरी तो खरोखरी अवस्थापरत्वे भिन्न स्वरूपाचा नाही. तो एकच आहे व तो या सर्व अवस्थांतरांना व्यापून असल्याने व्यापकही आहे. आपल्या वैयक्तिक जीवनातील अहंप्रत्यय सुद्धा अशा प्रकारे अवस्थांतरांच्या दृष्टीने एकच व त्या सर्व अवस्थांचा व्यापक असल्यामुळे त्याचा निरोध किंवा अवच्छेद या अवस्थांनी होत नाही. त्याचे एक आणि व्यापक असे ज्ञातृत्व हाच आपल्या वैयक्तिक जीवनातील अहंप्रत्ययाचा अर्थ होतो.

ज्याप्रमाणे मानवाच्या व्यक्तिगत जीवनात त्या त्या अवस्थेतील अहंप्रत्यय त्या त्या अवस्थांशी अभिन्नत्वाने असतो त्याचप्रमाणे निरनिराळ्या व्यक्तींचा अहंप्रत्यय त्या व्यक्तिपुरता त्या त्या देहादिकांशी अभिन्नत्वाने असतो. ज्याप्रमाणे अवस्थांतरांशी हा अहंप्रत्यय अभिन्नत्वाने दिसत असला तरी तो जसा एकरूप आणि अनुस्यूतच असतो त्याप्रमाणेच अहंप्रत्यय व्यक्तींशी

अभिन्नत्वाने दिसत असला तरी तो त्या सर्वांत एकरूप आणि अनुस्यूतच असतो; कारण कोणत्याही व्यक्तीचा अहंप्रत्यय घेतला तरी तो ज्ञातृत्वरूपच असणार. व्यक्तिगत जीवनातील अहंप्रत्ययाचा अवस्थांतरांनी निरोध होत नाही, उलट ज्याप्रमाणे तो सर्व अवस्थांना व्यापून असतो. त्याचप्रमाणे सर्व व्यक्तींच्या ठायी एकरूपत्वाने व अनुस्यूततेने आढळणारा अहंप्रत्ययही व्यक्तिमर्यादांनी निरुद्ध होत नाही, उलट तोच सर्व व्यक्तींना व्यापतो. असा हा व्यापक अहंप्रत्ययच स्वस्वभाव होय म्हणूनच स्वस्वभावाचा देहादि उपाधींनी निरोध होत नाही असे आगम सांगतात.

योगिदशेतील अवस्थांचीही याने नीट कल्पना येते. योगिदशेतील जागरावस्था म्हणजे ध्येय अर्थाच्या ठिकाणी तत्काळ प्रवृत्ती होणे ही धारणा होय. विरुद्ध प्रत्ययांचा परिहार होऊन समान प्रत्ययांच्या प्रवाहाचे एकतानतेने अनुसंधान म्हणजे स्वप्न होय हेच ध्यान होय व एकाग्रतेचा अतिशय होऊन चित्ताच्या ठिकाणी केवळ ध्येयाभासच वैशिष्ट्याने प्रतीत होणे ही सवेद्य सुषुप्तावस्था होय. हीच संप्रज्ञात समाधीची आनंदास्मिता युक्त अवस्था होय. या अवस्थेत आनंदमय अस्मिताच (अहंता) स्फुरत असते. या सर्वच अवस्थांतून अहंप्रत्ययच व्यापकतेने स्फुरत असतो. हे स्वस्वभावाचे स्फुरणच होय.।।३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

**अवस्थाभेदांमध्ये स्वरूपाची एकता**

येथेपर्यंत हे सिद्ध केले गेलेले आहे की, आंतर आणि बाह्य या दोन्ही अवस्थांमध्ये एकच स्वभाव (स्पंदतत्त्व) व्यापून राहत असतो. या विषयामध्ये अशी शंका येते की, जेव्हा जाग्रत्, स्वप्न इत्यादि अवस्थांमध्ये पारस्पारिक भिन्नता प्रत्यक्षरूपात आढळून येत असते तेव्हा सर्वांमध्ये एकाच स्वभावाच्या व्यापकतेचा सिद्धान्त कशा प्रकारे स्वीकारला जाऊ शकतो. पुढील सूत्रामध्ये या शंकेचे समाधान केले जाणार आहे.

जरी (दैनंदिन जीवनामध्ये) जाग्रत इत्यादि अवस्थांमध्ये पारस्पारिक भिन्नतेचा अनुभव होत असतो तरीही या भेदकल्पनांच्या द्वारा त्यांच्या अर्थात्-श्रीशिवांच्या स्वरूपावर कोणतेही आवरण पडू किंवा येऊ शकत

नाही. याचे कारण असे आहे की, त्या तीन अवस्थांमध्ये अनुभवी प्रमात्याचे रूप साधारण असते. ज्याप्रमाणे विषाच्या बीजापासून उगवलेल्या अंकुर इत्यादींच्या पाचही स्कंधामध्ये अर्थात् मूळ, शाखा, पत्र, फूल आणि फळ यामध्ये व्याप्त विषाच्या रूपामध्ये कोणताही भेद किंवा फरक असत नाही त्याप्रमाणे त्याच्या स्वरूपामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होत नाही.।।३।।

**विवरण :-**

प्रस्तुत सूत्रामध्ये उल्लेखिलेल्या "**तदभिन्ने**" शब्दाची व्याख्या दोन प्रकारांनी केली जाऊ शकते.

१) **तदभिन्ने :-** जाग्रत् इत्यादि भेदपूर्ण अवस्था या त्या मौल्यवान भेदरहित तत्त्वाहून भिन्न नाहीत; कारण ते तत्त्व आपल्या इच्छेने स्वरूपामध्ये असे अवस्थाभेद निर्माण करीत असते.

२) **तदभिन्ने :-** जाग्रत् इत्यादि अवस्थांमध्ये पारस्पारिक भेद असतो तरीही या सर्व अवस्थांमध्ये ते भेदरहित तत्त्व एकाच भेदरहित वेदकाच्या रूपामध्ये व्यापून राहिलेले असते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये "जाग्रदादि" शब्दाने मुख्यतः जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती आणि गौणरूपाने या तिघांच्या अतिरिक्त स्मृती, भ्रांती, मद, मूर्च्छा इत्यादि जीवभावाशी संबंधित सर्व अवस्थांचे ग्रहण केले जाते. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**जाग्रत स्वप्नः सुषुप्तं च तुर्यं च तदतीतकम्।**

**इति पञ्च पदान्याहुः .......।।१०-२२८।।**

प्रत्यक्षात शैवसिद्धान्तानुसार जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ती, तुर्या आणि तुर्यातीत याच पाच अवस्था स्वीकारलेल्या आहेत; परंतु या पाच अवस्थांमधील अंतिम दोन अवस्था या क्रमशः "शाक्तभूमिका" आणि "विशुद्ध शिवभाव" या अवस्था आहेत. सिद्ध श्रीगुरुचरणांचे कथन अर्थात् म्हणणे असे आहे की, प्रत्यक्षात या दोन्ही अवस्था एकाच सर्वोत्कृष्ट निर्विकल्प अवस्थेच्या द्योतक आहेत. यामध्ये केवळ सूक्ष्मातिसूक्ष्म स्थिरता आणि अस्थिरता यांच्या अतिरिक्त कोणताही भेद नाही. याचाच अर्थ असा आहे की, प्रत्यक्षात किंवा खरे पाहता तुर्यपद ही अशी पूर्ण अहंविमर्शात्मक शाक्तभूमिका आहे की, जी प्राप्त केल्यावर सर्व इतिकर्तव्यता समाप्त होत असते.

साधक जेव्हा या तुर्यपदावर शाश्वत स्थिरतेने अवस्थित अर्थात् आरूढ होतो तेव्हा या अवस्थेला तुर्यातीत अर्थात् पूर्ण श्रीशिवभावाची अवस्था असे म्हणतात. हेच कारण आहे की, आमचे श्रीस्पंदगुरू हे हेच तुर्यपद अर्थात् शाक्तभूमिका प्राप्त करून घेण्याला अग्रस्थान किंवा त्यावर जोर देत असत; कारण हे पद श्रीशिवभाव प्राप्त करण्याचे पहिले दार आहे.

प्रस्तुत सूत्रामध्ये या दोन्ही अवस्थांना ग्रहण करण्याचा कोणताही अभिप्राय नाही; कारण या दोन्ही निर्विकल्प चिद्धनतेच्या भूमिका आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारच्या भेदकल्पनेचा प्रश्नच निर्माण होत नाही. चिद्धन अवस्था सतत उदीयमान असल्यामुळे शाश्वत जागृतीची अवस्था आहे. यामुळे यावर भेदकल्पना कशी थापली जाऊ शकेल? अवशिष्ट अर्थात् उरलेल्या तीन अवस्थांच्या विषयी काही गोष्टी या अवश्य विचारणीय आहेत.

या विषयी सर्वप्रथम ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, साधनामार्गावर चालणाऱ्या योगी किंवा ज्ञानी यांच्या दृष्टिकोणाने या तीन अवस्थांचे स्वरूप हे संसार भावाच्या सर्वसाधारण आणि दैनिक व्यवहारात अनुभवता येत नाही. उदाहरण म्हणून साधारण अर्थात् सामान्य लोकांच्या जाग्रत, स्वप्न आणि सुषुप्ती या योग्यांसाठी ध्यान, धारणा आणि समाधीच्या अवस्था असतात. परंतु प्रस्तुत सूत्रामध्ये साधारण आणि दैनिक जीवनाशी संबंधित अवस्थांच्या त्याच रूपाकडे निर्देश केलेले आहे. यामुळे येथे याच रूपावर संक्षिप्तपणे प्रकाश टाकण्यात येणार आहे आणि पुढे सूत्र १८ मध्ये या संबंधी काही विशेष गोष्टीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

साधारणपणे जाग्रत, स्वप्न आणि सुषुप्ती यांचे रूप अशा प्रकारचे असते.

१) **जाग्रत-अवस्था :-** "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात "**ज्ञानं जाग्रत् ।।१.८।।**" अर्थात् ज्यावेळी इंद्रियांच्या द्वारा बाह्य जगाचे ज्ञान आकलन होते ती जाग्रत अवस्था होय, असे म्हटलेले आहे. या अवस्थेमध्ये मितप्रमात्याचे अर्थात् संसारी जीवाचे अंतःकरण आणि ज्ञानेंद्रिये सर्वसाधारण तसेच स्थिर विषय ग्रहण करण्याच्या दिशेने स्पंदायमान होत असतात. याचा अर्थ असा आहे की, या अवस्थेमध्ये इंद्रियबोधाचा किंवा इंद्रियज्ञानाचा विषय बनलेले पदार्थ स्वप्नावस्थेत अनुभूयमान अर्थात् अनुभवास येणाऱ्या

पदार्थांप्रमाणे क्षणपर्यवसायी आणि एकाच प्रमात्याच्या द्वारा अनुभूयमान अर्थात् अनुभूत होत नाहीत. कोणत्याही प्रमात्याची म्हणजे जीवाची इंद्रिये ज्या पदार्थांचे ग्रहण करीत असतात, ते पदार्थ त्या प्रमात्याच्या द्वारा ग्रहण केले न जाताही वेगळ्या रूपामध्ये वर्तमान असतात. त्याचबरोबर त्या प्रमात्याशिवाय अन्य प्रमाता हेही एकाच वेळी या पदार्थांचे ग्रहण करू शकतात. घडा हा एक पदार्थ आहे. घड्याला कोणीही पाहिले किंवा न पाहिले तरीही घडा वर्तमान राहत असतो आणि घडा पाहण्याच्या काळी अनेक प्रमाते या घड्याला एकाच वेळी पाहू शकतात. फलतः तीन अंतःकरणे आणि पाच बाह्य ज्ञानेंद्रिये यांच्या वृत्तीपासून निश्चय, अभिमान, संकल्प, शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध यांच्या रूपामध्ये उत्पन्न सर्वसाधारण ज्ञानाला "जाग्रत अवस्था" असे म्हणतात. येथे चिदात्म्याच्या गृहीतृ-ग्रहण-ग्राह्य या त्रिपुटीत स्फुरणाऱ्या ज्ञानशक्तीला "जाग्रद्वृत्ती" असे म्हटले आहे. यात सत्त्वगुणाची प्रधानता राहते. या अर्थाने **"श्रीशिव-सूत्रवार्तिक"** या टीकेत असे म्हटले आहे की -

**बौद्धं गार्वं च साङ्कल्पं शाब्दं स्पार्शं च रूपजम्।**
**रसजं गन्धजं चान्यदैन्द्रियज्ञानमेव यत्।।**
**अत्र गृहीतृग्रहणग्राह्यरूपा चिदात्मनः।**
**स्फुरत्येव ज्ञानशक्तिर्जाग्रद्वृत्तिरिहैव सा।।८।।**

**अर्थ :-** निश्चय, अभिमान, संकल्प, शद्ब, स्पर्श, रूप, रस, गंध आणि अन्य इंद्रिये यांच्यापासून होणारे जे ज्ञान आहे त्याला व चिदात्म्याच्या ग्रहीतृ, ग्रहण व ग्राह्य या रूपात स्फुरणाऱ्या ज्ञानशक्तीलाच येथे जागद्वृत्ती असे म्हणतात.

**२) स्वप्न अवस्था :-** स्वप्नावस्थेचे वर्णन करताना **"श्रीशिवसूत्र"** या ग्रंथात व त्यावरील **"श्रीशिवसूत्रवार्तिक"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की -

**स्वप्नो विकल्पाः।।१.९।।**

**अर्थ :-** ज्या अवस्थेत बाह्य जगाशी इंद्रियांचा संबंध न येता, मानसिक क्रियांच्या द्वारा केवळ मनोव्यापारांनी संकल्पनात्मक ज्ञान मिळते त्या अवस्थेला "स्वप्न" असे म्हणतात.।।१.९।।

**दृष्टिस्वभावस्य विभोरन्तर्नवनवोदयः।**
**विकल्पानां स्मृतः स्वप्नस्तद्वाह्यार्थनिरासतः।।९।।**

**अर्थ :-** दृष्टी हाच ज्याचा स्वभाव आहे अशा व्यापक आत्म्याच्या विकल्पांचा नवनवीन उदय म्हणजे स्वप्न होय.।।९।।

या अवस्थेमध्ये प्रमात्याच्या अर्थात् ज्ञात्याच्या किंवा जीवाच्या इंद्रियवर्गाचा बाह्यप्रसार थांबतो आणि याचा परिणाम म्हणून त्या प्रमात्याच्या निश्चयन, अभिमानन, शब्दन, स्पर्शन इत्यादि सर्व वृत्ती केवळ मानसिक संकल्पविकल्पात्मकतेमध्ये केंद्रिभूत होतात. फलतः या अवस्थेमध्ये प्रमाता हा जाग्रत अवस्थेप्रमाणे मानसिक विकल्पांच्या किंवा संशयांच्या द्वारा नगर, पर्वत, उपवन इत्यादि पदार्थांचा अनुभव घेऊ लागतो. या जाग्रत् अवस्थेमध्ये अनुभवास येणारा पदार्थवर्ग हा एकीकडे क्षणपर्यवसायी असतो आणि दुसरीकडे स्वप्नावस्थेमध्ये असलेल्या प्रमात्याशिवाय दुसरे प्रमाता या पदार्थवर्गाला ग्रहण करू शकत नाहीत. स्वप्न अवस्था आणि जाग्रत अवस्था या दोन्ही अवस्थांमध्ये केवळ इतकाच फरक आहे. फलतः केवळ मानसिक संकल्पविकल्पात्मकतेच्या द्वारा विषयांचा अनुभव घेण्याच्या अवस्थेला "स्वप्नावस्था" असे म्हणतात. या अवस्थेमध्ये रजोगुणाची प्रधानता असते.

**३) सुषुप्ती अवस्था :- "अविवेको माया सौषुप्तम्।।१.१०।।"** अर्थात् विवेकराहित्य किंवा निश्चित बुद्धी न राहणे आणि मोह अथवा गाढ अंधःकार यांना सुषुप्ती अवस्था म्हणतात असे "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात म्हटलेले आहे. सुषुप्ती अवस्थेमध्ये प्रमात्याच्या अंतःकरणामधील तमोगुणाची मात्र इतकी वाढते की, तो प्रमाता आपल्या सर्व तन-मनाची शुद्ध हरवून मोहामध्ये पडत असतो. वास्तविक पाहता "**श्रीशिवसूत्रवार्तिक**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की -

**ज्ञानज्ञेयस्वरूपायाः शक्तेरनुदयो यदा।**
**चिद्रूपस्याविवेकः स्यादसावेवाविमर्शतः।।**
**सैव माया वृत्तिजालपोषकत्वात् प्रकीर्तिता।**
**अर्थस्मृती स्वात्मसंस्थे चिद्रूपे सा सुषुप्तता।।१०।।**

**अर्थ :-** ज्यावेळी ज्ञानज्ञेयरूप शक्तीचा अनुदय अर्थात् अस्त होतो त्यावेळी चिद्रूपाचे जे अज्ञान होते त्या अवस्थेलाच "सुषुप्ती" असे म्हटले आहे. या अवस्थेत विषय व त्यांच्या स्मृती चिद्रूपात लीन झालेल्या असतात.

इंद्रियांची शक्ती ही ज्ञानरूपामध्ये किंवा ज्ञेयरूपामध्ये कोणतेही काम करू शकत नाही. फलतः प्रमाता हा केवळ आंतरिक चेतनेच्या द्वारे (जिला मायापदवीवर "चित्र" असे म्हणतात) विषयांचा अनुभव घेऊ शकतो. सुषुप्तीकाळी प्रमात्याला विषयाची अनुभूती निश्चितपणे राहत असते; परंतु तमोगुणाची मात्रा अधिक असल्यामुळे प्रमात्याला त्या अवस्थेमधून बाहेर आल्यानंतर त्या अवस्थेमध्ये प्राप्त झालेल्या अनुभवांचे स्मरण स्पष्टपणे होऊ शकत नाही. त्या काळामध्ये अनुभूत विषयांच्या द्वारा झालेल्या संस्कारातून बाहेर आल्यानंतर त्या प्रमात्याला "मी सुखाने झोपलो होतो, मला काहीही ज्ञात नाही," अशा प्रकारचे पुसट स्मरण होत असते. फलतः गाढ झोपेमध्ये केवळ चित्ताच्या द्वारा विषयांचा अनुभव घेण्याच्या अवस्थेला "सुषुप्तीअवस्था" असे म्हणतात. या अवस्थेमध्ये तमोगुणाची प्रधानता असते.

या तीन अवस्थांशिवाय स्मृती, मद, मूर्च्छा इत्यादि अनंत मानसिक अवस्था आह्रेत. या अवस्थांच्या स्वरूपविश्लेषणाच्या विषयी शास्त्रकारांनी असा एक सिद्धान्त स्थापन केलेला आहे की, ज्या वृत्तींमध्ये सात्त्विक अंशाची अधिकता असते त्या वृत्तींना जाग्रत अवस्थेच्या, ज्या वृत्तींमध्ये राजस अंशाची अधिकता असते त्या वृत्तींना स्वप्नावस्थेच्या आणि ज्या वृत्तीमध्ये तमोगुणाची प्रधानता असते त्या वृत्तींना सुषुप्तीच्या अंतर्भूत समजावे.

याच तीन मौलिक अवस्थांचे परस्परांशी असलेले संबंध अथवा विच्छेदाच्या विचित्रतेपासून अनेक प्रकारच्या मानसिक अवस्था जन्म घेतात. उदाहरण म्हणून या अवस्थांमधील प्रत्येक अवस्थेमध्ये पुढीलप्रमाणे त्रिरूपता आढळून येते.

१) जाग्रत अवस्थेमध्ये जाग्रत अवस्था, जाग्रत अवस्थेमध्ये स्वप्नावस्था आणि जाग्रत अवस्थेमध्ये सुषुप्ती अवस्था.

२) स्वप्नावस्थेमध्ये जाग्रत अवस्था, स्वप्नावस्थेमध्ये स्वप्नावस्था आणि स्वप्नावस्थेमध्ये सुषुप्ती अवस्था.

३) सुषुप्ती अवस्थेमध्ये जाग्रत अवस्था, सुषुप्ती अवस्थेमध्ये स्वप्नावस्था आणि सुषुप्ती अवस्थेमध्ये सुषुप्ती अवस्था.

या अवस्थांच्या विनाकारण विश्लेषणाची येथे काहीही आवश्यकता नाही. जिज्ञासू साधक या अवस्थांना तंत्रालोक आदि ग्रंथ वाचून स्वतः

जाणून घेऊ शकतात. या अवस्थांमधील भिन्नतेमुळे स्वरूपामध्ये कोणता भेद उत्पन्न होऊ शकतो का? येथे केवळ या गोष्टीचे परीक्षण करणे आवश्यक आहे. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की

**इति पञ्चपदान्याहुरेकस्मिन् वेदके सति।।१०.२२९।।**

या पाचही अवस्थांमध्ये वेदक अर्थात् अनुभव घेणारा प्रमाता अर्थात् ज्ञाता किंवा जीव हा एकच असतो, असे शास्त्रकारांचे कथन आहे. या दृष्टीने "**तंत्रालोकविवेक**" या टीकाग्रंथात असे कथन केले आहे की, "**एकस्मिन् वेदके सतीति, अनेकस्मिन् वेदके अन्यस्य जाग्रदन्यस्य स्वप्नः इत्यवस्थानामवस्थात्वं पञ्चात्मकत्वं च न स्यात्।।१०.२२८।।**" अर्थात् जर यातील प्रत्येक अवस्थेचा वेदक अर्थात् अनुभव घेणारा ज्ञाता भिन्न भिन्न असता तर एका अवस्थेचा अनुभव घेणारा प्रमाता दुसऱ्या अवस्थेपासून पूर्णपणे अनभिज्ञ राहिला असता. त्याचा परिणाम असा होतो की, एकाच अवस्थेच्या अभावामध्ये या अवस्था बनू शकत नाहीत आणि यांची निश्चित संख्या सांगितली जाऊ शकत नाही. एकाच वस्तूची भिन्न भिन्न देश, काल, आकार आदींशी संबंधित दशा किंवा अवस्था हा "अवस्था" या शब्दाचा अर्थ आहे. "**एकमेव ह्यवस्थान्तरमधिकृत्यासां तथाभावो भवेदिती भावः।। तंत्रालोकविवेक १०.२२८।।**" अर्थात् ही गोष्ट स्पष्ट आहे की, अवस्थांची संख्या कितीही असली तरी त्या सर्वांचा संबंध एकाच अवस्थ्यात्याशी असणे आवश्यक असते. त्यामुळे या पाचही अवस्था एकाच चेतन प्रमात्याच्या स्वयं अंगीकृत अवस्था आहेत. स्थूलरूपाने या अवस्थांमध्ये पारस्पारिक स्वरूपभेद असूनही यांचा अनुभव घेणाऱ्या चेतन सत्तेच्या उपलब्धृतेमध्ये अर्थात् अनुभव घेण्याच्या स्वभावामध्ये कोणताही फरक किंवा भेद असत नाही.

हे तथ्य सिद्ध करण्यासाठी शास्त्राचे प्रमाण किंवा कर्णोपकर्णी ऐकलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवण्याची आवश्यकता नाही; कारण येणाऱ्या प्रत्येक दिवशी प्रत्येक मनुष्य या गोष्टीचा स्वतः अनुभव घेत असतो. एकच मनुष्य एखाद्या दिवशी झोपेतून उठताना असे म्हणतो की, "अरे मी काल जाग्रत-अवस्थेमध्ये पत्र लिहीत होतो, रात्री कधीतरी स्वप्नामध्ये विमान उडवीत होतो आणि त्यानंतर गाढ झोपेमध्ये बुडून गेल्यामुळे मला कोणत्याही गोष्टीची शुद्ध राहिली नाही." या तीन अवस्थांमध्ये प्रमात्याच्या

चैतन्यात्मक स्वभावामध्ये कोणताही भेद असता तर तो प्रमाता प्रातःकाळी उठून या तिन्ही अवस्था समानरूपाने अभिव्यक्त कसा करू शकला असता? यावरून ही गोष्ट लक्षात येते की, चेतन प्रमाता हा या अवस्थांच्या अभिव्यक्तीच्या दिशेने यांचा अनुभवही घेऊ शकतो. यामुळे या एकाच चैतन्यसत्तेच्या केवळ भिन्न भिन्न अवस्था आहेत.।।३।।

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

जागृत इत्यादि दशांमध्ये वरच्या श्लोकात स्पष्ट केलेला हा स्वभाव अनुभवास येत नाही आणि जरी वरती सांगितलेल्या युक्तींनी हा स्वभाव कोणाकडून निरोधित केला जात नसला तरी तो जागृत इत्यादि अवस्थांमध्ये स्वतःच स्वतःकडून निरोधिला जातो. अशी शंका प्रतिपक्षाने व्यक्त केली असता दुसऱ्या कारिकेमध्ये या स्वभावाचे स्पष्टीकरण करूनही प्रतिपक्षाला न समजल्याने तोच अर्थ अधिक स्पष्ट करण्यासाठी ही कारिका सांगितली आहे.।।३।।

**स्पष्टीकरण :-** जागर या शब्दाला जाग्रत् हा समानार्थी शब्द आहे; कारण हे दोन्ही शब्द या अर्थाने विद्वान् लोकांनी वापरले आहेत. भेदरूप धारा जरी लोकांमध्ये जाग्रत्-स्वप्न-सुषुप्ती या नावांनी प्रसिद्ध असलेल्या किंवा योग्यांमध्ये धारणा-ध्यान-समाधी या नावांनी प्रसिद्ध असणाऱ्या रूपांमध्ये वेगवेगळ्या प्रकारांनी वाहत असली तरीही सर्वांचा आत्मा एकच असल्यामुळे आणि अनुभवितृरूप अर्थात् अनुभव घेणाऱ्याच्या स्वभावामुळे ते तत्त्व स्वतःच्या स्वरूपापासून कधीच मागे येत नाही. जर हे तत्त्व स्वतःच स्वतःला लपवून ठेवील तर जाग्रत आदि अवस्थाही त्यांचे अस्तित्व हरवून बसतील; कारण तशा स्थितीत त्या अवस्थांना त्या परम तत्त्वाच्या प्रकाशापासून वंचित व्हावे लागेल. या तत्त्वाची उपलब्धता अर्थात् ज्ञानविषयक स्वभाव सर्वांना जाग्रत आणि स्वप्नावस्थेतल्या स्वानुभवाने ज्ञात होतो. जरी सुषुप्त्यावस्थेत हे तत्त्व तशा प्रकारे जाणवत नसले तरी त्याचे अस्तित्व तेथे असतेच; नाहीतर त्यानंतर येणारी स्मृती विसंगत ठरेल. हे तत्त्व आपल्या ज्ञानी स्वभावापासून कधीही मागे येत नाही. मग भलेही ज्ञानाच्या वस्तू म्हणजेच जाग्रदादि अवस्था या तत्त्वाच्या सामर्थ्यामुळे नष्ट झाल्या; तरी येथे कोणते नुकसान आहे? येथे "एव" हा शब्द "अपि" या अर्थाने आला असून त्याचा अन्वयार्थात क्रमाने अन्वय लावू नये.

याचा अर्थ असा होतो की, या अवस्थांच्या अनुपस्थितीतही या तत्त्वाचा नाश होत नाही.

## "तदभिन्ने" पदाचे पहिले स्पष्टीकरण

"**जागरादि विभेदस्य**" ह्याचे "**तदभिन्ने**" हे विशेषण नसून येथे "**हेतू**" या अर्थी ते वापरले आहे. त्यामुळे याचा अर्थ असा होतो की, हे तत्त्व श्रीशिवस्वभावाशी अभिन्न रूपात प्रकाशिल्यामुळे प्रकाशरूप आहे. ज्या दोन वस्तू एकमेकांशी अभिन्न होऊन स्थित असतात किंवा एकात्मक स्थितीत असतात त्या एकमेकांशिवाय वेगवेगळ्या कशा काय अस्तित्त्वात राहू शकतील?

## तदभिन्ने पदाचे दुसरे स्पष्टीकरण

किंवा या ठिकाणी "**तत्**" हे कर्तृपद म्हणून घ्यावयास हवे. "**अभिन्न**" म्हणजेच जागृत इत्यादि अवस्थांचे श्रीशिवापेक्ष (श्रीशिवांची अपेक्षा असणारे) केवल अभिन्नत्वच होय. या ठिकाणी याचा अर्थ असा होईल की, ते तत्त्व जाग्रत इत्यादि भेद असतानाही प्रसरण पावेल व वैचित्र्याचा स्वीकार करील; परंतु ते आपल्या "स्व"भावापासून मागे येणार नाही अर्थात् "स्व"भावाचा त्याग करणार नाही.

हा जाग्रदादि भेद म्हणजेच परिणाम किंवा विवर्त आहे असे जे सांख्य, पांचरात्र आणि शाब्दिक इत्यादि विद्वान् मानतात त्यांचे निराकरण करण्यासाठी येथे "तदभिन्ने" हे पद योजिले आहे.

## परिणामवादाचे निराकरण

जर हा अवस्थांचा प्रपंच किंवा अवस्थांचे प्रकटन चैतन्यापासून परिणामत्वाने थोडेसेही वेगळे होईल किंवा अधिक होईल किंवा चिद्रूप त्याच्या परिणत झालेल्या रूपाहून किंचितही अधिक होईल किंवा वेगळे होईल, तर काहीही प्रकाशितच होणार नाही. त्यामुळे येथे जागरादि अवस्था या स्पंदतत्त्वाचा परिणाम आहेत असे म्हणण्यास या ठिकाणी अवकाशच उरत नाही. यासंबंधी "**श्रीकिरण**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**परिणामोऽचेतनस्य चेतनस्य न युज्यते।**

**अर्थ :-** परिणाम हा अचेतनाचा असतो, चेतनाचा परिणाम आहे असे म्हणणे उचित नाही.

## विवर्तवादाचे निराकरण

जो रूपांच्या असत्य विभिन्न प्रकारांना चालना देतो तो विवर्त म्हणजेच जागरादि अवस्था असे म्हणणे संगतीपूर्ण होणार नाही; कारण ज्याचा अनुभव येतो ते विश्व असत्य असू शकत नाही. जर जगाला असत्य मानले तर ब्रह्मतत्त्वालाही असत्यच मानावे लागेल आणि वास्तविक तशी स्थिती नाही.

या तदभिन्ने पदाने श्रीपरमेश्वरांचे अतिदुर्घट कार्य करण्याचे सामर्थ्यच सुचविले आहे. श्रीपरमेश्वरच भेद, अभेद आणि (उभय) भेदाभेदाने अपरा, परा आणि परापरा या तीन शक्तींच्या स्वरूपात प्रकाशित होतो; कारण त्याचवेळेस तो जागरादि अवस्थांचा विभेद आणि तेथेच त्याचा स्वतःचा "**स्व**"भाव प्रकाशित करीत असतो. अशा प्रकारे श्रीपरमेश्वर अलौकिक तीन तत्त्वांच्या स्वरूपात प्रकाशित होतो. यामुळे या श्लोकात असा उपदेश केला आहे की, जागरादि अवस्थांमध्ये स्थिर राहूनही अशा प्रकारे हा स्वतःचा स्वभाव परिशीलन करून जे शोधतात तेच श्रीशिव होत.।।३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

बाह्य आणि आंतर अवस्थेत जर एकमेव स्पंदात्मक विमर्शता किंवा स्पंदात्मक ज्ञान व्यापून राहत असेल तर जाग्रत् इत्यादि अवस्थांमध्ये पारस्पारिक भेद असा काय असतो? अशी शंका घेऊ नये असे "**जाग्रदादि विभेदेऽपि .....।।३।।**" या कारिकेत (ग्रंथकारांनी) सांगितले आहे. कारण त्या अवस्थांमध्ये ज्याला भेद अनुभवाला येत असतो त्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा भेद नसतो. जो जाग्रदादि अवस्थांमध्ये अनुभव घेणारा असतो तोच स्वप्न आणि सुषुप्ती अवस्थांमध्येही अनुभव घेत असतो; कारण ज्ञानरूप अनुभविता संविद्रूप आत्म्यामुळे अनावृत अर्थात् आवरणरहित असतो. त्या अवस्थांमध्ये तो अनुभविता साधारणरूपानेच स्थित असतो. त्यामुळेच त्या अनुभवित्याच्या स्वरूपात कोणतेही परिवर्तन घडत नाही. त्या अवस्थांमध्ये अनुभव घेणारा भिन्न असेल तर दुसऱ्या अवस्थेचे संपूर्ण ज्ञान कसे काय होईल बरे? यासंबंधी "**पञ्चदशी**"कारांनी असे म्हटले आहे की -

**स बोधो विषयाद्भिन्नो न बोधात्स्वप्रबोधवत्।**
**एवं स्थानत्रयेऽप्येका संवित्तद्वनान्तरे।।६।।**
**मासाब्दयुगकल्पेषु गतागम्येष्वनेकधा।**
**नोदेति नास्तमेत्येका संविदेषा स्वयंप्रभा।।७।।**

ज्याप्रमाणे स्वप्न बघणारा हा स्वप्नाच्या ज्ञानाहून किंवा बोधाहून भिन्न नसतो त्याचप्रमाणे तो बोध अर्थात् ज्ञान बोधापासून (म्हणजेच बोध घेणाऱ्या जीवाहून) भिन्न नाही. मात्र तो बोध विषयांहून भिन्न आहे. अशा प्रकारे तीनही स्थानांमध्ये म्हणजेच जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती या तीनही अवस्थांमध्ये त्याचप्रमाणे दिनांतरातही एकमात्र संवित्च असते.।।६।।

अनेक प्रकारांनी मास, वर्षे, युग आणि कल्प गेले असूनही ज्याचा उदयही होत नाही आणि अस्तही होत नाही ते तत्त्व म्हणजेच ही स्वयंप्रभ संवित् होय.।।७।।

अशा प्रकारे एकाच प्रमात्याच्या अर्थात् जीवाच्या जाग्रदादि अवस्थांमध्ये स्वरूपतः भेद भासतो; परंतु ज्ञात्याचे चिद्रूप उपलब्ध असताना कोणत्याही प्रकारची भिन्नता नसते. तरंगांनी समुद्रामध्ये कोणत्याही प्रकारचा भेद होत नाही हे आम्ही पूर्वीच सांगितले आहे.।।३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**अहं सुखी च दुःखी च रक्तश्चेत्यादिसंविदः।**
**सुखाद्यवस्थानुस्यूते वर्तन्तेऽन्यत्र ताः स्फुटम्।।४।।**

**अन्वयार्थ :-**

**अहम्** - मी, **सुखी**- सुखी, **च** - आणि, **दुःखी** - दुःखी, **च** - आणि, **रक्तः** - अनुरक्त, **च** - व, **इत्यादि**- या व अशा प्रकारच्या, **संविदः** - संवेदना, ज्ञान, **ताः** - त्या (शरीर इ.) पासून भिन्न असलेल्या, **अन्यत्र** - दुसऱ्या अनुभवित्या व वेदक सत्तेमध्ये, **वर्तन्ते** - राहतात, अवस्थित असतात, **स्फुटम्** - उघड, स्पष्ट आहे (ही वेदक सत्ता या सर्व अवस्थांपेक्षा भिन्न असली तरी), **सुखाद्यवस्था** - सुख, दुःख इत्यादि अवस्थांमध्ये, **अनुस्यूते**- ओवलेली असते.।।४।।

**अर्थ :-** ही गोष्ट उघड किंवा स्पष्ट आहे की, मी सुखी आहे, मी दुःखी आहे, मी अनुरक्त आहे या व अशाच प्रकारच्या अन्य संवेदना त्या शरीर इत्यादींहून भिन्न असलेल्या दुसऱ्या अनुभवित्या अर्थात् अनुभव घेणाऱ्या व

वेदक अर्थात् ज्ञात्या सत्तेमध्ये अवस्थित असतात किंवा राहतात. ही वेदकसत्ता या सर्व अवस्थांहून भिन्न असली तरी सुख, दुःख इत्यादि अवस्थांमध्ये ओवलेली असते.।।४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

देह, बुद्धी, प्राण वगैरेंमुळे जे जे ज्ञान होते ते ते सर्व मुळातील आत्म्याच्या ज्ञानस्वरूपामुळे होते. ज्याप्रमाणे सर्व नद्या समुद्राला मिळाल्या म्हणजे त्यांची नावे व रूपे समुद्रात लीन होतात त्याचप्रमाणे वरील सर्व भिन्न भिन्न प्रकारची ज्ञाने सर्वव्यापी चैतन्यात्म्याच्या म्हणजे श्रीशंकरांच्या महाज्ञानात लीन होतात. यासाठी **"ज्ञानकला"** किंवा **"संवित्"** ही एकच होय. ज्ञान हे अनुभवरूपाने किंवा ज्ञानस्वरूपाने "अहं" "अहं" म्हणून स्फुरण पावत असते म्हणून ज्ञान म्हणजे संवित् हे एकच आहे. जर हे वेगवेगळे असते तर मी सुखी होतो हे स्मरण, मी दुःखी आहे, अशा स्थितीत झाले नसते. अवस्था जरी अनित्य असल्या तरी त्याचा ज्ञाता असलेला आत्मा हा "अहं" या रूपाने एकरूप व सर्वव्यापी आहे. आपल्या शरीराची अवस्था भिन्न भिन्न अवस्थेतही एकतान आहे याची जाणीव होते. त्याचप्रमाणे अनेक जीवजंतूंच्या भिन्न भिन्न अवस्थेच्या साक्षिरूपाने असणारा आत्मा ज्ञानस्वरूप व एकच आहे. त्यालाच स्वभाव किंवा श्रीशंकर असे नाव आहे.

मी सुखी, दुःखी, रागी इत्यादि आहे या सर्व संवेदना किंवा अवस्था आहेत. ज्याप्रमाणे सूर्य किंवा चंद्रग्रहणात त्याच्यावर आलेला काळिमा स्पष्ट दिसत असला तरी त्या काळिम्यापासून सूर्य किंवा चंद्र हे जसे पूर्णपणे निराळे असतात त्याप्रमाणे सुखदुःखादि भिन्न भिन्न संवेदनांपासून किंवा अवस्थांपासून संवेत्ता, अवस्थता, उपलब्धा किंवा ते जाणावयाचे तत्त्व हे स्पष्टपणे अलग असते. संवेत्त्याच्या म्हणजे त्या जाणावयाच्या तत्त्वाशिवाय भिन्न भिन्न संवेदनांची सिद्धी होऊ शकत नाही. क्षणिक ज्ञानवाद्यांच्या मताने अनेक नद्या समुद्राला मिळाल्यामुळे जे तादात्म्य होते त्यामुळे त्या एक आहेत असे वाटते. परंतु हा संवेत्ता म्हणजे काही निरनिराळ्या अवस्थांचे तादात्म्य नाही. जोपर्यंत पूर्वदशा व उत्तरदशा यांचा एकच प्रमाता म्हणजे ज्ञाता असत नाही तोपर्यंत कार्यकारण किंवा बाध्यबाधक भाव सिद्ध होत नाही. जर प्रत्येक क्षण विलक्षण होईल तर प्रत्येक संविद् निरनिराळी होईल. मग पूर्वीच्या प्रमाणांनी पुढील प्रमेयांचे ज्ञान

कसे होईल? संबंध कळल्याशिवाय प्रमाणाची काय गती होईल? संवेत्त्याशिवाय मिथ्या ज्ञानाचे मिथ्यात्व कसे सिद्ध होईल? एका क्षणाच्या नंतर जर शिंपल्यांची चांदी होणार असेल तर त्याला कोण अडवू शकणार? खरे पाहिले तर संवेत्ता एक असल्याशिवाय प्रमाण-अप्रमाणाचा भेद राहू शकणार नाही. घटाची सिद्धी होईल व अनुभव खोटा होईल. **"हा तोच आहे,"** हा प्रत्यय सुद्धा क्षणिक विज्ञानवाद्यांच्या मताने असू शकत नाही. यासाठी ज्याला प्रत्यभिज्ञा म्हणजे पूर्व विज्ञानाची स्मृती म्हणतात ती सर्वार्थाने खरी आहे. यासाठी नित्यस्वभाव आत्माच संवेत्ता आहे. खरी गोष्ट अशी आहे की, एक प्रमाता आत्म्याच्या सिद्धीशिवाय प्रमाणही अप्रमाण होईल; कारण सर्वच क्षणिक व अनिश्चित होईल. क्षणिक ज्ञानामध्ये कार्यकारणाची सिद्धी कशी होईल? स्मृतिबीज कसे राहील? जर कार्याचा नाश होत नसेल तर ते क्षणिक कसे ठरेल? जी गोष्ट दुसऱ्या क्षणाला राहू शकते ती गोष्ट शंभर क्षणही राहू शकते. खरी सांगावयाची गोष्ट अशी आहे की, सर्व भाव स्थिर आहेत. स्वरूपतः भावाचा अभाव होत नाही. आत्मज्ञानात काहीही क्षणिक नाही. निश्चयाशिवाय बाध्य-बाधक भावही सिद्ध होत नाही. शिंपल्यावर भासणाऱ्या चांदीचा भ्रम दूर करण्याला स्थिरतेशिवाय दुसरा उपाय नाही व दुसऱ्या कोणत्याही उपायाला काही अर्थही नाही. सारांश, ज्ञान एक आहे व ते नित्य आहे. ते क्षणिक व अनेक असू शकणार नाही.

**"सत्कार्यसिद्धी"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "जर प्रत्येक विज्ञान स्वतंत्र होईल किंवा असेल तर एक दुसऱ्याची संवेदना होऊ शकणार नाही. यासाठी पूर्वावस्था व उत्तरावस्था या दोन्हींचा ज्ञाता एक प्रमाता म्हणजे आत्माच आहे. तो विचित्र वृत्तींच्या द्वाराने व्यवहाराचा आश्रय होतो. अनेक वृत्तींच्या ज्ञानाचे अनुसंधान एका अजन्मा ज्ञानालाच होते. **"एकच चेतन स्मरण, ज्ञान, संशय, विपर्यय इत्यादि दोषांना दूर करण्याचे कारण असते,"** हे गीतेचे वचन सर्वथा सत्य आहे."

संवेत्याचे स्वरूप काय आहे? संवेत्ता म्हणजे आत्मा होय. ज्याप्रमाणे माळेतील प्रत्येक मण्यामध्ये दोरा अनुस्यूत असतो त्याप्रमाणे सुख-दुःख, राग-वैराग्य, मोह-प्रबोध इत्यादि जितक्या अवस्था आहेत त्यामध्ये आत्मा दोऱ्याप्रमाणे अनुस्यूत असतो. मी प्रथम सुखी होतो, आज दुःखी आहे. यातील सुख-दुःखामध्ये भेद आहे. मी मध्ये भेद नाही. या स्मृतीचे व प्रत्यभिज्ञेचे अनुसंधान किंवा ज्ञान आत्म्याला होते. या अवस्था विकल्पमात्र व अनित्य असल्यामुळे त्या अवस्थांमध्येही आत्म्याला आवरण राहू शकत नाही. त्यामुळे संवेत्ता किंवा

आत्मा त्या अवस्थांहून निराळा आहे. ज्याप्रमाणे चंद्र किंवा सूर्यग्रहण असावे त्याप्रमाणे अविद्येचे आवरण हे आत्म्यावरील ग्रहणमात्र आहे. दोरी अंधःकाराने झाकल्यामुळे ती साप होऊ शकत नाही व ती नष्टही होऊ शकत नाही. या बाबतीत श्रीभर्तृहरींचे असे वचन आहे की, **"अविद्या आत्म्याचे काहीही बिघडवू शकत नाही."**

**"संवित्प्रकाश"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "स्फटिक हा स्वभावतःच अत्यंत निर्मल असतो. ज्यावेळी जपाकुसुमासारख्या अर्थात् ज्यावेळी लाल जास्वंदाप्रमाणे असलेल्या फुलांवर स्फटिक ठेवतात त्यावेळी त्या फुलांच्या संयोगामुळे तो लाल दिसतो. भगवान् संवेत्त्याचे अत्यंत निर्मल शरीर जेव्हा निरनिराळ्या भावांनी भरून जाते म्हणजे समासक्त होते तेव्हा तो विविध प्रकारचा भासू लागतो." ज्याप्रमाणे स्फटिक रंगीत होऊ शकत नाही त्याप्रमाणे भावयुक्त होऊनही संवित् भावमुक्त असते. जरी ही आत्मसंवित् ग्रहणयुक्त किंवा रंगीत झालेली दिसली तरी ती आपल्या निजरूपाचा परित्याग करीत नाही. ती रूपांतरीत झाली आहे असे दिसते. खरी गोष्ट अशी आहे की, जे काही सर्व दिसते ते सर्व त्या आत्म्याचा विलास आहे. शुद्ध अनुभव आपल्या विविध आकारांनी दिसत असला तरी तो मूळ आकाराचा त्याग करीत नाही. उलट तो निर्मळच राहतो. पांढऱ्या वस्त्राला प्रथम एक रंग देऊन तो काढून टाकला व पुन्हा दुसरा रंग देऊन तो काढून टाकला तरी मुळातील पांढरे वस्त्र जसेच्या तसेच राहते. याचप्रमाणे शुद्ध चेतन आत्मा त्या त्या आकाराच्या रंगामुळे किंवा स्पर्शामुळे त्या त्या आकाराचा भासतो; परंतु तो कायम शुद्धच राहतो. या बाबतीत एक सुंदर वचन असे आहे की, **"निळा, पिवळा इत्यादि रंगांमध्ये किंवा सुख-दुःखादि भावनांमध्ये म्हणजे सर्व गोष्टींमध्ये चित्स्वरूप अखंडित राहते. चित्रविचित्र उपाधींचे नानाविध विकल्प चित्स्वरूप निरनिराळे आहेत असे फक्त भासविते."**

या विकल्पाहून चित्स्वरूप कसे विलक्षण म्हणजे निराळे आहे ते पुढील कारिकेत सांगितले आहे.।।४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

जागरादि अवस्थाविशेष आणि देहादि उपाधी यांनी स्वभावाचा किंवा व्यापक अहंप्रत्ययाचा निरोध कसा होत नाही हे दाखविले. आता

सुखदुःखभोगभेदानेही हा अहंप्रत्यय विरुद्ध कसा होत नाही हे या कारिकेत कथन केले आहे.

**स्पष्टीकरण :-** मागील कारिकेत देह व इंद्रिये यांच्या अवस्थांमुळे व्यापक अहं प्रत्ययाचा विरोध होऊ शकत नाही हे दाखविले. या कारिकेत सुखदुःखादि आंतरिक अवस्थाही व्यापक अहंप्रत्ययाचा निरोध करू शकत नाहीत हे सांगितले आहे. सुखादि आंतरिक अवस्थांशी अभिन्नतेनेच अहंप्रत्यय अनुभवास येत असला तरी तो अनेक नाही, एकच आहे; कारण तो त्या सर्व अवस्थांमधून एकरूप व अनुस्यूत आहे म्हणूनच तो व्यापकही आहे. असे जर न मानले आणि अवस्थापरत्वे अहंप्रत्ययाचीही भिन्नता मानली तर स्मृती, प्रत्यभिज्ञा इत्यादिकांना जीवनात अर्थच राहणार नाही. त्यामुळे जाग्रदादि अवस्थांप्रमाणेच सुखादि अवस्थाही व्यापक अहंप्रत्ययाचा निरोध करू शकत नाहीत. त्यामुळे व्यापक अहंप्रत्ययरूप स्वस्वभाव हीच श्रीशिवदशा होय.।।४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## सुखिता इत्यादींमध्ये स्पंदाची अनुस्यूतता

पूर्वसूत्रामध्ये असे म्हटलेले आहे की, जाग्रत इत्यादि अवस्थांमध्ये एकच अवस्थाता अर्थात् अवस्थांचा अनुभव घेणारा ज्ञाता व्याप्त असतो किंवा व्यापून राहिलेला असतो. परंतु विश्वामध्ये "मी सुखी आहे," "मी उपाशी किंवा भुकेलेला आहे," "मी कृश अर्थात् बारीक आहे," "मी कोणीही नाही," इत्यादि अनेक विकल्पात्मक अर्थात् संशयात्मक अनुभूती आहेत. ज्या प्रत्यक्षरूपामध्ये शरीर, बुद्धी, प्राण, शून्य यावर अवसित होणाऱ्या "अहं प्रतीती"च्या द्वारा अनुमेय अर्थात् अनुमानाने जाणता येणाऱ्या आणि सुख, दुःख इत्यादि उपाधींनी विशिष्ट अनेक प्रकारच्या जीवात्म्यांशी संबंधित असतात. अशा अवस्थेमध्ये प्रत्येक अनुभूतीशी संबंधित असलेल्या एकाच अनुभवाची वर्तमानता स्वीकारली कशी जाऊ शकते? या सूत्रामध्ये या शंकेचे समाधान केलेले आहे.

**वृत्ती :-** हा स्पंदात्मक स्वभाव सर्व अवस्थांमध्ये अनुस्यूत आहे अर्थात् धाग्याप्रमाणे ओवलेला आहे; कारण "जो मी आधी सुखी होतो,

तोच मी नंतर दु:खी किंवा अनुरक्त आहे," अशा प्रकारच्या अनुभूतींमध्ये साधारण अहंप्रतीतीच्या रूपामध्ये एकाच वेदकाची अनुस्यूतता आढळून येते. **"अन्यत्र"** हा शब्द या सर्व अवस्थांहून भिन्न असलेल्या स्वभावाचा द्योतक आहे. आगमशास्त्रामध्ये अर्थात् परंपरेने प्राप्त झालेल्या शास्त्रामध्ये "तो स्वभाव सर्व वस्तूंहून भिन्न तसेच उत्कृष्ट आहे," असे म्हटलेले आहे.।।४।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्रामध्ये ग्रंथकारांनी बौद्धांचा क्षणिकवाद, मीमांसकांचा सुख दु:ख इत्यादि उपाधींनी विशिष्ट असलेला आत्मवाद आणि चार्वाकांचा देहवाद यांचे सूत्रात्मक अर्थात् श्लोकात्मक रूपामध्ये खंडन करून आपल्या स्पंदसिद्धान्ताचे मंडन केलेले आहे. ग्रंथकाराच्या अभिप्रायाला सुलभतेने आणि योग्य प्रकारे हृदयंगम करण्यासाठी या सर्व दार्शनिकांच्या दृष्टिकोनांचा संक्षेपाने उल्लेख करणे आवश्यक आहे.

**१) बौद्ध दार्शनिकांचा क्षणिकविज्ञानवाद :-** या संसारामध्ये **"मी सुखी आहे," "मी दु:खी आहे,"** अशा प्रकारे व्यवहारात येणाऱ्या परामर्शाच्या रूपामध्ये भिन्न भिन्न आकार-प्रकारचे ज्ञान-क्षण हे प्रकाशमान असतात. या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही आधारभूत स्पंदात्मक चैतन्याची अर्थात् स्वभावभूत विश्वात्म्याची सत्ता स्वीकारणे योग्य नाही; कारण तसे केले असता कल्पनागौरवाशिवाय अन्य कोणताही लाभ होत नाही. (**"भारतीय दर्शन,"** श्रीबलदेव उपाध्याय पृ.१२४ पाहावे.) ते ज्ञानक्षण परस्परांहून भिन्न असूनही स्वत: प्रकाशवान आहेत. या ज्ञानक्षणांना दुसऱ्या कोणत्याही पदार्थाच्या साहाय्याने प्रकाशित होण्याची आवश्यकता भासत नाही. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की -

**..... ज्ञानान्येव प्रकाशन्ते, भिन्नकालानि भिन्नविषयाणि भिन्नाकाराणि च।।**

ज्ञान हे एकाच प्रकारचे नसते. प्रमाता म्हणजे जीव हा स्वत:ही या ज्ञानक्षणांशिवाय अन्य काहीही नाही. प्रमात्याच्या हृदयामध्ये अजस्त्ररूपाने भिन्न भिन्न काळी, भिन्न भिन्न विषय आणि भिन्न भिन्न आकार-प्रकारांसह संबंधित ज्ञानक्षणाची धारा वाहत राहते. या धारेलाच **"ज्ञान-संतान"** असे म्हणतात. ज्ञानक्षणांचे **"भिन्नत्त्व"** वर्णन करण्यामागील कारण

एवढेच की, ज्ञान हे केवळ तीनच क्षणापर्यंत राहत असते (**"भारतीय दर्शन,"** श्रीबलदेव उपाध्याय पृ.१२५) यामुळे प्रत्येक तीन क्षणांनंतर ज्ञानाचा वेळ, काळ, विषय आणि आकार-प्रकार बदलून जात असतो. असे असूनही या ज्ञानक्षणांमध्ये एकरूपता अनुभवास येत असते. याचे कारण पहिल्या ज्ञानक्षणाचे संस्कार हे उत्तर-उत्तर कालाच्या ज्ञानक्षणांना जन्म देतात. स्थितिस्थापकता अर्थात् पहिल्याप्रमाणेच असलेल्या अवस्थेला जन्म देणे हा संस्काराचा स्वभाव आहे. याच स्वभावामुळे प्रथम ज्ञानक्षणांचे संस्कार दुसऱ्या परंतु पहिल्याप्रमाणेच आकार-प्रकार असलेल्या अपर अर्थात् कनिष्ठ ज्ञानक्षणांना उत्पन्न करीत असतात. यामुळे हे ज्ञानक्षण एकरूप आहेत असे भासत असते.

ज्ञानक्षण हे निर्विकल्प आणि सविकल्प अशा दोन प्रकारांचे असतात. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, **"तत्र नीलप्रकाशः स्वलक्षणाभासं ज्ञानम्। स्वम् अन्याननुयायि स्वरूपसङ्कोचभागि लक्षणं देशकालाकाररूपं यस्य तस्य आभासः प्रकाशनम् अन्तर्मुखं यस्मिन्।।१.२.१।।"** याचा अर्थ असा आहे की, ज्ञानाची क्षणिकता असल्यामुळे नीलप्रकाश निर्विकल्परूप असतो. तो आपल्या स्वरूपाचे आभासरूप ज्ञान असतो. तो दुसऱ्यांचे अनुकरण करीत नाही. तो आपल्या स्वरूपाचा संकोच करणारा असतो. देश, काल व आकाररूप हे त्याचे लक्षण आहे. त्याचा आभास-प्रकाश अंतर्मुख राहतो.

"स्वलक्षणाभास" हे निर्विकल्प ज्ञानक्षणांचे शास्त्रीय नाव आहे. कोणत्याही वस्तूचे प्रथमच अर्थात् पहिल्यांदाच प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर त्या वस्तूशी संबंधित असलेला असा तो ज्ञानक्षण असतो. **"स्वलक्षणाभासं ज्ञानमेकम् .....।। ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी १.२.१।।"** यानुसार या ज्ञानक्षणामध्ये त्या प्रत्यक्ष दर्शन झालेल्या वस्तूचा नामरूपात्मक विकल्पांनी अर्थात् संशयांनी रहित आणि केवळ त्या वस्तूच्या विकल्पहीन स्वरूपामध्ये परिनिष्ठित रूपाचा अनुभव होत असतो. त्या वस्तूच्या किंवा अवस्थेच्या विकल्पहीन स्वरूपामध्ये संकुचित झाल्यामुळे हा प्राथमिक ज्ञानक्षण एकाच प्रकारचा असतो. यामुळे या क्षणाच्या द्वारा सांसारिक आदान-प्रदान शक्य होत नाही.

हा निर्विकल्प ज्ञानक्षण आपल्या संस्काराच्या द्वारा दुसऱ्या सविकल्प

ज्ञानक्षणाला जन्म देत असतो. या क्षणापर्यंत पोहोचता पोहोचता त्याच पूर्वानुभूत वस्तू किंवा अवस्थेसह नामरूपात्मक विकल्पांचा संबंध होत असतो किंवा येत असतो. **"साभिलापं विकल्पाख्यं बहुधा .....।। ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी १.२.१।।"** याचा अर्थ असा आहे की, (आपले आपण भासित होणारे स्वयंप्रकाश ज्ञानच एक श्रेष्ठ पदार्थ असून) ते विकल्परूपाने आपला अभिलाप म्हणजे विशेष विवरण असते. नामरूपात्मक विकल्प हे अनेक प्रकारचे असतात. या विकल्पासह अभिलाप अर्थात् शब्दामध्ये अभिव्यक्तीचा संबंध येत असतो. स्थानाला घेरून असलेल्या आणि वजनाने युक्त असलेल्या वस्तूला **"रूप"** असे म्हणतात. (**"भारतीय दर्शन,"** श्रीबलदेव उपाध्याय पृष्ठ १२४) वजनाने रहित आणि स्थानाला घेरून नसलेल्या वस्तूलाच **"नाम"** असे म्हणतात. या लक्षणानुसार पहिल्यामध्ये अर्थात् रूपामध्ये पृथ्वी, जल, तेज आणि वायू ही चार महाभूते आणि त्यापासून उत्पन्न झालेले शरीर आणि दुसऱ्या नामामध्ये विकल्पात्मक मानसिक प्रवृत्ती अंतर्भूत होत असतात.

वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान हे नामाचे चार प्रकार आहेत. फलतः रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान या पाच स्कंधांचा समुदाय हीच संतानरूपात वाहणारी ज्ञानधारा आहे. यातील **"विज्ञान"** हे निर्विकल्प ज्ञानक्षण असून **"संज्ञा"** हे सविकल्प ज्ञानक्षण आहेत. याआधी असे म्हटलेले आहे की, बौद्धांच्या मतानुसार हेच ज्ञानसंतान चेतन आत्म्याचे सर्व स्मरण, उपलब्धी इत्यादि कार्ये सिद्ध करीत असतात. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

**..... नापि तद्वयम्।।१.२.१।।**
**नित्यस्य कस्यचिद्द्रष्टुस्तस्यात्रानवभासतः।**
**अहंप्रतीतिरप्येषा शरीराद्यवसायिनी।।१.२.१।।**

याचा अर्थ असा आहे की, अनेक किंवा दोन प्रकारचेही विकल्प असत नाहीत; कारण की, या ठिकाणी कोणताही नित्य द्रष्टा भासमान होत नाही. येथे जी अहंप्रतीती होते ती शरीरालाच आपला विषय करते.

यामुळे याहून भिन्न अशा अन्य तसेच उपलब्ध आत्म्याची कल्पना करून या त्रिक्षणवृत्ती ज्ञानांचा या आत्म्याशी संबंध जोडणे हे यथार्थापासून दूर आहे. प्रत्यक्षात या ज्ञानक्षणांमध्ये अशा दुसऱ्या चेतन सत्तेची वर्तमानता

अनुभवावयास येत नाही. आता **"मी सुखी आहे"** इत्यादि परामर्शामध्ये अर्थात् विचारांमध्ये **"मी"** ची प्रतीती आढळून येत असते. तिचे पर्यवसान किंवा परिणती केवळ **"रूप"** अर्थात् शरीरसंतान अथवा **"नाम"** अर्थात् ज्ञानसंतान मध्ये होत असते.

**२) मीमांसकांचा उपाधिविशिष्ट आत्मवाद :-** मीमांसकांचा अर्थ येथे श्रीभाट्टमताचे अनुयायी श्रीकुमारिल सारखे उद्भट मीमांसागुरू असा आहे. मीमांसकांनी आपल्या काळी अनात्मवादी बौद्धांच्या प्रखर तर्कांना आपल्या पांडित्यपूर्ण तसेच अकाट्य अर्थात् बिनतोड तर्कांनी विशीर्ण अर्थात् विदीर्ण करून नामोहरम केले होते आणि भारतामध्ये पुन्हा वैदिक धर्माच्या मर्यादेचे पुनरुज्जीवन केले होते. या मीमांसकांचे मत हे पुष्कळ प्रमाणात न्यायाच्या प्रत्यक्ष, अनुमान इत्यादि प्रमाणांवर आधारित आहे. (**"भारतीय दर्शन,"** श्रीबलदेव उपाध्याय पृ.३१२ पाहावे)

मीमांसकांच्या मतानुसार कोणत्याही प्रकारच्या ज्ञानासह कोणते ना कोणते वैशिष्ट्य निश्चितपणे उपाधी बनून राहत असते. (**"भारतीय दर्शन,"** पृ.३२४ पाहावे.) चांदीच्या ज्ञानासह रजतत्व अर्थात् चांदीत्वही राहत असते. याचाच अर्थ असा आहे की, एखादे वैशिष्ट्य अथवा उपाधीच्या द्वाराच एखाद्या वस्तूचे यथार्थ ज्ञान उत्पन्न होत असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये सुद्धा याच नियमानुसार **"मी सुखी आहे", "मी दुःखी आहे"** इत्यादि परामर्शामध्ये अर्थात् विमर्शामध्ये सुखिता अर्थात् सुखत्व आणि दुःखिता अर्थात् दुःखत्वरूप वैशिष्ट्य किंवा उपाधी यांच्या द्वारा अशाच एखाद्या आत्मा नामक वस्तूची अनुमानाच्या द्वारा प्रतीती होत असते. ती या उपाधींनी युक्त आहे. **"मी सुखी आहे"** इत्यादि परामर्शामध्ये अर्थात् विचारामध्ये दोन प्रकारची प्रतीती अनुभवास येते. ही प्रतीती एक सुखिता अर्थात् सुखत्व इत्यादि रूप विशेषता किंवा उपाधींच्या द्वारा येते व दुसरी अहं द्वारा येते. सुखिता इत्यादींच्या येणाऱ्या प्रतीती हे गुण आहेत. गुण हा गुणीशिवाय स्वतंत्रपणे राहू शकत नाही. गुणाला एखाद्या आधारभूत गुणीची आवश्यकता असते. **"मी"** पासून त्याची प्रतीती होत असते. सुखिता इत्यादींचा तोच गुणी असतो. तोच आत्मा आहे.

याबरोबरच **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथामध्ये कथन केलेली ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की -

**सुखादि चेत्यमानं हि स्वतन्त्रं नानुभूयते।**
**मतुबर्यानुवेधस्तु सिद्धं ग्रहणात्मनः।।१।।**
**इदं सुखमिदं ज्ञानं दृश्यते न घटादिवत्।**
**अहं सुखीति तु ज्ञप्तिरात्मनोऽपि प्रकाशिका।।२।।**

याचा अर्थ असा आहे की, अनुभवाला आलेल्या सुखादि गोष्टींची स्वतंत्ररूपाने अनुभूती येत नाही. जर "मतुप्" प्रत्यय लावला तर आत्म्याचे ग्रहण होणे शक्य होते. एखाद्या घड्याप्रमाणे हे सुख आहे, हे ज्ञान आहे, असे दृष्टीस पडत नाही; परंतु मी सुखी आहे, मी ज्ञानी आहे, असे प्रकाशित किंवा प्रकट होत असते.

सुख, दुःख इत्यादि उपाधींचे एखाद्या उपाधी-विशिष्ट आधाराशिवाय घट, पट याप्रमाणे अल्प दर्शन होत नाही. यामुळे **"मी सुखी आहे"** इत्यादींच्या द्वारा सुख इत्यादि उपाधींनी विशिष्ट अशा **"मी"** अर्थात् आत्मभूत वस्तूची प्रतीती अनुमानाच्या साहाय्याने होत असते.

फलतः आत्म्याच्या विषयी मीमांसकांचा निर्णय असा आहे की, **"मी"** च्या प्रतीतीसह समवाय संबंधाने राहणारे सुख, दुःख इत्यादि वैशिष्ट्यांच्या द्वारा आत्म्याच्या सद्भावाचे अनुमान केले जाऊ शकते. चिद् आणि अचिद् हे या आत्म्याचे दोन अंश आहेत. **'चिदंशत्वेन दृष्टत्वं सोऽयमिति प्रत्यभिज्ञा, विषयत्वं त्व अचिदंशेन, ज्ञान-सुखादिरूपेण परिणामित्वम्।** (**"काश्मीरिक सदानन्द अद्वैतब्रह्म-सिद्धीः"**) **स आत्मा अहंप्रत्ययेनैव वेद्यः।** (**"भारतीय दर्शन,"** पृ.६०२) आत्मा हा चिद् अंशाच्या साहाय्याने ज्ञानाचा अनुभव घेत असतो आणि अचिद् अंशाच्या साहाय्याने सुखी इत्यादि उपाधींचे वैशिष्ट्य प्राप्त करून घेत असतो. याचा अर्थ असा आहे की, आत्मा हा स्वयं सुखदुःखादिरूप नाही; परंतु तद्विशिष्ट आहे. **"तद्विशिष्ट"** याचा अर्थ सुख, दुःख इत्यादि वैशिष्ट्यांच्या द्वारा परिणामाला प्राप्त करणारा असा आहे. श्रीकुमारिल भट्ट हेही मान्य करतात की, आत्मा ही स्वयं चेतन वस्तू नाही. परंतु शरीर आणि विषय यांच्याशी संयोग होण्याच्या अवस्थेमध्ये आत्मा हा **"चेतनविशिष्ट"** बनत असतो. हेच कारण आहे की, स्वप्नावस्थेमध्ये विषयांशी असलेला संबंध तुटल्यावर आत्म्यामध्ये तत्कालपर्यंत चैतन्य राहत नाही. परिणामतः आत्मा जडच आहे आणि बोधात्मक अर्थात्

ज्ञानात्मकही आहे.

या सर्व कथनाचा निष्कर्ष असा आहे की, **"मी"** प्रतीतीने अनुमेय अर्थात् अनुमान करता येणारा आणि सुखदु:ख इत्यादि उपाधींनी विशिष्ट वस्तू हाच आत्मा आहे. याहून दुसरा किंवा अन्य कोणताही स्वप्रकाश आत्मा नाही.

**३) चार्वाकांचा देहात्मवाद :-** अनात्मवादी दार्शनिकांमध्ये चार्वाकाचे स्थान हे प्राचीन तसेच महत्त्वपूर्ण आहे. प्राचीन भारतामध्ये चार्वाकांना लोकायतिक असेही म्हणत असत.

चार्वाकांचे मत असे होते की, शरीराहून भिन्न आत्मा नामक वस्तूचे अस्तित्व मानणे म्हणजे सत्याच्या नजरेत धूळ फेकण्याव्यतिरिक्त अन्य काहीही नाही. **"मी सुखी आहे," "मी दु:खी आहे"** इत्यादि अनुभवामध्ये सुख, दु:ख इत्यादींचा संबंध हा चेतन शरीराबरोबर आहे; कारण प्रत्यक्ष रूपात शरीरच पाहता येत असते. जे प्रत्यक्ष आहे तेच सत्य आहे. जे प्रत्यक्ष नाही त्या विषयामध्ये अनुमान इत्यादींचे हवेत इमले बांधणे हे मूर्खाचे काम आहे.

चार्वाक मतानुयायी शरीरालाच आत्मा मानण्याच्या पक्षामध्ये तीन प्रमाणे प्रस्तुत करतात. (**"भारतीय दर्शन,"** पृष्ठ ८१)

१) जोपर्यंत शरीर राहते (जीर्ण होत नाही) तोपर्यंतच चैतन्य हेही राहत असते. चैतन्य हे शरीराबरोबरच येते आणि शरीराबरोबरच जाते. अन्नपानामुळे चेतना (शरीररूप) वृद्धी पावत असते आणि त्याच्या अभावामुळे चेतनेचा ऱ्हास होत असतो. यावरून शरीर हेच चेतन आहे.

२) **"मी सुखी आहे," "मी दु:खी आहे," "मी उपाशी आहे"** इत्यादि अनुभवजन्य ज्ञान हे शरीराकडेच संकेत करीत असते; कारण सुखी, क्षीण इत्यादि शरीर होत असते. अन्य काहीही नाही.

३) चैतन्य आणि भौतिक पदार्थ यांचा परस्परांशी असलेला संबंध शाश्वत आणि यथार्थ असतो; कारण जे काही ज्या रूपामध्ये दिसून येते तेच सत्य आहे.

आता प्रश्न इतकाच आहे की, या भौतिक पदार्थांमध्ये चेतनेचा उदय कोठून होतो? (**"भारतीय दर्शन,"** श्रीबलदेव उपाध्याय, पृष्ठ ८१) या विषयी चार्वाकांचे कथन असे आहे की, प्रत्यक्षरूपामध्ये जड दिसणाऱ्या पृथ्वी, जल, तेज आणि वायू या चार महाभूतांच्या आकस्मिक आणि

एखाद्या निश्चित नियमानुसार होणाऱ्या संमिश्रणापासून स्वयंचैतन्याची उत्पत्ती होत असते. त्या संमिश्रणाचा लोप झाल्यावर चैतन्याचाही लोप झालेला आढळून येतो. महाभूतांच्या संमिश्रणापासूनच शरीराची उत्पत्ती होत असते. यामुळे स्वयंही चैतन्ययुक्त शरीर उत्पन्न होत असते आणि मेल्यावर त्या शरीराच्या चैतन्याचाही नाश होत असतो. सृष्टी आणि संहार हा जगताचा आपला स्वतःचा स्वभाव आहे. यामध्ये ईश्वराचा कोणताही सहभाग नाही. प्रत्यक्षात् ईश्वर नामक कोणताही पदार्थ अस्तित्वातच नाही. यामुळे जे काही आहे ते सर्व शरीरच आहे. शरीराचे आयू वाढविणे आणि या जीवनाला सुखमय बनविण्याचा उपक्रम करणे हे जीवनातील महत्त्वपूर्ण कार्य आहे. खा, प्या आणि मजा करा. धर्म म्हणजे काहीही नाही. धन आणि काम हीच जीवनाची परम लक्ष्ये आहेत. मुक्तीची कल्पना खोटी आहे. मृत्यू म्हणजेच मुक्ती आहे.

चार्वाकांच्या या कथनानुसार यांच्या मतांचा निष्कर्ष असा आहे की, सुख, दुःख इत्यादि अनुभूतींचा आणि मी या प्रतीतीचा सरळ संबंध शरीराशी आहे. यामुळे शरीराहून भिन्न अशा इतर आत्म्याची किंवा चेतन सत्तेची विद्यमानता स्वीकारली जाऊ शकत नाही.

बौद्ध दार्शनिकांचा क्षणिक-विज्ञानवाद, मीमांसकांचा उपाधिविशिष्ट आत्मवाद आणि चार्वाकांचा देहात्मवाद या तीन वादींचे तोंड बंद करण्याकरिता ग्रंथकर्त्याने या सूत्राने एकाच प्रहाराने या मतवादींच्या सर्व तर्कांना नेस्तनाबूद केलेले आहे. ग्रंथकाराच्या विचारानुसार **"मी सुखी आहे"** इत्यादि विमर्शामध्ये किंवा परामर्शामध्ये किंवा विचारामध्ये एकाच आधारभूत सत्तेच्या दोन रूपांची स्फुरणा अंतर्निहित आहे अर्थात् सामाविलेली आहे. श्रीभगवच्छक्ती ही संसाराची क्रीडा करण्यासाठी स्वेच्छेने ग्राह्यभूमिकेवर अवतीर्ण होऊन स्वयं सर्व प्रमेय अर्थात् ज्ञेय अर्थात् जाणून घेण्याची गोष्ट अशा पदार्थांचे रूप धारण करीत असते. श्रीभगवंतांच्या शक्तीच्या या रूपाचा आभास सुख, दुःख अथवा मूढता इत्यादि अवस्थाविशेषांनी प्राप्त होत असतो. श्रीभगवंतांची शक्ती ही सर्वस्वतंत्र अर्थात् मुक्त आहे. हीच श्रीभगवच्छक्ती संसारी ग्राहक अर्थात् ग्रहण करणारा या भूमिकेवर अवतीर्ण होऊन स्वेच्छेने अर्थात् स्वतःच्या इच्छेने स्वतःला पाच तन्मात्रा, मनस्, बुद्धी आणि अहंकार यांच्या पुर्यष्टकामध्ये अर्थात् शरीरामध्ये फसलेल्या संसारी प्रमात्याचे अर्थात् जीवात्म्याचे रूप धारण करीत असते. **"अहम्"**

या शब्दाने श्रीभगवच्छक्तीच्या या रूपाकडे संकेत केलेला आहे. "**अन्यत्र**" या शब्दाने संविद्‌चे अर्थात् श्रीभगवच्छक्तीचे विश्वोत्तीर्ण तसेच अनुत्तर अर्थात् ज्याहून श्रेष्ठ असे दुसरे काहीही नाही हे रूप अभिप्रेत आहे. या रूपाने श्रीभगवच्छक्ती प्रमातृभावावर अर्थात् जीवभावावर अवस्थित होऊन या सुख-दु:ख इत्यादि अवस्थांच्या द्वंद्वाहून विहीन असलेल्या पूर्ण आनंदघनतेमध्ये विलीन राहत असते. याचे फल म्हणून संवित्-श्रीभट्टारिकेच्या दोऱ्यामध्ये सर्व प्रमेयता ही माळेतील मण्यांप्रमाणे ओवलेली आहे. हाच तो अंतिम सोपान आहे जेथे पोहोचल्यावर साधकाच्या सर्व अवस्थांच्या कल्पना विश्रांत आणि समरस होत असतात. आता प्रश्न असा उरतो की, संवित् श्रीभट्टारिका शाक्त प्रसाराच्या क्षणी कशा प्रकारे स्वत: संसारी ग्राहक भूमिका अथवा ग्राह्यभूमिकेवर अवतीर्ण होत असते? या प्रक्रियेचे यावच्छक्य पर्यालोचन पुढील दोन सूत्रे आणि सूत्र बारा यांमध्ये करण्यात येणार आहे. येथे इतके ध्यानात ठेवणे पर्याप्त किंवा पुरेसे आहे की, शरीर, प्राण, पुर्यष्टक, शून्य इत्यादि सर्व जड तसेच अजड पदार्थांच्या ज्ञानरूपतेमध्ये एकच आधारभूत तसेच जीवनदायिनी स्पंदशक्ती अनुस्यूत असते अर्थात् अखंड व्यापून राहिलेली असते. या स्पंदशक्तीच्या परमार्थसत्तेला कोणत्याही प्रकारे नाकारले जाऊ शकत नाही.

ग्रंथकाराच्या आशयाला किंवा अर्थाला योग्यप्रकारे स्पष्ट करण्यासाठी आता उपर्युक्त आशयाच्या पृष्ठभूमीवर पूर्वोक्त मतवादांचे थोडेसे परीक्षण करणे हे युक्तियुक्त होईल.

**१) बौद्धवादाचे पर्यालोचन अर्थात् चिंतन किंवा जाणणे (ज्ञान) :-** **"ज्ञानसन्तान एव तत्त्वम्" इति सौगता बुद्धिवृत्तिषु एव पर्यवसिता: ।। प्रत्यभिज्ञाहृदय सूत्र ८।।** याचा अर्थ असा आहे की, विज्ञानाच्या धारेला किंवा प्रवाहाला परमार्थ मानणारे सौगत अर्थात् बौद्धही बुद्धीचे वृत्तींमध्ये अर्थात् आपल्या सिद्धान्तातच पर्यवसान करतात. बौद्धांनी ज्या भिन्न कालीन ज्ञानांची प्रकाशमानता स्वीकारलेली आहे ती सर्व त्रिगुणात्मक प्रकृतीच्या विकारभूत बुद्धीवर पर्यवसित होत असते अर्थात् या सर्व ज्ञानांची समाप्ती किंवा शेवट हा त्रिगुणात्मक प्रकृतीच्या विकारभूत बुद्धीमध्ये होत असतो. या विषयामध्ये ही गोष्ट विचारणीय आहे की, ज्ञानाचे भिन्नकालीन खंड होऊ शकतात का? ज्ञान हे स्वयं जड आहे की चेतन आहे? जर ज्ञान हे भिन्नकालीन आणि भिन्न आकाराचे आहे असे मानले

तर या ज्ञानामुळे कोणतीही प्रतीती येणे कसे शक्य आहे? तसेच ज्ञान हे जड असेल तर जड असल्यामुळे हे ज्ञान कोणत्याही प्रकारच्या प्रतीतीला प्रकाशित कसे करू शकते? जर ज्ञान हे चेतन असेल तर बौद्धांना जडाहून भिन्न अशा एका चेतन सत्तेचा स्वीकार करावाच लागेल. बौद्ध हे ज्ञानाला स्वप्रकाश मानतात. प्रकाशमानता अर्थात् विषयाला प्रकाशित करण्याबरोबरच स्वतःलाही प्रकाशित करणे हा केवळ चेतनसत्तेचाच स्वभाव होऊ शकतो. परंतु बौद्ध लोक स्वयं द्रष्टा किंवा उपलब्धा याच्या रूपामध्ये केवळ एकाच चेतन सत्तेचा स्वीकार करण्याच्या पक्षामध्ये नाहीत. याचा परिणाम म्हणून या लोकांच्या द्वारा स्वीकारले गेलेले भिन्नकालीन तसेच भिन्नाकार ज्ञान हे अनेकाकार असल्यामुळे केवळ वेद्यच अर्थात् ज्ञेयच किंवा जाणून घेण्याची गोष्ट किंवा जिचे ज्ञान करून घेतले जाते असे होते. ते वेदक अर्थात् ज्ञाता होत नाही. अनेकाकारता हीच वेद्यता अर्थात् ज्ञेयता आहे. वेद्यतेमध्ये अर्थाला प्रकाशित करण्याचा स्वभाव असत नाही. यामुळे अर्थप्रकाशितेच्या अभावामध्ये हे ज्ञानक्षण स्वतः जडच आहेत. हे ज्ञानक्षण कदापि प्रकाशमान मानले जाऊ शकत नाहीत.

याबरोबरच बौद्ध लोकांचा विचार असा आहे की, संसारातील सर्व आदान-प्रदान हे दुसऱ्या सविकल्प ज्ञानक्षणामुळे चालत असतात आणि पहिला निर्विकल्प ज्ञानक्षण हा या आदान-प्रदानाचा आधार आहे. प्रत्यक्षात गोष्ट अशी आहे की, ज्ञानाचा प्रथम क्षण हा अनुभवकाल असून दुसरा क्षण स्मृतिकाल असतो. संसारातील सर्व व्यवहार हे प्राथमिक अनुभवावर आधारित नसून त्याच्या स्मृतीवर आधारित असतात. याचे कारण असे आहे की, विश्वामधील एकाच पदार्थाला शेकडो वेळा पाहण्याने प्रत्येक पाहण्याला पहिला अनुभव असे म्हटले जाऊ शकत नाही. अनुभव-कालामध्ये विषयांचा ज्या रूपामध्ये अनुभव आलेला असतो, स्मृति-कालामध्ये विषय हे नेमके त्याच रूपामध्ये प्रकाशित होत असतात. जेव्हा अनुभवक्षणामध्ये स्मृती नाही आणि स्मृतिक्षणामध्ये अनुभव नष्ट झालेला आहे अशा परिस्थितीमध्ये स्मृतिक्षणामध्ये घट, पट आदि पदार्थांचे अनुभवकालीन रूप कशा प्रकारे प्रकाशित होऊ शकते? ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. विषय त्याच स्वरूपात प्रकाशित न झाल्याने अशा अवस्थेत त्या विषयांची स्मृती तरी कशी काय शक्य आहे? आणि

परिणामतः संसारातले व्यवहार चालणे तरी कसे काय शक्य आहे?

आता जर बौद्धांचे संस्कारसिद्धान्त मान्य केले की, अनुभवाच्या संस्कारांनी स्मृतिक्षणामध्ये योग्य अनुभवकालाच्या आकार-प्रकारच्या विषयाचे प्रकाशन होत असते तर एक अडथळा निर्माण होतो. तो अडथळा असा की, पहिल्यासारखी स्थिती स्थापन करणे हा संस्काराचा स्वभाव आहे. अनुभवकालाचे संस्कार स्मृतिकालामध्ये पूर्णपणे अनुभवकालाशी समान रूप असलेल्या ज्ञानाला जन्म देत असतात. अनुभवकालामध्ये विषयांचा अनुभव निर्विकल्परूपामध्ये होत असतो. तसेच स्मृतिकालामध्येही ज्ञानाचे रूप हे निर्विकल्पच असते अर्थात् स्मृतीचा विषय बनलेल्या ग्राह्य पदार्थामध्ये कोणत्याही प्रकारची नामरूपादींची कल्पना करणे शक्य असत नाही. अशा अवस्थेमध्ये स्मृतीच्या द्वाराही संसाराचे अर्थात् जगताचे आदान-प्रदान संभव होणे कसे शक्य आहे?

हे अडथळे नजरेसमोर ठेवून शैवदार्शनिक हे या निर्णयाप्रत पोहोचलेले आहे की, प्रत्यक्षात या दोन्ही ज्ञानक्षणांमध्ये याहून भिन्न चेतन आणि स्वयंप्रकाशमान सत्ता अनुस्यूत आहे अर्थात् गुंफलेली आहे किंवा व्यापलेली आहे किंवा अखंड आहे. ज्याप्रमाणे बीजामध्ये पूर्ण वृक्ष अवस्थित असतो त्याप्रमाणे या स्वयंप्रकाशमान सत्तेमध्ये सर्व अनुभव, स्मृती, आकार आणि प्रकार अवस्थित असतात. ही चेतन सत्ता स्वप्रकाश असल्यामुळे आपल्या आंतरिक अनुसंधानाच्या द्वारा अनुभव आणि स्मृती यांना एकाकार बनवून आणि निर्विकल्पाला नामरूपादींच्या कल्पनेच्याद्वारा सविकल्पाचे रूप देऊन जगताचे सर्व व्यवहार चालवीत असतें.

**२) मीमांसकवादाचे पर्यालोचन अर्थात् विवेचन किंवा चिंतन :-**

**अहंप्रतीतिप्रत्येयः सुखदुःखाद्युपाधिभिः तिरस्कृतः आत्मा इति मन्वाना मीमांसका अपि बुद्धावेव निविष्टाः ।।**

**।। प्रत्यभिज्ञाहृदय सूत्र ८ ।।**

याचा अर्थ असा आहे की, सुखदुःखादि उपाधींनी परिच्छिन्न म्हणजे झाकलेल्या आत्म्याची प्रतीती अहंप्रत्ययावर आश्रित आहे असे मानणारे मीमांसकही बुद्धीपर्यंतच येऊन पोहोचतात. "सुखदुःखादिविशिष्ट मी" प्रतीतीलाच आत्म्याचे नाव देऊन मीमांसक हे प्रत्यक्षात बुद्धितत्त्वावरच अवस्थित आहेत; कारण सुख, दुःख आणि मोह या अंतःकरणाच्या वृत्ती

आहेत. या विषयामध्ये हे विचारणीय आहे की, जर आत्मसत्ता ही प्रतिक्षण सुखदु:खादींच्या उपाधीखाली दबलेली राहत असेल तर या आत्मसत्तेला चेतन आणि स्वतंत्र म्हटले जाऊ शकत नाही. दुसऱ्या बाजूला सुखदु:खादि अवस्थांना त्यांच्या प्रतिद्वंद्वीच्या रूपामध्ये एक वेगळा सत्तावान पदार्थ मानावे लागेल. परंतु असे असू शकत नाही; कारण सुखदु:खादि हे स्वयं जड आणि अनेक असल्यामुळे शाश्वत सत्तावान पदार्थ मानले जाऊ शकत नाही. श्रीकुमारिलाप्रमाणे प्रख्यात मीमांसक आत्म्याला स्वतंत्ररूपामध्ये चैतन्य न मानता चैतन्यविशिष्ट मानत असतात. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, आत्म्यामध्ये चैतन्य हे अन्य कोठल्यातरी ठिकाणाहून अर्थात् स्थानाहून आलेले आहे. हे चैतन्य कोठून आले? ही गोष्ट स्पष्ट नाही. चैतन्य हे आत्म्यामध्ये कोठून आलेले असले तरी त्याला स्वतंत्र न ठेवता आत्म्याची विशेषता बनविणे आणि आत्म्याला त्याचे विशेष्य बनविणे हे निष्प्राण पत्नीच्या गळ्यामध्ये सोन्याचा हार घालण्याप्रमाणे आहे. **"गुण हे गुणींशिवाय राहू शकत नाहीत,"** हे म्हणणे न्यायसंगत नाही. अशा अवस्थेमध्ये आत्म्याची स्वतंत्रता आणि एकता संशयातीत असते. त्याबरोबरच हा नियम केवळ संसारभूमिकेवर लागू होत असतो; कारण की, गुणांना सत्ता प्रदान करूनही त्या गुणांपासून अतीत अर्थात् पलीकडे असणाराच विश्वात्मा बनू शकतो. परिणामतः या मीमांसकांचा उपाधिविशिष्ट आत्मवाद हाही संतोषजनक किंवा समाधानकारक नाही.

**३) चार्वाकांच्या देहात्मवादाचे पर्यालोचन अर्थात् चिंतन किंवा विवेचन :-** चार्वाकांची ज्ञानमीमांसा प्राचीन भारतातील सर्व बौद्ध, जैन आणि ब्राह्मण मतवाद्यांना समानरूपाने कधीही मान्य झालेली नाही. (पाहा :- **"भारतीय दर्शन,"** श्रीबलदेव उपाध्याय पृ. ७३-८७) कमीत कमी आजही जरी विश्वाच्या कानाकोपऱ्यामध्ये भौतिकवाद हा आपल्या चरमसीमेवर पोहोचला असला तरी चार्वाकीय विचारधारा ही भारतीय वसुंधरेवर अर्थात् जमिनीवर रुजून बहरू शकत नाही. येथील जनमानसात खोलवर शैव आणि वेदान्त यांच्यासारख्या दर्शनांच्या अध्यात्मवादाने शताब्दीपासून अर्थात् शेकडो वर्षांपासून इतकी मजबूत मुळे रोवलेली आहेत की, कोणतीही किंवा कोणत्याही प्रकारची भौतिकता मूलक विचारधारा या वादाला हलवू शकत नाही. चार्वाकांची ज्ञानमीमांसा ही स्पष्टरूपाने देहात्मवाद,

प्रत्यक्षवाद आणि आधिभौतिक सुखवादावर आधारलेली आहे. या ज्ञानमीमांसेमध्ये धर्म, आचार आणि ईश्वर यांना कोणतेही स्थान नाही. भारतामध्ये दिवसभर कडक उन्हामध्ये काम करणारा शेतकरी किंवा रस्त्यावर दगड फोडणारा मजूर संपूर्ण दिवस आपला घाम गाळून आणि रक्त आटवून सायंकाळी मंदिरामध्ये जाऊन जोपर्यंत श्रीभोलानाथ किंवा श्रीगिरीधर यांची आरती किंवा भजन करीत नाही तोपर्यंत त्याला चैन कोठे? अशा व्यक्तीचे पोट जरी अर्धे रिकामे असले तरीही जोरजोराने टाळ वाजविण्यामध्ये त्याला अपूर्व आनंद आणि संतोष प्राप्त होत असतो. ही गोष्ट अशा श्रमकऱ्यांच्या रक्तामध्ये मिसळलेली आहे. शेवटी याशिवाय या कामकऱ्याला वेगळे कसे काय करता येईल?

चार्वाकांचा देहात्मवाद हा शरीराची नश्वरता प्रत्यक्षरूपाने पाहिल्यानंतरच संशयात पडत असतो; परंतु प्रत्यक्षवादाचा स्वीकार करणे हे तर्काला अनुकूल नाही. शेवटी जगतामधील व्यवहार कधी कधी अनुमान किंवा आप्तवाक्य यांवर चालताना दिसून येतात. यामुळे या दोन्ही प्रमाणांना कोणाच्या सांगण्यावरून खोटे ठरविले जाऊ शकत नाही. याबरोबरच या लोकांनी भौतिकसुखवादाच्या अंतर्गत ज्या प्रकारच्या आचार-विचाराची रूपरेखा प्रस्तुत केलेली आहे, ती रूपरेखा आदर्शवादी भारतीय लोकांना कधीही मान्य होणार नाही.

फलतः याचा असा निष्कर्ष निघतो की, अध्यात्मवादाच्या पृष्ठभूमीवर चार्वाकांच्या देहात्मवादावर टीका करणे हा पूर्णपणे अन्याय आहे; कारण जेव्हा हे लोक शरीराशिवाय अन्य कोणत्याही आत्मा नामक सत्तेच्या सद्भावाचा स्वीकार करीत नाहीत तोपर्यंत त्यांना अध्यात्मवादाचा सिद्धान्त मान्य करा असे सांगता येणे कसे शक्य आहे?।।४।।

*****

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

"हे एकमेव संविद्रूपच हर्षविषाद इत्यादि अनेक आकार आणि प्रकारांचे आहे." या उक्तीच्या बळावर बौद्ध (सौगत) ज्ञानसंतान (अर्थात् ज्ञानाचे अखंडत्व) हेच परम तत्त्व आहे असे मानतात. तर मीमांसक असे मानतात की, एखाद्याच्या जाणीवेला येणारा असल्याने अस्तित्त्वाची सिद्धी होणारा आत्मा हा नेहमीच सुखादि उपाधींनी तिरस्कृत अर्थात् आच्छादिलेला

असतो. या दोघांचीही मते एकाच श्लोकात निराकरण करतात.।।४।।

## श्लोकाचे पहिले स्पष्टीकरण

**स्पष्टीकरण :-** जो मी सुखी आहे तोच मी दुःखी आहे. सुखानुशायी रागाने युक्त असल्यामुळे रक्त, दुःखानुशायी द्वेषाने संबंधित असल्याने द्विष्ट (द्वेषी) इत्यादि जे ज्ञान आहे ते एका शाश्वत स्वतत्त्वामध्ये अस्तित्वात असते म्हणजेच हे ज्ञान स्फुट म्हणजेच स्वसाक्षी होऊन तेथेच अंतर्मुखात स्वयंसिद्धतेने विश्रांती घेते. असे जर मानले नाही तर क्षणिक ज्ञानाचा आणि त्याच्या संस्कारांमुळे उत्पन्न होणाऱ्या विकल्पांचा (कल्पनांचा) आंतरसंबंध हा सुसंबंध राहणार नाही; कारण क्षणिक ज्ञान हे उत्पन्न झाल्याक्षणीच स्वतःच नष्ट होत असते आणि ज्ञानाच्या अनुपस्थितीत विकल्पांची प्रवृत्ती कधीच होत नसते.

येथे तीन वेळा वापरलेला चकार हा अनुसंधान अर्थात् योग्यसंबंध दाखवीत आहे; कारण तो एका गोष्टीचा दुसऱ्याशी व तिचा अन्य गोष्टीशी संबंध सुचवितो.

**"अन्यत्र"** म्हणजेच ज्यात उदय पावत असणाऱ्या आणि शांत होणाऱ्या सुखादि अवस्था अशा अनुस्यूत असतात अर्थात् ज्याप्रमाणे एखाद्या दोऱ्यामध्ये मणी ओवलेले असतात त्याप्रमाणेच या सुखादि अवस्था (स्पंदतत्त्वात) ओवलेल्या असतात. "ताः" या कारिकेतील पदाने एकमेकांशी योग्य संबंधित असणाऱ्या अवस्थांची स्मर्यमाणता अर्थात् आठवणीत येणे सांगत क्षणिकज्ञानवाद्यांच्या मते अनुभवांच्या संस्कारांपासून उत्पन्न होत असल्यामुळे अर्थाकारांनी म्हणजेच अनेक वस्तूंनी अलंकृत अथवा आच्छादलेल्या स्मृती या अनुभवांसारख्या असतात आणि भूतकाळात अनुभवास आलेल्या वस्तूंचा निश्चय त्या करू शकत नाहीत. जो सर्वांच्या संविद्रूप अंतरात राहतो अशा एकाच प्रमात्याचे अस्तित्व मान्य केल्याने सर्व गोष्टींची योग्य संगती लागते. परंतु सुकुमारहृदय वाचकांना उद्वेग आणणाऱ्या वर्णन करण्यास अवघड अशा गोष्टी पुरे. ज्यांना या गोष्टीविषयी अधिक जाणून घ्यावयाचे असेल त्यांनी प्रत्यभिज्ञाग्रंथाचे अध्ययन करावे. सूत्रकारांनी ज्या गोष्टी येथे थोडक्यात सांगितल्या आहेत त्या गोष्टींचे मी येथे अधिक स्पष्टीकरण केलेले आहे. त्यामुळे ज्ञात्या लोकांनी आम्हाला दोषी ठरवू नये.

## श्लोकाचे दुसरे स्पष्टीकरण

**स्पष्टीकरण** :- मीमांसकांच्या मताचा परिहार करण्यासाठी अशा प्रकारे स्पष्टीकरण करावे. **"मी सुखी"** इत्यादि जाणीव किंवा संविद् पुर्यष्टकस्वरूप असणाऱ्या प्रमात्यामध्ये सुखादि अवस्था ओतप्रोत भरलेल्या रूपामध्ये लोकांच्या अनुभवास येणाऱ्या साक्षिस्वरूपात स्थित असते. परंतु आमच्या मताप्रमाणे (ही अवस्था) चिदानंदघन श्रीशंकरात्मक स्वस्वभावात राहत नाही. त्यामुळे यथार्थतत्त्व नेहमीच सुखादि उपाधींनी झाकलेला आत्मा नसून चिन्मयस्वरूप आहे.

परंतु ज्यावेळेस त्याच्या निजाशुद्धीने पुढे स्पष्टीकरण करावयाचे असेल; त्यावेळेस हे परमतत्त्व आपले खरे स्वरूप झाकून राहते आणि पुर्यष्टकादि अवस्थांमध्ये ते आत्मतत्त्व अर्थात् तो (आत्मा) निश्चितच सुखी आदि (भावनांनी युक्त) असतो. परंतु येथेही आधीच सांगितलेल्या सुखादींनी त्याला निरोध केला जात नाही. अशा प्रकारे हा आत्मा कधीच झाकला जाऊ शकत नाही.

**"मी कृश", "मी स्थूल"** अशा प्रतीतींचा त्याग करून **"मी सुखी" "मी दुःखी"** या प्रतीती सांगण्याचा ग्रंथकाराचा आशय असा आहे की, सुखत्वादि प्रतीतींनी भिन्न झालेल्या पुर्यष्टकभूमीला अंतर्मुख पदात बुडवून त्याच्या अनुषंगाने बाह्य देहघटादींच्या नाशामुळे किंवा नष्ट होण्यामुळे आपण श्रीशिवांशी एकात्म आहोत असे (जीव) जाणून घेतो. त्यामुळे पुर्यष्टकाचे शमन करण्यासाठीच प्रयत्न करावा. (पुर्यष्टक म्हणजे मन, बुद्धी, अहंकार, आकाश, वायू, तेज, जल व पृथ्वी यांनी बनलेले शरीर होय.)।।४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

जाग्रत् आदि अवस्थांमध्ये एकच ज्ञाता व्यापून राहिलेला असतो हे सांगितले; परंतु मी सुखी, मी दुःखी इत्यादि अनुभवकालामध्ये "अहम्"ची प्रतीती विषयाकाराने म्हणजेच विषयांनी युक्त अशी भासते. अशा स्थितीत कशा प्रकारे तुम्ही म्हणता की, सर्वत्र संविदात्म्याची एकरूपताच विद्यमान असते. परंतु या प्रश्नाला येथे अवसरच नाही असे **"अहं सुखी च .....।।४।।"** या कारिकेत सांगितले आहे. कारण मी सुखी, मी दुःखी,

मी अनुरक्त इत्यादि रूपाने व्यवहारात जो अनुभव निर्माण होतो तो अनुभव अंतःकरणधर्मव्यतिरेकाने अर्थात् अंतःकरणाच्या धर्माने रहित आणि शरीर-इंद्रियादि विकल्प ज्ञान व्यतिरेकरूप अर्थात् शरीर इंद्रियादि विकल्पज्ञानाने रहित अशा संवित्सत्तेने संभव होतो. ती संवित्सत्ता सर्व अवस्थांमध्ये आणि सर्व पदार्थांमध्ये दोऱ्यात ओवलेल्या मण्यांच्या समूहाप्रमाणे अनुस्यूत झालेल्या रूपामध्ये राहते. त्यामुळेच **"मी सुखी"** इत्यादि प्रकारांमध्ये अनुभव घेणाऱ्याची सत्ता भिन्न नसते. सर्व ज्ञेयवस्तूंमध्ये राहत असूनही ती संवित् कमळाच्या पानाप्रमाणे ज्ञेयदोषांनी लिप्त होत नाही. हाच भगवान् श्रीपरमशिवांचा स्वतंत्रस्वभाव आहे अर्थात् ज्याप्रमाणे अग्नीचा दाहकत्व किंवा जाळणे हा स्वभावच असतो, पाण्याचा थंडपणा हा स्वभाव आहे आणि बीजांचा अंकुर उत्पन्न करणे हा स्वभाव आहे त्याचप्रमाणे संविदात्म्याचा जगताची उत्पत्ती इत्यादि कामे करणे हाच स्वभाव आहे.।।४।।

* * * * *

**न दुःखं न सुखं यत्र न ग्राह्यं ग्राहको न च।**
**न चास्ति मूढभावोऽपि, तदस्ति परमार्थतः।।५।।**

**अन्वयार्थ :-**

**तत्** - ते स्पंदतत्त्व, **परमार्थतः** - तत्त्वतः, (वास्तविक स्वरूपात), **अस्ति** - सत् व नित्य आहे, **यत्र** - ज्याचे- (स्पंदतत्त्वाच्या ठिकाणी), **दुःखं न** - दुःख नाही, **सुखं न** - सुख नाही, **ग्राह्यम्** - ग्रहण होण्याचा धर्म, ग्राह्यता, **ग्राहक** - ग्राहकता, इंद्रियपण, **न** - नाही, **च** - आणि **मूढभावोऽपि** - अचेतनत्त्व सुद्धा, **न अस्ति** - नाही.।।५।।

**अर्थ :-** ते स्पंदतत्त्व हे तत्त्वतः अर्थात् वास्तविक स्वरूपात सत् व नित्य आहे. या स्पंदतत्त्वाच्या ठिकाणी दुःख नाही, सुख नाही, ग्राह्यता अर्थात् ग्रहण होण्याचा धर्म नाही, ग्राहकता नाही आणि मूढभावही अर्थात् अचेतनत्वही नाही.।।५।।

* * * * *

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

श्रीशंकर हे साक्षिरूपाने सर्वत्र व सर्वकाली व्यापून असतात. त्यामुळे सुखदुःखादि अंतःकरणाचे व शब्दस्पर्शादि इंद्रियांचे विषय हे वास्तविक

पाहता नाहीतच; कारण श्रीपरशिवरूप जे आहे ते ज्ञानस्वरूप आहे. तेव्हा श्रीपरशिवज्ञानस्वरूप शब्द इत्यादींचा विषय होऊ शकत नाही म्हणून ते ग्राह्य नाही. ज्यांना द्वैताची भावना होते असे ज्ञातेसुद्धा ही गोष्ट मानतात. खरे श्रीशिवस्वरूप सर्व ठिकाणी व्यापून आहे. त्यामुळे ग्राह्य व ग्राहक हे दोन्हीही पदार्थ नाहीत. निव्वळ ज्ञानस्वरूपच सर्व ठिकाणी व्यापून आहे. मूढ अवस्थेमध्ये द्वैताचे भान नसते म्हणून ते परब्रह्म मूढ आहे काय? तर ते परब्रह्म तसे मूढ नसून नेहमी ज्ञानस्वरूपच आहे. त्याला कोणत्याही अवस्थेची बाधा होत नाही. मग परब्रह्मस्वरूप हे अभावरूप आहे का? परब्रह्माचे स्वरूप कधीही लोप न पावणारे व ज्ञानरूप आहे. सुख व दुःख या कल्पना आहेत. विद्यमान जेवढे पदार्थ आहेत तेवढे क्षणभंगुर आहेत म्हणून ते असत्य व अनित्य आहेत. वेदक किंवा जाणणारा असे म्हणतो की, ज्ञान किंवा परमस्वरूप हेच एक सत्य आहे. पदार्थमात्र संपादन करण्याची अशी जी स्वतंत्र शक्ती आहे तिने श्रीशंकर युक्त आहेत.

हे स्पंदतत्त्व परमार्थतः आहे; कारण ते नित्य आहे. त्यात आध्यात्मिक दुःखादि व वैषयिक सुखादि काहीही नाही. घटपटादि ग्राह्यही नाही. मी या गोष्टींना ग्रहण करणारा सविकल्प ग्राहकरूप प्राकृत अहंकार आहे असेही नाही; कारण अविद्येशिवाय अहंकार असू शकत नाही. यावरून अधिष्ठातारूप ग्राहक अहंकाराचा अभाव सांगण्याचा उद्देश नाही; कारण त्यालाच तर जाणावयाचे आहे. **"तत्त्वगर्भ"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "परमार्थामध्ये ग्राह्य व ग्राहक वगैरे काही नाही. परमार्थाच्या ज्ञानाशिवाय आपली छाया सुद्धा आभासाप्रमाणे वाटू लागते. मग ते स्पंदतत्त्व काय पाषाणाप्रमाणे मूढ किंवा शून्य आहे? अगदी नाही. ते स्पंदतत्त्व जड, मूढ किंवा शून्य नाही. ते स्वप्रकाश, सर्वांना प्रकाशित करणारे, सर्वोत्तम व सर्वसामर्थ्यशाली असे श्रेष्ठ तत्त्व आहे. शीतकालामध्ये व उष्णकालामध्ये शीत व उष्ण हे दोन्हीही नसतात. तसेच सुखदुःखामध्ये सुखही नसते व दुःखही नसते. मात्र आत्मतत्त्व या दोहोंमध्ये असते. **"तत्त्वस्तुती"** या ग्रंथामध्ये असे वचन आहे की, "ज्याप्रमाणे दुसऱ्या कोणत्याही भावाशिवाय किंवा संबंधाशिवाय सूर्याचा उदय होतो त्याचप्रमाणे वेद्याशिवायही त्याचा आपला स्वतःचा प्रकाश असतो. विशेषाच्या शिवाय सामान्याचा किंवा व्यक्तीच्या शिवाय जातीचा निराळा निर्देश करता येत नाही. परंतु असेही म्हणता येणे शक्य नाही की, सामान्य बरोबर विशेष नाही. स्वसंवेदन-

संवेद्य व संविन्मयी स्थिती नित्य शुद्ध निजस्वरूप आहे. त्या स्थितीत सुखदुःखाची कोणतीही विशेषता नाही. हे तत्त्व निराळे ते निराळेच. **"नागार्जुनाने"** ही असे म्हटले आहे की, "ते तत्त्व सर्व आलंबन, धर्म, तत्त्व क्लेश, इत्यादि आशयांपासून संपूर्णतः शून्य आहे; परंतु परमार्थतः मात्र ते तत्त्व शून्य नाही." **"आलोकमाला"** या ग्रंथामध्ये आणखी निराळ्या प्रकाराने तत्त्वावर प्रकाश टाकला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, "आत्मतत्त्व हे तमोवृत्तीच्या विरुद्ध आहे. यासाठी हे तत्त्व तमोवृत्तीला कधीही अवकाश, अवसर किंवा जागा देत नाही. खरोखरच हे आत्मतत्त्व सर्वसाधारण सामान्य लोकांच्या दृष्टीने न जाणण्यासारखीच अवस्था आहे. त्याला आम्ही शून्यता म्हणतो. लोकरूढीमध्ये नास्तिकताबोधक जो शून्यता शब्द सूचित केला जातो किंवा वापरला जातो तसा आमच्या शून्याचा अर्थ नाही."

हे आत्मस्वरूप जड नसून निश्चितरूपाने चिन्मयस्वरूप आहे. याचे प्रमाणांनी पुढे विवेचन केले आहे.।।५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

अशा प्रकारे स्वस्वभाव हीच श्रीशिवदशा होय हे सांगितले. आता त्याच्या लक्षणाचा अनुवाद करून परमार्थतः त्यालाच सत्ता आहे हे या कारिकेत कथन केले आहे.

**स्पष्टीकरण :-** वेद्य म्हणजे अनुभवनीय विषय. वेद्य आभ्यंतर व बाह्य असे दोन प्रकारचे आहे. आभ्यंतरवेद्य मनोग्राह्य आहे. त्याचा निर्देश येथे **"सुख-दुःख"** या शब्दांनी केला आहे. बाह्य वेद्य (शब्दादिक) इंद्रियग्राह्य आहे. त्याचा निर्देश येथे **"ग्राह्य"** या पदाने केलेला आहे. स्वस्वभाव किंवा व्यापक अहंप्रत्यय हा अंतःकरणाचा विषय होत नाही किंवा इंद्रियांचाही विषय होत नाही; कारण तो ज्ञातृत्वरूप आहे. ज्ञाता हा स्वरूपतः ज्ञेय होत नाही, असा यातील अभिप्राय आहे. ही ज्ञातृता व्यक्ती-उपाधीने अवच्छिन्नही अर्थात् निरनिराळी झालेली नाही म्हणजे केवळ व्यक्तिगत जीवनापुरतीच ती मर्यादित नाही, असे **"ग्राहको न च"** याने दाखविले आहे. अर्थात् येथे स्वस्वभावाच्या बाबतीत **"परिमित प्रमातृत्वाचा"** निषेध केला आहे, व्यापक प्रमातृत्वाचा नव्हे हे या ठिकाणी

लक्षात ठेवले पाहिजे. जेथे सुखदुःखादिभाव आणि ग्राह्यग्राहकभाव यांचा अभाव असतो ती अवस्था मूढ अवस्था (मोहात्मक स्थिती) आहे असे कोणी समजेल म्हणून कारिकेच्या तिसऱ्या चरणात मूढ भावाचाही निषेध केला आहे; पण आपल्या दैनंदिन अनुभवात अशा वस्तूला स्थानच नाही. त्यामुळे ती नाहीच असे वाटेल. तसे वाटू नये म्हणून अशी वस्तूच परमार्थतः म्हणजे सत्य स्वरूपाने आहे असे शेवटी निश्चयपूर्वक सांगितले आहे. कारिकेचा एकूण अभिप्राय असा की, व्यापक निरपेक्ष ज्ञातृत्व हेच स्वस्वभावाचे स्वरूप आहे, सुखादिक भाव कल्पनामात्र आहेत, त्यांना ज्ञातृत्वाच्या अधिष्ठानाखेरीज अस्तित्व नाही म्हणून त्यांना परमार्थतः सत्ता नाही.

श्रीशिवदशेमध्ये अभिव्यक्त होणारे हे व्यापक ज्ञातृत्व किंवा स्वस्वभाव याच्या ठिकाणीच सर्व वस्तू संपादन करण्याचे किंवा विश्वनिर्मितीचे स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्य हा स्वस्वभावाचा सहजधर्म आहे हे पुढील दोन कारिकांनी सांगतात.।।५।।

**टीप :- १) "परिमित प्रमातृत्व"** अर्थात् संकुचित किंवा मर्यादित जीवभाव हा शब्द रसविवेचनात वांरवार आला आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## स्पंदशक्तीचे पारमार्थिक अस्तित्व

सूत्रकार हे या सूत्रामध्ये स्पंदात्मक शाक्तभूमिकेच्या स्वरूपाच्या वर्णनाबरोबरच त्याची परमार्थसत्ता सिद्ध करीत आहेत.

**वृत्ती :-** स्पंदतत्त्वाचा हा स्वभाव आहे की, या स्पंदतत्त्वाला सुख, दुःख, ग्राह्यता, ग्राहकता, मूढता इत्यादि भाव हे कधीही स्पर्श करू शकत नाहीत. हेच तत्त्व परमार्थतः सत् आहे; कारण हे तत्त्व नित्य आहे. सुख इत्यादि केवळ मानसिक संकल्पाची निर्मिती आहे. सुख इत्यादि भाव हे केवळ क्षणातच नष्ट होत असतात आणि हे भाव आत्म्याच्या वास्तविक रूपाहून बाह्य किंवा बाहेर आहेत. यामुळे हे भावही शब्द इत्यादि ज्ञेयविषयांशी तुल्यबळ आहेत. या विषयी हा विचारही व्यर्थ आहे की, जर त्या तत्त्वाला सुख इत्यादींची अनुभूती होत नसेल तर ते तत्त्व दगडाप्रमाणे (जड) आहे.।।५।।

**विवरण :-** शाश्वत स्पंदमयी संवित् अर्थात् शक्ती भट्टारिका बहिर्मुखीन विश्वरूपामध्ये प्रसृत अर्थात् प्रवृत्त होण्याच्या म्हणजेच पसरण्याच्या उन्मुखतेमध्ये अर्थात् उत्सुकतेमध्ये किंवा सज्जतेमध्ये बहिर्मुख होत असते. ही स्पंदशक्ती सर्वप्रथम सूक्ष्म अशा प्राणभूमिकेवर किंवा सामान्य प्राणनेच्या किंवा जीविततेच्या भूमिकेवर अवतीर्ण होत असते. अशा रीतीने ही शक्ती त्रिगुणात्मक अंतःकरणाचे रूप धारण करून घेत असते. या त्रिगुणात्मक अंतःकरणाचे रूप हेच सुख, दुःख आणि मोह होत असते. यावरून सुख, दुःख, मूढता इत्यादि अवस्था या स्वरूपाहून भिन्न असा अन्य कोणताही पदार्थ नाही. या दृष्टीने **"श्रीशिवसूत्रविमर्शिनी"** या टीकाग्रंथातील अध्याय ३ सूत्र ३० वरील टीकेत उद्धृत केलेल्या **"कालिकाक्रम"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**तत्तद्रूपतया ज्ञानं बहिरन्तः प्रकाशते।**
**ज्ञानादृते नार्थसत्ता ज्ञानरूपं ततो जगत्।।३०।।**

याचा अर्थ असा आहे की, ज्ञान हे नीलसुखादि रूपाने अंतर्बाह्य प्रकाशते. ज्ञानावाचून वस्तूला सत्ता किंवा अस्तित्त्व नाही. त्यामुळे जगत् हे ज्ञानरूपच आहे.

आंतर आणि बाह्य रूपामध्ये प्रकाशमान असणारी अशी ही अखंड ज्ञानरूपा पारमेश्वरी शक्ती आहे. ही अखंड ज्ञानरूपा पारमेश्वरी शक्ती नील, सुख इत्यादि वेद्य पदार्थांच्या रूपामध्ये स्वयं प्रकाशमान आहे. प्रतिक्षण विश्वामध्ये असे आढळून येते की, प्रत्येक प्रमाता किंवा ज्ञाता ज्ञानाच्या द्वाराच या नीलसुखादि विषयांचा अनुभव करीत असतो अर्थात् ज्ञानसत्तेच्या आधाराशिवाय कोणत्याही विषयाची कोणतीही सत्ता नाही. यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की, जो ज्याच्याशिवाय भिन्न रूपामध्ये स्थित राहू शकत नाही तो त्याहून अभिन्न आहे. या दृष्टीने **"कालिकाक्रम"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**नहि ज्ञानादृते भावाः केनचिद्विषयीकृताः।**
**ज्ञानं तदात्मतां यातयेतस्मादवसीयते।।**

याचा अर्थ असा आहे की, ज्ञानाशिवाय कोणतेही पदार्थ कोणाचेही विषय होत नाहीत अर्थात् कोणालाही कळत नाहीत. यावरून ज्ञान हे पदार्थरूप होते हे निश्चित आहे.

परिणामतः नीलसुखादि ज्ञानाहून भिन्न असा अन्य कोणताही पदार्थ नाही. जर या अवस्था ज्ञानरूप आहेत तर आहेत व या अवस्था ज्ञानरूप नाहीत तर नाहीत. ज्याप्रमाणे माती असल्यावरच घट असतो. माती नाही तर घटही नाही.

या संबंधात ही गोष्ट स्मरणीय आहे की, विश्वात्मक अहंविमर्श अर्थात् विश्वाची उभारणी हे चित्-तत्त्वाचे स्वरूप आहे. शुद्ध आणि अशुद्ध ही या अहंविमर्शाची दोन रूपे आहेत. "**शुद्ध**" चा संबंध हा पतिप्रमातृभावाशी आहे. ज्याप्रमाणे संसारातील किंवा विश्वातील सर्व नद्या समुद्रामध्ये पोहोचल्यावर नद्या न राहता समुद्र किंवा सागर बनून जातात त्याप्रमाणे चित्-तत्त्वामध्ये सर्व अवस्था आणि सर्व विरोधात्मक द्वंद्व आपल्या भेदमयतेला विसरून विशुद्ध चिद्रूप एकाकारतेमध्ये त्याच प्रकारे अवस्थित राहत असतात. अशुद्ध अहंविमर्श अर्थात् मायाशक्तीच्या द्वारा संकोचात पडलेली "**मी**" पणाची प्रतीती याचा संबंध हा संसारी जीव किंवा पशुप्रमातृभाव यांच्याशी आहे. या दृष्टीने "**चितिरेव चेतनपदादवरूढा चेत्यसङ्कोचिनी चित्तम्।। प्रत्यभिज्ञाहृदय ५।।**" हे सूत्र पाहण्यासारखे आहे. याचा अर्थ असा आहे की, ज्यावेळी चितिशक्ती ही चेतनपदावरून खाली येऊन प्रत्यक्ष विषयांच्या द्वारा संकुचित होते त्यावेळी तिला चित्त असे म्हणतात. या अवस्थेमध्ये विशुद्ध चित्-तत्त्व हे आपलेच रूपांतर असलेल्या मायाशक्तीच्या द्वारा आपल्याच अभिन्न अशा ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती आणि मायाशक्ती यांचा संकोच करून अर्थात् संकुचित करून सत्त्व, रज व तमोगुणात्मक किंवा बुद्धी, मन व अहंकार यांच्या समष्टिरूपाने चित्तरूप धारण करते. या दृष्टीने "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**स्वाङ्गरूपेषु भावेषु पत्युर्ज्ञानं क्रिया च या।**
**मायातृतीये ते एव पशोः सत्त्वं रजस्तमः।।३.२.३।।**

हे विशुद्ध चित्-तत्त्व मायाशक्तीच्या द्वारा क्रमशः सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण (बुद्धी, मन आणि अहंकार) यांच्या समष्टिरूप अर्थात् समुदायरूप चित्ताच्या रूपाला धारण करीत असते. हे चित्तच प्रत्येक प्रकारची अवस्था, उपाधी, त्याचे पारस्परिक विरोधात्मक द्वंद्व, विचित्र प्रकारचे शरीर तसेच आकार प्रकारच्या अनेकाकारतेची सर्जना करून अर्थात् सृष्टी करून यांनाच आपले खरे स्वरूप समजत राहते. प्रत्यक्षात

खरी स्थिती काही वेगळीच आहे.

याचा परिणाम म्हणून विशुद्ध चित्-तत्त्व हे प्रतिक्षण अखंड ज्ञानात्मक एकाकारता असल्यामुळे सुख, दुःख, ग्राह्यता आणि ग्राहकता या उपाधींनी रहित असून परमार्थ "**सत्**" आहे. पशुप्रमातृ पदवीवर प्रत्येक जीवधारी मध्ये या उपाधींविषयी "**अहं**" अभिनिवेश अर्थात् युक्त किंवा सहित किंवा गढून जाणे अर्थात् भक्ती किंवा प्रेम अर्थात् उत्कट इच्छा अर्थात् कल्पना अर्थात् अभिमान अर्थात् प्रपंचासक्ती दिसून येत असते. हा अहंअभिनिवेश केवळ आपल्या वास्तविक चैतन्य स्वरूपाच्या अनुभूतीच्या हीनतेमुळे होत असतो. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथामध्ये "**सुखदुःख-योर्बहिर्मननम् ३.३३।।**" असे म्हटले आहे. याचा अर्थ असा आहे की, वेद्यवस्तूंच्या स्पर्शाप्रमाणे सुखदुःखांचे ज्ञान बाह्यदृष्ट्याच नीलादिकांप्रमाणे इदंतेने (हे असे) होते. याच्या उलट निरंतर अभ्यास तसेच श्रीगुरुकृपेमुळे आत्मस्वरूपाची अनुभूती प्राप्त करून घेणारे साधक, या सर्व उपाधींना दुसऱ्या घट, पट आदि ग्राह्य पदार्थांप्रमाणे स्वतःहून भिन्न "**इदं**" रूपामध्ये आणि आपल्या आत्मस्वरूपाचा विशुद्ध "**अहं**" रूपामध्ये अनुभव करीत असतात. यामुळे अशा व्यक्तींना संसारातील किंवा जगतामधील द्वंद्वे प्रभावित करू शकत नाहीत.

आता राहिला मूर्खतेचा प्रश्न! "**मूढस्य भावो मूढत्वं वेद्यवेदन-सामर्थ्याभावः।।३१।।**" असे "**स्पंदकारिका**" या ग्रंथात म्हटले आहे. त्याचा अर्थ असा आहे की, या विषयामध्ये अनेक दार्शनिकांचा असा विचार आहे की, जर आत्मस्वरूपामध्ये सुख-दुःखादि अवस्थांचा नितांत अभाव अर्थात् पूर्णपणे अभाव अर्थात् यांची संवेदनहीनताच आहे तर हे आत्मस्वरूप मूढता अर्थात् वेद्यपदार्थाच्या अनुभूतीच्या सामर्थ्याचा अभाव हेच आहे. शास्त्रामध्ये या शंकेचे निवारण अशा प्रकारे केलेले आहे की, "**यतः तस्यापि अवस्थान्तरे मूढोऽहमासम् इति प्रत्यवमर्शमानत्वात् वेद्यत्वं स्थितमेव केवलं तत्कालमनुपलम्भः। स्पंदकारिका।।**" जर कोणतीही व्यक्ती ही संज्ञाहीनता किंवा प्रगाढ सुषुप्तीच्या अवस्थेमध्ये असेल तर त्या व्यक्तीला प्रत्यक्षरूपामध्ये कोणत्याही गोष्टीची संवेदना होऊ शकत नाही.परंतु या अवस्थेमधून बाहेर आल्यावर किंवा जागृत झाल्यावर हीच व्यक्ती असे म्हणू लागते की, "अरे! मी तर गाढ किंवा गंभीर संवेदनहीनतेमध्ये किंवा मूढतेमध्ये पडलो होतो." जर त्यावेळी

अर्थात् सुषुप्तीकाळी या व्यक्तीचा आत्मा खरोखरच मूढ बनलेला असता तर या व्यक्तीला मूढतेत असण्याची संवेदना किंवा जाणीव कशी होऊ शकते? मूढतेचा अर्थ सर्वशून्यावस्था असा आहे. अशा अवस्थेमध्ये राहण्याच्या काळात या सुषुप्तीतील व्यक्तीला कोणत्याही प्रकारचे संवेदन होता कामा नये; परंतु असे प्रत्यक्षात आढळत नाही. यामुळे मूढता हेही आत्म्याचे स्वरूप नाही.

सूत्राच्या अंतिम पादामध्ये आत्मतत्त्वाच्या परमार्थसत्तेविषयी सांगून सूत्रकाराने "**असत्-सर्वाभाव**" यालाच शाश्वत किंवा यथार्थ मानणाऱ्या लोकांचे तोंड बंद केलेले आहे. सूत्रकाराच्या मतानुसार परमार्थ सत् हे निश्चितपणे सर्वोपाधिरहित विशुद्ध आत्मस्वरूप आहे. या सत्पासून बनलेला सर्व कार्यरूप प्रपंच हा संवृतिसत्य अर्थात् आवरणसत्य आहे. जी वस्तू परमार्थ सत् आहे ती कधीही असत् होऊ शकत नाही. जर या वस्तूला "**असत्**" मानले तर या शंकेचे समाधान होऊ शकत नाही की, असत् वस्तूपासून सत् अर्थात् सत्स्वरूपामध्ये दिसून येणाऱ्या कार्यकारी जगताची उत्पत्ती कशी झाली?

फलतः मौलिक स्पंदतत्त्व स्वयं "**सत्**" आहे आणि याच कारणाने त्यापासून दृश्यमान कार्यरूप "**सत्**" चा विकास होत असतो. सूत्राच्या तिसऱ्या आणि चौथ्या पादामध्ये शून्यवादी माध्यमिक अर्थात् बौद्ध दार्शनिकांची एक शाखा आणि अभाव ब्रह्मवादी श्रुत्यन्तविद् अर्थात् प्राचीन वेदान्त्यांची एक शाखा यांच्या मतांच्या निःसारतेचे प्रतिपादन केलेले आहे. पुढील सूत्र क्रमांक बारामध्ये या दोन्ही वादांचे यथाशक्य पर्यालोचन किंवा चिंतन केले जाणार आहे.।।५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

वर सांगितलेल्या उपपत्तींनी सिद्ध होणाऱ्या सर्व वादांची अनुपपन्नता सांगून (असमर्थता सांगून) आता सर्व गूढ उपदेशांचे उत्तम उपदेशक, गूढ प्रक्रिया जाणून ती उघड करणारे आणि अनुभवी असे ग्रंथकार "स्पंदतत्त्वालाच यथार्थ अस्तित्त्व आहे" असे स्पष्टपणे सांगत आहेत.

**स्पष्टीकरण :-** येथे जे काही सुख-दुःखादि आंतग्राह्य आणि नील-पीतादि (निळेपणा, पिवळेपणा आदि) बाह्य ग्राह्य (ग्रहण करता येण्याजोगी)

वस्तू आणि जे पुर्यष्टक, शरीर, इंद्रिय इत्यादि ग्राहक (जे ग्रहण करतात त्या) वस्तू सौषुप्त अवस्थेप्रमाणे जाणीवेत येत नसल्याने स्पष्टच होत नाहीत असे आपण म्हणू शकतो. जर त्यांची जाणीव होत असेल तर संवेदन होणाऱ्या त्या गोष्टीं चैतन्ययुक्त असल्याने त्या गोष्टी चैतन्यच होत. यासंबंधी "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**प्रकाशात्मा प्रकाश्योऽर्थो नाप्रकाशश्च सिध्यति।।१।५।३।।**

**अर्थ :-** जी गोष्ट प्रकाशात येते ती गोष्ट प्रकाशाने युक्त असते; जी गोष्ट प्रकाशयुक्त नाही तिची सिद्धी होत नाही अर्थात् ती वस्तू अस्तित्वातच नसते. असे रहस्यतत्त्व जाणण्यात श्रेष्ठ असणाऱ्या आमच्या परमगुरू श्रीउत्पलदेवपादांनी म्हटले आहे.

त्याचप्रमाणे "**स्पंदकारिका**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

**तत्संवेदनरूपेण तादात्म्यप्रतिपत्तितः।।२८।।**

**अर्थ :-** त्याच्या संवेदनाच्या रूपाप्रमाणे असल्याने आणि त्याच्याशी तादात्म्य सिद्ध झाल्यामुळे सुख-दुःखादि जाणीवा, त्याच प्रमाणे नीलादि बाह्य ग्राह्यवस्तू आणि त्यांना ग्रहण करणारे ज्या तत्त्वात नाहीत तेच प्रकाशाने परिपूर्ण असे (स्पंद) तत्त्व आहे.

### आक्षेप

जर सर्व ग्राह्य आणि ग्राहक यांचा अभाव आहे तर ते तत्त्व म्हणजेच शून्यत्व होय असे अनुमान यावरून काढता येणे शक्य आहे.

याचे उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की, नाही, मूढभावाचे सुद्धा अस्तित्व नाही; कारण जेथे मूढभाव म्हणजेच शून्यरूपताही नसते तेच यथार्थ परमतत्त्व होय. ही शून्यरूपता एकतर प्रकाशित तरी होते किंवा होत नाही. जर ती व्यक्तच होत नसेल तर ती अस्तित्वात आहे असे कसे म्हणता येईल? जर ती व्यक्त होते तर व्यक्त होण्यामुळे त्याच्यामध्ये कोणतीही प्रथा म्हणजेच प्रकाशनच नसते. व्यक्तपणाचा कधीच अभाव होत नाही; कारण त्याचा अभाव असताना प्रकाशनाच्या अभावाची सिद्धी होत नाही. याचे स्पष्टीकरण असे आहे. "**न तु योऽन्तर्मुखो भावः।।१६।।**" या ठिकाणीही येईल.

### मूढभावाचे दुसरे स्पष्टीकरण

ऐश्वर्यात्मक विमर्श रहित प्रकाशमात्र तत्त्व हेच ब्रह्मरूप जेथे नसते

आणि ज्याच्यावर वेदान्त्यांचा दृढ विश्वास आहे आणि जे म्हणतात की, **"विज्ञानं ब्रह्म"** अर्थात् विशिष्ट ज्ञान हेच ब्रह्म होय तोच मूढभाव होय. ते ब्रह्मही स्वातंत्र्ययुक्त स्पंदशक्तीशिवाय जड म्हणविले जाते. यासंबंधी **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**स्वभावमवभासस्य विमर्श विदुरन्यथा।**
**प्रकाशोऽर्थोपरक्तोऽपि स्फटिकादि जडोपमः।।१।५।११।।**

**अर्थ :-** अवभासाचा स्वभावच विमर्श आहे. स्वरूपाचे ज्ञान असणारेच त्याला जाणतात आणि तत्त्ववेत्ते या विमर्शाला अहम्, असांकेतिक, स्वातंत्र्यरूप व आत्मविश्रांतिरूप ज्ञाता असे म्हणतात. अन्यथा अर्थापासून उपरक्त राहूनही विमर्शशून्य प्रकाश स्फटिकादिप्रमाणे जड होऊन जाईल. ।।१।५।११।।

त्याचप्रमाणे **"भट्टनायकस्तोत्रात"** असे म्हटले आहे की -

**नपुंसकमिदं नाथ परंब्रह्म फलेत्कियत्।**
**त्वत्पौरुषी नियोक्त्री चैन्न स्यात्त्वद्भक्तिसुन्दरी।।**

**अर्थ :-** हे नाथ! हे नपुंसक किंवा निष्क्रीय ब्रह्म जर तुझ्या पौरुषाने युक्त व नियंत्रण करणाऱ्या भक्तिरूप सुंदरी अशा शक्तीसह नसेल तर कसे काय आणि किती फळ मिळेल?

अशा प्रकारे **"यत्र स्थितं"** येथपासून ज्या तत्त्वाचा विचार केला गेला आहे त्याच परम तत्त्वाला अस्तित्व आहे. हे परम तत्त्व खरोखरच तर्क, अनुभव आणि आगमांनी सिद्ध केलेल्या नैसर्गिक रूपात अस्तित्वात असते. त्याचे अस्तित्व नील इत्यादि कल्पित किंवा कृत्रिम रूपात नसते. यासंबंधी महागुरूंनी **"अजडप्रमातृसिद्धी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**एवमात्मन्यसत्कल्पाः प्रकाशस्यैव सन्त्यमी।**
**जडाः प्रकाश एवास्ति स्वात्मनः स्वपरात्मभिः।।१३।।**

**अर्थ :-** अशा प्रकारे ज्या असत्कल्पना किंवा जड वस्तू आहेत त्या त्यांच्या आत्म्याशी संबंधित असताना नसल्यासारख्याच आहेत आणि त्या प्रकाशाच्याच (प्रकाशाने युक्त) असतात. हा स्वात्म्याचा प्रकाशच स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या आत्म्याने अस्तित्वात असतो.

त्याचप्रमाणे **श्रीभर्तृहरींनीही** असे म्हटले आहे की -

**यदादौ च यदन्ते च यन्मध्ये तस्य सत्यता।**
**न यदाभासते तस्य सत्यत्वं तावदेव हि।।**

**अर्थ :-** जे आदि किंवा सुरुवातीला आहे, मध्ये आहे किंवा अंती आहे त्याचीच सत्यता (सांगितली जाते.) जे भासतच (प्रकाशित होत) नाही त्याचे सत्यत्वही तेवढेच असते. (अर्थात् तेथे सत्यच नसते.)

सर्व वाक्यांचा नेमका अर्थ सांगण्यामुळे येथे **"एव"** हे तीनदा योजले आहे.

अशा प्रकारे या सूत्रात सुखादींच्या ज्ञानाच्या सातत्यावर भर देणाऱ्या, सुखादींनी कलुषित अशा प्रमात्यांच्या तत्त्वाला मानणाऱ्या, नाना प्रकारचे ग्राह्य आणि ग्राहक मानणाऱ्या, सर्व अभाववादी लोकांच्या आणि परामर्शरहित प्रकाशाने युक्त ब्रह्म मानणाऱ्या सर्वांची मते खोडून काढून आणि ते परमतत्त्वाची सिद्धी करण्यास असमर्थ आहेत असे सांगून पारमार्थिक स्पंदशक्तीने युक्त तत्त्व हेच खरे तत्त्व आहे असे ग्रंथकारांनी स्पष्टपणे प्रतिपादन केले आहे. त्याचप्रमाणे येथे याचीही चर्चा केली आहे की, सर्व स्फुरणाऱ्या वस्तूंचे सार, उपदेशासह व अवधानासह महानुभावांनी (विद्वान् गृहस्थांनी) परिशीलन केलेल्या या स्पंदतत्त्वात हे सर्व स्फुरण पावते. दु:ख, सुख, ग्राह्य, ग्राहक आणि त्यांचा अभाव हे सर्व अस्तित्वात असतानाही काहीच अस्तित्वात नसते; कारण हे सर्व त्याच्या (श्रीपरमेश्वराच्या) चमत्काराचे म्हणजेच क्रीडेचे सार आहे. त्यामुळे ते म्हणजेच हे (अर्थात् ते स्पंदतत्त्व म्हणजेच सुखदु:ख, नील-पीत, ग्राह्य-ग्राहक इत्यादींनी युक्त असे विश्व) आहे असा येथे उपदेश केला आहे. यासंबंधी महागुरूंनी **"उ० स्तोत्रात"** असे म्हटले आहे की-

**दु:खान्यपि सुखायन्ते विषमप्यमृतायते।**
**मोक्षायते च संसारो यत्र मार्ग: स शाङ्कर:।।**

।। उ.स्तो.२०।१२।।

**अर्थ :-** जेथे दु:खे सुखाला प्राप्त होतात, विषाचे अमृत होते आणि संसार हाही मोक्षाला प्राप्त होतो असा जो मार्ग तो म्हणजेच श्रीशंकर होय.

श्रीशांकरमार्ग म्हणजेच श्रीशंकरात्मक स्वभावाच्या प्राप्तीसाठी असणारा पराशक्तिरूप (सिद्धयोगाचा) प्रवाह होय.।।५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

अशा प्रकारे स्वस्वरूप म्हणजे श्रीशिवच होत असे योग्यपणे प्रतिपादन व विवेचन करून आता त्याच्या लक्षणाचे निरूपण करीत परमार्थसत्तेचे प्रत्यक्ष ज्ञान देण्याच्या इच्छेने "**न दुःखं सुखं ....।।५।।**" ही कारिका सांगतात. संवित्सत्तेमध्ये सुख-दुःख, शीत-उष्ण इत्यादि प्रकारचे कोणतेही द्वंद्व नसते किंवा ग्राह्य-ग्राहकतेचा संभव नसतो. त्या संवित्मध्ये अज्ञानाचे कोणतेही आवरण नसते. वास्तविक पाहता जे त्रिकालाबाधित अर्थात् तीनही काळांनी बाधित न होणारे असते तेच यथार्थ तत्त्व होय. द्वंद्व हा तर प्राण्यांचा अंतःकरण धर्म आहे. हे द्वंद्व तरंगांप्रमाणे किंवा लाटांप्रमाणे उत्पन्न होते आणि नष्ट होते. आत्मस्वरूप हे सर्वतः (इंद्रियांहून) भिन्न असूनही ते ते इंद्रियांचे सामर्थ्य (त्या त्या इंद्रियांना) देऊन किंवा प्रदान करून ते अनुभविता होते. त्यामुळेच आत्मस्वरूप हे घटाप्रमाणे जड नसून त्याच्या विरुद्ध धर्माने युक्त म्हणजेच चेतन आहे.।।५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**यतः करणवर्गोऽयं विमूढोऽमूढवत्स्वयम्।**
**सहान्तरेण चक्रेण प्रवृत्ति-स्थिति-संहतीः।।६।।**
**लभते तत्प्रयत्नेन परीक्ष्यं तत्त्वमादरात्।**
**यतः स्वतन्त्रता तस्य सर्वत्रेयमकृत्रिमा।।७।।**

**अन्वयार्थ :-**

**यतः** - (ज्याच्यामुळे, ज्या तत्त्वामुळे), **आन्तरेणतक्रेण सह** - अंतर्भागी असलेल्या इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवतांच्या चक्रांच्या समुदायासह, **अयम्** - हा, **करणवर्ग** - इंद्रियांचा समुदाय, **प्रवृत्ति - स्थिति - सहतीः** - उत्पत्ती, स्थिति व लय, विषयांकडे जाणे, संलग्न राहणे वियोग पावणे ही अवस्थात्रयी, **स्वयम्** - इंद्रिय समुदाय - स्वतः, **विमूढः** - जड असून, **अमूढवत्** - सचेतन असल्याप्रमाणे, **लभते** - प्राप्त होतो, **तत्** - ते स्पंदतत्त्व, **आदरात्** - आदरपूर्वक, **प्रयत्नेन** - प्रयत्नपूर्वक, **परीक्ष्यम्** - परीक्षण करण्याच्या पात्रतेचे आहे, त्याचे परीक्षण करावे, **यत्** - कारण, **तस्य** - त्याची, **इयम्** - या तऱ्हेची, **स्वतंत्रता** - बाह्योपादान, करण इत्यादींवर अवलंबून न राहता असलेले कृतिस्वातंत्र्य, **सर्वत्र** - सर्व विश्वात, **अकृत्रिमा** - स्वाभाविकपणे व्यापून आहे.।। ६ व ७।।

**अर्थ :-** ज्या तत्त्वाच्या बळामुळे अंतर्भागी असलेल्या शक्तिचक्राबरोबर त्या बाह्य अचेतन इंद्रियसमुदायाला स्वतः जड असतानाही चेतन पदार्थाप्रमाणे उत्पत्ती, स्थिती आणि संहार करण्याचा धर्म प्राप्त होत असतो, अशा स्पंदात्मक स्वभाव असलेल्या त्या तत्त्वाचे आदरपूर्वक व प्रयत्नपूर्वक परीक्षण करावे. असे करणे आवश्यक आहे; कारण या स्पंदततत्त्वाची स्वतंत्रता अर्थात् कृतिस्वातंत्र्य हे सर्व विश्वामध्ये स्वाभाविकपणे व्यापून राहिलेले आहे.।। ६ व ७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

अत्यंत श्रद्धापूर्वक व सतत उद्योगाने प्राप्त केलेल्या प्रत्येक अवस्थेच्या अनुभव दशेमध्ये जेथे जेथे द्वैताचे स्फुरण होईल त्या त्या ठिकाणी सदा सर्वदा असणारी चैतन्य वस्तू वेद्य असणार नाही. ती वेदकच असणार. इदंता नाही, अहंताच आहे. अर्थात् हे नाही मीच आहे, अशा रीतीने जागृती ठेवून सर्वमय अशा आत्मस्वरूपातच राहिले पाहिजे. ते परब्रह्म स्वतःच्या इच्छेने सर्व कार्यरूप व कर्तारूप बनले आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी कर्त्याचा व कार्याचा अभिमान जागृत होईल त्या त्या ठिकाणी ते दोन्ही पदार्थ नसून सहज स्वरूपात स्थित असणारे श्रीशंकरतत्त्वच आहे अशी जागृती ठेवावी. संसारी जीवांचा सुद्धा सर्व व्यवहार त्या परब्रह्माच्या स्वातंत्र्यावरच उभारलेला आहे. परंतु मायेच्या मोहात सापडल्यामुळे सत्यस्वरूपाची जाणीव त्याला राहत नाही. त्यामुळे जीव स्वतःला परतंत्र संसारी म्हणवून घेत असतो. त्यामुळे प्रत्येक जीवमात्राने अंतःकरणामध्ये पूर्ण स्वतंत्र व सहजसिद्ध असे जे श्रीशंकरस्वरूप आहे त्याची प्राप्ती होण्याकरिता क्षणोक्षणी प्रत्येक ठिकाणी पदार्थ नाहीतच, परब्रह्म आहे, अशी जागृती ठेवावी. द्वैताचा प्रतिषेध केल्याने म्हणजे द्वैत नाहीसे केल्याने किंवा काढून टाकल्याने सर्वत्र अभाव भासू लागतो. मात्र वस्तू म्हणजे आत्मा अभावशून्य आहे असे मात्र समजू नये; कारण या अभ्यंतर व बाह्य इंद्रियांच्या उत्पत्ती-स्थिती-लयाची स्थिती त्या परब्रह्माच्या योगानेच येत असते.

अमुक एक पदार्थ आपल्याला हवा आहे अशा इच्छेचा जो क्षण ती त्या पदार्थाची उत्पत्ती आहे. तो पदार्थ नजरेपुढे असणे ही त्याची स्थिती

आहे. ही स्थिती पुरेशी वाटून लगेच दुसरीकडे वृत्ती जाणे हा त्याचा लय आहे. तेव्हा उत्पत्ती, स्थिती व लय या अवस्था करण्यास जड इंद्रिये कारण नसून आत असणारी व सर्वव्यापी काम करणारी चैतन्य शक्तीच असते. त्यामुळे विषयांचा अनुभव अगर इंद्रियांचा अनुभव हा त्या स्वातंत्र्य शक्तीचाच प्रभाव आहे, इंद्रियांचा नव्हे.

**अशा स्थितीत श्रीसद्गुरुकृपेने प्राप्त झालेले शक्तिपातयोगाचे साधन अत्यंत दृढतेने, निश्चयाने, अखंडपणे व मोठ्या आदराने करीत राहिल्यास आपण स्वयमेव शक्तीच आहो, पदार्थ नाहीतच अशी धारणा आपोआप दृढ होत जाते. साधनामुळे सर्वत्र स्वतंत्र शक्तीच आहे असा अभ्यास दृढ झाल्याने परकायाप्रवेशादिरूप सत्ता प्राप्त होत असते.** इंद्रिये ही जड आहेत. त्यांना विषय ग्रहणाची जी शक्ती किंवा सत्ता आहे ती चैतन्याच्या योगाने आहे. हे हवे, ते नको इत्यादि ज्या इच्छा आहेत त्या अंतःकरण वर्गाला या स्वातंत्र्यरूप शक्तीच्या योगानेच होतात. त्यामुळे इंद्रिये ही मूळ कारण नसून चैतन्य हेच मूळ कारण आहे. चैतन्य आहे म्हणून इंद्रिये आहेत व त्यांच्यामध्ये विषय ग्रहण करण्याची शक्ती आहे. कोयता, विळा किंवा कुऱ्हाड ही गवत कापण्याची व लाकडे फोडण्याची यंत्रे क्रिया स्वतः करू शकत नाहीत. त्यासाठी चैतन्याने प्रेरित केलेली हात इत्यादि इंद्रिये यांच्या योगाने ती यंत्रे काम करतात. तद्वत् आंतरिंद्रिये व बाह्येंद्रिये ही जड असल्याने स्वतः काहीच करू शकत नाहीत. चैतन्य आत्मा श्रीशंकर हेच सर्व काही करू शकतात. त्यामुळे निरंतर साधनाभ्यास रत होऊन सर्वत्र स्वातंत्र्य शक्ती अगर श्रीशंकर यांचीच जागृती सर्व क्षणी ठेवावी.

हे स्पंदतत्त्व ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय व अंतःकरण चक्र म्हणजे बाह्य साधनवर्गाबरोबर निगडीत होऊन मूढ होते. ते चेतन असून सुद्धा स्वतःच स्वतःला विचेतनाप्रमाणे प्रवृत्ती, स्थिती व संहाराच्या अवस्थेला प्राप्त करून घेते. चुंबकाच्या सान्निध्यात लोखंड क्रियाशील होते हे आपण नेहमीच पाहतो. वायूच्या व अग्नीच्या संपर्कात आलेला लोखंडाचा गोळा किंवा तवा अग्निप्रमाणेच दाह करण्यास, भाजून एखादी गोष्ट पक्व करण्यास किंवा प्रकाश देण्यास समर्थ होतो. तेव्हा असा विचार केला पाहिजे की, जो दुसऱ्यांच्या ठिकाणी चैतन्य आणण्यास समर्थ असतो

किंवा जो दुसऱ्यांना चेतन बनविण्यास समर्थ असतो, तो स्वतःच निःस्वभाव, अचेतन व असमर्थ कसा असू शकेल? याचा अर्थच असा आहे की, सर्व क्रिया किंवा प्रयत्न हे ज्ञानपूर्वक असतात. ज्ञानहीन शरीराची स्थिती मातीच्या ढेकळासारखी होते. सर्व जडवर्गाचा म्हणजे जडपदार्थांचा अधिष्ठाता (-आधार-) व धारक (-धारण करणारा-) निश्चयच आहे. एरवी आकाशात दगड का टिकू शकत नाही? यासाठी उद्योग व श्रद्धा या दोहोंच्या द्वारा या तत्त्वाचे परीक्षण व समीक्षण करणे आवश्यक आहे. ब्रह्म हे डोळ्याप्रमाणे अदृश्य व डोळ्याप्रमाणेच द्रष्टा आहे. आपल्याला आपणामध्येच हे ब्रह्म प्राप्त होते. एखाद्या वस्तूप्रमाणे हे ब्रह्म दृश्य नाही. सिद्धपुरुषाच्या या म्हणण्याचा विचार केला पाहिजे. ब्रह्माची स्थिती अकृत्रिम व स्वतंत्र आहे. जसे ते ब्रह्म देहातील करणवर्गाला चैतन्ययुक्त करण्यास समर्थ आहे तसेच ते लोक-लोकांतराला व दृश्यवर्गाला चैतन्यमय बनविण्यास समर्थ आहे. हे स्वातंत्र्यच त्याच्या इच्छेचे सामर्थ्य आहे.।।६-७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** करण म्हणजे इंद्रियवर्ग व आंतरचक्र म्हणजे अंतःकरण होय. यांची प्रवृत्ती म्हणजे ग्राह्य विषयाच्या बाबतीत उन्मुखता होय. हीच समुन्मेषाची अवस्था होय. स्थिती म्हणजे गृहीत विषयाच्या ठिकाणी करण विश्रांती होणे. संहृती म्हणजे कृतकृत्य भावनेने बाह्यार्थाचा त्याग करून होणारी व्यापारनिवृत्ती होय. ही लयावस्था होय. करणवर्ग जड आहे असे आपण मानतो. तो या स्वस्वभावाच्या संस्पर्शामुळे विषयाच्या बाबतीत प्रवृत्त होतो. सारांश, विषयसंपादनाच्या व विश्वनिर्मितिच्या बाबतीत स्वस्वभावाला स्वातंत्र्य आहे व हे स्वातंत्र्य स्वस्वभावाचा सहजधर्म आहे ही गोष्ट प्रयत्नपूर्वक ओळखली पाहिजे. विश्वनिर्मितीचे स्वातंत्र्य प्रमात्याच्या ठिकाणी आहे. विषयाच्या ठिकाणी नाही. करणे जड आहेत. प्रमाता आपल्या इच्छास्वातंत्र्याच्या योगाने करणांना प्रवर्तित करून विषयांची निर्मिती करितो. स्वस्वभाव विश्वनिर्मिती करितो ती स्वप्रेरणेने करितो. करणे किंवा विषय यांनी त्याची प्रेरणा परतंत्र झालेली नसते हे ओळखले पाहिजे असा या कारिकांचा आशय आहे.।।६-७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

**स्पंदतत्त्वाची उपादेयता किंवा ग्राह्यता अर्थात् स्वीकार्यता**

अशा प्रकारे स्पंदतत्त्वाची परमार्थ सत्ता सिद्ध केल्यानंतर सूत्रकार वरील दोन सूत्रांमध्ये ही गोष्ट स्पष्ट करीत आहेत की, विश्वाच्या अणू-अणूमध्ये याच स्पंदात्मक पारमेश्वरी शक्तीच्या स्वातंत्र्याचा प्रसार स्पष्टपणे दृष्टिगोचर होत असतो. स्पंदशक्ती याच स्वातंत्र्याच्या द्वारा जडवर्गामध्ये अनुस्यूत अर्थात् एकरूप किंवा संबद्ध होऊन जडवर्गालाही चेतनधर्मीय बनवीत असते. यामुळे अत्यंत चिकाटी आणि अथक प्रयत्न यांच्या द्वारा त्या मौलिक तत्त्वाचे परीक्षण केले असता अर्थात् केल्यावरच मनुष्यजन्म चरितार्थ होऊ शकतो.

**वृत्ती :-** ज्या तत्त्वाच्या बलस्पर्शामुळे आंतर करणेश्वरीचक्र खेचरी इत्यादि शक्तिचक्र यांच्यासह या सर्व इंद्रियवर्गाला स्वतः अचेतन अर्थात् जड असूनही चेतनाप्रमाणे सृष्टी, स्थिती आणि संहार करण्याचा धर्म प्राप्त होत असतो, ते तत्त्व दुसऱ्या जडवर्गाशी संबंधित पदार्थांना चेतनता प्रदान करण्यास समर्थ असूनही स्वयं स्वभावहीन अर्थात् चैतन्यरहित कसे असू शकते? यामुळे योग्याने भगीरथ प्रयत्नाद्वारा या तत्त्वाचे परीक्षण करावे. ज्या प्रकारे त्या तत्त्वाला इंद्रिये इत्यादि जड वर्गामध्ये चेतनेचा संचार करण्याची स्वतंत्रता आहे त्याच प्रकारे हे तत्त्व दुसऱ्या शरीर, प्राण इत्यादींना चेतनधर्मी बनविण्यामध्ये स्वतंत्र आहे, या गोष्टीचीही शक्यता आहे. सहज स्वातंत्र्य अर्थात् स्वतंत्र अहं प्रत्यवमर्श हाच प्रत्येक पदार्थाचा स्वभाव अर्थात् आपला वास्तविक भावात्मा बनून अवस्थित आहे. यामुळे अभ्यासाने अर्थात् श्रमहीन साधनेने या तत्त्वाची अनुभूती होत असते. ।।६-७।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्राचा अर्थ योग्यप्रकारे हृदयंगम करण्यासाठी यामध्ये प्रयुक्त **"करण वर्ग"**, **"आंतरचक्र"** तसेच **"प्रवृत्तिस्थिति संहतीः"** या दार्शनिक शब्दांचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. यामुळे खालील ओळीमध्ये किंवा पंक्तीमध्ये या शब्दांवर यावच्छक्य प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**१) करणवर्ग :-** "करण" या शब्दाचा अर्थ "अपेक्षिततम साधन" असा आहे. करणाशिवाय किंवा साधनाशिवाय कोणत्याही कार्याची निष्पत्ती

होऊ शकत नाही. संसाराच्या आदानप्रदानामध्ये कोणत्याही चेतन प्राण्याच्या अंतःकरणामध्ये विद्यमान असलेल्या भावात्मक विश्वाचे बाहेरील नामरूपात्मक व्यक्त विश्वाशी आणि बाह्य विश्वाचे अंतःकरणाशी संबंधित असण्याचे कार्य चालत राहते. यालाच "दैनिक जीवनाचा व्यवहार" असे म्हणतात. या जीवन व्यवहाराची ज्ञानप्रधानतेमध्ये संकल्प, निश्चय, अभिमान, श्रवण, स्पर्शन, दर्शन, आस्वादन, जिघ्रण (वास घेणे) आणि क्रियाप्रधानतेमध्ये चालणे, उठणे, बोलणे, मलत्याग आणि आनंदानुभूती ही तेरा रूपे आहेत. या तेरा रूपांमधील प्रथम तीन रूपांचा आंतरभावनात्मक आणि शेष रूपांचा बाह्य नामरूपात्मक विश्वाशी संबंध आहे. अशा प्रकारे तेरा इंद्रिये ही तेरा प्रकारची कार्ये करण्याची साधने आहेत. यामुळे या इंद्रियवर्गाचेच शास्त्रीय नाव "करणवर्ग" असे आहे. या तेरा इंद्रियांचे उपर्युक्त कार्यानुसार होणारे विभाग पुढीलप्रमाणे आहेत.

**तीन अंतःकरणे** - मन, बुद्धी आणि अहंकार.

**पाच ज्ञानेंद्रिये** - कर्ण, त्वचा, नेत्र, जिह्वा, नासिका.

**पाच कर्मेंद्रिये** - पाद, हस्त, जिह्वा, पायू, उपस्थ.

यामधील जिह्वा ही आस्वाद घेताना ज्ञानेंद्रिय आणि बोलताना कर्मेंद्रिय बनत असते.

ही सर्व करणे स्वतः अचेतन आहेत यामुळे उपर्युक्त कार्ये करणे हा या करणांचा स्वतःचा धर्म नाही. विशेष स्पंदांच्या धारा या करणामध्ये संचारित होऊन या करणांना चेतनधर्मी बनवीत असतात. यामुळे ही इंद्रिये चेतन असल्याप्रमाणे केवळ संकल्पानेच ती ती कार्ये करीत असतात. वास्तवात किंवा व्यवहारात पाहताना असे वाटते की, ही इंद्रिये स्वतःच सर्व कामे करीत आहेत. परंतु प्रत्यक्षात काम करण्याची शक्ती यांच्याहून भिन्न असूनही यामध्ये अनुस्यूत किंवा व्यक्त होत असते. इंद्रिये ही स्वयं केवळ साधने आहेत. जर या इंद्रियांमध्ये हे सर्व कार्य करण्याचे धर्म असते तर मृत्यू झाल्यानंतरही इंद्रियांचा हा कार्य करण्याचा धर्म नाहीसा झाला नसता.

**२) आंतरचक्र :-** पहिल्या सूत्राच्या विवरणामध्ये आंतर शक्तिचक्राच्या विषयामध्ये काही संकेत दिलेला आहे. यामध्ये असेही म्हटलेले आहे की, प्रत्यक्षात परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती अथवा स्पंदनशक्ती ही एकच आहे. ती अनंत तसेच अपरिमित अर्थात् अमर्यादित धारांमध्ये प्रवाहमान होऊन

विश्वाच्या अणू अणूचे रूप धारण करीत असते. शक्तीच्या याच अनंत धारांना शास्त्रामध्ये "आंतरचक्र," "शक्तिचक्र," किंवा "करणेश्वरीचक्र" अशी नावे दिलेली आहेत. तंत्रालोक, स्वच्छंदतंत्र, विज्ञानभैरव इत्यादि अनेक शैवग्रंथांमध्ये परमेश्वराच्या अनेक शक्तींचे आणि चक्रांचे विस्तृत विवेचन केलेले आहे. प्रस्तुत ग्रंथामध्येही पुढे अनेक स्थानांवर यांच्याकडे संकेत केलेला आहे. ज्यावर यथाशक्य प्रकाश टाकण्यात येणार आहे. या दृष्टीने **"प्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथातील बाराव्या सूत्रावरील विवरणात असे म्हटले आहे की -

**खेचरी - गोचरी - दिक्चरी - भूचरीरूपैः अशेषैः**
**प्रमातृअन्तःकरणबहिष्करणभावस्वभावैः परिस्फुरन्ती।।१२।।**

या शक्तिवर्गाचे खेचरी, गोचरी, दिक्चरी आणि भूचरी हे चार प्रधान विभाग केलेले आहेत. या विषयामध्ये खाली लिहिलेल्या गोष्टी स्मरणीय आहेत. **"किञ्च चितिशक्तिरेव भगवती विश्ववमनात् संसारवामाचारत्वाच्च वामेश्वर्याख्या सती।"** याचा अर्थ असा आहे की, (भगवती चितिशक्ती ही विश्ववमन आणि संसाराच्या वामाचारांमुळे वामेश्वरी ही पदवी धारण करीत) अखिल प्रमातावर्गाच्या अर्थात् जीवांच्या अंतःकरणात बहिष्करण आणि नाना पदार्थांच्या द्वारा (आपल्याला) खेचरी, गोचरी, दिक्चरी व भूचरी इत्यादि रूपांनी प्रकट करते.

परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती विश्वाचा बाह्यप्रसार करण्याच्या भूमिकेवर श्रीवामेश्वरीचे रूप धारण करीत असते. शास्त्रकारांनी हे नामकरण खाली लिहिलेल्या उपपत्तीच्या आधाराने केलेले आहे.

१) परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती विश्वाचे वमन करते अर्थात् स्वरूपामध्ये केवळ "अहं" रूपामध्ये अवस्थित भावमंडळाचे बाह्य "इदं" रूपामध्ये अवभासन करीत असते.

२) ही स्वातंत्र्यशक्ती वाम अर्थात् विरुद्ध आचरण करीत असते. या शक्तीचा भाव असा आहे की, स्वभावाच्या विरुद्ध रूपाला अर्थात् संसाराच्या रूपाला धारण करून सर्व विश्वाला अनंत आपत्तींचा आणि जन्ममरणाचा विषय बनवीत असते.

३) परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती ही संसारभावाच्या विरुद्ध आचरण करीत असते. या शक्तीचा भाव असा आहे की, ती परमेश्वराच्या शक्तिपातास अर्थात् कृपेस पात्र बनलेल्या व्यक्तीमध्ये श्रीशिवभावाचा विकास करीत

असते.

अशी श्रीवामेश्वरी शक्ती ही उपर्युक्त श्रीखेचरी इत्यादि चार शक्तींची मूलभूत शक्ती आहे. या दृष्टीने **"प्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**तदपरिज्ञाने स्वशक्तिभिर्व्यामोहितता संसारित्वम्।।१२।।**

याचा अर्थ असा आहे की, (श्रीशिव आभासन, अनुरक्ती, विमर्श, बीजारोपण व विलयन ही पंचकृत्ये विसरून) अर्थात् या विशेष ज्ञानाच्या अभावामुळे आपल्याही शक्तींच्या द्वारा मोहित होऊन (जीव बनून संसारात) पडतात.

या खेचरी आदि शक्ती पशुभावामध्ये सापडलेल्या श्रीशिवांना मोहात टाकून त्यांच्या बुद्धीमध्ये संसारातील हेय अर्थात् त्याज्य पदार्थांविषयी अहं-अभिनिवेशाचा अर्थात् आसक्तीचा दुराग्रह उत्पन्न करीत असतात. यामुळे संकुचित श्रीशिवांना अर्थात् जीवात्म्याला आपल्या विश्वात्मभावाचे तसेच आपल्या अबाध, असीम अर्थात् अमर्यादित अशा पंचविधकृत्य-कारितेचे ज्ञान राहत नाही. परमेश्वराच्या याच अवस्थेला "संसारभाव" असे म्हणतात.

इतके असूनही या शक्तिवर्गाचे काम द्विमुखी आहे. अर्थात् हा शक्ति-वर्ग दोन मुखांनी काम करीत असतो. या दृष्टीने श्री.भट्टदामोदर यांनी **"प्रत्यभिज्ञाहृदय"** सूत्र १२ वरील आपल्या मुक्तकांमध्ये असे म्हटले आहे की -

**पूर्णावच्छिन्नमात्रान्तर्बहिष्करणभावगाः।**
**वामेशाद्याः परिज्ञानाज्ञानात् स्युर्मुक्तिबन्धदाः।।१२।।**

याचा अर्थ असा आहे की, प्रमाता म्हणजे जीवाच्या अंतःकरणात, बाहेर आणि अन्य पदार्थात राहणारी पूर्ण व परिमित म्हणजे संकुचित श्रीवामेश्वरी आदि (देवी) सम्यक् ज्ञान आणि अज्ञानाने मुक्ती व बंध प्रदान करीत असतात.

**हा शक्तिवर्ग एकीकडे अज्ञानी पुरुषांना अधोगतीच्या गर्तेमध्ये लोटीत असतो तर दुसरीकडे श्रीसद्गुरूंच्या कृपेने निर्मळ हृदय बनलेल्या पुरुषांना श्रीशिवभावावर आरूढ करण्याची क्षमता या शक्तिवर्गामध्ये असते.** या दृष्टीने **"प्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथावरील टीकेत श्रीक्षेमराजांनी असे म्हटले आहे की -

**एवं सङ्कुचितशक्तिः प्राणादिमानपि**
**यदा स्वशक्तिव्यामोहितो न भवति,**
**"तदा अयम्, .... शरीरी परमेश्वरः"।।१२।।**

याचा अर्थ असा आहे की, अशा प्रकारे ज्यावेळी संकुचित म्हणजे परिच्छन्न शक्तींच्या द्वारा (जीव) मोहित होत नाही त्यावेळी तो शरीरी परमेश्वर "श्रीशिवभट्टारकच" असतो.

अशा सावधान साधकाच्या हृदयामध्ये या शक्ती मूढभाव उत्पन्न करीत नाहीत. या शक्ती तर शरीर, प्राण इत्यादींमध्ये राहत असूनही साक्षात् श्रीशिवच असतात.

या चारही शक्तिचक्रांच्या स्वरूपाच्या विषयामध्ये शास्त्रकारांचे मत संक्षेपाने अशा प्रकारचे आहे.

**१) खेचरी :- "खे बोधगगने चरतीति। प्रत्यभिज्ञाहृदयसूत्रटीका १२।।"** ज्ञानाच्या अनंत आकाशामध्ये विचरण करणाऱ्या शक्तीचे मूळरूपामध्ये "चिद्गगनचरी अर्थात् चिदाकाशामध्ये विचरण करणारी" असे नाव आहे. **"पशुभूमिकायां शून्यपदविश्रान्ता किञ्चित्कर्तृत्वाद्यात्मककलादिशक्त्यात्मना खेचरीचक्रेण गोपितपारमार्थिकचिद्गगनचरीत्वस्वरूपेण चक्रास्ति।। प्रत्यभिज्ञाहृदयसूत्रटीका १२।।"** परंतु जेव्हा परमेश्वराच्या सर्वकर्तृता आदि असंकुचित आणि असीम पाच शक्तींचा संकोच होऊन या शक्ती कला, विद्या आदि पाच कंचुकाचे अर्थात् आवरणाचे रूप धारण करीत असतात तेव्हा पशुभूमिकेवर या शक्तींना "खेचरीचक्र" हे नाव दिलेले आहे. या अवस्थेमध्ये या शक्ती पशूंच्या ज्ञानक्षेत्रावर आवरण टाकीत असतात आणि आपल्या खऱ्या चिद्गगनचरी रूपाला लपवून टाकतात. यामुळे हे जीवात्मा किंवा पशू स्वतःला शक्तिदारिद्र्य तसेच असहाय्य समजू लागतात.

दुसरीकडे **"पतिभूमिकायां तु सर्वकर्तृत्वादिशक्त्यात्मकचिद्गगनचरित्वेन। प्रत्यभिज्ञाहृदयसूत्रटीका १२।।"** या ज्ञानाने हाच शक्तिवर्ग सर्वकर्तृत्वा, सर्वज्ञत्व इत्यादि पाच असीम परमेश्वरी शक्तिरूपामध्ये स्पंदायमान होत आपल्या वास्तविक "चिद्गगनचरी" रूपाने पतिप्रमात्याच्या अर्थात् परप्रमात्याच्या हृदयाला विकसित करीत राहतात.

**२) गोचरी :-** परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चार वाणींच्या आणि अंतःकरणाच्या क्षेत्रामध्ये विचरण करणारा शक्तिवर्ग हा एकीकडे

पशुप्रमात्याच्या हृदयाला भेदव्याप्तीमध्ये टाकून अपारमार्थिक संकल्प-विकल्पांची शिकार बनवीत असतो आणि दुसरीकडे पतिप्रमात्याच्या हृदयामध्ये पूर्ण अभेद व्याप्तीच्या रूपामध्ये स्फुरायमान असतो. (**"प्रत्यभिज्ञाहृदयसूत्रटीका"** १२ पाहावी.)

**३) दिक्चरी :-** पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये नामक दहा दिशांमध्ये विचरण करणारा शक्तिवर्ग एकीकडे पशूंच्या इंद्रियांना बाहेर संसाराकडे प्रवाहमान बनवून त्याच्या द्वारा या पशूंना बाह्य विषयांचे भेदरूपामध्ये ग्रहण करवीत राहतो आणि दुसरीकडे पतिप्रमात्याला अर्थात् परमेश्वराला आंतर्मुखीन तसेच अतींद्रिय संवेदनेच्या द्वारा प्रत्येक पदार्थाचे अभेद "अहं" रूपामध्ये ग्रहण करवीत असतो. (**"प्रत्यभिज्ञाहृदयसूत्रटीका"** १२ पाहावी.)

**४) भूचरी :-** शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पाच प्रमेय भूमिकांमध्ये विचरण करणारा शक्तिवर्ग एकीकडे पशुप्रमात्याला भिन्न रूपामध्ये अवभासित होणाऱ्या घट, पट इत्यादि अनंत प्रमेयजालांच्या गोरखधंद्यामध्ये फसवीत असतो आणि दुसरीकडे पतिप्रमात्याला याच अनंत रूपांच्या प्रमेय पदार्थांचे आपल्याच अंगाप्रमाणे विशुद्ध अशा केवळ चिद्रूपामध्ये अनुभव करवीत असतो. (**"प्रत्यभिज्ञाहृदयसूत्रटीका"** १२ पाहावी.)

सर्व आंतर शक्तिचक्र हे स्पंदमयी संवित्‌सह अर्थात् शक्तीसह अभिन्न असल्यामुळे सतत स्पंदमय अर्थात् नित्य चेतन आहे. हाच नित्य चेतन शक्तिवर्ग सर्व इंद्रियवर्गामध्ये आणि याहून इतर अन्य देह, प्राण, पुर्यष्टक इत्यादींमध्ये चेतनेचा संचार करवून त्यांना चेतनाचा समानधर्मी बनवीत असतो. यामुळे ज्याप्रमाणे स्वयं परमेश्वर आपल्या असीम विश्वात्मक रूपामध्ये सृष्टी-संहारादि कार्ये करीत असतो त्याप्रमाणे संसारी जीवही आपल्या आपल्या अनुरूप परिधीमध्ये अर्थात् मर्यादेमध्ये किंवा क्षेत्रामध्ये किंवा सीमेमध्ये त्याचप्रकारे सृष्टी-संहारादि कार्ये करीत राहतो.

जीवभावामध्ये इंद्रियांची प्रवृत्ती, स्थिती आणि संहृती अर्थात् (सृष्टी, स्थिती, संहार) यांची अवस्था पुढीलप्रमाणे आहे.

**१) प्रवृत्ती किंवा सृष्टी :- "प्रवृत्तिः जिघृक्षितार्थोन्मुखतासमुन्मिषदवस्था।। स्पंदकारिका।।"** आपल्या आपल्या ग्राह्य विषयांना (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) ग्रहण करण्याकाली इंद्रियांच्या आपल्या विषयांकडे

उन्मुख होण्याच्या अवस्थेला "इंद्रियांची प्रवृत्ती" किंवा "सृष्टिदशा" असे म्हणतात.

**२) स्थिती :- "स्थितिर्गृहीतार्थविश्रान्त्यावस्था।। स्पंदकारिका।।"** आपल्या आपल्या किंवा आपल्याला अनुकूल ग्राह्य विषयांना ग्रहण केल्यानंतर काही काळ त्या विषयाबरोबरच तन्मय होऊन विश्रांत होण्याच्या अवस्थेला "इंद्रियांची स्थितिदशा" असे म्हणतात.

**३) संहार :- "संहृतिः कृतकृत्यत्वात् बाह्यार्थपरित्यागे स्व-व्यापारोपरमः प्रत्यस्तमयावस्था।। स्पंदकारिका।।"** अभिलषित अर्थात् इच्छित कार्य समाप्त झाल्यावर त्याच ग्रहण केलेल्या ग्राह्य पदार्थांहून वेगळे होऊन आपल्या कार्यापासून निवृत्त होण्याच्या अवस्थेला "इंद्रियांची संहारदशा" असे म्हणतात. यालाच दुसऱ्या शब्दामध्ये इंद्रियांची "प्रत्यस्त-मयावस्था" असेही म्हणतात.

अशा प्रकारे ही गोष्ट स्पष्ट होते की, सर्व आंतर शक्तिचक्र आणि त्या द्वारा बाह्य इंद्रिय वर्ग अथवा सर्व जडवर्गाला सत्ता देणारे मूलतत्त्व हे अहं प्रत्यवमर्शात्मक स्पंदतत्त्व अर्थात् संविद्भट्टारिकाच आहे. आता केवळ त्या तत्त्वाच्या परीक्षेचा प्रश्नच शिल्लक राहिला. **या विषयामध्ये शास्त्राचे सखोल अध्ययन, प्रत्यक्षादि प्रमाणांनी प्राप्त झालेली यथार्थ अनुभूती आणि सर्वोपरी अर्थात् सर्व प्रकारांनी श्रीगुरुचरणांची सेवा या गोष्टींची आवश्यकता आहे.**

सातव्या सूत्राच्या उत्तरार्धामध्ये **"यतः स्वतन्त्रता तस्य सर्वत्रेयम-कृत्रिमा।।"** याच्या द्वारा सूत्रकारांनी या गोष्टीकडे संकेत केलेला आहे की, अथक प्रयत्न आणि अतूट श्रद्धा यांनी त्या मौलिक तत्त्वाची परीक्षा केल्यावरच मितप्रमात्याला अर्थात् मर्यादित ज्ञात्याला किंवा जीवात्म्याला आपल्या मूलभूत सहज स्वातंत्र्याची अनुभूती होत असते.।।६-७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

अशा प्रकारे तार्किक प्रमाणांनी सिद्ध केलेल्या तत्त्वाच्या प्रत्यभिज्ञानासाठी अभिज्ञानासहित असलेला उपाय ग्रंथकारांनी ह्या कारिकांमध्ये सांगितला आहे.

ह्या पूर्वी स्पष्ट केलेल्या तत्त्वाची आदराने, श्रद्धेने आणि प्रयत्नाने,

"**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात "**उद्यमो भैरवः**" अर्थात् उद्योग हाच भैरव आहे. अशा प्रकारे प्रतिपादन केल्याप्रमाणे, सर्व भेदांचा उपसंहार करून, आपल्या ओज (तेजस्वी) वृत्तींना पसरवून (प्रसार करून किंवा वाढवून), परिपूर्ण अशा अंतर्मुखस्वरूपाचे सेवन करून भैरवरूप उद्योगाने परीक्षा करावी. सर्वांना अनुभवातून जाणविणारी, त्या श्रीशंकरात्मक स्वस्वभावाची अकृत्रिम, सहज व स्पंदतत्त्वरूप स्वतंत्रता ही सर्वत्र म्हणजेच जड आणि अजड (चैतन्य युक्त) पदार्थांमध्ये स्फुरण पावत स्थित आहे.

अशा प्रकारचे तत्त्व कोणते आहे? याला उत्तर "**यतः**" पासून "**लभते**" पर्यंत दिले आहे. "**अयम्**" म्हणजेच "**हा**" चा अर्थ येथे करणवर्ग म्हणजेच तेरा इंद्रिये असा होतो. तो लोकांना गोलक आदि रूपात माहीत असतो. मात्र लोक शास्त्रात केलेली व्याख्या जाणत नाहीत; कारण तो नेहमीच अदृश्य असल्याने त्याचा "हा" असा निर्देश केला जाऊ शकत नाही. ही तेरा इंद्रिये जरी विशेषत्वाने मूढ असली, मायेमुळे जड भासत असली आणि अणूपेक्षाही अधिक मूढत्व प्राप्त केलेली असली तरीही अमूढाप्रमाणे म्हणजेच चेतनाप्रमाणे स्वतःच प्रवृत्ती, स्थिती आणि संहार या अवस्था त्यांना प्राप्त होतात म्हणजेच ही इंद्रिये विषयांकडे प्रवृत्त होतात, तेथे रमतात आणि त्या विषयांपासून परत मागे फिरतात असा त्याचा अर्थ आहे. हा इंद्रियसमूह अशा प्रकारे अवस्थांना कसा काय प्राप्त होतो? याचे उत्तर असे आहे की, आंतरचक्राने ती इंद्रिये ही स्थिती प्राप्त करतात.

येथे आंतरचक्र याचा अर्थ करणेश्वर असा असून आंतःकरणे (आतील इंद्रिये) नाही; कारण ही अंतरिंद्रिय "वर्ग" या शब्दाने स्वीकारली जातात. पुढे सांगितल्या जाणाऱ्या पुर्यष्टकालाही हे पद उपयोजिलेले नाही; कारण त्या पुर्यष्टकामध्ये असलेले अंतःकरणत्रय (मन-बुद्धी-अहंकार) हेही एकत्र आलेले आहेत किंवा त्यांचाही "वर्ग" या शब्दाने उल्लेख केला जातो आणि त्या इंद्रियांनाही उद्देशून आंतरचक्र हा शब्द वापरलेला नाही; कारण ती इंद्रिये केवळ वासनारूप असल्यामुळे ती ज्यांना उपदेश द्यावयाचा आहे आणि ज्यांना योग म्हणजे काय ते माहीत नाही, अशा विद्यार्थांपुढे प्रत्यक्ष होत नाहीत. ज्याने इंद्रियांना जाणले आहे अशा योगिजनाला उपदेशांची (सूचनांची) आवश्यकता नसते; कारण स्वतःच परतत्त्वाचा अभ्यास किंवा परिशीलन करून त्याने ते प्राप्त केलेले असते.

त्यामुळे "**विमूढोऽमूढवत्**" या पदाबरोबर करणवर्गाचाच संबंध लावणे योग्य आहे. त्याचा संबंध आंतरकरणेश्वरीचक्राबरोबर लावता येत नाही कारण ते चक्र चैतन्याच्या चमत्काराच्या रूपाचे आहे.

असे म्हणण्याचा ग्रंथकाराचा आशय असा आहे की, हा जो श्रीशंकरात्मक स्वस्वभाव आहे तो एकरूपतेने आणि एकाचवेळेस, त्याच्या अत्यंत दुर्घट कामे करणाऱ्या स्वातंत्र्यशक्तीच्या साहाय्याने सर्व ज्ञानाचे सार अशा करणेश्वरीचक्राला आणि जड भासणाऱ्या करण वर्गाला एकात्म भासवितो.

हा स्वस्वभाव, ग्रंथकाराच्या मते करणेश्वरीचक्राला आणि करणवर्गाला प्रवृत्ती, स्थिती आणि संहार या अवस्थेतून जावयास लावतो. त्या ईश्वराच्या कृपेमुळे ज्याप्रमाणे करणेश्वरीचक्र त्या त्या पदार्थाची सृष्टी इत्यादि करते त्याचप्रमाणे करणवर्ग जड असूनही तो सृष्टी इत्यादि घटना घडवून आणणारा असा दिसतो.

जरी रहस्यदृष्टीने जड करणवर्ग अस्तित्वात नाही; या उलट करणेश्वरच विज्ञान देहरूप असतात तरीही येथे सुप्रसिद्ध प्रतीतीनुसार उपदेश देणाऱ्यांना क्रमानेच रहस्यार्थांच्या उपदेशामध्ये अनुप्रवेश द्यावा म्हणून असे सांगितले.

अशा प्रकारे गोलकादिरूप करणवर्गाच्या प्रवृत्त्यादि क्रमाने त्याचे अधिष्ठानरूप स्वतःचे मरीचिचक्र अर्थात् किरणांचे चक्र निरीक्षित असताना योगी त्या दोघांनाही प्रेरणा देणाऱ्या श्रीशंकरात्मक स्वस्वरूपाची परीक्षा करतो. स्वस्वरूप प्राप्त करण्यासाठी त्याची अकृत्रिम अशी स्वतंत्र शक्ती योग्याला सर्व ठिकाणी मिळते हेही यातून सांगितले.

यामुळे हेच परम उपादेयत्व असल्याने अर्थात् सर्वश्रेष्ठ ध्येय असल्याने या तत्त्वाची परीक्षा करणे योग्य आहे किंवा हे तत्त्व परीक्षणास योग्य आहे. याच तत्त्वाची परीक्षा करावी; कारण मागे सांगितल्याप्रमाणे हे तत्त्व प्राप्त करण्याचे उपायही सहजसोपे आहेत. त्यामुळे या तत्त्वाची परीक्षा आदराने, बहुमानाने आणि इच्छित विषयांच्या उपभोग घेण्यातल्या अविरोधाने युक्त होऊन करावी. अशा प्रकारच्या परीक्षणासाठी या ठिकाणी केलेल्या उपदेशानुसार योग्य काल आहे. यासंबंधी रहस्य जाणणाऱ्या श्रीगुरूंनी असे म्हटले आहे की -

**निजनिजेषु पदेषु पतन्त्विमाः करणवृत्तय उल्लसिता मम।**
**क्षणमपीश मनागपि मैव भूत्वदविभेदरसक्षतिसाहसम्।।**

।। उ.स्तो.८।७।।

**अर्थ** :- माझ्या उल्लसित झालेल्या या इंद्रियांच्या वृत्ती त्यांच्या त्यांच्या पदांच्या (विषयांच्या) ठिकाणी जावोत. हे ईश्वरा! क्षणभरासाठीसुद्धा तुझ्याशी अभिन्न असणाऱ्या त्यांचा आनंद कमी होऊ देण्याइतका तू उतावीळ होऊ नकोस.

"**परीक्ष्यम्**" येथला कृत् प्रत्यय हा योग्यता, शक्यता, प्राप्तकालता आणि प्रेषण इत्यादि सुचवितो.

या श्लोकातून ग्रंथकाराने इंद्रियांना चेतन म्हणणाऱ्या चार्वाकाचे मतही खोडून काढले आहे; कारण असा सर्वांचाच अनुभव आहे की, जड करण (इंद्रिय) वर्ग बलात्काराने किंवा बळजबरीने अमूढत्त्व-प्रवृत्यादींना प्राप्त होतो अर्थात् त्याला सृष्टी इत्यादि अवस्था बळजबरीने अथवा अन्य कोणा (परमतत्वा) मुळे प्राप्त होतात.।।६-७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

आधी भगवान् श्रीपरमशिवांचे नित्यस्वरूप सांगून आता दोन श्लोकांनी विश्वाचे अणुपरमाणू आदि अखिल वेद्यवस्तूंमध्ये त्यांचे स्वरूप पूर्ण असते, हे "**यतः करणवर्गोऽयं .....।।६।।**" व "**लभते तत्प्रयत्नेन .....।।७।।**" असे दोन कारिकांनी सांगतात.

परमेश्वराच्या स्पंदशक्तीच्या संबंधमात्राने आंतर आणि बाह्य इंद्रियवर्गांमध्ये चैतन्य निर्माण होते; कारण इंद्रियवर्गांमध्ये स्वतःचे असे सामर्थ्य नसते आणि श्रोत्रादि बाह्य आणि मनःप्रभृती आंतर अशी तेरा इंद्रिये ही अचेतन किंवा जड आहेत. स्पंदरूप चितिशक्ती त्या इंद्रियांमध्येच स्रोतरूपाने प्रवाहित होऊन त्यांना चेतनत्व देते. परमेश्वराच्या ठिकाणी अचेतन पदार्थात चैतन्य प्रदान करण्याची शक्ती नाही, हे म्हणणे कोणत्याही प्रकारे स्वीकारता येत नाही. या अचेतन पदार्थांमध्ये चैतन्य प्रदान करण्याचे सामर्थ्य हा मूलतः चिद्रूप परमेश्वराचा स्वभाव आहे. यामुळे परमेश्वर शरीरेंद्रिये, बुद्धी, प्राण आदींना चेतनत्व देऊन स्वतःच्या कल्पनेने त्या त्या (इंद्रियांची) कार्य करण्याची क्षमता निर्माण करतो आणि अशा प्रकारे त्या इंद्रियांहून भिन्न अच्युततत्त्वाला लोहचुंबकाप्रमाणे इंद्रियगोचर करतो. शरीरादि ही त्या परमतत्त्वाची केवळ साधने होत. जर त्या शरीरादींमध्ये कार्यकरणक्षमता स्वतः होऊनच असते असे स्वीकारले तर मग शरीर

पडल्यानंतर किंवा मृत्यूनंतरही ती कार्यकरणक्षमता दिसली असती. त्यामुळे श्रद्धातत्पर आणि संयत इंद्रियांनी साधक पुरुषाने यथार्थ तत्त्वाची परीक्षा करूनच स्वाभाविक स्वातंत्र्यशक्तीचे अर्जन करावे. यासंबंधी "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात भगवान् श्रीकृष्णांनी असे सांगितले आहे की -

**ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः।**
**तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी।।१५-४।।**

**अर्थ :-** त्यानंतर ज्या स्थानी गेलेले (जीव) परत मागे परतून येत नाहीत त्या स्थानाला जाणून घ्यावे. ज्याच्यापासून ही अनादि संसारप्रवृत्ती पसरली आहे त्याच आद्य पुरुषाला "मी शरण आहे" अशा भावनेने सर्व प्रकाराने जाणावे.

त्यामुळे सर्व भावाने एकाग्र मनाने त्या स्वस्वरूपाचे अनुसंधान करावे.।।६-७।।

**न हीच्छानोदनस्यायं प्रेरकत्वेन वर्तते।**
**अपि त्वात्मबलस्पर्शात् पुरुषस्तत्समो भवेत्।।८।।**

**अन्वयार्थ :-**

**अयम् पुरुषः** - हा जीव, लौकिक पुरुष, संसारी, "मित प्रमाता", **इच्छानोदनस्य** - स्वतःच्या इच्छेच्या टोचणीने, इच्छाबळावर, **प्रेरकत्वेन** - आपल्या इंद्रियांना प्रेरणा देणारा म्हणून- प्रेरक या भूमिकेने, **न वर्तते** - व्यवहार करीत नाही, वागत नाही, **अपि तु** - परंतु, **आत्मबल-स्पर्शात्**- स्पंदाच्या अथवा आत्म्याच्या किंवा "**परप्रमाता**" जो ईश्वर त्याच्या सामर्थ्याच्या स्पर्शामुळे- त्याचे सामर्थ्य असते इतकेच नव्हे तर त्या स्पर्शामुळे तो, **तत्समो** - त्याच्यासारखा- कार्य करण्यास सक्षम, **भवति**- होतो.।।८।।

**अर्थ :-** हा जीव किंवा लौकिक पुरुष, किंवा मितप्रमाता हा इच्छेच्या बळाने आपल्या इंद्रियांना प्रेरणा देणारा अर्थात् प्रेरक या भूमिकेने व्यवहार करीत नाही किंवा वागत नाही; परंतु स्पंदाच्या अथवा आत्म्याच्या किंवा परप्रमात्याच्या किंवा परमेश्वराच्या समर्थ स्पर्शामुळे तो जीव स्वयं त्याच पतिप्रमात्याप्रमाणे किंवा परमेश्वराप्रमाणे बनतो अर्थात् त्याच्याप्रमाणे कार्य करण्यास सक्षम होत असतो.।।८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

ज्याप्रमाणे एखादा मनुष्य हाताच्या साहाय्याने चाबुकादिकांना मारण्याची प्रेरणा करतो त्याप्रमाणे हा अंतरात्मा इच्छारूपी शक्तीने इंद्रियांना विषयाकडे प्रेरणा करीत असतो. इच्छारूपी साधन असले तरच इंद्रिये विषयाकडे जातात असे नाही तर आत्म्याची जी स्वाभाविक सर्वकर्तृत्वशक्ती आहे तिच्या सामर्थ्याने तो इंद्रियांकडून विषयांना ग्रहण करवितो. त्यामुळे हा आपला आत्मा सर्वशक्तिमान् सत्ताधीश आहे. आत्मा हा शब्द जीवात्मा व परमात्मा या दोघांनाही लागू होत असतो. ज्याप्रमाणे सर्वसत्ताधीश परमेश्वर स्वतःच्या चैतन्य शक्तीच्या बळावर स्वतंत्रपणाने यथेष्ट रीतीने जगाची उत्पत्ती-स्थिती-लय करू शकतो त्याप्रमाणे हा संसारी जीवात्मा ज्यावेळेला त्या स्वतंत्र इच्छाशक्तीचे बल घेतो त्या त्या वेळेस तो इंद्रियांना विषयाकडे प्रवृत्त अगर निवृत्त करू शकतो. त्यामुळे तो त्या वेळेला स्वतंत्र शक्तिमान् अशा परमेश्वराप्रमाणे समर्थ होत असतो. ज्याप्रमाणे ईश्वर सर्वकर्तृत्व व आदिशक्तीच्या योगाने विश्वाला निर्माण करतो व जाणतो त्याप्रमाणे हा जीवात्मा त्या स्वतंत्र शक्तीच्या बळावर जाणण्याची व करण्याची क्रिया करतो; कारण तो मायेच्या योगाने नियतीने केलेल्या ठराविक विषयांचे ज्ञान व ग्रहण या क्रिया करीत असतो. फक्त त्यावेळेला हा जीव आपली जागृती ठेवीत असतो म्हणजे त्याला आपल्या स्वातंत्र्य शक्तीची जाणीव नसते. अशा रीतीने जीव ईश्वरशक्तीमध्ये येत असल्याने ईश्वर व जीवात्मा हे एकच आहेत. अशा स्थितीत त्या जीवाच्या पाठीमागे भेदाचे बंधन काय म्हणून असते? वास्तविक पाहता जीवात्मा पुरुष केवळ इच्छा, प्रेरणा किंवा साधनसमूहाच्या प्रेरणेचा स्वतंत्र कर्ता असतो. याशिवाय आपल्या आवरणरहित, चिद्रूपज्ञत्व, कर्तृत्व इत्यादींच्या बळाच्या स्पर्शाने तो सर्वज्ञ व सर्वकर्ता बनतो.।।८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

पण येथे कोणी अशी शंका घेईल की, करणांचे अर्थात् साधनांचे प्रेरकत्व स्वस्वभावाकडे निरपेक्षतेने जात नाही. धर्माधर्मसंबंधाने चेतनप्रमात्याच्या ठिकाणी इच्छा नामक गुण उत्पन्न होतो. या इच्छागुणाने युक्त झालेला चेतनप्रमाताच करणांना प्रवर्तित करतो व त्यामुळे करणे

अर्थात् साधने विषयाचा स्वीकार किंवा त्याग करतात. सारांश, करणप्रवृत्तीचे कारण प्रमात्याचे स्वातंत्र्य हे नसून धर्माधर्मामुळे उत्पन्न होणारा हा गुण हे आहे. यावर कारिकाकार असे म्हणतात की -

**स्पष्टीकरण :-** नोदन म्हणजे प्रेरणेचे साधन होय. एखादा मनुष्य आपल्या हात या साधनाने चाबूक इत्यादि जड वस्तूला प्रवर्तित करतो असा प्रकार करणप्रेरणेचा नाही. स्वस्वभाव हा इच्छेच्या साहाय्याने जडकरणांचा प्रेरक होत नाही, तर तो "आत्मबलस्पर्शानेच" म्हणजे स्वभावभूत आंतरिक शक्तीच्या संस्पर्शानेच करणांना प्रवृत्त करतो. करणांचे प्रवर्तन व स्वस्वभाव यांच्यात धर्माधर्ममूलक इच्छेचे माध्यम नसते हा अर्थ. या बाबतीत पुरुष व ईश्वर यांचे साम्य आहे. ईश्वर हा स्वस्वभावाच्या भूमिकेवर आरूढ होऊन जगताच्या प्रवृत्ती, स्थिती व संहृती अर्थात् संहार घडवून आणतो. त्याच स्वस्वभावाच्या भूमिकेवर आरूढ होऊन पुरुषही करणवर्गाची स्वविषयांत प्रवृत्ती, स्थिती व संहृती घडवून आणतो. तो विश्वाचा ज्ञाता व निर्माताही असतो. त्याचप्रमाणे पुरुषही स्वभावबलानेच ज्ञातृत्व व कर्तृत्व यांनी युक्त होऊन आपले नियत विषय जाणतो आणि निर्माणही करतो. ज्याप्रमाणे ईश्वराला विश्वनिर्मितीकरिंता स्वतंत्र अशा साधनाची गरज पडत नाही त्याप्रमाणेच करणे प्रवृत्त करावयास पुरुषालाही इच्छा या माध्यमाची गरज पडत नाही. इच्छा ही धर्माधर्ममूलक असून आत्म्याचा तो एक गुण आहे अशी नैयायिकांची कल्पना आहे. या इच्छागुणाचा येथे निषेध आहे. स्पंदशास्त्राची इच्छेची कल्पना वेगळी आहे ती पुढे येईलच.।।८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## प्रमातृत्व वर्गामध्ये स्पंदशक्तीचा स्पर्श

पूर्व सूत्रामध्ये असे म्हटलेले आहे की, शाश्वत स्पंदमय अनुत्तरतत्त्व स्वतंत्र इच्छाशक्तीच्या द्वारा अचेतन इंद्रियवर्गामध्ये चेतनेचा संचार करून इंद्रियवर्गाला चेतनधर्मी बनवीत असते. या संबंधामध्ये अशी शंका उत्पन्न होत असते की, पतिप्रमाता अर्थात् परमेश्वर आणि जडवर्ग यांमध्ये अवस्थित असा पशुप्रमाता अर्थात् संसारी जीव यांच्यासाठी कोणते स्थान

अवशिष्ट किंवा शिल्लक राहत असते? हा पशुप्रमाता नेहमीच या दोहोंमध्ये लटकत राहून किंवा अडकून कोणत्यातरी दिशेने आलेल्या इच्छारूपी चाबुकाच्या माराने इंद्रियांना आपापल्या कार्याकडे प्रवृत्त होण्याची केवळ प्रेरणा देत असतो का? या शंकेचे निवारण या सूत्रामध्ये केले जाणार आहे.

**वृत्ती :-** असा विचार करणे योग्य नाही की, हा मितप्रमाता किंवा जीवात्मा अर्थात् पशुप्रमाता श्रीपरमेश्वराच्या इच्छारूपी अंकुशाच्या द्वारा इंद्रियवर्गाला आपापले काम करण्याची केवळ प्रेरणा देत राहतो. परंतु याचा अर्थ असा आहे की, हा मितप्रमाता आपल्या स्वरूपामध्ये स्थित झाल्यावर आपल्या इच्छेनुसार बाह्य तसेच आभ्यंतर कार्यांची सृष्टी करीत असतो. अशा अवस्थेमध्ये या मर्यादित प्रमात्याला केवळ इंद्रियांना विषयाभिमुख बनविण्याचे समार्थ्य असत नाही; परंतु हा प्रत्येक क्षेत्रामध्ये स्वतंत्रतेने कार्य करण्याची क्षमताही प्राप्त करून घेत असतो.।।८।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्रामध्ये प्रत्यक्षात मागील सूत्राचीच व्याख्या केलेली आहे. मागील सूत्रामध्ये जे काही सांगितलेले आहे त्यामुळे सहजपणे अशी शंका निर्माण होते की, जेव्हा पतिप्रमाता सरळ जडवर्गामध्ये चेतनासंचार करून संसाराचे कार्य चालवीत असतो तेव्हा संसारी ग्राहकवर्ग अर्थात् संसाराच्या सर्व जीवांचे अस्तित्वच संशयात पडत असते. परंतु वस्तुस्थिती तर याहून काही वेगळीच असलेली आढळून येते. संसाराच्या प्रत्येक आदान-प्रदानकाळी आपण असे पाहतो की, प्रत्येक संसारी जीव (ग्राहक) आपल्या स्वतंत्र इच्छेने आपल्या इंद्रियांना सहजरूपामध्ये विषयाकडे अभिमुख किंवा प्रवृत्त अगर विषयापासून निवृत्त करीत असतो. शेवटी कोणत्याही प्रकारचा कार्यकलाप संपन्न होण्याच्या वेळी श्रीपरमेश्वर स्वतः हिमालयासारख्या उंच मंचावर उभा राहून जीवांना कठपुतळीप्रमाणे नाचवीत तर राहत नाही ना? जर अशी परिस्थिती असती तर संसारातील सर्व ग्राहकवर्गाच्या अस्तित्त्वाचा अभिप्राय किंवा अर्थच काय राहिला असता? याबरोबरच जेव्हा संसाराचा सर्व ग्राहकवर्ग प्रत्यक्षरूपामध्ये स्वतः प्रत्येक प्रकारचे आदानप्रदान करताना दिसून येतो तेव्हा या यथार्थाला केवळ परमेश्वराच्या इच्छेचे नाव देऊन टाळता तरी कसे येणार? ह्या शंकेचे समाधान तोपर्यंत होणे असंभव आहे जोपर्यंत शैवसिद्धान्तानुसार पतिप्रमाता

अर्थात् श्रीशिव किंवा पूर्णप्रमाता, पशुप्रमाता अर्थात् संसारी ग्राहक किंवा मितप्रमाता आणि सर्व ग्राह्यवर्ग अर्थात् जडप्रमेय वर्ग किंवा ग्राह्य, ज्ञेय विषय याचे वास्तविक किंवा खरे स्वरूप काय आहे हे समजत नाही. या तीन प्रकारच्या भिन्न भिन्न आणि पारस्परिक संबंधरहित स्वतंत्र सत्ता आहेत की एकच मूलभूत सत्तेची केवळ तीन रूपांतरे आहेत?

या संबंधामध्ये ही गोष्ट विचारणीय आहे की, सूत्रकाराने या सूत्रामध्ये आत्मबलाच्या स्पर्शाने जे कोडे उलगडविले आहे त्याचा खरा अर्थ काय आहे? आत्मबल हे स्वतः काय आहे आणि हे आत्मबल कशाला स्पर्श करीत असते? शैवशास्त्री लोकांचे मत असे आहे की, प्रत्यक्षात सतत स्पंदमयी पारमेश्वर सत्ता स्वतःच या तिन्ही रूपांमध्ये प्रकाशमान आहे. ही पारमेश्वरी सत्ता विभू असल्यामुळे सर्वव्यापक आहे. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात श्रीअभिनवगुप्ताचार्य यांनी असे म्हटले आहे की -

**विभुत्वात्सर्वगो नित्यभावादाद्यन्तवर्जितः।**
**विश्वाकृतित्वाच्चिदचित्तद्वैचित्र्यावभासकः।।६१।।**
**ततोऽस्य बहुरूपत्वमुक्तं दीक्षोत्तरादिके।।१.६२।।**

याचा अर्थ असा आहे की, (श्रीशिव) हा प्रभू असल्यामुळे सर्वव्यापक आहे. तो नित्य असल्यामुळे अनादि व अनंत आहे. तो (श्रीशिव म्हणजे) विश्वाकृतीच आहे. त्यामुळे तो चिद्रूप व अचिद्रूपही आहे. त्याच्या सर्व विचित्रतांचे अवभासन म्हणजे प्रकटीकरण तोच करतो. तो श्रीशिव आपल्या शक्तीने बहुरूपत्व धारण करतो.

ही सतत स्पंदमयी पारमेश्वर सत्ता नित्य असल्यामुळे आदि अंतरहित असते. ही परमेश्वराची सत्ता विश्वाकृती असल्यामुळे स्वतःच चेतनरूप, जडरूप आणि विश्वाच्या विचित्र आकारप्रकारचे अवभासन करणारी आहे. सत्य गोष्ट अशी आहे की, या कारणांनी ही स्पंदमयी परमेश्वराची सत्ता स्वतः बहुरूपी अर्थात् अनेक रूपे धारण करणारी अशी आहे.

**"विश्वनिर्माणेच्छुर्हि परमेश्वरः प्रथमं स्वाव्यतिरिक्तमेव विश्वं प्रकाशयेत्, अयमेव हि आदिसर्गः तत्र तत्रागमेषु उच्यते।। तंत्रालोक-विवेक १.१३५।।"** असीम तसेच अनंत शक्तींनी परिपूर्ण असे श्रीशिव विश्वाचे बाह्य अवभासन न करण्याच्या संकल्पात्मक अर्थात् इच्छात्मक उन्मुखतेकाली किंवा उत्सुकतेसमयी सर्वप्रथम त्याचे अवभासन स्वरूपाहून अभिन्न अहंविमर्शात्मक रूपामध्ये करीत असतात. या अवभासनाचे शास्त्रीय

नाव "आदिसर्ग" असे आहे. त्यानंतर **"अनन्तरं यदास्य मायया सर्गचिकिर्षा भर्वात तदा स्वस्वातन्त्र्यात् स्वात्मदर्पणे अनन्तग्राह्य-ग्राहकद्वयाभाससन्ततीराभासयति।। तंत्रालोकविवेक १.१३५।।** यानुसार श्रीशिव हे आपल्याच स्वातंत्र्यशक्तीचे रूपांतर असलेल्या मायाशक्तीच्या द्वारा स्वरूपावरच आवरण टाकून स्वतःच्या आत्मरूपाच्या दर्पणामध्ये अनंत प्रकारच्या ग्राहकांचे आणि ग्राह्याचे अवभासन करीत असतात. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**सोऽयमात्मानमावृत्य स्थितो जडपदं गतः।।१३४।।**
**आवृतानावृतात्मा तु देवादिस्थावरान्तगः।**
**जडाजडस्याप्येतस्य द्वैरूप्यस्यास्ति चित्रता।।१३५।।**

याचा अर्थ असा आहे की, तो परमेश्वर स्वात्म्याला आवृत करून मायेच्या प्रभावाने संकुचित होतो. त्यामुळे त्याचे रूप आवृत व अनावृत असे होते. देव योनीपासून स्थावरापर्यंत पसरलेल्या जडचेतन रूप अशी याची दोन रूपे असली तरी याची अनंत रूपे किंवा भेद आहेत.

संसारी ग्राहकदशा आणि ग्राह्यदशा स्वरूपावर पडलेल्या आवरणाच्या तारतम्यावर आणि अनुपातावरच आधारित आहे. अशा प्रकारे परमेश्वर हे स्वयं तिन्ही रूपांमध्ये अवभासन करीत असतात किंवा अवभासित आहेत. खालील तक्त्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक १**

| | **प्रमात्याचे अर्थात् जीवाचे रूप** | **आवरणाचे तारतम्य** | **शक्तीचे स्वरूप** |
|---|---|---|---|
| १ | प्रतिप्रमाता अर्थात् श्रीशिव किंवा परमेश्वर | विशुद्ध चिद्रूप अनावृत्त म्हणजे उघडे | ज्ञानत्व आणि कर्तृत्वरूपपूर्ण स्वातंत्र्य |
| २ | पशुप्रमाता अर्थात् संकुचित जीव | चित् व अचित् अर्धआवृत्त अर्थात् अर्धे झाकलेले व अर्ध-अनावृत्त अर्थात् अर्धे उघडे | संकुचित ज्ञान आणि क्रिया |
| ३ | जड प्रमेय अर्थात् संसार किंवा जगत् | अचित् चिद्रूपतापूर्ण आवृत | ज्ञेयभाव व कार्यभाव |

**तक्ता क्रमांक २**

| | आकार | भावांचे रूप | भेद |
|---|---|---|---|
| १ | विश्वात्मभाव आकारहीन | सर्वभाव आपल्या अंगाप्रमाणे | भेदरहित सर्वव्यापक |
| २ | देह, प्राण पुर्यष्टक व शून्य | सर्व भाव आपल्या-पासून भिन्न | देवता मानव पशुपक्षिवर्ग |
| ३ | जड पंचमहाभूते अंधारात पडून राहिल्यामुळे संज्ञाहीनता | घोर मूढतेमध्ये किंवा प्रकृतीचे असंख्य भेद | सर्व स्थावर |

प्रत्यक्षात जगतामध्ये दिसून येणाऱ्या अनंत भावराशी हे परमात्म्याच्या अनंत शक्तींच्या विश्वमय प्रसाराशिवाय अन्य काहीही नाही. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**एष चानन्तशक्तित्वादेवमाभासयत्यमून्।**
**भावानिच्छावशादेषा क्रिया निर्मातृतास्य सा।।२.४.२।।**

याचा अर्थ असा आहे की, भगवान् श्रीपरमशिव अनंतशक्तिसंपन्न असल्यामुळे ते सर्व पदार्थांना आभासित करीत असतात. ही निर्माणरूपी क्रिया भगवान् श्रीशिवांच्या अधीन असते. त्यांना इच्छेला येईल तेव्हा ते उभारणी, प्रकाशन किंवा आभासन करतात व जेव्हा नको असेल तेव्हा करीत नाहीत. परमात्मा या भावराशीला आपल्या केवळ स्वतंत्र संकल्पानेच अवभासित करीत असतात. स्वरूपतः एकाकार असूनही ग्राहकरूप किंवा ग्राह्यरूप अनेकाकारतेला अवभासित करण्याची संकल्पात्मक क्षमता किंवा सामर्थ्य हेच श्रीपरमेश्वराचे क्रियात्मक स्वातंत्र्य आहे. हे स्वातंत्र्य संकुचित अशा ग्राहकवर्गामध्ये शक्य असत नाही.

**न लोकयात्राभिप्रायाज्जनयेद् बीजमङ्कुरम्।**
**किन्तु स्वभावात् .....।। ईश्वरसिद्धिः ४२।।**

भूमीमध्ये टाकलेले बीज हे लोकयात्रेच्या अपेक्षेने अंकुर बनत नसते तर अंकुरित होणे हा बीजाचा स्वभावच आहे. चैतन्य हे कोणत्याही

दुसऱ्या वस्तूच्या अपेक्षेने रूपाचा प्रसार करीत नाही; परंतु हा चैतन्याचा अकाट्य अर्थात् न तोडता येणारा स्वभावच आहे. फलतः ही गोष्ट स्पष्ट होते की, संसारी ग्राहक अर्थात् मितप्रमाता किंवा जीवात्मा आणि पतिप्रमाता अर्थात् श्रीपरमेश्वर हे स्वरूपतः भिन्न नाहीत. अशा अवस्थेमध्ये जीवात्मा अर्थात् जीव आणि परमात्मा अर्थात् श्रीशिव यांची इच्छाशक्तीही भिन्न असू शकत नाही. परिणामतः ज्ञान आणि क्रिया यांमध्येही भेद किंवा फरक असत नाही. परंतु यांच्या स्वातंत्र्याच्या अनुपातामध्ये अर्थात् क्रमामध्ये आणि तारतम्यामध्ये निश्चित भेद आहे. पतिप्रमाता अर्थात् परमेश्वर किंवा श्रीशिव अर्थात् परमात्मा हे पूर्णपणे स्वतंत्र आणि चिद्रूप असल्यामुळे विश्वरूपामध्ये इच्छा, ज्ञान आणि क्रिया शक्तींना उपयोगात आणू शकतात. परंतु पशुप्रमाता अर्थात् जीव हा अंशतः स्वतंत्र आणि चिद्रूप असल्यामुळे आपल्या संकुचित परिधीमध्ये अर्थात् क्षेत्रामध्ये किंवा सीमेमध्ये या तिन्ही शक्तींना त्याच अनुपाताने अर्थात् क्रमाने उपयोगात आणू शकतो. एवढेच नाही; तर संसारामधील अर्थात् जगतामधील अनंत जीवजंतूंमध्ये परस्परातही चिद्रूपतेवर पडलेल्या आवरणाच्या अनुपाताने या तीन शक्तींची हीनता किंवा अधिकता आढळून येत असते. जर एका छोट्याशा जीवाला विश्वाची परिधी अर्थात् मर्यादा किंवा कक्षा आणि शक्तित्रयाचे काही तारतम्य होत असते तर तेच तारतम्य त्या जीवाहून मोठे जीव किंवा मनुष्याचे असू शकत नाही. महान् अर्थात् मोठा दावाग्नी मोठे जंगल जाळू शकतो. अंगारा हा एका छोट्या दाह्यपदार्थाला आणि ठिणगी एका रुईच्या रेशाला म्हणजे तंतूला जाळू शकते. परंतु अग्नी हा छोटा किंवा मोठा आहे यावर त्याच्या जाळण्याच्या स्वभावामध्ये कोणताही फरक पडत नाही. त्याचप्रमाणे प्रमाता किंवा ज्ञाता हा पतिभावावर असो किंवा पशुभावावर असो त्याच्या स्पंदात्मक चैतन्यस्वभावामध्ये कोणताही फरक पडत नाही. आता जर कोणी असे म्हणाले की, छोटीशी ठिणगी ही कधी मोठ्यात मोठी आग बनू शकते तर ते ठीक आहे; कारण पशुप्रमाता अर्थात् जीव हा ही कधी कधी साधनेच्या बळाने पतिप्रमाता अर्थात् परमेश्वर बनू शकतो.

प्रमात्याच्या या पतिभाव आणि पशुभाव यांच्या विषयामध्ये भगवान् श्रीउत्पलदेवांचे असे म्हणणे आहे की -

**स्वाङ्गरूपेषु भावेषु प्रमाता कथ्यते पतिः ।**
**मायातो भेदिषु क्लेशकर्मादिकलुषः पशुः ।।**
**।। ईश्वरप्रत्यभिज्ञा ३.२.३ ।।**

याचा अर्थ असा आहे की, तो प्रमाता म्हणजे जीव आपल्या अंगरूप पदार्थांचा स्वामी आहे असे म्हटले जाते. मात्र मायेच्या द्वारा या पदार्थांचा भेद झाल्यावर तो क्लेश-कर्मादींमुळे पशू अर्थात् जीव होतो.

प्रमात्याला ज्या अवस्थेमध्ये सर्व भावमंडल आपल्या अंगाप्रमाणे अर्थात् आपल्या अहं विमर्शात्मक अर्थात् विचारात्मक स्वभावाने अभिन्न प्रतीत होत असते त्या अवस्थेलाच "**पतिप्रमातृभाव**" असे म्हणतात. या प्रमात्याला पती म्हणण्यामागे कारण असे आहे की, या पतिप्रमात्याचे साम्राज्य हे सर्व भाववर्गावर पसरलेले आहे आणि पतिप्रमाता अर्थात् परमेश्वर किंवा श्रीशिव हे या सर्व भावांचे आपल्या चैतन्याच्या अमृतांच्या बिंदूंनी अनुप्राणन किंवा पालन करीत राहतात. याउलट ज्या अवस्थेमध्ये प्रमात्याला मायीय आवरणामध्ये आवृत्त राहिल्यामुळे आपले अंगभूत भाव हे आपल्याहून भिन्न रूपामध्ये प्रतीत होऊ लागतात. त्यालाच अर्थात् त्या अवस्थेलाच "**पशुप्रमातृभाव**" असे म्हणतात. या अवस्थेमध्ये हा प्रमाता भाववर्गाचा अधिपती न राहता त्या भाववर्गाचा दास बनून राहतो. भावांचा क्षोभ अर्थात् उलथापालथ हा या परप्रमात्यासाठीच बनलेला असल्यामुळे त्यामध्ये फसून हा प्रमाता पशू आणि जन्ममरण यांच्या संसृतीच्या अर्थात् मार्गाच्या दुरत्यय अर्थात् दुःखदायक पथाचा पथिक बनलेला आहे.

या तीन रूपांच्या पारस्परिक संबंधाच्या विषयामध्ये शैवगुरूंनी लांबरुंद आणि कठीण बौद्धिक कवायत केल्यानंतर हा निष्कर्ष काढलेला आहे की, हे तिन्ही परस्परांमध्ये अभेद संबंधामध्ये स्थित आहेत.

आता केवळ आत्मबल आणि त्याच्या स्पर्शाचा प्रश्न उरतो. आत्म-सत्तेमध्ये स्पंदमान होणाऱ्या अर्थात् स्पंदमयी पूर्णाहंतेचे अर्थात् स्वसामर्थ्याचे बल आहे. हे बळ पतिप्रमातृभावाच्या अवस्थेमध्ये अपरिमित अर्थात् अमर्यादित तसेच पूर्ण स्वतंत्र आहे. संसारी ग्राहकभावाच्या अवस्थेमध्ये याची "स्पर्श" अर्थात् अंशरूपाने विद्यमानता असते. यामुळे या अवस्थेमध्ये प्रमाता हा परिमित अर्थात् मर्यादित तसेच अंशतः स्वतंत्र असतो. हेच कारण आहे की, जेथे पतिप्रमाता अर्थात् परमेश्वर अर्थात् श्रीशिव हे

असीम रूपामध्ये अर्थात् अमर्यादित रूपामध्ये सर्व काही युगपत् अर्थात् एकाचवेळी इच्छित असतात, जाणत असतात आणि करीत असतात. तेथे पशुप्रमाता देह, प्राण तसेच पुर्यष्टक अर्थात् मन, बुद्धी, अहंकार आणि शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध यांच्या पिंजऱ्यामध्ये बद्ध झाल्यामुळे ससीम रूपामध्ये आणि निश्चित क्रमामध्ये काहीही इच्छित असतो, जाणत असतो आणि करीत असतो. या दृष्टीने **"अजडप्रमातृसिद्धी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की-

**यद्यप्यर्थस्थितिः प्राणपुर्यष्टकनियन्त्रिते।**
**जीवे निरुद्धा तत्रापि परमात्मनि सा स्थिता।।२०।।**

**अर्थ :-** जरी प्राण व पुर्यष्टकांनी नियंत्रित केलेली ही क्रियाशक्ती जीवामध्ये निरुद्ध झालेली असली तरी तेथेही ती परमात्म्यातच स्थित असते.

दोन्ही रूपांमध्ये प्रवर्तमान क्रियाशक्ती ही प्रत्यक्षात मौल्यवान आत्म-सत्तेवरच आश्रित आहे. याचा परिणाम म्हणून पशुप्रमाताही प्रत्यक्षात स्वरूपामध्येच अवस्थित असतो, त्याच्या बाहेर नसतो. याच्याशिवाय **"आत्मबलस्पर्श"** याचा अभिप्राय किंवा अर्थ स्वरूपाची पूर्णानुभूती होणे असाही आहे. जेव्हा पशुप्रमात्याला अलक्ष्य अर्थात् श्रीशिव किंवा परब्रह्माच्या अनुग्रहामुळे वास्तविक पूर्ण अहंतारूप स्वरूपाची अनुभूती होत असते तेव्हा तो पशुप्रमाता किंवा जीव हा पशुभावापासून मुक्त होऊन साक्षात् श्रीशिवच बनत असतो. अशा अवस्थेमध्ये जीवाची इच्छा ही विश्वात्म्याची इच्छा असते.

आत्मबलाच्या विषयाबद्दल याच्या पुढेही यथाशक्य विवेचन केले जाणार आहे. येथे केवळ इतकेच म्हणणे पुरेसे आहे की, आत्मबलाचे महत्त्व हे शब्दाच्या द्वारा वर्णन करण्यास कठीण आहे. आत्मबलाच्या केवळ स्पर्शाने करणवर्गच काय संपूर्ण विश्वामध्ये प्रचंड हालचाल किंवा गोंधळ उडून जात असतो. आजचे यांत्रिक युग हे याचे ज्वलंत उदाहरण आहे. कोणत्याही बिंदूला किंवा बिंदूवर आत्मबलाचा स्पर्श होताच सर्व जडवर्ग हा कठपुतळीप्रमाणे नाचू लागतो. प्रत्येक प्राण्याची पांचभौतिक काया अर्थात् शरीर, प्राण इत्यादिही याला अपवाद नाही.।।८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

त्या (परम) तत्त्वापासून चेतनता मिळविल्याप्रमाणे इंद्रिये स्वतःच प्रवृत्यादि मिळवितात किंवा प्राप्त करतात असे कसे काय म्हणता येईल? कारण अनुभव तर असा आहे की, ग्राहक (प्रमाता किंवा जीव) स्वतःच्या इच्छेने कात्री इत्यादि साधनांना प्रेरणा करतो. त्याचप्रमाणे या तत्त्वाची प्रयत्नपूर्वक परीक्षा करावी असे तरी कसे काय म्हणता येईल? कारण आमची इच्छा ही बाह्य विषयांमागोमाग धावत असते. ती इच्छा तत्त्वपरीक्षा करण्यास उत्साहाने पुढे येईलच असे नाही. अशा शंका प्रतिपक्षाने उत्पन्न केल्या असता त्यांना उत्तर देण्यासाठी ग्रंथकारांनी ही कारिका सांगितली आहे.

**स्पष्टीकरण :-** हा लौकिक (सामान्य) पुरुष इच्छेच्या किंवा प्रतोदाच्या प्रेरणेमुळे काम करीत नाही अर्थात् आपल्या इंद्रियांना त्यांच्या अर्थाकडे जाण्यास प्रवृत्त करीत नाही. या उलट चिद्रूप आत्म्याच्या स्पंदात्मक बलाचा स्पर्श करून घेऊन अर्थात् त्या तत्त्वाच्या थोड्याशा क्रियेने स्पंदशक्तीचा त्याच्यात समावेश होऊन तो त्या स्पंदतत्त्वाप्रमाणेच बनतो. त्या अहंतारूप रसाच्या एका थेंबाच्या अभिषेकानेही अचेतन वस्तूही सचेतन होते. त्यानंतर ते तत्त्व केवळ इंद्रियांनाच प्रेरणा देणारे ठरत नाही, तर कल्पित प्रमात्यालाही चेतनयुक्त बनवून स्वयं प्रवृत्त्यादींना योग्य बनविते आणि त्यामुळेच त्या प्रमात्याला असे वाटते की, मी या इंद्रिय वर्गाला प्रेरणा देतो. तो प्रमाता त्या स्पंदतत्त्वाशिवाय, त्याच्या अंतःप्ररणेने रहित असल्यास स्वतःलाच हरवून बसतो.

त्यामुळे जड करणांना आणि त्यांच्या ग्राहकाला स्वतःचे प्रकाशयुक्त किरणरूप चक्र पसरवून त्या किरणांच्या संबंधाने चेतनभावाची प्राप्ती करवून देणाऱ्या या तत्त्वाची परीक्षा करावी, हे योग्यच आहे. जर प्रतिपक्षी असे म्हणत असेल की, इच्छा नावाच्या प्रतोदरूपाने (पुढे ढकलणाऱ्या रूपाने) इतर करणांकडून अन्य सर्व इंद्रियांना प्रेरणा करीत असला तरीही त्या "इच्छा" रूप करणाला प्रेरणा मिळण्यासाठी त्या करणाला आणखी दुसऱ्या करणाची अपेक्षा निर्माण होईल आणि त्या करणाला आणखी तिसऱ्याची; अशा प्रकारे येथे अनवस्था प्रसंग निर्माण होईल.

"आमची इच्छा त्या स्पंदतत्वाच्या परीक्षणासाठी प्रवर्तित होणार नाही,"

असे जे म्हटले आहे त्याचा श्लोकातल्या अर्ध्या भागाने स्वीकार केलेला असून त्या पुढच्या अर्ध्याभागात त्याचे उत्तर दिले आहे. याचा अर्थ असा आहे की, मनुष्य तत्त्वपरीक्षणासाठी आपली इच्छा प्रवर्तित करू शकत नाही हे सत्यच आहे. तो इच्छेनेच तत्त्वाला विषय बनविण्यास समर्थ नसतो; कारण की, हे तत्त्व कल्पनातीत (अविकल्प) आहे. परंतु ज्यावेळेस विषयांच्या मागोमाग धावणाऱ्या त्या उपभोग घेण्याच्या इच्छेला शांत करून तो अंतर्मुख स्वकरणांच्या चैतन्याचे वहन करणाऱ्या अर्थात् चैतन्ययुक्त, आत्मबलरूप स्पंदतत्त्वाला स्पर्श करतो त्यावेळेस तो स्पंदतत्त्वासमच होतो. त्याचा समावेश झाल्याने तो त्या स्पंदतत्त्वाप्रमाणेच सर्वत्र स्वतंत्रता प्राप्त करतो. ज्यामुळे हे सर्व घडून येते त्या तत्त्वाची परीक्षा करावी. शक्तिभूमीची स्पर्शप्रधानता असल्यामुळे **"आत्मबल-स्पर्शात्"** असे कारिकेत म्हटले आहे. (अर्थात् शक्तीच्या अवस्थेत स्पर्शविषयक ज्ञान वरचढ होते.)।।८।।

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

जर खरोखर श्रीमहेश्वरांच्या स्पंदनाशक्तीच्या इंद्रियादि करणांचा त्या त्या विषयांकडे उन्मुख होणे हाच एकमात्र व्यापार असेल तर मोहाच्या बंधनात बद्ध झालेल्या पशुप्रमात्यांची स्थिती लाकडाच्या पुतळ्याप्रमाणे होईल; कारण (ती इंद्रिये) उक्तशक्तिरूपांकुशाने आक्रमितच होतील अशी जर तुम्ही शंका घेत असाल तर ती योग्य नाही, असे **"न हीच्छानोदनस्यायं .....।।८।।"** या कारिकेत सांगतात. पशुप्रमाता अर्थात् पशुरूप जीव हा पारमेश्वरी इच्छाशक्तीच्या अंकुशरूपाचा प्रेरक नाही; उलट प्रमात्याची ज्या प्रकारची इच्छा हृदयात असते त्यानुरूप सृष्टीच्या बाह्यांतर कार्याची रचना केलेली असते. त्यामुळेच अधिकारी प्रमाते अर्थात् जीव स्व-स्वविषयांमध्ये इंद्रियसंघाच्या रूपाने प्रवृत्त होऊनही त्याबरोबरच स्वस्वरूप आत्म्याचे जे उद्गमस्थान तेही आत्मसात् करतात. या रीतीने स्वातंत्र्याची परिपूर्ण बोधरूप अर्थात् पूर्णज्ञानरूप अवस्थाही त्यांच्यामध्ये जाऊन मिळते. त्यानंतर ते पशुप्रमाते अर्थात् जीव सर्वप्रकाराने पशुभावाचा त्याग करून श्रीशिवस्वरूपात समाहित होतात अर्थात् एकरूप होतात म्हणजेच सामरस्यावस्थेला प्राप्त होतात.।।८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**निजाशुद्ध्यासमर्थस्य कर्तव्येष्वभिलाषिणः ।**
**यदा क्षोभः प्रलीयेत तदा स्यात्परमं पदम् ।।९।।**

**अन्वयार्थ :-**

**यदा** - जेव्हा, **निजाशुद्ध्या** - स्वतःच्या आत्मगत अशुद्धीमुळे, "आणव" मलाने, **कर्तव्येषु अभिलाषिणः** - संसारातील वासनात्मक कर्मांच्या अभिलाषांमध्ये पडलेला - "कर्म"मलाने लिप्त असलेला अशा, **असमर्थस्य** - मर्यादित सामर्थ्याच्या- पूर्ण सामर्थ्य नसलेल्या पुरुषाची, **क्षोभ** - क्षुब्धवृत्ती, **माया** - मल, अहंकार, भेदबुद्धी, **प्रलीयेत** - नाहीशी होईल, **तदा** - तेव्हा, **परमं पदम्** - श्रेष्ठ स्थान, **स्यात्** - प्राप्त होईल. ।।९।।

**अर्थ :-** स्वतःच्या आत्मगत अशुद्धीमुळे अर्थात् आणव मलामुळे संसारामधील वासनात्मक कर्मांच्या अभिलाषांमध्ये किंवा इच्छेमध्ये पडलेल्या अर्थात् कर्ममलाने लिप्त झालेल्या मर्यादित सामर्थ्याच्या अर्थात् पूर्ण सामर्थ्य नसलेल्या पुरुषाच्या क्षुब्धवृत्ती व माया अर्थात् मल, अहंकार, भेदबुद्धी नाहीशी झाल्यावर त्या पुरुषाला परमपद प्राप्त होत असते. ।।९।।

* * * * *

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

वर सांगितलेल्या स्थितीत जीव परमेश्वरच झालेला असतो यात संशय नाही; परंतु हा जीवात्मा जन्मल्यापासून देह हाच आत्मा आहे असे ज्ञान होऊन आल्या कारणाने कामक्रियादिक मन त्याला अशुद्ध करते व क्षणिक सुखाच्या लवमात्र प्राप्तीकरिता त्याला लुब्ध बनविते. जीवाच्या या अवस्थेमुळे त्याची शक्ती दरिद्री बनते. याच्या योगाने तो कर्तव्याबाबतीत स्वतःला असमर्थ मानावयाला लागतो. याकरिता जीवाने पूर्ण स्वातंत्र्ययुक्त अशा चैतन्यशक्तीने तद्रूप असलेले परब्रह्मतत्त्वच मी आहे अशी जागृती दरएक क्षणी ठेवली पाहिजे. असे केले म्हणजे मी देह आहे या भावनेमुळे निर्माण होणारा अडथळा नाहीसा होतो. देहात्मभाव नष्ट झाला की, परब्रह्मपदाची म्हणजे आत्मपदाची प्राप्ती होते. जितका जितका जीवाचा देहात्मभाव नष्ट होतो तितकी तितकी स्वातंत्र्य शक्ती तो मिळवीत जातो व देहात्मभाव पूर्ण नाहीसा झाला की, पूर्ण स्वातंत्र्य शक्तीच्या प्राप्तीने जीव मुक्त होतो.

देह अनित्य, जड व परतंत्र आहे. त्याच्यावर चैतन्यस्वरूप, नित्य व स्वतंत्र गुणांनी युक्त असलेल्या "अहं" म्हणजे परब्रह्मतत्त्वाचा आरोप केला की, तो जीवाच्या अशुद्धीला कारण होतो. मीच देह आहे या जीवाच्या विपरीत भावनेमुळे जीवात्मा शक्तिदरिद्री बनतो. ही विपरीत भावना नष्ट होऊन मी स्वतः पूर्ण चैतन्यमय असा श्रीशंकर आहे व जडाहून अगदी वेगळा आहे अशी खात्री पटली म्हणजे जीवाचे चित्त पूर्णपणे शुद्ध होऊन त्याला उत्तम अशा स्वातंत्र्य शक्तीची प्राप्ती होते. मी देह आहे अशा भावनारूप विकल्पाचा नाश झाला की, जीव निर्मळ ज्ञानस्वरूपात लीन होतो. त्यामुळे इंद्रियग्रामाकडील व देहाकडील सर्व वृत्ती नष्ट होऊन मी विश्वात भरून राहिलेला नित्य असा आत्मा आहे अशी भावना प्रकट होते. एखाद्या बाल राजाला आपल्या स्वतःच्या राजेपणाच्या सामर्थ्याची जाणीव नसल्यामुळे तो पराधीन वागतो. मात्र ज्यावेळी त्याला आपण सर्वशक्तिमान् राजे आहोत असे ज्ञान होते त्यावेळी तो स्वतंत्र बनून सर्व अधिकाऱ्यांना व प्रजेला धाकात ठेवू शकतो. समुद्रावर वादळ नसताना समुद्र जसा शांत अवस्थेत राहतो त्याप्रमाणे आपला देहाभिमान नष्ट झाला की, आपण प्रशांत परमात्म्यामध्ये राहू शकतो. मी आत्मा आहे, मी पूर्ण स्वतंत्र श्रीशंकर आहे अशी जाणीव जीवाला झाल्यावर व अशी खरी स्थिती असताना हा पूर्ण स्वतंत्र परमात्मा बळेच पराधीन का बनतो? हा खरा प्रश्न आहे.

अनादी अशुद्धी, अविवेकमूल अविद्या व भोगाभिलाषेचा मल आत्म्याच्या शक्तीला संकुचित व सामर्थ्यहीन करतो. नंतर जीवाला भोगाभिलाषा पूर्ण करण्यासाठी अनेक कर्तव्ये-गोष्टी करण्याची इच्छा होऊ लागते. हेच अज्ञान आहे. श्रीसात्वनाने असे म्हटले आहे की, "अज्ञान, परिच्छिन्नता, सुखीपणा, दुःखीपणा इत्यादि सर्व गोष्टी सर्वज्ञ आत्मतत्त्वामध्ये त्याने कर्मचक्राचे अवलंबन केल्यानेच समाविष्ट होत जातात. यालाच इतर शास्त्रांमध्ये गमनागमन, प्रकृती, अशुद्धी, कर्मवासना, माया, अविद्या, भ्रम, मोह, अज्ञान व मल इत्यादि नावे दिली आहेत. प्रकृती व पुरुषाची अनादिता सारखी झाल्यावरच मायारूप प्रकृतीचा लय होतो व आत्मसंवित् जशीच्या तशीच राहते. "**संवित्प्रकाश**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

**मायात्वमेतदेव स्यान्नाशस्तत्त्वप्रदर्शनात्।**
**नहि विज्ञातरज्ज्वात्मा सर्पादीन्मन्यते पुनः।।**

मायेचे मायापण हेच आहे की, तत्त्वसाक्षात्कार झाल्याबरोबर ती नाश पावते किंवा संपुष्टात येते. दोरीचे ज्ञान झाल्याबरोबर दोरीला सर्प किंवा माळ इत्यादि मानण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

त्याच ग्रंथात आणखी पुढे असेही म्हटले आहे की -

**त्वत्तो द्वितीयमिह वस्तु यदस्ति किञ्चित्।**
**तत्तद्विचारपदवीमवतारितं चेत्।।**
**गन्धर्वपत्तनमिवोपलयं प्रयाति त्वं।**
**शिष्यसे ध्रुवमतस्तव शेषसंज्ञा।।**

तुझ्याशिवाय दुसरी कोणती वस्तू येथे आहे असा विचार केल्यावर असे लक्षात येते की, आपल्याशिवाय दुसरी कोणतीही वस्तू गंधर्व नगराप्रमाणे आपल्यातच विलीन होते व केवळ आपणच राहतो. त्यामुळेच आपले नाव शेष आहे.

"**विद्याधिपतीने**" असे म्हटले आहे की -

**भक्षणप्रकृतिना समाधिना युक्तितो विषयधानि भक्षिते।**
**सर्वभक्षपदवीमुपेयुषः शिष्यते परमभक्षितो भवान्।।**
**सा चेन्द्रजालिनो मायेवाऽऽस्थिता बाधकात्मनि।**
**यथाऽग्रेर्धूमलेखेव मलवद् दर्पणस्य वा।**
**बुद्बुदाः सलिलस्येव तच्छान्तौ निर्विकारिता।।**

विषयांचे भक्षण करणे हा समाधीचा स्वभाव आहे. युक्तिपूर्वक समाधी लावल्यावर ती विषयप्रकाशाला खाऊन टाकते व आपल्या सर्वभोक्ता पदवीला प्राप्त होऊन शेवटी केवळ आपणच अभक्षित अशी शिल्लक राहते. ती जादूगाराच्या जादूप्रमाणे किंवा इंद्रजालाच्या मायेप्रमाणे आपल्याला अडथळा करणाऱ्यामध्येच राहते. अर्थात् ती माया मायावीच्या बुद्धीमध्ये कोणताही भ्रम उत्पन्न करीत नाही व आपल्या आश्रयाला आलेल्याला दुःखही देत नाही. आगीपासून निघणारा धूर, आरशावरील मल किंवा पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे तिचे स्वरूप आहे. नंतर सर्वत्र निर्विकारच निर्विकार आहे.

हा क्षोभ म्हणजे आहे तरी काय? क्षोभ हा अशुद्धिजनित विकार

आहे. देहातील अहंभाव हे त्या क्षोभाचे केवळ एकमात्र रूप आहे. ज्यावेळी शक्तिपात होऊन विवेक जागृत होतो त्यावेळी विवेकामुळे आत्मबलाचा स्पर्श होऊन देहाहंकार नष्ट होतो व परमपदाची प्राप्ती अर्थात् आपल्या स्वरूपात आपली स्थिती होते. **"षड्धातु-समीक्षा"** या ग्रंथकर्त्याचे असे म्हणणे आहे की, "मोहमूलक कर्मे संसाराला कारण होतात. मोह संपणे व कर्म संपणे या दोन्ही गोष्टी एकच आहेत. तीच खरी शांती व स्वस्थता आहे." **"नारद-संग्रह"** या ग्रंथकर्त्याचे वचन या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. "ज्याप्रमाणे भाजलेले बीज उगवू शकत नाही त्याप्रमाणे विकल्परहित चित्त पुनर्जन्मापासून मुक्त होते. निरंतर साधनाभ्यासाने हा क्षोभक्षय हळूहळू कमी होत जातो." **"स्वात्मसंबोध"** या ग्रंथकर्त्याचे म्हणणे असे आहे की, "ज्याप्रमाणे एखाद्या भांड्यातून अग्नी काढून टाकला तर ते हळूहळू थंड होत जाते त्याचप्रमाणे साधनाभ्यासद्वारा अज्ञानरूपी चिखल धुऊन काढून फेकून दिल्यावर हळूहळू कैवल्याचा अनुभव येतो." **"षाड्गुण्यविवेक"** या ग्रंथात आत्मा व परमात्म्याचा केवळ इतकाच भेद सांगितला आहे की, "अविद्येमुळे अहंभावाचा संकोच झाल्याने ही आत्मसंवित् परमात्म्याशी अभिन्न असतानाही भिन्न भासते." स्वप्नावस्थेमध्ये मनुष्य घाबरतो. वस्तुतः स्वप्नद्रष्टा अगदी निर्भय आहे. परंतु तो भीतीने घाबरून जातो. स्वप्नद्रष्टा व स्वप्नदृश्यात काही पारमार्थिक भेद आहे का? जेव्हा मनुष्य कोणतीही वस्तू "माझी" आहे असे मानतो तेव्हा त्याच्या मनात खोट्या भीतीचा उदय होतो. ज्यावेळी "हा पदार्थ स्वप्नवत् आहे" अशी मनाची समजूत पटते तेव्हा भीती पळून जाते. याप्रमाणेच "मी परमात्मस्वरूपच आहे," अशी भावना जेव्हा आतून उदित होते तेव्हा अहंकारग्रंथी नष्ट होऊन साधक आपणा स्वतःला परमात्मस्वरूपच पाहातो." **"संवित्प्रकाश"** या ग्रंथामध्ये या विचाराबद्दल अशी सयुक्तिक उक्ती आहे की, "ही सर्व कर्मे आपणच करतो आहोत व सर्व आपणच आहोत. अहंकार संपला की, फक्त आपणच शेष आहोत. अहंभावामुळेच आत्मा व परमात्मा यांच्यामध्ये भेद होतो. ज्यावेळी साधनाभ्यासाने हा अहंभाव नष्ट होतो तेव्हा सर्वत्र एकताच एकता होते."।।९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

ज्ञातृत्व आणि कर्तृत्व या शक्तीचे स्वरूप ईश्वर आणि पुरुष यांच्यात एकच असेल तर मग पुरुष हा ईश्वरच झाला. त्यांच्यामध्ये मग अभेदच राहील. मग वरील कारिकेत पुरुषाला ईश्वर असेच न म्हणता "तत्समः - ईश्वरासारखा असे का म्हटले? या शंकेचे समाधान पुढील कारिकेत आहे.

**स्पष्टीकरण :-** स्वस्वभावदृष्टीने म्हणजे व्यापक अहंप्रत्ययाच्या भूमिकेवर पुरुष व ईश्वर यांच्यात अभेदच आहे. पण पुरुष संसारावस्थेत देहात्मप्रतीतिरूप मलाने व्याप्त झालेला असल्याने त्याला आपल्या स्वाभाविक सामर्थ्याची जाणीव नसते. शिवाय तो कर्तव्याच्या म्हणजे त्याच्या क्रियेच्या बाबतीत अभिलाषा ठेवतो, म्हणजे त्या क्रियेने त्याला वेगळा काही हेतू साधावयाचा असतो. अशा प्रकारे मल आणि अभिलाष यांनी युक्त झाल्याने पुरुषाची नेहमी क्षुब्ध अवस्था असते. पण त्याला जेव्हा आपल्या स्वाभाविक व्यापक अहंप्रत्ययाचा अर्थात् "मी श्रीशिव आहे" याचा संस्पर्श होतो त्या अवस्थेत त्याचे हे मल आणि अभिलाषा उरत नसल्यामुळे त्याचा देहात्मक अहंप्रत्ययरूप क्षोभ नाहीसा होऊन तो स्वस्वभावाने प्रकट होतो व त्याला ते परमश्रेष्ठ ईश्वरीपद प्राप्त होते.।।९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## क्षोभाची शक्ती आणि स्पंदाची उपलब्धी किंवा प्राप्ती

याआधीच्या सूत्रामध्ये ही गोष्ट सिद्ध केलेली आहे की, प्रत्यक्षात पतिप्रमाता अर्थात् परमेश्वर किंवा श्रीशिव आणि पशुप्रमाता अर्थात् जीव यांच्यामध्ये स्वरूपगत असा कोणताही भेद नाही. हा सिद्धान्त स्वीकारण्यामध्ये कोणतेही संकट किंवा बाधा नाही. परंतु सूत्राचे अंतिम चरण हा यामध्ये अडचण उत्पन्न करीत आहे. ती अडचण अशी आहे की, जर जीव आणि श्रीशिव यामध्ये कोणताही स्वरूपगत भेद नाही तर "पुरुषस्तत्समो भवेत्" या अंतिम चरणामध्ये पुरुषाला श्रीशिवासह समानता प्राप्त करण्याच्या आवश्यकतेला अभिव्यक्त करण्यामागे काय प्रयोजन किंवा हेतू आहे? यावरून ही गोष्ट स्पष्ट आहे की स्वरूपगत भेद नसतानाही पुरुष म्हणजे जीव हा श्रीशिवाहून कोणत्या बाबतीत कमी असतो? वरील सूत्रात याच

प्रश्नाचे उत्तर देऊन त्यावर प्रकाश टाकला आहे.

**वृत्ती :-** स्वभावापासून उत्पन्न झालेल्या अशुद्धीच्या द्वारा ओत-प्रोत अर्थात् परिपूर्ण असल्यामुळे आणि वासनात्मक कर्तव्याच्या अभिलाषेमध्ये गुंतून राहिल्यामुळे मितप्रमात्याला अर्थात् जीवाला आत्मबलाचा पूर्ण स्पर्श होऊ शकत नाही. परंतु जेव्हा याचा अर्थात् जीवाचा क्षोभ अर्थात् देहादि परं "अहं" अभिमानमूलक विकल्प अर्थात् संशय परंपरा या स्वरूपामध्ये लीन झाल्यावर हा जीव किंवा मितप्रमाता अर्थात् मर्यादित जाणणारा सर्वोत्कृष्ट अशा पदवीवर प्रतिष्ठित होत असतो.।।९।।

**विवरण :-** शैवशास्त्रींनी ठिकठिकाणी विश्वात्म्याच्या पतिरूपाचे आणि पशुरूपाचे तर्कपूर्ण विवेचन प्रस्तुत केलेले आहे. हे शैवशास्त्र जाणणाऱ्या ज्ञानी व्यक्तींनी प्रबळ युक्तींच्या द्वारा ही गोष्ट सिद्ध केलेली आहे की, ही दोन्ही रूपे प्रत्यक्षात एकाच स्वतंत्र सत्तेची "पूर्ण स्वतंत्र" आणि "संकुचित स्वतंत्र" अशी केवळ भिन्न रूपे आहेत. त्या स्वतंत्र सत्तेने विश्वमयतेच्या महान् नाटकामधील भूमिका वठविण्यासाठी आपल्याच इच्छेने आपल्यालाच अख्यातीचा अर्थात् अपूर्ण ज्ञानाचा पोशाख घालून संकुचित स्वतंत्र रूप धारण केलेले आहे. पूर्ण स्वतंत्र रूपामध्ये ही भूमिका पार पडू शकत नाही; कारण पूर्णामध्ये संकोच नसतो व संकोचाच्या अभावामध्ये संसार कसा असणार? याचाच अर्थ असा की, पती हा आगीचा मोठा ढीग असल्यास पशू ही त्या आगीची छोटीशी ठिणगी आहे. ते श्रीशिव अनुपम अर्थात् ज्याला कशाचीही उपमा देता येत नाही असे महान् आणि स्वतःच लघू आहेत. परंतु प्रत्यक्षात महानता आणि लघुता इत्यादि सर्व मायीय बंधनांनी रहित असलेले स्वातंत्र्य वनविहारी अर्थात् स्वातंत्र्याच्या वनात विहार करणारे ते पतिप्रमाता किंवा श्रीपरमेश्वर हे आनंदघन आहेत.

हे शक्तिघन प्रतिकाळ किंवा प्रतिक्षण चित्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रिया या पाच रूपांमध्ये स्पंदायमान आहेत अर्थात् स्पंदन पावत आहेत. यांच्यामधून आनंदशक्तीच्या द्वारा विश्वरूपाची सर्जना किंवा निर्मिती होत असते; कारण हे संपूर्ण विश्व असीम अर्थात् अमर्यादित आनंदामृताची केवळ उच्छलता अर्थात् उसळणे आहे. परमेश्वर संसारभावाला आपल्याहून अभिन्न रूपामध्ये अर्थात् वेद्यरूपामध्ये किंवा ज्ञेयरूपामध्ये किंवा जाणून घेण्यात येणाच्या रूपामध्ये अवभासित करण्याची आणि संकल्पात्मक

उन्मुखतेच्या अर्थात् उत्सुकतेच्या काळी आपल्या स्वातंत्र्यशक्तीला मायाशक्तीचे रूप देऊन त्याच्यापासून निर्माण होणाऱ्या आत्मविस्मृतिरूप अख्यातीला अर्थात् आपल्या स्वरूपाच्या पूर्णतेच्या विस्मृतीच्या द्वारा आपल्या खऱ्या अमर्यादितरूपाला विसरून जातात आणि ससीम अर्थात् मर्यादित पशूचे रूप धारण करीत असतात. यालाच शास्त्रीय शब्दामध्ये अभेद व्याप्तीला विसरून भेदव्याप्तीचे ग्रहण करणे असे म्हणतात. याचा परिणाम म्हणून अख्याती अर्थात् अपूर्ण ज्ञान ही पतिप्रमात्याची अर्थात् परमेश्वराची त्यांनी स्वतःच उत्पन्न केलेली अशुद्धी आहे. यामुळे पतिप्रमाता हे स्वतःच शक्तीने दरिद्री बनून जीवभावाच्या संकुचित आणि पावला-पावलावर हेयता अर्थात् त्याज्यता आणि उपादेयता अर्थात् स्वीकार्यता यांच्या संशयांनी ग्रस्त होऊन इतिकर्तव्यतेच्या अर्थात् कर्तव्याच्या क्षोभामध्ये पडलेले आहेत. हा क्षोभ अर्थात् संसाराच्या अनंत तुच्छ कामना आणि त्यांच्या पूर्तीसाठी चाललेला सततचा संघर्ष या दोन रूपांमध्ये असलेली ही एक खोल दरी आहे. नेहमीच्या गोष्टींमध्ये ऐकल्याप्रमाणे किंवा सांगितल्याप्रमाणे ही दरी ओलांडणे तितकेसे सोपे नाही. जर कोणत्याही प्रकारे अर्थात् गंभीर किंवा सखोल अध्ययन, श्रद्धा-भक्ती, अथक अर्थात् सतत अभ्यास, शक्तिपातरूप श्रीगुरुकृपा इत्यादि साधनात्मक उपायांच्या द्वारा या दरीला ओलांडणे शक्य झाल्यास स्वरूपस्पंदाची अनुभूती होते व पशू हा साक्षात पती किंवा श्रीपरमेश्वर बनत असतो.

शैवगुरूंनी ईश्वरप्रत्यभिज्ञा, तंत्रालोक इत्यादि महान् शैवग्रंथांमध्ये स्वतंत्र चैतन्याचे हेच द्विमुखी स्फुरणेचे सिद्धान्त आणि याबरोबर संबंधित अवरोह प्रक्रियेचे विस्तृत तसेच खोल विवेचन प्रस्तुत केलेले आहे. या विवेचनाचे अध्ययन किंवा अभ्यास करणे हे लोखंडाचे चणे खाण्याप्रमाणे कठीण आहे. शास्त्र न वाचताही अनेक संशयाची निवृत्ती श्रीगुरूंच्या वचनामृतामुळेच होत असते. परंतु जेथपर्यंत स्वतंत्र संवित् भट्टारिकेच्या अर्थात् स्वतंत्र संवित् श्रीपरमेश्वराच्या स्वतःच अस्वतंत्र अर्थात् परतंत्र संसारी पशुपदवीधर अर्थात् जीवभावावर अवतीर्ण होण्याच्या प्रक्रियेचा प्रश्न आहे त्यावर सूत्र १९-२० मध्ये यथाशक्य प्रकाश टाकण्यात येणार आहे. येथे केवळ विषयाला स्पष्ट करण्यासाठी शैवदर्शनाच्या स्वातंत्र्यवाद, अशुद्धी आणि मायेच्या स्वरूपावर थोडा प्रकाश टाकणे आवश्यक आहे.

**स्वातंत्र्य :-** शैवशास्त्रामध्ये "स्वातंत्र्य" आणि "चैतन्य" हे दोन्ही शब्द पर्यायवाचक शब्द म्हणून योजलेले आहेत. या दोन्ही भाववाचक संज्ञा किंवा नामे आहेत. या दोन्ही भाववाचक संज्ञांना भाववाचक ठेवण्यामागे एक विशिष्ट अर्थ आहे. तो अर्थ पुढे स्पष्ट होईल. प्रथम हे समजणे आवश्यक आहे की, स्वातंत्र्य किंवा चैतन्य या शब्दांनी ज्ञान आणि क्रिया यांचे स्वतंत्र अर्थात् अनन्यमुखापेक्षी म्हणजे अन्य कोणाच्याही मुखाची अर्थात् साहाय्याची अपेक्षा न करणारा असा अर्थ घेतलेला आहे. विश्वात्मक रूपामध्ये सृष्टी, स्थिती संहार, पिधान आणि अनुग्रह या पाच प्रकारच्या कृत्यांना जाणण्यासाठी आणि करण्यासाठी अनन्यमुखापेक्षी स्वरूपाने इतर व कोणत्याही सत्तेवर अवलंबून राहण्याचा अभाव असा याचा अर्थ आहे. या दृष्टीने शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की -

**स्वातन्त्र्यमेव च अनन्यमुखप्रेक्षित्वम् आत्मनः स्वरूपम्।**

**।।ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी।।१-८-११।।**

**चैतन्यमात्मा ..... चैतन्यं सर्वज्ञानक्रियासम्बन्धमयं**
**परिपूर्णं स्वातन्त्र्यम् उच्यते।।**

**।। शिवसूत्रविमर्शिनी १.१।।**

**चैतन्यमात्मनो रूपं सिद्धं ज्ञानक्रियात्मकम्।।**

**।। शिवसूत्रविमर्शिनी १.१।।**

**अर्थ :-** स्वातंत्र्य म्हणजे अन्य कोणाच्याही मुखाकडे न पाहणे अर्थात् मदतीची अपेक्षा न करणे होय. हेच आत्म्याचे स्वरूप होय. (१.८.११) चैतन्य हाच आत्मा होय. जाणण्याच्या क्रियेतील स्वतंत्रता हेच चैतन्य आत्म्याचे स्वरूप आहे. हा सर्व ज्ञानक्रियांच्या बाबतीत स्वतंत्र आहे. चैतन्य हे सर्वज्ञानक्रियासंबंधमय परिपूर्ण स्वातंत्र्य म्हणविते.

या स्वतंत्र आत्मनिर्भरतेच्या स्वरूपाला आणि पूर्णज्ञातृता अर्थात् पूर्णज्ञान आणि पूर्णकर्तृता अर्थात् पूर्ण कार्यशक्ती यांच्या अहंविमर्शमयी अर्थात् विचारमयी विश्वात्मक स्फुरणालाच शैवशब्दामध्ये स्वातंत्र्य, चैतन्य किंवा आत्मा इत्यादि नावे दिलेली आहेत. या दृष्टीने शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की -

**आत्मत एव चैतन्यं चित्क्रिया चितिकर्तृता**

**तात्पर्येणोदितस्तेन जडात्स हि विलक्षणतः ।।**

**।। ईश्वरप्रत्यभिज्ञा १.५.१२ ।।**

याचा अर्थ असा आहे की, याकरिता आत्मा चैतन्य आहे. चित्तत्व क्रियाही चेतन कर्त्याने युक्त आहे. या कारणामुळे जडापेक्षा तो चेतन आत्मा एक विलक्षण पदार्थ आहे.

आता हे पाहणे आवश्यक आहे की, या सर्वोत्कृष्ट सत्तेला स्वतंत्र न म्हणता तसेच स्वातंत्र्य किंवा चेतन न म्हणता "चैतन्य" असे म्हणण्यामागे कोणता अर्थ आहे? शैवदर्शनामध्ये ज्ञातृता आणि कर्तृता यांचा सामान्य ज्ञान (जाणणे) किंवा क्रिया (करणे) इतकाच अर्थ नाही. याशिवाय विश्वरूपामध्ये प्रत्येक वस्तूला देश, काल, आकार यांच्या बाधा आणि सीमा यांनी अबाधित अर्थात् अडथळाविहीन रूपामध्ये जाणणे आणि करणे यांच्या क्रियेचे स्वतंत्र कर्तृत्व हीच खरी ज्ञातृता आणि कर्तृता आहे. सामान्य पशुभावामध्ये प्रत्येक जीव हा जाणत आणि करीत असतो. परंतु जीवाला एकाच वेळी प्रत्येक वस्तू जाणण्याची आणि करण्याची स्वतंत्रता असत नाही; कारण की, जीव हा देश, काल तसेच आकार यांच्या कक्षेमध्ये मर्यादित होऊन थोडेसेच जाणू शकतो किंवा थोडेसेच काम करू शकतो. सर्व नाही. याचा परिणाम म्हणून संसारी जीवामध्ये आपल्या मर्यादित विश्वाच्या अनुपातानुसार अर्थात् भागानुसार मर्यादित स्वातंत्र्य असते. यामुळे संसारी जीव हा प्रत्येक क्षणी दुसऱ्याच्या मुखाची अपेक्षा करणारा असा असतो अर्थात् दुसऱ्यावर अवलंबून राहत असतो.

"चेतन" किंवा "चैतन्य" या शब्दामधील मूळ शब्द "चिति" असा आहे. **"चितिक्रिया सर्वसामान्यरूपा।। शिवसूत्रविमर्शिनी १.१।।"** "चिती" या शब्दाचा अर्थ चेतण्याची क्रिया असा आहे. ही चेतण्याची क्रिया संसारामधील किंवा जगतामधील प्रत्येक ग्राहकामध्ये सर्वसामान्य रूपामध्ये विद्यमान असते. सूक्ष्म दृष्टीने पाहिले असता सर्व तथाकथित जड पदार्थांमध्ये याचे अस्तित्व किंवा सद्भाव आढळून येत असतो. (ईश्वरप्रत्यभिज्ञासूत्र १.१.३ वरील भास्कराचार्य यांची भास्करी टीका प्रथमभाग पृ.६५) चेतणाऱ्याला "चेतन" असे म्हटले जाते. याचाच अर्थ असा की, चेतन हा स्वतंत्रतापूर्वक कोणत्याही वस्तूला जाणू व करू शकतो. इथपर्यंत सर्व काही ठीक आहे. परंतु तरीही एक संसारी ग्राहक आणि विश्वात्मा

यांच्या चेतण्यामध्ये काय फरक आहे? जर या दोहोंच्या चेतण्यामध्ये कोणताही फरक नाही तर पूर्ण स्वातंत्र्य असे म्हटले जाऊ शकत नाही. **"चैतन्यं सर्वज्ञानक्रियासम्बन्धमयं परिपूर्ण स्वातन्त्र्यम्।। शिवसूत्र-विमर्शिनी १.१।।"**

यामुळे शैवदार्शनिकांनी याचे भाववाचक नाव अर्थात् नाम बनवून असा अर्थ काढला की, विश्वात्मक रूपामध्ये ज्ञानक्रियामयी चेतनेच्या क्रियेचे पूर्ण अधिकारात्मक आणि अनन्यमुखापेक्षी अर्थात् इतरांवर अवलंबून असणारे कर्तृत्व हेच पूर्ण स्वातंत्र्य अथवा परमेश्वराचे ऐश्वर्य आहे. हे कर्तृत्व किंवा स्वातंत्र्य शाश्वतरूपामध्ये सत्तावान् होऊन कोणत्याही देशाच्या किंवा काल इत्यादींच्या संकुचित परिधीमध्ये अर्थात् कक्षेमध्ये सीमित अर्थात् मर्यादित नाही. विश्वात्मा प्रत्येक क्षणी प्रत्येक गोष्ट जाणण्यात आणि करण्यात स्वतंत्र आहे. याचा परिणाम म्हणून **"चैतन्यमिति भावान्तः शब्दः स्वातन्त्र्यमात्रकम्। अनाक्षिप्तविशेषं सदाह सूत्रे पुरातने।। तंत्रालोक १.२८।।"** अर्थात् चैतन्य हा भाववाचक शब्द केवळ स्वातंत्र्यासाठीच योजिला जात असून ते चैतन्य अनाक्षिप्तविशेष अर्थात् त्याने स्वतःबरोबर राहणारे नित्यत्व-व्यापकत्वादि भेद टाकलेले नाहीत असे आहे. हे पूर्वीच्या सूत्रात सांगितलेले आहेच. चैतन्य या शब्दाने केवळ आणि केवळ ज्ञातृताकर्तृतारूप स्वातंत्र्याला अभिव्यक्त केलेले आहे आणि हेच स्वातंत्र्य शाश्वत स्पंदमय पतिप्रमात्याचे वास्तविक स्वरूप आणि सर्व विश्वाच्या प्रत्येक दृश्यमान अर्थात् दिसून येणाऱ्या अथवा चिंत्यमान अर्थात् चिंतन केल्या जाणाऱ्या पदार्थवर्गाचा आधार तसेच अंतिम विश्रांतिस्थानही आहे. याच स्वातंत्र्याला शास्त्रीय शब्दामध्ये "सतत् स्पंदमयी संवित्" अर्थात् चेतनाशक्ती असेही म्हणतात.

या विषयाचे अधिक स्पष्टीकरण करण्यासाठी पूर्वी वर्णिलेल्या ज्ञानक्रियात्मक चितिक्रियेचे स्वरूप समजणे आवश्यक आहे. पहिल्या सूत्राच्या विवरणामध्ये असे स्पष्ट केलेले आहे की, चितिक्रियेचे स्वरूप चालणे, शिजविणे इत्यादि स्थूल क्रियांप्रमाणे नसून आंतर अनुसंधानात्मक अथवा केवळ संकल्पात्मक गतिमयता असे असून त्यालाच शास्त्रीय परिभाषेत **"चितिप्रत्यवमर्शात्मा।। ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी।। १.५.१३।।"** अर्थात् चितिशक्ती ही प्रत्यवमर्शात्मक म्हणजे चेतनरूप, विचारात्मक किंवा "मी आहे" अशी असून तेच तिचे पारमार्थिक रूप आहे. या

शक्तीला **"अहं प्रत्यवमर्शात्मक सामान्यस्पंद।।"** असेही म्हणतात. विमर्शात्मिका अर्थात् विचारमयता हाच या चितिक्रियेचा एक अविच्छेद्य अर्थात् अखंड स्वभाव आहे. **"तेन जडात्स हि विलक्षणः।। ईश्वर-प्रत्यभिज्ञाविमर्शिनी।।१.५.१२।।"** अर्थात् जडापेक्षा चेतन आत्मा हा एक विलक्षण पदार्थ आहे. हा स्वभाव चितिक्रियेला मूळापासून पृथक् करीत असतो. ज्ञान आणि क्रिया अथवा प्रकाश आणि विमर्श हे दोन वेगळे पदार्थ नसून एकाच चितिशक्तीच्या द्विमुखी स्पंदात्मकतेचे द्योतक आहेत. क्रिया ही ज्ञानाचीच पल्लवित अवस्था आहे. ज्ञान हे क्रियेचेच पूर्वरूप आहे. दुसऱ्या शब्दामध्ये असेही म्हटले जाऊ शकते की, प्रकाश अर्थात् श्रीशिव हेच बहिर्मुख अवस्थेमध्ये विमर्श अर्थात् शक्ती आहेत आणि विमर्श अर्थात् शक्ती हीच अंतर्मुख अवस्थेमध्ये प्रकाश अर्थात् श्रीशिव आहे. "अहं" हे "इदं" चे बीजरूप असून "इदं" हे "अहं" चे विकसित रूप आहे. स्पंदात्मक श्रीशिवामध्ये संपूर्ण जगत् हे अभेदरूपाने उपस्थित आहे आणि सर्व जगत् हाच श्रीशिवांचा प्रसार आहे.

अशाच चितिकर्तृतारूप स्वातंत्र्याच्या गतीमध्ये कोठेही व कोणतीही अडचण निर्माण होत नाही आणि हेच कारण आहे की, विश्वात्मा स्वतः उत्पादित अशुद्धीच्या द्वारा आपल्याच स्वरूपाला भागरूपामध्ये आवृत करून संसारी जीवाचे आणि पूर्ण आवृत्त करून सर्व जडवर्गाचे रूप धारण करून अवस्थित झालेला आहे. स्वातंत्र्य हे तर शेवटी स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्य हे स्वतः कधी अर्धस्वतंत्र किंवा अस्वतंत्र ही बनू शकते. ते असे बनले नसते तर त्याला पूर्णस्वातंत्र्य असे म्हटले नसते.

**अशुद्धी :-** शैवशास्त्रामध्ये अशुद्धी, अख्याती, मल अथवा बंध इत्यादि कितीतरी शब्दांनी वास्तविक स्वतंत्र स्वरूपाच्या अज्ञानाचा अर्थ घेतला जाऊ शकतो. स्वरूपाचे अज्ञान ही एक मोठी अशुद्धी असून तिने विश्वात्म्यालाही विश्वात्मभावापासून खाली आणून पशुभावाच्या चौकामध्ये आणून उभे केलेले आहे. या अज्ञानाच्या स्वरूपाच्या विषयामध्ये भगवान् श्रीचंद्रमौलींनी **"ज्ञानं बन्धः।। शिवसूत्र १.२।।"** या सूत्रामध्ये असा निर्णय दिलेला आहे की, अज्ञानाचा अर्थ सर्वथा अर्थात् पूर्णपणे ज्ञानाभाव असा नसून वास्तविक स्वरूपाचे अपूर्णज्ञान असा आहे.

अज्ञान हे तिमिर म्हणजे एक प्रकारच्या नेत्ररोगाप्रमाणे आहे. **"अज्ञानं तिमिरं पारमेश्वरस्वातन्त्र्यमात्रसमुल्लासितस्वरूपगोपनामात्रसतत्त्वम्**

.....।। **तंत्रालोकविवेक १-२३।।"** अर्थात् अज्ञान हे स्वरूपगोपन अर्थात् स्वातंत्र्यशक्तीच्या द्वारा आपल्याच स्वतंत्र स्वरूपाला लपविण्याशिवाय किंवा विस्मृती व्यक्तिरिक्त अन्य काहीही नाही. या स्वतःच्या आत्मविस्मृतिरूप अज्ञानाच्या विषयामध्ये पुढे सूत्र क्रमांक वीसमध्ये प्रकाश टाकण्यात येणार आहे. येथे संक्षेपाने अज्ञानाच्या विकासाच्या तसेच प्रसाराच्या प्रक्रियेशी संबंधित काही गोष्टींचा उल्लेख केला जाणार आहे.

वर असे म्हटलेले आहे की, परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती सतत उदीयमान असल्यामुळे अर्थात् उदय पावत असल्यामुळे प्रतिक्षणी चित् आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रिया या पाच रूपांमध्ये स्पंदनशील अर्थात् स्फुरणशील आहे. यालाच दुसऱ्या शब्दामध्ये सर्वकर्तृत्व, सर्वज्ञत्व, पूर्णत्व, नित्यत्व आणि व्यापकत्व असेही म्हणतात. तेच अनुत्तर अर्थात् ज्याहून अन्य काहीही श्रेष्ठ नाही असे सर्वश्रेष्ठ तत्त्व याच शक्तिपंचकाच्या साहाय्याने प्रतिक्षण विश्वरूपामध्ये सृष्टी, स्थिती, संहार, पिधान आणि अनुग्रह ही पाच विराट कृत्ये करीत राहत असते. विश्वरूपामध्ये प्रसृत अथवा अवभासित होणे किंवा प्रकाशित होणे हा चैतन्याचा स्वभाव आहे. चैतन्यामध्ये आनंदाची प्रधानता आहे. संसारभावाला अवभासन करण्याकडे अर्थात् प्रकाशित करण्याकडे उन्मुख किंवा उत्सुक झाल्यावर ते चैतन्यतत्त्व स्वतंत्रतेमुळे आपल्या अभेदव्याप्तीला विसरून भेदव्याप्तीला अर्थात् भेदकतेला ग्रहण करीत असते. याचाच अर्थ असा आहे की, जरी सर्व विश्व त्या अखंड स्वातंत्र्यसागरामध्ये भेदरहित असलेल्या "अहं" रूपामध्ये अवस्थित असले तरी त्यामध्ये याच्या स्वरूपाहून भिन्न अशा "इदं" अर्थात् जगत् रूपामध्ये अवभासित किंवा प्रकाशित करण्याची सूक्ष्म स्फुरणामय अभिलाषा किंवा इच्छा उत्पन्न होत असते. अशा प्रकारची अभिलाषा किंवा इच्छा किंवा कामना ही स्वरूपामध्ये अपूर्णतेची प्राथमिक अनुभूती अर्थात् सर्वात पहिला मल आहे. याचे कारण असे आहे की, जर सर्व विश्वकल्पना स्वरूपामध्ये शाश्वत रूपामध्ये अवस्थितच आहे तर या विश्वाला स्वतःहून भिन्न स्वरूपात पाहण्याच्या इच्छेचे उत्पन्न होणे ही अपूर्णतेची अनुभूती नाही तर अन्य काय असू शकते? स्वरूपाच्या अपूर्णतेची अनुभूती ही आणव, मायीय आणि कार्म या तीन रूपामध्ये अभिव्यक्त होत असते. आणव, मायीय आणि कार्म या तिघांना शैवशब्दामध्ये "मलत्रय" असे म्हणतात. अनुग्रहमूर्ती भगवान् श्रीआशुतोषांनी स्वतःच

"**श्रीमालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथातील दोन सूत्रामध्ये या तीन मलांच्या स्वरूपाचे विश्लेषण केलेले आहे. हे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे -

**मलमज्ञानमिच्छन्ति संसाराङ्कुरकारणम्।।१।।**
**धर्माधर्मात्मकं कर्म सुखदुःखादिलक्षणम्।।२।।**

याचाच अर्थ असा आहे की, काहीजण संसाररूपी अंकुराचे कारण असणाऱ्या मलाची म्हणजे अज्ञानाची इच्छा करतात. (तर) काहीजण सुखदु:ख हे ज्याचे लक्षण आहे अशा धर्म-अधर्मात्मक कर्माची इच्छा करतात.

आपल्या खऱ्या स्वरूपाचे अज्ञान हाच मूलभूत आणवमल आहे. हा आणवमल संसार अर्थात् मायीयमलाचा अंकुर किंवा कारणीभूत असलेल्या कार्ममलाचेही कारण आहे. आणवमलापासून कार्ममलाचा आणि कार्ममलापासून मायीयमलाचा विकास होत असतो. "**मलमज्ञानमिच्छन्ति।। मालिनीविजयोत्तरतंत्र १.२३।।**" यानुसार अज्ञान हे आणवमलाचे रूप आहे. "**धर्माधर्मात्मकं कर्म।।**" यानुसार हेय अर्थात् त्याज्य अर्थात् टाकून देण्यास योग्य तसेच उपादेय किंवा ग्राह्य अर्थात् ग्रहण करण्यास योग्य क्रमांची खिचडी किंवा कोशिंबीर हे कार्ममलाचे रूप आहे. "**सुखदुःखादिलक्षणम्।।**" शुभ अथवा अशुभ कर्माच्या वासनेपासून निर्माण झालेल्या सुख, दु:ख, जन्म, मरण इत्यादींचा भोग हे मायीय मलाचे रूप आहे.

आणवमलाच्या विषयामध्ये शास्त्रकारांचे कथन असे आहे की, स्वातंत्र्याची हानी अर्थात् संकोच हा दोन रूपांमध्ये अभिव्यक्त होत असतो. या दृष्टीने "**ईश्वरप्रत्नभिज्ञा**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की-

**स्वातन्त्र्यहानिर्बोधस्य स्वातन्त्र्यस्याप्यबोधता।**
**द्विधाणवं मलमिदं स्वस्वरूपापहानितः।।३.२.४।।**
**भिन्नवेद्यप्रथात्रैव मायाख्यं जन्मभोगदम्।**
**कर्तर्यबोधे कार्मं तु मायाशक्त्यैव तत्त्रयम्।।५।।**

याचा अर्थ असा आहे की, स्वातंत्र्याची हानी आणि बोधरूप स्वातंत्र्याचे ज्ञान होऊ न देणे असा दोन प्रकारचा मल आहे. या मलात आपले स्वरूप लपून जाते.।।३.२.४।। भिन्नभिन्न वेद्यप्रथेचा फैलाव झाल्यावर माया नावाचा मल जन्म व भोग देणारा होतो. मायाशक्तीच्या द्वारा कर्त्याच्या अबोधतेत

किंवा अज्ञानात तर कार्ममल राहतो. असे हे आणव, कार्म व मायीय मल आहेत.।।५।।

स्वातंत्र्याची हानी अर्थात् संकोच दोन रूपांमध्ये अभिव्यक्त होतो असे आणवमलाविषयी शास्त्रकारांनी पुढीलप्रमाणे कथन केले आहे.

१) **"स्वातन्त्र्यहानिर्बोधस्य।।"** म्हणजे ज्ञानामध्ये स्वातंत्र्याची हानी अर्थात् **"बोधस्य चिन्मात्रस्य स्वातन्त्र्यहानिर्ज्ञातृत्वसङ्कोचः एकः प्रकारः।। ईश्वरप्रत्यभिज्ञाभास्करीटीका।।"** चिन्मात्ररूपामध्ये पूर्णज्ञातृतेचा अर्थात् पूर्णज्ञातेपणाचा संकोच.

२) **"स्वातन्त्र्यस्याप्यबोधता।।"** स्वातंत्र्याचे अज्ञान अर्थात् **"स्वातन्त्र्यस्य कर्तृत्वस्य अबोधता बोधव्यतिरिक्ताभिमानः द्वितीयः प्रकारः।। ईश्वरप्रत्यभिज्ञाभास्करीटीका।।"** अर्थात् पूर्णकर्तृत्वाला बोधरूपतेपासून म्हणजे ज्ञानरूपतेपासून भिन्न समजण्याचा मिथ्याभिमान होय. या दोन रूपांमध्ये स्वातंत्र्याची हानी किंवा संकोच हा अभिव्यक्त होत असतो.

येथे हे दोन वेगवेगळे मल आहेत असे समजणे योग्य नाही. उलट दोन्ही रूपांमध्ये स्वातंत्र्याची अंख्याती अर्थात् अपकीर्ती झाल्यामुळे प्रत्यक्षात एकाच मलाची ही दोन रूपे आहेत.

**निजशुद्ध्या .....।** या सूत्रामध्ये सूत्रकारांनी याच मलत्रयाकडे संकेत करीत असे म्हटलेले आहे की, पतिप्रमात्यांनी अर्थात् परमेश्वरांनी किंवा श्रीशिवांनी आपल्या स्वातंत्र्यापासून स्वतःच एक प्रकारची अशुद्धी (आणवमल) निर्माण केलेली आहे. या मलामुळे पतिप्रमाता किंवा श्रीपरमेश्वर हे स्वतः शक्तिदरिद्री होऊन संसारी शुभाशुभ कर्मांच्या अर्थात् कार्ममलांच्या चक्रात अडकले आहेत आणि त्या कर्मापासून निर्माण झालेल्या जन्ममरणरूप संसृतीच्या अर्थात् प्रवाहात क्षोभाचा (मायीयमलाचा) विषय बनलेले आहेत. याचा परिणाम म्हणून श्रीपरमेश्वरांनी स्वतःच संसरणशील पशूचे रूप धारण केलेले आहे.

**माया :-** परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती ही सर्वतोमुखी अर्थात् स्वयंपूर्ण आहे. परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती महान् तसेच अचिंत्य अर्थात् चिंतन करण्यास अशक्य असे सामर्थ्य असलेली आहे अर्थात् सामर्थ्यशालिनी आहे. यामुळे परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती आपल्या स्वतःच्या इच्छेने आपल्या स्वरूपावर अख्याती अर्थात् अपूर्णज्ञानाचे आवरणही टाकू शकते. आपल्या

अहंविमर्शामध्ये अभेदरूपामध्ये अवस्थित असलेल्या विराट विश्वकल्पनेला आपल्याहून भिन्न रूपामध्ये अवभासित करून या विश्वाची सृष्टी, संहार इत्यादींची क्रीडा करणे हे या परमेश्वराच्या स्वातंत्र्यशक्तीचेच सामर्थ्य आहे. शेवटी इतक्या विस्तृत तसेच तुच्छ मानवाच्या कल्पनेहून अतीत असलेल्या विश्वाला हातावरील आवळ्याप्रमाणे नाचविण्यासाठी या विश्वाहून अनेक पटीने सामर्थ्यशालिनी शक्तीची गरज लागेलच यात काहीही शंका नाही. या दृष्टीने **"परमार्थसार"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**परमं यत्स्वातन्त्र्यं दुर्घटसंवादनं महेशस्य।**
**देवी मायाशक्तिः स्वात्मावरणं शिवस्यैतत्।।१५।।**

याचा अर्थ असा आहे की, श्रीमाहेश्वराचे जे अशक्य निष्पादनरूप स्वातंत्र्य आहे ते स्वातंत्र्य हीच देवी मायाशक्ती आहे. ती श्रीशिवांचे स्वतःचे अर्थात् आत्म्याचे आवरण आहे.

अशा परिस्थितीमध्ये ज्यावेळी ती परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती स्वतःच्या संकल्पात्मक स्फुरणेच्या द्वाराच इतक्या महान् विश्वाला आपल्याहून भिन्नरूपामध्ये अवभासित करण्याचे दुर्घट कृत्य करण्याकडे उन्मुख किंवा उत्सुक होते, त्यावेळी परमेश्वराच्या स्वातंत्र्यशक्तीला "मायाशक्ती" असे म्हणतात. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की-

**माया नाम च देवस्य शक्तिरव्यतिरेकिणी।**
**भेदावभासस्वातन्त्र्यं तथाहि स तया कृतः।।९.१४९.५०।।**

याचा अर्थ असा आहे की, माया ही त्या देवाधिदेव परमेश्वराची अव्यतिरेकिणी अर्थात् अभिन्न शक्ती आहे. श्रीशिवांचे भेदावभास म्हणजे भेदाचे प्रकाशन करण्याचे स्वातंत्र्य हीच माया आहे. तिच्या द्वारा केलेले मायाकार्य म्हणजेच विश्व होय. विश्वाचा अवभास हाच भेदावभास होय.

संक्षिप्तपणे किंवा थोडक्यात असे म्हणता येते की, अभेदामध्येही भेदसर्जना अर्थात् भेदाची निर्मिती करण्याच्या शक्तीच्या स्वातंत्र्यालाच "मायाशक्ती" असे म्हणतात. यामुळे हाही परमेश्वराच्या अभिन्न स्वातंत्र्यशक्तीचाच विकास आहे. स्वतःच आवरण बनून आपल्याच पूर्णरूपाला अपूर्ण बनविणे आणि आपल्या भेदहीन स्वरूपामध्ये भेदाचा सूत्रपात करणे हे या मायाशक्तीचे काम आहे. अनुत्तर भगवान् श्रीभूतनाथ यांनी स्वतः या निजी अभिन्न शक्तीच्या स्वरूपाचे विश्लेषण करताना

"**मालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात असे म्हटलेले आहे की -

**सा चैका व्यापिनीरूपा निष्कला जगतो निधिः।**
**अनाद्यन्ता शिवेशानी व्ययहीना च कथ्यते।।१.२६।।**

याचा अर्थ असा आहे की, ती (माया) एक व्यापिनीरूप अर्थात् सर्वांना व्यापून राहणारी निष्कल, जगाचा ठेवा असणारी, अनादि, अनंत, शिवा, ईशानी व नाश न पावणारी अशी (शक्ती) आहे.

मायाशक्ती ही एक, सर्वव्यापक, सूक्ष्म, खंड किंवा भागाहून रहित, समग्र संसाराला आपल्या गर्भामध्ये धारण करणारी, अनादि, अनंत, अकल्याणदायिनी असूनही स्वातंत्र्याने परिपूर्ण आणि स्वतः कोणत्याही प्रकारच्या विकारापासून रहित आहे.

शक्तिरूपा व तत्त्वरूपा ही मायेची दोन रूपे आहेत. यांमधील पहिल्या रूपाचे नाव "महामाया" किंवा "मायाशक्ती" असून दुसऱ्या रूपाचे नाव केवळ "माया" किंवा "मायातत्त्व" असे आहे. ही संसाराच्या शुद्धाध्व अर्थात् शुद्ध मार्ग आणि अशुद्धाध्व अर्थात् अशुद्ध मार्ग नावाच्या दोन स्तरांवर अहंतेचे तिरोधान करण्याच्या अनुपाताने एकाच शक्तीची दोन रूपे आहेत. यामध्ये भेद किंवा फरक असा आहे की -

**आद्यो भेदावभासो यो विभागमनुपेयिवान्।**
**गर्भीकृतानन्तभाविविभागा सा परा निशा।।**
**।। तंत्रालोक ९.१५०.५१।।**

याचा अर्थ असा आहे की, आद्य भेदाच्या अवभासात एक असा विभाग निश्चित होता. अनंतरभावी विभाग त्याच्या गर्भातच होते. यालाच परानिशा किंवा महारात्र म्हणतात व हीच महान् माया होय.

महामाया किंवा मायाशक्ती ही स्वातंत्र्यशक्तीची अवस्था आहे. या अवस्थेमध्ये अहंतारूपामध्ये अवस्थित इदंतेला भेदरूपामध्ये अवभासित करण्याकडे शक्तीची केवळ प्राथमिक संकल्पात्मक स्फुरणा किंवा केवळ उन्मुखता किंवा उत्सुकता होत असते. अद्यापि इदंतेचा पृथक्रूपामध्ये विभाग झालेला नाही. थोडक्यात आंतरविचारामध्ये भेदावभासाच्या उपक्रमाच्या केवळ सूक्ष्म आसूत्रणाची किंवा अंतर्ग्रथित अवस्था आहे. "**मायाशक्त्यैव तत्त्रयम्।। ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी ३.२.५।।**" येथूनच स्वातंत्र्यामध्ये संकोचरूप मलत्रयाचाही म्हणजे आणव, कार्म व मायीय मलाचा श्रीगणेशा

किंवा आरंभ होत असतो.

..... **बहिर्मुखतायां भाविनो विभागस्य शिम्बिकाफलवदस्यां गर्भीकारोऽस्ति। तंत्रालोकविवेक ९.१५१।।** अर्थात् ज्याप्रमाणे शिबिका अर्थात् शेवग्याच्या शेंगेच्या गर्भामध्ये असंख्य बीजे भिन्न भिन्न असूनही बाहेर कोठूनही दिसून येत नाहीत त्याप्रमाणे मायाशक्तीच्या गर्भामध्ये आगामी इदंतेचा पूर्ण विभाग अर्थात् सर्व स्थूलविश्वाचे भेदपूर्णवैचित्र्य त्याच अंतर्निहित रूपामध्ये अर्थात् गर्भात अवस्थित असते.

शास्त्रकारांनी मायाशक्तीची परिभाषा अशा प्रकारे प्रस्तुत केलेली आहे की, "**अपूर्णता प्रथनेन मीनाति हिनस्ति इति मायाशक्तिरुच्यते।। तंत्रालोकविवेक ९.१५०।।**" मायाशक्ती ही अपूर्णतेच्या अनुभूतीला जन्म देऊन स्वरूपाची हिंसा करीत असते. वर सांगितल्याप्रमाणे माया-शक्तीचे कार्यक्षेत्र हे शुद्धअध्वा अर्थात् श्रीशिवतत्त्वापासून शुद्धविद्या-तत्त्वाच्या प्रमातृमंडलापर्यंत असते. याचे कारण येथपर्यंत इदंतेच्या अर्थात् भेदप्रथात्मक प्रमेय विश्वाच्या बहिरंग अवभासनाची प्रक्रिया ही विकासमान अवस्थेमध्ये असते तथापि दुसरीकडे अहंता अर्थात् प्रमातृभाव याचे पूर्ण तिरोधान झालेले नसते.

**माया किंवा मायातत्त्व :-** शुद्धविद्येच्या खाली पृथ्वीतत्त्वापर्यंतच्या अशुद्ध मार्गामध्ये मायाशक्तीचे जे रूप कार्यनिरत होत असते त्याला "मायातत्त्व" असे म्हणतात. या अवस्थेमध्ये ..... "**तिरोधानकरी मायाभिधा पुनः।। ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी ३.१.७।।**" अर्थात् (या शक्तीलाच) तिरोधान करणाऱ्या मायाशक्तीच्या नावाने ओळखले जाते. या न्यायाने अहंतेचे पूर्ण तिरोधान होत असते किंवा ती नष्ट होत असते आणि आगामी जड तसेच प्रमेयविश्वाच्या स्थूल अवभासन प्रक्रियेचा आरंभ होत असतो. इदंता ही अहंतेहून पूर्णपणे वेगळी होऊन स्थूल देह, प्राण इत्यादि रूपामध्ये विकसित होत असते. "**सा जडा भेदरूपत्वात् कार्यं चास्या जडं यतः।। तंत्रालोक ९.१५१।।** अर्थात् ही शक्ती भेदरूप असल्यामुळे जड आहे. तिची कार्येही यामुळे जडच असतात. स्वरूपावर पूर्ण आवरण पडल्यामुळे शक्तीचे रूपही जड होते. शक्ती ही स्वतः एका जडतत्त्वाचे रूप धारण करून पुढे पुढे जड कार्यवर्गाचेही कारण बनत असते. हेच कारण आहे की या अवस्थेमध्ये या शक्तीला "मायाशक्ती" असे न म्हणता "मायातत्त्व" असे म्हटले जाते. जड बनण्याचा अर्थ असा आहे की,

**"अयमेव हि जडस्य स्वभावो यत् "इदमत्र इदानीं भाति इति परिच्छिन्नतया प्रकाश्यते इति।। तंत्रालोकविवेक ९.१५२।।"** अर्थात् जडाचा असा स्वभाव असतो की तो "ही वस्तू येथे भासते अथवा प्रकट होते" असे जाणवून देऊन प्रत्येक वस्तूला वेगवेगळेपणाने प्रकाशवितो किंवा भासवितो. मौलिक रूपामध्ये असीम स्वातंत्र्यशालिनी अशी शक्ती असूनही देश, काल तसेच आकार यांच्या सीमांनी संकुचित होत असते. शैवशब्दामध्ये संकुचित प्रकाशमानता (अल्पज्ञातृता आणि अल्पकर्तृता) ही जडता असते.

संसारी ग्राहकवर्गामध्ये मायातत्त्वाच्या मधुमय विषाचा प्रसार अर्थात् मायाजनित क्षोभ कोणत्या कोणत्या रूपामध्ये प्रसरत असतो या विषयावर पुढे सूत्र क्रमांक २० मध्ये प्रकाश टाकण्यात येणार आहे. या बाबतीत **"परमार्थसार"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**मायापरिग्रहवशाद् बोधो मलिनः पुमान् पशुर्भवति।**
**कालकलानियतिवशाद्रागाविद्यावशेन सम्बद्धः।।१६।।**

याचा अर्थ असा आहे की, मायेचा स्वीकार केल्याकारणाने बोध मलिन होऊन पुरुष पशू होतो. हा पुरुष पशू काल, कला, नियती, राग व अविद्येने उत्तम रीतीने बांधलेला आहे.

येथे केवळ ही गोष्ट समजून घेण्याची आवश्यकता आहे की, मायाशक्तीच्या द्वारा उत्पादित संकोचही सर्वतोमुखी आहे. सर्वप्रथम हा संकोच पूर्वी सांगितलेल्या सर्वकर्तृत्व इत्यादि पाच स्वतंत्र शक्तींवर प्रभावान्वित अर्थात् प्रभावशाली होऊन त्यांना क्रमशः किंचित्कर्तृत्व, किंचिज्ज्ञत्व, अपूर्णत्व, अनित्यत्व आणि अव्यापकत्व यामध्ये रूपांतरित करीत असतो. यामुळे स्वतंत्र शक्तिमान् पतिप्रमाता किंवा परमेश्वर किंवा श्रीशिव हे शक्तिदरिद्री पशू बनत असतात. या पाच संकुचित शक्तींची शास्त्रीय नावे क्रमशः कला, विद्या, राग, काल आणि नियती अशी ठेवलेली आहेत. या अवस्थेमध्ये या स्वतंत्र शक्ती न राहता पाच प्रकारचे वासनात्मक बंधन अर्थात् पंचकंचुक म्हणजे पाच आवरणे बनत असतात आणि स्वतंत्र आत्मा याच शृंखलामध्ये फसून संसारी पशू बनत असतो. तत्त्वरूपामायेच्या शास्त्रीय परिभाषा **"तंत्रालोकविवेक"** या टीकाग्रंथातील आह्निक ९ श्लोक १५२ मध्ये पुढीलप्रमाणे कथन केल्या आहेत.

**१) माया :- मीयते हेयतया परिच्छिद्यते योगिभिः।।** योगी लोक हिला हेय किंवा त्याज्य समजून आपल्याहून वेगळे करीत असतात.

**२) माया :- सर्वत्र मातीति।।** ही शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध यामध्ये सर्वत्र व्याप्त होऊन अवस्थित राहात असते.

**३) माया :- "मा" शब्दवाच्याद्विनाशरूपान्निषेधात् यातेति।।** माया ही स्वयं "मा" शब्दाने वाच्य निषेध अर्थात् विनाशाचा विषय बनू शकत नाही अर्थात् ती नित्य आहे.

**४) माया :- मात्यस्यां विश्वमिति।।** हिच्या गर्भामध्ये सर्व विश्व अवस्थित राहत असते.

**५) माया :- स्वात्माभिन्नमपि भावमण्डलं शिवो यया मिमीते भिदा व्यवस्थापयति इति।।** या शक्तीच्या द्वारा श्रीपरमेश्वर स्वरूपामध्ये अवस्थित भावराशीला किंवा भावसमूहाला स्वतःहून भिन्न रूपामध्ये प्रतिष्ठित करीत असतात.

या सर्व परिभाषांव्यतिरिक्त श्रीभगवंतांनी स्वयं आपल्या सूत्रामध्ये या मायेला अशिवा अर्थात् चतुर्दिक् भेदप्रथेचा अंधकार उत्पन्न करून महान् अकल्याण करणारी असे म्हटलेले आहे. **"अशिवा भेदप्रथाप्रदा"** केवळ अनुत्तरतत्त्वासमोर अर्थात् परमतत्त्वासमोर हिची डाळ शिजत नाही. इतर विश्वाच्या अणूअणूवर या मायेने आपले इंद्रजाल पसरविलेले आहे. पुनःपुन्हा सोडविल्यावरही गोरखधंद्याप्रमाणे पुनःपुन्हा ही माया माणसाला दंश करीत असते. या अर्थानेच शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की -

**उन्मूलितापि शतशः खण्डितापि सहस्रशः।**
**गोनासेवाप्रथोदेति द्रागत्र शरणं शिवः।**

**अर्थ :-** "गोनासा" काश्मीरमधील एका भयंकर सर्पिणीला म्हणतात. तिचे तुकडे तुकडे केल्यानंतरही ही सर्पिणी उसळून दंश करीत असते. माया ही गोनासाप्रमाणेच एक भयंकर आणि विष ओकणारी नागीण आहे. माया ही जडमूर्ती असल्यामुळे स्वयं आंधळी आहे. यामुळे माया ही साधू-असाधू, धनिक-निर्धन, पंडित-मूर्ख यापैकी प्रत्येकाला समान रूपाने दंश करीत असते. ही नागीण कोणालाही सोडीत नाही.

मायेच्या अशा स्वभावाला दृष्टिपथामध्ये ठेऊन भगवान् श्रीत्रिपुरारींनी **"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**मलः कर्म च माया च मायीयमखिलं जगत्।**

**सर्वं हेयमिति प्रोक्तं विज्ञेय वस्तु निश्चितम्।।१.१६।।**

याचा अर्थ असा आहे की, मल, कर्म, माया आणि मायानिर्मित सर्व जग त्याज्य मानावे आणि वस्तू म्हणजे ब्रह्म निश्चितपणे जाणून घ्यावे.

या सूत्रामध्ये मायेच्या प्रपंचाला अर्थात् त्रिविध मल, वासनात्मक कर्मांचा जंजाळ, स्वयं माया आणि तिचे कार्यरूप जगत् यांना तत्काळ किंवा एकाएकी तिलांजली देऊन आपल्या वास्तविक स्वभावाच्या यथार्थ अनुभूतीचा आदेश दिलेला आहे.।।९।।

*****

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

हा क्षेत्री अर्थात् जीव श्रीपरमेश्वरमय असूनही नेहमीच परिपूर्णतेने का स्फुरत नाही? अंतर्मुख आत्मबलाच्या स्पर्शाची तो का अपेक्षा करतो? या शंकांची उत्तरे देण्यासाठी नववी कारिका सांगितली आहे.

**स्पष्टीकरण :-** ही इच्छाशक्ती "स्व"च्या स्वातंत्र्याने उल्लसित झालेली असून तिचे स्वरूप अविमर्शस्वभाव अर्थात् स्वभावाचा पूर्ण विचार न करणारे असते. ती स्वतःला अपूर्ण स्वरूपाची मानत असून तिलाच **"आणव मल"** असे म्हणतात. ती संकुचित होऊन अपूर्णरूपामध्ये व्यक्त होते. त्या मलापासून उत्पन्न झालेल्या आवरणाच्या पाच कंचुकांमुळे ज्ञानशक्ती क्रमाने ("स्व" च्या अज्ञानाच्या भ्रमामुळे व्यापकत्व सोडून देते आणि किंचिज्ज्ञत्वाचा) (ज्ञानातल्या संकुचितत्वाचा) स्वीकार करते. ती स्वतःला अंतःकरण, बुद्धी, इंद्रियांच्या रूपात घालून अत्यंत संकुचित होते. त्यामुळे ती विभिन्न ज्ञेयांच्या प्रथारूप अर्थात् भिन्न भिन्न ज्ञेयांच्या रूपात व्यक्त होणाऱ्या अशुद्धीमध्ये प्रवेश करते. तिलाच **"मायीय मल"** असे म्हणतात. क्रियाशक्तीसुद्धा क्रमाक्रमाने सर्वकर्तृत्वतेला सोडून किंचित् कर्तृत्वाचा स्वीकार करते. ती संकुचित होऊन कर्मेंद्रियाच्या रूपात अत्यंत परिमितता (लहान होऊन) प्राप्त करते. ही शुभ-अशुभ अनुष्ठानाने युक्त अशी अशुद्धी म्हणजेच **"कार्म मल"** म्हणून ओळखली जाते. त्या अशुद्धींमुळे पूर्णज्ञत्व आणि सर्वकर्तृत्व (प्राप्त करण्यास जीव) असमर्थ झाल्याने विकल झालेल्या आणि त्यानंतरच करण्यात येणाऱ्या लौकिक आणि शास्त्रीय अनुष्ठानांमध्ये ज्यांची इच्छा केली जात असते त्या गोष्टी मिळविण्याच्या (इच्छेने) नेहमीच अभिलाषव्याकुळ झालेल्या त्याला (जीवाला) क्षणभरही आपल्या "स्व" स्वरूपात विश्रांती मिळत नाही. ज्यावेळी या आधी सांगितलेल्या आणि पुढेही सांगितल्या जाणाऱ्या उपपत्तींच्या घट्ट पकडीमुळे आणि

अनुभवामुळे अभिलाषांनी विवश झालेल्या ग्राहकाच्या (जीवाच्या) अभिमानाने युक्त असा क्षोभ अनात्म्यामध्ये आत्माभिमानाची निवृत्ती करीत आत्म्यामध्ये अनात्माभिमानाची शांती प्रकर्षाने करतो त्यावेळी त्या जीवाला श्रेष्ठ असे स्पंदतत्त्वात्मक पद प्राप्त होते. अर्थात् ते स्पंदतत्त्व त्याच्या प्रत्यभिज्ञेचा (जाणिवेचा) विषय होते. ही परमावस्था नित्य असल्यामुळे त्याचक्षणी होत नाही. यासंबंधी **"विज्ञानभैरव"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**मानसं चेतना शक्तिरात्मा चेति चतुष्टयम्।**
**यदा प्रिये परिक्षीणम् तदा तद्भैरवं वपुः।।१३८।।**

**अर्थ :-** हे प्रिये! मन, चेतना, शक्ती आणि आत्मा हे चौघेजण ज्यावेळेस पूर्णपणे नष्ट होतील त्यावेळेस ते भैरवरूप आपोआप व्यक्त होईल.

निजाशुद्धी या शब्दाने मल म्हणजेच (स्वतः पासून) वेगळे झालेले द्रव्य आहे असे ज्यांनी मानले आहे त्यांच्याकडे दूष्यत्वाने पाहिले गेले आहे अर्थात् त्यांचे मन दोषपूर्ण आहे असे सूचित केले आहे.।।९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

जीव आणि श्रीशिव यांच्यामध्ये कोणताही स्वरूपगत भेद नसतो. अशा दशेमध्ये पुरुष परमेश्वरसमानधर्मत्व प्राप्त करतो या निरूपणाचा प्रकृत विषयाशी कोणता अभिप्राय आहे? वस्तुतः त्या जीव आणि श्रीशिवां-मध्ये परस्परांमधील मोठे विलक्षणत्वच अनुभवास येते. त्यामुळे ग्रंथकार **"निजाशुद्ध्यासमर्थस्य .....।।९।।"** ही कारिका सांगतात. जरी जीव आणि श्रीशिव यांच्यामध्ये अभेद आहे हे पारमार्थिक सत्य असले तरीही व्यवहार दशेमध्ये मात्र औपाधिक भेद स्वीकारला जातो. त्याचप्रमाणे हा जो पशुरूप प्रमाता अर्थात् जीव आहे त्याच्या अंतःकरण-स्वभावापासून उत्पन्न झालेल्या अशुद्ध रूप मलामुळे तो स्वतःच असमर्थ होऊन नाना प्रकारच्या वासनांमुळे त्या त्या बहिर्विषयांची कामना करतो. त्याचप्रमाणे स्वतःला दारिद्र्याच्या समुद्रात बुडवून संकुचितपणाचा अनुभव घेतो. त्यामुळेच पशुजीवामध्ये मोहामुळे पारमार्थिक आत्मप्रकाशाचा अभाव असतो. पण ज्यावेळेस पूर्वजन्मी केलेल्या पुण्याच्या परिमाणाने देहेंद्रियादि विषयांमध्ये

मिथ्याध्यासाचा अर्थात् खोट्या ज्ञानाचा त्याग करून सर्व उपद्रवांनी रहित होतो त्यावेळेस तो परमपदामध्ये प्रतिष्ठित होतो; त्या पदापासून तो कधीही ढळत नाही.।।९।।

*****

**तदास्याकृत्रिमो धर्मो ज्ञत्व-कर्तृत्व-लक्षणः।**
**यतस्तदेप्सितं सर्वं जानाति च करोति च।।१०।।**

**अन्वयार्थ :-**

**तदा** - तेव्हा (मागील कारिकेत उल्लेखिलेला "क्षोभ" जेव्हा प्रलीन होईल तेव्हा), **अस्य** - या संसारी पुरुषाच्या अंगी, **अकृत्रिमः** - नैसर्गिक, अंगभूत असलेला, स्वभावसिद्ध, **ज्ञत्वकर्तृत्वलक्षणः** - ज्ञत्व (सर्वज्ञता) व कर्तृत्व (कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् नामक काहीही करण्याचे सामर्थ्य) ही ज्याची लक्षणे आहेत, असा त्याचा, (मूळचा, कायमचा, अंगभूत) **धर्मः** - (**सततमव्यतिरिक्त :** श्रीरामकण्ठ) :- प्रकट होतो व **यतः** - त्यामुळे, तो धर्म प्रकट होताच, **तदीप्सितम् सर्वम्** - जे जे काही जाणावे, करावे, मिळावे वाटते, त्या सर्व वस्तू, **जानाति च करोति च** - तो - स्वेच्छेने- जाणतोही व करतोही.।।१०।।

**अर्थ :-** संसारी मनुष्याच्या किंवा जीवाच्या क्षुब्धवृत्ती विलीन झाल्यावर त्या जीवाच्या किंवा पुरुषाच्या अंगी नैसर्गिक, अंगभूत असलेला स्वभावसिद्ध व ज्ञत्व अर्थात् सर्वज्ञताकर्तृत्व (काहीही करण्याचे सामर्थ्य) ही ज्याची लक्षणे आहेत असा धर्म निरावृत अर्थात् आवरणरहित रूपामध्ये प्रकट होत असतो. हा धर्म प्रकट होताच तो पुरुष सर्व इच्छित गोष्टी जाणूनही घेतो आणि करीतही असतो.।।१०।।

*****

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

चैतन्याचा धर्म सर्वज्ञत्व व सर्वकर्तृत्व आहे. चैतन्याची चैतन्यशक्तीच ज्ञानशक्ती व क्रियाशक्तीच्या रूपाने नटलेली असते. जीवाला स्थितिकालामध्ये सुद्धा जगण्याची व करण्याची इच्छा ज्या ज्या वेळेला होत असते त्या त्या वेळेला ती चैतन्यरूपाच्या मूळ स्वरूपाचीच शक्ती काम करीत असते. यासाठी उपरोक्त स्थितीत जीवात्म्याच्या ज्ञानसंकोचाकडे लक्ष न पुरविता

आपल्या चैतन्यरूपाचीच सर्व कर्तृत्वशक्ती आहे अशी जाणीव व जागृती ठेवावी.

ज्यावेळी क्षोभाचा प्रलय होतो त्यावेळी आत्मा स्वरूपस्थ होऊन त्याचा सहजस्वभाव प्रकट होतो. सहजस्वभाव म्हणजे काय? सहजस्वभाव म्हणजे सर्वज्ञता व सर्वकर्तृता होय. आत्मा जे काही जाणण्याची इच्छा करील ते तो जाणू शकतो. जे तो करण्याची इच्छा करील ते तो आपल्यासाठी व इतरांसाठीही करू शकतो. **"पंचरात्र"** ग्रंथामध्ये या सहजधर्माला **"विवेकज्ञान"** असे नाव देऊन त्याचे वर्णन केले आहे. जेव्हा या सहजधर्माचा किंवा सहजसाधनेचा प्रादुर्भाव होतो तेव्हा खरोखरीच काय होते? सिद्धयोगाचे सहजसाधन जेव्हा वृद्धिंगत होते तेव्हा आत्मा सर्वज्ञ, सर्वदर्शी, सर्वेश्वर व सर्वशक्तिमान होतो. तो इंद्रियरहित होतो. ज्याप्रमाणे अग्नी दाह्याचा म्हणजे जाळावयाची गोष्ट कोणती आहे याचा विचार कधीही करीत नाही त्याचप्रमाणे ज्ञेय म्हणजे जाणावयाचे काय आहे याचा विचार आत्मा कधीही करीत नाही; कारण तो स्वतः बोधस्वरूप आहे. **"षाड्गुण्यविवेक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "विचित्र पदार्थांची निर्मिती करण्यासाठी बोधस्वरूप आत्मा दुसऱ्या कोणत्याही कारणाची किंवा साहाय्याची अपेक्षा ठेवीत नाही. तो स्वतःच्या संकल्पानेच सहस्ररूपांची सृष्टी करीत असतो."

काही काही लोकांचे असे म्हणणे आहे की, आत्म्यात ज्ञातृत्व व कर्तृत्व इत्यादि गोष्टी कोणत्यातरी दुसऱ्या परतत्त्वामुळे येतात. असे म्हणणारे लोक वस्तुतः आत्म्याला अनीश्वरच मानतात. **"आगमरहस्य"** या ग्रंथाचे असे वचन आहे की, "जो ईश्वराची कृती दुसऱ्या कोणत्यातरी सहकारी कारणाने झाली आहे असे मानतो तो ईश्वरी तत्त्वालाच तिलांजली देतो." ते तर असे म्हणतात की, "परस्त्रीच्या आधीन झालेल्या पुरुषाचे नाव कामीश्वर ठेवावे त्याप्रमाणेच हे आहे." या सहज धर्माच्या स्थिरतेचा उपाय पुढील श्लोकात सांगितला आहे.।।१०।।

* * * * *

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

पण अशा प्रकारे पुरुषाचा देहात्मक अहंप्रत्यय नाहीसा झाला व त्याची स्थिती निश्चल सागराप्रमाणे प्रशांत झाली तर मग त्या अवस्थेत पुरुषाच्या ठिकाणी स्वबलस्पर्शाने इंद्रियप्रवृत्तीच होणार नाही. मग त्या

अवस्थेत ज्ञातृत्व व कर्तृत्व कोठले राहणार? कारण काही झाले तरी ज्ञातृत्व व कर्तृत्व या क्षोभाच्याच अवस्था होत. या आक्षेपाचे उत्तर असे आहे की -

**स्पष्टीकरण :-** मल व अभिलाषा नष्ट झाल्याने क्षोभ गेलेला असतो. अशा त्या व्यापक अहंप्रत्ययाच्या भूमिकेवरच पुरुषाचे स्वभावभूत ज्ञातृत्व आणि कर्तृत्व प्रत्ययास येते; कारण हे त्याचे धर्म सहजसिद्ध आहेत. या अवस्थेतच त्याला सम्यक्दृष्टी येते व त्याच्याकडून सम्यक्निर्मिती होते. या अवस्थेत प्रकट होणारी त्याची प्रत्यवमर्शरूप शक्ती ही खरोखरी एकच असते. ती संवेदनरूप असते म्हणून तिला ज्ञानशक्ती म्हणतात व तेवढ्यापुरताच तिचा संरंभ होत असल्याने तिला क्रियाशक्ती म्हणतात. पण या व्यापक अहंप्रत्ययाच्या भूमिकेवरून प्रत्यवमर्श न होता देहात्मतेच्या व्यक्तिगत भूमिकेवरून जर हे संवेदन व संरंभ झाले तर ते ज्ञातृत्व व कर्तृत्व कृत्रिम आहे असे समजावे; कारण त्याचे क्षेत्र उपाधीमुळे अगदीच संकुचित असते व ते मल आणि अभिलाषा यांनी व्याप्त झालेले असते. हीच क्षुब्धावस्था होय. व्यापक अहंप्रत्ययाच्या भूमिकेवरील ज्ञातृत्व व कर्तृत्व हाच खरोखरी आत्म्याचा स्वभाव होय. म्हणूनच त्याला स्वस्वभाव म्हणतात. ही क्षोभावस्था नव्हे. ।।१०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## ज्ञातृता आणि कर्तृता यांचा विकास

सूत्र क्रमांक ९ मध्ये असे म्हटलेले आहे की, प्रत्येक प्रकारचा क्षोभ विलीन अर्थात् नाहीसा झाल्यावर मितप्रमाता अर्थात् मर्यादित प्रमाता किंवा जीव हा श्रीशिवभावामध्ये प्रतिष्ठित होत असतो. या कथनाचा असा अर्थ आहे की, या अवस्थेमध्ये आत्म्यामध्ये कोणत्याही प्रकारचे स्फुरण राहत नाही. याचा परिणाम म्हणून आत्मा तरंगहीन सागराप्रमाणे शांत अर्थात् निःस्पंद होत असतो. जर असे आहे तर त्याचे पूर्वोक्त स्पंदात्मक स्वरूप हे कसे सिद्ध होऊ शकते? खालील सूत्रामध्ये या शंकेचे निवारण केले जात आहे.

**वृत्ती :-** सूत्र क्रमांक १० मध्ये असे म्हटले आहे की, मितप्रमात्याचा अर्थात् जीवाचा स्वभावसिद्ध ज्ञातृतारूप आणि कर्तृतारूप धर्म क्षोभ

विलीन अर्थात् नाहीसा झाल्यावर तत्काळ निरावृतरूपामध्ये अर्थात् आवरणरहित रूपामध्ये प्रकट होत असतो. यामुळे हा मितप्रमाता अर्थात् जीव त्या आत्मबलाचा स्पर्श प्राप्त केल्याक्षणीच ज्या ज्या गोष्टी जाणू इच्छित असतो त्या त्या गोष्टी तो जीव स्वतंत्रपणे जाणत व करीत असतो. याच्या विरुद्ध संसारी अवस्थेमध्ये ही गोष्ट कदापि शक्य होत नाही.।।१०।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्रामध्ये शांत ब्रह्मवादी वेदान्त्यांचे मुखमुद्रण अर्थात् खंडन सूत्रात्मक रूपामध्ये केले गेलेले आहे. वेदान्त्यांच्या विचारानुसार परब्रह्माचे स्वरूप हे निस्पंद किंवा स्पंदरहित आहे. याचाच अर्थ असा की, ब्रह्मवादी वेदान्त्यांच्या परब्रह्माचे स्वरूप हे प्रकाशमान असो किंवा नसो; परंतु त्या परब्रह्मात विमर्शाचा किंवा विचाराचा सर्वथा किंवा पूर्णपणे अभाव असतो. वेदान्त्यांच्या शब्दामध्ये परब्रह्म हे "निस्तरंगमहोदधिकल्प" अर्थात् तरंगहीन महान् समुद्राप्रमाणे असते. त्यामुळे यामध्ये ज्ञान-क्रियारूप चेतनेचे अस्तित्व शक्य होऊ शकत नाही. परब्रह्म हे पूर्ण शांत आहे आणि प्रत्येक प्रकारच्या कटकटीहून दूर आहे. यामुळे "विश्व आहे की नाही? विश्वाची सृष्टी, स्थिती आणि संहार यांचा कार्यक्रम नियमित रूपाने चालत आहे किंवा नाही? जर हा कार्यक्रम नियमित रूपाने चालत असेल तर त्या कार्यक्रमाचा ज्ञाता अर्थात् जाणणारा आणि कर्ता अर्थात् करणारा कोण आहे?" इत्यादि गोष्टींची परब्रह्माला चिंता नसते किंवा चेतनाही नसते. थोडक्यात असे म्हणता येते की, हे ब्रह्मवादी वेदान्ती परब्रह्माला एकीकडे चेतन मानतात तथापि दुसरीकडे ते परब्रह्म शांत-निस्तरंग-महोदधिकल्प आहे असे सांगून त्याला उदासीनही बनवीत असतात.

शैवशास्त्र मतवाद्यांना आणि विशेषतः स्पंदशास्त्र मतवाद्यांना सर्वात उत्कृष्ट आणि सर्व विश्वाच्या नियामक अशा अनुत्तरतत्त्वाची अशा प्रकारची शक्तिहीनता किंवा लुळेपणा मान्य नाही. स्वातंत्र्यशक्तिघन चैतन्याचा ज्ञान आणि क्रिया यांवर अनंद्यमुखापेक्षी अर्थात् दुसऱ्याच्या मुखाकडे न पाहण्याचा म्हणजे स्वतंत्र अधिकार आहे. हा अधिकार म्हणजेच त्या सर्वकर्त्याचा अकाट्य स्वभावच आहे. अशा परिस्थितीमध्ये त्या ज्ञान पारावारामध्ये अर्थात् परिपूर्ण रूपात कोणताही तरंग निर्माण झाला नाही तर हा कोणता स्वभाव होऊ शकतो? हे परमतत्त्व पूर्ण स्वतंत्र असल्यामुळे युगपत् अर्थात् एकाच वेळी निस्तरंगवृत्ती अर्थात् तरंगरहित वृत्ती आणि तरंगायमान

रूपामध्ये प्रकाशमान होत असते. "**शिवदृष्टी**" या ग्रंथामध्ये या दृष्टीने असे म्हटले आहे की -

**स यदाऽऽस्ते चिदाह्लादमात्रानुभवतल्लयः।**
**तदिच्छा तावती तावज्ज्ञानं तावत्क्रिया हि सा।।१.३।।**
**सुसूक्ष्मशक्तित्रितयसामरस्येन वर्तते।**
**चिद्रूपाह्लादपरमो निर्विभागः परस्तदा।।१.४।।**

**अर्थ :-** ज्यावेळी श्रीशिव पूर्ण चिदानंदमात्र अवस्थेत प्रकाशित होत राहतात अर्थात् बाह्यतः उभारणीच्या रूपाने प्रकाशित होत नाहीत आणि त्या चिदानंदावस्थेत त्यांचा लय होऊन ते राहतात त्यावेळी त्यांच्या सर्व इच्छा, समस्त ज्ञान आणि संपूर्ण क्रिया इत्यादि सर्वकाही त्यांच्यातच लीन राहते.।।३।। या स्थितीत किंवा यावेळी इच्छा, ज्ञान आणि क्रिया या तिन्ही सूक्ष्म शक्ती समरस अवस्थेत राहतात. यामुळेच चिद्रूप व आह्लादस्वरूप श्रीपरमशिवांची ही निर्विभाग अवस्था असते. हीच परावस्था आहे.।।४।।

शैवदर्शनामध्ये "निस्तरंगवृत्तिता" या शब्दाचा अर्थ "शक्तिहीनता" असा केलेला नाही; परंतु "निस्तरंगवृत्तिता" या शब्दाचा अर्थ इच्छा, ज्ञान आणि क्रिया शक्तींची सूक्ष्म सामरस्य अवस्था अर्थात् अभेद चिद्रूपता असा आहे. प्रत्यक्षात चैतन्य हे प्रसरणशील असून रूपप्रसाराचे प्रतीक आहे. चैतन्य हे स्वयं विश्वरूपामध्ये अवभासमान आहे. विश्व हे मिथ्या किंवा गर्हित अथवा निंद्य नाही; कारण की, **रूपप्रसाररसतो गर्हितत्त्व-मयुक्तिमत्।। शिवदृष्टि १.१२।।** अर्थात् श्रीशिव आपल्या मायाशक्तीद्वारा आपल्या पूर्वस्वरूपाला या विचित्र कार्यात्मक संसाराच्या रूपामध्ये प्रसारीत करू इच्छित असतात. त्यामुळे हा संसारही त्यांचेच रूप असल्याने तो निंद्य नाही. वरून खालपर्यंत असलेले सर्वकाही श्रीशिवरूप असल्यामुळे त्यांचा गर्हित अर्थात् निंद्य होण्याचा प्रश्नच कोठे निर्माण होतो? मात्र केवळ विश्वाला श्रीशिवरूपता अर्थात् आत्मभूत चैतन्याशी भेदरूपामध्ये पाहणे हे गर्हित अर्थात् निंद्य आहे आणि ती एक प्रकारची भ्रांतीच आहे. "**एवं न जातुचित्तस्य वियोगस्त्रितयात्मना।। शिवदृष्टि १.६।।** अर्थात् इच्छा, ज्ञान, क्रिया या तीन शक्तींचा त्याचप्रमाणे चिदानंदात्मक शक्तींचा त्या प्रमात्याशी कधीही वियोग होत नाही. परतत्त्व हे नित्य स्फुरणशील अर्थात् स्पंदायमान आहे. या परतत्त्वाचा आपल्या स्वभावभूत शक्तींशी छेद

कोणत्याही अवस्थेमध्ये होत नाही. यामुळे ज्ञातृता आणि कर्तृता हा या परतत्त्वाचा सहज अर्थात् अकृत्रिम आणि यथार्थ स्वभाव आहे. परब्रह्म हे शांत असते याचाच अर्थ असा आहे की, हे परतत्त्व विश्वोत्तीर्ण अर्थात् विश्वाच्या पलीकडे असलेले व या परतत्त्वाने विश्वाच्या सर्व अवस्था आणि वैचित्र्य यांना स्वतःच्या इच्छेने सत्ता किंवा अस्तित्त्व प्रदान केलेले आहे. परब्रह्म हे असीम सामर्थ्यशाली आहे. परब्रह्म हे स्वयं कधीही सुख-दुःखादि द्वंद्वानी अथवा क्षणभंगूर शरीरादींच्या ममत्व आणि अभिमानरूप क्षोभाने अभिभूत किंवा पराभूत होऊ शकत नाही. याचमुळे **संवित्ति-शून्यब्रह्मत्ववादिना जडतैव सा।। शिवदृष्टि ६.२९।।** अर्थात् ब्रह्माला ज्ञानशून्य मानणाऱ्यांच्या मताने संवित्तिशून्यता ही जडताच आहे. शांत ब्रह्मवादींनी परब्रह्माला शांत म्हणून त्याच्या या शांतीचे संवेदनरहित रूप प्रस्तुत केलेले आहे. यालाच शैवदार्शनिक जडतेव्यतिरिक्त अन्य काही मानत नाहीत.

या विषयासह संबंधित शैवदृष्टिकोणाला हृदयंगम करण्यासाठी वाचकांचे लक्ष्य खालील काही गोष्टींकडे आकर्षित केले जात आहे. प्रथम सूत्राच्या विवरणामध्ये या गोष्टीकडे थोडाबहुत संकेत केलेला आहे. परंतु येथे जरा विस्तारपूर्वक विश्लेषण करणे आवश्यक आहे. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथामध्ये असे म्हटलेले आहे की -

**हृदये स्वविमर्शोऽसौ द्राविताशेषविश्वकः।**
**भावग्रहादिपर्यन्तभावी सामान्यसंज्ञकः।**
**स्पन्दः स कथ्यते शास्त्रे स्वात्मन्युच्छलनात्मकः।।**
**।।४.१८२-१८३।।**

**अर्थ :-** हृदय म्हणजेच बोध होय. त्या स्वबोधात स्वात्म्याचा विमर्श किंवा ज्ञान बाहेर पसरलेल्या सर्व संसाराला आत्मसात् करून घेते. संसाराच्या सृष्टीपासून ते संहारापर्यंत हा स्पंद शाश्वत उच्छलित किंवा उसळणारा आहे. कोणत्याही विशेषाने रहित असल्याने व त्याच्या ठिकाणी शांतता असल्याने त्याला सामान्य असे म्हणतात. त्याला स्पंदशास्त्रात "स्पंद" असे म्हणतात व तो आत्म्यात उच्छलन करणारा किंवा उसळणारा आहे.

शैवमतानुसार हृदय अर्थात् अहंप्रत्यवमर्शात्मक बोधपारावारामध्ये

अर्थात् विचारात्मक ज्ञानामध्ये व शाश्वतरूपामध्ये विमर्शात्मक अर्थात् विचारात्मक स्पंदाच्या उर्मी उठत राहतात; कारण ज्ञान हे चैतन्य असल्यामुळे कधीही निष्क्रिय होऊ शकत नाही. हा विमर्शरूप स्पंद विश्वाचे द्रावण अर्थात् विश्वाचे बाह्य इदंरूपामध्ये अवभासन अथवा प्रसारण आणि प्रसारित भावमंडळाला पुन्हा आंतरिक अहंरूपतेमध्ये विलीन करण्याच्या संकल्पात्मक अर्थात् संकल्पयुक्त क्रियाशीलतेमध्ये निरत अर्थात् मग्न आहे. याआधीही असे म्हटलेले आहे की, या स्पंदाच्या प्रसाराची दिशा युगपत् अर्थात् एकाचवेळी बहिर्मुख आणि अंतर्मुखही आहे. बहिर्मुखप्रसार अर्थात् विश्वात्मकता स्वीकारण्याकडे उन्मुखता किंवा उत्सुकता यालाच शास्त्रीय शब्दामध्ये "स्वतःच्या आत्म्याचा विकास" असे म्हणतात. अंतर्मुखप्रसार अर्थात् प्रसृत म्हणजेच निर्माण झालेल्या विश्वात्मकतेला पुनः एकत्रित करण्याकडे असणारी उन्मुखता किंवा उत्सुकता आहे. या अंतर्मुखप्रसाराला शास्त्रीय भाषेमध्ये "स्वात्मसंकोच" असे म्हणतात. याबरोबरच या द्विमुखी क्रियाशीलतेला एकत्रित रूपामध्ये "स्वरूपाचे उच्छलन" किंवा "किंचिच्चलन" अर्थात् स्पंद असे म्हटले जाते.

या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटलेले आहे की -

**किञ्चिच्चलनमेतावदनन्यस्फुरणं हि यत्।**
**ऊर्मिरेषा विबोधाब्धेर्न संविदनया विना।।४.१८४।।**

**अर्थ :-** (बोधामध्ये) होणाऱ्या किंचित् चलनाला कोणत्याही अन्य स्फुरणाची अपेक्षा नसते अर्थात् ते स्वाभाविक स्फुरण आहे. हा स्पंद म्हणजे बोधरूप सागरामधील ऊर्मिरेषा म्हणजे तरंग असून या तरंगाशिवाय संविद् म्हणजे शक्ती ही शक्ती होत नाही.

हे किंचित्चलनात्मक स्फुरण विश्व स्थूलरूपामध्ये विकसित होण्याच्या "आदि" अर्थात् निर्माण काळी आणि "अंत" अर्थात् विश्वाचा संहार होण्याच्या वेळेला सामान्य स्वरूपात चालत राहते. त्यामुळे या रूपात याला सामान्यस्पंद असे म्हणतात. याचा भावार्थ असा आहे की, या अवस्थेमध्ये प्रवाहित स्पंदशक्तीमध्ये कोणत्याही प्रकारचा घटपट आदि विशेष विकल्पात्मकतेचा भेद असत नाही. विश्वाच्या स्थितिकालामध्ये निःसंशय स्पंद आपले सामान्य रूप सोडून देह, प्राण, नील, सुख इत्यादि विशेष विकल्पात्मक रूपांमध्ये प्रवाहित होऊन विश्ववैचित्र्याचे अवभासन करून घेतो. ही विशेषरूपताही उच्छलन किंवा किंचित्-चलन म्हणूनच

ओळखली जाते. अशा प्रकारचे हे स्वात्मोच्छलनयुक्त स्फुरण हाच चैतन्याचा शाश्वत स्वभाव आहे. त्यामुळे पतिप्रमातृभाव किंवा संविद्रूपता या स्फुरणाशिवाय किंवा स्पंदाशिवाय राहू शकत नाही. शेवटी स्वभाव हा स्वभावच आहे; तो कधीही अन्यथा होऊ शकत नाही.

याचा परिणाम म्हणून शैवसिद्धान्तानुसार अनुत्तरतत्त्व हे सर्वज्ञ अर्थात् सर्व काही जाणणारे आणि सर्वकर्ता अर्थात् सर्व काही करणारे असल्यामुळे कधीही दूर वेगवेगळे पडलेले तमासगीर बनून राहू शकत नाही. अनुत्तरतत्त्व हे स्वयं स्वतंत्र होऊन सर्वकाही जाणतही असते आणि करतही असते. यामुळे हे परतत्त्व उदासीन किंवा निश्चेष्ट नाही. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**तथा च तेषां हेतूनां संयोजनवियोजने।**
**नियते शिव एकैकः स्वतन्त्रः कर्तृतामियात्।।९.३५.३६।।**

**अर्थ :-** त्याचप्रमाणे चक्रादि साधनांच्या एकत्र येण्याने व दूर जाण्याने निर्माण होणाऱ्या घटामध्ये एकमात्र श्रीशिवच कर्ता असतात. विश्वात्मक शाक्तप्रसाराच्या भूमिकेवर चालणाऱ्या सर्व कार्यकलापांची साधनसंपत्ती अर्थात् निश्चित कारणसमूहाचे संयोजन-वियोजन करण्यामध्ये श्रीशिवांनाच एकमात्र स्वतंत्र कर्त्याच्या रूपामध्ये अवश्य मानावे लागते; कारण श्रीशिवांचे रूप हे संविदात्मक किंवा शक्त्यात्मक आहे आणि विश्वात्मक ज्ञातृता-कर्तृतेची अहंविमर्शमयी अर्थात् विज्ञानाची स्फुरणा हा शक्तीचा यथार्थ अर्थात् अकृत्रिम स्वभाव आहे. हेच कारण आहे की, मितप्रमातृभावाच्या जीवाच्या अल्पज्ञभावाच्या भूमिकेवर संसारातील सर्व अणू दैनिक आदान-प्रदान काळी आपल्या आपल्या आवश्यकतेनुसार निश्चित कार्याचे उत्पादन करण्यासाठी ज्या निश्चित कारणसमूहाचे संयोजन किंवा वियोजन करीत राहतात, त्यांच्या मुळामध्येही स्पंदात्मक अशी श्रीभगवंतांची शक्ती क्रियाशील आहे. शक्ती ही शक्तीच असते. ती कोठेही कमी किंवा अधिक असत नाही. यामुळे पतिप्रमातृभाव अर्थात् परमेश्वरभाव अर्थात् श्रीशिवभाव अथवा पशुप्रमातृभाव अर्थात् जीवभाव यांच्या भूमिकांमध्ये शक्तीच्या ज्ञातृ-कर्तृरूप अर्थात् जाणणे-करणेरूप क्रियाशीलतेमध्ये कोणताही फरक असत नाही. इथे केवळ इतकीच गोष्ट आहे की, पशुरूपामध्ये अर्थात् जीवरूपामध्ये श्रीभगवंतांची शक्ती ही आवश्यकतेनुसार स्वतःच जडशरीराविषयी ममत्व, अभिमान यांच्या क्षोभाचा पेहराव घालून निश्चित देश, काल तसेच आकार

यांच्या परिधीमध्ये किंवा कक्षेमध्ये क्रियाशील असते. परंतु पतिरूपामध्ये अर्थात् श्रीशिवरूपामध्ये शक्तीच्या क्रियाशीलतेवर कोणताही अंकुश नाही. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**तस्मादेकैकनिर्माणे शिवो विश्वैकविग्रहः।**
**कर्तेति पुंसः कर्तृत्वाभिमानोऽपि विभोः कृतिः।।**
**।।९.३८.३९।।**

**अर्थ :-** विश्वाच्या उभारणीमध्ये विश्व हेच शरीर असलेले श्रीशिव हेच कर्ता असतात; (इतकेच नव्हे तर) मी कर्ता आहे हा मनुष्याचा कर्तृत्वाभिमानसुद्धा श्रीशिवांचीच कृती असते. प्रत्यक्षात सूक्ष्मदृष्टीने पाहिले असता संसाराच्या किंवा जगताच्या अणुवर्गामध्ये अर्थात् जीववर्गामध्ये आढळणारे देहादिविषयी ममत्व अथवा संसाराच्या कर्त्तव्याविषयी कर्तृत्वाचा खोटा अभिमान हीही विश्वशरीरी श्रीभगवंतांचीच स्फुरणा आहे. यामुळे शक्ती ही जड किंवा उदासीन नाही.

संसारातील पशू अर्थात् जीव आपल्या खऱ्या शक्त्यात्मक स्वरूपाला विसरतात आणि कधीही तृप्त न होणाऱ्या वासनांच्या मरिचिकेच्या अर्थात् मृगजळाच्या मागे धावत सुटतात. जगतातील जीव हे या कर्माने माझी इष्टापत्ती होईल अर्थात् इच्छित प्राप्त होईल आणि या कर्मामुळे अनिष्टापत्ती होईल अर्थात् इच्छित प्राप्त होणार नाही, अशा संकोचामध्ये पडत असतात. ते उपादेयता अर्थात् ग्राह्य आणि हेयता अर्थात् त्याज्य यांचा क्षोभ अर्थात् अंतरात चाललेल्या द्वंद्वामध्ये व भावनांपासून निर्माण झालेल्या संघर्षाला बळी पडत असतात. जर श्रीभगवंतांचा अनुग्रह आणि श्रीसद्गुरूंचा कृपाकटाक्ष यामुळे पशुहृदयामध्ये अर्थात् जीवाच्या हृदयामध्ये केवळ एकवेळच ही अनुभूती जागृत झाली की, "प्रत्यक्षात् मी देहादींचे सत्ताभूत अर्थात् अस्तित्त्वरूप संवित्स्वरूपच किंवा शक्तिस्वरूपच आहे, सर्व विश्व हे माझेच विभव अर्थात् ऐश्वर्य आहे व यामुळे मी जाणण्यात आणि करण्यात नेहमीच स्वतंत्र आहे," तर अशी जाणीव निर्माण होऊन त्या जीवाचे सर्व पाश किंवा बंध गळून जातात. अशी अनुभूती प्राप्त करून घेतलेला जीव पशुप्रमातृभावाने अर्थात् जीवभावाने अकृत्रिम अशा ज्ञातृत्वाचा आणि कर्तृत्वाचा अधिकारी बनत असतो. यालाच शास्त्रामध्ये "आत्मबलाचा स्पर्श" असे म्हटलेले आहे.।।१०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

ज्यावेळेस ग्राहकाच्या अहंभावरूप आत्म्यातला क्षोभ क्षीण होतो किंवा नष्ट होतो त्यावेळेस ते स्पंदतत्त्व लाटा नसलेल्या सागराप्रमाणे अस्पंद (स्पंद किंवा तरंगरहित) असे तत्त्व होईल, या शंकेला यापुढील कारिकेत उत्तर दिले आहे.

**स्पष्टीकरण :-** येथे **"तत्"** (ते) हे पद उपदेश देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वापरले आहे. अकृत्रिम धर्म म्हणजे सहज धर्म अर्थात् पूर्वी सांगितलेला स्वंत्रतारूप श्रीपरमेश्वरस्वभाव होय. ज्ञत्वकर्तृत्व म्हणजेच सामरस्य स्थितीत असणाऱ्या, प्रकाश आणि आनंदरूप असणाऱ्या अशा ज्ञान आणि क्रिया या ज्यावेळेला क्षोभांचा उपशम होतो त्यावेळेला ज्याचे स्वरूप अव्यभिचारी आहे, अशा पुरुषासमोर प्रकट होतात. त्या कोठून अभिव्यक्त होतात? या प्रश्नाला उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की, मूलाधारातून चिच्छक्ती कुंडलिनी सुषुम्णामार्गाने जाताना ज्ञानक्रिया प्रकट होतात आणि परम पदात प्रवेश करण्याच्या वेळी, जे जे जाणून घेण्याची इच्छा केलेली असते किंवा करण्यास इच्छिलेले आहे ते ते तो जीव जाणतो आणि करतो.

येथे दोन चकारांचा वापर समानता सांगण्यासाठी केला आहे. ह्या चकारांमुळे ज्ञान आणि क्रियांचे ऐकात्म्य सुचविलेले आहे. अर्थात् क्रिया (स्थूल, सूक्ष्म आणि पर या सर्व) या ज्ञानात्मक आहेत. ते ऐकाम्य ज्ञत्वकर्तृत्वलक्षण या एकधर्म विशेषणाने संबंधांचा निर्देश करणाऱ्या वास्तव स्वरूप सांगणाऱ्यांकडून सांगितले गेले आहे.।।१०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

जो पुरुष आपल्या देहादींमध्ये अहंप्रत्ययरूप क्षोभाचा वारा नसलेल्या सागराप्रमाणे अत्यंत प्रशांतस्थितीला गेलेला असतो त्याच्या आत्म्यालाच "मोक्ष" या शब्दाने संबोधिले जाते. परंतु येथे ही स्वाभाविक शंका उत्पन्न होते की, देहेंद्रियांमध्ये अहंप्रतीतिलक्षणक्षोभरहितसामर्थ्यबळाने पुरुष त्यापासून वेगळ्या लक्षणाच्या क्षोभस्वरूप धर्माला कशा प्रकारे प्राप्त होतो? जर त्या धर्माने संयुक्त होऊन तो प्रवृत्त्यादींना प्राप्त करील तर तो "मी करतो" इत्यादींनी क्षुब्ध होईल. अशा प्रकारच्या अज्ञानी लोकांचा भ्रम नष्ट करण्याच्या

इच्छेने "**तदात्याकृत्रिमो धर्म .....।।१०।।**" ही कारिका सांगतात. ज्यावेळेस देहेंद्रियबुद्धिप्राण इत्यादींचा अवलंब करून उत्पन्न होणारा मायिक क्षोभ सर्वप्रकारे निवृत्त होतो त्यावेळेस पुरुषामध्ये स्वाभाविकज्ञातृत्वकर्तृत्वरूप धर्मांचा त्याचक्षणी आविर्भाव होतो. ही स्थिती प्राप्त करून तो पुरुष इष्ट वस्तू स्वतःच्या स्वातंत्र्याने दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची अपेक्षा न करताच जाणतो आणि ती वस्तू संपादनही करतो. यासंबंधी "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**एवमात्मानमेतस्य सम्यग्ज्ञानक्रिये तथा।**
**जानन्यथेप्सितान् पश्यञ्जानाति च करोति च।।४-१-१५।।**

**अर्थ :-** अशा प्रकारे (साधक) आपल्या स्वरूपाला आणि त्याच्या ज्ञान व क्रिया यांना योग्यप्रकारे जाणून इच्छित गोष्टींना पाहत त्यांचे ज्ञान करून घेतो व त्याचप्रमाणे क्रियाही करतो.।।

ज्या पुरुषाचे चित्त विषयप्रवण होते तो संसरणशील म्हणजेच स्खलनशील अशा संसारस्थितीतच निमग्न होऊन जातो. त्याच्या ठिकाणी तत्त्वज्ञानही राहत नाही आणि कर्तृत्त्वशक्तीही राहत नाही.।।१०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**तमधिष्ठातृभावेन स्वभावमवलोकयन्।**
**स्मयमान इवास्ते यस्तस्येयं कुसृतिः कुतः।।११।।**

**अन्वयार्थ :-**

**यः** - जो साधक, **तम्** - वर वर्णिलेल्या त्या, **स्वभावम्** - स्पंदात्मक आत्मस्वरूपास, **अधिष्ठातृभावेन** - सर्व विश्वातील स्थावर जंगम वस्तूंमध्ये मी अनुस्यूत असलेला - सर्व विश्वाचे अधिष्ठान असलेला - सर्व सामर्थ्ययुक्त परमेश्वर आहे अशी प्रत्यभिज्ञा पूर्वक जाणीव - (श्रीकल्लट व श्रीरामकण्ठ) **अवलोकयन्** - पाहत, साक्षात्कार अनुभवीत असणारा, **स्ययमान** - विस्मयावस्थेत असतो, **तस्य** - त्याला, **कुतः** - कोठून, **कुसृतिः** - जन्म, मृत्यू, संसाराचा - कुमार्ग (असणार?)।।११।।

**अर्थ :-** जो साधक वर वर्णिलेल्या त्या स्वभावाचा किंवा स्पंदात्मक आत्मस्वरूपाचा सर्व विश्वातील स्थावर व जंगम वस्तूंमध्ये अर्थात् कणाकणामध्ये अनुस्यूत किंवा समाविष्ट असलेल्या मुख्य सत्तेच्या रूपात

विकास अनुभवास येत असतो.

"क्रम" आणि "मुद्रा" हे "क्रममुद्रा" या शब्दाचे दोन खंड आहेत. यातील "क्रम" शब्दाने संवित् रूपामध्येच सृष्टी, स्थिती आणि संहार यांचा क्रम असा अर्थ घेतला जातो. तर "मुद्रा" शब्दाने मुद्रित करणे किंवा स्वरूपामध्येच विश्रांती प्राप्त करून घेणे असा अर्थ घेतला जातो. याचा परिणाम म्हणून "क्रममुद्रा" ही स्वतः तुरीयारूपा असल्यामुळे प्रत्येक प्रकारच्या क्रमाला ग्रास करण्याच्या क्रमाने स्वरूपामध्येच विश्रांती प्राप्त करून घेत असते. या दृष्टीने "**प्रत्यभिज्ञाहृदयसूत्र।।१९।।**" यावरील टीकाग्रंथात श्रीक्षेमराज यांनी असे म्हटले आहे की -

**सृष्टि-स्थिति-संहृति-संविच्चक्रात्मकं-क्रमं मुद्रयति**
**स्वाधिष्ठितं आत्मसात् करोति येयं तुरीया चितिशक्ति...!।।१९।।**

याचा अर्थ असा आहे की, साधक सृष्टी, स्थिती, संहार आणि संवित्च्या चक्रस्वरूप क्रमाच्या मुद्रा प्रदर्शित करतो अर्थात् आपल्या ठिकाणीच स्थित असलेल्या सर्व गोष्टी पूर्ण आत्मसात करतो. यालाच तुरीय चितिशक्ती असे म्हणतात.

याशिवाय क्रममुद्रा या शब्दाचा असाही अर्थ घेतला जातो की, फलतः ही एक नित्य उदय पावणारी समाधी अवस्था असल्यामुळे अंतःरूपामध्यें किंवा बाह्यरूपामध्ये समानरूपाने आनंदाचे वितरण अर्थात् वाटप करीत असते. ही समाधी अवस्था अख्यातीच्या अर्थात् अज्ञानाच्या द्वारा निर्माण झालेल्या बंधनांना कापून टाकीत असते. ही अवस्था बाह्य अवभासाला आंतर तुरीयासत्तेमध्ये अर्थात् सामरस्य सत्तेमध्ये मुद्रित करून घेत असते अर्थात् शिक्कामोर्तब करते. या सूत्रामध्ये याच योगभूमिकेला "स्मयमानः" शब्दाच्या द्वारा अभिव्यक्त केलेले आहे.।।११।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

या कारिकेत उन्मेष क्रमरूप समाधीने स्पंदतत्त्वाचा साक्षात्कार केलेला (साधक) स्पंदत्वाच्या दृढ आश्रयाने व्युत्थानही समाधीशी एकरूप करवून संसाराचा नाश करणारा होतो आणि जे "**यतः करण**", "**निजाशुद्धी**" या कारिकांमध्ये सांगितलेले आहे त्याचेच स्पष्टीकरण करतात.

**स्पष्टीकरण :-** जो सांगितलेल्या उपपत्तींनी ज्ञेय गोष्टीचा सतत अभ्यास करून जाणून घेतलेल्या त्या स्पंदतत्त्वात्मक स्वभावाला आत्मीय नियामक

भावाने (आपल्या नियामकभावाने) व्युत्थान (जागृत) दशेतही व्याप्त होऊन अवलोकन करतो किंवा त्याचे चयन करतो तो या उभयप्रकारच्या सृष्टीच्या अरणीचे निरीक्षण करतो. निमीलन (संहार) आणि उन्मीलन (सृष्टी) या दोन्ही प्रकारच्या समाधीने सर्व ठिकाणी व्याप्त असलेल्या मध्यभूमीचा आश्रय घेतल्यामुळे एकदमच त्या योग्याचे सर्व विकल्प नष्ट होतात आणि त्याचे करणचक्र पूर्णपणे अभिव्यक्त होते. या सर्वांचा परंपरेनुसार **"विज्ञानभैरव"** आणि **"कक्ष्यास्तोत्र"** या ग्रंथात पुढीलप्रमाणे उल्लेख केलेला आहे.

**न व्रजेन्न विशेच्छक्तिर्मरुद्रूपा विकसिते।**
**निर्विकल्पतया मध्ये तया भैरवरूपधृक्।।२६।।**

**अर्थ :-** ज्यावेळेस मरूद्रूप (वायुरूप) शक्तीचा विकास होतो त्यावेळेस ती जातही नाही आणि प्रवेशही करीत नाही. तिच्यामुळे (जीव) निर्विकल्पत्वाने तिच्यामध्येच भैरवरूप धारण करणारा होतो.

**सर्वाः शक्तीश्चेतसा दर्शनाद्याः स्वे स्वे वेद्ये यौगपद्येन विष्वक्।**
**क्षिप्त्वा मध्ये हाटकस्तम्भभूतस्तिष्ठन्विश्वाकार एकोऽवभासि।।**
**।। कक्ष्यास्तोत्र।।**

**अर्थ :-** तू एकटाच विश्वाच्या आकाराप्रमाणे, मध्यात सोन्याच्या स्तंभाप्रमाणे आणि दर्शनादि सर्व शक्ती एकाच वेळेस स्वतःच्या वेद्यांमध्ये (त्या त्या विषयांकडे) प्रवृत्त करून भासतोस.

योगी **"आम्नाय ग्रंथात"** वर्णन केल्याप्रमाणे कसा असतो हे सांगताना शास्त्रात असे म्हटले आहे की -

**अन्तर्लक्ष्यो बहिर्दृष्टिः निमेषोन्मेषवर्जितः।**
**इयं सा भैरवी मुद्रा सर्वतन्त्रेषु गोपिता।।**

**अर्थ :-** आपले लक्ष्य (ध्येय) आत ठेवून निमेष (डोळे मिटणे) व उन्मेष (डोळे उघडणे) यांनी रहित अशी दृष्टी बाह्य ठिकाणी ठेवणे यालाच सर्व तंत्रग्रंथांमधून गुप्त म्हणून सांगितली गेलेली भैरवी मुद्रा असे म्हणतात.

(साधकयोगी) या भैरवी मुद्रेत प्रविष्ट होऊन, आरशामध्ये उत्पन्न होणाऱ्या आणि नाहीशा होणाऱ्या नाना प्रतिबिंबांच्या समूहाप्रमाणे अनेक पदार्थसमूहांना चिदाकाशात उत्पन्न होऊन तेथेच विलीन होताना पाहतो.

त्याच्या अनेक जन्मांनंतर परमानंदाने पूर्णपणे भरलेल्या लोकोत्तर अशा स्वस्वरूपाच्या प्रत्यभिज्ञानामुळे तत्काळ सर्व वृत्तींचा नाश होतो. तो विस्मयमुद्रेत अनुप्रविष्ट होऊन त्याने महाविकास संपादन केल्यामुळे त्याच्या ठिकाणी (अचानक) सहसा योग्य असा तात्त्विक स्वभाव उत्पन्न होतो. असा तो योगी स्थिर राहतो म्हणजेच आश्रयामुळे (दृढपणात) ढिला होत नाही. त्याची ही सर्व जगाचा थरकाप उडविणारी जन्म-मरण-प्रपंचरूप-प्रवृत्ती निजाशुद्धीलक्षणाच्या हेतूचा अभाव असल्यामुळे होतच नाही (अर्थात् योग्याच्या मनात कोणतीही वृत्ती उठत नाही.)

"**श्रीपूर्वशास्त्र**" या ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

**तत्त्वे निश्चलचित्तस्तु भुञ्जानो विषयानपि।**
**नैव संस्पृश्यते दोषैः पद्मपत्रमिवाम्भसा।।**
**विषापहारिमन्त्रादिसन्नद्धो भक्षयन्नपि।**
**विषं न मुह्यते तेन तद्वद्योगी महामतिः।।१८।१२०।।**

**अर्थ :-** ज्या योग्याचे चित्त स्पंदतत्त्वामध्ये अत्यंत दृढपणे स्थिर झालेले आहे त्याने विषयांचा भोग घेतला असतानाही ज्याप्रमाणे पाण्याने कमळाचे पान भिजत नाही त्याप्रमाणेच तो कोणत्याही दोषांनी स्पर्शिला जात नाही. ज्याप्रमाणे विष दूर करणारे मंत्र ज्याच्या जवळ असतात त्याने विष भक्षण केले असताही त्याला ते बाधत नाही त्याचप्रमाणे या महामती योग्यावरही विषयांचा कोणताही परिणाम होत नाही.।।११।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

पूर्वोक्त श्लोकात योग्य युक्तीसह आत्म्याचे स्वरूप प्रस्थापित करून आता तत्त्वज्ञानाचे फल दाखविण्यासाठी "**तमधिष्ठा-तृभावेन .....।।११।।**" ही कारिका सांगतात. जो कोणी योगिसाधक ज्यावेळी सर्व ज्ञेय वस्तूंमध्ये अनुस्यूत असलेले, कर्तुमकर्तुम् म्हणजे कोणतेही काम करण्याच्या अथवा न करण्याच्या शक्तीने सामर्थ्यवान् असे स्पंदात्मकस्वरूप परम सत्याच्या स्वरूपात अनुभवितो त्यावेळी तो सर्वच ठिकाणी स्वस्वरूपात्मक चैतन्याचे अधिष्ठान अनुभवितो अर्थात् पारमार्थिक व्यापकत्त्व यथातथ्य स्वरूपात त्याच्या हृदयामध्ये अनुभवरूपात प्रकाशित होते. यासंबंधी "**ईश्वर-प्रत्यभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की-

**सर्वो ममायं विभव इत्येवं परिजानतः।**
**विश्वात्मनो विकल्पानां प्रसरेऽपि महेशता।।४-१-११।।**

**अर्थ :-** हे सर्व विश्व म्हणजे माझेच ऐश्वर्य आहे असे जाणून घेणाऱ्या विश्वात्म्यामध्ये विकल्पांचा उदय झाला तरीही श्रीमहेश्वरभाव तसाच स्थिर राहतो.।।

ज्या स्थितीत योग्याची दृष्टी ज्ञानात्मक अर्थात् ज्ञानाने युक्त होते आणि त्याचप्रमाणे सांसरिक पदार्थांचा प्रवाह, समुद्रात उत्पन्न झालेल्या लाटा, नीलाकाशातले श्यामवर्णाचे ढग आणि चंद्रमंडलातले मधुर चांदणे आपल्या आत्म्यामधूनच बाहेर विकसित होत आहेत असा अनुभव घेऊन तो साधकयोगी महदाश्चर्य व्यक्त करतो त्याच्या बाबतीत जन्ममरणरूप दुर्गती कशी काय शक्य आहे बरे? अर्थात् कधीच शक्य होणार नाही. तो समस्त संसाराच्या पाशांमधून मुक्त होऊन अनामय अर्थात् निर्मळ अशा मोक्षपदाला प्राप्त होतो.।।११।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**नाभावो भाव्यतामेति न च तत्रास्त्यमूढता।**
**यतोऽभियोगसंस्पर्शात्तदासीदिति निश्चयः।।१२।।**

**अन्वयार्थ :-**

**अभावः -** अभाव, शून्यता, **भाव्यताम् न एति -** भावनेच्या, ध्यानाच्या स्थितीस येत नाही, ध्यानावस्थेचा विषय होऊ शकत नाही, **तत्र-** त्या तसल्या समाधी अवस्थेत, **अमूढता -** जड-मूढ अवस्थेचा अभाव, **न च अस्ति -** नसतोच. अभाव-भावना हीच मूढतेची- जडतेची अवस्था आहे, **यत्ः -** कारण, **अभियोगसंस्पर्शात-** अभियोग- अपलाप, भाषण - त्याचा संबंध झाल्यावर, शाब्दिक अभिव्यक्तीत, **तत्ः -** ती मूढावस्था, **आसीत्ः -** होती, **इति निश्चयः -** असा निश्चय होतो.।।१२।।

**अर्थ :-** अभाव किंवा शून्यता ही कधीही भावनेचा विषय बनू शकत नाही. अशा समाधीमध्ये अमूढता अर्थात् जडतेचा अभाव असत नाही. अभाव-भावनेची अवस्था ही जडतेची अवस्था आहे. याचे कारण असे आहे की, अभाव-समाधीतून बाहेर आल्यानंतर योग्याचा अभिलापाशी अर्थात् भाषणाशी संबंध आल्यावर त्याला हे निश्चितपणे माहिती होते की, ती माझी शून्य अवस्था होती.।।१२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

परब्रह्म जर शून्य असेल तर समाधी अवस्थेत त्याचा अवलंब करणे शक्य नाही. भाव म्हणजे काय? ज्ञानाचा विषय होण्याचा पदार्थ व भाव्यता म्हणजे काय? अस्तित्व म्हणजे काय? ध्येय होण्याला योग्य अशी स्थिती कोणती? काहीच नाही असे जर असेल तर ते ध्यानात येणे शक्य नाही. समाधीमध्ये ध्यान, ध्यातृ व ध्येय ही त्रिपुटी नाहीशी होत असते. त्या अवस्थेमध्ये मूढत्व नसते म्हणजे मला काही समजत नाही असे नसते. समाधीतून उठल्यानंतर जागृतावस्थेपेक्षा काही तरी निराळ्या अवस्थेत आपण होतो असा निश्चय साधक योग्याचा होतो. समाधी अवस्थेमध्ये काहीच असत नाही अशी जर साधक योग्याची स्थिती असती तर मग जी स्थिती मला प्राप्त व्हावयास पाहिजे होती ती स्थिती मला प्राप्त झाली, मला ब्रह्मप्राप्ती झाली, ज्या स्थानी मला जावयाचे होते त्या स्थानी मी पोहोचलो व उत्तम अशा आनंदयुक्त स्थितीचा आनंद मला मिळाला हे जागृत अवस्थेत तो सांगू शकला नसता. यावरून परब्रह्म वस्तू किंवा श्रीशंकरस्वभाव जागृत, स्वप्न, सुषुप्ती व समाधी या चारी अवस्थेमध्ये ज्ञानस्वरूपाने सारखा असतो हेच सिद्ध होते. त्यामुळे परब्रह्म ही काही अभाव किंवा शून्य वस्तू मुळीच नाही म्हणजे ज्याला कशाचेही ज्ञान नाही अशी ही स्थिती नाही तर ती ज्ञानमय स्थिती आहे. जागृत, स्वप्न व सुषुप्ती या अवस्था अनित्य आहेत व त्यांचा साक्षी आत्मा हा नित्य आहे. त्यामुळे समाधी किंवा तुरीयावस्था ही त्या अवस्थेसारखी अनित्य असते. मात्र ज्ञानावस्था किंवा श्रीशंकरावस्था यांमध्ये आत्मतत्त्व नेहमी जागृत असतेच. यासाठी कोणत्याही अवस्थेत प्रत्येक ठिकाणी ज्ञेय वस्तू नाहीच फक्त ज्ञाताच आहे, अशी जागृती ठेवावी.।।१२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

वरील विस्मयावस्थेत वेद्यवेदकभाव जाणवत नसल्यामुळे त्या अवस्थेला कोणी अभावरूप मानतील या शंकेने तिची भावरूपता स्पष्ट करतात.

**स्पष्टीकरण :-** अभाव हे समाधीचे आलंबन होऊ शकत नाही असे कारिकाकारांचे स्पष्ट मत आहे. पण "**अभावं भावयेत् तावत् तन्मयतो व्रजेत्**" असे मानणारेही कोणी आहेत. समाधिकाली ध्याता-ध्यान-ध्येय

या विकल्पांचा उच्छेद झाल्यामुळे या अवस्थेला ज्यांना आत्मस्वरूपाचे विस्मरण झाले आहे असे योगी अभाव-समाधी म्हणतात. यांना उद्देशून कारिकाकार असे म्हणतात की, ज्या अर्थी व्युत्थानकाली तुम्हाला होणारे त्या अवस्थेचे स्मरण म्हणून होते त्याअर्थी ते अनित्य असले पाहिजे. अर्थात् अभावरूप आलंबन हे नित्य असे आत्मस्वरूप किंवा स्वस्वभाव असणे शक्य नाही व म्हणूनच ते चैतन्यमय असणेही शक्य नाही. अर्थात् आत्मा चैतन्यरूप आहे, जड नाही असे मानणाऱ्या चेतनात्मवादात अभावरूप आलंबन उपपन्न होत नाही.।।१२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## अभावब्रह्मवाद, सर्वशून्यत्ववादाची निःसारता

शैवदर्शानानुसार सामान्य स्पंदमयी शाक्तभूमिका ही पूर्णज्ञातृत्व आणि पूर्णकर्तृत्वरूप चैतन्याची भूमिका आहे. या शैवदर्शनाला प्रतिकूल असलेल्या अभावब्रह्मवादी श्रुत्यंतविद अर्थात् शास्त्राचे अत्यंत श्रवण करून विद्वान् बनलेले लोक आणि या विद्वानांच्या समकक्ष सिद्धान्ताचे अनुसरण करणाऱ्या शून्यवादी माध्यमिकांच्यानुसार स्वरूपाच्या साक्षात्काराची अवस्था ही सर्वाभावाची किंवा सर्वशून्यतेची अवस्था आहे. या अवस्थेवर पोहोचलेला आत्मा हा अभावामध्ये लीन होत असतो.

वरील सूत्रामध्ये अशाच मतवाद्यांचे मुखमुद्रण अर्थात् खंडन केले आहे.

**वृत्ती** :- दुसरे काही योगी असा उपदेश करीत असतात की, "जोपर्यंत आत्मा अभावामध्ये लीन होत नाही तोपर्यंत अभावाची भावना करीत राहावी." परंतु ही गोष्ट युक्तिसंगत नाही; कारण अभाव हा कधीही भावनेचा विषय बनू शकत नाही.

प्रत्यक्षात हा विचार युक्तियुक्तही नाही; कारण "अभाव" ही निश्चितपणे जडतेचीच अवस्था आहे. यामुळे भावनेचा विषय होण्याचे मंतव्य प्रस्तुत करणे हे असंगत आहे. ही अभाव-भावना मूढतेची अवस्था आहे; कारण की, समाधिकालानंतर जेव्हा अशा योग्याचा अभियोग किंवा भाषणाशी संबंध येतो तेव्हा तो योगी या समाधिअवस्थेचा ती माझी शून्य अवस्था होती असा अनुभव घेत असतो. आत्म्याचा स्वभाव असा नाही; कारण

चित्स्वरूपता ही सतत उदीयमान असल्यामुळे मूढतेच्या अवस्थेप्रमाणे तिचे स्मरण केले जात नाही. चित्स्वरूपता ही शाश्वत उदीयमान सत्ता आहे. यामुळे या सत्तेचा अनुभव प्रतिक्षण अनुभवित्याच्या अर्थात् स्वतंत्र ज्ञानक्रियात्मक चैतन्य प्रमात्याच्या रूपामध्ये होत असतो.।।१२।।

**विवरण :-** अभावब्रह्मवादी श्रुत्यंतविदांचा प्राचीन वेदान्त्याच्या एका शाखेशी आणि शून्यवाद्यांपासून ते बौद्ध दार्शनिकांच्या माध्यमिक शाखेच्या अनुयायांपर्यंत सर्वांचा संबंध आहे. विषय थोडा अधिक स्पष्ट करण्यासाठी येथे दोन्ही मतवाद्यांच्या सिद्धान्ताचे संक्षिप्त अवलोकन करणे आवश्यक आहे.

**अभावब्रह्मवाद :-** या वादानुसार अभावरूप अथवा असत्‌रूप कारणापासून भावरूप किंवा सद्रूप कार्याची उत्पत्ती होत असते असे मानलेले आहे. याचे तात्पर्य असे आहे की या भावरूपामध्ये दिसून येणाऱ्या स्थूल जगताच्या सृष्टीच्या आधी कोणत्याही पदार्थाची भावरूपामध्ये सत्ता नसल्यामुळे चारही दिशांना अभावाचेच साम्राज्य होते. या अभावापासूनच भावरूपामध्ये दिसून येणाऱ्या जगताची स्वतःच सृष्टी झाली. हे लोक आपल्या मताची पुष्टी करताना खालील उपनिषद्वाक्याला प्रमाणरूपामध्ये प्रस्तुत करीत असतात.

**असदेवेदमग्र आसीत् .....।। छांदोग्योपनिषद् ३.१९.१।।**

या म्हणण्यामागील तात्पर्य हे की, सृष्टीच्या आधी असत्‌च असत् होते अर्थात् प्रत्येक पदार्थाचा अभाव होता. सृष्टीच्या प्रलयानंतरही सर्व जगताचा अभावामध्येच लय होणार आहे. यामुळे प्रत्यक्षात अभाव हीच यथार्थ सत्ता आहे. अभाव हेच ब्रह्माचे वास्तविक रूप आहे. या अभावाची निरंतर भावना केली असता सर्व सांसारिक उलथापालथीचा उच्छेद किंवा नाश होत असतो; कारण की, वेदकसत्ता आणि वेद्यसत्ता या दोघांचाही अभावामध्येच लय होत असतो. अभावामध्ये लय होणे हीच जीवात्म्याची खरी मुक्ती आहे. याचा परिणाम म्हणून अभावसमाधीची परिपक्वता प्राप्त करून घेऊन आत्म्याचे अभावरूप परब्रह्मामध्ये लीन होणे हेच खरे साधनेचे परमलक्ष्य आहे.

**शून्यवाद :-** बलदेव उपाध्याय यांनी आपल्या **"भारतीय दर्शन"** या पुस्तकात शून्यवादासंबंधी असे म्हटले आहे की, "बौद्धांच्या माध्यमिक शाखेचे प्रसिद्ध तसेच उद्भट अर्थात् विद्वान् श्रीनागार्जुन आणि त्यांना समकक्ष असणाऱ्या अन्य अनेक विद्वानांनी बौद्धदर्शनामध्ये "सर्वशून्य-

वादाची" स्थापना केलेली आहे. हे लोक या वादाला "सर्ववैनाशिकवाद" असेही म्हणतात. सर्ववैनाशिकवादानुसार कोणत्याही पदार्थाचे अस्तित्वच स्वीकृत केलेले नसते. भगवान् श्रीअभिनव गुप्तपादाचार्यांनी आपल्या **"तंत्रालोक"** या ग्रंथामध्ये या लोकांना **"सर्वापह्नवहेवाकधर्मा"** या नावाने संबोधित केलेले होते. यावर टीका करताना श्रीमदाचार्यजरथ यांनी **"विवेकव्याख्येत"** असे म्हटले आहे की, **"सर्वेषां ज्ञातृज्ञानज्ञेयानाम् अपह्नवो निराकरणं तत्र हेवाक एव धर्मः स्वभावो यस्यासौ बौद्धः।। तंत्रालोकविवेक १.५६।।"** याचा अर्थ असा आहे की, सर्व म्हणजे ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान या त्रयींचे अपह्नवत्व म्हणजेच मिथ्यात्व ठरविणे किंवा निराकरण करणे हा बुद्धीचा धर्म किंवा स्वभाव आहे. श्रीअभिनव-गुप्तपादाचार्यांच्या विचारानुसार या लोकांनी प्रत्येक प्रकारच्या ज्ञातृरूप, ज्ञानरूप अर्थात् जाणीवरूप आणि ज्ञयेरूप अर्थात् जाणण्यास योग्यरूप पदार्थाच्या अनस्तित्वावर दुराग्रह ठेवण्याचा ठेका किंवा जबाबदारी घेतली होती.

या दृष्टीनेच **"भारतीय दर्शन"** या ग्रंथात डॉ.बलदेव उपाध्याय यांनी असे म्हटले आहे की -

**मुख्यो माध्यमिको विवर्तमखिलं शून्यरस्य मेने जगत्।।**

यांच्या मताचा संक्षिप्त निष्कर्ष असा आहे की, हे सर्व दृश्यमान स्थूल जगत् प्रत्यक्षात केवळ शून्याचेच विवर्त अर्थात् रूपांतर आहे. शून्याशिवाय अन्य कोणत्याही बाह्य पदार्थाची अथवा ज्ञानाची स्वतःची कोणतीही सत्ता नाही किंवा कोणतेही अस्तित्व माही.

**न सन् नासन् न सदसन्न चाप्यनुभवात्मकम्।**
**चतुष्कोटिविनिर्मुक्तं तत्त्वं माध्यमिका विदुः।।**

**(भारतीय दर्शन पृष्ठ ५६३)**

शून्याचे स्वरूप हे सत् नाही, व असत् नाही, सद्सत् नाही आणि सदसताहून भिन्न नाही. शून्याचे स्वरूप हे या सर्वाहून भिन्न आहे. जेथे या चारांपैकी कोणीही नाही तेथेच यथार्थ शून्य असते. हे शून्य हेच अन्यथा न होणारे वास्तविक आणि प्रमाणांनी परिपुष्ट यथार्थ असे पारमार्थिक सत्य आहे, तर बाकी जगत् हे संवृती अर्थात् केवळ व्यवहाराने बोलके व ऐकले जाणारे यथार्थ सत्य आहे. प्रत्येक प्रकारचा स्वभाव व प्रत्येक

साक्षात्कार करून घेत विस्मयावस्थेत अर्थात् आश्चर्य करीत राहत असतो तो साधक या तिरस्काराने पूर्ण आणि कुत्सित अर्थात् दूषित आवागमनामध्ये अर्थात् जन्म-मृत्यूच्या येरझाऱ्यामध्ये पडणे कसे शक्य आहे?।।११।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

शक्तिपातयोगाचा अभ्यास सुरू झाला की, हळूहळू जडता दूर होत जाऊन चैतन्यशक्तीचा विकास होत जातो. त्यामुळे साधकाला आपल्या एकट्याच्या स्वरूपाच्या ठिकाणीच नव्हे; तर जेवढे देहधारी आहेत त्यांच्या ठिकाणी सर्व अवस्थेत व सर्व काळी चैतन्यस्वरूप असा मीच व्यापून आहे अशी जागृती उत्पन्न होते. ही जागृती अखंड ठेवली की, तर्कज्ञानाने व उत्पत्तीच्या दरेक क्षणी मी स्वतः स्वतंत्र परमेश्वर आहे हीच स्थिती विस्मित म्हणजे विस्तृत होते. या अत्यंत आनंदाच्या स्थितीमध्ये साधक सतत राहू लागला की, त्याच्या जननमरणाला कारण होणाऱ्या देहभावाचा नाश होऊन तो सर्व संसार बंधनापासून मुक्त होतो. वरील विस्तृत अवस्थेमध्ये साधकाची इच्छाशक्ती नष्ट होत असल्यामुळे तो आत्मस्थितीमध्ये स्थित राहतो. यासाठीच "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये "**ममात्मा सर्वभूतात्मा**" या उक्तीनुरूप सावध असावे म्हणून सांगितले आहे.

अशा प्रकारे साधक शुद्ध आत्मस्वभावाला म्हणजे अधिष्ठातृभावाने आपल्या स्वतःला स्वयंप्रकाश चिद्रूपाने सर्वव्यापक रूपामध्ये पाहतो. तो हसत-खेळत व विस्मयाविष्ट होऊन एखाद्या उमलत्या फुलाप्रमाणे आनंदात राहतो. अविद्येचा विलय झाल्या कारणाने त्याच्या लेखी हा क्षुब्ध संसार असतोच कोठे? साधक योग्याची ही एक अत्यंत उच्च भूमिका आहे. द्रष्टारूपाने सर्वांची अनुभूती घेणे हीच त्याची दृष्टी नसते. "**इष्टोपदेश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**यदिदं दृश्यते दृष्ट्या ग्रहं पुत्राऽत्र सन्त्यज।**
**येन पश्यसि तं पश्य यं दृष्ट्वा पश्यसेऽखिलम्।।**

"बेटा! तुझ्या दृष्टीला हे जे काही दिसते आहे त्याचा आग्रह सोडून दे. ज्याच्यामुळे तू पाहू शकतोस त्याला पाहा. त्याला पाहिल्यावर तू सर्व काही पाहिल्यासारखेच आहे." एकदा ही स्थिती प्राप्त झाली की, विकल्पाच्या जाळ्यात सापडून साधक कुमार्गावरून जात नाही. त्याची सदासर्वदा

आपल्या स्वरूपातच स्थिती म्हणजे राहणे होते. या स्थितीलाच सत्यसंकल्प ईश्वर म्हणतात. अभ्यास व भावनेमुळे सर्व दु:ख दूर होते. रसायनाच्या आस्वादनाशिवाय केवळ त्याच्या ज्ञानानेच ते सिद्धी देते. खरी गोष्ट अशी आहे की, हे प्रभो ! आपल्याला गुराखी, लहान मुले व स्त्रियासुद्धा जाणतात. परंतु साधन किंवा युक्ती प्राप्त झालेली नसल्याने आपण त्यांना मुक्त करीत नाही. गाईच्या कासेत दूध आहे हे माहीत असले तरी त्यामुळे भूक थांबत नाही. ज्यावेळी दूध पिण्यास मिळते तेव्हाच खरी भूक शमन होते. पुढील दोन श्लोकांत अभावचिंतनाचा उपदेश करणाऱ्या शून्यवाद्यांचे खंडन केले आहे. ।।११।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

अशा प्रकारे स्वस्वभावाचे म्हणजे आत्म्याच्या (स्वस्य) स्वरूपाचे (स्वभाव:) विवेचन केल्यावर त्याच्या जाणिवेचे फळ काय हे सांगतात.

**स्पष्टीकरण :-** वरील दहाव्या कारिकात वर्णिलेला स्वस्वभाव याचेच सर्व व्यक्तीत, सर्व अवस्थांत, सर्व काळी, सर्व स्थळी, व्यापकतेने व निरपेक्षपणे अधिष्ठान असते. या सत्याची जाणीव ज्याला होते त्याची स्थिती संसारी जीवाच्या स्थितीहून अगदी वेगळीच असते. आजवर लक्षात न आलेले आपले स्वभावभूत परमज्ञातृत्व व कर्तृत्व यांची आज आपल्याला ओळख पटली, आजवर आपण कसे परिमित प्रमातृत्वालाच कवटाळून बसलो होतो, या नव्या जाणिवेने जणू तो विस्मित झाल्यासारखा होतो. या अवस्थेत त्याला वेद्यवेदक भाव जाणवत नाही. मनातील क्षोभ नाहीसा झाल्याने या चमत्काराबरोबरच त्याला प्रसन्नताही येते. ।।११।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## संसारभावाची शांती

सूत्रकाराने आत्तापर्यंतच्या सूत्रामध्ये दृढ उपपत्तीच्या अर्थात् सिद्धान्तांच्या द्वारा स्पंदतत्त्वाचे प्रतिपादन केलेले आहे. आता वरील सूत्रामध्ये असे समजाविले जात आहे किंवा उपदेश केला जात आहे की, हळूहळू अभ्यासाची दृढता प्राप्त झाल्यावर योग्याला स्वत:मध्येच त्या स्पंदशक्तीची अनुभूती होत असते. नंतर त्या भावावर स्थिरता प्राप्त करून घेतल्यावर

त्या योग्याची जघन अर्थात् कनिष्ठ तसेच घृणित अर्थात् घृणेस पात्र असलेल्या पशुयोनीत भटकत राहण्यापासून सुटका होत असते.

**वृत्ती :-** अशा प्रकारे यापूर्वी सांगितलेल्या प्रकारावरून ज्यावेळी ही गोष्ट सिद्ध होते की, आत्मस्वभाव अर्थात् सामान्य स्पंदतत्त्व हे विश्वाच्या प्रत्येक पदार्थामध्ये अनुस्यूत किंवा अंतर्भूत आहे आणि हे स्पंदतत्त्व प्रत्येक प्रकारच्या सामर्थ्याने युक्त आहे त्यावेळी जो कोणीही योगी त्याच स्वभावाच्या अधिष्ठात्याच्या रूपामध्ये अर्थात् सर्वव्यापक रूपामध्ये ते तत्त्व अनुभवीत तो विस्मयाच्या अवस्थेत अर्थात् आश्चर्यावस्थेत राहतो. अशा योग्याची कुत्सा अर्थात् जघन्यतेपासून पूर्ण सृती अर्थात् आवागमनापासून म्हणजे संसारचक्रात किंवा जन्ममरणचक्रपरंपरेपासून सुटका होते अर्थात् त्याची कटकट राहत नाही.।।११।।

**विवरण :-** तुर्यावस्थेलाच दुसऱ्या शब्दामध्ये "शाक्तभूमिका" असे म्हणतात. शाक्तभूमिकेवर आरूढ होण्यास इच्छुक असलेला योगी हा संसारामधील सर्व कार्यकलाप करीत करीतच या जगतामधील तुच्छातितुच्छ पदार्थामध्येही स्वभावरूप अशा स्पंदरूपतेचा प्रसार तसेच विकास यांचा अनुभव घेण्याचा निरंतर अभ्यास करीत राहतो. हळूहळू अभ्यासाची परिपक्वता, शास्त्रांचे गंभीर अर्थात् सखोल अध्ययन, श्रीपरमेश्वरांचा अनुग्रह आणि श्रीसद्गुरूंचा कृपाकटाक्ष यामुळे योग्याच्या भावना तुच्छ शरीर इत्यादींवर आत्माभिमान ठेवण्याच्या संकुचित कक्षेतून बाहेर पडतात. योग्याच्या या कक्षेतून बाहेर पडलेल्या भावना विश्वात्मभाव अथवा पूर्ण "अहं विमर्श" भावावर अर्थात् संपूर्ण विश्व हे आत्मस्वरूप असून ते आपणच आहोत या भावावर आरूढ होत असतात. या अवस्थेमध्ये त्या योग्याच्या चिद्रूपतेवरील मायीय अर्थात् मायेचे घन आवरण स्वतःच बाजूला होत असते. चतुर्दिक् अर्थात् चारही दिशांमध्ये चित्प्रकाशाच्या किरणजालाचा स्वर्णिम अर्थात् सुवर्णाप्रमाणे तसेच शाश्वत स्वरूपाचा आलोक अर्थात् प्रकाश सर्वत्र पसरत असतो. अशा योग्याचा आत्मा हा शरीरात राहत असतानाही तुर्यावस्थेचा साक्षात्कार करून घेत असतो. त्या योग्यासाठी चिरंतन सत्याचे रुद्ध किंवा लावलेले दरवाजे अचानक उघडतात. असा योगी भैरव भूमिकेवर आरूढ होण्याला अधिकारी बनत असतो. या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की -

**योगी स्वच्छन्दयोगेन स्वच्छन्दगतिचारिणा।**
**स स्वच्छन्दपदे युक्तः स्वच्छन्दसमतां व्रजेत्।।**
**।। स्वच्छन्दतंत्र ७.६०।।**

**अर्थ :-** योगी स्वच्छंदाच्या योगाने स्वच्छंद अर्थात् स्वतंत्र गतीने युक्त होऊन स्वच्छंदाच्या ठिकाणी युक्त होतो आणि स्वच्छंदाची प्राप्ती करून घेतो. तो स्वच्छंद झालेला योगी नेहमीच स्वच्छंद अर्थात् मन-मोकळेपणाने आणि स्वतंत्रपणे विचरण करतो.

याचा अर्थ असा आहे की, असा साधक निरंतर अभ्यास केल्यानंतर चारही बाजूंना आपल्याच स्वातंत्र्यशक्तीच्या विकासाचा अनुभव घेत असतो. असा साधक योगी तुरीयादशारूप स्वच्छंद भूमिकेच्या क्षेत्रामध्ये प्रवेश प्राप्त करून घेत असतो. योगी हा प्रत्येक स्थान आणि प्रत्येक अवस्था यांवर आपल्याच चिद्रूपतेच्या अधिष्ठातृतेचा अर्थात् वास्तविक किंवा मौल्यवान व्यापकतेचा यथार्थ अनुभव घेत असतो. यामुळे अशा योग्याला विश्वाची लाट एखाद्या जलाशयावर उठणाऱ्या तरंगाप्रमाणे, आगीच्या वर येणाऱ्या ज्वालाप्रमाणे अथवा सूर्यमंडलापासून निघालेल्या प्रकाशपुंजाप्रमाणे स्वरूपाच्याच बहिर्मुख विकासाच्या रूपामध्ये प्रतीत होत असते. या प्रकारच्या यौगिक अनुभूतीच्या स्तराला शास्त्रीय शब्दामध्ये "तुरीया दशा" किंवा शाक्तभूमिकेमध्ये प्रविष्ट होण्याची भूमिका असे म्हटले जाते.

या शाक्तभूमिकेचा साक्षात्कार झाल्यानंतर साधकामध्ये जसजशी या भावावर स्थिर राहण्याच्या क्षमतेमध्ये उत्तरोत्तर वृद्धी होत जाते तसतसे साधकाला अशा अनेक लोकोत्तर यौगिक भूमिकांचा स्वतः अनुभव येऊ लागतो. या लोकोत्तर यौगिक भूमिका अंतिम तुर्यातीत अवस्थेवर शीघ्र आरूढ होण्याच्या पूर्वसूचनेच्या प्रतीक असतात. या दृष्टीने **"शिवसूत्र-विमर्शिनी"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की - **"ता एव योगस्य परतत्त्वैक्यस्य सम्बन्धिन्यो भूमिकाः। तदध्यारोहविश्रान्तिसूचिकाः परिमिता भूमयः।।१.१२।।** याचा अर्थ असा आहे की, (शक्तिपातयोगाचे साधन करताना साधकयोग्याला क्षणात स्तब्ध व क्षणात विकसित होणाऱ्या इंद्रियसमुदायाला पाहून आश्चर्य वाटते;) कारण साधकयोग्याची इंद्रिये आनंदरूप आत्मस्वरूपाविषयी अतृप्त असतात. या इंद्रियांच्या अतृप्तीतच परमतत्त्वैक्यासंबंधी भूमिका असतात. प्रत्यक्षात श्रीशैवगुरूंचे म्हणणे असे आहे की, तुरिया भूमिकेवर शाश्वत स्थिरता प्राप्त करून घेणे म्हणेजच

तुर्यातीत भूमिकेवर अर्थात् पूर्ण श्रीशिवभावावर आरूढ होणे असते.

या यौगिक भूमिकांनाच परमकारुणिक भगवान् श्रीचंद्रमौली यांनी "विस्मय" असे नाव दिलेले आहे. "विस्मय" या शब्दाचा उल्लेख प्रस्तुत सूत्रामध्ये "स्मयमानः" या शब्दाने केलेला आहे. शैवदर्शनामध्ये **"विस्मयो योगभूमिकाः।।१.१२।।"** अर्थात् (परमतत्त्वाशी ऐक्य दाखविणाऱ्या) योग्याच्या भूमिका अखंड आनंदयुक्त असूनही तृप्ती न होणाऱ्या अशा आश्चर्ययुक्त असतात. येथे आश्चर्याची अनिर्वाच्य अर्थात् शब्दांनी वर्णन करता न येणारी आणि स्वस्वंवेद्य अर्थात् केवळ स्वतःच स्वतःला जाणता येणारी अशी अनुभूती असा "विस्मय" या शब्दाचा अर्थ केलेला आहे. योग्याला शाक्तभूमिकेचा साक्षात्कार होताच त्या शाक्तभूमिकेविषयी एक प्रकारची अतृप्ती उत्पन्न होत असते. याचा परिणाम म्हणून योगी पुनःपुन्हा अंतर्मुख होऊन त्या आनंदसागरामध्ये बुड्या मारू लागतो. अशा वेळी त्या योग्याच्या अंतःकरणामध्ये एका विशेष प्रकारच्या आश्चर्याची अशी अवस्था उदीत होत असते. ती अवस्था त्या योग्याला वारंवार अंतर्मुख होण्याकडे आकर्षित करीत असते. शैवमान्यतेनुसार ही विस्मयात्मक योगभूमिका साक्षात् तुर्यारूप आणि नित्य नव नव चमत्कारमयी असल्यामुळे सर्वात उत्कृष्ट आणि केवळ स्वतःच्या अनुभवाने गम्य होणारी अशी आहे. परंतु अणिमा इत्यादि दुसऱ्या प्रकारच्या यौगिक भूमिका यापेक्षा खालील अर्थात् कनिष्ठ स्तराच्या आणि परसंवेद्य अर्थात् दुसऱ्या गोष्टीच्या आधारामुळे जाणता येणाऱ्या आहेत. या दृष्टीने श्रीवरदराज यांनी आपल्या **"शिवसूत्रवार्तिक"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की -

**यथा सातिशयानन्दे कस्यचिद्विस्मयो भवेत्।।६३।।**
**तथास्य योगिनो नित्यं तत्तद्वेद्यावलोकने।**
**निःसामान्यपरानन्दानुभूतिस्तिमितेन्द्रिये।।६४।।**
**परे स्वात्मन्यतृप्त्यैव यदाश्चर्यं हि विस्मयः।।६५।।**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे एखाद्याला अत्यानंद झाल्यावर आश्चर्य वाटते त्याप्रमाणे साधकयोग्याला वेद्याच्या नित्य विभिन्न अनुभूती येऊन परमानंद होऊन त्याची इंद्रिये स्तब्ध होतात. असे झाले म्हणजे साधकयोग्याला स्वतःच्या ठिकाणीच अतृप्तीमुळे जे आश्चर्य वाटते तोच विस्मय किंवा निरभिमानावस्था होय.

दैनंदिन देवाण-घेवाणीमध्ये जेव्हा एखादा मनुष्य एखाद्या विशेष अतिशयाने युक्त अशा वस्तूचा साक्षात्कार करून घेत असतो तेव्हा त्याच्या मनामध्ये एक प्रकारच्या विचित्र तसेच स्तंभकारिणी वृत्तीचा उदय होत असतो. त्यावेळी तो मनुष्य त्या वस्तूच्या अन्य वस्तुहून विशिष्ट अशा आकार-प्रकाराला कुतूहलपूर्ण नेत्रांनी पाहूनही वाणीच्या द्वारा काही अभिव्यक्त करू शकत नाही. त्यावेळी त्या योग्याची अंतर्चेतना त्याच वस्तूच्या अनन्य एवं अद्भुत सौंदर्याचा आंतरिक रूपामध्ये आनंद घेत एका अकथनीय अशा अवस्थेमध्ये बुडून जाते. या अवस्थेलाच "विस्मय" किंवा "आश्चर्यमानता" असे म्हणतात. बरोबर त्याच प्रकाराने स्वात्मनिष्ठ साधकालाही वारंवार शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या वेद्यपंचकाच्या अर्थात् ज्ञेयपंचकाच्या सामान्य स्पंदमयी अहंतेमध्ये विश्रांत होण्याच्या काळी अनिर्वाच्य अतिशयतेने युक्त आणि नवनवीन चमत्कारांनी अर्थात् चैतन्य रसाच्या अलौकिक आस्वादाने पूर्ण स्वरूप-समावेशाचा उदय होत असतो. त्यावेळी त्या योगी-साधकाने अंतरामध्ये अर्थात् अंतःकरणामध्ये स्वरूपभूत करणेश्वरीचक्राच्या विकसित वैभवाची अनुभूती प्राप्त करून घेतली असता एखादी अपूर्व व विशिष्ट अशी आंतरिक अवस्था उत्पन्न होत असते. योगिसाधक वारंवार त्या स्वरूप समावेशमय आनंदाचा अतृप्तरूपामध्ये अनुभव करीत आश्चर्यमानतेने परिपूर्ण होत असतो. (**शिवसूत्रविमर्शिनी १.१२ पाहावे.**) या आश्चर्यमानतेच्या प्रारंभिक रूपाला शास्त्रीय शब्दामध्ये "साश्चर्यस्पंदरूपता" असे म्हणतात. या अवस्थेचा उदय झाल्यावर असा साधक विकल्पहीन अर्थात् संशयरहित तुर्यातीत दशेवर प्रतिष्ठित होण्याची क्षमता प्राप्त करून घेत असतो. या अवस्थेचे उदीत होणे या गोष्टीचे सूचक आहे की, अशा योगीश्वराचा आत्मा हा पंचकंचुकांच्या अर्थात् पंचआवरणांच्या सीमांना ओलांडून भेदरहित विश्वात्मभावाच्या उन्मुक्त आकाशामध्ये विचरण करू लागला आहे किंवा फिरू लागला आहे. अशा योगीश्वराचा आत्मा आपल्याच चिन्मात्ररूपाला सर्वत्र उपलब्ध अर्थात् व्यापून असणारा किंवा अधिष्ठाता यांच्या रूपामध्ये अनुभवू लागला आहे. असा मुक्तात्मा कधीही आवागमनाच्या अर्थात् येरझाऱ्यांच्या बंधनामध्ये फसण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. याचे कारण असे आहे की, एकदा पिंजऱ्याचे दार उघडल्यावर उन्मुक्त होण्यासाठी अनेक युगे तडफडणारा पक्षी उडून शून्यामध्ये मिळून गेला किंवा हरवून

गेला असता तो पक्षी येऊन पुन्हा त्या पिंजऱ्यात बंदी किंवा कैदी बनून राहील अशी कल्पना करणे व्यर्थ आहे.

वर असे म्हटलेले आहे की, तुर्यावस्थेमध्ये पोहोचलेला योगी वारंवार त्या आनंदाचा अनुभव करून घेण्यासाठी अंतर्मुख होत असतो. यावेळी अंतर्मुख होण्याच्या अवस्थेला "क्रममुद्रा" असे म्हणतात. या बरोबरच या अवस्थेला दर्शविणारे "भैरवमुद्रा," स्वरूप समावेश, "शांभव समावेश" इत्यादि अनेक शास्त्रीय शब्द आलेले आहेत. नित्य उदय पावणाऱ्या समाधीला "क्रममुद्रा" असे म्हणतात. **क्रममुद्रया अन्तःस्वरूपया बहिर्मुखः समाविष्टो भवति साधकः।। प्रत्यभिज्ञाहृदयसूत्र १९।।** याचा अर्थ असा आहे की, साधक बहिर्मुख होत असला तरी अंतःस्वरूप क्रममुद्रेच्या द्वारा तो समावेश प्राप्त करून घेतो. या अवस्थेमध्ये साधक अंतर्मुख अवस्थेव्यतिरिक्त बहिर्मुख अवस्थेमध्येही चिद्रूपामध्ये समाविष्ट होत असतो. याचाच अर्थ असा आहे की, क्रममुद्रा ही समाधीची अशी परिपक्व अवस्था आहे की, ज्यात साधक स्वरूप समावेशाच्या बळाने सहजच बहिर्मुखतेमधून अंतर्मुखतेमध्ये आणि अंतर्मुखतेमधून बहिर्मुखतेमध्ये विद्युत्गतीने प्रवेश करू शकतो. असे करताना त्या साधकाला कोणताही प्रयत्न करावा लागत नाही; कारण निरंतर अभ्यासामुळे हा त्या साधकाचा स्वभावच बनून जातो. या दृष्टीने "**प्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**तत्रादौ बाह्यात् अन्तःप्रवेशः अभ्यन्तरात् बाह्यस्वरूपे प्रवेशः आवेशवशात् जायत इति सबाह्याभ्यन्तरोऽयं मुद्राक्रमः।।१९।।**

याचा अर्थ असा आहे की, या स्थितीत आवेशामुळे (साधकयोग्याचा) प्रथम बाहेरून आंतरस्थितीमध्ये व त्यानंतर आंतरस्थितीमधून बाह्यरूपात प्रवेश होतो. अशा प्रकारे हा मुद्राक्रम बाह्य आणि आभ्यंतर अशा (दोन्ही स्वरूपांनी) युक्त आहे.

मात्र अपरिपक्व समाधीमध्ये समाधिकालापर्यंतच स्वरूपाची अनुभूती राहत असते. परंतु "क्रममुद्रा" या समाधीच्या अवस्थेमध्ये असा कोणताही प्रतिबंध राहत नाही. या कारणामुळेच सिद्ध पुरुषांनी अशा समाधीला "सबाह्याभ्यन्तरसमावेश" असे नाव दिलेले आहे. या दृष्टीने सिद्धगुरू श्रीक्षेमराज यांनी "**प्रत्यभिज्ञाहृदयसूत्र।।१९।।**" यावरील आपल्या टीकेत असे म्हटले आहे की -

**"आसदितसमावेशो योगिवरो व्युत्थाने अपि समाधिरससंस्कारेण क्षीब इव सानन्दं घूर्णमानो भावराशिं शरदभ्रलवं इव चिद्गगन एव लीयमानं पश्यन् भूयो भूयः अन्तर्मुखतामेव समवलम्बमानो निमीलन-समाधिक्रमेण चिदैक्यमेव विमृशन् व्युत्थानाभिमतावसरेऽपि समाध्येक-रस एव भवति।।१९।।"**

याचा अर्थ असा आहे की, समावेश अर्थात् सामरस्यावस्था प्राप्त करून घेतल्यानंतर सिद्धयोगी व्युत्थानदशेमध्येही आनंदाच्या संस्कारामुळे एखाद्या मदोन्मत्त व्यक्तीप्रमाणे अडखळताना, चिद्रूपी आकाशात शरद्ऋतूत पसरलेल्या निरनिराळ्या ढगांप्रमाणे आपल्या विविध भावनांना पाहताना, वारंवार विवेकाचा आश्रय घेताना आणि निमीलन समाधीच्या द्वारा चित् अर्थात् चैतन्याबरोबर आपल्या तादात्म्याचा अनुभव घेताना व्युत्थान स्थितीमध्येसुद्धा समाधीच्या आनंदाची अनुभूती घेत राहतो. श्रीगुरूंचे म्हणणे असे आहे की, या अवस्थेवर पोहोचलेला साधक हा व्युत्थानदशेमध्येही अर्थात् संसारातील सर्व कार्ये करीत असतानाही त्याच समाधिकालीन संस्कारांच्या द्वारा प्रत्येक वेद्यपदार्थामध्ये किंवा ज्ञेयपदार्थामध्ये केवळ चिन्मयतेच्याच आभासाला प्राप्त केल्यामुळे स्वरूपनिष्ठच अर्थात् असा स्वरूपमग्न योगीच आपल्या स्वस्वरूपामध्ये स्थित असतो. अशा साधकाला सर्व भाववर्ग शरत्कालाच्या मेघखंडाप्रमाणे अर्थात् ढगांप्रमाणे चिदाकाशा-मध्येच लीन होताना प्रतीत होत असतो. फलस्वरूप असा योगी आता अंतर्मुख असतो तर आता बहिर्मुख असतो.

या द्विमुखी समाधिक्रमाला शास्त्रकारांनी पुढीलप्रकारे अभिव्यक्त करताना असे म्हटले आहे की, "शाक्त भूमिकेवर पोहोचलेला योगी निमीलन अर्थात् निर्विकल्प समाधीच्या द्वारा बाहेरील इदंतारूप अर्थात् विश्वरूप भाववर्गाला सामान्यस्पंदामध्येच विश्रांत करीत पराचित् अर्थात् श्रेष्ठ अशा चैतन्य भूमिकेमध्ये प्रवेश करीत असतो. हा योगी तेथे स्वरूपाचा साक्षात्कार करून घेऊन उन्मीलन समाधीच्या द्वारा अहंतेमध्ये अर्थात् स्वतःमध्ये विश्रांत केलेल्या भाववर्गाला बाहेर वमन करीत असतानाही अर्थात् त्यांचा त्याग करून देतानाही इदंतेच्या अर्थात् विश्वरूपतेच्या क्षेत्रामध्ये प्रवेश करीत असतो. या अंतःप्रवेश आणि बहिःनिर्गमन यांच्या प्रक्रियेमध्ये ही गोष्ट विशेष रूपाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, अशा पदावर पोहोचलेल्या योग्याला दोन्ही अवस्थांमध्ये स्वरूपभूत सामान्य स्पंदात्मकतेचाच

प्रकारचे लक्षण इत्यादींहून भिन्न असल्यामुळे शून्यावस्था ही अनिर्वाच्य अर्थात् वाणीने बोलण्यास कठीण अशी आहे. मात्र या शून्यावस्थेपर्यंत पोहोचणे हेच सर्व साधनेचे अंतिम लक्ष्य आहे. या सर्वशून्य भावाच्या अनुभूतीलाच बौद्धशब्दामध्ये "निर्वाण" अशी संज्ञा दिलेली आहे. महाप्रज्ञेच्या अर्थात् महान् अशा बुद्धीच्या साहाय्यानेच अशा "निर्वाणपदाची" प्राप्ती करून घेणे शक्य असते. निर्वाणपदाची प्राप्ती करून घेतल्यावर पूर्णपणे क्लेशांचा किंवा दुःखांचा क्षय होत असतो. प्रसिद्ध बौद्धदार्शनिक आणि कवी श्रीअश्वघोष यांनी या सर्वशून्यरूप निर्वाणालाच "शांती" असे नाव दिलेले आहे. श्रीअश्वघोषांच्या मतानुसार -

**दीपो यथा निर्वृतिमभ्युपेतो नैवावनिं गच्छति नान्तरिक्षम्।**
**दिशं न कांश्चित् विदिशं न कांश्चित् स्नेहक्षयात्केवलमेति शान्तिम्।।**
**योगी तथा निर्वृतिमभ्युपेतो नैवावनिं गच्छति नान्तरिक्षम्।**
**दिशं न कांश्चित् विदिशं न कांश्चित् क्लेशक्षयात्केवलमेति शान्तम्।।**
**।। सौन्दरानन्द १६.२८-२९।।**

**अर्थ** :- ज्याप्रमाणे दिव्याची ज्योत विझल्यावर ती भूमीमध्ये, आकाशामध्ये, कोणत्याही दिशेला किंवा कोणत्याही विदिशेमध्ये म्हणजे दोन दिशांच्या मध्यवर्ती बिंदूत जाऊ शकत नाही; मात्र दिव्यामधील तेलाचा क्षय झाल्यावर केवळ शांती होत असते त्याचप्रमाणे योग्याचा आत्मा निवृत्तिस्थानी पोहोचल्यावर भूमीमध्ये, आकाशामध्ये कोणत्याही दिशेमध्ये किंवा कोणत्याही विदिशेमध्ये जाऊ शकत नाही; मात्र योग्याचा आत्मा सर्व दुःखांचा क्षय झाल्यामुळे केवळ शांतीच्या अवस्थेमध्ये लय होऊन जातो.

शैवसिद्धान्ताला मनामध्ये ठेऊन या दोन्ही मतवाद्यांच्या विचारांचे अनुशीलन केले असता मस्तकामध्ये अनेक गोष्टींसंबंधीचे विचार सहजपणे निर्माण होत असतात.

अभावब्रह्मवादाच्यानुसार जर आत्म्याचे वास्तविक स्वरूप अभाव मानून त्यापासून कोणत्याही प्रकारच्या सत्तेच्या अनस्तित्वाचा सिद्धान्त स्वीकारला असता एक अडथळा निर्माण होऊ शकतो. तो अडथळा असा किंवा ती अडचण अशी की, अभावावस्थेमध्ये कोणत्याही प्रकारच्या वेदकसत्तेचा किंवा ज्ञानक्रियात्मक अनुभविता अर्थात् अनुभव घेणारा

कर्ता याचे अस्तित्व शिल्लक न राहिल्यामुळे त्या अभावदशेचा अनुभव कोण घेऊ शकतो? त्याबरोबरच अभाव या शब्दाचा अर्थ पदार्थाची असत्ता असा असल्यास अशा अभावापासून भावरूप जगताचा उदय कसा होऊ शकतो? कारण असत्पासून सत्ची उत्पत्ती होणे शक्य नाही आणि अशी कल्पना करणे हेही तर्कसंगत नाही. जर **"नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।। श्रीमद्भगवद्गीता २.१७।।** यानुसार असे मानले की भावरूपतेला जन्म देणे आणि पुन्हा त्याचा अभावसत्तेमध्ये लय करणे हाच अभावाचा स्वभाव आहे तर अशा स्वभावाच्या विद्यमानतेमध्ये त्याला सर्वाभाव कसे मानले जाऊ शकते? याचा परिणाम म्हणून प्रथम अभावाचे रूप स्पष्ट होऊ शकत नाही.

अभावसमाधीचा उपदेश देणाऱ्या श्रीगुरूंचे म्हणणे असे आहे की, जोपर्यंत आत्मा हा स्वतः अभावरूप बनत नाही तोपर्यंत साधक शिष्याने अभावाची भावना अर्थात् मी नाही आहे, मी नाही आहे अशा प्रकारच्या भावनेचा अभ्यास करीत राहावे. या विषयामध्ये ही गोष्ट विचारणीय आहे अर्थात् या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे की, भावनेचा विषय केवळ अशीच गोष्ट बनू शकतो की, ज्या वस्तूची अखंडित सत्ता विद्यमान असते तीच वस्तू केवळ भावनेचा विषय बनू शकते. अभाव हा प्रत्येक भाव अर्थात् सत्ता यांचे अनस्तित्व आहे. अर्थात् प्रत्येक भाव अर्थात् सत्ता यांचे अस्तित्व नसणे यालाच अभाव असे म्हणतात. असे असताना अभाव हा भावनेचा विषय कसा बनू शकतो? **"भावनाया भाव्यवस्तुविषयत्वादभावस्य न किञ्चित्वाद् भाव्यमानतायां वा किञ्चित्वे सत्याभावत्वाभावात्।। स्पंदनिर्णय १.१२।।"** याचा अर्थ असा आहे की, भाव्य (अस्तित्वात असणाऱ्या) वस्तूच भावनांचे विषय होत असतात. अभाव वास्तविक पाहता काहीही नसतो. जर अभावाला अस्तित्व द्यावयाचे ठरले तर तो अभाव म्हणजे "किंचित्" (काहीतरी अस्तित्वात असण्याजोगा) मानावा लागेल व त्यामुळे अभावाचाच अभाव होईल.

दुसऱ्या पक्षामध्ये जर अभाव ही प्रत्यक्षात वास्तवामध्ये कोणतेही भाव्य अर्थात् भावनेचा विषय असलेली अशी वस्तूच आहे तर अभावाचाही अभाव झाल्यामुळे स्वयं सत्ता बनत असते. विशेष गोष्ट अशी आहे की, अभावभावनेचा उपदेश देणारे श्रीगुरू आणि त्यांनी दिलेला उपदेश ग्रहण करणारा शिष्य या दोघांनाही या गोष्टीची पूर्ण चेतना किंवा जाणीव असते

की, आपली सत्ता विद्यमान आहे. आपण चेतन आहोत. आपल्यामध्ये ज्ञानक्रियारूप वेदकता अर्थात् ज्ञाता भाव विद्यमान आहे. परंतु श्रीगुरु-शिष्यांना "मी नाही आहे" अशी भावना करून आपल्याच अस्तित्वाचा आपणच नाश किंवा अपलाप करावा लागतो. फलस्वरूप श्रीगुरुशिष्यासाठी **"अन्धेनैव नीयमाना यथान्धाः।"** म्हणजे एका अंधळ्याने दुसऱ्या अंधळ्याला मार्गदर्शन करणे ही गोष्ट चरितार्थ अर्थात् सार्थ करावी लागते. आपल्या सत्तेचा नाशही करता येत नाही आणि तिचा स्वीकारही करता येत नाही.

अभाववादी अर्थात् अभाव मतवादी लोक असा दावा करीत असतात की, अभावसमाधीमध्ये सर्वांचा अभावरूप विश्वोच्छेद अर्थात् विश्वाचा नाश हाच भावनेचा विषय बनत असतो. **"किं च भावकस्यापि यत्राभावः स विश्वोच्छेदः कथं भावनीयः, भावकाभ्युपगमे तु न विश्वोच्छेदो भावकस्यावशिष्यमानत्वात्।। स्पंदनिर्णय १.१२।।"** यानुसार या विषयामध्ये ही गोष्ट विचारणीय आहे की, जर विश्वोच्छेद अर्थात् विश्वाचा उच्छेद याचा अर्थ प्रत्येक सत्तेचा अभाव असा आहे; तर त्यामुळे अनुभवित्याचा अर्थात् अनुभव घेणाऱ्या कर्त्याचाही उच्छेद किंवा नाश झाल्याने त्या विश्वोच्छेदाचा अर्थात् विश्वनाशाचा अनुभव कोण घेणार? विश्वोच्छेद अवस्थेचा अनुभव करताक्षणीच तत्काळ अनुभव घेणाऱ्याचाही उच्छेद किंवा नाश होत असतो. विश्वोच्छेदामध्ये अनुभव घेणारा हा अनुभविता किंवा ज्ञाता पुरुष हा अपवाद असू शकत नाही. आता जर असे मानले की, विश्वाचा उच्छेद किंवा नाश झाल्यानंतरही अनुभव घेणाऱ्याचा उच्छेद होत नाही तर विश्वोच्छेदाची कल्पना वंध्येच्या पुत्राप्रमाणेच असंभव होत असते. याबरोबरच या विषयामध्ये आणखी एक अडचण उपस्थित होत असते. ती अडचण किंवा शंका अशी की, विश्वोच्छेदाची कल्पना करताना भावनेचाही उच्छेद होणे हे आवश्यक मानावे लागेल. भावनेचा उच्छेद किंवा नाश होतो हे मानल्यानंतरही विश्वोच्छेदाची किंवा विश्वनाशाची कल्पना पूर्ण होऊ शकत नाही; कारण येथे स्वतः उच्छेदाची कल्पना अवशिष्ट किंवा शिल्लक राहत असते. त्यानंतर जर उच्छेदाच्या अर्थात् नाशाच्या कल्पनेचा उच्छेद किंवा नाश केला तर त्या उच्छेदाच्या कल्पनेचा गोरखधंदा कधीही समाप्त होणार नाही. याचा परिणाम असा होईल की, सर्वाभाव अर्थात् सर्व गोष्टींचा अभाव हा कधीही सिद्धच

होणार नाही. अनुभवित्याची अर्थात् अनुभव घेणाऱ्या व्यक्तीची सत्ता ही कोणत्यातरी रूपामध्ये अवशिष्ट किंवा शिल्लक राहतच असते.

प्रस्तुत सूत्रामध्ये ग्रंथकाराने अभाव-समाधीच्या विषयामध्ये एका विशेष प्रकारच्या दोषाचा उल्लेख केलेला आहे. तो दोष असा की, अभावब्रह्मवादी लोक अभाव समाधीला ज्या रूपामध्ये स्वीकारीत असतात ती प्रत्यक्षात मूढता अर्थात् विशेष प्रकारची जडता ज्यामध्ये कोणत्याही प्रकारची संवेदना राहत नाही अशी समाधी अवस्था असून या समाधीचा अभ्यास करणारा योगी समाधीमधून बाहेर आल्यानंतर त्या समाधिकालीन अवस्थेचे स्मरण करीत असे म्हणू लागतो की, "मी प्रगाढ मूढतेच्या अवस्थेमध्ये पडून राहिलेलो होतो आणि माझी ती अवस्था आता उलटून गेलेली आहे." ज्या समाधीमध्ये स्वतःमध्ये आपल्या ज्ञानक्रियात्मक चैतन्याचा आभास राहत नाही ती समाधी यथार्थ समाधीची अवस्था नाही. या अवस्थेला मादक द्रव्यांचे सेवन करणाऱ्या व्यक्तीच्या नशेप्रमाणे मोहात्मक अर्थात् तामसिक अचेतन अवस्था असेच म्हणता येते. अशा अवस्थेमध्ये सर्वसामान्य प्राण्यांमध्ये आढळून येणारी तामसिक सुषुप्ती आणि योग्याची समाधी यामध्ये फरक काय आहे?

माध्यमिक लोकांच्या शून्यवादाच्या संबंधामध्ये जवळजवळ अशाच अडचणी उपस्थित होत असतात. या लोकांच्या शून्याचे स्वरूपही काही स्पष्ट झालेले नाही. शून्यवाद मानणारे माध्यमिक लोक एकीकडे कोणतीही वेदक किंवा ज्ञान करून घेणारी आत्मसत्ता स्वीकारण्याच्या पक्षामध्ये नाहीत तेच तर दुसरीकडे जोराजोरात निर्वाणाचा ढोल पिटत राहतात. जर आत्म्याचे कोठे अस्तित्वच नाही तर मग निर्वाण कोणाचे होणार? शरीर आदि जड पदार्थ निर्वाणाचा विषय बनू शकत नाहीत. कोणत्याही आत्मरूप वेदकसत्तेच्या अर्थात् ज्ञातासत्तेच्या अनस्तित्वाच्या अर्थात् अभावाच्या दशेमध्ये क्लेश कोणाला होणार? आणि त्याच्या क्षयासाठी संघर्ष करण्याचे प्रयोजन काय आहे? शेवटी शून्य ही कोणती आणि कशी वस्तू आहे? जर या शून्याचे रूप सर्वाभावाप्रमाणे अर्थात् सर्व गोष्टींच्या अभावाप्रमाणेच आहे तर या शून्याची अनुभूती आणि नामकरण कोणाच्या किंवा कशाच्या द्वारे आणि कसे संभव होऊ शकते?

या माध्यमिक लोकांच्या द्वारा वर्णिलेली निर्वाणाची परिभाषाही पूर्ण स्पष्ट नाही. या मतवादी लोकांनी "निर्वाणालाच" शांती असे नाव दिलेले

आहे. परंतु याच लोकांच्या मतानुसार निर्वाणाचे किंवा या शांतीचे रूप हे शून्य आहे. मग निर्वाण ही एखादी अशी अवस्था आहे की, ज्यामध्ये ज्ञातृता अर्थात् ज्ञान जिच्या साहाय्याने होते ती शक्ती अर्थात् ज्ञानशक्ती आणि कर्तृता अर्थात् क्रिया जिच्या साहाय्याने केली जाते ती शक्ती अर्थात् क्रियाशक्ती यांचा पूर्णपणे लोप होतो. असे असताना हे मत शैवांना अर्थात् शैवदर्शन मानणाऱ्या लोकांना मान्य नाही; कारण की, हे लोक अशा अवस्थेला जडतेच्या व्यतिरिक्त अन्य काही मानण्याच्या पक्षामध्ये नाहीत. शैवदार्शनिकांचे या विषयीचे जे मत आहे त्या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**मोक्षो हि नाम नैवान्यः स्वरूपप्रथनं हि सः ।**
**स्वरूपं चात्मनः संविन्नान्यत्तत्र तु याः पुनः ।।१.१५६।।**

याचा अर्थ असा आहे की, मोक्ष नावाचे कोणतेही दुसरे तत्त्व नाही. मोक्ष म्हणजे स्वरूपाचे प्रथन अर्थात् प्रकाशित होणे आहे. स्वरूप हे आत्मसंविन्मात्र आहे. या संविद्भिन्नरूपतेशिवाय मोक्षाचे दुसरे स्वरूप नाही.

यानुसार मोक्ष ही कोणतीही वेगळी अवस्था नाही तर स्वरूपख्याती अर्थात् स्वरूपांचे ज्ञान अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्य हाच मोक्ष आहे. जेव्हा आत्मा अख्यातीच्या अर्थात् अज्ञानाच्या किंवा अविद्येच्या सीमेतून बाहेर पडून आपल्या असीम अर्थात् अमर्यादित-अफाट अशा ज्ञातृतेची अर्थात् ज्ञानशक्तीची आणि असीम अशा कतृतेची अर्थात् क्रियाशक्तीची अनुभूती प्राप्त करून घेत असतो, तेव्हा या आत्म्याला "मुक्तात्मा" असे म्हणतात. ही गोष्ट स्पष्ट आहे की मुक्तात्म्याचे रूप जड नसून ज्ञान-क्रिया यावर स्वतंत्र अधिकार असणारे "पूर्ण चैतन्य" असे या आत्म्याचे स्वरूप आहे. या दृष्टीने "**तंत्रालोकविवेक**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की -

**"ते खलु सर्वभावनैः स्वाभाव्यवादिनः संविदोऽपि नैःस्वाभाव्यान्मिथ्यात्वमभिदधतस्तच्छून्यतायामेव मोक्षमाचक्षीरन्।।१.३३।।"**

याचा अर्थ असा आहे की, ते (माध्यमिक) सर्वभावनिःस्वभाववादी अर्थात् सर्व पदार्थ अस्तित्वात नाहीत असे मानणारे आहेत. संवित्लाही ते निःस्वभाव म्हणून मिथ्या म्हणजे शून्य म्हणतात. यावरून त्यांचा मोक्षही शून्यरूपच होतो.

सर्वाभावाच्या द्वारा निःस्वभाव उपलब्ध होतो. हा सिद्धान्त मानणारे हे बौद्ध लोक संविच्छक्तीतही निःस्वभावाची गोष्ट सांगत राहतात. निःस्वभावतेमुळे संविच्छक्ती खोटी आहे असे ते म्हणतात आणि शून्यताच मोक्ष आहे असे गर्जून सांगतात. यानुसार शून्यवादी दार्शनिक प्रत्येक प्रकारचे ज्ञान, ज्ञाता अर्थात् ज्ञान प्राप्त करून घेणारा पुरुष आणि ज्ञेयपदार्थ अर्थात् ज्याचे ज्ञान करून घेतले जाते तो पदार्थ यांची निःस्वभावता किंवा शून्यता यांचा स्वीकार करून ज्ञातृ-कर्तृरूप संवित्‌ला अर्थात् श्रीभगवंतांच्या शक्तीलाही निःस्वभाव किंवा शून्यस्वरूप मानतात. याचा परिणाम म्हणून किंवा निष्कर्ष असा की, या मतवादी लोकांच्या मतानुसार संवित्‌ची शून्यता किंवा शक्तीचा अभाव हेच खरे निर्वाण आहे. शैवदार्शनिकांचा या संबंधामध्ये एक भिन्न दृष्टिकोण आहे. शैवदार्शनिकांचा असा विश्वास आहे की, प्रत्यक्षात पूर्णज्ञातृता आणि पूर्णकर्तृतारूप स्पंद किंवा स्फुरण हे संवित्‌चे किंवा श्रीभगवंतांच्या शक्तीचे स्वरूप आहे. या स्पंदापासून किंवा स्फुरणेपासून सर्व नील, पीत आदि भावांचे अवभासन अर्थात् प्रकाशन आणि स्थिती संभव किंवा शक्य होऊ शकते. जर या विश्वात्मक स्फुरणालाच नाकारले तर सर्व विश्व हे प्रत्यक्षरूपामध्ये संज्ञी अर्थात् संवेदनाक्षम असूनही पूर्णपणे संज्ञाहीन अर्थात् जाणीवविरहित किंवा चेतनाहीन मानणे आवश्यक आहे. या दृष्टीने "**तंत्रालोकविवेक**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, "**संविदि तु स्फुरत्तामात्रसारायां मिथ्यात्वादसत्त्वमेव स्यात्, इति न किञ्चित्स्फुरेत्, इति मूर्च्छेव स्यात् इति। न च संविदः स्फुरत्तामात्रसाररूपाया अपह्नवः शक्यक्रिय इति ।।१.३३।।**" याचा अर्थ असा की, संविद्-शक्तीच महास्फुरणरूप आहे. जर या शक्तीला खोटे मानले तर अनस्तित्वाचे अर्थात् अस्तित्वच नसल्याचे संकट उत्पन्न होईल. त्या स्थितीत कशाचेही स्फुरण होणार नाही आणि अस्फुरण तर मूर्च्छा आहे. याकरिता शाश्वत स्पंदनमयी व श्रीपरमशिवाच्या प्रतिभारूपाच्या व विश्वहृदयाच्या महास्फुरणशालिनी सत्तेचा कधीही लोप होणे शक्य नाही. विश्वाची संज्ञाहीनता ही कदापिही आढळून येत नाही. यामुळे या स्फुरत्तारूप अर्थात् स्फुरण पावणाऱ्या संवित्‌चा किंवा शक्तीचा अपलाप किंवा नाश कदापिही केला जात नाही.

शून्यवादी बौद्ध लोकांचे प्रसिद्ध माध्यमिक आचार्य श्रीनागार्जुन यांची पुढील उक्ती प्रस्तुत केलेली आहे -

**सर्वालम्बनधर्मैश्च सर्वतत्त्वैरशेषतः।**
**सर्वक्लेशाशयैः शून्यं न शून्यं परमार्थतः।।**

या उक्तीच्या साहाय्याने शून्यवादी बौद्ध लोकांनी असा दावा केलेला आहे की, ज्या दशेला अन्य दार्शनिकांनी सर्वाभावाचे नाव देऊन कटू अशा टीकेचा विषय बनविलेले आहे त्या दशेला आम्ही आमच्या "शून्य" या अवस्थेचे नाव दिलेले नाही. आमचे शून्य हे एक निरपेक्ष अर्थात् कशाचीही अपेक्षा न करणारे परमतत्त्व आहे. या शून्यामध्ये सर्व कल्पित अवलंबन धर्मी अर्थात् संपूर्ण तत्त्व आणि सर्व क्लेशात्मक वासनांची शून्यता होते किंवा वासनांचा अभाव होत असतो. प्रत्यक्षात सर्वाभाव हे या शून्यतत्त्वाचे स्वरूप नाही. शून्यतत्त्व ही चतुष्कोटींची अर्थात् चारकोटींची अविषय, मन-वाणी यांनी अगोचर व अनिर्वचनीय अशी अवस्था आहे. ("**भारतीय दर्शन,**" श्रीबलदेव उपाध्याय पृ.१५४ ते ६२ पाहावे.)

या विषयामध्ये ही गोष्ट विचारणीय आहे अर्थात् या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे की, जर श्रीनागार्जुनांच्या उक्तीनुसार "शून्यामध्ये" केवळ कल्पित ग्राह्य-ग्राहक आदिभावांची शून्यता किंवा अभाव आहे आणि ज्ञानरूपतेची स्थिरता अटळ राहते तर मग पुन्हा शून्यवादामध्ये, बौद्धांची दुसरी शाखा असलेल्या विज्ञानवादाच्या सिद्धान्तात म्हटल्याप्रमाणे "अथ" "**सर्वालम्बनधर्मैश्च सर्वसत्वैरषेशतः। सर्वक्लेशाशयैः शून्यं न शून्यं परमार्थतः।। इत्याद्युक्तयुक्त्या ग्राह्य-ग्राहक भावादिना कल्पितेन रूपेण शून्यं न तु संविदापि इति चेत्, एवं ह्युच्यमाने विज्ञानवादे एवाभ्युपगमः स्यात्।। तंत्रालोकविवेक १.३३।।**" अर्थात् जो सर्व आलंबनधर्मांपासून, सर्व सत्त्वांपासून सर्व क्लेशांपासून शून्य आहे तोही परमार्थतः शून्य नाही. या औचित्यपूर्ण आप्त उक्तीनुसार ग्राह्य-ग्राहक भाव इत्यादि संबंधांच्या कल्पितरूपापासून शून्याचे आकलन होते. संविद् अर्थात् शक्तीबद्दल शून्यतेची गोष्ट तर बिल्कुल असत नाही. जर ही स्थिती मानली तर विज्ञानवादाचेही हेच म्हणणे आहे, असे जे कथन केले आहे, यानुसार आणखी कोणती नवीन गोष्ट सांगितलेली आहे. विज्ञानवाद्यांचे मत असे आहे की, "**इत्यन्तःकरणस्यैव विचित्रात्मावभासिनः। अवि-भावितत्त्वस्य विस्फूर्जितमिदं जगत्।। तंत्रालोकविवेक १.३३।।**" याचा अर्थ असा आहे की, अंतःकरणाचे विस्फूर्जन अर्थात् स्पंदनच संसार आहे. बाह्यपदार्थांच्या

शून्यतेबरोबर अंतःकरणाची शून्यता स्वीकार करणे योग्य नाही. स्वयंवेदनाची अर्थात् स्वयंस्पंदाची परम आवश्यकता आहे. हेच संविद् अर्थात् शक्तीचे महत्त्व आहे. या दृष्टीने हे सर्व कल्पित जगत् किंवा हा सर्व कल्पित जगत्प्रपंच प्रत्यक्षात अंतःकरणामध्ये धर्म बनलेल्या ज्ञानाचा, ज्याला त्यांच्या शब्दकोशामध्ये "विज्ञप्ती" असे म्हणतात त्याचा केवळ विकास आहे. हे ज्ञानच विचित्र रूपांना अवभासित अर्थात् प्रकाशित करीत असते. परंतु स्वयं ज्ञान हे कल्पित तत्त्वादींचे रूप धारण करीत नाही. ज्ञान हे चेतनक्रियेशी संबंधित झाल्यामुळे त्यालाच "चित्त" असे म्हणतात आणि हेच एक पारमार्थिक सत्य आहे. यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की, शून्यवादी लोकांचे "शून्य" आणि विज्ञानवादी लोकांचे "चित्त" यामध्ये शाब्दिक भेदाव्यतिरिक्त कोणताही सैद्धान्तिक भेद दृष्टिगोचर होत नाही.

शैव मतवादी हे ज्ञानाला चित्तरूप किंवा अंतःकरणरूप मानण्याच्या पक्षामध्ये किंवा गटामध्ये समाविष्ट होत नाहीत. अंतःकरण हे इंद्रिय असल्यामुळे ते स्वतः जड आहे. ज्ञान हे सर्वस्वतंत्र आणि चैतन्य असल्यामुळे या अंतःकरणाचा धर्म कसे बनू शकते?

"शून्या" च्या कल्पनेच्या विषयामध्येही शैवांचा दृष्टिकोण अन्य दार्शनिकांपेक्षा नितरां अर्थात् पूर्णपणे भिन्न आहे. यादृष्टीने शैववादी लोकांच्या कथनानुसार अर्थात् म्हणण्यानुसार "**स्वच्छंदतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**अशून्यं शून्यमित्युक्तं शून्यं चाभाव उच्यते।**
**अभावः स समुद्दिष्टो यत्र भावाः क्षयं गताः।।**
**सत्तामात्रं परं शान्तं तत्पदं किमपि स्थितम्।।४.२९२.९३।।**

याचा अर्थ असा आहे की, अशून्याला अर्थात् चिदानंदघन आणि सतत स्फुरणशील श्रीपरमशिवतत्त्वाला शून्य असे म्हटले आहे. आणि शून्य म्हणजे अभाव होय. अभाव म्हणजे जेथे सर्व भावांचा नाश होतो असे स्थान होय. सर्व भाव-अभावांची सत्ता असलेले हे पद अर्थात् श्रीशिव परमशांत आणि लोकोत्तर आहेत. यानुसार "शून्य" या शब्दाने प्रत्यक्षात अशून्य अर्थात् चिदानंदघन आणि सतत स्फुरणशील श्रीपरम-शिवतत्त्वच अभिप्रेत आहे. या श्रीपरमशिवतत्त्वाला "शून्य" ही संज्ञा यासाठी दिलेली आहे की, "**यत्तु अस्य शून्यत्वमुक्तं तन्मायाक्षयोपचारेण**

**तद्धर्मैः परिणामित्वादिभिः शून्यत्वाच्छून्यम्।।१.७६।।**" असे "**तंत्रालोकविवेक**" या टीकाग्रंथात म्हटल्याप्रमाणे ते तत्त्व विश्वोत्तीर्ण रूपामध्ये मायेचा अविषय असल्यामुळे मायेपासून निर्माण झालेल्या परिणमित्व अर्थात् रूपांतर इत्यादि धर्मांनी शून्य आहे. या शून्य अर्थात् विश्वोत्तीर्ण रूपामध्ये हे सर्व इदंवाच्य अर्थात् जगत्वाच्य अर्थात् जगत् या नावाने ओखळले जाणारे प्रमेयमंडल अर्थात् यथार्थ ज्ञान करून घेण्याची गोष्ट असलेले त्याच रूपामध्ये विश्रांत होऊन अभिन्न अशा अहंरूपामध्ये अर्थात् स्वस्वरूपामध्ये अवस्थित झालेले आहे. विश्वोत्तीर्ण अवस्थेमध्ये या नाममरूपात्मक प्रमेयमंडलाचा अर्थात् जगताचा वेगळा भाव न होण्याचेच नाव "अभाव" आहे आणि अशाच अभावाचे नाव "शून्य" आहे. शून्य ही एक महान् सत्ता असून तिला पूर्ण ज्ञानक्रियात्मक स्वातंत्र्य असते. शून्यरूपी सत्ता प्रत्येक भाव किंवा अभाव यांना सत्ता किंवा अस्तित्त्व प्रदान करीत असते. या पदामध्ये प्रत्येक प्रकारची भेदकल्पना विश्रांत झाल्यामुळे हे पद शांत तसेच अनिर्वाच्य आहे.

हे शून्यतत्त्व एक अति अद्भुत तसेच विलक्षण तत्त्व आहे. हे शून्य असून अशून्यही आहे. या दृष्टीने "**स्वच्छंदतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**यत्र यत्र च नादादि स्थूला अन्येऽपि संस्थिताः।**
**तत्र तत्र परं शून्यं सर्वं व्याप्य व्यवस्थितम्।।४.२९४।।**

याचाच अर्थ असा की, हे शून्यतत्त्व विश्वोत्तीर्णतेच्या अतिरिक्त नाद, बिंदू, भुवन, भाव इत्यादि रूपात आभासमान विश्वमयतेमध्ये फुलामधील सुगंधाप्रमाणे व्याप्त होऊन अवस्थित आहे. थोडक्यात सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, शैव आचार्यांच्या मतानुसार "शून्य" सर्वाभाव न असता पूर्णवेदक अर्थात् स्वतंत्र ज्ञान-क्रियात्मक प्रमातृसत्तेचे अर्थात् जीवसत्तेचे अभिव्यंजक अर्थात् सूचक आहे.

या सर्व अवलोकनाचा निष्कर्ष हा आहे की, शैवमान्यतेनुसार व्युत्थान, समाधी, शून्य, अभाव इत्यादि सर्व अवस्थांमध्ये अनुभवितारूप अर्थात् अनुभव घेणाऱ्या आत्म्याच्या ज्ञान-क्रियात्मक स्पंदनामध्ये अर्थात् स्फुरणामध्ये कोणताही भेद असत नाही. याचे फल म्हणून सतत स्पंदमयी अर्थात् स्पंद पावणाऱ्या आत्मसत्तेच्या प्रत्यभिज्ञानाची अर्थात् जाणिवेची ही सर्वाभावाची

अवस्था असत नाही, सर्वशून्यतेची अवस्था असत नाही की मूढतेची अवस्था असत नाही.।।१२।।

❋❋❋❋❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :- (कारिका क्रमांक १२ व १३)**

आता बारा व तेरा कारिकांमधून जे वेदान्ती, नैयायिक आणि माध्यमिकादि असे मानतात की, क्षोभाचा प्रलय होत असताना विश्वोच्छेद (विश्वाचा संहार) रूप अभावात्मक तत्त्वच शिल्लक राहते त्यांना यथार्थ तत्त्वाचे ज्ञान देण्यासाठी आणि त्यांनी सांगितलेल्या तत्त्वाला विरोध करून प्रकरणशरीररूप स्पंदतत्त्वाचे निरूपण केले आहे.

**स्पष्टीकरण :- "असदेव इदमग्र आसीत्।"**

**(छांदोग्य उपनिषत् ३।१९।५)**

**अर्थ :-** या (सृष्टीच्या) प्रारंभी असत्च (अस्तित्वात) होते.

यासारख्या वेदान्त्यांनी मानलेल्या मतांनी अभाव हा भाव्यतेला म्हणजेच अस्तित्वात येत नसतो; कारण भाव्य (अस्तित्वात असणाऱ्या वस्तूच) भावनेचे विषय होत असतात. अभाव वास्तविक पाहता काहीही नसतो. जर अभावाला भाव्यमानता द्यावयाची ठरली तर त्या अभावाला "किंचित्" म्हणजेच काहीतरी (अस्तित्वात असण्याजोगे) मानावे लागेल आणि असे झाल्यास त्या अभावाचीच अभावता निर्माण होईल. त्याचप्रमाणे जेथे भावकाचाही अर्थात् जीवाचाही अभाव असेल तो विश्वोच्छेद (विश्वाचा संहार) कसा काय मानावा? जर भावकाच्या अस्तित्वाचा स्वीकार केला तर विश्वाचा संहार होणार नाही; कारण भावक (तेथे विश्वाच्या तत्त्वाखाली येणारा म्हणून) अवशिष्ट राहतो. त्यामुळे विश्वाभाव हे तत्त्वच नाही.

**(आक्षेप आणखी दृढ करतात.)** हा भावक कल्पित म्हणजेच कृत्रिम आहे. विश्वोच्छेदाला विकल्पाने कल्पित करून अर्थात् विश्वोच्छेदाची विकल्पाने कल्पना करून त्या भावनेची पूर्णपणे निष्पत्ती झाल्यावर भाव्याशी तादात्म्यरूप असल्याने हा भावक अभावरूप होतो असा एक पक्ष आहे.

## ग्रंथकाराचे उत्तर

ग्रंथकाराने वरील आक्षेपाला असे उत्तर दिले आहे की, अभावाच्या भावनेमध्ये अमूढता नसते उलट मोहच असतो. कारण शास्त्रात असे म्हटले आहे की -

..... यद्यदेवातिभाव्यते।
भावनापरिनिष्पत्तौ तत्स्फुटं कल्पधीफलम्।।

**अर्थ :-** त्यामुळे सर्व भाव आणि अभाव ज्यांची भावना केली जाते ते सर्व भावनांची पूर्ण निष्पत्ती झाल्यावर कल्पनेचे फल म्हणून स्पष्टपणे भासते.

या न्यायाने विश्वोच्छेद किंवा अभाव यांची भावना केली असता कधीही परमार्थाची प्राप्ती होत नाही.

### प्रतिपक्षाचा परत आक्षेप

**सर्वालम्बनधर्मैश्च सर्वतत्त्वैरशेषतः।**
**सर्वक्लेशाशयैः शून्यं न शून्यं परमार्थतः।।**

**अर्थ :-** सर्व आलंबन धर्मांनी, सर्व तत्त्वांनी आणि सर्व दुःखांनी शून्य (रहित) असलेले हे परमार्थतः शून्य नव्हेच.

अशा रीतीने श्रीनागार्जुनांनी अशा प्रकारचे ते शून्य असते असे सांगितले आहे.

### ग्रंथकाराचे उत्तर

जर (तुम्ही) चिदानंदघन, स्वतंत्र, पारमार्थिक (सत्तेला) आधारभूत म्हणून स्वीकाराल तर हे सत्य आहे. "**विज्ञानभैरव**" या ग्रंथातही या पारमेश्वरी शक्तीला "**दिक्कालकलनातीता।।१४।।**" अर्थात् दिशा आणि काल यांच्या मर्यादांच्या पलीकडे असलेली असे म्हटले आहे. अशा प्रकारे पारमार्थिक भित्तिभूत (अशा) चिद्भूमीप्रमाणे स्थापना करणाऱ्या शक्तीला शून्यभावना असे म्हटले आहे. नाहीतर "तत्त्वतः काहीही शून्य नाही" असे जे म्हटले आहे ते "**यद्यदेवातिभाव्यते**" या प्रतिपादनामुळे अर्थशून्य ठरेल.

**सावस्था काप्यविज्ञेया मादृशां शून्यतोच्यते।**
**न पुनर्लोकरूढ्येव नास्तिक्यार्थानुपातिनी।।**

**अर्थ :-** ती कोणालाही सांगता न येणारी, कोणालाही न आकळणारी अवस्था माझ्यासारख्याकडून "शून्यता" म्हणून सांगितली जाते. तिचा अर्थ खरोखर नास्तिकांपासून होणारी लोकरूढी नाही.

असे जे "**आलोकमाला**" या ग्रंथात म्हटले आहे ते सत्यच आहे. तुमच्यासारख्या अज्ञानांनी असे सांगण्यात समाधान मानले आहे की, ही

अवस्था कोणालाही स्पष्टपणे आकळत नसल्यामुळे तिच्यासंबंधी काहीही सांगणे अशक्य आहे आणि त्यामुळे तिला शून्यता असे म्हटले आहे. परंतु तिला शून्यता म्हणावयाचे का? कारण ही शून्यताही जोपर्यंत (भावकाकडून) घडविली जाते तोपर्यंत विकल्पाने (कल्पनेने) तिचा उल्लेख होत असल्यामुळे ती जाणण्यास योग्य आहे. जर तुमच्यासारख्यांना तिचे ज्ञान करून घेणे अशक्य असेल तर त्या शून्यतेचा साक्षात्कार करून घेऊन तिचे ज्ञान झालेल्या श्रीसद्गुरूंच्या सेवेत जावे. स्वतःच्या बुद्धीनेच शून्यतेचा व्यवहार करून स्वतःला आणि इतरांनाही अगाध आणि खोल अशा मोहामध्ये फेकू नये.

तेथे मूढता (जडत्व) आहे याचे ज्ञान कोठून झाले? या प्रश्नाचे उत्तर देताना कारिकाकार **"संस्पर्शात्"** असे सांगतात - **"यतः अभियोग"** अशा समाधीतून उठलेल्यांचा "मी" कशा प्रकारचा होतो" या अवस्थेला सामोरे गेल्यावर झालेल्या ज्ञानाचा जो अभिलाप किंवा भाषण आहे त्याच्या संस्पर्शामुळे म्हणजेच त्याच्या प्रभावामुळे "मी अत्यंत जड आहे," असा निश्चय किंवा अशा प्रकारची प्रतिपत्ती होते. त्यामुळे ती मोहावस्थाच होय. अशा प्रकारे त्या अवस्थेची स्मृती होत असल्याने ती कल्पित किंवा कृत्रिम आहे. ही अवस्था अनुभवास येत असल्यामुळे ती अनुभविणाऱ्या व स्थिर असणाऱ्या प्रमात्याचे अस्तित्वच दाखविते. अभाव दाखवीत नाही. त्यामुळे विश्वाच्या अभाव अवस्थेत चिद्रूप आत्म्याचे अखंडित असेच रूप स्थित असते. त्याचा अभाव होतो असे म्हणता येत नाही.

प्रतिपक्षी असे म्हणतो की, जी गोष्ट पाहिलेली असते आणि त्यामुळे ज्याचे अस्तित्व निश्चित केले जाते त्या नीलादींचे स्मरण केले जाते. जी गोष्ट शून्यभूत आहे आणि बुद्धीमधून ज्याचा अभाव झालेला आहे त्याचा निश्चय होत नाही. त्यामुळे उत्तर कालात जिच्या अस्तित्वाचा निश्चिय होतो ती मूढता असे कसे काय म्हणता येईल?

या शंकेला उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की, **"वेद्यस्य एषा गतिः"** अर्थात् हे ज्ञेय वस्तूचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे ते इदंतासार इदंतेने जोपर्यंत स्वात्म्यावर उपारोहण करून अर्थात् स्थिर राहून निश्चित करीत नाही तोपर्यंत त्याचे स्मरण होत नाही. वेदक जरी कल्पित (कृत्रिम) अशा शून्यादि अवस्थांमध्ये संकुचित झालेला असला तरीही तो परमोच्च असांकेतिक अहंतारूपानेच स्थिर असतो. त्यामुळे त्याच्यात आणि स्वात्म्यात कोणताही

वेगळेपणा नाही. अशा प्रकारे हा विकल्प त्याचा निश्चय करणारा आहे. त्यावेळेस अहंविमर्शरूप, स्वसंवेदनाने सिद्ध होणारा, शून्यरूप प्रमाता विश्वाच्या विरोधी असल्याने संकोचाचे सार म्हणून त्यानंतरच्या काळात स्मरला जातो. त्यामुळे यामध्ये कोणतीही विसंगती नाही.

अशा प्रकारे हे शून्यात्मक पद कृत्रिम आहे व त्याचप्रमाणे ते **"तस्माद्भूतमभूतं वा यद्यदेवातिभाव्यते"** या वचनाप्रमाणे ज्याचे अस्तित्व कधीच नव्हते अशा वस्तूंच्या कल्पनेने अस्तित्त्वात आणले जाते. श्रीपरमेश्वराकडूनच यथार्थ ज्ञान गुप्त ठेवण्यासाठी मूढांना उपेयाप्रमाणे भासविले जाते. जाणून घ्यावयाचे ज्ञेय आणि ज्ञेयाचे रूप हे नेहमीच सुषुप्ती अवस्थेप्रमाणे असतात.

याचा भावार्थ असा आहे की, मोहरूप आणि कोणत्याही प्रयत्नांशिवाय सिद्ध असणारी शून्यरूप सुषुप्ती अवस्था सर्वांनाच प्राप्त होत असते. त्यामुळे या समाधी आदि प्रयत्नांनी दुसरे शून्यरूप प्राप्त करण्यात काय फायदा? कारण ही दोन्हीही शून्ये अवस्तुत्व अर्थात् असत्यच आहेत. या तरून जाण्यास कठिण व महान् अशा मोहाच्या सागराप्रमाणे असणाऱ्या शून्यात वेदान्त, अक्षपाद, सौगत इत्यादि बरेच तत्त्वज्ञ प्रविष्ट झालेले आहेत. स्पंदतत्त्वामध्ये प्रवेश करण्यास इच्छुक असणाऱ्या साधकांचे प्रयत्न शिथिल झाल्याने हे शून्य त्यांना विघ्नच ठरले आहे. याबद्दल **"तदा तस्मिन्महाव्योमि।।२५।।"** इथून सुरुवात करून **"सौषुप्तपदवन्मूढ .....।।२५।।"** येथपर्यंतच्या कारिकेत ग्रंथकार अधिक-स्पष्टीकरण देतीलच. त्यामुळे त्यांचा निरास करण्यासाठी ग्रंथकाराचा मोठाच खटाटोप दिसून येतो. त्याचप्रमाणे ग्रंथकार या शून्याला "त्याज्य" म्हणून निर्णय करूनही "जो कार्यास प्रवृत्त करणारा प्रयत्न (आहे .....।।१५।।)" या ठिकाणी परत त्याचा निर्णय करतील. त्यामुळे आमच्याकडून त्याच्यातले दोष सांगण्यास आरंभ केला गेला आहे. असे असल्यामुळे उपदेश ऐकण्यासाठी तत्पर असणाऱ्या (वाचकांनी) साधकांनी आमच्यावर क्रोध करू नये. सौगतांचे मत निरसन केले असता वेदान्त्यांचे आणि इतरांचेही मत निरसन होते; कारण त्या दोघांचाही मुद्दा सारखाच आहे. त्यामुळे मी या चर्चेत खूप खोल गेलो नाही.

आता आपण विषयाकडे वळू. हे स्पंद नावाचे तत्त्व अशा प्रकारे शून्याप्रमाणे स्मर्यमाण (कोणाकडून तरी स्मरण करवून दिले जाणारे)

नाही; कारण हे तत्त्व नेहमीच उपलब्ध (अस्तित्वात) असणाऱ्या ज्ञात्याशी एकरूपात अनुस्यूत असून ते कधीही अनुपलभ्य असत नाही. त्याचप्रमाणे बृहदारण्यक उपनिषदात असे म्हटले आहे की -

**विज्ञातारमरे केन विजानीयात्।।४।५।१५।।**

**अर्थ :-** जो जाणणारा आहे त्याला कशाने जाणावयाचे?

जरी समावेश दशा जागृत झालेल्या योग्याला प्राणादींच्या संस्कारांमुळे स्मरते तरी ती एकमात्र स्पंदतत्त्व घडवू शकत नाही किंवा ती म्हणजेच स्पंदतत्त्व नाही. हे स्पंदतत्त्व सर्वांमध्ये अनुस्यूत असणारे, अनवच्छिन्न अर्थात् न आच्छादलेले, प्रकाश, आनंदसाररूप व परप्रमातारूपच आहे. यासंबंधी "**तस्माच्छब्दार्थचिन्तासु न सावस्था न यः शिवः।।२९।।**" या कारिकेत अधिक माहिती ग्रंथकार सांगतील. त्यामुळे या अनवच्छिन्न चमत्काररूपाला स्मर्यमाणत्वही नाही आणि मूढत्वही नाही. या स्पंदतत्त्वाचा "तत्" (ते) या पदाने निर्देश करणे हे अयोग्य आहे; कारण "तत्" हे पद स्पंदतत्त्वाला ज्याचा अनुभव आलेला असून आता स्मृतीत येत आहे अशा एखाद्या गोष्टीशी संबंधित करते. (परंतु स्पंदतत्त्वाचा अशा प्रकारचा उल्लेख न करता येणे शक्यच नाही; कारण मनुष्याच्या भाषेमध्ये (व्यावहारिक जगातल्या) या शिवाय त्या तत्त्वाचा निर्देश करण्यासाठी दुसरा कोणता उपायच नाही. कारण मनुष्याला भौतिक जगातच व्यवहार करावयाचा असतो अतिभौतिक जगतात नाही.) "तत्" हे पद "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथामधील "**स्वातन्त्र्यामुक्तमात्मानं .....।।१।५।१६।।**" अर्थात् आत्मा हा स्वातंत्र्याने वंचित नाही" या उक्तीनुसार अकृत्रिम स्वरूपाला योग्य तऱ्हेने लागू पडते. "**न प्रतिपद्यते इत्यनेन**" या पदांनी असे सुचवितात की, या तत्त्वाची स्मर्यमाणत्वाने (कोणीतरी आठवण करून देण्याने) प्रतीती अथवा अनुभव येतच नाही.।।१२-१३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

"**असदेव इदमग्रे आसीत्**" या श्रुतीनुसार अक्षपाद आणि माध्यमिक (बौद्ध) प्रभृति संसारात्मक प्रक्षोभाच्या विनाशात विश्वोच्छेदरूप अभाव हेच सारभूत तत्त्व आहे असे म्हणतात. त्यांच्या मताचा उपहास करून त्यांना जागे करण्यासाठी आणि त्यांनी स्वीकारलेल्या तत्त्वाचे खंडन

करून लोकोत्तर स्पंदतत्त्वाचे निरूपण "**नाभावो भाव्यतामेति ..... ।।१२।।**" या कारिकेतून करतात. वरती सांगितलेल्या अभाववाद्यांचा सिद्धान्त प्रमाणग्राह्य अर्थात् प्रमाणांनी सिद्ध होणारा नाही आणि त्याचप्रमाणे युक्तियुक्तही नाही; कारण अभावात्मक वस्तूला भावनाविषयत्व अर्थात् अस्तित्वाची प्राप्ती कशी काय होईल? शून्यवादी माध्यमिक सर्व प्रपंच हा शून्याचा विवर्त अर्थात् परिणाम आहे असे स्वीकार करून त्या शून्यतत्त्वाशिवाय कोणत्याही तत्त्वाची इच्छा किंवा अपेक्षा करीत नाहीत अर्थात् इतर कोणतेही तत्त्व मानत नाहीत. शून्य हेच पारमार्थिक वस्तुतत्त्व आहे; इतर तत्त्वे मात्र संवृत्तिसत्य अर्थात् क्षय पावणारी सत्ये आहेत. परंतु ज्याच्याविषयी काहीच स्पष्टीकरण देता येत नाही अशा अभावरूप शून्याला ज्ञानक्रियात्मक अनुभवित्याचे अस्तित्व आहे असे ते सिद्ध करून दाखवू शकत नाहीत. अभावात्मक दशेचा कोणाला बरे अनुभव येत असेल? अभावामध्ये भावरूप जगताच्या उत्पत्तीचा हेतू काय असू शकेल? असत् म्हणजेच ज्याचे अस्तित्त्वच नाही त्यापासून सत् म्हणजेच अस्तित्त्वात येणाऱ्या किंवा दिसणाऱ्या पदार्थांची उत्पत्ती कशी काय शक्य आहे?

अशा प्रकारे असद्रूपाचे अस्तित्त्व व सद्रूपाचे अभावत्व याविषयी भगवान् श्रीकृष्णांनी "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात असे म्हटले आहे की-

**नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।**
**उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः।।२-१।।**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे अविद्यमान अर्थात् अस्तित्वात नसलेल्या पदार्थांचा भाव म्हणजेच अस्तित्व नसते त्याचप्रमाणे विद्यमान पदार्थांचा म्हणजेच अस्तित्वात असलेल्या पदार्थांचा अभाव नसतो. या दोघांचाही निर्णय तत्त्ववेत्यांनी पाहिलेला आहे.

अभावसमाधीमध्ये अर्थात् "मी नाही" अशा भावनेच्या दशेमध्ये मूढरूप असंवेदनेची प्रसक्ती अर्थात् संबंध येतो. ही असंवेदना कोणत्याही रीतीने बुद्धिमान् साधकांकडून अंगीकार करणे अशक्य आहे. ज्याचे अवच्छिन्नरूपाने अर्थात् अखंड रूपाने नेहमी सर्वत्र अस्तित्व असते तोच पदार्थ भावनेचा विषय होतो. अभावामध्ये तर अस्तित्त्वच नसते. त्यामुळे

हा अभाव भावनेने कसा काय संगृहीत केला जाईल?

चिद्रूपतत्त्वाचा स्वभाव (स्वरूप) निरंतर स्फुरणशील असतो. त्यामुळेच ते चिद्रूपतत्त्व मूढदशेप्रमाणे स्मरणाचा स्वतःच विषय होणार नाही. तो अनुभविता स्वस्वरूपानेच उत्पन्न होतो. आभासशून्य अर्थात् आभासरहित, ज्ञानक्रियायुक्त चिद्रूपता समाधिदशा नसतेच. या उलट समाधिदशेमध्ये जो भावात्मक चिद्रूपतेची भावना करतो तेथेच चिद्रूपता स्फुरण पावते. परंतु सुषुप्तीमध्ये केवळ मूढत्व किंवा मोहच प्रस्फुरतो. हेच त्या दोघांमधले अंतर आहे. त्यामुळेच जाग्रत् दशेमध्ये काहीही जाणण्यासारखे नसल्यामुळे तेथे अनुभविलेली मूढताच स्मरणविषयत्वाने प्रस्फुरित होते. शून्यवादी आत्म्याचे अस्तित्त्व स्वीकारण्यास तयार किंवा तत्पर नाहीत. त्यांच्या मते आत्माच नाही तर निर्वाणाचा डिंडिम घोष कशासाठी केला जातो? आमच्या मते शून्य शब्दाने अशून्यरूप सततस्फुरणशील असा संवित्प्रकाश अभिप्रेत आहे. विश्वोत्तीर्ण अवस्थेमध्ये मायाविषयाचा अभाव असल्यामुळे परिणाम इत्यादि धर्मांनी रहित असा श्रीशिवस्वरूप आत्मा राहतो. त्या दशेमध्येच सर्व प्रपंचाचे पृथक् रूपाने अस्तित्व नसल्याने अभाव शब्दाने त्याचा उल्लेख केला आहे.

यासंबंधी **"स्वच्छंदतंत्र"** या ग्रंथात असे विवेचन केले आहे की -

**अशून्यं शून्यमित्युक्तं शून्यं चाभाव उच्यते।**
**अभावः स समुद्दष्टो यत्र भावाः क्षयं गताः।।**

**अर्थ :-** अशून्याला म्हणजेच शून्यरहित अवस्थेला शून्य असे म्हणतात. शून्यालाच अभाव असे म्हटले आहे. जेथे भावांचा क्षय (नाश) झालेला आहे तेथे अभाव दिसतो.

अशा प्रकारचा जो अभाव आहे त्याला आम्ही शून्यरूपाने स्वीकारतो. अशा प्रकारची शून्यात्मक सत्ता परिपूर्णज्ञानक्रियारूप होऊन भावाभावांना अस्तित्त्व प्रदान करतो. या सर्वांचा एकच निष्कर्ष निघतो -

**आत्मसत्ता ही असद्रूप किंवा जडरूप किंवा शून्यरूप नाही.।।१२।।**

❋ ❋ ❋ ❋ ❋

**अतस्तत्कृत्रिमं ज्ञेयं सौषुप्तपदवत्सदा।**
**न त्वेवं स्मर्यमाणत्वं तत्तत्वं प्रतिपद्यते।।१३।।**

**अन्वयार्थ :-**

**अतः** - म्हणून, (वर सांगितलेल्या कारणावरून), **तत्** - ती मूढ "अभाव -समाधी अवस्था," **सदा** - नेहमी, **सौषुप्तपदवत्** - गाढ झोपेच्या तामसिक अवस्थेप्रमाणे, **कृत्रिमम्** - अनित्य (भट्ट श्रीकल्लट), **ज्ञेयम्** - जाणावी. कारण ज्याप्रमाणे "मी सुखाने झोपलो" हे जसे झोप संपल्यावर स्मरण राहते त्याप्रमाणे व्युत्थानाच्या वेळी अभाव - समाधी - अवस्था "अशी समाधी होती" असे स्मरण राहते, **तु** - पण, **तत्तत्त्वम्**- ते स्पंदतत्त्व अथवा आत्मरूप, **एवम्** - या "अभावसमाधी" प्रमाणे, **स्मर्यमाणत्वं न प्रतिपद्यते** - स्मरणाचा विषय होत नाही.।।१३।।

**अर्थ :-** वर सांगितलेल्या कारणावरून ती मूढ अभाव-समाधी-अवस्था ही प्रतिक्षण गाढ झोपेच्या तामसिक अवस्थेप्रमाणे अनित्य तसेच कृत्रिम जाणावी; कारण ज्याप्रमाणे पुरुषाला "मी सुखाने झोपलो होतो" हे झोप पूर्ण झाल्यानंतरही स्मरण राहते त्याप्रमाणे समाधिस्थ योग्याला समाधीतून बाहेर पडताना "अभाव-समाधी-अवस्था" अशी समाधी होती असे स्मरण राहते. परंतु ते स्पंदतत्त्व किंवा आत्मरूप या अभावसमाधीप्रमाणे स्मरणाचा विषय होत नाही.।।१३।।

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

परब्रह्म तत्त्व आहे. ते समाधीमध्ये प्राप्त झाले असे म्हणणे म्हणजे खरे पद प्राप्त झाले नाही. सुषुप्ती अवस्थेप्रमाणेच समाधी ही अवस्था कमी दर्जाची आहे; कारण ती जड देहाला प्राप्त होणारी अवस्था आहे. मात्र समाधी अवस्था ज्ञान प्राप्त होण्याला उपयुक्त असते. समाधी अवस्थेमध्ये ज्ञाता व ज्ञेय ह्या गोष्टी समाधी कालापर्यंत विभागरूपाने जाणता येत नाहीत. अर्थात् निद्रावस्थेप्रमाणे समाधी ही एक स्थिती आहे व ती अभावरूपच आहे. झोपेतून जागृत झाल्यानंतर मला त्या वेळेला काही आठवत नव्हते असे म्हणणे ही अभावरूप समाधी होय किंवा मला अमुक एक प्रकारचा अनुभव आला हे सांगणे म्हणजे गतगोष्टीचा अनुभव निवेदन करण्यासारखे असल्यामुळे ते पण खोटे आहे. पण तशी चैतन्यावस्थेची स्थिती नाही. सर्व काळी व सर्व स्थळी मी ज्ञानस्वरूपच आहे असे हे चैतन्यरूपाने अहंचे खरे स्वरूप आहे.

अभाव हा सशाच्या शिंगाप्रमाणे असतो. यासाठी जी वस्तूच नाही ती अनुभवाचा विषय होऊ शकत नाही. अभाव ही एक मूढावस्था आहे. ती

काही चेतनावस्था नाही. अभियोग अर्थात् अभिलाषेच्या स्पर्शामुळे परब्रह्माच्या अभावाची भावना जीवाला होते व ती पक्की रुजली जाते. त्यामुळे ती माझी शून्यावस्था होती असे जीवाला स्मरण होते. शास्त्रकार म्हणतात, "ज्या भावाच्या द्वारा अभाव बाधित होतो तो "आहे" का "नाही?" परंतु अभावाच्या बाधकभावाचा सद्भाव कोण तोडू शकतो? यासाठी ते तत्त्व आहे व ते चिन्मय आहे. त्याच्यामुळेच सर्व गोष्टींचा अनुभव येत असतो. त्या तत्त्वामुळेच अभावाचाही अनुभव येतो. अभावाची भावना कृत्रिम व अनित्य असण्याचे हेच कारण आहे. ते सुषुप्तावस्थेसारखेच आहे. जर असे नसते तर मूढावस्थेप्रमाणे त्याचे नंतर स्मरण झाले नसते. या अवस्थेमुळेच सदासर्वदा प्रकाशमान असलेला आत्मा स्मृतीचा विषय होतो. आत्मा पाहून तर तो (साधक) स्मरण करतो. यामुळे तो चिद्रूप व नित्योदित आहे. या कारणामुळेच श्रीगुरूंपासून उपदेश किंवा शक्तिपातयोगदीक्षा प्राप्त करून अत्यंत आदरपूर्वक नित्य व अखंडित साधन करणे नितांत आवश्यक ठरते.

या सर्व गोष्टींचा विचार केला तर असे दिसून येते की, स्मर्ता व स्मर्तव्य अशा दोनच अवस्था आहेत. या दोहोत नित्य कोण व अनित्य कोण आहे? याचा विचार पुढील कारिकेत केला आहे.।।१३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

तर मग तुम्ही चेतनात्मवादी या अभावानुभवाची उपपत्ती कशी लावणार असा प्रश्न कल्पून, वरील मुद्दाच स्पष्ट करण्याच्या दृष्टीने ग्रंथकार असे म्हणतात की -

**स्पष्टीकरण :-** सुषुप्ती अवस्था ही कृत्रिम अवस्था आहे. ती आत्म्याचे स्वरूप होत नाही. तद्वतच अभावसमाधी हीही कृत्रिम अवस्थाच आहे; कारण या दोहोंचीही जाणीव आपणाला भूतकालीन अवस्था म्हणून येते. त्यामुळेच ती केवळ स्मरणाचा विषय होते. स्वस्वभाव तसा नाही. स्वस्वभावलक्षण आत्मतत्त्व हे नित्योदित असल्यामुळे ते नेहमी वर्तमान-कालीनच असते व त्याचा नेहमी अनुभवच येतो. आत्म्याचे ज्ञान अनुभवस्वरूपच असते, ते स्मरणरूप कधीच नसते.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## स्मर्यमाणतेची अर्थात् स्मृतिगम्यतेची असंगती

आता सूत्रकार अभावसमाधीला सामान्य पशुवर्गामध्ये आढळून येणारी मोहात्मक सुषुप्ती अर्थात् प्रगाढ निद्रा यासारखी कृत्रिम तसेच जडता ही अवस्था सिद्ध करण्यासाठी सूत्र क्रमांक १३ सांगत आहेत.

**वृत्ती :-** (मी नाही आहे, मी नाही आहे, अशा प्रकारच्या) अभाव-भावनेचा अभ्यास केल्याने योग्याला एखाद्या भूमिकेचा साक्षात्कार झाला तरी ही अवस्था कृत्रिम अर्थात् अनित्य असते. या अवस्थेची अनुभूती जीवभावाच्या मोहात्मक सुषुप्तीप्रमाणेच होत असते. याचे कारण हे आहे की, चिद्रूपता हे आत्म्याचे वास्तविक स्वरूप आहे. आत्म्याची अवस्थिती अर्थात् वास्तव्य सतत सन्निहित अर्थात् त्रिकालाबाधितच असते. प्रतिक्षण श्रीगुरूंच्या उपदेशावर कटिबद्ध राहून साधकयोग्याने किंवा शिष्याने त्या आत्मतत्त्वाचे अनुशीलन करीत राहावे.।।१३।।

**विवरण :-** या सूत्राचा अर्थ चांगल्या तऱ्हेने समजण्यासाठी येथे "सौषुप्तपदाच्या" संबंधामध्ये दोन शब्द बोलणे आवश्यक आहे. अनुग्रहमूर्ती भगवान् श्रीभूतनाथ यांनी स्वतः **"अविवेको मायासौषुप्तम्।। श्रीशिवसूत्र १.१०।।"** अर्थात् ज्या अवस्थेत जाणिवेचा संपूर्ण अभाव असतो, अशी मोहमयी गाढ झोपेची अवस्था सुषुप्ती (सौषुप्त) होय. या एका सूत्रामध्ये सामान्य पशुवर्ग आणि योगिवर्गाच्या दृष्टिकोणातून सौषुप्तपदाचे निरूपण केलेले आहे.

**पशुवर्गाची सुषुप्ती :-** साधारण पशुभावामध्ये सुषुप्ती ही प्रगाढ निद्रेची अवस्था आहे. या प्रगाढ निद्रेच्या अवस्थेमध्ये तमोगुणापासून निर्माण झालेल्या मोहाच्या घनतेमुळे वेद्यपदार्थांचे किंवा ज्ञेयपदार्थाचे प्रत्यक्ष ज्ञान किंवा स्मृती होत नाही. या दृष्टीने **"श्रीशिवसूत्रवार्तिक"** या टीकाग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

**ज्ञानज्ञेयस्वरूपायाः शक्तेरनुदयो यदा।**
**चिद्रूपस्याविवेकः स्यादसावेवाविमर्शतः।**
**सैव मायावृत्तिजालपोषकत्वात्प्रकीर्तिता।**
**अर्थस्मृती स्वात्मसंस्थे चिद्रूपे सा सुषुप्तता।।१.१०।।**

याचा अर्थ असा आहे की, शक्तियुक्त आत्मा असलेल्या ईश्वराच्या

ज्ञान-ज्ञेयरूप शक्तीचा ज्यावेळेला अस्त होतो त्यावेळेला चिद्रूपाचे ज्ञान नष्ट होते व त्या शक्तीला मायावरणामुळे युक्त असल्यामुळे सुषुप्ती असे म्हटले आहे. त्यामुळे विषय व त्यांची स्मृती चिद्रूपात लीन झालेल्या असतात. विषय व त्यांच्या स्मृती मुळीच नसतात असे म्हणता येत नाही; कारण "मी सुखाने झोपलो होतो, त्यामुळे मला काही बाह्य व्यवहारचे ज्ञान झाले नाही" असा सुषुप्तीचा अनुभव सांगता येतो.

या अवस्थेत अविवेक अर्थात् ज्ञानरूप आणि ज्ञेयरूप चिच्छक्तीवर अख्यातीचे अर्थात् आपल्या स्वरूपाच्या पूर्णतेच्या विस्मृतीचे इतके मोठे आवरण पसरते की, चिच्छक्तीची चिद्रूपता आणि बाह्यरूपामध्ये अवभासमान अर्थात् स्पष्ट रूपामध्ये प्रकाशमान होणाऱ्या भाववर्गाचे स्फुटतर रूपामध्ये अर्थात् अत्यंत स्पष्ट रूपामध्ये विवेचनाचे सामर्थ्य पूर्णपणे थांबते. ही अवस्था मृत्यूच्या जडतेप्रमाणे असते, हा यामागील अर्थ आहे. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, "**यस्तु अविवेको विवेचनाभावोऽख्यातिः, एतदेव मायारूपं मोहमयं सौषुप्तम् ।।१.१०।।**" याचा अर्थ असा आहे की, ज्यात बरे-वाईट असे काहीही विवेचन करता येत नाही अशी अवस्था म्हणजे अख्याती अर्थात् नाव न देता येण्यासारखी स्थिती होय. हीच मायारूप मोहमय सुषुप्ती अवस्था आहे. ज्ञानज्ञेयरूपशक्तीवर सुषुप्तीकाळपर्यंत मायीय आवरण पडलेले असते. यामुळे स्पष्टरूपामध्ये बाह्य अर्थाकडे अर्थात् विषयाकडे उन्मुखता किंवा उत्सुकता किंवा इच्छा शक्य होऊ शकत नाही अगर विषयाचा ऐंद्रियबोध अर्थात् इंद्रियांच्या साहाय्याने प्राप्त होणारे ज्ञान किंवा या ज्ञानाची स्मृती संभव किंवा शक्य होऊ शकत नाही. प्रत्यक्षात सुषुप्तीमध्ये सापडलेल्या व्यक्तीची सर्व चेतनाशक्ती शरीर, प्राण, बुद्धी, इंद्रिये इत्यादींपासून संकुचित होऊन पुर्यष्टक प्रमातृभावावर अर्थात् बुद्धी, अहंकार, मन, शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या आठ पुरींनी युक्त अशा जीवभावावर केंद्रित झालेली असते. पुर्यष्टकावर लागलेल्या सुषुप्ती संस्काराचे फलस्वरूप ती व्यक्ती सुषुप्तिकालीन अवस्थेतून बाहेर आल्यावर त्यावेळच्या अवस्थेला अर्थात् सुषुप्तीमधील अवस्थेला अंधुक स्मृतीच्या रूपामध्ये अभिव्यक्त करीत असते अर्थात् जसे की, "मी सुखाने झोपलो होतो. मला काहीही आठवत नाही."

ही अवस्था स्मर्यमाण रूपामध्ये अर्थात् स्मृतिगम्यरूपामध्ये अभिव्यक्त

किंवा स्पष्ट झालेली अवस्था कृत्रिम असते. खरी आत्मानुभूती ही सतत उदीयमान होत असल्यामुळे कधीही स्मर्यमाण अर्थात् स्मृतिगम्य बनू शकत नाही.

**योग्यांच्या दृष्टीने सुषुप्ती :-** योग्यांच्या सुषुप्ती-समाधीची अवस्था ही पशुभावाच्या सुषुप्ती अवस्थेच्या प्रतिकूल असते. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्रवार्तिक**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की -

**अर्थस्मृती स्वात्मसंस्थे चिद्रूपे या सुषुप्तता।**
**पत्युरेवं स्वविश्रान्त्या पशोरावृतिरूपतः।।१.१०।।**

याचा अर्थ असा आहे की, चिद्रूप अशा आत्म्यामध्ये स्थित असलेली विषयांची स्मृती म्हणजे सुषुप्ती होय. ही अवस्था योग्यांना स्वविश्रांती देणारी व जीवाला आवरण करणारी असते.

योग्याच्या समाधीकाळामध्ये त्या योग्याच्या चित्ताची बाह्य भाववर्गाकडे अर्थात् बाह्य जगताकडे उन्मुखता न राहिल्यामुळे सर्व काही स्वरूपामध्ये विश्रांत झालेले असते. याचा परिणाम म्हणून योग्याचा आत्मा हा विशुद्ध चिन्मात्र रूपामध्ये अवस्थित राहत असतो. हेच कारण आहे की, "**ग्राह्य-ग्राहकभेदासञ्चेतनरूपश्च समाधिः सौषुप्तम्, इत्यप्यनया वचोयुक्त्या दर्शितम्।। श्रीशिवसूत्रविमर्शिनी १.१०।।**" म्हणजे यानुसार समाधिनिष्ठ अर्थात् समाधीत असलेल्या योग्याला ज्या अवस्थेत ग्राह्यता अर्थात् स्वीकारण्यास योग्य आणि ग्राहकता म्हणजे जो स्वीकारला जातो तो यांच्या भेदभावाची चेतना किंवा जाणीव प्राप्त करून घेता येत नाही त्या अवस्थेला सुषुप्ती असे म्हटले आहे. यामुळे समाधी अवस्थेमध्ये असलेल्या योग्याचे सर्व भाव हे स्वतःच्या आत्मरूपामध्ये अवभासित अर्थात् प्रकाशित होत असतात. योग्याच्या समाधिकालामध्ये योग्याला त्याच्या स्वतःच्या ज्ञान-क्रियात्मक स्पंदनाची किंवा स्फुरणेची पूर्ण चेतना किंवा जाणीव राहत असते. यामुळे योग्याची समाधी अवस्था ही सामान्य सुषुप्तीतील मूढतेच्या अवस्थेप्रमाणे कदापिही असत नाही. वेदकता किंवा ज्ञेयता किंवा चेतना ही या समाधिकालामध्ये संपूर्णपणे अक्षुण्ण किंवा अखंडित असल्यामुळे या काळामध्ये योग्याला कोणत्याही प्रकारच्या अभावाची किंवा शून्यतेची अनुभूती होत नाही. याबरोबरच अनुभवी श्रीगुरूंचे कथन असे आहे की, समाधी काळामध्ये प्राप्त केलेली स्वरूपाची अनुभूती ही त्रिकालाबाधित अर्थात् भूत-वर्तमान-भविष्य या तिन्ही काळांनी बाधित न

होणारी आणि सतत उदीयमान होत असते. यामुळे अशी अवस्था ही कृत्रिमही नसते आणि अनित्यही नसते.

याचे फल म्हणून श्रीशैवगुरू हे आपल्या यथार्थ अनुभूतीच्या आधारावर असा उपदेश देत असतात की, अभाव समाधी किंवा शून्य समाधी या दोन्ही वर वर्णिलेल्या पशुभावाच्या सुषुप्तीप्रमाणे जड काळाच्या मर्यादेमध्ये किंवा कक्षेमध्ये संकुचित आणि कृत्रिम अवस्था आहेत. कोणतीही आध्यात्मिक अनुभूती अनुभव कालानंतर व्यतीत झालेल्या रूपामध्ये स्मरली जाते. ती अनुभूती केवळ भूतकाळाशी संबंधित असल्यामुळे कालकल्पनेच्या परिधीमध्ये किंवा कक्षेमध्ये सीमित किंवा मर्यादित होत असते. कालाच्या कल्पनेत मर्यादित झाल्यामुळे योग्याची आध्यात्मिक अनुभूती अनित्य बनत असते. आत्मानुभूती ही सतत स्फुरणमयी असल्यामुळे आध्यात्मिक अनुभूतीच्या विपरीत असते. आत्मानुभूती ही अनुभवाच्या काळी आणि स्मृतीच्या काळी एकाच उदीयमान रूपामध्ये अवभासमान किंवा प्रकाशमान राहत असते.

आणखी एक गोष्ट ध्यानात ठेवणे आवश्यक आहे की, अभाव किंवा शून्य याची भावना करणाऱ्या योग्यामध्ये आपल्या विद्यमान सत्तेला ''मी नाही आहे" असे म्हणून आग्रहपूर्वक खोटे ठरविण्याची प्रवृत्ती आढळून येत असते. ही प्रवृत्ती चिद्रूपतेच्या अभावाची नाही तर प्रत्युत अर्थात् दुसऱ्या रीतीने सद्भावाची द्योतक आहे. याचे उदाहरण म्हणून जर एखादी व्यक्ती घरात बसलेली आहे आणि बाहेरून एखादी अशी व्यक्ती येऊन त्या पहिल्या व्यक्तीला बोलावू लागली असताना त्या प्रथम व्यक्तीला या दुसऱ्या व्यक्तीला भेटावयाचे नाही. अशा वेळी ती पहिली व्यक्ती आतून स्वयं "मी येथे नाही आहे," असे म्हणून ओरडू लागली तर अशा वेळी त्या पहिल्या व्यक्तीचा स्वरूप अपलाप अर्थात् स्वतःला लपविण्याचा प्रयत्न त्या पहिल्या व्यक्तीचे तेथे नसण्याचा प्रत्युत अर्थात् त्याच्या विरुद्ध सद्भावाला सहजपणे सिद्ध करीत असतो.

फलस्वरूप कोणती व्यक्ती ही इतकी मूर्ख असेल की जी स्वयं चेतन असून स्वतःलाच अभावरूप किंवा शून्यरूप समजण्याची चूक करील?।।१३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

कारिका क्रमांक १३ ची टीका कारिका क्रमांक १२ बरोबर वर दिलेली आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

पूर्वी सांगितलेल्या अभावाचे भावनाविषयत्व म्हणजेच अस्तित्व कशाच प्रकारे शक्य असत नाही हे आणखी स्पष्ट करण्यासाठी "**अतस्तत्कृत्रिमं .....।।१३।।**" ही कारिका सांगतात.

पशुप्रमात्यांमध्ये म्हणजेच जीवामध्ये जडत्वाचे प्राधान्य असल्याने त्यांची सुषुप्तिदशा संमोहात्मक असते. त्यामुळेच तेथे घट-पटादि ज्ञेय विषयांचे प्रत्यक्ष किंवा स्मरण होत नाही. जरी त्या अवस्थेमध्ये प्राण्यांची चेतनाशक्ती विद्यमान असली तरी ते मूढत्वाने संकुचित होऊन पुर्यष्टकाच्या म्हणजेच मन, बुद्धी, अहंकार व शब्दादि पाच तन्मात्रांच्या भोवतीच केंद्रित होतो. अशा प्रकारे सुषुप्ती काळात झालेल्या संस्कारांच्या फलरूपाने ते प्रमाता अर्थात् जीव जाग्रत अवस्थेत सुषुप्त्यावस्थेत अनुभविलेले अज्ञान किंवा सुख आठवितात. उदा.- "मला काहीच समजले नाही. आम्ही सुखाने झोपलो होतो." अशा प्रकारच्या आठवणीत येणाऱ्या विषयाने त्यांच्या उल्लेखामुळे ही सुषुप्तिदशा कृत्रिम होते. ती स्वाभाविक राहत नाही. समाधीत स्थित असणाऱ्या योग्याचा ग्राह्यग्राहक इत्यादि भेदांचा नाश झाल्याने हे समस्त भावजात पदार्थ त्या योग्याच्या स्वस्वरूपातच प्रकाशित होतात. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथाच्या टीकेच्या विवरणात असे म्हटलेच आहे की -

**ग्राह्यग्राहकभेदासञ्चेतनरूपश्च समाधिः सौषुप्तम्।।**

**अर्थ :-** ज्या अवस्थेत ग्राह्य आणि ग्राहक असा भेद नसतो ती अवस्था म्हणजे समाधी अथवा सुषुप्ती अवस्था होय.

त्यामुळे त्याची (योग्याची) पशुप्रमाणे जडस्थिती कधीच होत नाही; कारण सतत प्रकाशस्वरूपातच गेलेला तो योगी कोणत्या कारणामुळे अभाव किंवा शून्य यांचा अनुभव घेईल?।।१३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**अवस्थायुगलं चात्र कार्यकर्तृत्वशब्दितम्।**
**कार्यता क्षयिणी तत्र कर्तृत्वं पुनरक्षयम्।।१४।।**

**अन्वयार्थ :-**

**अत्र** - या ठिकाणी, स्पंदात्मक आत्मतत्त्वामध्ये, **अवस्थायुगलम्**- दोन अवस्था, अवस्थांची जोडी, **कार्य - कर्तृत्व - शब्दितम्** - कार्य अथवा भोग्य किंवा वेद्य अशी जड, परतंत्र अवस्था (श्रीरामकंठ) आणि कर्तृत्व अथवा भोक्तृत्व किंवा वेदकत्व अशी चेतनयुक्त स्वतंत्र अवस्था (श्रीरामकंठ) या शब्दांनी अभिव्यक्त झाली आहे. "शब्दित" म्हणजे यांच्यामध्ये हा केवळ शाब्दिक - संज्ञामात्र - भेद आहे. तो भेद वास्तव नाही - (श्रीरामकंठ) **तत्र** - त्या ठिकाणी, कार्य व कर्तृत्व यामध्ये, **कार्यता** - कार्यरूपावस्था, भोग्यरूप भेद, **क्षयिणी** - नश्वर, क्षणभंगुर, उत्पन्न होऊन नाश होणारी - (भट्ट श्रीकल्लट), **कर्तृत्व** - कर्तृरूप, भोक्तृरूप, अथवा जाणणारा - **"वेदक"**- हा भेद अथवा अवस्था - चिद्रूप असल्यामुळे - (भट्ट श्रीकल्लट), **पुनरक्षयम्** - कधीही नष्ट होत नाही.।।१४।।

**अर्थ :-** या स्पंदमार्गामध्ये स्पंदात्मक आत्मत्त्वाच्या दोन अवस्थांना कार्यता आणि कर्तृत्व किंवा कर्तृता अशी नावे दिलेली आहेत. या दोन अवस्थांमधील कार्यता ही नश्वर किंवा क्षणभंगुर आहे. परंतु कर्तृत्व हे कधीही नष्ट होत नाही.।।१४।।

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

निरनिराळ्या शास्त्रांमध्ये निरनिराळ्या अवस्थांचे वर्णन केलेले आहे. परंतु त्या अनेक शास्त्रांच्या भानगडीत न पडता सर्व शास्त्रांचे सार ग्राह्य व त्याज्य एवढ्या दोन लक्षणांनी ध्यानात ठेवले पाहिजे. हे विचित्र विश्व अनंत आहे. त्यातले एवढेच ग्राह्य व त्याज्य अगर कार्य व कर्ता या रूपाने श्रीपरमेश्वररूप असा आत्मा एकटाच आहे. हा आत्मा अविनाशी व स्वतंत्र अशा स्वतःच्या शक्तीच्या बळाने वरील दोन रूपाने स्वतःला भासमान करीत आपणाला खेळवीत असतो. त्यांपैकी कर्ता म्हणून जी अवस्था आहे त्याचीच भोक्ता, ज्ञानी, चैतन्य व अहं अशी एक स्वतंत्र अवस्था आहे. दुसरी अवस्था त्याच्याच शक्तीने निर्माण केलेली कार्यरूप, जडरूप किंवा भेदरूप अशा रूपाने वर्णन करण्यात येत असते. परंतु परब्रह्मालाच कर्ता असे वर्णन करण्यात येत असल्याने त्यालाच शक्तिचक्राचे

कार्य असे म्हणण्यात येते. परंतु ती शक्ती या शक्तिमानापासून म्हणजे परब्रह्मापासून मुळीच भिन्न नसते. त्यामुळे एकच कर्ता परमात्मा, ज्ञाता व सर्वांचा अधिष्ठाता हा सतत सर्व ठिकाणी आत्मरूपाने व्यापून आहे. ज्यावेळी नियमित साधनाने असे अनुसंधान आपोआप राहील त्यावेळी साधकाला भवबंधन कधीही व्हावयाचे नाही.

या स्पंदतत्त्वामध्ये कार्य-कर्ता, भोग्य-भोक्ता किंवा दृश्य-द्रष्टा अशा दोन अवस्था आहेत. त्यांना वेद्य व वेदक असे सुद्धा म्हटले जाते. यांच्या भासामुळे जे काय झालेले दिसते ते क्षय-नाश पावणारे व उत्पत्ति-विनाशयुक्त आहे. मात्र जो शुद्ध कर्ता, भोक्ता, द्रष्टा अर्थात् अवेदक आहे तो अक्षय आहे. तो निर्बाध, निरवधी व चित्स्वरूप आहे.।।१४।।

* * * * *

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

व्यापक अहंप्रत्यय किंवा स्वस्वभाव हा अशा प्रकारे नित्योदित व सदा प्रकाशमान तत्त्व आहे. या तत्त्वाचे प्रत्यभिज्ञान न होणे हेच बंधाचे किंवा शक्तिसंकोचाचे कारण आहे. त्यामुळे कोणत्याही अवस्थेत याचे प्रत्यवमर्श अर्थात् त्याला स्पर्श किंवा त्याच्याशी संपर्क करणे हेच उचित आहे. या हेतूने पुढील तीन कारिकांनी या तत्त्वाचे स्वरूप स्पष्ट करून सांगतात.

**स्पष्टीकरण :-** या आत्मनामक परतत्त्वाच्या दोन अवस्था दिसतात. याचा अर्थ असा आहे की, परमार्थतः सत् असलेला एकच आत्मा आपल्या ऐश्वर्यशक्तीने स्वतःलाच अवस्थाद्वयाने अभिव्यक्त करतो. ही त्याची अभिव्यक्ती म्हणजे त्याची क्रीडाच होय. विश्वामधील वैचित्र्य अनंत रूपांनी प्रकट होत असले तरी त्या वैचित्र्यात खरोखरी दोनच तत्त्वे दिसतात. एकच तत्त्व दोन प्रकारे प्रकट होते असा याचा अर्थ आहे. त्यामुळेच त्या प्रकारांना "अवस्थायुगल" असे म्हटले आहे. या दोन अवस्थांपैकी कर्तृत्व, ज्ञातृत्व, भोक्तृत्व, चेतनभाव यांनी युक्त असणारी "अहं" अशी एक अवस्था व तद्विपरीत कार्यत्व, ज्ञेयत्व, भोग्यता व जडता यांनी युक्त असलेली अशी दुसरी अवस्था आहे. यात पहिली स्वतंत्र व दुसरी परतंत्र अवस्था आहे. या दोन अवस्थांमध्ये वास्तविक भेद नसून तो केवळ नावापुरताच आहे असे "शब्दित" या पदाने

दाखविले आहे. यातील कर्तृरूप जी अवस्था सांगितली तिला प्रकाशमानता हा धर्म आहे व कार्यात्मक जी अवस्था सांगितली तिला प्रकाशमानता नसेल तर अस्तित्वच असू शकत नाही. याचा अर्थ असा की, कार्यरूप अशी स्वतंत्र अवस्था कल्पावयाची असेल तर तिचाही प्राणभूत धर्म प्रकाशमानताच असावयास पाहिजे. त्याखेरीज तिची सत्ता जाणवणारच नाही. आता मुळात जड म्हणून कल्पिलेल्या कार्यावस्थेत ही प्रकाशमानता कोठून येईल? ती अर्थातच नित्य प्रकाशमान आत्मरूप कारणापासूनच येईल. याचा अर्थ असा की, या दोन अवस्था मुळात अभिन्न आहेत; कारण प्रकाशमानता ही दोहोतही अनुस्यूत आहे. मग या दोन अवस्थांचे नाते काय? याचे उत्तर असे की, कार्यरूप अवस्था ही कारणभूत आत्मरूप अवस्थेचाच विकास आहे. अर्थात् कार्यरूप विश्व हा स्वस्वभावाचाच विकास आहे. यालाच श्रीशंकरांचे शक्तिचक्ररूप वैभव असे पहिल्या कारिकेत म्हटले आहे. कार्य हे अनित्य असते म्हणून कार्यता ही क्षयिणी होय व कर्तृत्व हे आत्मरूप असल्याने ते नित्य म्हणजे अक्षय होय.।।१४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## कर्तृत्वाची अनश्वरता अर्थात् स्थिरता

स्पंदात्मक अर्थात् स्फुरणशील आत्मतत्त्वाच्या वेदकरूप अर्थात् जाणणारा (जीव) आणि वेद्यरूप अर्थात् ज्ञानरूप (श्रीशिव) अशा दोन अवस्था आहेत. या अवस्थांना शास्त्रीय शब्दामध्ये क्रमशः कर्तृता आणि कार्यता अथवा भोक्तृता आणि भोग्यता असे म्हणतात. यातील कर्तृतारूप अवस्था हेच आत्म्याचे वास्तविक रूप आहे. कार्यता हे आत्म्याच्या द्वारा स्वतः अंगीकृत केलेले कृत्रिम रूप आहे. हेच कारण आहे की, कर्तृता ही प्रथम अवस्था अनश्वर आहे आणि दुसरी भोक्तृता ही नश्वर अवस्था आहे अर्थात् विनाश पावणारी अवस्था आहे. या सूत्र क्रमांक १४ मध्ये चित्तत्त्वाच्या या दोन अवस्थांवर प्रकाश टाकण्यात येत आहे.

**वृत्ती :-** (स्पंदात्मक आत्मतत्त्वाच्या) दोन अवस्था आहेत. या दोन अवस्थांना कार्यता आणि कर्तृत्व (कर्तृता) अशी नावे दिलेली आहेत. यात फरक किंवा भेद असा आहे की, एक अवस्था भोग्य अर्थात् जिचा भोग घेतला जातो अशी आणि दुसरी अवस्था भोक्ता अर्थात् भोग घेणारी

अशी आहे. यामधून जो भोग्य नावाचा भेद आहे तो उत्पन्नही होतो आणि नष्टही होतो. परंतु भोक्ता या नावाचा भेद हा चित्स्वरूप असल्यामुळे उत्पन्नही होत नाही आणि कधी नष्टही होत नाही. यामुळे हा चिद्रूप भोक्ता नित्य आहे.।।१४।।

**विवरण :-** या आधीही शैवदर्शनाच्या या सिद्धान्ताचा उल्लेख करून झालेला आहे की, अहं विमर्शात्मक अर्थात् स्वविचारात्मक स्पंदतत्त्व हे स्वतंत्र असल्यामुळे प्रतिक्षण दोन प्रकारच्या अवस्थांमध्ये स्पंदायमान राहत असते. यांमधील पहिली अवस्था सामान्य असून दुसरी अवस्था ही विशेष अवस्था आहे. सामान्य अवस्था ही कोणत्याही प्रकारच्या उपरागाने अर्थात् आसक्तीने रहित असून विशुद्ध चिद्रूपतेची अवस्था आहे. या अवस्थेमध्ये बाह्य प्रमेयवर्ग अर्थात् बाह्य भाववर्ग किंवा जगत् हे विभागहीन अर्थात् अखंड अहंविमर्शाच्या अर्थात् स्वविचाराच्या रूपामध्येच अवस्थित राहत असते. या सूत्रामध्ये याच अवस्थेला कर्तृत्वाची अवस्था असे नाव दिलेले आहे. दुसऱ्या विशेष अवस्थेमध्ये मौलिक अर्थात् मौल्यवान चिद्रूपता स्वतःच उत्पादित केलेल्या अख्यातीच्या अर्थात् स्वतःच्या स्वरूपाच्या विस्मृतीच्या द्वारा आपल्या वास्तविक किंवा खऱ्या रूपाला आच्छादित किंवा आवृत करीत असते अर्थात् झाकून टाकीत असते. ही मौल्यवान चिद्रूपता देह, प्राण, बुद्धी, ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये अथवा घट, पट इत्यादि अनंत तसेच विचित्र जड वेद्य अर्थात् ज्ञेय अर्थात् ज्ञान करून घेण्यास योग्य पदार्थांच्या रूपामध्ये अवभासमान किंवा प्रकाशमान झालेली आहे. या अवस्थेला प्रस्तुत सूत्रामध्ये कार्यतेच्या अवस्थेचे नाव दिलेले आहे. आचार्य श्रीमद् अभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटलेले आहे की, **"निरावरणमाभाति भात्यावृतनिजात्मकः।। तंत्रालोक १.९३।।"** अर्थात् मौलिक परमतत्त्व हे आपल्या स्वातंत्र्यामुळे प्रतिक्षण आवरणरहित अर्थात् वेदक किंवा ज्ञाता अर्थात् ज्ञान प्राप्त करून घेणारा पुरुष आणि आवरणसहित अर्थात् वेद्याच्या किंवा ज्ञेयाच्या अर्थात् ज्ञान करून घेण्याच्या पदार्थाच्या रूपामध्ये स्वयं अवभासमान किंवा प्रकाशमान झालेले आहे. हे परमतत्त्व युगपत् अर्थात् एकाच वेळी कर्तृतेची अवस्था आणि कार्यतेची अवस्थाही आहे. पहिल्या रूपामध्ये हे परमतत्त्व अपरिणामी अर्थात् परिणाम न होणारे, अविचल आणि अनश्वर अर्थात् अविनाशी आहे आणि दुसऱ्या

रूपामध्ये हे परमतत्त्व परिणामी अर्थात् परिणाम पावणारे, चल आणि नश्वर अर्थात् नाश पावणारे असे आहे.

अनुभवी शैवगुरूंनी तुरीयारूप शाक्तभूमिकेचा यथार्थ अनुभव प्राप्त करून घेऊन ही गोष्ट स्पष्ट केलेली आहे की, शक्तीच्या कर्तृत्व अंशामध्ये कोणत्याही अवस्थेमध्ये कोणतेही परिवर्तन होत नाही. वेदकतेचा किंवा ज्ञातृतेचा भाव शाश्वतरूपामध्ये अटळ अर्थात् न टळणारा तसेच अक्षुण्ण अर्थात् अखंडित आहे; कारण हेच शक्तीचे वास्तविक किंवा यथार्थ किंवा खरे रूप आहे. कार्यता अर्थात् कार्याच्या अंशामध्ये देश, काल तसेच आकार यांच्या भेदानुसार उतार-चढाव अथवा उदय-अस्त हे होतच राहतात. समाधीच्या अवस्थेमध्ये कार्यतेचा अर्थात् कार्याचा क्षय होत असतो. याचा खरा अर्थ असा आहे की, कार्यता ही संहृत अर्थात् संहारणी होऊन कर्तृतेमध्ये अर्थात् मूळ स्वरूपात किंवा तत्त्वात विश्रांती प्राप्त करून घेत असते. कार्यता ही आपल्या विशुद्ध अर्थात् अत्यंत शुद्ध ज्ञानक्रियात्मक चिद्रूपामध्ये अवभासित किंवा प्रकाशमान राहते.।।१४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :- (कारिका क्रमांक १४ ते १६)**

**"यत्र स्थितम्"** या कारिकेत चिद्रूपच विश्वकार्याचे रूप ग्रहण करते असे सांगितले. त्यामुळे ध्यानातून उत्थापित झालेले कृत्रिम स्वरूपाचे अभावात्मक रूप त्या चिद्रूपानेच स्वीकारलेले असते. अशा स्वरूपामध्ये ह्या चिद्रूपाचे अनवच्छिन्न चमत्काररूप आणि अमूढत्व कसे काय शक्य आहे? या शंकेचे उत्तर १४, १५ व १६ या तीन कारिकांच्या द्वारा दिलेले आहे.

**स्पष्टीकरण :-** या स्पंदतत्त्वात कार्यत्व आणि कर्तृत्व या शब्दांनी सांगितलेल्या दोन भिन्न प्रकारच्या अवस्था केवळ शब्दव्यवहारासाठी आहेत. वास्तविक पाहता हे एकमेव स्वतंत्र आणि प्रकाशघन श्रीशंकरस्वरूप तत्त्वच या दोन्हींमधून व्यक्त होते. क्रियेने व्याप्त आणि प्रकाशाशी अभेदरूप असणारे हे तत्त्व कर्त्याच्या अस्तित्वाहून वेगळे असत नाही. ते ज्यावेळेस क्रियेशी एकरूप व्यक्त होते त्यावेळेस ते तत्त्व, भुवन, शरीर आणि त्यांचा अभाव यांच्या रूपाचे ग्रहण करते; त्यामुळे त्याला कार्य असे म्हणतात. कारण या स्पंदतत्त्वाशिवाय अन्य कोणालाही कारणत्व देता येत नाही.

यासंबंधी **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**जडस्य तु न सा शक्तिः सत्ता यदसतः सतः।**
**कर्तृकर्मत्वतत्त्वैव कार्यकारणता ततः।।२।४।२।।**

**अर्थ :-** असत् आणि सत् यांची जी सत्ता आहे ती जडाची शक्ती नाही. त्यामुळे कर्तृता आणि कर्मता हेच कार्य आणि कारणता आहेत.

या विश्वाचे हे कार्यत्व विविध देश, कालादि आभासांच्या संयोजन आणि वियोजन अशा क्रमाने अनंत प्रकारच्या चिदात्मक स्वरूपाहून अनतिरिक्त अर्थात् स्पंदतत्त्वाशी एकरूप असूनही आरशात पडलेल्या प्रतिबिंबाप्रमाणे देहनीलादि आभासांना अतिरिक्त अर्थात् स्पंदतत्त्वाहून वेगळे असल्याप्रमाणे आभासित करते. जे काही भासित होत असते ते सर्व आभास्यमान अर्थात् प्रकाशित होणाऱ्या धर्माने युक्त असल्याने बहिर्मुख रूपाने क्षय होणाऱ्या धर्माचे असते.

येथे **"क्षय"** याचा अर्थ इदंताभासातून निमज्ञन होऊन अर्थात् इदंतेमधून बाहेर येऊन अहंतारूपामध्ये अवस्थान करणे म्हणजेच स्वरूपामध्ये स्थित राहणे होय. त्यामुळेच देहादींचे ग्रहण करणारा जो वेद्यांश (ज्ञेयांश) आहे तोच श्रीपरमेश्वरांकडून निर्मिला जातो आणि संहारिला जातो. (म्हणजेच देह इत्यादि निर्माण केले जातात आणि नष्ट केले जातात.) अहंताप्रकाशात्मक कर्तृरूपाने त्याने देह इत्यादि विषयांमध्ये प्रवेश केलेला असूनही सृष्टी आणि लय होत नाही; कारण हे कर्तृरूप श्रीभगवंतांशी एकरूप आहे. त्यामुळे या कार्यत्व आणि कर्तृत्व यांच्यामधील कार्यत्व हे क्षय किंवा नष्ट होणारे असून कर्तृत्व चित्स्वातंत्र्यरूप असल्याने अक्षय आहे अर्थात् त्याचा नाश होत नाही. जगताच्या उत्पत्ती आणि स्थिती या दोन्ही अवस्थांच्या वेळेस ह्या स्पंदतत्त्वाचा स्वभाव स्वतःच्या रूपापासून ढळत नाही. जर हा "स्व"भाव ढळला किंवा त्याच्या "स्व"भावापासून हे तत्त्व दूर गेले तर सृष्टी आणि प्रलय हे अभिव्यक्तच होणार नाहीत. त्यामुळे मूढादि अवस्थेतही हे चमत्कारसार अमूढत्व अर्थात् चैतन्यरूप स्पंदतत्त्व अखंडच राहते.

## प्रतिपक्षाचा आक्षेप

अभावसमाधीच्या कृतीत सुषुप्ती आदि अवस्थांमध्येही या तत्त्वाचा कर्तृत्वरूपाने प्रत्यय येत नाही; कारण तेथे कोणती प्रवृत्ती अथवा क्रियाच दिसत नाही.

### सिद्धान्तीचे उत्तर

तुम्ही जे म्हणता ते खरे आहे. कार्यास प्रवृत्त झालेला म्हणजेच इंद्रियादींना कार्य करण्यासाठीच्या प्रेरणेने युक्त असा व्यापारप्रवण जो प्रयत्न किंवा संरंभ असतो तो या क्षय होणाऱ्या कार्यात लुप्त होतो. त्याचा लोप झाल्यावर अथवा हा प्रयत्न नष्ट झाल्यावर अभावसमाधीमुळे ज्याचे आत्मरूप झाकले गेले आहे असा मूढ साधक आपणही नष्ट झालो आहोत असे मानतो. परंतु जो अहंताप्रकाशरूप, सर्व गुणांचे स्थान असणारा स्वभाव आहे (तो या सर्व कर्तृत्वादि वस्तूंचे उपलक्षण अर्थात् चिह्न आहे.) त्याच्याबाबतीत नाश किंवा संहार कधीही शक्य नाही; कारण त्या अंतर्मुख स्वभावाच्या नाशाचे ग्रहण करणारा अथवा त्याचे ज्ञान ज्याला होते असा ग्राहक किंवा ज्ञाता कोठेही अस्तित्वात नाही. जर असा कोणी ज्ञाता सापडला तर त्याला या अंतर्मुख स्वभावाच्या चिद्रूपाचेच ज्ञान होते असे म्हटले पाहिजे. जर स्पंदतत्त्व किंवा "स्व"भावाच्या नाशाचे ज्ञान होणारा असा ज्ञाताच सापडत किंवा मिळत नसेल तर तुम्ही एवढ्या निश्चितपणे असे कसे काय म्हणू शकता की, लोपदशा (स्पंदतत्त्वाचा नाश) अस्तित्वात आहे?

### प्रतिपक्षाचा आक्षेप

प्रतिपक्षी यानंतर असे विचारतो की, यावर असे म्हणता येईल की, अन्य कोणालाही त्या लोपदशेचे ज्ञान होत नसले तरीही त्या प्रकाशरूप आत्म्याला हे ज्ञान होते.

### सिद्धान्तीचे उत्तर

त्यावर ग्रंथकार असे म्हणतात की, तर मग त्या अंतर्मुख स्वभावाचा म्हणजेच स्पंदतत्त्वाचा अभाव असणे कसे काय शक्य आहे? आणि त्याचप्रमाणे "**अन्यस्यानुपलम्भनात्**" या कारिकेतील पदांचे स्पष्टीकरण वरील म्हणण्यानुसार अन्य कर्त्याकडून होणाऱ्या ज्ञानाच्या किंवा ग्रहणाच्या अभावामुळे असे करावे लागेल. ज्याप्रमाणे घटाचा अभाव घटाशिवाय असणाऱ्या जमिनीच्या ज्ञानामुळे निश्चित केला जातो त्याप्रमाणे आत्म्याचा अभावही आत्मविरहित कोणत्यातरी गोष्टीच्या ज्ञानामुळे निश्चित करावा. परंतु या स्थितीत उपलंभक म्हणजेच ग्रहण करणाऱ्याची सत्ता किंवा अस्तित्व आवश्यक असते. त्यामुळे स्वात्मग्राहकाचा अभाव हा सिद्धच होत नाही.

जर तो (अंतर्मुख स्वभाव) कार्याला प्रवृत्त करण्याच्या प्रयत्नांमध्ये लुप्त होणारा असेल तर त्यानंतरच्या काळी अन्य कोणत्याही प्रयत्नाचे ग्रहण होणार नाही म्हणजेच अन्य प्रयत्नांच्या ग्रहणाचा अभाव प्राप्त होईल.

त्याशिवाय या मूढ लोकांकडून अन्य बहिर्मुख प्रयत्नांचे सुषुप्ती आदि अवस्थांमध्ये ग्रहण होत नसतानाही अंतर्मुख स्पंदतत्त्वाचा लोप होतो अशी शंका कशी उत्पन्न केली गेली? कारण एकाचा लोप होत असताना त्याचा दुसऱ्यावर कोणाताही परिणाम होत नाही हे त्यांना माहीत आहे.

अन्य कार्योन्मुखप्रयत्नाच्या ग्रहणाने आणि अभाव व्यक्त होत असल्याने त्या अंतर्मुख प्रकाशरूप स्पंदतत्त्वाचे ग्रहण करणाऱ्याचा अभाव कधीही शक्य नाही. हे जे अंतर्मुख तत्त्व सर्वज्ञत्व गुणांचे स्थान आहे ते अभाव दशेला जाणते. असे जर नसेल तर ती अभाव दशाच अस्तित्वात राहणार नाही. "**अन्यस्य**" ही षष्ठी प्रथमा आणि द्वितीया किंवा कर्ता आणि कर्म यांचा अर्थ दाखविण्यासाठी वापरली आहे. अंतर्मुख स्पंदतत्त्वात कार्यत्वाच्या विरोधी असल्याप्रमाणे कर्तृत्वाची संभाव्य अवस्था असते असे सांगितले आहे. वस्तुतः वर सांगितल्यानुसार कार्यत्व हे सुषुप्ती इत्यादि अवस्थांचा अनुभव घेणारेच असते. अंतर्मुख म्हणजे "ज्याच्यामध्ये पूर्णाहंतात्मक प्राधान्य आहे" असा अर्थ योजावा.।।१४।।१५।।१६।।

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

स्पंदात्म्याच्या म्हणजेच आत्मतत्त्वाच्या दोन प्रकारच्या अवस्था "**अवस्था युगलं .....।।१४।।**" या करिकेत दाखवितात. स्पंदभिंतीवर किंवा स्पंदरूप भूमीवर दोन अवस्था असतात. त्यांपैकी एक अवस्था कर्तृत्वरूप असते आणि दुसरी अवस्था कार्यरूप असते. त्या दोन्ही अवस्थांचा भोक्तृत्व आणि भोग्यत्व या शब्दांनी शास्त्रामध्ये व्यवहार होतो. तेथे त्रिकालाबाधित आत्म्याची कर्तृत्त्व आणि भोक्तृत्त्वरूपस्थिती ही पारमार्थिक नित्य असून कार्यत्वरूप स्थिती भोक्त्याने स्वतःच अंगिकारिलेली असल्याने ती कृत्रिम किंवा अनित्य अवस्था आहे. कार्यत्वरूप अवस्था प्रतिक्षण उत्पत्ती आणि विनाश होण्याच्या स्वभावाने युक्त आणि सकारण असते. त्यामुळेच ती "कृत्रिम" या शब्दाने संबोधिली जाते. कर्तृत्वरूप अवस्था ही विशुद्ध चिद्रूप-अहंचमत्कार रूपाने प्रस्फुरित होते. तेथे निखिल प्रमातृप्रमेय युक्त हे विश्व मंडल अर्थात् प्रमाता (जीव) आणि प्रमेय (ज्ञेय वस्तूंनी) यांनी युक्त हे विश्व अहंज्ञानामध्ये विश्रांती घेते. त्यामुळे ही अवस्था

पारमार्थिक, सद्रूप आणि अनश्वरस्वभाव अर्थात् शाश्वत स्वभावाची असते.।।१४।।

❋❋❋❋❋

**कार्योन्मुखः प्रयत्नो यः केवलं सोऽत्र लुप्यते।**
**तस्मिंल्लुप्ते विलुप्तोऽस्मीत्यबुधः प्रतिपद्यते।।१५।।**

**अन्वयार्थ :-**

**अत्र** - या समाधिकालात, **केवलम्** - फक्त, केवळ (एवढेच होते की), **यः** - जो, **कार्योन्मुखः प्रयत्नः**- कार्य संपादन करण्यात प्रवण असलेला- शब्द, स्पर्श इत्यादि (बाह्य विषय ग्रहण करण्याचा बाह्य इंद्रियांचा व्यापार), **लुप्यते** - लुप्त होतो, **तस्मिन् लुप्ते** - तो व्यापार लोप पावला म्हणजे, **विलुप्तः अस्मि** - मी लोप पावलो, **इति अबुधः प्रतिपद्यते** - असे अबुध-अज्ञानी योगी मानतो.।।१५।।

**अर्थ :-** या समाधिकाळामध्ये केवळ एवढेच होते की, कार्योन्मुख प्रयत्न अर्थात् कार्य संपादन करण्यास प्रवण असलेला शब्द, स्पर्श इत्यादि बाह्य विषय ग्रहण करण्याचा बाह्य इंद्रियांचा व्यापार लुप्त होत असतो. इंद्रियांचा व्यापार लुप्त झाला की, "मी लोप पावलेलो आहे अर्थात् मी अभावामध्ये लय पावलेलो आहे," असे अबुध किंवा अज्ञानी योग्याला वाटू लागते.।।१५।।

❋❋❋❋❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

ज्यावेळी कोणतेही कर्म करण्याचा संकल्प मनात उत्पन्न होईल त्यावेळी त्याक्षणी संकल्प दडपून टाकून साधकाने स्वस्वरूपी जागृत राहावे म्हणजे मी ब्रह्म आहे असे चिंतन करावे. साधक संकल्पास दडपू लागला की, त्यास असे वाटू लागते की, आपण असून नसून सारखेच! या स्थितीत साधक आत्मरूप पूर्णपणे विसरलेला असतो; कारण ते स्वरूपज्ञान स्वरूप आहे असे त्याचे आत्मस्वरूपाविषयीचे बोलणे हेच त्याचे पूर्ण अज्ञान असते.

देवदत्त नावाचा गृहस्थ घरात असूनही जेव्हा त्याला कोणी बोलवावयास येतो तेव्हा काही कारणामुळे त्याला बाहेर जावयाचे नसते किंवा दुसऱ्यास भेटावयाचे नसते तेव्हा तो स्वतःच देवदत्त घरात नाही असे सांगतो.

त्यावेळेला मी नाही असे सांगतानाच मी स्वतः आहे असे ज्ञान त्याला पूर्णपणे असते. त्याचप्रमाणे अभाव समाधीत "मी समाधीत शून्यच होतो," असे जेव्हा साधक सांगतो तेव्हा त्या अवस्थेत आपण कधीही नव्हतो असे जे साधकाला वाटते ती स्वस्वरूपाची भ्रांतीच आहे. त्या स्थितीत काहीही करावयाचे नसल्याने इंद्रियांचा व्यापार बंद होताच मी स्वतःच नाही असे त्याला वाटावयास लागते. असे जे साधकाला वाटते हीच त्याची भ्रांती होय. खरा तो आत्मस्वरूपात जागृतच असतो. वरील देवदत्ताच्या उदाहरणाप्रमाणे आपण असूनही आपण नाही असे तो समजतो.

बाह्यार्थ कार्यवर्ग जेव्हा क्षीण होऊ लागतो तेव्हा कार्यसंपादनानुकूल बाह्येंद्रियांचा व्यापाररूप प्रयत्नही थांबतो. तो आकुंचित होऊन आत्म्यामध्ये विलीन होतो. अशा प्रकारे कार्यवर्ग आत्म्यामध्ये लीन झाला की, दृष्टोत्पत्तीस येत नाही. इंद्रियांचे कार्यच थांबले तर प्रयत्नांचे सामर्थ्य राहिले कोठे? वास्तविक पाहता या आकुंचनीकरणामध्ये म्हणजे आत्मविलिनीकरणामध्ये प्रयत्न थांबतात किंवा लुप्त होतात. परंतु अज्ञानी मनुष्य आपणच नष्ट व नाहीसे झालो आहोत असे मानतो. वस्तुतः चिद्रूप आत्मतत्त्वाचा विनाश कधीही होत नाही. शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "शरीराचा नाश झाला तरी चैतन्याचा नाश होत नाही." सूर्यकांतमणी जरी नाहीसा झाला तरी त्यामुळे सूर्याची काहीही हानी होत नाही. असे का होते याचे स्पष्टीकरण पुढील कारिकेत केले आहे.।।१५।।

*****

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

पण ही जी कर्तृत्वावस्था तुम्ही अक्षय म्हणून सांगता तिचा नित्य प्रत्यय तर येत नाही मग तिची अक्षयता कशी उत्पन्न होणार? यावर उत्तर-

**स्पष्टीकरण :-** कोणत्याही निर्मितीकरिता उन्मुख असणारा प्रयत्न म्हणजे सहज उत्साह होय. ज्यावेळी कार्य स्थूल रूपात प्रकट झालेले नसते त्यावेळी हा उत्साह अभिव्यक्त झालेला नसतो एवढेच. याचा अर्थ तो नसतोच असा नाही; कारण अनभिव्यक्त रूपात तो उत्साह आत्म्याच्या ठिकाणी अवस्थित असतोच. या अनभिव्यक्तिमुळेच केवळ त्याची अक्षयता बोधहीन माणसाला प्रतीत होत नाही.।।१५।।

*****

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

**समाधीमध्ये केवळ कार्यतेचा**
**अर्थात् उभारणीच्या इच्छेचा लोप**

समाधिकालामध्ये सतत स्पंदन किंवा स्फुरण पावणारी कर्तृता किंवा वेदकता किंवा जाणून घेण्याची वृत्ती बाह्य प्रमेयवर्गाकडे अर्थात् बाह्य जगताकडे उन्मुख किंवा उत्सुक न झाल्यामुळे अर्थात् बहिर्मुख न झाल्यामुळे आपल्याच कार्यतेच्या अंशाला आपल्या स्वतःमध्येच विलीन करीत असते. अशा रीतीने ही कार्यता अर्थात् उभारणीची इच्छा विशुद्ध चिन्मात्र रूपामध्येच अवस्थित राहते. अशा अवस्थेमध्ये सुप्रबुद्ध अर्थात् ज्ञानी किंवा विद्वान् योगिजन त्या चिन्मात्ररूपतेला ओळखण्यास समर्थ होत असतात. अभावाची भावना करणारे योगी प्रत्यक्षात अबुद्ध किंवा अज्ञानी असतात. त्यामुळे समाधिकालामध्ये कार्यतेचा अर्थात् उभारणीच्या इच्छेचा अंश विलीन होताच त्या योग्यांना "आम्ही अभावामध्ये लय पावलेलो आहोत" असे वाटू लागते. सूत्र क्रमांक १५ मध्ये या रहस्याचे उद्घाटन केलेले आहे.

**वृत्ती :-** समाधिकाळामध्ये शब्द, स्पर्श आदि विषय ग्रहण करण्याचा व्यापार किंवा इंद्रियाचे हे कार्य सिद्ध करण्याचे सामर्थ्य लुप्त होऊन जाते. बाह्य इंद्रियांचा उपशम झाल्यावर आणि या बाह्य इंद्रियांचे विषय ग्रहण करण्याचे सामर्थ्य लुप्त झाल्यावर अबुद्ध किंवा अज्ञानी "माझ्या स्वभावाचाच लोप झालेला आहे," असे समजू लागतो. त्रिकालाबाधित सत्ता असलेल्या भावाचा कधीही विनाश होत नाही.।।१५।।

**विवरण :-**

अभाववादी लोक हे कोणत्याही पदार्थाच्या सत्तेच्या अनस्तित्वालाच वास्तविक यथार्थ मानीत असतात. या विषयावर या आधीही प्रकाश टाकलेला आहे. अभाववादी लोकांच्या मतानुसार हाच सिद्धान्त आत्म-सत्तेलाही लागू होतो. हेच कारण आहे की, हे अभाववादी लोक ही अनस्तित्वाची अर्थात् अभावाची अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी प्रतिक्षण "मी नाही आहे, माझा भाव नाही आहे," अशा प्रकारच्या भावनेचा अभ्यास करीत राहतात. निरंतर अभ्यास करीत असताना कधी कधी अशा एखाद्या योग्याचा समाधिकालामध्ये इंद्रियांचा व्यापार विरत अर्थात् परावृत्त झाल्यावर बाह्य विषयांशी पूर्णपणे संबंधविच्छेद किंवा संबंधनाश

होत असतो. त्यावेळी योग्याच्या बाह्य इंद्रियवर्गामध्ये आपले शब्द, स्पर्श आदि विषयांना ग्रहण करण्याचे सामर्थ्य राहत नाही, याचे कारण योग्याची चेतना ही बहिर्मुखतेपासून निवृत्त होऊन अंतर्मुख होऊ लागते. या अवस्थेमध्ये योगी अबुध अर्थात् बोधरहित झाल्यामुळे "मी अर्थात् माझ्या आत्म्याचा स्वभावामध्येच लय झालेला आहे," असे तो समजू लागतो.

समाधिकालामध्ये अशा अवस्थेचा उदय होणे हे केवळ साधनेची अपरिपक्वता आणि साधकाच्या अबुधतेचे परिचायक अर्थात् परिचय देणारे आहे, हे सांगण्याचे काहीच कारण नाही. सुप्रबद्ध योगी हेच आपल्या पुरुषार्थाने या अवस्थेला पार करून तुरीयारूप शाक्तभूमिकेचा साक्षात्कार करून घेण्यास समर्थ असतात. या तुरीया भूमिकेवर पोहोचल्यावर आपल्या ज्ञानक्रियामयी स्पंदनाने किंवा स्फुरणाने योग्याला पूर्ण वेदकतेची अर्थात् ज्ञातृतेची अनुभूती होत असते. यामध्ये पूर्णपणे श्रीसद्गुरूंच्या कृपेचीच अपेक्षा असते.

या संबंधामध्ये ही गोष्ट लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे की, कार्याकडे उन्मुख अर्थात् कार्य करण्यास उत्सुक प्रयत्न लुप्त होण्याच्या अवस्थेमध्ये जर कर्तृत्वाच्या अंशाचा पूर्णपणे खरोखरच लोप किंवा नाश झाला असता तर त्या सर्वाभावाच्या अवस्थेमध्ये सर्वाभावाची अनुभूती येणे कोणाला शक्य झाले असते? असे कोणते तत्त्व आहे की, जे एकीकडे स्वतःला "अहं रूपामध्ये" सत्ता देत असते तर दुसरीकडे अभावामध्ये लय होऊन अशा लयीभवनाच्या अनुभूतीला अभिव्यक्त करीत असते? याचा परिणाम म्हणून हे एक तथ्य आहे की, योग्यामध्ये अथवा सर्वसाधारण जीवधारी व्यक्तीमध्येही जी ही "अहंरूप" प्रतीती किंवा अनुभूती विद्यमान आहे ती प्रतीती हाच वेदकतेचा अर्थात् ज्ञातृतेचा अंश आहे. वेदकतेच्या या अंशामध्येच अनुभव घेण्याची, विचार करण्याची, समजण्याची किंवा कोणत्याही प्रकारची अनुभूती अभिव्यक्त करण्याची शक्ती असते. हाच अंश अभावालाही अभावाच्या रूपामध्ये (अर्थात् न होण्याच्या भावरूपामध्ये) सत्ता देऊन त्याची अनुभूती प्राप्त करून घेत असतो. यामुळे अभाववादी लोकांची सर्वाभावाप्रमाणे कपोलकल्पित अवस्था ही मूढतेच्या अवस्थेव्यतिरिक्त अन्य काहीही नाही.।।१५।।

* * * * *

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

कारिका क्रमांक १५ ची टीका कारिका क्रमांक १४ मध्ये समाविष्ट आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

अभावाची भावना करणारा योगी सर्वथा अप्रबुद्ध असतो, या विषयी थोडाही संशय घेऊ नये. हेच **"कार्योन्मुखः प्रयत्नो यः .....।।१५।।"** या कारिकेत सांगितले आहे. कारण समाधिकाळामध्ये "स्व"चा कार्यत्वांश विलुप्तावस्थेत जागा केला जातो. या कारणामुळे "मी अहंभावाला प्राप्त झालो आहे" असे त्याला वाटू लागते. समाधिदशेमध्ये बाह्य इंद्रियांचा व्यापार होतच नाही. या हेतूने त्याचा म्हणजेच त्या योग्याचा शब्दादिविषयांसह संबंधविच्छेद होतो अर्थात् शब्दादिविषयांशी त्याचा संबंध तुटतो. अशा प्रकारे तो योगी संबंधविच्छेदामुळे इंद्रियांच्या विषयग्रहणसामर्थ्याने रहित होतो. त्यामुळे अभाववादी योगी माझ्या "स्व"भावाचा लोप झाला असे मानू लागतो. परंतु ज्ञातृत्व अंशाचा कोणत्याही अवस्थेत लोप होत नाही. अविनाशीभावरूपाच्या वस्तूचा लोप होणे शक्यच नाही. कारण त्रिकालाबाधित भावरूप पदार्थाचा विनाश होणे शक्यच नाही. कर्तृत्वावस्था पारमार्थिक आहे हे तर आधीच सांगितले.।।१५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**न तु योऽन्तर्मुखो भावः सर्वज्ञत्वगुणास्पदम्।**
**तस्य लोपः कदाचित्स्यादन्यस्यानुपलम्भनात्।।१६।।**

**अन्वयार्थ :-**

**तु** - परंतु, **यः** - जो, **अन्तर्मुखः** - स्पंदरूप चेतनसत्ता अथवा आत्मा, **सर्वज्ञत्वगुणास्पदम्** - सर्वज्ञत्व, सर्वकर्तृत्व इत्यादि गुणांचे आश्रयस्थान असलेला, **तस्य** - त्याचा, **लोपः** - लोप, **न कदाचित् स्यात्** - केव्हाही होणार नाही. कारण (समाधी अवस्थेमध्ये) **अन्यस्य**- आत्मस्वरूपाव्यतिरिक्त दुसरी सत्ता अथवा दुसऱ्याचे अस्तित्व, **अनुपलम्भनात्** - (आढळत नाही. अनुभवास येत नाही.)।।१६।।

**अर्थ :-** परंतु ती अंतर्मुख अर्थात् शाश्वत अहंरूपामध्ये स्पंदायमान होणारी स्पंदरूप चेतनसत्ता अथवा स्पंदायमान होणारा आत्मा सर्वज्ञत्व,

सर्वकर्तृत्व इत्यादि गुणांचे आश्रयस्थान आहे. या चेतनसत्तेचा किंवा आत्म्याचा केव्हाही लोप होत नाही; कारण समाधी अवस्थेमध्ये आत्म-स्वरूपाव्यतिरिक्त दुसरी सत्ता अथवा दुसऱ्याचे अस्तित्व आढळत नाही किंवा अनुभवावयाला येत नाही.।।१६।।

*****

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

श्रीपरमशिव किंवा चैतन्य वस्तू ही सत्यत्वाने तद्रूप असून समाधी आदि कोणत्याही कालामध्ये त्या स्वरूपाचा उच्छेद किंवा नाश होऊ शकत नाही. परंतु त्या अवस्थेत आत्म्याशिवाय दुसरी कोणतीही अनित्य अशी वेद्यवस्तू त्याला अनुभविता न आल्याने तो त्या स्थितीमध्ये आत्मा नाहीच असे म्हणत असतो. वेद्य म्हणजे जाणावयाचा किंवा अनुभवावयाचा आत्मा नाही म्हणून वेदक म्हणजे जाणणारा किंवा अनुभविणारा ज्ञाता नाही, हे म्हणणे अशक्य कोटीतले आहे; कारण वेदकाचा अर्थात् ज्ञात्याचा म्हणजे पर्यायाने आत्मतत्त्वाचा कधीही नाश होऊ शकत नाही. अंतर्मुख वृत्तीमुळे वेद्यवस्तूचा अभाव होतो व ज्ञानशक्तीही आत्मशक्तीमध्ये एकरूप झाल्याने किंवा ज्ञानशक्ती कुंडलिनी परब्रह्म श्रीशिवस्वरूप झाल्याने त्याला आपण नाहीच असे वाटावयाला लागते. अंतर्मुख वृत्ती होणे म्हणजे आत्मस्वरूप जाणणे होय. कारण एकदा वृत्ती आत जाऊ लागल्या की, त्या प्राणाबरोबर सुषुम्णेत प्रवेश करून आत्मस्वरूपात लीन होतात. परंतु बाह्य विषय ग्रहण करण्याच्या आत्म्याच्या सवयीमुळे किंवा वृत्तीमुळे त्याला मोहात पडणारी बुद्धी होते.

यातच समाधी अवस्थेमध्ये योग्याला काहीही दिसत नसल्यामुळे तो आत्माही नाही असे म्हणू लागतो; कारण त्याला पूर्वज्ञानाची म्हणजे बाह्यवस्तूंची सवय जडलेली असते. समाधी अवस्थेत साधकयोग्याला चैतन्य सर्वव्यापक आहे असाच अनुभव येत असतो. परंतु उत्थान अवस्थेत तो मोहपरवश होतो. आत्मस्वरूपाशी आपण जोडलो गेलो होतो हे तो विसरतो. त्यामुळे आत्मा नाहीच असे त्याला वाटत असते. त्यामुळे साधकाने नेहमी जागृत राहून समाधी विरहित इतर वेळीसुद्धा वेद्य वस्तू नाही वेदकच आहे अशी जागृती ठेवावी. त्यामुळे साधक अंतर्मुख वृत्ती करावयास गेला की, त्याला आत्मस्वरूपाची जाणीव राहील. वेदक म्हणजेच आत्मा होय.

देश व कालामुळे परिच्छिन्न म्हणजे आवृत झालेल्या कार्याचीच निवृत्ती होत असते. स्वस्वरूपात राहणे, स्वस्वभावात स्थिर असणे व सर्व ज्ञान असणे इत्यादि गुणांचे अंतर्मुख भाव हे आश्रयस्थान असल्यामुळे तो कधीही बाहेर पसरत नाही व त्या भावाची कधीही निवृत्ती होत नाही. असे का होत नाही? एका चिद्रूप आत्म्याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट उपलब्ध नसल्यामुळे असे कधीही होत नाही. त्याचीच सर्वत्र व सर्वदा उपलब्धी होत असते. शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "देश, काल, क्रिया व आकारामुळे परिच्छिन्न झालेल्या वस्तूंमध्ये चैतन्यात्माच अनवच्छिन्नपणे प्रकाशित होत असतो; कारण तो सर्वांच्या बाहेर आहे." सर्व स्थिती किंवा अवस्था या चिद्रूप ज्ञानाच्याच असल्यामुळे सर्वज्ञता, ज्ञान इत्यादींमध्ये कोणताही भेद असत नाही. **"षाड्गुण्य विवेक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "सर्व गुणांच्या सुरवातीला व शेवटी ज्ञानच असते. केवळ या ज्ञानामुळेच तत्त्वाचा निश्चय होत असतो किंवा केला जातो. बल, वीर्य, ओज इत्यादि शक्ती धर्मरूपानेच स्वीकाराव्या लागतात. **"कक्ष्यास्तोत्र"** या ग्रंथामध्ये बाह्यविचाराच्या दृष्टीने शक्तीला अविद्या व ज्ञानाला सर्वज्ञता म्हटले आहे. दुसऱ्यांना झुकविणे हा तेजाचा प्रभावच आहे. तेज वेद्य असल्याने एका बाजूला ते बोधाचे ऐश्वर्य किंवा विलास आहे तर दुसऱ्या बाजूला तेच जगताला झुकवीत असते. हाच ईश्वर होय व त्याची स्वतंत्रता हेच त्याचे ऐश्वर्य आहे. हा संविदात्मा सर्व कृत्यांमध्ये स्वतंत्र असतो. तो कशाची योजना करीत नाही व तो कशात विघ्नही आणीत नाही. प्रवृत्ती व निवृत्ती या दोन्ही दशांमध्ये हा ईश्वरच असतो. त्याची शक्ती कधीही लोप पावत नाही, लपत नाही किंवा नाहीशीही होत नाही. तो अविनाशी आहे. त्याचे वीर्य म्हणजे सामर्थ्य इतके बलवत्तर आहे की, त्याची आत्मसत्ता म्हणजे शक्ती कधीही परिभ्रष्ट होत नाही. तो कोणत्याही कार्यात स्वतः गुंतत नाही. मात्र कोणतेही कार्य तो स्वतःच असतो."।।१६।।

* * * * *

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

शिवाय स्वस्वभावाचे कर्तृत्व लुप्त असू शकते पण ज्ञातृत्व तर कधीच लुप्त असू शकत नाही.

**स्पष्टीकरण :-** आत्म्याची जी ज्ञान व क्रिया अशी दोन प्रकारची

शक्ती आहे, ती पुरुषावस्थेमध्ये अंतःकरण व बहिःकरणातून अभिव्यक्त होत असते. या दोन्ही करणांचा उपरम झाला तरीही ज्ञानशक्ती ही आत्माभिमुखतेने प्रकाशमान होतच असते. या ज्ञानशक्तीचा आश्रय अंतर्मुख भाव आहे, असे येथे म्हटले आहे. हा भाव म्हणजे स्वस्वभाव किंवा आत्माच होय. मुख हा शब्द आगमग्रंथात शक्तीचा पर्याय म्हणून वापरला आहे. तेव्हा अंतर्मुखभाव म्हणजे शक्तीच्या अंतर्गत राहणारा भाव, म्हणजेच आत्मा होय. ज्ञेय दिसत नाही म्हणून ज्ञाताही नाही असे कधीच म्हणता यावयाचे नाही. कार्यरूप प्रयत्नाचा निदान लोप तरी कल्पिता येतो; पण ज्ञातृत्वाचा लोप कल्पनेतही संभवत नाही, हा आशय आहे.।।१६।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## आत्मतत्त्वाची स्थिरता

सूत्र क्रमांक १६ मध्ये "कर्तृत्व अंश हा कोणत्याही अवस्थेमध्ये नष्ट होत नाही" या मौलिक सिद्धान्ताची पुष्टी हेतूच्या द्वारा केली जात आहे.

**विशेष :-**

अनेक प्राचीन स्पंदशास्त्रीय लोकांनी या सूत्राच्या "**अन्यस्या-नुपलम्भनात्**" या चौथ्या पादाचे दुसऱ्या प्रकारचे अर्थ घेतलेले आहेत. त्याचा आशय पुढील प्रमाणे आहे.

१) या कर्तृत्वसत्तेचा कधीही नाश होत नाही; कारण जर तसा नाश झाला असता तर दुसऱ्याचेही अर्थात् विश्वाचेही अनुपलंभ अर्थात् अदर्शन झाले असते.

२) या वेदकसत्तेचा कधीही नाश होत नाही; कारण जर या वेदकसत्तेचा नाश झाला असता तर दुसरे अर्थात् अभाववादींच्या अभावाचे आणि शून्यवादींच्या शून्याचे स्वरूप निर्धरण होऊ शकले नसते.

**वृत्ती :-** परंतु तत्त्व हे अंतर्मुख अर्थात् आंतरिक किंवा आतील संवित्तिचक्राच्या अर्थात् शक्तिचक्राच्या रूपामध्ये प्रतिक्षण स्पंदायमान किंवा स्फुरणशील स्वभावाचे असून हे तत्त्व सर्वज्ञता इत्यादि गुणांचा आधार आहे. या तत्त्वाचा कधीही नाश होत नाही. यामुळे ही गोष्ट निर्विवाद आहे की, या तत्त्वाहून भिन्न अशा अन्य कोणत्याही वेदकसत्तेचे अर्थात् ज्ञात्यासत्तेचे अस्तित्व किंवा सत्ता नाही. यामुळे हे तत्त्व आकाशाप्रमाणे स्वच्छ असून

हे सर्वव्यापक चैतन्यरूप तत्त्व प्रत्येक अवस्थेचा अनुभव प्राप्त करून घेत असते.।।१६।।

**विवरण :-** याआधीच्या सूत्र क्रमांक १४ मध्ये उल्लेख केलेल्या कर्तृत्व सत्तेला सूत्र क्रमांक १५ मध्ये "भाव" या शब्दाच्याद्वारा अभिव्यक्त केलेले आहे. कर्तृत्व सत्तेचा एक विशेष अर्थ आहे. "भू" हा भाव या शब्दाचा मूळ धातू आहे. "भाव" या शब्दाचा अर्थ "सत्ता" किंवा "अस्तित्व" असा आहे. या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की, **"सत्ता च भवनकर्तृता सर्वक्रियासु स्वातन्त्र्यम्।। ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी १.५.१४।।"** अर्थात् सत्ता ही भवन कर्तृरूप असल्यामुळे सर्व क्रिया संपादन किंवा संपन्न करण्यामध्ये सर्वप्रकारे स्वतंत्र असते. यानुसार शैवशास्त्रामध्ये अकालकलित अर्थात् कालाच्या मुखात न जाणारे अस्तित्व व ज्याचे वर्तमानतेने स्वतःचे अस्तित्वही सार्थक होत असते असा "सत्ता" किंवा "भाव" या शब्दाचा अर्थ आहे. कोणत्याही प्रकारची क्रिया घडण्यासाठी त्या क्रियेच्या कर्त्याची वर्तमानता आवश्यक आहे. अर्थात् "कर्ता" तेथे उपस्थित असणे किंवा कर्त्याची सत्ता असणे आवश्यक आहे. याचे कारण कर्त्याशिवाय कोणतीही क्रिया सिद्ध होऊ शकत नाही. फलतः प्रत्येक क्रिया सिद्ध करण्याची अबाध अर्थात् बाधारहित क्षमता ठेवणाऱ्या आणि शाश्वतरूपामध्ये स्वयं अर्थात् स्वतः वर्तमान राहणाऱ्या स्वतंत्र कर्तृत्वालाच "भाव;" किंवा "सत्ता" अशी संज्ञा दिलेली आहे किंवा नाव दिलेले आहे.

साधारण किंवा सामान्य जीवभावाच्या स्तरावर असे म्हटले जाते की, "देवदत्त अन्न शिजवीत आहे." तेव्हा या "शिजवीत आहे" या क्रियापदामधील "शिजवीत" या अंशाने "शिजविण्याच्या क्रियेचा" आणि "आहे" या अंशाने एका शिजविण्याची क्रिया करण्यास स्वतंत्र असलेल्या चेतन कर्त्याचा अवबोध होत असतो किंवा ज्ञान होत असते. या उदाहरणावरून ही गोष्ट पूर्णपणे सिद्ध होते की, देवदत्तरूप चेतन सत्तेच्या पूर्ववर्तमानतेने अर्थात् देवदत्तरूप चेतन सत्ता याआधीच उपस्थित असल्यानेच "शिजविण्याची" क्रिया निष्पन्न होऊ शकते किंवा घडू शकते. पारमार्थिक स्तरावरही हाच सिद्धान्त लागू होत असतो.

"अहं" विमर्शात्मक अर्थात् विचारात्मक किंवा ज्ञानात्मक स्पंद हे या शाश्वत कर्तृत्वाचे स्वरूप आहे. दुसऱ्या शब्दामध्ये याला "विमर्शशक्ती" असेही म्हणतात. विमर्शशक्तिरूप अर्थात् विचारशक्तिरूप किंवा ज्ञानशक्तिरूप

कर्तृत्व हा अनिर्वचनीय अर्थात् सांगता किंवा वर्णिता न येणारा भाव आहे. हा अनिर्वचनीय भाव हेच विश्वाच्या अणू-अणूला सत्ता किंवा अस्तित्व प्रदान करणारे सारभूत चैतन्य आहे. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**सा स्फुरत्ता महासत्ता देशकालाविशेषिणी।**
**सैषा सारतया प्रोक्ता हृदयं परमेष्ठिनः।।१.५.१४।।**

याचा अर्थ असा आहे की, ही दैदीप्यमान महासत्ता आहे. तिला देश, काल इत्यादि विच्छेदांचा स्पर्श होत नाही. या परमेश्वराच्या सारतत्त्वयुक्त चितिशक्ती अर्थात् कुंडलिनी शक्तीला हृदय अर्थात् प्रतिष्ठास्थान असे म्हटलेले आहे.

भगवान् श्रीउत्पलदेवांनी या भावाला अहंविमर्शात्मक अर्थात् अहं-ज्ञानात्मक स्फुरणाला "महासत्ता" असे नाव दिलेले आहे. महासत्ता हे सर्व जड आणि चेतन भावांच्या विश्रांतीचे स्थान अथवा हृदय आहे. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथात **"हृदयं च नाम प्रतिष्ठानमुच्यते तच्च उक्तनीत्या जडानां चेतनम्, तस्यापि प्रकाशकत्वम्, तस्यापि विमर्शशक्तिः।।१.५.१४।।"** अर्थात् या कुंडलिनी शक्तीचे नाव हृदय असून तीच प्रतिष्ठानरूप आहे असे सांगतात. हे सांगताना **"तथा हि जडभूतानाम्"** या न्यायाने ती जड व चेतन आहे. ती ही प्रकाशात्मक आहे आणि हीच विमर्श अर्थात् विचार किंवा ज्ञानशक्ती आहे. चेतन हे जड भावाच्या विश्रांतीचे स्थान आहे. "प्रकाशमानता" हा चेतनांचा आधार आहे. परंतु स्वयं प्रकाशाच्या प्रकाशमानतेचे रहस्यही या विमर्शामध्ये किंवा विचारामध्ये किंवा ज्ञानामध्ये अंतर्निहित आहे अर्थात् अंतर्भूत आहे. ही **"महासत्ता महादेवी विश्वजीवनमुच्यते।।"** अर्थात् ही कुंडलिनी-शक्ती महासत्ता, महादेवी व विश्वाचे जीवन आहे. अशा स्वरूपाची विमर्शरूप किंवा विचाररूप किंवा ज्ञानरूप स्पंदना किंवा स्फुरण हे स्वयं अदेशकालरहित अर्थात् अयोग्यदेशकालरहित असते. ही विमर्शरूप स्पंदना विभिन्न आणि विचित्र प्रकारच्या देश, काल आणि आकार यांनी परिवलित अर्थात् वेष्टिलेल्या प्रमेयवर्गाला अर्थात् बाह्य जगताला जीवन देऊन स्वतः त्या त्या रूपामध्ये निरर्गल अर्थात् स्वतंत्र क्रीडा करीत राहते. सशाची शिंगे आणि आकाशाचे फूल या सारख्या कल्पनांचे प्रत्यक्षरूपामध्ये कोठेही अस्तित्व नाही. असे असले तरी दृश्यमान पदार्थाच्या प्रमाणे विमर्शामध्ये

या काल्पनिक पदार्थाची सत्ता विद्यमान आहे. फलतः या शाश्वत भावामध्ये अभाव हाही अंतर्निहित किंवा अंतर्भूत आहे.

कोणतीही क्रिया ज्ञानाशिवाय शक्य होऊ शकत नाही. या गोष्टीचा उल्लेख सूत्र क्रमांक १ मध्ये केलेला आहे. स्वतंत्र इच्छा हे या ज्ञानाचे मौलिक रूप आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये कर्तृत्व अथवा भाव, स्वतंत्र तसेच अकालकलित अर्थात् अवेळी होणारी इच्छा, ज्ञान आणि क्रिया यांची समरसता यांचे वर्णन केलेले आहे. यालाच शैवशब्दामध्ये चिद्रूपता असे म्हटलेले आहे.।।१६।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

कारिका क्रमांक १६ ची टीका कारिका क्रमांक १४ व १५ मध्ये समाविष्ट आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

तीन श्लोकांनी उपक्रांत अर्थात् आरंभ केलेल्या अर्थाचा उपहास करून प्रमेयजात (वस्तूंचा) स्पंदतत्त्वाने अभेद आहे हे पूर्वीच विवेचन करून त्या प्रत्यभिज्ञेच्या प्रत्यभिज्ञानरूप बंध-मोक्षाचे प्रतिपादन **"न तु योऽन्तर्मुखो .....।।१६।।"** या कारिकेत करतात. जो लोकोत्तर स्पंदात्मक भाव अंतर्मुखस्वरूपाने सतत प्रस्फुरित होतो त्याचप्रमाणे सर्वज्ञता आदि अनेक गुणांचा आश्रयस्थान असतो त्याचा कदापीही लोप होत नाही. त्यामुळेच कर्तृत्वसत्तेहून भिन्न असणाऱ्या कोणत्याही वस्तूचे किंवा पदार्थाचे अस्तित्त्वच नसते. त्यामुळे कर्तृत्वरूप आंतरक्रियेची सिद्धी होत नाही; कारण चित्क्रिया करणारा दुसऱ्या कोणत्याही भेदाने किंवा अंतराने भासत नाही. यासंबंधी **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात असे म्हटलेले आहे की -

**सा स्फुरता महासत्ता देशकालाविशेषणी।**
**सैषा सारतया प्रोक्ता हृदयं परमेष्ठिनः।।१-५-१४।।**

**अर्थ :-** ती दैदीप्यमान महासत्ता असून तिच्यामध्ये देशकालाचा "विच्छेद" अर्थात् तिला या गोष्टींचा स्पर्श होत नाही व परमेश्वराचे सारतत्त्व असणाऱ्या त्या चितिशक्तीलाच हृदय अर्थात् प्रतिष्ठास्थान असे म्हटलेले आहे.

त्याचप्रमाणे विमर्शिनीकारांनी असे म्हटले आहे की, **"सत्ता च भवनकर्तृता सर्वाक्रियासु स्वातन्त्र्यम्। सा च खपुष्पादिकमपि व्याप्नोति इति महती।"** अर्थात् सत्ता म्हणजेच भवनकर्तृता अर्थात् विद्यमानतेचे कर्तृत्व असून ती कर्तृता म्हणजे सर्व क्रिया (करण्यामध्ये) स्वतंत्र होय. ती खपुष्पादिकांनाही व्यापून असते. त्यामुळे ती महान् किंवा श्रेष्ठ आहे.

त्यामुळेच अहंप्रत्यवमर्शामध्ये म्हणजेच चिद्रूपामध्ये सतत स्फुरणरूपाने अवभासित होणारी स्वतंत्रकर्ताच असणारी भावात्मक सत्ता असते आणि तीच पारमार्थिक वस्तू होय.।।१६।।

**येथे स्वरूपस्पंद अर्थात् व्यतिरेकोपपत्ती नावाचा प्रथमनिष्यंद समाप्त झाला.**

**इति श्रीराजानकरामकृतायां विवृत्याख्यायां स्पन्दकारिकाटीकायां व्यतिरेकोपपत्तिनिर्देशो नाम प्रथमो निष्यन्दः।।१।।**

अशा प्रकारे श्रीरामकंठाचार्यांनी केलेल्या विवृती नावाच्या स्पंदकारिकेवरच्या टीकेतील "व्यतिरेकोपपत्तिनिर्देश'' नावाचा पहिला निष्यंद संपला.

❋ ❋ ❋ ❋ ❋

# स्पन्दकारिका

## दुसरा प्रवाह

## निःष्यंद दुसरा

### स्वभावोपलब्धि

**तस्योपलब्धिः सततं त्रिपदाव्यभिचारिणी**
**नित्यं स्यात्सुप्रबुद्धस्य तदाद्यन्तेऽपरस्य तु।।१७।।**

**अन्वयार्थ :-**

**तस्य** - आतापर्यंत वर्णन केलेला चिद्रूप आत्म्याचा किंवा परमेश्वराचा, **उपलब्धिः** - अनुभव, **सुप्रबुद्धस्य** - सिद्धावस्थेतील पुरुषाला, **नित्य** - नेहमी, अनुभवांच्या सर्व अवस्थात, **त्रिपदा-व्यभिचारिणी** - जागृती, स्वप्न व सुषुप्ती या अवस्थांच्या आदि, मध्य व अंत या अवस्थांत, **समान**-अखंडरूप, **सततं** - कोणतेही व्यवधान न येता, **स्यात्** - असतो, मिळतो, **तु** - परंतु, **अपरस्य** - दुसऱ्याला, "प्रबुद्धा"वस्थेतील योगी पुरुषाला, **तदाद्यन्ते - तद्** - जाग्रतादि तीन अवस्थांतील, **आदि** - पहिल्या म्हणजे जागृतावस्थेच्या, **अन्ते** - शेवटच्या दोन पदात म्हणजे स्वप्न व सुषुप्तीमध्ये, (श्रीरामकंठ हे पद 'तद्+आदि+अन्ते असे सोडवितात. श्रीरामकंठ), **स्यात्** - उपलब्धी होते, अनुभव येतो.।।१७।।

**अर्थ :-** सुप्रबुद्ध किंवा सिद्धावस्थेतील पुरुषाला नेहमी अर्थात् अनुभवाच्या सर्व अवस्थांमध्ये अर्थात् जागृती, स्वप्न व सुषुप्ती या अवस्थांच्या आदि, मध्य व अंत या अवस्थांमध्ये आतापर्यंत वर्णन केलेला चिद्रूप आत्म्याचा किंवा परमेश्वराचा अनुभव समान व अखंड रूपाने कोणतेही व्यवधान अर्थात् अडथळा न येता प्राप्त होत असतो. परंतु दुसऱ्याला अर्थात् प्रबुद्धावस्थेतील योगिपुरुषाला जाग्रतादि तीन अवस्थांमधील पहिल्या म्हणजे जागृतावस्थेच्या शेवटच्या दोन पदात म्हणजे स्वप्न व सुषुप्ती या अवस्थांमध्ये श्रीपरमेश्वरांची प्राप्ती होते किंवा श्रीपरमेश्वरांचा अनुभव येतो.

*****

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

पहिल्या प्रवाहामध्ये आत्मतत्त्व हे देहाहून वेगळे आहे याची स्वतःला अनभूती कशी येते हे निरनिराळ्या अनुभवांनी व दृष्टान्तांनी स्पष्ट केले. या आत्मतत्त्वाच्या अनुभवाचा उपाय व त्यासंबंधी उपदेश करताना त्या उपदेशाला कोणकोण पात्र आहेत याचे वर्णन यापुढे केले आहे.

या उपदेशाला पात्र असे जे जीव आहेत त्यांचे तीन विभाग आहेत. १) सुप्रबद्ध २) प्रबुद्ध ३) अप्रबुद्ध. मी देह आहे अशा प्रकारचे अज्ञान व अत्यंत लांबलचक अशी दुःस्वप्ननिद्रा आणणारी मोहमाया यांचा ज्यांना यत्किंचितही स्पर्श होत नाही त्यांना सुप्रबुद्ध असे म्हणतात. त्यामुळे त्यांना आत्मतत्त्व प्रकटरूपाने अनुभवास येत असते. जागृत, स्वप्न व सुषुप्ती या तीन अवस्थांच्या भूमिकेत सुप्रबुद्धाच्या ठिकाणी आत्मतत्त्व नेहमीच जागृत राहते. अशा प्रकारे कृतकृत्य झालेल्याला व आत्मऐश्वर्याची उत्कृष्ट सिद्धी पावलेल्याला उपदेशाची जरूरीच असत नाही. यानंतर दुसरा क्रमांक प्रबुद्धाचा येतो. याच्यावर उत्कृष्ट असा शक्तिपात झालेला असल्याने त्याच्यावरील मायेचा अंधकार नष्ट होत आलेला असतो व त्याचा मोह क्षीण होत असल्याकारणाने सारासार विवेकरूपी चक्षू स्वच्छ झालेला असतो. त्यामुळे त्याच्यावर मोहाचा पगडा बसत नाही. त्याने जागृत, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थांमध्ये जागृतावस्थेचा अंत व सुषुप्ती अवस्थेचा उदय यामधील संधिकालाच्या स्थितीची जागृती ठेवल्यास त्याला आत्मतत्त्वाचा अनुभव येतो. एका अवस्थेचा अंत व दुसऱ्या अवस्थेचा उदय यामधील संधिकाल तेच आत्मतत्त्वाचे ज्ञान व तोच आत्मतत्त्वाचा अनुभव होय. संधिकालाचे हे जे क्षण आहेत तेच आत्मतत्त्वाचे अनुभव आहेत. या क्षणांमध्ये साधक आत्मस्थितीमध्ये असतो. त्याचप्रमाणे एखाद्या गोष्टीची स्मृती होणे व त्या स्मृतीचा अंत होऊन दुसऱ्या स्मृतीचा उदय होणे यातील संधिकाल हा आत्मानुभवच होय.

आत्मस्वरूपाच्या अनुभवाचा उपदेश दोन प्रकारचा असतो. "निव्वळ चिन्मय स्वरूप मी आहे व दुसरा कोणताच पदार्थ नाही," अशी मनात किंवा चित्तात बुद्धीने अखंड धारणा ठेवल्यास आत्मस्वरूपाचा अनुभव येतो. हा आत्मस्वरूपाचा अनुभव यावा म्हणून जो उपदेश दिला जातो त्याचा हा पहिला प्रकार होय. दुसरा प्रकार विश्वमय होण्याचा आहे. "मी नाहीच, विश्वरूपाने मीच नटलो आहे," अशी धारणा ठेवल्यास आत्मरूपाचा

अनुभव येतो. जो प्रबुद्ध आहे त्याला अशा प्रकारचा अनुभव सुषुप्ती अवस्थेतून स्वप्नावस्थेत जातेवेळी होणेच शक्य नाही. फक्त सुप्रबुद्धाला मात्र प्रयत्नाशिवाय आत्मानुभव येतो. सुषुप्ती अवस्थेमध्ये वेद्याच्या ज्ञानाचा लय झालेला असतो. त्या ठिकाणी त्याला खरोखरच कोणत्याही प्रकारच्या त्रासाशिवाय स्वस्वरूपाच्या ठिकाणी विश्रांती मिळत असते. त्यामुळे चैतन्यरूप आत्मत्वाचा अनुभव त्याला येत असतो म्हणजे गाढ झोपेतही आत्मस्थितीच असते. वास्तविक पाहता स्वप्नावस्थेमध्ये भिन्नता निर्माण होण्याचे असे कोणतेही बाह्य साधन नसताना तेथे नाना प्रकारची सृष्टिरचना निर्माण होत असते. त्या स्थितीमध्ये तो जीव अनंत कोटी ब्रह्मांड निर्माण करणाऱ्या परमेश्वराचे स्वरूप पावलेला असतो. त्याने स्वप्नात पाहिलेले प्रकार मी आपल्या इच्छेने निर्माण केले अशी भावना ठेवावी म्हणजे पुढे पुढे तो आत्मस्वरूप होतो. या अभ्यासामुळे गाढ निद्रेमध्येही तो आत्मस्वरूप होतो. हा अभ्यास सुप्रबुद्धाला करावयाला नको. तो ईश्वरस्वरूपच असतो. प्रबुद्धाने मात्र हा अभ्यास अवश्य केला पाहिजे. तिसरा जो अप्रबुद्ध आहे त्याच्यावर अनेक प्रयत्न करून हे ठसविण्याचा प्रयत्न केला तरी काहीही उपयोग होत नाही. त्याच्या बाबतीत सर्व प्रयत्न व्यर्थ ठरतात. ज्याप्रमाणे दगड शेकडोशे वर्षे जरी पाण्यात टाकला तरी त्याच्या आत पाण्याचा प्रवेश होऊ शकत नाही त्याप्रमाणेच अप्रबुद्धाचे असते. त्यामुळे स्वप्न व सुषुप्ती या अवस्थांमधील अभ्यास हा प्रबुद्धच करू शकेल. जागृत अवस्थेमध्येही इंद्रियांचा शब्दादि विषयांचा व्यापार तोडून टाकून प्रबुद्ध जीव जर स्वस्थ बसला तर त्याला आत्मतत्त्वाचा अनुभव अवश्य येईल. तुरीयावस्थेचा त्याला कधीही अनुभव नसल्याकारणाने त्याला उपदेशाचा रस्ता दाखविला तर तो फायदा करून घेऊ शकेल. आत्मतत्त्व हे निव्वळ चैतन्यमय व विश्वरूपमय अशा दोन प्रकारे पाहण्याची बुद्धी तीनही अवस्थांमध्ये कशी ठेवावी याचा उपदेश प्रबुद्धाला करण्यात येत आहे. जागृत व स्वप्नावस्थेमध्ये अनेक प्रकारे भासमान होणारे हे विश्व आहे असे जे दिसते, ते विश्व नसून श्रीपरमशिव आपल्या अचिंत्य शक्तीसह प्रकटरूपाने दिसत आहेत अशी भावना व अभ्यास सतत करावा. अचिंत्य रूपशक्तीत ज्ञान व ज्ञेय या रूपाने भासत असते. अंतरिंद्रिये व बाह्येंद्रिये ही सर्व त्या शक्तीची ज्ञानस्वरूपे आहेत व शब्दादि विषय ही सर्व ज्ञेयस्वरूप आहेत.

योग्याला चिद्रूप आत्म्याची निरंतर उपलब्धी व अनुभूती होत असते. हा योगी कसा असतो? तो नेहमी सावधान व जागृत राहतो. त्याला आत्म्याची उपलब्धी कशी होत असते? जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थांमध्ये त्याला आत्मा उपलब्ध असतो. तो या अवस्थांमध्ये निवृत्त होत नाही. कार्यदशेमध्येही ही उपलब्धी निभ्रांतपणे असते. शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "संवित् राहत नाही अशी कोणतीही अवस्था नाही. यासाठी योगिगण चिद्धनस्वरूपाचीच उपासना करतात. जरी योगी पूर्ण प्रबुद्ध नसला तरी त्यालाही कार्याच्या सुरवातीला व शेवटी संवित्चा अनुभव येतो. कार्याची पहिली अवस्था व शेवटची अवस्था चिन्मयच असते. मध्यंतरी कार्य संविद्रूप असूनही ते अन्य रूपाने भासत असते. या सर्व विवेचनाचा अभिप्राय असा आहे की योग्याला आदि, अंत, मध्य, जाग्रत, स्वप्न व सुषुप्तीमध्ये म्हणजे सर्वत्र संवित्चीच अगदी स्पष्ट उपलब्धी होत असते. हा संवित्स्वरूप परमात्मा योग्यासाठी कोठे व कसा असतो हे पुढील कारिकेत स्पष्ट केले आहे.।।१७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण** - अधिकारी दृष्टीने सुप्रबुद्ध, प्रबुद्ध आणि अप्रबुद्ध असे साधकांचे तीन भेद केले आहेत. त्यांपैकी सुप्रबुद्धाला व्यापक अहंप्रतीती सर्वच अवस्थात नित्य येत असल्याने त्याला हा उपदेश करण्याचे कारणच नाही. अप्रबुद्धाला हा उपदेश करणे व्यर्थ आहे. भोपळा पाण्यात तरंगत असला तरी त्यात जसा पाण्याचा एकही थेंब शिरत नाही त्याप्रमाणेच अप्रबुद्धावर या उपदेशाचा कितीही वर्षाव केला तरी तो त्याच्या मनात रुजत नाही. आता राहिला प्रबुद्ध. प्रबुद्धाला स्वप्न व सुषुप्ती या दोन अवस्थात स्वस्वभावाची देहादिकांहून वेगळेपणाने जाणीव होते. पण जागृती व तुर्या या दोन अवस्थात ही जाणीव त्याला नसते. जागृतावस्थेत शब्दादिविषयांचे ग्रहण करीत असताना स्वस्वभाव इंद्रियव्यापाराने व्यवहित अर्थात् अवरुद्ध झालेला असतो, तर तुर्यावस्थेत जाणवणारे स्वस्वभावाचे व्यापक स्वरूप प्रबुद्धाला अजून आकळलेले नसते. त्यामुळे प्रबुद्ध हाच येथील उपदेशाचा अधिकारी होय.

हा उपदेश दोन प्रकारचा आहे. देहेंद्रियांसहित सर्व ज्ञेय पदार्थांहून

चिन्मय स्वस्वभाव वेगळा आहे अशी प्रथम ओळख पटविणे हा पहिला प्रकार व याची जाणीव झाल्यावर हा चिन्मय स्वस्वभावच विश्वरूपाने सारखा प्रकट होत आहे याची जाणीव करून देणे हा दुसरा प्रकार होय. या दोन्ही प्रकारांची जाणीव प्रबुद्धाला जागृती व तुर्या या दोन्ही अवस्थात यावयास हवी. ।।१७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## प्रबुद्ध अर्थात् जागृत आणि सुप्रबुद्ध अर्थात् सिद्ध यांची अनुभूती

आता येथून पुढील अनेक सूत्रांमधून याच चिन्मात्ररूप स्वभावाच्या अनुभवपक्षावर प्रकाश टाकला जात आहे. या संबंधामध्ये सर्वप्रथम पुढील सूत्रामध्ये सुप्रबुद्ध आणि प्रबुद्ध योग्यामध्ये आढळून येणाऱ्या आध्यात्मिक अनुभूतीच्या स्तरामध्ये तारतम्य दर्शविलेले आहे. याबरोबर या सूत्रामध्ये अंतर्भूत व्यंगाच्या द्वारा या रहस्याचे उद्घाटन केले जात आहे की, "प्रबुद्ध भूमिकेवर स्थित असलेल्या योग्याला सुप्रबुद्ध भाव प्राप्त करून घेण्यासाठी श्रीगुरूपदेशाची आवश्यकता असते."

**वृत्ती :-** सुप्रबुद्ध योग्याला विश्वाच्या कणाकणामध्ये अनुस्यूत असलेली अर्थात् अवस्थित असलेली चिद्रूप स्वभावाची अनुभूती जाग्रत्-स्वप्न-सुषुप्ती आदि तीन अवस्थांमध्ये प्रतिक्षण अर्थात् प्रत्येक अवस्थेच्या आदि, मध्य आणि अंतामध्ये अखंडपणे होत राहते. परंतु प्रबुद्ध योग्याला या तीन अवस्थांमधील पहिली अर्थात् जागृत अवस्थेच्या शेवटी अर्थात् स्वप्न आणि सुषुप्तीमध्ये तसेच याच दोन अवस्थांमध्ये अंतर्भूत होणाऱ्या अन्य अवस्थांमध्येच होत असते. (श्रीरामकंठाचार्य यांच्या मतानुसार श्रीभट्टकल्लट यांच्या वृत्तीमध्ये "**स्वपसुषुप्त्यादौ**" या समस्त पदामध्ये स्वप्न आणि सुषुप्ती या शब्दाबरोबर "आदि" हा शब्द जोडला असता संवेदनाच्या ज्या सर्व अवस्था अभिप्रेत आहेत त्या अवस्थांचा अंतर्भाव या दोन अवस्थांमध्ये होत असतो. ("**स्पंदकारिका, १७।।**") जाग्रत् आणि तुर्या अवस्थांमध्ये अशी अनुभूती योग्याला केवळ श्रीसद्गुरूंच्या उपदेशामुळेच प्राप्त होऊ शकते. ।।१७।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्रामध्ये वर्णिलेला विषय ही एक लोकोत्तर अनुभूती असल्यामुळे सामान्य रूपामध्ये हा विषय दुरूह अर्थात् अनाकलनीय आणि असंगत प्रतीत होणे, ही गोष्ट स्वाभाविक आहे. या सूत्राला काही मात्रेपर्यंत कूटसूत्राची संज्ञा किंवा कूटसूत्राचे नाव दिले तर कोणतीही अत्युक्ती अर्थात् अतिशयोक्ती होणार नाही. विशेष रूपामध्ये याच्या चौथ्या चरणामध्ये असणारी कूटता किंवा असणारे रहस्य हे श्रीक्षेमराज आणि श्रीभट्टकल्लट यांसारख्या प्राचीन व्याख्याकारांसाठी माथेफोडीचे किंवा डोकेदुखीचे कारण बनलेले होते. ("**स्पंदनिर्णय**" पाहावे) प्रस्तुत वृत्तिकार श्रीभट्ट-कल्लटांनीही आपल्या वृत्तीमध्ये "तदाद्यन्ते" या मूळपदासाठी "**स्वप-सुषुप्त्यादौ**" हा पर्याय लिहून इतिश्री केलेली आहे. मूळसूत्र आणि वृत्ती या दोघांचेही सखोल अनुसंधान किंवा अध्ययन केल्यानंतरही या सूत्राचा खरा अर्थ लक्षात येत नाही. वृत्तीचा अभ्यास केल्यावर केवळ इतकीच गोष्ट लक्षात येते की, जेथे सुप्रबुद्ध योग्याला तिन्ही अवस्थांच्या आदि, मध्य आणि अंतामध्ये अखंडरूपामध्ये आत्मानुभूती होत राहते तेथे प्रबुद्ध योग्याला केवळ स्वप्न आणि सुषुप्तीमध्ये आत्मानुभूती होत असते. परंतु एवढ्याने या शंकेचे समाधान होत नाही; कारण की, सुप्रबुद्ध योग्याप्रमाणे प्रबुद्ध योग्याचे दोन्ही अवस्थांमधील आत्मानुभूतीचे स्वरूप हे अखंड असते का? श्रीभट्टकल्लटांच्या वृत्तीच्या आधारावर लिहिलेल्या श्रीरामकंठा-चार्यांच्या विवृतीमध्येही या शंकेचे कोणतेही संतोषकारक समाधानकारक उत्तर मिळत नाही. फलतः खरी स्थितीही पूर्वरूपामुळे स्पष्ट होऊ शकत नाही.

श्रीरामकंठाचार्य यांनी आपल्या विवृतीमध्ये "**तदाद्यन्ते**" या मूळपदाचा जसा अर्थ लिहिलेला आहे त्याच अर्थाला आधार मानून याचा मराठी अनुवाद केला आहे. या स्थळी आचार्यजींच्या विवृतीलाच मराठी अनुवादाचा आधार बनविण्याचे कारण असे आहे की, आचार्यजींनी स्वतः श्रीभट्ट-कल्लटांच्या वृत्तीलाच आपल्या विवृतीचा आधार बनविलेले आहे.

या संदर्भामध्ये निःसंकोचरूपामध्ये ही गोष्ट स्वीकारणे आवश्यक आहे की, प्रातःस्मरणीय श्रीईश्वरस्वरूपजींना श्रीरामकंठाचार्य यांच्या द्वारा प्रस्तुत केले गेलेले "**तदाद्यन्ते**" या शब्दाचे विश्लेषण मान्य नाही. प्रातः-स्मरणीय श्रीईश्वरस्वरूपजींनी अनेक वेळा आपल्या मौखिक अर्थात् तोंडी प्रवचनामध्ये या आध्यात्मिक कोड्याला किंवा गोंधळाला, या मूळ शब्दाचा

दुसऱ्या प्रकाराने अर्थ लावून ते कोडे किंवा तो गोंधळ सोडविण्याची कृपा केलेली आहे. प्रातःस्मरणीय श्रीईश्वरस्वरूपजी यांच्या मतानुसार प्रबुद्ध योग्याला श्रीसद्गुरूंच्या उपदेशामुळे स्वप्नपदाच्या शेवटी आणि सुषुप्तिपदाच्या प्रथम अर्थात् स्वप्नपदातून सुषुप्तीमध्ये प्रविष्ट होण्याच्या वेळी दोन्ही पदांच्या अंतरालवर्ती अर्थात् मधल्या काळात संधिक्षणामध्ये स्वभावाची अनुभूती प्राप्त होत असते. ही स्वभावानुभूती वीजेच्या लखलखाटाप्रमाणे क्षणपर्यवसायिनी अर्थात् क्षणभरच टिकणारी अशी असल्यामुळे ही अनुभूती अखंड म्हटली जाऊ शकत नाही. जेव्हा हा योगी श्रीसद्गुरूंच्या द्वारा सांगितलेल्या विधीचे अक्षरशः पालन करीत निरंतर अभ्यास आणि अनुसंधान यांच्या द्वारा या तुर्यारूप स्वभावावर स्थिर राहण्याची क्षमता किंवा सामर्थ्य प्राप्त करून घेत असतो तेव्हा तो योगी प्रबुद्ध भावातून बाहेर निघून सुप्रबुद्ध भावामध्ये प्रविष्ट होत असतो. अशा योग्याची आत्मोपलब्धी ही तीनही पदांच्या आधी, मध्यामध्ये आणि शेवटी समानरूपाने स्थिर राहत असते.

आता केवळ सुप्रबुद्ध योग्याचा प्रश्न शिल्लक राहतो. या योग्याच्या विषयी काही म्हणणे हे चमकणाऱ्या सूर्याला दिव्याच्या मदतीने शोधण्याप्रमाणे आहे. अशा सुप्रबुद्ध योग्याने श्रीपरमेश्वराच्या अनुग्रहामुळे किंवा कृपेमुळे तुर्यारूप शाक्तभूमिका अथवा सामान्यस्पंदभूमिका आक्रांत केलेली असते आणि हा सुप्रबुद्ध योगी साक्षात् श्रीशिवभावावर आरूढ होऊन सिद्ध होत असतो. अशा योग्यामध्ये भेदव्याप्तीने संस्कार शिल्लक राहत नाहीत. यामुळे या योग्याच्या आत्मानुभूतीमध्ये कधीही कोणताही चढ-उतार येण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

आता वर सांगितल्याप्रमाणे या सूत्रामध्ये श्रीगुरूपदेशासाठी उपयुक्त तसेच अधिकारी पात्राचा निर्देश व्यंगरूपामध्ये अंतर्भूत केलेला आहे. वृत्तिकारांनी **"जाग्रत्तुर्यौ त्वागममात्रगम्यौ"** इतके म्हणून या व्यंगाचे स्पष्टीकरण केलेले आहे. या कथनानुसार केवळ प्रबुद्ध भावावर अवस्थित असेलेली व्यक्ती हीच श्रीगुरूपदेशासाठी उपयुक्त अर्थात् योग्य पात्र आहे.

या संबंधामध्ये येथे प्रबुद्ध, सुप्रबुद्ध इत्यादि भूमिकांवर अवस्थित प्रमात्यांच्या अर्थात् ज्ञात्यांच्या स्वभावगत वैशिष्ट्यावर प्रकाश टाकणे आवश्यक वाटत आहे; कारण की, यामुळे वाचकांना किंवा अभ्यासकांना सूत्राचा अर्थ योग्य प्रकारे हृदयंगम करण्यासाठी किंवा समजण्यासाठी

साहाय्यता किंवा मदत मिळेल अशी आशा आहे.

शास्त्रकारांनी आध्यात्मिक संदर्भाने संसाराच्या प्रमातृवर्गाला अर्थात् ज्ञातृवर्गाला किंवा जीववर्गाला अबुद्ध, बुद्ध, प्रबुद्ध आणि सुप्रबुद्ध या चार प्रकारामध्ये विभक्त केलेले आहे. या दृष्टीने **"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **चतुर्विधं तु पिण्डस्थमबुद्धं बुद्धमेव च। प्रबुद्धं सुप्रबुद्धं च पदस्थं च चतुर्विधम्।।२.४३।।** अर्थात् पिंडस्थ व पदस्थ हे अबुद्ध, बुद्ध, प्रबुद्ध आणि सुप्रबुद्ध अशा चार प्रकारचे असतात. या रीतीने तंत्रग्रंथामध्ये या चार प्रकारच्या प्रमात्यांच्या स्वरूपगत वैशिष्ट्यांचा जो उल्लेख केलेला आहे त्याचा संक्षिप्त किंवा थोडक्यात आशय पुढीलप्रमाणे आहे.

**१) अबुद्ध प्रमातृवर्ग :-** या विषयाचे विवेचन **"स्वच्छंदतंत्र"** या ग्रंथात (११.९१-९५) पाहावे. या वर्गामध्ये परमेश्वराच्या तिरोधानात्मिका अर्थात् मोहमाया शक्तीच्या द्वारा संहाराच्या अवस्थेमध्ये फेकल्या गेलेल्या प्रमात्यांना किंवा जीवांचा समावेश केलेला आहे. हे अबुद्ध अर्थात् अज्ञानी जीव या संहाराच्या अवधीमध्ये मायारूपी काळरात्रीने अथवा दुसऱ्या शब्दामध्ये गुणत्रयाच्या साम्यावस्थेच्या गर्भामध्ये प्रगाढ अर्थात् घनदाट अंधकाराने अर्थात् अंधाराने परिपूर्ण असलेल्या गहन गुंफेमध्ये किंवा गुहेमध्ये पडलेल्या अजगराप्रमाणे निःसंज्ञ अर्थात् संज्ञारहित किंवा जाणीव-शून्य होऊन पडून राहतात. या जीवांच्या चेतनेवर स्वात्म-अख्यातीचे अर्थात् आत्मस्वरूपाच्या विस्मृतीचे इतके दुर्भेद्य अर्थात् भेदन करण्यास कठीण आवरण पसरलेले असते की, या जीवांना आपल्या सद्भाव किंवा असद्भाव यांपैकी कोणत्याही गोष्टीची जाणीव किंवा चेतना असत नाही. याचा परिणाम म्हणून हे अज्ञानी जीव शब्दादि विषयांना ग्रहण करण्यास पूर्णपणे असमर्थ असतात. त्यामुळे त्या काळापर्यंत या जीवांना सुख-दुःख इत्यादींची कोणतीही अनुभूती राहत नाही याच कारणामुळे अशा प्रमातृवर्गाला किंवा जीववर्गाला "अबुद्ध" ही संज्ञा दिलेली आहे.

याविषयी ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, संहार होण्याच्या वेळी अशा प्रमात्यांचे किंवा जीवांचे संचित कर्मही तावत्कालापर्यंत वासना अथवा संस्काराच्या रूपामध्ये त्या जीवाबरोबर सुप्तावस्थेमध्ये पडून राहिलेले असते.

**२) बुद्ध प्रमातृवर्ग :-** या विषयाचे विवेचन **"स्वच्छंदतंत्र"** या

ग्रंथात (११.९६-११२) पाहावे. या संहारावस्थेमध्ये पडून असलेल्या प्रमात्यांपैकी अर्थात् जीवांपैकी काही प्रमात्यांच्या कर्मपरिपाकाची वेळ आली असता भगवान् श्रीअनंतभट्टारक आपल्या इच्छाशक्तीच्या साहाय्याने या प्रमात्यांना किंवा जीवांना त्यांच्या पूर्वसंचित कर्मानुसार त्या त्या योनींमध्ये ढकलत असतात आणि या जीवांना फलांचा भोग घेण्याला प्रवृत्त करीत असतात. (शैवसिद्धान्तानुसार शुद्धाध्वामध्ये अर्थात् शुद्ध सृष्टीमध्ये किंवा शुद्ध जगतामध्ये किंवा शुद्ध मार्गामध्ये भगवान् श्रीशिव हे भेदरहित श्रीशिव-रूपामध्येच सृष्टीसंहार आदि करीत राहतात. अशुद्धाध्वामध्ये अर्थात् मायातत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंतच्या या विश्वामध्ये स्वतः भेदव्याप्तीचा स्वीकार करून सृष्टी-संहार आदि करीत असतात. श्रीशिवांच्या या रूपाचे नाव "**श्रीअनंतभट्टारक**" हे आहे.) त्यावेळी श्रीभगवान् कलातत्त्वाच्या द्वारा या प्रमात्यांमध्ये किंवा जीवांमध्ये अंशतः चेतनेचा संचार करून घेत असतात आणि हे प्रमाता किंवा जीव प्राकृतिक प्रतिविधानानुसार स्थूल शरीरे धारण करून विचित्र योनींमध्ये भटकत राहतात. अशाच प्रमात्यांना किंवा जीवांना दुसऱ्या शब्दामध्ये "संसारी जीव किंवा पशू" असे म्हटलेले आहे. विषयपिपासेला अर्थात् विषयतृष्णेला विषयोपभोगाच्या द्वारा शांत करणे हे अशा जीवांचे कर्तव्य बनून राहते. याचा परिणाम असा होतो की, हे जीव प्रतिक्षण परमेश्वराच्या निग्रहशक्तीच्या घोरतर प्रभावामध्ये पडून कामिनी अर्थात् स्त्री आणि कांचन अर्थात् सोने किंवा पैसा यांना सर्वोत्कृष्ट तसेच उपादेय किंवा ग्राह्य किंवा स्वीकार्य समजत असतात. असे जीव कधीही आत्मचिंतनाकडे प्रवृत्त होत नाहीत. कामिनीकांचन यांनाच जीवनाचे परमलक्ष्य समजल्यामुळे अशा जीवांना किंवा प्रमात्यांना "बुद्ध" असे म्हटले जाते.

**३) प्रबुद्ध प्रमातृवर्ग :-** या विषयाचे विवेचन "**मालिनीविजयोत्तर-तंत्र**" (१.४२-४५) तसेच "**स्वच्छंदतंत्र**" (११.११३-१२०) या ग्रंथांमध्ये पाहावे. श्रीभगवान् हे परमकारुणिक अर्थात् परमदयाळू आहेत. यामुळे या श्रीभगवंतांच्या शक्तिपातामुळे किंवा कृपेमुळे कोणत्याही वेळी एखाद्या प्रमात्यामध्ये किंवा जीवामध्ये अकस्मात् अशी योग्यता निर्माण होते की, त्या जीवाच्या अंतःकरणातील तमामध्ये किंवा अंधकारामध्ये दिव्य अशा श्रीशांकरभक्तीची किरणे स्वयं प्रवेशतात. याचा परिणाम म्हणून सर्वप्रथम अशा जीवाच्या हृदयामध्ये संसारातील किंवा जगतामधील विषयांच्या

विषयी अरुची उत्पन्न होत असते. त्या जीवाच्या सद्ज्ञानावर पसरलेले मायीय आवरण दूर होऊ लागते आणि तो जीव सर्व कृत्रिम संबंधांना इंद्रजलाप्रमाणे अनभवू लागतो. श्रीगुरुकृपेने असा जीव आत्मानुसंधान करण्याकडे प्रवृत्त होतो. जेव्हा या जीवाची आत्मजिज्ञासा तीव्रतर रूप धारण करते तेव्हा भगवान् श्रीचंद्रमौळी स्वयं श्रीगुरूंचे रूप धारण करून त्या जीवाला श्रीशांकरमार्गामध्ये दीक्षित करून देतात. असा कृपाप्राप्त जीव प्रबुद्ध भावाच्या कनिष्ठ भूमिकेतून बाहेर निघून सुप्रबुद्ध भावाच्या उच्चतर भूमिकेमध्ये प्रविष्ट होत असतो. अशा कृतार्थ प्रमात्याला किंवा जीवाला शैवशब्दामध्ये "प्रबुद्ध-प्रमाता" असे म्हणतात.

**४) सुप्रबुद्ध प्रमातृवर्ग :-** या विषयाचे विवेचन "**मालिनीविजयोत्तरतंत्र**" (१.४६-४७) तसेच "**स्वच्छंदतंत्र**" (११.१२१-१२५) या ग्रंथांमध्ये पाहावे. प्रबुद्ध प्रमाता किंवा जीव अनथक प्रयत्न अर्थात् न थकता केलेले प्रयत्न आणि निश्चल तसेच पवित्र भक्तीच्या द्वारा प्रसन्न करून घेतलेल्या श्रीशंकरस्वरूप श्रीसद्गुरूंकडून शैवी दीक्षा प्राप्त करून घेत असतो. असा जीव किंवा प्रमाता योगमार्गावर अग्रेसर होत सुप्रबुद्ध अवस्थेमध्ये प्रविष्ट होत असतो. अशा सुप्रबुद्ध जीवाला उत्कृष्ट तसेच अवर्णनीय तुर्यारूप शाक्तभूमिकेची अखंड अनुभूती प्राप्त होत असते. असा प्रमाता किंवा जीव श्रीभगवंतांच्या तीव्रतम शक्तिपाताच्या प्रभावामुळे एका अनिर्वचनीय भूमिकेवर पोहोचलेला असतो. वर्ण, पद, मंत्र, कला, तत्त्व आणि भुवन या सहा मार्गांनी अतिगत झाल्यामुळे अर्थात् पलीकडे गेल्यामुळे पूर्णपणे विरज, विमल आणि शांत अशी ही भूमिका आहे. संक्षेपाने केवळ इतकेच म्हणणे पर्याप्त आहे की, सुप्रबुद्ध योगी हा साक्षात् श्रीशिवभावावर पोहोचलेला प्रमाता किंवा जीव असून या योग्याला प्रत्येक अवस्थेमध्ये प्रतिक्षण आणि प्रत्येक दिशेमध्ये आनंदरसाने परिपूर्ण अशा केवळ श्रीशिवभावाची अनुभूती त्रिकालाबाधित रूपामध्ये होत असते.

इतक्या गोष्टी समजून घेतल्यानंतर वाचक किंवा अभ्यासक स्वतः या निष्कर्षावर पोहोचत असतो की, प्रबुद्ध योगी हाच श्रीगुरूपदेशासाठी उपयुक्त अर्थात् योग्य पात्र आहे. अबुद्ध तसेच बुद्ध प्रमाता किंवा जीव उपदेशास पात्र असत नाहीत; कारण हे प्रमाता किंवा जीव हे प्रमाद अर्थात्

निष्काळजीपणाच्या मदिरेच्या नशेमध्ये धुंद होऊन कधीही आत्मचिंतनाकडे प्रवृत्त होत नाहीत. केवळ त्या प्रमात्यामधील कोणाला स्वतः श्रीभगवंत उदयास आणू इच्छित असतील किंवा प्रबुद्ध करू इच्छित असतील तर दुसरी गोष्ट आहे. सुप्रबुद्ध योग्याला उपदेश देण्याची आवश्यकता नसते; कारण साक्षात् श्रीशिवभावावर स्थित असलेल्या व्यक्तीला उपदेश देण्याचे प्रयोजन काय आहे.।।१७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

अशा प्रकारे अप्रबुद्ध बहिर्मुख (बाह्य) व्यापारांचा प्रतिरोध झाला असता ज्ञान होणाऱ्या आत्म्याची सिद्धी होत नसतानाही अभावाची निश्चिती करतो असे सांगून सुप्रबुद्ध आणि अप्रबुद्ध हे दोघेही कशा प्रकारे आत्म्याला समजावून अथवा जाणून घेतात ते या कारिकेत सांगितले आहे.

**स्पष्टीकरण :-** या प्रकरणाचा विषय असणाऱ्या "स्व"भावाची जी उपलब्धी म्हणजेच कोणत्याही आवरणांनी रहित असा प्रकाश आहे तो सांगितलेल्या दृढ अशा वचनांमुळे सुप्रबुद्धाच्या म्हणजेच अप्रबुद्ध संस्कारांचा अभाव असणाऱ्या जाग्रत, स्वप्न आणि सुषुप्ती या तीनही अवस्थांमध्ये सतत नित्यच असतो म्हणजेच तो आदि, मध्य आणि अंती अव्यभिचारी म्हणजेच अनपायी अर्थात् क्षय न होणारा असतो. अशा प्रकारे हा प्रकाश श्रीशंकरात्मक स्वस्वभावत्वाने स्फुरतो असा त्याचा अर्थ आहे. दुसरा म्हणजेच जो अप्रबुद्ध आहे त्याला आदि म्हणजेच परत त्या दशांच्या म्हणजे स्व-उचित-संविद्रूपाच्या उदयाच्या इच्छेच्या वेळी तो प्रकाश प्राप्त होतो आणि शेवटी चैतन्यस्वरूप अशा स्थितींच्या विश्रांतीने युक्त अशा अंतर्मुखत्वाच्या वेळी प्राप्त होतो. परंतु "स्व"ला योग्य अशा अर्थाचे प्रकटन होत असणाऱ्या स्थितिरूप मध्यपदात (हा प्रकाश) प्राप्त होत नाही. यादृष्टीने **"श्रीशिवदृष्टि"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**यावत्समग्रज्ञानाग्रज्ञातृस्पर्शदशास्वपि।**
**स्थितैव लक्ष्यते सा तु तद्विश्रान्त्याथवा फले।।२।५।।**

**अर्थ :-** ती (शक्ती) ज्ञात्याच्या अस्तित्वात सर्व ज्ञानाच्या उगमाच्या वेळेला किंवा फलामध्ये विश्रांती घेत असलेली दिसून येते अथवा जाणवून येते.

भट्टश्रीकल्लटांनीही स्वतःच्या टीकेत "**तदाद्यन्ते**" या पदांची अशीच व्याख्या केली आहे. भट्टश्रीकल्लटांची वृत्ती अपेक्षून आम्ही त्या वृत्त्यक्षरांच्या अनुरोधाने अत्यंत स्पष्ट अशा सूत्राच्या अर्थाची क्लिष्ट किचकट कल्पनांनी व्याख्या करण्यात अशिक्षित आहोत; कारण ज्याला प्रकाशरूप तत्त्वाचे यथार्थ ज्ञान झालेले नाही अशा अप्रबुद्ध साधकाला त्याचे ज्ञान आदि व अंतीच होत असते. त्यामुळेच तो साधक येथे अर्थात् या ज्ञानाच्या प्राप्तीत अधिकारी असून तो स्पंदशास्त्रातल्या सिद्धान्तांच्या उपदेशांनी सुप्रबुद्ध होतो. हेच कारिका क्रमांक २१, २५, ३४ आणि ४४ याही ठिकाणी सांगितले. या ठिकाणी जागरादि तीन पदांमधल्या आदि व अंतकोटीप्रमाणे अर्थवसायात्मक अर्थात् पदार्थांचे निश्चितीकरण करणाऱ्या मध्यपदालाही तुर्याभोगमय करण्यासाठी व प्रबुद्धाला सुप्रबुद्धता येण्यासाठी उपदेश प्रवृत्त झाला आहे. आणि पुढे ह्याचा निर्णय सांगतील. त्याचप्रमाणे, "**जाग्रत्स्वप्नसुषुप्तभेदे तुर्याभोगसम्भवः।।७।।, त्रिषुचतुर्थं तैलवदा-सेच्यम्।।, त्रितवभोक्ता वीरेशः।।१।११।।**" हे "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथामध्ये असेच सांगितले आहे.।।१७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

पूर्वी सांगितलेल्या देहादि व्यतिरिक्त असणाऱ्या आत्मतत्त्वाचे युक्तीने आणि स्वानुभूतीने प्रतिपादन करून आता त्याच्या प्राप्तीसाठी उपायांचा उपदेश(ज्ञान) प्राप्त करून सुप्रबुद्ध, प्रबुद्ध आणि अप्रबुद्ध इत्यादि तीन प्रकारच्या मानवांमध्ये कोण प्रकृतोपदेशाधिकारी असतो? या शंकेला उत्तर देताना "**तस्योपलब्धिः सततं .....।।१७।।**" ही करिका सांगितली आहे.

सुप्रबुद्ध योगी सर्वव्यापक चिद्रूप स्वभावात राहणारा परमतत्त्व-परमेश्वराची उपलब्धी म्हणजेच आत्मानुभूती, जाग्रत, स्वप्न आणि सुषुप्ती या तीनही अवस्थांमध्ये अखंड आणि एकरसतेने अविरत घेत असतो. या सुप्रबुद्ध योग्याची ही आत्मानुभूती कधीही व्यभिचरित होत नाही. दुसऱ्या प्रकारचे प्रबुद्धयोगी हे जाग्रदादि तीनही अवस्थांमध्ये आत्मस्वभावाचा अनुभव घेत असतात. परंतु तुर्यावस्थेत त्यांची दृढ स्थिती होत नाही. त्यांना तुर्यावस्थेची प्राप्ती ही श्रीसद्गुरूंच्या उपदेशामुळेच होते. त्यामुळे सुप्रबुद्ध योग्याला कोणत्याही प्रकारच्या उपदेशाची आवश्यकता नसते. त्याची आत्मस्वरूपात

प्रतिक्षण स्थिती ही स्वाभाविकपणेच प्राप्त झालेली असते. त्या व्यतिरिक्त जे अन्य योगी आहेत त्यांना तत्त्वज्ञांच्या किंवा श्रीगुरूंच्या उपदेशाची नितांत आवश्यकता असते.।।१७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**ज्ञान-ज्ञेय-स्वरूपिण्या शक्त्या परमया युतः।**
**पदद्वये विभुर्भाति तदन्यत्र तु चिन्मयः।।१८।।**

**अन्वयार्थ :-**

**विभुः** - सर्वव्यापी ईश्वर, ("चिन्मयमूर्ती आत्मा" - श्रीरामकंठ,) **ज्ञान-ज्ञेय-स्वरूपिण्या :-** ज्ञान व ज्ञेय (**ज्ञेय** - शब्द, रूप इत्यादि व सुखादि अनंत विषय - श्रीरामकंठ) स्वरूपी, **परमया** - अत्यंत श्रेष्ठ, (अत्यद्भुत रूप असल्यामुळे सर्वश्रेष्ठ - श्रीरामकंठ), **शक्त्या :-** शक्तीने, **युतः** - युक्त असलेला, **पदद्वये** - जागृती व स्वप्न या अवस्थात, **भाति-** प्रकाशतो, म्हणजे "ज्ञान रूपाने तो स्वप्न या अवस्थेत व ज्ञेय या रूपाने तो जाग्रत अवस्थेत अनुभवास येतो, **तु** (पण), **तदन्यत्र** - त्या व्यतिरिक्त इतर म्हणजे सुषुप्ती व तुर्या या अवस्थांत तो, **चिन्मयः** - चिद्रूप असल्याचा, चिद्रूपत्वाने (-प्रतीतीस येतो.)।।१८।।

**अर्थ :-** सर्वव्यापी ईश्वर किंवा चिन्मयमूर्ती आत्मा ज्ञान व ज्ञेय अर्थात् शब्द, रूप इत्यादि तसेच सुखादि अनंत विषयस्वरूपी असून अत्यंत श्रेष्ठ शक्तीने युक्त असतो. सर्वव्यापी ईश्वर हा जागृती व स्वप्न या अवस्थांमध्ये प्रकाशतो. ईश्वर हा ज्ञानरूपाने स्वप्न या अवस्थेत व ज्ञेयरूपाने जागृत अवस्थेमध्ये अनुभवावयास येतो. त्या व्यतिरिक्त इतर म्हणजे सुषुप्ती व तुर्या या अवस्थेमध्ये तो चिद्रूपत्वाने प्रतीतीस येतो.।।१८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

ज्ञान व ज्ञेयरूपाने परब्रह्म नटले आहे. ज्ञानरूपाने म्हणजे "मी आहे," हे जाणण्याची शक्तीही तोच बनला आहे. अर्थात् हे सर्व विश्व त्याची शक्तीच आहे. खरोखर हे विश्व विश्व नसून परब्रह्माची शक्तीच आहे. सारांश विश्व हे परब्रह्मच आहे अशी भावना ठेवावी.

परमेश्वर स्वतःच्या मायेच्या क्षेत्रज्ञ स्वरूपाने स्वतःला नानारूपाने

भासमान करीत असतो. तो स्वतःहून कधीही वेगळ्या नसणाऱ्या अशा पराशक्तीला ज्ञान व ज्ञेय भावाने भासवीत असतो. यामुळेच जीवाला जागृत व स्वप्नावस्थेत त्याचा अनुभव येत असतो. हेच त्या शक्तीचे श्रेष्ठत्व होय. ती स्वतःच्या चैतन्याच्या स्वरूपाची प्रकाशमानता नष्ट न करता ज्ञान व ज्ञेय या रूपाने भासमान होत असते.

सुषुप्ती व तुरीय अवस्थेमध्ये मायेच्या अंधःकारामुळे जीवाचे श्रीपरमेश्वरांशी अभिन्नत्व नष्ट होते. वास्तविक त्या अवस्थांमध्ये द्वैताची भावना खरोखरीच नष्ट पावलेली असते व चैतन्यरूप ज्ञानमय अशा खऱ्या स्वरूपाचा साक्षात् अनुभव आपणास येत असतो. त्या दोन्ही अवस्थांमध्ये आपण ज्ञानस्वरूप असतोच हे समजण्याची जरूरी नाही. परंतु जागृत व स्वप्नावस्थेमध्ये अशी सावधानता ठेवावयास हवी की, आपल्याला ज्ञान व ज्ञेय रूपाने चिच्छक्तीचेच भान होत असते म्हणून ज्ञान व ज्ञेय ही चिच्छक्तीच आहे. चिच्छक्ती ही ज्ञानस्वरूपानेच असते म्हणून आपण चैतन्यमय आहोत. याचा अर्थच असा की, जागृत, स्वप्न, सुषुप्ती व तुरीय या चारी अवस्थेमध्ये आपण चैतन्यस्वरूपच म्हणजे परमेश्वररूपच आहोत, याचा अनुभव आपल्याला येत असतो. व्यवहारामध्ये ईश्वराने कल्पिलेल्या या सृष्टीची दृढता जास्त होत असते. स्वप्नावस्थेमध्ये क्षेत्रज्ञानेच सृष्टी उत्पन्न केली असल्याकारणाने ती आपल्याला अदृढ व चंचल वाटत असते. सुषुप्ती अवस्थेमध्ये चिन्मात्ररूप हे सत्यत्वाने असूनसुद्धा मोहामुळे मीच ते स्वरूप आहे हा अनुभव नसल्याने परमेश्वर तत्त्व नाहीच असे वाटत राहते. परंतु तुरीयावस्थेमध्ये परमात्मस्वरूपाचीच सत्ता आहे याची खरोखर जाणीव होत असते. या कारणाने व्यवहारामध्ये निरनिराळ्या शास्त्राच्या चार अवस्थेच्या अभिमान्यांना विश्वात्मा, तैजसात्मा, प्रज्ञात्मा व तुरीयात्मा अशी नावे प्राप्त झाली आहेत. अशा प्रकारचा उपदेश प्रबुद्ध जीवात्म्यालाच होऊ शकतो. अप्रबुद्धांना उपदेशाचा संस्कारसुद्धा होऊ शकत नाही. त्यांना वर सांगितलेला अभ्यासच करता येणे शक्य नाही.

चिद्रूप श्रीपरमात्मा सर्वत्र परिपूर्ण आहे व तो अत्यंत उत्कृष्ट सामर्थ्याने युक्त आहे. तो जागृत व स्वप्नावस्थेत दैदीप्यमान असतो. ज्ञान व ज्ञेय या दोन्ही गोष्टी त्याच्या शक्तीच आहेत. ही शक्ती या दोन्ही अवस्थेत दोन प्रकारचे कार्य करते. ती दोन प्रकारांनी उत्पन्न होते. या

दोन अवस्थांना सोडून सुषुप्ती व तुरीय या दोन्ही अवस्थांमध्ये ती शक्ती चिन्मात्र रूपानेच राहते; कारण तेथे ज्ञेय असत नाही, केवळ ज्ञानस्वरूपच असते. प्रश्न असा आहे की, गुणस्पंदादि अनेक पदार्थ उपलब्ध असताना परमेश्वराची उपलब्धी कशी होते? या शंकाकलंकाचे परिमार्जन पुढील कारिकेत केले आहे.।।१८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** जागृती व स्वप्न या अवस्थेतील आपला व्यवहार भेददृष्टीने होत असतो. त्यात ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय अशी त्रिपुटी नेहमी अनुभवास येते. पैकी ज्ञाता हा जीवरूपाने वावरणारा आत्माच होय. याला क्षेत्रज्ञ म्हणतात. या क्षेत्रज्ञाची शक्तीच ज्ञान व ज्ञेय या रूपाने या अवस्थाद्वयात स्फुरण पावत असते. हाच व्यवहार होय. यात शक्तीला प्राधान्य असलेले दिसून येते; पण सुषुप्ती आणि तुर्या या अवस्थांत ज्ञान-ज्ञेय हा भेद नाहीसा झालेला असतो व शक्ती लीन झालेली असते. त्यामुळे केवळ चिन्मय ज्ञातृत्व हेच त्या दोन अवस्थात स्फुरत असते. जागृती व स्वप्न या दोहोतही ज्ञानज्ञेयभेद कायमच राहत असेल तर मग त्या अवस्था एकच का मानू नयेत? तसेच सुषुप्ती व तुर्या या दोन्हीत चिन्मयताच असेल तर मग त्याही दोन अवस्था एकच का नसाव्यात? अशी शंका येथे येणे शक्य आहे. यावर उत्तर असे की, जागृतीतील ज्ञानज्ञेयभेद स्थिर असतो तर स्वप्नातील हा भेद जीव परिकल्पित असल्याने अस्थिर असतो. तसेच सुषुप्तीमध्ये व तुर्येत चिन्मयताच प्रकाशत असली तरी सुषुप्तीतील चिन्मयता मोहाने आवृत असल्याने तेथे जीवाला अहंप्रत्ययाचा आनंदमय अनुभव येत नाही, उलट तुर्येत मोहाचे आवरण नसल्याने अहंप्रत्ययाचा आनंद अनुभविता येतो.।।१८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

### अवस्था भेदामध्ये स्वरूपाची अभेद अवस्था

या सूत्र क्रमांक १८ मध्ये अनुभूतीच्या दृष्टिकोनातून जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ती आणि तुर्य अवस्थांमध्ये स्वभावाची उपलब्धी किंवा प्राप्ती

कोणकोणत्या रूपामध्ये होते या रहस्याला अनावृत केले जाणार आहे.

**वृत्ती :-** जागृत आणि स्वप्न या दोन अवस्थांच्या अवस्थागत द्विरूपतेचा आधार हा आहे की, पहिल्या अवस्थेमध्ये संवेदनाचे रूप ज्ञेय असून दुसऱ्या अवस्थेमध्ये ज्ञान हे रूप आहे. याच्या प्रतिकूल सुषुप्ती आणि तुर्या नावाच्या दोन अवस्थांमध्ये स्वभावाची अनुभूती विशुद्ध चिन्मात्ररूपामध्ये होत असते. या दोन अवस्थांमध्ये स्वभावाची उपलब्धी किंवा प्राप्ती चिद्रूपतेशिवाय अन्य कोणत्याही रूपामध्ये होत नाही.।।१८।।

**विवरण :-** जाग्रत् आदि अवस्थांच्या सर्वसामान्य लौकिक रूपावर प्रथम प्रकाश टाकलेला आहे. (सूत्र क्रमांक ३ चे विवरण पाहावे.) हेही म्हटले गेलेले आहे की, प्रत्यक्षात हे अवस्थाभेद औपचारिक आहेत; कारण या सर्वांचा अनुभविता अर्थात् वेदक किंवा ज्ञाता अर्थात् अनुभव घेणारा जीव हा एकच असतो. आता येथे केवळ इतका विचार करणे आवश्यक आहे की, आध्यात्मिक दृष्टिकोणाने या अवस्थांची स्वरूपगत वैशिष्ट्ये कोणती आहेत आणि यामध्ये शक्तीची स्पंदना किंवा स्फुरण कोणकोणत्या रूपामध्ये विलासमान किंवा क्रीडारत होत असते?

**मुख्य जाग्रत् अवस्था :-** (मुख्य अवस्था असे म्हटल्यावर इतर अवस्थांशी संकर न झालेले अवस्थेचे विशुद्धरूप हे अभिप्रेत असते. जसे मुख्य जाग्रत अवस्था हे जाग्रत्-जाग्रत्, जाग्रत्-स्वप्न इत्यादि अवस्थांना न म्हणता केवळ विशुद्ध जाग्रत् अवस्थेलाच दिलेले नाव आहे. **"मेयभूमिरियं मुख्या जाग्रदाख्या .....।। तंत्रालोक १०.२४०।।"** मुख्य जाग्रत् अवस्था पूर्णरूपामध्ये प्रमेय भूमिका आहे अर्थात् सिद्ध भूमिका आहे असे अनुभवी सिद्ध पुरुषांचे कथन आहे. यामध्ये संवित्-भट्टारिका अर्थात् विमर्शशक्ती अर्थात् श्रीभगवंतांची स्वतंत्रशक्ती ही प्रमेय भूमिकेवर उतरून जगतामधील प्रमेय (ज्याचे यथार्थ ज्ञान करून घ्यावयाचे आहे तो पदार्थ किंवा वस्तू), प्रमाण (यथार्थ ज्ञान करून घेण्याचे साधन), प्रमाता (यथार्थ ज्ञान प्राप्त करून घेणारा कर्ता अर्थात् ज्ञाता किंवा पशुवर्ग किंवा जीव) आणि प्रमा (यथार्थ ज्ञान) यांच्या विचित्रतेने भरलेल्या प्रमेय विश्वाच्या रूपामध्ये स्पंदायमान किंवा स्फुरणशील आहे. (या प्रमाता शब्दाचा अर्थ संसार भूमिकेवर स्थित असलेला पशुवर्ग असा आहे. संसारामधील किंवा जगतामधील पशुवर्ग हा चेतन असूनही विश्वात्मक संवित्च्या अर्थात्

शक्तीच्या पेक्षा प्रमेय किंवा ज्ञेय किंवा वेद्य वर्गामध्ये अंतर्भूत होत असतो.) शास्त्रीय शब्दामध्ये या अवस्थेला अधिष्ठेय अवस्था असे म्हणतात. या अवस्थेमधील स्थितीचे वर्णन करताना **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की-

**तथा हि भासते यत्तन्नीलमन्तः प्रवेदने।**
**सङ्कल्परूपे बाह्यस्य तदधिष्ठातृबोधकम्।।**
**यत्तु बाह्यतया नीलं चकास्त्यस्य न विद्यते।**
**कथञ्चिदप्यधिष्ठातृभावस्तज्जाग्रदुच्यते।।१०.२३४-३५।।**

याचा अर्थ असा आहे की, संकल्परूपाने अंत:प्रवेदनात म्हणजे अंत:करणात विशेषत्वाने जाणविणारा जो नील (प्रकाश) भासित होत असतो तोच बाह्य नीलप्रकाशाचा बोध करणारा असतो. तो बोध करणारा असल्यामुळे तोच अधिष्ठाता आहे. जो नील बाहेरील व्यवहारात निराळ्या रूपाने भासित होत असतो तो अधिष्ठेय आहे. त्यात कोणत्याही प्रकाराने अधिष्ठेयभावाचे प्रकल्पन अर्थात् स्थिर करणे शक्य होत नाही. जी अधिष्ठेय दशा आहे तीच जागृत अवस्था आहे.

मनामध्ये अंत:संकल्पात्मक संवेदनाच्या रूपामध्ये भासमान होणाऱ्या घट-पट आदि वेद्य किंवा ज्ञेय किंवा प्रमेय पदार्थांच्या द्वाराच बाहेरील स्थूल घट-पट आदि वेद्य किंवा प्रमेय पदार्थाचे अवभासन किंवा प्रकाशन होत असते. हेच कारण आहे की, मानसिक संकल्परूप घट-पट आदि वेद्यभाव हे अधिष्ठात्याच्या पदवीवर आणि या वेद्यभावांच्या द्वारा अवभासित किंवा प्रकाशित होणारे बाह्य स्थूल घट-पट आदि वेद्यभाव अधिष्ठेय अर्थात् प्रशासकीय पदवीवर स्थित आहेत. जागृत अवस्थेमध्ये अंत:संवेदनाच्या रूपामध्ये वर्तमान वेद्य पदार्थाचे बाह्य स्थूल वेद्य पदार्थाच्या रूपात प्रकाशित होणे आवश्यक आहे; कारण तेव्हाच या अवस्थेची सार्थकता मानली जाते. याच कारणाने या अवस्थेला प्रतिक्षण अधिष्ठेय-अवस्था असे म्हटले जाते. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**यदधिष्ठेयमेवेह नाधिष्ठातृ कदाचन।**
**संवेदनगतं वेद्यं तज्जाग्रत्समुदाहतम्।।१०.२३१।।**

याचा अर्थ असा की, जागृत अवस्था हीच नेहमी अधिष्ठेय म्हणजे

अधिष्ठान करण्यास योग्य असते. ही अवस्था कधीही अधिष्ठातृ अर्थात् अधिष्ठानयुक्त अवस्था बनू शकत नाही. या अवस्थेमध्ये स्पंदमयी विमर्शशक्ती अर्थात् विचारशक्ती ज्ञेयरूपामध्येच विलासमान अर्थात् क्रीडारत राहते. यामुळे सावधान पुरुषांना ज्ञेयतेमध्येच स्वरूपाची अनुभूती होत राहते.

**मुख्य स्वप्न अवस्था :-** मुख्य स्वप्नावस्थेमध्ये संवित् भट्टारिका अर्थात् विमर्शशक्ती अर्थात् विचारशक्ती वैकल्पिक अर्थात् अनिश्चित ज्ञानरूपामध्ये स्पंदित होत असते. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**यत्त्वधिष्ठानकरणभावमध्यास्य वर्तते।**
**वेद्यं सत्पूर्वकथितं भूततत्त्वाभिधामयम्।**
**तत्स्वप्नो मुख्यतो ज्ञेयं तत्त्व वैकल्पिके पथि।।**
**।।१०.२४७-४८।।**

याचा अर्थ असा आहे की, (स्वप्न ही जागृत अवस्थेनंतरची अवस्था असून त्याची चार वैशिष्ट्ये आहेत.) ही अवस्था अधिष्ठानाच्या साधनभावात अध्यस्त म्हणजे आरोपित केलेली राहते. ही वेद्य असते. ही वेद्य असली तरी भूततत्त्वाभिधानमय असते. ही वैकल्पिक मार्गात ज्ञेय होते.

ही संवित् भट्टारिका जाग्रत् अवस्थेच्याच घट-पट आदि ज्ञेय पदार्थांना मानसिक संकल्परूपामध्ये अशा प्रकारे सुस्पष्ट रूपामध्ये अवभासित अर्थात् प्रकाशित करून घेत असते की, जणू प्रमाता जाग्रत् अवस्थेप्रमाणे बाह्य इंद्रियांच्या द्वारा या ज्ञेय पदार्थांचे ग्रहण करून घेत आहे. या दृष्टीने "**तंत्रालोक**" ग्रंथात असे म्हटले आहे की -

**मानभूमिरियं मुख्या स्वप्नो ह्यामर्शात्मकः।।१०.२५६।।**

शास्त्रानुसार जाग्रत् अवस्थेला ज्ञेयप्रधानतेमुळे "प्रमेय पद" असे म्हणतात. स्वप्नावस्थेला वैकल्पिक ज्ञानप्रधानतेमुळे "प्रमाणपद" असे म्हणतात. स्वप्नावस्थेमध्ये "**मेयच्छायावभासिनी मानप्रधाना स्वप्नावस्थेयमित्यर्थः।। तंत्रालोकविवेक १०.२४८।।**" असते. याचा अर्थ असा आहे की, यानुसार अनुभवित्याचे अर्थात् अनुभव घेणाऱ्या पुरुषाचे मानसिक संकल्प, स्थूल घट-पट इत्यादि वेद्य पदार्थांच्या वास्तविक किंवा खऱ्या स्थितीच्या अभावामध्येही संकल्परूपामध्ये या पदार्थांच्या छायेला

अवभासित किंवा प्रकाशित करीत असतात. परिणामतः ही गोष्ट स्पष्ट आहे की, स्वप्नावस्थेमध्ये जाग्रत् अवस्थेपर्यंत अनुभवास येणारे वेद्य किंवा ज्ञेय किंवा प्रमेय पदार्थ बाह्य स्थूल रूपामध्ये वर्तमान नसतानाही मानसिक संकल्परूपामध्ये अर्थात् ज्ञानरूपामध्ये वर्तमान राहतात. याच कारणामुळे या अवस्थेचे दुसरे शास्त्रीय नाव "अधिष्ठान अवस्था" असे आहे. सावधान अर्थात् जागरुक पुरुषांना या अवस्थेमध्ये वैकल्पिक ज्ञानरूपामध्येच स्पंदायमान अर्थात् स्फुरण पावणाऱ्या स्वरूपाची अनुभूती प्राप्त होत असते.

**मुख्य सुषुप्ती अवस्था :-** येथे सुषुप्ती शब्दाचा अर्थ "पूर्णस्वाप" असा असला तरीही आध्यात्मिक स्तरावर "सुषुप्ती" या शब्दाचा अर्थ "प्रगाढ निद्रा" असा नाही. योगाच्या प्रक्रियेनुसार ही समाधी अवस्था आहे. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**अनुभूतौ विकल्पे च योऽसौ दृष्टा स एव हि।**
**न भावग्रहणं तेन सुष्ठु सुप्तत्वमुच्यते।।१०.२५८.५९।।**

याचा अर्थ असा आहे की, प्रमाता म्हणजे जीव आपल्या अनुभूतीच्या बळावर जागृत अवस्थेतही वेद्याच्या बाह्यसत्तेचा प्रत्यक्ष अनुभव घेतो. विकल्प अर्थात् स्वप्नातही तो बाहेरच्या प्रमाणेच दर्शन घेत असतो. द्रष्टा तेथेच राहतो. तो भावरूप प्रमेय व ग्रहणरूप प्रमाण होत नाही. ज्यावेळी द्रष्टा आत्मस्थ राहतो त्या दशेला सुषुप्ती अवस्था असे म्हणतात.

या अवधीमध्ये जाग्रत् तसेच स्वप्न या अवस्थांचा अनुभव घेणारा प्रमाता अर्थात् अनुभविता हाच चिन्मात्र रूपामध्ये अवस्थित राहतो आणि जाग्रत् अवस्थेमध्ये ज्ञेयरूप तसेच स्वप्नावस्थेमधील वैकल्पिक ज्ञानरूप वेद्य पदार्थांना ग्रहण करण्याविषयी पूर्णपणे सुप्त अर्थात् विमुख होत असतो. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**यत्त्वधिष्ठातृभूतादेः पूर्वोक्तस्य वपुर्ध्रुवम्।**
**बीजं विश्वस्य तत्तूष्णींभूतं सौषुप्तमुच्यते।।१०.२५७.५८।।**

याचा अर्थ असा आहे की, वेद्याच्या छायेचा अवभास प्राणादि आणि संकल्पादींच्या संस्पर्शाच्या कारणामुळे चेतनायमान होतो. तो मेयात अधिष्ठान आहे हे मानणे आवश्यक आहे. बीज हे विश्वाच्या उल्लासाचे प्रशांत

श्रीशिवत्व आहे. या अवस्थेला सौषुप्त संज्ञाने संबोधले जाते.

परिणामतः या कालामध्ये तोच याआधी वर्णिलेला अधिष्ठातृरूपामध्ये अर्थात् अंतःसंवेदनाच्या रूपामध्ये असणारा प्रमेयभाव हा बाह्य प्रमेय-विश्वाच्या बीजाप्रमाणे संस्काररूप बनून जणू गाढ झोपेत असल्याप्रमाणे पडून राहतो. याचा अर्थ असा आहे की, सुषुप्ती कालामध्ये वेद्यता किंवा ज्ञेयता ही पूर्णपणे नाहीशी होऊन चिन्मात्ररूपतेमध्ये लय पावत नाही. उलट तावत्कालापर्यंत संस्काररूपामध्ये वर्तमान राहत असते. हेच कारण आहे की, सुषुप्ती काल व्यतीत होताच अंतःसंवेदनामध्ये पुन्हा वेद्यतेचा किंवा ज्ञेयतेचा उदय होत असतो. "**मुख्या मातृदशा सेयं सुषुप्ताख्या निगद्यते।। तंत्रालोक १०.२६०।।**" अशा रीतीने शास्त्रकारांनी या अवस्थेला "मुख्य मातृदशा" असे म्हटलेले आहे; कारण यामध्ये तावत्कालापर्यंत ज्ञेयरूपता आणि वैकल्पिक ज्ञानरूपतेचा सर्व क्षोभ शांत झाल्यामुळे प्रमाता किंवा ज्ञाता अथवा जीव हा मुख्य चिन्मात्ररूपामध्ये अवस्थित राहतो.

**तुर्या अवस्था :-** सुषुप्ती काळातील प्रमातृभाव किंवा जीवभाव हा अमित अर्थात् अमर्यादित नसून मित अर्थात् मर्यादित असतो. हा काळ व्यतीत झाल्यावर संस्काररूपामध्ये विद्यमान अर्थात् अस्तित्वात असलेली वेद्यता अर्थात् ज्ञातृता पुन्हा उदय पावत असते आणि चिन्मात्ररूपतेवर भेदव्याप्तीचे अर्थात् सर्वव्यापक गुह्य आवरण निर्माण होते. यामुळे सावधान किंवा जागृत योगी आपल्या अथक अनुसंधानाच्या किंवा अभ्यासाच्या द्वारा या अवस्थेला ओलांडून यावर असलेल्या एका अवर्णनीय अवस्थेमध्ये प्रविष्ट होत असतो. या अवस्थेमध्ये योग्याच्या मनामध्ये असलेले वेद्यतेचे किंवा ज्ञानाचे संस्कारही अवशिष्ट किंवा शिल्लक राहत नाहीत. या अवस्थेला तुर्यावस्था असे म्हणतात. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**यत्तु प्रमात्मकं रूपं प्रमातुरुपरि स्थितम्।**
**पूर्णतागमनोन्मुख्यमौदासीन्यात्परिच्युतिः।।१०.२६४।।**
**तत्तुर्यमुच्यते शक्तिसमावेशो ह्यसौ मतः।।२६५।।**

याचा अर्थ असा आहे की, पूर्णतेकडे जाण्याची उन्मुखता किंवा उत्सुकता आणि उदासीनतेपासून पूर्णपणे सुटका होणे यालाच तुर्यावस्था असे म्हटले आहे आणि या अवस्थेतच पूर्ण प्रमात्यामध्ये म्हणजे श्रीशिवांमध्ये

शक्तीचा समावेश होतो असे मानले जाते. हे जे प्रमात्मक म्हणजे पूर्ण ज्ञानात्मक श्रीशिवरूप आहे ते अज्ञानी जीवाच्या पेक्षा श्रेष्ठ आहे.

ही विशुद्ध ज्ञानरूप अर्थात् प्रमारूप अर्थात् विरज, विमल अर्थात् विशुद्ध किंवा मलरहित, अखंड तसेच सर्वतोमुखी चिन्मात्ररूपतेची अवस्था आहे. हेच अंतिम श्रीशिवभावामध्ये प्रविष्ट होण्याचे प्रवेशद्वार आहे आणि येथे पोहोचलेल्या साधकाच्या सर्व मायीय अर्थात् मायेमुळे निर्माण झालेल्या चिंता व काळजी सदासर्वदा शांत होऊन जातात. या अवस्थेला स्पंदशास्त्रामधील पारिभाषिक शब्दामध्ये ज्ञानक्रियांची शाश्वत स्पंदमयी विमर्शभूमिका अथवा शाक्तभूमिका असे म्हणतात.

सामान्य स्पंदभूमिका असल्यामुळे या अवस्थेला कोणतेही विशिष्ट नाम देणे संभव किंवा शक्य नाही. यामुळे शास्त्रामध्ये या स्पंदभूमिकेला किंवा शाक्तभूमिकेला "तुर्या" अर्थात् "चौथी अवस्था" असे नाव देऊन संतोष मानलेला आहे. या अवस्थेला मुख्य किंवा अमुख्य अवस्था असेही म्हणता येत नाही. हे समजून घेणे आवश्यक आहे. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**मेयं माने मातरि तत् सोऽपि तस्यां मितौ स्फुटम्।**
**विश्राम्यतीति सैवैषा देवी विश्वैकजीवितम्।।१०.२६७।।**

याचा अर्थ असा आहे की, मेय मानात, मान मातेत आणि माता मितीमध्ये विश्रांती प्राप्त करतात. ही प्रकाशात्मिका प्रमाच अर्थात् स्वप्रकाशरूप असल्यामुळे स्वतः द्योतमाना अर्थात् देवी मानली जाते.

पूर्ण चिन्मात्ररूप असल्यामुळे ही अवस्था स्वयं जाग्रत् आदि पूर्वोक्त तीन अवस्थांमध्ये व्याप्त राहून या अवस्थांना जीवन देत असते. यामुळे या अवस्था आपल्या मिश्रणाने यामध्ये मुख्यता किंवा अमुख्यता कशी उत्पन्न करू शकते? प्रत्यक्षात जाग्रत्, स्वप्न आणि सुषुप्ती या तीन अवस्था अंततोगत्वा अर्थात् सर्वात शेवटी याच अवस्थेमध्ये लय पावत असतात. प्रमेय अर्थात् ज्याचे यथार्थ ज्ञान करून घ्यावयाचे आहे अशी गोष्ट प्रमाण अर्थात् यथार्थ ज्ञानप्राप्तीचे साधन यामध्ये आणि प्रमाण हे प्रमात्यामध्ये अर्थात् यथार्थ ज्ञान प्राप्त करून घेणाऱ्या साधकामध्ये लय पावून कृतकृत्य होतात. ही लयभावाची प्रक्रिया आहे. प्रमात्यामध्ये अर्थात् जीवामध्ये आतबाहेर पूर्ण शाक्तसमावेश होत असतो. "**शक्ति-समावेशो ह्यसौ मतः।। तंत्रालोक १०.२६५।।**" या न्यायाने ही अवस्था साक्षात्

शाक्तसमावेशात्मक अभेदव्याप्तीचीच अर्थात् अद्वैताचीच अवस्था आहे.

अशा प्रकारे चारही अवस्थांच्या स्वरूपाच्या विश्लेषणामुळे खालील निष्कर्ष काढले जाऊ शकतात.

१) ज्ञेयता अर्थात् जाणीव हे जाग्रत् अवस्थेमधील शक्तीच्या स्फुरणेचे रूप आहे.

२) ज्ञप्ती अर्थात् समज किंवा बुद्धी हे स्वप्नावस्थेमधील शक्तीच्या स्फुरणेचे संकल्प-विकल्पात्मक रूप आहे.

३) सुषुप्ती अवस्थेमधील शाक्तस्फुरणेचे रूप चिन्मय आहे. ज्ञेयता ही संस्काररूपाने या अवस्थेमध्ये शिल्लक राहत असल्याने ही अवस्था पूर्ण चिन्मय नाही.

४) तुर्या अवस्थेमध्ये ज्ञेयतेचे संस्कार अवशिष्ट किंवा शिल्लक राहत नाही यामुळे या अवस्थेमधील शक्तीच्या स्फुरणेचे रूप पूर्ण चिन्मय आहे.।।१८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

सुप्रबुद्ध साधक तीनही अवस्थांमध्ये कशाप्रकारे यथार्थत्व प्राप्त करतो ते विभागानुसार या कारिकेत दाखविले आहे.

**स्पष्टीकरण :-** सुप्रबुद्ध (साधकाला) ज्ञानज्ञेयस्वरूपाने मध्यम स्थितीत आणि पहिल्या व शेवटच्या स्थितीत स्वस्वरूप स्पंदतत्त्वात भासणाऱ्या पराशक्तीने युक्त, व्यापक, श्रीशंकरात्मक स्वभाव जागृत आणि स्वप्न या दोन पदांत भासतो. तेथे तो श्रीसदाशिव आणि श्रीईश्वराप्रमाणे सुप्रबुद्ध सर्व विश्व हे स्वतःच्या अवयवांप्रमाणे समजतो. **"तदन्यत्र तु"** या कारिकेतील पदांचा अर्थ "सुषुप्तीमध्ये" असा आहे. इतर म्हणतात त्याप्रमाणे "सुषुप्ती आणि तुर्य यांच्यामध्ये" असा नाही. **"त्रिपदा व्यभिचारिणी"** अर्थात् "तीन अवस्थांमध्ये चल अशी" या विषयाच्या चर्चेत तुर्य किंवा चौथी (अवस्था) ही अप्रस्तुत आहे. या चौथ्या अवस्थेची जाणीव होणे म्हणजे तुर्यावस्थाच होय. सौषुप्त अवस्थेत हे व्यापक तत्त्व त्याला चिन्मयाप्रमाणे भासते; कारण सर्व वेद्य (ज्ञेय) विषयांचा म्हणजेच या जगताचा उपशम झालेला असतो. असा सुप्रबुद्धाचा अभिप्राय असून येथे वस्तूंच्या क्रमाचे अनुसरण होत नाही; कारण नंतरच्या गोष्टीमध्ये **"तदन्यत्र तु चिन्मयः"**

हे पद या ठिकाणी विसंगत ठरेल; कारण लोकांमध्ये सुषुप्ती अवस्था ही मोहमय किंवा जडावस्था असल्याने, श्रीशिवांच्या अपेक्षेने जाग्रत् आणि स्वप्न या दोन्हीही अवस्था चिन्मय किंवा चैतन्याने युक्त असल्यामुळे तसेच सध्याच्या विषयाच्या चर्चेत ही चर्चा उपयोगी नसल्यामुळे साधकाला स्पंदतत्त्वाचा या तीनही अवस्थांमध्ये अनुभव किंवा प्रत्यय येतो. याच्यानंतर प्रथम निष्यंदाच्या अंतापर्यंत हा ग्रंथ प्रबुद्धाचा सुप्रबुद्ध होण्यासाठी स्थित असलेल्यांनी स्वतःच नीटपणे परीक्षावा; कारण टीकाकारांनी त्याचा योग्यप्रकारे अभ्यास केलेला नाही. आम्ही प्रत्येक पदाचे स्पष्टीकरण करावयास पाहिजेच असे नाही. ।।१८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

जाग्रदादि चार अवस्थांमध्ये स्वात्मस्वरूपाने अनुभूती स्वाभाविकच उत्पन्न होईल ही शंका निवारण करण्यासाठी **"ज्ञानज्ञेयस्वरूपिण्या .....।।१८।।"** ही कारिका सांगतात. चिन्मात्रमूर्ती, सर्वव्यापक व विभू असा परमात्मा जाग्रत्स्वप्नावस्थांमध्ये अघटित घटना घडविणाऱ्या स्वमायाशक्तीने युक्त होऊन निरंतर बाहेर आणि आत प्रकाशित होतो. ती मायाशक्ती ज्ञान-ज्ञेयस्वरूप असते. "अनेन ज्ञायते" अर्थात् "याने जाणले जाते" या व्युत्पत्तीचे अनुसरण करून बाह्य आणि आंतर इंद्रियांचा समूह हा ग्रहणात्मक किंवा ज्ञप्तिमात्रस्वरूप म्हणजेच जाणून घेण्याच्या स्वरूपाचा होईल. अखिल ब्रह्मांडाची निर्मिती करणारे भगवान् श्रीपरम-शिवच स्वतःच्या मायेने अनेकविध क्षेत्रज्ञांच्या म्हणजेच आत्म्याच्या रूपांनी भासणाऱ्या, "स्व"पासून अभिन्न असणाऱ्या शक्तीला ज्ञानज्ञेय-भावाने भासवून जाग्रत्स्वप्नदशाव्यवहार भासवितात. हेच परमेश्वराच्या शक्तीचे परमतत्त्व किंवा श्रेष्ठत्व आहे. दुसऱ्या ठिकाणी सुषुप्तितुर्यादि अवस्थांमध्ये हा विभू चिन्मयरूपाने भासतो. त्या दोघांच्या (ठिकाणी) "स्व"अतिरिक्त ज्ञेयपदार्थाचा अभाव असल्यामुळेच सर्व प्रकारच्या विभागांनी रहित अशा स्वात्मस्वरूपात विश्रांती घेतलेल्या शक्तीच्या रूपाने ईश्वरच प्रकाशित होतो. खरोखर जाग्रत्स्वप्नावस्थांमध्ये ज्ञान-ज्ञेयरूपाने, सुषुप्तीतुर्यावस्थांच्या प्रकटीकरणात भेदाचा अभाव असल्याने दोनच पदे सांगणे उचित आहे; चार पदे सांगणे उचित नाही, असे म्हटले असता ग्रंथकार असे सांगतात की, आपण

सत्यच बोललात; परंतु जाग्रत्स्वप्नपदार्थांचा स्थिरत्व, अस्थिरत्व, प्रतिपत्तिरूप अर्थात् निर्मिति-रूप विकल्प प्रयुक्त केला असता तेथे भेदव्यवहार असतो. त्यामुळेच तेथे वेगवेगळ्या रूपाने दोन अवस्था असतात; कारण परमेश्वराने प्रकल्पित केलेल्या सृष्टिजागरादि अवस्था दृढपणे जाणल्या जातात. परंतु स्वप्नात क्षेत्रज्ञाने परिकल्पित केलेली सृष्टी दृढरूप नसते. त्यामुळे जाग्रत्स्वप्नावस्थांच्या भेदांमध्ये (काहीतरी) कारण असते. अशा प्रकारे सुषुप्तीअवस्थेमध्ये चिन्मात्रस्वरूप तत्त्व विद्यमान असूनही मोहामुळे अहंरूपाने अनुभवित्याच्या चमत्काराच्या अभावामुळे ते असत् (वस्तू-प्रमाणे) भासते. पण तुर्यपदामध्ये तत्त्वाची परमार्थ सत्ता स्वरूपाने आत्मरूपत्वाने उपलब्धी दिसते. त्यामुळे सुषुप्ती आणि तुर्यावस्थांमध्ये भेद हा असणारच. त्यामुळे चार अवस्थांनी युक्त भिन्न भिन्न शास्त्रांमध्ये विश्वतैजसप्राज्ञतुर्य इत्यादि नावांची चार पदे स्वीकारलेली दिसतात. त्यामुळे येथे किंचितही असामंजस्य नाही.।।१८।।

*****

**गुणादिस्पन्दनिष्यन्दाः सामान्यस्पन्दसंश्रयात्।**
**लब्धात्मलाभाः सततं स्युर्ज्ञस्यापरिपन्थिनः।।१९।।**

**अन्वयार्थ :-**

**सामान्यस्पन्दसंश्रयात्** - सामान्य अथवा प्रतिष्ठित स्पंदाचा आश्रय असल्यामुळे, **गुणादिस्पन्दनिष्यन्दाः** - सत्त्व, रज व तमस् या गुणांच्या रूपानी वाहणारे अप्रतिष्ठित गुणस्पंदांचे अनंत प्रवाह, **लब्धात्मलाभाः**- ज्यांना त्या त्या रूपात सत्ता प्राप्त झाली आहे, **ज्ञस्य** - आत्मानुभवी योग्यास, **सततम्** - नेहमी, **अपरिपन्थिनः** - शत्रू नसलेले, **स्युः** - होतात.।।१९।।

**अर्थ :-** सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांच्या साम्यावस्थारूप अव्यक्ततत्त्वापासून बाहेर निघालेले आणि सर्व प्राधानिक सर्गाच्या रूपामध्ये प्रवाहमान होणाऱ्या गुणादि स्पंदांच्या अनंत प्रवाहांचा सामान्य स्पंद हाच आधार असल्याने (गुणादि स्पंदांनाच स्पंदशास्त्रामध्ये "विशेष स्पंद" असे म्हटलेले आहे. विशेष स्पंद या शब्दाचा अर्थ नील तसेच सुख रूपाने प्रवाहमान होणाऱ्या अनंत प्रकारचे विकल्पप्रत्यय असा आहे.) गुणादि स्पंद निष्यंदांना त्या त्या रूपांमध्ये सत्ता प्राप्त झालेली आहे. ज्या योग्याने

जाणण्यास योग्य अशा रहस्याला जाणलेले आहे, अशा योग्याचे विशेष स्पंद हे शत्रू बनू शकत नाहीत.।।१९।।

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

श्रीपरमेश्वराशी अभिन्न असणाऱ्या पराशक्तीला श्रेष्ठ असे शास्त्र किंवा तत्त्व असे म्हणतात. या पराशक्तीचे तत्त्व सामान्य व विशेष या दोन प्रकारे कसे आहे व त्याच्यातील सारासार ग्राह्य व त्याज्य विभाग कोणते आहेत याचा विवेक करण्यास प्रबुद्ध साधक समर्थ असतो. सर्वांचा आदिकारण असलेला परमात्मा हा सर्व पदार्थांमध्ये व्यापून आहे एवढाच ग्राह्य भाग घेण्यास तो साधक समर्थ होत असतो. दरेक वेळेला जेथे दुसरा पदार्थ दिसतो तेथे मीच आहे व माझ्या बाजूने द्वैताचा लय व्हावयाचा आहे, अशा रीतीच्या विवेकामुळे प्रत्येक ठिकाणच्या आपल्या आत्मसत्तेच्या जागृतीला सामान्य स्पंद असे म्हणतात. सर्व पदार्थ आत्मस्वरूप असताना मी देहच आत्मा आहे अशी भावना होते. त्यामुळे मायेने निर्माण केलेले परस्पर भिन्न असे अनेक ज्ञानाचे विषय होतात. त्यामुळे मी सुखी व मी दुःखी इत्यादि त्रिगुणांनी निर्माण केलेले सुखदुःखाचे अनुभव जीवाला येतात. हा सुखदुःखाचा सतत चालणारा प्रवाह हाच संसाराला टाकण्यास किंवा त्याचा त्याग करावा असे वाटण्यास कारण आहे. त्यामुळे देहाच्या ठिकाणी आत्मभावना उत्पन्न होण्याकरिता सतत सर्व अवस्थांमध्ये वरच्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे प्रत्येक ठिकाणी आत्म्याची जागृती ठेवून आत्मबल वाढविण्याचा निश्चय करावा. अशा रीतीने प्रबुद्धाने वर वर्णिलेल्या अभ्यासाची एकतानता राखल्यास थोडक्याच काळात त्यास स्वस्वरूपाचा अनुभव येईल.

सत्त्व, रज, तम हे तीन गुण व महान् अहंकार इत्यादींचे जे स्पंद आहेत ते सुख, दुःख, मोह आदींचे तरंग असून त्याचेच निष्यंद अर्थात् प्रवाह आहेत. ते सामान्य स्पंदांच्या अंतरलीन होऊन अनंत विशेषांचे आलंबन प्राप्त करूनच सत्तावान होतात. त्यामुळे तत्त्वज्ञ योग्याच्या स्वरूपामध्ये उपरोक्त गोष्टींमुळे कोणतेही अवधान उपस्थित होत नाही. त्या गोष्टी योग्याच्या विरोधी नसून, तो त्याच्या स्वरूपाचाच विलास असतो. ज्याप्रमाणे फुलाचा रस त्याच्या स्वभावाला-आकाराला झाकणारा किंवा आच्छादन करणारा असत नाही त्याचप्रमाणे स्पंदाचे प्रवाह कमळाच्या मकरंदासारखे असतात. एका सिद्धाचे असे वचन आहे की,

"प्रकाशाच्या महालात प्रकाश्य वस्तू दिसत नाही. अनंत संविदामध्ये संवेद्यही संविद्रूपच असते." **"मतंग पारमेश्वर"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"श्रीशिवापासून (सहस्त्रारापासून) पृथ्वीपर्यंत (मूलाधारापर्यंत) हा जो विस्तीर्ण मार्ग (सुषुम्णापथ) आहे, तो चिद्वस्तूनेच (कुंडलिनी शक्तीनेच) सिद्ध होतो व त्या शक्तीमुळेच जाणला जातो." "श्रीमद्भ-गवद्गीता"** या ग्रंथामध्ये मायेला "दैवी' म्हणण्याचा अभिप्राय हाच आहे. अज्ञाची स्थिती कशी असते याचे वर्णन पुढील कारिकेत केले आहे.।।१९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

कारिका क्रमांक १९ ची श्रीरामकंठाचार्य विवृती ही कारिका क्रमांक ५ बरोबर एकत्रितपणे दिलेली आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## ज्ञानी आणि विशेष स्पंद

सूत्र क्रमांक १९ मध्ये हा उपदेश दिला जाणार आहे की, ज्या भाग्यशाली योग्याला पूर्ण शाक्तसमावेश झाल्याचा परिणाम म्हणून प्रत्येक अवस्थेमध्ये सामान्य स्पंदात्मक स्वभावाची अनुभूती होत राहते त्या योग्याच्या मार्गामध्ये विशेषस्पंदांचे अनंत प्रवाह कोणताही अडथळा निर्माण करू शकत नाही.

**वृत्ती :-** सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण यांच्या रूपामध्ये प्रवाहमान असलेले गुणस्पंदांचे अनंत प्रवाह हे सामान्यस्पंदावरच आधारित आहेत. या परिस्थितीमध्ये हे गुणस्पंदांचे अनंत प्रवाह अजस्त्र रूपामध्ये प्रवाहमान होत राहूनही ज्या योग्याने ज्ञातव्य अर्थात् ज्ञान करून घ्यावयाचा विषय जाणून घेतलेला आहे त्या योग्याचे ते गुणस्पंदांचे अनंत प्रवाह प्रतिद्वंदी अर्थात् विरोधी बनू शकत नाही. हे अनंत प्रवाह त्या योग्याच्या चिन्मात्र स्वभावाचे आवरण बनू शकत नाहीत. हे याचे तात्पर्य आहे.।।१९।।

**विवरण** :- याआधी या गोष्टीचा उल्लेख केला गेलेला आहे की, सामान्यस्पंद आणि विशेषस्पंद ही स्पंदतत्त्वाची दोन रूपे आहेत. या दोन रूपांनाच दुसऱ्या शास्त्रीय शब्दामध्ये क्रमशः प्रतिष्ठितस्पंद आणि अप्रतिष्ठित-स्पंद असे म्हणतात. प्रतिष्ठितस्पंद अर्थात् सामान्यस्पंद ही संपूर्ण

विश्ववैचित्र्याची एकमात्र तसेच मौलिक विराट चेतना आहे. यामुळे सर्व नामरूपात्मक अनेकत्वाचे मूलभूत ऐक्य आहे. अप्रतिष्ठित अर्थात् विशेषस्पंद याचे रूप मायातत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंत पसरलेले आहे. हा पावलापावलावर अनेक भेद आणि उपभेद यांनी भरलेला विश्वप्रपंच आहे. यामुळे हे अप्रतिष्ठितस्पंद याच एकत्वापासून निघालेले अनेकत्व आहे. सूत्रकारांनी प्रस्तुत सूत्रामध्ये याच अनेकत्वाला स्पंदनिष्यंद अर्थात् अनेक रूपांमध्ये प्रवाहमान होणाऱ्या स्पंदधारांचे नाव दिलेले आहे. या जडचेतनात्मक विश्वाचा प्रत्येक पदार्थ हा आपल्या दृष्टीने गवताच्या पात्याप्रमाणे कितीही तुच्छ किंवा नगण्य असला तरीही प्रत्यक्षात तोही विराट स्पंदशक्तीचा एक प्रवाह आहे. परमेश्वराच्या स्पंदशक्तीचा अक्षय अर्थात् कधीही क्षय न पावणारा सागर हा आधार असल्यामुळेच या विशेषस्पंदांच्या धारांची प्रवाहमानता संभव किंवा शक्य होऊ शकते. शैवग्रंथामध्ये वर्णिलेल्या विशेषस्पंदाच्या प्रवाहमानतेच्या प्रक्रियेचा संक्षिप्त सारांश पुढीलप्रमाणे आहे.

**तेनाहुः किल संवित् प्राक् प्राणे परिणता .....।।**

**।। तंत्रालोक ६.१२।।**

**अर्थ :-** त्यामुळे ती संवित् अर्थात् शक्ती ही प्रथम प्राणात परिणत होते.

श्रीभट्टकल्लटांसारख्या महान् सिद्धांनी आपल्या आध्यात्मिक अनुसंधानाच्या किंवा अभ्यासाच्या साहाय्याने हे तथ्य शोधून काढलेले आहे की, शाश्वत स्पंदमयी संवित् अर्थात् स्पंदशक्ती बाह्यप्रसाराकडे उन्मुख किंवा उत्सुक होऊन सर्वप्रथम प्राण अर्थात् प्राणना किंवा दुसऱ्या शब्दामध्ये विश्वचेतनेच्या रूपामध्ये परिणत किंवा रूपांतरित होत असते. संवित् अर्थात् श्रीभगवंतांची विमर्शशक्ती ही प्रकाशरूप असण्याबरोबरच विमर्शमयी अर्थात् विचारमयी किंवा ज्ञानमयी आहे. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**तयोर्यद्यामलं रूपं स सङ्घट्ट इति स्मृतः।**
**आनन्दशक्तिः सैवोक्ता यतो विश्व विसृज्यते।।३.६८।।**

याचा अर्थ असा आहे की, श्रीशिवशक्तीचे जे यामलरूप अर्थात्

समावेशात्मकरूप आहे यालाच संघट्ट असे म्हणतात. हीच आनंदशक्ती आहे. या शक्तीपासून विश्वाची निर्मिती होते.

यानुसार या प्रकाश-विमर्शमय अर्थात् श्रीशिवशक्तीमय संघट्टाला अर्थात् उभयात्मक दशेला अर्थात् एकत्रिकरणाला किंवा सामरस्याला शास्त्रीय शब्दामध्ये "आनंदशक्ती" असे म्हणतात. विश्ववैचित्र्याच्या अनंत रूपामध्ये स्पंदित होणे हा या आनंदशक्तीचा अकाट्य अर्थात् अखंड स्थायी स्वभाव आहे. फलतः ही एक प्रसिद्ध शैवमान्यता आहे अर्थात् हा एक शैवदर्शनाने मान्य केलेला प्रसिद्ध सिद्धान्त आहे. संवित् अर्थात् श्रीभगवंतांची विमर्शशक्ती प्रतिक्षण उच्छलनात्मक अर्थात् उसळणारी किंवा वर जाणारी आहे. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**संविन्मात्रं हि यच्छुद्धं प्रकाशपरमार्थकम्।**
**तन्मेयमात्मनः प्रोज्झ्य विविक्तं भासते नभः।**
**तदेव शून्यरूपत्वं संविदः परिगीयते।।६.९.१०।।**

ही विशुद्धा प्रकाशरूप संवित् असून विशेषस्पंदाच्या रूपामध्ये प्रवाहमान होत असते. या प्रवाहमान अवस्थेमध्ये याच उच्छलनात्मक स्वभावामुळे ही विमर्श शक्ती स्वरूपामध्येच असलेल्या वेद्यभोगाला अर्थात् जाणणाऱ्या म्हणजे परब्रह्माच्या भोगाला स्वरूपाहून वेगळे करीत असते. ही विशुद्ध अर्थात् अत्यंत शुद्ध प्रकाशरूप संवित् स्वयं आकाशतुल्य शून्यातिशून्य रूपामध्येच स्थित आहे. (प्रसिद्ध शून्यवादी बौद्ध आचार्य श्रीनागार्जुन यांनी ह्याच शून्यावस्थेला सर्वोत्कृष्ट अवस्था मानलेले आहे.) याचे तात्पर्य असे आहे की, ही विशुद्ध प्रकाशरूप संविद् किंवा विमर्शशक्ती ही या अवस्थेमध्ये राहून एकीकडे आपल्याहून वेगळे केलेल्या वेद्यभावाचा पूर्ण निषेध करून या वेद्यभागाला स्वीकारण्यास विरोध करते आणि दुसरीकडे या विमर्शशक्तीच्या अशा प्रकारच्या निषेधात्मक विमुखतेचा स्वीकार करणे हेच या शक्तीचे असीमता विसरून ससीमतेच्या अर्थात् मर्यादेच्या क्षेत्रामधील पहिले पदार्पण आहे. याचा परिणाम म्हणून इतक्या अंशामध्ये या शक्तीची पूर्णता खंडित होत असते. या शक्तीच्या याच रूपाला शैवशब्दामध्ये "आकाशकल्प शून्यातिशून्य" असे म्हणतात; कारण की, हे रूप पूर्ण नाही की अपूर्णही नाही. ही संवित् अर्थात् विमर्शशक्ती अशा प्रकारच्या शून्यातिशून्य भूमिकेवर उतरत असते आणि स्वरूपाहून पृथक् केलेल्या

वेद्य अंशाला उत्तरोत्तर स्थूल रूपामध्ये विकसित करण्याकडे उन्मुख किंवा उत्सुक होत असते. विमर्शशक्ती या प्रक्रियेला कार्यान्वित करीत असते. सर्वप्रथम ही विमर्शशक्ती पूर्वी सांगितलेल्या विश्वप्राणनाच्या रूपामध्ये उच्छलित अर्थात् उसळत असते. याचा निष्कर्ष म्हणून विश्वप्राणनेच्या रूपाला धारण करणे हाच स्पंदशक्तीचा सर्वप्रथम बहिर्मुखीन निष्यंद अर्थात् प्रवाह आहे. यालाच शास्त्रीय शब्दामध्ये "प्राणस्पंद" असे म्हणतात. विश्वप्राणना ही पुढे पुढे प्रवाहमान होत होत पाच स्थूल प्राणांचे धारण करीत असते. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की-

**सा प्राणवृत्तिः प्राणाद्यै रूपैः पञ्चभिरात्मसात्।**
**देहं यत्कुरुते संवित् पूर्णस्तेनैष भासते।।६.१४।।**

हे सांगणे आवश्यक नाही की, हे पाचही प्राण कोणत्याही प्रकारच्या पांचभौतिक कायेमध्ये अर्थात् पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या पाच महाभूतांपासून बनलेल्या शरीरामध्ये प्रविष्ट होतात. हे पांचभौतिक शरीर जड असूनही एक पूर्ण चेतन पिंडाप्रमाणे दिसून येते. अशा तऱ्हेने हे पाच प्राण या जड पंचमहाभूतांपासून बनविलेल्या या शरीराला नाचवीत असतात. प्राणस्पंदानंतर पुन्हा ही स्पंदशक्ती कोणकोणत्या रूपामध्ये प्रवाहमान होत राहते याची गणतीच करता येणार नाही. सत्त्व-रज-तम हे तीन गुण, मनस्-बुद्धि-अहंकार ही तीन अंतःकरणे, यांच्या द्वारा जाणून घेता येणारे सुख, दुःख, मूढता हे तीन अंतःकरणविषय, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, सर्व घट-पट इत्यादि ज्ञेय किंवा वेद्य विषय अर्थात् आब्रह्मस्तंभापर्यंत अर्थात् ब्रह्मापासून ते गवताच्या काडीपर्यंत संपूर्ण प्रमेय अर्थात् यथार्थ ज्ञान ज्याचे करून घ्यावयाचे आहे अशा जगताच्या अनंत भावांच्या रूपामध्ये विमर्शशक्ती अर्थात् विशुद्ध प्रकाशरूप संविद् प्रवाहमान होत राहते. या सूत्रामध्ये उल्लेखिलेल्या स्पंदनिष्यंदाचा विशेष स्पंदप्रवाह असा अर्थ केलेला आहे.

अनुभवी सिद्ध पुरुषांचे म्हणणे असे आहे की, या विशेषस्पंदाचा गोरखधंदा पावलापावलावर इतक्या गोंधळाने व कोड्यांनी भरलेला आहे की, जगतामधील सर्व पशुवर्ग या कोड्यात फसून दिग्भ्रमात सापडलेला आहे. योग्य दिशा कोठे आहे हे कोणालाही सुचत नाही.

याउलट सुप्रबुद्ध भूमिकेवर पोहोचलेल्या योग्यांची गोष्टच वेगळी

आहे. सुप्रबुद्ध भूमिकेवर पोहोचलेल्या योग्याचा श्रीसद्गुरूंच्या कृपेने तुर्यारूप शाक्तभूमिकेमध्ये प्रवेश झालेला असतो. यामुळे अशा सुप्रबुद्ध योग्याला विशेषस्पंदांच्या अनेक आकारांमध्येही सामान्य एकाकारतेचीच अखंड अनुभूती प्रतिक्षण होत राहते. अशा परिस्थितीमध्ये स्पंदाच्या अनंत रूपामध्ये प्रवाहित होणाऱ्या या श्रीशांकरशक्तीच या सुप्रबुद्ध योग्याला अंतिम श्रीशिवधामामध्ये पोहोचण्यात सहाय्यक बनत असतात.

या दृष्टीने "**मालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**पूर्ववज्जन्तुजातस्य शिवधामफलप्रदाः।**
**पराः प्रकथितास्तज्ज्ञैरघोराः शिवशक्तयः।।३.३३।।**

याचा अर्थ असा आहे की, पूर्वीप्रमाणे प्राणिमात्रांना श्रीशिवधामरूपी फळ देणाऱ्या श्रीशिवाच्या शक्ती या परा म्हणजे श्रेष्ठ व अघोरा आहेत असे तज्ज्ञांनी कथन केले आहे.।।१९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

ही जागरादि मध्यदशाही प्रबुद्धाला अडथळा कशा प्रकारे करीत नाही हे या कारिकेत सांगितले आहे.

**स्पष्टीकरण :-** येथे गुण म्हणजे सत्त्व, रज व तम ज्याचे प्रकृतितत्त्व असून विभवाला कारणीभूत असणारे व मायातत्त्वात अवस्थित असणारे असे अभिप्रेत आहेत. यासंबंधी मायेच्या थरांच्या संबंधात बोलताना "**स्वच्छंदशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**अधश्छादनमूर्ध्वं च रक्तं शुक्लं विचिन्तयेत्।**
**मध्ये तमो विजानीयाद्गुणास्त्वेते व्यवस्थिताः।।२।६५।।**

**अर्थ :-** रक्त म्हणजेच रजोगुण हा खालचा थर असून शुक्ल किंवा सत्त्वगुण हा वरचा थर आहे. तसेच तमोगुण हा मधला स्तर आहे असे जाणून घ्यावे. अशा प्रकारे या गुणांची व्यवस्था केलेली आहे.

ते ज्यांच्या आदि (प्रथमस्थानी) आहेत व कलेपासून ते क्षितितत्त्वापर्यंत स्पंदाचे जे विशेष प्रसर आहेत त्यांचे जे निष्यंद अर्थात् शरीर, इंद्रिये, जग इत्यादि स्फुरण, नील, सुख इत्यादि जाणीवा त्याचप्रमाणे योग्याच्या अपेक्षेने बिंदू व नाद हे सतत, ज्याला पुढचा जन्म नाही, अशा सुप्रबुद्धासाठी "स्व"स्वभावाला आवरण न घालणारे होतात हे निश्चित आहे; कारण

"**यत्र स्थितम्**" या ठिकाणी चर्चा केल्याप्रमाणे ते वर सांगितलेल्या सामान्य स्पंदाचा आश्रय घेऊन त्या स्पंदतत्त्वापासून निर्माण होतात व स्पंदमयच असतात.

**स्वाङ्गरूपेषु भावेषु पत्युर्ज्ञानं क्रिया च या।**
**मायातृतीये त एव पशोः सत्त्वं रजस्तमः।।(३।३।४)**

**अर्थ :-** ईश्वराचे ज्ञान, क्रिया आणि माया स्वांगरूप म्हणजेच श्रीपरमेश्वररूप पदार्थांमध्ये पशूचे सत्त्व, रज आणि तम होतात.

ह्या तीन गोष्टी या "**ईश्वरप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथातील वचनाप्रमाणे चितिशक्तीच पारमेश्वरी ज्ञान-क्रिया-माया या तीन शक्तींनी श्रीसदाशिवपदात स्फुरित होऊन अत्यंत संकुचित झाल्यामुळे सत्त्व-रज-तमोगुणरूप क्रीडाशरीराचा आश्रय घेते. यामुळे सुप्रबुद्ध नेहमीच असे जाणून घेतो की, हे विश्व म्हणजे निजचिच्छक्तीचाच प्रसार असल्यामुळे त्याचेही या विश्वात अधिष्ठान आहे. तो गुणांपासून सुरू होणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण अशा स्पंदतत्त्वाच्या विरुद्ध न जाऊनही स्पंदतत्त्वात प्रवेश केल्याप्रमाणेच स्वतःला मानतो.।।१९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

आता पूर्वी सांगितलेला प्रबुद्धच उपदेशाचा अधिकारी आहे हे दृढ करण्यासाठी त्याचप्रमाणे अप्रबुद्धांचे उपदेश-अयोग्यत्व अर्थात् अप्रबुद्ध हे उपदेशासाठी योग्य नाहीत, अशी सूचना देण्यासाठी पुढील तीन श्लोक सांगतात -

"**गुणादिस्पन्द .....।।१९।।**" या कारिकेत सत्त्वादि गुणांची साम्यावस्था म्हणजे अव्यक्तत्त्व होय असे कथन केले आहे. या अव्यक्त-तत्त्वामुळे निर्गतसमस्तप्राधानिकसर्ग अर्थात् ज्यातून सर्व प्रधान सर्ग निघून गेले आहेत अशी सृष्टी विद्यमान असते. सर्गरूपामध्ये प्रवाहित होणारे गुणस्पंद सामान्यस्पंदाप्रमाणे भगवान् श्रीपरमशिवांमध्ये आश्रय घेतात. त्यामुळेच श्रीसद्गुरूंच्या अनुकंपेमुळे किंवा कृपेमुळे अर्थात् शक्तिपातामुळे ज्या योग्याची तुर्यात्मक श्रीशिवभूमिकेमध्ये प्रतिष्ठा उत्पन्न होते त्याच्या सर्व वेद्यात्मक विशेष स्पंदांच्या अनंत धारा अस्तित्वात असूनही सामान्यस्पंदात्मक सत्यात्मक एकरूपतेचे अर्थात् अखंडैकरस-रूपतेचे प्रतिक्षण होणारे स्फुरण

व्यभिचरित होत नाही. त्याचप्रमाणे त्याच्यासाठी विशेषस्पंद प्रतियोगी अर्थात् प्रतिस्पर्धी होत नाहीत.।।१९।।

*****

**अप्रबुद्धधियस्त्वेते स्वस्थितिस्थगनोद्यताः ।**
**पातयन्ति दुरुत्तारे घोरे संसारवर्त्मनि।।२०।।**

**अन्वयार्थ :-**

**एते** - गणादि रूपाने प्रवाहमान असणारे "हे विशेष स्पंद," **स्वस्थितिस्थगनोद्यताः** - चिद्रूप असणारी जी स्वतःची वास्तविक स्थिती, तिच्यावर आवरण घालण्यासाठी, चिद्रूपावस्था झाकण्यासाठी उद्युक्त, टपलेले असतात, (आणि) **अप्रबुद्धधियः** - ज्यांना स्पन्द तत्त्वाचे ज्ञान झालेले नाही, अशा अप्रबुद्ध बुद्धीच्या जीवांना, **दुरुत्तारे**- दुस्तर, तरून जाण्यास अवघड अशा, **घोरे** - भयंकर, **संसारवर्त्मनि**- संसार-मार्गात, **पातयन्ति** - पाडतात.।।२०।।

**अर्थ** :- गुणादि रूपाने प्रवाहमान असणारे हे विशेषस्पंद प्रतिक्षण चिद्रूप असणाऱ्या स्वतःच्या वास्तविक स्थितीवर आवरण घालण्यासाठी अर्थात् चिद्रूपावस्था झाकण्यासाठी उद्युक्त झालेले किंवा टपलेले असतात. हे विशेषस्पंद ज्यांना स्पंदतत्त्वाचे ज्ञान झालेले नाही अशा प्रबुद्ध बुद्धीच्या जीवांना दुस्तर अर्थात् तरून जाण्यास अवघड अशा भयंकर संसारमार्गात पाडतात.।।२०।।

*****

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

अप्रबुद्धाचे लक्ष, गुण, विषय व सुखदुःखांचे प्रवाह त्याला मदत करीत असल्याने या सर्व गोष्टी त्याला आत्मस्थितीपासून दूर झुगारून देतात.

स्पंद म्हणजे काय? स्पंद म्हणजे क्षेत्रज्ञ जीवात्म्याच्या ज्ञानादि शक्तीचे निष्यंद म्हणजे निरनिराळ्या पदार्थांकडे जाणारे प्रवाह होत. या प्रवाहामध्ये भिन्न भिन्न प्रकारचे अनुभव असतात. या प्रवाहात सत्त्व-रज-तमोगुणापासून सुखदुःखादिक उत्पन्न होतात. मी सुखी किंवा मी दुःखी आहे असे येणारे निरनिराळे अनुभव हे ज्ञानाचे भेद आहेत. हे जे गुणादि स्पंद-निष्यंद आहेत ते सामान्य स्पंद असून ते सर्वव्यापक अशा परमात्म्याच्या

पराशक्तीत लीन होणारे असतात. या निरनिराळ्या प्रकारच्या ज्ञानाचा मूळ सामान्यज्ञानाशी पूर्ण समन्वय असतो. हे ज्ञानप्रवाह मूळ ज्ञानाशी अनन्य शरण असून त्यांना त्याचाच आश्रय असतो. या गुणादि ज्ञानप्रवाहांना मूळ आत्मस्वरूपापासूनच लाभ झालेला असतो. निरनिराळ्या कारणांनी ते भासमान होत असले तरी त्या प्रवाहांमध्ये आपल्या आत्मस्वरूपाचाच उदय होत असतो. श्रीगुरूंनी शक्तिपात योगदीक्षा दिल्याने म्हणजे परमेश्वराच्या अनुग्रहाच्या योगाने ज्या साधकाच्या ठिकाणी सारासार विवेकाचा उदय झालेला असतो अशा प्रबुद्ध साधकाला हे गुणादि निःष्यंद म्हणजे सुखदुःखाचे प्रवाह आड येत असतात. यासाठी विशेषस्पंदाचे लक्षण येथे दिले नाही. साधकाने सामान्य स्पंदांचीच जागृती ठेवावी. परमेश्वराची मुख्य शक्ती म्हणजे परमेश्वराशी ऐक्यतेने असणारी जी निर्विकल्प शक्ती तिची जागृती सतत ठेवली म्हणजे निरंतर साधानाभ्यास केला की, सामान्यस्पंदाची जागृती ठेवल्यासारखे होते. अशी जागृती ठेवली की, परमेश्वराशी ऐक्यतेने असणाऱ्या निर्विकल्प शक्तीच्या ऊर्ध्वमुखतेमुळे सुखदुःखादि परस्पर भिन्न भासणाऱ्या संस्काररूप विशेषस्पंदांपासून साधक परावृत्त होतो. वर सांगितलेला अभ्यास नित्य केला की, जागृत शक्ती विशेषस्पंदांना उठू देत नसल्याने आत्मतत्त्वाची वाढ होऊन हे स्पंद साधकाच्या आड येऊ शकत नाहीत. त्यामुळे सर्व उद्योग करणाऱ्या प्रबुद्धांच्या स्वात्मशक्तीचा उत्साह सतत वाढत राहतो. मात्र जर असा अभ्यास केला नाही तर मायेच्या तडाख्यात सापडलेल्या गुणादि स्पंदांमुळे उत्पन्न होणारे सुखदुःखाचे तडाखे दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन जेरीस आणतात.

हे स्पंद-निष्यंद मूढ पुरुषाच्या चित्स्वरूपाला झाकून टाकण्याचे कार्य करतात; कारण आपण शुद्ध-बुद्ध नसून गुणात्मक आहोत असे मूढबुद्धी पुरुष समजत असतो. शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "ज्याप्रमाणे लहान बालक आपल्याच श्वासांनी आरसा मलीन करतो त्याचप्रमाणे अज्ञानी मनुष्य आपल्या विकल्पांनी विज्ञान मलीन करतो. हे विकल्पच अज्ञानी माणसाला पुनःपुन्हा जन्ममरणाच्या संसार प्रवाहामध्ये ढकलीत असतात. या प्रवाहामध्ये त्याला अत्यंत क्लेश होतात व त्यातून पार पडणे फार कठीण असते." "**ज्ञानबोध**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "जरी ज्ञानी व अज्ञानी हे दोघेही आत्मशक्तीने संचालित होत असले तरी एक स्वतंत्र व दुसरा परतंत्र असतो. शुद्ध बोध प्राप्त झालेला

पुरुष विषमस्थळीसुद्धा साक्षिवत् स्वतंत्र असतो. मंद बोध असलेला पुरुष समान समस्थळातही परतंत्र असतो. पुढील कारिकेत अज्ञानाला संसार तरून जाण्याचा उपाय सांगतात.।।२०।।

❋❋❋❋❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

कारिका क्रमांक २० ची विवृती कारिका क्रमांक २१ व्या कारिकेबरोबर दिली आहे.

❋❋❋❋❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## अज्ञानी आणि विशेष स्पंद

सूत्र क्रमांक २० मध्ये पूर्वी वर्णिलेले विशेषस्पंद प्रतिक्षण अप्रबुद्ध अर्थात् अज्ञानी पशूंच्या अंतःकरणामध्ये असलेल्या चिन्मात्रतेवर अर्थात् चैतन्यरूपावर आवरण टाकण्यात नेहमी गढलेले राहतात.

**वृत्ती :-** हे गुण अर्थात् गुणादि रूपांमध्ये प्रवाहमान होणारे विशेष-स्पंद परिमित अर्थात् मर्यादित ज्ञान असलेल्या पशूंच्या खऱ्या चिद्रूपतेवर आवरण टाकून पशूंना अत्यंत कठीण रीतीने पार करण्यास योग्य अशा संसाराच्या ओबडधोबड मार्गाला लावीत असतात. अशा रीतीने हे विशेष-स्पंद पशूंना अर्थात् जीवांना पथभ्रष्ट करीत असतात. याचे कारण असे आहे की, ते अर्थात् अज्ञानी पशू प्रतिक्षण स्वरूपाला त्या गुणादि विशेष-स्पंदांच्या रूपामध्ये पाहत राहतात. हे अज्ञानी पशू स्वरूपाला शुद्ध अर्थात् गुणत्रयापासून बनलेल्या सुख, दुःख आणि मूढता यांच्या उपाधींच्या दोषांनी रहित आणि बुद्ध अर्थात् अपरिमित बोधाच्या रूपामध्ये अनुभव करू शकत नाहीत.।।२०।।

**विवरण :-** विशेष रूपामध्ये प्रवाहमान शक्ती ही प्रतिक्षण स्वरूपावर आवरण टाकण्यास उद्यत किंवा सज्ज किंवा तत्पर असते हेच या विशेष रूपामध्ये प्रवाहमान होणाऱ्या शक्तीचे वैशिष्ट्य आहे. हा शैवदर्शनाचा सिद्धान्त आहे. याचाच अर्थ असा आहे की, बहिर्मुख प्रवाहमान असणारी शक्ती एकीकडे पंचकंचुक, स्थूलदेह इत्यादि आवरणांच्या रूपांना धारण करून जीवात्म्याच्या चारही बाजूंना अशा प्रकारे आवळून घेत असते की,

जीवात्मा हा स्वत्त्वाधिकारितेला अर्थात् स्वतःच्या अधिकाराला विसरून याच अनात्मभूत अर्थात् आत्मा नसलेल्या गोष्टींपासून बनलेल्या आणि जड पदार्थाबद्दल आत्माभिमान धारण करीत राहतो आणि दुसरीकडे गुणत्रयापासून उत्पन्न होणाऱ्या सुख, दुःख व मूढता या तीन रागात्मक भावनांचे रूप धारण करून जीवात्म्याला स्वतः निर्गुण, निष्कल आणि निरंजन असतानाही यावर ममत्व, अभिमान ठेवण्यास विवश करीत असते अर्थात् भाग पाडीत असते. याच भावनांच्या अंतर्द्वंद्वामुळे जगतामधील पशुवर्ग प्रतिक्षण संसारामधील भोगलिप्सांना अर्थात् भोगाकांक्षांना कामिनी अर्थात् स्त्री आणि कांचन अर्थात् सुवर्ण इत्यादि विषयांच्या उपभोगाच्या द्वारा शांत करण्याचा रात्रंदिवस प्रयत्न करीत असतो. हा पशुवर्ग जितका या भोगाकांक्षेच्या कधीही तृप्त न होणाऱ्या तृष्णेला विषयोपभोगाच्या द्वारा शांत करू इच्छितो तितकी ही तृष्णा वाढतच जाते. याचा परिणाम म्हणून युगेच्या युगेपर्यंत किंवा अनेक युगांपर्यंत हा पशुवर्ग या चक्रवातातून अर्थात् वावटळीतून बाहेर पडू शकत नाही किंवा या पशुवर्गाला तृष्णेच्या या चक्रवातामधून बाहेर पडणे शक्य होत नाही. या दृष्टीने **"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**विषयेष्वेव संलीनानधोऽधः पातयन्त्यणून्।**
**रुद्राणून्याः समालिङ्ग्य घोरतर्योऽपराः स्मृताः ।।३.३१।।**

याचा अर्थ असा आहे की, ज्या रुद्राणूंना आलिंगन देऊन दुसऱ्या अपरा घोरतर शक्ती सांगितल्या आहेत त्या विषयांमध्ये बुडालेल्या अणूंना खाली-खाली बुडवून टाकतात.

संक्षेपामध्ये किंवा थोडक्यात असे म्हणता येते की, श्रीशांकरशक्तीचे किंवा शांभवीशक्तीचे रूप हे अज्ञानी पुरुषासाठी विषवेगाने फुत्कार टाकण्याऱ्या महाभयंकर नागिणीप्रमाणे घोरतर असते. हा पशुवर्ग या शांकरीशक्तीच्या विषारी दंशामुळे आपली शुद्ध हरपवून किंवा आपले खरे स्वरूप विसरून निर्विवेकतेच्या अर्थात् विवेकहीन अवस्थेमध्ये निद्रेत पडून राहतात. या पशुवर्गाचा वितंडापूर्ण अर्थात् पोकळ वादविवादांनी भरलेला बुद्धिवाद हा जितक्या अतिस्वनिक अर्थात् ध्वनीपेक्षा अधिक वेगाने पुढे धावत राहतो तितक्याच वेगाने हृदयपक्ष अर्थात् ज्ञानपक्ष मागे पडत जातो. शुष्क बुद्धिवाद हा रागात्मक अर्थात् प्रेमात्मक किंवा मोहात्मक वासनांना अर्थात्

भोगाकांक्षांना जन्म देत असतो. सरस अर्थात् उत्कृष्ट अशा हृदयपक्षाच्या अभावामध्ये स्वरूपाचे स्थगित होणे हे स्वाभाविक आहे.

पशुवर्गामध्ये आढळून येणाऱ्या या अवस्थेला जर स्वशक्तिविरोधाची अवस्था म्हटले तर यात कोणतीही अतिशयोक्ती होणार नाही. शैवशास्त्रामध्येही या अवस्थेला "शक्तिदारिद्र्य" असे नाव देऊन प्रस्तुत केलेले आहे. शक्तिदारिद्र्य या शब्दाचा अर्थ "ज्ञान-क्रियात्मक स्पंदना यांचा अभाव" असा न घेता पशुभावाच्या स्तरावर या शक्तीच्या किंवा ज्ञानक्रियात्मक स्पंदनेच्या स्वतंत्र रीतीने होणाऱ्या प्रसारामध्ये होणारा विशेष प्रकारचा संकोच असा घेतलेला आहे. जोपर्यंत असीम अर्थात् अमर्यादित स्वातंत्र्य हे मर्यादित पराधीनता किंवा पारतंत्र्य किंवा परावलंबित्व बनत नाही तोपर्यंत पशुभाव संपन्न होऊ शकत नाही.

सर्व रीतीने स्वतंत्र असलेले श्रीशिव हे स्वतःच्या शक्तीच्या विरोधामुळे अस्वतंत्र अर्थात् परतंत्र पशू बनत असतात. असे संकोच पावलेले श्रीशिव हे अशुद्ध संसाराचे किंवा मार्गाचे प्रवासी बनलेले आहेत. शैवशास्त्रामध्ये तत्त्वक्रमाच्या दृष्टीने चिन्मात्ररूप आत्मतत्त्वाची अवरोह प्रक्रियेची वैज्ञानिक मीमांसा प्रस्तुत केली गेली आहे. प्रस्तुत विषयाशी संबधित असल्यामुळे येथे त्याचा थोडक्यात उल्लेख करणे आवश्यक वाटत आहे.

अशुद्धाध्वामध्ये अर्थात् अशुद्ध संसारामध्ये किंवा अशुद्ध मार्गामध्ये अर्थात् मायातत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंतच्या शाक्त अर्थात् शक्तीच्या अवरोह अर्थात् उतरत्या क्रमामध्ये सतत स्पंद पावणारी आणि सर्व स्वतंत्र चिच्छक्ती ही जड मायातत्त्वाचे रूप धारण करीत असते. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**माया हि चिन्मयाद्भेदं शिवाद्विदधती पशोः।**
**सुषुप्ततामिवाधत्ते तत एव ह्यदृक्क्रियः।।९.२७५।।**

प्रत्यक्षात श्रीशिवांच्याच अंशाला ही तत्त्वरूप अशी असलेली माया मौल्यवान चिन्मात्ररूप अशा श्रीशिवभावापासून वेगळे करीत असते. अशा तऱ्हेने माया ही प्रथम या पशूला संज्ञारहित अर्थात् संवेदनारहित बनवीत असते. जीव श्रीशिवांपासून वेगळा होण्याच्या अवस्थेमध्ये पूर्णपणे चेतनाहीन होत असतो, हा निःसंज्ञ शब्दाचा खरा अर्थ नाही. सशक्त तसेच दुर्भेद मायीय आवरणाच्या द्वारा आवृत झाल्यामुळे जीव हा पूर्णचेतना

हरवून अंशरूप अशा चेतनेने युक्त राहत असतो. हा निःसंज्ञ या शब्दाचा खरा अर्थ आहे. अशा जीवाची अवस्था ही गाढ झोपेतील अवस्थेप्रमाणे असते. संज्ञारहित अर्थात् निःसंज्ञ अवस्थेमध्ये जीवाच्या निरंकुश अर्थात् अंकुशरहित अशा ज्ञान-क्रिया यांच्या प्रसादामध्ये अडथळा येणे ही गोष्ट स्वाभाविक आहे. या आधीही या गोष्टीचा उल्लेख केलेला आहे की, पूर्ण श्रीशिवभावाच्या स्तरावर शक्तीची चित्, निवृत्ती, इच्छा, ज्ञान, क्रिया ही पाच मुखे आहेत. शक्तीची व्यापकता आणि प्रसार यांमध्ये कधीही कोणतीही देशकालादिकांपासून निर्माण झालेली बाधा किंवा सीमा असत नाही. याउलट जेथे एकीकडे माया ही आपल्या प्रभावाने पूर्ण चेतन असलेल्या श्रीशिवांना अंशतः चेतन पशू बनवून संकुचित करीत असते तेथे दुसरीकडे हीच माया या उपर्युक्त पाच असीम अर्थात् अमर्यादित शक्तींना ससीम अर्थात् मर्यादित बनवून क्रमशः कला, विद्या, राग, काल आणि नियती या पाच तत्त्वांच्या रूपामध्ये अवभासित अर्थात् प्रकाशित करीत असते. मायेचा आवरणात्मक प्रभाव हा सर्वव्यापक असल्यामुळे कोणत्याही पक्षाला अस्पर्श राहू देत नाही; कारण याच अवस्थेमध्ये संसारभावाची किंवा जगताची चरितार्थता अर्थात् सफलता सिद्ध होऊ शकते. प्राकृतिक अर्थात् नैसर्गिक प्रकृतिविधानाच्या अनुकूल ही गोष्ट आहे; कारण की, अंशतः स्वतंत्र असलेल्या पशूच्या शक्ती याही अंशतः स्वतंत्र अर्थात् दरिद्री असणे आवश्यक आहे. अस्तु अर्थात् असो. मायातत्त्व हे सर्व प्रथम कलातत्त्वाला जन्म देते. या दृष्टीने "**मालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**असूत सा कलातत्त्वं यद्योगादभवत्पुमान्।**
**जातकर्तृत्वसामर्थ्यो विद्यारागौ ततोऽसृजत्।।१.२७।।**

याचा अर्थ असा आहे की, तिने म्हणजे या मायेने कलातत्त्व निर्माण केले. या कलातत्त्वाच्या योगाने पुरुष निर्माण झाला. जन्मतःच कर्तृत्वाने युक्त असल्याने या पुरुषाने विद्या व राग निर्माण केला.

हे कलातत्त्व मायीय अर्थात् मायेच्या प्रभावामुळे चेतनाहीन किंवा निःसंज्ञ बनलेल्या अणूमध्ये किंवा जीवामध्ये किंवा प्रमात्यामध्ये संकुचित कर्तृतारूप चेतनेचा संचार करवीत असते. यामुळे तो अणू किंवा जीव किंवा प्रमाता जीवभावाला अनुकूल असलेल्या अशा अत्यंत सीमित किंवा मर्यादित रूपामध्ये केवळ संसारातील आदान-प्रदान अर्थात् देवाण-

घेवाण करण्याची क्षमता किंवा सामर्थ्य प्राप्त करून घेत असतो. यालाच पारिभाषिक शब्दामध्ये "किंचित्कर्तृत्व" असे म्हणतात. यानंतर विद्यातत्त्वाचा आविर्भाव होत असतो अर्थात् यानंतर विद्यातत्त्व निर्माण होते. **"विद्या विवेचयत्यस्य कर्म तत्कार्यकारणे ।।१.२८।।"** म्हणजे विद्या ही त्याच्या अर्थात् पुरुषाच्या कार्यकारण विषयक कर्माचे विवेचन करते, असे **"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथात म्हटले आहे. हेच विद्या-तत्त्व अणूला अर्थात् जीवाला किंवा प्रमात्याला बुद्धीच्या आरशामध्ये प्रतिबिंबित होणाऱ्या सुखदुःखादि प्रत्ययांचे अर्थात् अनुभूतींचे अथवा हीन अर्थात् त्याज्य व आदान अर्थात् ग्राह्य इत्यादिरूप कर्मजालाची विवेचना अर्थात् विवरण करण्याचे मर्यादित सामर्थ्य प्रदान करीत असते. यालाच शैवशब्दांमध्ये "किंचित्-ज्ञत्व" असे म्हणतात. शैवदार्शनिकांचे असे मत आहे की, बुद्धी ही स्वतः जड असल्यामुळे स्वतः सुख-दुःखादि प्रत्ययाचे अर्थात् अनुभूतीचे विवेचन करू शकत नाही. (बुद्धीच्या विषयामधील शैव आणि सांख्य यांच्या दृष्टिकोणाची भिन्नता समजून घेण्यासाठी **"तंत्रालोक"** ९.१९१.९८ पाहावे.) फक्त या विद्यातत्त्वाच्याच साहाय्याने प्रत्येक जीव हा इंद्रियांच्या सरणीने अर्थात् साधनाने अर्थात् बुद्धीच्या दर्पणामध्ये प्रतिबिंबित होणाऱ्या सुख-दुःख आदि विषयांच्या परस्परांमधील भिन्नतेचे विश्लेषण करू शकतो. या दृष्टीने **"रागोऽपि रञ्जयत्येनं स्वभोगेष्वशुचिष्वपि ।।१.२८।।"** म्हणजे राग अर्थात् प्रेम हे त्याच्या अपवित्र अशा भोगांमध्येही त्याचे मनोरंजन करते, असे **"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथात म्हटले आहे. विद्यातत्त्वानंतर रागतत्त्व निर्माण होत असते. रागतत्त्व हे पशूमध्ये अर्थात् अणूमध्ये किंवा जीवामध्ये अपूर्णमन्यतारूप अर्थात् अपूर्ण विचाराची आसक्ती उत्पन्न करीत असते. पशू अर्थात् जीव या आसक्तीमुळेच संसारामधील अर्थात् बाह्य जगतामधील अशा भोगांना भोगण्याकडे आकर्षित होत असतो. हे भोग अन्यथा म्हणजे निराळ्या रूपामध्ये कितीही अमंगळ किंवा शिसारी आणणारे असले तरीही त्या जीवाच्या रुचीस अनुकूल असे असतात. रागतत्त्वाच्या संबंधामध्ये शैवशास्त्र जाणणाऱ्या लोकांनी असे विवेचन प्रस्तुत केलेले आहे की, संसारामधील किंवा जगतामधील अविरोधी आणि विरोधी अशा प्रकारचे सर्व आदान-प्रदान हे रागमूलक आहे. या दृष्टीने **"तंत्रालोकविवेक"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की -

**एवं द्वेषोऽप्यस्यैव प्रसरः तत्रापि**
**अनिष्टप्रहानादाभिष्वङ्गस्यैव सम्भवात्।।९.२०१।।**

याचा अर्थ असा आहे की, एखाद्या व्यक्तीला एखाद्या व्यक्तीचा द्वेष वाटत असल्यास त्या मागील कारण असे असते की, त्या व्यक्तीला आपली इष्ट वस्तू प्राप्त करून घेण्याविषयी प्रेम आहे. "**विरक्तावपि तृप्तस्य सूक्ष्मरागव्यवस्थितेः।।९.२०१।।** याचा अर्थ असा आहे की, एखाद्या व्यक्तीच्या मनामध्ये संसारामधील किंवा जगतामधील पदार्थांविषयी विरक्ती उत्पन्न झालेली असते. ही विरक्ती या व्यक्तीच्या मनात ती व्यक्ती या पदार्थांना हेय किंवा त्याज्य समजत असते त्यामुळे निर्माण झालेली नसून या पदार्थांच्या जंजाळातून सुटका करून घेण्याच्या आसक्तीमुळे निर्माण झालेली असते. यावरून जगताचे सर्व अवडंबर हे केवळ रागमूलक अर्थात् प्रेममूलक असते. हा राग स्वतः प्रत्येक जीवामध्ये कोणत्या तरी अपूर्णतेला दर्शविणारा असा आहे. या दृष्टीने "**तंत्रालोकविवेक**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की - "**तस्माद्यत्र क्वचनोपादेये हेये वा किञ्चिन्मे भूयात्" इति सामान्येनाभिष्वङ्गमात्रं रागतत्वम्।।९.२०१।।** याचा अर्थ असा आहे की, अपूर्णतेची भावना ही प्रत्येक प्राण्याला त्याच्या दृष्टीमधील हेय अर्थात् त्याज्य व उपादेय अर्थात् ग्राह्य कर्मामधील अनेकांकडे प्रवृत्त आणि अनेक कर्मांपासून निवृत्त करण्यास विवश करीत असते अर्थात् भाग पाडीत असते. सामान्यपणे ही अपूर्णतेची भावना "मला काही हवे आहे," अशा प्रकारच्या भावनारूप मृगतृष्णेने अर्थात् खोट्या तृष्णेने लिप्त करीत असते. रागतत्त्वाला पारिभाषिक शब्दामध्ये "अतृप्ती" असेही म्हणतात.

असो. उपयुक्त रागतत्त्वाच्या द्वारा होणाऱ्या कर्तव्याच्या हेयोपादेयतेच्या निश्चयाबरोबरच कालतत्त्व हे उद्भूत किंवा निर्माण होत असते. या दृष्टीने "**मालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**कालोऽपि कलयत्येनं तुल्यादिभिरवस्थितः।।१.२९।।**" याचा अर्थ असा आहे की, हे कालतत्त्व पशूला अर्थात् जीवाला अर्थात् अणूला त्रुटी, क्षण इत्यादिरूप कालभेदाच्या परिधींमध्ये अर्थात् कक्षेमध्ये किंवा मर्यादेमध्ये अडकवीत असते. काळाच्या तथाकथित मर्यादेच्या संकोचामध्ये पडल्यामुळे जीव हा संसारामधील किंवा जगतामधील प्रत्येक कार्यकलापासाठी निश्चित

क्षण किंवा प्रहर यांच्या कल्पनेमध्ये व्यस्त राहतो अर्थात् गढून गेलेला असतो. जीवाच्या प्रत्येक इतिकर्तव्यतेवर "यावेळी केवळ घडा बनविणे योग्य होईल, पट बनविण्याची सुयोग्य संधी उद्या आहे, श्रीमद्भगवद्गीतेचा पाठ करण्यासाठी प्रातःकाळच उपयुक्त अर्थात् योग्य आहे, मध्याह्न काळी अर्थात् दुपारच्या वेळी श्रीमद्भगवद्गीतेचा पाठ केला असता अनिष्ट अर्थात् अहितकर असे संकट किंवा आपत्ती ओढविण्याची भीती आहे," अशा प्रकारच्या विविध कालकलनेचा अर्थात् कालगणनेचा रंग चढलेला असतो. याच कारणामुळे कालतत्त्वाला दुसऱ्या शब्दामध्ये अनित्यता असे म्हणतात. या दृष्टीने "**मालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**नियतिर्योजयत्येनं स्वके कर्मणि पुद्गलम्।।१.२९।।**" याचा अर्थ असा आहे की, या पुद्गलाला अर्थात् पुरुषाला नियती स्वकर्मामध्ये नेमते. यावरून पाचवे नियतीतत्त्व हे पशूच्या अर्थात् जीवाच्या किंवा अणूच्या विचाराच्या क्षेत्राला निश्चित करून कारणांपासूनच निश्चित कार्याची उत्पत्ती होत असते असे मानण्याच्या नियमामध्ये मर्यादित किंवा सीमित करीत असते. "एखाद्या विशिष्ट कारणामुळे एखादे विशिष्ट कार्य होईल किंवा अमुक विशिष्ट कार्याचे अमुक विशिष्ट कारण होते," अशा प्रकारच्या संकोचामध्ये पडलेला जीव हा प्रतिक्षण विशिष्ट कार्य आणि कारण यांना जन्मभर शोधीतच काळाच्या उदरात गडप होतो. या अर्थाने "**तंत्रालोकविवेक**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, "**नियतिर्हि "अस्मादेव कारणादिदमेव कार्यं भवेत्" इति नियममादध्यात्। नियतिर्योजनां धत्ते विशिष्टे कार्यमण्डले।" "नियतामर्थक्रियामर्थयता नियतमेव वस्तु उपादातव्यम्।।९.२०२।।**" जन्मभर स्वार्थालाच सर्वोपरी अर्थात् सर्वात प्रथम मान्यता देऊन नियत अर्थात् निश्चित कारणांपासून नियत अर्थात् निश्चित अर्थक्रियेची सिद्धी इच्छिणारा पशू किंवा जीव किंवा अणू निश्चित वस्तूचेच उपादान करीत राहतो अर्थात् निश्चित वस्तूचाच स्वीकार करीत राहतो व इतर वस्तूंचा त्याग करीत राहतो. अशा भावना त्या जीवाच्या किंवा अणूच्या किंवा पशूच्या अव्यापकतेला अर्थात् संकुचितपणालाच सूचित करीत असतात. याच कारणामुळे नियतीला दुसऱ्या शब्दामध्ये "अव्यापकता" असेही म्हणतात. या संबंधामध्ये खालील तक्ता लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

| स्वातंत्र्यशक्ती | | मायातत्त्व | |
|---|---|---|---|
| संकोचहीन श्रीशिवाहून अभिन्न अर्थात् श्रीशिवाशी एकरूप असलेल्या स्वातंत्र्यशक्तीची पाच मुखे | | संकुचित पशुभावाला अर्थात् असलेल्या जीवभावाला किंवा अणुभावाला जन्म देणाऱ्या भेदपूर्ण अशा मायेची पाच मुखे | |
| चित् | सर्वज्ञता | विद्या | अल्पज्ञता |
| निर्वृती | सर्वकर्तृता | कला | अल्पकर्तृता |
| इच्छा(एषणा) | पूर्णता | राग | अपूर्णता |
| ज्ञान | नित्यता | काळ | अनित्यता |
| क्रिया | व्यापकता | नियती | अव्यापकता |

(चौकटीमध्ये कलेचा क्रम हा विद्यातत्त्वानंतर लावण्यात आलेला आहे. यावरून वाचकांनी कोणत्याही सैद्धान्तिक मतभेदाची कल्पना करून घेऊ नये. शक्य झाल्यास अधिक स्पष्टीकरणासाठी वाचकांनी **"तंत्रालोक"** या ग्रंथातील नवम आह्निकाचा अभ्यास करावा.)

मायातत्त्व आणि तिचे विकासरूप असलेली वर उल्लेखिलेल्या पाच तत्त्वे यांना एकत्रितपणे शैवशब्दामध्ये "षट्-कंचुक" अर्थात् षट्-आवरण असे म्हणतात. या दृष्टीने **"परमार्थसारविवृत्ती"** या टीकाग्रंथात श्रीयोगराज यांनी असे म्हटले आहे की, **"तथा एतत् मायादिकञ्चुकम् अणोः तण्डुलस्थानीयस्य अन्तरङ्गत्वात् कम्बुकस्थानीयं व्यतिरिक्तमपि अव्यतिरिक्ततया पूर्णसंवित्स्वरूपम् आच्छाद्य स्थितम्।।१८।।"** हे मौलिक अंतरंग आवरण हे पूर्णसंवित्‌ला अर्थात् श्रीभगवंतांच्या स्वातंत्र्यशक्तीला आच्छादित करीत असते. हे आवरण या पूर्णसंवित्‌ला तांदळाच्या दाण्याला चिकटून असलेल्या त्या दाण्याच्या टरफलाप्रमाणे व्यतिरिक्त अर्थात् भिन्न असूनही अव्यतिरिक्त अर्थात् अभिन्न वाटू लागते. याउलट देह, प्राण, पुर्यष्टक, ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये इत्यादींना "बहिरंग आवरण" असे म्हटलेले आहे. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**देहपुर्यष्टकाद्येषु वेद्येषु किल वेदनम्।**
**एतत्षट्कससङ्कोचं यदवेद्यमसावणुः।।९.२०५।।**

याचा अर्थ असा आहे की, या वेद्यभूत अर्थात् ज्ञेयभूत आवरणांच्या द्वारा आच्छादित झालेला ज्ञानक्रियारूप संवेदन अर्थात् चेतन प्रमाता मुळात वेदक असूनही अर्थात् ज्ञान करून घेणारा कर्ता पुरुष असूनही स्वरूपाच्या संकोचाच्या अवस्थेमध्ये अर्थात् शक्तिदारिद्र्याच्या अवस्थेमध्ये अडकल्यामुळे अणू अर्थात् संसारी जीव बनलेला आहे आणि यालाच शास्त्रीय शब्दामध्ये "पुरुष-तत्त्व" असे म्हटले जाते.

अशा प्रकारच्या विश्लेषणामुळे प्रस्तुत सूत्रामध्ये उल्लेखिलेले सिद्धान्त हे सोपेपणामुळे लक्षात येऊ शकतात. बहिर्मुखी अर्थात् बाह्य जगताकडे उन्मुख होणाऱ्या संसारभावाकडे अजस्त्ररूपामध्ये अखंड प्रवाहमान होणारे गुणादि स्पंदांचे निष्यंद अर्थात् प्रवाह अथवा दुसऱ्या शब्दामध्ये आपल्याच शक्तींचे दारिद्र्य हे जगतामधील अपरिपक्व बुद्धीच्या व्यक्तींना आपल्या स्थिर किंवा खऱ्या स्थितीच्या अनुभूतीच्या प्राप्तीमध्ये अडथळा किंवा बाधा उत्पन्न करीत असते.

वर वर्णिलेल्या रागतत्त्वाच्या विषयामध्ये आणि अधिक माहिती प्राप्त करून घेण्यासाठी जिज्ञासू वाचकांनी खाली लिहिलेल्या गोष्टी ध्यानात ठेवण्याचा प्रयत्न करावा. या गोष्टी काही प्रमाणापर्यंत अप्राकरणिक अर्थात् वादविषय नसलेले अर्थात् प्रकरण प्राप्त नसलेले अर्थात् अवर्णनीयही सिद्ध होऊ शकतात. परंतु आत्मशोधाच्या मार्गामध्ये प्राकरणिकता किंवा अप्राकरणिकता यांच्या सीमांमध्ये घोटाळणे बनणे योग्य नाही.

याआधी वर्णिलेला आणवमल अर्थात् पशुमल अर्थात् जीवमल हेच रागाचे अर्थात् प्रेमाचे किंवा लोभाचे मूळ उद्गमस्थान आहे. संवित् भट्टारिकांमध्ये अर्थात् परम श्रीशिवांमध्येही विश्वरूपाने उच्छलित अर्थात् उसळण्याची किंवा वरचढ होण्याची आंतर-अभिलाषा अर्थात् जगतरूपाने नटण्याची आंतरिक इच्छा वर्तमान असते. ही गोष्ट वेगळी आहे की, त्या अवर्ण्य अर्थात् वर्णन करण्यास अयोग्य स्तरावर वर्तमान असलेल्या इच्छेला क्षुद्र पशूमध्ये असलेल्या क्षुद्र अभिलाषेची संज्ञा किंवा नाव दिले जाऊ शकत नाही. अभिलाषा ही अभिलाषाच आहे; कारण या अभिलाषेनेच सर्वस्वतंत्र श्रीभगवंतांच्या शक्तीला पृथ्वीतत्त्वापर्यंतच्या निकृष्ट कोटीवर अवरूढ होण्यास विवश केलेले आहे. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**अणूनां लोलिका नाम निष्कर्मा याभिलाषिता।**
**अपूर्णमन्यताज्ञानं मलं सावच्छिदोज्झिता।।९.६२।।**

**अर्थ :-** अणूंची अभिलाषित अर्थात् इच्छिली जाणारी आणि निष्कर्म अर्थात् क्रियारहित अशी लोलिका (नावाची इच्छा) असते. तिचे स्वरूप अपूर्णमन्य अर्थात् स्वतःला अपूर्ण मानणारी, मलयुक्त आणि अवच्छेदरहित असे असते.

संसारभावाच्या स्तरावर स्थित असलेल्या पशूमध्येही किंवा जीवामध्येही किंवा अणूमध्येही हाच आणवमल किंवा जीवमल प्रथम सूक्ष्मातिसूक्ष्म लोलिकेच्या अर्थात् आसक्तीच्या रूपामध्ये प्रकट होत असतो. शैवग्रंथामध्ये अभिलाषेच्या किंवा इच्छेच्या सूक्ष्मातिसूक्ष्म रूपालाच "लोलिका" असे म्हणतात. या रूपामध्ये अभिलषणीय विषयाची स्पष्टता असत नाही; परंतु जीवाच्या मनामध्ये अपूर्णतेची अनुभूती ही अंग शहारल्याप्रमाणे निर्माण झालेली असते. लोलिका ही एक प्रकारची निष्कर्म अभिलाषा आहे. लोलिका ही पशूच्या मनामधील "मला काही हवे आहे," अशा प्रकारच्या अस्पष्ट आकांक्षेच्या अनुभूतीला जन्म देत असते. ही लोलिका परिपुष्ट होऊन चतुर्दिक् क्षोभामध्ये पडून कर्मासह स्थूल अभिलाषेचे रूप धारण करीत असते. या लोलिकेच्या स्थूल अभिलाषेच्या रूपाला बुद्धीचा धर्म बनलेले "रागतत्त्व" असे म्हणतात.।।२०।।

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

हेच गुण अप्रबुद्धाला कशा प्रकारे बंधनकारक ठरतात ते या कारिकेत सांगितले आहे.

**स्पष्टीकरण :-** अप्रबुद्ध बुद्धी असणारे म्हणजेच बहुधा सर्व पारमेश्वरी शक्त्यात्मक निजस्पंदांना न जाणलेल्या, देहालाच आत्मा मानणाऱ्या अर्थात् लौकिक प्राण इत्यादि गोष्टींना आत्म्याच्या ठिकाणी मानणाऱ्या मितयोग्यांना व जगातील सर्व लोकांना स्वतःची स्पंदतत्त्वात्मक स्थिती गुप्त ठेवण्यात मग्न असणारे पूर्वोक्त गुणादि स्पंदनिष्यंद दुःखामुळे ओलांडण्यास कठिण असणाऱ्या या घोर आणि दुःखमय अशा संसरण-मार्गावर हे गुण फेकून देतात अर्थात्च ज्यांच्या म्हणजे ज्या गुणांच्या पलीकडे जाऊन मनुष्यप्राण्यांची संपूर्णता प्रवीण व वाकबगारांकडून अत्यंत कष्टाने घेतली जाते. यासंबंधी "**श्रीमालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**विषयेष्वेव संलीनानधोऽधः पातयन्त्यणून।**
**रुद्राणून्याः समालिङ्ग्य घोरतर्योऽपराः स्मृताः।।३।३१।।**

**अर्थ :-** ज्या शक्ती रुद्रात्म्यांना आलिंगन देऊन विषयांमध्येच लीन झालेल्या जीवांना खाली खालीच नेतात त्या अपरा (शक्तींना) "घोरतरी" असे म्हटलेले आहे.

पूर्वी प्रतिपादन केलेली ही स्पंदतत्त्वाने युक्त अशी जी पराशक्ती आहे ती या विश्वाला आत आणि बाहेर ओकून टाकते आणि संसाराचे वामाचरण म्हणजे संसाराचा ग्रास करून नंतर ओकून टाकते. त्यामुळे तिला श्रीवामेश्वरीशक्ती असे म्हणतात. या शक्तीपासून उत्थापित झालेली श्रीखेचरी, श्रीगोचरी, श्रीदिक्चरी व श्रीभूचरीरूप चार देवताचक्रे सुप्रबुद्धाला उच्च अवस्थेला अर्थात् पराभूमीवर घेऊन जातात आणि अप्रबुद्धांना खाली खाली अर्थात् अधःपाताला घेऊन जातात. त्याचप्रमाणे त्या सुप्रबुद्धाच्या बोधरूप (ज्ञानरूप) आकाशात संचार करीत असणाऱ्या श्रीखेचरी इत्यादि शक्तींवर अकालकलितत्व अर्थात् कालाचा कोणताही परिणाम होत नसल्यामुळे अभेदरूप, सर्वकर्तृत्व, सर्वज्ञत्व, पूर्णत्व व व्यापकत्व यांचे प्रकाशन करणाऱ्या असतात. त्या शक्तीच अप्रबुद्धाच्या शून्यप्रमातापदात संचार करीत आवरण रूपाने राहून नैमित्तिकता, किंचित् कर्तृता, किंचित् ज्ञान यांना कारणीभूत होतात. वाणीने चिह्नित केलेल्या संजल्पमय अर्थात् वार्तामय बुद्धी, अहंकार, मनोभूमीत संचार करणाऱ्या गोचरी शक्ती सुप्रबुद्धाचे स्वात्माभेदमय (आत्म्याशी आपला अभेद आहे अशा प्रकारच्या) निश्चयरूप अभिमानाच्या संकल्पांना उत्पन्न करतात आणि अप्रबुद्धाच्या ठिकाणी भेदत्वाने संकल्प उत्पन्न करतात. दिशांमध्ये म्हणजेच दहा बाह्य इंद्रियांच्या (पाच ज्ञान व पाच कर्मेंद्रिये) भूमीत संचरण करणाऱ्या दिक्चरी शक्ती सुप्रबुद्धाच्या ठिकाणी अद्वय प्रकट करतात आणि इतरांच्या बाबतीत द्वैत प्रकट करतात. भू म्हणजेच रूपादि पंचकात्मक प्रमेयपद (अर्थात् ज्ञेयपद); तेथे संचरण करणाऱ्या भूचरी शक्ती भोगमय आश्यानीभावत्वाने अर्थात् सर्वांना आपल्यात सामावून घेऊन तन्मयत्व प्राप्त करून सुप्रबुद्धाला चित्प्रकाश-शरीराने स्वतःला दाखवितात आणि इतरांना सर्वतोपरी आवरणरूपाने स्वतःला दाखवीत स्थित असतात. अशा प्रकारे प्रमाता म्हणजे जीव, अंतःकरण (अंतरिंद्रिय),

बहिष्करण (बाह्येंद्रिय) आणि प्रमेयरूपत्वाने चार गुणांपासून सुरुवात होणाऱ्या स्पंदतत्त्वाने युक्त चक्रे अप्रबुद्ध लोकांना, लौकिक लोकांना आणि बिंदुनादाच्या प्रकाशानेच संतुष्ट झालेल्या योग्यांना त्या त्या विशिष्ट तत्त्वांनी उत्क्रांत झालेल्या या जगात फेकून देतात अथवा पाडतात.।।२०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

जे अप्रबुद्ध प्रमाते असतात त्यांच्यावर प्रतिक्षण विशेष स्पंदांचे आवरण असते. अप्रबुद्ध प्रमात्यांच्या आंतर जगतात स्थित असलेल्या चिद्रूपतेला गुणादिस्वरूपात प्रवाहित करणारे विशेष स्पंद आवरण घालून बळजबरीने त्यांना परमार्थतः दूर करतात आणि घोर सुख-दुःख द्वंद्वात्मक संसार सागरात पाडतात; कारण हे अप्रबुद्ध जीव आपले स्वस्वरूप निरंतर त्या अगुणात्मकविशेषस्पंदांमध्ये पाहतात. ते जीव तीन गुणांनी उत्पन्न झालेले सुख-दुःख-मोहादि रूप उपाधींच्या कालुष्याने किंवा दोषाने रहित अशा शुद्ध संविद्रूपशिवांचा अनुभव घेण्यासाठी असमर्थ बनतात. ।।२०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**अतः सततमुद्युक्तः स्पन्दतत्त्वविविक्तये।**
**जाग्रदेवं निजं भावं न चिरेणाधिगच्छति।।२१।।**

**अन्वयार्थ :-**

**अतः** - वरील कारणांमुळे, **सततम्** - नेहमी, खंड न पाडता, **स्पन्दतत्त्वविविक्तये** - स्पंदतत्त्वाची अभिव्यक्ती - स्वरूपाचा अनुभव प्राप्त होण्यासाठी, **उद्युक्तः** - प्रयत्नशील असणारा, **जाग्रदेव**- जागृतावस्थेतच, **निजं भावम्** - आपल्या चिन्मात्र स्वरूपाची - "आपल्या तुर्यावस्थेतील भोगात्मक, चमत्कारमय जे स्पंद तत्त्व आहे, त्याची अनुभूती" - (श्रीभट्ट-कल्लट), **न चिरेण** - फार वेळ न लागता, लौकरच, **अधिगच्छति**- प्राप्त करून घेतो.।।२१।।

**अर्थ** :- वरील कारणांमुळे किंवा यामुळे स्पंदतत्त्वाची अभिव्यक्ती अर्थात् स्वरूपाचा अनुभव प्राप्त होण्यासाठी प्रयत्नशील असलेला प्रबुद्ध योगी आपल्या तुर्यावस्थेतील भोगात्मक, चमत्कारमय अशा स्पंदतत्त्वाची अर्थात् आपल्या चिन्मात्र स्वरूपाची अनुभूती जागृतावस्थेतच अत्यंत अल्प काळामध्येच अखंड प्राप्त करून घेत असतो.।।२१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

प्रबुद्धाचा अभ्यास सतत जागृत राहिल्याने तो विशेष स्पंदाचा सामान्य स्पंदात लय करीत असतो. असा नित्य उद्योग म्हणजे अभ्यास-साधन तो करीत असल्याने हे गुणादिक स्पंद त्याचा पराभव करू शकत नाहीत. मात्र अप्रबुद्धावर श्रीगुरुरूपाने शक्तिपात होऊन परमेश्वराचा अनुग्रह झाला नसल्याने त्याच्या बुद्धीची गाढ निद्रा नष्ट झालेली नसते. त्यामुळे हे गुणादिक प्रवाह अप्रबुद्धाला त्याच्या आत्मस्थितीपासून भ्रष्ट करून, सामान्य स्पंदमात्र असलेल्या ज्ञानाच्या स्थितीमुळे प्राप्त होणाऱ्या सुस्थिर अशा आत्मप्रतिष्ठेला आच्छादून टाकतात. त्यामुळे तो त्यांच्या तडाख्यात सापडून दुस्तर अशा घोर संकटात जाऊन पडतो. प्रबुद्धालाच गुणादि प्रवाहाचा उदय झाल्यावर जागृती होते व तो लगेच सामान्य स्पंद निर्माण करून आपल्या आत्मस्थितीमध्ये जागृत राहतो. या जागृतीमुळे तो अल्प काळात आत्मप्राप्ती करून घेतो. ज्याप्रमाणे एखाद्या प्रमादात असणाऱ्या राजाजवळ सैन्याचे सर्व सामर्थ्य असूनसुद्धा तो बेभान व असावध आहे असे पाहून त्याचे शत्रू त्याच्यावर चढाई करण्याची तयारी करतात व त्याला नाना प्रकारच्या संकटात टाकतात त्याप्रमाणेच अप्रबुद्धाची स्थिती झालेली असते. तो स्वतः सर्व कर्तव्य इत्यादि गुणांनी मुक्त असून सुद्धा त्याची त्याला जाणीव नसल्याने दरेक बाबतीत परतंत्र होतो व देहादिकांना सुख असेल तरच आपण सुखी, नाहीतर दुःखी, असे मानावयाला लागतो. त्यामुळे आत्मसमाधीत स्वस्वरूप असूनही तो भ्रष्ट होतो व संसार सागरात पडतो. त्यामुळे त्याला जरी वरील ज्ञानाचा उपदेश केला तरी सुद्धा ते ग्रहण करण्याची बुद्धी नसल्याने आत्मस्वरूपाच्या ठिकाणी तो विश्राम पावत नाही. जे मूढ किंवा अप्रबुद्ध आहेत त्यांना किती जरी उपदेश केला तरी तो त्यांच्या देहात उतरत व ठसत नाही. ज्याप्रमाणे मेघाने अहोरात्र जरी पाण्याचा वर्षाव केला तरी कमळाचे पान लेशमात्रही भिजले जात नाही त्याप्रमाणेच या अप्रबुद्ध अगर मूढ लोकांना अहोरात्र जरी या युक्तीचा उपदेश केला तरी तो त्यांच्या हृदयात कधीही उतरावयाचा नाही व प्रबुद्धाप्रमाणे सतत जागृत राहून या सामान्यस्पंदांचा अभ्यासही ते कधीही करणार नाहीत. त्यामुळे या अभ्यासाला प्रबुद्धच अधिकारी आहे. तो सामान्य स्पंदाचा अभ्यास करू शकतो व आत्मपदाची प्राप्ती करून घेतो.

अज्ञानी माणसाला हे स्पंदाचे प्रवाह पतित करण्यासाठी नेहमीच उद्युक्त असतात. यासाठी आपल्या विस्तृत स्वभावाने स्पंदतत्त्वाचा विवेक करण्याकरिता नेहमी उद्योग-साधन करीत राहिले पाहिजे. त्यामुळेच स्वस्वरूपाची अभिव्यक्ती होते. आपले स्वरूप हे खरोखरच उद्युक्त करणारे, विस्तृत व श्रीशिव आहे. **"श्रीशिवसूत्र"** या ग्रंथामध्ये उद्योगालाच "श्रीशिव" असे म्हटले आहे. यासाठी जागृत अवस्थेमध्ये अर्थात् व्युत्थान-दशेमध्ये शीघ्रातिशीघ्र त्याला आपल्या स्वरूपाची प्राप्ती होते. जो साधनाच्या मागे लागतो तो जागृत राहतो. याचे विवेचन असे आहे. "मी शुद्धबोधैकस्वरूप आहे. हे सर्व जगत् माझा विस्तार आहे. विलास आहे. जांभई आहे. हास्य आहे." याचे सुंदर वर्णन असे आहे की, "हे सर्व माझे वैभव आहे असे ज्ञान झाल्यावर साधक विश्वात्मा होतो. तो विकल्पांच्या विस्तारातही श्रीमहेश्वरच राहतो." **"पंचरात्र"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "जेव्हा साधक आत्म्यात सर्व भूतमात्रे आहेत असे पाहतो व आपल्याला सर्व भूतमात्रात पाहतो आणि सर्व भूतमात्रांपासून आपण निराळे आहोत असे पाहतो तेव्हा तो जन्ममरणापासून मुक्त होतो." दुसऱ्या एका ठिकाणी शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "खरोखर आपण निर्मल, अनंत व एकमात्र बोधस्वरूप आहोत. भव्यबुद्धी सावधान पुरुष आपल्याला ज्ञाता व ज्ञेय या दोन्ही गोष्टींमध्ये पाहत असतो." **"तत्त्वार्थ-चिंतामणी"** या ग्रंथामध्ये असे वचन आहे की, "विवेकाच्याद्वारे विशाल मोहांधकाराचा चुराडा झाला की, योग्याच्या स्वरूपाचा उदय होतो. अनात्मभाव नाहीसा झाला की, प्रत्येक दशेमध्ये साधक आपल्या परमानंदस्वरूपात मग्न राहतो. त्याला द्रष्टा-दृश्याच्या विवेकाचे रहस्य समजते. तो नाही असा संसारातील कोणताही कण, क्षण व कोपरा असत नाही. त्याचा भवरोग संपतो. त्याच्या व्युत्थानातही समाधी असते. खरी मोक्षलक्ष्मी ही त्याची मुलगीच असते."

जागृत दशेमध्येच स्वभावाचे स्फुरण होते ही गोष्ट अज्ञानी लोकांच्या लक्षात येत नाही. यासाठी ज्या अवस्थांमध्ये स्पंदांचे स्पष्ट दर्शन होते त्या अवस्थांचे पुढील कारिकेत वर्णन केले आहे.।।२१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :- (कारिका क्रमांक १९ ते २१)**

जागृती आणि तुर्या या दोन अवस्थांतील स्वस्वभावाची व्यतिरिक्तत्वाने अर्थात् निराळेपणाने जाणीव प्रबुद्धाला नसते. ती आता त्याला आणून द्यावयास हवी. पण प्रबुद्ध आणि अप्रबुद्ध या दोघांचाही जागरावस्थेतील व्यवहार सारखाच दिसतो. मग एकाला त्यातील स्वस्वभावाची व्यतिरिक्तत्वाने जाणीव होणार, दुसऱ्याला होणार नाही हे कसे? याचे समाधान -

**स्पष्टीकरण :-** "स्पंद" ही स्वस्वभावरूप परशक्तीच्या उन्मेषाची संज्ञा आहे. हा उन्मेष खरोखरी एकरूपच आहे. पण विषयांचे आकलन व्हावे याकरिता सामान्यविशेषभावाच्या भूमिकेवरून सामान्यस्पंद व विशेषस्पंद असे स्पंदांचे विभाग कल्पिले आहेत. "मी सुखी आहे," "मी दुःखी आहे," अशा प्रकारचे अनंत प्रत्ययप्रवाह संसारात आपल्याला जाणवत असतात. किंबहुना यांचाच संसार बनलेला आहे. हे विशेषस्पंद होत. पण या विशेषस्पंदांना खरोखरी निरपेक्ष अस्तित्व नसते. हे सर्व विशेषस्पंद आपल्या अंतर्गत शक्तीतून उदित होतात, त्या शक्तीवरच ते स्थित होतात व तीतच ते लीन होतात. विशेषस्पंदात जे परस्पर भेद दिसतात ते भेद सत्त्वरजस्तमामुळे झालेले असतात. त्यामुळे विशेषस्पंदांना येथे "गुणादिस्पंदनिष्यंद" असे म्हटले आहे. तत्त्वतः पाहिले तर या सर्व विशेषस्पंदात आपल्या अंतर्गत शक्तीचे स्फुरण अनुस्यूतच असते. अर्थात् आपली अंतर्गत शक्तीच साधकांना त्या स्पंदाच्या रूपात स्फुरण पावत असते. ही आपली शक्ती म्हणजे स्वस्वभावच होय म्हणजे त्या त्या विशेषस्पंदाच्या रूपात स्वस्वभावाचे स्फुरण होत असते. स्व-स्वभावाच्या स्फुरणाला येथे "सामान्यस्पंद" असे म्हटले आहे. गुणादि स्पंदविशेष हे या सामान्य स्पंदाच्याच आश्रयावर स्फुरत असतात. **(सामान्यस्पन्द-संश्रयात् लब्धात्मलाभाः)**

आता या स्पंदांचा विचार आपल्यालाच दोन प्रकारे करता येईल. हे सर्व विशेषस्पंद परस्परनिरपेक्ष आहेत, त्यांना निरपेक्ष अस्तित्व आहे, त्यावाचून दुसरे काही नाही, हा एक विचाराचा प्रकार व विशेषस्पंद स्वस्वभावरूप सामान्यस्पंदांचा अविष्कार आहे, त्यांना स्वतंत्र सत्ता नसून ते सामान्यस्पंदांच्या आश्रयावरच उदित झाले आहेत, संसारात हे विशेषस्पंद जेव्हा आपणाला जाणवतात तेव्हा तो खरोखरी स्वभावाच्या सामान्यस्पंदांचाच

साक्षात्कार होय, हा दुसरा प्रकार. पहिल्या प्रकारची विचारसरणी अप्रबुद्धाची असते तर दुसऱ्या प्रकारची विचारसरणी प्रबुद्धाची असते. अप्रबुद्धाला विशेषस्पंदांमागील आश्रयभूत सामान्य-स्पंदांची जाणीवच होत नसल्याने त्याची जाणीव विशेषस्पंदांच्या मर्यादेतच गुरफटलेली असते व या विशेषस्पंदांचाच संसार बनलेला असल्याने ती जाणीव संसारदशेतच सारखी भ्रमण करीत असते. तिला हा घोर संसार उत्तीर्ण करता येत नाही. पण प्रबुद्धाला या प्रत्येक विशेषस्पंदात सामान्य स्पंदांची जाणीव होत असल्याने तो संसारोत्तीर्ण अवस्थेत आरूढ होऊ शकतो व जागरावस्थेतच त्याला व्यापक अहंप्रत्ययाचा आनंद अनुभविता येतो.

विशेषस्पंद हे सांसारिक अवस्थेतील लौकिक अनुभवाच्या रूपाचे असतात. हे सुखदुःखात्मक आहेत. सामान्यस्पंद हा व्यापक अहंप्रत्ययाच्या भूमिकेवरील "प्रत्यवमर्श" असतो. सामान्यस्पंदरूप प्रत्यवमर्शाचा साक्षात्कार हा नेहमीच आनंदमय असतो; कारण ते चिदानंदमय स्व-स्वभावाचेच स्फुरण असते. त्यामुळे प्रबुद्धाला जागरावस्थेतच निज-भावानंदाचा लाभ होतो.।।२१।।

**(टीप :- "ग्राह्यग्राहकसंवित्तिः सामान्या सर्व देहिनाम्। योगिनां तु विशेषोऽयं सम्बन्धे सावधानता"।।** हे वचन सहज आठवण्यासारखे आहे.)

❋❋❋❋❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## स्पंदतत्त्वाच्या अनुभूतीसाठी निरंतर अर्थात् अथक किंवा सतत प्रयत्नांची अनिवार्यता किंवा आवश्यकता

परमकारुणिक श्रीसद्गुरूंनी सूत्र क्रमांक २१ मध्ये असा उपदेश केलेला आहे की, आत्म्याचा उद्धार इच्छिणाऱ्या व्यक्तींनी स्वतःहूनच स्पंदशक्तीची अनुभूती प्राप्त करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे; कारण निरंतर उद्योग केल्याने त्या व्यक्तींच्या इच्छेची पूर्तता होण्यास अधिक काळ लागत नाही.

**वृत्ती :-** यामुळे जो प्रबुद्ध योगी स्वतःमध्ये स्पंदतत्त्वाच्या स्वरूपाची अनुभूती प्राप्त करून घेण्यासाठी प्रतिक्षण उद्योग करीत राहतो तो प्रबुद्ध योगी जाग्रत् अवस्थेमध्येच आपल्या भावाची अर्थात् तुर्यचमत्कारमय

अशा स्पंदतत्त्वाची अनुभूती अत्यंत अल्प काळामध्ये प्राप्त करून घेत असतो.।।२१।।

**विवरण :-** सूत्र क्रमांक २१ मध्ये त्या व्यक्तींना अर्थात् आत्म्याच्या उद्धाराची इच्छा करणाऱ्या व्यक्तींना प्रतिक्षण प्रयत्नशील राहण्याचा उपदेश दिलेला आहे. या व्यक्ती स्पंदात्मक पर अर्थात् सर्वश्रेष्ठ अशा संविद्धामामध्ये अर्थात् शक्तिधामामध्ये किंवा भगवद्धामामध्ये प्रवेश प्राप्त करून घेण्यास इच्छुक असणे आवश्यक आहे. या संबंधामध्ये मनामध्ये असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे की, प्रयत्न कोणत्या गोष्टीचा करावयाचा आहे? भगवान् श्रीचंद्रमौलींनी "**प्रयत्नः साधकः।। श्रीशिवसूत्र २.२।।**" या सूत्रामध्ये दोनच शब्दामध्ये या शंकेचे निवारण केलेले आहे. शास्त्रकारांनी मोठ्या विस्ताराने या सूत्रामध्ये अंतर्निहित अर्थाचे विश्लेषण केलेले आहे. थोडक्यात या सूत्राचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

चित्त हे बहिर्मुख असलेल्या विश्वप्रसाराकडे अर्थात् बाह्य जगताकडे किंवा बाह्य विश्वरूप उभारणीकडे सतत गुणादि रूपामध्ये प्रवाहमान होणाऱ्या अर्थात् राहणाऱ्या स्पंदप्रवाहाचेच रूप आहे. या दृष्टीने "**शिवसूत्रविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, "**चित्तं मन्त्रः" चेत्यते विमृश्यते अनेन परं तत्त्वम् इति चित्तम् ..... तदेव मन्त्र्यते गुप्तम् अन्तरभेदेन विमृश्यते परमेश्वररूपम् अनेन इति कृत्वा मन्त्रः।।२.१।।** ज्या साधनाने परतत्त्वाचा विचार केला जातो ते चित्त होय. त्या चित्ताकडून अत्यंत रहस्यमय अशा परमेश्वररूपाचा आंतरिक अभेदाने विचार होतो. त्यामुळे चित्ताला मंत्र असे म्हटले आहे. पांचभौतिक कायेमध्ये अर्थात् पृथ्वी, आप, तेज, वायू आकाश या पाच महाभूतांपासून बनलेल्या शरीरामध्ये राहता राहता केवळ चित्ताच्या द्वारा परमतत्त्वाचाच शोध घेतला जातो. यामुळे मननधर्मा अर्थात् मननधर्मीय असल्यामुळे प्रत्यक्षात चित्तालाच मंत्राची संज्ञा किंवा नाम दिलेले आहे. त्रिगुणमय अर्थात् सत्त्व-रज-तम या तीन गुणांनी बनलेले असल्यामुळे चित्तामध्ये प्रतिक्षण संकल्प-विकल्प निर्माण होतात व नाहीसे होत राहतात. याच संकल्प-विकल्पात्मक चित्ताला हळूहळू अंतःकरणामधील अनुसंधानाच्या अर्थात् सद्विमर्शाच्या किंवा सद्विचाराच्या बळाने सामान्य स्पंदरूपावर प्रतिभा अर्थात् विकल्पहीन अर्थात् कोणतेही विकल्प नसलेल्या परसंविद्धाम अर्थात् सर्वश्रेष्ठ भगवद्धामामध्ये विलीन करण्याच्या नैसर्गिक प्रयासालाच

पारिभाषिक शब्दामध्ये "प्रयत्न" असे म्हणतात. श्रीभगवंतांच्या सूत्रामध्ये अशाच प्रयत्नांना करीत राहण्याचा आदेश दिलेला आहे; कारण हाच प्रयत्न शेवटी योग्याच्या हृदयामध्ये शाक्तस्वरूपाची अभिव्यक्ती करून देत असतो. सहज प्रयत्नांच्या द्वारा पूर्ण अहंरूप आत्मानुभूती प्राप्त करून घेण्यालाच शास्त्रीय शब्दामध्ये "मंत्रवीर्याची अनुभूती" प्राप्त करून घेणे असे म्हणतात. पूर्ण अहंभावाची अनुभूती हेच सर्वोत्कृष्ट वीर्य आहे.

आध्यात्मिक मार्गावर पुढे जाण्यासाठी अपेक्षित प्रयत्न किंवा उद्योगाचे स्वरूप समजून घेण्याबरोबरच मनामध्ये अशा प्रयत्नाला कार्यान्वित करण्याच्या प्रक्रियेचे ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा साधकयोग्याला होणे हे स्वाभाविकच आहे. शास्त्रकारांनी शाक्तभूमिकेची अनुभूती प्राप्त करून घेण्यासाठी अनेक प्रकारच्या प्रक्रियेचे फायदे तोटे वर्णिलेले आहेत. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "..... **स्वभावे पारमेश्वरे। प्रविविक्षुर्विकल्पस्य कुर्यात्संस्कारमञ्जसा।।४.२।।"** याचा अर्थ असा आहे की, ज्याला पारमेश्वर स्वभावात प्रवेश करण्याची इच्छा असेल त्याने सर्व प्रथम विकल्पांवर संस्कार करावेत. परंतु भगवान् श्रीमद् अभिनवगुप्तपादाचार्यांनी या विषयामध्ये विकल्प-संस्काराच्या प्रक्रियेलाच सर्वप्रथम मान्यता प्रदान केलेली आहे.

आत्मिक उन्नतीच्या मार्गामध्ये "विकल्प-संस्कार" अर्थात् आपल्या भावनांचा परिष्कार करणे अर्थात् भावनांवर संस्कार करणे किंवा भावनांचे दोषनिरसन करणे किंवा भावना शुद्धी करणे याचा प्रयत्न हीच मुख्य प्रक्रिया आहे आणि कमीतकमी आधुनिक युगामधील शेकडो कटकटींनी व संकटांनी तसेच कोड्यांनी भरलेल्या व्यस्त जीवनामध्ये याच्या कार्याचा अर्थ लावणे संभव होऊ शकते. केवळ आध्यात्मिक पक्षामध्येच नाही, तर सामान्य जीवनपक्षामध्ये या प्रक्रियेचा अंगीकार केला असता प्रत्येक मानवाचे आणि त्याच्याद्वारा सर्व जगताचे श्रेय किंवा भले होऊ शकते. विकल्पांचा संस्कार हा कशा प्रकारे होऊ शकतो. या विषयामध्ये श्रीसद्गुरूंचे असे म्हणणे आहे की, वारंवार कामिनी कांचनरूपी प्रतिकूल दिशेमध्ये वाहणाऱ्या विकल्पांच्या परंपरेचा मार्ग बदलून, बलपूर्वक त्या विकल्पांना स्वरूपचिंतनाच्या अनुकूल दिशेमध्ये लावले असता विकल्पांचा स्वयं संस्कार होत असतो. (**संस्कारो हि गुणान्तराधानम्।** अर्थात् संस्कार याचा अर्थ गुणवृद्धी किंवा विविध गुण निर्माण करणे असा आहे.)

याआधीच या गोष्टीचा उल्लेख केलेला आहे की, गुणादि स्पंदांचे निष्यंद हे प्रतिक्षण आत्म्याच्या खऱ्या रूपावर आवरण टाकीत राहतात. हेच कारण आहे की, मनातील विकल्प हे प्रतिक्षण मायीय तसेच निहित अर्थात् संचित स्वार्थाची पूर्तता करण्यासाठी कटिबद्ध राहत असतात. वाईट विकल्पांचे संस्कार अधिक शतपटीने वाईटच विकल्पांच्या परंपरांना जन्म देत असतात. याचा परिणाम म्हणून संसारामधील विषयोपभोगाच्या शृंखला किंवा साखळ्या या अशा प्रकारे एकमेकात गुंतून जातात की, जन्मजन्मांतरापर्यंत चित्ताची स्थिरता प्राप्त करणारा हाच एक स्वप्न होऊन जातो किंवा असे करणे हेच एक स्वप्न होऊन जाते. यामुळे प्रबुद्ध व्यक्तीने खाताना, पिताना, झोपताना, जागे असताना अर्थात् जीवनाचा प्रत्येक कार्यकलाप अर्थात् जीवनातील प्रत्येक गोष्ट करताना इंद्रियांच्या सरणींच्या अर्थात् पद्धतींच्या द्वारा बाह्य जगतामधील हेय अर्थात् त्याज्य विषयांकडे धाव घेणाऱ्या विकल्प परंपरांना अलंग्रासाच्या अर्थात् आता हे विषय पुरे या युक्तीने ग्रस्त करून अर्थात् सत्-विमर्शाच्या किंवा सद्विचारांच्या बळाने बाह्य विषयांपासून निवृत्त करून हृदयामध्ये अर्थात् चित्प्रकाशमय अशा संविद्धामामध्ये एकाग्रभावाने स्थिर करण्याचा सतत प्रयत्न करीत राहावा. असे केले असता त्या प्रबुद्ध व्यक्तीच्या मनामध्ये संस्कृत अर्थात् संस्कारित झालेले अर्थात् दोषांचे निरसन करून शुद्ध झालेले असे विकल्प निर्माण होऊ लागतात. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की-

**विकल्पः संस्कृतः सूते विकल्पं स्वात्मसंस्कृतम्।**
**स्वतुल्यं सोऽपि सोऽप्यन्यं सोऽप्यन्यं सदृशात्मकम्।।३.३।।**

याचा अर्थ असा आहे की, यावरून संस्कारित झालेल्या विकल्पांचे संस्कार हे शतपटीने संस्कृत विकल्पनाच जन्म देत राहतात आणि असत् अर्थात् वाईट विकल्प हे स्वतःच क्षीण होत राहतात.

सावधान राहून सतत अभ्यास करीत राहिल्याने विकल्प संस्कारित होऊन संस्काराच्या पूर्ण परिणत अथवा रूपांतरित अवस्थेवर पोहोचत असतात. "**स्फुटतम विकल्प**" हे पूर्ण संस्कृत किंवा संस्कारित विकल्पाचे शास्त्रीय नाव आहे. या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**चतुःष्वेव विकल्पेषु यः संस्कारः क्रमादसौ।**
**अस्फुटः स्फुटताभावी प्रस्फुटत् स्फुटितात्मकः।।३.४।।**

याचा अर्थ असा आहे की, पूर्णसंस्काराच्या अवस्थेवर पोहोचण्यासाठी विकल्पाला अस्फुट, स्फुटतेकडे उन्मुख, स्फुट होणारी आणि पूर्ण प्रस्फुटित या चार अवस्थांतून जावे लागते. पूर्णविकासाची अवस्था ही अंतिम अवस्था आहे. येथे पोहोचेपर्यंत असत् विकल्पाचे संस्कार नष्ट झालेले असतात. याचा परिणाम म्हणून संवित् अर्थात् श्रीभगवंतांची शक्ती ही निर्मळ पारमार्थिक विकल्पांच्या रूपामध्ये कशी प्रकाशित होते हे सांगताना "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**ततः स्फुटतमोदारताद्रूप्यपरिबृंहिता।**
**संविदभ्येति विमलामविकल्पस्वरूपताम्।।४.६।।**

याचा अर्थ असा आहे की, त्यानंतर अत्यंत स्फुट किंवा स्पष्ट, उदार, तद्रूपतेने पसरलेली, विमल अर्थात् सर्व मल नष्ट झालेली आणि अविकल्पस्वरूपाची संवित् उदित होते.।।४.६।।

यावरून "**तंत्रसार**" या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे स्वतः निर्मळ पारमार्थिक विकल्पांच्या रूपामध्ये "**इत्थं विचित्रैः शुद्धविद्यांशरूपैः विकल्पैः .....।।**" अर्थात् संस्कारित विकल्पांवरील संस्काराच्या द्वारा पुढे पुढे जे दुसरे संस्कारित विकल्प निर्माण होत राहतात ते विकल्प शुद्ध विद्येचेच अंश असतात; कारण "**न च अत्र सत्तर्कात् शुद्धविद्या-प्रकाशरूपात् ऋते अन्यत् योगाङ्गः साक्षात् उपायः।।**" अर्थात् शुद्ध विद्येला प्रकाशित करणाऱ्या सत्तर्काशिवाय अन्य कोणतेही (उत्तम) योगांग नाही. तोच (योग प्राप्त करण्याचा) साक्षात् उपाय आहे, असे "**तंत्रसार**" या ग्रंथात म्हटले आहे. दुसऱ्या शब्दामध्ये या विकल्पांना सद्-ज्ञान किंवा सत्-तर्काचे विकल्प असेही म्हणतात. सत्-तर्क हेच योगाचे उत्तम अंग मानले गेले आहे; कारण या सत्-तर्काच्या द्वारा हळूहळू चित्तावर जमलेली तामसिक किंवा राजसिक धूळ दूर होते आणि विकल्पाचे विकसित झालेले अनुपम रूप हे संसाराचे कारण बनलेल्या असत्-तर्काचे सशक्त प्रतिद्वंद्वी बनून त्याचा पूर्ण नाश करीत असते. या दृष्टीने "**तंत्रसार**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**अतः प्रतिद्वन्द्विरूपो विकल्प उदितः संसारहेतु विकल्पं**
**दलयति इति अभ्युदयहेतुः।।**

**अर्थ** :- त्यामुळे प्रतिद्वंद्वीरूप असा विकल्प निर्माण झालेल्या

संसारहेतुरूप विकल्पाचा नाश करीत असल्यामुळे तो अभ्युदयास किंवा मोक्षाला कारणीभूत मानला जातो.

संस्काराच्या प्रक्रियेच्या द्वारा संस्कारित झाल्यावर विकल्पाचे पारमार्थिक रूप उदय पावत असते. परंतु इतक्यानेच उपर्युक्त प्रयत्नाची इतिश्री किंवा प्रयत्नाचा शेवट होऊ शकत नाही. विकल्प हा सत्-विकल्प अर्थात् पारमार्थिक विकल्प असो किंवा असत्-विकल्प अर्थात् सांसारिक विकल्प असो शेवटी तो विकल्पच आहे. जोपर्यंत मनामध्ये कोणत्याही प्रकारचा विकल्प विद्यमान असतो तोपर्यंत विशुद्ध चिन्मात्ररूप श्रीशिवभावाची अखंड अनुभूती प्राप्त होणे किंवा स्वशक्तिविरोधाच्या भूतापासून पिंड सोडविणे हे दुर्लभ आहे. यामुळे "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**परमार्थविकल्पेऽपि नावलीयते पण्डितः।**
**को हि भेदो विकल्पस्य शुभे वाप्यथवाशुभे।।४.६।।**

सिद्ध श्रीसद्गुरूंनी श्रेयस्काम अर्थात् मोक्षाची इच्छा करणाऱ्या शिष्यांना वारंवार सचेत केलेले आहे की, मनामध्ये पारमार्थिक विकल्प निर्माण झाल्यानंतरही विवेकी व्यक्तींनी याचा अहंकार बाळगू नये. अशा व्यक्तींनी संस्कार प्रक्रियांच्या द्वारा या विकल्पांचा सतत संस्कार करीत राहावा. विशेषस्पंदरूप चित्त हे सामान्यस्पंदरूप अभेद भूमिकेमध्ये पूर्णपणे विश्रांत होऊन विकल्पहीन संवित् स्वभावामध्ये विलीन होईपर्यंत या विकल्पांचा संस्कार करावा. याकरिताच "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकाग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

**अथ च मन्त्रदेवताविमर्शपरत्वेन प्राप्ततत्सामरस्यम्**
**आराधकचित्तमेव मन्त्रः।।२.१।।**

याचा अर्थ असा आहे की, याशिवाय मंत्रदेवताविचारपूर्वक त्या मंत्रदेवतांशी समरस होणारे आराधकाचे चित्तच मंत्र होय.

यावरून अशाच निर्मळ चित्तासह शाक्त उपायाचे आधारभूत मंत्रांचे विमर्शात्मक तादात्म्य झाल्यावर चित्, मंत्र आणि मंत्रदेवता हे तिन्ही एकाकार बनतात. यामुळे योग्याच्या निर्मळ चित्तालाच "मंत्र" अशी संज्ञा किंवा नाव दिलेले आहे. अशा स्थितीमध्ये सर्व वर्णात्मक मंत्रही निर्विकल्प अहंरूपामध्ये विश्रांत होत असतात. अशा वेळी या मंत्रामध्ये स्पंदात्मक

शाक्त बळाचा संचार होत असतो. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकाग्रंथामध्ये "**श्रीतंत्रसद्भाव**" या ग्रंथातील वचन उद्धृत करताना असे म्हटले आहे की -

**मन्त्राणां जीवभूता तु या स्मृता शक्तिराख्या।**
**तया हीना वरारोहे निष्फलाः शरदभ्रवत्।।२.१।।**

याचा अर्थ असा आहे की, मंत्राची प्राणभूत अशी जी पूर्ण, विचाररूप संविच्छक्ती आहे ती शाश्वत आहे. हे वरारोहे! त्या संवित् अर्थात् चिच्छक्ती कुंडलिनीवाचून मंत्राला शारदीय मेघाप्रमाणे निष्फलत्व आहे.

मंत्र तसेच चित्त यांची अहंरूप एकाकारता झाली नाही तर अशा परिस्थितीत मंत्राचे कितीही वेळा उच्चारण केले अर्थात् मंत्र कितीही वेळा म्हटला तरीही ते केवळ मंत्राच्या वर्णाचे उच्चारण होईल. यामुळे कोणतेही अभीष्ट सिद्ध होणार नाही. पुढे सूत्र क्रमांक २६ च्या विवरणामध्ये या विषयावर सविस्तर चर्चा होणार आहे.

प्रस्तुत संदर्भामध्ये अजून ही शंका उरते की, या आधी वर्णिलेल्या विकल्पसंस्काराच्या दिशेमध्ये पुढे जाण्याची अर्थात् प्रगती करण्याची क्षमता कशी प्राप्त होऊ शकते? या विषयामध्ये भगवान् श्रीआशुतोष यांनी स्वतः असा आदेश दिलेला आहे किंवा अशी आज्ञा केलेली आहे की, "**गुरुरुपायः। श्रीशिवसूत्र २.६।।**" अर्थात् पारमेश्वरी अनुग्रह करणारी शक्ती हीच श्रीगुरू होय व तोच उपाय होय. हा उपाय प्राप्त होण्याची क्षमता किंवा असे सामर्थ्य हे केवळ श्रीसद्गुरूंच्या कृपेमुळेच अर्थात् शक्तिपातयोगदीक्षेमुळे व त्यामुळे उद्भूत झालेल्या सिद्धयोगसाधनामुळे प्राप्त होऊ शकते. श्रीसद्गुरूंच्या केवळ उपदेशानेच शिष्याच्या मनामधील दौर्बल्य व शंका दूर होतात आणि तो शिष्य अभ्यासाचे रहस्य जाणून घेण्यास किंवा अवगत करण्यास समर्थ होत असतो. "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये श्रीभगवंतांनी स्वयं अशी घोषणा केलेली आहे की -

**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते।**
**श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः।।१२.२।।**
**अप्यावेशयितुं चित्तं न शक्नोषि मयि स्थिरम्।**
**अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनञ्जय!।।२१।।**

अर्थ :- माझ्या ठिकाणी मनाला एकाग्र करून निरंतर माझ्या भजनात

व ध्यानात रत होऊन जे भक्तजन श्रेष्ठ अशा श्रद्धेने युक्त होऊन मला भजतात ते मला योग्यांमध्येही अति उत्तम योगी वाटतात. ।।१२।। हे धनंजया! जर तू माझ्यामध्ये तुझ्या चित्ताचा समावेश करू शकत नसशील आणि ते स्थिर करू शकत नसशील तर अभ्यासरूप योगाने मला प्राप्त होण्याची इच्छा कर.।।२१।।

❋❋❋❋❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

हे असे असल्यामुळे वर सांगितलेल्या आणि पुढेही सांगितल्या जाणाऱ्या स्पंदतत्त्वाच्या विमर्शासाठी किंवा ज्ञानासाठी सतत उद्युक्त असणाऱ्या, "**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते**" अर्थात् "जे माझ्याशी सदैव युक्त असणारे माझ्यामध्ये मन प्रवेशून माझी उपासना करतात," असे "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे सतत अंतर्मुखस्वरूपाचे प्रत्यक्षीकरण करण्यात पटाईत असणारा जो (साधक असतो) तो जाग्रत् अवस्थेत स्थित राहूनच आत्मीय श्रीशंकरात्म स्वस्वभावाचे तत्काळ ज्ञान प्राप्त करतो. त्याचप्रमाणे त्यांचा श्रीशंकरात्मक आंतर स्वभाव स्वतःच त्यांच्यासमोर उदय पावतो आणि त्यामुळे प्रबुद्ध (साधक) नित्योदित समावेश प्राप्त करून सुप्रबुद्ध म्हणजे जीवन्मुक्त होतात. ।।२१।।

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

साधकपुरुष स्पंदतत्त्वाचा साक्षात्कार अविरत उत्साहबलाने थोडक्या-काळातच प्राप्त करून घेतात, हे "**अतः सततमुद्युक्तः .....।।२१।।**" या कारिकेत सांगितले आहे. तो शाक्तभूमिकेत समारूढ झालेला योगी अविरतकाळ परमतत्त्व स्वरूपाचा स्वभाव प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करीत असतो व जाग्रत् अवस्थेतच संवित्प्रकाशात्मस्वभावाची अर्थात् चैतन्यप्रकाशयुक्त आत्मस्वभावाची अपरोक्ष अनुभूती शीघ्रपणे करून घेतो. याचे तात्पर्य असे आहे की, स्वीय म्हणजेच स्वतःच्या स्पंदतत्त्वाची अभिव्यक्ती करण्यासाठी निरंतर स्वात्मानुसंधान अर्थात् आत्म्याच्या अनुसंधानरूप यत्नाची मोठीच अपेक्षा दिसून येते. यामुळे सद्भावनेची मनामध्ये उत्पत्ती होते. यासंबंधी "**श्रीतंत्रालोककारांनी**" असे म्हटले आहे की -

**विकल्पः संस्कृतः सूते विकल्पं स्वात्मसंस्कृतम्।**
**स्वतुल्यं सोऽपि सोऽप्यन्यं सोऽप्यन्यं सदृशात्मकम्।।**

**अर्थ :-** संस्कारित विकल्प स्वात्मसंस्कारित अशा दुसऱ्या विकल्पाला जन्म देतो आणि तो (निर्माण झालेला दुसरा) विकल्प स्वतःप्रमाणेच अन्य सदृश विकल्पाला जन्म देतो; तो आणखी एका, आणि तो आणखी एका विकल्पाला जन्म देतो. अशा प्रकारे अनंत विकल्प उत्पन्न होतात.।।

यामुळे येथे असे सूचित केले आहे की, तत्त्वजिज्ञासूंनी साध्याच्या म्हणजेच प्राप्त करून घ्यावयाच्या तत्त्वाच्या सिद्धीसाठी दृढ संकल्प करून अविरत प्रयत्न करावे.।।२१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**अतिक्रुद्धः प्रहृष्टो वा किं करोमीति वा मृशन्।**
**धावन् वा यत्पदं गच्छेत्तत्र स्पन्दः प्रतिष्ठितः।।२२।।**

**अन्वयार्थ :-**

**अतिक्रुद्धः** - क्रोधाची पराकाष्ठा झालेला, **वा** - किंवा, **प्रहृष्टः** - अत्यंत हर्षभरित, **वा**- अथवा, **"किं करोमि" इति मृशन्** - "मी आता करू तरी काय" अशी किंकर्तव्यमूढ अवस्था झालेला, **वा**- किंवा, **धावन्** - जीवाच्या किंवा तशा स्वरूपाच्या आत्यंतिक भीतीने धावत असलेला, **यत्** - ज्या, **पदं** - अवस्थेला, **गच्छेत्** - जातो, (त्या अवस्थेत) **स्पन्दः** - स्पंद तत्त्व, **प्रतिष्ठितः** - प्रतिष्ठित असते - (त्याचा स्पष्ट रूपात उदय होतो. - श्रीभट्टकल्लट)।।२२।।

**अर्थ :-** क्रोधाची पराकाष्ठा झालेला किंवा अत्यंत हर्षभरित झालेला किंवा "मी आता करू तरी काय?" अशी किंकर्तव्यमूढ अवस्था झालेला किंवा जीवाच्या वा तशा स्वरूपाच्या आत्यंतिक भीतीने धावत असलेला प्रमाता अर्थात् जीव ज्या अवस्थेला जातो त्या अवस्थेत स्पंदतत्त्व प्रतिष्ठित असते अर्थात् या स्पंदतत्त्वाचा स्पष्टपणे उदय होतो.।।२२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

सामान्य व विशेष या दोन प्रकारांनी स्पंदाचे वर्णन केले आहे. सामान्यस्पंदाची जागृती असली की, साधकाची आत्मस्वरूपाच्या ठिकाणी प्रतिष्ठापना होते. मात्र विशेषस्पंदाची जागृती असली तर तो आत्म-

स्थितीपासून भ्रष्ट होतो. त्याला आत्मस्वरूपाची विस्मृती होते. साधक आत्मस्थितीच्या ठिकाणी प्रतिष्ठित झाला हे केव्हा समजावयाचे? मी सुखी किंवा दुःखी अशा विशेषस्पंदांनी ज्याची स्थिती ढासळत नाही व आत्मस्वरूपाच्या ठिकाणी जो जागृत राहतो त्याच्या ठिकाणी सामान्यस्पंद जागृत आहे असे समजावे. आत्मस्वरूपाच्या ठिकाणी प्रतिष्ठित असणारी स्थिती व्यवहारामध्ये कोणकोणत्या ठिकाणी किंवा स्थितीत ध्यानात येते याची उदाहरणे पुढे दिली आहेत.

१) एकदम रोगाचा उपद्रव, शरीरावर आघात किंवा कट्ट्या शत्रूचे दर्शन झाले म्हणजे त्या वेळेला तीव्रतम असा संताप होतो. तो विकार होण्याचा जो क्षण तो क्षण आत्मस्थितीचा असतो.

२) आपल्या अत्यंत लाडक्या प्रियेचे-बायकोचे प्राणोत्क्रमण झाल्यावर जर पुन्हा ती एकदम सजीव झालेली दिसली तर त्या वेळेस जो एकदम आनंद होतो तो क्षणही आत्मस्थितीचा आनंद देणारा आहे.

३) एखाद्या राजाने किंवा बलवान् शत्रूने हल्ला केला असता प्रतिकार कसा करावा याचा निश्चय न झाल्याने आता काय करावे? या प्रश्नाने जी स्थिती एकदम होते तो क्षण आत्मस्थितीचा होय. ही जी स्तब्धता येते त्या स्थितीला "निरालंब" स्थिती म्हणतात.

४) आत्यंतिक सुख, दुःख, मूढता व ज्याच्या मरणाची कधीही कल्पना येणार नाही अशा एखाद्या आवडत्या मनुष्याच्या मृत्यूची बातमी ऐकल्यावर अंतःकरणाची जागृत अवस्थेत जी स्थिती होते, त्या वेळेचा जो क्षण तोही आत्मस्थितीचा अनुभव देणारा आहे.

५) अतिशय क्रुद्ध झालेला कृष्णसर्प, अजगर, वाघ किंवा सिंह अकस्मात् समोर आल्याबरोबर जी अनियंत्रित भीती उत्पन्न होते, त्या वेळचा क्षण आत्मस्थितीचा असतो.

६) अतिशय तिटकारा येणारा पदार्थ नजरेस पडल्याबरोबर त्या वेळेला जी क्रुद्धावस्था येते तो क्षण आत्मस्थितीचा असतो.

७) अतिशय दुष्कर असे कार्य केल्यास तुला हिंदुस्थानचा राजा करीन हे ऐकल्यावर होणाऱ्या मनाच्या स्थितीचा क्षण आत्मस्थितीचा असतो.

८) कधीही न पाहिलेला असा रमणीय पदार्थ पाहताना विस्मय वाटण्याचा क्षण आत्मस्थितीचा असतो.

९) एखाद्याने आणलेले सोंग हे सोंग नसून तो ते प्रत्यक्षच आहे असे वाटून लगेच तो कोण आहे हे ओळखताच जे आत्यंतिक हास्य येते ती स्थिती आत्मस्थितीची असते.

१०) एखादा मनुष्य दुरून दिसल्यावर त्याला ओळखण्याचा निश्चय बरोबर न झाल्यामुळे तो कोण असावा बरे? असा विचार मनात उठताच जी स्थिती होते तो क्षण आत्मस्थितीचा असतो.

११) पाठीमागे वाघ लागल्यावर मनुष्य जीव वाचविण्याकरिता पुढे धावत सुटतो. त्या वेळेला पावलांची पाऊल टाकण्याची जी स्थिती तो क्षण आत्मस्थितीचा होय.

याप्रमाणे जागृत अवस्थेत अंतःकरणाची किंवा कर्मेंद्रियांची जी स्थिती होते ती आत्मस्थिती होय. आपली इच्छा, प्रेम, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती यांच्या बाबतीत व्यवहारात विचारशक्ती नाहीशी होऊन जी अद्वय स्थिती येते तेव्हा ईश्वरच प्रकट झालेला असतो. त्यावेळेला जीवात्मा परमात्मारूप व आत्मप्रतिष्ठ होऊन त्याची स्थिती परब्रह्मरूप झालेली असते.

अत्यंत स्पष्ट वर्णाने उच्चार करण्यात जेव्हा वाणी गुंग होते तेव्हा आपल्या मनाची जी स्थिती असते किंवा वीणा अगर वेणू वाजविताना हाताच्या अंगुलींची जी स्थिती असते ती आत्मस्थितीच असते. सर्व अवस्थेत व सर्व इंद्रियांच्या वृत्ती सदोदित प्रकाशमान अशा आत्मसत्तेनेच चालत असतात. तथापि मायेने निर्माण केलेल्या भासाने अनंत ज्ञानक्रिया दिसत असल्यामुळे प्रबुद्धाला सुद्धा याची जाणीव राहू शकत नाही. एकाग्र रीतीने चिंतन करून प्रबुद्धाला आत्मस्थितीची जाणीव व्हावी म्हणून वर सांगितलेल्या सर्व अवस्थांचे वर्णन केले आहे. या उपदेशाच्या योगाने आत्मस्वरूपाची विवेक करण्याची प्रज्ञा प्रबुद्धाला प्राप्त होऊन त्याला आत्मस्थितीचा अनुभव येईल.

ज्यावेळी द्वेषामुळे अस्वस्थता व असहनीयता उद्दीप्त झाल्यावर अत्यंत क्रुद्ध मनुष्य पहिल्याप्रथम ज्या अवस्थेवर पोहोचतो त्यावेळी त्याच्या चित्तवृत्तीला अत्यंत मोठ्या विस्तृत अशा उन्मुखतेचा स्पर्श होतो. शुचिरागत प्रिय व्यक्तीच्या दर्शनादींमुळे हर्ष प्राप्त होऊन मनुष्याला परमानंद प्राप्त होतो. अनेक कर्तव्यांच्या कल्लोळांमध्ये गुंतल्यावर "हे करू का ते करू" या प्रकारच्या विचारानंतर जेव्हा त्याच्या मनाला निश्चयात्मक दशा

येते तेव्हा त्याला अपरिमित सुख होते. आपल्या प्रेयसीने बोलाविल्यावर किंवा संभ्रम अवस्थेत धावत असताना मनुष्य ज्या अवस्थेवर आरूढ होतो त्यावेळी त्याला आत्मस्वभाव स्पंद स्पष्टपणे उपलब्ध होतो. ज्यावेळी जेथे व ज्या अवस्थेमध्ये सर्व शक्तींचा लय होतो तेथे स्पंदतत्त्वाचा स्पष्ट उदय झालेला पाहवयास मिळतो. क्रोधामुळे सर्व दुःखावस्था व हर्षामुळे सर्व सुखावस्था एकदम प्रकट होतात हेच याचे खरे कारण आहे. "काय करू व काय करू नको" यामुळे सर्व मोहजन्य इंद्रियवृत्ती धावू लागतात. या बाबतीत "**विज्ञानभैरव**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "क्रोधादींच्या शेवटी, भीतीत, शोकात, शून्य अरण्यात, कोणत्याही कामाच्या प्रवृत्तीला एकाएकी थांबविल्यावर, घनघोर संग्रामात, कुतूहलात, तहान भुकेचा शेवट झाल्यावर ब्रह्मसत्ता सर्वथा निकट असते. परंतु ती ओळखता येत नाही." "**रहस्यस्तोत्र**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "क्रोध व हर्षाच्या विवशतेच्या पराकाष्ठेत, कर्तव्याकर्तव्याच्या विचारात व एखाद्या भावाचा स्पर्श होण्यापूर्वी जी दशा असते तेथे स्पंद आपल्या ठिकाणी शक्तीचा संचार करीत असतो. या सूक्ष्मातिसूक्ष्म त्रुटिमात्र कालात सर्वज्ञता व सर्वशक्तिमत्तेचा माणसाला स्पर्श होऊ लागतो. (सुईने कमळाच्या एका पाकळीला छेदण्यास जितका वेळ लागतो त्याला त्रुटी म्हणतात.) एका त्रुटीच्या कालात मनुष्यात सर्वज्ञता, सर्वकर्तृता व सर्वेश्वराचा उदय होतो. श्रीगुरूपदेशाने प्राप्त झालेले साधन आदरपूर्वक करून या सिद्धान्ताची खात्री करून घेता येते. या स्पंदतत्त्वाचा जीवनात उदय होण्यासाठी पुढील तीन कारिकेत उपाय सांगितला आहे.।।२२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** येथे सामान्यस्पंदाला "प्रतिष्ठितस्पंद" असे म्हटले आहे. लौकिक जीवनातील विशेषस्पंद हे क्षणजीवी असतात. ते येतात आणि जातात. त्यामुळे ते अप्रतिष्ठितस्पंद होत. पण कितीही विशेषस्पंद आले आणि गेले तरी तदाश्रयभूत स्वस्वभावाचे स्फुरण सर्वत्र अनुस्यूत असतेच म्हणून स्वस्वभावस्फुरणरूप नित्य सामान्यस्पंदाला येथे प्रतिष्ठित स्पंद म्हटले आहे. जाग्रदावस्थेत सामान्यस्पंदाची जाणीव कोणत्या भूमिकेवर होते हे या कारिकेत सांगितले आहे.

या कारिकेत आलेली "अतिक्रुद्ध," "प्रहृष्ट," इत्यादि पदे उपलक्षणात्मक आहेत म्हणजे त्यांनी तज्जातीय इतर विशेषस्पंदांचेही ग्रहण करावयाचे आहे. **"अतिकृद्धो यत् पदं गच्छेत्"**- याचा अर्थ असा आहे की, आपल्यावर कोणी प्रहार केला किंवा आपल्या जीवावर संकट घातले किंवा शत्रू समोर येऊन उभा ठाकला तर अत्यंत तीव्र अशा क्रोधाने आविष्ट झालेले मन तज्जन्य विकार दिसण्यापूर्वीच तत्काळ ज्या भूमिकेवर आरूढ होते त्या भूमिकेवर प्रतिष्ठित स्पंदाची उपलब्धी होते. या प्रमाणेच इष्ट जनाचा नाश झाल्याचे कानावर येताच अतिशोकाविष्ट झालेला मनुष्य शोकव्यंजक अश्रुप्रलयादि विकार दिसण्यापूर्वीच तत्काळ ज्या भूमिकेवर आरूढ होतो, तसेच चिडलेला सर्प, वाघ इत्यादि अंगावर आलेले पाहून भयग्रस्त झालेला मनुष्य, कंपपलायनादि विकार दिसण्यापूर्वीच भयोत्पत्तीने ज्या भूमिकेवर जातो, तसेच अत्यंत किळसवाण्या पदार्थांचे दर्शन होताच थुंकणे इत्यादि विकार दिसण्यापूर्वीच केवळ जुगुप्सा उत्पन्न झाल्याने मनुष्य तत्काळ ज्या भूमिकेवर आरूढ होतो, तेथेही प्रतिष्ठितस्पंदाची उपलब्धी होते. अशा प्रकारे क्रोध, शोक, भय व जुगुत्सा या चार दुःखराशींचा निर्देश कारिकेत "अतिकृद्ध" या उपलक्षणाने केला आहे. **"प्रहृष्टो वा यत् पदं गच्छेत्"** या भागाने चतुर्विध सुखराशींचा निर्देश केला आहे. मृत्यूच्या दाढेतून सुटलेल्या प्रियेचे दर्शन होताच अतिशय हृष्ट झालेला मनुष्य हर्षावेगामुळे तज्जन्य शारीरिक विकार प्रकट होण्यापूर्वी तत्काल ज्या भूमिकेवर आरूढ होतो, तसेच आपला पराक्रम, बल इत्यादींनी दुष्कर कार्य करण्याकरिता निर्हेतुकपणे उत्साहमान होणारा तत्काळ ज्या भूमिकेवर आरूढ होतो किंवा अपूर्व आणि परमरमणीय दर्शनाने तत्काळ विस्मयाविष्ट झालेला ज्या भूमिकेवर आरूढ होतो किंवा विकृती, दंभ, लबाडी इत्यादिक गोष्टी पाहून हास्य उत्पन्न झाले असता त्या हास्यावेशात मनुष्य ज्या भूमिकेवर आरूढ होतो तेथे प्रतिष्ठितस्पंदाची उपलब्धी होते. अशा प्रकारे **"प्रहृष्टः"** हा शब्द हर्ष, उत्साह, विस्मय व हास्य या चतुर्विध सुखराशींचे उपलक्षण आहे. **"किं करोमीति वा मृशन्"** म्हणजे किंकर्तव्यतामूढ होय. ही पदे विस्मृती, मोह इत्यादि भावांची उपलक्षणे आहेत. या भावांच्या आवेशातही जी भूमिका असते तेथेही प्रतिष्ठितस्पंदाची उपलब्धी होते. अशा प्रकारे जाग्रदवस्थेतील अंतःकरण

व्यापाराला आश्रयभूत होणारा सामान्यस्पंद कसा उपलब्ध होतो हे सांगितले.[१] बुद्धींद्रिय व्यापारातही सामान्यस्पंद आश्रयभूत कसा असतो हे पुढे कारिका क्रमांक ३६ मध्ये सांगण्यात येईल. जाग्रदवस्थेतील कर्मेंद्रिय व्यापारातही सामान्यस्पंदच आश्रयभूत कसा असतो हे **"धावन् वा यत् पदं गच्छेत्"** या पदांनी दाखविले आहे. धावण्याचे उदाहरण घेण्याचे कारण एवढेच की, लौकिक व्यवहारात या व्यापारात इच्छा, प्रयत्न, ज्ञान व क्रिया असा क्रम असूनही या सर्वांचे ऐकात्म्य अक्रमतेने जाणवते. पाय उचलण्याची इच्छा, तदनुरूप प्रयत्न, पुढील जागेचे ज्ञान व पाऊल पुढे टाकण्याची क्रिया असे यात क्रमाने येणारे चार वृत्तिविशेष आहेत. पण धावण्याच्या वेळी सामान्य माणसाला सुद्धा हा क्रम जाणवत नाही. धावताना धावणाऱ्याची संवित् या क्रमावर स्थित न होता त्यांच्या अविभागावरच स्थित होते. कर्मेंद्रिय व्यापारातील ही अक्रमता दाखविण्याकरिताच धावण्याचे उदाहरण घेतले आहे. जेथे जेथे म्हणून पदविन्यास, क्रमाने येत असताही अक्रमाने, अविभागाने व एकात्मतेने प्रतीत होतो तेथे तेथे ती व्यक्ती परवश झाल्यासारखी स्वस्वभावातच प्रतिष्ठित झालेली असते व त्या आवेशातच तिची पदे पडत असतात. तसेच अत्यंत चतुर वर्णस्वरोच्चाराने युक्त असलेली वाग्वृत्ती प्रकट होत असताना किंवा वीणा किंवा वेणू वादनाच्या वेळी जेव्हा स्वाभाविकपणे करांगुलीचा निर्वेध व्यापार चाललेला असताना या स्वस्वभावस्फुरणरूप प्रतिष्ठित स्पंदाचीच उपलब्धी होत असते.[२]

तत्त्वतः विचार करताना मानवाची एकही अशी इंद्रियवृत्ती नाही की जी सामान्यस्पंदाच्या आश्रयावाचून प्रतीत होईल. तरीही लौकिक संसारी अवस्थेत या सर्वच वृत्ती भेदभावाने व नानात्वाने अनुभवास येतात व त्यामुळे प्रतिष्ठितस्पंद व्यवहित झाल्यासारखा होतो. कदाचित् तो प्रबुद्धालाही अनेक प्रसंगी जाणवणार नाही म्हणून ज्यामध्ये प्रतिष्ठित स्पंदाची प्रबुद्धाला तात्काळ ओळख पटेल अशा काही अवस्था येथे संगृहीत केल्या आहेत.

या अवस्थांच्या बाबतीत एक गोष्ट मात्र लक्षात ठेवणे आवश्यक आहे. लौकिक संसारी अवस्थेत या गोष्टी जेव्हा अनुभवाला येतात तेव्हा त्या सुख-दुःखरूपच असतात. पण प्रबुद्ध जेव्हा त्यांचा प्रत्यवमर्श करतो म्हणजे व्यापक अहंप्रत्ययाच्या भूमिकेवरून या अनुभवांकडे विषयदृष्टीने पाहतो व विचार करतो तेव्हाच त्याला प्रतिष्ठितस्पंद जाणवतो. लौकिक संसारी अवस्थेतून तो निष्क्रांत झाला तरच प्रबुद्धाच्या ठिकाणी

स्वस्वभावस्फुरणरूप सामान्यस्पंदाचे विवेचन करण्याचेही सामर्थ्य येते.[३] ।।२२।।

**टीपा :-** १) सामान्यस्पंदाच्या उपलब्धीकरिता ज्या आठ गोष्टी येथे घेतल्या त्यांचा अष्टरसांशी स्थायिभावरूप संबंध आहे व मोहात्मक दशेत व्यभिचारीभाव अभिप्रेत आहेत हे स्पष्ट दिसते. शृंगारादिरस एकाच महारसाचे विभावादिपरत्वे विशेष आहेत असे श्रीअभिनवगुप्तांचे विशेष मत आहे. त्याची या विवेचनाशी तुलना करावी.

२) येथे नृत्य, काव्य (वाग्वृत्ती) आणि संगीत हे अभिप्रेत आहेत. या तीनही कला म्हणजे सामान्यस्पंदाचाच आविष्कार होय असा श्रीरामकंठांचा अभिप्राय आहे. याच्या विशेष विवेचनाकरिता श्रीअभिनवगुप्तांचा "**तंत्रालोक**" हा ग्रंथ पाहावा.

३) रसप्रतीती लौकिक पातळीवर येत नाही, ती अलौकिक पातळीवरच येते. लौकिक पातळीवरून रसविचारही करणाऱ्यांना रसास्वादहि सुखदुःखात्मकच वाटतो; पण अलौकिक पातळीवरून रसविचार करणारांच्या मते रसास्वाद हा आनंदमयच आहे.

❋❋❋❋❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## जागृत अवस्थेमध्ये साधकाला होणारी स्पंदतत्त्वाची अनुभूती

श्रीसद्गुरू हे सतत प्रयत्नशील असलेल्या प्रबुद्ध व्यक्तींना जागृत अवस्थेमध्येही अनेकदा निश्चित वेळी स्पंदशक्तीची अनुभूती करून देत असतात किंवा करवीत असतात. त्यानंतर त्या प्रबुद्ध व्यक्ती स्वतः पुनःपुन्हा त्या अनुभूती ग्रहण करण्याचा भगीरथ प्रयत्न करून अंततोगत्वा अर्थात् शेवटी त्या अनुभूतींमध्ये स्थैर्य प्राप्त करून घेत असतात. सूत्र क्रमांक २२ मध्ये जाग्रत् अवस्थेच्या याच निश्चित काळाचे किंवा संधीचे वर्णन केले जात आहे. यावेळी सावधान राहिल्यामुळे विवेकी साधकांना सहजपणे स्पंदतत्त्वाची प्राप्ती होत असते.

**वृत्ती :-** अत्यंत क्रोध आल्यावर, आनंद झाल्यावर, अचानक धावू लागल्यास आणि काही वेळा अकस्मात् मी काय करू? अशा प्रकारच्या चिंतेमध्ये पडल्यावर जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या अंतःकरणामध्ये शक्तिप्रत्यस्तमित

अर्थात् शक्तीच्या गतिरोधात्मक अवस्थेचा उदय होत असतो तेव्हा त्या क्षणिक अवधानकाळी स्पंदतत्त्वाचा उदय स्पष्टपणे होत असतो. या स्पंदतत्त्वाची अनुभूती साधकाने श्रीगुरूपदेशाच्या साहाय्याने प्राप्त करून घ्यावी.।।२२।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्रामध्ये अंतर्निहित असलेल्या ध्वनीला योग्य प्रकारे हृदयंगम अर्थात् आत्मसात् करण्यासाठी सूत्राच्या वृत्तीत आलेल्या "शक्तिप्रत्यस्तमितदशा" या शब्दाचे तात्पर्य नीट समजून घेणे हे अत्यावश्यक आहे. जीवभावाशी संबंध ठेवणाऱ्या दिवसभरातील आदानप्रदानामध्ये किंवा देवाणघेवाणीमध्ये काही वेळी असे क्षण येत असतात की, त्या मनोभावाच्या रूपामध्ये बाहेरच्या बाजूला वाहणाऱ्या विशेष स्पंदाच्या प्रवाहामध्ये अचानक एखाद्या तर्कविहीन कारणामुळे क्षणभरासाठी गतिरोधाची अवस्था निर्माण होत असते. विशेष रूपांमध्ये प्रवाहमान शक्तीच्या या गतिनिरोधात्मक अवस्था "शक्तिप्रत्यस्तमितदशा," "वृत्तिक्षयदशा," "निस्तिमितबुद्धिदशा" इत्यादि शास्त्रीय शब्दांच्या द्वारा वर्णिलेली आहे. या संबंधामध्ये ही गोष्ट विशेष करून स्मरणात ठेवणे आवश्यक आहे की, "शक्तिप्रत्यस्तमित अर्थात् शक्तीच्या प्रत्ययाने किंवा अनुभूतीने येणारी स्तिमित अर्थात् स्तब्ध अवस्था मधील क्षणांमध्ये शक्तीची प्रवाहमानता ही कधीही थांबत नाही." परंतु काही वेळा असे होते की, या शक्तीची बहिर्मुख असणारी प्रवाहमानता अचानक दिशा बदलून केवळ क्षणभरासाठी अंतर्मुख होत असते आणि तितक्याच स्थूल बुद्धीच्या द्वारा अग्राह्य कालखंडामध्ये वीजेप्रमाणे अत्यंत तीव्र गतीने मौलिक सामान्यरूपतेबरोबर एकाकार होऊन पुन्हा विशेष रूपाने प्रवाहित होऊ लागते. सांगण्याचे तात्पर्य असे आहे की, शाक्त-स्फुरणा ही कोणत्याही रूपामध्ये थांबत नाही; कारण स्फुरणा किंवा स्पंदना ही एक अविराम अर्थात् न थांबणारी गतिशीलता आहे.

जागृत अवस्थेमध्ये सामान्यस्पंदतत्त्वाचा अनुभव हा अशाच शक्ति-प्रत्यस्तमित क्षणामध्ये होऊ शकतो; कारण या क्षणी विशेषस्पंदाचा क्षोभ हा पूर्णपणे शांत झालेला असतो. वस्तुस्थिती अशी आहे की, जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या मनामध्ये क्रोध, हर्ष, भय किंवा अन्य कोणताही मनोभाव आपल्या अनुकूल आलंबनासह अर्थात् आधारासह अकस्मात् अतिस्वनिक अर्थात् ध्वनीपेक्षा अधिक वेगाने निर्माण होत असतो तेव्हा त्या व्यक्तीच्या

मनावर याची एक विलक्षण प्रतिक्रिया होत असते. (**टीप:-** प्रत्येक मनोभावाचे आपले असे निश्चित आलंबन असते किंवा असा निश्चित आश्रय असतो. विविध प्रकारच्या आलंबनाच्या किंवा आश्रयाच्या अवलंबनाने साधकाच्या चित्तामध्ये विविध प्रकारचे मनोभाव निर्माण होत असतात. उदाहरणादाखल अकस्मात् प्राणघातक शत्रूला पाहून क्रोध, प्राणाहूनही प्रिय इष्टजनांना अनेक काळानंतर पाहिल्याने निर्माण होणारा हर्ष, आपल्या स्वामीची कठोर तसेच जबाबदारीने भरलेली आज्ञा ऐकून निर्माण होणारी किंकर्तव्यविमूढता अथवा जंगलाच्या चिडीचूप मार्गामध्ये चालताना अचानक समोर येणारा वाघ किंवा नाग यांना पाहून निर्माण होणारे भय हे विविध मनोभाव आहेत. अशा प्रकारे अन्य मनोभावांविषयी समजावे.) ती प्रतिक्रिया अशी की, जितक्या अलक्ष्य तीव्रतेने निर्माण होणारा भाव वर उफाळून येतो तितक्याच तीव्रगतीने त्या आधीचा मनोभाव बुडून जातो. या दोन्ही मनोभावाच्या अशा अप्रत्याशित अर्थात् अडथळा नसलेला शेवट आणि सुरुवात यांमधील संधिक्षणामध्ये सर्व विशेषरूप मानसिक वृत्तींची बहिर्मुखी गती स्तब्ध होऊन जाते. या दृष्टीने "**विज्ञानभैरव**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**क्षुताद्यन्ते भये शोके गह्वरे वा रणाद्रुते।**
**कुतूहले क्षुधाद्यन्ते ब्रह्मसत्तामयी दशा।।११५।।**

याचा अर्थ असा आहे की, शिंक आल्यावर किंवा भय, शोक आदि भाव उत्पन्न झाल्यावर, खड्ड्यात पडल्यावर, युद्धभूमीवरून पळून गेल्यावर, एखादी आश्चर्यकारक घटना घडल्यावर किंवा तहान-भूक इत्यादि तीव्र संवेगापासून निवृत्त झाल्यावर एक क्षणाकरिता ब्रह्मानंदा-सारख्या आनंदाचा अनुभव येतो.

हा क्षण एक प्रकारच्या निर्विकल्प क्षणाप्रमाणे असतो. या क्षणामध्ये वीजेच्या तीव्र लखलखाटाप्रमाणे अलक्षित रूपामध्ये ब्रह्मस्थितीमध्ये विगलित वेद्यांतरता अर्थात् ज्ञेय गळून गेलेल्या अशा आपल्या अवस्थेची झळक दाखवून पुन्हा शांत होऊन जाते. त्या स्थितीत सुख, दु:ख किंवा मूढता इत्यादि अंत:करणातील वृत्तीची नाममात्रही चेतना अवशिष्ट अर्थात् शिल्लक राहत नाही. प्रत्येक जीवाच्या मानसिक प्रक्रियेमध्ये प्रतिक्षण न जाणो कितीतरी असे शक्तिप्रत्यस्तमित दशेचे किंवा अवस्थेचे क्षण येत-जात राहतात; कारण प्रतिक्षण मनोभावाचे उन्मज्ञन अर्थात् उसळणे आणि

निमज्ञन अर्थात् शांत होणे यांची क्रिया ही अविराम अर्थात् विराम न पावता चालत राहते. त्यात कठीण गोष्ट अशी आहे की, या मनोभावाचे उन्मज्ञन-निमज्ञन इतके तीव्र असते की, कोणत्याही मनुष्याला या दोहोंमधील संधिक्षणाचा आभासही होऊ शकत नाही; मग मानवेतर प्राण्यांची गोष्टच सोडून द्या. याचे कारण असे आहे की, हे क्षण अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे स्थूल बुद्धीच्या द्वारा ग्राह्य नाहीत.

ज्या भाग्यशाली व्यक्तींवर परमेश्वराचा तीव्रतम शक्तिपात होतो त्या व्यक्तींना श्रीसद्गुरू हे लोकोत्तर प्रातिभ ज्ञानाच्या द्वारा या मधल्या अवकाशातील संधिक्षण आणि या क्षणांमध्ये प्रकाशमान राहणारे स्पंदतत्त्व या सर्वांची अनुभूती करवून देत असतात. त्यानंतर अभ्यासाच्या दृढतेमुळे अशा क्षणी त्या व्यक्ती आपल्या बहिर्मुखी शक्तीला कूर्मांगाच्या अर्थात् कासवाच्या पाठीच्या आतील अवयवांच्या संकोचाच्या युक्तीच्या द्वारा एकदम एकत्रित करून अंतर्मुख होत असतात. (**टीप :-** अर्थात् ज्याप्रमाणे कासव हे भयाची चाहूल लागताच क्षणभरातच आपल्या सर्व अवयवांना आपल्या पाठीवर असलेल्या कठीण कवचाखाली ओढून घेते त्याप्रमाणे साधक अंतर्मुख होतो.

या अर्थानेच "**प्रत्यभिज्ञाहृदयसूत्र**" या ग्रंथावरील टीकेत असे म्हटले आहे की -

**प्रसृताया अपि वा कूर्माङ्गसङ्कोचवत् त्राससमये**
**हृत्प्रवेशवच्च सर्वतो निवर्तनम्।।१८।।**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे कासवाची अंगे पसरलेली असूनही भयामुळे संकोच पावतात किंवा हृदयात प्रवेश केल्याप्रमाणे पूर्णपणे निवृत्त होतात (त्याप्रमाणे भाग्यशाली व्यक्ती आपल्या बहिर्मुखी शक्तीचा संकोच करतात.) त्याप्रमाणे तीव्रतम शक्तिपाताने अनुग्रहीत झालेल्या व्यक्ती हळूहळू या भावावर स्थिर राहण्याची क्षमताही प्राप्त करून घेत असतात.

सूत्र क्रमांक २२ मध्ये हर्ष, क्रोध आणि मूढता यामुळे क्रमशः सर्व सुखात्मक, दुःखात्मक आणि मोहात्मक अंतःकरणवृत्तींचे ग्रहण करून सर्व ज्ञानेंद्रियांच्या व्यापाररूप जाग्रत् अवस्थेमध्ये आणि धावण्याच्या क्रियेच्या द्वारा बहिरंग कर्मेंद्रिय वृत्तींचे ग्रहण करून कर्मेंद्रियांच्या व्यापाररूप जाग्रत् अवस्थेमध्ये समान रूपाने स्पंदतत्त्वाच्या प्राप्तीकडे संकेत केलेला आहे.।।२२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

ज्याप्रमाणे या उद्युक्त झालेल्या साधकाच्या दृढ विश्वासामुळे उदित झालेल्या अनायासच अन्य सर्व वृत्तींच्या क्षयाने युक्त अशा ज्या नियत अवस्थांमध्ये स्पंदांचा समूह उन्मुद्रित अर्थात् विकसित होऊन आणि अभिमुख अर्थात् समोर येऊन बसतो त्या या अवस्था प्रथम उद्योगाच्या विषय आहेत असा उपदेश करण्यासाठी वरील कारिका सांगितली आहे.

**स्पष्टीकरण :-** सर्वच उपायांच्या मार्गामध्ये योगी इतर सर्व वृत्तींना शांत करूनच एकाग्रता प्राप्त करू शकतात. जर या अतिक्रोधादि अवस्थांमध्ये, स्वतःच सर्व अपर (इतर) वृत्तींचा क्षय होत असताना स्पंदतत्त्वाच्या विमर्शनासाठी सतत प्रयत्न करणारे योगी तत्काळ अंतर्मुख होतात अर्थात् त्यांना इच्छित असलेली गोष्ट ते तत्काळ प्राप्त करतात. जे योगी नाहीत ते येथे मूर्खच ठरतात.

अतिक्रुद्ध म्हणजे ज्याने नुकताच एखाद्यावर दारूण आघात केलेला आहे अशा शत्रूच्या दर्शनाने किंवा त्याच्या मर्मस्पर्शी वचने ऐकण्याने प्रथमच उन्मेषित झालेल्या विचाराने शत्रूचा नाश करण्याच्या इच्छारूप अशा दिव्यशक्तीमुळे किरणांचे चक्र अंतर्मुख झालेले आहे असा मनुष्य होय. चिरकाळापासून जिची इच्छा केलेली आहे अशा प्रियेच्या मुख-कमलाच्या दर्शनामुळे त्याचक्षणी अभिलाषरूप देवता शक्तींच्या प्रभावाने उत्पन्न झालेली ज्याची सर्व इंद्रियचक्रे पूर्ण रूपाने विकसित झालेली आहेत असा मनुष्य म्हणजे प्रहृष्ट होय. "किं करोमीति मृशन्" (काय करावे? याचा विचार करणारा) असा मनुष्य हे निर्देशित करतो की, तो अमानुष आणि शक्तिमान् अशा बळाने घेरल्याने भीतियुक्त होऊन पळणारा, अनिश्चिततेच्या दोलायमान अवस्थेत लोंबकळत असणाऱ्या स्थितीला आलेला आणि आश्रयाची सर्व साधने संपुष्टात आल्यामुळे ज्याची सर्व इंद्रिये संशय संवित् खाली अचल स्थितीला आलेली आहेत असा असतो. "धावन्" म्हणजे मदोन्मत्त हत्ती आदि समोर आलेला आणि जो शरीरनिरपेक्ष असल्याने इतर सर्व प्रवृत्तींना आत्म्याकडे लावून देत देवीने प्रेरणा दिल्याने अत्यंत त्वरित पलायनक्रियेत प्रविष्ट झालेला मनुष्य होय.

अशा प्रकारे सिंह, अजगर इत्यादि पाहिल्यामुळे अशाच तऱ्हेच्या उत्पन्न झालेल्या मोठ्या कष्टदायक अवस्थांमध्ये जे वृत्तिक्षयात्मक पद

आहे त्याठिकाणी योगिजन त्याच्या वृत्तिक्षयात्मक अवस्थाविशेषामध्ये स्पंदतत्त्वासमोर किंवा स्पंदतत्त्वाभिमुख होऊन स्थिर होतात.

त्यामुळे या वृत्तिक्षयपदाला जाणून घेऊन तत्काळ त्यात स्थित होऊन कासव ज्याप्रमाणे आपली अंगे संकोचून घेतो त्याप्रमाणे सर्व वृत्तींचा संकोच करून क्रोध व संशयवृत्तींचे प्रशमन करून महाविकासाच्या व्याप्तीने युक्त होऊन प्रहर्ष व धावनवृत्तींचे विस्फारण करून (प्रसरण करून) व अभिमुख होऊन निजस्पंदशक्तीच्या ज्ञानाने योग्याने युक्त व्हावे. यासंबंधी "**विज्ञानभैरव**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**कामक्रोधलोभमोहमदमात्सर्यगोचरे।**
**बुद्धिं निस्तिमितां कृत्वा तत्तत्त्वमवशिष्यते।।१०१।।**
**आनन्दं महति प्राप्ते दृष्टे वा बान्धवे चिरात्।**
**आनन्दमुद्गतं ध्यात्वा तल्लयस्तन्मना भवेत्।।७१।।**
**क्षुताद्यन्ते भये शोके गहरे वा रणाद्रुते।**
**कुतूहले क्षुधाद्यन्ते ब्रह्मसत्ता समीपगा।।११८।।**

**अर्थ :-** काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांच्यामध्ये ज्यावेळेस योगी बुद्धी ठेवतो त्यावेळेस तेच तत्त्व शिल्लक राहते. खूप आनंद प्राप्त झाला असता किंवा आपले बांधव खूप काळाने पाहिल्यानंतर होणाऱ्या आनंदाचे ध्यान करून त्याच्यामध्ये मन लीन करून आनंदमय व्हावे. शिंकेच्या शेवटी, भीतीमध्ये, गहन शोकामध्ये, युद्धातून पळ काढण्यात, कुतूहलामध्ये व भुकेच्या शेवटी ही ब्रह्मसत्ता मनुष्याच्या समीप जाणारी आहे.।।२२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

पूर्वोक्त श्लोकात प्रबुद्ध हाच जागरित आणि तुर्य यांच्या उपदेशाचा अधिकारी आहे असे स्थापित करून या कारिकेत शरीरधारी लोकांना साधारण जाग्रदावस्थेत आंतरलीन असलेले परतत्त्व उपदेशिण्याच्या इच्छेने असे सांगतात की, "**अतिक्रुद्धः प्रहृष्टो वा .....।।२२।।**" या शास्त्रात स्पंदतत्त्वाचे सामान्य आणि विशेष असे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यापैकी सामान्यस्पंदतत्त्व हे प्रतिष्ठित झालेले आहे. तर विशेषस्पंदतत्त्व हे अप्रतिष्ठित आहे. साधकांनी प्रतिष्ठित स्पंदतत्त्वाची प्राप्ती करून घ्यावी.

स्वभावाचा आश्रय घेतलेला सामान्य स्पंद मुख्य किंवा प्रधान असतो. याच मुख्य स्पंदतत्त्वात सर्वप्रकारच्या विशेष शक्ती समूहांनी युक्त असा परमात्मधर्म राहतो. अतिक्रुद्ध, अतिप्रसन्न असा माणूस किंकर्तव्यमूढ व मी सुखी, मी दुःखी इत्यादि अनुभव घेणारा होतो. याचे जे ज्ञानभेद असतात त्यांची स्थिती ही सामान्य-स्पंदतत्त्वाच्या शक्तीमुळेच असते. जेथे जेथे पावले जातील तेथे तेथे स्पंदतत्त्वाचीच प्रतिष्ठा असते. ज्यांचे विशेषस्पंदतत्त्व वृत्त्यात्मक असतात त्यांच्यामध्ये भगवान् श्रीपरमशिवांचा सामान्यस्पंद प्रतिष्ठित असतो; अशा प्रकारचा हा उपदेश आहे. त्यामुळे सर्व ठिकाणी पारमेश्वर तत्त्वच असते असे अनुसंधान करावे.।।२२।।

* * * * *

**यामवस्थां समालम्ब्य यदयं मम वक्ष्यति।**
**तदवश्यं करिष्येऽहमिति सङ्कल्प्य तिष्ठति।।२३।।**
**तामाश्रित्योर्ध्वमार्गेण सोमसूर्यावुभावपि।**
**सौषुम्नेऽध्वन्यस्तमितो हित्वा ब्रह्माण्डगोचरम्।।२४।।**
**तदा तस्मिन्महाव्योम्नि प्रलीनशशिभास्करे।**
**सौषुप्तपदवन्मूढः प्रबुद्धः स्यादनावृतः।।२५।।**

**अन्वयार्थ :-**

**याम्** - ज्या स्पंदस्वरूप शक्तीला, **समालम्ब्य** - दृढ धरून, शक्तीचा आश्रय करून, **अयं** - हा स्पंद, ही स्पंदशक्ती, **यत्** - जे जे, **माम्** - मला, **वक्ष्यति** - सांगेल, **तत्** - ते ते, **अहम्** - मी, **अवश्यम्** - निश्चयाने, **करिष्ये** - करीन, **इति** - अशा प्रकारे, **सङ्कल्प्य** - संकल्प, निश्चय करून, **तिष्ठति** - "स्पंदत्तत्वाच्या अधिष्ठानावर" (श्रीभट्टकल्लट) जो योगी राहतो.)।।२३।।

**अन्वयार्थ :-**

**ताम् - आश्रित्य** - (तो योगी) त्या अवस्थेचा आश्रय घेऊन, **उभौ सोमसूर्यौ अपि** - त्या दोघा चंद्रसूर्यांना (चंद्र नाडी व सूर्य नाडी, प्राण व अपान यांना), **ब्रह्माण्डगोचरम्** - शरीर मार्ग, **हित्वा :-** सोडून, **ऊर्ध्वमार्गेण :-** उर्ध्व मार्गाने, **सौषुम्ने अध्वनि-** सुषुम्णा नामक मध्य नाडीच्या मार्गाने, **अस्तं इतः** - लय पावतात.।।२४।।

**अन्वयार्थ :-**

**तदा** - त्यावेळी, **प्रलीनशशिभास्करे** - ज्यामध्ये प्राण व अपान विलिन झाले आहेत, **तस्मिन् महाव्योम्नि** - त्या महदाकाशात, **प्रबुद्धः** - प्रबुद्ध असा योगी, **अनावृतः स्यात्** - अनावृत, ज्याच्या चिन्मात्ररूप अनुभूतीवर आवरण नाही असा, **स्यात्** - असेल - असतो, (पण), **मूढः** - जो मूढ, अप्रबुद्ध आहे तो, **सौषुप्तपदवत्**- सुषुप्तीसारख्या गाढ अंधाऱ्या अवस्थेत (निरुद्ध होऊन पडून राहतो.)।।२५।।

**सूत्र क्रमांक २३ अर्थ :-**

स्पंदस्वरूप शक्तीला दृढ धरून अर्थात् शक्तीचा आश्रय घेऊन, "हा स्पंद किंवा ही स्पंदशक्ती मला जे काही सांगेल ते सर्व मी निश्चयाने करीन," असा संकल्प करून किंवा निश्चय करून स्पंदतत्त्वाच्या अधिष्ठानावर जो योगी राहतो किंवा श्रीभट्टकल्लटानुसार साधनेच्या क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रबुद्ध भूमिकेवर स्थित असलेला साधक "ही स्पंदात्मिका शक्ती मला ज्या प्रकारच्या स्वरूपविमर्शाची किंवा स्वरूपाच्या ज्ञानाची अनुभूती करवील, त्या प्रकारच्या ज्ञानावर मी आरूढ होऊन राहीन," अशा प्रकारे संकल्पबद्ध होऊन मानसिक अवस्थेचा किंवा वृत्तिप्रत्यस्तमित अवस्थेचा आश्रय घेऊन स्थित राहतो.।।२३।।

**सूत्र क्रमांक २४ अर्थ :-**

त्या योग्याच्या त्या अवस्थेचा आश्रय घेऊन त्या योग्याचे चंद्रमा आणि सूर्य (मन-प्राण अथवा प्राण-अपान) हे शरीराची व्याप्ती सोडून ऊर्ध्व मार्गाने सुषुम्णाधामामध्ये किंवा मध्यमार्गामध्ये पोहोचून त्यामध्येच लय पावतात.।।२४।।

**सूत्र क्रमांक २५ अर्थ :-**

जेथे पोहोचल्यावर चंद्र आणि सूर्य हे दोन्ही लीन होतात त्या महान् आकाशामध्ये अर्थात् तुर्यारूप शाक्तभूमिकेच्या अनंत आकाशामध्ये प्रबुद्ध योग्याच्या चिन्मात्ररूप अनुभूतीवर कोणतेही आवरण राहिलेले नसते. याउलट मूढ अर्थात् सम्यक् अनुभूतीने हीन योगी त्या अवस्थेमध्येही सुषुप्तिपदासारख्या प्रगाढ अंधकाराच्या अवस्थेमध्ये पडलेला असतो. ।।२५।।

❋❋❋❋❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :- (कारिका क्रमांक २३ ते २५)**

जागृत अवस्थेमध्ये तुरीय अवस्था म्हणजे निर्विकार ब्रह्मावस्था कशी अनुभवास येते याचे वर्णन सात व आठ श्लोकात केले आहे. "राजा जे सांगेल ते केले तर ठीक, नाही तर ठार मारावयाची वेळ आली आहे," हे ऐकताक्षणीच त्या पुरुषाचे चंद्र व सूर्य म्हणजे मन आणि प्राण अकस्मात लय पावतात. त्यावेळी जीव ब्रह्माची एकता होऊन तो ब्रह्मस्थितिप्रत पोहोचतो.

अलौकिक मार्गाने म्हणजे सुषुम्णामार्गाने प्राण व मन लय पावतात. मनाच्या ज्ञानशक्तीचा प्रभाव ग्रहण व त्याग करण्याची वृत्ती नष्ट होऊन मध्यमेची-सुषुम्णेची-आत्मस्थितीची वृत्ती उदित होऊन त्या ठिकाणी चंद्रमा म्हणजे मन लय पावते. त्याचप्रमाणे सूर्याची म्हणजे प्राणाची नाना नाड्यांतून संचार करण्याची वृत्ती नाहीशी होऊन ती सुद्धा परब्रह्माच्या ठिकाणी लीन होते. योग्याचे मन आणि प्राण सुषुम्णानाडीत प्रविष्ट झाले म्हणजे स्वतःच्या व्यापारापासून ते पराङ्मुख होतात. अशा स्थितीत त्या योगी पुरुषाला समाधी व तुरीय अवस्थेचा अनुभव येतो. त्याचप्रमाणे राजा काय वचन सांगणार आहे ते ऐकण्याची तीव्रता निर्माण होऊन माणूस इतका एकाग्र होऊन जातो की, बाकीच्या सर्व वृत्ती नष्ट होऊन ज्ञानदशा किंवा तुरीयावस्थेला तो एकदम पोहोचतो. या स्थितीचा अभ्यास केला असताना परतत्त्वाची प्राप्ती होते. अशा प्रकारे तुरीय दशेचा अभ्यास प्रबुद्धाने केल्यास बाह्य स्थिती विसरून जाऊन परमपदाची स्थिती त्याला प्राप्त होते.

प्रबुद्धाला ईश्वर शक्तिपाताच्या प्रभावाने इतर लोकांहून निराळ्याच प्रकारची जागृती झालेली असते व त्याची ज्ञानदृष्टी चांगलीच उघडलेली असते. त्यामुळे अशा प्रकारच्या दशेचा अनुभव घेतला असता साधकाला तद्रूप दशेचा अनुभव येत असतो. आपण देहाहून वेगळे आहोत असा पराहंतेचा अनुभव त्याला येऊन चैतन्यरूप आत्मा व श्रीशंकर यांच्या समाधीचे भान त्याला होते. शास्त्रामध्ये सांगितलेल्या क्रियासाधनरूपी मंत्रांचे कार्य तो प्रकट करू शकतो. अप्रबुद्धाला ही अवस्था प्राप्त झाली तरी सुद्धा गाढ झोपेमध्ये जसे आत्मस्वरूपाचे अज्ञान असते तसे त्याला या स्वरूपाचे अज्ञान असते.

"हे माझे गुरुदेव आहेत! ते ज्ञात्यांचे शिरोमणी आहेत!! ते अनिर्वचसद्वस्तूचेही निर्वचन म्हणजे समजावून सांगून दान करू शकतात. त्यांच्या आज्ञेचे कोणीही उल्लंघन करू शकत नाही. ते जे काही मला सांगतील त्याचे मी अवश्य पालन करीन," असा दृढ संकल्प धारण करून साधक जेव्हा उन्मुखतारूप वृत्तीचे आलंबन घेऊन स्थिर होतो तेव्हा त्याची त्या अवस्थेमध्ये ऊर्ध्वमार्गाने विषुववत् (दिवस व रात्र सारखे येतात तो काल) प्रवाहाच्याद्वारे चंद्र-सूर्य, अपान-प्राण व मन-प्राण पर शक्तीच्या मध्यम नाडी मार्गात म्हणजे सुषुम्णा मार्गात विलीन होऊन जातात. त्यावेळी श्रीगुरुदेव काय आज्ञा देतील? हे कुतूहल वासनांना चिरडून टाकते. त्यावेळी साधक ब्रह्मांडात असलेल्या शरीर विषयाचा त्याग करून देहभावापासून मुक्त होतो. शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "देहातील अहं प्रत्ययाचे बेट भग्न झाले. अनंत संवित्‌रूप निर्मल समुद्राशी एकता झाली. इंद्रियसमूह अंतर्मुख झाला. आता खरोखर, तू एक अद्वितीय विश्वात्माच झालास!!" अशा अवस्थेत महाव्योम अर्थात् परचिदाकाशात सूर्य व चंद्र आणि ज्ञान व क्रिया या दोन्ही गोष्टी शांत किंवा स्तब्ध होतात. स्वभावात अभिव्यक्ती होत नाही. स्वप्न, जागृती इत्यादि दृश्यांमुळे मोह होत नाही. साधक प्रबुद्ध व अनिरुद्ध होतो. असे म्हणा की, ती झोपच आहे. परंतु त्यावेळी तो प्रबुद्ध आवरणरहित झालेला असतो.

**"रहस्यस्तोत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "ज्यांनी आपल्या आत्मसंवितात सूर्य-चंद्राला अर्थात् ज्ञान-क्रियेला विलीन केले आहे, जे व्योममार्गाचे उल्लघंन करून पलीकडे गेले आहेत व ज्यांनी आपल्या दृष्टीत भावनेचे अंजन घातले आहे अशा मोठमोठ्या आकाशगमन करणाऱ्या सिद्ध पुरुषातील काही काही जणांनाच आपल्या स्वरूपाचे दर्शन होते." **"निरंजन तत्त्वोदय"** या ग्रंथात "प्राणापानाची प्रशांती हीच आत्मदर्शनाची युक्ती आहे," असे म्हटले आहे. **"भोग-मोक्ष-प्रदीपिका"** या ग्रंथात सुद्धा असे म्हटले आहे की, "हृदयात सोम(चंद्र)सूर्याचा संचार झाला की, कामसिद्धी होते व त्यांची शांती झाली की निरंजन तत्त्वाचा उदय होतो. हेच शास्त्राचे सर्वस्व आहे. याच अवस्थेत सहज मंत्राचा उदय होतो." **"बौद्धायनसंहितेचे"** असे वचन आहे की, "ज्यावेळी चंद्र शांत होतो व सूर्याचा उदय होत नाही, त्यावेळी सर्व देवतांचा म्हणजे इंद्रियांचा विलय

होऊन सर्व मंत्रांचा उदय होतो. **"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथातही हेच मत मांडले आहे. ज्या अवस्थेत जीव इतर सर्व आधारांपासून मुक्त होऊन स्वस्वरूपात लीन होतो ती अवस्थाच संपूर्ण मंत्रांच्या उत्पत्तीचे क्षेत्र म्हणजे स्थान आहे. आणखीही शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "जेव्हा धर्माधर्माच्या संधिस्थलामध्ये पुरुषाचे चित्त निरुद्ध होते तेव्हा तो जे बोलतो तोच मंत्र होतो. स्वरवर्णमातृकांपासून तयार केलेले मंत्र हे मंत्र होत नाहीत.।।२३-२४-२५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :- (कारिका क्रमांक २३ ते २५)**

जाग्रदवस्थेतच तुर्यावस्थागत स्वभावाचीही अनेकदा उपलब्धी होते हे वरील तीन कारिकांनी दाखविले आहे.

**स्पष्टीकरण :-** जागरावस्थेतही तुर्य स्थितीचे काही क्षण असतात. त्यांच्या साहाय्याने येथे प्रबुद्धाला होणाऱ्या तुर्यावस्थेतील स्वभावदर्शनाची कल्पना दिली आहे. येथे योगाची परिभाषा वापरली आहे. तुर्यावस्था म्हणजे चवथी अवस्था. जागृती, स्वप्न व सुषुप्ती या अवस्था आपल्या परिचयाच्या आहेत. जागरावस्थेत देहात्मप्रत्यय प्रधान असतो. या अवस्थेत आपली ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती या दोघांचाही व्यापार चालत असतो. स्वप्नदशेत क्रियात्मक शक्ती लीन झालेली असते. पण मनःप्रसररूप ज्ञानशक्तीचा व्यापार चालू असतो. सुषुप्तिदशेत क्रिया व ज्ञान या दोन्ही शक्ती लीन झालेल्या असतात. मात्र ती दशा मोहात्मक असल्याने तेथे अहंप्रत्यय जाणवत नाही. पण एक अवस्था अशी असते की, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती या दोहोंचाही लय झाला तरी तीत अहंप्रत्यय प्रकाशत असतोच. ही तुर्यावस्था होय.

जागरावस्थेतही या तुर्येचे क्षण केव्हा केव्हा येतात पण ते आपल्याला ओळखता येत नाहीत. उदाहरणार्थ - सेवकाला राजा आज्ञापित आहे. ती आज्ञा कानावर पडताक्षणीच त्याला तिचे पालन तत्काळ करावयाचे आहे. अशा अवस्थेत सेवकाचे सर्व अवधान राजा काय सांगतो यावरच केवळ केंद्रित होईल. त्याच्या इतर सर्व वृत्ती जवळपास अस्तमित होतील. अशा अवस्थेत त्याला देहाचे भान राहणार नाही किंवा त्याचे मनही वृत्त्यंतराने व्यापृत होणार नाही. अशा प्रकारे त्याचा क्रियात्मक व्यापार व

ज्ञानात्मक व्यापार ही दोन्ही लीन होतील. पण ही सुषुप्त अवस्था खास नव्हे; कारण येथे मोहाचे आवरण नाही; उलट अहंवृत्तीचे स्फुरण आहे. याक्षणी सेवकाचा तुर्यदशेत प्रवेश झाला असे म्हणता येते. या अवस्थेच्या प्रत्यवमर्शाच्या अभ्यासाने स्वस्वभावाची उपलब्धी होते असे कारिकाकार सांगतात.

प्रबुद्ध जेव्हा या अवस्थेचा आश्रय करतो त्यावेळी कशी स्थिती होते हे कारिकाकारांनी सांगितले आहे. चंद्र=मन, सूर्य=प्राण व ब्रह्मांड=शरीर. "चंद्र व सूर्य हे दोन्ही ब्रह्मांडगोचर सोडून ऊर्ध्व मार्गाने सौषुम्णमार्गात अस्त पावतात," असे कारिका म्हणते. याचा अर्थ असा:- मनोवृत्तिरूप ज्ञानशक्ती व प्राणवृत्तिरूप क्रियाशक्ती, ज्या संसारदशेत शरीराच्या आश्रयाने प्रसार पावतात, त्या आता शरीराचा आश्रय सोडून अलौकिक अशा ऊर्ध्वमार्गाने सुषुम्णामार्गात लीन होतात. सुषुम्णा ही शरीरमध्यगत नाडी असून शक्तिप्रसाराचा तोच मुख्य मार्ग आहे. शक्तीचा ज्ञानक्रियारूप प्रवाह व्यवहारदशेत अधोमुख असून त्याचे बहि:प्रसरण असते. पण या अवस्थेत देहभान नाहीसे झाल्याने तो प्रवाह ऊर्ध्वगामी होतो आणि ज्ञान व क्रिया या शक्ती सुषुम्णामार्गात लीन होतात.

या सुषुम्णामार्गालाच परमाकाश असे म्हटले आहे. या परमाकाशातच ज्ञानशक्तिरूप चंद्र व क्रियाशक्तिरूप सूर्य लीन झालेले असतात. या अवस्थेत मूढाचा म्हणजे अप्रबुद्धाचा प्रवेश झाला तर त्याची स्थिती तेथे सुषुप्तीप्रमाणे मोहात्मकच असते; पण प्रबुद्धाचा या दशेत प्रवेश झाला तर त्याचा देहात्मभाव नाहीसा झाल्याने त्याच्या अहंप्रत्ययावरील आवरण नाहीसे होते व देहव्यतिरिक्त व्यापक अहंप्रत्ययाचा किंवा स्वस्वभावाचा त्याला साक्षात्कार घडतो.।।२३-२४-२५।।

*****

**श्रीभट्टकल्लटवृत्ती :-**

## चित्ताची एकाग्रता सोम (चंद्र)-सूर्य

आत्तापर्यंतच्या प्रकरणामध्ये वर्णन केलेल्या अनुभूतीची प्राप्ती करून घेण्यासाठी शिष्यावर श्रीसद्गुरूंची छत्रछाया किंवा कृपाछत्र असणे अनिवार्य आहे. परंतु ज्यावेळी एखादा साधक हा स्पंदात्मक शाक्तभूमिकेमध्ये किंवा तुर्यावस्थेमध्ये खरा प्रवेश प्राप्त करून घेतो त्यावेळेपासून त्या साधकाचा

श्रीसद्गुरूंशी असलेला संबंध तुटून जातो. यामागील कारण असे आहे की, तुर्याधामामध्ये प्रवेश होण्याच्या वेळी विकल्पांचे इतके संस्कार झालेले असतात अर्थात् विकल्प इतके नाहीस झालेले असतात की, त्यावेळी श्रीगुरुभाव आणि शिष्यभाव याचे विकल्प समाप्त होतात. यामुळे येथून पुढील क्षेत्र पार करण्यासाठी साधकाची त्याची स्वतःची उद्बुद्ध किंवा जागृत शक्ती ही पथप्रदर्शक बनत असते.

सूत्र क्रमांक २३, २४ व २५ मध्ये अशाच शाक्तभूमिकेमध्ये प्रविष्ट होण्यास अभिमुख असलेल्या योग्याची मानसिक संकल्पबद्धता यौगिक प्रक्रिया आणि त्याचे सुषुम्णाधामामध्ये होणारे अंतिम लयीभवन याचे वर्णन केलेले आहे. (या सूत्रामधील पहिले सूत्र हे दृष्टान्त आणि दार्ष्टान्तिक या दोन्ही रूपांमध्ये प्रस्तुत केलेले आहे.)

**वृत्ती :-** तुर्यारूप शाक्तभूमिकेमध्ये प्रविष्ट होण्याच्या अभिमुखी-भावाच्या अर्थात् समोर जाण्याच्या वेळी जो योगी "ही माझी स्वभावभूत असलेली स्पंदशक्ती मला जे काही सांगेल अर्थात् यामध्ये प्रविष्ट होण्यासाठी जसे मार्गदर्शन करील, तसे मी निश्चितपणे त्या मार्गाचेच अनुसरण करीन," अशा प्रकारचा अटळ संकल्प मनामध्ये धारण करून स्पंदतत्त्वाचे स्वरूप बनलेल्या अवस्थेचा आश्रय घेत असतो तो योगी हा स्पंदतत्त्वावर अधिष्ठित होऊन राहत असतो.।।२३-२४-२५।।

त्या योग्याच्या त्याच अवस्थेच्या आधाराने त्या योग्याचे चंद्र आणि सूर्य हे दोन्ही शरीरव्याप्तीला सोडून अर्थात् पांचभौतिक कायेमध्ये अर्थात् शरीरामध्ये आपल्या बहिर्मुख प्रसाराला सोडून मध्यनाडी नावाच्या सुषुम्णामार्गामध्ये लय पावत असतात. ज्या महान् आकाशामध्ये अर्थात् विशुद्ध अर्थात् शुद्धतम चिन्मात्ररूप तुर्याभूमिकेच्या असीम अर्थात् अमर्यादित आकाशामध्ये चंद्र आणि सूर्य या दोघांचेही अस्तमन अर्थात् नाहीसे होणे होत असते तेथे पूर्णरूपाने स्वभावाची अभिव्यक्ती न झालेला योगी साधारण स्वप्न इत्यादि (लौकिक स्वप्न आणि सुषुप्ती) यांच्या द्वारा मूढभाव अर्थात् तामसिक मोहामध्ये पडल्यामुळे अप्रबुद्ध बनून निरुद्ध अवस्थेत पडून राहत असतो. याउलट प्रबुद्ध योग्याची आत्मचेतना ही निरावृत अर्थात् आवरणरहित रूपामध्ये प्रकाशमान राहत असते.।।२३ ते २५।। (**निरुद्ध अवस्था :-** चित्ताच्या या अवस्थे-मध्ये योगी आपल्या मौलिक चितिरूपतेचा साक्षात्कार करण्याच्या क्षणी मूढतेमध्ये अर्थात् मोहजनित स्तब्धतेमध्ये पडत असतो.)

**विवरण :-** प्रस्तुत सूत्र क्रमांक २३ मध्ये विशेष स्पंद असे म्हटले जाणाऱ्या बहिर्मुख चित्तवृत्तींच्या निरोधात्मक प्रक्रियेचे वर्णन केलेले आहे. बहिर्मुख झालेल्या चित्तवृत्तींना अलंग्रासयुक्तीच्या अर्थात् गिळण्याच्या किंवा संहाराच्या द्वारा दिशा बदलून अंतर्मुख बनविणे याला "चित्तनिरोध" असे म्हणतात. चित्तनिरोध हाच शाक्तउपायाचा आधारस्तंभ आहे. या विषयामध्ये आधीही पर्याप्त उल्लेख आलेला आहे. त्यामुळे या गोष्टी पुन्हा सांगण्याची आवश्यकता नाही. येथे केवळ एकच गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, या सूत्रामध्ये आपली अन्य सर्व कर्तव्ये विसरून प्राणपणाने आपले हितैषी असलेल्या श्रीस्वामींची आज्ञा पूर्ण करण्यास उत्सुक असलेल्या एका कर्मचाऱ्याची क्षणपर्यवसायिनी अर्थात् क्षणामध्ये परिणत होणाऱ्या वृत्तिप्रत्यस्तमितदशेच्या अर्थात् वृत्तीच्या गतिरोधात्मकतेच्या दृष्टान्ताच्या पृष्ठभूमीवर या गोष्टीचा स्पष्ट संकेत केलेला आहे की, स्पंदमयी शाक्तभूमिकेमध्ये प्रवेश मिळविण्यास उत्सुक असलेल्या योग्याने प्रथम आपल्यामध्ये प्रखर मानसिक नियंत्रणाची क्षमता किंवा सामर्थ्य प्राप्त करणे नितांत आवश्यक आहे. हे लक्ष्य प्राप्त करून घेण्यासाठी संकल्पाची दृढता, सद्विचार, अढळ श्रद्धा आणि आत्मशक्तीची तीव्रता हे परम आवश्यक अंग आहे. दृढसंकल्प करणारा योगी स्वरूपाच्या प्राप्तीसाठी संसारातील अडथळे तसेच तथाकथित विभिषिकांना अर्थात् त्रासांना किंवा संकटांना आपल्या शक्तीच्या साहाय्याने नेस्तनाबूत अर्थात् परास्त करू शकतो. अन्यथा नाही.

भारतीय जनसमूहाचे मानसविहारी भगवान् श्रीमुरलीमनोहर यांनी चित्तनिरोधाचे सामर्थ्य असणाऱ्या व्यक्तीला "स्थितप्रज्ञ" असे म्हटले आहे. श्रीभगवंतांचे म्हणणे असे आहे की, स्थितप्रज्ञ व्यक्ती सर्व संसारामधील कामना विसरून केवळ स्वतःमध्येच स्मरणशील होऊन राहतात. स्थितप्रज्ञ व्यक्ती कोणत्याही दुःखामुळे उद्विग्न होत नाहीत की सुखभोगाच्या नदीमध्ये वाहून जात नाहीत. स्थितप्रज्ञ व्यक्तींवर श्रीभगवंतांची पूर्ण कृपा असते. यामुळे अशा व्यक्ती मायीय द्वंद्वाच्या द्वारा प्रभावित झाल्या-शिवायच आपल्या मार्गावर पुढे चालत राहतात.

सूत्र क्रमांक २४ मध्ये योगाच्या प्रक्रियेच्या द्वारा मन आणि प्राण अथवा प्राण आणि अपान यांना सुषुम्णाधामाच्या आत असलेल्या चिदाकाशामध्ये लय करण्याचा भाव अभिव्यक्त केलेला आहे. या संबंधामध्ये

सूत्रात उल्लेख केलेल्या अनेक पारिभाषिक शब्दांवर यथाशक्ती प्रकाश टाकणे आवश्यक आहे.

**सोमसूर्य :-** श्रीभट्टकल्लट यांनी आपल्या वृत्तीमध्ये या दोन शब्दांची व्याख्या न करताच अस्पष्ट रूपात त्यांना सोडून दिलेले आहे. श्रीभट्टकल्लट यांनी जाणून बुजून असे केलेले आहे असे वाटते. आगमशास्त्रामध्ये अर्थात् श्रीगुरुपरंपरेनुसार चालत येणाऱ्या शास्त्रामध्ये भिन्न भिन्न प्रकारच्या धारणांच्या आधारावर या शब्दयुग्माचे वेगळे वेगळे अर्थ केलेले आहेत. काही ठिकाणी सोम-सूर्य या शब्दाचा अर्थ प्रमेयपद आणि प्रमाणपद तर काही ठिकाणी प्राण-अपान तर काही ठिकाणी शिवकला-जीवकला असा केलेला आहे. श्रीभट्टकल्लटांनी कदाचित् हीच गोष्ट नजरेसमोर ठेऊन या शब्दयुग्माला अर्थात् शब्दांच्या जोडीला एखाद्या निश्चित अर्थाच्या कक्षेमध्ये बांधल्याशिवायच साधकांच्या पसंतीवर किंवा आवडीवर सोडून दिलेले असावे.

आध्यात्मिक विषयांची चर्चा करताना साधकाने अत्यंत सावधान असणे आवश्यक आहे. यामुळे केवळ इतकेच म्हणता येते की, प्रस्तुत सूत्रामध्ये मागील प्रकरणाच्या आधाराने **"चन्द्रसूर्यौ मनःप्राणौ द्वावपि।। स्पंदकारिकाविवृती।।"** यावरून सोमसूर्य या शब्दाचे मन व प्राण हेच दोन अर्थ करणे अधिक युक्तिसंगत आहे. याचे कारण असे आहे. या आधीच्या सूत्रामध्ये या सिद्धान्ताची स्थापना केलेली आहे की, सामान्य स्पंदशक्ती एकीकडे ज्ञानरूपतेच्या द्वारा गुणत्रयावर आधारित असलेल्या अंतःकरणाच्या वृत्तीमध्ये (या वृत्तींना साधारण रूपामध्ये मन किंवा चित्त असे म्हणतात) आणि दुसरीकडे क्रियारूपतेच्या द्वारा पाच स्थूल प्राणांच्या रूपामध्ये पांचभौतिक शरीरामध्ये व्याप्त होऊन राहते. अपान स्वतः पाच प्रकारच्या स्थूल प्राणामध्ये अंतर्भूत होत असतो. यामुळे योग्यासाठी प्राणासह मनाचे चिदाकाशामध्ये लयीकरण करणे परम आवश्यक आहे. श्रीक्षेमराज यांनी आपल्या व्याख्येमध्ये या शब्दयुग्माचा अर्थ प्राण तसेच अपान असा केलेला आहे.

**सुषुम्णामार्ग :-** आगमशास्त्रामध्ये "मध्यनाडी" हे सुषुम्णानाडीचे प्रमुख नाव आहे. श्रीभट्टकल्लटांनीही आपल्या वृत्तीमध्ये मध्यनाडी याच नावाने सुषुम्णानाडीचा उल्लेख केलेला आहे. याशिवाय सुषुम्णानाडीला "ब्रह्मनाडी" असेही म्हणतात.

या नाडीला "मध्य" म्हणण्यामागे दोन कारणे आहेत. मूळरूपा-मध्ये ही सुषुम्णानाडी स्वतः संविद्रूपा अर्थात् शक्तिरूपा किंवा ज्ञानरूपाच आहे. हे एक कारण असून दुसरे कारण असे आहे की, संवित् हीच प्रत्येक जड किंवा चेतन पदार्थाचा मध्य अर्थात् अंतरतम जीवन आहे. या दृष्टीने "**प्रत्याभिज्ञाहृदय**" या ग्रंथावरील टीकेत असे म्हटले आहे की, **सर्वान्तरतमत्वेन वर्तमानत्वात् तद्भित्तिलग्नतां विना च कस्यचिदपि स्वरूपानुपपत्तेः संविदेव भगवती मध्यम्।।१७।।** भगवती संविद् शक्तीच मध्य अर्थात् सुषुम्णेव्यतिरिक्त आणखी काहीही नाही; कारण की, ती सर्वांमध्ये समानरूपाने विद्यमान राहते. त्या सुषुम्णानाडीच्या आधाराशी संलग्न किंवा एकरूप अगर तिच्या अंतरातून गमन केल्याशिवाय (साधकाला आपल्या वास्तविक) स्वरूपाचे ज्ञान होत नाही.

प्रत्येक प्राण्याच्या शरीरामध्ये सुषुम्णानाडी ही जीवनशक्तीचा मूलस्रोत आहे. या आधीही असे म्हटले गेलेले आहे की, संवित् भगवती ही अवरोहक्रमामध्ये सूक्ष्म प्राणाचे रूप धारण करीत असते व ही संवित् क्रमशः उत्तरोत्तर स्थूलतेला प्राप्त करून घेत संपूर्ण अस्थिमेदोमय स्थूल शरीराचे आणि त्या शरीरामध्ये पसरलेल्या असंख्य शिराजालांचे रूप धारण करीत असते. या दृष्टीने "**प्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

**सा तु मायादशायां तथाभूतापि स्वरूपं गूहयित्वा "प्राक् संवितप्राणे परिणता" इति नीत्या प्राणशक्तिभूमीं स्वीकृत्य अवरोहक्रमेण बुद्धि-देहादिभुवं अधिशयाना नाडीसहस्रसरणिम् अनुसृता।। तत्रापि च पलाशपर्णमध्यशाखान्यायेन आब्रह्मरन्ध्रात् अधोवक्त्रपर्यन्तं प्राण-शक्तिब्रह्माश्रयमध्यनाडीरूपतया प्राधान्येन स्थिता।।१७।।**

याचा अर्थ असा आहे की, या त्या संविच्छक्तीने मायेच्या दशेमध्ये निरनिराळी रूपे धारण केली तरी आपले स्वरूप झाकून प्रथम जी संविच्छक्ती होती ती आता प्राणाच्या रूपात परिणत झाली व अवरोहण कालात देहादि भूमींमध्ये विश्राम करीत तिने हजारो हजार नाड्यांचा मार्ग अनुसरण केला आणि तेथेही ती शक्ती पळसाच्या पानाच्या मध्यशाखेच्या न्यायाने ब्रह्मरंध्रापासून खालील मुखापर्यंत म्हणजे मूलाधारापर्यंत प्राणशक्तीच्या रूपात ब्रह्माचा आश्रय असलेल्या ब्रह्मनाडीत स्थिर आहे.

यावरून संविद् भगवती स्वयं या असंख्य नाडीजाळाच्या बरोबर

मध्यामध्ये ब्रह्मारंध्रापासून मूलाधारापर्यंत प्रधान प्राणशक्तिरूप असलेल्या सुषुम्णानाडीच्या रूपामध्ये राहत असते. सुषुम्णानाडी ही या शिराजालांच्या बरोबर मध्यामध्ये राहत असल्याने तिला "मध्य" असे म्हटलेले आहे. **मध्यनाडी मध्यसंस्था।। विज्ञानभैरव ३५।।** ज्याप्रमाणे पलाशाच्या अर्थात् पळसाच्या पानाच्या बरोबर मधोमध एक मुख्य शिर वरून खालच्या दिशेमध्ये स्थित आहे त्याप्रमाणे शरीरामधील शिराजालांमध्ये बरोबर त्याच तऱ्हेने सुषुम्णानाडी पसरलेली आहे.

मध्यनाडीच्या आकार-प्रकारच्या विषयामध्ये अनुभवी व्यक्तीचे म्हणणे असे आहे की, **सूक्ष्मत्वात् मृणालसूत्रतुल्यरूपया।। प्रत्यभिज्ञाहृदय।।** सुषुम्णानाडी ही मृणालतनूप्रमाणे अर्थात् कमळाच्या तंतूप्रमाणे अत्यंत सूक्ष्म आहे. "**मध्यनाड्यामन्तश्चिदात्मकं शून्य-मेवास्ति।।**" यानुसार सुषुम्णानाडीमधील अंतराळामध्ये किंवा अवकाशामध्ये शून्य आकाश असते. याच शून्य आकाशाला सूत्रकाराने "महान्-व्योम" असे म्हटलेले आहे. सुषुम्णानाडीमध्ये असलेले आकाश हे अपरिमित अर्थात् अमर्यादित चैतन्यरूप असल्यामुळे त्याला "चिदाकाश" असे म्हणतात. "**तस्मात् (शून्यात्) प्राणशक्तिर्निःसरति।। प्रत्यभिज्ञाहृदय।।** याच महान् व्योमापासून प्राणशक्तीचा निकास अर्थात् विकास होत राहतो. प्राणशक्तीवरच विश्वाच्या सर्व चेतन पदार्थांचे जीवन अवलंबून असते. मध्यनाडी अर्थात् सुषुम्णानाडी ही शरीराची प्रधान नाडी असून येथून शरीराच्या रोमारोमामधील चेतना ही वितीर्ण अर्थात् प्रसार पावत राहते. **तत एव सर्ववृत्तीनामुदयात् तत्रैव च विश्रामात्।। प्रत्यभिज्ञाहृदय १७।।** यावरून या सुषुम्णानाडीमध्ये सर्व मानसिक वृत्ती उदय पावत असतात आणि शेवटी या नाडीत लय पावतात.

साधारण जीवभावाच्या अवस्थेमध्ये कोणत्याही जीवधाऱ्याला या नाडीची वर्तमानता अर्थात् या नाडीचे अस्तित्व अथवा याच्या मौलिक स्पंदनाचा आभास मिळू शकत नाही. केवळ योगिजनांनाच प्राणायामाच्या प्रक्रियेच्या द्वारा सुषुम्णानाडीच्या महत्त्वाची अनुभूती होत असते.

**ऊर्ध्वमार्ग :-** साधारण रूपामध्ये "ऊर्ध्वमार्ग" या शब्दाचा अर्थ "उत्कृष्ट मार्ग" असा आहे आणि आगम शास्त्रांमध्ये उत्कृष्ट मार्ग म्हणजे उदान वायूचा मध्यनाडीरूप मार्ग असा केलेला आहे. सामान्य जीवधाऱ्यांमध्ये अर्थात् जीवांमध्ये प्राण तसेच अपान यांच्या प्रवाहमानतेचा मार्ग मध्यनाडीच्या

डाव्या आणि उजव्या बाजूला पार्श्वभागी असलेल्या दोन नाड्यांच्या रूपाने आहे. या अवस्थेमध्ये प्राणापानाच्या प्रवाहमानतेसाठी सुषुम्णेचा मार्ग हा पूर्णपणे बंद राहतो. योगप्रक्रियेच्या द्वारा प्राण आणि अपान यांचे छेदन केले असता अर्थात् दोघांचाही बहिर्मुख संचार अडकून प्राण व अपान या दोघांनाही हृन्मंडलामध्ये ठेवले असता ते उदानवायूचे रूप धारण करून सुषुम्णामार्ग अर्थात् उर्ध्वमार्ग यातून ऊर्ध्वसंचार करू लागतात. (**"ईश्वर-प्रत्यभिज्ञा"** ३.२.१९.२०) प्राणापानाच्या ऊर्ध्वसंचाराच्या अवस्थेला पोहोचलेल्या योग्याच्या अंतःकरणामध्ये असेलली भेदभावना ही आपोआप वितळून किंवा विरघळून अभेद भावनेच्या रूपामध्ये उदित होत असते. तुर्यारूप शाक्तभूमिकेचा समावेश झाल्यावर प्राणापानाचा ऊर्ध्वसंचार होऊ लागतो.

सूत्र क्रमांक २५ मध्ये मूढ आणि प्रबुद्ध यांच्या समाधिकाळामधील फरकाला स्पष्ट केलेले आहे. या संबंधामध्ये सूत्र क्रमांक १२ पासून सूत्र क्रमांक २० पर्यंतच्या विवरणावर आवश्यक तेवढा प्रकाश टाकून झालेला आहे. यामुळे येथे पुन्हा त्याच गोष्टी सांगणे हे पिष्टपेषणच अर्थात् नुसते पीठ दळणेच आहे.।।२३-२४-२५।।

**इति श्रीकल्लटाचार्यविरचितायां**
**स्पन्दकारिकावृत्तौ स्वरूपस्पन्दः नामो प्रथमो निःष्यन्दः।।१।।**
**श्रीकल्लटाचार्यांच्या द्वारा विरचित**
**स्पंदकारिका वृत्तीचा "स्वरूपस्पंद" या नावाचा**
**पहिला निःष्यंद समाप्त झाला.**

*****

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-(कारिका क्रमांक २३ ते २५)**

आता सतत प्रयत्नशील असणाऱ्या योग्याने वर सांगितलेल्या युक्तीनुसार अशा प्रकारच्या अवस्थांमधून प्रथम स्पंदशक्तीचे परिशीलन करून त्यानंतर त्याचेच अनुसंधान करीत सर्व अवस्थांमध्ये दृढपणे असलेल्या जीवन्मुक्ततेला प्राप्त करावे असे या कारिकेत सांगितले आहे.

**स्पष्टीकरण :-** हा श्रीशंकरात्मक स्वभाव मला जे सांगतो किंवा अभिव्यक्त होऊन चिदानंदघन असे अभूतपूर्व स्वरूप मला जे ज्ञान करूवून देते ते मी अवश्य करीन आणि बहिर्मुखतेचा त्याग करीन असा संकल्प करून आणि निश्चितपणे विचार करून, अतिक्रोधादि अवस्थांमध्ये अनुभवास येणाऱ्या चिदानंदघन स्पंदात्मक अवस्थेचा अवलंब करून

प्राप्य किंवा ध्येय म्हणून (योगिसाधक) त्याचे अनुसंधान करून राहतो. अर्थातच जो योगी विकल्प किंवा विचारांची गती शांत करून अविकल्प अथवा विचाररहित अवस्थेचे अविचलत्वाने ध्यान करतो त्याच्या त्या अवस्थेचा आश्रय घेऊन (साधकयोग्याने) चंद्र-सूर्य आणि प्राण-अपान या दोघांनाही हृदयात एकत्रित करून तत्काळच सुषुम्णामार्गात ब्रह्मनाडीला ऊर्ध्व मार्गाने म्हणजेच उदान प्राणाच्या मार्गाने शांत करावे. हे कसे करावे? ब्रह्मांडाने चिह्नित केलेले गोचर (विषय) यांचा त्याग करून ब्रह्मरंध्रात अधिष्ठित असणाऱ्या अर्थात् ब्रह्मात अधिष्ठित असणाऱ्या अंड्याला मुक्त करून वरच्या कवाडाप्रमाणे असणाऱ्या देहव्याप्तीचा त्याग करून आणि त्यावेळेस देहाच्या संकुचितत्वाला ओलांडून जेथे वर सांगितलेले चंद्र आणि सूर्य प्रकर्षाने लीन होतात त्या महाकाशात म्हणजेच सर्व वेद्य (ज्ञेय) गोष्टींना शांत झालेल्या परमाकाशात अर्थात् सहस्रारात जावे. ही अवस्था प्राप्त होऊनही जो साधकयोगी प्रयत्न कमी अथवा ढिले पडल्याने खेचर्यादि शक्तींनी युक्त गुणादि स्पंदाच्या निष्यंदाने मोहित अथवा भ्रमित होतात ते सौषुप्त अवस्थेप्रमाणे होतात. जो योगी त्या अवस्थेत असूनही सौषुप्तामुळे सुप्त असूनही उपलक्षित केलेला आणि स्वप्नसुषुप्तीप्रमाणे शून्यादि भूमीतच अधिष्ठित होतो तो योगी "स्व"भावाची अभिव्यक्ती योग्यप्रकारे न झाल्याने मूढ म्हणविला जातो. श्रीभट्टकल्लटाने यासंबंधी असे म्हटले आहे की -

**यां स्पन्दत्मिकामवस्थामवलम्ब्य।**

**अर्थ :-** ज्या (त्या) स्पंदात्मक अवस्थेचा आधार घेऊन आणि त्याचप्रमाणे,

**"यस्य स्वस्वभावाभिव्यक्तर्न सम्यक् वृत्ता स स्वप्नादिना मुह्यमानोऽ-प्रबुद्धो निरुद्धः स्यात्"** अर्थात् ज्याला स्वस्वभावाची अभिव्यक्ती योग्य प्रकारे झालेली नसते तो स्वप्न आदि अवस्थांनी भ्रमित झालेला अप्रबुद्ध किंवा निरुद्ध होईल.

परंतु जो प्रयत्नांच्या शक्तीत आणि शीघ्र उद्योग करण्यात क्षणभरही कमी पडत नाही तो अंधाराचा किंवा अज्ञानाचा प्रभाव न पडल्याने चिदाकाशमय अवस्थेतच स्थित असणारा प्रबुद्ध म्हणविला जातो. त्यामुळे योग्याने स्पंदतत्त्वाचे ज्ञान होण्यासाठी सतत उद्योगशील किंवा प्रयत्नरत राहावे असे श्रीगुरूंनी सांगितलेले आहे. इति शिवम्।।२३-२४-२५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**
**(कारिका क्रमांक २३ ते २५)**

जाग्रत् वृत्तीमध्ये तुर्यावस्था अंतर्हित असतानाच्या "स्व"भावाची प्राप्ती करण्यासाठी उपाय किंवा उपदेश **"यामवस्थां समाल-सम्ब्यं .....।।२३।।" "तामाश्रित्योर्ध्वमार्गेण .....।।२४।।" "तदा तस्मिन्महाव्योम्नि .....।।२५।।"** या तीन कारिकांमधून सांगितला आहे. स्वस्वरूपशंकरात्मक चितिशक्ती मला जे दाखवील व प्रत्यक्षरूप होऊन सच्चिदानंदघनरूप अशा मला ज्याप्रमाणे जागवील त्याचप्रमाणे मी बाह्यविषयांचा त्याग करून तिच्याशीच समरस होईन, असा दृढ निश्चय करून त्या चितिशक्तीचाच आधार घेऊन अलौकिक व अनिर्वचनीयरूपाने चंद्रसूर्यात्मक मन आणि प्राण इत्यादींना हृदयभूमीमध्ये मिळवून त्याचक्षणी सुषुम्णामार्गात ज्यावेळेस शांत होतो त्याचवेळेस समग्र ब्रह्मांडरूप विषयांना टाकून महाकाशात समस्त ज्ञेय रहित स्थिती प्राप्त होऊनही जो योगी प्रयत्न करीत नाही तो योगी त्याचा "स्व"भाव योग्य रीतीने अभिव्यक्त न झाल्याने मूढच होतो. जो प्रयत्नात शैथिल्य करीत नाही उलट श्रीसद्गुरूंच्या उपदेशाप्रमाणे सतत उद्योग (साधन) करीत राहतो तो प्रबुद्ध होऊन सर्व दुष्ट आवरणांनी रहित होतो, अनावृत होतो.।।२३।।२४।।२५।।

अशा प्रकारे श्रीमहामाहेश्वराचार्यक्षेमराजांनी रचलेल्या स्पंदनिर्णयातील स्वरूपस्पंद नावाचा पहिला निष्यंद संपला.।।१।।

❋❋❋❋❋

**तदाक्रम्य बलं मन्त्राः सर्वज्ञबलशालिनः।**
**प्रवर्तन्तेऽधिकाराय करणानीव देहिनाम्।।२६।।**

**अन्वयार्थ :-**

**तद् बलम्** - त्या स्पंद तत्त्वाचे बल जे चिद्रूप, **आक्रम्य** - आश्रय करून, त्याच्या अधिष्ठानावर, **मन्त्राः** - मंत्र वा त्यांच्या अधिष्ठात्री देवता, **सर्वज्ञ-बल-शालिनः** - महेश्वराची - सर्वज्ञता तृप्ती, अप्रतिहत स्वातंत्र्य - इत्यादि जी सामर्थ्ये आहेत त्यांनी सुसंपन्न - सुशोभित होऊन, **देहिनाम्** - शरीर धारण करणाऱ्या जीवांच्या, **करणानीव** - इंद्रियांप्रमाणेच, **अधिकाराय** - मंत्राचे अनुग्रह, निग्रह, रोगनिवारण इत्यादि

जे अधिकार वा कार्ये आहेत, **प्रवर्तन्ते** - प्रवृत्त होतात.।।२६।।

**अर्थ** :- प्रत्येक प्रकारचे मंत्र त्या स्पंदरूप आत्मबळाशी तादाम्य प्राप्त केल्याने सर्वज्ञता, तृप्ती, अनादिबोध, अप्रतिहत स्वातंत्र्यशक्तीचा अडथळारहित प्रसार आणि विश्वरूपामध्ये विकसित असलेले अनंत शक्तींचे ऐश्वर्य या सहा प्रकारच्या माहेश्वर बलांना प्राप्त करून घेऊन शोभित होऊ लागतात. अशा परिस्थितीत कोणतेही मनोवांछित कार्य अधिकारपूर्वक सिद्ध करण्यासाठी हे मंत्र जितक्या सहजपणे प्रवृत्त होतात तितक्या सहजपणे शरीरधारींची इंद्रिये केवळ संकल्पानेच आपापली कार्ये सिद्ध करीत असतात.।।२६।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

आराध्य देवतांचे जे जे वाचक मंत्र असतात ते ते परमेश्वराच्या अनन्य सर्वकर्तृत्व वगैरे साधारण गुणांनी युक्त व श्रीपरमशिवरूपच असतात. देवता ही श्रीपरमशिवरूप आहे अशी जागृती ठेवून जप केला तरच तो मंत्र इष्ट कार्य करण्याला समर्थ होतो. त्या मंत्राने जर उत्पत्ती व विनाश हे धर्मयुक्त वर्ग नुसते मानण्यात आले तर त्याच्या हातून काहीसुद्धा व्हावयाचे नाही. पण देवता ही श्रीपरमशिवरूप आहे अशा प्रकारची जागृती ठेवून जर जप केला तर ते मंत्र विष उतरणे, आकर्षण करणे वगैरे इष्ट कार्यसाधक होतात. असा प्रत्येक मंत्र श्रीपरमशिवांच्या सामर्थ्याने युक्त आहे. मग वाटेल त्या मंत्राने वाटेल ते का होऊ शकत नाही? निरनिराळ्या मंत्रांना परिकल्पित असे नियतीचे बंधन घालून दिले आहे. त्यामुळे त्या त्या कारणापुरतेच ते ते मंत्र पूर्ण बलवान होऊ शकतात. निरनिराळी इंद्रिये प्रामुख्याने श्रीपरमशिवांच्या सामर्थ्याने आपापल्या विषयाचे ग्रहण करू शकतात. तेथे नियतीचे बंधन आहे. ऐकण्याचे काम करणे हे कानाचे कार्य आहे. मात्र जवळचेच शब्द ऐकण्याचे कार्य कान करू शकतात. परंतु श्रीपरमशिवांच्या सामर्थ्याने जेव्हा दिव्य श्रवणाचे सामर्थ्य प्राप्त होते तेव्हा इतरांना न ऐकू येणारे असे शब्द सिद्धपुरुष ऐकू शकतात. कान पाहण्याचे काम मात्र करू शकत नाहीत. त्यामुळे इंद्रियवर्गाप्रमाणे सर्वज्ञत्वाचे बल असणारे मंत्र नियत कार्यच करू शकतात. सर्व मंत्र श्रीपरमशिवरूप आहेत अशी

भावना केल्याने वर्ण जरी वाच्यांशात्मक असले तरी उपरोक्त प्रकारच्या बंधनापासून मुक्त होऊन त्या वर्णांचे मूळ स्वरूप शांत, शुद्ध, ज्ञानमय व निर्विकार स्वरूप बनले म्हणजे त्यांचे जे श्रेष्ठ आदि कारण श्रीपरमशिवस्वरूप आहे त्याच्याशी ते ऐक्यता पावतात.

मंत्रामध्ये बीज, पिंड, पद आणि नाम या चार गोष्टी मुख्य असतात. मनन व त्राण हा मंत्रांचा धर्म आहे. निरावरण चिच्छक्तीचा उल्लास अर्थात् पराशक्तीचे उन्मुखत्व, ऊर्ध्वगामित्व व विलास हेच त्या मंत्रांचे खरे बल आहे. या शक्तीच्या साहाय्याने मंत्र सहजतेने नादशक्तीच्या रूपाने उद्बोधित होऊन प्रदीप्त होतात. त्यामुळे मंत्रात सर्वज्ञता इत्यादींचे बल येते. ज्यावेळी या मंत्राचा सिद्धमंत्री प्रयोग करतात त्यावेळी ते अनुग्रह व निग्रह करण्यास समर्थ असतात. माणूस आपल्या हाता-पायांची जितक्या सहजतेने व इच्छेने हालचाल करतो अगदी त्याचप्रमाणे मंत्रांच्या बाबतीत घडते. आत्म्याच्या परत्वाचा पूर्ण बोध होण्यासाठी मंत्रज्ञ आपल्या इच्छेने मंत्रांचा यथेष्ट प्रयोग करू शकतो. या दृष्टीने **"त्रिकसार"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "वर्णातीत निराकार परम तत्त्वाचा बोध झाल्यावर मंत्र मंत्राधिपतीच्या बरोबरच दास होऊन पूर्णपणे वशीभूत होतात. जर असे झाले नाही तर खूप प्रयत्नाने प्रयोग करूनही ते एखाद्या लाकडाच्या बाहुलीप्रमाणे निष्फळ होतात व निश्चेष्ट राहतात; कारण सत्यसंकल्प चिच्छक्तीच्या बलाचा स्पर्श न झाल्याने हे मंत्र केवळ वर्णमात्र अर्थात् जड अक्षरेच राहतात."

**"हंस-पारमेश्वर"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "केवळ वर्णरूप मंत्र पशुभावात राहणारे असतात. सुषुम्णामार्गात त्यांचा जप-उच्चारण केल्यावर ते पशुपती होतात." खरे पाहिले तर सिद्धमार्गातच मंत्रांची सफलता आहे. **"तत्त्वरक्षाविधान"** या ग्रंथात या संबंधी असे म्हटले आहे की, "आत्मसंवित् किंवा परमपदात मंत्राचा प्रयोग करू नये; कारण तो शक्ती व क्रियारहित असतो. शक्तीच्या विषयातच मंत्राचा प्रयोग केला पाहिजे. तोच जप सफल होतो. **"श्रीवैहायसी"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "संधिस्थलात म्हणजे सुषुम्णेमध्ये नादोर्ध्वध्वनीने बोधित जप केला पाहिजे. ज्याप्रमाणे दोऱ्यात मणी गुंफलेले असतात त्याप्रमाणे शक्तीच्या उभ्या-आडव्या धाग्यांनी बनलेल्या मंत्राक्षरांचे ध्यान केले पाहिजे. ती शक्ती परमाकाशात-सहस्रारात राहते व ती परमामृताने समृद्ध आहे. अशा

पद्धतीने जप केल्यावर मंत्र आपले स्वरूप प्रकट करतो. तो आपल्या स्वतःला झाकून ठेवू शकत नाही." **"श्रीकालपरा"** या ग्रंथात असे वचन आहे की, "शब्द नादात्मक आहेत. त्यामुळे त्यांच्या बरोबर प्रत्यय व संवित् राहून ते वाढत राहतात. मंत्रबोधाच्या स्वरूपात राहणारी संवित् अभिन्न असते. त्यामुळे ती साधकाला आत्मबोध करून देते." **"संकर्षणसूत्र"** या ग्रंथात असे वचन आहे की, "चिद्रूपता स्वात्मैकनिष्ठ आहे. भाव व अभाव त्यांच्या निरनिराळ्या दशा व सजावट आहे. ते स्वसंवेदन संवेद्य आहे व चिद्रूप प्रकृतीचा विषयही तेच आहे. तेच मंत्राचे प्रत्ययात्मक कारण आहे. मंत्र बाहेर व आत वर्णरूपाने प्रकट होतात. ते शाश्वत पदरूप होतात. ते मनुष्याच्या हातापायासारखे आहेत. ते सामर्थ्यसंपन्न झाले की, कोणत्याही काळात सिद्ध होतात." जेव्हा शुद्ध बोधात्मक रूपाचा आत व बाहेर दोन्ही ठिकाणी उदय होतो तेव्हा मंत्राचा एकवेळा सुद्धा जप केला तरी एक लाख वेळा जप केल्यासारखे आहे. **"जयसंहिता"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "आत व बाहेर अशा दोन्ही ठिकाणी एकाच मंत्रनाथाचा उदय होऊन ते एक होतात तेव्हा तो जप एक लाखापेक्षा अधिक झाला असे समजले पाहिजे."

या ठिकाणी प्रसंगवशात् मंत्रशक्तीचे विवेचन आले त्याचा उदय सांगितला. पुढील श्लोकात त्याचा विलय सांगितला आहे.।।२६।।

कारिका क्रमांक २६ ची **श्रीरामकंठाचार्य विवृती, श्रीभट्टकल्लट वृत्ती, श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका व श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका** कारिका क्रमांक २७ बरोबर दिली आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**तत्रैव संप्रलीयन्ते शान्तरूपा निरञ्जनाः ।**
**सहाराधकचित्तेन तेन ते शिवधर्मिणः ।।२७।।**

**अन्वयार्थ :-**

(हे मंत्र) **निरञ्जनाः** - मायेच्या काजळीपासून अलिप्त, सांसारिक भोगसिद्धीपासून निवृत्त झालेले, **शान्तरूपाः** - शुद्ध संविद्रूप अथवा शांतरूप होऊन (श्रीक्षेमराज मतेः **निरञ्जनाः** - आपापली कर्तव्ये अधिकारपरत्वे पार पाडून अधिकार निवृत्त होऊन, **शान्तरूपाः** - ज्यांचे विशिष्ट देवतास्वरूप समाप्त झाले आहे) असे हे, मंत्र,

**आराधकचित्तेन सह** - भक्ताच्या अथवा आराधना करणाऱ्याच्या चित्तासह, **तत्रैव** - त्याच ठिकाणी सामान्य **स्पंद**रूप चिदाकाशात किंवा **स्पंद**तत्त्वात- (श्रीक्षेमराज), **संप्रलीयन्ते** - **विलीन** होतात, **तेन** - त्या कारणामुळे, **एते** - हे **सर्व** मंत्र, **शिवधर्मिणः** - शिवस्वरूप आहेत. ।।२७।।

**अर्थ** :- दुसरीकडे हे मंत्र मायेच्या काजळीपासून अलिप्त होऊन, संसारातील भोगसिद्धीपासून निवृत्त होऊन, शुद्ध संविद्रूप किंवा शांतरूप अर्थात् ज्यांचे विशिष्ट देवतास्वरूप समाप्त झालेले आहे असे होऊन, भक्ताच्या किंवा आराधना करणाऱ्या व्यक्तीच्या चित्तासह त्याच ठिकाणी सामान्य स्पंदरूप चिदाकाशात किंवा स्पंदतत्त्वात विलीन होतात. या कारणामुळे हे सर्व मंत्र श्रीशिवस्वरूप आहेत.।।२७।।

* * * * *

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

उपरोक्त स्थिती प्राप्त होण्याकरिता साधकाचे चित्तसुद्धा श्रीपरम-शिवरूपस्थितीलाच पोहोचलेले असले पाहिजे. अशा स्थितीमध्ये मंत्र व चित्त यांची उत्पत्ती व लयदशा नष्ट होऊन परत ते कारणाशी म्हणजे श्रीपरमशिवांशी एकरूप होतात. ज्या साधकाची स्थिती अशी परमात्मरूप झाली आहे त्याने मंत्राची श्रीपरमशिवांशी ऐक्यता सिद्ध करून मंत्रोच्चार केला असता वाटेल ते कार्य करण्यास वाटेल तो मंत्र सिद्ध होतो. मंत्र तर राहूनच द्या; परंतु श्रीपरमशिवस्थितीत असणारा साधक जे जे वचन ज्या ज्या इच्छेने उच्चारील ते ते वचन मंत्ररूप बनून वाटेल ते कार्य करू शकते. त्यामुळे श्रीपरमशिवांशी ऐक्यता असणाऱ्या साधकाने प्रत्येक मंत्र श्रीपरमशिव आहे असे समजून जप करावा म्हणजे त्या मंत्राला वाटेल ते कार्य करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. याप्रमाणे प्रत्येक पदार्थ, ज्ञान व वस्तू श्रीपरमशिवरूपच आहे अशी भावना सतत जागृत ठेवावी म्हणजे वर वर्णन केलेला प्रकार साधकाला अनुभवाला येईल. कोणताही मंत्र श्रीपरमशिवरूपच आहे. याप्रमाणे ध्यानामध्येच म्हणजे सुषुम्णेमध्येच ध्यान करून जप केला असता वाटेल ते कार्य मंत्र करू शकेल व त्या साधकाला नियतीचे बंधन राहू शकणार नाही.

अर्थात् त्या शक्तिमान स्वस्वभावधर्मात हे मंत्र साधकचित्ताच्या प्रवृत्ति-निवृत्तीच्या निमित्तानें म्हणजे त्याच्या आधारभूत इच्छेने पुन्हा लीन होतात;

कारण मंत्र हे स्वस्वभावाचे अनुगामी व शक्तिरूप असतात. हीच गोष्ट **"कालपरा"** या ग्रंथामध्ये सांगितली आहे. श्रेष्ठ अक्षररूप वृक्षात अनेक शक्ती आहेत. त्यांचे विवर्त शक्तीच्या रूपात वर्णस्वरूपाने प्रकट होतात. मुखाच्या आश्रयाने त्या वर्णांचा स्वीकार केला जातो. त्या शक्ती कृतकृत्य असल्यामुळे स्वतः शांत, निरंजन व कालुष्यरहित आहेत. त्या शक्ती निरंजन तत्त्वाने प्रेरित व भारलेल्या आहेत. श्रीशिव-शंकरात जे धर्म आहेत तेच मंत्रात असण्याचे हेच कारण आहे. अर्थात् मंत्र सुद्धा सर्वज्ञ व सर्वकर्ता आहेत.

साधकाच्या चित्तात मंत्र लीन होतात. साधकाचा आत्माच श्रीशिव आहे हे पटण्यासाठी हे सांगितले. याचेच संयुक्तिक विवेचन पुढील प्रवाहात केले आहे.।।२७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :- (कारिका क्रमांक २६ व २७)**

अशा प्रकारे देहादि व्यतिरिक्ततेने जाणवलेले आत्मरूप किंवा स्वस्वभाव हेच श्रीशंकरांचे रूप किंवा श्रीशिवदशा होय. या श्रीशिव-दशेत प्रकट होणारे सामर्थ्य हे स्वस्वभावविकासातून प्रत्ययास येते. त्या अवस्थेतून बाहेर पडलेल्या शब्दांच्या ठिकाणीसुद्धा अमोघमंत्रता येते. हेच वरील क्रमांक २६ व २७ या दोन कारिकांनी सांगितले आहे.

**स्पष्टीकरण :-** व्यापक अहंभावाच्या भूमिकेवरून प्रबुद्धाची स्वाभाविक ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती प्रवृत्त होऊन जेव्हा शब्दरूपाने बाहेर पडते तेव्हा उच्चाराबरोबर ते सामर्थ्य घेऊनच शब्द बाहेर पडतात. या सामर्थ्यातच त्यांची शोभा साठविलेली असते **(सर्वज्ञ बलशालिनः)** व अशा प्रकारे प्रगट झालेले वर्णसन्निवेश आपला नियत अधिकार परिणामरूपाने प्रकटही करतात. ही सामान्यस्पंदरूप स्वस्वभावात्मकशक्ती एकरूपच असली तरी त्या त्या वर्णसन्निवेशानुसार इष्ट परिणाम घडविते. याला कारिकाकारांनी इंद्रियवृत्तीचा दृष्टान्त दिला आहे. एकाच शक्ति-संस्पर्शाने करणे म्हणजे इंद्रिये प्रवृत्त झाली तरी आपापल्या नियत रूपाप्रमाणेच त्यांची वृत्ती असते. तद्वत् हेही आहे. आराधक जेव्हा ह्या मंत्रांचा उच्चार करतो त्यावेळी तो केवळ वाचक वर्णाचाच उच्चार करताना दिसला तरी ते मंत्र आपल्या वाचकवर्णरूप व वाच्यार्थ्यरूप उपाधीतून निष्क्रांत होतात

(निरञ्जनाः) व शांत रूपाने, आराधकाच्या उपाधिविरहित स्वभावभूत चित्ताला बरोबर घेऊनच, पुन्हा मूल स्वस्वभावातच लीन होतात. तेव्हा हे मंत्रसुद्धा श्रीशिवधर्माने म्हणजे स्वस्वभावानेच युक्त आहेत. केवळ मंत्रच नव्हेत तर व्यापक अहंप्रत्ययाच्या भूमिकेवरून प्रबुद्ध जे जे वचन उच्चारतो त्या त्या वचनात अशीच अमोघमंत्रता येते.[१] ।।२६-२७।।

**१) टीप :-** १) श्रीरुद्रशक्तीचा समावेश झाला म्हणजे त्या शक्तीचा विकास पुढील क्रमाने होतो. भक्ती-मंत्रसिद्धी-तत्त्ववशित्व-कृतकृत्यता-कवित्व-सर्वशास्त्रज्ञातृत्व. (पाहा - श्रीअभिनवगुप्त, **"तंत्रालोक"**, १३,२१५)

❋❋❋❋❋

## सहजविद्योदय नामक दुसरा निष्यंद

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

येथपर्यंतच्या प्रकरणामध्ये ग्रंथकाराने अनेक युक्ती आणि उपपत्ती यांच्या द्वारा हे तथ्य निर्धारित केलेले आहे की, विश्वाच्या कणा-कणामध्ये चैतन्यमयी स्पंदशक्ती सामान्यरूपामध्ये अनुस्यूत आहे अर्थात् अखंड गुंफलेली आहे. योगिलोक हे पूर्वी वर्णिलेल्या विकल्पसंस्काराच्या द्वारा आपल्या संवेदनाला अर्थात् चेतनेला निर्मळ अर्थात् मलरहित किंवा शुद्ध बनवून आपल्याच हृदयमंडलामध्ये या शाक्त भूमिकेची अनुभूती प्राप्त करून घेत असतात. फलस्वरूप योगिजन हे पशुभावाच्या संकुचित सीमांना ओलांडून असीम अर्थात् अमर्यादित विश्वात्मभावामध्ये लय पावत असतात.

आता या प्रकरणाच्या अर्थात् दुसऱ्या निष्यंदाच्या सूत्रामध्ये आध्यात्मिक साधनेच्या आधारावर विकल्प संस्काराच्या प्रक्रियेचा निरंतर किंवा सतत अभ्यास केला असता प्रबुद्ध योग्यांच्या हृदयामध्ये **"सहज-विद्येचा"** उदय होत असतो, या रहस्याचे उद्घाटन करणार आहेत. शुद्ध विकल्प अथवा **"अहं"** विमर्शात्मक अर्थात् ज्ञानात्मक स्वरूपाची यथार्थ अनुभूती हे या सहजविद्येचे स्वरूप आहे. निर्मळ हृदयामध्ये शुद्धविद्येचा प्रकाश पसरला असता योग्याला वास्तविक स्वरूपाचा परिचय प्राप्त होत असतो. योग्याला मंत्राच्या वीर्याचा अर्थात् सामर्थ्याचा अनुभव येत असतो आणि तो योगी प्रबुद्ध अवस्थेतून बाहेर पडून

सुप्रबुद्ध अवस्थेमध्ये प्रविष्ट होत असतो.

## मंत्र आणि मंत्रवीर्य

या संबंधामध्ये आता सूत्रकार क्रमांक **२६** व २७ या वरील दोन सूत्रांमध्ये या तथ्याचे प्रतिपादन करीत आहेत की, सिद्ध योग्याच्या वाणीमध्ये होणाऱ्या आत्मबलाच्या संचारामुळे या योग्याच्या द्वारा उच्चारले गेलेले मंत्र हे कागदाच्या पानावर लिहिलेल्या सामान्य वर्णाप्रमाणे न राहता अमोघ वीर्य किंवा शक्ती किंवा तेज बनत असतात. या योग्यामध्ये योग्याच्या रुचीनुसार भोगरूप किंवा मोक्षरूप फलांना प्राप्त करून घेण्याची क्षमता निश्चित बनत असते.

**सूत्र क्रमांक २६ वृत्ती :-** सर्व मंत्र हे आवरणहीन चिद्रूपतेबरोबर एकाकार झाले असता सर्वज्ञता इत्यादि श्रीमहेश्वर बळाला प्राप्त करून घेऊन श्लाघ्य अर्थात् पूज्य बनत असतात आणि शरीरधारी जीवाच्या इंद्रियांप्रमाणे आपल्या अनुग्रह आदि अधिकाराच्या कामांकडे प्रवृत्त होत असतात. आत्मबळाचा स्पर्श प्राप्त केल्याशिवाय मंत्र एखाद्या दुसऱ्या प्रकारच्या आकारविशेषांच्या अर्थात् अक्षर आणि मात्रा (एखाद्या पुस्तकादि मध्ये अंकित) यांच्या केवळ विशेष रचनेच्या द्वारा कोणतेही कार्य सिद्ध करू शकत नाहीत.।।२६।।

**१) टीप :-** सर्वज्ञता, तृप्ती, अनादि-बोध, अप्रतिहत-स्वातंत्र्य, शक्तीचा निर्बाध प्रसार व विश्वरूपात विकसित झालेल्या अनंत शक्तींचे ऐश्वर्य असे सहा प्रकारचे माहेश्वरबल आहे.

**सूत्र क्रमांक २७ वृत्ती :-** हेच मंत्र संसारातील भोगाच्या सिद्धीपासून निवृत्त होतात व मायेच्या उपरागाने अर्थात् मायेच्या ग्रहणाने रहित होऊन शांतरूप बनत असतात. यामुळे हे मंत्र साधकाच्या चित्ताबरोबरच स्वभाव अर्थात् विशुद्ध चिद्रूपता किंवा दुसऱ्या शब्दामध्ये सामान्य स्पंदात्मक शाक्तभूमिकेच्या अमर्यादित अवकाशामध्ये लीन होऊन जातात. प्रत्येक प्रकारचा मंत्र हा पशुभावामध्ये पडलेल्या आत्म्याला श्रीशिवभावाशी एकाकार बनवीत असतो. हाच प्रत्यक्षात प्रत्येक प्रकारच्या मंत्राचा पार्यंतिक अर्थात् शेवटपर्यंतचा तसेच अनौपचारिक स्वभाव आहे. या कारणामुळे सर्व मंत्रांना श्रीशिवात्मक अथवा श्रीशिवरूपच म्हटले जाते.।।२७।।

**विवरण :-** मंत्र हे भोगरूप आणि मोक्षरूप अशा फळांच्या आधाराने

सांजन आणि निरंजन अशा दोन प्रकारचे आहेत. मंत्रशक्तीच्या सांजनरूपाला संसारातील भोगरूप फळांना प्राप्त करण्याच्या अर्थाने प्रयोगात आणले जाते. अनेक साधक हे स्वत:मध्ये मंत्रवीर्याला अर्थात् मंत्रशक्तीला विकसित करून घेतल्यावर त्या मंत्रशक्तीच्या द्वारा दैनंदिन जीवव्यवहाराशी संबंध असणाऱ्या कार्यांची सिद्धी करून घेऊ लागतात. उदाहरणार्थ हे साधक एखाद्या व्यक्तीवर अनुग्रह, एखाद्यावर निग्रह, एखाद्या व्यक्तीचे रोगनिवारण, एखाद्या व्यक्तीचे मारण इत्यादि कनिष्ठ कोटीच्या लक्ष्यांना पूर्ण करण्यामागे लागतात. असे मंत्र मायीय उपरागाच्या अर्थात् मोहाच्या किंवा आसक्तीद्वारा रंगल्यामुळे या मंत्रांना "**सांजन-मंत्र**" असे म्हणतात.

निरंजन मंत्रशक्तीला केवळ आपल्यामध्येच श्रीशिवतत्त्वाच्या अभिव्यक्तीसाठी प्रयोगात आणले जात असते. अशा प्रकारच्या मंत्रांवर कोणत्याही प्रकारचा मायीय रंग चढलेला नसतो. यामुळे या मंत्रांना "**निरंजन-मंत्र**" असे म्हणतात. मंत्र हा निरंजन आहे की सांजन? ही गोष्ट मंत्रशक्तीच्या अनुभवी साधकांच्या आवडीवर किंवा मनोभूमिकेवर अवलंबून आहे. मंत्राच्या प्रयोगानुसार त्याचा प्रकार ठरत असतो.

सूत्र क्रमांक २६ व २७ यांमध्ये ज्या लोकांच्या विचारामध्ये मंत्रशक्तीच्या गोष्टी या थोतांड अथवा आजच्या शब्दकोषातील "शोषण" याशिवाय अन्य काहीही नाही अशा लोकांचे तोंड बंद करण्याचा प्रयत्न केला आहे. सूत्रकाराच्या विचारानुसार असे लोक मंत्र आणि मंत्रवीर्य यांचे खरे स्वरूप समजून घेण्यात चूक करीत असतात. सामान्य रूपामध्ये "**लिपिस्थितस्तु यो मन्त्रो निर्वीर्यः सोऽत्र कल्पितः।। तंत्रालोक ४.६६।।**" अर्थात् नुसत्या लिपीमध्ये लिहिलेला मंत्र निर्वीर्य असतो. मंत्र शब्दाने "पुस्तकाच्या कागदावर अंकित असलेल्या अर्थात् लिहिलेल्या अनेक प्रकारच्या वर्णरचना" असा अर्थ अभिप्रेत आहे. परंतु हे पूर्णपणे चुकीचे आहे; कारण यामध्ये कोणतेही बल असत नाही. प्रत्यक्षात उच्चतर भूमिकेवर असलेल्या त्या निर्मळ तसेच विकल्पहीन संवेदनाला अर्थात् चेतनेला मंत्र असे म्हणतात. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की - **मन्त्रदेवताविमर्शपरत्वेन प्राप्ततत्सामरस्यम् आराधकचित्तमेव मन्त्रः, न तु विचित्रवर्णसंघट्टनामात्रम् .....।।२.१।।**

याचा अर्थ असा आहे की, मंत्रदेवतेशी विचारपूर्वक समरस होणारे आराधकाचे चित्तच मंत्र होय. वेगवेगळे वर्णसमूह म्हणजे मंत्र नव्हे.

मंत्राच्या द्वारा योगिजनांना आपल्या पंचमहाभूतांपासून उत्पन्न झालेल्या शरीरामध्ये लपलेल्या अमोघ आणि असीम आत्मशक्तीची अनुभूती येत असते. फलतः सामान्यातील सामान्य मंत्र हा आत्मशक्तीसह योग्य रीतीच्या उच्चारणामुळे महान् प्रभाव निर्माण करू शकतो. अन्यथा नाही.

सूत्रकाराच्या वरील अभिप्रायाला चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मंत्रशक्तीशी संबंध ठेवणाऱ्या खालील अनेक गोष्टी ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

**मंत्राचे स्वरूप :-** "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात मंत्राचे स्वरूप कथन करताना "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, "**मनु अवबोधने," "तृ पालने" इत्येताभ्यां निरुक्ततया निर्वचनीयत्वेन निर्णीततया उच्यते।।२.१।।**" मंत्र हा शब्द अवबोधनार्थक "मनु" आणि पालनार्थक "तृ" या दोन धातूंच्या संयोगाने बनलेला आहे. या आधारावर मंत्राचा सरळ संबंध केवळ लिपिबद्ध वर्णरचनेपेक्षा वर उठून अंतःकरणातील संवेदनाशी जोडला जात असतो. आपल्यामधील संवेदन शक्तीमुळे मानव सामान्य स्पंदात्मक स्वरूपाचे आंतररूपामध्ये मनन करून आपल्या आत्म्याच्या पशुतेच्या संकुचित स्तरापासून बरेच वर उठण्याच्या रूपामध्ये त्याचे पालन करू शकतो. शैवशब्दामध्ये संवेदनालाच "चित्त" असे म्हणतात. चित्ताच्या साहाय्यानेच सामान्य व्यवहारापासून ते परमतत्त्वाच्या स्वरूपाचे ज्ञान साधकाला होऊ शकते. प्रथम ही गोष्ट समजाविलेली आहे की, संवेदन, चित्त, मंत्र आणि विमर्श यांचे स्वरूप अंतःकरणातील आत्मस्फुरणेव्यतिरिक्त अन्य काहीही नाही. हे सर्व शब्द पर्यायवाची असल्यामुळे एकाच आत्मस्पंदनाचे किंवा आत्मस्फुरणाचे द्योतक आहेत.

या दृष्टीने शैव दार्शनिकांचा विचार मांडताना "**ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, "**हृदयं च नाम प्रतिष्ठास्थानमुच्यते, तच्च उक्तनीत्या जडानां चेतनं, तस्यापि प्रकाशात्मत्वं, तस्यापि विमर्शशक्तिः इति विश्वस्य परमे पदे तिष्ठतो विश्रान्तस्य इदमेव हृदयं विमर्शरूपं परमन्त्रात्मकं तत्र तत्र अभिधीयते ।।१.५.१४।।** याचा अर्थ असा आहे की, हृदयाला प्रतिष्ठान असे म्हणतात. ते स्थान जड आणि चेतन या दोघांचेही आहे. त्यालाही प्रकाशात्मकता आहे. हृदयाची विचारशक्ती विश्वाच्या परमपदामध्ये विश्रांतिस्थानरूप आहे

आणि हे विश्रांतिस्थान विमर्शरूप परमंत्रात्मक आहे. हे विश्रांतिस्थानच त्या त्या ठिकाणी कथन केले आहे. विमर्श किंवा आत्मस्पंदना हेच प्रत्येक भावाचे हृदय आहे; कारण सर्व भाव येथूनच बाहेर पडून किंवा यामधून बाहेर निघून अंततोगत्वा अर्थात् सर्वात शेवटी याच आत्मस्पंदनेमध्ये विश्रांतीही प्राप्त करून घेत असतात. श्रीमद् अभिनवगुप्तपादाचार्य यांच्या कथनानुसार जडाचे हृदय चेतन, चेतनाचे हृदय प्रकाश आणि प्रकाशाचे सार विमर्श किंवा ज्ञान आहे. विमर्शात्मक अर्थात् ज्ञानात्मक किंवा विचारात्मक आत्मस्फुरणा अर्थात् आत्मस्पंदना हाच परमंत्र अर्थात् सर्वश्रेष्ठ मंत्र आहे. "अहंविमर्श" अर्थात् आत्मज्ञान हे या सर्वश्रेष्ठ मंत्राचे खरे स्वरूप आहे.

आतापर्यंत ही गोष्ट स्पष्ट झाली की, **"मन्त्रश्चविमर्शनात्मा।। ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी १.५.१४।।"** अर्थात् मंत्र हे विमर्शरूप अर्थात् ज्ञानरूप असतात. अहंविमर्श अर्थात् आत्मज्ञान हे मंत्राचे खरे स्वरूप आहे. विमर्श अर्थात् विचार किंवा ज्ञान हा कोणत्या रूपामध्ये कार्यनिरत होतो हे पाहणे आवश्यक आहे. "शब्दना" किंवा "अभिलाप" हे कोणत्याही भूमिकेवर अवस्थित असलेल्या विमर्शाचे किंवा विचाराचे किंवा ज्ञानाचे खरे रूप आहे. शब्दविरहित विमर्शाच्या किंवा विचाराच्या अस्तित्त्वाची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. उच्चतम भूमिकेवर स्थित असलेल्या विमर्शात्मक किंवा विचारात्मक किंवा ज्ञानात्मक स्पंदनाला किंवा स्फुरणाला शास्त्रीय शब्दामध्ये **"परावाणी"** किंवा सर्वश्रेष्ठ वाणी असे म्हणतात. ही परावाणी किंवा आंतरशब्द हा एक स्पंदनामयी अर्थात् स्फुरण पावणारा शब्द असून त्याच्यामध्ये अनंत तसेच अतर्क्य स्थूल वाचक आणि वाच्यरूप शब्दसमूह मोराच्या अंडरसाच्या न्यायाने केवळ स्फुरणा या रूपातच स्थित आहेत. या भूमिकेमध्ये शब्दामध्ये कोणताही स्थूल वाच्यवाचकरूप विभाग नसल्यामुळे हा शब्द बीजरूप अर्थात् अहंरूपच आहे. सर्व मंत्र हे मुळात परावाणीरूपच आहेत.

परावाणी ही एक सामान्य स्पंद असून या स्पंदनेचे स्वरूप अगतिमय गती असे आहे आणि ही स्पंदना किंवा हे स्फुरण अचल आत्म्यामध्ये चलत्तेचा आभास करवीत असते. ही चलत्ता अर्थात् गती हीच परमेश्वराची ज्ञान-क्रियात्मक विमर्शना अर्थात् विचार किंवा ज्ञान आहे. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"एषैव**

**च किञ्चिद्रूपता यत् अचलमपि चलनाभासते।।१.५.१४।।"** याचा अर्थ असा आहे की, हेच किंचित् स्फुरण आहे. ते अचल असून चल भासते.

पराशब्द किंवा परावाणी बहिर्मुख प्रसाराच्या. प्रक्रियेमध्ये पश्यंती आणि मध्यमा अवस्थामधून प्रसृत होत आणि उत्तरोत्तर स्थूल होत होत वैखरी वाणीचे रूप धारण करीत असते. हा पराशब्द किंवा परावाणी "अ" पासून "क्ष" पर्यंत मातृका किंवा "न" पासून "फ" पर्यंत मालिनीच्या रूपामध्ये विकसित होत असते. (**टीप :-** संस्कृत वर्णमालेचा "अ" पासून "क्ष" पर्यंतचा क्रम हा आजही प्रचलित आहे. या क्रमाला शास्त्रीय शब्दामध्ये "मातृका" किंवा "पूर्वमालिनी" असे म्हणतात. **"स्वच्छंदतंत्र"** या ग्रंथामध्ये याच क्रमाचा स्वीकार केलेला आहे. याउलट **"मालिनी-विजयोत्तरतंत्र"** या ग्रंथामध्ये वर्णमालेला "न" पासून "फ" पर्यंत दुसऱ्या क्रमातही ठेवलेले आहे. या वर्णमालेचे शास्त्रीय नाव "मालिनी" आहे. हा क्रम पुढीलप्रमाणे आहे, न, ऋ, ॠ, लृ, ॡ, थ, च, ध, ई, ण, उ, ऊ, ब, क, ख, ग, घ, ङ, इ, अ, व, भ, य, ड, ढ, ठ, झ, ज, र, ट, प, छ, ल, आ, स, अः, ह, ष, क्ष, भ, श, अं, न, ए, ऐ, ओ, औ, द, फ.) या दृष्टीने पाहिले असता अनेक शास्त्रामध्ये लिहिले गेलेले केवळ विशिष्ट वर्ण हे रचनात्मक मंत्रच नाही तर प्रत्येक शब्द वर्ण, मात्रा अर्थात् मुखाने उच्चारल्या जाणाऱ्या प्रत्येक ध्वनीला "मंत्र" असे म्हणतात. या वैखरीरूप स्थूल ध्वनीच्या पृष्ठभूमीमध्येही तो आंतरविमर्शच अर्थात् आंतरज्ञान कार्यनिरत होत असते. हेच कारण आहे की, सामान्य सांसारिक आदान-प्रदानामध्येही अर्थात् देवाण-घेवाणीमध्ये मुखाने उच्चारिलेले ध्वनी विचित्र प्रकारच्या प्रभावांना उत्पन्न करू शकतात. ही गोष्ट स्पष्ट आहे की, जेव्हा केवळ स्पंदशक्तीचाच विकास झाल्यामुळे सामान्यातील सामान्य वर्णामध्ये कधी कधी कल्पनातीत गोंधळ उत्पन्न करण्याची क्षमता असते तर मंत्रामध्ये अशी शक्ती का असणार नाही? या दृष्टीने **"श्रीशिवसूत्रविमर्शिनी"** या ग्रंथामध्ये **"तंत्रसद्भाव"** या ग्रंथातील वचन उद्धृत करताना असे म्हटले आहे की-

**"सर्वे वर्णात्मका मन्त्रास्ते च शक्त्यात्मकाः प्रिये।।२.३।।"**

याचा अर्थ असा आहे की, प्रत्यक्षात सर्व वर्ण पररूप अर्थात् श्रीशिवरूप असून त्या वर्णापासून बनलेले मंत्र हे शक्तिरूप आहेत.

तंत्रशास्त्रामध्ये अनेक प्रकारच्या मंत्रांचा उल्लेख मिळतो. याबरोबर तेथे या मंत्रांपासून विशेष प्रभाव उत्पन्न करण्यासाठी मंत्रांचे उच्चारण, जपाच्या विशेष पद्धती आणि जपाला अनुकूल असलेले विशेष वातावरण तसेच देश-काल यांची समग्र माहिती दिलेली आहे. अनुभवी श्रीगुरूंचे म्हणणे असे आहे की, शास्त्रामध्ये वर्णिलेल्या नियमांचे जसेच्या तसे पालन करीत मंत्रांचा अभ्यास केल्यास ते मंत्र मनोवांछित प्रभाव उत्पन्न करीत असतात. यात अट इतकीच आहे की, मंत्रशक्तीचा प्रयोग करण्याआधी साधकाला आत्मशक्तीची अनुभूती येणे आवश्यक आहे.

या दृष्टीने "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकाग्रंथामध्ये "**तंत्रसद्भाव**" या ग्रंथातील वचन उद्धृत करताना असे म्हटले आहे की -

**मन्त्राणां जीवभूता तु या स्मृता शक्तिरव्यया।**
**तया हीना वरारोहे, निष्फलाः शरदभ्रवत्।।२.१।।**

याचा अर्थ असा आहे की, मंत्राची प्राणभूत अशी जी पूर्ण "अहं" विचाररूप संविच्छक्ती आहे ती शाश्वत आहे. हे सुंदरी! या संविच्छक्ती-वाचून मंत्राला शारदीय मेघाप्रमाणे निष्फलत्व असते.

मंत्रामध्ये स्पंदात्मक बळ स्वभावानेच अंतर्निहित झालेले असते. मात्र पशूच्या म्हणजे जीवाच्या चित्ताच्या निर्मळतेवर दूषित विकल्पांचे आवरण तयार झालेले असते एवढी एकच गोष्ट येथे कमी असते किंवा त्याची त्रुटी असते. यामुळे या पशूंना आपल्या शक्तीची ओळख नसते. आत्मबळाच्या विस्मृतीच्या अवस्थेमध्ये मंत्राचे वीर्यहीन किंवा शक्तिहीन होणे स्वाभाविक आहे आणि पुनःपुन्हा अनेक वेळा उच्चारण करूनही शरदऋतूतील ढगाप्रमाणे या मंत्रापासून कोणतेही अभीष्ट फळ प्राप्त होऊ शकत नाही.

"**तस्यानुसन्धानम् ..... मन्त्रवीर्यस्यानुभवः।। श्रीशिवसूत्रविमर्शिनी १.२२।।** यावरून स्वरूपाच्या स्पंदमयतेचे सतत अनुसंधान करण्याच्या भगीरथ प्रयत्नामुळे योग्यांना मंत्रशक्तीचा अनुभव येत असतो. अन्यथा योग्यांना मंत्रशक्तीचा अनुभव येऊ शकत नाही. "**शक्तिः मन्त्रवीर्य-स्फाररूपा।। श्रीशिवसूत्र २.१ उपक्रमणिका।।**" अर्थात् शक्ती ही मंत्रवीर्याची स्फुरणकर्त्री आहे. यावरून प्रत्यक्षात् स्वरूपाचा विकास हाच आत्मशक्तीचा विकास आहे, असे समजणे आवश्यक आहे. "**स्वात्म-रूपतया स्फुरणं भवति।। श्रीशिवसूत्रविमर्शिनी १.२२।।** यावरून अंतःअनुसंधान परिपक्व झाल्यावर मंत्राच्या केवळ उच्चारणानेच अभीष्ट अर्थात् इच्छित परिणाम

प्राप्त होत असतात; कारण अशा अवस्थेमध्ये मंत्रशक्ती ही स्वतःच्या आत्मशक्तीमध्ये स्फुरित होत असते.

अंतःअनुसंधानाची अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी सर्वप्रथम आपल्या चित्ताला निर्मळ बनविणे ही एक मौलिक आवश्यकता आहे; कारण निर्मळ चित्तामध्येच स्वरूपाचा प्रकाशपुंज अखंडरूपामध्ये प्रतिबिंबित होत असतो. हे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी पूर्वी वर्णिलेली विकल्पसंस्काराची युक्ती हाच सरलतम उपाय आहे; कारण या अवस्थेमध्ये अन्य उपायांसाठी आवश्यक अशा कठीण शास्त्रीय विधि-विधानांचे पालन करण्याची माथेफोड करावी लागत नाही. याआधी हे सांगितलेले आहे की, उत्सुक व्यक्ती ही दैनंदिन आदानप्रदान करीत असतानाही आपल्या मानसिक संतुलनावर दृढ नियंत्रण ठेवून हळूहळू सद्विमर्शाच्या अर्थात् सद्विचाराच्या द्वारा चित्तातील कुत्सित अर्थात् दूषित विकल्पांचा बहिष्कार करू शकते अर्थात् विकल्प दूर करू शकते. विकल्पांचा संस्कार केल्यामुळे भावना निर्मळ होतात आणि परिणामतः मनामध्ये स्वयं शुद्धविद्येचा उदय होत असतो. मनामध्ये शुद्धविद्येचा स्वर्णिम अर्थात् सुवर्णमय आलोक अर्थात् प्रकाश याचा उदय होताच साधकाला मंत्रशक्तीची अनुभूती येत असते. या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**नियतिप्राणतायोगात्सामग्रीतस्तु यद्यपि।**
**सिद्धयो भाववैमल्यं तथापि निखिलोत्तमम्।।३.११०।।**
**उक्तं श्रीसारशास्त्रे च निर्विकल्पो हि सिद्ध्यति।**
**क्लिश्यन्ते सविकल्पास्तु कल्पोक्तेऽपि कृते सति।।११२।।**
**'तदाक्रम्य बलं मन्त्रा'- अयमेवोदयः स्फुटः।**
**इत्यादिभिः स्पन्दवाक्यैरेतदेव निरूपितम्।।११३।।**

याचा अर्थ असा आहे की, जरी योगामुळे प्राणांचे नियमन आदि होत असले तरी सिद्धीसाठी भावांची विशुद्धता हीच सर्वात उत्तम गोष्ट आहे. **"श्रीसारशास्त्र"** या ग्रंथात असेच म्हटले आहे की, निर्विकल्प अर्थात् विकल्पांनीरहित असे मंत्र सिद्धिप्रद जातात. योग्य नियमांचे पालन करूनही जर ते मंत्र सविकल्प असतील तर ते नष्ट होतात. **तदाक्रम्य बलं मन्त्राः।** (कारिका २६) व **"अयमेवोदयः स्फुटः।** (कारिका ३१)" या स्पंदशास्त्रातील वचनांनी हेच स्पष्ट केले आहे.

या संबंधामध्ये भगवान् श्रीमद् अभिनवगुप्तपादाचार्यांनी आपल्या **"तंत्रालोक"** या ग्रंथामध्ये भावनेच्या स्वच्छतेची अर्थात् निर्मळपणाची वारंवार प्रशंसा केलेली आहे. श्रीमद् अभिनवगुप्तपादाचार्यांनी या महान् ग्रंथामध्ये एका ठिकाणी श्रीमालिनीविजयाच्या प्रमाणवाक्याचा संदर्भ देऊन **"तदाक्रम्य ....."** इत्यादि प्रस्तुत सूत्रांचा असा अर्थ केलेला आहे की, **आत्मोद्धार करण्याच्या दुर्गम अर्थात् चालण्यास अत्यंत कठीण अशा मार्गाला पार करण्यासाठी भावनेच्या निर्मळपणापेक्षा अधिक कोणतीही साहाय्यक सामग्री उपयोगी बनू शकत नाही.** फलस्वरूप मंत्रशक्तीचा अनुभव घेण्यासाठी असणारा सरळ आणि प्रभावी उपाय "विकल्प संस्कार" हाच आहे.

आता वर ज्या शुद्धविद्येचा उल्लेख केला गेलेला आहे त्याच्या संबंधामध्ये येथे थोडे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. छत्तीस तत्त्वामध्ये ईश्वरतत्त्वाच्या खाली आणि मायातत्त्वाच्या वर असलेल्या तत्त्वाला "शुद्धविद्यातत्त्व" असे म्हणतात. या प्रकरणामध्ये शुद्धविद्या या शब्दाचा अर्थ "शुद्धविमर्श" असा आहे. शुद्ध विद्येचा उदय होताच योग्याच्या हृदयामध्ये सर्वज्ञता, सर्वकर्तृता इत्यादि सहा माहेश्वरधर्म हे स्वयं चमकून उठतात. शैवशास्त्री लोकांनी प्रस्तुत विद्या शब्दाची व्युत्पत्ती लाभार्थक विद्लृ धातू, विचारार्थक "विद्" धातू आणि ज्ञानार्थ "विद्" धातू या धातूपासून झालेली आहे असे मानून याचे विवरण पुढीलप्रमाणे केलेले आहे. **(स्वच्छन्दोद्योतः ४.३९५-९६)**

१) **विद्या :-** (लाभार्थ विद्लृ धातू) विमर्शाची ही उच्चतम भूमिका असून ही भूमिका विकसित झाल्याने योग्याला सर्वज्ञता इत्यादि श्रीशिवधर्मांचा सहजपणे लाभ होत असतो.

२) **विद्या :-** (विचारार्थक "विद्" धातू) विमर्शाची ही उच्चतम भूमिका विकसित झाल्यावर योग्यामध्ये अकस्मात् हा विचार उत्पन्न होतो की, "मी अनादिधर्मा आहे अर्थात् माझा धर्म अनादि हा आहे अर्थात् स्वातंत्र्यशक्ती हाच माझा खरा स्वभाव आहे."

३) **विद्या :-** (ज्ञानार्थक "विद्" धातू) योगिसंवेदनाच्या या अवस्थेला पोहोचल्यावर योग्याला असे ज्ञान होते की, प्रत्यक्षात मी स्वयं शक्तिकेंद्र श्रीशिव आहे आणि हे संपूर्ण विश्व माझ्याच स्वरूपाची केवळ स्पंदना आहे.

संवेदानाच्या या तीव्र अवस्थेला शास्त्रीय शब्दामध्ये "उन्मना" अवस्था असे म्हणतात.

फलतः सूत्रकाराच्या मतानुसार असा निष्कर्ष निघतो की, योग्याचे संवेदन परिपक्व झाल्यावर मंत्राचे उच्चारण करताच त्या योग्याचे चित्त, मंत्र आणि मंत्रदेवता यांची सघन एकाकारता होत असते. अशा वेळी मंत्र हा लिहिलेल्या वर्णाची विशेष रचना न राहता एक अशी अमोघ शक्ती बनत असतो की, या मंत्रापासून कोणतेही अभीष्ट फळ अवश्य प्राप्त केले जाऊ शकते.।।२६ व २७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

## : श्रीक्षेमराज श्रीस्पंदनिर्णयटीका प्रस्तावना :

## सहजविद्योदय

अशा प्रकारे प्रथमनिष्यंदात स्वस्वरूपात्मक, तर्कांनी सिद्ध होणारे, अभिज्ञानासह निमीलनसमाधीचे ज्ञान करून देणारे हे स्पंदतत्त्व प्रतिपादिले. ज्याप्रमाणे सतत त्या स्वरूपाच्या साक्षात्काराने सुप्रबुद्धता पूर्वीच सूचित केलेली होती त्याचप्रमाणे आता त्याचेच वैश्वात्म्य उन्मीलन समाधीद्वारा तर्कांनी निर्णय करण्यासाठी सर्वत्र चिदभेद अर्थात् चैतन्याचा अभेद व्यक्त करणारा "**सहजविद्योदय**" नावाचा हा द्वितीय निष्यंद "**तदाक्रम्य**" पासून "**शिवसद्भावदायिनी**" येथपर्यंतच्या सात श्लोकात निरूपित केला आहे.

विश्व हे शुद्ध आणि अशुद्ध अशा दोन प्रकारचे आहे. त्यापैकी दोन श्लोकांमध्ये शुद्ध विश्व मंत्रांच्या स्वरूपाचे असून तेथेच उत्पन्न होऊन व मंत्रमय होऊन ते त्या मंत्रामध्येच विश्रांती घेते असे वर्णन केले आहे. दुसऱ्या दोन श्लोकांमध्ये अशुद्ध विश्वही मंत्रमयच आहे असे सांगितले आहे. त्या स्पंदतत्त्वाच्या ज्ञानावर अधिरूढ झालेला अर्थात् स्पंदतत्त्वाचे ज्ञान झालेला मनुष्य जीवन्मुक्त होतो असे पुढच्या श्लोकात सांगितले आहे. या तत्त्वाच्या साक्षात्कारामुळेच साधकांनी इच्छिलेली गोष्ट सिद्ध होते असे पुढील दोन श्लोकात सांगितलेले आहे.

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

**"यत्र स्थितमिदं कार्यं यस्माच्च निर्गतम्।। स्पंदकारिका २।।"** यामध्ये प्रतिपादिलेल्या शुद्ध मंत्रादिरूपापासूनच सर्व उत्पत्ती होते, तेथेच

स्थिर होते आणि सर्व तेथेच लीन होते असे सांगितले. हे प्रथम निष्यंदात सांगितलेलेच दृष्टान्त देऊन निरूपित करतात.

**स्पष्टीकरण :-** ते स्पंदतत्त्वात्मक बल म्हणजेच प्राणरूप वीर्य यांना प्राप्त करून त्याचा अभेदत्वाने आश्रय घेऊन पवित्र, पूजनीय, अनंत आणि व्योमव्यापी इत्यादि मंत्र सर्वज्ञ सामर्थ्याने श्लाघ्यतेने अर्थात् प्रतिष्ठेने व जृंभतेने म्हणजे विस्तारपूर्वक किंवा सामर्थ्याने अधिकारासाठी देहधारींमध्ये प्रवर्तित होतात अर्थातच ते सृष्टी, संहार, तिरोधान, अनुग्रह इत्यादि कार्ये करतात. "सर्वज्ञ" शब्द हा क्रियाप्रधान असून सर्वकर्तृत्वादींना चिह्नित करतो. ज्याप्रमाणे देहधारींची इंद्रिये उपपादन केल्याप्रमाणे त्या सामर्थ्याचा आधार घेऊन विषयांच्या प्रकाशनात प्रवर्तित होतात त्याप्रमाणे निरंजन म्हणजेच सर्व कृत आणि कृत्य यांच्या मलाच्या अधिकारत्वापासून निवृत्त झालेले अर्थात् शुद्ध व शांत अशा आत्मस्वरूप स्पंदात्मक बलामध्ये योग्य प्रकारच्या अभेदापत्तीने व प्रकर्षाने पुनरावृत्ती न होता लीन होतात म्हणजेच आराधक अर्थात् उपासना करणाऱ्या लोकांच्या ज्ञानासह अधिकार मलापासून मुक्त होतात. यासंबंधी **"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**अनुगृह्याणुसङ्घातं याताः पदमनामयम्।।१।४१।।**

**अर्थ :-** जीवांच्या समूहावर कृपा करून अनामय अर्थात् रोगरहित स्थानाला जाणारे हे मंत्र आणि मंत्रेश्वर परमेश्वर श्रीशिवांशी संबंधी धर्म अर्थात् श्रीशिवांच्या स्वभावाचे आहेत आणि ते सर्वसाधारण सामान्य-स्पंदांशी एकरूप असतात; कारण ते त्या स्पंदतत्त्वापासून उत्पन्न होतात व त्यांच्या सामर्थ्याने विसर्जित झालेले तेथेच लीन होतात.

## प्रतिपक्षाचा आक्षेप

यावर प्रतिपक्षी असे म्हणतो की, जर इंद्रिये आणि मंत्र त्या एकाच तत्त्वापासून निर्माण इत्यादि होत असतील तर मग इंद्रियांचेही स्वरूप सर्वज्ञादि का नाही? या शंकेचे उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की, परमेश्वर मायाशक्तीने एकेक किंवा भेदमय असे शरीर आणि इंद्रिये बनवितो आणि विद्याशक्तीने वेगवेगळ्या देवतांचे ज्ञान देणाऱ्या मंत्रांना उत्पन्न करतो. वाचकाच्या मायावस्थेतही

**घटोऽयमित्यध्यवसा नामरूपातिरेकिणी।**
**परेशशक्तिरात्मेव भासते न त्विदन्तया।।१।५।२०।।**

**अर्थ :-** "हा घट आहे" हा जो निश्चय तो परेश शक्तिरूप आत्म्यात भासतो; परंतु इदंतेमध्ये कधीही भासत नाही, कारण तो नाम आणि रूप यांच्यापलीकडे आहे," असे **"प्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात सांगितलेल्या नीतीनुसार प्रमात्याच्या अवस्थेपासून खालच्या पायरीवर येत नाही आणि त्या मंत्रांच्या ठिकाणी शरीर किंवा पुर्यष्टकाप्रमाणे बोधसंकोचत्व म्हणजेच संकुचित ज्ञान नसते. त्यामुळे मंत्र सर्वज्ञत्वादि गुणांनी युक्त असतात हे म्हणणे योग्यच आहे. ह्याचे संपूर्ण स्पष्टीकरण **"भेदे त्वेकरसे भाते"** अर्थात् एकरसामध्ये भेदाचा आभास होताना .....। या **"प्रत्यभिज्ञा-कारिका"** या ग्रंथाच्या टीकेत सांगितले आहे. अशा प्रकारे विद्ये (ज्ञाना)च्या स्थानी स्थिर राहून सृष्ट्यादि कार्ये करणाऱ्या अनंतभट्टारक इत्यादींच्या अपेक्षेनुसार या कारिकेची व्याख्या केली पाहिजे.

## कारिकेचे दुसरे स्पष्टीकरण

दीक्षा देण्यासाठी प्रवृत्त झालेल्या आचार्यादींचे करणरूप सर्व मंत्र त्या स्पंदतत्त्वरूप सामर्थ्याला प्राप्त करून अनुप्राणकत्वाने अर्थात् त्या स्पंदतत्त्वात समाविष्ट होऊन आचार्यादींशी संबंधित झालेल्या आराधकाच्या चित्तासह मोक्ष आणि मोक्ष मिळविण्याच्या साधनेचा अधिकार मिळविण्यासाठी प्रवृत्त होतात. तेथेच "शांत" शब्दात्मक शरीररूप असल्याने आणि त्याचमुळे निरंजन व शुद्ध असणारे साधकयोगी योग्य प्रकाराने प्रलीन होतात अर्थात् तेथेच विश्रांती घेतात. या व्याख्यानामध्ये **"सहाराधक चित्तेन"** हे पूर्वश्लोकातून योजावे. अशा प्रकारे स्पंदतत्त्व हे उदय आणि प्रलय यांच्यासाठी प्रवृत्त झालेले असूनही मंत्राचा आधार म्हणून काम करते.

अशा रीतीने दहा, अठरा इत्यादि भिन्न प्रकार असणाऱ्या शैव मतामध्ये मंत्राचे सार हे स्पंदतत्त्वच आहे असे सांगितले.।।२६ व २७।।

❋❋❋❋❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

संसार हा शुद्ध आणि अशुद्ध भेदानें दोन प्रकारचा आहे. शुद्ध हा

मंत्रादिस्वरूप असून अशुद्ध त्याच्या व्यतिरिक्त असतो. विश्वाभिमानापासून विरक्त झालेले अर्थात् विश्वाभिमान गळालेले शास्त्रामध्ये **"जीवन्मुक्त"** या शब्दाने संबोधिले जातात. ज्याप्रकारचे स्पंदाचे स्वाभाविक स्वरूप असते तेच स्वरूप साधकांची अभीष्ट सिद्धी होय. मंत्रादिरूप असे जे विश्वाचे विशुद्ध स्वरूप आहे त्यापासून सर्व (जग) उत्पन्न झालेले आहे, त्याच्या बलानेच प्रकाशमान आहे आणि त्याचठिकाणी शांत होते. आता हे सर्व दृष्टान्तद्वारा **"तदाक्रम्य बलं मन्त्राः .....।।२६।।"** व **"तत्रैव संप्रलीयन्ते .....।।२७।।"** या कारिकांनी निरूपण करतात. या कारिकेत तत् या शब्दाने अलौकिक व अनुत्तर स्पंदरूप सांगितले असून त्याने युक्त असे बल अर्थात् वीर्य, अभेदाने आश्रयरूपाने राहून सर्वही मंत्र विद्यमान असतात. तेथे मंत्र सर्वज्ञत्व, सर्वकर्तृत्त्वादि सामर्थ्यद्वारा शरीरधारी प्राण्यांच्या अधिकारप्राप्तीसाठी प्रवर्तित होतात. हे मंत्र सृष्टि-स्थिति-संहार-तिरोधानअनुग्रहादिरूप कार्य करतात. ज्याप्रमाणे देहधारी मनुष्याची चक्षू आदि इंद्रिये त्या त्या विषयांशी एकरूप होऊन मानसवृत्तीला प्राप्त होऊन विषयांच्या प्रकाशनात समर्थ बनतात त्याचप्रमाणे अज्ञानात्मक काजळाने रहित अभेदभूमिकेला प्राप्त झालेले अर्थात् मी व परमात्मा एकच आहे हा अभेद समजलेले विद्वान् लोक कृतार्थतेला प्राप्त होऊन तशा प्रकारच्या मंत्रबलाने युक्त होऊन स्पंदरूप बलामुळे सम्यक् रूपाप्रत नेले जातात अर्थात् सर्व प्रकारच्या मलापासून मुक्त होतात. ते आराधक-मनाने उपासनात्मकसंवेदनासह युक्त होतात; कारण या परमकारणापासून हे मंत्र उत्पन्न होतात आणि त्यांच्या सामर्थ्यानेच ते सर्व मंत्रादि परमेश्वरात विलीन होतात. या स्थितीत मंत्र आणि त्यांचे अधिपती श्रीपरमेश्वराच्या म्हणजेच स्पंदात्मक श्रीपरमशिवाच्या स्वभावभूत होऊन सामान्यस्पंदाचे सारभूतच होतात. जरी करणे अर्थात् इंद्रिये दोन्हीही लोकांतर स्पंदत्त्वामुळे उत्पन्न होत असली तरीही इंद्रियांमध्ये परमेश्वराच्या मायाशक्तीने अभेदरूपाने इंद्रिये उत्पन्न होत असल्यामुळेच त्या इंद्रियांच्या ठिकाणी सर्वज्ञत्वसर्व-कर्तृत्व शक्ती राहत नाही. मंत्र मात्र विद्याशक्तीने उत्पन्न होतात. त्यामुळेच मंत्रांच्या ठिकाणी सर्वज्ञत्व-सर्वकर्तृत्व शक्ती असते. त्यामुळे त्यांचे (मंत्रांचे) श्रीशिवधर्मित्व स्वभावतःच उत्पन्न होते. हे मंत्र आराधकाच्या विधेयांच्या सांसरिक भोग वासना दूर करून शांतशुद्धचिद्रूपनिरंजनात्मक चिदाकाशात स्थित म्हणजेच स्थिर राहतात. साधक मंत्रांच्या सामर्थ्याने

मायीयसंबद्ध गोष्टींशी युक्त होत नाहीत. केवळ साधकच अनुत्तरपरमतत्त्वात विलीन **होतो असे** नाही तर त्याच्याबरोबर मंत्रही अनुत्तर परमतत्त्वात विलीन होतात. अशा स्थितीत त्रिकशास्त्रामध्ये मंत्रांची श्रीभगवान् परमशिवस्वरूपाशी अभिन्नता स्वीकारलेली आहे.।।२६ व २७।।

**इति राजानकश्रीरामविरचितायां स्पन्दविवृतौ व्यतिरिक्तस्वभावोपलब्धिर्नाम द्वितीयो निष्यन्दः।।२।।**

अशाप्रकारे श्रीरामाकंठाचार्यांनी रचलेल्या स्पंदविवृती या टीकाग्रंथातला "व्यतिरिक्तस्वभावोपलब्धि" या नावाचा दुसरा निष्यंद संपला. ।।२।।

*****

# तिसरा प्रवाह
# निःष्पंद तिसरा

## विश्वस्वभावशक्त्युपपत्ती

**यस्मात्सर्वमयो जीवः सर्वभावसमुद्भवात्।**
**तत्संवेदनरूपेण तादात्म्यप्रतिपत्तितः।।२८।।**

**अन्वयार्थ :-**

**यस्मात्** - ज्या अर्थी, ज्याच्यामुळे, **जीवः** - आत्मा - पशू -प्रमाता, **सर्वभावसमुद्भवात्** - सर्व घट, पट इत्यादि पदार्थ आणि सुख, दुःख इत्यादि भावनात्मक विषय या भावांची उत्पत्ती झाल्यामुळे, **तत्संवेदन-रूपेण**- त्या त्या भावांच्या जाणीवेच्या, ज्ञानाच्या रूपाने, त्यांच्या अनुभूतीमुळे होणाऱ्या संवेदनांच्या रूपाने, **तादात्म्यप्रति-पत्तितः**- त्या त्या विषयाशी तादात्म्यभावनेमुळे, (जीव हा) **सर्वमयः** - सर्व विश्वमय आहे.।।२८।।

**तेन शब्दार्थचिन्तासु न साऽवस्था न यः शिवः।**
**भोक्तैव भोग्यभावेन सदा सर्वत्र संस्थितः।।२९।।**

**अन्वयार्थ :-**

**तेन** - (श्रीक्षेमराज पाठ, **तस्मात्**) - त्यामुळे, (आत्मस्वरूप विश्वमय असल्यामुळे), **शब्दार्थचिन्तासु** - शब्द व अर्थ, वाचक व वाच्य यांच्या संवेदनात वा विचारात (**चिन्तासु - विकल्पज्ञानादिरूपासु** - श्रीक्षेमराज), **न सा अवस्था** - "आदि, मध्य व अंत या सर्व अवस्थांमध्ये" (श्रीक्षेमराज), अशी एकही अवस्था नाही की, **न यः शिवः** - जी ती श्रीशिवरूपच नाही. (वस्तुतः प्रत्येक ठिकाणी) **भोक्ता एव** - भोक्ता, आत्मा, वेदक सत्ताच केवळ, **भोग्य-भावेन** - भोग्य पदार्थरूपाने, वेद्यसत्तेच्या रूपाने, **सदा** - नेहमी, **सर्वत्र** - सर्व ठिकाणी, **संस्थितः** - अवस्थित, विद्यमान आहे.।।२९।।

**इति वा यस्य संवित्तिः क्रीडात्वेनाखिलं जगत्।**
**स पश्यन् सततं युक्तो जीवन्मुक्तो न संशयः।।३०।।**

**अन्वयार्थ :-**

**इति वा** - अशाप्रमाणे, **यस्य संवित्तिः** - ज्याला हे सर्व जग

आत्मस्वरूप, "मन्मय" आहे असा स्वानुभव येतो, अशी ज्याची अनुभूती आहे, **सः** - तो, **अखिलं जगत्** - सर्व विश्व, **क्रीडात्वेन पश्यन्** - ही आपली लीला आहे असे पाहणारा-जाणणारा, **सततं युक्त** - नेहमी आंतरिक - ईश्वरी सत्तेशी युक्त असल्यामुळे, **सः** - तो पुरुष, **जीवन्मुक्तो न संशयः** - जीवन्मुक्त असतो यात संशय नाही.।।३०।।

**सूत्र क्रमांक २८ अर्थ :-** जीव किंवा पशुप्रमाता हा सर्वमय आहे; कारण हा जीव किंवा पशुप्रमाता पतिप्रमात्याप्रमाणे किंवा परमेश्वराप्रमाणे संसारामधील अर्थात् जगतामधील सर्व घट, सुख इत्यादि भावांसह संवेदनात्मक तादात्म्य प्राप्त करून घेऊन त्यांची सर्जना किंवा सृष्टी करीत असतो. (स्पंदशास्त्रामध्ये "सृष्टी" या शब्दाचा अर्थ सृष्टी, स्थिती, संहार, पिधान आणि अनुग्रह ही पाच कृत्ये असा केलेला आहे.)

**सूत्र क्रमांक २९ अर्थ :-** यामुळे सर्व वाचक अर्थात् जीव आणि वाच्य अर्थात् ज्ञेय अशा पदार्थाच्या संवेदनाची कोणतीही अशी अवस्था नाही, जी श्रीशिवरूप नाही. खरी स्थिती अशी आहे की, प्रत्येक ठिकाणी भोक्ता अर्थात् भोग घेणारा आत्मा हाच भोग्य अर्थात् भोग घेण्यास योग्य अशा प्रमेय पदार्थांच्या रूपामध्ये उल्हसित किंवा आनंदित होऊन शाश्वतरूपाने राहिलेला आहे.

**सूत्र क्रमांक ३० अर्थ :-** अशा प्रकारे ज्याला हे सर्व जग संवित् आत्मस्वरूप अर्थात् मन्मय किंवा चिन्मय आहे असा स्वानुभव येतो तो हे सर्व विश्व ही आपली लीला आहे असे जाणतो. अशा प्रकारे आपल्या आंतरिक ईश्वरी सत्तेशी तो पुरुष नेहमी युक्त असल्यामुळे जीवन्मुक्त असतो यात काहीही संशय नाही.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :- (कारिका क्रमांक २८ ते ३०)**

मागील प्रवाहात सांगितल्याप्रमाणे अभ्यास करणारा साधकोत्तम हा जीवन्मुक्तच असतो; कारण तो सतत सर्वावस्थेमध्ये एक क्षणसुद्धा वाया न घालविता श्रीपरमशिवस्थितीत जागृत राहतो. पदार्थमात्राच्या ठिकाणी श्रीपरमशिवच आहे. परिशीलनामध्ये एकाग्रचित्ताने जागृत असल्याकारणाने देह, प्राण, इंद्रिये ही असली तरीसुद्धा तो मुक्तच असतो. "मी सर्वव्यापी, सर्वात्मक, सर्वेश्वर व स्वतंत्र असा परमात्मा आहे," असा

दृढ अभ्यास करीत असल्याने त्या जीवाच्या आड जन्ममरणादि गोष्टी येणेच शक्य नसते; यात काहीही संशय नाही. कारण युक्तिवादाने व अनुभवाने त्याचे हे ज्ञान सतत दृढ झालेले असते. मग शब्दाची वृत्ती उठो अगर पदार्थाची वृत्ती उठो, श्रीपरमशिवाखेरीज त्याच्या मनात दुसरी कल्पनाच उठू शकत नाही. परमात्मा हा भोग्य व भोक्ता या रूपाने नटला आहे अशी जागृती त्याला नेहमीच असते. "अनंत वस्तूंनी चित्रविचित्र असलेले हे जग मी स्वतः क्रीडा करण्याकरिता लीलामात्राने निर्माण केले आहे," अशा रीतीने साधक सर्व जगाला साक्षिरूपाने पाहत असतो. इतर जीवांना स्वतःच्या चैतन्यस्वरूपाची जागृती ठेवण्याचे विमल ज्ञान झालेले नसल्याने व त्यांची विज्ञान-दृष्टी न उघडल्यामुळे हे विश्व आपणाहून व सर्व पदार्थांहून वेगळे आहे व त्यांना उत्पन्न करणारा दुसराच कोणी कारण आहे असे ते मानीत असतात. या अशा द्वैताच्या भावनेमुळे व स्वस्वरूपाला विसरल्यामुळे हर्ष, शोक वगैरे विकार त्याला बाधक होऊन तो संसारचक्राच्या व जन्ममरणाच्या बंधनात पडतो.

जो कोणी आत्तापर्यंत वर्णन केलेल्या प्रबुद्धांच्या उपदेशामुळे आपणामध्ये आत्म्याच्या जागृतीचे ज्ञान उत्पन्न करून घेतो त्याची स्थिती खेळाडूप्रमाणे होते. एखादा खेळाडू खेळ करीत असताना स्वतःच भय व क्रोध निर्माण करून त्याप्रमाणे व्यवहार करीत असताना आपणच हे निर्माण केले आहे याचे यथार्थ ज्ञान त्याला असते. त्यामुळे भय व क्रोधादिक विकारांचा परिणाम त्याच्यावर यत्किंचितही होत नाही. जो कोणी अहंता ममतादि सर्व विकार मी माझ्या पराहंतारूपी शक्तीच्या रूपाने निर्माण केले आहेत अशी जागृती ठेवील त्याची स्थिती भय व क्रोधादिक विकारांनी यत्किंचितही विकार पावत नाही. सर्वांतर्यामी परमात्म्यासकट सर्व माझ्या लीला आहेत असे साक्षिरूपाने जो पाहत राहतो तो जीवन्मुक्त स्थिती भोगतो; कारण शब्द व विषय यांची वृत्ती उठताच तो आपल्या श्रीशिवावस्थेला ढासळूच देत नाही. अशा रीतीने जो सर्वावस्थेत जागृत राहतो तो जीवन्मुक्त समजावा.

शब्द म्हणजे काय? पदार्थांचे ज्ञान करून देणाऱ्या समुदायास शब्द असे म्हणतात. अर्थ म्हणजे काय? अनेक पदार्थांचे नाव धारण करणाऱ्या वस्तूला अर्थ असे म्हणतात. चिंता म्हणजे काय? त्याच्या संबंधी कल्पना करणाऱ्या वस्तूला चिंता असे म्हणतात. विकल्प म्हणजे काय? कल्पना

करणाऱ्या विचित्र वस्तूंच्या ज्ञानाला विकल्प असे म्हणतात. अशा रीतीच्या व्यवहाराला शब्दाचे ज्ञान असे म्हणतात. अर्थाचे ज्ञान त्यावरच अवलंबून आहे. **ज्ञान म्हणजे साक्षात् श्रीपरशिवांचे स्वरूप होय.** अशी स्थिती असल्यामुळे भोक्ता किंवा अनुभविता ज्याला म्हणतात तो नित्य सर्वावस्थेत भोग्यभावामध्ये सुद्धा अनुभवीत वस्तू तोच बनलेला असतो. भोग्य म्हणजे दुसरा कोणी आहे व भोक्ता कोणी तिसराच आहे असे मुळीच नाही. जर श्रीपरमशिवावस्थेचा विचार जागृत ठेवला नाही तरच भोग्य व भोक्ता हे निराळे ज्ञान असू शकेल. जीवाला देहाचे ज्ञान झाल्याबरोबर जीव स्वतःला देहरूप समजू लागतो. त्याचप्रमाणे ज्या ज्या पदार्थांचे व शब्दांचे ज्ञान होते त्यावेळेस तो तद्रूप होत असतो. यामुळे आपण सर्वमय होऊ शकतो. कोणत्याही विषयाचे अगोदर ज्ञान, नंतर भावना व शेवटी उन्नती होत असते. ज्यावेळेस ते ज्ञान होते त्यावेळेस ती वस्तू परब्रह्मरूप बनलेली असते. ही ज्ञानाची जी अवस्था तीच प्रकाशाची अवस्था असते. ज्यावेळी जीवाला आपण स्वतःला हातपाय इत्यादि अवयवांनी युक्त आहोत असे वाटते त्याक्षणी तो जीव देही बनतो. जीव हा देहाहून निराळा असून त्याच्याशी तादात्म्य पावला की, देहरूप बनतो. नाहीतर देहाचे व जीवाचे गुणधर्म अगदी भिन्न आहेत. **जीव चैतन्यरूप असून देह जड आहे; परंतु जितके ज्ञान त्याला झालेले असते तितका तितका तो तद्रूप बनतो.**

**जीव-आत्मा हा बोद्धा म्हणजे जाणणारा ज्ञाता असल्याने तो सर्वमय, सर्वात्मक व विश्वरूप आहे. वेद्याचा म्हणजे जे जाणावयाचे तत्त्व आहे त्याचा कोणताही भाग असा नाही की, जो वेदकाच्या म्हणजे जाणणाऱ्याच्या बाहेर आहे. वेद्यच वेदक आहे. वेदक संवित् आहे. संवित् आत्मा आहे. मग तर सर्वात मोठी यथार्थ गोष्ट ही आहे की, आत्माच जगत् आहे. छांदोग्य श्रुतीत स्पष्टपणे असे म्हटले आहे की, "इदंच्या रूपात दिसणारे हे सर्व जगत् आत्माच आहे. आत्म्यात नानात्व किंचितसुद्धा नाही."**

एका गोष्टीचा विशेष विचार केला पाहिजे. आत्म्यापासूनच सर्व भावांचा उद्भव होतो. संविद्च्या आरोहणामुळे म्हणजे शक्ती जागृत होऊन सुषुम्णा प्रवेशामुळे परा, पश्यंती इत्यादि वाणींचा उदय होतो व सत्ता सिद्ध होते. प्राचीन आचार्यांचे असे वचन आहे की, "**हे शक्ती! तूच सगळ्याला कारण आहेस हे आम्ही जाणले आहे; कारण मातीचा**

**घडा हा मातीने तयार केलेला असल्याने त्यात मातीशिवाय काहीही असत नाही. त्याप्रमाणे सर्वत्र तुझाच अन्वय अर्थात् संबंध आहे. संपूर्ण विश्व हे संविद्ने भरलेले व समन्वित झालेले असल्याने संवित्शिवाय विश्वाची सिद्धी होऊ शकत नाही. मग असंवित् कारण कसे होऊ शकेल? संवित्च सत्य आहे व सत्यच संवित् आहे. संवित्ची उपासना केल्याशिवाय म्हणजे श्रीसद्गुरूंकडून शक्तिपातयोगदीक्षा घेऊन साधन केल्याशिवाय हे सर्व सत्य आहे हा अनुभव साधकाला येऊ शकत नाही. हे माँ शक्ती कुंडलिनी! सर्व भाव ही तुझीच स्वरूपे आहेत. याबद्दल कोणाचेही दुमत नाही. तुझ्यामुळेच सर्व प्रकाशित होते.** असे तर नाही ना की अप्रकाशही प्रकाशित होतो? तूच एक प्रकाशक आहेस. सर्जन-निर्मिती, भाषण व बोधन हे तीनही तुझेच प्रकाश आहेत. सूर्यादि दुसऱ्या प्रकाशांपेक्षा तू अगदी निराळी आहेस. तुझ्या प्रकाशाचा उदय झाल्याशिवाय इतर दुसरे प्रकाश प्रकाशित होऊ शकत नाहीत. श्रुती, पंचरात्र इत्यादि तर हेच सांगतात की, तेथे सूर्य चंद्रादींचा प्रकाश नाही. आत्मसंवित्च्या प्रकाशानेच हे सर्व प्रकाशित होत राहते.

संवित् सर्वमय असण्याचे दुसरे एक कारण आहे. जितक्या संवेद्य गोष्टी आहेत त्या संवेदनरूप अनुभवाच्या द्वाराच संवेदित होतात. त्यांच्याशी तादात्म्य होते. तद्भावरूपता होते व अभेदाचे संवेदन होते. **"स्वात्मसप्तमी"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "सर्व वस्तू ज्ञानस्वभावाचा विषय होतात व त्याच्या बरोबर तादात्म्य प्राप्त करून घेतात. जीव ज्ञानस्वरूप आहे, म्हणून तो सर्वमय आहे." **"संविद्प्रकरण"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "अग्नीत समाविष्ट झालेल्या सर्व वस्तू अग्निरूपच दिसतात. त्याचप्रमाणे ज्ञानात समाविष्ट असलेल्या सर्व गोष्टी ज्ञानमयच पाहाव्यात. **"आगम रहस्य"** या ग्रंथात असे वचन आहे की, "आकारवर्ग ज्ञानामुळेच भासतो. यासाठी ही विश्वमयी विभूती ज्ञानच आहे. आपण विश्वात्मक आहोत हे केवळ शास्त्रसिद्धच नाही तर ही गोष्ट आत्मसंवित्मुळे संविदित होत असल्याकारणाने अनुभव-सिद्धही आहे."

संविद्च प्राणद्वारा वाग्रूप धारण करते. तीच वैखरी, मध्यमा, पश्यंती व परारूप आहे. या चारही वाणींचा वक्ता निर्विशेष परमस्थायी, नित्योदित

व निजाकृती आहे. सूर्याप्रमाणे आपल्या तेजाचा विस्तार करीत ती हृदयात प्रकाशित होते. चिदिच्छाशक्तीमुळे ते सबुद्ध (विस्तृत व जागृत)आहे व आत्मबल हेच त्याचे बल आहे. **"प्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात असे वचन आहे की, "प्रत्यवमर्शात्मा चिती हीच सर्वात श्रेष्ठ परावाक् आहे. परमात्म्याचे हे स्वातंत्र्य हेच त्याचे मुख्य ऐश्वर्य आहे. ती सर्वदेशकालामध्ये स्फुरण पावणारी महासत्ताच सर्वांचा आधार असून ती परमेश्वराचे हृदय आहे." अंत:संकल्प हेच तिचे रूप आहे. शब्द व अर्थ या दोन्ही गोष्टी तिच्या ठिकाणी एकावेळी स्फुरण पावतात. यासाठी या दोन्ही गोष्टींची एकता प्रसिद्ध आहे. शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "शब्दानुवेधाशिवाय प्रत्ययाचा, अनुभूतीचा उदय होत नाही. वाणीचे मूळ संवित् आहे हे पहिल्या प्रथमच सांगितले आहे. ज्याप्रमाणे निजात्मा संवित्शी संपूर्ण जगत् मिसळून जाऊन एकरूप झालेले असते त्याचप्रमाणे संवितशी संपूर्ण वाणी एकरस व एकरूप झालेली असते.

योगिनाथांनीही असे म्हटले आहे की, "परतत्त्वात कोणत्याही वस्तूची सिद्धी करावयाची असेल तर वाणीचा स्वीकार करणे भाग पडते; कारण रूपाच्या अनुसंधानाने म्हणजे तपासाने वस्तूचा निश्चय होतो. वाणीच्या म्हणजेच शक्तीच्या उन्मुख म्हणजे ऊर्ध्वगामी वृत्तीमुळेच वस्तूच्या म्हणजे परमतत्त्वाच्या सद्भावाची कल्पना किंवा अनुभूती येते. अशा प्रकारे शक्तीचे ऊर्ध्वगमनयुक्त चालन झाल्याशिवाय कोणालाही आत्मलाभ होऊ शकत नाही; कारण त्या अवस्थेत केवळ स्वरूपज्योतीच राहते. तेथे विभाग व क्रमाची अपेक्षा असत नाही. त्याचे रूप केवळ योगीच जाणू व अनुभवू शकतात. **त्या ज्योतीच्या उन्मुखतेमुळे म्हणजे विकासामुळे चिंतनमयी वाग्धारा उत्पन्न होते.** त्यानंतर विशिष्ट शब्दाच्या विषयीची स्फुरणात्मक इच्छा होते. मग ती शब्दाचे रूप धारण करून अर्थ प्रकट करते. यासाठी संवित्प्रसूत म्हणजे संवित्पासून निघालेल्या वाणीच्या शिवाय कोणत्याही अर्थाची निश्चिती होऊ शकत नाही. याप्रकारे सर्वप्रकाश संवित्स्वरूपाच्या प्रभेच्या सारखी असलेली प्रकाशनशक्ती अंत:संकल्परूप वाणी बनून ती पुन्हा वर्ण, पद, वाक्याला जीवदान करते व पदार्थाच्या रूपाने बाहेर दिसते. जे प्रबुद्ध म्हणजे शक्तिपात-योगानुग्रही साधक आहेत त्यांच्या बाबतीत ही गोष्ट स्वानुभवसिद्ध आहे. शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "चिदात्मा देव आपल्या अंत:स्थित

अर्थाला स्वेच्छेने बाहेर प्रकाशित करतो. अगदी याचप्रमाणे योगी कोणत्याही उपादानाशिवाय म्हणजे कोणत्याही भौतिक गोष्टीच्या आधाराशिवाय वस्तू म्हणजे परब्रह्मतत्त्व प्रकट करतो. अंतस्थ भावांचा जो स्वामी आहे तोच त्या परमतत्त्वाला प्रकाशित करतो. त्याच्या इच्छेशिवाय क्षोभ वगैरे कोणतीही गोष्ट प्रवृत्त होऊ शकत नाही." आणखी हे लक्षात ठेवले पाहिजे की, **"जे काही बाहेर ब्रह्मांडात दिसते आहे ते सर्व पिंडात स्थित आहे. डोळे बंद करून ज्याप्रमाणे आपण सर्व काही आत पाहू शकतो त्याप्रमाणेच हा सर्व प्रपंच आहे."**

याच प्रकाराने स्वभावच सर्वरूपाने स्वरूपाने स्थित असतो. या सर्वात्मक स्वभावाच्या कारणामुळे शब्द व अर्थाची चिंता केल्यावर श्रीशिवस्वभावाला प्रकट न करणारी व चित्स्वरूप नसणारी अशी एकही अवस्था मिळत नाही किंवा सापडत नाही. संविदात सर्व एक आहे व त्यातच सर्वांचे अस्तित्व आहे. शास्त्रकारांनी यासाठीच असे म्हटले आहे की, **"ज्या ज्या कारणांनी भावनद्या निरनिराळ्या वाहतात, त्या त्या कारणांनीच त्या बोधसमुद्राशी एकरूप होतात."** या बाबतीत ग्रंथकाराने प्रथमच असे सांगितले आहे की, ज्याच्या प्रारंभी आपण विराजमान असत नाही असा कोणताही शारीरिक, शाब्दिक किंवा मानसिक व्यवहार असत नाही. यासाठी संविदात्मा भोक्ता म्हणजे अनुभविणाराच भोग्यभावाने अनुभाव्याच्या रूपात नेहमीच सर्वत्र असतो, असे जे म्हटले आहे ते योग्यच आहे. याशिवाय भोग्य नावाचा दुसरा कोणताही पदार्थ नाही. श्रुतीनेही हेच गीत गायिले आहे. **"अहमन्नमहमन्नमहमन्नम्। अहमन्नादोऽ-हमन्नादोऽहमन्नादः।। तैत्तिरीयोपनिषद् ३.१०.६।।"** मी अन्न आहे व त्याचा भोक्ताही मीच आहे. या दृष्टीने **"तत्त्वविचार"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "भोक्ता व भोग्याच्या रूपात स्वभावातील परस्पर भावच संबद्ध होतात. त्यांची कोणतीही निराळी सत्ता नाही. द्रष्टा, अनुभविता, स्मर्ता, ग्राहक, भोक्ता, वेदक, कर्ता, उपलब्धा, संवेत्ता व ज्ञाता ही ज्ञानाचीच नावे आहेत." याचा अभिप्राय असा आहे की, ज्ञानच ज्ञेयाच्या रूपाने चमकत व पसरत असते. शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "आपल्याहून जे भिन्न भाव दृष्टीस पडतात ते तर आपला आत्माच आहेत. परंतु मुग्धपणामुळे अन्य भोगांच्या रूपाने ते दृष्टीस पडतात. मूर्ख लोक हे भोग प्राप्त व्हावेत म्हणून एखाद्या पशूसारखे संसारात भटकत फिरत

असतात. जे लोक या दृश्य भावांना आपल्याच वैभवाच्या रूपात पाहतात ते आपल्यासारखे प्रभू व स्वामी होऊन सर्व विश्व वश करून घेतात." "**ज्ञानसंबोध**" या ग्रंथात असे वचन आहे की, "ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या तीन रूपात ज्ञानच राहत असते. "**ब्रह्मार्पणं ब्रह्महविः ।।४.२४।।**" अर्थात् ज्या साधनांनी किंवा मंत्रांनी अग्नीत हवी (आहुती) अर्पण केले जातात ती साधने किंवा मंत्रही ब्रह्मच आहेत आणि तूप, भात इत्यादि हवन करण्याचे पदार्थही ब्रह्म आहेत, हे गीतेचे वचन सर्व दृष्टीने यथार्थ आहे. श्रीउत्पलाचार्य म्हणतात, "खरे व वास्तविक पाहता द्रष्टाच आहे. अज्ञानी लोक या दृश्याकडे अध्यात्मरूपाने पाहत नाहीत. आरशातील प्रतिबिंबासारखे हे जगत् द्रष्टा व दृश्याच्या रूपात दोन प्रकाराने भासमान होते. बोधानुबोधानेच म्हणजे शक्तिपातयोगदीक्षेमुळेच साधकाला घटपटादि बाह्य सद्भाव प्राप्त होतात. त्यामुळे ज्ञानाद्वैतच सत्य आहे. कोठेही ज्ञेयाची सत्ताच नाही.

"**आत्मसप्तती**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "हे जे काही दृष्टीस पडते आहे ते दर्शनाहून भिन्न नाही. दर्शन द्रष्ट्याहून भिन्न नाही. त्यामुळे द्रष्टाच जगत् आहे." "**संकर्षणसूत्र**" या ग्रंथातही असे वचन आहे की, "ज्याच्यामुळे हे विश्व दिसते, जो सर्व विश्वाचा द्रष्टा व जो चराचर रूपात दिसत असतो त्याचे नाव विष्णू आहे." "**जाबालीसूत्र**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की, "ज्याच्या चैतन्यस्वभावाचा कधीही लोप होत नाही अशा द्रष्टा, स्प्रष्टा, श्रोता, घ्राता, रसयिता, मंता व बोद्धा हाच जगताच्या उत्पत्ती, स्थिती व प्रलयाचे एकमात्र कारण आहे. त्यालाच भगवान् श्रीवासुदेव अर्थात् आत्मा म्हणताता." "**पंचरात्र उपनिषद्**" या ग्रंथात असे सांगितले आहे की, "ज्ञाता-ज्ञेय, वक्ता-वाच्य, भोक्ता-भोग्य सर्व काही तोच आहे. सर्वांतर, सर्वबाह्य, स्वयंज्योती, स्वयंबोध्य व स्वयंभू तोच आहे. श्रुती सुद्धा सांगते की, "तोच ज्ञाता व तोच ज्ञान आहे. तोच मंत्रात्मा आहे. यासाठी मंत्रही श्रीशिवरूपच आहेत." पुढील श्लोक क्रमांक ३० मध्ये याची प्रशंसा करून त्याच्या स्वीकृतीचा उपाय सांगतात.

भूतात्मक व भावात्मक असे दोन प्रकारचे शरीर आहे. आपल्या पंचमहाभूतांच्या शरीराहून वेगळे असे जे शब्दादि विषयांचे ज्ञान होते त्याला भावात्मक शरीर असे म्हणतात. जे शरीराचे ज्ञान होते ते भूतात्मक

शरीर होय. जेवढ्या ज्ञेय वस्तू आहेत ते जीवाचे शरीर होय. ज्या ज्या वेळेस तो ज्ञेय वस्तूचे स्मरण करतो त्या त्या वेळेस जीव तो तो पदार्थ बनत असतो. पण जीव सत्यरूपाने याचा विचार करीत नाही. त्यामुळे विश्वरूप असूनही तो स्वतःला जाणत नाही. ज्या ज्या वेळेस आपल्याला ज्या ज्या वस्तूचे ज्ञान होते त्या त्या वेळेस आपण ती ती वस्तू बनतो. ही जागृती जर जीवाने ठेवली तर तो जीव विश्वमय होईल; परंतु ही सावधानता न ठेवल्यामुळे अनित्यभाव असलेल्या देहावरच जीव अहंभावाचा निश्चय करतो. इतर ज्या ज्ञेय वस्तू आहेत त्यात अहंभावाचा निश्चय करीत नाही म्हणून तो जीव संसारी बनतो व जन्ममरणाच्या तडाख्यात सापडतो. **ज्यावेळी श्रीसद्गुरुकृपेने शक्तिपात होतो त्यावेळी श्रीपरमशिवरूपी शक्तीची किरणे त्याच्यावर पडतात. त्यामुळे ज्ञान जागृत होऊन जीवाची दृष्टी विमल होते. ही दृष्टी एकदा प्राप्त झाली की, देहाहून वेगळे असे जे जे पदार्थ आहेत ते ते सर्व आत्मस्वरूप आहेत असे तो पाहतो. जी जी वस्तू दिसेल त्या त्या वस्तूच्या ठिकाणी विवेक जागृत करून सर्व पदार्थमात्र श्रीपरमशिवाच्या शक्तिचक्रातील अविभाज्य घटक आहेत अशी अनुभूती तो घेतो. अशी जागृती ठेवल्याने या शक्तिचक्राचा तो जीव अधिष्ठात्रा बनतो म्हणजे श्रीपरमशिव होतो.** आपणच सर्वमय आहो अशी ज्ञानदृष्टी ठेवल्याने साधक आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण श्रीशिवमय स्थितीतच असतो. भोक्ता परमेश्वरच स्वतः भोग्य भावाने जीव बनतो. परंतु ज्यावेळी वरीलप्रमाणे सदा सर्व ठिकाणी जो जागृती ठेवतो तो जीवन्मुक्त होतो. आत्मा हा चैतन्यमय आहे. तो विश्वरूप आहे; कारण कार्यकारणाचा अभेद असल्याने तोच सर्व विश्वप्रपंचात आहे. त्यामुळे विश्वरूप हे श्रीपरमशिव आहे. श्रीपरमेश्वर स्वतःच्या मायेच्या म्हणजे शक्तीच्या योगाने अनेक रूपाने नटतात. ज्या ज्या वेळी द्वैताचे भान होईल त्या त्या वेळी परमात्मा आपल्या लीलेने अनेकत्व दाखवीत आहे अशी जागृती ठेवावी. स्फटिकाच्या खाली जर निरनिराळे रंग ठेवले तर तो स्फटिक निरनिराळ्या प्रकारचा भासमान होत असतो; परंतु स्फटिक मात्र एकच असतो. त्याचप्रमाणे आत्मा हा शुद्ध चैतन्यमय असा एकच असून आपल्या स्वतःच्या प्रभेच्या योगाने अनेक प्रकाराने भासमान होत असतो. अशा वेळी तो अनेक नाही एकच आहे अशी जागृती साधकाने ठेवावी.

या सर्वांचा अभिप्राय असा आहे की, ज्या पुरुषाला असे ज्ञान झाले

आहे, ज्याला आपल्या स्वरूपाचा सर्वत्र अनुभव येतो आहे व जो सर्वमन्मयही पाहतो तो सर्व जगत् क्रीडांगण किंवा खेळण्याची बाग आहे असे समजतो. कारण तो नित्ययुक्त व नित्यमुक्त आहे. प्रबोधाच्या म्हणजे शक्तिपातयोगाच्या प्राप्तीने बंधनाचे कारण असलेले अज्ञान दूर झाले की, जीवन ईश्वराप्रमाणे मुक्त होते यात काहीही संदेह नाही. ही गोष्ट उपपत्ती व उपलब्धीच्या द्वारा सिद्ध असल्यामुळे याबद्दल भ्रांती बाळगण्याचे कारण नाही. याबाबत शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "**आत्मानुभवाने सम्यक् विश्रांती प्राप्त झाल्यावर जो अलुप्तानुभव स्थिर राहतो त्यामुळे तत्त्ववित् पुरुष विषयभोग घेत असतानाही जीवनमुक्तच असतात.**"

उत्क्रांतीशिवाय मोक्ष मिळत नाही असे जे लोक म्हणतात त्यांचे म्हणणे योग्य नाही; कारण शास्त्रकारांचे असे म्हणणे आहे की, "स्वभावाचा अनुभव न येता केवळ उत्क्रांतीच्या बळावर पुरुषाला कैवल्याची प्राप्ती झाली असती तर फासावर जाणाऱ्या माणसालाही मोक्षाची प्राप्ती झाली असती. प्रलयकालात देह सुटला तरी पुरुष गुणवासनायुक्त असल्याने बद्धच राहतात. मात्र विशुद्ध ज्ञानाच्या आश्रयाने शरीरधारीही मुक्त होतात." "**ज्ञानगर्भ**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**हे त्रिलोकीनाथा! आपली उपासना करून ज्या माणसाने सर्व किल्बिषरूप उपद्रव नाहीसे केले आहेत किंवा ते धुऊन टाकले आहेत म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने शक्तिपातयोगाचे साधन मिळून ज्यांच्या प्राणशक्तीचे सुषुम्णेत चालन होऊन जन्मजन्मांतरींचे सर्व संस्कार जळून गेल्याने अज्ञानादि सर्व दोष दूर झाले आहेत त्यांना माझ्यातच हे सर्व जगत् स्थित आहे, मीच सर्व आहे व मीच सर्वत्र आहे हा अनुभव अद्वैतभावनेच्या आवेशाने अत्यंत शीघ्रतेने प्राप्त होतो.**" "सर्वत्र मी व माझ्यात सर्व," हे "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथातील वचन प्रसिद्ध आहे. "**पंचरात्र**" या ग्रंथामध्ये असा उल्लेख आहे की, "प्रज्ञेच्या महालावर चढून पुरुष शोकरहित होतो. ज्याप्रमाणे डोंगराच्या शिखरावर उभा असलेला माणूस पायथ्यापाशी असलेली वस्तू पाहत असतो त्याप्रमाणे प्रज्ञावान् पुरुष शोकग्रस्त लोकांकडे पाहत असतो. खरे पाहिले तर येथे नित्य उद्युक्तता व उन्मुक्ततेसाठी उपाय सुचविला आहे. ही गोष्ट प्रथमच सांगितली आहे. मंत्रात्मा श्रीशिवभावाचा उदय दुसऱ्याही युक्तीच्या द्वारा कसा होतो हे पुढे समजावून सांगितले आहे.।।२८-२९-३०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :- (कारिका क्रमांक २८ ते ३०)**

मागील दोन प्रकरणात व्यतिरेकदृष्टीने स्वस्वभावाचे स्वरूप कसे आहे व त्याची उपलब्धी कशी होते हे सांगितले. आता अन्वयदृष्टीने हे विश्व स्वस्वभावाचेच विकसन कसे आहे हे दाखवितात. हा विचार म्हणजे मंगलाचरणात निर्देशिलेल्या शक्तिचक्रविभवनाचाच विचार होय. त्याची या निष्यंदात उपपत्ती व पुढील निष्यंदात उपलब्धी दाखविली आहे.

**स्पष्टीकरण :-** २८ व्या कारिकेतील पदांचा अन्वय असा- **"तत्संवेदनरूपेण तादात्म्यप्रतिपत्तितः सर्वभावसमुद्भवात् सर्वमयो जीवः"**- तत्संवेदन म्हणजे वेद्य वस्तूंचे संवेदन. त्या संवेदनाचे रूप म्हणजे स्वभाव. त्याच्याशी प्रबुद्धाची तादात्म्यप्रतिपत्ती होते म्हणजे त्या वेद्यवस्तूशी प्रबुद्धाचा त्या अवस्थेत अभेदच असतो. या अभेदाच्या अवस्थेत त्या त्या भावाची म्हणून सर्वच भावांची निर्मिती होत असते. अशा प्रकारे ज्याअर्थी निर्मित विश्व हे प्रबुद्धाच्या संवेदनतादात्म्याचाच आविष्कार असतो त्याअर्थी प्रबुद्ध आत्मा हा सर्वमय म्हणजे विश्वमयच असतो. यातील आशय असा आहे. प्रबुद्धाकडून ज्या वेळी स्वविषयाचे संवेदन होत असते, तत्समकालच त्या भावाची निर्मितीही होत असते; कारण वस्तूंचे संवेदन होत असतानाच तिला स्वरूप लाभत असते. वस्तूचे संवेदन होत नसेल तर तिला आकारही येत नाही. आता वस्तूचे संवेदन होणे म्हणजे वस्तू प्रकाशमान होणे व प्रकाशमान होणे म्हणजे प्रकाशयुक्त असणे आणि प्रकाश हाच तर आत्म्याचा धर्म आहे. याचा अर्थ असा की, आत्मा ज्या ज्या विषयांचे संवेदन करतो तो तो विषय त्याचे शरीरच बनतो. हात, डोके इत्यादि अवयवांचा संनिवेश एवढेच काही आत्म्याचे शरीर नव्हे. पार्थिव देहसुद्धाही जेव्हा त्याच्या संवेदनाचा विषय होतो तेव्हाच तो आत्म्याचे शरीर बनतो, एरवी नाही. तुर्यावस्थेत पार्थिव देह हा आत्म्याचे शरीर नसतो. सारांश, संवेद्यमानता हेच शरीरलक्षण आहे.

संवेद्यमान होणारे जीवाचे शरीर दोन प्रकारचे आहे. एक भूतात्मक शरीर व दुसरे भावात्मक शरीर. आपल्या व्यापक स्वभावाचे विस्मरण झाल्यामुळे वस्तुसंवेदनाच्या बाबतीत यथार्थपणे स्वरूपपरामर्श करण्याचे ज्याचे सामर्थ्य नष्ट झाले आहे असा संसारी जीव, अहंप्रत्ययाचा आश्रय

म्हणून पार्थिव देहाचेच ग्रहण करतो. ते त्याचे भूतात्मक शरीर होय. पण जीवाला शब्दादि विषयांचेही संवेदन होत असते. त्यामुळे संवेद्यमान शब्दादिक त्याचे भावात्मक शरीर होय. (या भावात्मक शरीराचा प्रत्यय स्वप्नदशेत येतो.) आत्म्याचा या दोन्ही शरीरांशी संसर्ग होतो. आत्मा वस्तुतः संवेद्य वस्तूहून वेगळा नाही; कारण आत्म्याचा प्रकाशमानता हाच धर्म संवेद्यवस्तूतही असतो. त्यामुळे आत्मा खरोखर विश्वरूप आहे. पण जेव्हा तो व्यामोहित होऊन हे विश्व आपल्याहून वेगळे आहे व विश्वातील पदार्थ परस्परांपासून वेगळे आहेत असे समजतो त्यावेळी साहजिकच त्याला व विश्वालाही पृथक्त्वाची मर्यादा पडते. अशा वेळी त्याचा अहंप्रत्यय पार्थिव देहादिकांच्या ठिकाणीच विश्रांत होतो व त्याचे व्यक्तित्व संकुचित होते. हीच संसारी दशा किंवा जीवदशा होय. पण जेव्हा प्रबोधामुळे जीवाची दृष्टी निर्मळ होते व त्याला आत्मस्वरूपाची ओळख पटून त्याचा अहंप्रत्यय व्यापक स्वस्वभावाच्या ठिकाणी विश्रांत होतो तेव्हा वस्तुसंवेदनाच्या बाबतीत यथार्थपणे स्वरूपपरामर्श करण्याची त्याची शक्ती प्रकट होते व त्या शक्तीच्या प्रसारातूनच त्याचे व्यक्तित्व विकसित होते. हीच श्रीशिवदशा होय. या श्रीशिवदशेत त्याने आपल्या संकल्पाने रेखाटलेले वैचित्र्यपूर्ण शक्तिचित्र म्हणजेच विश्वाची अभिव्यक्ती होय. वस्तूच्या संवेदनाशी झालेल्या स्वस्वभावाच्या तादात्म्यातूनच या विश्वाचा उदय होत असतो. त्यामुळे जीव हा सर्वमय म्हणजे विश्वरूप आहे असे म्हटले आहे.

याकरिताच या अवस्थेत प्रबुद्ध जे शब्दरूप किंवा अर्थरूप विकल्पन करतो ते सर्व विकल्पन श्रीशिवभावाने म्हणजे स्वस्वभावाने ओतप्रोत भरलेले असते. या विकल्पनात अशी एकही अवस्था नसते की, जी स्वस्वभावविरहित असू शकेल. खरे म्हणजे या विकल्पनात भोक्ता हाच भोग्य बनत असतो. प्रबुद्ध आपल्या अहंप्रत्ययरूप स्वभावालाच इदंप्रत्ययाचा आश्रय बनवितो व त्याचाच प्रत्यवमर्श करतो. या प्रत्यवमर्शातच त्या इदंप्रत्ययात्मक स्वस्वभावाला जो आकार येतो तेच नामरूपात्मक विश्व होय. अशा प्रकारे स्वस्वभावरूप आत्माच विश्वरूपाने प्रकट होतो. विश्वाचे हे प्रकटीभवन म्हणजे स्वस्वभावाचे स्फुरण होय.

स्वस्वभावाचे विश्विभवन ही प्रबुद्धाची एक क्रीडा किंवा लीला आहे. ज्याला हा व्यापक अहंप्रत्यय जाणवत नाही त्याला विश्वातील पदार्थ

स्वतःपासून व परस्परापासून भिन्न आहेत असे वाटते. ते पदार्थ स्वतःहून अन्यकारणाने उद्भूत झाले आहेत अशी त्याची कल्पना असते. त्यामुळे पदार्थांपासून उत्पन्न होणाऱ्या हर्षशोकभयादि विकारांनी हाही विकृत होतो. हे विश्व त्याला दुःखमय वाटते. हीच संसारदशा होय. पण व्यापक अहंभावाच्या भूमिकेवर आरूढ झाल्याने जेव्हा त्याला सम्यक् दृष्टी येते व त्याची परसंविद्रूप शक्ती प्रकट होते तेव्हा हे सर्व भाव स्वपरिकल्पित आहेत, स्वस्वभावशक्तीचेच (प्रतिभेचेच) ते विजृंभण म्हणजे जांभई किंवा पसरणे आहे हे तो ओळखतो. त्यामुळे या भावांचा संसर्ग होत असताही त्याला विकृतीचा तिळमात्रही स्पर्श होत नाही. उलट, प्रतिभाविकासाच्या आनंदमय संविदेत तो विश्रांत झालेला असतो.।।२८-२९-३०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## आत्मसत्ता आणि संवेद्यविषय

सूत्र क्रमांक २८, २९, ३० मध्ये असे समजाविले जात आहे की, वेदकरूप आत्मसत्तेची व्यापकता ही केवळ मंत्रसमुदायापर्यंत मर्यादित नाही, उलट सर्व वेद्यवेदक संक्षोभ हाच स्वरूपाचा विकास आहे. फलतः जेथे भगवान् श्रीशिव हे सर्वमय आहेत तेथे श्रीशिवांचाच पशुरूप जीव हाही प्रत्यक्षात सर्वमयच आहे. योगिलोक आपल्या विशुद्ध संवेदनाच्या द्वारा या गोष्टीची अनुभूती प्राप्त करून घेऊन जीवनमुक्त बनत असतात.

**सूत्र क्रमांक २८ वृत्ती :-** जीवात्मा हा आपल्या स्वतःच्या संवेदनाच्या द्वारा संसाराच्या प्रत्येक भावाची सर्जना किंवा निर्मिती करीत असतो. जो पदार्थ अनुभवास येतो तोच संवेदनेचा विषय होतो. हा (जीवात्मा) कोणत्याही बाह्य पदार्थाचा अनुभव करताच त्या पदार्थाला आपल्या शरीररूपात ग्रहण करतो. त्यामुळे ज्याला हात, पाय, डोके आहे असेच केवळ जीवात्म्याचे शरीर नसते.।।२८।।

**सूत्र क्रमांक २९ वृत्ती :-** अशा प्रकारे आत्म्याचा सर्वमय स्वभाव असल्याने शब्द आणि अर्थांच्या संवेदनेमध्ये श्रीशिवमय स्वभावाला अभिव्यक्त करणार नाही अशी एकही अवस्था नाही. त्यामुळे वस्तुस्थिती अशी आहे की, प्रत्येक स्थानावर भोक्ता (वेदक सत्ता)च भोग्य पदार्थांच्या (वेद्यसत्तेच्या)

रूपात आभासमान होत असतो. भोग्य पदार्थ चेतन भोक्त्याहून वेगळा नसतो.।।२९।।

**सूत्र क्रमांक ३० वृत्ती :-** ज्या योग्याच्या चित्ताचा असा स्वभाव विकसित झालेला असतो की, "हे सर्व विश्व माझेच स्वरूप आहे," तो योगी सर्व प्रमेयविश्वाला आपला खेळ समजून, नित्ययुक्त असल्याकारणाने, पांचभौतिक कायेमध्ये राहत असूनही ईश्वराप्रमाणे मुक्त आहे. अशा व्यक्तीसाठी शरीराचे अस्तित्व इत्यादि बंधनकारक होत नाही.।।३०।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्रांमध्ये आत्मसत्तेच्या खऱ्या सर्वमयतेचा विचार प्रस्तुत केलेला आहे. या मतानुसार संसारी जीव हा स्वयं भगवान् श्रीशिवां-प्रमाणे विश्वशरीरी आहे. ज्याप्रमाणे श्रीभगवंतांनी आपल्या नित्य स्पंद पावणाऱ्या किंवा स्फुरण पावणाऱ्या विमर्शशक्तीच्या अर्थात् स्वातंत्र्य-शक्तीच्या किंवा ज्ञानशक्तीच्या द्वारा अनंत प्रकारचे वेदक आणि वेद्य यांनी परिपूर्ण विश्वाला सत्ता देऊन व या विश्वाला आपल्या शरीराच्या रूपामध्ये धारण केलेले आहे त्याचप्रमाणे जीवही पावलापावलावर आपल्या संवेदनाच्या द्वारा प्रत्येक प्रकारच्या भूतात्मक किंवा भावात्मक पदार्थांना सत्ता देऊन अर्थात् अस्तित्व प्रदान करून या पदार्थांना आपल्या शरीराच्या रूपामध्ये ग्रहण करून राहिलेला आहे. श्रीशिवभावावर किंवा जीवभावावर स्थित असलेली आत्मसत्ता स्वभावतः वेदकसत्ता अर्थात् ज्ञान करून देणाऱ्याची सत्ता कारण ज्ञान-क्रियामयी स्पंदना किंवा स्फुरण हेच या आत्मसत्तेचे केवळ स्वरूप आहे. सर्व वेद्य किंवा ज्ञेय किंवा प्रमेय अर्थात् ज्याचे ज्ञान करून घ्यावयाचे आहे अशा पदार्थाचे अस्तित्व किंवा अनस्तित्व हे मौलिक वेदक सत्तेवर अवलंबून असते. ही मौलिक आत्मसत्ता चेतन असल्यामुळे आपल्या स्वतंत्र संवेदनाच्या द्वारा या ज्ञेय पदार्थांना सत्ता प्रदान करीत असते. याद्दष्टीने **"श्रीशिवसूत्रविमर्शिनी"** या टीकाग्रंथात उद्धृत केलेल्या **"उष्मभैरव"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**यावन्न वेदका एते तावद्वेद्याः कथं प्रिये।**
**वेदकं वेद्यमेकं तु तत्त्व नास्त्यशुचिस्ततः ।।१।।**

*याचा अर्थ असा आहे की, जोपर्यंत जाणणारे नाहीत तोपर्यंत ज्ञेयवस्तूही नाहीत. वेदक आणि वेद्य या तत्त्वांमध्ये काहीही भेद नाही.*

*फलतः जीवात्मा हा विशेष आकार-प्रकारचा आणि शिरपाय इत्यादि अवयव असलेले केवळ पांचभौतिक शरीर नसून* **"एवञ्च यद् यदयं**

**जीवः संवेत्ति तत्तदस्य शरीरमेव सम्पद्यते, न तु नियतशिरःपाण्याद्य-वयवसन्निवेश एव।। स्पंदकारिकाविवृती।।** त्या जीवात्म्याची ज्या ज्या पदार्थांबरोबर त्याची संवेदनात्मक एकाकरता होत राहते त्या त्या पदार्थांमध्ये संवेदनाच्या रूपामध्ये अनुप्रविष्ट होऊन त्या पदार्थांना आपले शरीर बनवीत असतो. मात्र डोके, हात, पाय इत्यादि अवयवांनी युक्त म्हणजेच शरीर नाही. यामुळे या दृष्टिकोणाच्या पृष्ठभूमीवर दृढ अनुसंधान केले असता हे तथ्य आपोआपच अनुभवास येते की, जीवात्मा हाही प्रत्यक्षात विश्वशरीरी अर्थात् सर्वमय आहे.

संसारातील ज्या सर्व संवेद्य विषयाला जीवात्मा संवेदनाच्या द्वारा शरीररूपामध्ये स्वीकारीत किंवा नाकारीत राहतो ते सर्व संवेद्य विषय भूतात्मक विषय आणि भावात्मक विषय अशा दोन प्रकारचे असतात. याची परिभाषा पुढील प्रमाणे आहे.

**१) भूतात्मक विषय :-** हे विषय पंचमहाभूतांच्या मिश्रणापासून बनलेले असतात. हे विषय विचित्र तसेच अनेक आकार-प्रकारचे असतात. हे विषय बाह्य इंद्रियांनी ग्राह्य असून निश्चित शिर, पाय, हात इत्यादि अंगांनी युक्त आणि स्थूल असतात. भूतात्मक विषयांमध्ये प्रत्येक स्थूल शरीर अंतर्भूत होत असते.

**२) भावात्मक विषय :-** या विषयांचे कोणतेही अंग-उपांगाचे आणि स्थूल आकार-प्रकारचे मूर्त शरीर नाही आणि ते केवळ संवेदनात्मक अनुभूतीनेच गम्य आहेत. या विषयांमध्ये सुख, दुःख, धर्म, अधर्म इत्यादि अनेक प्रकारचे विषय अंतर्भूत होतात. याव्यतिरिक्त संवेद्य विषयाची भावरूप विषय आणि अभावरूप विषय अशी दोन रूपे आहेत.

**भावरूप विषय :-** भावरूप विषयाचे संसारात भावरूपामध्ये अस्तित्व विद्यमान असते. उदा. घट, पट, सुख, दुःख इत्यादि.

**अभावरूप विषय :-** या विषयाचे अभावरूपामध्येच अस्तित्व आहे. उदा. आकाशपुष्प, सशाची शिंगे, वांझ स्त्रीचा पुत्र, सापाचे कान इत्यादि.

वरील विभाग-कल्पना केवळ औपचारिक आहे; कारण संवेदनेमध्ये प्रत्येक प्रकारच्या विषयाच्या स्थितीमध्ये कोणताही फरक असत नाही. संवेदनामध्ये मूर्त घटाप्रमाणेच अमूर्त सुख-दुःखादि भावनांची अनुभूती होत असते. दुसरी गोष्ट अशी आहे की, संवेदनेमध्ये प्रत्येक प्रकारच्या विषयाची अनुभूती ही केवळ भावरूपामध्येच होत असते. संवेदनेमध्ये

अभावरूपामध्ये अनुभूती येऊ शकत नाही. उदाहरणार्थ संवेदनेमध्ये आकाशपुष्प इत्यादि अभावरूप पदार्थाचे अस्तित्वही घट-पट इत्यादि भावरूप पदार्थाप्रमाणेच असते. प्रत्यक्षात ही गोष्ट निर्विवाद आहे की, संवेदनामध्ये जे काही आहे केवळ त्याचेच अस्तित्त्व आहे, अन्य कोणत्याही गोष्टीचे अस्तित्व नाही.

"**एवञ्च ..... संवेद्यमानतावस्थायामेव शरीरी भवति।।" स्पंद-कारिकाविवृती।।** जीवात्म्यांची ज्यावेळी ज्या विषयाकडे उन्मुखता होत असते अर्थात् जीवात्मा ज्यावेळी जो विषय जाणण्यास उन्मुख होतो त्या संवेद्यमानतेच्या वेळी तो विषय त्या जीवात्म्याचे शरीर बनत असतो; कारण त्यावेळी संवेदन तद्रूप बनत असते. प्रत्यक्षात "**संवेद्यमानता च तेन तेन रूपेण प्रकाशमान।। स्पंदकारिका ३०।।** संवेद्यमानता या शब्दाचा अर्थ त्यावेळी संवेदन त्याच विषयाच्या रूपामध्ये प्रकाशमान होऊ लागते.

संवेद्यमानतेच्या काळी एखाद्या विषयाला शरीराच्या रूपामध्ये ग्रहण करणे याचा अर्थ असा आहे की, त्यावेळी जीवात्मा हा स्वतंत्र संवेदनाच्या द्वारा त्या विषयाला सत्ता देऊन त्याची सृष्टी करीत असतो. दुसऱ्याच क्षणी एखाद्या दुसऱ्या विषयाकडे जीवात्म्याची संवेदनात्मक उन्मुखता झाल्यावर पहिल्या विषयाचा संहार आणि दुसऱ्या विषयाच्या सृष्टीचे कार्य संपन्न होत असते. अशा प्रकारे जीवात्मा हा विश्वात्म्याप्रमाणे प्रत्येक क्षणी भिन्न भिन्न शरीरांना स्वीकारीत व नाकारीत त्याची सृष्टी आणि संहार आदि करीत राहतो.

जिचा वर उल्लेख केला गेलेला आहे तीच वस्तुस्थिती आहे. परंतु दुःख या गोष्टीचे आहे की, पशुभावाच्या पिंजऱ्यातील बंदी असलेला जीव आपल्या पांचभौतिक शरीराच्या दृढ प्राचीरांच्या अर्थात् कुंपणांच्या बाहेरही पसरलेल्या आपल्या रूपविस्ताराला पाहत असतानाही पाहू शकत नाही. ही शक्तिदारिद्र्याची विडंबना अर्थात् उपहास आहे.।।२८-२९-३०।।

* * * * *

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

अशा प्रकारे मंत्र-मंत्रेश्वरादिरूप शुद्ध सृष्टी ही श्रीशिवस्वभावाची आहे असे प्रतिपादन करून आता अशुद्ध मानलेली मायारूप सृष्टीही श्रीशिवस्वरूपच आहे असे उपपादन करून श्रीमतशास्त्रादिरहस्यदृष्टी ही या कारिकेत सांगतात.

**स्पष्टीकरण :-** याचे कारण जीव हा ग्राहक व सर्वमय म्हणजेच श्रीशिवांप्रमाणे विश्वरूप आहे हेच याचे कारण आहे त्या हेतूने वाचक शब्दात, वाच्य अर्थात् विकल्पज्ञानादि रूपांमध्ये, विचारांमध्ये आदि, मध्य किंवा अंत या स्थितीत अशी एकही अवस्था नाही की जी श्रीशिवरूप नाही. अशा प्रकारे सर्वच श्रीशिवरूप आहे असा त्याचा अर्थ आहे; कारण चिदात्मा भोक्ता ग्राहकच भोग्यभावाने म्हणजेच देह, नीलादिरूपाने नित्य सर्व विविध प्रकारच्या तत्त्वांनी युक्त जगाच्या ठिकाणी स्वरूपात काहीही कमी-जास्त न होता स्थित असतो. भोग्य हे भोक्त्याशिवाय वेगळे असे अस्तित्वातच नसते.

जीव अशी सुरुवात करून श्रीशिव असा उपसंहार करण्याने जीव आणि श्रीशिव यांच्यामध्ये कोणताही भेद नाही हे सिद्ध होते. देहादि अवस्थांमध्ये कोणत्याही प्रकारची अपूर्णता मानू नये. याउलट तो देह चिद्घन असा श्रीशिवस्वरूपच आहे असा उपदेश करतात. यासंबंधी "**श्रीप्रत्यभिज्ञाटीका**" या ग्रंथात असे म्हटलेले आहे की, "जे छत्तीस-तत्त्वमय शरीराला श्रीशिवरूपत्वाने पाहतात आणि त्याची पूजा करतात त्यांनाही सिद्धी (यश) मिळते आणि जे घटादिकांनाही त्याप्रमाणे अभिनिवेश करून पाहतात आणि पूजा करतात तेही यशस्वी होतात. या ठिकाणी कोणताही विवाद नाही." भट्ट श्रीवामनानेही असेच म्हटले आहे की -

**आलम्ब्य संविदं यस्मात्संवेद्यं न स्वभावतः।**
**तस्मात्संविदितं सर्वमिति संविन्मयो भवेत्।।**

**अर्थ :-** ज्याअर्थी जाणीव झालेली विशिष्ट वस्तूही संवित् (ज्ञाना)च्याच आधाराने राहते आणि ती स्वभावतःच संवित्शिवाय अस्तित्वात राहते असे म्हणता येत नसल्याने हे संविदित अर्थात् ज्ञात झालेले सर्वच संविन्मय आहे असे जाणावे व आपणही संविन्मयच व्हावे.

हा जीव सर्वमय कसा काय होऊ शकतो? या प्रश्नाचे उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की, तोच सर्व पदार्थांच्या उत्पत्तीचे मूळ अथवा हेतू असल्याने जीव सर्वमय आहे असे म्हटले आहे. "**सर्वाभावा .....**" हे पद येथे उपादानभावाने वापरले आहे.

**प्रमातृमितिमानमेयमयभेदजातस्य ते**
**विहार इह हेतुतां समुपयाति यस्मात्त्वयि।**

**निवृत्तविवृ (हृ) तौ क्वचित्तदपयाति तेनाध्व (धु)ना**
**नयेन पुनरीक्ष्यते जगति जातुचित्केनचित्।।**

**अर्थ :-** तुझी सुखद इच्छा ही प्रमाता, प्रमिती, प्रमाण, प्रमेय अशा प्रकारच्या भेदांचे कारण बनते आणि तो भेद तुझी इच्छा निवृत्त झाल्यावर कोठेतरी लुप्त होतो. क्वचितच कोणीतरी मनुष्य हे या प्रकाशात जाणू शकतो. अशा प्रकारे **"ज्ञानगर्भस्तोत्रात"** सांगितलेल्या नीतीनुसार व्यक्त झालेल्या संवित्च्या अस्तित्वामुळेच जीव हा सर्व पदार्थांचे कारण असतो; कारण जीवापासूनच सर्व विश्व उत्पन्न होत असल्यामुळे जीव हा सर्वमय आणि सर्व शक्तींनी युक्त आहे. मी हे द्वितीय सूत्राच्या वृत्तीत स्पष्ट केलेले आहे.

जीव सर्वमय आहे ह्यासाठी दुसरे कारण **"तत्संवेदन"** यापासून सुरुवात होणाऱ्या अर्ध्या भागात सांगितले आहे. त्या सर्व नीलसुखादींचे संवेदन म्हणजेच प्रकाश अथवा ज्ञान त्याच्याशी जीव स्वभावाने एकरूप असल्याने जीव हा सर्वमय आहे अशी जाणीव होते. सर्व आवश्यक उपदेश या स्पंदतत्त्वातच गुंतलेले आहेत; कारण वरील दोन श्लोक रहस्य आचरण आणि सर्व प्रकारच्या भेदरूप वृक्षांचे उच्चाटन करण्यासाठी ज्ञानाच्या उपदेशकथा निर्देशित करतात. त्याचप्रमाणे पहिले आणि शेवटचे सूत्र महार्थतत्त्वाचा निर्देश करते. तर **"जाग्रदादि"** सूत्राने त्रिकमार्गाचे आणि **"तदाक्रम्य"** या सूत्राने सर्व ध्यानांचे सारच सांगितलेले आहे.।।२८-२९।।

*****

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

आता ३० व्या कारिकेत ग्रंथकारांनी असे प्रतिपादित केले आहे की, "स्व"चे विश्वमयत्व जाणून घेणे म्हणजेच मोक्ष होय.

**स्पष्टीकरण :-** या कारिकेतील "वा"शब्द हा प्रथम निष्यंदात सांगितलेल्या निमीलन समाधीचा प्रकार हा विकल्प असून या जीवाच्या सर्वमयत्वाचे ज्ञान हे दुर्लभ आहे असे ध्वनित करतो. त्यामुळे या कारिकेचा अर्थ असा होतो की, ज्या कोणा पुढचा जन्म नसलेल्या भाग्यवान् मनुष्याला ही दुर्लभ संवित् (ज्ञान) प्राप्त होते तो अखिल जगत् ही एक लीला आहे असे पाहतो व ते आपल्या संवित्च्या उन्मेष आणि निमेषांनी निर्माण करतो व नष्टही

करतो. **"मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्त्या उपासते"** अर्थात् माझ्यामध्ये मनाला प्रवेशून जे नित्ययुक्त माझी उपासना करतात या **"श्रीमद्भगवद्गीता"** या ग्रंथात सांगितलेल्या स्थितीप्रमाणे सतत समाविष्ट झालेला तो महायोगी जीवित राहूनच म्हणजेच प्राणादींनी युक्त राहूनसुद्धा विज्ञानरूप अग्नीने सर्व बंधनांना दग्ध करतो आणि देह पडल्यानंतर श्रीशिवच बनतो. अशा प्रकारचा तो जीवन्मुक्त कोणाकडूनही कशाही प्रकाराने बद्ध होत नाही.

**"न संशयः"** या पदाने असे ध्वनित केले आहे की, दीक्षा इत्यादींनी श्रीगुरूंवर विश्वास ठेवल्यामुळे मुक्ती मिळते तर या अशा प्रकारच्या ज्ञानाने किंवा आचरणाने स्वतःवर विश्वास ठेवल्यामुळे मुक्ती मिळते. ।।३०।।

*****

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

मंत्रादिरूप सृष्टी ही विशुद्ध श्रीशिवस्वरूप आहे असे पूर्वी सांगितले. आता मायादिरूप अशुद्धत्वाने स्वीकारलेली सृष्टीही स्पंदतत्त्वात्मक श्रीशिवरूपच आहे असे सांगून **"यस्मात्सर्वमयो .....।।२८।।"** व **"तेन शब्दार्थ-चिन्तासु.....।।२९।।"** या दोन कारिकांनी ग्रंथकार आपली दृष्टी दुसरीकडे वेधतात. प्रमातृस्वभाव जीव ज्यामुळे सर्वमय होतो त्यामुळे तो श्रीपरमशिवस्वरूपच बनतो. वाचक शब्दसमूहात, वाच्य अर्थांमध्ये व विकल्पज्ञानरूप चिंतेमध्ये अशा प्रकारची एखादी आदि-मध्य-अंतरूप अवस्था दिसत नाही की, ज्यामुळे ती श्रीशिवस्वरूप होत नाही. याचाच अर्थ असा आहे की, वर सांगितलेल्या सर्व तत्त्वांमध्ये आदि-मध्य किंवा अंतरूप अशा प्रकारची श्रीशिवस्वरूप नसलेली एकही अवस्था नाही. त्यामुळेच भोक्ता चिदात्माच भोग्यत्वाने सर्वत्र विविध प्रकारच्या त्या त्या वस्तूंमध्ये अवस्थित झालेला दिसून येतो. भोक्त्याहून भोग्यजात म्हणजेच भोगणारा आणि भोगल्या जाणाऱ्या वस्तू यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेद नसतो. त्यामुळे उपक्रम-उपसंहारांच्या दर्शनाने जीवशिवांमध्ये किंचितही स्वाभाविक भेद नसतो. सर्व भावपदार्थ हे त्यांच्यापासून म्हणजेच जीवांपासून उत्पन्न होतात; कारण जीवापासूनच हे नामरूपात्मक विश्व उदयाला येते. त्यामुळे जीव हाच सर्वमय आणि विश्वशक्तीने युक्त आहे असे सांगितले आहे. सर्व पदार्थांचे जे संवेदन म्हणजेच प्रकाश होतो त्या प्रकाशरूपानेही

स्वभावभेदामुळे सर्वमयत्व ज्ञात होतेच. त्यामुळे अन्यत्र स्वीकृत केलेला भेदवृक्ष उत्पादन करून श्रीपरमशिवांप्रमाणे जीवाचे सर्वमयत्व या सूत्राने स्पष्ट केलेले आहे. ।।२८-२९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

श्रीशिवस्वरूपाचे स्वात्म्यासह (जीवासह) ऐक्यत्व किंवा सामरस्य आहे असे पूर्णपणे जाणून घेणाऱ्या जीवाला मुक्ती मिळते **"इति वा यस्य .....।।३०।।"** असे या कारिकेत सांगितले आहे. ज्यावेळी एखाद्या योग्याच्या मनामध्ये किंवा चित्तामध्ये भगवान् श्रीपरमशिवरूप स्पंदतत्त्वाचे हे ऐक्य अपरोक्षरूपाने भासते आणि सर्व बाजूंनी दिसणाऱ्या समस्त विश्वात्मक वस्तू माझ्याच आत्मतत्त्वाचा विलास आहे असे हृदयामध्ये अनुभवतो त्यावेळी या सर्व प्रमेयजाताचा अर्थात् ज्ञेय वस्तूंचा त्याच्याकडून क्रीडासाधन म्हणून व्यवहार केला जातो. या स्थितीत असतानाही प्राणसंबंधाच्या दृष्टीने जीवन्मुक्तस्वरूपामध्ये योग्याची स्थिती परमेश्वराप्रमाणे होते. शरीरादि गोष्टी या जीवन्मुक्त स्थितीसाठी कोणत्याही प्रकारे आडकाठी होत नाहीत. या स्थितीत त्याच्या जीवन्मुक्तत्वामध्ये अल्पही संशय घेऊ नये.।।३०।।

**इति श्रीराजानकश्रीरामविरचितायां स्पन्दविवृतौ विश्वस्य स्वस्वभावशक्तिमात्रत्वोपपत्तिर्नाम तृतीयो निष्यन्दः ।।३।।**

अशाप्रकारे श्रीरामकंठाचार्यांनी रचलेल्या स्पंदविवृतीमधल्या विश्वाच्या स्वस्वभावशक्तिमात्रत्वोपपत्ती नावाचा तिसरा निष्यंद संपला.।।३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

# निष्यंद चौथा

## अभेदोपलब्धी अर्थात् विभूतिस्पंद

**(श्रीरामकंठ संहितेतील "अभेदोपलब्धी" हा चौथा निष्यंद सुरू)**

वरील कारिकांमध्ये वर्णन केल्याप्रमाणे अनुसंधान करताच योग्याचे चित्त मंत्रदेवतेशी एकाकार होते व या तीव्र एकाग्रतेने त्या योग्याला शेवटी श्रीशिवांशी सायुज्य (श्रीशिवसद्भाव) प्राप्त होतो.

**अयमेवोदयस्तस्य ध्येयस्य ध्यायिचेतसि।**
**तदात्मतासमापत्तिरिच्छतः साधकस्य या।।३१।।**

**अन्वयार्थ :-**

**ध्यायिचेतसि** - ध्यान करणाऱ्या साधकाच्या वा योग्याच्या चित्तात, **तस्य** - त्याच्या, **ध्येयस्य** - ध्येय विषयाचा, ज्या देवतेचे ध्यान करावयाचे तिचा, **अयमेव उदयः** - हाच साक्षात्कार, यालाच साक्षात्कार म्हणतात (की जो), **इच्छतः साधकस्य** - इच्छा करणाऱ्या साधकाची, देवतेचा मंत्रोच्चार करण्याची इच्छा होताच, **तदात्मता समापत्तिः** - त्या देवतेशी तादात्म्यप्राप्ती होते, साक्षात्कार होतो.।।३१।।

**अर्थ :-** ध्यान करणाऱ्या साधकाच्या किंवा योग्याच्या चित्तात देवतेचा मंत्रोच्चार करण्याची इच्छा होताच त्या देवतेशी तादात्म्यप्राप्ती होते. यालाच "साक्षात्कार" असे म्हणतात.।।३१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

मंत्रवाच्य देवतेच्या ध्यान केलेल्या त्या त्या आकाराच्या ध्येय वस्तूच्या ठिकाणी नाना प्रकारची क्रिया संपादन करण्याची शक्ती असते. मंत्र उच्चारून ध्यान किंवा स्मरण करणाऱ्या अधिकारी साधकामध्ये संकल्पातच देवतेचा उदय होतो. इच्छा केल्याबरोबर मंत्राचा उच्चार करण्याच्या वेळी त्याच्या ध्येयाशी एकाग्रता होते. त्यावेळेस ती ती देवता तो तो पदार्थरूप बनते. साधकाला ध्येय देवतेशी तद्रूप झाल्यामुळे ही सत्ता प्राप्त होत असते. ज्यावेळी साधक मंत्राचे न्यास करून मंत्रोच्चार करतो त्यावेळी ते अन्य देवतेचे निरोधन करीत असतात. त्यामुळे साधकाचे चित्त प्रयत्नाशिवाय देवतेशी एकरूप होते. विवेकाची जागृती असलेल्या व ध्यान करणाऱ्या

साधकाला मंत्र जपाच्या वेळी आराध्य देवतेचे प्रत्यक्ष दर्शनच झालेले असते. त्यामुळे तो देवतारूप बनलेला असतो. याकरिता **"शिवो भूत्वा शिवं भजेत्"** व **"देवी देवं भजेत्"** अर्थात् श्रीशिव होऊन श्रीशिवाचे भजन करावे व देवी होऊन देवाचे भजन करावे असे सांगितले आहे.

मंत्रात्मा ध्येयाचाच ध्यात्याच्या चित्तात उदय होत असतो. जो साधक किंवा ध्याता मंत्रात्म्याशी एकत्व प्राप्त व्हावे अशी इच्छा करतो त्याची हीच तदात्मता किंवा ध्येयस्वरूपापत्ती असते. **"विश्वसंहिता"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "जेव्हा चित्त ध्येयात लीन होते तेव्हा त्याला ध्यान म्हणतात." ध्येय प्रत्यक्ष प्राप्त होते व ध्याता तन्मय होतो. मंत्रोच्चारणाच्या इच्छेने मंत्रदेवतेच्या बरोबर जे तादात्म्य होते ते वस्तुतः संवेदनांच्या द्वारा एकता प्राप्त होऊन होते. मंत्रन्यासाने जीवनात देवतेचा आविर्भाव होतो. याच्या व्याप्तीचे फल पुढील श्लोकात सांगितले आहे.।।३१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

संपूर्ण शब्दार्थमय विश्व श्रीशिवाचा म्हणजे स्वस्वभावाचाच आविष्कार आहे याची उपपत्ती मागील निष्यंदात सांगितली. या आविष्काराची उपलब्धी कोठे कशी होते हे आता सांगतात.

**स्पष्टीकरण :-** ध्यात्याच्या अंतःकरणात ध्येय वस्तू स्फुरित होणे हाच ध्येयाचा उदय होय. ध्यात्याच्या संकल्पनातच ध्येयाला आकार येतो. साधकाच्या इच्छावस्थेत ध्यात्याच्या ध्येयवस्तूंशी "तदात्मतासमापत्ति" होते व त्या समापत्तीतून बाहेर येणारा शब्दोच्चारच अमोघ ठरतो. "तदात्मतासमापत्ति" म्हणजे ध्येयवस्तूच्या स्वरूपाशी ध्यात्याचा होणारा एकीभाव होय. हा एकीभाव म्हणजे ध्येय वस्तूचा उदय होय. साधकाच्या चित्तात संकल्पावस्थेत सहजपणे व अप्रयत्नाने उठणारे स्फुरणच आकारास येते. हेच ध्येयाचे दर्शन किंवा साक्षात्कार होय. ध्येयाची स्वबाह्यतेने किंवा व्यतिरिक्तपणे प्रतीती येणे हा साक्षात्कार नव्हे.।।३१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-** कारिका क्रमांक ३१ ची वृत्ती कारिका क्रमांक ३२ मध्ये समाविष्ट केलेली आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-** कारिका क्रमांक ३१ ची टीका कारिका क्रमांक ३२ मध्ये समाविष्ट केलेली आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-** कारिका क्रमांक ३१ ची टीका कारिका क्रमांक ३२ मध्ये समाविष्ट केलेली आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**इयमेवामृतप्राप्तिरयमेवात्मनो ग्रहः ।**
**इयं निर्वाणदीक्षा च शिवसद्भावदायिनी ।।३२।।**

**अन्वयार्थ :-**

**इयमेव** - हीच - तादात्म्यता, **अमृतप्राप्तिः** - अमृतत्वाची प्राप्ती, **अयमेव** - हाच, हेच, **आत्मनो ग्रहः** - आत्म्याचे ग्रहण, आत्मज्ञान, **शिवसद्भावदायिनी** - श्रीपरमशिवांचे स्वरूपत्व, सायुज्य शिवभाव - हे प्राप्त करून देणारी, **इयं** - निर्वाणदीक्षा - जिला "निर्वाण दीक्षा" म्हणतात ती हीच.।।३२।।

**अर्थ :-** हीच तादात्म्यता आहे. हीच अमृततत्त्वाची प्राप्ती आहे. हेच आत्म्याचे ग्रहण किंवा आत्मज्ञान आहे. हिलाच वास्तविक पाहता "निर्वाण दीक्षा" असे म्हणतात. ही परम श्रीशिवांचे स्वरूपत्व किंवा सायुज्य अर्थात् श्रीशिवभाव प्राप्त करून देणारी या अर्थानेच या "निर्वाण दीक्षेला" "श्रीशिवसद्भावदायिनी" असेही म्हणतात.।।३२।।

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

जीव शरीरादि नश्वर वस्तूंचे अवलंबन करून त्यालाच अहं अहं म्हणत बसतो. त्याचप्रमाणे सर्व ठिकाणी श्रीपरमशिव आहे ही भावना सुटून द्वैतरूपाने त्यास मिथ्या ज्ञानच भासमान होते. वरील दोन्ही गोष्टींचा उच्छेद करून सर्व काळी, सर्व देशी, स्वच्छ व पूर्ण स्वतंत्र अशा एका चैतन्य तत्त्वाचीच जाणीव असणे यालाच सम्यक् ज्ञान असे म्हणतात. अशा प्रकारचे ज्ञान प्राप्त झाले म्हणजे साधकाला अमृताचीच प्राप्ती झाल्यासारखे आहे. याचाच अर्थ साधकाला श्रीपरमशिवाची प्राप्ती होऊन

मोक्ष मिळाला असा होतो. अमृतासारख्या जड वस्तूला मोक्ष म्हणत नाहीत. अमृताची प्राप्ती झाली की, पुष्कळ काळ टिकणारे शरीर प्राप्त होते. मात्र अमृताने आत्मप्राप्तिरूपी मोक्ष प्राप्त होत नाही. खरे म्हणजे मोक्षप्राप्तीसाठी वरीलप्रमाणे ज्ञानसिद्धी झाली पाहिजे. श्रीगुरूंनी दिलेला मंत्रोच्चार करण्याच्या वेळी इच्छा करता क्षणीच साधक किंवा दीक्षाकाळी शिष्य तद्रूप म्हणजे आत्मरूप बनत असतो. **दीक्षाकाळी श्रीगुरूंनी आपण स्वतःला परमात्मस्वरूप आहोत अशी भावना करून शिष्याला ही स्थिती प्राप्त होवो असा संकल्प करीत शिष्याच्या ठिकाणी शक्तिपाताने ती आत्मसत्ता प्रविष्ट करावी.** अशा प्रकाराने आत्मप्राप्ती करून घेण्याच्या विधीचा विवेक शिष्यानेही नीट केला पाहिजे. अमूर्त अशा परब्रह्म तत्त्वाचे देणे अगर घेणे संभवत नाही. परंतु देणारे श्रीगुरू व ग्रहण करणारा शिष्य हे दोघे व्यापक अशा संवित् स्वरूपाशी अभिन्न असल्याने श्रीगुरूंकडून शिष्याशी अभिन्न अशा रूपाने राहूनच दान दिले जाते व शिष्याकडूनही अभिन्न अशा रूपानेच दान स्वीकारले जाते. यालाच निर्वाण दीक्षा असे म्हणतात. निर्वाण म्हणजेच निवृत्ती होय. जीवाच्या ठिकाणी द्वैताच्या भावाचा जो क्षोभ झालेला असतो किंवा होतो त्याचा दीक्षेने नाश झाला की, जीवाला आत्यंतिक शांती प्राप्त होते. **या दीक्षेमुळेच स्वस्वरूपाच्या ठिकाणी ज्ञान स्थित होते. आपपररूपी बंधाचा नाश ज्या संस्काराने होतो व ज्यामुळे स्वरूपाच्या ज्ञानाचे दान केले जाते त्या विधीला दीक्षा म्हणतात. 'दी' म्हणजे दान व 'क्षा' म्हणजे बंधाचा नाश होय. अशा प्रकारे ज्ञानाचा उपदेश झाला म्हणजे त्याला निर्वाण दीक्षा म्हणतात.** या निर्वाण दीक्षेलाच "**संवित्-दीक्षा**" असे नाव आहे. परमेश्वराच्या अनादि सत्तेच्या जागृतीमुळे "मी अहं आहे" म्हणजे "मी परब्रह्म आहे," अशा ज्ञानाच्या सिद्धीची अवस्था या संवित्-दीक्षेमुळे साधकाला प्राप्त होते. ही निर्वाण दीक्षा देऊन श्रीपरमशिवात्मक अशा आत्मस्वरूपाची प्राप्ती करून देण्यास फक्त सुप्रबुद्ध असे श्रीगुरूच समर्थ असतात. हा अखेरचा संस्कार आहे. देणारा व घेणारा तयार असला की, हा संस्कार संपन्न होतो. जगत् किंवा प्रपंच सत्य असल्याचे मिथ्या ज्ञान ज्याचे पूर्णपणे नष्ट झाले असेल तोच ही दीक्षा देण्यास समर्थ अधिकारी पुरुष असतो.

**या दीक्षेमुळे स्वरूपाच्या संवेदनाला सुरुवात होते. शक्तीच्या**

जागृतीमुळे आत्म्यावरील आवरण हळूहळू दूर होत जाते. हाच आत्म्याच्या अमृतत्व प्राप्तीचा मार्ग आहे. मृत्यू, म्हातारपण इत्यादि परंपरा संपून पुन्हा जन्मप्राप्तीचा संभव उरत नाही, अशा अवस्थेला आम्ही मुक्ती म्हणत नाही. शक्तीची जागृती म्हणजे क्षीरसागरातून स्वतः परमात्म्याने प्रकट किंवा उद्भूत होणे आहे. हाच खरा आत्म्याचा अनुग्रह आहे. हीच "निर्वाणदीक्षा" आहे. हेच खरे परमात्म्याशी मिलन आहे. "मोक्षधर्म" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "सर्व संकल्प सोडून देऊन चित्तं सत्त्वात विलीन केले पाहिजे. जेव्हा चित्त सत्त्वात विलीन होते तेव्हा काळावर विजय प्राप्त होतो. "आत्मसंबोध" या ग्रंथातही असे सांगितले आहे की, "स्वभाव-संवित्‌चे ज्ञानच मनुष्याला या संसार सागरातून तरून नेण्यास समर्थ ठरते. एक वेळेला केलेले अमृतपानही मृत्युपंथाला लागलेल्या माणसाला अमर करते." ज्ञानसद्भावाचे दान व सर्व मल धुवून टाकणे किंवा नाहीसा करणे हाच दीक्षा पदाचा अर्थ आहे. जेव्हा श्रीसद्गुरू आपल्या अपार सामर्थ्याने शक्तिपात करून बोधानुवेध करतात तेव्हा उपरोक्त गोष्ट सिद्ध होते. दीक्षेतील 'द' शब्दाचा अर्थ दान असा असून 'क्ष' या शब्दाने क्षपण म्हणजे दूर करणे असा अर्थ सूचित होतो.

**अशा प्रकारे एकमात्र शक्तिपातानेच अकृत्रिम स्पंदतत्त्वाचा म्हणजे आत्मतत्त्वाचा उदय होतो.** त्यामुळेच होणारा मंत्रोदय, त्याचा प्रभाव व त्याच्या विभूती यांचे पुढे वर्णन केले आहे. स्पंदतत्त्वाचा उदय झाल्यावर साधकाला जागृत अवस्थेतही निजभावाची प्राप्ती होते. त्यामुळे तो पूर्णपणे स्वतंत्र होतो. स्वप्नातही हे असेच होते हे पुढील दोन श्लोकात सांगितले आहे.।।३२।।

❋❋❋❋❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** संपूर्ण वेद्यवर्ग स्वप्रकाशाहून वेगळा नाही. वेद्यवर्गाची प्रतीती प्रकाशव्यतिरिक्तत्वाने येणे ही मिथ्या प्रतीती होय. या मिथ्या प्रतीतीचा उच्छेद होताच व्यापक, निर्मळ व स्वच्छंदैकस्वभाव संविदेचा उदय होतो व तिच्यामुळेच तादात्म्य प्रतिपत्ती होते. या अवस्थेलाच येथे अमृतप्राप्ती म्हटले आहे. अमृतप्राप्ती म्हणजे अविनाशी अशा स्वस्वभावाचीच

प्राप्ती होय. ध्येयवस्तूचा उदय स्वस्वभावातूनच होतो; कारण स्वस्वभावच इदंतारूपाने ध्येयवस्तू बनतो. त्यामुळे ध्येयवस्तूशी तदात्मता म्हणजे स्वस्वभावाचीच प्राप्ती होय. हीच "अमृतप्राप्ती." या स्थितीलाच **"आत्मग्रह"** वा **"निर्वाणदीक्षा"** असेही म्हटले आहे. आत्मग्रह म्हणजे आत्मत्वाने ग्रहण होय. आत्म्याचे अमूर्तत्वाने ग्रहण शक्य नसते. त्यामुळे परिकल्पितरूपाद्वारे त्याचे ग्रहण करणे हा आत्मग्रह होय. "निर्वाणदीक्षा" म्हणजे आत्यंतिक प्रशांतीची अवस्था होय. या अवस्थेतच श्रीशिवभावाचा म्हणजे स्वस्वभावाचा बोध किंवा साक्षात्कार होतो.।।३२।।

**टीप :- लोके च धर्मादयोऽनाश्रया न संवेदनयोग्या तेन**
**धर्मादिविषये यो यथा प्रसिद्धो रामादिः**
**स शब्दमात्रोपयोगित्वेन मुख्यया प्रणालिकया गृहीतः।**
**।। अभिनवभारती।।**

**अर्थ** :- जगामध्ये अनाश्रित धर्म संवेदनयोग्य नाहीत. त्यामुळे धर्मादिविषयांमध्ये जो ज्या प्रमाणे प्रसिद्ध रामादि आहे तो शब्दमात्रानेच उपयोगी असल्याने मुख्य प्रणालीत स्वीकारला आहे.

❋❋❋❋❋

## श्रीभट्टकल्लट वृत्ती :- (कारिका क्रमांक ३१ व ३२)

## मंत्रदेवता आणि चित्त

सूत्र क्रमांक ३१ व ३२ यांमध्ये ही गोष्ट समजाविलेली आहे की, आत्मसत्तेच्या अशाच पूर्वी वर्णिलेल्या व्यापकतेचे वारंवार अनुसंधान केले असता योग्याचे संवेदन इतके तीव्र होत असते की, मंत्राचे उच्चारण करताक्षणीच त्या योग्याचे चित्त मंत्रदेवतेशी एकाकार होत असते. हीच तीव्र एकाग्रता योग्याला अंतिमतः श्रीशिवभावावर पोहोचवीत असते.

**सूत्र क्रमांक ३१ ची वृत्ती** :- संवेदनाच्या द्वारा जे त्या ध्येयाचे अर्थात् मंत्रस्वरूप किंवा मंत्राच्या द्वारा ध्येय देवताचे, मंत्रात्मक किंवा न्यासात्मक अर्थात् मंत्र म्हणणे किंवा न्यास करणे याबरोबरच साधकाचे आत्मरूपामध्ये ग्रहण अर्थात तादात्म्य होत असते, त्यालाच साधकाच्या चित्तामध्ये त्या मंत्रदेवतेचा उदय होणे अर्थात् प्रत्यक्ष साक्षात्कार होणे असे म्हणतात. "तादात्म्य होणे" याचा अर्थ असा आहे की, साधक हा

त्या मंत्रदेवतेच्या स्वभावाला प्राप्त करून घेत असतो. साधकाला त्या मंत्रदेवतेशी असे तादात्म्य मंत्राचे उच्चारण करण्याच्या केवळ इच्छेनेच प्राप्त होत असते.।।३१।।

**सूत्र क्रमांक ३२ ची वृत्ती :-** ज्ञानी होण्याच्या ढोंगापासून रहित असलेल्या योग्याचे असे आवरणहीन आणि निर्मळ स्वात्मसंवेदन हेच त्या योग्यासाठी प्रत्यक्षात अमृतत्त्व अर्थात् अविनश्वर श्रीशिवभाव प्राप्त करणे हे आहे. याउलट एखाद्या स्थूल आणि धातूच्या संमिश्रणापासून बनविले गेलेले शरीरामधील सप्तधातूंना पुष्टी देणारे आणि स्वादिष्ट अर्थात् केवळ जिव्हेला मधुर लागणाऱ्या अशा रसाचा आस्वाद घेणे हे अमृतत्त्वाला प्राप्त करणे असत नाही. (**टीप :-** येथे प्रथम आलेला "धातू" हा शब्द वैद्यकशास्त्रानुसार धातूंचे मारण करून बनविलेल्या भस्मांना सूचित करतो आणि दूसरा "धातू" या शब्दाचा अर्थ शरीरातील रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा, शुक्र हे सात धातू असा आहे. या वाक्यातील "रस" या शब्दाचा अर्थ धातूची भस्मे मिसळून बनविलेल्या स्वादिष्ट आणि पौष्टिक औषधी असा आहे. वैद्यकशास्त्रामध्ये असे म्हटलेले आहे की, रस हे मनुष्याला अमर बनवितात तथापि तो दीर्घायू सूचित करण्यासाठी केवळ एक औपचारिक प्रयोग आहे.) साधनमार्गामध्ये मंत्राचे केवळ उच्चारण करताच योग्याच्या किंवा साधकाच्या मंत्रदेवतेसह होणाऱ्या स्वरूपतादात्म्याच्या स्थितीला आत्मग्रह किंवा आत्म्याची अनुभूती प्राप्त करून घेणे असे म्हणतात; "कारण दीक्षेच्या काळी श्रीगुरूंनी आत्म्याचे ग्रहण करावे अर्थात् अंतर्विमर्शाच्या किंवा अंतर्ज्ञानाच्या किंवा अंतर्विचाराच्या द्वारा शिष्याला दिल्या जाणाऱ्या मंत्राच्या देवतेच्या स्वरूपामध्ये स्वयंस्थित राहावे," असे म्हटलेले आहे.

निराकार आत्म्याला मातीचा ढीग किंवा दुसऱ्या कोणत्याही स्थूल पदार्थाप्रमाणे हाताने पकडता येत नाही. या कारणाने ही आत्मानुभूती खरी निर्वाणदीक्षा आहे. ही निर्वाणदीक्षा साधकाच्या अंतःकरणामध्ये अनुत्तर अर्थात् ज्याहून श्रेष्ठ असे अन्य काहीही नाही अशा श्रीशिवभावाला अभिव्यक्त करीत असते.

**विवरण :-** सूत्र क्रमांक ३१ व ३२ चा अर्थ योग्य रीतीने समजण्यासाठी खालील गोष्टी ध्यानात ठेवणे परम आवश्यक आहे.

सूत्र क्रमांक ३१ मध्ये मंत्रदेवतेचे ध्यान करणाऱ्या साधकाच्या चित्तामध्ये त्या मंत्रदेवतेचा उदय होण्याची किंवा दुसऱ्या शब्दात त्या मंत्रदेवतेचा साक्षात्कार होण्याची चर्चा केलेली आहे. या संबंधामध्ये ही गोष्ट उल्लेखनीय आहे की, विकल्पसंस्कारांच्या उपायामुळे योग्याच्या संवेदनाची अर्थात् चित्ताची विशुद्धता आणि एकाग्रता इतकी तीव्र होते की, तो योगी इंद्रियांच्या द्वारा बाहेरच्या दिशेने स्पंदित होणाऱ्या संवित्धारेला अर्थात् शक्तीच्या प्रवाहाला पूर्वी वर्णिलेल्या अलंग्रासाच्या युक्तीने अंतर्हृदयाच्या अवकाशामध्ये केंद्रित करू शकतो. अशा अवस्थेमध्ये त्या योग्याने कोणत्याही मंत्राचा विमर्श किंवा विचार करताच तत्काळ त्या मंत्रदेवतेबरोबर चित्ताची एकाकारता होत असते. साधनेच्या क्षेत्रामध्ये मंत्रदेवतेबरोबर होणाऱ्या चित्ताच्या एकाकारतेला "मंत्रदेवतेचा प्रत्यक्ष साक्षात्कार होणे," असे म्हणतात. हा साक्षात्कार पूर्णपणे संवेदनात्मक असतो; कारण देवता ही स्वरूपाव्यतिरिक्त अन्य कोणताही शारीरिक आकार-प्रकार धारण करून समोर येत नाही. साधकाने किंवा योग्याने हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, ही शाक्त उपायाची उच्चतर भूमिका आहे आणि या भूमिकेवर परमेश्वराच्या तीव्र शक्तिपातामुळे पवित्र बनलेल्या पवित्र अंतःकरणाच्या काही मोजक्याच व्यक्ती पोहोचू शकतात. भगवान् श्रीअभिनवगुप्तपादाचार्य यांनी अशा सौभाग्यशाली अर्थात् अत्यंत भाग्यवान साधकाची महत्ता वर्णन करताना **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटलेले आहे की -

**केतकीकुसुमसौरभे भृशं भृङ्ग एव रसिको न मक्षिका।**
**भैरवीयपरमाद्वयार्चने कोऽपि रज्यति**
**महेशचोदितः ।।४.२७६।।**

याचा अर्थ आहे की, ज्याप्रमाणे केवड्याच्या पुष्पाचा भुंगा हा रसिक असतो अर्थात् रसिकपणाने आस्वादन घेत असतो तशी माशी असत नाही त्याचप्रमाणे एखाद्याच विशिष्ट किंवा विरळ्या व्यक्तीच्या मनामध्ये भैरवीय अभेदभूमिका प्राप्त करण्याविषयी अत्यंत आवड असते. अशा उत्सुक योग्यासाठी संसाराचे अवडंबर हे स्वतः त्याच प्रकारे नाहीसे होते ज्याप्रकारे ग्रीष्माच्या कडक उन्हामध्ये मोठमोठें हिमपहाड स्वतः वितळून वाहून जातात. हेच **"तंत्रालोक"** या ग्रंथात पुढील श्लोकात व्यक्त करताना श्रीअभिनवगुप्तपादाचार्य असे म्हटले आहे की -

**अस्मिंश्च यागे विश्रान्तिं कुर्वतां भवडम्बरः।**
**हिमानीव महाग्रीष्मे स्वयमेव विलीयते।।४.२७७।।**

या व्यतिरिक्त श्रीभट्टकल्लटांनी सूत्रामध्ये उल्लेख केलेला "इच्छतः" या शब्दाचा अर्थ मंत्राचे उच्चारण करण्याची इच्छा असा केलेला आहे. या संबंधामध्ये हे समजून घेणे आवश्यक आहे की, कोणत्याही शब्दाचे उच्चारण करतेवेळी उच्चारणाच्या दोन स्थिती सक्रिय होत असतात. यातील एक स्थिती अव्यक्त ध्वनिरूपा आंतरिक विमर्शमयी असून दुसरी या स्थितीची अनुगामिनी व्यक्त ध्वनिरूपा बाह्य वैखरीमयी स्थिती आहे. या दोन स्थितीमधील पहिली विमर्शमयी किंवा विचार अर्थात् ज्ञानमयी स्थिती ही मूलभूत इच्छारूपा स्थिती आहे. ही स्थिती प्रतिक्षण प्रत्येक प्राण्याच्या अंतःकरणात क्रियाशील राहत असली तरीही बहिर्मुख झाल्यामुळे तो प्राणी त्यामुळे सचेत होत नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की - "**उच्चारेण विमर्शरूपेण न तु स्थानकरणप्रयत्नरूपबीजाक्षरोच्चारेण तस्याणवोपायपर्यवसायित्वात् ।।२.०।।**" याचा अर्थ असा आहे की, मंत्र हा उच्चाराने पुढे जातो म्हणजेच विमर्शरूपाने (ज्ञानरूपाने) जातो. त्या मंत्राचे पुढे जाणे हे स्थान-करण-प्रयत्न यांनी निर्माण होणाऱ्या अक्षरांच्या उच्चाराने होत नाही; कारण हे अक्षरांचे उच्चारण शेवटी आणवमलात पर्यवसित होते. यावरून मंत्रोच्चारणाच्या संबंधामध्ये मंत्रोच्चारणाच्या याच पहिल्या विमर्शमयी अथवा इच्छारूपा स्थितीचाच अभिप्राय आहे; कारण शाक्त उपायावर चालणाऱ्या साधकांच्या सर्व क्रिया विमर्शमयी अर्थात् स्फुरणशील असतात. वैखरीवाणीच्या द्वारा मोठ्या आवाजात मंत्राचे उच्चारण करणे हे आणव उपायावर चालणाऱ्या अवर अर्थात् कनिष्ठ अधिकारी व्यक्तींसाठी लाभदायक सिद्ध होऊ शकते.

या दृष्टीने "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथावरील टीकेत "**तंत्रसद्भाव**" या ग्रंथातील वचन उद्धृत करताना असे म्हटले आहे की -

**यथा शरो धनुसंस्थो यत्नेनाताड्य धावति।**
**तथा बिन्दुर्वरारोहे! उच्चारेणैव धावति।।२.२।।**

याचा अर्थ असा आहे की, मंत्राच्या विमर्शमयी उच्चारणामध्ये इतकी प्रचंड शक्ती असते की, ज्याप्रमाणे धनुष्याच्या प्रचंड आघातामुळे ढकलला किंवा फेकला जाणारा तीर हा अतिस्वनिक वेगाने धावून लक्ष्याशी मिळत

असतो किंवा लक्ष्याचा वेध करीत असतो त्याप्रमाणे साधकाचे चित्त आणि परप्रकाशरूप बिंदू तीव्रगतीने एकमेकांशी एकाकार होत असतात.

सूत्र क्रमांक ३२ मध्ये निर्वाण दीक्षेचा उल्लेख केलेला आहे. या संबंधामध्ये खालील गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**आध्यात्मिक जगतामधील "दीक्षा" या शब्दाचा अर्थ विशेष प्रकारचे संस्कार असून या संस्कारांच्या द्वारा सिद्धश्रीसद्गुरू आपल्या शिष्यांमध्ये त्यांच्या मानसिक योग्यतेनुसार अनेक प्रकारच्या योगसंबंधी अनुभूतींना संक्रमित करीत असतात व अशा रीतीने एका क्षणात श्रीसद्गुरू आपल्या शिष्याचा उद्धार करीत असतात. याचा अर्थ असा आहे की, (श्रीगुरू सिद्धयोगांतर्गत शक्तिपात योगदीक्षा देऊन) शिष्याला ज्ञानाचा सद्भाव अर्थात् शक्तिस्वरूप ज्ञानाची प्राप्ती करून देत असतात. यामुळे साधकजीवाच्या आवरणात्मक अशा विकृतवासना नष्ट होतात. अशा प्रकारे (शक्तिजागृतियुक्त ज्ञानाचे) दान आणि (अज्ञानाचा) क्षय अशी ही दोन्ही कार्ये एकाच वेळेस होतात. यामुळे या प्रकारच्या प्रक्रियेला "निर्वाणदीक्षा" असे म्हणतात.** या दृष्टीने **"तंत्रालोक"** या ग्रंथाच्या विवेकटीकेत असे म्हटले आहे की -

**दीयते ज्ञानसद्भावः क्षीयन्ते (कर्म) पशुवासनाः ।**
**दानक्षपण संयुक्ता दीक्षा तेनेह कीर्तिता ।।१.४३।।**

**अर्थ :-** दीक्षेच्या वेळी श्रीगुरू शिष्याच्या देहात शक्तिसंक्रमण करून त्याची अनादि निद्रिस्त आत्मशक्ती कुंडलिनी जागृत करून तद्द्वारा त्याला ज्ञानाचा सद्भाव प्रदान करतात व त्याची पशुवासना क्षीण अगर नष्ट करतात. अशा प्रकारे दान व क्षय अशी दोन्ही कार्ये एकाच वेळी होत असल्याने हिला दीक्षा असे म्हणतात. दीक्षा शब्दाच्या "दी" वर्णामध्ये ज्ञानाचे संक्रमण आणि "क्षा" वर्णामध्ये कर्मवासनांचा नाश असा अर्थ अभिप्रेत आहे.

तंत्रशास्त्रामध्ये अनेक प्रकारच्या दीक्षा आणि त्यांच्याशी संबंधित असलेल्या शास्त्रीय विधि-विधानांचे विस्तारपूर्वक वर्णन केलेले आहे. शिष्यांच्या मानसिक योग्यतांची पूर्ण परीक्षा घेतल्यानंतरच श्रीसद्गुरू हे कोणत्या शिष्याला कोणती दीक्षा देणे योग्य आहे? हा निर्णय घेत असतात.

या दृष्टीने **"स्पंदकारिका"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**तथा इयमेव निर्वाणदीक्षा ..... संस्कारविशेषः ।।३२।।**

सर्व दीक्षांमध्ये निर्वाण दीक्षा ही असामान्य आणि दुर्लभ मानलेली आहे; कारण ज्या भाग्यवान् व्यक्तीला ही निर्वाण दीक्षा प्राप्त होते त्या व्यक्तीच्या मनामध्ये अनेक युगे साठलेल्या आणि पिंड न सोडणाऱ्या वासना या एका क्षणभरात नाहीशा होत असतात. असा योगी पुर्यष्टकाच्या (अर्थात् तन्मात्ररूप शब्द आदि पाच ज्ञेय विषय आणि मनस् इत्यादि तीन अंतःकरणापासून बनलेल्या सूक्ष्म शरीराला पारिभाषिक शब्दामध्ये "सूक्ष्म पुर्यष्टक" असे म्हणतात आणि पांचभौतिक शरीराला "स्थूल पुर्यष्टक" असे म्हणतात,) बंधनातून मुक्त होऊन स्वरूपामध्ये विश्रांती प्राप्त करून घेत असतो.

आता प्रश्न असा निर्माण होतो की, आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी निर्वाण दीक्षा या संस्काराचा आणि त्याचे शास्त्रीय विधिविधान पूर्ण करण्याची अनिवार्य आवश्यकता आहे काय? सूत्रकारांनी या शंकेचे समाधान मूळसूत्रामध्ये शब्दांना एका विशेष पद्धतीने ठेवून केलेले आहे. सूत्रकारांनी सूत्राच्या पहिल्या आणि दुसऱ्या चरणामध्ये "निर्वाण दीक्षा" या शब्दाबरोबर जाणून बुजून "एव" या शब्दाऐवजी "च" चा उपयोग केलेला आहे. असे करण्यामागे विशेषता अशी आहे की, निर्वाण दीक्षा नामक संस्काराच्या आश्चर्यजनक महत्तत्त्वाची कधीही उपेक्षा केली जाऊ शकत नाही. परंतु ईश्वरीय अनुग्रहाच्या लोकोत्तर पद्धती किंवा रीतीरिवाज मात्र शास्त्रीय विधिविधानावर अवलंबून नाहीत. या दृष्टीने **"तंत्रसार"** या ग्रंथात श्रीअभिनवगुप्तपादाचार्य यांनी असे म्हटले आहे की, **"तत्र अतिदृढशक्तिपाताविद्धस्य स्वयमेव सांसिद्धिकतया सत्तर्क उदेति, योऽसौ देवीभिः दीक्षित इति उच्यते।।पृष्ठ २३।।** ज्या महान् आत्म्यांवर परमेश्वरांचा दृढ शक्तिपात होत असतो त्या महान् आत्म्यांना देवी अर्थात् परमेश्वरांच्या शक्तींनी स्वयं अज्ञातरूपाने दीक्षित केलेले असते. या दीक्षेमुळे या महान् आत्म्यांच्या मनामध्ये सांसिद्धिक अर्थात् स्वतःसिद्धरूपामध्ये सत्तर्क अर्थात् शुद्ध विद्या हिचा उदय होत असतो. फलतः ज्या व्यक्तींना कोणत्याही अचिंत्य अर्थात् चिंतन करता न येणाऱ्या रीतीने आणि अज्ञात प्रकाराने मंत्रशक्तीची अनुभूती होत असते तो प्रकार त्यांच्यासाठी निर्वाणदीक्षा असते. निर्वाण

दीक्षेसाठी तुपाचे दिवे जाळून किंवा सामग्रीचे भंडार जाळून संस्काराचा विधी पूर्ण करण्याच्या अवडंबराची आवश्यकता असत नाही. या दृष्टीने **"परात्रिंशिका"** या ग्रंथात म्हटले आहे की -

**एवं यो वेत्ति वेदतत्त्वेन तस्य निर्वाणदायिनी।**
**दीक्षा भवत्यसन्दिग्धा तिलाख्याहुतिवर्जिता।।२६।।**

याचा अर्थ असा आहे की, अशा प्रकारे जी व्यक्ती या अमृतबीजरूपी हृदयाचे तत्त्व जाणणारी असते, त्याला निर्वाणाच्या अवस्थेवर नेऊन पोहोचविणारी दीक्षा अग्नीत तीळ व तुपाची आहुती टाकल्याशिवाय निःसंदेह-पणे दैवी अनुग्रहाने परिपूर्ण होते.

श्रीमद् सोमानंदाचार्य, श्रीमद् उत्पलाचार्य किंवा श्रीमद् अभिनव-गुप्तपादाचार्य यांसारख्या शैवदर्शनाचे उद्भट आणि वरिष्ठ सिद्धजनांचे या गोष्टीवर एकमत आहे की, कोणत्याही उपायाने, शास्त्राध्ययनाने अर्थात् शास्त्राभ्यासाने, श्रीगुरूपदेशाने किंवा कोणत्याही अदृश्य प्रकाराने आत्मशक्तीचे एकदा प्रत्यभिज्ञान अर्थात् संपूर्ण विशिष्ट ज्ञान झाले की, सर्व उपायजालाचे किंवा निर्वाणदीक्षेसारख्या संस्काराच्या शास्त्रीय विधिविधानांचे कोणतेही प्रयोजन अवशिष्ट किंवा शिल्लक राहत नाही. **(शिवदृष्टी आह्निक ७, "तंत्रालोक" आह्निक २)** एखादा पदार्थ हे खरे सोने आहे असे एकदा ज्ञान झाले की, ते पारखून घेण्यासाठी ते सोने कसोटीवर घासून पाहण्याची आवश्यकता असत नाही.।।३१-३२।।

**इति श्रीभट्टकल्लटाचार्यविरचितायां स्पन्दकारिकावृत्तौ "सहज-विद्योदयो" नाम द्वितीयो निःष्यन्दः।।२।।**

**श्रीमान् भट्टकल्लटाचार्य यांच्या द्वारा विरचित स्पंदकारिकावृत्तीचा "सहज विद्योदय" नावाचा दुसरा निष्यंद समाप्त झाला.**

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

या दोन कारिकांमध्ये ग्रंथकारांनी असे सांगितले आहे की, या महान् स्पंदतत्त्वाच्या साक्षात्काराने साधक, आचार्य इत्यादींना इच्छिलेली वस्तू प्राप्त करविण्यास कारण होतो.

**स्पष्टीकरण :-** येथे **"शिवो भूत्वा शिवं यजेत"** अर्थात् "श्रीशिव

होऊन श्रीशिवाला यजावे." असे जे उद्घोषिले आहे तेथे ध्यान करणाऱ्याच्या मनामध्ये किंवा संवेदनेमध्ये "**न सावस्था न यः शिवः।**" अर्थात् अशी अवस्थाच नाही जी श्रीशिव नाही," असे प्रतिपादित केलेल्या श्रीशिवस्वभावाचा किंवा अन्य ध्येयाचा म्हणजेच त्या त्या सिद्धी प्राप्त होण्यासाठी एखाद्या विशिष्ट मंत्राच्या देवतेचा हाच प्रकटीभाव किंवा उदय असून तो साधकाने म्हणजेच ध्याननिष्ठ साधकाने किंवा आचार्यांनी "**तस्माच्छब्दार्थचिन्तासु न सावस्था न यः शिवः।।२।४।।**" अर्थात् शब्द व अर्थ यांच्या विचारांमध्ये अशी अवस्थाच नाही की जी श्रीशिव नाही, अशा प्रकारे प्रतिपादित केलेल्या अवस्थेशी म्हणजेच श्रीशिवांशी एकात्मता प्राप्त केलेली असते. ही स्थिती म्हणजे पंचवक्त्रादि इतर स्वरूपांचे दर्शन नव्हे. फक्त निश्चय केल्यानेच त्या श्रीशिवांशी एकात्मता प्राप्त करता येत नाही. परंतु विश्वाहंतात्मक श्रीशिवांशी एकात्म किंवा समरस होण्याच्या तीव्र इच्छेने श्रीशिवांशी एकात्मता प्राप्त करता येते.

या सर्वाचा अर्थ असा आहे की, "मी स्वतःच चिदानंदघन श्रीशिव असून माझे शरीर म्हणजे हे विश्व आहे; कारण मी त्याच्याशी एकरूप झालो आहे असे प्रत्यक्ष ज्ञान मला झाले आहे" अशा प्रकरचा ज्याचा संकल्प इतर सर्व कल्पनांचा क्षय झाल्यावर सिद्ध होतो त्याच्या बाबतीत ध्येयरूप मंत्राच्या देवतादि का बरे अभिमुख होणार नाहीत? (अभिमुख होणार). कारण हे सर्व विश्व या स्वभावाशी अद्वय रूप अशा स्पंदतत्त्वामध्ये कळसाला पोहोचते अथवा लीन होते. यासंबंधी आमच्या महान् व पूजनीय श्रीगुरुजनांनी असे म्हटले आहे की -

**साक्षाद्भवन्मये नाथ सर्वस्मिन्भुवनान्तरे।**
**किं न भक्तिमतां क्षेत्रं मन्त्रः क्वैषां न सिध्यति।।**

।। उ०स्तो०१।४।।

**अर्थ :-** हे नाथ! या सर्व भुवनामध्ये कोणती अशी पवित्र जागा किंवा क्षेत्र तुझ्या भक्तांसाठी नाही की, जी साक्षात् तुझ्याशी एकरूप नाही? आणि अशी धारणा झालेल्या त्या भक्तांचा कोणता बरे मंत्र सिद्ध होणार नाही?

हीच श्रेष्ठ अद्वयरूप अमृतमय स्वरूपाची प्राप्ती होय. येथे "**एव**" **(च)** याचा आशय असा आहे की, कितीतरी काळ शरीराला दृढत्व प्राप्त करून देणारे अन्य (साधारण) अमृत प्राप्त होऊनही साधकांचे मरण

अवश्यच घडून येते. अशा प्रकारे सर्वत्र याच आशयाने **"श्रीस्वच्छंदशास्त्र"** या ग्रंथातल्या स्थूलदृष्टीने अमृतप्राप्ती प्रकरणात **"नैव चामृतयोगेन कालमृत्युजयो भवेत्।"** अर्थात् (सर्वसाधारण) अमृत प्राप्त करण्याने काल व मृत्यूवर जय मिळविता येत नाही. या वाक्याने उपसंहार करून (अमृताच्या) तात्त्विक प्राप्तीचा प्रकार **"अथवा परतत्त्वस्थः सर्वकालैर्न बाध्यते।।७.२२३।।"** अर्थात् किंवा परतत्त्वात स्थित असणाऱ्या अमृताच्या प्राप्तीने (साधकाला) कोणत्याही प्रकारचा काळ बाधत नाही. इत्यादींनी सांगितले आहे. त्याचप्रमाणे मध्यात **"..... सर्वं शिवशक्तिमयं स्मरेत्।"** अर्थात् हे सर्व श्रीशिव आणि शक्तिमय आहेत असे स्मरण करावे," असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे शेवटी -

**जीवन्नेव विमुक्तोऽसौ यस्येयं भावना सदा।**
**यः शिवं भावयेन्नित्यं न कालः कलयेत्तु तम्।**
**योगी स्वच्छन्दयोगेन स्वच्छन्दगतिचारिणा।**
**स स्वच्छन्दपदे युक्तः स्वच्छन्दसमतां व्रजेत्।**
**स्वच्छन्दश्चैव स्वच्छन्दः स्वच्छन्दो विचरेत्सदा।।७।२५८।।**

**अर्थ :-** (हे सर्व श्रीशिवमय आणि शक्तिमय आहे) अशी ज्याची भावना असते तो जिवंतपणीच मुक्त होतो. जो श्रीशिवांचे नेहमी ध्यान करतो त्याच्यावर काळाचा कोणताही प्रभाव पडत नाही. तो योगी स्वच्छंदाच्या योगाने स्वच्छंद अर्थात् स्वतंत्र गतीने युक्त होऊन तो स्वच्छंदाच्या ठिकाणी युक्त होतो आणि स्वच्छंदाची प्राप्ती करून घेतो. तो स्वच्छंद झालेला योगी नेहमीच स्वच्छंद अर्थात् मनमोकळेपणाने आणि स्वतंत्रपणे विचरण करतो.

असे सांगून सहजसंदर्भाने प्रशंसेसह मागाहून असे उपदेशिले आहे की, हा ग्रह म्हणजेच भावना हेच आत्म्याचे ज्ञान होय. "आत्म्याचे ज्ञान करून घ्यावे," असे जे शास्त्रात सांगितले आहे त्यामध्येही सर्वज्ञ, सर्वकर्तृत्व स्वतंत्र श्रीशिवस्वरूपाच्या प्रत्यभिज्ञानरूप आत्म्याचेच ज्ञान अपेक्षिले आहे. तेथे **"पुरुष एवेदं सर्वम्।। श्वेताश्वतरउपनिषद् ३।१५।।** अर्थात् "हा पुरुषच सर्व आहे" असे वेदान्त्यांनी सांगितल्याप्रमाणे किंवा **"त आत्मोपासकाः सर्वे न गच्छन्ति परं पदम्।। स्वच्छंदतंत्र ४.३८८।।"** अर्थात् ते आत्म्याची उपासना करणारे सर्वच जण परमपदाला

प्राप्त होत नाहीत. अशा प्रकारे आम्नायांमध्ये सांगितल्याप्रमाणे ज्ञानाची अपेक्षा नाही.

त्याचप्रमाणे हे (ज्ञान म्हणजे) दीक्षा देण्याच्या वेळेस शिष्याची एकात्मता साधण्यासाठी त्याच्या आत्म्यावर केलेला अनुग्रह आहे. हे आत्म्याचे ज्ञान प्राप्त करण्याचा मार्ग जाणून घेऊन आचार्य शिष्याच्या आत्म्याला श्रीशिवांशी एकरूप करवून खऱ्या अर्थाने आचार्य बनतात.

ही स्वतःच्या अनुभवाने सिद्ध होणारी, पुत्रकादींना श्रीशिवात्म सद्भावाचे पारमार्थिक स्वरूप प्राप्त करून देणारी निर्वाणदीक्षा होय. यासंबंधी "**परात्रिंशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**एवं यो वेद तत्त्वेन तस्य निर्वाणदायिनी।**
**दीक्षा भवत्यसन्दिग्धा तिलाज्याहुतिवर्जिता।।२५।।**

**अर्थ :-** अशा प्रकारे जो तत्त्वाने (या स्वरूपाला) जाणतो त्याला निःसंदिग्ध निर्वाण (मुक्ती) देणारी ही दीक्षा तिळ आणि तूप नसणाऱ्या आहुतीप्रमाणे होते.

हौत्री दीक्षाही (यज्ञ करणाऱ्या होत्याला दिली जाणरी दीक्षाही) दीक्षाच असते. त्या हौत्री दीक्षेच्या ठिकाणी कोणाचाही अनाश्वास (अविश्वास) होऊ नये म्हणून श्रीमहागुरू व श्रेष्ठ श्रीवसुगुप्तांनी येथे "एव" हा शब्द वापरला नाही.।।३१-३२।।

**इति श्रीमहामाहेश्वराचार्यक्षेमराजानकनिर्मिते स्पन्दनिर्णये सहजविद्योदयस्पन्दो द्वितीयो निष्यन्दः।।२।।**

अशा प्रकारे श्रीमहामहेश्वराचार्यक्षेमराज यांनी निर्मिलेल्या स्पंद-निर्णयातला सहजविद्योदय स्पंद नावाचा दुसरा निष्यंद पूर्ण झाला.

❋❋❋❋❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

पूर्वोक्त प्रकाराने निरूपित अनवच्छिन्न अर्थात् कोणतेही आवरण नसलेली, निर्मल, स्वतंत्रस्वरूपमात्र, अनुत्तर स्पंदतत्त्वरूप संवित् (ची प्राप्ती) म्हणजेच अमृतप्राप्ती होय हे "**अयमेवोदयस्तस्य .....।।३१।।**" व **इयमेवामृत .....।।३२।।** या दोन कारिकांमध्ये कथन केले आहे. या संवित्‌ची प्राप्ती म्हणजेच अविनाशी स्वभावाने युक्त श्रीशिवस्वरूप अशा आत्म्याची अपरोक्षज्ञानरूपाने उपलब्धी होय. ही प्राप्ती म्हणजे आयुर्वेदात

सांगितलेल्या विशिष्ट द्रव्यस्वरूप जडात्मक अविनाशी वस्तूची प्राप्ती नसून याउलट श्रीशिवसंविदात्मक वस्तूची प्राप्ती होय. "आत्मज्ञानही ही संवित्‌च होते." मंत्रोच्चारांच्या अभिलाषेने त्याचक्षणी उत्पन्न होणारी संवित् हीच आत्म्याचे ज्ञान होय. ही संवित्‌च अनुत्तरस्पंदात्मक श्रीशिवतत्त्वाबरोबर तादात्म्य प्रदान करणारी निर्वाण दीक्षा आहे. निर्वाण म्हणजे निर्वृती अर्थात् द्वैतज्ञानात्मक विक्षेपांचा पूर्णपणे क्षय करून आत्यंतिक प्रशांतस्वरूप अशा संविद्‌ची "स्व"स्वभावामध्ये व्यवस्थिती होय. या संविद्रूप ज्ञानावस्थेमध्ये असूनही सर्व भेदात्मक भयाचा आणि संमोहात्मक बंधाचा त्याचक्षणी विनाश होतो. श्लोकात असणाऱ्या "शिव-सद्भाव-दायिनी" या अंशाचा असा अर्थ आहे की, श्रीशिवांचा म्हणजेच स्व-स्वभावरूप सर्वेश्वराचा जो सद्भाव म्हणजेच अस्तित्व ज्या रूपाने विद्यमान असते ते माझेच रूप आहे, दुसऱ्या कोणाचेही नाही. अशा प्रकारच्या अज्ञानावस्थेमध्ये अज्ञान स्वस्वरूप ही संवित्‌च प्रदान करते.।।३१-३२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**यथेच्छाभ्यर्थितो धाता जाग्रतोऽर्थान् हृदि स्थितम्।**
**सोमसूर्योदयं कृत्वा सम्पादयति देहिनः।।३३।।**
**तथा स्वप्नेऽप्यभीष्टार्थान् प्रणयस्यानतिक्रमात्।**
**नित्यं स्फुटतरं मध्ये स्थितोऽवश्यं प्रकाशयेत्।।३४।।**

**अन्वयार्थ :-**

**यथा** - ज्याप्रमाणे, **धाता** - "परमात्मा" (श्रीरामकंठ), प्रत्येकाच्या हृदयात विद्यमान असलेली चिच्छक्ती, "स्वतःमध्ये सर्व धारण करणारे," **धत्ते सर्वमात्मनि** - असे श्रीशिव (श्रीक्षेमराज), **देहिनः** - (१) सर्वसाधारण देहधारी - संसारी जीवाचे, (२) "देहाभिधान असलेल्या पण नियमित योगाभ्यास करणाऱ्या योग्याचे" (श्रीभट्टकल्लट), **हृदि स्थितम्** - अंतःकरणात असलेली जी जी इच्छा. (**पाठभेद - हृदि स्थितान्** - अंतःकरणात हवे असणारे भाव, इच्छा), **इच्छाभ्यर्थितः** - (१) संकल्पात्मक इच्छारूपी प्रार्थना केला गेलेला (श्रीभट्टकल्लट), (२) दिदृक्षेने (पाहण्याच्या इच्छेने - योग्याची संकल्पात्मक इच्छा हीच हवे असण्याची प्रार्थना असते) अभ्यर्थना केलेला (श्रीरामकंठ), **जाग्रतः** - जागृत अवस्थेत योग्याला, **सोमसूर्योदयं कृत्वा** - सोमसूर्य योग्याचे नेत्र, योग्याच्या डोळ्यात तीव्र अवधानात्मक

शक्ती निर्माण करून - (श्रीभट्टकल्लट), **सम्पादयेत्** - दर्शन करविते.।।३३।।

**अन्वयार्थ :-**

**तथा** - त्याच प्रमाणे योगसाधना पूर्ण करून परिपक्व झालेल्या योग्यांच्या, **स्वप्नेऽपि** - स्वप्न अवस्थेमध्ये सुद्धा, **अभीष्टार्थान्** - इच्छित पदार्थांचा, **अवश्यम्** - खात्रीने, न चुकता, **प्रकाशयेत्** - प्रकाश करतो, साक्षात्कार घडवितो, (कारण अशा प्रगत अवस्थेतील योग्यांच्या) **मध्ये**- मध्यधामात, सुषुम्णा नाडीत, **नित्यं**- नेहमी, **स्फुटतरम्** - अधिक स्पष्ट रीतीने प्रकाशमान राहतो व त्या योग्याच्या, **प्रणयस्य** - संकल्पनात्मक अभ्यर्थनेचा, **अनतिक्रमात्**- अतिक्रमणाचा अभाव असल्यामुळे- तो अतिक्रमण करीत नाही.।।३४।।

**सूत्र क्रमांक ३३ अर्थ :-** ज्याप्रमाणे धाता अर्थात् प्रत्येक प्राण्याच्या अंतर्हृदयामध्ये राहत असलेली चिच्छक्ती देहाभिमानामध्ये असलेल्या परंतु नियमित रूपाने योगाभ्यास करणाऱ्या योग्याच्या द्वारा संकल्पात्मक इच्छेच्या रूपाने असणारी प्रार्थना केली असता सोमसूर्य अर्थात् दोन्ही नेत्रामध्ये अत्यंत तीव्र अशा अवधानात्मक शक्तीचा उदय करवून योग्याला जे पदार्थ हृदयात पाहावयाची इच्छा असेल त्या पदार्थाचे दर्शन जागृत अवस्थेमध्ये करवीत असते।।३३।।

**सूत्र क्रमांक ३४ अर्थ :-** त्याचप्रमाणे प्रत्येक प्राण्याच्या अंतर्हृदयामध्ये असलेली ही चिच्छक्ती परिपक्व योग्यांना स्वप्नावस्थेमध्येही इच्छित पदार्थांचा साक्षात्कार करवीत असते. याचे कारण असे आहे की, ही चिच्छक्ती या स्तरावरील योग्याच्या मध्यधामामध्ये अर्थात् सुषुम्णाधामामध्ये प्रतिक्षण स्फुटतर रूपामध्ये प्रकाशमान राहत असते आणि त्यांच्या अर्थात् योग्यांच्या प्रणयाचे म्हणजेच संकल्पात्मक अभ्यर्थनेचे कधीही अतिक्रमण करीत नाही.।।३४।।

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :- (कारिका क्रमांक ३३ व ३४)**

देही हा देहमात्रच आत्मा आहे असे मानतो. जागृत अवस्थेमध्ये व विषय ग्रहण करण्यामध्ये गुंतलेल्या इंद्रियांच्या वृत्तिरूप अशा जागृतावस्थेचा अनुभव जीव घेत असतो. तो हृदयामध्ये स्थित असलेले पदार्थ पाहण्याची इच्छा करतो. त्या वेळेस पाहण्याची शक्ती हीच इच्छाशक्ती असते. या शक्तीने इच्छा किंवा विनंती केल्याबरोबर त्याचक्षणी परमात्मा

जागृतावस्थेशी तादात्म्य पावलेला पदार्थ होतो. त्या वेळेस मनास वाटेल तसे पदार्थ त्या त्या वेळेस तो जीव करून घेत असतो. चंद्र-सूर्य हे ज्याचे डोळे आहेत असा तो परमात्मा आवडत्या पदार्थाचा निश्चय होता क्षणीच तत्स्वरूप बनतो.

इच्छाशक्तीने विनंती केल्यावरून तो परमात्मा तेवढाच पदार्थ फक्त नजरेस पडावा अशी जागृती ठेवून डोळ्यांच्या ठिकाणी आत्मस्वरूपाच्या जागृतीचा उदय करून इतर अनेक पदार्थ भोवताली असूनसुद्धा जो पदार्थ पाहण्याची इच्छा केली असेल तेवढाच पदार्थ दाखवीत असतो. त्याचप्रमाणे ऐकण्याच्या इच्छेने प्रार्थना केल्याबरोबर कानांचा उदय करून इतर हजारो गोष्टी कानावर पडत असताना जी गोष्ट ऐकण्याची इच्छा असेल तेवढेच तो ऐकू शकतो. त्या वेळेस मन, प्राण वगैरे सर्व परमात्मस्वरूप होत असतात. चंद्र व सूर्य हे विश्वरूप परमात्म्याचे डोळे आहेत. त्यामुळे तो परमात्मा विश्वातील वाटेल तो पदार्थ पाहू शकतो. त्याचप्रमाणे प्राण व मनाच्या साहाय्याने हा जीवात्मा इष्ट अशा पदार्थाचे ज्ञान करून घेऊ शकतो.

आपल्या स्वतःच्या बळाच्या आश्रयाने आत्मस्वभावरूप स्रष्टा जागृत अवस्थेत आपल्या इच्छेने प्रेरित होऊन हृदयातील अभिमत अर्थ प्राप्त करतो. खरोखर हे कसे होते? चंद्र-सूर्य, प्राणापान व डोळ्यांचा उदय करून तो अत्यंत अवधानपूर्वक इच्छित पदार्थ पाहतो. गवताच्या काडीपासून आकाशस्थ ग्रह ताऱ्यांपर्यंत मनुष्यांच्या दृष्टीपुढे असंख्य वस्तू असतात. त्यातील जी वस्तू पाहण्याची योगी इच्छा करतो तीच तो पाहतो; कारण त्या वस्तूत स्वरूपाचा प्रवेश होतो. अगदी याच प्रकाराने स्वप्नावस्थेमध्येसुद्धा आपल्या स्वभावात स्थिर राहून जीव आपल्या हृदयातील इच्छित पदार्थांना स्पष्टपणे पाहतो; कारण आत्मवित् इच्छेचे अतिक्रमण करीत नाही. एक प्राचीन वचन असे आहे की, "दृढ अभीष्ट विषयक इच्छा सोडून जीवाची दुसरी वृत्तीच होत नाही." येथे सांगण्याची गोष्ट अशी आहे की, सृष्टीत इच्छानुगामीच पदार्थ असतात. स्वतंत्रपणे कोणत्याही पदार्थाचा उदय होत नाही. पदार्थ इच्छेचे अतिक्रमण करू शकत नाही. **"रहस्यस्तोत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "विस्तृत पदार्थाचे स्मरण करून बुद्धी जीवाला संपूर्णपणे आत्म्याच्या समोर ठेवते. ज्या ज्या गोष्टींची प्रार्थना बुद्धी रसपूर्वक करते त्या गोष्टींचे

आत्मसंवित् स्वप्नातही उल्लंघन करीत नाही." सिद्धाची वाणी अशी आहे की, "चिदाकाशात राहून जो अनुसंधान करतो तो अखंडितच पाहतो." ज्योतिषशास्त्रात असे म्हटले आहे की, "मनुष्य ज्या ज्या इंद्रियार्थांनी पूर्ण व्याप्त होऊन झोपतो, त्या त्या पदार्थांचेच कर्म तो स्वप्नावस्थेत पाहतो."

आतापर्यंत स्वप्न-स्वातंत्र्याचे वर्णन करून युक्तीने सुषुप्तीकालीन आवरणाच्या अंधाराच्या कल्पनेचा निषेध केला. यापुढे स्वस्थ स्वरूपस्थ पुरुषच जागृती, स्वप्न आदि अवस्थांमध्ये स्वातंत्र्याचा लाभ कसा करतो हे स्पष्ट केले आहे. स्वरूपस्थित झाल्याशिवाय स्वातंत्र्याची प्राप्ती होत नाही.।।३३-३४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :- (कारिका क्रमांक ३३ व ३४)**

**स्पष्टीकरण :-** स्वस्वभावाच्या भूमिकेवरील संकल्पित वस्तूच्या प्रकटीभवनाची कल्पना आणून द्यावयास येथे जाग्रदवस्थेचा दृष्टान्त घेतला आहे. जागरावस्थेत एखादी वस्तू पाहण्याची आपली इच्छा होताच आपले डोळे नेमके इच्छित वस्तूवर जाऊन पडतात. हे कसे घडते? तदात्मतासमापत्तीने हे घडते असे याचे उत्तर आहे. इच्छावस्थाही आपलीच व दर्शनरूप क्रियावस्थाही आपलीच असते. आपणच या दोन्ही अवस्थांनी स्फुरत असतो. आपली इच्छेची तदात्मता झाली की, इंद्रियवृत्ती प्रवर्तित झालीच. या तदात्मतासमापत्तीलाच कारिकेत ध्यात्याची प्रार्थना म्हटले आहे. सोमसूर्योदय म्हणजे चक्षुरिंद्रियांचे प्रवर्तन होय. हे प्रवर्तन इच्छापूर्वकच असते. इच्छा हे स्वस्वभावाचे स्फुरण व इंद्रियवृत्ती हे त्याचे प्रकटन होय. लौकिकजीवनातही हा प्रकार असतोच. संसारी जीवाला त्याची जाणीव नसते हा भाग वेगळा. पण ज्याला व्यापक अहंप्रतीतीची भूमिका लाभली आहे त्याला कोणत्याही अवस्थेत ज्ञान-ज्ञेयरूप विश्व जाणवत असता त्याची ही तादात्म्यप्रतीती कधीच व्यभिचरित होत नाही. त्यामुळे स्वप्नात म्हणजे संकल्पावस्थेत सुद्धा त्याला अभीष्ट असणारे अर्थच त्याच्यासमोर उपस्थित होतात व ते संसारी जीवाच्या जागृतीपेक्षाही अधिक स्पष्टपणे प्रकट होतात. "प्रणयस्यानतिक्रम" म्हणजे "तादात्म्य-समापत्तीच होय."

प्रबुद्धावस्थेतील संकल्पावस्था व आपली संसारी जीवाची स्वप्नदशा

यांच्यातील भेद नीट ओळखला पाहिजे. प्रबुद्धाचे स्वस्वभावाशी नित्य तादात्म्य होत असल्याने व प्रतिक्षणी त्याचाच प्रत्यवमर्श होत असल्याने प्रबुद्ध संकल्पावस्थेतही विमर्शाच्याबाबतीत जागृतच असतो. त्यामुळे संकल्पावस्थेतही त्याचे अभीष्ट पदार्थच उपस्थित होतात. शिवाय त्याच्या क्रियाशक्तीला तेथेही प्रतिबंध नसतो. संसारी जीवाची स्वप्नदशा अशी नसते. तिच्यामध्ये स्वाप्नपदार्थावर जीवाचे नियंत्रण नसते. उलट प्रबुद्धाचे इच्छास्वातंत्र्य संकल्पावस्थेतही कायमच असते. त्यामुळे तो आपल्या संकल्पात यथेप्सित पदार्थ निर्माण करू शकतो. प्रबुद्धाच्या या शक्तीलाच भर्तृहरीने "**स्वप्नस्वातंत्र्य**" असे म्हटले आहे. ज्याला स्वप्नस्वातंत्र्याचे बळ लाभले आहे त्याच्या स्वप्न व जागर या अवस्थात फरक नसतो. शैवागामात या अवस्थेला "**तमोवरणनिर्भेद**" असे म्हटले आहे.[१] ।।३३ व ३४।।

टीप :- १ रसविघ्नात "**देशकालादिविशेषावेश**" व "**सुखसुखादि-विवशीभाव**" अशी दोन रसविघ्ने आहेत. त्यांचा निरास व "**तमो-वरणनिर्भेद**" एकाच प्रकारचे आहेत.

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

कारिका क्रमांक ३३ व ३४ ची श्रीभट्टकल्लट वृत्ती कारिका क्रमांक ३५ बरोबर दिली आहे.

## विभूतिस्पंद

### : श्रीक्षेमराजस्पंदनिर्णय टीकेची विभूतिस्पंदाची प्रस्तावना :

अशा प्रकारे निमीलन आणि उन्मीलन अशा दोन समाधींचे ध्यान करून सुप्रबुद्धता व्यक्त किंवा प्रकट होण्यासाठी दोन प्रकारच्या सृष्टींमध्ये अरणी (रवी) झालेला स्पंदतत्त्वामधील समावेश किंवा स्पंदतत्त्वाशी सामरस्य मागील दोन निष्यंदामध्ये वर्णन केले. आता या निष्यंदात ग्रंथकार स्पंदतत्त्वाच्या आश्रयाच्या अभ्यासाने पर आणि अपर विभूतींचा उदय होतो असे सांगून बंध आणि मोक्षाचे स्वरूप निरूपण करतात व पहिल्यांदाच आरंभ केलेल्या विषयाचे "**यथेच्छा .....**" येथून सुरुवात होणाऱ्या आणि "**चक्रेश्वरो भवेत् .....**" येथपर्यंतच्या एकोणीस श्लोकांनी "विभूतिस्पंद" या नावाच्या निष्यंदात वर्णन करतात.

त्यापैकी दोन श्लोकांनी जागृत अवस्थेत सिद्ध असणारे स्वातंत्र्य हे

दृष्टान्तपुर:सर अर्थात् स्वप्नावस्थेतले स्वातंत्र्य सांगितले आहे. त्याच्या पुढच्या श्लोकात त्याच्या विरुद्ध सांगत (साधकाने) सतत उद्योगाचा आश्रय घेतला पाहिजे असे सांगितले आहे.

त्यानंतरच्या दोन श्लोकातून अभीष्ट अर्थात् इच्छिलेल्या वस्तूच्या ज्ञानाचे प्रकटीकरण अथवा आविर्भाव सांगितला आहे.

त्यानंतरच्या श्लोकात कर्तृशक्तीच्या आविर्भाव आणि भूक इत्यादींवर जय सांगितला आहे.

त्यानंतरच्या एका श्लोकात सर्वज्ञतेची प्राप्ती कशी होते ते सांगितले आहे.

पुढच्या श्लोकात ग्लानींचा नाश कसा होतो ते सांगितले. या विषयाचा या आठ श्लोकांमध्ये समावेश आहे.

त्यानंतरच्या श्लोकात स्पंदात्मक तत्त्वाच्या उन्मेषाचे (विकासाचे) स्वरूप सांगितले आहे.

त्यापुढच्या श्लोकात परसमाधीत विघ्न आणणाऱ्या सिद्धींचे हेयत्व म्हणजेच नि:सारता सांगितली आहे.

त्या पुढच्या श्लोकात दुसऱ्या निष्यंदात वर्णन केलेल्या विश्वात्मक "स्व"भावाचा समावेश किंवा प्रेरणा सांगितली आहे.

तशा प्रकारच्या समावेशाच्या प्राप्तीचा उपाय किंवा प्रक्रिया पुढच्या श्लोकातून सांगितली आहे.

पुढच्या तीन श्लोकांनी पशू व त्याला बांधणाऱ्या पाशांचा विचार केला आहे.

पुढच्या श्लोकात स्पंदतत्त्वच बंध आणि मोक्ष या दोन्हींमध्ये व्याप्त असते असे सांगितले आहे.

पुढच्या दोन श्लोकात उच्छेद्यत्वाने अर्थात् एकमेकांपासून दूर होण्याला योग्य अशा प्रकाराने बंधाचे स्वरूप सांगितले आहे.

शेवटच्या श्लोकात बंध नष्ट करण्याचा उपाय सांगतानाच पहिल्या सूत्राचा सारांशही सांगितला आहे. हे सर्व तृतीयनिष्यंदाचे सार आहे. आता ग्रंथाचे व्याख्यान सुरू होते.

**श्रीक्षेमराजस्पंदनिर्णय टीका :- (कारिका क्रमांक ३३ व ३४)**

"सुप्रबुद्धाला नेहमीच स्पंद तत्त्वाची प्राप्ती होते," असे मागे म्हटले

आहे. त्याठिकाणी "त्यामुळे नेहमीच प्रयत्नशील असावे," या वचनांनी असे सांगितले आहे की, जागृत अवस्थेत स्पंद तत्त्वाचे सतत परिशीलन अर्थात् अभ्यास करून प्रबुद्धाने सुप्रबुद्ध व्हावे. या अवस्थेला या परिच्छेदात उपायांवरच्या समाधीच्या सतत अभ्यासाने निष्णात झालेल्या योग्याची आवरणरूप सुषुप्ती अवस्था सांगितली आहे.

आता ग्रंथकार लौकिक स्वप्न आणि सुषुप्ती अवस्थांच्या नाशाने सुप्रबुद्धता साधण्यासाठी स्वप्नावस्थेला योग्य असणाऱ्या विभूतीचे स्पष्टीकरण करतात.

**स्पष्टीकरण :-** सर्व गोष्टी आत्म्यामध्ये धारण करतो तो धाता होय आणि असा तोच श्रीशंकरात्मक स्वभाव आहे. तो ज्याप्रमाणे जागृत अवस्थेमध्ये स्वातंत्र्य अभिव्यक्त झालेल्या देहभूमिकेतच पिंडाचे म्हणजेच संपूर्ण विश्वाच्या लहान प्रतिकृतीचे ज्ञान प्रकट झालेल्या योग्याशी संबंधित असणाऱ्या इच्छेने प्रार्थना केलेल्या अर्थात् अंतर्मुखस्वरूप ज्ञानाच्या सामर्थ्याने कृपा केली आहे असा हृदयामध्ये स्थिर असणाऱ्या विषयांना म्हणजेच बिंदुनादादि ज्ञानांचा क्षोभ, प्रतिभाचालन, बोधस्तोभ अर्थात् ज्ञानाचा अवरोध, ज्ञानसंचार इत्यादि प्रयोजने संपादन करतो त्याचप्रमाणे सोम (चंद्र) आणि सूर्य यांच्या ज्ञानाने क्रियाशक्तींचा उदय करून ज्ञानशक्तीने अभिव्यक्त होणाऱ्या त्या त्या सर्व विषयांचे क्रियाशक्तीद्वारा उन्मीलन अर्थात् विकासन करतो अर्थात् ते होते. योग्याच्या शरीरात अनुप्रविष्ट झालेला श्रीपरमेश्वर समावेश अथवा ध्यानाने उन्मेषित किंवा जागृत झालेल्या प्रतिभात्मक मूळ स्वरूपाचा आश्रय घेऊन व्यक्त झालेल्या ज्ञान आणि क्रिया यांच्या व्याप्तीचे सार उजव्या आणि डाव्या प्रकाशाचे क्रमशः विस्फारण (प्रगती) करून त्या त्या वेधसंक्रमण आदींचे संपादन करतो. हे जसे आहे त्या दृष्टीने **"विज्ञानभैरव"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**अनागतायां निद्रायां विनष्टे बाह्यगोचरे।**
**सावस्था मनसा गम्या परा देवी प्रकाशते।।७५।।**

**अर्थ :-** ज्यावेळेस निद्रा आलेली नसते आणि तरीही बाह्य विषय नष्ट झालेले असतात ती अवस्था मनानेच जाणली पाहिजे. त्या अवस्थेतच परा देवी प्रकाशित होतात.

त्याचप्रमाणे,

**पीनां च दुर्बलां शक्तिं ध्यात्वा द्वादशगोचरे।**
**प्रविश्य हृदये ध्यायन् स्वप्रस्वातन्त्र्यमाप्नुयात्।।५५।।**

**अर्थ :-** सामर्थ्याने युक्त आणि दुर्बल बारा गोचर शक्तींच्या इंद्रियांमध्ये ध्यान करून (नंतर) हृदयात प्रवेश करून स्वप्नस्वातंत्र्य प्राप्त करावे.

अशा प्रकारे संप्रदायात असलेला, वमन व ग्रास यांच्यामध्ये मग्न असणारा, दोन्ही प्रकारच्या सृष्टींमध्ये अरणीप्रमाणे असलेला चितिशक्तीच्या ज्ञानमुखाने नित्य प्रार्थनेला न ओलांडणारा, श्रीभगवंताची प्रार्थना करण्यात तत्पर असलेला, योगनिद्रेत आरूढ झालेला आणि आवरण नसलेले रूप स्फुट (स्पष्ट) झाल्याने सुषुम्णामार्गात स्थिर असणारा धाता स्वप्नातही अभीष्ट असणाऱ्या आणव, शाक्त व शांभव समावेशांना आणि अन्य वस्तूंनाही समावेशाच्या अभ्यासरसाने उन्मृष्ट अर्थात् विकसित करून जिज्ञासित केलेल्या पदार्थांना अवश्य प्रकट करतो. या योग्याला स्वप्न आणि सुषुप्ती या दोन्हीही अवस्थांमध्ये मोह होत नाही. "स्वप्न" याच्या उल्लेखाने "सौषुप्त" पदाचाही उल्लेख होतो. येथे "अभीष्ट पदार्थांच्या व्यक्त होण्यामध्ये" ह्यांच्या दोनदा आवृत्तीत हाच हेतू आहे की, श्रीभगवंत अंतर्मुख स्वरूपाच्या परिशीलनरूप ध्यानाने प्राप्त होण्यास योग्य आणि मायेच्या अशुद्धतेचा उपशम होणाऱ्या स्वरूपाच्या अशा प्रसादाचे कधीच उल्लंघन करीत नाही. चिदात्मा परमेश्वर जे अंतर्मुखास योग्य अशा सेवाक्रमाने प्रार्थिले जाते ते ते मिळवून देतोच. **"जाग्रतः"** ह्याची परतत्त्वात जागरूक असलेल्या आणि जाग्रत् अवस्थेमध्ये स्थित असणाऱ्या अशा दोन्हीही अर्थाने व्याख्या करावी.।।३३, ३४।।

❋❋❋❋❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका:- (कारिका क्रमांक ३३)**

आता श्लोकात प्रसिद्ध असणाऱ्या स्वप्न-सुषुप्ती उल्लेखद्वारा त्याच्या विघटनाने सुप्रबुद्धस्वरूप साधण्यासाठी स्वप्नतुल्य अशा या योग्याचे दर्शन करण्यासाठी **"यथेच्छाभ्यर्थितो .....।।३३।।"** ही कारिका सांगतात. ज्या साधकात परिपूर्णरूपाने स्वस्वरूपाची अपरोक्ष म्हणजेच प्रत्यक्ष रूपाने अभिव्यक्ती झालेली नाही अशा प्रकारच्या योगिपुरुषाला जाग्रत्कालातही स्वेच्छासामर्थ्यामुळे युक्त असताना व अनेकविध पदार्थ जवळ असताना निश्चितरूपाने इच्छित पदार्थ दृष्टिगोचर होतो. अशा स्थितीत

धातृरूप चितिशक्ती त्या योग्याच्या सोमसूर्यात्मक (चंद्र व सूर्य रूप) दोन डोळ्यांमध्ये असामान्य आणि तीव्र अवधानयुक्त शक्ती प्रदान करून तो योगी ज्या पदार्थांना पाहू इच्छितो त्या पदार्थांचा साक्षात्कार करून देतो.।।३३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :- (कारिका क्रमांक ३४)**

**"तथा स्वप्नेऽप्यभीष्टा .....।।३४।।"** या कारिकेत असे कथन केले आहे की, ज्याप्रमाणे योगी जाग्रत्कालातही आपल्या अभिरुचीचे अनुसरण करून इच्छेने मागितलेल्या धात्याच्या कृपने नानाविध पदार्थ-समूहांमध्ये ते सर्व पदार्थ जवळच असतानाही आपल्याला हवा तोच पदार्थ पाहतो; कारण मायेचा किंवा अशुद्धतेचा नाश होण्याच्या स्वरूपाने युक्त असणाऱ्या प्रार्थनेचे किंवा प्रसादाचे श्रीपरमेश्वर कधीच उल्लंघन करू शकत नाही. स्वप्नपद हे सौषुप्तपदाचे उपलक्षण आहे. ह्याचा निष्कर्ष असा आहे की, स्वप्नामध्ये योगी ज्या विशिष्ट वस्तूची अपेक्षा करतो तीच वस्तू त्याच्यासमोर स्पष्टपणे प्रकाशित होते; कारण चिद्रूप श्रीपरमेश्वर हा योग्याच्या हृदयात निरंतर राहत असल्याने तो त्याची इच्छा जाणत असतोच.।।३४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**अन्यथा तु स्वतन्त्रा स्यात् सृष्टिस्तद्धर्मकत्वतः।**
**सततं लौकिकस्येव जाग्रत्स्वप्नपदद्वये।।३५।।**

**अन्वयार्थ :-**

**अन्यथा** - जर योगी स्वरूपानुभूती होऊनही तिच्यामध्ये स्थित झाला नाही, **"स्वरूपस्थित्यभावे"**- (श्रीभट्टकल्लट), **सततम्** - नेहमी, **लौकिकस्येव** - सर्वसाधारण लोकांप्रमाणे, **जाग्रत्स्वप्नपदद्वये** - जागृती आणि स्वप्न या दोन्ही अवस्थांमध्ये, **स्वतन्त्रा सृष्टिः** - भावांची (घट-पटादि पदार्थ व सुख दुःखादि भावना यांची उत्पत्ती स्वतंत्रपणे होते,) **तद् धर्मकत्वतः** - कारण तो तिचा - स्पंदशक्तीचा - स्वभावधर्म आहे.।।३५।।

**अर्थ :-** जर योगी हा स्वरूप साक्षात्कार करून घेतल्यानंतरही किंवा स्वरूपानुभूती घेऊनही त्या साक्षात्कारामध्ये किंवा अनुभूतीमध्ये स्थित झाला नाही तर अशा योग्याच्या जागृत आणि स्वप्न या दोन्ही पदांमधील भावांची सृष्टी सर्वसाधारण लौकिक प्राण्यामध्ये स्वतंत्रपणे होत

असते. स्वतंत्र रूपामध्ये उत्तरोत्तर भावाची निर्मिती करीत राहणे हा स्पंदशक्तीचा अकाट्य अर्थात् अनुल्लंघनीय स्वभाव आहे.।।३५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

प्रत्येक पदार्थाचे ज्ञान होण्यास इच्छा ही मूळ कारण असते. ही इच्छा संसारी लोकांची असूनही ती आदिकारण परमात्म्याच्या इच्छाशक्तीशी अभेदत्वाने असते. अर्थात् तो जीव त्या वेळेस परमात्म्याच्या स्वरूपाप्रत जात असतो. याचा अर्थ असा की, खरोखर पाहिले असता परमेश्वराच्या मायाशक्तीने केलेले मायादि अनेक भेद खरे नसतातच; परंतु हे भेद अप्रबुद्धाला समजत किंवा जाणवत असतात. जर प्रबुद्धाने वर वर्णन केलेल्या उपदेशाप्रमाणे खूप साधन करून स्वतःची बुद्धी अभ्यासरूपी दगडावर तीक्ष्ण केली असेल तर बुद्धिरूपी तलवारीच्या योगाने मी देह आहे या कठीण अशा हृदयग्रंथीचा तो नाश करू शकतो. साधनामुळे व अभ्यासामुळे साधकाची बुद्धी आवरणरहित होऊन सत्यज्ञानस्वरूप होते. त्यामुळे प्रबुद्ध साधक परमेश्वरस्वरूप होतो. सिद्धयोगी लोक वरच्या सिद्धकोटीच्या प्रबुद्ध स्थितीला पोहोचून वाटेल तो पदार्थ निर्माण करू शकतात. त्याप्रमाणे हे सामान्य साधकही करू शकतो. हाच अभ्यास दृढ झाला की, सर्व काळी सर्व अवस्थेत म्हणजे अगदी स्वप्नातसुद्धा तशी जागृती राहते. ही स्थिती केवळ मनानेच ग्राह्य होते. त्यामुळे स्वतः निर्माण केलेली सृष्टी पाहताच साधकाला परमात्म-स्थितीबद्दल जागृती राहून ही स्वप्नसृष्टी नाहीच, परमात्मस्थितीच आहे असे भान राहते. साधकाची अशी स्थिती झाली की, तो सर्वकर्तृत्व असलेल्या परमेश्वर स्वरूपाला पोहोचतो. इतर जीवांची स्वप्नात जशी परतंत्र स्थिती असते तशी वरील साधकाची मात्र नसते. तो वाटेल तेव्हा स्वप्न पाहू शकतो. अत्युत्कट साधनाभ्यासामुळे तमरूपी आवरणाचा नाश होऊन जागृत व स्वप्नावस्था यांचा भेदच उरत नाही. जागृतावस्थेमध्ये काय किंवा स्वप्नावस्थेमध्ये काय मी सर्व शक्तिमान परमात्मा आहे याची जाणीव साधकाला असते. तमोगुणाची बुद्धी झाल्याने साधकाची आत्मसत्ता तिरोधान पावते. तमोगुणाची बुद्धी नाहीशी व्हावी म्हणून साधकाने साधनाभ्यासच चालू ठेवावा. या अभ्यासामुळेच

अनंत विश्वाच्या निर्मात्याच्या वैभवाची जाणीव जागृत होऊन व तमाचे निर्मूलन होऊन तो अंतर्धान पावतो. जागृतावस्था व स्वप्नावस्था या ब्रह्मदेवानेच निर्माण केलेल्या सृष्टीपैकीच आहेत. या सृष्टीमध्ये परमेश्वराच्या ज्ञान व ज्ञेय भावाचे प्राबल्य असते. त्या सृष्टिशक्तीचा नाश होण्याकरिता साधकाने साधनरत असले पाहिजे. या साधनरततेमुळे जागृतावस्था नाही, स्वप्नावस्था नाही व परमेश्वराची ज्ञानदशाच सदा उदित आहे अशी सावधानता ठेवली की, परमेश्वराच्या मायाशक्तीचा बंध नाहीसा होतो. याचा अभ्यास योग्यानेसुद्धा समाधी अवस्थेत जाताना व येताना ठेवलाच पाहिजे. नाहीतर अप्रबुद्धाप्रमाणे ही सृष्टी सत्य मानल्याने साधक श्रीपरमशिवपदाला पोहोचू शकावयाचा नाही. या अत्युच्च अशा परमेश्वर पदाच्या बाबतीत अप्रबुद्ध लोकांची जागृत व स्वप्नावस्था आणि योग्याची उत्थान व समाधी अवस्था सारख्याच किंमतीच्या ठरतील. जीवाच्या विचारशक्तीची परमेश्वराच्या विचारशक्तीशी ऐक्यताच करावी लागते तरच मुक्तावस्था प्राप्त होते.

स्वरूपस्थिती झाली नाही तर चित्ताच्या चंचलतेच्या कारणाने इच्छारूप स्वप्नादि सृष्टी स्वतंत्र होईल. स्वतंत्र होण्याचा अर्थ असा की, ही सृष्टी असंमजस व असंगत दिसू लागेल; कारण सृष्टीचा स्वभावच तसा आहे. इच्छा पसरविणे हा तत्त्वाचा स्वभावच आहे. जागृत व स्वप्न या दोन्ही अवस्थेत अज्ञानी पुरुषाच्या इच्छा स्वतंत्रपणे कार्य करतात. वास्तविक हे कार्य काही अज्ञानजन्य नाही; कारण हा संविद्‌चा स्वभाव आहे व इच्छा हजारो असतात. संबद्ध व असंबद्ध विकल्प हेच इच्छांचे स्वरूप आहे. परंतु ज्ञानी माणसाची इच्छा स्वाधीन असते व अज्ञानी माणसाची इच्छा उच्छृंखल-पराधीन असते.

आत्म्याच्या विभूतीतील स्वातंत्र्याचे निरूपण करून पुढे ज्ञातृत्व व कर्तृत्वाच्या सामर्थ्याची युक्ती सांगितली आहे. त्यातील सूक्ष्म व अपार इत्यादींतील ज्ञातृत्वाची युक्ती सूचित करतात.।।३५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :- (कारिका क्रमांक ३५)**

**स्पष्टीकरण :-** जागृती व स्वप्न या दोन्ही दशा सर्गात्मक आहेत. या दोन अवस्थांत सृष्टी ज्ञान-ज्ञेयरूपानेच प्रतीत होते. वस्तुतः हा स्वस्वभावरूप

शक्तीचाच प्रसर आहे, हे ज्याने ओळखले त्याचे स्वातंत्र्य सर्वगुणात्मक सृष्टीमुळे प्रतिबद्ध होत नाही. आपल्या इच्छास्वातंत्र्याची ती निर्मिती आहे हे तो जाणतो. पण ज्याची ही जाणीव सुटते तो योगी निर्मित सृष्टीच्याच आहारी जाऊन परवश होतो.

❋ ❋ ❋ ❋ ❋

## श्रीभट्टकल्लट वृत्ती :- (कारिका क्रमांक ३३, ३४ व ३५)

## "विभूतिस्पंद" नावाच्या तिसऱ्या निष्यंदाची प्रस्तावना

आतापर्यंत दोन निःष्यंदांमध्ये स्पंदतत्त्वाच्या स्वरूपाचे व यामध्ये समाविष्ट होऊन सुप्रबुद्ध प्रमातृभावावर आरूढ होण्याच्या प्रक्रियेचे यथावत् वर्णन केलेले आहे. आता या निःष्यंदामध्ये या विषयाची चर्चा केली जात आहे की, उल्लेख केलेली शाक्तभूमिकेची अनुभूती प्राप्त करून घेऊन अभ्यासाच्या दृढतेने या भावावर स्थिर राहण्यासाठी सक्षम योगीश्वरामध्ये अनेक प्रकारच्या पर अर्थात् श्रेष्ठ आणि अपर अर्थात् कनिष्ठ सिद्धी सहजपणे विकसित होत असतात. या सिद्धींना दुसऱ्या शास्त्रीय शब्दामध्ये क्रमशः "**मितसिद्धी**" आणि "**अमितसिद्धी**" असेही म्हणतात. अमितसिद्धी या उत्कृष्ट योग्यामध्ये अभिव्यक्त होणाऱ्या सर्वज्ञता, सर्वकर्तृता इत्यादि माहेश्वर धर्मच आहेत. सामान्य सांसारिक फळ देणाऱ्या तुच्छातितुच्छ सिद्धींना, "**मितसिद्धी**" असे म्हणतात. असावधान योगी सिद्धीच्या प्रलोभनात पडून निःसंशयपणे आपल्या लक्ष्यापासून अर्थात् ध्येयापासून भ्रष्ट होत असतात. अशा योग्यांच्या चित्तामध्ये सांसारिक आसक्तीविषयी आकर्षण निर्माण होऊ शकते. यामुळे खऱ्या मुमुक्षू साधकाला असामान्य कौशल्याने या आसक्तीपासून स्वतःचा बचाव करून बाहेर पडावे लागते. पोहोचलेल्या अनुभवी योग्यामध्ये असे योगी इतके विरळ असतात की, जे तीव्र आत्मशक्तीच्या साहाय्याने सांसारिक आसक्तींना तुडवून पुढे जात अंततोगत्वा अर्थात् अंतिमतः चक्रेश्वर पदवीवर पोहोचून विश्रांती प्राप्त करून घेत असतात.

## योग्यांचे स्तर आणि स्वातंत्र्य

योगसिद्धी वर्णन करण्याच्या प्रसंगामध्ये आता वरील तीन सूत्रांमध्ये जाग्रत्-स्वातंत्र्य आणि स्वप्न-स्वातंत्र्य नावाच्या सिद्धींचे आणि असावधान योग्यामध्ये आढळून येणाऱ्या स्वातंत्र्यहानीचे वर्णन केलेले आहे.

**सूत्र क्रमांक ३३ वृत्ती :-** ज्या योग्यामध्ये स्वस्वरूपाची पूर्ण अभिव्यक्ती झालेली नसते त्या योग्याला जाग्रत् अवस्थेमध्ये त्याच्यासमोर अनेक पदार्थ ठेवलेले असले तरी आपल्या इच्छेनुसार एखादा विशेष अभिलषित अर्थात् इच्छित पदार्थ दिसत असतो. याचे कारण असे आहे की, अशा प्रसंगी परमेश्वर त्या योग्यामध्ये सोमसूर्यांचा उदय करवीत असतो अर्थात् त्या योग्याच्या नेत्र इत्यादि ज्ञानेंद्रियांमध्ये त्या इच्छित ग्राह्यविषयांच्या संबंधाने तीव्र अवधानात्मक अर्थात् तीव्र एकाग्रतेच्या शक्तीचा उदय करवीत असतो. (सामान्य जीवव्यवहारात काही क्षणांमध्ये ज्ञानेंद्रियांमध्ये आढळून येणाऱ्या या तीव्र अवधानात्मक स्थितीचा आभास) नट किंवा पेहेलवान यांच्या सार्वजनिक प्रेक्षणामध्ये अर्थात् प्रदर्शनात प्राप्त होत असतो.।।३३।। (**टीप :-** येथे वृत्तिकारांनी ज्ञानेंद्रियांमध्ये उदय पावणाऱ्या तीव्र अवधानात्मक स्थितीचा अनुभव करविण्यासाठी नट आणि पेहेलवान यांच्या प्रेक्षणाचे उदाहरण प्रस्तुत केलेले आहे. या उदाहरणाची व्याख्या दोन प्रकाराने केली जाऊ शकते. एक व्याख्या अशी आहे की, सामान्य जीवव्यवहारामध्येही अशा प्रेक्षणाच्या वेळी दर्शकांच्या ज्ञानेंद्रियांमध्ये एका विशेष अवधानात्मक वृत्तीचा उदय होत असतो. त्यामुळे ते जीव प्रेक्षास्थळावर दुसऱ्या अनेक वस्तू विद्यमान असतानाही केवळ इच्छित प्रेक्षणालाच पाहू शकतात. दुसरी व्याख्या अशी केलेली आहे की, योगाभ्यास करणाऱ्या पुरुषांच्या ज्ञानेंद्रियांमध्ये एका विशेष अवधानात्मक शक्तीचा उदय होत असतो. त्यामुळे असे योगाभ्यासी पुरुष नट आणि पेहेलवान यांच्या प्रेक्षणासारख्या कोलाहलपूर्ण तसेच मानसिक विकार निर्माण करणाऱ्या प्रसंगी इच्छित स्वस्वरूपाचा साक्षात्कार करून घेत असतात.)

या प्रकारेच

**सूत्र क्रमांक ३४ वृत्ती :-** एक परिपक्व योगी स्वप्नावस्थेमध्येही इच्छित पदार्थांचेच दर्शन करीत असतो. याचे कारण हे की, परमेश्वर हे तर योग्याच्या प्रणयाला अर्थात् अंतःकरणातील इच्छारूप अभ्यर्थनेला कधीही टाळत नाही. अशा योग्याच्या मध्यधामामध्ये अर्थात् सुषुम्णा-धामामध्ये प्रतिक्षण हृदय अर्थात् चिच्छक्तीची अनुभूती ही स्फुटतर रूपामध्ये विद्यमान राहत असते. पारिभाषिक शब्दामध्ये या अवस्थेला "स्वप्न-स्वातंत्र्य" असे म्हणतात. याचाच अर्थ असा आहे की, स्वप्न-स्वातंत्र्याची अवस्था ही योग्याच्या हृदयावर असलेले तामसिक आवरण

फाटून गेलेले आहे या अवस्थेची सूचक आहे.।।३४।।

याउलट

**सूत्र क्रमांक ३५ वृत्ती :-** जर योग्याने स्वस्वरूपामध्ये पूर्णपणे स्थित राहण्याची सावधानता ठेवली नाही तर त्या योग्यासाठी स्वप्न अवस्थेमध्ये उलट-सुलट भावांची सृष्टी किंवा निर्मिती ही स्वतंत्ररूपामध्ये चालत राहते. याचे कारण असे आहे की, स्पंदशक्ती ही प्रसवधर्मा आहे. उत्तरोत्तर भावांचे निर्माण करीत राहणे हा त्या शक्तीचा स्वभाव आहे. असावधान योग्याला जाग्रत् आणि स्वप्न या दोन्ही अवस्थांमध्ये सामान्य व्यावहारिक प्राण्याप्रमाणे चित्रविचित्र विकल्पांचाच साक्षात्कार होत राहतो.।।३५।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्रांच्या व्याख्यानात स्पंदसूत्राच्या प्राचीन टीकाकारांमध्ये एकमत झालेले आढळून येत नाही. प्रत्यक्षात या सूत्रांच्या शब्दावलीच्या प्रयोगाची रीत अशा प्रकारची आहे की, कोणत्याही व्याख्याकाराच्या मनामध्ये सूत्रांच्या अर्थाच्या विषयामध्ये अनेक शंका उत्पन्न होऊ शकतात. असो. या टीकाकारांच्या परस्परामधील मतभेदाच्या भानगडीत पडणे हे प्रस्तुत लिखाणाचे ध्येय नाही. येथे केवळ इतकेच समजणे आवश्यक किंवा पुरेसे आहे की, प्रस्तुत संदर्भामध्ये आपले वृत्तिकार श्रीभट्टकल्लट यांचा दृष्टिकोण काय आहे?

श्रीभट्टकल्लट यांच्या वृत्तीचे सूक्ष्म अध्ययन अर्थात् वृत्तीचा सूक्ष्म अभ्यास आणि गंभीर अर्थात् खोल मनन केल्यानंतर वाचक या निष्कर्षाप्रत सहजपणे पोहोचू शकतो की, मूळ सूत्रकारांनी प्रस्तुत सूत्रामध्ये आध्यात्मिक योग्यतेच्या आधारावर योग्यांना अपरिपक्व, परिपक्व आणि असावधान अशा तीन श्रेणीमध्ये विभक्त केलेले आहे. या अभिप्रायाला अभिव्यक्त करण्यासाठी सूत्रकारांनी पहिल्या सूत्रामध्ये "**जाग्रतः देहिनः**" दुसऱ्या सूत्रामध्ये "**नित्यं स्फुटतरं मध्ये स्थितः**" आणि तिसऱ्या सूत्रामध्ये "**अन्यथा**" या शब्दांचा प्रयोग केलेला आहे. याव्यतिरिक्त या तीन सूत्रांमध्ये तीन प्रकारच्या योग्यांच्या संकल्पशक्तीच्या व्यापकतेची परिधी अर्थात् मर्यादा किंवा कक्षा निश्चित केलेली आहे. सूत्रकारांनी या सर्व अभिप्रायांना वृत्तीमध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहे.

१) पहिल्या सूत्रामध्ये उल्लेख केलेल्या "**जाग्रतः देहिनः**" या शब्दाचा अर्थ वृत्तीमध्ये "**अनभिव्यक्त-स्वरूपस्य योगिनः**" अशा प्रकारे केलेला आहे. याचाच अर्थ असा आहे की, या प्रकरणामध्ये "**जाग्रतः देहिनः**"

या शब्दांनी संसारामधील सर्वसाधारण देहधारी व्यक्तींचा उल्लेख केलेला नाही; तर जे जाग्रत् अर्थात् अभ्यासाच्या विषयामध्ये सावधान तर राहतातच; परंतु अद्यापि देहाभिमान हा पूर्णपणे नाहीसा न झाल्याने स्वरूपात स्थित नाहीत, अशा योग्यांचा उल्लेख केलेला आहे. या स्तराच्या योग्यांना अपरिपक्व योग्यांच्या वर्गामध्ये ठेवले जाऊ शकते. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथाच्या १.१९ सूत्रावरील १५७ व्या टिपणीत "**देहाभिमानवतः ।**" असे म्हटले आहे. याचा अर्थ देहाभिमानी योग्यांप्रमाणे असा आहे.

२) वृत्तिकारांनी दुसऱ्या सूत्रामध्ये उल्लेखिलेल्या "**नित्यं स्फुटतरं मध्ये स्थितः**" या शब्दांचा अर्थ "**यश्च तन्मध्ये हृदयं स्फुटतरम् अभिव्यक्तं नित्यम्**" अशा प्रकारे केलेला आहे. यानुसार श्रीभट्टकल्लटांना असा अर्थ अभिप्रेत आहे की, ज्या योग्याला पांचभौतिक शरीरात राहत असताना आणि जीवनामधील प्रत्येक देवाण-घेवाण करीत असताना प्रतिक्षण मध्यामध्ये अर्थात् सुषुम्णाधामामध्ये हृदयाची अर्थात् स्वरूपभूत शाक्तस्पंदनेची अनुभूती स्फुटतर रूपामध्येच स्पष्टपणे होत असते, त्या योग्याला जाग्रत्, स्वप्न आणि सुषुप्ती या तीन पदांमध्ये समानरूपाने भावमंडलाची सृष्टी व संहार यांची स्वतंत्र अधिकारिता प्राप्त झालेली असते. या कारणाने या स्तरांच्या योग्यांना परिपक्व योग्यांचा वर्ग असे म्हणता येते.

या संबंधामध्ये प्राणाभ्यासाच्या दृष्टीने मध्यनाडीचा विकास आणि ज्ञानमार्गाच्या दृष्टीने प्रमाणपद आणि प्रमेयपद यांच्या मध्यवर्ती असलेल्या प्रमातृपदावर अवस्थिती इत्यादि गोष्टींवर या आधीच सूत्र १, १८ मध्ये कमीअधिक प्रकाश टाकला गेलेला आहे.

३) तिसऱ्या सूत्रामध्ये केलेल्या "**अन्यथा**" या शब्दाचा अर्थ श्रीभट्टकल्लट यांनी "**स्वरूपस्थित्यभावे**" असा लिहिलेला आहे. याचाच अर्थ असा आहे की, एखाद्या योग्याला स्वरूपाची अनुभूती प्राप्त झालेली असते; परंतु त्या योग्याला अद्यापि त्या स्वरूपस्थितीमध्ये स्थिर राहण्याची क्षमता प्राप्त झालेली नसते. अशा वेळी तो योगी संसारामधील शब्द आदि विषयांकडे आकर्षित होऊन अखंड आत्मानुसंधानाची गोष्ट पूर्णपणे विसरून जातो. असे योगी आणि सर्वसामान्य लोक यांमध्ये कोणताही फरक नाही.

या स्तराच्या योग्यांना असावधान योग्यांच्या गटात ठेवणे अधिक योग्य आहे.

**उल्लेख केलेल्या योग्यांमध्ये स्वातंत्र्याचे तारतम्य :-** यांमधील पहिल्या प्रकारच्या योग्यांना केवळ जाग्रत् अवस्थेवर स्वतंत्र अधिकार प्राप्त झालेला असतो अर्थात् असे योगी हे केवळ याच अवस्थेमध्ये मनोनीत अर्थात् मनातील भाववर्गाचा साक्षात्कार करून घेण्यास समर्थ असतात. या स्तराच्या स्वातंत्र्याला शास्त्रीय शब्दात **"जाग्रत् अवस्था"** असे म्हणतात.

दुसऱ्या प्रकारचे योगी जाग्रत् आणि स्वप्न या दोन्ही अवस्थांमध्ये समानरूपाने इच्छित भावांचा अनुभव करून घेण्यास स्वतंत्र असतात. (स्वप्नपदामध्ये बाह्य इंद्रियांचे कार्य बंद राहिल्यामुळे केवळ मनाच्या साहाय्यानेच भावाचे ग्रहण होत असते. **"स्पंदकारिकाविवृती"** ❋ ❋ ❋ पाहावी). हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, प्रस्तुत संदर्भामध्ये "स्वप्न" या शब्दाने स्वप्न आणि सुषुप्ती या दोन्ही अवस्थांचे ग्रहण केले जाते. जाग्रत् अवस्थेमध्ये या योग्यांची स्वतंत्र अधिकारिता याआधीच सिद्ध झालेली आहे. फलतः परिपक्व योग्यांची संकल्पशक्ती ही इतकी दृढ आणि तीव्र असते की, ते योगी तिन्ही पदांमध्ये समानरूपाने स्वरूपावर अवस्थित राहू शकल्यामुळे प्रत्येक पदामध्ये मनोनीत अर्थात् मनातल्या विषयांचा अनुभव घेत राहतात. या स्तराच्या स्वातंत्र्याला शास्त्रीय शब्दामध्ये **"स्वप्न-स्वातंत्र्य"** असे म्हणतात.

तिसऱ्या प्रकारचे योगी हे नित्ययुक्त होऊन स्वरूपाचे अखंड अनुसंधान करण्यास चालढकल केल्यामुळे कोणत्याही अवस्थेशी संबंधित असलेल्या स्वतंत्र अधिकारितेला मुकतात. हे योगी जगतामधील सर्व सामान्य प्राण्यांप्रमाणे आपल्या इच्छेविरुद्ध त्याच तारतम्यरहित विषयांसंबंधी प्रतिक्षण अनुभव घेत असतात. त्रिगुणात्मिका प्रकृती ही या विषयाचा अनुभव अशा योग्यांना हठात् किंवा बलपूर्वक करवीत असते.

## अपरिपक्व आणि परिपक्व योग्यांच्या इच्छेचे रूप

अपरिपक्व योग्यांच्या आंतरिक इच्छेचे रूप **"दिदृक्षारूपा अभ्यर्थना"** अर्थात् मनोनुकूल विषयांना पाहण्याची इच्छारूप अभ्यर्थना असे सांगितले आहे. या संबंधामध्ये स्वाभाविकपणे मनामध्ये असा प्रश्न निर्माण होतो की, योग्याचा आत्मा आणि सूत्रामध्ये निर्दिशिलेला धाता अर्थात् धारण करणारा या दोन सत्ता आहेत का की, ज्यामध्ये एक प्रार्थी आणि दुसरी प्रार्थनेचे

आलंबन आहे? या शंकेचे समाधान प्राप्त करून घेण्यासाठी हे समजणे आवश्यक आहे की, या प्रकरणामध्ये योग्याचा आत्मा आणि धाता या दोन भिन्न सत्ता नाहीत. तसेच **"अभ्यर्थना"** या शब्दाचा "एखाद्या व्यक्तीच्या द्वारा एखाद्या व्यक्तीची प्रार्थना करणे," असा अर्थ घेतलेला नाही. येथे **"अभ्यर्थना"** या शब्दाचा अर्थ केवळ तीव्र संवेदनात्मक एकाकारता असा केलेला आहे. याचाच अर्थ असा आहे की, योग्याचा आत्मा आपल्या तीव्र संकल्पशक्तीच्या द्वारा इच्छित पदार्थांबरोबर अशा प्रकारे एकाकार होत असतो आणि या योग्याची ज्ञानेंद्रिये दुसरे अनंत पदार्थ समोर असतानाही केवळ त्याच पदार्थांना ग्रहण करून घेतात. संवेदनात्मक एकाकारतेला शास्त्रीय शब्दामध्ये **"यथाभिमतशरीरोत्पत्तिः"** असे म्हणतात. याचा अर्थ असा आहे की, आत्मा हा स्वतःच्या संवेदनांच्या द्वारा ज्या विषयांकडे उन्मुख होत असतो त्या काळापर्यंत त्या विषयांना आत्मा आपले शरीर बनवीत असतो. फलतः या संदर्भामध्ये योग्याचा आत्मा हा स्वयं प्रार्थी अर्थात् प्रार्थना करणारा आणि प्रार्थनेचे आलंबनही असतो.

परिपक्व योग्यांच्या इच्छेचे रूप **"तादात्म्य-प्रतिपत्तिरूप-प्रणय"** असे सांगितलेले आहे अर्थात् आपण जगद्रूपाने नटलेले आहोत अशा एकरूपतेच्या किंवा समरसतेच्या अनुभूतीचे प्रेम असे कथन केले आहे. **"तादात्म्य प्रतिपत्तिः"** हा शब्द विशुद्ध संवेदनाच्या उच्चतर अवस्थेचा द्योतक आहे अर्थात् अवस्था दर्शविणारा आहे. या अवस्थेमध्ये पोहोचलेल्या योग्याला प्रतिक्षण संसाराच्या अनंत भावमंडळामध्ये केवळ आपल्याच रूपविस्ताराची अखंड अनुभूती होत राहते. अशा योग्याच्या स्वातंत्र्याची व्यापकता अपरिमित अर्थात् अमर्यादित असते. अशा योग्याची इच्छा ही सामान्य न राहता स्वतंत्र इच्छाशक्ती असल्यामुळे कधीही अन्यथा होऊ शकत नाही. हेच कारण आहे की, सूत्रकारांनी अशा तीव्रतर योगिसंकल्पाला **"प्रणय"** असे नाव दिलेले आहे. अभ्यर्थना पूर्ण होणे हे कधी कधी संदेहास्पद असू शकते. परंतु प्रणयामध्ये टाळाटाळीसाठी स्थान राहत नाही. ।।३३-३४-३५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराजस्पंदनिर्णय टीका :-**

परंतु जर हा (साधक) सावधान होत नसेल तर त्याला "योगी" असे

म्हणता येणार नाही, असे या कारिकेत सांगितले आहे.

**स्पष्टीकरण :-** जर वर सांगितल्याप्रमाणे धात्याने आराधना केली नाही तर स्वस्वरूपात स्थिर न झाल्याअभावी सतत सर्वसाधारण मनुष्याप्रमाणे या योग्याच्याही जागृत आणि स्वप्न अवस्थांमध्ये साधारण व असाधारण पदार्थांना प्रकट करणारी आणि त्यांचे स्वरूप निश्चित करणारी अशी पारमेश्वरी सृष्टी स्वतंत्र होईल. लौकिक मनुष्याप्रमाणे हा ही संसारपथात पडेल असा त्याचा अर्थ आहे. यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की, "**प्रवृत्तिर्भूतानामैश्वरी**" अर्थात् प्राणिमात्रांची प्रवृत्ती श्रीईश्वराशी संबंधित असते किंवा श्रीईश्वरामुळे "**तद्धर्मकत्वतः**" अर्थात् त्याच्या धर्माने युक्त असल्याने या पदांचा अर्थ असा आहे की, स्वप्न, जागृत इत्यादि स्थितींच्या प्रकाशनात भगवंताची सृष्टी स्वतंत्र असते.।।३५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

जर पूर्वी सांगितलेला योगी-पुरुष अवधानाने युक्त नसेल तर त्याचे योगित्व ही (अस्तित्त्वात) नसेल असे "**अन्यथा तु ....।।३५।।**" या कारिकेत सांगितले आहे. या आधीच्या श्लोकात जे सांगितले त्यानुसार धातूचे म्हणजे श्रीपरमेश्वराचे सावधानपणे अविरत समाराधन अर्थात् पूजा किंवा ध्यान पुरुषाने केले नाही तर त्याचे स्वस्वरूपामध्येही अवस्थान राहत नाही. अशा दशेमध्ये प्रत्येक दिवशी लौकिक प्रमात्याप्रमाणे ज्या पुरुषाच्या स्वप्न-जागृती अवस्थांमध्ये साधारण-असाधारण पदार्थ प्रकाशित करीत निश्चयादि स्वभावाने युक्त अशी स्पंदशक्ती म्हणजेच निर्माण झालेली सृष्टी स्वतंत्रच होईल. अशा प्रकारे पांचुलपादहालिकवत् न्यायाने तशा प्रकारच्या योग्याचेही संसारमार्गामध्ये निश्चितच पतन होईल. स्वप्न-जागरादि दशेमध्ये वस्तूचे प्रकाशन होताना श्रीभगवंताच्या सृष्टीचे स्वभावतःच स्वातंत्र्य असते. ह्याची सूचना देण्यासाठीच सूत्रात "**तद्धर्मकत्वतः**" हे पद घातले आहे.।।३५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**यथा ह्यर्थोऽस्फुटो दृष्टः सावधानेऽपि चेतसि।**
**भूयः स्फुटतरो भाति स्वबलोद्योगभावितः।।३६।।**
**तथा यत्परमार्थेन यदा यत्र यथा स्थितम्।**
**तत्तथा बलमाक्रम्य न चिरात् संप्रवर्तते।।३७।।**

**अन्वयार्थ :-**

**यथा** - ज्याप्रमाणे (दूर असलेला पदार्थ), **सावधानेपि चेतसि दृष्टः** - माणसाने लक्षपूर्वक - सावधान मनाने पाहिला तरी, **अस्फुट-** अस्पष्ट दिसतो, पण, **स्वबलोद्योगभावितः** - विशेष प्रयत्न करून निरीक्षण केले असता, **भूयः** - पुनः, **स्फुटतरो** - अधिक स्पष्ट, **भाति**- प्रकाशतो, दिसतो.।।३६।।

**अन्वयार्थ :-**

**तथा** - त्याप्रमाणे तसाच विशेष प्रयत्न केला असता, **तेनैव प्रयत्न-विशेषेण**- (श्रीभट्टकल्लट), **तद् तथा बलमाक्रम्य** - त्या स्पंदबलावर आरूढ होऊन त्या दशेत; **न चिरात्** - फार उशीर न होता, लौकरच, **यत्परमार्थेन** - ती वस्तू, ते सर्व पदार्थ वास्तवात खऱ्या स्वरूपात, **यदा** - जेव्हा भूत, भविष्य वर्तमान काळात; **यत्र**- त्रैलोक्यातील कुठल्याही स्थळी, **यथा स्थितम्** - जशी आहे तशा अवस्थेत, **संप्रवर्तते** - ज्ञानाचा विषय होते.।।३७।।

**सूत्र क्रमांक ३६ अर्थ :-** ज्याप्रमाणे एखादा दूर असलेला पदार्थ माणसाने लक्षपूर्वक सावधान मनाने पाहिला तरी पहिल्या नजरेमध्ये अस्पष्ट दिसतो; पण विशेष प्रयत्न करून आत्मबळाच्या साहाय्याने परीक्षण केले असता पुन्हा अधिक स्पष्ट दिसतो.।।३६।।

**सूत्र क्रमांक ३७ अर्थ :-** त्याप्रमाणे अर्थात् तसाच प्रयत्न केला असता योग्याला स्पंदात्मक आत्मबलावर आरूढ होण्याच्या अवस्थेमध्ये अल्प काळातच ते सर्व पदार्थ त्रैलोक्यात कोठेही असले तरी जसे आहेत त्या अवस्थेत दिसू लागतात.।।३७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

श्रीपरशिवांच्या स्थितीत राहिले असताना साधकाला भूत-भविष्य, दृष्टिआडचे, जवळचे व लांबचे असे सर्व पदार्थ जाणता येतात. सावधान चित्तवृत्ती असताना एखादा पदार्थ पाहण्याची दृढ प्रभावाने इच्छा करूनसुद्धा तो पदार्थ अस्पष्ट असा नजरेस पडतो. तोच पदार्थ आत्मस्थितीच्या बळाचा प्रयत्नाने उपयोग केला असता म्हणजे अतिशय दृढ अशी एकाग्रता किंवा सावधानता करून पाहिला असता स्पष्टपणे आपल्या नजरेस

पडतो. नुसती पाहण्याची इच्छा झाल्याबरोबर पदार्थाचे अस्पष्ट ज्ञान होते. नंतर त्याच ठिकाणी जास्त नजर देऊन पाहिले असताना जास्त अर्थात् तीव्र नजरेत तो पदार्थ येतो. त्याचे कारण साधक द्रष्टा असून त्यावेळी तो स्वतःचे आत्मरूपच होत असतो. यावरून काय स्पष्ट होते? तर प्रत्येक प्राणिमात्राला प्रत्येक पदार्थाचे ज्ञान स्पष्ट होण्याकरिता आत्मबळाचेच साहाय्य घेण्याचा उद्योग करावयाचा असतो. ही जागृती ठेवून अभ्यास वाढविण्याचे काम प्रबुद्धच करू शकतो. परंतु इतर सर्व साधारण प्राणिमात्र मायेच्या अंधकारात असल्यामुळे आत्मदर्शनाचा तिरस्कारच करीत असतात. त्यामुळे त्याला ती वरील प्रकारची श्रीपरमशिवाची उत्तम स्थिती प्राप्त होत नाही. स्वबल म्हणजे आपल्या आत्म्याच्या शक्तीचे सामर्थ्य होय. हे आत्मशक्तीचे सामर्थ्य मीच आहे असा निश्चय करून ज्यावेळी साधक कोणत्याही आकाराशी, देशाशी व कालाशी एकतान होऊन प्रयत्न करील तर तो आकार, तो देश व तो काल त्याच्या स्पष्टपणे नजरेस येईल.

वस्तू ज्या प्रकारची, ज्या अवस्थेची, ज्या आकाराची वर्तमानकाळी अगर भूतकाळी असली तरी तदाकार होऊन म्हणजे परब्रह्म स्थितीला जाऊन पाहिली की, ती साधकाला स्पष्टपणे दिसते. अस्पष्ट असा एखादा पदार्थ नजरेस पडला असता तो स्पष्टपणे नजरेस यावा म्हणून त्यावेळी साधक आत्म्याच्या सर्वज्ञपणाच्या स्वभावाशी सहजतेने अभिन्न-एकरूप होत असतो. प्रबुद्धाने विवेक व अभ्यास केला असता देश कितीही दूर व कोणताही काल असला तरी वाटेल तो पदार्थ साधक स्पष्टपणे जाणू शकतो.

याकरिता सर्वज्ञपणाचा अभ्यास साधकाने सतत वाढवावा. त्यामुळे आत्मस्थितीची सर्वमयता साधकाला प्राप्त होऊन कोणतेही आवरण आड न येता भूतभविष्याचे ज्ञान त्याला सहज प्राप्त करून घेता येईल. याचप्रमाणे प्रत्येक विषयाच्या ज्ञानाची सिद्धी या अभ्यासाप्रमाणे साधकाला प्राप्त करून घेता येईल. कोणत्याही पदार्थाचे स्पष्ट ज्ञान होण्यासाठी साधक प्रयत्नांच्या विशेष अवस्थेमध्ये गेला असताना त्याचा सदासर्वदा स्थित अशा आत्मस्थितीमध्ये प्रवेश होत असतो. याप्रमाणे बुद्धी व इंद्रिये यांचा व्यापार ज्या स्थितीमध्ये सुरू आहे त्या स्थितीत जागृत राहून श्रीपरशिव-अवस्थेच्या प्राप्तीचा उपाय वर्णन केला.

दूर अंतरावरील कोणताही पदार्थ अस्पष्ट व संदिग्ध असा दृष्टीस

पडतो. परंतु चित्त इतर सर्व गोष्टींकडून काढून घेऊन विशेष प्रयत्नाने विचार केल्यावर तो स्पष्टपणे दिसू लागतो. त्यामुळे जी वस्तू ज्या रूपाने, ज्या स्थानी व ज्या वेळी दृष्टीस पडते ती विशेष प्रयत्नाने संवित् विकसित झाली की, स्वस्वरूपावर कोणतेही आवरण राहत नसल्याने उत्तमपणे, स्पष्ट, असंदिग्ध व निश्चित रूपाने दिसू लागते. आत्मबलाच्या स्पर्शाने पुरुष समोरील पदार्थासारखा होतो व त्यामुळे यथार्थ ज्ञान होते हे प्रथमच सांगितले आहे.

"**तत्त्वयुक्ती**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "विषयाधिपती ज्याच्या द्वारा ज्ञान प्राप्त करतो त्याला तत्त्वतः म्हणजे आत्मसंवित्च्या रूपात जाणून घेतल्यावर साधकाला चराचराचे ज्ञान प्राप्त होते. छोट्या छोट्या विषयांचे भूतकालीन किंवा भविष्यकालीन ज्ञान प्राप्त करून घेणे यात तर काहीच आश्चर्य नाही. याप्रकारे ज्ञानशक्तीचे निरूपण करून पुढे कार्यकर्तृत्वाच्या सामर्थ्याचे वर्णन केले आहे.।।३६-३७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** प्रारंभी अस्पष्ट दिसणारी वस्तू आपण न्याहाळून पाहताच स्पष्टपणे दिसू लागते. यावेळी आपण पाहण्याचे दुसरे काही साधन वापरतो असे नाही. खरोखरी त्यावेळी आपला "तात्त्विक स्वभावानुप्रवेश" होतो व त्यामुळे ती वस्तू स्फुटतेने दिसते. तेव्हा ज्ञातृत्वशक्तीचा योग हेच अर्थप्रकाशनाचे कारण आहे हे व्यवहारातही दिसते. प्रबुद्धावस्थेत तर स्वस्वभावाच्या या सामर्थ्याने प्रबुद्ध युक्तच असतो. त्यामुळे ज्ञेय वस्तूशी त्याचे तत्काळ तादात्म्य होऊन वस्तुरूप त्याला यथार्थतेने अभिव्यक्त होते. त्याचा हा स्वभावभावावेश सहजतेने होत असतो म्हणून त्याच्या या अभिव्यक्तीला त्रैकालिकताही येत असते. प्रबुद्धाचा प्रतिष्ठितस्पंदानुप्रवेश व जाग्रदवस्थेतील परतत्त्वोपलब्धीचे उपाय हेही येथे अभिप्रेत आहेत असे समजावे.।।३६-३७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

**संवित्स्पर्शाने सर्वज्ञतेची प्राप्ती**

वरील दोन सूत्रांमध्ये अर्थात् सूत्र क्रमांक ३६ व ३७ यामध्ये शाक्तबळाचा

अनुभव प्राप्त झाल्यावर योग्यामध्ये सर्वज्ञतेचा विकास होत असतो हे तथ्य प्रस्तुत केले जात आहे. अशा शाक्तभूमिकेवर आरूढ झालेल्या योग्याला अतीत अर्थात् भूतकाळाचे, व्यवहित अर्थात् भविष्यकालीन आणि विप्रकृष्ट अर्थात् अत्यंत दूर असल्यामुळे इंद्रियज्ञानापासून अज्ञात विषयांचे किंवा घटनांचे स्वतःला इतके सिद्धज्ञान होत असते की, जणू तो योगी ते विषय समोर प्रत्यक्ष पाहत आहे. या दोन सूत्रांपैकी पहिला दृष्टान्त असून दुसरे सूत्र दार्ष्टान्तिक आहे.

**वृत्ती :-** ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला एखादा दूरवरचा पदार्थ सावधपणे पाहिल्यानंतरही प्रथम स्पष्टपणे दिसत नाही; मात्र काही काळ ती व्यक्ती त्या ठिकाणीच उभी राहिली तर त्या व्यक्तीला प्रथम न दिसणारा पदार्थ अगदी स्पष्टपणे दिसू लागतो त्याप्रमाणे स्पंदात्मक स्वरूपात अवस्थित योग्याने जर थोडा प्रयत्न केला तर त्याला अल्पावधीत सर्व पदार्थांचा बोध ते ज्या रूपात, ज्या कोणत्या देशात, ज्या कोणत्या कालात आणि ज्या कोणत्या आकारात किंवा प्रकारात अस्तित्वात असतात त्या रूपात त्यांचा बोध होतो. असे घडण्याचे एकमात्र कारण असे असते की, त्या योग्याच्या स्वरूपावरून अर्थात् मनावरून तामसिक आवरण दूर झालेले असते. त्यामुळे याचे फळ म्हणून योग्यांना भूत व भविष्य काळातील पदार्थांच्या खऱ्या रूपाचा बोध होणे ही एक सामान्य गोष्ट असते. यात काही महान् आश्चर्य आहे असे समजण्याची आवश्यकता नाही. ।।३६/३७।।

**विवरण :-** शैवशास्त्राच्या ज्ञात्यांचा या बाबत असा विचार आहे की, साधन जीवनव्यवहारातही ज्यावेळी कोणाही व्यक्तीला आपल्यापासून दूर असलेल्या आणि त्यामुळेच ज्ञानेंद्रियांच्या द्वारा स्पष्टतर रूप ग्रहण करण्यास अयोग्य असेलेल्या शब्द आदि विषयांबद्दल स्पष्टतर रूपाचा आपल्या इंद्रियांना बोध व्हावा किंवा ती त्या रूपाचा विषय व्हावीत याबद्दल तीव्र बहिर्मुख वृत्ती उत्पन्न होते त्यावेळी त्याची बहिर्मुख रूपात प्रवाहमान झालेली स्पंदधारा एकदम अंतर्मुख होऊन आपल्या मूल उद्गमस्थान असलेल्या सामान्यस्पंदसागरात बुडी मारते आणि एका क्षणात पुन्हा बहिर्मुख होते. सामान्यस्पंदसागर तर चतुर्दिकबोधसागरच असल्यामुळे त्याच्या स्पर्शमात्राने केवळ चित्तच नव्हे; तर सर्व ज्ञानेंद्रियांमध्येही अशा एका प्रकारचा आंतरिक बोधाच्या बळाचा संचार होतो की, ती ज्ञानेंद्रिये

अस्पष्ट विषय स्पष्टपणे आणि यथातथ्य रूपात ग्रहण करतात. यापूर्वी हे कथन केलेले आहे की, स्पंदशक्तीच्या आकस्मिक, अपरिलक्ष्य आणि विजेप्रमाणे असलेल्या अंतर्बाह्य गतिशीलतेला शास्त्रीय परिभाषेत **"आत्मबलाचा स्पर्श"** असे म्हणतात.

जरी स्पंदशक्तीची ही गतिशीलता प्रत्येक क्षणाक्षणाला आंतरिक रूपाशी संलग्न होण्यासाठी जात असली तरी साधारण मनुष्याला याची जाणीव होत नाही. मात्र श्रीसद्गुरूंच्या शक्तिपातानुग्रहकृपेमुळे योग्यांना याच्या उलट अनुभव येतो. योगिसाधक तीव्रतर विमर्शात्मक म्हणजे विचाराच्या अनुसंधानाने आणि विशेष प्रकारच्या साधनाच्या प्रयत्नांनी या अंतरालवर्ती संवित् स्पर्शांना पकडून त्यावर स्थिर राहू शकण्याची क्षमता प्राप्त करून घेतात. याचे फळ म्हणून त्यांच्या संकल्पशक्तीत इतक्या तीव्रतम मात्रेचा उदय होतो की, ते जर आवश्यकता वाटली तर थोड्याशा संवेदनात्मक एकाग्रतेच्या द्वारा अतीत म्हणजे भूतकालीन, अनागत म्हणजे भविष्यकालीन आणि विप्रकृष्ट म्हणजे अत्यंत दूर असल्यामुळे इंद्रियज्ञानापासून अज्ञात विषयांना यथायोग्यरीतीने जाणू शकतात.।।३६-३७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराजस्पंदनिर्णय टीका :-**

अशा प्रकारे स्वप्न आणि सुषुप्ती या अवस्थांना नष्ट करण्याचा उपाय म्हणून सुप्रबुद्धता मिळविण्यासाठी ती साध्य करण्याचा आणि सुप्रबुद्धाचा स्पंदतत्त्वामध्ये समावेश व्हावा म्हणून तो उपाय दृष्टान्त व युक्तिपूर्वक निरूपण करतात आणि अशा प्रकारे जिज्ञासा केलेल्या पदार्थाचे ज्ञान ही होते असा उपदेश करतात.

**स्पष्टीकरण :-** येथे "ही" हा शब्द किल (खरोखर) या अर्थी वापरलेला आहे. मन सावध असतानाही पदार्थ दूर असल्यामुळे वगैरे दोषांनी अस्पष्ट दिसतो. तीच वस्तू परत परत स्वतःच्या सामर्थ्याने निरीक्षली असता केवळ स्पष्टच नाही तर अधिक स्पष्ट होते. त्याचप्रमाणे स्पंदतत्त्वात्मक बल ज्या आनंदघनतात्म्याने श्रीशंकरात्मक स्वस्वभावात अभेदव्याप्तीने स्थित असते ते स्वबलोद्योगाने अर्थात् अंतर्मुख होऊन एकात्मतेने सतत अभ्यासरूप प्रयत्नाने शीघ्र स्पष्टपणाने प्रवर्तित होते. हे

कसे काय होते? या प्रश्नाला उत्तर देताना असे म्हटले आहे की, आराधकाची कल्पिलेली (कृत्रिम) देहादि स्वरूपात असणारी प्रमातृभूमी स्वतःत किंवा आत्म्यात निमग्न करून आणि स्पंदात्मक बलाचा आश्रय घेऊन स्थिर राहणाऱ्या कल्पितदेहबुद्धीच्या प्रमातृभूमीला असकृत् अर्थात् वारंवार उत्तेजना देणाऱ्या साधक योग्याचे जे जिज्ञासा केलेले निधान (ठेवा) इत्यादि ज्या देशादींमध्ये सुवर्ण आदींनी परमार्थरूपाने ज्याप्रमाणे सन्निवेशात स्थित असते त्याप्रमाणे तत्काळ प्रकाशित होते.।।३६-३७।।

*****

**श्रीक्षेमराजस्पंदरंजनी टीका :-**

ज्यावेळेस योगी शाक्तबल अनुभवितो त्यावेळेस त्या योग्यामध्ये सर्वज्ञत्वाचा पूर्णपणे विकास होतो. त्यामुळे त्या विकासात तो योगी अतीत म्हणजे मागे होऊन गेलेल्या व अनागत म्हणजे पुढे येणाऱ्या वस्तूंचे प्रत्यक्ष दर्शन, अनुभव इत्यादि करतो. हा विषय "**यथा ह्यर्थोऽस्फुटो .....।।३६।।**" व "**एवं यत्परमार्थेन।।३७।।**" या कारिकांमध्ये सांगितला आहे. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तिविशेषापासून दूर ठिकाणी असणाऱ्या वस्तूचे अस्तित्व असूनही चित्त एकाग्र केले असता त्या वस्तूची सहसा स्पष्टरूपाने प्रतीती येत नाही; परंतु अंतर्मुखता, त्या वस्तूशी एकाग्रता, त्या वस्तूचे परिशीलन व ज्ञान इत्यादि स्वबलाच्या प्रयत्नांनी योग्याला त्या वस्तूची अत्यंत स्पष्टपणे प्रचीती येते. याच नीतीने लोकोत्तर स्पंदात्मस्वरूपात स्थिती प्राप्त करणारा योगी थोड्याच काळात सर्व पदार्थांना ते ज्या काळात, ज्या प्रदेशात आणि ज्या ज्या प्रकारांनी आहेत त्या त्याप्रमाणेच प्रत्यक्षपणे बघतो.।।३६-३७।।

*****

**दुर्बलोऽपि तदाक्रम्य यतः कार्ये प्रवर्तते।**
**आच्छादयेद् बुभुक्षां च तथा योऽतिबुभुक्षितः।।३८।।**

**अन्वयार्थ :-**

**दुर्बल** - आणि (तो योगी) शरीराने दुबळा असून सुद्धा, **तदाक्रम्य**- त्या स्पंदात्मक आत्मबलावर आरूढ होऊन, **यतः** - त्या स्पंदात्मक सामर्थ्याने, **कार्ये** - दुष्करकामामध्ये, **प्रवर्तते** - प्रवृत्त होतो व यश मिळवितो, "अशक्यमपि वस्तु तद् बलाक्रमणेनैव करोति"- श्रीक्षेमराज

**यो** - जो, तो योगी, **अतिबुभुक्षितः** - अतिशय भुकेलेला असला ("भूक" हे क्षुधा व तृषा, शोक व मोह आणि जरा व मृत्यू या सहा उर्मींचे प्रतीक (उपलक्षण) म्हणून घेतले आहे) तरी, **तथा** - त्याप्रमाणे **आच्छादयेत्** - आवरण घालील, आवरील, त्यावर विजय मिळवील. ।।३८।।

**अर्थ** :- ज्याप्रमाणे दुर्बल शरीराची व्यक्ती कोणतेही अशक्य कार्य (आवेशामध्ये करून टाकण्याच्या परिस्थितीमध्ये) अलक्ष्य आत्मबलाच्या प्रेरणेने करण्यास प्रवृत्त होते व त्यात यश मिळविते त्याचप्रमाणे परिपक्व योगी शरीर अत्यंत निर्बल झाले तरीही स्पंदात्मक आत्मबलावर आरूढ होऊन मोठ-मोठी दुष्कर कामे सहजपणे करीत असतो आणि अत्यंत भुकेलेला असतानाही आपल्या भुकेला इच्छित काळापर्यंत नियंत्रणामध्ये ठेवू शकतो. (येथे "क्षुधा" हा शब्द सर्व देहधर्माचे प्रतीक आहे. याचाच अर्थ असा आहे की योग्याला क्षुधा, निद्रा, स्त्रीचिंता इत्यादि देहधर्म विचलीत करू शकत नाहीत.)।।३८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

सर्वज्ञत्व, सर्वकर्तृत्व व स्वातंत्र्य ह्या आत्म्याच्या गुणांची प्राप्ती करून एखादा दुर्बल मनुष्य असमर्थ असूनसुद्धा ज्याप्रमाणे एखादे वजन उचलण्याच्या कामास प्रवृत्त होतो त्याचप्रमाणे मायाशक्तीने बांधलेला व अमुक एक कार्य करण्यास अमुक एका कर्माची जरूरी आहे असे मानणारा मनुष्य यथेष्ट सर्वकर्तृत्व लक्षण असलेल्या आत्म्याच्या सामर्थ्याच्या योगाने नियत काळी इच्छित कार्य करू शकतो. त्यावेळी त्याची विकल अशी उत्साहसत्ता नष्ट होऊन आत्मबळाच्या सामर्थ्यावर तो कार्य पार पाडण्यास समर्थ होतो. हे कार्य योगी या ज्ञानाने सहज करू शकतो. योगिसाधकाचा असा अभ्यास झाला की, आत्मबल संपादन होऊन तो सर्व कामे करू शकतो. अतिशय भूक लागलेली असली तरी तो आपली भूक शांत करू शकतो. मी नित्य तृप्त आहे हे आत्म्याचे खरे स्वरूप व सामर्थ्य त्याच्या क्षुधेच्या निवृत्तीला कारण होते. क्षुधा शमनासाठी अन्नच पाहिजे हा नियतीच्या शक्तीचा बंध तो तोडून टाकतो. इतकेच नव्हे; तर नित्यतृप्तता व स्वतंत्रत्व हे आत्म्याचे गुण प्राप्त झाल्यामुळे त्याला कधीही भूक लागत नाही व काही न खाता तो नित्यतृप्त व स्वतंत्र राहतो.

क्षीणधातू, अशक्त, कृश व दुर्बल पुरुष आपल्या उत्साहात्मक बलाचा व उद्योगाचा स्वीकार करून आपल्या कार्यात प्रवृत्त होऊन ते कार्य पूर्ण करतो. उद्योगबळाच्या जोरावर निर्बल व्यक्तीसुद्धा रणांगणावर आपल्या अपूर्व शौर्याचे दर्शन घडविते. असमर्थ पुरुषही व्यायामाभ्यास करून महान् शक्ती प्राप्त करून घेतो. उद्योगबळ हे आत्मसंवित् शक्तीचेच बळ आहे. भुकेलेला मनुष्य आपल्या भुकेच्या स्वभावाचा सराव करून भूक शांत करतो. कंठात संयम केला की, भूक व तहान थांबते. हा उपाय महर्षी श्रीपतंजलींनी योगदर्शनात सांगितला आहे. संयमाच्या बळावर मनुष्य हत्तीसारखे बळ प्राप्त करू शकतो. याचा अर्थ असा आहे की, आत्मशक्ती कुंडलिनी जागृत होऊन आत्मबळाची अभिव्यक्ती झाली की शोक, मोह, जरा, मृत्यू इत्यादि षडूर्मींचा नाश होतो. या प्रकारामुळे केवळ या शरीरीच्या संबंधात तो सर्वज्ञ होतो असे नसून त्याला सर्वत्र सर्वज्ञता प्राप्त होते.।।३८।।

* * * * *

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** दुर्बलाच्या कर्तृत्वशक्तीचा येथे दृष्टान्त घेतला आहे. दुर्बलाचे कर्तृत्व देहादि करणसमुदायावर अवलंबून नसून स्वस्वभावबलावर अधिष्ठित असते. तसेच प्रबुद्धाला नित्यतृप्तता स्वस्वभावप्रतीतीनेच येत असते. "बुभुक्षेचे आच्छादन" असे कारिकेत म्हटले आहे. बुभुक्षा म्हणजे भोगेच्छा. भोगेच्छेच्या आच्छादनामुळे तृप्तता येते असा तेथे अभिप्राय नाही. तृप्तता स्वस्वभावप्रतीतीनेच आलेली असते. भोगेच्छा तिरोहित होणे हे आनुषंगिक फळ होय.।।३८।।

* * * * *

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

श्रीभट्टकल्लट वृत्ती कारिका क्रमांक ३८ व ३९ मिळून कारिका क्रमांक ३९ च्या बरोबर दिली आहे.

* * * * *

**श्रीक्षेमराजस्पंदनिर्णय टीका :-**

कर्तृशक्ती आदिसुद्धा ह्या स्पंदतत्त्वाच्या बलापासून उत्पन्न होतात असे या कारिकेत सांगितले आहे.

**स्पष्टीकरण :-** ज्याचे शरीर दुर्बल झालेले आहे किंवा जो ऋषीप्रमाणे आहे तोही स्पंदात्मक बलाचा आधार घेऊन स्पंदसमावेशाच्या सामर्थ्याने प्राणप्रमातृभूमीला असकृत् अर्थात् वारंवार उत्तेजन देऊन अवश्य करावयाच्या असणाऱ्या कामांमध्ये प्रवृत्त होतो अर्थात् अशक्य असणारी वस्तूही त्या बलाच्या साहाय्याने प्राप्त करतो. जो अत्यंत भुकेलेला आहे तोही स्पंदतत्त्वाच्या बलाच्या साहाय्याने भूक, तहान यांना शांत करतो. क्षुधा व तहान ही चिद्घन भूमीमध्ये प्रवेश केलेल्याच्या बाबतीत कधीच शक्य नाहीत; कारण हे पारतंत्र्य केवळ प्राणादिभूमीवर असतानाच सामर्थ्यवान असते व त्या चिद्भूमीत निमग्न झालेले असते.।।३८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

त्या त्या व्यक्तिविशेषांमध्ये कर्तृत्वशक्त्यादि या अनुत्तरस्पंदशक्तीच्या सामर्थ्यानेच प्रादुर्भूत होतात हे "**दुर्बलोऽपि तदाक्रम्य ....।।३८।।**" या कारिकेत स्पष्ट करून सांगितले आहे. ज्याप्रमाणे कोणता एखादा धातू (जीवनशक्ती) क्षीण झाल्याने दुर्बल पुरुष विशेष औषधे घेऊन शक्तिवान् होतो व धष्टपुष्ट बनतो अथवा धातूंच्या क्षीणत्वामुळे शरीर दुर्बळ झालेले ऋषी बहुधा लोकोत्तरस्पंदात्मक श्रीपरमशिवतत्त्वस्वरूप बलाचा आश्रय घेऊन स्वतःमध्ये स्पंदतत्त्वाच्या समावेशाने प्राणप्रमातृत्वादि भूमिकेला पुनःपुन्हा उद्दीप्त करून आवश्यक कर्तव्यात स्वतःला प्रवर्तित करीत असत अर्थात् अशक्य असलेले वस्तुविशेषही त्या स्पंदशक्तीच्या सामर्थ्यामुळे मिळवीत असत त्याचप्रमाणे अत्यंत भुकेलेली आणि तहानलेली व्यक्तीही त्या सामर्थ्यामुळे भूक, तहान इत्यादि प्राणधर्म दूर करते. अशा प्रकारचे स्पंदतत्त्व सर्वत्र व्याप्त होऊन समस्त भावपदार्थांमध्ये त्यांच्यासाठी अभीष्ट शक्ती समर्पित करते.।।३८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**अनेनाधिष्ठिते देहे यथा सर्वज्ञतादयः।**
**तथा स्वात्मन्यधिष्ठानात् सर्वत्रैवं भविष्यति।।३९।।**

अन्वयार्थ :-

**अनेन** - या स्पंदतत्त्वाने, **देहे अधिष्ठिते** - पांचभौतिक जड शरीरात अधिष्ठान केले तर, **यथा** - ज्याप्रमाणे त्या शरीराला साजेशा देश, काल

व आकार यांच्या मर्यादात, **सर्वज्ञतादयः** - सर्वज्ञता इत्यादि शक्ती येतात - विद्यमान असतात, **तथा** - त्याप्रमाणे, **स्वात्मनि** - या देह वगैरेच्या व्यतिरिक्त विशुद्ध चिन्मय रूप आहे त्यात (श्रीरामकंठ) स्वतःच्या शुद्ध आत्मस्वरूपात, अविनाशी चिद्रूपात (श्रीक्षेमराज), **अधिष्ठानात्** - अधिष्ठान केले, तेच स्वरूप आपण आहोत अशी अनुभूती असेल (अशा योग्याला), **सर्वत्र एवं भविष्यति**- सर्व विश्वामध्ये विश्वाबाबत अशा रीतीचे सर्वज्ञतादि धर्म आविर्भूत होतील-प्रकटतील. ।।३९।।

**अर्थ :-** ज्याप्रमाणे या स्पंदतत्त्वाने पांचभौतिक जड शरीरात अधिष्ठान केले तर त्या शरीराला साजेशा देश, काल व आकार यांच्या मर्यादेमध्ये सर्वज्ञता इत्यादि शक्ती येतात किंवा विद्यमान असतात त्याप्रमाणे ही गोष्टही निश्चित आहे की, देहाभिमानापासून दूर होऊन सरळ त्या आत्मतत्त्वाचा अहंरूपामध्ये अनुभव घेणाऱ्या योग्यामध्ये सर्व विश्वामध्ये विश्वाबाबत सर्वज्ञता इत्यादि धर्म निश्चितपणे अभिव्यक्त होत असतात. ।।३९।।

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

देह हाच आत्मा आहे अशी भावना केल्याने आपल्या देहातील सूक्ष्म वस्तूला-आत्म्याला पदार्थाचे ज्ञान होते. इतर कोणत्याही पदार्थाचे ज्ञान आपल्याला पाहिजे असल्यास आपल्याला पदार्थरूप बनले पाहिजे. अर्थात् असे झाले तर त्या पदार्थाचे आपणास पूर्ण ज्ञान होते. याच दृष्टान्ताप्रमाणे पहिल्या प्रवाहातील पाचव्या श्लोकातील वर्णिलेल्या **"न दुःखं न सुखं"** वगैरे श्रीपरशिवाचे, पराहंतेचे व परब्रह्माचे ज्ञान श्रीपरशिवांच्या वैभवासह हवे असेल तर या देहाहून वेगळे विशुद्ध चैतन्यमय असे माझे शरीर आहे असा अहंतेचा अभ्यास केल्यास आत्म्याचे सर्व गुण साधकाला अवश्य प्राप्त होतात.

स्वस्वभावाच्या द्वारा आपण आपल्या शरीरावर अधिकार मिळविल्यावर या विषयात सर्वज्ञता आदि गुणांची प्राप्ती होते. एखाद्या लहानशा किड्याचा स्पर्श झाला तरी त्याची जाणीव आपल्याला होते. त्याचप्रमाणे आपल्या स्वरूपावर व स्वभावावर ताबा किंवा अधिकार मिळविल्यावर सर्वत्र सर्व गोष्टींचे ज्ञान होणे शक्य आहे. **"ज्ञानसंबोध"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "सर्व काही तोच आहे; कारण तो व्यापक आहे. तो स्वभावतःच सर्वज्ञ आहे. तो पुरुष सर्वज्ञ आहे. यामुळेच सर्वज्ञतेचे विशेष स्फुरण होते आणि जर सर्वांच्या हृदयात सदासर्वदा सर्वज्ञ परमात्मा विद्यमान नसता

तर नष्ट पदार्थाच्या विषयाची स्मृती कोणला कशी झाली असती? जन्माला आल्याबरोबर लहान बालक स्तनपानाचे शिक्षण कोणाकडून घेते? लहान लहान जंतूंना पाण्यात पोहोण्यास-तरंगण्यास कोण शिकविते? हा सर्व परमात्म्याच्या सर्वज्ञतेचा उल्लास आहे." शास्त्रात आणखी असेही म्हटले आहे की, "ज्यावेळी मधमाशी मध एकत्र करू लागते तेव्हा तिला आपल्याला अमूक फुलातील रस घ्यावयाचा आहे, अमूक नाही व अमूक गोड आहे, अमूक अगोड आहे ही जाणीव कशी होते? हा सर्व परमात्म्याचाच विलास नाही तर आणखी काय आहे? लहान लहान किडेसुद्धा आपल्या भरणपोषणाची आश्चर्यकारक व्यवस्था करून घेताना दिसतात. हत्ती-सारखा अज्ञानी पशू आपल्या सोंडेने स्वतः वर पाणी उडवून स्नान करतो. हे कोणाच्या ज्ञानाचे फल आहे? भोळ्याभाबड्या हरिणाला संगीताचे ज्ञान किंवा ओळख कशी होते? हा अनंत संविताचा विलासच आहे. असे जर नसते तर बिळात राहणारा उंदीर मांजराला का घाबरला असता? विवेकरहित असलेले कासव पाण्यात लपून आपली सर्व अंगे आत ओढून घेते. ही बुद्धी त्याला कोठून प्राप्त होते? आत्मसंवित्‌च मोरात राहून नाचत असते. सागराच्या पाण्यात सुरकांडी मारून पक्षी मासे पकडण्याचे कौशल्य कोणापासून शिकतो? नीरक्षीरविवेकाची जाणीव संवित्-हंसाला कशी प्राप्त होते? लहानातला लहान प्राणी बोलून आपली भावना कशी प्रकट करतो? आज आपल्याला हे हे काम करावयाचे आहे असा संकल्प सकाळीच कोठून उदय पावतो? आपल्या शिंगांनी, दातांनी व पंजांनी दुसऱ्यावर प्रहार करण्याची विद्या मूर्ख पशूंना कोण शिकविते? जर अखंड संवित् हृदयात स्पंदित झाली नसती तर हत्तीला आपल्या बळाची व सिंहाला आपल्या तेजाची जाणीव कशी झाली असती? अतिवृष्टी, अनावृष्टी, भूकंप इत्यादि गोष्टींच्या पूर्वसूचना पशुपक्षांना कोठून व कशा मिळतात? सिंह, वाघ इत्यादि यमासारख्या भयंकर प्राण्यांवरही मनुष्य प्रेम कसे करतो? सर्व प्राणिमात्रांच्या हृदयामध्ये एकाच संविदाची अखंड धारा प्रवाहित झाली नसती तर अशी मैत्री व असे मिलन दृष्टीस पडले नसते.

ही सर्व आत्मसंविताची विशेष अभिव्यक्ती आहे. आपल्या स्वरूपात आपली स्थिती झाली म्हणजे सर्वांच्या स्वरूपात आपली स्थिती झाल्यासारखेच आहे. असे झाले म्हणजे साधकाची स्वस्वरूपापासून कधीही च्युती होत नाही. सर्वत्र, सर्वज्ञता, सर्वता इत्यादि अभिव्यक्त होण्याची हीच युक्ती

आहे. या दृष्टीने शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की -

**एको भावः सर्वभावस्वभावः सर्वे भावा ह्येकभावस्वभावाः।**
**एको भावस्तत्त्वतो येन दृष्टः सर्वे भावास्तत्त्वतस्तेन दृष्टाः।।**

याचा अर्थ असा आहे की, एकच भाव सर्वांचा स्वभाव आहे. सर्व भाव एकाच भावाचे स्वभाव आहेत. ज्या साधकाने कोणत्याही एका भावाचा तत्त्वतः अनुभव प्राप्त केलेला असतो त्याने सर्व भावांचा तत्त्वतः अनुभव प्राप्त केल्यासारखेच असते.

याबद्दल शास्त्रात असे वचन आहे की -

**रहस्ययुक्तिरत्रेयं शरीरे यत्र यत्र च।**
**संविदो दार्ढ्यलाभः स्यात्तत्र तत्र गुणोदयः।।**

याचा अर्थ असा आहे की, या संबंधी एक रहस्य-युक्ती आहे. ज्या ज्या शरीरात संवित् दृढ होत जाते तेथे तेथे तिचे सर्व गुण प्रकट होतात. या सर्व गुणांना झाकणारे जे दुर्गुण आहेत त्यांचा मूळापासून नाश करावा म्हणून पुढील श्लोकात सांगितले आहे.।।३९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** ज्याचे ज्याचे म्हणून आत्मा अहंप्रत्ययाने ग्रहण करतो ते ते त्याचे शरीर बनते. या शरीरात अधिष्ठित होऊन तो जाणतो व करतो. ज्ञातृत्व व कर्तृत्व आत्म्याचे स्वभावभूत धर्म आहेत (१०). ते धर्म या अधिष्ठित देहातून अभिव्यक्त होतात. त्यामुळे ते त्या देहाचेच धर्म होत असे आपण मानू लागतो. या लौकिक दृष्टान्तावरून कारिकाकार असे म्हणतात की, जर देहमात्र प्रत्ययाच्या प्रतिबंधातून मोकळा होऊन अहंप्रत्यय व्यापक झाला तरी अशी एकही वस्तुमात्र नाही की, जिच्यातून त्याचे ज्ञातृत्व व कर्तृत्व अभिव्यक्त होणार नाही.

रस व शब्दार्थ यांच्यात जीवशरीरभाव असून रसामध्ये समवायाने राहणारे गुण शब्दार्थांवर उपचारित केले जातात असे साहित्यशास्त्र सांगते. त्यातील अभिप्राय असाच आहे.।।३९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

## संवित्स्पर्शाने सर्व कर्तृत्वाची प्राप्ती

वरील दोन सूत्रांमध्ये शाक्तबलावर अधिष्ठित राहणाऱ्या योग्यामध्ये

उदित होणाऱ्या सर्वकर्तृतेवर प्रकाश टाकला आहे. दोन्ही सूत्रांमध्ये निरनिराळ्या दार्ष्टान्ति गोष्टी दृष्टान्ताच्या द्वारा समजावून सांगितल्या आहेत.

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :- (कारिका क्रमांक ३८ व ३९)**

**सूत्र क्रमांक ३८ वृत्ती :-** ज्याप्रमाणे एखादी निर्बळ व्यक्ती आपल्या उद्योग करण्यास आवश्यक असलेल्या बळाचा आश्रय घेऊन सतत व्यायाम करून मोठे शारीरिक बल प्राप्त करून अर्थात् अत्यंत दुबळ्या शरीराच्या द्वारा अवजड कामे करण्याची शक्ती प्राप्त करून घेत असते त्याप्रमाणे योग्याचा धातुक्षय झाला असतानाही तो उत्साहाच्या रूपामध्ये अभिव्यक्त होणाऱ्या आत्मबळाला वश करून दुष्कर कामे करण्याकडे प्रवृत्त होत असतो. (येथे धातुक्षय या शब्दाचा अर्थ म्हातारपण किंवा व्याधी यामुळे शरीरातील धातूत घट होणे असा आहे.) याव्यतिरिक्त याच स्वभावाचे सतत अनुशीलन केल्याने अर्थात् याच स्वभावाचा सतत अभ्यास केल्याने अत्यंत भुकेलेल्या अवस्थेतही योगी आपल्या भुकेला स्वतंत्रपणे दाबून टाकीत असतो. या सर्व गोष्टीमागील कारण असे आहे की, स्वरूपामध्ये सर्वत्र कार्य आणि त्यांच्या कारणांना सत्ता प्रदान करण्याचे सामर्थ्य प्रकट होण्यास वेळ लागत नाही.।।३८।।

**सूत्र क्रमांक ३९ वृत्ती :-** जेथे हे सत्य आहे की, स्पंदतत्त्वाच्या चैतन्य प्रदान करण्याच्या स्वभावाच्या द्वारा अधिष्ठित सर्वसाधारण जड शरीरामध्येही (तदनुकूल देश, काल आणि आकार यांच्या सीमांमध्ये) सर्वज्ञता आदि धर्म विद्यमान असतात आणि ज्याच्या साहाय्याने तो योगी एका छोट्याशा कीटकाच्या अर्थात् ऊच्या स्वभावाचाही तत्काळ अनुभव प्राप्त करून घेत असतो तेथे ही गोष्टही निश्चित आहे की, त्या स्वरूपामध्ये अवहित अर्थात् पूर्णपणे अधिष्ठित राहणाऱ्या योग्यामध्ये सार्वत्रिक अर्थात् सर्व भुवनामध्ये समान रूपाने कार्यक्षम असणारी सर्वज्ञता अवश्य अभिव्यक्त होत असते.।।३९।।

**विवरण :-** अनेक वेळा असे आढळून येते की, काही विशिष्ट परिस्थितीमध्ये अत्यंत दुर्बल शरीराच्या व्यक्ती अल्पकालावस्थायी अर्थात् अल्पकाळ टिकणाऱ्या आवेशाच्या बळाने त्या शक्तीबाहेरील दुष्कर कामे करीत असतात. उदाहरणरूपाने जहाजांवर काम करणारे आणि सामान्य मानव शरीर धारण करणारे नाविक अकस्मात् निर्माण होणाऱ्या प्रलयंकर

समुद्रातील वादळामध्ये अथवा रणांगणावर लढणारे साधे शिपाई प्रबळ शत्रूच्या प्रचंड आणि आकस्मिक आक्रमणामध्ये कधी कधी अशी अभूतपूर्व कार्ये करतात की, त्यामुळे बुद्धी गोंधळात पडते. सामान्यपणे अशा अवस्थेला "आवेश" असे नाव दिले जाते. परंतु येथे हे पाहणे आवश्यक आहे की "आवेश म्हणजे काय?" आवेश ही कोणत्याही जिवंत प्राण्यामध्ये एखाद्या विशिष्ट क्षणी अकस्मात् प्रकट होणारी अशी दुर्दांत अर्थात् न नमणारी आणि प्रबळ वेगवान वृत्ती आहे. या वृत्तीमुळे त्या प्राण्याच्या मानसिक क्षेत्रामध्ये आणि त्याच्या द्वारा शरीराच्या प्रत्येक भागामध्ये एका अलक्ष्य शक्तिप्रेरणेचा तीव्र संचार होत असतो. शाक्तप्रेरणा ही कोठून बाहेरून येत नाही. ही प्रेरणा प्रत्येक प्राण्याच्या अंतःकरणामध्ये असलेल्या अमर्यादित आत्मशक्तीच्या स्पर्शाचा केवळ परिणामस्वरूप असते. या संसारामध्ये ही गोष्ट अनुभवाने सिद्ध झालेली आहे की, आवेशात्मक क्षणामध्ये प्रत्येक प्राणी हा त्या काळापर्यंत आपल्या देहाभिमानाला पूर्णपणे विसरून विशुद्ध अशा शाक्त स्वरूपामध्ये अवस्थित झालेला असतो. हेच कारण आहे की, असा प्राणी शरीर क्षीण झाले असतानाही दुष्कर कार्यांमध्ये स्वतःला झोकून देऊन आपले कार्य आवेगामध्ये सफलतेने करतो.

सामान्य प्राणिवर्गामध्ये आढळून येणाऱ्या आवेशाला "पूर्ण आवेश" असे म्हणता येत नाही; कारण हा मौलिक आत्मबलाचा केवळ नगण्य स्पर्श असतो. त्यामुळे साधारण जीवभावामध्ये अशा आवेशात्मक अवस्था या क्षणभंगूर असण्याचे हेच कारण आहे.

योग्यांची गोष्ट वेगळीच असते. योग्यांचा "अहं" अभिमान शरीर, प्राण इत्यादींवर असत नाही. योगी हे आत्माभिमानी असतात. यामुळे अशा योग्यांना केवळ शाक्तबळाचा स्पर्शच झालेला नसतो; तर अशा योग्यांचा शाक्तभूमिकेत पूर्ण समावेश झालेला असतो. अशा परिस्थितीमध्ये जर या योग्यांची सर्वज्ञता आणि सर्वकर्तृता इत्यादि सार्वत्रिक आणि सार्वकालीन असली तर त्यात आश्चर्याची गोष्ट नाही. भगवान् श्रीरामचंद्रांचे प्रिय दूत श्रीमारुती यांचे समुद्रलंघन हाही एक असाच शाक्तसमावेशच होता.

फलतः सामान्य प्राण्यांमध्ये असणारी ज्ञानक्रियात्मक स्पंदना त्या प्राण्यांच्या शरीराला अनुकूल देश, काळ तसेच आकार यांच्या परिधीपर्यंत

किंवा कक्षेपर्यंत सीमित राहते. याउलट परिपक्व योग्यांची स्पंदना ही देश, काळ आदि प्राचीरांना किंवा भिंतींना किंवा बंधनांना तोडून विश्व व्यापून राहिलेली असते.।।३८-३९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराजस्पंदनिर्णय टीका :-**

याकरिता वरील सूत्रात सांगितलेल्या क्रमानुसार अशा प्रकारचा गूढ सिद्धिसमुदाय या स्पंदतत्त्वापासून उत्पन्न होतो म्हणून पुढील कारिका सांगतात -

**स्पष्टीकरण :-** या स्वस्वभावरूप स्पंदतत्तवाने व्यापलेल्या देहात ज्याप्रमाणे त्या अवस्थेला योग्य अशा पदार्थांचे अनुभव करून देणारे इंद्रियरूप सर्वज्ञता, सर्वकर्तृत्वता इत्यादि धर्म देह धारण करणाऱ्या साधकामध्ये आविर्भूत होतात त्याचप्रमाणे जर हा देही कासव ज्याप्रमाणे आपले अंग संकोचून घेते त्याप्रमाणे सर्व वृत्तींचा उपसंहार करून किंवा महाविकासाच्या अथवा उन्नतीच्या द्वारे स्वतःच्या कधीही अव्यक्त न होणाऱ्या चिद्रूप आत्म्यात अधिष्ठान करील किंवा वर सांगितलेल्या अभिज्ञानाच्या प्रत्यभिज्ञानाने म्हणजे त्या अभिज्ञानाच्या आठवणीने तेथेच समावेश स्थितीला बांधील तर तो श्रीशिवापासून पृथ्वीपर्यंत सर्व ठिकाणी श्रीशंकरांना योग्य अशा सर्वज्ञता सर्वकर्तृत्वादिरूपांनी युक्त होईल.।।३९।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

**"अनेनाधिष्ठिते .....।।३९।।"** या कारिकेत स्पंदशास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, चेतन आत्म्याने अधिष्ठित या शरीरात "अहं" अशा संविद्रूपज्ञानप्रकाशाने शरीरात असलेले सर्व ज्ञेय (विषय) आणि त्यांनी घडून येणारी कार्ये उत्पन्न होतात. त्या विषयांबद्दल अहं अभिमानी असलेल्या जीवाचे कर्तृत्वज्ञातृत्वादि धर्म यथास्थित असतात. याचे तात्पर्य असे आहे की, ज्या पुरुषविशेषाचे **"अहं"** या बुद्धीने शरीरच अधिष्ठित असते त्या व्यक्तिविशेष साधकाला स्थूल, सूक्ष्म, ज्ञेय आणि कार्य अपरोक्ष म्हणजे प्रत्यक्ष होतात आणि त्यांच्या निर्माणासाठी तो प्रयत्नही करतो. या दृष्टान्ताद्वारे ज्याप्रमाणे जीव देहाला निमित्त असणारी कार्ये आणि ज्ञेय (विषय) हे जाणतो आणि त्यांची रचनाही करतो त्याचप्रमाणे जेथे स्वस्वभावात दुःखादींचा

गंधही नसतो तशा प्रकारच्या सर्व उपाधींपासून मुक्त असणाऱ्या जीवसाधकाला चित्स्वभावात अहंरूपाने परिज्ञान अर्थात् सर्वार्थाने ज्ञान होते. त्या पुरुषाचे सर्व ठिकाणी ज्ञातृत्व आणि कर्तृत्व होते. हे संसारित अर्थात् ही अपूर्व स्थिती ते विलक्षण स्वस्वरूप जाणणाऱ्या ज्ञात्याची असते. हा योगी देहाभिमानाच्या लक्षणास प्रतिबंध करणाऱ्या शून्यत्वाने स्वस्वरूपात प्रतिष्ठित होऊन सर्वकर्तृत्व-सर्वज्ञत्वादि धर्मांचा आश्रय बनतो.।।३९।।

* * * * *

**ग्लानिर्विलुम्पिका देहे तस्याश्चाज्ञानतः सृतिः।**
**तदुन्मेषविलुप्तं चेत् कुतः सा स्यादहेतुका?।।४०।।**

**अन्वयार्थ :-**

**ग्लानि** - मानसिक औदासीन्य, **देहे** - शरीरामधील, **विलुम्पिका** - चोर, दरोडेखोर, **तस्याः** - त्या ग्लानीची, **सृतिः** - उत्पत्ती, **अज्ञानतः** - अज्ञानापासून होते, **तद्** - ते अज्ञान, **उन्मेषविलुप्तम्** - उन्मेषाच्या योगे समूळ उच्छेद झाला, संपूर्ण नाहीसे झाले, **चेत्** - जर, **अहेतुका** - जिचे कारण, मूळ, नाहीसे झाले आहे अशी, **सा** - ती ग्लानी, **कुतः** - कोठे.।।४०।।

**अर्थ :-** मानसिक उदासीनता ही साधकाच्या शरीरामधील धातू, सामर्थ्य, उत्साह, तेज इत्यादि सर्व चोर-दरोडेखोराप्रमाणे लुटून नेते. मानसिक औदासीन्य किंवा ग्लानी हे स्वयं अज्ञानामुळे प्रसार पावत असते. उन्मेषाच्या अर्थात् ज्ञानोदयाच्या द्वारा अज्ञानाचा समूळ उच्छेद झाल्यावर अज्ञान हे कारण न उरल्याने ग्लानी उत्पन्न होणे कसे शक्य आहे?।।४०।।

* * * * *

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

अग्निमांद्य झाल्याने म्हणजे मी देह आहे असे वाटत राहिल्याने होणाऱ्या हर्षाच्या हानीस ग्लानी म्हणतात. या ग्लानीमुळे शरीरातील धातू, रस व शक्ती या सर्वांचा बलात्काराने नाश होत असतो. अशी स्थिती येण्याचे कारण काय? मी श्रीपरमशिवरूप, पूर्ण, स्वतंत्र व चैतन्य आहे या ज्ञानाचा अभाव हेच या स्थितीला खरे कारण आहे. जर साधकाने क्षणोक्षणी सर्व अवस्थेत प्रत्येकवेळी उन्मेष म्हणजे श्रीपरशिवांच्या स्वरूपाची जागृती ठेवली तर ते अज्ञान निर्मूल होते. मग कारणरहित अशी ग्लानी

म्हणजे हर्षाची हानी उत्पन्न होत नाही. जन्मणे, परिणाम पावणे, वाढणे, क्षय होणे, विनाश होणे वगैरे विकाराने रहित असा नित्य निर्विकार श्रीपरमशिव मी आहे अशी जाणीव न ठेवल्याने जन्मादि विकार असलेले शरीरच आपण आहोत असा आपल्याला अभिमान उत्पन्न होतो. यालाच अज्ञान म्हणतात. हे अज्ञान अप्रबुद्ध जीवांना होत असते. जन्ममरणादि विचारयुक्त असा माझा देह हाच आत्मा आहे असा रोग या जीवांना होत असल्याने आत्म्याची हर्षहानी होऊन ग्लानी वगैरेचा त्याला अनुभव येतो. त्यामुळे जो साधक श्रीपरमशिवांची जागृती नेहमी ठेवतो त्याच्या ठिकाणी सत्य असे आत्मज्ञान प्रकट होते व त्याला सदानंदाची प्राप्ती होते. हे त्याचे मुख्य फळ आहे. या साधनाने देहाला म्हातारपण, रोग वगैरे सहज होत नाही व या साधकाच्या हर्षाची हानी केव्हाही होत नाही. हे या साधनाचे गौण फळही साधकाला मिळते. "देह मी आहे," हीच भावना सर्व दुखांना व आनंदाच्या नाशाला कारणीभूत होते.

आपल्या शरीरातील ग्लानी ही आत्मसंविताच्या उल्लासाला कुंठित, लुप्त किंवा विशेष प्रकाराने नाश करणारी आहे. ग्लानी म्हणजे अनुत्साह होय. उत्साहानेच स्वभावाची अभिव्यक्ती होत असते. अज्ञानापासूनच ग्लानीची उत्पत्ती होते. जर आत्मस्वभावाच्या द्वारा अज्ञानाचा नाश केला तर जीवनात ग्लानी किंवा अनुत्साह राहू शकत नाही. या अज्ञानाचा व ग्लानीचा नाश करूनच योगिलोक जन्म-मृत्यूची परंपरा संपवून शरीर दृढ करून घेतात. पुढील श्लोकात उन्मेषाचे स्वरूप काय आहे हे सांगितले आहे.।।४०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** ग्लानी म्हणजे हर्षहानी. स्वस्वभाव सहजानंदमय आहे. सहजानंदाची हानी होताच अभिव्यंजक शरीराची शक्ती नष्ट होते. ग्लानीची किंवा आनंदहानीची प्रवृत्ती अज्ञानापासून आहे. त्यामुळे अज्ञान जाताच ग्लानीही जाते व स्वस्वभावाचा सहजानंद प्रकट होतो. अज्ञान उन्मेषामुळे लुप्त होते. उन्मेष म्हणजे "स्वभावालोकविकास." उन्मेषाच्या परिशीलनाने आत्मस्वरूपाचा प्रत्यय येतो. हा प्रत्यय म्हणजे सहजानंदाचाच प्रत्यय होय.

प्रतिभेच्या प्रसिद्ध लक्षणातील "नवोन्मेष" या शब्दाचा हाच अर्थ आहे. काव्याला जर प्रतिभेचे अधिष्ठान नसेल तर ते जुनाट चित्रासारखे मलिन वाटते.।।४०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

श्रीभट्टकल्लटवृत्ती कारिका क्रमांक ४० व ४१ मिळून कारिका क्रमांक ४१ च्या बरोबर दिली आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराजस्पंदनिर्णय टीका :-**

या कारिकेत ग्रंथकार साधक वरील गोष्टींशिवाय खालील गोष्टीही त्या स्पंदतत्त्वाच्या कृपेने प्राप्त करतो असे सांगतात.

**स्पष्टीकरण :-** जो स्वतःच्या शरीरालाच आत्मा समजत असतो त्याची दुःखाची संवेदना ही एखाद्या चोराप्रमाणे असते; कारण ती परसंविद्रूप धन चोरून नेते आणि (साधकाला) संकुचित ज्ञानी करून दरिद्री बनविते. या ग्लानीचे मूळ कारण आणि अस्तित्व हे अज्ञानामुळे आणि चिदानंदघन अशा स्वस्वरूपाचे प्रत्यभिज्ञान न झाल्यामुळे असते. ते अज्ञान पुढे सांगण्यात येणाऱ्या उन्मेषाच्या स्वरूपामुळे नष्ट झाले असता; त्याचे कारण जे अज्ञान तेच नष्ट झाले असता ही ग्लानी किंवा दुःख कोठून उत्पन्न होणार? अर्थात् उत्पन्नच होणार नाही. हे दुःख नाहीसे झाले असता देहाला अवश्यरूपात होणाऱ्या व्याधिसंतापादि अवस्था जसजशा योग्यापासून दूर दूर जातात किंवा नष्ट होतात तसतसा ज्याप्रमाणे सोने खूप तापविल्यानंतर त्याचा मळ निघून गेल्याने ते जसे दैदिप्यमान होते त्याप्रमाणे तो योगी तेजस्वी होतो. अशा प्रकारे देहस्थितीत असणाऱ्या परयोग्यांच्याही ग्लानीचा अभाव हे वैभव किंवा विभूती आहे. यासंबंधी परमयोगिनी मदालसेने आपल्या मुलांवर प्रयोग करताना असे म्हटले आहे की -

**त्वं कञ्चुके शीर्यमाणे निजेऽस्मिन्देहे हेये मूढतां मा व्रजेथाः।**
**शुभाशुभैः कर्मभिर्देहमेतन्मदादिभिः कञ्चुकस्ते निबद्धः।।**
**।। मा. पु. २५।१४।।**

**अर्थ :-** तू या कंचुकांनी (आवरणांनी) क्षय होणाऱ्या आणि त्याज्य अशा देहामध्ये मूढतेला प्राप्त होऊ देऊ नकोस. तुझा देह हा शुभाशुभ

कर्मांनी आणि कंचुक मदादि दोषांनी बद्ध झालेला आहे.

मितसिद्धींची अभिलाषा करणाऱ्या योग्यांनी समावेशाच्या अभ्यास-रसाने ते योगी केस पांढरे झालेले आणि सुरकुत्या पडलेले अशा प्रकारचे देह धारण करणारे असले तरीही व्याधींवर जय मिळवू शकतात, असे या कारिकेत सूचित केलेले आहे.।।४०।।

*****

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

व्याधींचा विनाश व्हावा यासाठी **"ग्लानिर्विलुण्ठिका .....।।४०।।"** या कारिकेत उपाय सांगितला आहे. ग्लानी म्हणजे मंदस्वने प्रयोजिलेल्या हर्षक्षय (इत्यादि भावना) होत. ती ग्लानी शरीरात विद्यमान असणाऱ्या धातूंच्या बळाची बळानेच विनाशक बनते. ही ग्लानी अनादि अशा अज्ञानाचे निमित्त आणि संसाराचे कारण आहे. अशा प्रकारचे अज्ञान सर्वप्रकाराने हानी करणारे व उन्मेषद्वारा अर्थात् जागृतीद्वारा विनाश करणारे होईल त्यावेळेस ही ग्लानी कारणांच्या अभावामुळे कोणापासून उत्पन्न होईल? ती कोणत्याही दुसऱ्या कारणापासून उत्पन्न होत नाही. अज्ञान म्हणजे सर्व प्रकारच्या विकारापासून रहित असणाऱ्या स्व-स्वभावाच्या अज्ञानामुळे जन्म-मृत्यू इत्यादि विकारांचा आश्रय असलेल्या शरीरादींमधील आत्माभिमान किंवा मी देह आहे (आत्मा नाही) हे होय. हे अज्ञान विद्यमान असताना ज्ञानरहित लोक जन्मादि विकारांचा आत्म्यावर आरोप करून ग्लानीमुळे सर्वप्रकारच्या शुभकर्मांचा नाश करतात; कारण षुरुषधुरिण उन्मेषाच्या परिशीलनाने अर्थात् सतत अभ्यासाने सर्वव्यापक स्वात्म्याची परीक्षा करतो, त्याच्या बाबतीत ग्लानी किंवा तेज इत्यादींची क्षती (कमी) होत नाही.।।४०।।

*****

**एकचिन्ताप्रसक्तस्य यतः स्यादपरोदयः।**
**उन्मेषः स तु विज्ञेयः स्वयं तमुपलक्षयेत्।।४१।।**

**अन्वयार्थ :-**

**एकचिन्ताप्रसक्तस्य** - एका विचारात- एकाच विषयाच्या चिंतनात गढलेल्या किंवा गढलेल्याचे बाबतीत, **यतः** - ज्याच्यामुळे- ज्या अलक्षित आत्मबलाच्या विकासामुळे, **अपरोदयः** - दुसऱ्या विचाराचा उदय होतो,

**सः-** त्या आत्मबालाने अचानक झालेल्या प्रभावाला- विकासाला **उन्मेषः विज्ञेयः** - "उन्मेष" आहे असे जाणावे, **व स्वयम्** - आपणाहून, **तम्** - त्या उन्मेषाला- उन्मेषावर, **उपलक्षयेत्** - लक्ष ठेवावे, अनुसंधान ठेवावे.।।४१।।

**अर्थ :-** एका विचारात अर्थात् एकाच विषयाच्या चिंतनात गढलेल्या व्यक्तीच्या चित्तामध्ये ज्या अलक्षित आत्मबळाच्या विकासामुळे दुसऱ्या विचाराचा उदय होत असतो त्या आत्मबळामुळे अचानक झालेला प्रभाव किंवा विकास हा उन्मेष आहे असे जाणून घ्यावे. साधकाने आपणहून त्या उन्मेषावर लक्ष ठेवावे किंवा उन्मेषाचे अनुसंधान करावे. ।।४१।।

❋❋❋❋❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

उन्मेष कशाला म्हणतात? माणसाचे ज्ञान दृश्यमान अगर स्मरणमान अशा वस्तूंमध्ये रंगलेले असते. त्या वस्तूंचे एकाग्र चिंतन करीत असताना त्याला आत्मस्वरूपाची जागृती होत असल्याने ते कंटाळवाणे वाटते. असे झाले की, पहिले चिंतन विराम पावते व दुसऱ्या ग्राह्य वस्तूंच्या चिंतनाचे ज्ञान उदय पावावयास लागते. पहिले संपलेले ज्ञान व दुसरे उदय पावलेले ज्ञान या दोहोंमधल्या अवस्थेलाच उन्मेष असे म्हणतात. हा जो मधला क्षण आहे त्या क्षणी सर्वांचा आदिकारण परमात्मा तोच मी आहे अशी जागृती ठेवावी. तो क्षण इदंता वगैरे शब्दांनी वर्णन करता येत नाही. परमेश्वराचा हा ज्ञानमय स्वभाव सदा सर्वकाळ असतो. तथापि साधकाला उपदेश करण्याकरिता त्या क्षणी परमेश्वर स्वरूपाचा उदय झाला आहे असे सांगून त्याला उन्मेष असे संबोधिले आहे. पहिल्या वस्तूचे चिंतन हे दुसऱ्या वस्तूच्या चिंतनाला कारण आहे असे नव्हे; तर याला कारण व कार्यरूप असणारे असे सर्वांचे आदिकारण असलेले परमात्मस्वरूप हेच अनुसंधान करणारे आहे. पहिल्या चिंतेचा लय व दुसऱ्या चिंतेचा उदय करणारा असा अनुसंधान ठेवावयास विशुद्ध कारणमात्र असलेला सर्वांचा आदिकारण परमात्मा आहे, अशा रीतीने साधकाने जागृती ठेवावी. यालाच उन्मेष अवस्था म्हणजे ज्ञानाची जागृती म्हणतात. या गोष्टीचा स्वतः अनुभव घेतला पाहिजे. या उन्मेषाच्या जोरावरच आपले आत्मस्वरूप ओळखले पाहिजे. दोन चिंतांमधील व्यापकरूपाने अनुभवास

येणारे स्वसंवेद्य तत्त्व तेच आहे. तो वेदप्रतिपादित आद्य परमात्माच स्वसंवेद्य आहे. तरुण स्त्रीच्या सहवासाचे सुख असे असते हे ज्याप्रमाणे नुसत्या उपदेशाने समजत नाही त्याचप्रमाणे आत्मा हा उपदेशगम्य नसून अनुभूयमान आहे. उन्मेषाचे अनुशीलन केल्यावर प्रत्ययांचा उदय पुढील प्रकारे होतो.।।४१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** या कारिकेत **"एकचिंता"** आणि **"अपरचिंता"** असे शब्दप्रयोग आहेत. चिंता म्हणजे ज्ञान. आपणाला एखाद्या वस्तूचे अनुभवरूप किंवा स्मरणरूप ज्ञान होते, ते ज्ञान त्या वस्तूने उपरक्त म्हणजे झालेले असते. अशा वस्तूपरक्त ज्ञानाचा निर्देश **"एकचिंता"** या पदाने केला आहे. **"अपरचिंता"** म्हणजे "अनुपरक्त पण ग्राह्यालंबी ज्ञान" होय. लौकिक व्यवहारातील आपले ज्ञान प्रत्येक क्षणी "वस्तूपरक्त" म्हणजे त्या त्या विषयविशेषाने उपहित झालेले असते. पण या वस्तूपरक्त ज्ञानावरूनच आपणाला त्या वस्तूच्या आभासाने उपरक्त न झालेल्या ज्ञानरूप स्वरूपप्रकाशाचेही ज्ञान होते. याला आपण "ज्ञानाचे ज्ञान" असे म्हणू.[१] हे ज्ञान अनुपरक्त असले तरी तो निरालंबनप्रत्यय अर्थात् आधाराशिवाय येणारा अनुभव मात्र नसतो. ते ग्राह्यच त्याचे आलंबन अर्थात् आधार असतो. या अनुपरक्त स्वरूपप्रकाशाच्या प्रत्ययामुळे वेद्य वस्तूचे स्वरूपच पालटते. जी वस्तू प्रथम चिंतेच्या वेळी वस्तुविशेष म्हणून ग्रहण करण्यात आली होती तीच आता अनुपरक्त स्वरूपप्रकाशाचे आलंबन होत असताना त्या ज्ञानाची प्रतिपादक झाली.[२] वेद्य वस्तूचे हे रूपांतर होण्याचे एकमेव कारण अनुपरक्त स्वस्वभावरूप प्रकाश हेच होय. या प्रकाशाची जाणीव इदंतेने कधीच येत नाही. तो केवळ स्वसंवेदनसिद्ध आहे. खरोखरी, हा स्वभावप्रकाश नित्योदितच असतो; पण त्या विशिष्ट चिंतेच्या वेळी तो अभिव्यक्त होत असल्यामुळे त्याचा "उन्मेष" असा निर्देश केला जातो. सारांश, उन्मेष म्हणजे विशिष्ट चिंताप्रसंगी प्रतीत होणारी स्वभावप्रकाशाची अभिव्यक्ती होय. त्यामुळेच उन्मेष म्हणजे "स्वभावालोकविलास" होय.।।४१।।

**टीप :- १)** हा अनुव्यवसाय होय. नाट्यात अनुव्यवसाय असतो

असे श्रीभट्टतौत म्हणतात. **तस्मादनुव्यवसायात्मकं कीर्तनं रूषितविकल्प-संवेदनं नाट्यम्। तद्वेदनवेद्यत्वात्।। अभिनवभारती।।** याचा अर्थ असा आहे की अर्थात् त्यामुळे नाट्य म्हणजे मनोभावात्मक म्हणजेच मनोभावांनी युक्त आणि विकल्पांच्या संवेदनांनी युक्त असे कीर्तन होय. कारण त्या (संवेदनांची) जाणीव होत असते.

**२)** लौकिक वस्तूंचे विभावीकरण असेच होते. लौकिकातील उपहित ज्ञानाचा आश्रय काव्यात अनुपहित स्वरूपप्रकाशाचे आलंबन बनतो हाच विभाव होय. **"अनुपरक्तज्ञानरूपस्वभावप्रकाश"** आरक्त न झालेल्या अर्थात् कोणत्याही रंगांनी न रंगलेल्या हेच साहित्यशास्त्रात सांगितलेल्या साधारण्यप्रतीतीचे बीज होय. "साधारणी भूत भावांचे अनाश्रित अवस्थेत संवेदन होणे शक्य नसते म्हणूनच केवळ काव्यात शब्दमात्रोपयोगित्वाने आलंबन घ्यावे लागते," असे श्रीअभिनवगुप्त म्हणतात.

❋ ❋ ❋ ❋ ❋

## श्रीभट्टकल्लट वृत्ती :- (कारिका क्रमांक ४० व ४१)
## मानसिक उदासीनता आणि तिचे निवारण

सूत्र क्रमांक ४० व ४१ मध्ये ग्रंथकार असे सांगत आहेत की, ग्लानी अर्थात् मानसिक शैथिल्य किंवा उदासीनता ही आधिव्याधी याची जन्मदात्री आहे. मानसिक उदासीनता ही अज्ञानामुळे उत्पन्न होत असते. उन्मेषामुळे अर्थात् अज्ञानाचा समूळ उच्छेद झाल्यामुळे मानसिक उदासीनता आणि त्यापासून निर्माण झालेल्या आधिव्याधी या स्वयं नष्ट होत असतात. याच कारणामुळे योग्यांचे शरीर वलीपलितादिंनी [१] रहित, तेजस्वी आणि निरोगी असते. (**टीप १ :-** वृद्धपणामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या पडणे आणि केस सफेद होणे.)

**सूत्र क्रमांक ४० वृत्ती :-** ग्लानी अर्थात् मानसिक उदासीनता किंवा मानसिक शैथिल्य हे शरीराचा आणि शरीराचे धातू, बल, तेज इत्यादींचा नाश करीत असते. मानसिक शैथिल्य व उदासीनता ही केवळ अज्ञानामुळेच उत्पन्न होत असते. जर उन्मेष अर्थात् चित्-चमत्कारमय स्वरूपविकासाच्या उपायाने त्या अज्ञानाचा पूर्णपणे उच्छेद किंवा नाश केल्यास ही मानसिक उदासीनता निर्माण होणे कसे शक्य आहे; कारण मानसिक उदासीनता

निर्माण होण्याचे कोणतेही कारण शिल्लक राहात नाही. हेच कारण आहे की, योग्यांची शरीरे दृढ असतात. योग्यांच्या शरीराला कधीही सुरकुत्या पडत नाहीत की योग्यांचे केस हे कधीही पिकत नाहीत.।।४०।।

**सूत्र क्रमांक ४१ वृत्ती :-** जर एखाद्या चिंता करणाऱ्या पुरुषाचे चित्त हे एखाद्या विषयाशी संबंध ठेवणाऱ्या चिंतेमध्ये एकाग्रभावाने बुडलेले असेल अशा परिस्थितीत त्या चित्तामध्ये त्या स्वभावाच्या द्वारा अचानक कोणतीतरी दुसरी चिंता निर्माण होते. उन्मेष हेही दुसरी चिंता उत्पन्न होण्याचे कारण आहे. योग्याने आपल्या अनुसंधानाच्या द्वारा त्याचा स्वतः शोध घेतला पाहिजे. हे तत्त्व दोन्ही चिंतांच्या मध्ये असणाऱ्या संधिक्षणामध्ये जागृत योग्यांना व्यापक रूपामध्ये अनुभवा-वयाला येत राहते.।।४१।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्रांचा अर्थ समजण्यात कोणतीही विशेष अडचण येत नाही. केवळ उन्मेषाच्या संबंधामध्ये खालील गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक असते.

सूत्र क्रमांक ४१ मध्ये उल्लेखिलेल्या **"एकचिन्ताप्रसक्तस्य"** शब्दाची व्याख्या करताना टीकाकारांचा भिन्नभिन्न दृष्टिकोण आढळून येतो. अनेक टीकाकारांच्या विचारानुसार याचा अर्थ असा आहे की, जेव्हा योगी हा दैनंदिन जीवनाच्या सर्व आवश्यक कृत्यांना तिलांजली देऊन आणि वेगवेगळ्या कोणत्यातरी एका आलंबनविशेषाला आपल्या धारणेचा विषय करून अनुसंधान करीत करीत मानसिक एकाग्रतेच्या चरम सीमेवर पोहोचत असतो तेव्हा त्या योग्यामध्ये स्वयं चित्-चमत्कारमय अशा उन्मेषाचा उदय होत असतो. ("स्पंदनिर्णय कारिका" क्रमांक ४० ची व्याख्या पाहावी.)

या व्याख्येनुसार उन्मेषतत्त्वाच्या अनुभूतीचा पूर्ण स्वाधिकार हा केवळ जंगलामध्ये जाऊन आसन घालणाऱ्या आणि संसाराविषयी पूर्णपणे निरपेक्ष असणाऱ्या व्यक्तीसाठी सुरक्षित बनत असतो. अशा परिस्थितीमध्ये आजच्या भौतिकयुगीन आघात-प्रतिघातामध्ये फसलेल्या व्यक्तीसाठी याविषयीचे कोणतेही आकर्षण शिल्लक राहत नाही. या संबंधामध्ये या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे की, **शैवदर्शन हे कधीही पलायनवादावर विश्वास ठेवीत नाही. संसार आणि त्याचे आघात-प्रतिघात या दोहोंविषयी निरपेक्ष असे राहता येते; कारण हे दोन्ही श्रीशिवत्वाचा विकास आहेत. यामुळे सत्य आहेत. सत्याला नाकारणे कसे शक्य आहे?**

**साधकाला किंवा योग्याला उन्मेषतत्त्वाची प्राप्ती ही संसाराला वेगळे ठेवून नाही तर त्या संसाराच्या कणाकणामध्ये या तत्त्वाच्या व्यापकतेचा अनुभव घेतल्याने होऊ शकते. परंतु या तत्त्वाची प्राप्ती करून घेण्यासाठी मोठे साहस आणि तीव्र आंतर अनुसंधानाची अर्थात् अभ्यासाची आवश्यकता आहे.**

कदाचित् श्रीभट्टकल्लटांनी याच विचारांच्या पृष्ठभूमीवर वर निर्देशिलेल्या शब्दाची सोपी व्याख्या करून हे तथ्य समजाविलेले आहे की, **प्रतिक्षण मनामध्ये निर्माण होणाऱ्या आणि नाहीशा होणाऱ्या असंख्य चिंतांमधील संधिक्षणामध्ये नित्योदित अर्थात् नित्य उदय पावलेल्या उन्मेषतत्त्वाची व्यापकता अनुभवावयास येऊ शकते. या उन्मेषतत्त्वासाठी उत्सुक असणाऱ्या व्यक्तीला संसाराचा त्याग करून जंगलात जाण्याची नाही तर संसारामधील सर्व कार्य व कर्तव्य करीत असतानाही आंतर ज्ञानाच्या किंवा अंतर्विचारांच्या द्वारा किंवा आंतर स्फुरणाच्या द्वारा त्या तत्त्वाशी नित्ययुक्त राहण्याची आवश्यकता असते.** ।।४०-४१।।

*****

**श्रीक्षेमराजस्पंदनिर्णय टीका :-**

आता या कारिकेत ग्रंथकार हा जो उन्मेष आहे तो कशा प्रकारचा आहे आणि कोणत्या उपायांनी लाभणारा आहे या प्रश्नांचे उत्तर देतात.

**स्पष्टीकरण :-**

**भावे त्यक्ते निरुद्धा चिन्नैव भावान्तरं व्रजेत्।**
**तदा तन्मध्यभावेन विकसत्यतिभावना।।**
**।। विज्ञानभैरव ६२।।**

**अर्थ :-** ज्यावेळेस चित्-शक्ती एकाच अदृश्य पदार्थावर निरुद्ध किंवा नियंत्रित केलेली असते त्यावेळेस ती मध्यभावात भावनेच्या अतिशयत्वाने विकसित होते. या "**विज्ञानभैरव**" या ग्रंथात सांगितलेल्या नीतीनुसार एका कोणत्यातरी विशिष्ट आधार धारण केलेल्या आणि विकारात्मक अशा विचारामध्ये एकाग्र झालेल्या योग्याच्या त्या विचारामध्ये खूप एकाग्र झाल्याने उल्लसित झालेल्या संवित्स्फारापासून (संवेदनेच्या पूर्ण अभिव्यक्तीपासून) आणि त्याचा आधार अचानकच नष्ट झाल्याने एका

विशिष्ट विचाराचे सर्व प्रकार अव्यक्त झालेल्या अग्नी आणि चंद्राच्या स्वरूपाच्या स्पंदतत्त्वापासून चित्-चमत्काररूप (तत्त्वाचा किंवा विचाराचा) उदय होतो. चित्-चमत्काररूप आत्म्यातच हा लोकोत्तर अर्थात् दिव्य उल्लास होतो तो उन्मेष चमत्काररूप उन्मेष करणारा असल्याने (योग्याने) जाणून घ्यावा. अशा प्रकारेच योगी ते जाणू शकतो. इदंताविषयाचा म्हणजेच (परमात्म्याशिवाय इतर गोष्टींचा) अभाव असल्यामुळे अकृत्रिम प्रयत्नांचे अवधान (एकाग्रता) करून अहंतेच्या जवळ जाऊन आत्म्यात पाहावे. अर्थात्च हे तत्त्व असाधारण (अलौकिक) चमत्कारयुक्त आत्म्याने जाणून घ्यावे.

काही जण या श्लोकाचा अर्थ पुढीलप्रमाणे करतात. एकाच विषयविचारादि विचारांमध्ये एकाग्र झालेल्या दुसऱ्या विचाराचा तत्काळ उदय होईल. तो दोन्हीही विचारांनी व्याप्त असणारा उन्मेष होय.।।४१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

**"एकचिन्ताप्रसक्तस्य .....।।४१।।"** या कारिकेत उन्मेषाचे स्वरूप सांगितले आहे. उन्मेष म्हणजे स्वरूपानुभासाचा विकास होय. या "स्व"रूपाच्या विकासामुळे उत्पन्न होणाऱ्या उन्मेषाने ग्लानीचा नाश होतो. कोणत्या योग्याचा अशा प्रकारे विकास होतो? या प्रश्नाचे उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की, एकचित्तामध्ये प्रयुक्त झालेल्या म्हणजेच एकाच विचारामध्ये अनुभव घेणाऱ्या म्हणजे स्मरण करणाऱ्या त्या त्या वस्तुरूप उपाधीने उपहित अर्थात् वस्तू जवळ ठेवल्याने ज्ञानस्थितीला प्राप्त झालेल्या व एकाग्र विचार करणाऱ्याच्या अभ्यासामुळे चिंतेच्या विषयांच्या अवभासामुळे अनुपरक्त साक्षिस्वरूपप्रकाश कारणीभूत झाल्याने दुसऱ्या चिंतेची अर्थात् ग्राह्यविषयक अन्य ज्ञानाची उत्पत्ती होते त्यालाच उन्मेष असे म्हणतात. अशा प्रकारच्या उन्मेषाचे योगी स्वानुभवानेच उपलक्षण करतो अर्थात् त्याचे निरीक्षण करतो. हा श्रीपरमशिव सर्वांचा ईश्वर, सर्वांपासून भिन्न व परमकारण हा मीच असे इदंरूपाने जाणतो. हा घट नाही अशा प्रकारे घटाचे इदंतेने उपलक्षण केले जाते. परंतु श्रीपरमशिवाचे तसे उपलक्षण करणे शक्य नाही; कारण त्याचा स्वानुभवविदित अर्थात् स्वच्या अनुभवाने जाणता येणारा स्वभाव आहे.।।४१।।

**अतो बिन्दुरतो नादो रूपमस्मादतो रसः।**
**प्रवर्तन्तेऽचिरेणैव क्षोभकत्वेन देहिनः।।४२।।**

**अन्वयार्थ :-**

**अचिरेणैव** - (असा योगाभ्यास करताना) लौकरच, **अतो बिन्दुः** - यापासून विशेष तेज असणारे बिंदू, तेजस्वी रूप, **अतो नादः** - यापासून अनाहत-नाद, **अतो रूपम्** - यापासून गाढ अंधकारातसुद्धा पदार्थ दिसण्याचे सामर्थ्य (श्रीभट्टकल्लट), **अतो रसः** - यापासून मुखात अमृतासारखी चव असणारा रस (श्रीभट्टकल्लट), **प्रवर्तन्ते** - प्रकट होतात, प्राप्त होतात, (पण) **देहिनः** - देहाभिमान न गळलेल्या योग्याला, **क्षोभकत्वेन** - क्षोभ देतात, त्याच्यामध्ये क्षोभ निर्माण करतात.।।४२।।

**अर्थ :-** असा योगाभ्यास किंवा योगसाधना करताना साधकामध्ये अल्प काळातच विशेष तेजयुक्त बिंदू नजरेसमोर दिसणे, अनाहत नाद ऐकू येणे, मिट्ट काळोखातही पदार्थ दिसण्याचे सामर्थ्य येणे, मुखात अमृतासारखी चव असणारा रस पाझरणे अशा अमित अर्थात् अमर्यादित सिद्धी अभिव्यक्त होतात. परंतु ज्या योग्याचा देहाभिमान पूर्णपणे गळालेला नाही त्या योग्याच्या मनामध्ये त्या गोष्टी क्षोभ उत्पन्न करतात.।।४२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

उन्मेषाच्या अनुशीलनाचा अभ्यास करीत असताना साधकाने फार सावध राहिले पाहिजे. जागृत अवस्थेमध्ये सुखदु:खाचे अनुभव येत असताना आत्मस्वरूपाला न विसरता क्षणोक्षणी नाश पावणारे सर्व जगातील विचित्र व तुच्छ असे पदार्थ आत्मस्वरूपासह अगदी भिन्न कर्मीच असल्याने त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून जो सावधान राहील त्याला थोडक्याच काळात सिद्धचिह्ने दिसावयास लागतील. पण त्या चिह्नांचा आनंद न मानता व त्याबद्दल गर्व न करता पुढे चालले पाहिजे; कारण त्याचा देहस्वभाव पूर्णपणे नष्ट झालेला नसतो. भ्रूमध्याच्या ठिकाणी साधकाने ध्यानाचा अभ्यास केला असताना त्याला नाना प्रकारचे तेज दिसावयाला लागते. आत्मतत्त्वाचा अभ्यास करणाऱ्या साधकाला बिंदुभेद होऊन तेजाचा प्रकाश भ्रूमध्याच्या ठिकाणी दिसतो. वेगाने वाहणाऱ्या मोठमोठ्या नद्यांचा धो धो आवाज व मधुर असे मधुकरांचे आवाज वगैरे निरनिराळे आवाज

ऐकू येतात. गाढ अंधःकारा-मध्ये निरनिराळ्या आकाशांचे दर्शन होते. अमृत प्राशन केल्याप्रमाणे जिभेला स्वाद येतो. तेजतत्त्वाच्या अभ्यासाने निरनिराळे स्पर्श प्राप्त होतात. ज्ञानतत्त्वाचा म्हणजे ब्रह्मतत्त्वाचा अभ्यास करणाऱ्या साधकाला वरील अनुभव येतात.

योगी साधकांना प्राप्त होणारे विविध अनुभव हे सिद्धीसारखेच आहेत. पृथ्वीतत्त्वाचा अभ्यास करीत असताना साधकाला तेज दिसू लागते. आकाशतत्त्वाचा अभ्यास करीत असताना निरनिराळ्या प्रकारचे आवाज ऐकू येतात. तेजतत्त्वाची उपासना करताना अंधारात आकार दिसतो. आपतत्त्वाची उपासना करीत असताना काही न खाता अमृताचा आस्वाद येतो. वायुतत्त्वाची उपासना करून स्पर्श प्राप्त होतात. अशा प्रकारच्या व इतर सिद्धी चैतन्याचा अभ्यास करणाऱ्या साधकाला सहज प्राप्त होतात. अशा प्रकारच्या अनुभूतींची प्राप्ती झाली असताना आनंद मानून साधकाने तेथेच थांबता कामा नये. हे अनुभव आपल्याला वारंवार यावेत म्हणून साधकाने आग्रह धरू नये. ब्रह्मपदारूढ होण्यास या गोष्टी आड येतात. उन्मेषाच्या म्हणजे ज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या साधकाने अखंड सावध असावे.

येथे ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, बिंदू, नाद इत्यादि निरूपणक्रमात सृष्टिक्रमही ध्वनित आहे. उन्मेषामुळेच सृष्टी होते हे प्रथमच सांगितले आहे. उन्मेषापासून प्रथम बिंदू म्हणजे इच्छा-दृक्शक्तीचा प्रसार होतो. त्यानंतर शब्दात्मक नादाची उत्पत्ती होते. तीच क्रियाशक्तिरूप वाक् आहे. यानंतर रूपाचा उदय होतो. हेच पदार्थाचे दर्शन व विचार आहे. मग त्यातच रस अर्थात् अभिलाषा व उपभोगाचा जन्म होतो. रहस्यवेदी अनुभवी पुरुष यालाच उद्योग, अवभास, चर्वण व विलापन असे म्हणतात. या श्लोकात या चारही गोष्टींचे क्रम सूचित केले आहेत. विशेष आपल्या परिभाषेच्या द्वारा प्रकृताचा बाध करीत नाही. यामुळे आपल्या स्वतःला आत्म-संविताचा साक्षात्कार होतो. हा साक्षात्कार कसा होतो याचा उपाय पुढील श्लोकात सांगितला आहे.।।४२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** लौकिक जीवनात जागरादि अवस्थेत सुखदुःखाचे

अनुभव येतात. त्यावर नित्य अवधान ठेवल्यामुळे व दर क्षणी बदलत्या ज्ञानज्ञेयरूप संसारातून व्यतिरिक्तत्वाने पण अनुस्यूतपणे प्रतीत होणाऱ्या स्वस्वभावावर भावना केंद्रित केल्याने देहदशेवर येण्यापूर्वी प्रबुद्धाला बिंदू, नाद इत्यादि सिद्धी प्राप्त होतात. बिंदू म्हणजे भ्रूमध्यदेशी प्रतीत होणारा प्रसादरम्य तेजोविशेष, नाद म्हणजे प्रारंभी वेगवान् नदीच्या निर्घोषाप्रमाणे वेगाने पण हळूहळू सूक्ष्मपणे साधकाच्या मुखातून प्रकट होऊ पाहणारा ध्वनिविशेष, रूप म्हणजे तमोरूप आवरणातून प्रकट होऊ पाहणारा वेद्यवस्तूचा आकारविशेष व रस म्हणजे आस्वादमय प्रतीती. या सिद्धींनी संतोष, विस्मय, अभिमान इत्यादि भावना साधकाला जाणवतात. पण येथेच साधकाला जपावे लागते. या भावनांच्या आहारी जाऊन साधक सिद्धीपाशीच थांबला तर उन्मेषावरील त्याचे लक्ष उठून तो तेथेच अडकून पडतो. हा क्षोभ शांत करून समाहित चित्ताने तो प्रबुद्ध पुढे गेला पाहिजे.

रससमाहित अवस्थेत कवीच्या मुखातून शब्द कसे बाहेर पडतात याचे वर्णन श्रीअभिनवगुप्तांनी लोचनात श्रीवाल्मीकींचे उदाहरण घेऊन दिले आहेत. या संबंधात रामायण, बालकांड, २ रा सर्गही पाहावा.।।४२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

आतापर्यंत योग्यामध्ये अभिव्यक्त होणाऱ्या अमित अर्थात् अमर्यादित सिद्धींचे वर्णन केलेले आहे. आता सूत्र क्रमांक ४२ मध्ये कनिष्ठ कोटींच्या कनिष्ठ सिद्धींचा संकेतरूपाने उल्लेख करून असे समजाविलेले आहे की, अशा प्रकारच्या अपरसिद्धी किंवा कनिष्ठ सिद्धी या असावधान अर्थात् सावधान नसलेल्या योग्यांना क्षोभात टाकून त्यांच्या खऱ्या ध्येयापासून च्युत किंवा स्खलित किंवा परावृत्त करीत असतात.

**वृत्ती :-** सतत अनुशीलन अर्थात् अभ्यास केल्या जाणाऱ्या उन्मेषाच्या द्वारा योग्यामध्ये अत्यंत अल्प वेळामध्ये बिंदू अर्थात् एक प्रकारचे विशेष तेज, नाद अर्थात् प्रणव किंवा ओंकार नावाचा अनाहत शब्द, रूप अर्थात् दाट अंधारामध्ये किंवा काळोखामध्ये पदार्थांना पाहू शकण्याची शक्ती आणि रस अर्थात् मुखामध्ये अमृताचा स्वाद अशा प्रकारच्या सिद्धी अभिव्यक्त होत असतात. परंतु देहाभिमानामध्ये अडकलेल्या योग्यांना या सिद्धी क्षोभामध्ये टाकीत असतात.।।४२।।

**विवरण :-** या सूत्रामध्ये चार प्रकारच्या कनिष्ठ सिद्धींच्या पारिभाषिक नावांचा उल्लेख केलेला आहे. स्पंदशास्त्राच्या आचार्यांनी या कनिष्ठ सिद्धींच्या स्वरूपाचे वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आहे.

१) **बिंदू :- "बिन्दुः"- भ्रूमध्यादौ प्रदेशे ध्यानाभ्यासप्रकर्षप्रवर्धमानोत्तरोत्तरप्रसादस्तेजोविशेषो, यो बिन्दुभेदाभ्यासात् धरातत्त्वध्यायिनामभिव्यज्यते। स्पंदकारिकाविवृती कारिका क्र.४२।।**

यावरून पृथ्वीतत्त्वाची धारणा करणाऱ्या योग्यांना एकाग्र ध्यान प्रखरतेने केल्यामुळे भुवयांच्या मध्ये एक प्रकारचे विशेष उत्तरोत्तर वाढणारे तेज प्रकट होत असते. या तेजालाच बिंदू असे म्हणतात. "बिंदुभेद" हे या धारणेचे पारिभाषिक नाव आहे.

२) **नाद :- "नादो"- वेगवन्नद्यौघनिर्घोषघनोपक्रमः क्रमसूक्ष्मीभावाभिव्यज्यमानमधुमत्तमधुकरध्वनितानुकारी स्वोच्चारितो ध्वनिविशेषो, यं व्योमतत्त्वाभ्यासिनः श्रृण्वन्ति।। स्पंदकारिकाविवृती कारिका क्र.४२।।**

आकाशतत्त्वाच्या धारणेचा अभ्यास करणाऱ्या योग्याला एक विशिष्ट प्रकारचा स्वयं उच्चारित ध्वनी ऐकू येत असतो. हा ध्वनी प्रथम तीव्र वेगाने वाहणाऱ्या नदीच्या घरघराटाप्रमाणे ऐकू येतो आणि त्यानंतर तो ध्वनी हळूहळू सूक्ष्म होत होत मकरंद पानाने धुंद झालेल्या भोवऱ्याच्या किंवा भुंग्याच्या गुणगुणाटाप्रमाणे प्रतीत होत असतो.

३) **रूप :- "रूपं" सन्तमसाद्यावरणेऽपि सति तत्तद् दृश्यवस्त्वाकारदर्शनं, यत् तेजस्तत्त्वन्यक्षनिक्षिप्तमतयो निरीक्षन्ते।। स्पंदकारिकाविवृती कारिका क्र.४२।।**

तेजतत्त्वाच्या धारणेचा अभ्यास करणाऱ्या योग्याला मिट्ट काळोखामध्येही वस्तू स्पष्टपणे दिसू लागतात.

४) **रस :- "रसो" रसवद्वस्तुविरहेऽपि अमृतास्वादो मुखे लोलाग्रलम्बिकादिधारणानिरतैर्अप्तत्त्वध्यायिभिर्य उपलब्धे।। स्पंदकारिकाविवृती कारिका क्र.४२।।**

जल तत्त्वाची धारणा करणारे योगी आपले जिह्वाग्र किंवा त्याच्या जवळ असलेल्या लंबिकेवर म्हणजे जिभेवर धारणेचा अभ्यास करीत असतात. रसाची धारणासिद्धी झाल्यावर या योगिजनांना कोणताही स्वादिष्ट पदार्थ खाल्याशिवायच मुखामध्ये अमृताप्रमाणे स्वादाची अनुभूती होत राहते.

याव्यतिरिक्त योग्यामध्ये दिव्य स्पर्श आणि दिव्य गंध यांची अभिव्यक्ती होत असते. (स्पर्शाच्या विषयामध्ये विशेषरूपाने "**तंत्रालोक**" या ग्रंथामधील अकरावे आह्निक पाहावे.) परंतु या विषयामध्ये पूर्ण माहिती प्राप्त करून घेण्यासाठी "**तंत्रालोक**" या ग्रंथामध्ये वर्णिलेल्या भगवान् श्रीमद् अभिनवगुप्तपादाचार्य यांचा दृष्टिकोन समजावून घेणे आवश्यक आहे. या सूत्रामध्ये दिव्य स्पर्श आणि दिव्य गंध या दोन सिद्धींचा उल्लेख केलेला नाही. यामुळे येथे या विषयावर भाष्य करणे हे प्रसंगाला अनुकूल नाही.

"**मालिनीविजय**" तसेच "**विज्ञानभैरव**" यांसारख्या रहस्यमय शास्त्र ग्रंथांमध्ये भिन्न भिन्न धारणांचा अभ्यास करणाऱ्या योग्यांमध्ये अभिव्यक्त होणाऱ्या शेकडोशे सिद्धींची वर्णने केलेली आहेत. परंतु सूत्र क्रमांक ४२ मध्ये ग्रंथकारांनी केवळ चार सिद्धींचाच नामनिर्देश केलेला आहे. कदाचित् असे करण्यामागे या कनिष्ठ सिद्धींच्या अतिरंजित वर्णनाने शिष्याचे मन प्रलोभनात अडकू नये अशी या ग्रंथकारांची इच्छा असावी. स्पंदज्ञानसंपन्न श्रीगुरूंच्या विचारानुसार स्पंदात्मक शाक्तभूमिकेची अनुभूती प्राप्त करून घेणे हे सर्व साधनांचे एकमात्र ध्येय असणे आवश्यक आहे. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की - "**गर्भः अख्यातिर्महामाया तत्र तदात्मके मितसिद्धिप्रपञ्चे यश्चित्तस्य विकासः तावन्मात्रे प्रपञ्चे सन्तोषः असावेव ..... किञ्चिज्ज्ञत्व-रूपा अशुद्धविद्या ..... विकल्पात्माः भ्रमः।। श्रीशिवसूत्रविमर्शिनी २.४।।**" याचा अर्थ असा आहे की, गर्भ म्हणजे अज्ञान अर्थात् महामाया होय. या मायेने युक्त अशा मंत्रसिद्धींमध्ये चित्ताचा तात्पुरता संतोष वाटतो. ही सर्वसाधारण विद्या आहे. यात किंचिज्ज्ञता असल्याने ही अशुद्धविद्या होय. ही स्वप्न आहे असे म्हणण्यास हरकत नाही; कारण ही विद्या भेदांनी युक्त असून वेगवेगळ्या विकल्पांमुळे ही विद्या म्हणजे भ्रमही आहे.

या ध्येयाहून भिन्न इतर सर्व तथाकथित योगसिद्धी या मायिक उपरागांनी अर्थात् मायेने रंगलेल्या असल्यामुळे कनिष्ठ कोटीच्या असून पूर्णपणे हेय किंवा त्याज्य असतात. या कनिष्ठ सिद्धींचे स्वरूप सर्वसामान्य मनुष्यामध्ये आढळून येणाऱ्या अल्पज्ञतारूप अशुद्ध विद्येहून जराही अधिक नाही. या कनिष्ठ सिद्धी थोडा वेळेपर्यंत अभ्यास केल्याने प्रकट होत असतात. परंतु अपरिपक्व योगी हा कधीही यांच्या भ्रमजाळ्यामध्ये पडून गर्वाने फुगून दरवेशाप्रमाणे बनत असतो. लोक या योग्यांच्या दरवेशी

खेळांना मोठ्या योगसिद्धी समजून त्यांची वारंवार प्रशंसा करीत स्वतःला शिष्य किंवा शिष्या म्हणवून घेण्याकरिता नेहमी त्यांच्या मागे पडलेले असतात. परंतु अनुभवी सिद्धांनी वारंवार घोषणा करून असे सांगितलेले आहे की, **"ते समाधावुपसर्गा व्युत्थाने सिद्धयः।। पातंजल योगदर्शन ३.३७।।"** अर्थात् ते समाधीत उपसर्ग अर्थात् अडथळे असून जागृत दशेमध्ये सिद्धी ठरतात. यावरून मर्यादित सिद्धींचे व्यापारीकरण योग्याला स्वरूपसमाधीपासून अत्यंत दूर भटकवून आंधळ्या खड्ड्यात पाडीत असते.

या विषयामध्ये भगवान् श्रीआशुतोष यांनी **"श्रीशिवसूत्र"** व **"मालिनीविजयोत्तर"** या ग्रंथांतील वचने उद्धृत करताना अशी आज्ञा केलेली आहे की -

**वासनामात्रलाभेऽपि योऽप्रमत्तो न जायते।**
**तमनित्येषु भोगेषु योजयन्ति विनायकाः।**
**तस्मान्न तेषु संसक्तिं कुर्वीतोत्तमवाञ्छया।।२.१०।।**

याचा अर्थ असा आहे की, जो साधक वासनालाभानेही सावध होत नाही त्याला विनायक म्हणजे त्या त्या दिव्यभोगांचे अधिष्ठाते देवगण अनित्य भोगांकडे वळवितात. त्यामुळे त्या भोगांच्यामध्ये उत्तम वांछेने किंवा इच्छेने घनिष्ट संपर्क करू नये.

**मितसिद्धी या विनायक अर्थात् दिव्य योगभूमिकेच्या अध्यक्षा दिव्यशक्ती असतात. या मितसिद्धी गंभीर साधनेमध्ये निरत असलेल्या योग्यांना मार्गभ्रष्ट करण्यासाठी प्रतिक्षण उद्यत राहत असतात.**

भगवान् श्रीपतंजलीमुनींचे मत हेच आहे. भगवान् श्रीपतंजलीमुनींनी असे म्हटलेले आहे की, या दिव्यशक्ती ऋतंभरा प्रज्ञेने युक्त अशा योग्याची सत्त्वशुद्धी पाहून त्या योग्याला वारंवार संसारामधील सुखभोगांच्या प्रलोभनांमध्ये फसविण्याचा किंवा अडकविण्याचा प्रयत्न करू लागतात. या दिव्यशक्ती त्या योग्याला वारंवार अशी प्रेरणा देत राहतात की, "हे आयुष्मन्! आपण आपल्या सद्गुणांनी ह्या विशिष्ट दिव्य भोगांचे अर्जन केलेले आहे अर्थात् हे विशिष्ट दिव्य भोग प्राप्त करून घेतलेले आहेत. सौंदर्य आणि सौरभसंसाराला पसरविण्याऱ्या सुखाला या आपल्या दर्शनासाठी व्याकूळ झालेल्या आहेत. आपले अवयव दिव्य तेजाने चमकत आहेत. हे जरा अर्थात् वार्धक्य किंवा म्हातारपण आणि जीर्णता यांना दूर ठेवणारे

अमृतरसायन आपल्या समोर सादर केलेले आहे. कृपया आपण या अमृतरसायनाचा स्वीकार करावा. अष्टसिद्धी (अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राप्ती, प्राकाश्य, ईशित्व, वशित्व) नवनिधी (पद्म, महापद्म, शंख, मकर, कच्छव, मुकुंद, कुंद, नील, खर्व्व) कल्पवृक्ष, मंदाकिनी, नंदनवन, दिव्ययान इत्यादि दिव्यरत्नांचे संभार आपल्या कृपाकटाक्षाची प्रतीक्षा करीत आहेत इत्यादि".

साधक हा बेसावध राहून एकवेळ या प्रलोभनांच्या मृगजळामध्ये अडकला की, **"प्रसह्य चञ्चलीत्येव योगिनामपि यन्मनः। स्वच्छंदतंत्र ४.३११।।"** अर्थात् जे बलपूर्वक योग्यांचे मनही चंचल करते, असे घडते. यावरून त्या योग्याच्या आत्म्याचा घात झाला हे निश्चितपणे समजावे. यामुळेच सिद्ध श्रीगुरूंनी स्वरूपलाभ प्राप्त करण्यास इच्छुक व्यक्तींना सचेत करण्यासाठी वारंवार असा उपदेश केलेला आहे की, ज्या महान् धैर्यशाली व्यक्तीच्या स्थिर मनामध्ये आपल्या ज्ञेयविषयाला अर्थात् स्पंदात्मक स्वभावाला सोडून अन्य कोणताही कनक-कामिनी यासारख्या अस्थायी प्रलोभनांचा विचार टिकू शकत नाही, असा योगी हा कोणत्याही अवस्थेमध्ये राहत असला तरीही आपल्या लक्ष्यापासून किंवा ध्येयापासून विचलीत होत नाही.।।४२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

आता ज्या सिद्धी कमी सामर्थ्यवान् असणारा मितयोगी मिळवू शकतो आणि ज्या उन्मेषाच्या सतत अभ्यासानेच उदित होतात त्या सिद्धींना श्रेष्ठ योग्यांनी "हेय" अर्थात् "त्याज्य" मानावे, असे या कारिकेत ग्रंथकार सांगतात.

**स्पष्टीकरण :-** उन्मेषाच्या सतत अभ्यासामुळे स्थूल-सूक्ष्मादि देहाच्या अहंभावाचा नाश न झालेल्या योग्यांच्यामध्ये तत्काळ भ्रूमध्यादींमध्ये तारकाप्रकाशरूप (ताऱ्यांप्रमाणे चमकत असणाऱ्या) व सर्व ज्ञेयरूप सामान्य प्रकाशाने युक्त असा बिंदू, अनाहत ध्वनिरूप असलेला सर्व वाचक म्हणजेच अर्थांच्या अनेक प्रकारांच्या रूपांचा असा नाद, अंधःकारातही प्रकाशित होणाऱ्या तेजस्वरूप रूप आणि रसनेच्या टोकावर असणारा अलौकिक आस्वाद म्हणजेच रस हे अडथळ्यांच्या अर्थात् सिद्धींच्या

रूपाने स्पंदतत्वाच्या प्राप्तीमध्ये विघ्न आणणाऱ्या संतोषप्रदानत्वाने असतात.

यासंबंधी पातंजल योगसूत्रात असे म्हटले आहे की, **"ते समाधावुपसर्गा व्युत्थाने सिद्धयः।"(३१-३७)** अर्थात् ते (अडथळे) समाधीमध्ये उपसर्ग आणि व्युत्थानात गूढ शक्ती किंवा सिद्धी मानलेल्या आहेत.

अशा प्रकारे उन्मेषाच्या निभालनात अर्थात् उन्मेषाच्या निरीक्षण करण्यात उद्युक्त असूनही देहाला आत्मा मानणाऱ्या योग्यालाही हे बिंदुनादादि अडथळेच होतात असे म्हटले आहे.।।४२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

**"अनो बिन्दुरतो ...।।४२।।"** या कारिकेत उन्मेषाच्या साक्षात्कारासाठी प्रवृत्त झालेल्या ज्या योगिजनाच्या मित अर्थात् कमी प्रयत्नाने साध्य होणाऱ्या आणि मिळणाऱ्या सिद्धी ह्या प्रतिबंधकच होतात हे सांगितले आहे. अविरत उन्मेषाच्या अनुशीलनात प्रवृत्त झालेल्या श्रेष्ठ योग्याला थोडक्याच काळात सिद्धी प्राप्त होतात. त्या सिद्धी कोणत्या आहेत?

**बिंदु :-** तारकांच्या टोकाला विलक्षण तेजस्विता दिसते. त्यामुळे सर्व ज्ञेयसामान्यांचा प्रकाश होतो.

**नाद :-** भृंग्याच्या आवाजाप्रमाणे अनुकरण करणारा आणि उच्चरित होणारा ध्वनिविशेष होय. हा ध्वनी आकाशतत्त्वाचा अभ्यास करणारे ऐकतात.

**रूप :-** त्या त्या ज्ञेय वस्तूंचे आकारदर्शन म्हणजे रूप होय.

**रस :-** रसाने युक्त असणाऱ्या वस्तूचा अभाव असतानाही मुखामध्ये अमृतरसाची चव येणे.

परंतु या सिद्धी परयोग्यांच्यासाठी प्रक्षोभ देणाऱ्याच ठरतात. त्यामुळेच या सिद्धी त्याज्य होत.।।४२।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**दिदृक्षयेव सर्वार्थान् यदा व्याप्यावतिष्ठते।**
**तदा किं बहुनोक्तेन स्वयमेवावभोत्स्यते।।४३।।**

**अन्वयार्थ :-**

**यदा** - जेव्हा, **दिदृक्षया** - केवळ स्पंदात्मक स्वरूप पाहण्याच्या तीव्र इच्छेने, **सर्वार्थान्** - सर्व भावांना, सर्व पदार्थ, **व्याप्य** - स्वतःच्या संवित्च्या (प्रकाशाने आच्छादून, ते भाव आत्मत्त्वात अंतर्लीन आहेत

असे ध्यानी आणून,) **अवतिष्ठते** - राहतो, "विविधतेचे, नानात्वाचे दर्शन ही भ्रांती असून तत्त्व एकच आहे हे जाणून त्यावरच स्थिर विसावतो", (श्रीरामकंठ), **तदा** - तेव्हा, **किंबहुनोक्तम्** - अशा योग्याचे बाबतीत जास्त काय बोलावे, **स्वयमेव अवभोत्स्यते** - तो आपण होऊनच स्वभावभूत स्पंदतत्त्वाची अनुभूती घेतो.।।४३।।

**अर्थ :-** सर्व भावांमध्ये केवळ स्पंदात्मक स्वरूप पाहण्याच्या तीव्र इच्छेने योगी प्रत्येक भाव हा आत्मतत्त्वात लीन झालेला आहे हे जाणून घेऊन राहतो. विविधतेचे व नानात्वाचे दर्शन ही भ्रांती नसून सर्वांना एकच तत्त्व व्यापून राहिलेले आहे हे ज्ञात करून त्यावरच स्थिरपणे विसावतो. अशा योग्याच्या बाबतीत जास्त काय बोलावे? असा योगी स्वयं स्वभावभूत स्पंदतत्त्वाची अनुभूती घेत असतो.।।४३।।

*****

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

ज्यावेळेस साधक पाहण्याच्या इच्छेने दृष्टी फेकतो त्यावेळेस त्याच्या नजरेच्या पुढचे सर्व पदार्थ त्याला दिसतात. साधक त्यावेळेस आत्मज्ञानाचा प्रकाश पाडतो व त्या प्रकाशात तो सर्व पदार्थांना लीन करतो. त्याक्षणी त्याची अनेकत्वाची भावना निवृत्त होऊन पहिल्या क्षणी तो तटस्थ राहतो. तो जो एक तटस्थ वृत्तीचा क्षण असतो तोच आत्मस्थितीचा क्षण होय. मग बाकीच्या सूक्ष्म गोष्टी जेव्हा साधक बघावयास लागतो तो मायेचा खेळ होय. सिद्धस्थितीत आलेला पुरुष साधन सामुग्रीची जरूर नसतानासुद्धा तसल्या प्रकारचे विश्व पाहू शकतो. योग्याने सर्व पदार्थमात्र श्रीपरमशिवांहून वेगळे नाहीत असे ज्ञानाच्या इच्छेने पाहण्याची इच्छा करावी म्हणजे वरील अनुभव येत असतो. पाहण्याची इच्छा असलेला पदार्थ श्रीपरमशिवाशी अभेदत्वानेच त्याच्या नजरेस पडत असतो. भेदाला कारण असलेले इदंतेचे ज्ञान तेथे मुळीच प्रकट होत नाही; कारण पदार्थमात्र सत्यच आहे असा त्याला अनुभव येत असतो. ज्याच्या ठिकाणी ज्ञानरूपच पाहण्याची इच्छा झालेली आहे त्याने पाहण्याच्या प्रत्येक क्षणी अशा प्रकारची सावधानता ठेवावी. मायाशक्तीने निर्माण केलेल्या विकल्परूपी अंधःकाराने ज्याची सम्यक् ज्ञानदृष्टी नष्ट झालेली आहे त्याला निव्वळ चैतन्यरूप व अविभक्त असे परब्रह्मस्वरूपच सर्व ठिकाणी भरून राहिलेले असताना ज्ञान व ज्ञेय वगैरे नानारूपाने भासणाऱ्या त्रिपुटी खेरीज दुसरी गोष्टच तो पाहू शकत

नाही. त्यामुळे सर्वव्यापी परमेश्वररूप पाहण्याची जरी त्याने इच्छा केली तरी सर्व ठिकाणी व्यापून असलेल्या परब्रह्मशक्तीच्या त्रिपुटीमुळे तो ते रूप पाहू शकत नाही. एक वस्तू देखील तो अशा परब्रह्मदृष्टीने मानू शकत नाही. मग तो सर्व काही परब्रह्म कसे पाहणार? या करिता आत्मस्वरूपाची प्राप्ती हवी असेल त्याने भेदरूपी अंधःकाराचा नाश करणारा सूर्यच मी आहे व सर्वत्र मी आहे असा निश्चय करून पाहत असावे.

जेव्हा साधक दिदृक्षा म्हणजे दर्शनाच्या इच्छेत स्थिर होऊन सर्व पदार्थात व्याप्त होऊन वागू लागतो तो स्वतः आपल्या स्वभावाचा अनुभव प्राप्त करून घेतो हे सांगण्याची अधिक आवश्यकताच नाही. येथे या उपदेशाचा आशय समजून घेणेच योग्य आहे. ज्याप्रमाणे एखादा मनुष्य कुतूहलाने एखादी वस्तू पाहण्यासाठी सावधान होऊन विकासवृत्तीने जागृत होतो त्याचप्रमाणे सर्व पदार्थांमध्ये श्रीशिवरूप दर्शनाच्या उन्मुखतारूप वृत्तीने उद्युक्त होऊन आपल्या स्वरूपात स्थिर होतो तो स्वतः सर्वज्ञता इत्यादि गुण आपल्या स्वभावात प्राप्त करून घेतो. "**अतः सततमुद्युक्तः**" इत्यादि शब्दांनी ही गोष्ट मूळ कारिकेत आलेली आहे. या स्थितीला "**तत्त्वार्थचिंतामणी**" या ग्रंथामध्ये रहस्यमुद्रा म्हटले आहे. "**भोगमोक्षप्रदीपिका**" या ग्रंथात याचे वर्णन असे आले आहे. "उन्मेषबलाने उद्यंत्रित होऊन म्हणजे उद्युक्त व कार्यान्वित होऊन आपल्या स्वरूपात राहावे. असा योगी आनंदभूमीत राहून प्राप्त झालेल्या विषयांचा स्वतः उपभोगही घेत राहतो. ही आनंदभूमी अत्यंत उच्छृंखल, खूप मोकळी व परम विस्तृत आहे. ज्यांची बुद्धी प्रबुद्ध आहे त्या साधकांसाठीच ही भूमी आहे. सिद्ध पुरुष या अवस्थेत नेहमी आनंदरत राहतात. हीच परममुद्रा आहे." अन्यत्र असे म्हटले आहे की, "दर्शनादि सर्व शक्तींना चित्तातून त्यांच्या त्यांच्या विषयात एका वेळेला फेकून द्या. त्या सर्व विषयांमध्ये तुम्ही सुवर्णाच्या खांबाप्रमाणे स्थिर राहा. खरोखर तुम्हीच एकमात्र विश्वाधार आहात. वेश्या स्त्रीप्रमाणे नेत्रादि चंचल शक्ती इकडे तिकडे अगदी स्वच्छंदपणे भटकत राहतात. त्यांच्याकडे नुसते पाहत राहा. त्यांच्या मागे बिलकुल जाऊ नका. खरोखर तुम्हीच संपूर्ण विश्वाला धारण केले आहे व तुम्हीच सर्व विश्वापासून निराळे आहात. ही स्थिती प्राप्त व्हावी म्हणून पुढील श्लोकात युक्ती सांगितली आहे.।।४३।।

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** आपल्याला लौकिक पातळीवर ज्ञेयतेने प्रतीत होणारे विश्व प्रबुद्धाला स्वस्वभावाचा आविष्कार म्हणून प्रतीत होते. लौकिक भूमीवरील "इदंतेचा" तेथे मागमूसही नसतो. त्याची दिदृक्षा म्हणजे अहंतेला पाहण्याचीच इच्छा असते. ज्ञाता स्वतःलाच आपले ज्ञेय बनवतो किंवा तो स्वतःलाच आपले भोग्य बनवतो. ही अवस्था केवळ स्वसंवेद्य आहे, कितीही सांगू म्हटले तरी शब्दांनी ती सांगता येत नाही.[१] ।।४३।।

**टीप १ :-** रसास्वादही असाच स्वसंवेद्य आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

**प्रथमाभास**

सूत्र क्रमांक ४३ मध्ये स्पष्ट शब्दामध्ये असे म्हटलेले आहे की, जे योगी स्वतः समोर आलेल्या मितसिद्धीच्या प्रलोभनांना दूर करून केवळ विश्वात्मभावाला प्राप्त करून घेण्यासाठी तत्पर राहतात त्या योग्यांसाठी महान् रहस्यांची बंद असलेली कपाटे आपोआप उघडतात.

**वृत्ती :-** पाहण्याच्या तीव्र इच्छेला "दिदृक्षा" असे म्हणतात. दिदृक्षेच्या अवस्थेमध्ये राहून जेव्हा योगी सर्व भावांमध्ये स्वरूपतः व्याप्त होऊन स्थित झालेला असतो तेव्हा स्वयं तो योगी स्वभावभूत अशा स्पंदतत्त्वाची अनुभूती प्राप्त करून घेत असतो. यात अधिक वायफळ बडबडीची काहीही गरज नाही. ।।४३।।

**विवरण :-** कोणत्याही भावाचा साक्षात्कार करण्याच्या वेळी दोन प्रकारचे आभास कार्यरत होत असतात. (येथे शैवदर्शनाच्या प्रसिद्ध प्रक्रियेचा केवळ संकेत केलेला आहे. विशेष माहितीसाठी **"ईश्वर-प्रत्यभिज्ञेचा"** ज्ञानाधिकार पाहावा.) इंद्रिय आणि भाव यांचा संयोग होण्याच्या प्राथमिक क्षणाच्या आभासाला **"विकल्पहीन आभास"** असे म्हणतात. दुसऱ्या क्षणी त्याच भावाशी संबंधित असलेल्या वैशिष्ट्यांना स्पष्ट रूपात परिलक्षित करणाऱ्या आभासाला **"सविकल्प आभास"** असे म्हणतात. या दोहोंमधील पहिला आभास हा इतका स्वरूप संकुचित असतो की, त्या आभासाच्या वीजेप्रमाणे तीव्रतम लखलखाटामुळे त्या भावामध्ये सामान्य रूपामध्ये असणाऱ्या स्वरूपसत्तेव्यतिरिक्त कोणतीही

अन्य जाती, गुण, क्रिया आणि यदृच्छात्मक वैशिष्ट्य परिलक्षित होत नाही अर्थात् आढळून येत नाही. या आभासालाच शास्त्रीय शब्दामध्ये **"प्रथमाभास", "स्वरूपाभास", "निर्विकल्पाभास"** अथवा **"स्वलक्षणाभास"** इत्यादि म्हणतात. दुसरा आभास हा अनेक आभासांचे मिश्रण असलेला स्थूल अभिलापाच्या अर्थात् स्थूल शब्दाद्वारा वाच्य असतो अर्थात् सांगितला जातो. उदाहरणार्थ प्रथमाभासावर "घट" नामक भावाचा साक्षात्कार हा गोलाई, लालवर्ण इत्यादि अनेक विकल्पांनी युक्त घटाच्या रूपामध्ये होत नाही तर सामान्य प्रकाशात्मतेच्या रूपामध्ये भावाचा साक्षात्कार होत असतो. दुसऱ्या क्षणामध्ये अर्थात् प्रथमाभासाच्या बरोबर अनंतरवर्ती अर्थात् नंतर सविकल्पाभासावरच या सर्व आभासांच्या मिश्रणामुळे त्याचा साक्षात्कार विशिष्ट नामरूपात्मक घटाच्या रूपामध्ये होत असतो. अशाच संवेदनात्मक आभास प्रक्रियेच्या द्वारा घटाभास, पटाभास, सुखाभास, दुःखाभास इत्यादि अनंत प्रकारच्या विकल्परूप आभासांच्या वैचित्र्याची निर्मिती होत असते. या आभास वैचित्र्यांनाच **"प्रमेय जगत्"** असे म्हणतात.

थोडक्यात असे म्हणणे योग्य आहे की, प्रथमाभासाच्या भूमिकेवर सर्व भाव हे सामान्य स्पंदरूप अथवा चिद्रूपच असतात. यामुळे विशुद्ध अहंरूप हीच या भावाची संवेदना आहे. सविकल्प आभासाच्या भूमिकेमध्ये सर्व भाव हे एकमेकांपासून स्वरूपतः, देशतः, कालतः आणि आकारतः भिन्न असल्यामुळे विकल्परूप असतात. यामुळे "इदंरूप" हे या भावांचे संवेदन आहे.

संसाराची प्रत्येक अर्थक्रिया ही सविकल्प आभासावरच चालू शकते; कारण यासाठी भावाची भिन्नता असणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणाशी संबंधित असलेले मितसिद्धींचे हे प्रदर्शन ही बाह्य अर्थक्रिया असल्यामुळे केवळ सविकल्प आभासच आहे. यामुळे हा संसारभावच आहे, श्रीशिवभाव नाही.

प्रथमाभासावर संसाराच्या अणूअणूमध्ये स्वरूपाची अभिव्यक्ती ही प्रतिक्षण होत असली तरीही ही स्वरूपाची अभिव्यक्ती सामान्य इंद्रियांच्या साहाय्याने जाणून घेता येत नाही. योग्यांमध्ये अदृश्य प्रेरणेमुळे अतींद्रिय बोध किंवा प्रातिभज्ञान विकसित झालेले असते. यामुळे असे योगी प्रथमाभासावरच स्वरूपाचा साक्षात्कार करून घेण्यास सक्षम किंवा समर्थ

असतात. परिणामतः असे योगी प्रतिक्षण प्रथमाभासावर अवस्थित राहिल्यामुळे प्रत्येक भावामध्ये व्याप्त स्वरूपाचा साक्षात्कार करून घेण्याच्या तीव्र इच्छेला सूत्रामध्ये "दिदृक्षा" असे नाव दिलेले आहे. हीच ती पूर्वी वर्णिलेली संकल्पशक्ती असून ती साधकाला स्वयं शाक्तभूमिकेवर पोहोचवीत असते.

या संबंधामध्ये अनेक मित्रांना अशी अडचण आहे की, जर योगी नेहमी निर्विकल्प आभासावरच स्थित राहत असतात तर असे योगी संसारामधील आदानप्रदान अर्थात् देवाणघेवाण कशा प्रकारे करू शकतात? संसारामध्ये आढळून येणारी भाववैचित्र्याची अनुभूती ही योग्यांना होत नसते. यामुळे असे योगी संवेदनाहीन खुंट्याप्रमाणे पडून राहत असावेत.

या शंकेचे समाधान प्राप्त करून घेण्यासाठी हे समजून घेणे आवश्यक आहे की, प्रथमाभासावर स्थित राहणे याचा अर्थ असा नाही की, योग्यांना व्यक्त नामरूपात्मक जगताचे भाववैचित्र्य दिसतच नसते. असे योगी आपल्या प्रातिभज्ञानाच्या द्वारा बाह्य प्रकृतीच्या भाववैचित्र्याचे जितके सूक्ष्म व गंभीर निरीक्षण करू शकतात तितके सामान्यरूपामध्ये कुशाग्रबुद्धीचा समजला जाणारा पुरुषही करू शकत नाही. गोष्ट केवळ इतकीच आहे की, हे योगी भाववैचित्र्याच्या ज्या ज्या पक्षाचा साक्षात्कार करून घेत असतात ते भाववैचित्र्य त्या योग्यांना आत्मरूपाच्या केवळ विकासाच्या रूपामध्ये प्रतीत होत असते. फलतः असे योगी कोणत्याही अवस्थेमध्ये अखंड स्वरूपभावनेमध्ये पडून भेदभावनेच्या गोंधळाची शिकार बनत नाहीत. प्रथमाभासावर स्थित राहण्याचा खरा अर्थ हाच आहे.।।४३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

या कारिकेत ग्रंथकार असे म्हणतात की, जे उन्मेषयुक्त स्वभावामध्ये देहाची प्रमातृता बुडवितात त्यांना त्या देहामध्येच परप्रमातृता अर्थात् अनुभवत्वाची उच्च अवस्था प्राप्त होते.

**स्पष्टीकरण :-** ज्याप्रमाणे पश्यंतिरूप विचाररहितत्व पाहण्याच्या इच्छेच्या वेळेस पाहण्याची इच्छा केलेली वस्तू अंतरभेदाने अर्थात् अंतर्गत स्वत्वाने स्फुरण पावते त्याचप्रमाणे **"स्वच्छंदतंत्र"** या ग्रंथात सांगितलेल्या मार्गांच्या प्रक्रियेत धरादि श्रीशिवापर्यंत सर्व पदार्थांना व्याप्त करून हे सर्व

मीच आहे (अशी अनुभूती येते. ही अनुभूती) ज्याप्रमाणे श्रीसदाशिव या सर्वांना व्यापून आहे (त्याप्रमाणे सर्वव्यापक आहे.) अशा स्वविकल्पाच्या (स्व-विचाराच्या) अनुसंधानाने युक्त होऊन साधकयोगी अभेदज्ञानाने अंतःकरण आच्छादून स्थिर राहतो किंवा तिच्या प्राप्तीने (सिद्धीच्या) विचलित होत नाही; तोपर्यंत सर्व वेद्य (ज्ञेय विषय) एकरूप करण्याने जागृत होणारे व सर्व ज्ञेय वस्तूंना गिळून टाकणाऱ्या महाप्रमातृत्वामध्ये समावेश करणारे चमत्काररूप जे फल ते तो स्वतःच उपभोगतो अर्थात् तो स्वसंविद्‌च होऊन जातो. येथे अधिक बोलण्याचा काय उपयोग?।।४३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

**"दिदृक्षयेव .....।।४३।।"** या कारिकेत ग्रंथकार उन्मेषाचा साक्षात्कार करून घेणाऱ्या योग्याला विश्वरूपता देणाऱ्या समस्त प्रकरणाचे तात्पर्य दाखवितात. ज्या वेळेला साधक सर्व पदार्थांना अर्थात् प्रमेयरूप पदार्थांना इष्ट प्रकाराने स्वसंवित्प्रकाशाने त्यामधील अंतर्हितत्व संपादून स्थित राहतो आणि भेददर्शनाच्या भ्रांतीचा निरास झाल्याने अर्थात् अभेदतत्त्वाचे ज्ञान झाल्याने एकाच तत्त्वात विश्राम करतो. त्या अवस्थेत त्या योग्याला जे फल अनुभवावयास मिळते त्या बद्दल जास्त काय बोलावे? त्या फलाचे निरूपण करण्याच्या इच्छेने प्रवृत्त झालेली हजारो ग्रंथांमधली वाक्येही निरर्थक ठरतात. ते फल वाचेला अगोचर अर्थात् न समजणारे असल्याने ते स्वतःच्या आत्म्यानेच अनुभविले जाते.।।४३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**प्रबुद्धः सर्वदा तिष्ठेज्ज्ञानेनालोच्य गोचरम्।**
**एकत्रारोपेयत् सर्वं ततोऽन्येन न पीड्यते।।४४।।**

**अन्वयार्थ :-**

**प्रबुद्धः** - नेहमी जागरूक असलेला, प्रबुद्धावस्थेतील योगी, योग्याने, **सर्वदा** - नेहमी, जागृती, स्वप्न व सुषुप्ती या अवस्थांत, अथवा अनुभवाच्या आदि, मध्य व अंत या सर्व दशांत, **गोचरम्** - इंद्रियगोचर असे सर्व विषय, **ज्ञानेन** - आपल्या ज्ञानशक्तीच्या द्वारा, **आलोच्य** - (ज्ञेय विषयांचे) विश्लेषण करून, त्यांचे वास्तव्य स्वरूप, स्पंदरूपत्व, निश्चित करून, **तिष्ठेत्** - (सावधान) असावे, **सर्वम्** - हे सर्व गोचर विषय, **एकत्र** -

एका तत्त्वात, शुद्ध स्पंदतत्त्वात, "ज्ञाता जो आत्मा त्याच्या ठिकाणी" (श्रीरामकंठ), **आरोपयेत् :-** आरोपण करावे, लय करावा, अर्पण करावे, आत्मतत्त्वापेक्षा ते भिन्न नाहीत असे जाणावे - (श्रीरामकंठ), **ततः** - तसे केल्याने, **अन्येन** - दुसऱ्याकडून, "कला-समूहाकडून" (श्रीभट्टकल्लट), **न पीड्यते** - त्याला त्रास होत नाही. ।।४४।।

**अर्थ :-** जागृत असलेल्या अर्थात् प्रबुद्धावस्थेतील योग्याने सर्वदा अर्थात् जागृती, स्वप्न व सुषुप्ती या अथवा अनुभवाच्या आदि, मध्य व अंत या सर्व अवस्थांमध्ये इंद्रियगोचर अर्थात् इंद्रियांनी जाणता येणारे सर्व विषय आपल्या ज्ञानशक्तीच्या द्वारा विश्लेषित करून अर्थात् स्पंदतत्त्व हे प्रत्येक विषयाचे खरे रूप आहे हे जाणून घेऊन सावधान राहावे. योग्याने या सर्व गोचर विषयांचा एका तत्त्वात अर्थात् शुद्ध स्पंदतत्त्वात ज्ञाता जो आत्मा त्याच्या ठिकाणी लय करावा किंवा त्याला अर्पण करावेत अर्थात् सर्व विषयस्पंद आत्मतत्त्वापेक्षा भिन्न नाहीत असे जाणावे. जर साधक-योग्याने असे केले तर त्याला दुसऱ्या कोणाकडूनही कसलाही त्रास होत नाही किंवा दुसरा कोणी त्रास देऊ शकत नाही.।।४४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

सर्वावस्थांमध्ये व सर्वस्थितींमध्ये श्रीपरमशिवाचा आपला अभ्यास जागृत ठेवल्यास म्हणजे सर्व ठिकाणी श्रीपरमशिवच आहे अशी वृत्ती सतत ठेवल्यास साधकाला मुक्त दशेचा अनुभव येतो. हा अभ्यास कसा करावयाचा? ज्या ज्या इंद्रियांनी ज्या ज्या विषयांचे ग्रहण होईल त्या त्या क्षणी विषय नाहीतच, परमात्मा आहे, अशा निश्चयाने त्या पदार्थांकडे पाहावे. मी ज्ञानस्वरूप आहे व पदार्थही ज्ञानस्वरूप आहेत अशी भावना सतत जागृत ठेवली पाहिजे. असा हा अभ्यासाचा क्रम आहे. असा अभ्यास केल्यास द्वैताची, इंदतेच्या भासापासून होणाऱ्या किंचिज्ज्ञत्वाची, किंचित् कर्तृत्वाची, दारिद्र्याची व मी देह आहे अशा प्रकारच्या जाणीवे-पासून अहं ममतेच्या पाशाचे हे लचांड त्याला बाधू शकणार नाही. चक्षुरादि इंद्रियांनी आपल्याला ज्या ज्या पदार्थांचे ज्ञान होत असते त्या त्या संबंधी आपला निश्चय होत असतो. त्या त्यावेळी आपण परमात्मस्वरूप बनत असतो. वरील प्रकारे निश्चय होणे म्हणजे त्या क्षणीच परमेश्वरस्वरूप बनणे आहे. ज्या ज्यावेळी ज्या ज्या वस्तूंचा निश्चय होत असतो त्या

त्यावेळी ती ती वस्तू परब्रह्मरूप बनत असते. अर्थात् ग्राह्य वस्तू, ग्राहक व ग्रहण करण्याचा संबंध ही त्रिपुटी सर्व परब्रह्मस्वरूपच असते. जर अशा रीतीने विचार केला तर अनेकत्वाचा विचार करणारी माया आपल्यावर मोहजाल टाकून इतर प्राणिमात्रांप्रमाणे आपल्याला बांधून संसारात टाकील म्हणून सर्व अवस्थांमध्ये एकसारखा न विसरता हा विवेक जागृत ठेवावा. त्यामुळे सर्व ठिकाणी परमात्मा आहे असा अनुभव आपल्याला येऊन आपण संसारचक्रात पडणार नाही. प्रबुद्ध म्हणजेच मी श्रीपरमशिव आहे अशी भावना करणारा स्वतः परमात्मा हा एकच पदार्थ आहे असे असून तोच प्रत्येक प्राणिमात्राच्या ठिकाणी भेदरूपाने स्वतःला भासमान करीत असतो. परमात्म्याखेरीज दुसरा पदार्थच या जगात नाही हे खरे सत्य आहे. तथापि जीवांना जे अनेकत्व अनुभवास येते त्याला कारण श्रीपरमशिवांच्या शक्तीचा खेळ होय.

आपल्या शक्तीचा संकोच न करता प्रबुद्धाने निर्विकल्प व नेहमी उद्युक्त म्हणजे सावधान राहावे. ज्ञानाच्या समोर जो जो विषय उपस्थित होईल त्याला पाहून संविताच्या दीप्तीने ज्ञेयाचा लोप करून त्यांना अविभागात म्हणजे मूळ तत्त्वात प्रतिष्ठित करावे. मग त्याला दुसरा कोणीही त्रास देऊ शकत नाही.

"**भोगमोक्षप्रदीपिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "अविभाग बोधाच्या अग्नीने विभागाला नाहीसे करून वेद्यपीयूष प्राशन करावे. मग तो योगी अगदी लवकर तृप्त व निरोगी बनून एकाकी विचरण करू लागतो. हे क्रमार्थाचे सार व शक्तींच्या पराधारेची भूमिका आहे." त्याच्याच अनुज्ञेने सच्छिष्यांच्या ज्ञानाकरिता याचे वर्णन केले; कारण ही पराधारेची भूमिका निर्विभाग आहे. शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "देश, काल, क्रिया व आकार या चारही गोष्टी विभागामुळे किंवा त्या हेतूमुळे प्रसिद्ध आहेत. ज्यामध्ये व ज्या ठिकाणी या चार गोष्टी असत नाहीत तेथे विभागाचे कोणतेही कारण असत नाही. **विषयासहित मन भस्म करावयाचे आहे. ज्यावेळी शक्तिपात होऊन कुंडलिनीशक्ती जागृत होते त्यावेळी प्रदीप्त होणारा ज्ञानाग्नी आपल्या दृष्टीने विषय व मन या दोन्ही गोष्टी भस्म करतो. या गोष्टींचे भस्म झाले की, अंतर्मुखता व बहिर्मुखता या दोन्ही गोष्टी समाधिस्थ होतात. त्याचप्रमाणे विज्ञानाचा वडवाग्नी प्रदीप्त होऊन तो आपल्या शक्तीने ज्ञेय अशा विषयरूप**

**समुद्राचा निरंतर ग्रास करीत राहतो. जागृत शक्तीच्या अग्नीशिवाय विषयरूप समुद्र प्राशन करण्यास कोणीही समर्थ असत नाही. पाणी मिळाले नाही तर तहान वाढत नाही व पुष्कळसे पाणी मिळाल्यावर तृप्ती किंवा कृतकृत्यता होत नाही. हे ज्ञान हा एक अशा प्रकारचा विलक्षण वडवाग्नी आहे.**

**"यस्मात्सर्वमयो जीवः"** याच्या व्याख्येत या विषयांचे सयुक्तिक वर्णन आपण वाचलेले आहे. हे सर्व कथन करण्याचा अभिप्राय हा आहे की विद्यात्मक ज्ञानस्वरूप हाच स्वभाव आहे. यासाठी संपूर्ण ज्ञेय त्याच्याशी एकरूप केले पाहिजे. अशा रीतीने ऐक्य झाले की, दुसऱ्या कलात्मक विकल्परूप शक्ती पुन्हा कोणत्याही प्रकारची पीडा किंवा बाधा देऊ शकत नाहीत. अर्थात् या विकल्परूप शक्ती साधकाला स्वस्वरूपापासून च्युत करू शकत नाहीत. याबाबत शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "आकाश एक व व्यापक आहे. भिंत, घट इत्यादींच्या संयोगाने त्याचे आतील व बाहेरील असे भेद दृष्टीस पडतात. याच प्रकारे पशुपती तत्त्वज्ञ, ग्राह्य व ग्राहकाला एकरूपच पाहतो. आपल्या समाधी स्वरूपात विक्षेप्य व विक्षेपक आणि व्याक्षिप्त व व्याक्षेप्याचा कोणताही भेद असत नाही."

असा प्रबुद्ध पती दुसऱ्या कोणाकडूनही पीडित होत नाही. या विवेचनावरून हा अभिप्राय आपोआप स्पष्ट झाला की, जो अप्रबुद्ध पशू आहे तो पुनःपुन्हा संसारात मार खात राहतो. याचे लक्षण पुढील कारिकेत सांगितले आहे.।।४४।।

❋❋❋❋❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** चक्षुरादिकांनी ग्रहण केलेल्या विषयांचा आपण निश्चय करतो तेव्हा निश्चयावस्थेत ते विषय प्रमातृरूपाहून भिन्न नसतातच. कोणत्याहि वस्तूचा निश्चय करणे म्हणजे त्या वस्तूला प्रकाशमान करणे आणि प्रकाशमानता हा ज्ञातृधर्मच आहे. तेव्हा त्या दोहोत भेद कसा होणार? वेद्य वस्तू प्रकाशमानतेहून भिन्न आहे असे मानताच येणार नाही; कारण वेद्यता म्हणजे प्रकाशमानताच होय. त्यामुळे निश्चयावस्थेत प्रकाशमानतारूप ज्ञातृधर्माशी सर्वभावांचा अभेदच असतो. लौकिकातील ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान हे भेद या अलौकिक भूमीवरील अभिन्नप्रत्ययात विलीन

होतात व प्रबुद्धाची एकघनसंवितेतच विश्रांती होते.[१] ।।४४।।

**टीप १ :-** रसास्वादाची भूमी अशी अलौकिकच आहे म्हणूनच रस हा ज्ञाप्य नाही किंवा कार्य नाही. तो चर्वणीय किंवा आस्वाद्य म्हणजे स्वसंवेद्यच आहे असे म्हटले जाते.

❋ ❋ ❋ ❋ ❋

## श्रीभट्टकल्लट वृत्ती :-

### अनुभूती प्राप्त करून घेण्याचा उपाय

सूत्र क्रमांक ४४ मध्ये प्रबुद्ध योग्यांच्या प्रत्येक भावामध्ये स्वरूपाची अनुभूती प्राप्त करून घेण्याचा उपाय समजाविण्यात येत आहे.

**वृत्ती :-** योग्याने विशुद्ध अर्थात् शुद्धतम संवेदनाच्या द्वारा प्रत्येक ज्ञेय अर्थात् जाणून घेण्यास आवश्यक असलेल्या विषयाची विश्लेषणा करून प्रतिक्षण प्रबुद्ध अर्थात् स्वरूपाच्या विकासाच्या अवस्थेमध्ये स्थित राहणे आवश्यक आहे. (येथे "प्रतिक्षण" या शब्दाचा "ज्ञेयविषयाची आदिकोटी, मध्यकोटी आणि अनंतकोटी या तीन अनुभवदशा" असा अर्थ आहे.) योग्याने अशा प्रकारे भावनेच्या बळाने प्रत्येक विषयाला एकाच तत्त्वाच्या सद्भावावर अर्थात् शुद्ध विद्यात्मक स्पंदसत्तेवर चढवावे अर्थात् प्रत्येक विषय हा शुद्ध विद्यात्मक सत्तेशी अभिन्न मानावा. असे केल्याने त्या विषयाला दुसऱ्या अर्थात् पुढे वर्णिल्या गेलेल्या कलासमूहाच्या द्वारा पीडा किंवा त्रास दिला जात नाही.।।४४।।

**विवरण :-** सूत्र क्रमांक ४४ मधील **"प्रबुद्धः"** आणि **"सर्वदा"** या दोन शब्दांना विशेष अर्थ आहे. यांचे अर्थ समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे; कारण तेव्हाच या सूत्राचा अर्थ चांगल्या प्रकारे अवगत करून घेता येतो.

**प्रबुद्ध :-** या शब्दाने येथे कोणत्याही ज्ञेय विषयाचा साक्षात्कार होत असताना त्याच्या (त्या विषयाच्या) वास्तविक स्वरूपभूत स्पंदतत्त्वाला ओळखण्यास निष्णात अशा दिव्यदृष्टीचा योगी अभिप्रेत (अपेक्षित) आहे. या दृष्टीने **"स्पंदकारिका"** ❋४.१४❋ मधील **"अनिमीलिन-सम्यग्ज्ञानदृष्टिः जाग्रदेव"** या पदाचे विवरण पाहावे.

याबरोबरच तो सावधान आणि जागृत योगी हा असा प्रमाता किंवा ज्ञाता असणे आवश्यक आहे की, ज्याला आपल्या स्वातंत्र्याच्या असीमतेचा

अनुभव प्राप्त झालेला आहे. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथातील २.९।। सूत्राच्या टिपणीत असे म्हटले आहे की, "**असङ्कुचित-स्वातन्त्र्यशक्तिः।** याचा अर्थ असा आहे की, स्वातंत्र्यशक्ती ही असंकुचित अर्थात् असीम आहे.

कोणत्याही ज्ञेयविषयाच्या साक्षात्कारकाळातील तीन कोटी हा "**सर्वदा**" या शब्दाचा अर्थ आहे. कोणत्याही ज्ञेयविषयाच्या साक्षात्काराच्या तीन कोटी असून या कोटींना पारिभाषिक शब्दांमध्ये आदिकोटी, मध्यकोटी आणि अंतकोटी असे म्हणतात. यांनाच दुसऱ्या शब्दामध्ये बाह्य इंद्रियांच्या द्वारा ग्रहण केले जाण्याआधीचा तद्विषयक "**इच्छाकाल**", इंद्रियांच्या द्वारा बाह्य स्थूल रूपामध्ये "**ग्रहणकाल**" आणि ग्रहण केल्यानंतरही संवेदनामध्ये "**विश्रांतिकाल**" असे म्हणतात. आदिकोटी आणि अंतकोटी यावर प्रत्येक विषय हा अहंविमर्शात्मक अर्थात् अहंस्फुरणात्मक प्रमातृ-भावाबरोबर तादात्म्यरूपामध्ये अवस्थित राहत असतो. ज्ञेयविषयक मध्यकोटी अर्थात् बाह्य इंद्रियांच्या द्वारा स्थूलरूपामध्ये ग्रहण करतेवेळी मायाशक्तीच्या द्वारा अहंरूपतेपासून वेगळा होऊन इदंच्या द्वारा वाच्य स्थूल पांचभौतिक रूपामध्ये स्थिती प्राप्त करून घेत असतो. शब्द, स्पर्श आदि विषयांच्या याच रूपाला "**संसारभाव**" असे म्हटले जाते; कारण हेच रूप परिवर्तनशील अर्थात् परिवर्तन होणारे असे असते.

सामान्य रूपामध्ये संसारी पशू हे ज्ञेयविषयांच्या आदिकोटी व अंतकोटी या रूपांशी परिचित असत नाहीत; कारण या संबंधी पशूंना किंवा जीवांना आपल्या स्वरूपाची ओळख झालेली नसते. वरून किंवा बाह्यतः हे संसारी जीव त्यांच्या मध्यकोटीच्या स्थूल आणि परिवर्तनशील रूपालाच त्यांचे खरे रूप समजत असतात व या प्रमादामध्ये पडलेले असतात. ही एक अत्यंत मोठी विडंबना आहे. यामुळे सूत्रकारांनी वर निर्देश केलेल्या "**प्रबुद्ध**" आणि "**सर्वदा**" या शब्दांचा प्रयोग करून सम्यक् ज्ञानदृष्टीने युक्त असलेल्या योग्यांना साक्षात्काराच्या तीन कोटींवरील ज्ञेय विषयांच्या खऱ्या स्वरूपाला नजरेसमोर ठेवण्याचा उपदेश दिलेला आहे.

याशिवाय या सूत्रामध्ये असा उपाय सुचविला आहे की, ज्याचा स्वीकार केला असता योगिजन हे प्रत्येक प्रकारच्या अनुभवदशेमध्ये केवळ स्वरूपाभासावरच स्थित राहण्याची क्षमता प्राप्त करून घेत असतात. आपल्या सद्विचाराच्या द्वारा प्रत्येक ज्ञेयविषयाच्या स्वरूपाचे विश्लेषण

करून त्या विषयाच्या स्वरूपाचे खरे रूप जाणून घेणे हा क्षमता प्राप्त करून घेण्याचा उपाय आहे. याचे उदाहरण म्हणून घटाचे स्वरूपविश्लेषण केले असता या घटाचा स्थूल आकार, उंची, रुंदी इत्यादि घटक हे खरे स्वरूप बनू शकत नाहीत हे जाणण्यास वेळ लागत नाही; कारण हे सर्व घटक कल्पित, परिवर्तनशील आणि नश्वर आहेत. यामुळे हे सर्व दूर करून बाकी जे काही शिल्लक राहते ते या घटाचे संवेदनात्मक रूप आहे. या दृष्टीने **"भारतीय दर्शन"** या ग्रंथाच्या प्रथम भागात असे म्हटले आहे की -

**चिता सिद्धं यत्तु न सदचिदिति वक्तुं समुचितम्।**
**तयासिद्धं नाचिन्नचिदपि कदाचित् क्वचिदपि।**
**चितो द्वारैः सिद्धं यदपि च समस्तं तदपि चित्।।**

याचा अर्थ असा आहे की संवेदनात्मक रूप हे चित्कलेच्या अहंविमर्शमयी अर्थात् स्पंदनेव्यतिरिक्त अन्य काहीही नाही. अशा प्रकारे स्वरूप-विश्लेषणात्मक पद्धतीचा अभ्यास करणाऱ्या योग्यांना एखाद्या क्षणी स्वयं "संपूर्ण विश्व हे प्रत्यक्षात् स्वरूपस्पंदना आहे" अशी अनुभूती होत असते.

भगवान् श्रीआशुतोषांनी याच सिद्धान्ताला आपल्या सूत्रात्मक भाषेमध्ये असे समजाविलेले आहे की, **"ज्ञानमन्नम्। श्रीशिवसूत्र २.९।।"** जागृत आणि सत्तर्क योगी हे प्रत्येक अनुभवदशेमध्ये अन्यथा उपपत्तिरूप अर्थात् अज्ञानात्मक ज्ञानाचे अन्न खात राहतात. याचाच अर्थ असा आहे की, योगी हे प्रत्येक भावावर चढलेल्या तथाकथित प्रमेयाच्या काळीम्याला स्वरूपविश्लेषणात्मक अनुसंधानाच्या कसोटीवर घासून घासून त्याच्या खऱ्या निर्मळ स्वरूपाचा साक्षात्कार करून घेऊनच शांत होत असतात. अशा योग्यांसाठी तथाकथित जन्ममरण अथवा संसारामधील द्वंद्वात्मकतेचे जोखड (बंधन) किंवा तंटा शिल्लक राहत नाही. या दृष्टीने **"श्रीशिवसूत्रविमर्शिनी"** या टीकाग्रंथात श्रीक्षेमराज यांनी **"भर्गशिखा"** या ग्रंथातील श्लोक उद्धृत करून असे म्हटले आहे की -

**मृत्युञ्च कालञ्च कलाकलापं विकारजालं प्रतिपत्तिसात्म्यम्।**
**ऐकात्म्यनानात्म्यवितर्कजातं तदा स सर्वं कवलीकरोति।।**
**।। शिवसूत्र १.६।।**

**अर्थ :-** त्यानंतर तो योगी (विश्वसंहाराच्या वेळेला) मृत्यू, काळ, कलासमूह, विकारांचे जाळे, आत्म्यासहित ज्ञान, ऐकात्म्य व नानात्म्य या विकल्पातून जन्माला येणाऱ्या गोष्टी इत्यादि सर्वांचा घास करतो. ।।४४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

या कारिकेत अनुप्रवेश प्रक्रियेचा उपसंहार करण्यासाठी हे स्पंदतत्त्व अनेक प्रमेयांनी (ज्ञेयविषयांनी) भिन्न होत असल्याने ज्यांना उपदेश करावयाचा आहे त्यांना आठवण करून देणारे ग्रंथकार त्याची प्राप्ती सतत होत असते अशी प्रतिज्ञा करून त्यानंतर उपपन्न केलेल्या उपायांचे परिशीलन करणाऱ्या सुप्रबुद्धाला सतत स्पंदतत्त्वामध्ये प्रवेश मिळतो असे सांगतात.

**स्पष्टीकरण :-** प्रबुद्ध योग्याने नेहमीच म्हणजेच जाग्रत्, स्वप्न आणि सुषुप्तीच्या आणि संवेदनेच्या आदि, मध्य आणि शेवटी या वेळेला सावध राहिले पाहिजे. अर्थातच जागृत स्पंदतत्त्व हा जिचा आधार आहे अशा दिव्यदृष्टीसह सुप्रबुद्धतेची आराधना केली पाहिजे. ही आराधना कशा प्रकारे करावी? ज्ञानाने म्हणजे बहिर्मुख प्रकटीकरणाने सर्व दृष्टीला दिसणारे अथवा तिचा विषय होणारे नीलसुखादिरूप विषय पाहून **"तस्माच्छब्दार्थचिन्तासु न सावस्था न यः शिवः"** अर्थात् "त्यामुळे शब्द आणि अर्थ यांच्या विचारामध्ये अशी कोणतीच अवस्था नाही की जी श्रीशिव नाही," अशा प्रकारे विचार करून एकाच सृष्टी करणाऱ्या श्रीशंकरात्मक स्वभावात सर्वांचा आरोप करावा अथवा त्यालाच सर्व गोष्टींचा कर्ता मानावे. त्या स्वभावाला निमीलन आणि उन्मीलन या दशांमध्ये अभेदाने (म्हणजेच हा श्रीशंकरात्मक स्वभाव म्हणजे मीच आहे अशा प्रकारे) जाणावे. याचा अर्थ असा आहे की, पहिल्या आणि शेवटचा दृढ आधार असल्यामुळे मध्य अवस्थेलाही चिद्रसाचे वस्तुरूप म्हणूनच पाहावे. अशा प्रकारे तो साधक कोणत्याही इतर वस्तूने बाधित होणार नाही; कारण त्याने सर्वांमध्ये आत्म्याचा स्वीकार केलेला आहे.

यासंबंधी **श्रीप्रत्यभिज्ञाकारांनी** असे म्हटले आहे की -

**योऽविकल्पमिदमर्थमण्डलं पश्यतीश निखिलं भवद्वपुः ।**
**स्वात्मपक्षपरिपूरिते जगत्यस्य नित्यसुखिनः कुतो भयम् ।।**
**।। उ.स्तो. १३।१६।।**

**अर्थ :-** हे ईश्वरा! जो हे अखिल वस्तुयुक्त जगत् तुझ्या शरीराने बनलेले किंवा तुझेच शरीर आहे अशा निःसंशय दृष्टीने पाहतो त्या नित्य सुखी असणाऱ्या साधकाला या स्वात्मपक्षीयांनी अर्थात् बांधवांनी भरलेल्या जगात कोणाकडून बरे भय असणार?।।४४।।

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

या आधीच्या कारिकेत सांगितलेल्या गोष्टी अधिक दृढ करण्यासाठी ग्रंथकार "**प्रबुद्धः सर्वदा .....।।४४।।**" या कारिकेत निरूपण करतात. प्रबुद्ध योगी संवेदनात्मक ज्ञानाने विषयापासून उत्पन्न होणारे त्याचे (पदार्थाचे) स्वरूप निश्चित करून सर्व अनुभवांच्या अवस्थांमध्ये स्वतःला एका संवित्प्रकाश ज्ञातृरूप अशा आत्म्यात समर्पित करतो. त्याच्याकडून अखिलप्रमेयजात अर्थात् ज्ञेय विषय स्वतःपासून अभिन्न आहेत असे जाणले जाते. समग्र भावांच्या (पदार्थांच्या) प्रमात्याच्या स्वरूपाहून अभिन्न असलेल्या प्रतिपत्तिरूपारोपामुळे सांसारिकभावसमूहाने म्हणजेच संसारातील पदार्थांच्या समूहाने तो त्रास करून घेत नाही. परिवर्तन होणाऱ्या शरीरादि पदार्थांना अहंभावादिरूपपाशांनी संसारचक्रामध्ये टाकून तो कदर्थी अर्थात् दुःखी होत नाही. अभेददर्शी योग्यांना कोणापासूनच भय नसते. जो "स्व" पासून अतिरिक्त वस्तुतत्त्व (ब्रह्म) आहे असे (समजून) पाहतो त्यालाच भय असते. "**द्वितीयाद्वै भयं भवति।**" अर्थात् दुसऱ्यामुळे (द्वैतामुळे) भय उत्पन्न होते अशी श्रुती ह्याला प्रमाण आहे.।।४४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**शब्दराशिसमुत्थस्य शक्तिवर्गस्य भोग्यताम्।**
**कलाविलुप्तविभवो गतः सन् स पशुः स्मृतः।।४५।।**

**अन्वयार्थ :-**

**सः -** तो, आत्मा, **कलाविलुप्तविभवः -** कलांनी ज्याचे अनियंत्रित स्वातंत्र्यरूपी वैभव नाहीसे केले आहे व त्यामुळे जो स्वतःच्या मूळ स्वरूपापासून - "स्वभावा"पासून - च्युत झाला आहे, (स्पन्दप्रदीपिका) **शब्दराशिमुत्थस्य शक्तिवर्गस्यः -** "अ"- कारापासून "क्ष" कारापर्यंत जो वर्णसमुदाय आहे ती "शब्दराशी". या शब्दराशीतील क-वर्ग वगैरेंच्या ब्राह्मी इत्यादि देवता, यांना "कला" म्हणतात. तेव्हा अ पासून क्ष पर्यंतच्या शब्दराशीपासून निर्माण होणाऱ्या ब्राह्मी, माहेश्वरी इत्यादि ज्या

देवता-शक्ती किंवा "कला" यांच्या समूहाच्या, **भोग्यतां गतः सन्** - भोग्यतेप्रत - ताब्यात गेला असता, **स पशुः स्मृतः** - तो "पशू" मानला.।।४५।।

**अर्थ :-** शब्दराशीपासून अर्थात् "अ" कारापासून "क्ष" कारापर्यंतच्या वर्णसमुदायापासून निर्माण होणाऱ्या श्रीब्राह्मी, श्रीमाहेश्वरी इत्यादि देवतासमूहाच्या वशीभूत असलेल्या स्वतंत्र पतिप्रमात्याला किंवा परमेश्वराला किंवा श्रीशिवालाच "पशुप्रमाता" अर्थात् जीव असे नाव दिलेले आहे. पशुप्रमाता या कलासमूहाला वश होण्यामागील कारण असे आहे की, कलासमूहाने परमेश्वराच्या असीम वैभवाला किंवा स्वातंत्र्याला पूर्णपणे नष्ट-भ्रष्ट केलेले आहे.।।४५।।

❋❋❋❋❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका:-**

परमात्मस्वरूप सर्व व्यापून राहिलेले एकतत्त्व आहे. परंतु जीवाच्या सर्व वृत्ती पराधीन झाल्यामुळे त्याला आत्मस्थितीचे भान राहत नाही, जनावराप्रमाणेच त्याची स्थिती असते. त्यामुळे त्याला पशू असे नाव आहे. संसाररूपी क्रीडेचा प्रकार हा अनादि कालापासून सुरू आहे. ज्याच्या सर्व वृत्ती संसाराच्या ताब्यात कायमच्या जातात तो कायमचा पशू होतो. शक्तिवर्गाच्या ब्राह्म्यादि अष्ट मातृकांपासून "अ" ते "क्ष" वर्ण निघाले आहेत. त्यांच्यापासून शब्दांच्या राशी निर्माण झाल्या आहेत. या ब्रह्मादि अष्ट मातृका जीवाला आत्मस्वरूपापासून भ्रष्ट करतात त्यामुळे तो त्यांच्या तडाख्यात सापडतो. श्रीब्राह्म्यादि अष्ट मातृका जीवाचे सर्वव्यापकत्व सोडून देऊन किंचिज्ज्ञत्व प्राप्त करून देतात म्हणून हा जीव त्या देवतेच्या ताब्यात सापडतो, मलांनी बद्ध होतो व क्लेश कर्मामध्ये रत होतो. यासाठीच जीवाला पशू म्हणतात. जीवाची द्वैतग्रंथी जोपर्यंत कायम असते तोपर्यंत त्याचे कर्मबंधन सुटत नाही. ही पशुदशा शक्तिपाताशिवाय अन्य कोणत्याही प्रयत्नाने सुटत नाही व जीवाला मुक्तिदशा किंवा पूर्ण स्वातंत्र्य मिळत नाही.

वर्णसमूहच शब्दराशी आहेत. सर्व शक्ती वर्णात्मक असल्याने "अ" कारापासून "क्ष" कारापर्यंतच्या मातृका शब्दजननी ठरतात. यापासून कधी कादिरूप आणि कधी श्रीब्राह्म्यादि शक्तिरूप चक्राच्या कलांपासून

अर्थात् ककारादि अक्षरांपासून श्रवण उच्चारण यांच्यामुळे जीव आपल्या स्वरूपाचे वैभव हरवून बसतो. तो आपली महाव्याप्ती विसरून जातो व स्वभावापासून च्युत होतो. याचे फळ त्याला असे मिळते की, वास्तविकरीत्या ज्या शक्तींचा जीव स्वामी असतो त्याच शक्तींकडून भोगल्या जाणाऱ्या पुरुषाच्याऐवजी पशू होतो. **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, "आपल्या अंगचेष्टेप्रमाणे सर्व भाव आपल्या ठिकाणीच असतात. त्यांचा स्वामी, प्रमाता, संवित् किंवा श्रीशिव या नावानेच ओळखला जातो. परंतु ज्यावेळी तो त्या भावांमध्ये अडकून पडतो तेव्हा त्याला फार क्लेश होतात व कर्माच्या चिखलात लडबडून जाऊन तो पशू होतो." एका महात्म्याचे असे वचन आहे की, "खरे पाहता भेदग्रंथी या स्वतःच छिन्नभिन्न असतात. त्या छिन्न-भिन्न आहेत असे ज्ञान झाले की, द्वैत संपून जाते. ही गोष्ट जो जाणत नाही तो पशू होय व जो जाणतो तो पशुपती होय."।।४५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

अशा प्रकारे स्वस्वभावरूप आत्मा एकच आहे. त्याचीच ज्ञातृत्व आणि कर्तृत्वशक्ती त्या त्या शरीरद्वारा अभिव्यक्त होते. संपूर्ण विश्व ही त्याची शक्तिप्रसररूप क्रीडाच आहे. पण स्वस्वभावरूप आत्म्याची ही व्यापकता आमच्या सर्वांच्याच प्रत्ययास का येत नाही? विश्व हे जर शक्तिप्रसररूप असेल तर आम्हाला ते त्या स्वरूपात का जाणवू नये? याचा विचार पुढील कारिकांतून "पशू" स्वरूपाच्या प्रतिपादनाद्वारे करतात–

**स्पष्टीकरण :-** कारिकेतील पदांचा अन्वय असा - **"शब्दराशि-समुत्थस्य शक्तिवर्गस्य कलाविलुप्तविभवः भोग्यतां गतः सन् सः (आत्मा) पशुः स्मृतः।"** शैवागमामध्ये बद्ध संसारी जिवाला "पशू" अशी संज्ञा असून मुक्त श्रीशिवाला "पती" अशी संज्ञा आहे. आत्मा हा एकच आणि श्रीशिवच आहे. आपल्या मायाशक्तीच्या द्वारे तो स्वतःला अनंत व्यक्तींतून अभिव्यक्त करीत असतो. त्यामुळे नानात्वाने भासणारे हे विश्व आत्मशक्तीचाच प्रसार आहे. या जाणिवेने जो विश्वाकडे पाहतो तो विश्वाच्या नानात्वाने बद्ध होत नाही. पण हे ज्याला जाणवत नाही त्याला स्वात्म्याचे माहात्म्य व व्यापकताही जाणवत नाही. अर्थात् तो

व्यापक स्वस्वभावापासून च्युत होतो व आपले ज्ञातृत्व व कर्तृत्वही संकुचित करून बसतो. संपूर्ण शब्दराशीतून अभिव्यक्त होणारी शक्ती खरोखरी पुरुषाची असे असते; पण ह्या संकुचित पुरुषाला वाटते की, ही शक्ती माझी नसून शब्दराशीची आहे. त्यामुळे प्रत्ययाकरिता त्याला शब्दांवर अवलंबून राहावे लागते. त्याची सर्व निर्मिती "स्वतंत्र" न राहता शब्दपरतंत्र होते व तो शब्दशक्तीचाच भोग बनतो. ही पशू अवस्था होय.।।४५।।

या कारिकेतील श्रीरामकंठांची टीका त्रुटीत झाली आहे म्हणून ह्या व पुढील कारिकेचा अर्थ स्पंदप्रदीपिकेवरून दिला आहे. १६ व्या कारिकेवरील श्रीरामकंठांच्या टीकेचा मात्र बराच भाग उपलब्ध आहे म्हणून १६ व्या कारिकेचे स्पष्टीकरण श्रीरामकंठाच्या टीकेवर आधारले आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## ब्राह्मी आदि शक्ती

सूत्र क्रमांक ४५ मध्ये जागृत योग्यांना अन्य कोणीही त्रास किंवा दुःख देऊ शकत नाही असे कथन केले होते. यामुळे पुढील सूत्रामध्ये दुःख देणारा तो दुसरा कोण आहे? आणि तो कशाप्रकारे दुःख देत असतो? या रहस्याचे उद्घाटन केले जात आहे.

**वृत्ती :-** "अ" कारापासून "क्ष" कारापर्यंतच्या वर्णसमुदायाला "शब्दराशी" असे म्हणतात. पुरुष अर्थात् स्वतंत्र पतिप्रमाता किंवा स्वातंत्र्यशक्तीने युक्त असलेले परमेश्वर त्याच शब्दराशीपासून उद्भूत झालेले आणि "कवर्ग" इत्यादि वर्गाचे रूप धारण करणारी श्रीब्राह्मी इत्यादि पशू (शक्तींच्या) समुदायाचे वशवर्ती बनलेले आहेत अर्थात् या सर्व शक्तींनी वशीभूत झालेले आहेत. या अवस्थेमध्ये या परमेश्वराला "पशू" असे म्हणतात; कारण याच श्रीब्राह्मी इत्यादि शक्तींशी संबंधित असलेल्या कलांनी अर्थात् "ककार" इत्यादि स्थूल अक्षर समुदायाने या पतिप्रमात्याच्या वैभवाला नष्ट-भ्रष्ट केलेले आहे अर्थात् या पतिप्रमात्याला आपल्या स्वभावापासून च्युत केलेले आहे.।।४५।।

**विवरण :-** तांत्रिक शैवदर्शनाचा असा एक प्रसिद्ध सिद्धान्त आहे की, पतिप्रमात्याची अर्थात् परमेश्वराची अभिन्न तसेच स्पंदमयी विमर्शशक्ती अर्थात् सर्वस्वतंत्र संविच्छक्ती ही भेदरूप बहिर्विमर्शाच्या अर्थात् उभारणीच्या

अवस्थेमध्ये वैखरी वाणींच्या द्वारा उच्चारल्या जाणाऱ्या स्थूल वर्णसमुदायाच्या रूपामध्ये प्रसृत होत असते. हा स्थूल वर्णसमुदाय वस्तुतः शक्तिरूप असल्यामुळे पद, वाक्य, मोठे मोठे ग्रंथ किंवा जगतामधील सर्व आदान-प्रदानाचे रूप धारण करून विकल्प अर्थात् संशय व कल्पना यांचे अगडबंब जाळे उत्पन्न करीत असतो. यामुळे स्वतः स्वतंत्र पतिप्रमाता अर्थात् परमपिता परमेश्वरच यामध्ये अडकून अस्वतंत्र अर्थात् परतंत्र पशुप्रमाता किंवा जीव बनत असतो. वर्ण हे शक्तिरूप असल्याने हालचालीला, खळबळीला जन्म देणे हा या वर्णांचा स्वभाव आहे. हे वर्ण चांगली, वाईट हालचाल (खळबळ) उत्पन्न करीत असतात आणि पशू किंवा जीव हे त्यानुसार कार्य करण्यास विवश होत असतात. प्रतिक्षण वादविवाद, संशयाच्या साखळ्या किंवा मालिका घडत राहतात आणि संसारभावामध्ये अडकलेला पशुवर्ग हा अशांतीच्या भट्टीमध्ये घुसत जातो.

सूत्रामध्ये याच सिद्धान्ताचा उल्लेख हा सूत्रात्मक शब्दामध्ये केलेला आहे की, कलासमूहाने स्वातंत्र्याच्या स्वतंत्रतेला जेरबंद करून ठेवलेले आहे. शास्त्रीय शब्दांमध्ये "क" पासून "ह" पर्यंतच्या सर्व सस्वर व्यंजनसमुदायाला **"कलासमूह"** असे म्हणतात. याचाच अर्थ असा की, कलासमूह हाच तो "दुसरा" आहे जो असावधान अर्थात् बेसावध पशुप्रमात्याला अर्थात् जीवाला पावलापावलावर शेकडोशे संकटात टाकीत असतो.

यासंबंधामध्ये स्थूल शब्दराशीच्या रूपामध्ये विमर्शशक्तीच्या बहिर्मुखीन प्रक्रियेचे अत्यंत गंभीर आणि समजण्यास कठीण असे सैद्धान्तिक विवेचन हे आगम शास्त्रामध्ये प्रस्तुत केलेले आहे. याचे विस्तृत तसेच सर्वांगीण वर्णन करणे येथे शक्य नाही. असे केल्याने प्रस्तुत विषय हा समजण्यास कठीण आणि अरुचिकर बनण्याची शक्यता आहे यामुळे वाचकांचे लक्ष्य याकडे आकर्षित करण्यासाठी खालील ओळीमध्ये अनेक प्रमुख गोष्टींचा आंशिक रूपामध्ये उल्लेख केला जात आहे.

"अकारापासून" "क्षकारापर्यंत" वर्णसमुदायाला "शब्दराशी" असे म्हणतात. या वर्णसमुदायाचे शास्त्रीय नाव "मातृका" आहे. (**"मालिनी-विजयोत्तरतंत्र"** या ग्रंथामध्ये शब्दराशीचा "न" पासून "फ" पर्यंत असलेला दुसरा क्रम प्रस्तुत केलेला आहे. यालाच "मालिनी" असे म्हणतात. श्रीभट्टकल्लटांना कदाचित् वर्णमालेचा हा क्रम मान्य नसावा. कारण श्रीभट्टकल्लटांनी आपल्या वृत्तीमध्ये मातृका क्रमाचा अर्थात् "अ"

पासून "क्ष" पर्यंतचा उल्लेख केलेला आहे.) प्रत्यक्षात **"सा हि भगवती अशेषवाच्यवाचकात्मकजगदभेदचमत्कारात्मकशब्दराशिविमर्श परमार्था ...।"** असे **"स्वच्छंदतंत्र"** या ग्रंथात म्हटलेले आहे. याचा अर्थ असा आहे की, मातृकाशक्ती ही सर्व भेदपूर्ण वाचक आणि वाच्यरूप स्थूल शब्दराशीला आपल्या गर्भामध्ये अभेदरूपामध्ये अर्थात् केवळ स्पंदनामय विमर्शरूपामध्ये धारण करणारी पराशक्तीच आहे. त्याचप्रकारे **"स्वातन्त्र्य-शक्तिरेवास्य सनातनी पूर्णाहन्तारूपा।।** असे **"स्पंदनिर्णय"** या टीकाग्रंथात म्हटलेले आहे.।।४५।। याचे रूप पूर्ण अहंतारूप स्वातंत्र्या-शिवाय अन्य काहीही नाही. स्वतंत्र चेतनारूप असल्यामुळे ही शक्ती स्वयं "अ" पासून "क्ष" पर्यंतच्या स्थूल आणि सूक्ष्म वर्णसमुदायाच्या रूपामध्ये प्रसृत होऊन अनंत प्रकारच्या वाचक आणि वाच्य यांच्या विश्वाला अवभासित किंवा प्रकाशित करीत असते. (**"स्थूल"** या शब्दाचा अर्थ व्यक्त ध्वनिरूप आणि **"सूक्ष्म"** या शब्दाचा अर्थ अव्यक्त ध्वनिरूप अर्थात् क्रमशः मुखातून बोलले जाणारे आणि मनामध्ये चिंतन केले जाणारे वर्ण असा आहे. **"अज्ञाता माता मातृका विश्वजननी।।१.४।।"** असे **"शिवसूत्रविमर्शिनी"** या ग्रंथात म्हटले आहे. याचाच अर्थ न जाणलेल्या मातेला मातृका असे म्हणतात. फलतः ही शक्ती सर्व विश्वाची माता आहे. परंतु या मातेचा परिचय सिद्ध पुरुषांशिवाय अन्य कोणालाही होत नाही.

दुसरीकडे अनेक आचार्यांनी या शब्दाला मातृवाचक शब्दाऐवजी परिवारवाचक मानून याची दुसऱ्या प्रकारे व्याख्या प्रस्तुत केलेली आहे.

"अ" पासून "क्ष" पर्यंतची स्थूल शब्दराशी हा सर्वस्वतंत्र चिच्छक्तीचा बहिर्मुख प्रसार आहे. भेदपदवीवर उतरतानाच ही शब्दराशी आठ वर्गामध्ये विभागली जात असते आणि शक्ती ही स्वयं ब्राह्मी इत्यादि आठ प्रकारच्या विकल्परूप शक्तिपरिवाराच्या किंवा शक्तिकुटुंबाचे रूप धारण करून प्रत्येक वर्गाच्या एक एक अधिष्ठात्री देवीच्या रूपामध्ये अवस्थित राहत असते. आपल्या खऱ्या चिद्रूपाला चारही बाजूने घेरून त्याला बाजूला ठेवणे हे या शक्तींचे प्रधान कार्य आहे. परिवार किंवा कुटुंब हे आपल्या जन्मदात्याला चारही बाजूंना घेरून बसत असते. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की - **"एतदेव च ब्राह्म्यादिमातृणां मातृत्वं तत्तस्थ परिवारभावेन तिष्ठन्ति, विकल्पा हि चिद्रूपस्य जीवस्य**

**परितो वारणात् परिवार एव मातृशब्दो ह्यत्र परिवारवाच्येव न जननीवाचकः।।२.१.१।।"** याचा अर्थ असा आहे की, हेच ब्राह्म्यादि मातृकांचे मातृत्व असून त्या तेथे परिवारभावनेने राहतात. विकल्प हे चिद्रूप जीवाच्या भोवती वारण अर्थात् प्रतिरोध किंवा अडचण करीत असल्यामुळे परिवार अशी परिवाराची उत्पत्ती असून मातृशब्द येथे "परिवार" या अर्थी आलेला असून जननी या अर्थी आलेला नाही. ब्राह्मी इत्यादि शक्तींचा परिवार हाही पशुभूमिकेवर आपल्याच जन्मदात्री चिच्छक्तीला घेरून अशा प्रकारे बसून राहतो की, सर्वसामान्य जीवांना या चिच्छक्तीचा आभासही प्राप्त होऊ शकत नाही. यामुळे आठ शक्तींच्या परिवाराला किंवा कुटुंबाला "मातृका" असे म्हणतात.

मातृका शक्तीच्या वर निर्दिशिलेल्या बहिर्मुखीन प्रसाराच्या प्रक्रियेचे मूल्यमापन भगवान् श्रीशंकरांनी स्वतः प्रस्तुत केलेले आहे.

प्रकाशरूप श्रीशिव आणि विमर्शरूपा शक्तीची सामरस्य अवस्था हीच संपूर्ण विश्वाची आत्मभूत आणि आधारभूत सत्ता आहे. महामंत्रात्मक अहंविमर्श हेच केवळ या सत्तेचे स्वरूप आहे. या दृष्टीने **"श्रीशिवसूत्र-विमर्शिनी"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, **"अत एव प्रत्याहार-युक्त्या अनुत्तरानाहताभ्यामेव शिवशक्तिभ्यां गर्भीकृतम्, एतदात्मकमेव विश्वम्, इति महामन्त्रवीर्यात्मनोऽहंविमर्शस्य तत्त्वम्।।२.७।।"** याचा अर्थ असा आहे की, "अ" अर्थात् अनुत्तर अर्थात् श्रीशिवतत्त्व आणि "ह" अर्थात् अनाहत शक्तितत्त्व यांची संपुट दशा अर्थात् प्रत्याहार दशा हीच अहंता आहे. या अहंतेच्या गर्भामध्ये सर्व शब्दराशी मोराच्या अंडरसाच्या न्यायाने भेदरहित अशा अहंरूपामध्ये अवस्थित झालेली आहे. पारिभाषिक शब्दामध्ये यालाच **"परावाणी"** अर्थात् **"सर्वश्रेष्ठ वाणी"** असे म्हणतात. स्थूल वाच्यवाचकमय विश्वाचे प्रकाशन करण्याकडे उन्मुख किंवा उत्सुक असण्याच्या अवस्थेमध्ये ही अहंरूपा विमर्शशक्ती किंवा ज्ञानशक्ती ही इच्छाशक्तीचे रूप धारण करीत असते. यानंतर ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती या दोन रूपांमध्ये अंकुरित होत असते. या दोन रूपामध्ये अंकुरित होताच ही अहंरूपा विमर्शशक्ती मायापदवीवर उतरून स्वयं उत्पादित अनंत उपाधींच्या रंगाने स्वतःलाच रंगवून न जाणो किती अतर्क्यरूपामध्ये प्रसृत होत असते. याच बहिर्मुखीन प्रसार प्रक्रियेमध्ये ही विमर्शशक्ती मातृकेचे रूप धारण करीत असते. या दृष्टीने **"मालिनीविजयोत्तरतंत्र"**

या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**तत्र तावत्समापन्ना मातृभावं विभिद्यते।**
**द्विधा च नवधा चैव पञ्चाशद्धा च मालिनी।।३.९-१०।।**

याचा अर्थ असा आहे की, (ही ईश्वरी चिंतामणीप्रमाणे) जेव्हा अर्थरूप उपाधीच्या ताब्यात जाते, तेव्हा तेथे मातृभावामध्ये भेद निर्माण होतो. ती मालिनी दोन प्रकार, नऊ प्रकार आणि पन्नास प्रकारच्या भेदामध्ये विभक्त होत असते. याच दृष्टीने त्याच ग्रंथात पुढे या भेदांचे मूल्यमापन करताना असे म्हटले आहे की -

**बीजयोन्यात्मकाद्भेदाद्द्विधा बीजं स्वरा मताः।**
**कादिभिश्च स्मृता योनिर्नवधा वर्गभेदतः।।३.१०.११।।**

याचा अर्थ असा आहे की, बीज आणि योनी या दोन प्रकारांनी ती द्विविध होते. यातील बीज म्हणजे स्वर होत. "क" पासून वर्णभेदानुसार नऊ प्रकारची योनी होते.

## दोन प्रकारचे भेद-बीज आणि योनी

"अ" पासून "क्ष" पर्यंतच्या सर्व स्वरसमुदायाला "**बीज**" आणि "क" पासून "क्ष" पर्यंतच्या सर्व व्यंजनसमुदायाला "**योनी**" असे म्हणतात. "**बीजमन्त्र शिवः शक्तिर्योनिरित्यभिधीयते।।३.१२।।**" असे "**मालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात म्हटलेले आहे. याचा अर्थ असा आहे की, "**बीज**" या शब्दाचा अर्थ श्रीशिवभाग असा असून "**योनी**" या शब्दाचा अर्थ "**शक्तिभाग**" असा आहे. व्याकरणामध्ये वर्णिलेल्या संस्थानतेच्या नियमाने बीज आणि योनी हे दोन्ही एकमेकामध्ये अंतर्भूत आहेत.

**नऊ प्रकारचे भेद :-**

**( नवधा वर्गभेदतः।। मालिनीविजयोत्तरतंत्र )**

१) अवर्ग "**अ**" पासून "**अः**" पर्यंत (अमा)
२) कवर्ग "**क**" पासून "**ङ**" पर्यंत (कामा)
३) चवर्ग "**च**" पासून "**ञ**" पर्यंत (चार्वङ्गी)
४) टवर्ग "**ट**" पासून "**ण**" पर्यंत (टङ्कधारिणी)
५) तवर्ग "**त**" पासून "**न**" पर्यंत (तारा)
६) पवर्ग "**प**" पासून "**म**" पर्यंत (पार्वती)

७) यवर्ग **"य"** पासून **"व"** पर्यंत (यक्षिणी)

८) शवर्ग **"श"** पासून **"ह"** पर्यंत (शारिका)

९) क्षवर्ग **"क्ष"** (अनुत्तर तसेच अनाहत यांच्या संघट्टाला किंवा सामरस्याला अभिव्यक्त करणारे कूटबीज.)

वर्गभेदाच्या विषयामध्ये ही गोष्ट विशेष रूपाने उल्लेखनीय आहे की, प्रत्यक्षात वर्णसमाम्नायाचे अर्थात् वर्णसमूहाचे एक पासून आठ पर्यंतचे वर्ग हे मुख्य आहेत. "क्ष" ला मात्र औपचारिकतेने एकाच वेगळ्या वर्गामध्ये ठेवलेले आहे. कारण या "क्ष" चा अंतर्भाव "क" आणि "स" च्या रूपामध्ये पहिल्या आठ वर्गामध्ये होत असतो. या दोन वर्णांचे संयुक्त रूप असल्यामुळे हा कोणताही संयुक्त स्वतंत्र वर्ण नाही. "क्ष" या वर्गाला वेगळ्या वर्गरूपामध्ये ठेवण्याचे कारण केवळ इतकेच आहे की, **"क्षकार"** हे अनुत्तर वाचक अर्थात् श्रीशिववाचक **"ककार"** आणि विसर्गवाचक अर्थात् शक्तिवाचक **"सकार"** यांचे संयुक्तरूप कूटबीज आहे. या दृष्टीने **"श्रीशिवसूत्रविमर्शिनी"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

**तदियत्पर्यन्त यन्मातृकायास्तत्त्वं तदेव ककार-सकारप्रत्याहारेण, अनुत्तरविसर्गसंघट्टसारेण कूटबीजेन प्रदर्शितमन्ते।।२.७।।**

याचा अर्थ असा आहे की, येथपर्यंत मातृकांचे जे तत्त्व आहे ते "क" कार-"स" कार (विसर्गात्मक) यांनी तयार झालेल्या क्ष असा कूटवर्ण होय असे शेवटी सांगितले.।।२.७।। हा अर्थ या गोष्टीला अभिव्यक्त करीत आहे की, मातृकेचा प्रत्येक वर्ण हे श्रीशिवभाग आणि शक्तिभाग यांचे संघट्टरूप आहे. हेच कारण आहे की, याला शब्दराशीच्या शेवटी ठेवलेले आहे.

### पन्नास प्रकारचे भेद

**"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथात असे म्हटलेले आहे की, **"प्रतिवर्णविभेदेन शतार्धकिरणोज्ज्वला।।३.११।।"** याचा अर्थ असा आहे की, (ही योनी किंवा वर्णमाला) प्रत्येक वर्णानुसार ५० विवरणांनी तळपते. शब्दराशीच्या प्रत्येक अक्षराला वेगवेगळी शक्तिरूप मानून सोळा स्वर आणि चौतीस व्यंजनांच्या रूपामध्ये पन्नास भेदांची कल्पना केली गेलेली आहे. **"तदेव शक्तिभेदेन माहेश्वर्यादि चाष्टकम्।३.१३।।** असे **"मालिनीविजयोत्तरतंत्र"** या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे वर्णसमाम्नायाचे

आठ वर्ग हे प्रत्यक्षात भेदभूमिकेवर अवतीर्ण झालेल्या विमर्शशक्तीची आठ रूपे आहेत. श्रीमाहेशी, श्रीब्राह्मी, श्रीकौमारी, श्रीवैष्णवी, श्रीऐंद्री, श्रीयाम्या, श्रीचामुंडा आणि श्रीयोगेशी ही या आठ रूपांची नावे आहेत.

या आठ शक्तींना पारिभाषिक शब्दामध्ये "**पीठेश्वरी**" असे म्हणतात. या शक्तींची क्रिया ही द्विमुखी अर्थात् बाह्य व आंतर या दोन मुखांनी होते. सामान्य पशूंसाठी ही क्रिया प्रतिक्षण अधिकाधिक विकल्पपरंपरांना जन्म देत राहते. या शक्ती अत्यंत भय निर्माण करणाऱ्या असून ब्रह्मरंध्रामध्ये असलेल्या चिच्छक्तीला बाजूला ठेवून अनंत प्रकारच्या स्थूल अर्थात् वाणीच्या द्वारा अभिलापात्मक अर्थात् कथनाच्या द्वारा आणि सूक्ष्म अर्थात् मानसिक संकल्पात्मक वाचक आणि वाच्य यांच्या इशाऱ्यांवर अज्ञानी जीवांना न जाणो किती आणि कसे नाचवीत राहतात. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथाच्या टीकेत "**तिमिरोद्धाट**" या ग्रंथातील वचन उद्धृत करताना असे म्हटले आहे की -

**करन्ध्रचितिमध्यस्था ब्रह्मपाशावलाम्बिकाः ।**
**पीठेश्वर्यो महाघोरा नर्तयन्ति महुर्मुहुः ।।**

दुसरीकडे ज्या भाग्यवान् पुरुषामध्ये ईश्वरीय अनुग्रहामुळे सद्विवेकाचा उदय झालेला असतो त्या भाग्यशाली पुरुषांना ही शक्ती या शब्दराशीत असलेल्या शाक्तबळाची अनुभूती करवून श्रीशिवभावावर पोहोचण्यासाठी मार्गदर्शन करीत असते. शेवटी वाणी ही मनुष्याला तारीत असते आणि मारीतही असते.

मातृकाशक्तीचे हे आठ प्रकार केवळ विषयाला सुगम बनविण्यासाठी मुख्यरूपाने स्वीकारलेले आहेत. संसारामध्ये वाच्य-वाचकात्मक विकल्प-परंपरांच्या अगणित साखळ्यांच्या एकेका कड्यांमध्ये प्रसरामध्ये येत असतात. ती सर्व या शक्तीची अनंत रूपे आहेत. यामुळे या रूपांची यथावत् गणना केली जाऊ शकत नाही.

हा अनंत प्रकारचा शक्तिवर्ग भिन्न भिन्न प्रकृतींच्या प्रमात्यांना किंवा ज्ञात्यांना किंवा जीवांना किंवा संसारी पशूंना भिन्न भिन्न प्रकारच्या प्रतिक्रियांचा विषय बनवीत असतो. सामान्यपणे तीन गुणांच्या आधारावर प्रकृती ही तीन प्रकारची आहे. यामुळे शास्त्रकारांनी तदनुकूल कार्य-भेदानुसार "**मालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**अनन्तस्यापि भेदस्य शिवशक्तेर्महात्मनः।**
**कार्यभेदान्महादेवि! त्रैविध्यं समुदाहृतम्।।३.३०।।**

याचा अर्थ असा आहे की, हे महादेवी! अतिशय श्रेष्ठ अशा श्रीशिवशक्तीच्या अनंतभेदाचे कार्याच्या दृष्टीने तीन भेद सांगितले आहेत. या शक्तिवर्गाच्या तीन रूपांचा स्वीकार शास्त्रकारांनी केलेला आहे. त्यांचे "**मालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात पुढीलप्रमाणे विवरण आलेले आहे.

**विषयेष्वेव संलीनानधोऽधः पातयन्त्यणून्।**
**रुद्राणून्याः समालिङ्ग्य घोरतर्योऽपराः स्मृताः।।३.३१।।**

**अर्थ :-** ज्या रुद्राणूंना आलिंगन देऊन (दुसऱ्या) अपरा घोरतर (शक्ती) सांगितल्या आहेत त्या विषयांमध्ये बुडालेल्या अणूंना खाली-खाली ढकलतात.

**१) घोरतरा (अपरा) :-** मुख्यरूपाने तामसिक प्रकृतीच्या पशु-वर्गासाठी शक्तिवर्गाचे रूप हे महान् भय निर्माण करणारे आहे. अशा तामसिक पशुवर्गाला हा शक्तिवर्ग प्रतिक्षण केवळ कनक-कामिनी अथवा दुसऱ्या प्रकारच्या सांसारिक विषयोपभोगाची दारू पाजून चेतनाहीन बनवीत असतो आणि निरंतर अधोगतीच्या खालील शिडीकडे ढकलीत राहतो.

**मिश्रकर्मफलासक्तिं पूर्ववज्जनयन्ति याः।**
**मुक्तिमार्गनिरोधिन्यास्ताः स्युर्घोराः परापराः।।३.३२।।**

**अर्थ :-** पूर्वीप्रमाणे ज्या मिश्रफल निर्माण करतात त्या मुक्तिमार्गामध्ये अडसर असणाऱ्या परापरा घोरा (शक्ती) होत.

**२) घोरा (परापरा) :-** मुख्यत्वेकरून राजसिक प्रकृतीच्या पशुवर्गा-साठी शक्तिवर्गाचे रूप हे घोर व भय निर्माण करणारे आहे. परंतु घोरतर रूपाप्रमाणे भयंकर नाही. याचाच अर्थ असा की, या स्तरावर स्थित असेलल्या व्यक्तीवर ईश्वराचा अनुग्रह अर्थात् शक्तिपात झाल्यास ती व्यक्ती आपला उद्धार करून घेऊ शकते. घोरा शक्ती या पशुवर्गाच्या मनामध्ये मिश्रित अर्थात् शुभ-अशुभ कर्मफलांविषयी आसक्ती उत्पन्न करीत असते आणि सामान्यपणे या पशुवर्गाचे मुक्तीचे दार बंद ठेवते.

**३) अघोरा-परा :-**

**पूर्ववज्जन्तुजातस्य शिवधामफलप्रदाः।**
**पराः प्रकाशितास्तज्ज्ञैरघोराः शिवशक्तयः।।३.३३।।**

**अर्थ** :- पूर्वीप्रमाणे प्राणिमात्रांना श्रीशिवधामरूपी फळ देणाऱ्या श्रीशिवाच्या शक्ती या परा (श्रेष्ठ) व अघोरा आहेत असे तज्ज्ञांनी सांगितले आहे.

अनुभूतीतील तसेच सात्त्विक प्रकृतीच्या योग्यासाठी शक्तिवर्गाचे रूप हे घोर अर्थात् अतीव सौम्य व कल्याणकारी असते. ज्याप्रकारे या शक्ती राजसिक आणि तामसिक प्रकृतीच्या व्यक्तींना तदनुकूल कर्मफलाकडे प्रेरित करीत असतात त्याचप्रमाणे योग्यांना श्रीशिवभावावर पोहोचवीत असतात.

आता सूत्रामध्ये उल्लेखिलेल्या कलासमूहाच्या संबंधात दोन शब्द सांगणे आवश्यक आहे. अंतर्विमर्शाच्या अर्थात् अंतर्ज्ञानाच्या अवस्थेमध्ये अ, इ, उ, ऋ, लृ हे पाच मूळ स्वर क्रमशः चित्, निवृत्ती, इच्छा, ज्ञान आणि क्रिया या पाच माहेश्वर शक्तीचे प्रतिनिधीत्व करतात. या दृष्टीने "**श्रीशिवसूत्रविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की -

**बहिर्विमर्शन तु कादिमान्तं पञ्चपञ्चकं अ, इ, उ ऋ, लृ**
**शक्तिभ्यः पुरुषान्तं समस्तं प्रपञ्चयति।।२.७।।**

याचा अर्थ असा आहे की, बहिर्विमर्शाच्या किंवा बाह्यज्ञानाच्या अवस्थेमध्ये याच पाच मूळ स्वरांची अवतरणा ही क्रमशः कवर्ग, चवर्ग, टवर्ग, तवर्ग, पवर्ग यांच्या रूपामध्ये होत असते. याच ककार आदि अक्षरांना पारिभाषिक शब्दामध्ये "कलासमूह" असे म्हणतात. कारण हे कलातत्त्व, विद्यातत्त्व आदि मायिक प्रपंचाचे प्रतिनिधित्व करीत असतात.

शास्त्रामध्ये कलासमूहाची परिगणना स्वरवर्गाला वेगळे सोडून "क" वर्णापासून प्रारंभ करण्यामागील कारण असे आहे की, जेव्हा स्वर आणि व्यंजन परस्परातील संमिश्रणाच्या अवस्थेमध्ये पडतात किंवा असतात तेव्हा विकल्प अर्थात् संशयपरंपरांचा क्षोभ उत्पन्न होत असतो. अन्यथा केवळ स्वर किंवा केवळ व्यंजन वेगवेगळे कोणताही क्षोभ उत्पन्न करू शकत नाहीत. या दोहोंच्या परस्परांमधील संमिश्रणाला शास्त्रीय शब्दामध्ये "**बीजयोनिसंक्षोभ**" असे म्हणतात.

या सर्व प्रसंगावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रत्येक शब्द म्हणजे केवळ जड ध्वनी नसून स्पंदमयी चेतनाशक्ती आहे. आपल्या भोक्तृभावाची अर्थात् भोगणाऱ्या भावाची अनुभूती प्राप्त होईपर्यंत प्रत्येक जीव या शक्तीचा दास असतो.।।४५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

**"ततोऽन्येन न पीड्यते"** अर्थात् त्यानंतर त्याला अन्य कोणाकडूनही त्रास होत नाही. असे वरच्या कारिकेत सांगितले. तेव्हा जर हे सर्व विश्वच श्रीशिवमय असेल तर कोणाला त्रास होणार? आणि कोण त्रास देणारा असणार? अशी शंका उत्पन्न करून पाश आणि पशू यांचे स्वरूप ग्रंथकार या कारिकेत सांगत आहेत.

**स्पष्टीकरण :-** येथे जो प्रकाशयुक्त स्वस्वभावरूप श्रीशंकर सांगितला आहे तो असा आहे.

**व्यवस्थितः करोत्यैष विश्वकारणमीश्वरः।**
**सृष्टिं स्थितिं च सहारं तिरोधानमनुग्रहम्।।**

**अर्थ :-** हा विश्वाचे कारण असणारा ईश्वर व्यवस्थित राहून सृष्टी, स्थिती, संहार, तिरोधान आणि अनुग्रह (अशी पंचकृत्ये) करतो.

अशा प्रकारे श्रीस्वच्छंदशास्त्रानुसार श्रीशिव नेहमीच निजाशक्तीला चिकटलेला अर्थात् तिच्याशी समरस स्थितीत असतो. त्याचप्रमाणे तो सृष्ट्यादि पाच कृत्ये करणारा, स्वतंत्र, आगमांमधून स्पंद, ललित, ईश्वर इत्यादि शब्दांनी सांगितला गेला आहे. याची स्वातंत्र्यशक्तीच सनातन, पूर्णाहंतारूप, परा, मत्स्योदरी, महासत्ता, स्फुरत्तोर्मी (प्रकाशाची लाट), सार, हृदय, भैरवी, देवी, शिखा इत्यादि असंख्य प्रकारांनी त्या त्या ठिकाणी सांगितली गेली आहे. त्याची पूर्णाहंता म्हणजेच अनुत्तर आणि अनाहतशक्तींनी संपुट केलेल्या (अर्थात् अनुत्तर तत्त्व व अनाहत नादाच्या लहानशा पेटीत असलेल्या) अ ते क्ष पर्यंत वर्णांची स्वामिनी; त्यानंतर असंख्य प्रकारच्या वाच्य (अर्थ) व वाचक (शब्द) रूप सहा अध्वांना (मार्गांना) व्यक्त करणाऱ्या सर्व शक्तिचक्रांना व्यापून असलेली, सर्व सृष्टि-स्थिती इत्यादि क्रम परंपरांची कर्ती असूनही अक्रमरूपातच ज्ञात होणारी, नित्योदित म्हणजे नित्य उदित असणारी आणि उच्चार न करता येणाऱ्या श्रेष्ठ मंत्रांच्या स्वरूपात भासणारी आणि सर्वांचे जीवनच असणारी परावाक् होय. ही पूर्णाहंताच भगवंताच्या असंख्य व विविध प्रकारच्या विश्वाच्या क्रिया स्वतःच्या आत्म्यात व्यक्त करणारी असून ती स्पंदन पावते अर्थात् हालचाल करते. अशा अर्थानुसार तिला स्पंद असे म्हणतात. अशा प्रकारे विस्तार पावलेल्या विश्वशक्तीने युक्त अशा सुंदर पराशक्तिस्वरूप स्वात्म्याची

स्वरूप लपविण्याची क्रीडा अंशाअंशाने स्वात्मरूप आधारावर भासवीत परमेश्वर जोपर्यंत इच्छा करतो तोपर्यंत एक आणि अभिन्न असूनही त्याची ही विमर्श शक्ती इच्छात्वामध्ये प्रवेश करून ज्ञान आणि क्रिया रूपत्वाने स्थित राहते. ती श्रीशिव आणि शक्ती यांच्या परामर्शाने युक्त बीज आणि योनी अशा भेदाने दोन प्रकारची होऊन (क च ट प त य र ल व) या वर्गभेदाने नऊ प्रकारची आणि कलाभेदाने म्हणजेच (सर्व वर्णांच्या भेदाने) पन्नास प्रकारची होऊन स्फुरणारी त्या ज्ञानाच्या साराने, अघोर, घोर आणि घोरतर इत्यादि संवित्तिदेवतांच्या रूपांनी प्रकट होणारी परमेश्वराच्या पंचविधकृत्यकारित्वाचे निर्वहन करते. यासंबंधी "**श्रीमालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**या सा शक्तिर्जगद्धातुः कथिता समवायिनी।**
**इच्छात्वं तस्य सा देवी सिसृक्षोः प्रतिपद्यते।।३।५।।**
**सैकापि सत्यनेकत्वं यथा गच्छति तच्छृणु।**
**एकमेतदिति ज्ञेयं नान्यथेति सुनिश्चितम्।।६।।**
**ज्ञापयन्ती जगत्यत्र ज्ञानशक्तिर्निगद्यते।**
**एवं भवत्विदं सर्वमिति कार्योन्मुखी यदा।।७।।**
**ज्ञाता तदैव तद्वस्तु कुर्वत्यत्र क्रियोच्यते।**
**एवमेषा द्विरूपापि पुनर्भेदैरनन्तताम्।।८।।**
**अर्थोपाधिवशाद्याति चिन्तामाणिरिवेश्वरी।**
**तत्र तावत्समापन्ना मातृभावं विभिद्यते।।९।।**
**द्विधा च नवधा चैव पञ्चाशद्वा च मालिनी।**
**बीजयोन्यात्मकाद्भेदाद्द्विधा बीजं स्वरा मताः।।१०।।**
**कादयश्च स्मृता योनिर्नवधा वर्गभेदतः।**
**पृथग्वर्णाविभेदेन शतार्धकिरणोज्ज्वला।।११।।**
**बीजमत्र शिवः शक्तिर्योनिरित्यभिधीयते।**
**वर्गाष्टकमिति ज्ञेयमघोराद्यमनुक्रमात्।।१२।।**
**तदेव शक्तिभेदेन माहेश्वर्यादि चाष्टकम्।**
**शतार्धभेदाभिन्ना च तत्संख्यानां वरानने।।१३।।**
**रुद्राणां वाचकत्त्वेन कल्पिता परमेष्ठिना।**
**तद्वदेव च शक्तीनां तत्संख्यानामनुक्रमात्।।१४।।**

त्याचप्रमाणे

**विषयेष्वव संलीनानधोऽधः पातयन्त्यणून।**
**रूद्राणून्याः समालिङ्ग्य घोरतर्योऽपरास्तु ताः।।३/३१।।**
**मिश्रकर्मफलासक्तिं पूर्ववज्ञनयन्ति याः।**
**मुक्तिमार्गनिरोधिन्यस्ताः स्युर्घोराः परापराः।।३२।।**
**पूर्ववज्ञन्तुजातस्य शिवधामफलप्रदाः।**
**पराः प्रकथितास्तज्ज्ञैरघोराः शिवशक्तयः।।(३३)**

**अर्थ :-** हे देवी! जगनिर्मात्याची समवायिनी अर्थात् नित्य संबंधित अशी जी शक्ती आहे ती निर्मात्याचे इच्छात्व होय.।।३.५।।

ती एक असूनही अनेकत्वाला कशी जाते ते ऐक. हे अशा प्रकारेच जाणावे. इतर प्रकारे नाही हे निश्चित आहे.।।६।।

ह्या जगामध्ये जाणवून देणाऱ्या शक्तीला ज्ञानशक्ती असे म्हणतात. ज्यावेळेस "हे सर्व असे व्हावे" म्हणून (ही शक्ती) कार्योन्मुख किंवा कार्याला प्रवृत्त होते त्यावेळेस उत्पन्न झालेली ती वस्तू (निर्माण) करते; त्यामुळे तिला क्रिया असे म्हणतात. अशा प्रकारे ही दोन प्रकारची असूनही परत ती अनंत भेदांना प्राप्त होते.।।६, ७, ८।।

ज्यावेळी ही ईश्वरी शक्ती चिंतामणीप्रमाणे अर्थरूप उपाधीच्या ताब्यात जाते त्यावेळेस मातृभावामध्ये भेद निर्माण होतो.।।९।।

मालिनी दोन प्रकारची, नऊ प्रकारची आणि पन्नास प्रकारची असते. बीज आणि योनी या दोन भेदांनी ती द्विविध होते. यातील बीज म्हणजे स्वर होत.।।१०।।

"क"पासून वर्णभेदानुसार ती नऊ प्रकारची योनी होते. प्रत्येक वर्णानुसार ती पन्नास किरणांनी तळपते.।।११।।

येथे बीज म्हणजे श्रीशिव आणि शक्ती म्हणजे योनी होय. अघोरापासून सुरुवात करून आठ वर्ग आहेत असे जाणावेत.।।१२।।

माहेशी, ब्राह्मणी, कौमारी, वैष्णवी, ऐंद्री, याम्या, चामुंडा व योगीशी अशा या आठ शक्ती आहेत.

हे वरानने! परमेशाने पन्नास भेद रुद्रांच्या संख्येच्या अनुरोधाने केले आहेत.।।१३।।

त्याचप्रमाणे शक्तींचा त्यांच्या क्रमानुसार भेद आहे.।।१४।।

इत्यादि. त्याचप्रमाणे,

रुद्राणूंना आलिंगन देऊन दुसऱ्या घोरतरी शक्ती सांगितलेल्या आहेत

त्या विषयांमध्ये बुडालेल्या अणूंना खाली खाली टाकतात.।।३१।।

पूर्वी प्रमाणे ज्या मिश्रफल निर्माण करतात त्या मुक्तिमार्गामध्ये अडसर असणाऱ्या (शक्तींना) परापरा अर्थात् अघोरा असे म्हटले आहे.।।३२।।

पूर्वीप्रमाणे प्राणिमात्रांना शिवधामरूप फल देणाऱ्या श्रीशिवाच्या शक्तींना तज्ज्ञांनी परा (श्रेष्ठ) आणि अघोरा अशी नावे दिलेली आहेत. ।।३३।।

अशाप्रकारे शब्दराशीपासून उत्पन्न होणारा नऊ वर्गांनी युक्त जो श्रीशिवासहित श्रीब्राह्म्यादि देवतावर्ग आहे तो भोग्यतेला म्हणजेच पाश्यता किंवा बंधत्वाला प्राप्त होऊन तोच श्रीशंकरात्मक स्वभाव आगमांमध्ये सांगितलेला पशू होतो.

आता भोक्ता (उपभोग घेणारा) श्रीमहेश्वर या अवस्थेला कशा प्रकारे प्राप्त होतो? अशी शंका उत्पन्न झाली असता ग्रंथकार त्या शंकेचे उत्तर देण्यासाठी विशेषणांच्या द्वारा त्याचे कारण **"कलाविलुप्त विभव"** असे सांगतात. कला म्हणजेच जी बाहेर फेकून देते अथवा परिमिततेने सीमित होते ती असून तीच परमेश्वराची मायाशक्ती आहे. त्या कलेने वैभव लुप्त झालेल्या अर्थात् स्वतःच्या मायेने आपले ऐश्वर्य लपवून स्थिर असणारा असा (श्रीशंकर) होय. कलेने म्हणजेच किंचित्कर्तृत्वाने पुष्ट झालेल्या शक्तीने आणि त्या कलेने दाखविलेल्या कला-विद्या-काल-नियति-राग या आवरणांनी त्याचे पूर्णकर्तृत्वादि धर्म स्थगित अथवा नष्ट होतात. हे सर्व मान्य करूनही हा कसा काय शक्तिवर्गाच्या भोग्यतेला प्राप्त होतो? या शंकेलाही हेच उत्तर आहे. याचा अर्थ असा आहे की, हा श्रीशंकर कलांमुळे म्हणजेच अकारादि वर्गांमध्ये अधिष्ठान असलेल्या श्रीब्राह्म्यादि शक्तींमुळे, त्यांच्या वर्णांमध्ये स्वामिभावाने अधिष्ठान प्राप्त करून आणि श्रीमालिनीविजयोत्तरतंत्रामध्ये सांगितलेल्या अकारादि वर्णरूप देवतांमुळे त्याचे ऐश्वर्य लुप्त होऊन "मी संकुचित आहे, मी अपूर्ण आहे, काहीतरी करीत आहे, हे घेतो आणि हे टाकतो," अशा प्रकारच्या विविध विकल्पक आणि अविकल्पक (निश्चित आणि अनिश्चित) अशा प्रतिपत्तींच्या जंजाळात अडकून स्थूल आणि सूक्ष्म शब्दांच्या तणावाखाली हर्ष, शोक इत्यादि अवस्थांकडे परत परत नेला जात असल्याप्रमाणे क्षणभरही स्व-स्वरूपात स्थिती प्राप्त करत नाही. त्यामुळे वर सांगितलेल्या स्वरूपाच्या शक्तिवर्गाकडून भोगला जाणारा तो "पशू" म्हणून संबोधिला जातो. तो कलेने किंवा अख्यातियुक्त अंशाने म्हणजेच ज्याचे वर्णन करता येत नाही अशा

अंशाने आपले पूर्णतेचे ऐश्वर्य नष्ट झाल्यामुळे संकुचित झाल्याप्रमाणे भासतो. तत्त्वतः त्याचा श्रीशिवात्मक स्वभाव कोठेही गेलेला नसतो; कारण या स्वभावाच्या अभावी त्याचे प्रकटनच होणार नाही किंवा तो अस्तित्वातच येणार नाही. वर सांगितलेल्या प्रकारांनी कालांनी अवभासित झालेला व संकुचित शब्दज्ञानाने आपले पूर्णत्वाचे ऐश्वर्य विसरलेला तो जीव किंवा पशू आत्म्याचे योग्यप्रकारे ध्यान करू शकत नाही अथवा आत्म्याला जाणून घेऊ शकत नाही. ।।४५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

आधीच्या श्लोकात "संसारापासून योगी त्रासला जात नाही, तेथें दुसरा पीडाकर्ता कोण व कोणाची पीडा योग्याला प्राप्त होते?" अशी शंका उत्पन्न होते. कारण हे सर्व विश्व श्रीशिवस्वरूपच आहे. ही आशंका दूर करण्यासाठी आणि पाश व पशूचे लक्षण निश्चित करण्यासाठी **"शब्दराशिसमुत्थस्य .....।।४५।।"** या कारिकेत त्याबाबत सांगितले आहे. तो म्हणजेच आतापर्यंतच्या हजारो ग्रंथांमधून प्रतिपादिलेला ईश्वर जरी स्वात्म्यातच असतो तरीही सर्व वृत्ती पराधीन असल्याने "स्व"स्वरूप न आकळलेला पशू हा तिर्यग्प्राय अर्थात् नीच दर्जाचा समजला जातो. अनादिकालापासून सांसारिक क्रीडात्मक व्यवहार हा सतत स्मरणकर्तृत्वाने स्थित आहे. त्यामुळेच ज्याने स्वस्वरूप जाणलेले नाही त्याला या त्रिकशास्त्रात पशू असे म्हणतात. अशा प्रकारे ज्याला स्वस्वरूप समजलेले नाही असा पुरुष म्हणजे पशू होय. तो शब्दसमूह उत्पन्न झालेल्या शक्तिवर्गाच्या भोग्यस्वरूपाला प्राप्त होऊन अकारापासून क्ष पर्यंत वर्णसमुदायरूप शक्तीच्या भोग्यस्वरूपाला प्राप्त होतो. ककारादि अक्षरांनी स्वतःचे वैभव विसरलेल्या पुरुषाला पशू असे म्हणतात. याचे तात्पर्य असे आहे की, हा पुरुष अज्ञानाने आवृत्त म्हणजेच झाकला गेलेला असतो. ।।४५।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**परामृतरसापायस्तस्य यः प्रत्ययोद्भवः।**
**तेनास्वतन्त्रतामेति स च तन्मात्रगोचरः।।४६।।**

**अन्वयार्थ :-**

**यः** - जो, **प्रत्ययोद्भवः** - विकल्पज्ञानाचा उदय होणे, **परामृत-** -

**रसापायः** - परामृतरस- "शिवशक्ती सामरस्य" या अवस्थेपासून अपाय, भ्रष्ट होणे (श्रीभट्टकल्लट), **तेनास्वतन्त्रताम् एति** - त्यामुळे तो स्वतःचे स्वातंत्र्य गमावतो, परतंत्रेस प्राप्त होतो व **तन्मात्रगोचरः** - त्याला (विकल्प ज्ञानाचे विषय, ज्या पाच तन्मात्रा) त्यांच्याविषयी अभिलाषा निर्माण होते.।।४६।।

**अर्थ :-** श्रीशिवाच्या निर्विकल्प स्वरूपामध्ये विकल्पज्ञानाचा उदय होणे अर्थात् प्रत्ययोद्भव होणे हेच त्या श्रीशिवांचे परामृतरसापासून अर्थात् श्रीशिवशक्तीसामरस्य या अवस्थेपासून भ्रष्ट होणे आहे. यामुळे श्रीशिव स्वतःचे स्वातंत्र्य गमावतात व परतंत्र बनतात. श्रीशिवांना विकल्पज्ञानाच्याविषयी अर्थात् पाच तन्मात्रांविषयी अर्थात् संपूर्ण जगताविषयी अभिलाषा निर्माण होते.।।४६।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

सर्वात श्रेष्ठ अशा अविनाशी चिन्मय पदाला श्रीशिवास्य म्हणजे श्रीशिवस्वरूप म्हणतात. त्याच्या रस म्हणजे मी ते आहे अशा अनुभवापासून तो मी ते नाही अशी भावना व मी केवळ यत्किंचित् जीव आहे असे मानणे हे पशुस्थितीला जाणे होय. त्यामुळे श्रोत्रादि विषय जे सुखदुःख दाखवितील ते खरे मानल्यामुळे पुरुष-जीव-परतंत्र बनतो. मग अमुक विषय प्राप्त झाले नाहीत तर आपले जमणे अशक्य आहे, अशी भावना होऊन जीव त्या विषयांच्या मागे लागतो व त्यांचा अभिलाषी बनतो. "अहं" हा शब्द खरोखर देहाचा वाचक नसून श्रीपरशिवांच्या ज्ञानस्वरूपाचा वाचक आहे. अशा ज्ञानाला परमामृत म्हणतात. या ज्ञानाची सतत जागृती ठेवणे याला त्याचा रस चाखणे म्हणतात. त्या जागृतीचा आपण नाश केला तर आपण परतंत्र बनतो व पंचविषयांच्या तडाख्यात सापडतो. श्रीशिव व शक्ती अभिन्नच आहेत. निरुपाधिक ज्योतिरूप स्वरूपात्म्याला श्रीशिव असे नाव आहे व त्याच्या शक्तीला उन्मेष अगर स्पंद म्हणतात. स्वस्वरूपाच्या सदोदित असण्याला सामान्य स्पंद अगर धर्म म्हणतात. मी परशिव आहे असे जे ज्ञान तेच शक्तीचे स्वरूप होय. निरुपाधिक ज्योतिस्वरूप श्रीशिवतत्त्वच मी आहे अशा ज्ञानाला शक्तितत्त्व म्हणतात. श्रीसदाशिव, ईश्वर व शुद्ध विद्या या तीनही अवस्थांना **"परमामृत"** शब्दच लागू

पडतो. परमेश्वर स्वतः एकच रूप मानतो. त्याला श्रीसदाशिव तत्त्व म्हणतात. अत्यद्भुत ऐश्वर्य माझे आहे असे मानणाऱ्याला ईश्वर म्हणतात. विशुद्ध चैतन्यरूप असे जेव्हा तो मानतो तेव्हा त्याला शुद्ध विद्या म्हणतात. विश्वात्मा व विश्व असे जेव्हा तो मानतो तेव्हा त्याला माया म्हणतात. या मायेचेच पुढे ज्ञान व क्रिया असे दोन भेद पडतात. ज्ञानरूप जेव्हा प्रकट झालेले नसते तेव्हा ते साम्यावस्थेत असते. त्या अवस्थेमध्ये परमेश्वर भावरूपी ज्ञानक्रियारूप असून सुद्धा अंतर्मुख निमेषरूप असल्याने त्याला श्रीसदाशिव अवस्था म्हणतात. ज्यावेळेस त्या शक्तीमध्ये क्रियेचे प्राधान्य उत्पन्न होते त्यावेळेस तिला उन्मेषावस्था म्हणतात. परंतु पर अहंभावाच्या वेळेस ती शक्ती विश्राम पावत असल्याने त्याला ईश्वरदशा असे नाव आहे. ज्यावेळी शक्ती ही ज्ञानाचा उद्रेक होऊन बहिर्मुख होते त्यावेळी बाह्य व अंतर हे दोघे सारखेच आहेत असे जाणून ती स्वरूपाच्या ठिकाणी विश्रांती पावते. या तीनही अवस्थांमध्ये भेदाचे भान जरी होत असले व मायाशक्ती प्रकट रूपाला येत असली तरी सुद्धा सर्वश्रेष्ठ अशा ज्ञानकलेच्या सत्तेने परिपूर्ण असलेल्या अहंकाराच्या म्हणजे श्रीपरशिवतत्त्वाच्या ठिकाणी पुन्हा विश्रांती पावते म्हणून श्रीसदाशिव, ईश्वर व शुद्ध विद्या ही तीन तत्त्वे परमानंद श्रीशिवस्वरूपाला झाकण्याला समर्थ होत नाहीत. श्रीसदाशिवतत्त्वामध्ये निमेष जागृत असतो. श्रीशिवतत्त्वामध्ये उन्मेष जागृत असतो. "अहं" व "इदं" निराळे असे नाना प्रकारचे भेद माया निर्माण करते. ही त्याच्या पुढची अवस्था आहे. ही माया स्वतःच्या सत्यस्वरूपाला विसरणारी व श्रीपरशिवांना क्षेत्रज्ञ करून टाकून मी विश्वरूप आहे अशी भावना पूर्ण करणारी असते. मायातत्त्वामध्ये स्वस्वरूपाचा पूर्ण विसर पडतो. या मायाशक्तीच्या उदयाला प्रत्ययोद्भव असे नाव आहे. "अहं" हे श्रीपरशिवांच्या स्वस्वरूपाचे द्योतक असून तेच सत्यज्ञान आहे. श्रीशिवस्वरूपाच्या ठिकाणी विश्वस्वरूपाच्या भासाने "इदं"तेच्या द्वारा भेद निर्माण करणे हिला मायाशक्ती म्हणतात. खरोखर पाहिले तर श्रीपरशिवांखेरीज एकही वस्तू नाही. "इदं" असे ज्ञान होण्यास खरे म्हणजे श्रीपरशिवांचे ज्ञान हेच कारण आहे. भेदरूपाने दिसत असला तरी तो श्रीपरशिवांचे स्वरूप आहे म्हणून श्रीपरशिवांची जागृती ठेवली पाहिजे. मायेला दैवी माया म्हणतात. विश्व ही परमात्म्याची लीला आहे. ही क्रीडा करण्यात श्रीपरमशिव तत्पर असतात. मायेला गुणमयी म्हणतात; कारण सत्त्व, रज

व तमोगुणांपासून ती भेद उत्पन्न करते. निरनिराळ्या इंद्रियांपासून निरनिराळी सुखदुःखे ही माया दाखविते म्हणून तिला दुरात्मयी माया म्हणतात. या मायेचे उल्लंघन करणे हे मोठ्या कष्टाचे काम आहे. प्रबुद्धाने जरी मोठा उत्साह धारण करून तिचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न केला तरी त्याची संसारी अवस्था तत्काळ नष्ट न होता ती दुर्लंघ्यच ठरते. परंतु द्वैताचा समूळ नाश करून सदासर्वदा ज्ञानस्थितीत राहाणारा असा सुप्रबुद्ध जीव झाला तर सर्व ठिकाणी अभेदत्वाने श्रीपरमशिव आहे याचा त्याला अनुभव येतो व तो संसारसमुद्र तरून जातो. सूर्य असला म्हणजे जशी रात्र येऊ शकत नाही त्याचप्रमाणे ज्ञानस्थिती व ज्ञानसूर्य सतत जागृत ठेवला तर साधकाला मायेची बाधा होत नाही. हा भेदरूपी पर्वत दुसऱ्या कोणत्याही समाधिरूप वज्राने नष्ट होत नाही. **पण श्रीपरशिवांच्या भक्तीचे म्हणजे जागृत शक्तीचे बल धारण करणारे साधकच फक्त द्वैताचा विवेकाने नाश करू शकतात.** द्वैताची भावना माया उत्पन्न करते. त्यामुळे जीव क्षेत्रज्ञ बनतो. त्या जीवाला पशू म्हणतात. मायेमुळे तो परतंत्र होतो. माया इंद्रियादि पृथ्वीच्या ज्ञानाला सत्य मानते. त्यामुळे स्वस्वरूपापासून जीव भ्रष्ट होतो व काल, नियती, कला, विद्या व राग ह्या आत्मस्वरूपाहून भिन्न असलेल्या गोष्टी क्षेत्रज्ञाच्या पाठीमागे लागतात. त्यामुळे तो परतंत्र पशू होतो. स्वतः श्रीपरशिव हे नित्य असून ज्यावेळी ते क्षेत्रज्ञरूपाला म्हणजे जीवदशेला येतात त्यावेळी ते स्वतः भूत, भविष्य व वर्तमान काळाचे ज्ञान पाठीमागे लावून घेतात. त्यांना काळरूपी दोष प्राप्त होतो. स्वतःची स्वतंत्र अवस्था व पदार्थमात्र मी व्यापून आहे हे तत्त्व जीव विसरून जाऊन तो नियतीच्या तडाख्यात सापडतो. त्यामुळे आपण इतकेच कार्य अमुकच कारण असल्यास करू शकू अशी त्याची भावना होते. त्याचप्रमाणे सर्वकर्तृत्व व सर्वज्ञत्व हे श्रीपरशिवांचे सहज गुण नष्ट होऊन किंचित् कर्तृत्व-स्वरूप अशा दोषांनी तो युक्त होतो. नित्यतृप्तत्व हा गुण व निरभिलाष ही वृत्ती नाहीशी होऊन मला अमुक हवे व अमुक नको अशा प्रकारच्या रात्ररूपी वासनेच्या योगाने जीव बद्ध होतो. ही पराधीनता येऊन जीव पशुसत्तेने मायेच्या तडाख्यात सापडला की, काल, नियती, कला, विद्या व राग ही पाच प्रकारची संतती त्याच्यामागे लागते. ही संतती जीवाच्या श्रीपरशिवस्वरूपाला झाकून टाकून त्याला पशू बनविते. याचप्रमाणे मायेच्या तडाख्यात सापडल्यामुळे प्रत्येक प्राण्यामध्ये प्रत्येक

प्रकारची बुद्धी उत्पन्न होते व ती प्रत्येकाला श्रीपरशिवांपासून भ्रष्ट करते. यालाच प्रत्ययोद्भव म्हणजे विषयांचे ज्ञान असे म्हणतात. त्यामुळे सर्वमय श्रीशिव मी आहे हे भान नष्ट होऊन शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध यांना ग्रहण करणारी इंद्रिये हीच मी आहे अशी भावना होते. ग्राह्य, ग्रहण व ग्राहक यापासून त्रिपुटी निर्माण झाली. या त्रिपुटीला मायेनेच निर्माण केले. गृहीता म्हणजे द्वैत मानणारा होय. हा पशुग्राह्य आकाशादि पंचमहाभूतांच्या आधाराने असणाऱ्या शब्दादि विषयांचे ग्रहण करतो. यालाच तन्मात्रा म्हणजे विषय म्हणतात. त्या सूक्ष्म आहेत. अशा रीतीने पंचमहाभूते व पंचविषय या दहाही गोष्टी मायेच्या परिवाराचा परिवार आहेत. त्यांचा अनुभव घेणारा असा हा परवश पशू आहे. परवश झाल्यामुळे तो विषय बनतो व इष्ट वस्तूंचे ग्रहण आणि अनिष्ट वस्तूंचा त्याग करण्याची इच्छा करतो. त्याकरिता त्याला साधनाची जरूर लागते. त्यातील मुख्य साधन म्हणजे विषयांना व आत्मतत्त्वाला ग्रहण करणारी बुद्धी होय. दुसरे साधन म्हणजे अनात्म देहाला आत्मा मानून देहाला विपरीत स्थान प्राप्त करून देणारा अहंकार होय. जेव्हा हा अहंकार उद्योग करण्यास प्रवृत्त होतो त्यावेळी तो परमात्म्याच्या ठिकाणी विषयाची कल्पना करतो. त्याला साहाय्यभूत असे तिसरे साधन म्हणजे सदा संशयात राहणारे मन होय. अंतःकरण हे आत्मस्वरूपाची भावना करून देणारे श्रीपरमशिवस्वरूप असताना रजोगुणाच्या योगाने मन बनते. हे अंतःकरणच सत्त्वगुणाने बुद्धिरूप व तमोगुणाने अहंकारयुक्त बनते. असे हे त्रिविध बनलेले अंतःकरण हे आत्म्याच्या साधनाकरिता पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये आपल्या ताब्यात घेते. पंच ज्ञानेंद्रिये व पंच कर्मेंद्रिये यांना बाह्य विषय म्हणण्यात येते. मन, बुद्धी व अहंकार यांना अंतरिंद्रिये म्हणतात. याप्रमाणे आकाशादि पंचस्थूल महाभूते, शब्दस्पर्शादि पंचसूक्ष्म भूते, पंच ज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, मन, बुद्धी व अहंकार ही तेवीस तत्त्वे करण-वर्ग व कार्य-वर्ग यांमध्ये मोडली जातात. या तेवीस तत्त्वांना विषयाकडे प्रवृत्त करणारे दुःख हे प्रधान तत्त्व आहे. प्रत्येक प्राण्याच्या स्वतःच्या वासनेप्रमाणे इष्ट गुणांची प्राप्ती झाली तर तो स्वतःला सुखी मानत असतो. त्या सुखाला अनित्यानंद म्हणतात. वासनांनी प्रेरणा केलेला जीव इष्ट विषयप्राप्तीकरिता प्रयत्न करीत असतो. जीवाला इष्ट विषय मिळाला नाही की, अशांती उत्पन्न होते. यालाच दुःख म्हणतात. यामुळे जीव अनिष्ट विषयांचा त्याग

करावयाचा प्रयत्न करतो. अशा रीतीने सुखाकरिता व दुःखनिवृत्तीकरिता रात्रंदिवस प्रयत्न करणारा जीव मायेच्या मोहात सापडलेला असतो. तेव्हा या सर्वाला प्राणिमात्रांच्या नाना प्रकारच्या वासनानुसार कार्यकारणरूपाने प्रवृत्ती करविणारे असे राग म्हणून प्रधान तत्त्वच मूळ कारण आहे. राग म्हणजे शब्दस्पर्शादि मायेच्या पाच मुलांपैकी कोणतीही इच्छा करणारा एक मुलगा आहे. रागाचे स्थूलरूप अभिलाषा आहे. अशी ही एकंदर चोवीस तत्त्वे आहेत. त्यांना पंचतन्मात्रगोचर असे म्हटले आहे. श्रीशिव, शक्ती, ईश्वर, सदाशिव व शुद्ध विद्या ही पहिली पाच तत्त्वे होत. माया, कला, विद्या, राग, काल व नियती ही दुसरी सहा तत्त्वे मिळून अकरा तत्त्वे होतात. वासना पशूला खाली ओढून टाकणारी प्रकृती व खालची चोवीस तत्त्वे आहेत. अशा या छत्तीस तत्त्वांची रूपे धारण करणारी ही सर्व श्रीपरमशिवाची परमेश्वरी शक्ती आहे. त्याचप्रमाणे स्वतःच्या चैतन्य स्वरूपाचा विसर पडणे हे जीवदशेला येण्याचे मूळ कारण आहे. श्रीशिवांनी जीवदशा प्राप्त करून घेतली की तो शक्तींच्या ताब्यात जातो व पशूचे जसे हाल होतात तसे भिन्नभिन्न शक्ती त्याचे हाल करतात. जीवाला आपल्या स्वरूपाचे स्मरण होऊ नये म्हणून या शक्तींचा सतत उद्योग चाललेला असतो. याचे कारण पुढील श्लोकात सांगितले आहे.।।४६।।

**श्रीरामकंठाचार्य विवृत्ती :-**

हे पारतंत्र्य त्याला अर्थात् श्रीशिवाला कसे येते याबद्दल सांगतात-

**स्पष्टीकरण :-** प्रत्ययोद्भव म्हणजे अनुभवरूप ज्ञानाची उत्पत्ती होय. पुरुषाच्या संकुचित अवस्थेमुळे या ज्ञानाचा मूलस्रोत त्याच्या दृष्टीने स्वस्वभाव न राहता शब्दादि विषय (तन्मात्रे) राहतात. त्यामुळे प्रत्ययाच्या बाबतीत त्याला बाह्य विश्वावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे जाग्रदावस्थेत तो इंद्रियपरतंत्र व स्वप्नदशेत अंतःकरणपरतंत्र होतो. सुषुप्तीत तो या दोहोतून मोकळा असला तरी अज्ञानांधःकारात पडलेला असतो म्हणून कोणत्याही अवस्थेत तो पशूच म्हणजे परतंत्रच होय. काही योग्यांची स्थिती सुद्धा अशीच असते. जाग्रदादि अवस्थांना अनुसरून त्या योग्यांना सकल, विज्ञानकाल आणि प्रलयकेवली अशी संज्ञा आहे. हे योगीसुद्धा कार्म, मायीय व आणवमलांनी आवृत्त झालेले असतात म्हणून तेही परतंत्रच असल्याने पशूच होत. कोणत्याही अवस्थेमध्ये यांची परामृतरसापासून प्रच्युती झालेलीच असते.[१]

**टीप १ :-** याची थोडक्यात कल्पना येण्यासाठी जिज्ञासूंनी **"त्रिपुरा-रहस्य"** हा ग्रंथ पाहावा. या ग्रंथाचा मराठी अनुवाद **"दत्तभार्गव-संवाद"** या नावाने प्रसिद्ध आहे.

अविनाशी, अद्वय आणि चिन्मय स्वस्वभावाचे जे श्रीशिवसंज्ञक स्वरूप, त्याला येथे **"परामृत"** म्हटले असून त्या स्वरूपाचा प्रत्यवमर्शात्मक आस्वाद म्हणजे रस होय. **"परामृतरस"** म्हणजे स्वस्वरूपाच्या अद्वयानंदाचा अनुभव होय. या अनुभवापासून पशूची प्रच्युती झालेली असते. या प्रच्युतीच्या स्वरूपाचे नीट आकलन झाले पाहिजे.

अहंप्रत्यय (मीपणाची जाणीव) व इदंप्रत्यय (हेपणाची जाणीव) हे दोन्ही प्रत्यय आपल्या नित्यपरिचयाचे आहेत. अहंप्रत्यय आपल्याशी अभिन्नत्वाने येत असतो. तो केवळ प्रकाशरूप असून त्यात केवळ मीपणाचे स्फुरण असते. हाच श्रीशिवस्वभाव होय. सहजानंदमयता हा त्याचा शाश्वत धर्म असल्याने त्याला येथे परामृत असे म्हटले आहे. इदंप्रत्यय असा नसतो. "इदम्" असे म्हणताच आपल्याहून वेगळे काहीतरी अशी आपली भावना होते. इदंप्रत्यय भेदमूलक आहे. अहंप्रत्ययाला भेदाचा संस्पर्शही होत नाही.

पण आपण जेव्हा या अहंप्रत्ययाचा परामर्श करावयास जातो तेव्हा हा अहंप्रत्ययच परामर्शाचा विषय बनतो व त्याला इदंता येते. आपला जो अहंरूप प्रत्यय होता तो आता इदंरूप विषय झाला. हा भेद केवळ कल्पनेने आपण केलेला आहे ही गोष्ट येथे जरूर लक्षात ठेवली पाहिजे. वस्तुतः "अहं" व "इदं" यांचा येथे अभेद आहे. परामर्शाच्या अवस्थेत परामर्श करणारा "अहं" आहे; ज्याचा परामर्श करावयाचा तोही "अहं" आहे व परामर्शव्यापारसुद्धा "अहंचेच" स्फुरण आहे. **"अहं" आणि "इदं" यांची अशी तादात्म्यप्रतीती येणे हाच रसास्वाद होय. यालाच "श्रीशिवशक्तीचे सामरस्य" असे म्हटले आहे. श्रीशिव प्रकाशरूप आहेत व शक्ती विमर्शरूप आहे म्हणून संपूर्ण विश्व हे प्रकाशविमर्शमय आहे.**[२]

**टीप २ :- "स्वाकार इव अभिन्नोऽपि गोचरीकृतः।।"** म्हणजे साकाराप्रमाणे अभिन्न असूनही इंद्रियांचा विषय झालेला आहे. असे रसाबद्दल काव्यप्रकाशात म्हटले आहे. तेथेही अहंतेचे व इदंतेचे ग्रहणच अभिप्रेत आहे.

श्रीशिव-शक्ती यांच्यात वस्तुतः अभेद आहे. पण त्यांचे स्वरूप समजावून सांगताना त्यांच्याच केवळ सोयीच्या दृष्टीने भेद कल्पिला आहे व प्रतिपादनाच्या वेळी केव्हा एकावर तर केव्हा दुसऱ्यावर भर दिला आहे. उदाहरणार्थ, त्याच एकमेव वस्तूचे निरुपाधिक प्रकाशप्राधान्याने प्रतिपादन करावयाचे असले तर तिला श्रीशिव म्हणावयाचे व विमर्शप्राधान्याने प्रतिपादन करावयाचे म्हणजे तिला शक्ती म्हणावयाचे. विमर्शात्मक शक्तीलाच उच्छूनता, प्रत्यवमर्श, सामान्य स्पंद, उन्मेष इत्यादि संज्ञाही देण्यात येतात. या चिन्मयशक्तीचा विलास हेच खरोखरी बाह्य विश्व आहे.

श्रीशिव हा प्रकाशदृष्टीने केवळ चिन्मय आहे व विमर्शदृष्टीने विश्व आहे. चिन्मयता हे त्याचे आंतररूप आहे व विश्वात्मकता हे त्याचे बाह्यरूप आहे. श्रीशिवाच्या या विश्वात्मक स्वरूपाकडे पाहिले म्हणजे तेथे ज्ञेयता आणि कार्यता हे दोन धर्म दिसतात. पण विश्वाची ज्ञेयता आणि कार्यता हा श्रीशिवांच्या ज्ञानशक्तीचा व क्रियाशक्तीचाच विकास आहे. श्रीशिवांची ही ज्ञानक्रियारूपशक्ती निमिषित म्हणजे अंतर्मुख असते तेव्हा ती केवळ प्रकाशमयच असते व ती उन्मिषित होते तेव्हा ती बहिर्मुख होऊन विश्वरूपाने अवभासित होते. शक्ती अंतर्मुखतेने निमिषित असता तिला **"श्रीसदाशिव"** अशी संज्ञा आहे व ती बहिर्मुखतेने उन्मिषित होऊन क्रियाप्राधान्याने प्रकट होते तेव्हा त्या शक्तीला **"ईश्वर"** अशी संज्ञा आहे. पण ही शक्ती उन्मिषित असो की निमिषित असो दोन्हीही अवस्थात शक्तीचा आश्रय मात्र एक श्रीशिव हेच असतात. निमिषित अवस्थेत अहंप्राधान्य असते तर उन्मिषित अवस्थेत इदंप्राधान्य असते. पण अहंप्राधान्य असो की इदंप्राधान्य असो त्या दोहोंचाही आश्रय एकच स्वस्वभाव हाच असतो. अहंप्रत्यय आणि इदंप्रत्ययाचे हे सामानाधिकरण्य जाणवणे हीच "विद्या" किंवा शुद्ध विद्या होय.[१] या भूमिकेवर आरूढ झालेल्या साधकास "विद्येश्वर" अशी संज्ञा आहे.

**टीप १ :-** या दृष्टीने **"प्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**ईश्वरो बहिरुन्मेषो निमिषोऽन्तः सदाशिवः।**
**सामानाधिकरण्यं हि सद्विद्याहमिदं धियोः।।**

**अर्थ :-** श्रीसदाशिव, ईश्वर व विद्या या तीनही अवस्था "अहम्-इदं"

या द्विविध स्फुरणावरच आधारलेल्या असल्याने त्यांच्यात कल्पित भेदप्रतीती आहेच. या भेदप्रतीतीला कारणीभूत झालेले विकल्पन हीच मायाशक्ती होय. या मायाशक्तीमुळेच म्हणजे विकल्पनामुळेच अहंप्रत्ययाला इदंता आली. येथे अशा प्रकारे मायाशक्तीचा प्रवेश असला तरी अहम् व इदंचे सामानाधिकरण्य सारखे जाणवत असल्यामुळे व ही विकल्पनरूप मायाशक्ती सुद्धा व्यापक अहंतेतच विश्रांत झालेली असल्यामुळे तिची प्राधान्याने वेगळी प्रतीती येत नाही व त्यामुळे अहंप्रत्ययाची परमानंदताही तिरोहित होत नाही. त्यामुळे श्रीसदाशिव-ईश्वर-विद्या या दशेतही परमामृतरसाचा आस्वाद लाभतो.

या मायाशक्तीलाच कारिकेत **"प्रत्ययोद्भव"** असे म्हटले आहे. जरी विद्येश्वराच्या भूमिकेपर्यंत मायेने कल्पित भेद केलेला असला तरी अहंता, इदंता व माया या तिघींचाही स्वभाव हा एकच आश्रय असल्याची जाणीव कायम असल्यामुळे विद्येश्वरापर्यंतचा हा भेद व हा सर्व प्रत्यय परामृतरसापासून प्रच्युत झालेला नसतो. त्यामुळे विद्येश्वराच्या भूमिकेवरून झालेली विश्वनिर्मिती ही एक क्रीडा असते व ती आनंदमयच असते.

पण ज्यावेळी अहंप्रत्यय व इदंप्रत्यय यांची अधिकरणे भिन्न आहेत असे आपणास खरोखरीच वाटावयास लागते तेव्हा अहं व इदं असा परस्परनिरपेक्ष पृथक् भाव जागृत होतो. या पृथक्तेबरोबर अहं व इदं या प्रतीतींना मर्यादा पडते व अहं-प्रतीतीचा संकोच होतो. या संकोचा-बरोबर त्याचे ज्ञातृत्व व कर्तृत्व यांचाही संकोच होतो. अहंप्रतीतीच्या व्यापकतेवर पडणारे हे भेदमूलमायेचे आवरण याला शैवागमात **"कंचुक"** अशी संज्ञा आहे. शैवागमात काल, नियती, राग, अविद्या आणि कला असे पाच कंचुक मानले आहेत.[२] आत्म्याच्या या संकोचाबरोबर त्याचे स्वातंत्र्य लयास जाते व तो "पशू" बनतो.

**टीप २ :-** कला ही मायेची निर्मिती आहे म्हणून तिला मायेचा पहिला कंचुक म्हणतात. कलाकलना = विकल्पन. विकल्पन हेच मायेचे पहिले आवरण होय. विद्येश्वराचा प्रत्यय या विकल्पनांतून अभिव्यक्त होत असतो. त्यामुळे प्रबुद्धाच्या दृष्टीने कला ही चिन्मयशक्तीचा मूर्त अविष्कार आहे. त्यामुळेच तिला "अनुभवाहित संस्कार" असे म्हणतात. पशूला मात्र कला ही नियत निर्मिती वाटत असते म्हणून त्याचा कलाप्रत्यय काल, नियती, राग यांनी शबल होतो. त्यामुळेच प्रबुद्धाकरिता कला "स्वमार्गस्थ" असते

तर पशुकरिता "बंधक" ठरते असे १८ वी कारिका म्हणते.।।४६।।

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

श्रीभट्टकल्लटवृत्ती कारिका क्रमांक ४६ ची वृत्ती कारिका क्रमांक ४८ च्या बरोबर दिली आहे.

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

आता या कारिकेत ग्रंथकार संकुचित झालेल्या संवित्शक्तीकडून श्रीपरमशिव कसा काय त्रासला जातो? तो पाश्य म्हणजेच पाशांनी कसा काय बांधला जातो? हे सांगत आहेत.

**स्पष्टीकरण :-** त्या पशूच्या लौकिक आणि शास्त्रीय विकल्पांचा आणि त्याच्यामध्ये अधिष्ठित असणाऱ्या भिन्न भिन्न अर्थांच्या (पदार्थांच्या) ज्ञानाच्या विकल्पांचाही उद्भव म्हणजेच क्षय उत्पन्न होतो. त्यामुळे श्रेष्ठ असा अमृतरस म्हणजेच चिद्घन-आनंदाची निर्मिती दूर जाते अथवा नष्ट होते. उत्पन्न झालेल्या भिन्न भिन्न पदार्थांच्या अनुभवांमध्ये चिद्भूमी स्थित असूनही तिचे ज्ञान होणे शक्य नसल्याने ती तेथे नाही असेच वाटते. त्यामुळे असे सांगितले. या अनुभवामधून उत्पन्न होत असल्यामुळे हा जीव अस्वतंत्र होतो अथवा परतंत्रतेला प्राप्त होतो. यासंबंधी **"श्रीशिवसूत्र"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की **"ज्ञानं बन्धः"** अर्थात् "ज्ञान बंधाला कारणीभूत आहे."(१।२) श्रीव्यासमुनींनीही असे म्हटले आहे की, "बालक लहानपणी माता-पित्यांवर अवलंबून असते." श्रीमदालसेनेही यासंबंधी असे म्हटले आहे की -

**तातेति किञ्चित्तनयेति किञ्चित् अम्बेति किञ्चिद्दयितेति किञ्चित्।**
**ममेति किञ्चिन्न ममेति किञ्चित् भौतं सङ्घं बहुधा मा लपेथाः।।**
**।। मा.पु. २५।१५।।**

**अर्थ :-** आई, वडील, पुत्र, प्रिया, माझे व माझे नसणारे या सर्व भौतिक गोष्टींमध्ये (तू) बहुधा संबंध ठेवू नकोस.

प्रत्यय अथवा ज्ञानामधून उत्पन्न होणाऱ्या तन्मात्रा ह्या तीव्र, मंद या प्रकारांनी सामान्यपणे प्रवृत्त होत जोपर्यंत गोचर होत आहेत अर्थात् जोपर्यंत शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध या तन्मात्रा सामान्यतः तीव्र व मंद रूपाने इंद्रियांना जाणवत आहेत तोपर्यंत तशा प्रकारचा असलेला जीव हा ज्ञेय विषयांना भिन्नतेने जाणणारा असतो. याचा अर्थ असा आहे की, जोपर्यंत हे विविध प्रकाराने विषयांचे ज्ञान होत असते तोपर्यंत जीव हा

बद्ध असतो. ज्यावेळेस वर सांगितलेल्या उपदेशानुसार जीव हे सर्व विश्व आत्ममयच आहे असे दृढपणे ज्ञान मिळवितो त्यावेळेस तो या जन्ममरणचक्रातून सुटून् जीवन्मुक्त बनतो. यासंबंधी **"इति वा यस्य संवित्तिः।।३०।।"** अर्थात् "असे ज्याचे ज्ञान असते" असे म्हटलेच आहे त्याचप्रमाणे पूर्वीही असे म्हटले आहे की, **"तस्माच्छब्दार्थचिन्तासु न सावस्था न यः शिवः।।२९।।"** अर्थात् "शब्द व अर्थ यांच्या विचारात अशी एकही अवस्था नाही जी श्रीशिव नाही." त्या कारिकांमध्ये आणि या कारिकेत सांगितलेल्या विचारांमध्ये काहीही वैषम्य अथवा विरोध नाही.।।४६।।

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

आता पशुभावाला प्राप्त झालेला जीवात्मा परिच्छिन्नज्ञानशक्तीने अर्थात् संकुचित ज्ञानशक्तीने बद्ध होतो त्याचप्रमाणे पाशभोग्याचा जन्म होतो, हे विभागशः **"परामृतरसापायस्तस्य .....।।४६।।"** या कारिकेत वर्णन केले आहे. स्वरूप अवगत न झाल्याने पशुरूपतेला प्राप्त झालेल्या पुरुषविशेषाच्या बाबतीत लौकिक व शास्त्रीय अशा विभिन्नपदार्थज्ञानात्मक अर्थात् विविध पदार्थांच्या ज्ञानाने युक्त विकल्पांचाही उद्भव होतो.

या विकल्पांचा उद्भव म्हणजेच परामृतरसरूप चिद्घनाचे आणि सर्व उपाधींनी रहित सर्वव्यापक-शिवात्मायुक्त आनंदाच्या प्रसारणाचे नष्ट होणे होय. भिन्न अर्थांमध्ये उत्पन्न होणाऱ्या प्रत्ययांमध्ये (अनुभवांमध्ये) स्थिर राहूनही चिद्रूपता परामृष्ट असते अर्थात् त्या प्रत्ययांचा तिला स्पर्श होत नाही. त्यामुळेच ती अस्थिर असल्याप्रमाणे भासते. वर सांगितलेल्या प्रत्ययाच्या उत्पन्न होण्याने हा जीव स्वाधीन न होता पराधीन बनतो. अशा स्थितीत अज्ञानाने युक्त होऊन परस्परांना पीड्य-पीडकभावाने स्थित असणारे जीव हे पशूच होतात. तन्मात्रगोचर म्हणजे भिन्न जाणीवेचे विषय होत. जोपर्यंत जीवाला भिन्न भिन्न जाणीवा होत राहतात तोपर्यंत तो पाशबद्धच असतो. ज्यावेळेस पूर्वजन्मी केलेल्या पुण्यकर्मांच्या परिपाकामुळे श्रीसद्गुरूंचा उपदेश अर्थात् शक्तिपातयोगदीक्षा घेऊन सर्व जग श्रीशिवस्वरूपच आहे असे अपरोक्ष ज्ञान हृदयात उत्पन्न होईल त्यावेळेस तो मुमुक्षुजन जीवन्मुक्त होईल.।।४६।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**स्वरूपावरणे चास्य शक्तयः सततोत्थिताः।**
**यतः शब्दानुवेधेन न विना प्रत्ययोद्भवः।।४७।।**

**अन्वयार्थ :-**

**अस्य** - या पुरुषाच्या, आत्म्याच्या, **स्वरूपावरणे :-** स्वरूप झाकण्याच्या बाबतीत, **शक्तयः** - पूर्वी उल्लेखलेल्या "शब्दराशी" पासून निर्माण झालेल्या ब्राह्मी इत्यादि शक्ती, **सततोत्थिताः** - नेहेमी उद्युक्त असतात, **यतः** - कारण, **शब्दानुवेधेन विना** - स्थूल किंवा सूक्ष्म शब्दांनी अनुस्यूत असल्याशिवाय, **प्रत्ययोद्भवः** - विकल्प ज्ञानाचा प्रत्यय अथवा निर्मिती, **न** - होऊ शकत नाही.।।४७।।

**अर्थ :-** ही गोष्ट निश्चित आहे की, पूर्वी वर्णिलेल्या शक्ती या पुरुषाच्या किंवा आत्म्याच्या स्वरूपाला झाकून टाकण्यासाठी नेहमी उद्युक्त किंवा प्रयत्नशील असतात; कारण स्थूलं व सूक्ष्म शब्दांनी अनुस्यूत झाल्याशिवाय प्रत्ययोद्भव अर्थात् विकल्पज्ञानाची निर्मिती होऊ शकत नाही.।।४७।।

❋❋❋❋❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

भिन्न भिन्न शक्ती मी स्वतः श्रीपरमशिवरूप आहे या जागृतीला आवरण टाकण्याकरिता व शब्दसृष्टी ही खरी आहे असे भासविण्याकरिता जीवाला पशू बनवितात. त्याची पशुकाया कायम ठेवण्यासाठी ह्या सर्व शक्तींचा कायम प्रयत्न असतो. या प्रयत्नामुळे एकदा जीवाला स्वस्वरूपाचा विसर पडला की, तो परतंत्र बनतो व त्याचे स्वातंत्र्य नाहीसे होते. त्यामुळे परमात्म्याच्या ऐवजी पदार्थ आहे, प्रपंच आहे व तो सत्य आहे हे भासविण्याचा या शक्तींचा सतत प्रयत्न चालू असतो. इंद्रियांच्या वृत्ती जीवाला विषय दाखवितात. परमात्मा दाखवीत नाहीत. विषय खरा मानणे म्हणजेच सत्य परमेश्वराच्या स्वरूपाचा अवभास करणे आहे. विमर्शाऐवजी म्हणजे मी परमात्मा आहे या सर्वश्रेष्ठ भावनेऐवजी प्रत्यामर्श म्हणजे मी परमात्मा नाही असे जीव मानू लागतो. नाना प्रकारच्या जाती आहेत, निरनिराळ्या प्रकारचे गुण आहेत, अनेक रूपांनी परमात्मा बनला आहे व विश्व खरे आहे असे ज्याच्या योगाने मानले जाते त्याला विकल्प म्हणतात. विकल्प उत्पन्न करणे हे शब्दाचे मुख्य कार्य आहे. स्वरूप म्हणजे परमात्मरूप

दाखविणे व विकल्प म्हणजे परमात्मा नसून पदार्थ आहेत असे दाखविणे होय. अशा संकल्पाने स्वतःला ऐकू येईल अशा विचाराच्या ध्वनीला शब्द ही संज्ञा आहे. त्यामुळे जीवाच्या परमात्मस्वरूपाला आचरण करण्यास प्रपंच हा खरा आहे असे भासविणाऱ्या व शब्दरूपाने नटलेल्या या सर्व शक्ती आहेत. शब्द नाहीतच हे नेहमी लक्षात ठेवावे. याकरिता जो या शब्दांना व विषयांना खरे मानतो तो या शक्तिवर्गाच्या ताब्यातला पशू आहे असे समजावे. **याप्रमाणे शब्दरूपी शक्ती ही त्या श्रीपरमशिवांशी अभिन्न असणारी चिती म्हणजे "त्रिपुरसुंदरी" आहे. हिलाच "ज्ञानकला" म्हणतात.** हे लक्षात ठेवल्यास त्या जीवाला मोक्ष प्राप्त होतो. तसे ध्यानात न राहिल्यास जीव संसार बंधनात पडतो.

या पुरुषाच्या स्वरूपाला म्हणजे स्वभावाला आच्छादित करण्यासाठी शब्दरूप शक्ती नेहमीच उद्यत राहतात. याचा अर्थ असा की, क्रियाशक्तीच्या द्वारा या शक्ती पुरुषरूपाला नेहमीच झाकून टाकण्याची इच्छा करतात; कारण शब्दानुवेधाशिवाय अर्थात् वर्णानुगमाशिवाय कोणत्याही ज्ञानसंवेद प्रत्ययाचा उदय होत नाही. वास्तविक हे शब्द एकच तत्त्व वाच्य व वाचक अशा दोन विभागात वाटून दोन रूपांनी प्रकट करतात. **"वाक्य-पदीय"** या ग्रंथामध्ये बरोबर असेच लिहिले आहे की, "ज्यात शब्दाचा अनुगम होत नाही असा कोणताही प्रत्यय असत नाही." सर्व ज्ञान शब्दात मिसळलेले व गुंफलेले दृष्टीस पडते. वाक् हे या विश्व-व्यवहाराचे कारण आहे हे प्रथमच सांगितले आहे. इतरत्र शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, "हे देवा! चिच्छक्तीच्या उन्मुखतेत, उन्मीलनात किंवा ऊर्ध्वमुखतेत सदासर्वदा बोधच वाग्रूपाने राहतो. प्रत्यक्षात तीच प्रत्यवमर्शिनी शक्ती आहे. तिच्याशिवाय प्रकाश सुद्धा प्रकाशित होऊ शकत नाही. ही क्रियाशक्तीच बंधनाला व मोक्षाला कारण होते. ।।४७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** पशूला स्वशक्तीचा विसर झालेला असतो आणि प्रत्यय तर सारखे उदित होत असतात. त्यामुळे पशूला असे वाटते की, हे प्रत्ययात्मक विश्व शब्दादिकांच्याच शक्तीने झाले आहे. विश्व हे माझ्या शक्तीचे विजृंभण आहे ही जाणीव त्याला नसल्याने विश्व हे शब्दशक्तीचा

विलास आहे असे त्याला वाटते. कारण उघड आहे. अहंता व इदंता यांच्या सामानाधिकरण्याच्या भूमिकेवर उदित होणारा प्रत्येक इदंतारूप प्रत्यय अहंतेचाच विलास आहे ही प्रबुद्धाची जाणीव कायम असते. पण इदंतेचा आश्रय वेगळा झाला व अहंतेचा विसर पडला म्हणजे पशूचे प्रत्ययात्मक विश्वही केवळ द्वंद्वतेवरच आश्रित होते. त्यामुळे पशूचा कोणताही प्रत्यय शब्दाच्या आश्रयाशिवाय उदितच होत नाही. ज्ञानशक्ती माझ्यात नसून शब्दात आहे असे पशूला वाटत असते. या दृष्टीने **"वाक्यपदीय"** या ग्रंथात **"श्रीभर्तृहरीने"** असे म्हटले आहे की -

**न सोऽस्ति प्रत्ययो लोके यः शब्दानुगमं विना।**
**अनुविद्धमिव ज्ञानं सर्व शब्देन भासते।।**

याचा अर्थ असा आहे की, लौकिक जीवनातील एकही प्रत्यय शब्दाशिवाय उदित होत नाही. त्यामुळे ज्ञान जणू शब्दानेच अनुविद्ध झाल्यासारखे भासते.

शब्द हा खरोखरी प्रत्यवमर्शरूप आहे; कारण अवच्छिन्न व विशुद्ध प्रकाशाचा तो अभिव्यंजक म्हणूनच त्याला विश्वात स्थान आहे. त्यामुळे शब्द जोपर्यंत त्या प्रकाशाला अभिव्यक्त करतो तोपर्यंतच तो "प्रत्यवमर्शात्मक" असतो. पण ज्यावेळी तो जाती, गुण, क्रिया, द्रव्य इत्यादि भेदात्मक अवभासांचा बोधक होतो तेव्हा तो शब्दसुद्धा एक "विकल्प" ठरतो; कारण हे भेदच मुळी विकल्पात्मक आहेत. लौकिक व्यवहारात मात्र जात्यादि विकल्पच शब्दाचे मुख्य संकेत झाले आहेत. ।।४७।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

श्रीभट्टकल्लटवृत्ती कारिका क्रमांक ४७ ची वृत्ती कारिका क्रमांक ४८ बरोबर दिली आहे.

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

जरी हा संकुचित झालेला जीव प्रत्यय म्हणजेच अनुभवयुक्त ज्ञानातून उत्पन्न होत असला तरीही त्याला श्रेष्ठ अमृतरसापासून अलग व्हावे लागते; मग तो शक्तिवर्गांकडून भोगला जाणारा आहे असे कसे काय म्हटले आहे? या शंकेचा परिहार ग्रंथकारांनी या कारिकेत केला आहे.

**स्पष्टीकरण :-** "च" हे पद शंका व्यक्त करीत त्या शंकेचा परिहार करणारे दुसरे प्रमेय व्यक्त करते.

या पशूचा श्रीशिवात्मक स्वभाव आवरणामध्ये आधाररूपाने व्यक्त होत असूनही त्याचे योग्य प्रकारे (जीवाला) ज्ञान होऊ नये म्हणून या शक्ती नेहमीच तयार असतात. जोपर्यंत (जीवाला) परामृतरसात्मक स्वस्वरूपाचे प्रत्यभिज्ञान होत नाही तोपर्यंत या शक्ती त्या स्वरूपाला झाकून ठेवण्यास तयारच असतात; कारण जो ज्ञानापासून उत्पन्न होणारा निश्चित आणि अनिश्चित ज्ञानाचा प्रवाह असतो तो "मी हे जाणतो" अशा प्रकारच्या सूक्ष्म शब्दांशाच्या अनुरंजनाशिवाय अथवा स्थूल बोलण्याशिवाय शक्य नाही.

अशा प्रकारे खालच्या दर्जाच्या प्राणिमात्रांकडेही ध्वनींच्या उपयोगांमध्ये गुंतलेली वैचारिक शक्ती असते. जर त्यांना अंतःकरणातील गंभीर गोष्ट सांगावयाची असेल तर ते डोके हलवून सांगतात. अर्थातच त्यांच्याकडे शब्दाचा उपयोग कसा करावयाचा हे ज्ञान असते. असे जर नसते तर अंतर्गत ऊहापोहांचे ज्ञान नसल्याने लहान बालकाला पहिल्या संकेताचे ग्रहणच करता येणार नाही. अर्थातच त्याला कोणतीही भाषा येत नसल्याने त्याच्याशी सर्व नियमांनी बांधलेल्या भाषेतले पहिल्यांदा बोलले गेलेले समजणारच नाही. स्थूल शब्दाच्या संपर्काने युक्त असणारा हा विकल्प अथवा विचार सर्वांच्या अनुभवानेच सिद्ध होत असतो.।।४७।।

*****

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

शक्तिवर्गाच्या भोग्यरूपतेचे निरूपण "**स्वरूपावरणे .....।।४७।।**" या कारिकेत केले आहे. पूर्वी या श्रीब्राह्मी आदि शक्तींचे स्वरूप वर्णन केले आहे. त्या सर्व शक्ती पुरुषाच्या स्वस्वरूपतेला प्रतिक्षण झाकून टाकत असतात. अभेदकारण हे शब्दाच्या सहकार्याशिवाय कोणत्याही प्रकारे प्रत्ययात्मक (अनुभवात्मक) विकल्पज्ञानाचा उदय न होणारे असे असते. कारणाविना कार्याचा उदय होत नाही त्यामुळे ह्या विकल्पज्ञानाचा उदय होत नाही.।।४७।।

*****

**सेयं क्रियात्मिका शक्तिः शिवस्य पशुवर्तिनी।**
**बन्धयित्री स्वमार्गस्था ज्ञाता सिद्ध्युपपादिका।।४८।।**

**अन्वयार्थ :-**

**सा इयम्** - ती ही- मातृका "अक्षराधिष्ठित देवताशक्ती", वस्तुतः, **शिवस्य** - श्रीशिवांची, **क्रियात्मिका शक्तिः** - क्रियाशक्ती आहे, पण ती "बहिर्विमर्श" या अवस्थेत, अज्ञानदशेत, **पशुवर्तिनी** - "पशू" पाशबद्ध अथवा मलयुक्त जो आत्मा त्याच्यामध्ये आढळणारी स्थूल क्रिया, (होते व त्यामुळे) **बन्धयित्री** - बंधनकारक, (होते पण ती जेव्हा याचे उलट) **स्वमार्गस्था** - आपल्या मूळच्या श्रीशिवमार्गावर स्थिर होते, श्रीशिवमार्गाकडे वळते, (तेव्हा) **ज्ञाता** - तिच्या वास्तविक रूपात ज्ञान झाल्यावर, (ती) **सिद्ध्युपपादिका** - ती सिद्धी-मोक्ष-दायक होते. ।।४८।।

**अर्थ :-** ती ही श्रीशिवाची स्वतंत्र क्रियाशक्ती आहे जी बहिर्विमर्श अर्थात् बहिर्ज्ञानाच्या किंवा अज्ञान अवस्थेमध्ये पशुवर्तिनी अर्थात् जीवात्मा होते. यामुळे ही क्रियाशक्ती अज्ञावस्थेमध्ये जीवाच्या बंधनास कारण होत असते. परमेश्वराची स्वतंत्र क्रियाशक्ती आपल्या खऱ्या स्वरूपामध्ये आपल्या मूळच्या श्रीशिवमार्गावर स्थिर होते व मनुष्यांना पर अर्थात् श्रेष्ठ आणि अपर अर्थात् कनिष्ठ सिद्धी प्रदान करीत असते.।।४८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

चैतन्य हाच परमेश्वराचा स्वभाव आहे. त्याची क्रियात्मिका शक्ती ही त्याच्या स्वरूपाकडे वळविणारी असून द्वैताचा भासही करविणारी आहे. हीच शक्ती सर्व ठिकाणी परमात्मस्वरूपाने भरलेली असते. अशा रीतीने ही शक्ती प्रसार पावून द्वैताचा भास करविणारी असली तरीसुद्धा ती श्रीपरमशिवांशी ऐक्यतेने असणारीच आहे. जीव किंवा पुरुष याला पशू अशी संज्ञा आहे. त्याला त्याच्या कलातत्त्वाच्या योगाने दोन प्रकारचे ज्ञान होते. एक ज्ञान ज्ञानरूप असून दुसरे ज्ञान क्रियारूप आहे. मन, बुद्धी व अहंकार या तीन प्रकारच्या रूपाने ज्ञानरूप ज्ञान असते आणि पंच ज्ञानेंद्रिये व पंच कर्मेंद्रिये यांच्या रूपाने क्रियारूप ज्ञान असते. याप्रमाणे जीवाच्या या चौदा कला आहेत. देशकालामध्ये सर्व ठिकाणी व्यापून असणारी; परंतु त्याहून वेगळी असणारी व वेद्यवस्तूंवर ताबा चालविणारी

परमात्म्याची पराशक्तीच अशा प्रकारचा भास करवीत असते. ही पराशक्ती परा व अपरा अशा दोन प्रकारची आहे. पराशक्ती ही पदार्थांच्या ठिकाणी परमात्म्याची भावना करविणारी व आपला प्रपंच सत्य आहे असे दाखविणारी आहे. ही परा व अपरा रूपाने नटणारी श्रीपरशिवांची चित्कलाच आहे. या चौदाही कलांमधून प्रवेश करणारी ही शक्ती ज्या ठिकाणी पदार्थांचे ज्ञान आहे त्या ठिकाणी श्रीपरशिवांशी चिकटून राहिलेली असते. त्यामुळे ज्या ठिकाणी पदार्थांचे ज्ञान होईल त्या ठिकाणी मायेने निर्माण केलेला भेद हा विसरून जाऊन त्या ठिकाणी श्रीपरशिवच आहेत अशी भावना करावी. अशी भावना उदय पावताच आपण द्वंद्वापासून मुक्त होऊ. अनेक प्रकारच्या नद्या जशा समुद्रात एकरूप होतात त्याप्रमाणे इंद्रियांकडून निरनिराळे विषय दाखविले गेले तरी त्या सर्व शक्ती श्रीपरशिवरूपामध्ये एकरूप होतात. नद्या निरनिराळ्या असतात. त्यांना नावे निरनिराळी असून त्या निरनिराळ्या मार्गाने वाहतात. मात्र या सर्व नद्यांमधून वाहणारा जलरूपी पदार्थ एकच असतो. तसेच निरनिराळ्या इंद्रियांकडून निरनिराळ्या विषयांचे ज्ञान होत असले तरी त्या सर्वातील ज्ञान हे सर्वसाधारण आहे. पण मायाशक्तीने मोहित झालेल्या जीवांना हे पटत नाही. याप्रमाणे हे कलातत्त्व ज्या ज्या रस्त्याने श्रीशिवस्वरूपात जाईल त्या त्या ठिकाणी श्रीपरमशिवावस्था आहे असा अनुभव येतो. मात्र हा अनुभव स्वसंवेद्य असल्याकारणाने उपदेश करण्यास अशक्य आहे. अशी ही अवस्था एखाद्याच प्रबुद्धाच्या अंगी असते. अशालाच भाग्यशक्तिसाधक असे म्हणतात. श्रीसद्गुरूंनी केलेल्या शक्तिपातानेच ही अवस्था साधकाला प्राप्त होते. ब्रह्मादि देवांनाही अशी अवस्था प्राप्त होणे कठीण आहे. त्यांना सुद्धा त्यांच्या इंद्रियांनी प्रकट केलेले प्रपंचाचे ज्ञान होत असल्याने आपण निर्गुण परब्रह्मापासून वेगळे आहोत असा अभिमान नेहमी असतो. अशा प्रकारच्या अभिमानाचा त्याग करणे त्यांना अशक्य असल्या कारणाने ते सर्व पशुकोटीतीलच आहेत. त्यामुळे पशुपती ही पराकोटीतील अवस्था त्यांना प्राप्त होणे केवळ अशक्य आहे. **याप्रमाणे श्रीपरशिवांशी अभिन्न असणारी परमेश्वरी शक्ती जेव्हा अधोमुख होऊन क्रियारूप बनते त्यावेळेला ती जीवांना पशू बनवून क्षणोक्षणी भेदाचाच अनुभव देऊन त्यांना नेहमी परतंत्रावस्थेत राखते. त्याचप्रमाणे ही परमेश्वरी शक्ती अधोमुखाने कार्यरत झाली की, ती जीवांना जन्ममरणादि संसारात फेकून देते.**

पशू हा स्वतःला सर्वव्यापी आत्म्याहून वेगळा आहे असे समजतो. अधोमुखी क्रियाशक्तिरूप शक्ती मीच आहे व इष्ट विषयांचे ग्रहण व अनिष्ट विषयांचा त्याग करून सुखदुःखाचा अनुभव या जीवांना होतो. अशा स्पंदामध्ये राहिल्याने जीव प्रत्येकक्षणी परमात्मस्थितीचे स्मरण विसरतो. याप्रमाणे श्रीपरमशिवांशी ऐक्यतेने असणाऱ्या पराशक्तीला वेगळे काढून ज्ञानक्रियारूप बनवून आपण बंधनात पडतो व परवश होऊन राहतो. असा जर पशूचा स्वभाव आहे तर त्याची सुटका कधी व्हावयाची नाही. परंतु विषयग्रहणाच्या व त्यागाच्या प्रत्येकक्षणी हे पदार्थ नसून श्रीपरशिवांशी अभिन्न असणारे श्रीपरशिवच आहेत अशी जागृती ठेवल्यास साधकाला आत्मस्थैर्याची प्राप्ती होते. **यामुळे आत्मशक्ती चेतन बनून सर्व विश्वरूपाने तीच नटली आहे अशी ज्ञानोत्पत्ती ती साधकांमध्ये करविते व नेहमी त्याला श्रीपरमशिवांच्या अवस्थेत ठेवते.** मायेच्या वैभवाने भेदभावना उत्पन्न होऊन विषय खरे भासू लागतात. त्या वेळेस पशूच्या ठिकाणी असणारी ती सत्ता जीवकला या नावाने प्रसिद्ध होते. **परंतु जागृत शक्तीमुळे ज्यावेळी ज्ञानाचा उदय होतो त्यावेळी मी स्वतः श्रीपरशिवरूप आहे व एकंदर सर्व पदार्थ पराहंतारूप आहेत अशी जागृती साधकाला आतूनच राहिल्याने त्याला श्रीपरशिवांची सिद्धी प्राप्त होते. परमेश्वराचे ज्ञान प्राप्त करून देणारी अशी ही पराशक्ती, आत्मसत्ता किंवा माँ कुंडलिनी शक्ती आहे. ती ज्ञानस्वरूपाने व शब्दस्वरूपाने प्रकट होते. परमेश्वराने जी अनेक शास्त्रे निर्माण केली आहेत त्यामध्ये परमेश्वरप्राप्तीचा जो मार्ग दाखविला आहे त्या ठिकाणी ती पराशक्ती जीवाला परमपद प्राप्त करून देणारी बनत असते. शब्दरूपात्मक ती श्रीपरशिवशक्ती प्रथम दोन रूपात्मक बनते. नंतर नऊ व नंतर पन्नास रूपात्मक बनते. "परावाणीच्या" रूपाने ती अस्फुट असते. नंतर भेदभावना उत्पन्न करून ती अनेक रूपात्मक बनते. परंतु पुन्हा स्वस्वरूपाच्या ठिकाणी लीन होणाऱ्या वाणीला "पश्यंती वाणी" असे म्हणतात. नंतर कालाच्या वर्णाचा विभाग करीत ती ज्या वेळेस प्रसार पावते त्यावेळी तिला "मध्यमा वाणी" असे नाव पडते. त्या स्थितीतसुद्धा तिची ओढ स्वस्वरूपाप्रत जाण्याची असते. नंतर पुरुषाच्या इच्छेनुसार प्राणाच्या साहाय्याने ध्वनिरूपातून स्वर व व्यंजन रूपाने प्रकट होऊन स्पष्ट वाणीने जेव्हा ती बाहेर पडते**

त्यावेळी तिला "वैखरी वाणी" असे नाव मिळते. या चारी वाणींच्या ठिकाणी सुद्धा श्रीपरशिवस्वरूप असते. एका बाजूला वैखरीरूपाने वाणी प्रकट होते तर दुसरीकडे सप्तस्वर, रागरागिण्या वगैरे निरनिराळ्या रागात ती परमेश्वरी शक्ती प्रगट होते. ही शक्ती अशा निरनिराळ्या गाण्याच्या रीतीने नटली तरी जे परमेश्वराचे अनुग्रहीत असतात व ज्यांच्या ठिकाणी सत्य ज्ञान प्रकट झालेले असते ते मात्र या सर्व अवस्थेत जागृती ठेवू शकतात. ते श्रीपरशिवरूप विसरत नाहीत. शब्दरूपात्मक व अर्थरूपात्मक असा परमशक्तीचा पसारा हा परब्रह्माचे विवर्तरूप आहे असे ते म्हणतात. शब्दांवरच्या अर्थात्मक भावनेला विवर्त म्हणतात. दोरीवर साप भासतो त्याप्रमाणे परब्रह्म न दिसता पदार्थच दिसतात म्हणून जीव फसतो. वैखरी वाणीला "क्रियाशक्ती" व मध्यमा वाणीला "इच्छाशक्ती" म्हणतात. पश्यंती वाणीला "ज्ञानशक्ती" व परावाणीला "त्रिपुरसुंदरी" म्हणतात. मातृकां-पासून शब्द निर्माण होतात. त्यामध्ये क्रियाशक्ती प्रधान असते. अ, क, च, ट, त, प इत्यादि वर्णभेदांनी वाक्ये बनतात. क्रियाशक्तिरूप हा सर्व त्या मायेचा खेळ आहे. शास्त्रात्मक व वर्णात्मक वाक्ये ही नित्य आहेत. लौकिक व्यवहारात ती अनित्य आहेत. अशा प्रकाराने जी सर्व वाक्ये आहेत ती परमेश्वराची शक्तीच आहेत. ती वाङ्मय मूर्तीच आहे. हे सर्व ध्यानात ठेवल्याने आपल्याला श्रेष्ठ प्रकारच्या मुक्तीची प्राप्ती होते. हे (सिद्धयोग) शास्त्र ही काहीतरी अद्वातद्वा प्रकारची बडबड आहे असे मानले तर ते बंधनाला कारण होते. आत्मतत्त्व हे पशुपतिरूप आहे. ते मायेने अभिन्न असताना पशुरूप बनते. पशूंच्या ठिकाणी श्रीगुरुकृपेने शक्तिपात झाला की, अनादि आत्मसत्तेच्या जागृतीने विद्येचा उदय होतो म्हणजे आत्मतत्त्वाकडे नेणारी ती सत्ता पराशक्ती बनते. हे घडले की ही शक्ती जीवाला पशुपती बनविण्याला व संसाराचा नाश करण्याला कारणीभूत होते. जेव्हा ही शक्ती माझी आहे असे जीव जाणतो तेव्हा भोगमोक्षरूप सर्व सिद्धींचे ती कारण होते. याचे अज्ञान व स्वातंत्र्य हे बंधनाला आणि ज्ञान व आत्माधीनता हे सिद्धीला कारण होते. उत्थान व पतनाचे कारण एकच आहे हे प्रथमच सांगितले आहे. ही शक्ती बंधनाला कारण कशी होते हे पुढील श्लोकात स्पष्ट केले आहे.।।४८।।

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :-** विश्वामधील सर्व जीवांच्या ठिकाणी श्रीशिवांची पराशक्तीच आविष्कृत झालेली आहे. ही शक्ती पर आणि अपर या दोन प्रकारची आहे. सर्व रूपांतून अवभासित होणारे दिक्कालातीत शक्तितत्त्व हे तिचे पररूप होय आणि जीवाच्या ठिकाणी स्थूल क्रियारूपाने प्रकट होणारे शक्तीचे अपररूप होय. स्वस्वभावरूप पराशक्तीचा अपररूपाने होणारा मूर्त आविष्कार म्हणजे कला होय.[१] **"ज्ञानगर्भस्तोत्र"** या ग्रंथात यासंबंधी जे म्हटले आहे त्याचा तात्पर्यार्थ असा आहे की[२], कला ही खरोखरी चिदात्मकशक्तीच आहे. इंद्रिये व अंतःकरण यांच्या द्वारे कलारूप चिच्छक्तीचा प्रसर होत असतो. त्यांपैकी कोणत्याही मार्गाने तिचा प्रसर झाला तरी ती श्रीशिवदशेप्रतच पोहोचते. कलेचा परमार्थतः व्यापार अभेदप्रत्ययाच्या द्वारे श्रीशिवपदाचा आश्रय करणे हाच आहे. **"न दुःखं न सुखं यत्र।।११।।"** या स्पंदकारिकेत जे श्रीशिवदशेचे स्वरूप सांगितले आहे त्या भूमीवरूनच कला उदित होते व अखेर त्या भूमीतच म्हणजे श्रीशिवदशेतच सरितेने सागरात प्रवेश करावा त्याप्रमाणे, प्रवेशून समरस होते.[३] हीच कलेची स्वमार्गस्थता होय. मधल्या अवस्थेत करणपरत्वे ती भिन्न भिन्न दिसत असली तरी निरनिराळ्या जलप्रवाहात जलरूप सामान्यच असावे त्याप्रमाणे विविध करणांतून आविष्कृत होणाऱ्या कलेमध्ये स्वस्वभावरूप चिदात्मत्व हे सामान्यच असते. त्यामुळे कला ही कोणत्याही अवस्थेत स्वस्वभावापासून प्रच्युत होत नाही. मायाशक्तीने व्यामोहित होऊन जे भेदप्रत्ययाने तिजकडे पाहतात त्यांना कलेच्या या स्वरूपाचे आकलन होत नाही. कोणत्याही मार्गाने प्रसृत झालेली कला अखेर श्रीशिवावस्थेलाच जात असल्याने ती केवळ स्वसंवेदनसंवेद्यच असते. त्यामुळेच कलेच्या मार्गाने श्रीशिवदशेचा प्रत्यय घेणाऱ्या प्रबुद्धाची अवस्था वर्णन करून सांगता येत नाही. ती फक्त सिद्ध स्वरूपात अभिव्यक्त होऊ शकते.

पशुदशेत असलेल्या पुरुषाच्या प्रत्ययोद्भव विषयाभिलाषेतून उदित झालेला असल्याने तो कलेच्या शब्दादि कवचापाशीच गुंतून पडतो म्हणून कला त्याच्याकरिता बंधनकारक ठरतात.

स्वमार्गस्थ कला अशी असते हे श्रीरामकंठाचार्यांनी शब्दकलेचे उदाहरण घेऊन विस्तारपूर्वक दाखविले आहे. त्याचा सारांश असा आहे. परमेश्वर प्रकाशमय आहे. या प्रकाशाचा प्रत्यवमर्श म्हणजे पराशक्ती होय.

ही पराशक्तीच वाग्रूपाने प्रसृत झाली. ती शब्दकला होय. शैवागमात शक्तीचा प्रसर पराशक्ती (आनंद) - इच्छा (चमत्कार)- ज्ञान (विमर्श)- क्रिया (आकारयोग) असा दाखविला आहे. वाक्यपदीय या व्याकरणग्रंथात हाच प्रसर परावाक्-पश्यन्ती-मध्यमा-वैखरी अशा रूपाने दाखविलेला आहे. त्या चार वाणींमध्ये "परावाक्" ही "पराशक्ती" असून "वैखरी" हे क्रियात्मक शक्तीचे स्थूल स्वरूप आहे. तेथे तर असे स्पष्टच म्हटले आहे की, या सूक्ष्म परावाणीच्या आत ज्ञाता स्थित झाला असून हा ज्ञाताच स्वरूपाची अभिव्यक्ती करण्याकरिता शब्दरूपाने विवर्तित होत आहे. शब्दातील अक्षरतत्त्व ब्रह्मच आहे. या ब्रह्मावरच अर्थभावाने जगत्प्रक्रिया विवर्तित होत आहे.[४] सारांश ही संपूर्ण वैखरीरूप शब्दराशी श्रीशिवांचा क्रियाशक्तिप्रधान विग्रह किंवा मूर्तीच होय.

वैखरीरूपाने प्रगट होणाऱ्या या क्रियात्मक शक्तीचे स्वर आणि वर्ण असे दोन प्रकार आहेत. स्वररूप वैखरीचे स्वर, ग्राम, मूर्च्छना, तान, जाती, राग इत्यादि अनेक प्रसर आहेत. वर्णवैखरीचा प्रसर वर्ण- शब्द- वाक्य असा आहे. वाक्यरूप प्रसराची नित्य व अनित्य अशी दोन रूपे आहेत. मंत्र व शास्त्र या रूपाने प्रगट होणारा वाक्यप्रसर नित्य आहे.[५] लौकिक व्यवहारातील वाक्यप्रसर अनित्य आहे. अशा प्रकारे ही संपूर्ण "वाङ्मयविभूती" स्वस्वभावरूप शक्तीचाच अविष्कार आहे, हे ज्याने जाणले त्याला शब्दकला सिद्धिप्रद आहे, नाहीतर ती बंधक आहे.।।४८।।

**टीपा :-**

**(१) देशकालपदार्थात्मा यद् वस्तु तथा यथा।**
**तत्तद्रूपेण या भाति तां श्रये संविदां कलाम्।।**
**।। योगिनीहृदयतंत्र।।**

**अर्थ :-** जी देश, काल, पदार्थ इत्यादींनी युक्त असणारी वस्तू ज्याप्रमाणे त्या त्या रूपाने भासते त्या संविद्रूपकलेची मी स्तुती करतो.

(२) ज्ञानगर्भ स्तोत्रातील मूळ श्लोक असा -

**बहिष्करणबुद्ध्यहङ्कृतिमनः सुषुम्णाश्रयात्**
**चतुर्दशसु चण्डिके पथिषु येन येन व्रजेत्।**
**कला शिवनिकेतनं जननि तत्र तत्र स्मरते**
**दशोदयति दुर्लभा जगति या सुरैरप्यहो।।**

**अर्थ :-** हे चंडिके! सुषुम्णेचा आश्रय घेतल्यामुळे बाह्य इंद्रिये, अहंकार, बुद्धी आणि मन चौदा मार्गात जेथे जेथे जातात हे जननी! तेथे तेथे श्रीशिवांचे घर असणारी कला स्मरली जाते (त्यानंतर) जगात जी देवांनाही दुर्लभ आहे अशा अवस्थेचा उदय होतो.

**(३)** कला ज्या भूमिकेवर निघते त्या भूमिकेवर जर ती विश्रांत होत नसेल तर ती कलाच नव्हे -

**"प्रतिभातोऽप्यर्थः परामर्शमन्तरेण अप्रतिभात एव प्रमातरी अविश्रान्तेः।"**

**अर्थ :-** प्रतिभासित झालेला अर्थ अन्य परामर्श किंवा ज्ञानामुळे प्रतिभासित न झाल्यासारखा असतो कारण (ती कला) प्रमात्यामध्ये विश्रांत होतच नाही.

**(४) अथायमान्तरो ज्ञाता सूक्ष्मे वागात्मनि स्थितः।**
**व्यक्तये स्वस्य रूपस्य शब्दत्वेन विवर्तते।।**
**अनादि निधनं ब्रह्म शब्दतत्त्वं यदक्षरम्।**
**विवर्ततेऽर्थभावेन प्रक्रिया जगतो यतः।।**

**अर्थ :-** हाच आंतरिक ज्ञाता सूक्ष्म वाग्रूपात स्थित झाला असून स्वतःचे स्वरूप व्यक्त करण्यासाठी शब्दरूपात परिणाम पावतो.

जे अनादि, अनंत व अक्षर असे शब्दतत्त्व रूप ब्रह्म अर्थात् शब्दब्रह्म आहे त्यापासूनच ह्या जगताची प्रक्रिया अर्थभावाने विवर्तित होत असते.

या संदर्भात श्रीवाल्मीकींना उद्देशून श्रीभवभूतींनी उत्तररामचरित्रात घातलेले वाक्य लक्षात घेण्यासारखे आहे - **"ऋषे! प्रबुद्धोऽसि वागात्मनि ब्रह्मणि। तद्ब्रूहि रामचरितम् अव्याहतज्योतिः आर्षं ते प्रतिभाचक्षुः।"** अर्थात् हे ऋषी! आपण वाग्रूप ब्रह्मात अर्थात् शब्दब्रह्मात प्रबुद्ध आहात अर्थात् शब्दब्रह्माला जाणलेले आहात. तेव्हा अखंड ज्योतीप्रमाणे असणारे रामचरित्र सांगा. तुमचे प्रतिभाचक्षू आर्ष आहेत. आदिकवींची भूमिका प्रबुद्धाची आहे.

**(५)** मंत्रामध्ये श्लोक, गाथा इत्यादिकांचा अंतर्भाव होतो; कारण त्यात स्वस्वभावाचा परामर्शच असतो. **"तंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**श्लोकगाथादि यत् किञ्चित् आदिमान्त्ययुतं यतः।**
**तस्माद्विदंस्तथा सर्वं मंत्रत्वेनैव पश्यति।।४.१९४।।**

**अर्थ :-** जो कोणी श्लोक, कविता गाथा इत्यादि सोऽहं विमर्श अथवा

ज्ञानाच्या परिवेशात करतो आणि ते साक्षीभावाने पाहतो तो सर्व मंत्रात्मकच होतो.।।१९४।।

## श्रीभट्टकल्लट वृत्ती :- (कारिका क्रमांक ४६, ४७ व ४८)

## शक्तीचा अवरोह आणि आवरणात्मक स्वभाव व क्रियाशक्तीची दोन रूपे

वरील तीन सूत्रात स्वतंत्र आत्म्यामध्ये पूर्वी सांगितलेले स्वतःच्या शक्तीचे अज्ञान हे प्रत्ययोद्भवाच्या रूपामध्ये प्रकट होत असते याचे स्पष्टीकरण केलेले आहे. "**प्रत्ययोद्भव**" हाच त्रिविध मल आहे. या मलामुळेच श्रीशिव हे आपल्या श्रीशिवभावापासून अवतीर्ण होऊन अर्थात् खाली उतरून जड भावाच्या अंतिम कोटीपर्यंत अर्थात् पृथ्वीतत्त्वापर्यंत पोहोचत असतात.

**सूत्र क्रमांक ४६ वृत्ती :-** (सूत्रामध्ये उल्लेखिलेला "**प्रत्ययोद्भव**" हा एक पारिभाषिक शब्द आहे. स्वशक्ती विरोधामुळे विकल्पहीन स्वरूपामध्ये ज्ञेय विषयाशी संबंधित विकल्पज्ञानाचा उदय होण्यालाच "प्रत्ययोद्भव" असे म्हणतात.) ते स्वतंत्र पतिप्रमाता अर्थात् परमेश्वर हे आपल्या "**परामृतरस**" अर्थात् सर्वश्रेष्ठ अमृतमय रसपदवीपासून खाली उतरतात; कारण या परमेश्वरामध्ये प्रत्ययोद्भव अर्थात् ग्राह्य विषयांची प्राप्ती झाल्यावर त्याविषयीच्या स्मरणाचा उदय होत असतो. (येथे तन्मात्र या शब्दाचा अर्थ सर्व प्राधानिक सृष्टी असा आहे. "**स्मरण**" या शब्दाचा अर्थ स्मरण, संशय, भ्रम, अध्यवसाय, अनुमान इत्यादि विकल्पज्ञानाची परंपरा असा आहे.) यामुळे तो पुरुष परतंत्रता आणि असर्वव्यापकता या अवस्थेवर पोहोचत असतो. तन्मात्र हा प्रत्ययोद्भवाचा विषय आहे. रूप इत्यादींचा विषय अभिलाषा उत्पन्न होणे हे त्या विषयतेचे स्वरूप आहे.।।४६।।

**सूत्र क्रमांक ४७ वृत्ती :-** या आधी ज्या ब्राह्मी इत्यादि शक्तींचा उल्लेख आलेला आहे त्या शक्ती या पुरुषाचे स्वरूप अर्थात् पुरुषाचा स्वभाव याला झाकण्यासाठी अर्थात् आवृत करण्यास तत्पर राहतात. याचे कारण असे आहे की, शब्दाच्या सहकारितेशिवाय कोणत्याही प्रत्ययाचे अर्थात् विकल्पाचे ज्ञान होणे शक्य नाही.।।४७।।

**सूत्र क्रमांक ४८ वृत्ती :-** ही मातृका प्रत्यक्षात् श्रीभगवंतांची क्रियात्मक स्वभावाची शक्ती आहे. जी पशुवर्तिनी बनलेली आहे. या दृष्टीने शास्त्रात

असे म्हटलेले आहे की -

दोन संतानांच्या रूपामध्ये चालणारी अशी कोणतीही जीवकला नाही की, ज्यामध्ये "**श्रीशिवकला**" ही अधिष्ठात्री बनून व्याप्त झालेली नाही. (जीवकला ही दोन संतानांच्या रूपामध्ये चालत असते. ज्ञानसंतान आणि क्रियासंतान ही जीवकलेची दोन रूपे आहेत. ज्ञानसंतानामध्ये मन, बुद्धी आणि अहंकार ही तीन अंतःकरणे आणि क्रियासंतानामध्ये पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये आणि प्राणशक्ती अंतर्भूत आहे. यामुळे ज्ञानसंतान हे तीन प्रकारचे असून क्रियासंतान हे अकरा प्रकारचे आहे. "**स्पंदकारिका**" ४८ पाहावी.)

यामुळे ही ईश्वराची शक्ती अज्ञात होण्याच्या अवस्थेमध्ये बंधनाचे कारण आहे. परंतु वास्तविक रूपामध्ये ज्ञात होण्याच्या अवस्थेमध्ये मनुष्याला पररूप अर्थात् सर्वश्रेष्ठ आणि अपररूप अर्थात् कनिष्ठ सिद्धी प्रदान करीत असते.।।४८।।

**विवरण :-** वरील तीन सूत्रांमध्ये विमर्शरूपा अर्थात् ज्ञानरूपा किंवा स्फुरण पावणाऱ्या स्पंदशक्तीच्या बहिर्मुखीन प्रसाराच्या क्रीडेचे सूत्रात्मक रूपामध्ये वर्णन केलेले आहे. विमर्शरूपा स्पंदशक्तीचा शाक्तप्रसार हा तीन रूपांमध्ये प्रसृत अर्थात् निर्माण होऊन स्वतंत्र असणाऱ्या श्रीशिवांना परतंत्र बनवीत असतो. प्रत्ययोद्भव, स्वरूप-आवरण आणि पशुवर्तिनी स्थूलक्रियेच्या रूपाचे ग्रहण या शाक्तप्रसाराच्या तीन रूपांना शास्त्रीय शब्दामध्ये क्रमशः "**आणवमल**", "**मायीयमल**" आणि "**कार्ममल**" असे म्हणतात.

शाक्तप्रसाराची क्रिया ही चैतन्याच्या अनुत्तर कोटीपासून अर्थात् श्रीशिवभावापासून जडभावाच्या कनिष्ठ कोटीपर्यंत अर्थात् पृथ्वितत्त्वा-पर्यंत चालत राहते. श्रीशिवापासून पृथ्वीपर्यंत एकूण छत्तीस तत्त्वे आहेत. या छत्तीस तत्त्वांमध्ये सर्व जडचेतनात्मक विश्वाचा अंतर्भाव झालेला आहे. यामुळे या सूत्रामधील पहिल्या शब्दाचा अर्थ छत्तीस तत्त्वे असा आहे. या सर्व गोष्टी स्पष्टपणे समजण्यासाठी प्रत्येक सूत्रावर वेगवेगळा प्रकाश टाकणे आवश्यक आहे असे वाटते.

**सूत्र क्रमांक ४६ विवरण :-**

या सूत्रामध्ये बाह्य प्रसाराकडे अर्थात् उभारणीकडे उन्मुख किंवा

उत्सुक होताच शक्ती प्रत्ययोद्भवाच्या रूपामध्ये विकसित होत असते ही गोष्ट समजाविलेली आहे. विकल्पपरंपरा हेच प्रत्ययोद्भवाचे रूप आहे. याचाच अर्थ असा आहे की, श्रीशिवांची स्वतःहून अभिन्न असलेली स्वातंत्र्यशक्ती ही मायाशक्तीचे रूप धारण करताच श्रीशिवांमध्ये आपली पूर्णता आणि स्वतंत्रता याविषयी शंका उत्पन्न होते. आपल्या स्वतंत्र स्वभावाला अन्यथा अर्थात् वेगळ्या रूपामध्ये समजणे हाच सर्वात पहिला प्रत्ययोद्भव आहे. स्वातंत्र्याची बेगडी परिस्थिती ही स्वतंत्रज्ञातृतेची अर्थात् स्वतंत्र जाणिवेची हानी आणि स्वतंत्र कर्तृतेविषयीचे अज्ञान या दोन रूपामध्ये स्फुरित होत असते. दुसऱ्या शब्दामध्ये असेही म्हणता येते की, स्वरूपाहून भिन्न ग्राह्यविषयाची प्राप्ती होताच स्वतंत्र आत्म्याला स्वतःविषयी अनात्मविश्वास आणि अनात्मभूत शरीरादि गोष्टींवर आत्मविश्वास निर्माण होत असतो. हाच सर्वात मोठा प्रत्ययोद्भव आहे आणि ही मौलिक स्वातंत्र्यहानी आहे. यालाच "**आणवमल**" असे म्हणतात.

प्रत्ययोद्भवाच्या द्वारा स्वातंत्र्याच्या संभ्रमात पडल्याबरोबर आत्म्याच्या सर्वतोपरी अवरोहन प्रक्रियेचा उद्भव होत असतो. चेतन हेच जड बनते व परावाणी अर्थात् सर्वश्रेष्ठ वाणी ही स्थूल वैखरी वाणीचे रूप धारण करीत असते. स्वतंत्र ज्ञातृता आणि कर्तृता हेच संकुचित ज्ञान आणि क्रिया बनत असतात. फलतः छत्तीस तत्त्वांचे बहिर्मुख प्रकाशन संपन्न होत असते. या सर्व प्रक्रियेला सूत्रकाराने "**परामृतरसापाय**" असे नाव दिलेले आहे.

आता वर असे म्हटलेले आहे की, प्रस्तुत सूत्राच्या शब्दामध्ये छत्तीस तत्त्वांचा अर्थ व्यंगरूपाने अंतर्भूत झालेला आहे. थोडक्यात तो अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

**परामृत १ :-** अनुत्तर अर्थात् ज्याहून श्रेष्ठ असे अन्य काहीही नाही, अविनाशी, सर्वस्वतंत्र, प्रकाशरूप श्रीशिव.

**रस २ :-** श्रीशिवांची अभिन्न अहं विमर्शमयी अर्थात् अहं स्फुरणात्मक स्पंदशक्ती (या दोन तत्त्वांमध्ये द्वित्व हे औपचारिक आहे. प्रत्यक्षात ही एकच श्रीशिवशक्तिसामरस्याची अवस्था आहे. यालाच प्रकाशाच्या प्रधानतेमुळे श्रीशिव आणि विमर्शाच्या किंवा ज्ञानाच्या किंवा विचाराच्या प्राधान्यामुळे शक्ती असे म्हटलेले आहे.)

**परामृत ३ :-** सदाशिव तत्त्व.

४ :- ईश्वर तत्त्व.

५ :- शुद्धविद्या तत्त्व.

(ही तिन्ही तत्त्वे "**परामृत**" या शब्दांनी संबोधिली जातात; कारण येथपर्यंत अभेद प्रथा निर्माण करणाऱ्या तत्त्वरूपा मायेचा उल्लास झालेला नसतो. या तत्त्वामध्ये पूर्वी वर्णिलेल्या उन्मेषनिमेषात्मक चढउतारामुळेच पारस्परिक भेद मानला जातो.

**प्रत्ययोद्भव :-** ६ माया तत्त्व ७ कला तत्त्व ८ विद्या तत्त्व ९ राग तत्त्व १० नियती तत्त्व ११ काल तत्व.

ही सहा तत्त्वे भेदप्रथा निर्माण करणाऱ्या तत्त्वरूपा मायेची प्रसार रूपे आहेत. शास्त्रीय शब्दामध्ये यांनाच "**षट्-कंचुक**" असेही म्हटले जाते.

**अस्वतंत्र किंवा परतंत्र :-** १२ पुरुष-तत्त्व

(षट्-कुंचकामध्ये फसलेला) जीव अथवा शास्त्रीय शब्दामध्ये पशू. आता पुढे प्रत्ययोद्भवाच्या विषयभूत तन्मात्रप्रपंचाचा अर्थात् जड ग्राह्यवर्गाचा उल्लेख एकाच शब्दाच्या द्वारा केला गेलेला आहे.

**तन्मात्रगोचर :-** १३ प्रकृती-तत्त्व १४ बुद्धी-तत्त्व १५ मनस्-तत्त्व १६ अहंकार-तत्त्व १७ श्रोत्र-तत्त्व १८ त्वक्-तत्त्व १९ नेत्र-तत्त्व २० जिह्वा-तत्त्व २१ घ्राण-तत्त्व २२ वाणी-तत्त्व २३ हस्त-तत्त्व २४ पाद-तत्त्व २५ पायु-तत्त्व २६ उपस्थ-तत्त्व २७ शब्द-तत्त्व २८ स्पर्श-तत्त्व २९ रूप-तत्त्व ३० रस-तत्त्व ३१ गंध-तत्त्व ३२ आकाश-तत्त्व ३३ वायू-तत्त्व ३४ तेजस-तत्त्व ३५ जल-तत्त्व ३६ पृथ्वी-तत्त्व.

**सूत्र क्रमांक ४७ विवरण :-**

या सूत्रामध्ये शक्तीच्या स्वरूप-आवरणात्मक स्वभावाचे वर्णन केलेले आहे. या आधीही हे तथ्य समजाविण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे की, स्वरूपावर प्रतिक्षण कोणत्या ना कोणत्या प्रकारचे आवरण टाकून त्याला बाजूला किंवा दृष्टिआड करणे हा शक्तीचा अकाट्य किंवा न तोडता किंवा ओलांडता येणारा स्वभाव आहे. या संबंधामध्ये हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, श्रीशिवभूमिकेवर शक्तीचे रूप हे अहंविमर्शमयी स्पंदना अथवा पूर्णस्वातंत्र्य आहे. यामुळे त्या भूमिकेवर स्वरूपगोपनाचा प्रश्नच निर्माण होत नाही. परंतु शक्ती ही जेव्हा बहिर्मुख होऊन मायाशक्तीचे रूप धारण करीत असते तेव्हा हिच्या स्वरूपगोपनात्मक प्रक्रियेला सुरुवात होत असते. हेच कारण आहे की, मायाशक्तीला शास्त्रामध्ये "**स्वरूप-**

**गोपनव्यग्रा"** अर्थात् स्वरूपाला तिरोहित करण्यामध्ये म्हणजे लपविण्यात व्यस्त असे नाव दिलेले आहे.

स्वरूप-आवरणालाच दुसऱ्या शब्दामध्ये मायीय मल असे म्हटलेले आहे; कारण मायीय मलाच्या द्वारा आवृत्त झाल्यामुळे श्रीशिव हे आपल्या अंगभूत वेद्यपदार्थांना किंवा ज्ञेयपदार्थांना स्वरूपाहून भिन्न समजण्याच्या परावलंबित्वामध्ये पडत असतात.

याशिवाय या सूत्रामध्ये उल्लेखिलेल्या **"शब्दानुवेध"** या विषयामध्ये हे समजणे आवश्यक आहे की, संसारातील प्रत्येक अर्थाबरोबर त्याच्या वाचकभूत शब्दाचा नीर-क्षीराप्रमाणे अर्थात् पाणी व दुधाप्रमाणे संश्लेष अर्थात् एकत्रीकरण शाश्वतरूपामध्ये वर्तमान आहे. शास्त्रीय शब्दामध्ये अशा प्रकारे म्हटले जाते की, प्रत्येक अर्थ (ज्ञेयविषय) प्रकाशरूप आहे आणि त्याचा वाचक शब्द त्याच्या अणू-अणूमध्ये व्याप्त राहणारी विमर्शना अर्थात् संवित् किंवा ज्ञान आहे. शब्द हा प्रत्येक अर्थाला ज्ञानाच्या रूपामध्ये सत्ता प्रदान करीत असतो; कारण संसारामध्ये असा कोणताही अर्थ किंवा त्याच्या ज्ञानाचा सद्भाव नाही की, ज्याच्या सह शब्द अर्थात् अभिलापात्मकता नाही. **फलतः शब्द आणि अर्थसाहचर्य हे साक्षात् श्रीशिवशक्तीचे संघटनच किंवा सामरस्यच आहे.**

**सूत्र क्रमांक ४८ विवरण :-**

या सूत्रामध्ये क्रियाशक्तीच्या श्रीशिववर्तिनी क्रियाशक्ती आणि पशुवर्तिनी स्थूल क्रिया या दोन रूपांचा उल्लेख केलेला आहे. यामधील पशुवर्तिनी क्रिया ही बंधनात टाकणारी असल्यामुळे यालाच शास्त्रीय शब्दामध्ये **"कार्ममल"** असे म्हणतात. याच कथनाचा आशय किंवा अर्थ खालील विचारांना ध्यानात ठेवण्याने स्पष्ट होऊ शकतो.

श्रीशिवांमध्ये ज्याप्रमाणे ज्ञातृता अर्थात् ज्ञानशक्ती आहे त्याचप्रमाणे कर्तृता किंवा क्रियाशक्ती आहे. हे म्हणणे योग्य आहे की, प्रत्यक्षात श्रीशिवांची स्वतंत्र इच्छा हीच त्यांची ज्ञातृताही आहे आणि कर्तृताही आहे. अस्तु. श्रीशिवांशी संबंधित असलेल्या क्रियाशक्तीला श्रीशिववर्तिनी क्रियाशक्ती असे म्हणतात. विमर्शमयी स्पंदना अर्थात् ज्ञानात्मक स्फुरण हेच केवळ या श्रीशिवांच्या क्रियाशक्तीचे स्वरूप आहे. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**किन्तु निर्माणशक्तिः साप्येवं विदुष ईशितुः।**
**तथा विज्ञातृविज्ञेयभेदो यदवभास्यते।।२.१.८।।**

याचा अर्थ असा आहे की, विद्वान् ईश्वराची ही क्रियाशक्तीच निर्माणशक्ती आहे. तिच्यामुळे विज्ञाता म्हणजे जीव आणि विज्ञेय म्हणजे श्रीशिव यांच्यामधील भेद भासतो.

दुसऱ्या शब्दामध्ये श्रीशिवांच्या क्रियाशक्तीला पारमेश्वरनिर्माण शक्ती असे म्हणतात. या दृष्टीने उपरोक्त श्लोकाच्या टीकेमध्ये असे म्हटले आहे की, "**स्वरूपभेदेन देशक्रमकारिणा क्रियाभेदेन च कालक्रम-सम्पादकेन उपलक्षितो यो विज्ञातुः शून्यादेः प्रमातुः भेदोऽन्योन्यं ज्ञेयाच्च, एवं घटादेः परस्परं ज्ञातुश्च स भगवता अवभास्यते, यत् तदवभासनं सा ईशितुरपि निर्माणशक्तिः क्रियाशक्तिः।।२.१.८।।** याचा अर्थ असा आहे की, स्वरूपाचा भेद होण्याने देशक्रम बनतो आणि क्रियेचा भेद झाल्याने कालक्रमाच्या संपादकाने युक्त असा विज्ञाता किंवा जीव, शून्यादि, प्रमात्यांचे भेद आणि ज्ञेयाहूनही परस्पर भेद होतो. अशा प्रकारे घटादि ज्ञेयाचा परस्पर भेद ज्ञात्याहून आणि तो भेद परमेश्वराच्या द्वारा भासित होतो. हे अवभासनच ईश्वराची निर्माण शक्ती अथवा क्रिया शक्ती बनते. ही शाक्तस्पंदना अर्थात् शक्तीचे स्फुरण मूर्तिभेदापासून निर्माण झालेल्या देशक्रमाने आणि क्रियाभेदापासून निर्माण झालेल्या कालक्रमाने उपलक्षित अर्थात् दाखविलेले अनंत प्रकारचे शून्य, प्राण, पुर्यष्टक इत्यादि प्रमात्यांना किंवा ज्ञात्यांना किंवा जीवांना आणि नील, सुख आदि ज्ञेयविषयांना स्वरूपाहून आणि एक दुसऱ्याहून भेदरूपामध्ये प्रकाशित करीत असते. अशा प्रकारे अनंत वैचित्र्यांनी परिपूर्ण असलेल्या विश्वाचे प्रकाशन हीच ईश्वराची निर्माणशक्ती किंवा क्रियाशक्ती आहे. या दृष्टीने "**स्तुतिकुसुमांजली**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**इच्छयैव भुवनानि भावयन् यः प्रियोपकरणग्रहोऽपि सन्।**
**अप्रियोपकरणग्रहोऽभक्तं स्वशक्तिसचिवं शिवं स्तुमः।।१.१५।।**

**अर्थ :-** जे त्यांना प्रिय अशा उपकरणांचा स्वीकार करीत अप्रिय साधनांचेही ग्रहण करतात आणि स्वतःच्या केवळ इच्छेनेच जग निर्माण करतात त्या अखंड, स्वशक्तिसचिव अशा श्रीशिवांची आम्ही स्तुती करतो.।।१.१५।।

विश्वाचे निर्माण हे श्रीभगवंतांच्या स्वतंत्र इच्छेनेच यथावत् रूपामध्ये निष्पन्न होत असते आणि या निर्माणामध्ये श्रीभगवंतांना कोणत्याही प्रकारच्या उपादानसंभाराची अर्थात् साहाय्यक गोष्टींची किंवा वस्तूंची अपेक्षा असत नाही. श्रीभगवंत हे अशा क्रियेचे स्वतः स्वतंत्रकर्ते आहेत; कारण ते अशा निर्माणाला स्वतः जाणतही असतात. श्रीभगवंतांचे ज्ञात्याच्या रूपामध्ये स्फुरित होणे ही स्वतः क्रियाही आहे.

या दृष्टीने "**ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, त्यापासून निर्माण झालेले ज्ञातृ व ज्ञेय यांच्या क्रियाभेदाचे वैचित्र्य निर्माण होते. विद्वान् व्यक्तीच हा विषयं चांगल्या प्रकारे जाणू शकते. निरंतर तेथेच स्फुरतो, त्यामुळेही त्याचीही ती क्रियाशक्ती आहे.

**यतश्च तन्निर्मितं ज्ञातृज्ञेयक्रियावैचित्र्यभेदम् असौ विद्वान् वेत्ति अविरतं तत्रैव, हि तत् स्फुरति ततोऽपि**
**तस्य सा क्रियाशक्तिः ।।२.१.८।।**

याचा अर्थ असा आहे की, श्रीशिववर्तिनी क्रियाशक्तीचा कोणताही क्रम नाही; कारण या अवस्थेमध्ये याचे वास्तविक किंवा खरे रूप '**मी स्फुरित होत आहे, मी घूर्णित अर्थात् फिरणारा आहे** अशा प्रकारच्या देशकालक्रमाहून हीन "**अहंरूप इच्छास्पंद**" याच्याशिवाय अन्य काहीही नाही. या दृष्टीने उपरोक्त ग्रंथात असे म्हटले आहे की - "**ईश्वरस्यापि ईशे, आसे, स्फुरामि, घूर्णे, प्रत्यवमृशामि, इत्येवंरूपं यदिच्छात्मकं विमर्शनम् 'अहम्' इत्येतावन्मात्रतत्त्वं न तत्र कश्चित् क्रमः।**"

**अर्थ :-** ईश्वराचाही असाच क्रम आहे की, मी समर्थ आहे, मी भासित होत आहे, मी स्फुरित होत आहे, मी फिरत आहे, मी स्वतःलाच समजून घेत आहे. हे जे इच्छात्मक विमर्शन आहे तोच "अहं" होय. हे "अहं" एवढेच तत्त्व ईश्वराच्या ठिकाणी असते, तेथे दुसरा कोणताही क्रम नाही.

या दृष्टीने "**शिवस्तोत्रावली**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**स्फारयस्याखिलमात्मना स्फुरन्विश्वमामृशसि रूपमामृशन्।**
**यत्स्वयं निजरसेन घूर्णसे तत्समुल्लसति भावमण्डलम्।।१३.१५।।**

याचा अर्थ असा आहे की, चिन्मात्र श्रीभगवंतांची स्वतंत्र इच्छात्मक स्फुरणा हीच सर्व विश्वाची स्फुरणा आहे. स्वरूपाची विमर्शना अर्थात् निजस्वरूपाच्या आनंदमयतेचा आस्वाद घेणे हेच विश्वाचे आमर्शन अर्थात्

विश्वाला स्पर्श करणे होय. आपल्या चिदानंदरसाच्या पूर्णतेमुळे झोके घेणे हेच सर्व भावमंडलाचे उल्लसित किंवा आंनदित होणे आहे.

वर असे सांगितलेले आहे की, श्रीशिववर्तिनी क्रियाशक्तीचे स्वरूप हे विमर्शात्मक अर्थात् ज्ञानात्मक स्पंदना किंवा स्फुरण आहे. या विषयामध्ये हे समजणे आवश्यक आहे की, विमर्शासह अर्थात् ज्ञानसह किंवा विचारासह असणारे अभिलापात्मकतेचे अर्थात् बोलण्याचे साहचर्य हे एक शाश्वत यथार्थ म्हणजे सत्य आहे. फलतः परमेश्वराच्या विमर्शाबरोबरच अभिलापात्मकता अवश्य आहे; परंतु त्या भूमिकेवर परमेश्वरही तद्रूपच आहे अर्थात् एकरूप आहे. याचाच अर्थ असा आहे की, या पदवीवर "**अ**" पासून "**क्ष**" पर्यंतच्या ध्वनिसमुदायाचे रूप हे अहंविमर्शच अर्थात् आत्मज्ञानयुक्त आहे. यालाच शास्त्रीय शब्दामध्ये "**अव्यक्त परावाणी**" असे म्हणतात.

बाह्यप्रसाराच्या प्रक्रियेमध्ये ही श्रीशिववर्तिनी आणि क्रमहीन क्रियाशक्ती ही पशुवर्तिनी स्थूल तसेच सक्रम क्रियेचे रूप धारण करीत असते. या दृष्टीने "**ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, परमेश्वराची क्रियाशक्ती क्रमरूप क्रियेच्या निर्मितीचे सामर्थ्य आणि क्रमरूप क्रियेच्या उपरागाचा संबंध यांच्यामध्ये राहते. "**अस्य क्रियाशक्तिः क्रमरूपक्रियानिर्माणसामर्थ्य क्रमरूपक्रियो-परागयोगश्च इति।।२.१.८।।** परमेश्वराची क्रियाशक्ती ही स्वतंत्र चेतना-शक्ती आहे. यामुळे ही स्वतंत्र क्रियाशक्ती आपल्या सामर्थ्याने स्वतःला पशुभूमिकेवर सक्रम स्थूल क्रियेच्या रूपामध्ये विकसित करून घेत असते. ही स्वतंत्र क्रियाशक्ती आपल्या अक्रम स्वरूपावर सक्रम क्रियात्मक उपराग अर्थात् निरनिराळे रंग धारण करीत असते. स्वतंत्र इच्छा ही स्वतंत्र इच्छा असल्यामुळे ती जे काही करू इच्छिते ते करीत असते.

प्रत्यक्षात पशुभूमिकेवर अर्थात् जीवाच्या भूमिकेवरही प्रत्येक क्रियेचे मूळरूप हे इच्छात्मक स्पंदना किंवा इच्छात्मक स्फुरण आहे. परंतु ही स्पंदना किंवा हे स्फुरण मानसिक संकल्प-विकल्पाच्या रूपामध्ये होत असते. या दृष्टीने "**ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की - **चैत्रमैत्रादेरपि पचामि इति यैव अन्तरिच्छा सैव क्रिया, तथा च अधिश्रयणादिबहुतरस्पन्दनसम्बन्धेऽपि पचामि इति नास्य विच्छिद्यते। यत्तु इच्छारूपं तदेव तथास्पन्दनात्मतया भाति।**

**तत्र तु न कोऽपि क्रमः तत्त्वतः ।** याचा अर्थ असा आहे की, चैत्रमैत्रादींची "शिजवितो" अशी जी आंतरिक इच्छा तीच क्रिया आणि त्याचप्रमाणे चुलीवर भांडे ठेवणे, विस्तव लावणे इत्यादि संबंधामध्ये सर्व ठिकाणी ज्या शिजविण्याचीच क्रिया राहत असते त्या क्रियेचा कधीही नाश होत नाही. त्याची जी इच्छा होती तीच या शिजविणे इत्यादि रूपांमध्ये स्पंदात्मकरूपाने भासते; परमार्थतः त्यांच्यात कोणताही क्रम राहत नसतो. सूक्ष्म दृष्टीने पाहिले असता संसारामधील कोणत्याही प्राण्याच्या हृदयामध्ये जी आंतरिक इच्छा असते ती बाह्य रूपामध्ये त्याची क्रिया होते. जोपर्यंत ही आंतरिक इच्छा मानसिक संवेदनाच्या रूपामध्ये अवस्थित राहत असते तोपर्यंत यात कोणताही क्रम असत नाही; कारण तेथपर्यंत कोठेही विच्छेद झालेला आढळून येत नाही. या दृष्टीने **"ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, **"इच्छारूपं "पचामि" इति स्पन्दनात्मनां कार्यपर्यन्ता गतं क्रमारुषितम् आभाति ।।२.१.८।।"** परमेश्वराची इच्छाशक्ती प्रमाता आणि प्रमेयाच्या भेदापर्यंत जाणारी त्या क्रमाशी एकरूप झालेली भासते. ही इच्छात्मक स्पंदना किंवा हे इच्छात्मक स्फुरण पांचभौतिक शरीराच्या द्वारा बाह्य स्थूल क्रियेच्या रूपामध्ये पर्यवसित होत असते. यामुळे यावर कालक्रम आणि त्याच्या द्वारा देशक्रमाचा रंग चढत असतो. याचा परिणाम म्हणून अक्रम क्रियाशक्ती ही सक्रम अर्थात् क्रमासहित स्थूलक्रिया बनत असते. उदा. नाना प्रकारच्या शिजविण्याच्या, लिहिण्याच्या किंवा वाचण्याच्या इत्यादि क्रियांच्या मूलरूप इच्छात्मक स्पंदनेमध्ये किंवा स्फुरणामध्ये कोणताही तद्रूप अर्थात् एकरस झालेला क्रम असत नाही. परंतु जेव्हा ही इच्छात्मक स्पंदना शारीरिक व्यवहारामध्ये पर्यवसित होते तेव्हा या पुरुषावर **"मी शिजवीत आहे, मी काल लिहीत होतो, मी पुढच्या वर्षी शैवदर्शन वाचणार आहे"** इत्यादि रूपांमध्ये देहाभिमान निर्माण होत असतो आणि त्याला अनुकूल संकुचित कालक्रम आणि देशक्रम यांचा उपराग अर्थात् रंग चढत असतो. स्थूल क्रियेची अभिलापात्मकता ही स्थूल असते. ही अभिलापात्मकता याआधी वर्णिलेल्या अहंविमर्शमयी परावाणी, पश्यंती आणि मध्यमा यांच्या मार्गाने वैखरी पदवीवर उतरून **"अ"** पासून **"क्ष"** पर्यंतच्या स्थूल वर्णसमुदायाच्या अर्थात् मातृकेच्या रूपामध्ये विकसित झालेली असते. (या विषयामध्ये **"शिवसूत्रविमर्शिनीचे"** सूत्र १-४ पाहावे.) फलतः अशी स्थूल अभिलापमयी

आणि सक्रम पशुवर्तिनी क्रिया संसाराच्या पशुवर्गाला पावलापावलावर तथाकथित शुभ तसेच अशुभ कर्मांची ग्राह्यता आणि हेयता अर्थात् त्याज्यता यांच्या शंकेच्या पाशांनी जन्मजन्मांतरापर्यंत जखडून ठेवीत असते. स्थूल अभिलाप अथवा पारिभाषिक शब्दामध्ये ककार आदि स्थूल वर्णसमुदाय यामध्ये अधिष्ठित असलेल्या श्रीब्राह्मी इत्यादि पशुशक्तींच्या द्वारा बुद्धिभेदामध्ये अडकलेला पशू किंवा जीव प्रतिक्षण केल्या जाणाऱ्या स्थूलक्रियेच्या खऱ्या स्वरूपाला विसरून या शक्तींना केवळ आपला देह, प्राण आदींच्या अभिमानाशी जोडित राहतो.

सूत्राच्या अंतिम चरणामध्ये या तथ्याकडे संकेत केलेला आहे की, एखाद्या अलक्ष्य अनुग्रहामुळे पशूमध्ये असे सद्ज्ञान निर्माण झाले की, प्रत्यक्षात या सर्व क्रिया श्रीशिववर्तिनी क्रियाशक्तीचा केवळ बहिर्मुखीन विकास आहे आणि **"मी"** अर्थात माझे शरीर माझी बुद्धी इत्यादि या क्रियेचे कर्ता नाहीत. अशा परिस्थितीमध्ये पशूचे किंवा जीवाचे स्थूल क्रियात्मक पाश हे स्वयं छिन्न-भिन्न होऊन जातात. यथार्थरूपामध्ये अशी अनुभूती प्राप्त करून घेतल्यावर त्या जीवाने काहीही केले तरी त्याला त्यामध्ये श्रीशिवत्वाची प्राप्ती होत राहते.।।४६-४७-४८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

मागच्या तीन श्लोकांमधल्या अर्थाचा उपसंहार किंवा शेवट करून आणि मागे सांगितलेली नियत प्रमेयाची अर्थात् ज्ञेयाची स्पंदतत्त्वापासूनची अभिन्नता आणखी दृढ करीत ग्रंथकार बंध आणि मोक्ष हे स्पंदतत्त्वाच्या अभिव्यक्तीचे अज्ञान आणि स्पंदतत्त्वाच्या अभिव्यक्तीचे ज्ञान या स्वरूपाचे आहेत असे सांगतात.

**स्पष्टीकरण :-** **"सा (ती)"** म्हणजे आधीच्या तीन श्लोकात वर्णन केलेली शक्ती होय. **"इयम् (ही)"** म्हणजे प्रमेय रूपाने (जगद्रूपाने) स्फुरण पावणारी क्रियाशक्ती होय. ती स्वस्वभावरूप चिदात्मा श्रीशिवांशी संबंधित आहे. ती स्पंदतत्त्वाने युक्त असून श्रेष्ठ स्वामिनी आहे. त्याचप्रमाणे हे अनंत वैचित्र्यांनी भरलेले विश्व निर्माण करण्यामुळे तिला क्रियाशक्ती असेही म्हणतात. मागे स्पष्ट केलेल्या मतानुसार ज्याने पशूची भूमिका स्वीकारली आहे अशा श्रीशिवांमध्ये स्थित असणारी, प्राण आणि मन,

बुद्धी, अहंकार, शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या पुर्यष्टकाच्या रूपात असणाऱ्या त्याचे कर्तृत्वाने युक्त अशा संकुचित क्रियेच्या थेंबाने प्रोक्षण करणारी ती बंधयित्री (बंधनात टाकणारी) होते. कारण वर सांगितलेल्या प्रकाराने ज्यावेळेस स्वभाव व्यक्त झालेला नसतो त्यावेळेस ती त्याला आवरण करते आणि स्वीकारणे आणि त्याग करणे यांच्या परिक्लेशाला ती कारणीभूत होते.

मात्र स्वरूपाचा म्हणजेच श्रीशिवात्मकरूपाचा मार्ग पुढीलप्रमाणे असतो.

**शक्त्यावस्थां प्रविष्टस्य निर्विभागेन भावना।**
**तदासौ शिवरूपी स्याच्छैवी मुखमिहोच्यते।।२०।।**

**अर्थ :-** (ज्यावेळेस मनुष्य) विभागरहित भावनाशक्तीच्या अवस्थेमध्ये प्रविष्ट होऊन जाणतो, त्यावेळेस तो श्रीशिवरूप होतो. त्या श्रीशिवांच्या शक्तीला (श्रीशिवांकडे जाण्याचे) मुख (द्वार) असे म्हटले आहे.

अशा प्रकारे "**श्रीविज्ञानभट्टारक**" या ग्रंथात सांगितलेला प्राप्तीचा उपाय म्हणजेच योग्याकडून पराशक्ती आणि तिच्याशी तादात्म्याने क्रियाशक्ती जाणली जाते किंवा ज्यावेळेस निश्चित आणि अनिश्चित कल्पनांच्या प्रसरातही हा योगी श्रीशिवस्वरूपाशी एकरूप असणाऱ्या स्वात्म्याचे अंशभूत म्हणून सर्व वेद्य विषयांना पाहतो त्यावेळेस त्याला परानंदमयी परा सिद्धी प्राप्त होते.।।४८।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :-**

स्पंदतत्त्वाच्या प्रत्यभिज्ञानाने मोक्ष मिळतो आणि त्या स्पंदतत्त्वाच्या अप्रत्यभिज्ञानाने म्हणजेच विस्मरणाने (साधक) बंधनात पडतो हे "**सेयं क्रियात्मिका .....।।४८।।**" या कारिकेत सांगितले आहे. "**सा इयम्**" या ठिकाणी तत् शब्दप्रयोगाने निर्णीत केलेल्या प्रमेयसमूहात्म्याने म्हणजे ज्ञेयविषयांच्या समूहाने स्फुरण पावणारी श्रीशिवसंबंधिनी तत्त्वस्वरूप क्रियाशक्ती, या वैविध्यपूर्ण विश्वातील स्थितिकारिणी क्रियाशक्ती, पुर्यष्टकयुक्त शरीरामध्ये कर्तृत्व आणि अहमभिमान निर्माण करून स्पंदतत्त्वाचा साक्षात्कार करून घेण्यास असमर्थ ठरून बंधनास प्राप्त होते. बंधनात टाकते म्हणून त्या क्रियाशक्तीला "बंधयित्री" असे म्हणतात. ज्या काळात स्वतःचे श्रीशिवस्वरूप प्राप्त करण्याचा उपाय होणारी जी पराशक्ती असते त्या

पराशक्तीने युक्त होऊन त्याच्या क्रियाशक्तीपासून त्या काळी तो जीव योगी होऊन परमानंदमय सर्वोत्कृष्ट सिद्धी संपादित करतो अर्थात् मुक्त होऊन सर्व व्याप्त होतो.।।४८।।

* * * * *

**तन्मात्रोदयरूपेण मनोऽहंबुद्धिवर्तिना।**
**पुर्यष्टकेन संरुद्धस्तदुत्थं प्रत्ययोद्भवम्।।४९।।**

**अन्वयार्थ :-**

(श्रीभट्टकल्लटांनी "**तन्मात्रोदयरूपेण**" याची फोड "**तन्मात्ररूपेण**" व "**तन्मात्रोदयरूपेण**" अशी करून "**तन्मात्ररूप**" म्हणजे सूक्ष्म "**पुर्यष्टक**" किंवा मन, बुद्धी व अहंकाराचे बनलेले कारणशरीर व "**तन्मात्रोदयरूप**" म्हणजे स्थूल पुर्यष्टक किंवा पांचभौतिक स्थूल शरीर असा अर्थ केला आहे व स्पंदकारिकाकार श्रीवसुगुप्तांचे श्रीकल्लट हे साक्षात् शिष्य असल्यामुळे तो येथे स्वीकारला आहे.)।।४९।।

**तन्मात्ररूपेण-** तन्मात्रांनीच बनलेले सूक्ष्म "**पुर्यष्टक**" अथवा **कारणशरीर** या रूपाने, **मनोऽहंबुद्धिवर्तिना-** मन, अहंकार व बुद्धी यांच्या द्वारा परामर्श घेत असलेले, **तन्मात्रोदयरूपेण-** स्थूल "**पुर्यष्टक**" अथवा पांचभौतिक शरीर याच्या रूपाने ("**पशुत्व**" अवस्थेतील श्रीशिव), **पुर्यष्टकेन-** वर वर्णिलेल्या सूक्ष्म शरीराने, **संरुद्धः** - बद्ध होतो, बंधनात पडतो, **तदुत्थम्** - त्या पुर्यष्टकापासून निर्माण होणारे, **प्रत्ययो-द्भवम्-** सुख दुःखात्मक संवेदना - यांची उत्पत्ती होते.।।४९।।

* * * * *

**भुङ्क्ते परवशो भोगं तद्भावात्संसरत्यतः।**
**संसृतिप्रलयस्यास्य कारणं सम्प्रचक्ष्महे।।५०।।**

**अन्वयार्थ :-**

**परवशः** - परवश होऊन, **भोगम्-** सांसारिक भोग, सुख दुःखे, **भुङ्क्ते-** तो (पशुत्वावस्थेतील श्रीशिव) भोगतो, **तद्भावात्-** ते पुर्यष्टक, कारण-शरीर विद्यमान असल्यामुळे (तो) **संसरति-** वारंवार जन्ममृत्यूच्या चक्रात गुरफटतो, **अस्य-** या, **संसृतिप्रलयस्य-** संसाराचा कायमचा नाश कशामुळे होईल याचे, **कारणम्-** कारण अथवा उपाय मार्ग, **संप्रचक्ष्महे-** आम्ही पुढील कारिकेत सांगतो.।।५०।।

**अर्थ :- सूत्र क्रमांक ४९ -** पशुभावामध्ये अडकलेला श्रीशिव तन्मात्राच्या रूपाचे सूक्ष्म पुर्यष्टक, त्यांचे कार्यरूप स्थूल पुर्यष्टक तसेच मनस्, अहंकार आणि बुद्धी यांच्या द्वारा परामर्श केल्या जाणाऱ्या पुर्यष्टकाच्या बंधनात पडलेला आहे. पुर्यष्टकापासून **"प्रत्ययोद्भवाचा"** अर्थात् सुखात्मक किंवा दुःखात्मक संवेदनांचा जन्म होत असतो.।।४९।।

**अर्थ :- सूत्र क्रमांक ५० -** तो जीव परवश किंवा परावलंबी बनून संसारामधील भोग भोगीत असतो. पुर्यष्टकामुळेच असा जीव पुनःपुन्हा जन्मतो व पुनःपुन्हा मरतो. यामुळे संसृतीच्या या गोंधळाला एकाच वेळी नाहीसे करणाऱ्या कारणाचे किंवा उपायाचे वर्णन पुढील सूत्रामध्ये करीत आहोत.।।५०।।

*****

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :- (कारिका क्र. ४९ व ५०)**

पुरुष हा पुर्यष्टकाने जेव्हा बद्ध होतो त्यावेळी तो पशू होतो. शब्द, स्पर्श, रूप, रस गंध व सत्त्व, रज, तमोगुण हे सूक्ष्मरूपाने आत्म्याच्या सन्निध असतात.त्यापासून पुढे स्थूल शरीर निर्माण होते. आत्मा स्वतःचे सर्वव्यापित्व व सर्वकर्तृत्व विसरून जाऊन आपण लिंग देहात्मक किंवा स्थूल देहात्मक आहोत असे तो मानावयास लागून परवश होतो. स्वतःचे स्वातंत्र्य व सर्वशक्तित्व विसरून जाऊन अमुक एक कारण असेल तर अमुक एक होईल असे तो मानावयास लागून पराधीन होतो. मग मायेने प्रकाशित केलेल्या स्वतःच्या कर्माप्रमाणे भावना उत्पन्न होऊन तो सुख किंवा दुःख भोगीत असतो.

अशा स्थितीतून मुक्त व्हावयाचे असेल तर विषय हे भोग्य आहेत, हा देहाचा अभिमान धारण करणारा मी भोक्ता आहे, या भावनेचा जीवाने त्याग केला पाहिजे व मुळाकडे वळले पाहिजे. शब्दाचे स्थूल रूप आकाश असल्यामुळे शब्द कानी पडतो. त्याला मूळ कारण वर्ण व पश्यंत्यादि वाणी आहेत. त्याचे मूळ परावाणी व त्याचे मूळ पराहंता अगर पराशक्ती आहे. अशी जागृती प्रत्येक विषयाच्या किंवा पंचतन्मात्रांच्या बाबतीत ठेवावी. जेथे कोणतीही क्रिया होत असेल तेथे त्याला कारण प्राण असतो. प्राणाला कारण वायू, वायूला कारण स्पर्श, स्पर्शाला कारण प्रकृती, प्रकृतीला कारण माया, मायेला कारण त्रिपुरसुंदरी म्हणजे कुंडलिनी शक्ती

व त्रिपुरसुंदरीला मूळ कारण श्रीपरशिव आहे. अर्थात् त्या क्रियेची उत्पत्ती श्रीपरशिवांपासून आहे. उष्णतेचे मूळ रूप अग्नी आहे. अग्नीचे मूळ रूप तेज आहे. तेजाचे मूळ रूप आकाश आहे. त्याचे मूळ रूप श्रीत्रिपुरसुंदरी आहे. रुद्रादि द्रवतर पदार्थ, त्याचे मूळ रस, मूळ प्रकृती, मांस, अस्थी, रक्त वगैरे कठीण पदार्थ दिसले तरी त्याचे मूळ प्रकृती, माया, मन व श्रीत्रिपुरसुंदरी आहे. अशा रीतीने थेट श्रीपरशिवांपर्यंत जावे. पंचतन्मात्रा या परशक्तिरूप आहेत. तीन गुण आहेत. तमोगुणापासून अहंकार, रजोगुणापासून मन व सत्त्वगुणापासून बुद्धी होते. त्याचे कारण अहंकार प्रकृती आहे. त्याचे मूळ रूप माया श्रीत्रिपुरसुंदरी आहे.

पुर्यष्टकात श्रीत्रिपुरसुंदरी अगर पराहंता आहे अशी जागृती ठेवल्याने आपण पराहंतारूप बनतो. तशी सावधानता न ठेवल्यास पुर्यष्टकाने बद्ध असा मी पशू असून मला त्यापासून झालेले सुखदुःख भोगावयाचे आहे व जन्ममरणादि संस्कार घ्यावयाचे आहेत हा पशुभाव प्राप्त होतो. हा पशुभाव टाकून देऊन पशुपती होण्यासाठी पुढील श्लोकात उपाय सांगितला आहे.।।४९ व ५०।।

*****

**श्रीरामकंठाचार्य विवृती :- (कारिका क्र. ४९ व ५०)**

पतिस्वभावरूप आत्मतत्वाचे स्वमायावभासितरूप म्हणजे पशुत्व होय. तेव्हा पशूच्या ठिकाणी जर सद्विद्योदय झाला तर त्याची शक्तीसुद्धा स्वमार्गस्थ होऊन त्याच्या ठिकाणीही पतित्वाची अभिव्यक्ती होईल व तो संसारातीत होईल, म्हणून कारिकाकार म्हणतात की-

**स्पष्टीकरण :-** तन्मात्रे व त्रिगुण यांचे सूक्ष्मशरीर बनते व तेच स्थूलाचे कारण आहे म्हणून शरिराला पुर्यष्टक म्हटले आहे. देहाच्या ठिकाणी अहंप्रत्यय ठेवून पशू आपल्या नियत सुखादिकांवरच भोक्तृत्वाभिमान ठेवतो, हीच संसारदशा आहे.।।४९ व ५०।।

**श्रीभट्टकल्लटवृत्ती :- (कारिका क्र. ४९ व ५०)**

**पुर्यष्टक**

सूत्र क्रमांक ४८ मध्ये आत्म्याला त्याची स्वतःची शक्ती अज्ञात होण्याच्या अवस्थेमध्ये बंधनात टाकीत असते असे म्हटलेले आहे. या संबंधामध्ये सूत्र क्रमांक ४९ व सूत्र क्रमांक ५० मध्ये हे बंधन कसे असते

आणि यामुळे आत्मा कोणत्या दुर्गतीमध्ये पडतो? हे समजाविलेले आहे.

**सूत्र क्रमांक ४९ वृत्ती :-** **"तन्मात्रोदयः"** या शब्दाचे तन्मात्र आणि तन्मात्रोदय (क्रमशः सूक्ष्मपुर्यष्टक आणि स्थूलपुर्यष्टक) असे दोन खंड आहेत. याचाच अर्थ असा आहे की, पशुभावामध्ये पडलेला श्रीशिव शब्द आदि तन्मात्राच्या अनुभूतीच्या रूपाच्या आणि मन-अहंकार-बुद्धी या तिघांच्या द्वारा परामर्श केल्या जाणाऱ्या पुर्यष्टकाच्या बंधनामध्ये अडकलेला आहे. पुर्यष्टकामुळेच सुखात्मक किंवा दुःखात्मक संवेदनेला जन्म प्राप्त होत असतो.

**सूत्र क्रमांक ५० वृत्ती :-** श्रीशिव हे परतंत्र बनून सुख आणि दुःख यांच्या संवेदनांच्या रूपाच्या भोगाला भोगीत असतात. (श्रीशिव) त्या पुर्यष्टकाच्या विद्यमानतेमुळे संसार-शरीरामध्ये अर्थात् पांचभौतिक शरीरामध्ये संसरण अर्थात् जन्ममरणचक्रपरंपरा निर्माण करीत असतात. त्यामुळे संसृतीच्या नाशाचे अर्थात् जन्ममरणाच्या प्रवाहरूप संसाराचा नाश करणाऱ्या कारणांचे वर्णन आम्ही पुढील सूत्रामध्ये करणार आहोत. ।।५०।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्रामध्ये उल्लेखिलेल्या तन्मात्र, पुर्यष्टक इत्यादि शास्त्रीय शब्दांचे अंशतः पर्यालोचन याआधीही काही ठिकाणी केलेले आहे. काही गोष्टी राहून गेलेल्या आहेत. यामुळे येथे या गोष्टींचे संक्षिप्त परंतु यथासंभव व सर्वांगीण विवेचन प्रस्तुत करणे आवश्यक आहे; कारण यामुळेच सूत्राचा अर्थ सोपेपणाने समजून घेता येईल.

जगतामधील किंवा संसारामधील प्रत्येक प्राण्याच्या शरीराची सूक्ष्म शरीर आणि स्थूल शरीर अशी दोन रूपे असतात. यामधील सूक्ष्म शरीर हे स्थूल शरीराचे कारणरूप असून स्थूल शरीर हे सूक्ष्म शरीराचे कार्यरूप असते. या दृष्टीने **"परमार्थसार"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, जो या इंद्रियांचा ज्ञेय म्हणजेच कार्याच्या रूपात मानला जाणारा विषय अर्थात् गोचर आहे तो विभागरहित म्हणजेच विशेष भिन्न सामान्यस्वरूप सूक्ष्म अर्थ आहे. ते शब्दाचे सामान्य रूप अर्थात् तन्मात्र आहे ज्याप्रमाणे शब्दसामान्य किंवा शब्दतन्मात्र. अशाच प्रकारे दुसरेसुद्धा (स्पर्श तन्मात्र आदि) विषय आणि विषयी एकमेकांची अपेक्षा ठेवत असतात. त्यामुळे इंद्रियांप्रमाणेच शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध ही पाच तन्मात्रे अहंकारापासूनच उत्पन्न आहेत. **"एषां ग्राह्यो विषयः सूक्ष्मः प्रविभागवर्जितो यः स्यात्। तन्मात्रपञ्चकं तत् शब्दः स्पर्शो महो रसो गन्धः ।।२१।।"** सूक्ष्म शरीर

हे त्रिगुणमय मन, बुद्धी आणि अहंकार ही तीन अंतःकरणे आणि या अंतःकरणाच्या द्वारा संवेद्य असलेल्या शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पाच सूक्ष्म तन्मात्रांच्या योगापासून बनलेले आहे. शब्द आदि पाच ज्ञेय विषयाच्या मूलभूत सामान्य अवस्थेला "**तन्मात्र अवस्था**" असे म्हणतात. या दृष्टीने "**तंत्रालोकविवेक**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, ज्या सामान्य (गंधा) मध्ये अजून विशेषाच्या उत्पत्तीची लक्षणे व्यक्तही झालेली नाहीत, असे केवळ सामान्य गंध तन्मात्र आहे. "**अनुद्भिन्न-विशेषतया सा गन्धादिरेव केवलस्तन्मात्र इत्युक्तम्।।९.२८१।।**" यावरून या अवस्थेमध्ये या तन्मात्रामध्ये कोणत्याही प्रकारचे वैशिष्ट्य उत्पन्न झालेले नसते. याच प्रकारे उपरोक्त ग्रंथात असे म्हटले आहे की -

**पृथिव्यां सौरमान्यादि विचित्रे गन्धमण्डले।**
**यत्सामान्यं हि गन्धत्वं गन्धतन्मात्रनाम तत्।।९.२८०.८१।।**

**अर्थ :-** पृथ्वीमध्ये एक प्रकारचा सौरभ असतो. या व्यतिरिक्त अन्य गंधमंडलांमध्ये जो सौरभ आहे, यामध्ये सौरभ-सामान्य गंधत्व आहे, तेच गंधतन्मात्र आहे.

उदाहरण म्हणून ज्या गंधामध्ये अद्यापि सुगंध, दुर्गंध, तीव्रगंध, मंदगंध, तेलाचा गंध, अत्तराचा गंध, कुजलेल्या शरीराचा गंध इत्यादि वैशिष्ट्ये प्रकट झालेली नसतात; परंतु सामान्य रूपामध्ये केवळ गंधाचे अस्तित्व असते. या गंधाच्या सामान्य अवस्थेला "**गंधतन्मात्र**" असे म्हणतात. "**रस**" इत्यादींच्या विषयामध्ये हाच सिद्धान्त लागू होतो. तन्मात्ररूपामध्ये असलेल्या शब्द आदि विषयांचे बाह्य स्थूल इंद्रियांच्या द्वारा ग्रहण केले जाऊ शकत नाही. गंध विशिष्ट रूपाने विकसित झाल्यावर बाह्य इंद्रियांच्या द्वारा या विषयांचे ग्रहण सहजपणे केले जाऊ शकते. अशाच तन्मात्ररूप शब्द आदि पाच ज्ञेय विषय आणि मन इत्यादि तीन अंतःकरणांपासून बनलेल्या सूक्ष्म शरीराला पारिभाषिक शब्दामध्ये "**सूक्ष्म पुर्यष्टक**" असे म्हणतात. दुसऱ्या शब्दामध्ये या सूक्ष्म शरीराला "**वासना-पिंड**" असेही म्हणतात.

स्थूलशरीर हे त्रिगुणमय मन, बुद्धी, अहंकार ही तीन अंतःकरणे आणि याचे संवेद्यविषय तन्मात्राचेच कार्यरूप असलेल्या आकाश, वायू, तेज, जल आणि पृथ्वी या पाच स्थूल महाभूतांच्या मिश्रणापासून बनलेले आहे. सूक्ष्मतन्मात्रे ही जेव्हा आपली सामान्य अवस्था सोडून विशिष्ट

अवस्थेमध्ये अभिव्यक्त होतात तेव्हा स्थूल शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे म्हणवितात. स्थूल पंचमहाभूते ही या स्थूलतन्मात्रेची कार्ये आहेत. फलतः तन्मात्र हीच स्थूलभूतांची मूळ अवस्था आहे. या दृष्टीने "**परमार्थसार**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, या (तन्मात्रांच्या) संसर्गामुळे अर्थात् परस्परसंघर्षाच्या शक्तीमुळे स्थूल विषय पंचमहाभूते होतात. ती म्हणजे आकाश, वायू, तेज, जल आणि पृथ्वी ही होत. "**एतत्संसर्गवशात् स्थूलो विषयस्तु भूतपञ्चकताम्। अभ्येति नभःपवनस्तेजः सलिलं च पृथिवी च।।२२।।** (याचा अर्थ तसेच याच कारिकेची विवृती पाहावी.) स्थूलभूतांचे रूप धारण करतेवेळी या तन्मात्रा परस्परामध्ये एका निश्चित क्रमानुसार मिश्रित होतात. तो क्रम पुढीलप्रमाणे आहे.

| सामान्य रूप | विशेष रूप |
|---|---|
| १ शब्द तन्मात्र | शब्द गुणाचे स्थूल आकाश |
| २ शब्द-स्पर्श तन्मात्र | स्पर्श गुणाचा स्थूल वायू |
| ३ शब्द-स्पर्श-रूप तन्मात्र | रूप गुणाचे स्थूल तेज |
| ४ शब्द-स्पर्श-रूप-रस तन्मात्र | रस गुणाचे स्थूल जल |
| ५ शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध तन्मात्र | गंध गुणाची स्थूल पृथ्वी |

स्थूलशरीरामध्ये या पाच महाभूतांची स्थिती ही खालील प्रकारे मानली जाते.

१. नाड्यांच्या मधील पोकळ भागामध्ये शून्य अवकाश असते. आकाशाच्या रूपामध्ये "**शब्दतन्मात्राची**" अभिव्यक्ती झालेली आहे.

२. पाच स्थूल प्राण वायूंच्या रूपामध्ये स्पर्शतन्मात्राची अभिव्यक्ती झालेली आहे.

३. उष्णता, प्रकाश आणि आकार इत्यादि तेजाच्या रूपामध्ये रूप तन्मात्राची अभिव्यक्ती झालेली आहे.

४. रक्त, घाम इत्यादि तरल पदार्थ ही जल रूपामध्ये रस तन्मात्राची अभिव्यक्ती झालेली आहे.

५. शरीरामध्ये आढळणाऱ्या विभिन्न गंधांच्या व्यतिरिक्त कठीण हाडे,

मासाचे गोळे इत्यादि पृथ्वीच्या रूपामध्ये गंधतन्मात्राची अभिव्यक्ती झालेली आहे.

आता ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे की, पांचभौतिक शरीर हे पुर्यष्टक आहे; कारण पाच तन्मात्र आणि तीन अंतःकरणे हा या पुर्यष्टकाचा आधार आहे. सूक्ष्म तन्मात्राचे स्थूल कार्यरूप असल्यामुळे शरीराला **"स्थूल पुर्यष्टक"** असे नाव दिलेले आहे. याच दोन प्रकारच्या शरीरांना दुसऱ्या शब्दामध्ये भावात्मक आणि भूतात्मक शरीर असे म्हणतात. या विषयामध्ये या आधीच उल्लेख आलेला आहे.

स्थूल पुर्यष्टक हे अल्पकालावस्थायी अर्थात् अल्प काळ टिकणारे असल्यामुळे प्रत्येक मृत्यूच्या वेळी सूक्ष्मशरीर हे या स्थूल पुर्यष्टकाला सोडून दुसरे पांचभौतिक शरीर धारण करीत असते. स्वरूपज्ञान प्राप्त होईपर्यंत सूक्ष्मशरीर हे आत्म्याचा पिंड सोडीत नाही. थोडक्यात असे म्हणणे पुरेसे आहे की, सूक्ष्म शरीर हे आठ प्रकारच्या शलाकांनी अर्थात् सळ्यांनी बनलेला एक पिंजरा आहे. या पिंजऱ्यामध्ये आत्मा नावाचा पक्षी अत्यंत आवडीने बसलेला असतो; कारण स्वनिर्मित विषयोपभोगाच्या द्राक्षाचा आस्वाद या आत्म्यामध्ये मुक्ताकाशाच्या स्वच्छंदमयी भूमिकेचे विस्मरण करवीत असतो. हा शरीररूपी पिंजरा केवळ पिंजरा नाही; परंतु आत्म्याला एका स्थूल शरीरापासून दुसऱ्या शरीरामध्ये पोहोचविणारे वाहनही आहे. या तथ्याच्या पार्श्वभूमीवर सूत्रकाराचे हे म्हणणे योग्य आहे की, प्रत्यक्षात् पुर्यष्टक हेच आत्म्याचे बंधन आहे आणि हे पुर्यष्टक या आत्म्याला स्वरूपाचा लाभ होईपर्यंत शेकडो दुर्गतीमध्ये टाकीत असते. ।।४९-५०।।

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :- (कारिका क्र.४९ व ५०)**

अशा प्रकारे (पशू येथे बांधला जातो. आणि पुढे सांगितल्या जाणाऱ्या उपायांच्या सतत अभ्यासाने मुक्त होतो, असे सांगून बंधाचे स्वरूप उच्छेद्यत्वाने म्हणजे बंधाचा नाश कशाने होतो हे सांगतात.)

**स्पष्टिकरण :-** पशू पुर्यष्टकातून उत्पन्न झालेला भोग भोगतो; कारण या अनुभवातच सुखादि अनुभवांची उत्पत्ती होते. त्यामुळेच या प्रत्ययातून जन्मलेला परवश (दुसऱ्यांच्या ताब्यात असणारा) पशू शब्दांच्या संपर्काच्या क्रमाने प्रत्येक पदात (ठिकाणी) ब्राह्म्यादि देवतांकडून आक्षेपिला जाणारा व सुप्रबुद्धाप्रमाणे स्वतंत्र नसणारा असा असतो. त्या पुर्यष्टकाच्या भावापासूनच

परत परत उद्बुद्ध होणारे विचित्र (विविध) अज्ञान सतत होते. तो पशू त्या त्या भोगांना उचित असणाऱ्या भोगाच्या स्थानाची म्हणजेच शरीराची प्रार्थना करून ते स्वीकारतो आणि टाकून देतो. अशा प्रकारे या पुर्यष्टकाने रोधलेल्या (जीवाची) जी संसृती म्हणजे उभारणी होते त्याचा प्रकर्षाने लय होतो म्हणजेच पुर्यष्टकांनी युक्त अशा मलांचा उच्छेद करून विनाश होतो. त्याचे योग्य कारण आम्ही यानंतर सांगणार आहोत. प्रतिपादित करणारे आम्ही स्वतःच या प्रकरणात हे कारण सांगू.।।४९,५०।।

**श्रीकृष्णानंदसागर स्पंदरंजनी टीका :- (कारिका क्रमांक ४९ व ५०)**

बंधाचे स्वरूप हे उच्छेद करण्यास योग्यच आहे हे **"तन्मात्रोदयरूपेण .....।।४९।।"** व **"भुङ्क्ते परवशो .....।।५०।।"** या कारिकांमध्ये सांगितले आहे. जरी सूक्ष्मशरीरच पुर्यष्टकरूपाने तेथे तेथे वर्णिलेले असले तरी स्थूलशरीर त्याच्यापासून निर्माण झाल्याने पुर्यष्टक "ह्या" स्थूलशरीराने पुर्यष्टकात्म्याने तावन्मात्रात आत्मत्वाभिमानाने बद्ध होतो. त्यामुळे परतंत्र होऊन जीव अनेक प्रकारच्या भोग पदार्थांचा सुखदुःखादि साक्षात्कार करून घेतो. देहाशी संबंधित होऊन भोग उत्पन्न होतो. त्यामुळेच भोगांना तदुत्थ म्हणजेच त्या प्रत्ययांपासून उत्पन्न झालेले असे म्हणतात. प्रत्ययोद्भव म्हणजे प्राप्त अर्थात् त्या त्या विषयक भोक्तृत्वाभिमानाने उत्पन्न होणारी ज्ञानाची उत्पत्ती होय. प्रत्ययोत्पत्ती हाच भोग होय. स्थूलभूतांच्या कारणरूप ईश्वरेच्छेने भासणारे सूक्ष्म शब्दादि होते. त्या शब्दादि तन्मात्रांनी स्थूलशरीराची अभिव्यक्ती होते. याच स्थूलशरीरात ज्याचा मनोवृत्तिविशेषरूप दृढ अभिमान असतो तोच परवश होऊन भोग भोगत जन्ममरण ही लक्षणे असणाऱ्या संसारात परत परत येणे जाणे करतो. याचे कारण म्हणजे शरीर आणि इंद्रियांमध्ये असणारा तादात्म्याभिमान होय. याचा निष्कर्ष असा की, देहाभिमानी पुरुषाचा त्या विषयलाभापासून उत्पन्न होणाऱ्या सुखादिसंवेदनरूप भोगामध्ये जो भोक्तृत्वाभिमान असतो तोच संसाराचे मूलकारण असतो. त्यामुळेच आमच्याकडून अज्ञानादि आवरणांनी रहित (असलेली) स्वरूपनिष्ठा हीच संसाराच्या विनाशाचा हेतू आहे असे व्याख्यान केले गेले.।।४९-५०।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**यदा त्वेकत्र संरूढस्तदा तस्य लयोदयौ।**
**नियच्छन् भोक्तृतामेति ततश्चक्रेश्वरो भवेत्।।५१।।**

**अन्वयार्थ :-**

**यदा-** जेव्हा, **एकत्र संरूढः** - स्थूल किंवा सूक्ष्म पुर्यष्टकामध्ये चित्त लीन करून (अंतर्बाह्य एकाकार स्वरूप असलेल्या स्पंदतत्त्वाची अनुभूती घेऊन संरूढ- स्वतंत्र होतो, **तदा-** तेव्हा, **तस्य-** त्या प्रत्ययोद्भवाचा, **लयोदयौ-** संहार व उदय, **नियच्छन्-** स्वतंत्रतापूर्वक संपन्न करतो, (आणि) **भोक्तृताम् एति-** आपली आतापर्यंत "**भोग्य**" भूमिकेचा नाश करून आपली मूळची (भोक्तेपणाची पदवी प्राप्त) करून घेतो, (आणि त्यायोगे करून) **चक्रेश्वरो भवेत्-** तो चक्रेश्वर होतो.।।५१।।

**अर्थ :-** ज्यावेळी साधक स्थूल किंवा सूक्ष्म पुर्यष्टक यांपैकी एकात राहत असतानाही चित्ताला लीन करून अंतर्बाह्य एकाकार असलेल्या स्पंदतत्त्वाची अनुभूती प्राप्त करून घेतो त्यावेळी त्या प्रत्ययोद्भवाच्या स्वतंत्रतेने संहार व उदय संपन्न करीत असतो. यामुळे असा साधक आपली आतापर्यंत हरविलेली भोक्तेपणाची पदवी प्राप्त करून घेतो व शक्तिचक्राचा ईश्वर अर्थात् पूर्ण श्रीशिव बनतो.।।५१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

या स्थूल व सूक्ष्म पुर्यष्टकाहून आपण निराळे व श्रीपरशिवस्वरूपच आहोत अशी एकाग्रता एकसारखी करीत राहिल्यास आपली ज्ञानकला-कुंडलिनी शक्ती जागृत होऊन ज्या ज्या वेळेला आपल्याला विषयांचे स्मरण होईल त्या त्या वेळेला आपण त्यांच्यावर सत्ता चालवू शकू. मग मी नित्य, निरावरण, चैतन्यरूप, स्थूलसूक्ष्म पुर्यष्टक निर्माण करणारा व या दोघांवाचून माझे काही अडणार नाही अशी सत्यस्वरूपाची जागृती साधकात होऊन तो चक्रेश्वर होतो. या स्थावर जंगम प्रपंचाच्या शब्द, अर्थ, रूप व गंधराशींचा मी निर्माणकर्ता ईश्वर आहे असा अभ्यास करीत राहिल्याने साधकाचे पशुत्व नष्ट होते. त्यामुळे शक्तिचक्राच्या तडाख्यात तो सापडू शकत नाही. उलट तोच आपली मालकी त्यांच्यावर चालवू शकतो. आपण या देहाचे मालक आहोत व आपण इच्छेला येईल त्या पदार्थांचे ग्रहण किंवा त्याग करू शकतो अशी अवस्था त्याला प्राप्त होते.

त्यामुळे पतिभावामध्ये स्थित राहून आपण स्थूल-सूक्ष्म पुर्यष्टकांचा त्याग करू शकतो. मात्र आपण अप्रबुद्ध पशू राहिलो तर काहीच होणार नाही.

अशा प्रकारे बंध व मोक्षाचा विचार केल्यावर बोधाचा उदय व प्रतिबंधाची निवृत्ती होते. स्थूल किंवा सूक्ष्म अशा दोन पुर्यष्टकातील कोणत्याही एकाच्या पतित्वाच्या सिंहासनावर साधकाने आरूढ व्हावे. आपले चित्त विलीन करावे. असे केले की, त्यात उदय-विलय होणाऱ्या शब्दादि प्रत्ययांचे नियंत्रण होईल. मग तुम्ही त्यांचे भोग्य न होता तुम्हाला भोक्ताभाव प्राप्त होतो. भोगरूप पशुत्वापासून मुक्त होऊन साधक प्रभुभाव प्राप्त करतो. शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की, पशूंचा पती होऊन पशुपती व्हावे. पशुपती झाल्यावर साधक तत्काल पशुत्वापासून मुक्त होतो. "**स्वबोधोदयमंजरी**" या ग्रंथामध्येही असे वचन आहे की, "**ज्या ज्या कोणत्या मनोहर वस्तू आपल्या डोळ्यांसमोर येतील त्यांच्या ठिकाणी एकाग्र होऊन मन लीन होईपर्यंत श्रीपरमशिवांची भावना करावी. त्यामुळे निरोध आपला सेवक होईल.**"

अशा प्रकारे स्वातंत्र्याची प्राप्ती होते. मग पुरुष शक्तिचक्राचा स्वामी होतो. त्यावेळी त्याची सर्वज्ञता व सर्वाधिपतित्व निष्प्रतिबंध-मोकळे होऊन अभिव्यक्त होते.

मी या देहाहून वेगळा आहे अशी ज्याची अहोरात्र जागृती असेल त्याच्याकरिता हा उपदेश आहे. अशी जागृती असणाऱ्या साधकावरच परमेश्वराचा अनुग्रह झालेला असतो. असा साधकच मी श्रीपरमशिव आहे की नाही या संशयग्रंथीचा नाश करण्यास समर्थ होतो.

या दृष्टीने "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

**अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते।**
**इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः।।१०.८।।**

अर्थ :- मी वासुदेवच सर्व जगताच्या उत्पत्तीचे कारण आहे (व) माझ्यामुळेच सर्व जगत् कर्म करीत आहे. याप्रमाणे तत्त्वतः जाणून श्रद्धा व भक्तीने युक्त झालेले बुद्धिमान् भक्तजन मला परमेश्वराला(च) निरंतर भजतात.

मीच सर्वांचे आदिकारण आहे अशा रीतीने भावना करणारे ज्ञानी लोक मला भजत असतात. अशा प्रकारे सतत अभ्यास व आत्मवस्तूंवर

प्रेम करणाऱ्यांना मी तशाच प्रकारचा बुद्धियोग देतो व त्यांचा अज्ञानांधकार नाहीसा करतो.

साधकांना शक्तिपातयोगरूप ज्ञानदीप देऊन मी त्यांना आत्मभावात ठेवीत असतो. मी स्वतः आत्मरूप व श्रीपरशिवरूप आहे. जगाची उत्पत्ती व लय मीच करीत असतो. माझ्याशी अभिन्नरूपाने असणारी ही माझी शक्ती जगद्रूपाने नटली आहे. अर्थात् मीच सर्व जगद्रूप व अद्वैतरूप आहे.

सूक्ष्मरूपात्मक व स्थूलरूपात्मक मीच आहे. सप्तवर्ग व सप्त-पाताळ हे माझ्या अंतःकरणातलेच बाहेर काढून ठेवले आहेत. याप्रमाणे अंतर्बाह्य मीच स्वतः नटलो आहे. अशी जागृती ठेवली की, आपण श्रीपरशिवरूप बनतो.

इतके सांगून झाल्यावर ग्रंथकर्त्याने शिष्यांना शिष्टाचाराचे शिक्षण देण्याकरिता अत्यंत आनंदाने श्रीगुरुवाणीची स्तुती केली आहे.।।५१।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीरामकंठाचार्य विवृती :-**

**स्पष्टीकरण :- "एकत्र"** म्हणजे स्थूल किंवा सूक्ष्म शरीराच्या ठिकाणी, जे जे संवेद्य ते ते शरीरच अशा बुद्धीने भावात्मक शरीराच्या ठिकाणी, किंवा ध्येय अशा स्थूल किंवा सूक्ष्म भावाच्या ठिकाणी संरूढ होणे म्हणजे एकाग्रतेचा प्रकर्ष होऊन तादात्म्य-समापत्तीने संविदेची परिणती होणे होय. लयोद्भव म्हणजे त्याग किंवा स्वीकार होय. शब्दार्थमय विश्व माझेच कार्य आहे ही जाणीव झाली म्हणजे तो त्याचा नियंता होतो. तो शब्दशक्तीचा भोग्य न राहता भोक्ता होतो म्हणजे त्याला स्वातंत्र्य येते. तो चक्रेश्वर होतो म्हणजे शब्दराशीतून उत्थित होणाऱ्या शक्तींचा अधिष्ठाता होतो. हा सर्व वाङ्मयप्रपंच माझ्या शक्तीचा मूर्त आविष्कार आहे ही जाणीव दृढ होते.।।५१।।

**इति श्रीराजानकश्रीरामविरचितायां स्पन्दविवृतौ शक्त्यात्मक-विश्वव्यतिरेकोपलब्धिः प्रकीर्णं च चतुर्थो निःष्यन्दः समाप्तः।।४।।**

अशाप्रकारे श्रीरामकंठाचार्यांनी रचलेल्या स्पंदविवृतीमधल्या शक्त्यात्मक विश्वव्यतिरेकोपलब्धी नावाचा चौथा निःष्यंद आणि ग्रंथ समाप्त झाला.।।४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## चक्रेश्वरतेची प्राप्ती

आता सूत्र क्रमांक ५१ मध्ये संसृतीच्या अर्थात् भांडणाला सदा-सर्वदासाठी अर्थात् कायमचे आणि पूर्णपणे समाप्त करणाऱ्या कारणाचे वर्णन केले जात आहे.

**वृत्ती :-** जेव्हा स्थूल किंवा सूक्ष्म पुर्यष्टकामध्ये असलेला आत्मा आपल्या चित्ताचा या स्पंदतत्त्वामध्ये लय करीत असतो तेव्हा त्या प्रत्ययोद्भवाचा संहार आणि सृष्टी यांना स्वतंत्रतेने संपन्न करीत हरविलेल्या भोक्तृभावाला प्राप्त करून घेत असतो. यानंतर तो आत्मा चक्रेश्वर बनतो अर्थात् सर्व शक्तिचक्राचा अधिपती (संयोग आणि वियोग यांचे स्वतंत्र कर्ते असलेले पूर्ण श्रीशिव) बनत असतो.।।५१।।

**विवरण :-** सूत्र क्रमांक ५१ हे एकीकडे सर्व स्पंदशास्त्राचे उपसंहार सूत्र आहे तर दुसरीकडे संग्रह सूत्रही आहे. सूत्राबरोबर या सर्व स्पंद प्रकरणाचे आद्योपांत मनन तसेच अनुसंधानात्मक पर्यालोचन केल्यावर कोणताही वाचक सहजपणे खालील निष्कर्षाप्रत पोहोचू शकतो.

विश्वोत्तीर्ण आणि विश्वात्मक रूपामध्ये केवळ एकच सर्वस्वतंत्र चेतनसत्ता विद्यमान किंवा अस्तित्त्वात आहे. ही (ग्रंथाचे प्रारंभिक सूत्र मुख्यत्वे करून पहिले सूत्र) चेतनसत्ता प्रकाशरूप श्रीशिव आणि त्यांच्याहून अभिन्न असलेल्या विमर्शशक्तीची समरस अवस्था आहे. **शक्ती हीच श्रीशिव आहे आणि श्रीशिव हीच शक्ती आहे.** अहंविमर्शमय स्पंद किंवा स्फुरण हे शक्तीचे स्वरूप आहे. हे सर्व नामरूपात्मक व्यक्त विश्व श्रीशिवाच्या बहिर्मुखीन शाक्तस्पंदनेव्यतिरिक्त अन्य काहीही नाही. अभेद भूमिकेवर पूर्णाहंतारूप अर्थात् श्रीशिवरूप स्पंदशक्ती ही एकच आहे. तथापि ही स्पंदशक्ती बहिर्मुखी भेद-भूमिकेचे अवभासन किंवा प्रकाशन करण्याच्या शाश्वत स्वभावामुळे व स्वतंत्रतेमुळे सामान्य भूमिकेपासून विशेष भूमिकेवर उतरून अनंत भावात्मक आणि भूतात्मक रूपामध्ये स्पंदायमान किंवा स्फुरणशील आहे. या स्पंदशक्तीचे अनंत विशेषस्पंद हेच विश्वाचे अनंत चेतन आणि जड भाव आहेत. याच अनंत शाक्त स्पंदांना शास्त्रीय शब्दामध्ये **"शक्तिचक्र"** असे म्हणतात. श्रीशिव हे आपल्या इच्छात्मक विमर्शनेने प्रतिक्षण या शक्तिचक्राच्या संयोग-वियोगाच्या

अर्थात् निमेषोन्मेषाच्या रूपामध्ये सर्व भाववर्गाच्या सृष्टी, स्थिती, संहार, पिधान आणि अनुग्रह ही पाच कृत्ये युगपत् अर्थात् एकाच वेळी आणि स्वतंत्रतेने करीत असतात. (**"तंत्रालोक"** नवम आह्निक आणि **"ईश्वरप्रत्यभिज्ञा"** या ग्रंथाच्या ज्ञानाधिकारामधील आभासवाद पाहावा.) यामुळे श्रीशिव हे या संपूर्ण शक्तिचक्राचे स्वतंत्र अधिपती आहेत यासाठी श्रीशिव हे चक्रेश्वर आहेत. (**"तंत्रालोक"** या ग्रंथाचे चौथे आह्निक पाहावे.)

श्रीशिव आणि पशू यांमध्ये कोणताही मौलिक स्वरूपगत भेद नाही (ग्रंथाचे मध्यवर्ती सूत्र, विशेषकरून खालील सूत्रे - **("निजा-शुद्ध्यासमर्थस्य" "गुणादिस्पन्दनिष्यन्दाः", "अप्रबुद्धधियः", "शब्द-राशिसमुत्थस्य", "तन्मात्रोदयरूपेण।।")** श्रीशिव हे आपल्या शक्तीच्या द्वारा निर्माण केलेल्या पुर्यष्टकामध्ये स्वतःला बंदी बनवून पशू बनलेले आहेत. या अवस्थेमध्ये पडल्याने श्रीशिव हे आपले खरे स्वरूप पूर्णपणे विसरून गेलेले आहेत. यामुळे श्रीशिव हे अविवेकी, असाहाय्य आणि परतंत्र बनलेले आहेत. श्रीशिवांना पुर्यष्टकाचे भूत अशा प्रकारे चिकटले आहे की, ते पछाडले जाऊन यालाच वास्तविक स्वरूप समजून सांसारिक विषयोपभोगाचे मधमिश्रित हलाहल मजेने पीत आहेत आणि शरीराचे जन्ममरणस्वरूप कडू परिणाम परावलंबी बनून भोगीत आहेत. त्यात भर म्हणून श्रीब्राह्मी इत्यादि पशुशक्तीचा वर्ग श्रीशिवांना स्थूल तसेच सूक्ष्म अभिलाषात्मक विकल्प परंपरामध्ये पावलापावलावर फसवून स्वरूप चिंतनापासून दूर ठेवण्यास सज्ज आहे. थोडक्यात याचे तात्पर्य असे आहे की, श्रीशिवांनी भोक्तृभावाच्या चिंतामणीला भोग्यभावाच्या कवड्यांच्या मूल्यामध्ये अर्थात् किंमतीमध्ये विकलेले आहे. किती दुःख, किती अज्ञान आणि किती विडंबना आहे ही!

पशुशक्तींनी अधिष्ठित असलेल्या पुर्यष्टकापासून अर्थात् वासना-पिंडापासून आपला पिंड सोडवून आपल्या इच्छेनेच हरविलेली चक्रेश्वरता प्राप्त करून घेणे हाच मानवजन्माचा मुख्य उद्देश आहे. अशा प्रकारची अर्थसिद्धी ही संसाराच्या आघात-प्रतिघातापासून दूर पळून दिवसरात्र केवळ पुर्यष्टकाचे रडगाणे गाण्याने शक्य होऊ शकत नाही; तर जीवनक्षेत्रामधील सर्व व्यवहार करीत करीत आणि पुर्यष्टकामध्ये राहता राहता सतत अहंविमर्शात्मक अनुसंधानाच्या द्वारा संसार, पुर्यष्टक, मल,

अज्ञान, बंधन, संकोच इत्यादि सर्व जड चेतन भावामध्ये केवळ आणि केवळ शाश्वत स्पंदमयी स्वरूपसत्तेच्या व्यापकतेची यथार्थ अनुभूती प्राप्त करून घेण्यानेच शक्य होऊ शकते. या दृष्टीने **"तंत्रसार"** या ग्रंथात **"यो निश्चयः पशुजनस्य जडोऽस्मि कर्मसंपाशितोऽस्मि मलिनोऽस्मि परेरितोऽस्मि। इत्येतदन्यदृढनिश्चय लाभसिद्ध्या सद्यः पतिर्भवति विश्ववपुश्चिदात्मा।।आह्निक ४।।** असे म्हटले आहे. याचा अर्थ असा आहे की, पशुरूप जीवाचा मी जड आहे, कर्मांनी बद्ध आहे, मलिन आहे. सर्वांच्या पलीकडचा आहे असा निश्चय असतो. परंतु याच्या अगदी विरुद्ध म्हणजे मी चेतन आहे, कर्मांनी बांधलेलो नाही, शुद्ध आहे व सर्वांमध्ये व्याप्त आहे अशा प्रकारच्या दृढनिश्चयाने लाभसिद्धी होऊन तो तत्काळ पती, विश्ववपू आणि चिदात्मा बनतो. निर्मळ तसेच चिद्रूप विश्वात्मभाव प्राप्त करून घेतल्यावर कोणतेही तथाकथित बंधन हे बंधन राहत नाही. हा भाव प्राप्त करून घेण्यासाठी संकल्प-विकल्पात्मक चित्ताला चिच्छक्तीमध्ये विलीन करणे आवश्यक आहे.

निरंतर तीव्र साधनेच्या द्वारा स्वरूपज्ञान किंवा स्वरूपाची अनुभूती प्राप्त करून घेणारे सुप्रबुद्ध योगी हे आपल्या स्वतंत्र इच्छेनुसार अनेक पुर्यष्टक, प्रत्ययोद्भव किंवा दुसऱ्या द्वंद्वात्मक भावांच्या सृष्टि-संहाराची क्रीडा स्वतः संपन्न करण्याची क्षमता प्राप्त करून घेत असतात. यामुळे हे सुप्रबुद्ध योगी या घटकाचे भोग्य न बनता भोक्ते अर्थात् भोग घेणारे बनतात.

भोक्तृत्वाची स्थिर प्राप्ती हीच चक्रेश्वरतेची प्राप्ती आहे. हीच श्रीशिवत्वाची प्राप्ती आहे. हाच जन्ममरणरूप संसृतीचा अर्थात् संसारचक्राचा शेवट आहे.।।५१।।

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

असे प्रतिपादन करून ग्रंथकार पहिल्याच सूत्रातला अर्थ परत सांगतात.

**स्पष्टीकरण :-** ज्यावेळेस पुन्हा ही सांगितलेली परतत्त्वामध्ये समरस होण्याच्या उपदेशाची युक्ती सतत अभ्यासून एकाच पूर्णाहंतायुक्त स्पंदतत्त्वामध्ये योग्यप्रकारे व कोणत्याही प्रकाराने विचलित न होता रूढ झालेली म्हणजेच समाविष्ट झालेली स्पंदतत्त्वमय होते त्यावेळेस तो पशू पूर्वीच्या सूत्रात सांगितलेल्या पुर्यष्टकाच्या द्वारा निमीलन आणि उन्मीलन यांच्या समावेशाने लय आणि उदय करून प्रथम सूत्रात वर्णिल्याप्रमाणे एकमात्र श्रीशंकरात्मक

स्वभावापासून सृष्टी आणि संहार करून भोक्तृत्वाला प्राप्त होतो आणि पृथ्वीपासून श्रीशिवांपर्यंतच्या सर्व भोग्य तत्त्वांचा घास करून प्रत्यभिज्ञानाच्या क्रमाने परप्रमातृतेचा आश्रय घेतो. त्यानंतर पहिल्या सूत्रात वर्णन केलेल्या शक्तिचक्रांचा म्हणजे तेजसमूहाचा ईश्वर किंवा अधिपती होतो. याच देहाने श्रीमहेश्वरता प्राप्त करतो. अशा प्रकारे आरंभी व शेवटी महान् अर्थांचे संपुट दाखवून त्याच्या सारत्वाने श्रीमान् वसुगुप्ताचार्य या शास्त्राचे सर्व श्रीशांकर उपनिषदांमधले श्रेष्ठत्व अथवा मूर्धन्यत्व यांचे आविष्करण करतात.।।५१।।

* * * * *

**स्पंदरंजनी टीका :-**

आता "**यदा त्वकत्र .....।।५१।।**" या कारिकेत प्रथम श्लोकाच्या अर्थाचे निगमन अर्थात् स्पष्टीकरण करतात. ज्यावेळेस साधक स्थूल व सूक्ष्म पुर्यष्टकांपैकी कोणत्यातरी एकाच पुर्यष्टकात अवस्थित होऊन स्वतःचे चित्त लोकोत्तर स्पंदतत्त्वात विलीन करतो त्यावेळेस तो प्रथम सूत्रात सांगितलेल्या मार्गाने निमीलन-उन्मीलन समावेशापासून विश्वाच्या संहार आणि सृष्टींचे संपादन करून भोक्तृत्व मिळवितो. सर्व भोगविषयांच्या संहारणीने अबाधित परमप्रमातृता-प्रत्यभिज्ञान-क्रमद्वारा अर्थात् कधीही बाधित न होणाऱ्या परमप्रमात्याच्या प्रत्यभिज्ञानाच्या क्रमाचे अवलंबन करतो. त्यानंतर तो पहिल्या श्लोकात सांगितलेल्या शक्तिचक्राच्या स्वकिरणांच्या समूहाचा अधिपती होतो. ह्याच शरीराने श्रीमहेश्वरत्व प्राप्त करतो. हेच हृदय होय. अशा प्रकारे उपक्रम-उपसंहार यांचे संपुट करून महार्थ प्रदर्शित करून त्याच्या साररूपाने सर्व उपनिषद् आणि वेदान्ताचे मूर्धन्यत्व म्हणजेच स्पंदशास्त्र श्रीमदाचार्य वसुगुप्त यांनी प्रकट केले आहे.।।५१।।

**।। इति शिवम्।।**

**अशा प्रकारे श्रीस्पंदनिर्णयातला विभूतिस्पंद नावाचा तिसरा निष्यंद संपला.**

* * * * *

**अगाधसंशयाम्भोधिसमुत्तरणतारिणीम्।**
**वन्दे विचित्रार्थपदां चित्रां तां गुरुभारतीम्।।५२।।**

**अन्वयार्थ :-**

**विचित्रार्थपदाम्-** जिच्यातील शब्द व अर्थ आश्चर्यकारक आहेत, व **अगाध संशायाम्भोधि-समुत्तरण-तारिणीम्-** जी महासारगाप्रमाणे अगाध असणाऱ्या संशयरूपी महासागर तरून नेणारी नौका आहे (अशा), **चित्राम्-** आश्चर्यजनक असलेल्या, **गुरुभारतीम्-** माझ्या श्रीगुरूंची-श्रीवसुगुप्ताचार्यांची जी वाणी - वाङ्मयकृती स्पंदकारिका तिला, **वन्दे-** मी नमस्कार करतो.।।५२।।

**अर्थ :-** माझ्या श्रीसद्गुरूंची अर्थात् श्रीवसुगुप्ताचार्यांची वाणी अर्थात् वाङ्मयकृती म्हणजे स्पंदकारिकेमधील शब्द आणि अर्थ आश्चर्यकारक असून ही महासागराप्रमाणे अगाध असलेला संशयरूपी महासागर तरून नेणारी नौका आहे. अशा स्पंदकारिकेच्या रूपातील श्रीगुरुवाणीला मी नमस्कार करीत आहे.।।५२।।

❋❋❋❋❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

अत्यंत आश्चर्यमय अशी आमच्या श्रीगुरूंची वाणी आहे. त्यांच्या वाणीचे वाच्य व वाचक किंवा अर्थ व पद या दोन्ही गोष्टी विचित्र आहेत. त्यांची वाणी म्हणजे अगाध संदेहाच्या सागरात बुडणाऱ्या लोकांना पार करणारी नौकाच आहे. मी त्यांच्या वाणीला नमस्कार करतो.

श्रीगुरूंपेक्षा श्रेष्ठ दुसरे कोणीही नाही. **"जयाख्यसंहिता"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

**यस्माद्देवो जगन्नाथः कृत्वा मन्त्रमयीं तनुम्।**
**मग्नानुद्धरते लोकान् कारुण्याच्छास्त्रपाणिना।।**

स्वयंप्रकाश भगवान् श्रीजगन्नाथच मंत्रमय शरीर धारण करून आपल्या शास्त्ररूपी करकमलांनी संसार समुद्रात बुडणाऱ्या लोकांचा अत्यंत करुणावश होऊन उद्धार करतात. **"नारदसंहिता"** या ग्रंथाचे असे वचन आहे की-

**गुरवे दक्षिणां दद्यात् सर्वस्वं सार्थमेव वा**
**सर्वस्वमथवाऽत्यल्पं संसारोच्छेदहेतवे।।**

संसाराचा समूळ उच्छेद करणाऱ्या श्रीगुरूंना आपल्या सर्वस्वाची दक्षिणा दिली तरी ती सुद्धा अगदी थोडी आहे. **"स्वयं प्रदीपिका"** कारांचे म्हणणे आहे की, "ज्याच्या मनात भगवत्प्राप्तीची अभिलाषा आहे

त्याने प्रथम श्रीगुरूंचा शोध घेतला पाहिजे. शास्त्रामुळे भगवंताची ओळख, ज्ञान व जाणीव होते आणि श्रीगुरूंमुळे शास्त्राचे अनुभवात्मक ज्ञान होते. शास्त्रज्ञानामुळे विषयज्ञानाचा विलय होतो. खरे पाहिले तर श्रीभगवंतांची प्राप्ती झालेलीच असते. फक्त अनुभूतीलाच वेळ लागतो. यासाठी शास्त्र व ईश्वर या दोहोंपेक्षाही श्रीगुरू श्रेष्ठ आहेत." "**पंचरात्र**' या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"ईश्वराबरोबर आपण जसा व्यवहार करतो तसाच व्यवहार श्रीगुरूंबरोबर केला पाहिजे."**

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीभट्टकल्लट वृत्ती :-**

## श्रीगुरुभारतींना वंदन

शैवशास्त्रामध्ये श्रीगुरुशक्तीचे महत्त्व हे मुक्तकंठाने स्वीकारलेले आहे. स्वरूप अनुभूतीच्या विषयामध्ये केवळ मोठमोठे ग्रंथ वाचण्याने किंवा मोठी व्याख्याने ऐकण्याने मानवपशूच्या संशयग्रस्त मनाला आनंद किंवा समाधान प्राप्त होऊ शकत नाही. अनुग्रहमूर्ती हे श्रीगुरुरूपामध्ये अवतीर्ण होऊन स्वयं या मानवपशूच्या अंधकारावृत हृदयाला लोकोत्तर प्रकाशपुंजाने प्रकाशित करीत असतात. यामुळे मानवपशूच्या संशयाने ग्रासलेल्या मनाला समाधान मिळते. यासाठी त्या महान् महिमा असलेल्या श्रीगुरुशक्तीसमोर नतमस्तक होणे आवश्यक आहे.

**वृत्ती :-** श्रीसद्गुरू हे अगाध अर्थात् ज्यांना स्वतःचे असे काहीही नाही अर्थात् स्वतः निराधार असूनही ते अंतहीन आहेत.।।५२।।

**विवरण :-** प्रस्तुत सूत्रामध्ये वृत्तिकारांनी अगाध शब्दाचे अप्रतिष्ठ आणि अनंत हे पर्यायी शब्द सांगितलेले आहेत. प्रत्यक्षात् संशय नावाची कोणतीही वस्तू अस्तित्त्वातच नाही. याचे कारण असे आहे की, अज्ञान यालाच दुसऱ्या शब्दांमध्ये संशय म्हणतात. श्रीगुरुकृपेमुळे साधकाच्या किंवा मानवपशूच्या किंवा जीवाच्या मनामध्ये शुद्धविद्येचा उदय होतो आणि त्याचे सर्व संशय हे आपोआप नाहीसे होतात. पशुभूमिकेवर मनामध्ये सद्ज्ञानाचा उदय होईपर्यंत संशयसागराचा अंतहीन विस्तार मानवाला दिग्भ्रमामध्ये टाकीत असतो. यामुळे याची अंतहीनता ही खरी नसून तथाकथित आहे.

"**अगाध**" या शब्दाचे दोन विग्रह होत असल्याने वृत्तिकाराला

अगाध या शब्दाचे दोन अर्थ लिहिण्याची प्रेरणा मिळालेली आहे. ते खालील ओळीत स्पष्ट करीत आहोत.

**१ अगाध :-** (न अस्ति गाधो विश्रान्ति भूमिका यस्य) ज्याचे स्वतःचे आपले कोणतेही आधारभूत स्थान नाही असा.

**२ अगाध :-** (न अस्ति गाधो विश्रान्ति भूमिका यस्मिन्) ज्याच्यामध्ये कोणतेही आधारभूत स्थान किंवा किनारा नाही. असा पार करण्यास अत्यंत कठीण असलेला संशयसागर पार करण्यास उत्सुक असलेल्या व्यक्तींचे आपल्या सर्व अभिमानांचा त्याग करून केवळ श्रीसद्गुरूंच्या चरणकमलाची सेवा करणे हे प्रथम कर्तव्य आहे.

**इति श्रीभट्टकल्लट विरचितायां स्पन्दकारिकावृत्तौ विभूतिस्पन्दः तृतीयो निःष्यन्दः।।**

श्रीमान् भट्टकल्लट यांच्या द्वारा विरचित स्पंदकारिका वृत्तीचा **"विभूतिस्पंद"** नावाचा तिसरा निःष्यंद समाप्त झाला.

**गुरुशक्तिर्जयत्येका मद्रूपप्रविकासिका।**
**स्वरूपगोपनव्यग्रा शिवशक्तिर्जिता यया।।**

**अर्थ :-** मद्रूपाचा विकास करणारी, स्वरूप लपविण्यात व्यग्र असणारी, जिने श्रीशिवशक्तीलाही जिंकलेले आहे अशा श्रीगुरुशक्तीचा नेहमी विजय होवो.

**इति शिवम्**

**परिपूर्णेयं "स्पन्दवृत्तिः" कृतिस्तत्रभवान्महामाहेश्वराचार्य भट्टकल्लट पादानाम्।।**

**परम आदरणीय महामाहेश्वराचार्य श्रीभट्टकल्लटपाद यांची प्रस्तुत स्पंदवृत्ती पूर्ण झाली.**

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

ग्रंथाच्या शेवटी श्रेष्ठ स्पंदभूमी आणि श्रीगुरूंच्या वाणीची श्लेषाने स्तुती करतात.

**स्पष्टीकरण :-** त्या असामान्य भगवती स्पंदशक्तिरूप श्रीगुरूंना **"शैवी मुखमिहोच्यते"** अर्थात् शक्तिरूप वाणीला श्रीशिवामध्ये प्रवेश करण्याचे मुख असे म्हणतात.।। **विज्ञानभैरव।।२०।।**

अशा प्रकारे श्रीशिवस्थान प्राप्त करवून देण्यास कारणीभूत होत

असल्याने ती शक्तिरूप वाणी आचार्यरूप आहे म्हणून त्या श्रीगुरूंना आणि पश्यंत्यादि वाणींना अंतर्भूत करण्यामुळे महान् अशा परावाणीला त्याचप्रमाणे आचार्यांच्या संबंधित असणाऱ्या अशा उपदेश देणाऱ्या लोकोत्तर चमत्काररूप अशा वाणीला मी नमस्कार करतो किंवा त्यांच्यामध्ये सर्वोत्कृष्टत्वाने समाविष्ट (समरस) होतो. त्याचप्रमाणे सर्व अवस्थांमध्ये स्फुरण पावणारी असल्यामुळे अभिवादन करणाऱ्या शक्तीला मी माझ्या प्रयत्नांनी अभिवादन करतो अर्थात् विमर्शस्वरूपात स्थित असणाऱ्या तिच्यामध्ये प्रवेश करण्यासाठी तिला संमुख करतो. ती स्पंदशक्ती कशी आहे? जी उल्लंघून जाण्यास कठीण आहे, पूर्णाहंतेचा निश्चय न झाल्याने उत्पन्न होणारा विविध शंकारूप पसरलेला समुद्र योग्य रीतीने पार करण्यात जी नौकेप्रमाणे आहे आणि नाना चमत्कारांचे प्रयोजन असणारी पदे ज्या परावाणीत विश्रांती घेतात त्या रम्य रचनांमध्ये प्रवेश केलेल्या अर्थपद म्हणजेच वाच्य-वाचक ज्या श्रीगुरुवाणीत असतात त्या स्पंदशक्तीला मी नमस्कार करतो.।।५२।।

❋❋❋❋❋

# चतुर्थ निष्यंद

## श्रीगुरुभारतीवंदना

**लब्ध्वाप्यलभ्यमेतज्ज्ञानधनं हृद्गुहान्तकृतनिहितेः।**
**वसुगुप्तवच्छिवाय हि भवति सदा सर्वलोकस्य।।५३।।**

**अन्वयार्थ :-**

**एतत्-** हे, **अलभ्यम्-** मिळविण्यास कठीण, **ज्ञानधनम्-** ज्ञानरूपी धन, **लब्ध्वा-** मिळवून, **हृद्गुहान्तकृतनिहितेः -** अंतःकरण हीच गुहा - तिच्यात नीट सांभाळून ठेवलेले, (ज्ञानधन), **वसुगुप्तवत्-** श्रीवसुगुप्तां-प्रमाणे, जसे ते श्रीवसुगुप्ताना कल्याणप्रद झाले तसे, **सदा सर्व लोकस्य भवति -** नेहमी सर्व जगाला कल्याणप्रद होईल - होवो.।।५३।।

**अर्थ :-** श्रीवसुगुप्तांनी हे अलभ्य ज्ञानधन प्राप्त करून घेऊन अंतःकरणरूपी गुहेमध्ये नीट सांभाळून ठेवले. असे हे ज्ञान ज्याप्रमाणे श्रीवसुगुप्तांना कल्याणप्रद झाले त्याप्रमाणे सर्व लोकांनाही कल्याण-प्रद होवो, होईल.।।५३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्रीउत्पलाचार्य प्रदीपिका :-**

आता आपल्या संप्रदायाचा सन्मान करताना ग्रंथकार असे म्हणतात की -

**वसुगुप्तादवाप्येदं गुरोस्तत्त्वार्थदर्शिनः।**
**रहस्यं श्लोकमायास सम्यक् श्रीभट्टकल्लटः।।५३।।**

श्रीभट्टकल्लटाने आपले तत्त्वार्थदर्शी गुरू श्रीवसुगुप्त यांच्यापासून हे रहस्य उत्तम प्रकारे प्राप्त करून श्लोकबद्ध केले.

स्पंदशास्त्र हे ब्रह्मविद्येचे बीज आहे. परीक्षा केल्याशिवाय अयोग्य क्षेत्रात हे पेरता उपयोगी नाही. श्रीभट्टकल्लटाने दुसरीकडे असे म्हटले आहे की,

**गुणैरुपेताऽपि तु सिद्धविद्या कन्येव दत्ता गुणवर्जिताय।**
**सम्भोगहीना विदधात्यकीर्तिं दातुर्यतस्तत्प्रगुणाय दद्यात्।।**

**अर्थ :-** सिद्धविद्या ही गुणवती कन्येसारखी आहे. जो पुरुष गुणवर्जित म्हणजे षंढ असतो त्याला सुंदर कन्येचे दान केले तर ती त्याला

ज्याप्रमाणे संभोग देऊ शकत नाही व देणाऱ्याच्याच अपकीर्तीचे कारण होते त्याचप्रमाणे जो पुरुष गुणवर्जित असतो त्याला ही सिद्धविद्या दिली तर ती श्रीगुरूंच्या अपकीर्तीचेच कारण होते. यासाठी जे सद्गुणसंपन्न असतील त्यांनाच या विद्येचा उपदेश केला पाहिजे.

अविद्येचा अंधार नाहीसा करण्यासाठी ही विद्या प्रकाशित केली गेली. स्पंदशास्त्र हे शुद्धबोधाचा उल्लास आहे. मत्सर सोडून या शास्त्राच्या अर्थाचा विचार केला पाहिजे. हे शास्त्र म्हणजे एक महान् आश्चर्य आहे. या शास्त्राचा अनादर कधीही करता कामा नये.

सच्छिष्यांच्या करिता या शास्त्राची रचना झाली. दिवा हातात असला म्हणजे चालणाऱ्यांचे पाय घसरत नाहीत. त्याचप्रमाणे आड-मार्गातील लोकांनाही या शास्त्राच्या प्रकाशात शुद्धमार्ग दृष्टीस पडतो. अत्यंत सावधानतेने जो पुरुष या शास्त्राचा अभ्यास करतो तो आपल्या आयुष्यातच आपल्या भगवत्तेची अनुभूती घेऊन कृतार्थ होतो. यापेक्षा दुसरे मोठे कोणते आश्चर्य असू शकेल?।।५३।।

**इत्याचार्य भगवतोत्पलविरचिता स्पन्दप्रदीपिका समाप्ता।**
**अशाप्रकारे आचार्य भगवान् श्रीउत्पलदेवांनी रचलेली**
**स्पंदप्रदीपिका समाप्त झाली.**

**श्रीक्षेमराज स्पंदनिर्णय टीका :-**

या कारिकेत ग्रंथकारांनी शिष्यांना हे ज्ञान मिळविण्यासाठी प्रवृत्त करताना आणि त्यांचा विश्वास जागृत करताना आपले प्रसिद्धीच्या प्रभावाने युक्त असे स्वतःचे नाव सांगून हे शास्त्र गूढ ठेवल्याने या शास्त्राची महान् फलता सांगितली आहे.

**स्पष्टीकरण :-** या शास्त्रात सांगितलेले हे ज्ञानच पुरुषार्थ प्राप्त करून देण्यास कारणीभूत होत असल्याने हे सहजासहजी न लाभणारे असे धन मिळवून, श्रीशंकरांनी स्वप्नात दिलेल्या उपदेशाचे सार शिला-तलावर प्राप्त करून, प्रकाश-विमर्शात्मक विश्वाला आत प्रवेश दिल्यामुळे "गुहा" (या नावाने जाणले जाणारे) जे हृदय, त्या हृदयगुहेच्या आत ज्याने त्या ज्ञानाची स्थापना केली आहे, ते ज्ञानधन आणि त्याचे स्वामी श्रीवसुगुप्त या नावाने संबोधिलेले जाणारे श्रीगुरू ज्याप्रमाणे श्रीशिवत्वाला प्राप्त झाले त्याचप्रमाणे अधिकार, नियम आणि संकोच यांचा अभाव असल्याने सर्व लोकही हे ज्ञानधन ज्यावेळेस त्यांच्या हृदयगुहेमध्ये ठेवतील, दृढत्वाने ते

आत्मसात करतील आणि ते इतर अपात्र लोकांपासून लपवितील त्यावेळेस तेही श्रीशिवत्वाला प्राप्त होतील अर्थात् नित्य श्रीशंकरात्मकस्वभावामध्ये समावेशाचा अपूर्व लाभ मिळवितील.।।५३।।

जरी या शास्त्रातील टीकांची मोजदाद करणे शक्य नसले आणि जरी बुद्धिमान् लोक हे स्वभावाने उत्तान असले तरीही सार ग्रहण करण्यात कुशल असलेले काही चेतनराजंहसरूप कुशल (विद्वान्) माझ्या टीकेतील विशिष्ट गोष्टी नक्कीच जाणू शकतील.।।१।।

इतर अनंत टीकाकारांमध्ये आपली गणना (सामान्यतऱ्हेने) व्हावयास नको म्हणून माझ्या श्रीगुरूंनी त्या शास्त्रावर टीका लिहिलेली नाही.।।२।।

मी स्पंदसंदोह या टीकेत आज आणि पूर्वीचा विशेष फरक सांगितलेला आहे. परंतु श्रीरुद्रशक्तीचा समावेश झालेल्या, श्रीशिवरूप अशा शूर नावाच्या माझ्या शिष्याच्या मनापासून केलेल्या प्रार्थनेमुळे मी, क्षेमराजाने, माझ्या श्रीगुरूंच्या सूचनांच्या मदतीने हे शास्त्र निर्माण केले.।।३।४।।

योग्य श्रीगुरूंकडून उपदेश घेऊन ज्यांनी आपली बुद्धी शुद्ध केलेली नाही, शैव तत्त्वज्ञानाच्या रहस्याने ज्यांचा भ्रम दूर झालेला नाही आणि ज्या मंदबुद्धीच्या लोकांनी या आधी श्रीप्रत्यभिज्ञारूप अमृताचा आस्वाद घेतलेला नाही त्यांना हे ज्ञान मिळविण्याचा काहीच अधिकार नाही. ह्या ज्ञानाचे फक्त पूर्णबुद्धी मनुष्यांनीच योग्य प्रकार चर्वण केले पाहिजे.।।५।।

श्रीशिवांपासून पृथ्वीपर्यंत तत्त्वांचा विस्तार करणारा जो अध्वविभव आणि सृष्टी, स्थिती व लय या चित्रविचित्र अवस्थांच्या शरीराने स्फुरणारे, हे एवढे विश्व ज्याच्या स्वरूपाचा एक कण आहे आणि जे एकमेव सतत स्फुरण पावणाऱ्या आनंदाचे घर आहे अशा श्रेष्ठ संवित्स्पंदाचा जयजयकार असो.।।६।।

**अशा प्रकारे श्रीप्रत्यभिज्ञाकारांचे प्रशिष्य महामाहेश्वराचार्यवर्य श्रीअभिनवगुप्तांकडून उपदेश घेतलेल्या श्रीक्षेमराजांची श्रीस्पंदनिर्णय ही कृती समाप्त झाली.।।५३।।**

*****

।। श्रीगुरु:शरणम् ।।

श्रीक्षेमराज विरचित

# स्पन्दसन्दोहः

जे पृथ्वीपासून श्रीशिवापर्यंतची तत्त्वे चित्रसंयोजन करून हृदयात रेखाटतात, ज्यांचा महिमा (कोणासही) स्पष्ट झालेला नाही आणि जे विचित्र सृष्टिसंहाराची लीला प्रकट करतात असे स्पंद(शक्तीने) युक्त, स्वप्रतिष्ठ अर्थात् स्वात्म्यात स्थित असणारे श्रीशिवच विजयी होतात.।।१।।

चैतन्यरूपी समुद्राचे अमृत पसरवीत सर्वांच्या अंतःकरणात स्फुरत अर्थात् प्रकाशित होत जो महामुद्रेने आनंदित झाला आहे, अतिशय पूर्णानंद देत युक्तीने थोडक्यात असणाऱ्या तंत्रार्थाला उन्मुद्रित अर्थात् विकसित करून जो अंतर्मुखाला रसवितो तो हा वीर कुलेन्द्र श्रीशिव विजयी होतो.।।२।।

ज्या महान् अशा श्रीसद्गुरूंकडून स्पंदतत्त्व प्रकाशित केले गेले त्यांच्यापासूनच त्याचा उपभोग घेत असताना आम्हाला किंचित् कौतुक होत (वाटत) आहे.।।३।।

या ठिकाणी पहिल्याच सूत्राची श्रीक्षेमराज चर्चा करतात. श्रीमान् वसुगुप्त परमाद्वय, प्रकाश आणि आनंद यांनी युक्त अशा महेश्वरस्वरूपाचे ज्ञान करून देण्यासाठी समस्त शास्त्रार्थांचे सार असणाऱ्या समुचित स्तुतीचा उपदेश करतात.

**यस्योन्मेषनिमेषाभ्यां जगतः प्रलयोदयौ।**
**तं शक्तिचक्रविभवप्रभवं शङ्करं स्तुमः।।१।।**

**अर्थ :-** श्रीशंकरांच्या नेत्रांच्या उघडण्याने आणि मिटण्याने (म्हणजेच स्पंदामुळे) शक्तिचक्राचा संहार व उत्पत्ती होते. यामुळे जगाची उत्पत्ती व लय होत असतात. त्या (अनंत) शक्तींच्या समूहाच्या ऐश्वर्याचे उगमस्थान असलेल्या अर्थात् जगाच्या सर्व उत्पत्ती-लयाचे आदिकरण असलेल्या श्रीशंकरांची आम्ही स्तुती करीत आहोत.।।१।।

**स्पष्टीकरण :-** शम् अर्थात् सर्व उपद्रवांनी रहित, परमानंद-अद्वय चैतन्यप्रकाशाच्या ज्ञानाने युक्त असे जे अनुग्रह करतात त्या स्वात्मपरमार्थाने युक्त अशा श्रीशंकरांची मी स्तुती करतो. सर्व देह आणि प्राणादींनी

परिमित किंवा संकुचित झालेल्या प्रमातृपदाला खालच्या स्तरावर आणून विकल्प (निश्चित विचार) आणि अविकल्प (अनिश्चित विचार) रूप सर्व दशांमध्ये सर्वोत्कृष्टत्वाने त्या श्रीशंकरांची आम्ही चर्चा करतो. येथे "स्तुमः (स्तुती करतात.)" हे बहुवचन आमच्यासारख्याच सर्व अनुग्रह करण्यास योग्य अशा जनांचा अभेद सांगण्यासाठी आहे. "तम्" (त्याला) हे पद येथे श्रीशंकराचे असाधारण स्वरूप ज्ञात करवून देण्यासाठी योजिले आहे.

हे श्रीशंकर कोण आहेत बरे? (अथवा त्यांचे स्वरूप कसे आहे?) या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी "**यस्योन्मेष .....**" ही कारिका सांगितली आहे. येथे काहीजण असे म्हणतात की, स्वरूपाचे गोपन करणाऱ्या अर्थात् खरे स्वरूप लपवून ठेवणाऱ्या उन्मेष-निमेषांकडून जगताची सृष्टी अर्थात् उदय आणि संहार अथवा प्रलय होतो. पण ते काही जणांना पटत नाही. त्याचप्रमाणे ते असे म्हणतात की, नित्य अशा परमेश्वरामध्ये संयोगाने घडणारे उन्मेष आणि निमेष हे संयोगानेच घडणाऱ्या जगताच्या सृष्टी आणि प्रलयाचे कारण कसे काय असू शकतील? त्यामुळे उन्मेष आणि निमेष या धर्मांनी युक्त जगताच्या उत्पत्तीचे कारण असल्याने एकच भगवच्छक्ती उन्मेष-निमेष या शब्दांनी व्यवहारिली जाते. त्याचप्रमाणे यथासंख्य टाकून (यथासंख्य अर्थ न करता) ज्याच्या उन्मेषामुळे जगताचा उदय होतो आणि ज्याच्या निमेषामुळे जगताचा प्रलय होतो असे व्याख्यान करावे. येथेही अशी शंका उत्पन्न होते की, शास्त्रांमध्ये केलेल्या उपदेशांप्रमाणे असणाऱ्या श्रीशंकरांच्या स्वरूपाहून अभिन्न असणाऱ्या जगताचा कसा बरे अकस्मात् विनाश आणि उदय होईल? अशा प्रकारे प्रसंग प्राप्त झाला असता असे उत्तर दिले जाते की, जर आभासानुसार त्याच प्रकारे भासणाऱ्या श्रीशंकरांच्या स्वभावाहून अभिन्न असणाऱ्या जगताचे श्रीशंकरात्मक स्वभावाप्रमाणे भासणारे प्रलय आणि उदय इच्छिले जातात तर मग उन्मेष आणि निमेष तशाच प्रकाराने भासणाऱ्या परमेश्वरात का बरे इच्छिले जाणार नाहीत? कालही आभासनसार (व्यक्त होण्याच्या स्वभावाने युक्त) असतो, त्याच्या व्यतिरिक्त कोणीही नाही. मग कशा प्रकारे हे श्रीशंकर आभासणाऱ्या श्रीभगवंतांपासून भिन्न असतील?

"**एकचिन्ताप्रसक्तस्य।।४१।।**" ह्यामध्ये उन्मेषाचे लक्षण सांगितले आहे. त्यानुसार निमेषाचे लक्षणही स्वरूप लपवून ठेवणारा असेच आहे असे जाणून यथासंख्य घेतला तरी त्यात काही नुकसान नाही, असे काही

जणांचे मत आहे. आता आख्यायिकावर्णन पुरे.

आता सूत्राचे स्पष्टीकरण करतात. येथे महाप्रकाशरूप व अत्यंत शुद्ध अशा श्रीपरमेश्वराची एकच परामर्शशक्ती किंचित् हालचालींनी युक्त असल्याने अथवा तरंगरूप असल्याने स्पंद या नावाने संबोधिली जाते. आगमांमध्ये अर्थात् तंत्रांमध्ये या स्पंदशक्तीलाच स्फुरत्ता, ऊर्मी, बल, उद्योग, हृदय, सार, मालिनी, परा इत्यादि अनंत संज्ञा सांगितल्या आहेत. ती एकच असूनही एकाच वेळस उन्मेषनिमेष यांनी युक्त असते. श्रीसदाशिवांपासून पृथ्वीपर्यंत पूर्वसृष्ट अर्थात् आधी निर्माण झालेल्या तत्त्व समूहांची जी संहाराच्या अपेक्षेने निमेषभूमी आहे तीच निर्माण होणाऱ्याच्या अपेक्षेने उन्मेषदशा आहे. पूर्वी निर्मिलेल्या (वस्तूंची) संहाररूप निमेषअवस्था असते ती अभिन्न चैतन्याच्या प्रकाशाची अथवा व्यक्त होण्याची उन्मेष भूमी आहे. भेदांना जन्म देणारी जी उन्मेषदशा आहे तीच चैतन्याभिन्न व्यक्त स्वरूपाची निमेषदशा आहे. माया पदातही किंवा अवस्थेतही नील इत्यादींना पाहण्याच्या इच्छेने युक्त अशी पूर्वभूमिरूप जी उन्मेषदशा आहे ती आधीच व्यक्त झालेल्या पीत आदींच्या अवभासाची विश्रांतिस्थानरूप निमेषदशा होय. (म्हणजेच ज्या ठिकाणी नील इत्यादींची संवेदना उत्पन्न होण्याचे स्थान अर्थात् ती नील इत्यादींची उन्मेष दशा झाली. ती आणि जेथे आधीच पाहिलेल्या पीत इत्यादि संवेदना जेथून नष्ट होते ते विश्रांतिस्थान म्हणजेच निमेषदशा या दोन्हीही एकरूप आहेत.) हे सर्वांच्या जाणीवेत येत असल्याने ते स्वयंसिद्धच आहे. त्याचप्रमाणे ही पाहण्याच्या इच्छेने युक्त असणारी भूमी अथवा स्थान "नीलवर्णाच्या" इदंतावभासाचे अर्थात् विश्वाभासाचे आसूत्रण (एकत्रिकरण) करीत असल्याने ती उन्मेषरूप असूनही तीच श्रीपरमेश्वरांशी अभिन्न स्वभाव असणारी निमेषरूपही आहे. वस्तुत: मायेच्या अवस्थेतही निमेष आणि उन्मेष यांनी चिह्नित हालचाल करणाऱ्या सर्व शक्तींनी युक्त अशी ही सर्वश्रेष्ठ विमर्शभूमी नेहमीच सर्वांमध्ये स्फुरत असूनही माया अवस्थेमध्ये प्रवीणता प्राप्त करवून देत नाही. संविद्रूप स्वात्म्यात मध्ये मध्ये ती प्रकट होतेच. तिच्याच स्वरूपाचे ज्ञान करवून देण्यासाठीच पुढील कारिका प्रकट करतात - "**अतिक्रुद्ध ....।।२२।।**" पासून ते "..... **अनावृत्तः।।२५।।**"

अत्यंत श्रेष्ठ अशा तीव्रशक्तिपाताच्या प्रकाशाने ज्याचे मायेचे आवरण नष्ट झालेले आहे त्याला श्रीशिवपदाची प्राप्ती होण्यासाठी ही विमर्शभूमी

हाताचा आधार देते; परंतु ती पूर्णत्वाने तेथे परिस्फुरित होत नाही. हेच **"यदा क्षोभः प्रलीयेत .....।।९।।"** यापासून ते **"..... करोति च।।१०।।"** या पर्यंतच्या कारिकांमध्ये सांगतात. त्याचप्रमाणे **"जाग्रदादि .....।।३।।"** पासून **"तदस्ति परमार्थतः।।५।।"** येथपर्यंत हेच सांगितले आहे. ज्यावेळेस प्रथम श्रीशिवात्मक सामरस्यभूमीच्या पूर्णाहंतात्मक सामरस्यात स्थित असणारे विश्व जर नसेलच तर जे अस्तित्वातच नाही; मग त्याची निर्मिती कशी बरे होईल? नील इत्यादि पाहण्याची इच्छारूप, जिचे दुसरे नाव "तुटिपाता" असं आहे, अशी दशा उदित झाल्यावर केवळ नीलापेक्षेने अहंतेने आच्छादित असणाऱ्या एकत्रित झालेल्या इंदतारूपालाच अर्थात् विश्वाभासालाच श्रीसदाशिवेश्वरता असे म्हणतात. तीच पूर्णाहंतेने युक्त, सामरस्यस्थित विश्वाच्या अपेक्षेने श्रीशिवता होय. जर दुसरी (श्रीशिवता) प्रकाशयुक्त श्रीसदाशिवाशी युक्त होऊन स्थित नसेल तर उत्तरकालातली सृष्टी कशी काय शक्य आहे? कारण चिद्रूपाव्यतिरिक्त अन्य कोणीही सृजन किंवा निर्मिती करू शकत नसते. **"प्रत्यभिज्ञा"** या ग्रंथामध्ये याचा उल्लेख पुढील प्रमाणे केलेला आहे की -

**चिदात्मैव हि देवोऽन्तः स्थितमिच्छावशाद्बहिः।**
**योगीव निरुपादानमर्थजातं प्रकाशयेत्।।१।५।७।।**

**अर्थ :-** ज्याप्रमाणे योगी उपादान कारणादींशिवाय अर्थसमूहांना प्रकाशित करतात त्याचप्रमाणे चिदात्मा देवच आपल्या आत स्थित असणाऱ्या अर्थसमूहाला इच्छाबलानेच बाहेरील बाजूस प्रकाशित करतो.

येथेही **"यत्र स्थितमिदं कार्यं यस्माञ्च निर्गतम्।।२।।"** या कारिकेत असेच सांगितले आहे. हे विश्व आणि श्रीशिवता व श्रीसदाशिवता परस्परांना व्यापून राहतात आणि त्यामुळे ते एकरूपच असतात. हा वाचेतला क्रम आहे, वस्तूतला नाही. त्यामुळेच एकाच वेळेस ही संवित् स्रष्ट्री अर्थात् निर्मिती करणारी आणि संहर्त्री अर्थात् संहार करणारी अशा प्रकारे सक्रमाने भासित होणारी आहे. त्याचप्रमाणे सृष्टी आणि संहार न करणारी, शुद्ध-अहंता-प्रकाशमय अक्रमरूपाही आहे. उपदेशरूप धन ज्यांच्याकडे आहे तेच या भूमीची निवड करतात. **"दिदृक्षयेव .....।।४३।।"** या व **"तमाधिष्ठातृ भावेन .....।।११।।"** या सूत्रात हाच उपदेश केलेला आहे.

**"सदासृष्टिविनोदा .....।"**
**"प्रतिक्षणमविश्रान्तः .....।"**
**"प्राकाम्यमात्मनि यदा .....।"**

या ठिकाणीही श्रीगुरूंचा हाच आशय आहे. यासंबंधी आगमात असे म्हटले आहे की -

**लेलिहाना सदा देवी सदा पूर्णा च भासते**
**ऊर्मिरेषा विबोधाब्धेः शक्तिरिच्छात्मिका प्रभोः ।।**

**अर्थ** :- ही ईश्वरी (शक्ती) नेहमीच आनंदात असते आणि ती नेहमीच पूर्णरूपाने भासते. ती ज्ञानसागराची लाट असून ईश्वराची इच्छात्मक शक्ती आहे.।।

अशा प्रकारे ही विभागरहित एकच विमर्शभूमी उन्मेष-निमेषयुक्त असून उन्मेष-निमेष या शब्दांनी संबोधिली जाते. "उन्मेषौ च निमेषौ च" असा समासाचा विग्रह करून निमेषमय उन्मेषाचे आणि उन्मेषमय निमेषाचे धरणीपासून श्रीसदाशिवापर्यंत तत्त्वांनी युक्त जगताप्रती प्रलय आणि उदयाचे हेतुत्व सांगावे. नीलादींचा जो बाह्यरूप उदय तोच अहंतारूपाचा प्रलय आहे आणि बाह्यरूपाचा जो प्रलय तोच अहंतारूपाचा उदय आहे. अशा प्रकारे प्रलय हा उदयरूप असून उदय हा प्रलयरूप आहे असा याचा सारार्थ आहे. वस्तुतः चिदात्माच त्याप्रमाणे किंवा तशा प्रकारचा भासतो. त्यामुळे येथे अक्रमताच सांगितलेली आहे. अशा प्रकारेच येथे समास सिद्ध होतो.

या स्वतंत्रशिवाद्वय दर्शनात एकेका अर्थांचे अनेकत्व सापडते. एका ठिकाणी अस्थिर पदार्थ हे एक असूनही दोन अर्थ आहेत आणि दुसराही द्व्यर्थीच आहे; यात कोणती संगती आहे? आता अप्राकृत विषयांची चर्चा पुरे.

अशा प्रकारे व्याख्यान करीत असताना श्रीस्वच्छंद इत्यादि शास्त्रांमध्ये परमेश्वराचे जे पंचविधकृत्यकारित्व सांगितले आहे तेही येथे स्वीकारलेले आहे. त्याचप्रमाणे अंतर्भेद उल्लसित अर्थात् निर्माण झालेल्या आणि किंचित् स्वरूपनिमेषाने युक्त असणाऱ्या षडध्वांची सृष्टी शुद्ध आणि अशुद्ध अशा दोन प्रकारची आहे. अशा तऱ्हेने दोन प्रकारच्या निमेषांनी युक्त किंचित् भेदाने स्पर्श केलेला ऊर्ध्वोन्मेषरूपाने संहार होतो. त्याच प्रकारे उन्मेष आणि निमेषांनी हालचाल करणाऱ्या आभासन आणि अनाभासन यांच्या

प्रकाशनाचा परमार्थ म्हणजे स्थिती होय. यासंबंधी श्रीसिद्धपादांनी असे म्हटले आहे की -

**"..... लोलीभूता परा स्थितिः ।।"**

**अर्थ :-** "हालचाल करणारी परा (श्रेष्ठ) स्थिती होय." तशा प्रकारे उत्पन्न होणाऱ्या स्वरूपोन्मेषभासरूप नरकादिभोग युक्त जो पूर्ण निमेष आहे तो विलय होय. सर्वात्म्याने जो पूर्ण उन्मेष आहे तो सर्व भेद शांत झाल्यामुळे पूर्वी निरूपित केल्याप्रमाणे निमेषमय आहे. तो अनुग्रह होय. अशा प्रकारे परमेश्वराचे येथे पंचविधकृत्यकारित्व सांगितले. अशा प्रकारेच प्रलय आणि उदय हे जाणून घ्यावेत. प्रलयादि हे आभास्यनिष्ठ (अर्थात् ज्याचा भास होतो त्यात स्थिर राहणारे) आणि आभाससार आहेत. ते प्रकाशात्मक श्रीपरमेश्वरांशी किंचित्‌ही संबंधित नाहीत. हेच **"अवस्थायुगलं चात्र .....।।१४।।"** येथपासून **"..... कर्तृत्वम् .....।।१४।।"** येथपर्यंत सांगितले आहे. मायाप्रमातृभूमीत प्रकाशात्मक श्रीपरमेश्वराची ही पंचविध कृत्ये राहतात. यासंबंधीची पूर्ण माहिती त्यासंबंधी सावध चित्त असणाऱ्या विद्वान् लोकांनी जाणून घ्यावी. अशा प्रकारच्या पंचविध कृत्ये करणाऱ्या श्रीभगवंतांचे नीलादि विषय व्यक्त होत असताना देश-काल यांनी वेगवेगळ्या असलेल्या नीलादींच्या भासामध्ये स्रष्टुत्व, दुसऱ्या देश-कालादींनी भिन्न झालेल्यांमध्ये संहार, सृष्टी झाल्यावर नीलादींचा आभास सामान्य होत असताना स्थिती, तेथेच अभेदांशसर्गात विलय इत्यादि होत असतात. हेच पीत इत्यादींच्या आभासातही उपयोजावे. पहिल्यांदा आभासित झालेल्या नील आणि त्याचे ग्रहण करणाऱ्याच्या अपेक्षेने (पीताभास हा) संहार आहे. अवभासित होत असणाऱ्या पीतादि आणि त्यांच्या ग्राहकापेक्षेने ती सृष्टी होय. हे नील, हे पीत अशा प्रकाराने विभक्तपणाच्या किंवा वेगवेगळे-पणाच्या अपेक्षेने स्थिती होय. अंतःस्वरूपाची प्राप्ती होणे म्हणजेच विलय होय. **शुद्ध संविद्‌ऐक्याला प्राप्त झालेले असणे आणि स्मृत्यादींचे बीज काढून टाकणे म्हणजेच अनुग्रह होय.** (ज्यावेळेस निळ्या रंगाचे ज्ञान संपून पिवळ्या रंगाचा आभास अथवा ज्ञान होऊ लागते त्यावेळेचा तो क्षण म्हणजे निळ्या रंगाच्या ज्ञानाच्या संहाराचा आणि पिवळ्या रंगाच्या ज्ञानाच्या उत्पत्ती अथवा सृष्टीचा क्षण असतो. हा निळा रंग आणि हा पिवळा रंग असे वेगवेगळ्या प्रकाराने होणारे रंगाचे ज्ञान म्हणजे स्थिती होय. त्या सर्वच विषयांचे ज्ञान संपून आत्मस्वरूपाचे ज्ञान होणे म्हणजे

विलय होय. शुद्ध संविद्रूप आत्म्याशी एकरूप होऊन स्थिर असणे आणि स्मृती इत्यादि बीजांचा नाश होणे हा अनुग्रह होय.) अशा प्रकारे नेहमीच सर्व अवस्थांमध्ये श्रीमहेश्वरांचे पंचविधकृत्यकारित्व एकरूप विस्तार पावून अवस्थित असते. तेथेच चिच्चक्रैश्वर्यात्मक श्रीशंकररूप स्वप्रकाश स्वस्वभावात काही अनुत्तरसमाधीचे धन असणारेच बुद्धीने अधिरोहण करतात अर्थात् ते तत्त्व जाणून घेतात. जे देहालाच आत्मा समजतात त्यांना हे तत्त्व कधीच समजत नाही. यासंबंधाने "**श्रीभर्गशिखा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

**वीरभैरवदेवोऽपि परमानन्दविग्रहः।**
**उदेति मोहपङ्काङ्के पशुहृत्कुहरे कथम्।।**

**अर्थ :-** पशू अर्थात् जीवाच्या हृदयरूप गुहेच्या मोहचिखलावर परमानंद शरीररूप वीरभैरव देव कसा काय बरे उगवेल? अशा प्रकारे येथून पुढे व्याख्यानाचा उपदेशप्रकार "**जाग्रदादि .....।।३।।**" येथपासून "**तदस्ति परमार्थितः .....।।५।।**" येथपर्यंत स्पष्ट होत जाईल.

त्याचप्रमाणे, "**तस्योपलब्धिः सततं त्रिपदाव्यभिचारिणी ।।१।१७।।**", "**अतः सततमुद्युक्ता स्पन्दतत्त्वविविक्तये .....।।२१।।**", "**इति वा यस्य संवित्तिः .....।।३०।।**", "**प्रबुद्धः सर्वदा तिष्ठेत् .....।।४४।।**" इत्यादि स्थानांमध्येही हेच सांगितले आहे. ग्रंथाच्या शेवटीही ह्याचाच शेवट करतील.

**यदा त्वेकत्र संरूढस्तदा तस्य लयोद्भवौ।**
**नियच्छन्भोक्तृतामेति ततश्चक्रेश्वरो भवेत्।।५१।।**

**अर्थ :-** ज्यावेळेला साधक स्थूल किंवा सूक्ष्म पुर्यष्टक यांपैकी एकात राहत असतानाही चित्ताला लीन करून अंतर्बाह्य एकाकार असलेल्या स्पंदतत्त्वाची अनुभूती प्राप्त करून घेऊन त्या त्या प्रत्ययोद्भवाच्या स्वतंत्रतेने संहार व उदय संपन्न करीत असतो यावेळेला असा साधक आपली आत्तापर्यंत हरविलेली भोक्तेपणाची पदवी प्राप्त करून घेतो व शक्तिचक्राचा ईश्वर अर्थात् पूर्ण श्रीशिव बनतो.

लय आणि उदय यांचा येथे सत्य अर्थ सांगावयाचा आहे. हेच चक्रांचे ऐश्वर्य आहे. ते सर्वदा पंचविधकृत्य करणाऱ्या चिन्मय स्वरूपाचे स्थान आहे. आता कितीतरी जनांना आश्वासन देणाऱ्या कथा पुरे.

ज्या चिदानंदघन आत्म्याच्या उन्मेष-निमेषरूप उन्मीलन-निमीलनाने **"यदन्तः तद्बहिः"** असे करून शरीररूप जगताचे तदनुषंगाने बाह्य विश्वाचेही प्रलय-उदय अर्थात् निमीलन आणि उन्मीलन असे समावेश आणि व्युत्थानाच्या अपेक्षेने यथासंख्यानेही जोडावे.

ज्याप्रमाणे श्रीमत्स्वच्छंदशास्त्रात सांगितलेल्या ब्रह्मादि शक्तींच्या सुषुप्ती आणि जागृत अवस्थांमध्ये त्यांच्या खाली राहणाऱ्या व्यतिरिक्त गोष्टींचा प्रलय आणि उदय होतो त्याप्रमाणे श्रीपरमेश्वरापेक्षेने विश्वाव्यतिरिक्तही प्रलय आणि उदय होतो असे येथे सांगितले. कुंभाराशिवाय म्हणजेच कारणाशिवाय कार्य (घट) उत्पन्न झाला आहे असे प्रमाणांनी सिद्ध होऊन तुम्ही काय त्याचा स्वीकार करता का? नाही. हा संशय दूर करण्यासाठी विशेषणाद्वारे हेतू सांगतात. **"शक्तिचक्रविभवम्"** **"शक्तयोऽस्य जगत्कृत्स्नं शक्तिमांस्तु महेश्वरः।।"** अर्थात् "त्यांच्या (श्रीमहेश्वरांच्या) शक्ती म्हणजे हे जगत् असून श्रीमहेश्वर हे या शक्तींनी युक्त आहेत." अशा प्रकारे आगमात सांगितल्याप्रमाणे जे काही येथे व्यक्त होते ते सर्व प्रकाशमयच आहे. अप्रकाशाची प्रकाशाशिवाय सिद्धी होत नसल्याने स्वप्न संक पादींमध्ये संवित्‌च आभासन आणि उल्लासन यांचे कारण आहे असे सांगितले जाते. अनुभवानुसार प्रकाशरूप श्रीभगवंताच्या ज्या शक्ती आहेत त्यांचे चक्र अर्थात् विविध प्रकारच्या संयोजनांनी व्यवस्थित असलेला समुदाय होय. त्या समुदायाचा विभव म्हणजे विस्तार होय. त्याचा प्रभव म्हणजेच "त्याच्यापासून उत्पन्न होतात," म्हणून त्या त्या प्रकारे प्रकाशित होण्याचा जो स्वस्वभाव आहे, त्याला आम्ही स्तवितो.

हेच पुढे सांगितले आहे -

**यस्मात्सर्वयमयो जीवः सर्वभावसमुद्भवः।**
**तत्संवेदनरूपेण तादात्म्यप्रतिपत्तितः।।२८।।**

**अर्थ** :- जीव किंवा पशुप्रमाता हा सर्वमय आहे; कारण हा जीव किंवा पशुप्रमाता पतिप्रमात्याप्रमाणे किंवा श्रीपरमेश्वराप्रमाणे संसारातील अर्थात् जगतामधील सर्व घट, सुख इत्यादि भावांसह संवेदनात्मक तादात्म्य प्राप्त करून घेऊन त्यांची सर्जना किंवा सृष्टी करीत असतो.

तादात्म्यात म्हणजे त्याचे संवेदन आणि त्याच्या हेतुमुळे; इत्यादि. किंवा इंद्रियवर्गाची त्यांच्या त्यांच्या विषयांमध्ये प्रवृत्त्यादि होणे; त्याचा प्रभव अर्थात् त्याचे मूळ कारण मागीलप्रमाणेच आहे. पुढे हेच सांगतात-

**"यतः करणवर्गोऽयं .....।**
**..... प्रवृत्तिस्थितिसंहतीः।।**
**लभते .....।।६।।"**

शक्तिचक्र म्हणजे करणेश्वरीचक्राचा जो विभव म्हणजेच विचित्र सृष्टिसंहारादि करणे अर्थात् साधने होत. त्याचा प्रभव म्हणजे क्रमरूपाने पदार्थांचे अवभासन किंवा ज्ञान करून देणारा महाप्रकाशयुक्त अक्रमरूप होय. हेच पुढे सांगितले आहे -

**सहान्तरेण चक्रेण प्रवृत्तिस्थितिसंहतीः।**
**लभते तत्प्रयत्नेन परीक्ष्यं तत्त्वमादरात् .....।।६-७।।**

**अर्थ :-** या आंतर चक्रासह प्रवृत्ती-स्थिती आणि संहती होते. त्या तत्त्वाची अत्यंत आदरपूर्वक परीक्षा केली असता त्याचा प्रयत्नाने लाभ होतो.।।६ व ७।।

अशा प्रकारे आंतर चक्र असेच स्पष्ट करून सांगावे. आंतर चक्र म्हणजे अंतःकरणत्रय नव्हे; कारण अंतःकरण त्रयांचा करणवर्गामध्ये (इंद्रियवर्गामध्ये) समावेश केलेला आहे. करणवर्ग हा स्वात्म्यात प्रवृत्त होत असतो; तर करणेश्वरीचक्र सृष्ट्यादि कार्ये करण्यास प्रवृत्त होते असे व्याख्यान करावे.

शक्तिचक्र म्हणजे मंत्रगण आणि मुद्रासमूह होय. त्यांचा विभव म्हणजेच त्रिविध सिद्धी मिळविण्याचे सामर्थ्य होय. त्याचा प्रभव म्हणजे प्रभवाने दाखविलेले उत्पत्ति-विश्रांतिस्थान होय.

हेच पुढील कारिकांमधून सांगितले आहे-

**"तदाक्रम्य बलं मन्त्राः .....।।२६।।"**
**"निरञ्जनाः।।२७।।"**

इत्यादींपासून

स्पष्टीकरण केलेल्या शक्तिचक्रविभवाने अर्थात् मंत्रादिसामर्थ्याने ज्या साधकाच्या चित्ताची दीप्ती अथवा तेज (प्रकाशित होते.), त्या तेजाप्रत जो जातो, प्राप्त करतो, अधिष्ठित होतो व गंध युक्त होतो, विनाश पावतो आणि जो स्वात्म्यात विश्रांती घेतो त्याला आम्ही स्तवितो. हे सर्व पुढे स्पष्ट होईल.

**"सहाराधकचित्तेन .....।।२७।।"** इत्यादि.

दीक्षा किंवा अनुग्रह प्राप्त करून घ्यावयाच्या संपत्तीने युक्त अशा आचार्यांचा उदय म्हणजे शक्तिचक्रविभव होय. हे पुढे सांगितले आहे- "**अयमेवोदयस्तस्य** ..... येथपासून **शिवसद्भावदायिनी।।३१।।**" येथपर्यंत.

श्रीब्राह्म्यादि देवी आणि ब्रह्मादिकारणमाला या शक्तींशी संबंधित असलेले स्वभावाचे ज्ञान न झालेल्या, उदयरूप ऊर्ध्व अथवा उच्च भूमीवर जाण्यास अक्षम असलेल्या, भेदयुक्त मार्गावर चालणाऱ्या पशुप्रमात्याची ते ते काम करण्याची शक्ती हाच त्याचा प्रभव अर्थात् जन्म होय. हेच पुढील कारिकांमधून सांगितले आहे - "**शब्दराशिसमुत्थस्य शक्तिवर्गस्य** .....।।४५।।" पासून "**बन्धत्रियी** .....।।४८।।" येथपर्यंत. त्याचप्रमाणे "**तन्मात्रोदय** ..... ।।४९।।" पासून "..... **प्रचक्ष्महे।।५०।।**" येथपर्यंत.

त्या शक्तिचक्राचे स्वस्वभावपदापेक्षेने खालची खालची अवस्था टाकून वर वर जाण्याचे सामर्थ्य म्हणजेच विभव होय. त्याचाही प्रभव किंवा निर्मिती मागीलप्रमाणेच येथे अशा प्रकारे सांगतात की -

"..... **स्वमार्गस्था ज्ञाता सिद्ध्युपपादिका।।४८।।**"

खेचरी-गोचरी-दिक्चरी-भूचरी इत्यादि बाह्य-आंतरभेदाने वेगवेगळ्या असणाऱ्या अनेक योगिनींचा समूह म्हणजे शक्तिचक्र होय. त्या शक्तिचक्रांनी चिह्नित केलेला वीरांच्या समूहाचा विभव म्हणजेच मागचे व पुढचे ज्ञान, अणिमादि सिद्धींची प्राप्ती, स्वविषयांचा आभोग इत्यादि अनंत क्षुद्र आणि अक्षुद्र सिद्धींच्या प्राप्तीने जो पूर्ण करतो, तो शक्तिचक्रविभवप्र आणि त्याचा भव म्हणजेच त्या त्या रूपाने बनणे होय. त्याला आम्ही स्तवितो.

याचेच विभूतिस्पंदात पुढील आठ श्लोकांमधून वर्णन केले आहे-

"**यथेच्छाभ्यर्थितो धाता** .....।।३३।।" इत्यादि पासून "**कुतः सा स्यादहेतुका।।४०।।**" येथपर्यंत.

यापुढे श्रीवामेश्वरीत अधिष्ठित असणाऱ्या खेचरी-गोचरी-दिक्चरी-भूचरी इत्यादि आंतर आणि बाह्य चक्रे यांचे स्पष्टीकरण करतात. जेथे भेद-अभेदयुक्त आणि भेदसार अशा विश्वाचे वमन केले जाते, भेदाचे सार जेथे उच्च स्वरात स्तविले जाते, भेद-अभेदयुक्त आणि अभेदसाराला प्राप्त करविले जाते म्हणून या शक्ती संसारातल्या वाम भागात संचार करणाऱ्या वामा शक्ती आहेत. त्यांची ईश्वरी अथवा स्वामिनी ही एकच भगवती आहे. तिच्या ठिकाणी राहत अथवा स्थिर असल्यामुळे वामाचक्रालाही

वामेश्वरीचक्र असे म्हणतात. खे म्हणजेच बोधरूप गगनात संचार करतात म्हणून त्या शक्तींना खेचरी असे म्हणतात. या शक्ती प्रमात्याच्या ठिकाणी असतात. त्या अत्यंत श्रेष्ठ अशा शक्तिपाताने पवित्र झालेल्यांना चिदानंदाचे प्रकाशन करणाऱ्या व कालाने बाधित होत नसल्यामुळे अभेदाने युक्त, सर्वकर्तृत्व, सर्वज्ञत्व, पूर्णत्व, व्यापकत्व अशा स्वरूपाचे उन्मीलन करण्यात निष्णात आहेत. परंतु मायेने मोहित झालेल्यांना त्या कोणत्याही प्रकारचा आनंद देत नाहीत. शून्यप्रमात्याच्या भूमीवर संचार करणाऱ्या त्या काल-कला-शुद्ध-विद्या-राग-नियती यांनी युक्त असून जीवांना बंधनात टाकणाऱ्या आहेत.

गौः म्हणजेच वाणी होय. या वाणीने चिह्नित केलेल्या संजल्पमय (भाषणमय) बुद्धी-अहंकार-मनोभूमीत संचार करतात म्हणून त्यांना गोचरी असे म्हणतात. **ज्यांनी शक्तिपाताची दीक्षा घेतलेली आहे त्यांना या शक्ती शुद्ध संकल्पाप्रत नेणाऱ्या असून जे इतर आहेत त्यांना याच्या विरुद्ध मार्गाकडे नेणाऱ्या आहेत. दहा दिशांमध्ये म्हणजेच बाह्य इंद्रियांच्या ठिकाणी संचार करतात म्हणून त्या शक्तींना दिक्चरी म्हणतात. शक्तिपाताने अनुग्रहित झालेल्यांच्या ठिकाणी या दिक्चरी शक्ती अद्वैत ज्ञानाचे प्रकाशन करतात तर इतरांना भेदाचे ज्ञान देतात.** भू म्हणजे रूपादि पाच प्रमेय स्थाने (ज्ञेय विषय) होत. त्यांच्या ठिकाणी संचार करतात अर्थात् त्यांचा उपभोग घेऊन त्यांचा ग्रास करून त्यांच्याशी एकरूप होतात म्हणून त्यांना भूचरी असे म्हणतात. या भूचरी प्रबुद्धांमध्ये चित्प्रकाशशरीराने स्फुरण पावतात आणि इतरांना सर्वप्रकाराने व्यवच्छेदकता अर्थात् भेद दाखवितात. अशा प्रकारे वामेश्वरीशक्तींनी प्रसारित केलेली अपर-परापर-पर इत्यादि देवता प्रकाशित होण्यासाठी अघोर-घोर-घोरतर इत्यादि नावे असणाऱ्या खेचरी-गोचरी-भूचरी-दिक्चरी ही आंतर चक्रे असून त्याप्रकारच्या वीरांच्या समूहाबरोबर असणाऱ्या त्यांचे हे वर सांगितलेल्या प्रकारचे स्वरूप आहे. **"श्रीपूर्वशास्त्र"** या ग्रंथात असे सांगितले आहे की -

**विषयेष्वेव संलीनानधोधः पातयन्त्यणून्।**
**रुद्राणून्या समालिङ्ग्यघोरतर्योऽपराः स्मृताः।।३१।।**
**मिश्रकर्मफलासक्तिं पूर्ववज्जनयन्ति याः।**
**मुक्तिमार्गनिरोधिन्यस्ताः स्युर्घोराः परापराः।।३२।।**

**पूर्ववज्जन्तुजातस्य शिवधामफलप्रदाः।**
**पराः प्रकथितास्तज्ज्ञैरघोराः शिवशक्तयः।।३३।।**

**अर्थ :-** ज्या शक्ती रुद्राणूंना आलिंगन देऊन विषयांमध्ये बुडालेल्या अणूंना खाली खाली टाकतात त्यांना घोरतरी शक्ती असे म्हटले आहे.।।३१।।

ज्या पूर्वीप्रमाणेच मिश्रफल निर्माण करतात आणि ज्या मुक्तीच्या मार्गात अडथळा निर्माण करणाऱ्या आहेत त्यांना परापरा किंवा घोरा शक्ती असे म्हटले आहे.।।३२।।

पूर्वीप्रमाणेच प्राणिमात्रांना श्रीशिवधामरूप फल देणाऱ्या श्रीशिवाच्या शक्तींना तज्ज्ञांनी परा (श्रेष्ठ) आणि अघोरा अशी नावे दिलेली आहेत.।।३३।।

बाह्य चक्रेही वामेश्वरीमध्ये अधिष्ठित असणारी खेचरी-भूचरी-गोचरी आणि दिक्चरी हीच होत. आकाशात संचार करणाऱ्या शरीरविरहित शक्ती म्हणजे खेचरी होत. त्या केवळ इच्छेत अधिष्ठित असणाऱ्या मिथुन-संप्रयोगातून जन्माला येणाऱ्या, प्रबुद्धाच्या अंतःकरणात शुद्ध विद्येचा उदय करणाऱ्या आणि योगिनींच्या गर्भातून उत्पन्न होणाऱ्या आहेत. यासंबंधी **"श्रीतंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की-

**अन्याश्च गुरुतत्पत्न्यः श्रीमत्कालीकुलोदिताः।**
**अनन्तदेहाः क्रीडन्त्यस्तैस्तैर्देहैरशङ्कितैः।।**
**प्रबोधिततदिच्छाके तज्जं कौलं प्रकाशते।**

**अर्थ :-** श्रीमत् कालींच्या कुळात जन्मलेल्या व अनंत देहस्वरूप असणाऱ्या ह्यांच्या अन्य गुरुपत्नी शंकारहित होऊन त्या त्या देहांनी क्रीडा करताना त्यांच्या इच्छेने प्रबोधित झालेले व त्यांच्या पासून निर्माण झालेल्या "कौल" ज्ञानाचे प्रकाशन करीत असतात.

गोचरी म्हणजे "गो"शब्दाने वाच्य असणारे पशूच्या हृदयाचे सार आणण्यात रत असणाऱ्या, त्याच क्रमाने स्वात्म्याच्या आणि पशूंच्या त्या त्या सिद्धी प्राप्त करून देणाऱ्या एका जन्मापासून सात जन्मापर्यंत पशूला आणणाऱ्या अर्थात् पशूच्या जन्माला नेणाऱ्या शक्ती होत.

दिक्चरी म्हणजे भ्रांतचक्राप्रमाणे सर्वत्र संचार करणाऱ्या परापर सिद्धी देणाऱ्या (शक्ती होत.)

भूचरी म्हणजे स्वस्वभावत्वाने कुंकुम नारळाप्रमाणे त्या त्या पीतादि भूमीपासून उत्पन्न होणाऱ्या, पूर्णत्व आणि अपूर्णत्व इत्यादि नाना प्रकारांनी वेगवेगळ्या असणाऱ्या त्या त्या देवतांच्या अंशापासून उत्पन्न होणाऱ्या

(शक्ती) होत.

त्याचबरोबर शक्तिचक्राचा म्हणजेच आगम संप्रदायात प्रसिद्ध असणाऱ्या नाना देवतांची प्राप्ती करून देणाऱ्या, राग, द्वेष क्रोध, विकल्प आदि प्रत्ययांच्या समूहाचा त्याचप्रमाणे देहांचा आश्रय घेतलेल्या श्रेष्ठ देवतांच्या नाना धात्वादि गुणांचा जो विभव म्हणजेच त्या त्या उपनिषदात सिद्ध असणारा विशिष्ट प्रभाव व मायेने भ्रमित झालेल्यांना बंधात टाकण्यात कारणीभूत असा दोन्ही प्रकारचा प्रभव होय. ह्याचाच उपदेश पुढील कारिकेत सांगितला आहे -

**"गुणादिस्पन्दनिष्यन्दाः सामान्यस्पन्दसंश्रयात्।।१९।।"**

येथपासून "**..... संसारवर्त्मनि।।२०।।**" येथपर्यंत. त्याचप्रमाणे "**सेयं क्रियात्मिका शक्तिः।।४५।।**" ह्यातही हेच सांगितले आहे. अन्यत्र आगमांमधूनही असेच सांगितले आहे की -

**कुलसारमजानन्तो ह्यद्वये निपतन्ति ये।**
**स्वचित्तोत्थविकल्पान्धा निरये निपतन्ति ते।।**

**अर्थ :-** जे कुलसार न जाणताच अद्वय मतात पडतात ते स्वतःच्या मनात निर्माण झालेल्या विकल्पांनी अंध होऊन नरकात पडतात.

त्याचप्रमाणे,

**येन येन निबध्यन्ते जन्तवो रौद्रकर्मणा।**
**सोपायेन तु तेनैव मुच्यन्ते भवबन्धनात्।।**

**अर्थ :-** ज्या ज्या रौद्रकर्मांनी जंतू (जीव) बांधले जातात त्याच उपायांनी ते भवबंधनापासून मुक्त होतात. अशा प्रकारे नाना प्रकारच्या आगमातली स्पष्टीकरणे येथे दिली. परंतु ग्रंथ मोठा होईल म्हणून येथे सर्व दिलेली नाहीत. श्रेष्ठ शक्तिपाताने पवित्र झालेल्या साधकांनी स्वतःच त्याचे अनुसरण करावे. बाकीच्यांना यांचे कितीही स्पष्टीकरण दिले तरीही ज्याप्रमाणे खूप तापलेल्या दगडावरचा थेंब क्षणात नाहीसा होतो त्याप्रमाणेच त्यांचे ज्ञान क्षणभरात नाहीसे होते.

शक्तिचक्राची म्हणजेच स्वतंत्र-अद्वय-निजमहाप्रकाशामध्ये अनुप्रवेश करणाऱ्या तेजसमूहाची दीप्ती स्वतःच्या आनंदाचा प्रसार करून विभवाने प्रकाशित होणाऱ्या हृदयाला संतोष देते. ती मितयोग्यांना प्रयत्नाने साध्य असून स्वभावाचा आश्रय घेऊन प्रयत्नाने सिद्ध होणाऱ्या बिंदु-नादादि प्रकाशाने युक्त अशी आहे. ती ज्या ज्ञानिजनाच्या चित्तामध्ये क्षोभरूपाने

उत्पन्न होते त्याला अनुत्तर-अद्वय-सतत संवित्तीची प्राप्ती करवून देते. याचाच विस्तार पुढील कारिकांमधून केलेला आहे-

"**अतो बिन्दुरतो नादः .....।**" येथपासून "**..... क्षोभकत्वेन देहिनः।।४२।।**" येथपर्यंत.

अशा प्रकारचा जो आहे त्या शक्तिचक्रविभवप्रभवाला अर्थात् व्याख्यातरूप श्रीशंकरात्मक स्वस्वभावाला आम्ही स्तवितो. या श्लोकाने वर्तमान अर्थाचा उपक्षेप करून विश्वाच्या पलीकडे असणारा आणि विश्वमय स्वस्वभाव हाच श्रीशंकर आहे असे सांगितले. वेदान्तवाद्यांप्रमाणे "**विश्वं यत्र तदेव ब्रह्म।।**" अर्थात् "जेथे विश्व आहे तेच ब्रह्म आहे." असे सांगितले नाही.

"**नाभावो भाव्यतामेति .....।।२।।**" येथपासून "**न त्वेवं स्मर्यमाणत्वं तत्तत्त्वं प्रतिपद्यते।।**" येथपर्यंत निषेधाने वरील गोष्ट सांगितली आहे. सिद्धान्तदृष्टीप्रमाणे हे विश्वोत्तीर्ण श्रेष्ठ तत्त्व अशा प्रकारचे नाही; कारण त्याचे "**तस्योपलब्धिः सततं त्रिपदाव्यभिचारिणी।।१७।।**" अशा प्रकारचे विरुद्ध प्रमाण मिळते. त्याचप्रमाणे अप्रकट अशा अकुल स्वरूपाच्या कुल प्रक्रियेच्या शास्त्राप्रमाणे विश्वमय पूर्ण रूप हे अशा प्रकारच्या स्वभावाचे नाही. "**यदा क्षोभः प्रलीयते तदा स्यात्परमं पदम्।।९।।**" अशा प्रकारची संगती लागत नसल्यामुळे हे पूर्णरूप नाही.

अशा प्रकारे समस्त शास्त्रार्थाचे प्रत्येक वाक्यांनुसार पर्यालोचन करून नेहमी सर्वच दशांमध्ये श्रीशंकरात्मक स्व-स्वभाव होऊन दृढपणे स्थिर व्हावे. येथे थोडीशीही अवज्ञा होऊ देऊ नये. अशी एकही दशा अथवा अवस्था नाही की, जेथे शिवत्वाचे प्रकाशन होत नाही. यासंबंधी श्रीगुरूंनी "**श्रीस्वच्छंदशास्त्र**" या ग्रंथामध्ये आणि इतरही शास्त्रांमध्ये असे म्हटले आहे की -

**यत्र यत्र निलीयेत मनस्तत्रैव भावयेत्।**
**चलित्वा यास्यति कुत्र सर्वं शिवमयं यतः।।**

**अर्थ :-** जेथे जेथे मनाचा लय होतो तेथे तेथे मनाची भावना करावी. मन दुसरीकडे जाऊन कोठे जाणार? कारण हे सर्व श्रीशिवमयच आहे.

"**न सावस्था न यः शिवः।।२९।।**" येथेही हेच सांगितले आहे. त्याचसंबंधी "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

"**सकृद्विभातोऽयमात्मा पूर्णोऽस्य न क्वापि अप्रकाशसम्भवः।**"

**अर्थ :-** तत्काळ प्रकाशित होणारा हा आत्मा पूर्णस्वरूप आहे.

त्याच्या बाबतीत अप्रकाशाचा अर्थात् त्याचे ज्ञान अथवा प्रत्यक्ष न होण्याचा संभव कधीच होत नाही. त्याचप्रमाणे, **"चिद्धनमात्मपूर्णं विश्वम्।।"**

"अर्थात् चैतन्यघनाने हे विश्व पूर्ण आहे," असे शास्त्रात म्हटले आहे.

अशा प्रकारे हे अत्यंत प्रसन्न आणि गंभीर अर्थाने युक्त अशा पहिल्या सूत्राचे संपूर्णपणे शास्त्रार्थासहित परमार्थयुक्त स्पष्टीकरण केले. परमेश्वर सर्वांचे मंगल करो.

या शास्त्ररूप समुद्रातला थोडासा अर्थ प्राप्त करून काही साधक संतुष्ट होतात. काही जण खूप प्रयत्न करूनही याच्या पलीकडे जाऊन हे ज्ञान प्राप्त करू शकत नाहीत. काही जण अर्ध्या गवताप्रमाणे या समुद्रात बुडी मारून व वर येऊन थकतात तर इतर हे सर्व स्पष्ट झालेले अर्थापर्यंत नेत असताना थकून जातात.।।१।।

ज्याच्या स्मृतिपथाचा आश्रय घेतल्यावर पाशामध्ये बांधलेल्या विभक्त झालेल्या अंतर्ग्रंथी तत्काळ सैल होतात, चैतन्यचंद्राचा उदय होतो, आनंदाच्या धारा स्रवू लागतात आणि अमृतरसाचा अभिषेक होऊ लागतो त्या श्रीशिवांचा आम्ही आश्रय घेतो.।।२।।

सर्वत्र ज्ञानरूप तेज असलेल्या, विद्यारूप समुद्राचे शीत किरणरूप असणाऱ्या व सर्व कर्म पाशातून मुक्त झालेल्या अशा श्रीसद्गुरूंकडून ज्ञान घेऊन आणि ईश्वराच्या कृपेने त्याचे स्मरण होऊन साधकजनांनी विनंती केलेल्या क्षेमराजाने श्रीस्पंदसूत्रावर थोडेसे विवरण केले आहे.।।३।।

अशाप्रकारे श्रीस्पंदसंदोह समाप्त झाला.

**ही कृती महामाहेश्वराचार्यवर्य श्रीमद् अभिनवगुप्तपादांच्या चरणकमलाश्रयाने जीवित असलेल्या राजानक क्षेमराजाची आहे.**

❋ ❋ ❋ ❋ ❋

### परिशिष्ट क्रमाङ्क १

# स्पंदशास्त्र व आधुनिक भौतिकशास्त्र

### लेखक - श्री. मनोज अनंत करमरकर

**प्रास्ताविक :-**

भारतीय स्पंदशास्त्र असे सांगते की, विश्वाचे मूळ स्वरूप स्पंदमय आणि चैतन्यमय आहे.

दुसऱ्या बाजूला Physics किंवा भौतिकशास्त्र सुद्धा विश्वाच्या स्वरूपाचा शोध गेली अनेक शतके घेत आहे. ह्या दोन्ही शास्त्रांचा या लेखात तौलनिक अभ्यास मांडलेला आहे.

या लेखात शेवटी असा निष्कर्ष काढलेला आहे की, स्पंदशास्त्राप्रमाणे भौतिकशास्त्रही संपूर्ण ब्रह्मांडाला एका सूक्ष्म पातळीवर स्पंदमय मानते. मात्र हे स्वरूप स्पंदमय असले तरी ते चैतन्यमय आहे की नाही ह्याबद्दल भौतिक शास्त्रात अजून तरी निश्चित मत मांडले जात नाही.

दोन्ही शास्त्रांमध्ये जेवढे साम्य आज दिसते तेवढे दाखविण्याचा प्रयत्न पुढे केला आहे.

**जुने भौतिकशास्त्र :-**

तर्क व गणिताच्या दृष्टिकोनातून संपूर्ण ब्रह्मांड समजून घेणे हे भौतिकशास्त्राचे ध्येय आहे. मात्र या क्षेत्रात संशोधन कार्य नेहमी चालूच असते व नवीन नवीन शोध लागतच असतात. त्यामुळे भौतिकशास्त्राला आपली भूमिका अनेकदा विकसित करावयाला लागलेली आहे. ढोबळ मानाने इ. स. १५०० ते १९०० या काळात ग्राह्य मानल्या गेलेल्या भौतिकशास्त्राला जुने भौतिकशास्त्र असे म्हणता येईल. १९०० च्या नंतरचा काळ मात्र आधुनिक भौतिकशास्त्राचा होय. या प्रकारच्या विभागणीचे कारण असे आहे की, १९०० च्या नंतर जे संशोधन झाले त्यामुळे भौतिकशास्त्रज्ञांचा जगताकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामध्ये मूलभूत बदल झाला. सध्याचे भौतिकशास्त्र भारतीय अध्यात्मशास्त्राच्या बरेच जवळ गेलेले दिसते. त्याचा ह्या लेखात विचार करावयाचा आहे.

प्रथम जुन्या भौतिकशास्त्राचा थोडासा आढावा घेऊ. एखाद्या वस्तूचे

जर आपण विभाजन करीत गेलो तर शेवटी आपल्याला इलेक्ट्रॉन, प्रोटॉन व न्यूट्रॉन असे तीन प्रकारचे कण मिळतात. ह्या अविभाज्य अशा कणांना fundamental particles किंवा मूल कण असे म्हणतात. (पुढे कालांतराने ह्या तिघांच्या व्यतिरिक्त अन्य मूल कणांचाही शोध लागला; मात्र मूल कणांबद्दल ह्या लेखात करावयाचा विचार त्यामुळे बदलत नाही.)

जुन्या भौतिकशास्त्राप्रमाणे मूल कण हा जड पदार्थ म्हणजे विश्वाची मूळ वस्तू आहे आणि दोन मूल कणांच्या मधील जी पोकळ जागा असते, तेथे वस्तूचा अभाव आहे. सारे ब्रह्मांड हे मूल कणांनी व त्यांच्यामधील पोकळीने बनलेले आहे व ब्रह्मांडातील कुठलीही घटना, केवळ मूल कणांच्या अन्योन्य क्रियेमुळे होत असते, हा सिद्धान्त म्हणजे जुन्या भौतिकशास्त्राचा पाया होय.

ह्या उलट भारतीय तत्त्ववेत्त्यांनी असे आवर्जून सांगितलेले आढळते की, बाह्य जगत् जरी वरवर जड वाटत असले तरी त्याचे मूळ स्वरूप जड नसून सूक्ष्म आहे. **"यत् दृष्टम्, तत् नष्टम्"** ह्या त्यांच्या वाक्याने जड पदार्थांच्या क्षणभंगूरतेबद्दल त्यांचे मत किती निश्चित आहे, हे लक्षात येते.

**आधुनिक भौतिकशास्त्र :-**

मात्र विसाव्या शतकात झालेल्या अनेक शोधांमुळे भौतिकशास्त्रज्ञांना वरील दृष्टिकोनाचा पुनर्विचार करावयाला लागला आहे. मूल कणांचा अभ्यास करतांना त्यांच्या असे लक्षात आले की, काही प्रयोगांमध्ये मूल कण हा स्पंद किंवा तरंगाचे गुणधर्म दाखवितो. त्यामुळे दररोज व्यवहाराच्या पातळीवर जरी संपूर्ण सृष्टी आपल्याला जड भासत असली, तरी एका पातळीवर ती सूक्ष्म आहे यात शंका नाही.


"शक्तिपातयोगरहस्य अर्थात् सिद्धमहायोगशास्त्र" - खंड पहिला (लेखक : डॉ. केशव रामचंद्र जोशी) ह्या ग्रंथात असे म्हटले आहे की, "तात्पर्य, जगातील सर्व वस्तू अनिर्वचनीय आहेत. अनिर्वचनीय म्हणजे "त्या नाहीत" असेही म्हणता येणार नाही आणि "त्या आहेत" असे म्हणता येत नाही; कारण, जर "त्या नाहीत" असे म्हटले तर अज्ञानी मनुष्याच्या दृष्टीला जो त्यांचा भास होतो तो संभवणार नाही; तसेच, जर "त्या

आहेत" असे म्हटले तर ज्ञानी मनुष्याच्या दृष्टीने जो त्यांचा बाध होतो तो संभवणार नाही" (१, पृ. २६).


त्याचप्रमाणे आधुनिक भौतिकशास्त्राने सृष्टीला एका पातळीवर "जड" किंवा "कणात्मक" मानलेले आहे, तसेच दुसऱ्या पातळीवर "सूक्ष्म" किंवा "स्पंदात्मक" मानलेले आहे.

येथे "सूक्ष्म" व "जड" ह्या शब्दांचा थोडाफार ऊहापोह करावयाला लागेल. पूर्वीच्या संकल्पनेप्रमाणे मूल कण हा घन किंवा जड असून एखाद्या चेंडूप्रमाणे गोलाकार होता. विशिष्ट लांबी-रुंदी असल्यामुळे त्याला एक विशिष्ट आकार होता.

इलेक्ट्रॉनचा कण-भाव सिद्ध करण्यासाठी एक प्रयोग करता येईल. समजा, एका पडद्याला आपण दोन छिद्रे पाडली व एका इलेक्ट्रॉनला त्या छिद्रांच्या दिशेने फेकले. इलेक्ट्रॉन जर कण असेल तर त्याला विशिष्ट आकारमान असल्यामुळे तो दोहोंपैकी एकाच छिद्रातून आरपार जाऊ शकेल.




सूक्ष्म वस्तूला मात्र विशिष्ट साचेबंद आकारमान असत नाही. आश्चर्य म्हणजे वरील प्रयोग जेव्हा प्रत्यक्ष केला जातो तेव्हा असे लक्षात येते की, इलेक्ट्रॉन आपल्या जड भावाचा त्याग करून, सूक्ष्म रूप धारण करून व व्यापक होऊन एकाच वेळी दोन्ही छिद्रांमधून आरपार जातो.



ह्या प्रयोगात इलेक्ट्रॉनचे साचेबंद आकारमान नाहीसे झालेले दिसते. उलट तो आकाशतत्त्वाप्रमाणे व्यापक होऊ शकतो किंवा पसरू शकतो

असे सिद्ध होते व अशा प्रकारे व्यापक झाल्यामुळेच तो दोन्ही छिद्रांमधून जाऊ शकतो. मूलकणांच्या ह्या सूक्ष्म रूपाला wave किंवा quantum wave म्हणजे स्पंद असे म्हणतात.

कोठल्याही मूलकणाला बाह्य प्रभावापासून जर दूर केले तर तो मूलकण स्पंदरूप होतो. समजा एका पेटीमध्ये अशा प्रकारे जर त्या कणाला बंद करून ठेवले तर तो कण आता आपल्या कणत्वाचा त्याग करील आणि सूक्ष्म किंवा स्पंदरूपाने त्या बंद पेटीमधील सर्व आकाशाला व्यापून राहील. त्या आकाशातील जेथे तो मूलकण नाही; अशी कुठलीही जागा शिल्लक राहणार नाही; कारण स्पंदरूपाने तो पेटीत सर्वत्रच विद्यमान असतो. गंमत म्हणजे तो मूलकण अमक्या ठिकाणी आहे असे सुद्धा म्हणता येत नाही; कारण एका वेळी तो कणरूपाने एकाच ठिकाणी असू शकतो, पण येथे मात्र तो स्पंदरूपाने सर्वत्र आहे. सारांश, कणरूपाने तो कुठेही विद्यमान नसेल; मात्र स्पंदरूपाने तो सर्वत्र असेल.

येथे एक गोष्ट लक्षात घ्यावयाला हवी. Quantum wave किंवा स्पंद म्हणजे जड पदार्थाची हालचाल नव्हे. वरील उदाहरणात "मूल कण बंद पेटीमध्ये या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत आणि परत मागे, अशा प्रकारचे आंदोलन करीत असल्यामुळे wave किंवा स्पंदाची निर्मिती होते," असे जर कुणाला वाटत असेल, तर ते बरोबर नाही; कारण जेथे कणच नाही, तेथे त्याचे आंदोलन तरी कसे होणार? खरे तर, त्या बंद पेटीमध्ये सर्वत्र एकाच वेळी मूलकण स्पंदरूपाने विद्यमान असतो. त्यामुळे कोठल्यातरी कारणाने तो जर कणरूपाने पुढे प्रकट झाला तर पेटीतील आकाशात तो कुठल्याही जागी प्रकट होऊ शकतो. मात्र अशा प्रकारे कण प्रकट होण्याची शक्यता वेगवेगळ्या ठिकाणी भिन्न असते म्हणजे कमीजास्त असते. एखाद्या तरंगाचे किंवा लाटेचे चित्र काढताना सुद्धा आपण काही ठिकाणी उंचवटे दाखवितो, तर काही ठिकाणी खळगे. गणिताच्या दृष्टीने पाहिले तरी (१) कणाच्या प्रकटीकरणाची वेगवेगळ्या ठिकाणची शक्यता (२) एखादी लाट किंवा तरंग ह्या दोन्ही गोष्टींचे वर्णन एकाच स्वरूपाच्या गणितीय समीकरणाने होते. म्हणूनच मागे म्हटल्याप्रमाणे, मूलकणांची जी एक सूक्ष्म अवस्था असू शकते, त्याला भौतिकशास्त्रात

wave किंवा तरंग असे म्हटलेले आहे.

हा भौतिकशास्त्रातील स्पंद म्हणजे "कण" नसून कण प्रकट होण्याची शक्यता (the probability or expectancy of a particle appearing) आहे. कण प्रकट होण्याच्या आधीची ही अवस्था आहे. कणाचे अव्यक्त स्वरूप आहे किंवा कणाच्या निर्मितीचे स्फुरणमात्र आहे.

स्पंदशास्त्राच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास असे लक्षात येते, की "स्वत: परमतत्त्व "स्पंद" शब्दाने आपल्याला प्रकट करत असते......... स्पंद शब्दाचा अर्थ किंचित् हलणे असा आहे. अत्यंत शांत व निस्तरंग परमात्म्यामध्ये एकावेळेला सर्व रूपाने प्रकट होण्याची योग्यता असते. त्यालाच किंचित् चलन म्हणतात." (स्पंदशास्त्र अर्थात् सिद्धयोग साधन पद्धती पृ. ४९)


वरील दोन्ही शास्त्रांतील "स्पंद" म्हणजे जड वस्तू आविष्कृत किंवा प्रकट होण्याची शक्यता होय. हजारो वर्षांपूर्वीचे भारतीय तत्त्वज्ञान आणि गेल्या शंभर वर्षात पुढे आलेले आधुनिक भौतिकशास्त्र हे दोन्हीही सृष्टीच्या स्वरूपाचे वर्णन, बऱ्याच अंशी सारख्या अशा शब्दांमध्ये करतात, ही एक मोठी विलक्षणच गोष्ट म्हणावी लागेल.

मात्र ज्याप्रमाणे दोन दृष्टिकोनांमध्ये समानता आढळते त्याप्रमाणे एक मोठा फरकही आढळतो. स्पंदादि शास्त्रकारांनी चैतन्यमय अशा परमतत्त्वाला जाणल्यानंतरच शास्त्राची रचना केली. त्यामुळे दृश्य जगत् हे त्याच परमतत्त्वाचे परिवर्तित स्वरूप आहे असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणून ब्रह्मांडातील प्रत्येक अणू-रेणूचे स्वरूप त्यांनी चैतन्यमयच मानलेले आहे. त्यांच्या दृष्टीने "स्पंद" म्हणजे जगत् निर्माण होण्याची केवळ शक्यताच नसून, परमात्म्याची अशा प्रकारे सर्व रूपाने प्रकट होण्याची योग्यता आहे. "शक्यता" आणि "योग्यता" या दोन शब्दांमध्ये भौतिकशास्त्र आणि अध्यात्मशास्त्र या दोहोंच्या दृष्टीतील भिन्नता दडलेली आहे. स्पंदशास्त्रकारांचा स्पंद हा जिवंत व चेतनास्वरूप आहे. पाश्चात्य भौतिकशास्त्राची मात्र गेल्या तीन-चारशे वर्षांपासून प्रकृतीकडे एक निर्जीव वस्तू म्हणून पाहण्याची परंपरा आहे. त्यामुळे स्पंदासारख्या गोष्टीचा नवीन शोध प्रयोगशाळेत लावल्यानंतरही, त्याबद्दल सिद्धान्त मांडतांना

वरील पारंपारिक विचारधारेला कुठेही धक्का लागणार नाही याकडे त्यांचा सहज किंवा स्वाभाविक कल असतो, असे वाटते. (शिवाय स्पंदाच्या विषयीच्या तत्त्वज्ञानापेक्षा या स्पंदाची व्यावहारिक उपयुक्तता काय? या प्रश्नाकडे त्यांचे अधिक लक्ष दिसते.) अर्थात् ह्याला काही शास्त्रज्ञ उल्लेखनीय अपवाद ठरले आहेत ह्यात शंकाच नाही.

**जडतावादाकडून चैतन्यवादाकडे :-**

आपण यापूर्वी अशा एका वैज्ञानिक प्रयोगाचे वर्णन पाहिले आहे की, ज्याच्यात स्पंदरूपाने एक मूलकण दोन छिद्रातून आरपार जातो. मात्र मूलकणाचे अशा प्रकारचे विलक्षण वर्तन केवळ अनुमानाने आपण सिद्ध करू शकतो; कारण कुठलाही निरीक्षक किंवा द्रष्टा जर प्रयोगात उपस्थित असेल तर त्याला स्पंद न दिसता कणच दिसतो. म्हणजे स्पंद हा दोन्ही छिद्रातून कसा बाहेर पडतो व त्यावरून "स्पंद कसा असतो?" हे पाहण्यासाठी जर आपण योग्य प्रकारची यंत्रणा लावून त्यामार्फत दोन्ही छिद्रांचे सतत निरीक्षण करत गेलो तर स्पंदभावाचा त्याग करून, "कणाच्या" रूपातच तो मूल कण एकाच छिद्रातून आरपार जातो असे लक्षात येते. याचाच अर्थ असा आहे की, द्रष्टा जर उपस्थित असेल तर स्पंदभाव हा कणभावामध्ये परिवर्तित होतो. ह्याला "collapse of the wave function" किंवा "स्पंदभाव कोलमडून पडणे" असे म्हणतात.




प्रख्यात शास्त्रज्ञ आणि १९६३ चे नोबेल पारितोषिक विजेते Eugene Wigner ह्यांच्या मते, "द्रष्ट्याचे मन" आणि "स्पंद" ह्यांच्यामध्ये अन्योन्यक्रिया होते. या क्रियेमुळेच स्पंदाचे कणामध्ये रूपांतर होते. ह्याचा अर्थ असा होऊ शकतो की, सृष्टीतील मूल घटकाला जडत्व किंवा कणत्व येण्यासाठी निरीक्षण करणाऱ्या मनाच्या उपस्थितीची अपेक्षा असते. अन्यथा तो स्पंदरूपच असतो.

ह्यामुळे काही प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञांनी चैतन्याला असाधारण महत्त्व दिलेले दिसते. Wigner म्हणतात, "It was not possible to formulate the laws of quantum mechanics in a fully consistent way without reference to the consciousness (of the observer).... (Remarkably,) the very study of the external world led to the conclusion that the content of the consciousness is the ultimate reality" [as quoted in 3]

"द्रष्ट्याच्या चैतन्याचा संदर्भ घेतल्यावरच Quantum शास्त्राच्या नियमांची व्यवस्थितपणे मांडणी करता आली..... आश्चर्याची गोष्ट म्हणजे बाह्य जगताचा अभ्यासच शास्त्रज्ञांना ह्या सिद्धान्ताकडे घेऊन गेला की, ते चैतन्यच मुळात अंतिम सत्य आहे."

या दृष्टीनेच Sir Arthur Eddington असे म्हणतात की -

"We are thrown back, by physical science itself, onto the problem of the nature of consciousness or rather, our task now is to deal with that part of consciousness that does not emerge in space and time and is therfore not amenable, to and never will be, to scientific analysis" [as quoted in 3]

"अशा प्रकारे भौतिकशास्त्रानेच आपल्याला चैतन्याच्या अशा विभागाचा विचार करावयाला लावलेला आहे, जे चैतन्य देश-कालातीत असल्यामुळे वैज्ञानिक विश्लेषणाच्या पलीकडे आहे."

या बाबतीत James Jeans असे म्हणतात की, Today there is a wide measure of agreement.... that the stream of knowledge is heading towards a non-mechanical reality; the universe begins to look more like a great thought than like a great machine" [as quoted in 4]

"आज बऱ्याच प्रमाणात असे मतैक्य दिसते की, ज्ञानाचा (संशोधनाचा) प्रवाह एका अयांत्रिक सत्याकडे जातो आहे; ब्रह्मांडाचे स्वरूप आता एका प्रचंड यंत्रापेक्षा एका प्रचंड विचारासारखे दिसावयाला लागले आहे."

ह्यापूर्वी म्हटल्याप्रमाणे, Eugene Wigner ह्यांच्या मते निरीक्षकाचे

मन आहे म्हणून मूलकण आहे व मन नसेल तर स्पंद आहे. "स्पंद हा चैतन्ययुक्त अथवा चैतन्यमय असतो का?" ह्या प्रश्नाचे उत्तर मात्र भौतिकशास्त्रदृष्ट्या अजून तरी देता येत नाही. पुढील काळातील संशोधनच ह्या विषयावर प्रकाश टाकू शकेल.


सारांश, पूर्वीचे भौतिकशास्त्र म्हणजे "निर्जीव" वस्तूंचा अभ्यास मानले जाई. पुढे ह्या शास्त्रामध्ये "चैतन्याचा" समावेश करावयाला लागला. मात्र "जगत् हे चैतन्यमय आहे" या स्पंदशास्त्रकारांच्या सिद्धांतापर्यंत भौतिकशास्त्र अजून तरी पोहोचलेले दिसत नाही.

**अनेकतेकडून ऐक्याकडे :-**

आता शेवटच्या मुद्द्याकडे वळू. वैदिक तत्त्वज्ञानाप्रमाणे, शक्तीचे मूळ स्वरूप अखंड, अद्वितीय आहे. जड सृष्टीच्या उत्पत्तीच्या वेळी ही एक शक्तीच अनेकविध वस्तूंमध्ये परिवर्तित होते.

महत्त्वाचा मुद्दा असा की, मूळ शक्ती अंशतःच अशा प्रकारे जड सृष्टी बनते. शक्तीचा बहुतेक अंश अमर्त्य व दिव्य अशा अद्वैतरूपापासून ढळत नाही. त्यामुळे ब्रह्मांडामध्ये अंतर्बाह्य सगळीकडे सूक्ष्म पातळीवर अद्वैततत्त्व विद्यमान आहे, असे म्हणतात.

जड ब्रह्मांडामध्ये, सूक्ष्म म्हणजे "स्पंदाच्या" पातळीवर एक प्रकारचे "अद्वैत," विशिष्ट भौतिकशास्त्रीय प्रयोगांमध्येही दिसून येते.




EPR (Einstein-Podolsky-Rosen) प्रयोगामध्ये, दोन विशिष्ट प्रकारचे इलेक्ट्रॉन घेतात. त्यांना coupled इलेक्ट्रॉन असे म्हणतात. त्या दोघांच्या मध्ये हजारो मैल अंतर ठेवले जाते. पहिल्या इलेक्ट्रॉनवर एक विशिष्ट प्रकारचा प्रयोग केला जातो व आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्याच क्षणी दुसऱ्याही इलेक्ट्रॉनवर त्या प्रयोगाचा परिणाम झालेला दिसून येतो.

कुठलाही संदेश प्रकाशाच्या वेगापेक्षा जलद जाऊ शकत नाही असे भौतिकशास्त्र सांगते व हजारो मैलांचे अंतर प्रवासायला प्रकाशालासुद्धा काही क्षणांचा तरी काळ लागतोच. मात्र ह्या प्रयोगात, एवढे मोठे अंतर

असून सुद्धा, दोन्ही इलेक्ट्रॉनवर त्या प्रयोगाचा प्रभाव नेमक्या एकाच क्षणी होतो. मग हा संदेश इकडून तिकडे जातो कसा?

शास्त्रज्ञांच्या मते स्पंदाच्या पातळीवर एक प्रकारचे ऐक्याचे नाते असते. हे नाते देश आणि काळाच्या प्रभावाखाली नसते. दोन इलेक्ट्रॉमध्ये ऐक्य प्रस्थापित करणारे हे देशकालातीत नातेच EPR प्रयोगाच्या विलक्षण निष्कर्षाला कारणीभूत ठरते.

शास्त्रज्ञांच्या मते ह्या ऐक्यामुळे "एका इलेक्ट्रॉनवर प्रयोग केला" ह्या भाषेलाही येथे अर्थ नाही. "दोन इलेक्ट्रॉनच्या संहती किंवा एकीकरणावर" प्रयोग केला असे म्हणणे जास्त उचित आहे व म्हणूनच दोन्ही इलेक्ट्रॉनवर एकाच वेळी EPR प्रयोगाचा परिणाम होतो.

स्पंदाच्या पातळीवर ह्या ऐक्याच्या नात्याला शास्त्रज्ञ "non-local connections" किंवा "अस्थानीय परस्परसंबंध" असे म्हणतात. अशा प्रकारच्या non-local connections मुळे ब्रह्मांडातील कोठलाही घटक हा इतर सर्वच्या सर्व घटकांशी जोडलेला असतो, असे काही शास्त्रज्ञ मानतात व त्यामुळे विश्वाचे एकेक "घटक" हे मूलभूत सत्य असल्याची पूर्वीची कल्पना त्याज्य ठरली आहे. त्या उलट संपूर्ण ब्रह्मांडाचे अद्वैत नाते हेच मूलभूत सत्य आहे, असे ते म्हणतात.

Bernard d'Espagnat आणि David Bohm ह्यांसारखे शास्त्रज्ञ असे म्हणतात की, सर्व वस्तू इतर सर्व वस्तूंशी अक्षरशः जोडल्या गेलेल्या आहेत आणि अशा प्रकारच्या अखंड दृष्टीनेच आपण ब्रह्मांडाकडे पाहवयाला शिकलो तर (अद्यापि न समजलेल्या) मानवी चैतन्यासारख्या विषयांचे आकलन आपल्याला होऊ शकेल. (Theorists such as d'Espegnat and David Bohm argue that we must accept that, literally, everything is connected to everything else and only a holistic approach to the universe is likely to explain phenomena such as human consciousness" - quoted in 5, p.229-230)

सारांश, गेल्या शंभर वर्षात भौतिकशास्त्रामध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत. साधारणपणे ह्या शास्त्राचा प्रवास तीन दिशांनी चाललेला दिसतो. कणत्वाकडून स्पंदत्वाकडे, जडत्वाकडून चैतन्याकडे आणि अनेकत्वाकडून

ऐक्याकडे. हे तिन्ही प्रवाह अजूनतरी पूर्णतेला गेलेले नाहीत; पण शास्त्रज्ञ अधिकाधिक संशोधन व विचार करतील तसे भौतिकशास्त्र नक्कीच जास्त प्रगत होत जाईल. स्पंदशास्त्र आणि भौतिकशास्त्र ह्यांच्यातील जे साम्य आज दिसायला लागलेले आहे, त्या नात्याचे नेमके स्वरूपही काळ लोटेल तसतसे अधिक स्पष्ट होईल असे वाटते.

**संदर्भ :**

१) डॉ. केशव रामचंद्र जोशी - **शक्तिपातयोगरहस्य अर्थात् सिद्धमहायोगशास्त्र - खंड पहिला**, (द्वितीयावृत्ती), सिद्धयोग प्रकाशन, १९८९.

२) डॉ. केशव रामचंद्र जोशी - (संकलक), **स्पंदशास्त्र अर्थात् सिद्धयोग साधन पद्धती,** (द्वितीयावृत्ती), प्रकाशक : सिद्धयोग प्रकाशन-२००१

३) N.C.Panda, **Maya in Physics**, Motilal Banarsidas Publishers Private Limited, Delhi, 1991.

४) Fritjof Capra, **The Turning Point**, Flamingo, 1983.

५) John Gribbin, **In Search of Schrodinger's Cat** - Quantum Physics and Reality, Black Swan edition, 1991.

६) Fritjof Capra, **The Tao of Physics** : an exploration of the parallels between modern physics and Eastern mysticism, 3rd edition, Flamingo, 1982.

७) Paul Davies, **God and the New Physics**, Penguin Books, 1983.

८) Roger Penrose, **Shadows of the Mind** - a search for the missing science of consciousness, Oxford University Press, 1994.

९) डॉ. केशव रामचंद्र जोशी ह्यांची पुस्तके व त्यांच्याशी झालेल्या चर्चा.

* * * * *

## परिशिष्ट क्रमाङ्क २

## स्पंदकारिकांची अकाविल्हे सूची

| अ. क्र. | श्लोकार्ध | पृष्ठांक |
|---|---|---|
| | **अ** | |
| १ | अगाधसंशयाम्भोधिसमुत्तरणतारिणीम्। | ४८३ |
| २ | अतस्तत्कृत्रिमं ज्ञेयं सौषुप्तपदवत्सदा। | १९२ |
| ३ | अतिक्रुद्धः प्रहृष्टो वा किं करोमीति वा मृशन्। | २७६ |
| ४ | अतो बिन्दुरतो नादो रूपमस्मादतो रसः। | ३९९ |
| ५ | अतः सततमुद्युक्तः स्पन्दतत्त्वविविक्तये। | २६४ |
| ६ | अनेनाधिष्ठिते देहे यथा सर्वज्ञतादयः। | ३८२ |
| ७ | अन्यथा तु स्वतन्त्रा स्यात् सृष्टिस्तद्धर्मकत्वतः। | ३६४ |
| ८ | अप्रबुद्धधियस्त्वेते स्वस्थितिस्थगनोद्यताः। | २५१ |
| ९ | अयमेवोदयस्तस्य ध्येयस्य ध्यायिचेतसि। | ३४१ |
| १० | अवस्थायुगलं चात्र कार्यकर्तृत्वशब्दितम्। | २०० |
| ११ | अहं सुखी च दुखी च रक्तश्चेत्यादिसंविदः। | ७३ |
| | **इ** | |
| १२ | इति वा यस्य संवित्तिः क्रीडात्वेनाखिलं जगत्। | ३२१ |
| १३ | इयमेवामृतप्राप्तिरयमेवात्मनो ग्रहः। | ३४३ |
| | **ए** | |
| १४ | एकचिन्ताप्रसक्तस्य यतः स्यादपरोदयः। | ३९२ |
| | **क** | |
| १५ | कार्योन्मुखः प्रयत्नो यः केवलं सोऽत्र लुप्यते। | २०८ |
| | **ग** | |
| १६ | गुणादिस्पन्दनिष्यन्दाः सामान्यस्पन्दसंश्रयात्। | २४३ |
| १७ | ग्लानिर्विलुम्पिका देहे तस्याश्चाज्ञानतः सृतिः। | ३८९ |

* * * * *

# परिशिष्ट क्रमाङ्क ३

## विशेष शब्द, संदर्भ ग्रंथ व ग्रंथकार, सूची

* * * * *

*प.प्र - पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना,
**द्वि.प्र - द्वितीय आवृत्तीची प्रस्तावना,
***वि.प्र - विषय प्रवेश

# स्पंदशास्त्र - साररुप विषय

।। ॐ नमः स्वस्पन्दात्मसंविन्मूर्तये शम्भवे ।।

स्वत: परमतत्त्व 'स्पंद' शब्दाने आपल्याला प्रकट करीत असते. सात मजली महालावर जाण्यासाठी ज्याप्रमाणे जिन्याची किंवा नदी पार करुन जाण्यासाठी नावेची नितांत आवश्यकता असते त्याचप्रमाणे श्रीभगवंताच्या प्राप्तीसाठी सिध्दयोगशास्त्राची नितांत आवश्यकता आहे. यामुळेच सिध्द व साधारण पुरुषांमध्ये एक विलक्षण संबंध प्रस्थापित होतो. या संबंधाशिवाय साधारण पुरुषाला यथार्थ तत्त्वाची अनुभूती कदापीही होऊ शकत नाही. या ग्रंथामध्ये स्वस्पंद हे वाच्य म्हणजे लक्ष्य आहे व शब्द हा वाचक म्हणजे उपाय आहे. स्पंद शब्दाचा अर्थ किंचित् हलणे असा आहे. अत्यंत शांत व निस्तरंग परमात्म्यामध्ये एकावेळेला सर्व रुपाने प्रकट होण्याची योग्यता असते. त्यालाच किंचित् चलन असे म्हणतात. यामुळे त्याच्या निर्विकल्पतेचा भंग होत नाही. व्यवहारामध्ये जेवढे ज्ञान होत असते त्यात पदार्थांच्या उदयाचा क्रम अंतर्निहित असते. परंतु याच्याही पलीकडे एक विलक्षण अनंत चिद्रूप असा प्रमाता म्हणजे ज्ञाता किंवा संविद् आहे. खरे पाहिले तर तोच श्रीमहेश्वर आहे. त्याच्यामुळेच सर्व भेदांची सिध्दी होत असते म्हणजे त्याच्यामुळेच सर्व भेद दृष्टिगोचर होत असतात. हे तत्त्वच चित्, संवित्, ज्ञान व बोध या नावांनी प्रसिध्द आहे. वस्तुत: या तत्वाला कसलेही आवरण नसल्याने व ते चित्स्वरुप असल्याने दिशा व काल हे भेद या तत्त्वाच्या ठिकाणी नाहीत. त्या विरहित हे केवळ अद्वितीय आहे. हे तत्त्व केवळ श्रध्दागम्य, दृष्टीच्या पलीकडे असलेले किंवा अदृश्य असे परोक्ष तत्त्व नसून स्वत:ला अनुभवाला येणारे असे प्रमाणभूत तत्त्व आहे. **हाच शक्तितत्त्वाचा परमेश्वर म्हणजे आत्मचिंतामणी आहे.**